म. ग्रं. सं. ठाणे
काव्य
३३८

# काव्यसंग्रह.

## गुच्छ दुसरा.

श्रीदेवनाथमहाराजांची कविता.

[ प्रस्तावना, टीपा, सूचि व कोश यांसह

संपादक
अच्युत सिताराम साठे, एम्. ए., बी. एल.
[illegible] निळकंठ पांडे वकील, दर्यापूर
श्रीकृष्ण सखाराम अग्निहोत्रि

REFBK-0001188

नानाराम साठे, [illegible], [illegible]

किंमत २ रुपये.

र. क्र. ......

# वैदर्भकाव्यसंग्रह गुच्छ दुसरा.

११८८

## श्रीदेवनाथमहाराजांची कविता.

[ प्रस्तावना, टीपा, सूचि व कोश यासह ]

संपादक

अच्युत सिताराम साठे, एम्. ए., बी. एल.
सुंदर निळकंठ पांडे, वकील, कारंजा.
पांडुरंग सखाराम अग्निहोत्रि.

REFBK-0001188

सन १९१५

किंमत २ रुपये.

हे पुस्तक पुणें येथें "आर्यभूषण" छापखान्यांत महेश अप्पाजी द्रविड यांनीं छापिलें व अच्युत सीताराम साठे, यांनीं बुलढाणा येथें प्रसिद्ध केलें

# समाप्तीचे बोल.

१ देवनाथमहाराजाची कविता ४९२ पदें टीपा व प्रस्तावना सूची आणि कोश यासह वाचकांना आज सादर करीत आहों या पुस्तकाच्या अगोदर आम्हीं देवनाथांचे शिष्य दयाळनाथ याची कविता छापून प्रसिद्ध केली, आणि त्या पुस्तकात आगाऊ कळविल्याप्रमाणें आतां ही कविता छापली. या कविता मिळवितांना अगर पुढें टीपा वगैरेंच्या कामीं ज्यांनीं मदत केली त्यांचे आभार प्रस्तावनेंत मानले आहेतच. हिंदुस्थानी कविता शुद्ध करण्याच्या कामीं माझे मित्र मि. लक्ष्मीनारायण, बी. ए., एल एल. बी., जादा सेशन्स जज्ज रायपूर, व बुलढाणा येथील रा. लक्ष्मीप्रसाद तिवारी व ब्ऱ्हाणपूर येथील नाथमठातील श्रीगोविंदनाथ यांनीं जी मदत केली तीबद्दल तसेंच आर्यभूषण छापखान्याचे उत्साही व आस्थेवाईक मॅनेजर रा. अनंतराव पटवर्धन, बी ए, यांनीं हें पुस्तक व 'मासिकमनोरंजन'चे मालक श्रीयुत काशिनाथ रघुनाथ मित्र यानीं दयाळनाथाचें पुस्तक, हीं दोन्ही होतील तितकीं चांगलीं व लवकर निघण्याबद्दल जी मदत व काळजीपूर्वक सूचना केल्या त्यांबद्दल आम्ही त्यांचे फार आभारी आहों

२ पूर्वी १७५ पदें छापलीं होतीं तीं आतां ४९२ उपलब्ध झालीं आहेत, व मराठी भाषेंतील एका रसाळ कवीच्या कृतीचें यथामति व सांगोपांग विवेचन या सहाशें पानांत सांपडेल. धंदेवाइकाखेरीज इतर गृहस्थांनीं ग्रंथप्रकाशन करणें हें अर्थनीतीला विसंगत आहे हल्लीं इतिहास व काव्य यांची अभिरुचि थोडी इतिहाससंशोधक राष्ट्राला सांगणार कीं, प्रत्येक जुनें चिटोरें महत्त्वाचें, आणि आम्हांला पोतींच्या पोतीं उपलब्ध होतील तीं आम्ही छापून तुमच्यावर लादणार. काव्यसंशोधक म्हणणार कीं, प्रत्येक जुन्या पदाची ओळ ईश्वरस्फूर्तीनें झाली आहे, आतांपर्यंत काव्य उपलब्ध झालें आहे त्याच्या हजारपट व्हावयाचें आहे. वाचकवर्गाकडून धड 'काव्यसंग्रहाला' मदत झाली नाहीं व 'महाराष्ट्र कवी' ही बंद पडला, हा समाजाचा संशोधकवर्गाला जबाब आहे मोंगलाईंतील मराठी कवि झाला तरी त्याच्या प्रकाशनाची जबाबदारी तिकडील महाराष्ट्रसंघानें न ओळखता तीही रा. राजवाड्यांनींच

ओळखावी, आणि नागपूर ग्वाल्हेरच्या इतिहासाचे कागदपत्र असले तरी त्याबद्दल वाटल्यास रा. ब. पारसनीस अगर रा. खरे यांनीं छाननी करावी, जागच्या विद्वानांना त्याबद्दल औदासीन्य आहे अशा स्थितीत पूर्वसंशोधनाचे काम नीट व्हावयाला एकेका जिल्ह्यांतील लोक आपापल्या कार्यक्षेत्रांतील पूर्व ज्ञानाचें प्रकाशन करावयाला लागले तरी प्रत्यक्ष कार्य बरेंच घडेल असे वाटून केलेल्या प्रयत्नाचें फळ हीं दोन पुस्तकें होत. दयाळनाथांची कविता प्रसिद्ध केली तेव्हां श्री. रा. रा. यशवंत गोविंद देशपांडे, अंजनसिंगीकर, बी. ए., एल एल. बी. व श्री. रा. रा. माधव बळिराम गणोरकर, बी. ए., एल एल. बी., उभयतां हायकोर्ट वकील, उमरावती, यांनीं उदारपणानें प्रत्येकानें पन्नास पन्नास रुपयांचीं पुस्तकें घेतलीं, व श्री. रा. नानासाहेब केलकर यांनींही पधराची घेतलीं इतर मित्रांनीं पुस्तकें खपविण्याच्या कामीं मदत केल्यामुळें खर्च भरून आला, आणि रा. देशपांडे व गणोरकर याची रक्कम या दुसऱ्या पुस्तकाकरिता शिल्लक राहिली. या सर्वांचे येथें सप्रेम आभार मानितो.

३ तथापि रा. देशपांडे अथवा रा. गणोरकरांसारखे मदत करणारे दर ठिकाणीं मिळणें कठीण आणि मुंबईकडील प्रकाशक नवीन काव्यग्रंथ हातीं घ्यावयाला बिचकतात, सबब या पुस्तकाबद्दल वेगळीच व्यवस्था करावी लागली. हा ग्रंथ मुंबई व पुणें येथील नामांकित छापखानेवाल्यांना एक कवडी मोबदला न घेतां फक्त प्रेसबिलावर द्यावयाला तयार झालों, पण मोठें बुक किंवा दूर प्रांतांतील कवि म्हणून हें ओझें उचलावयाला प्रकाशक तयार होत नाहीं. ग्रंथ तयार होईपर्यंतचे कष्ट आम्हीं केले, व पुढील व्यवस्था श्री. रा. रा. कृष्णराव गोपाळ देशपांडे, बी. ए., एल एल. बी., ॲडव्होकेट, उमरावती, यांच्या पुढारीपणानें पार पडली, आणि या पुस्तकप्रकाशनाच्या नफानुकसानीला (बहुतेक नुकसानीलाच) जबाबदार म्हणून खालील फंड जमला :

रु. १०० श्री. रा. रा. कृष्णराव गोपाळ देशपांडे, ॲडव्होकेट, उमरावती.

रु. १०० श्री. रा. सा. केशव विश्वास ब्रह्म, हायकोर्ट वकील, उमरावती.

रु. १०० रा. रा. अच्युत सीताराम साठे, जज्ज, उमरावती.

रु. १०० श्री. रा. रा. रघुपतराव दाजीसाहेब देशपांडे, सुरजी अंजनगाव.

रु. ५० श्री. रा. रा. गोविंद कृष्ण पर्वते बी. ए., एल. एल. बी. वकील, दर्यापूर.

रु. २५ श्री. रा. सुंदर निळकंठ पांडे, वकील, दर्यापूर.

२५ अकोला–साहित्यपरिषद् रा. ब. वि. मो. महाजनींमार्फत

ही रक्कम, व दयाळनाथांच्या पुस्तकाच्या विक्रींतील शिल्लक राहिलेले श्री. रा. यशवंतराव देशपांडे व श्री. रा. गणोरकर या दोघांचे शंभर रुपये, प्रेसच्या हवालीं केले आहेत. पुस्तक खपून शिल्लक राहिली तर ती श्री. रा. कृष्णराव गोपाळ ऊर्फ भाऊसाहेब देशपांडे हे अंजनगावच्या मठाच्या मदतीकरितां अगर वऱ्हाडच्या प्राचीन कवींची इतर कविता प्रसिद्ध करण्याकडे दुसरी म्हणून लावतील. या पुस्तकावर मालकी आमची नाही. याची आवृत्ति काढण्याचा प्रसंग आला आणि कोणीं जास्ती पदें मिळवून काढली तर आम्ही आनंदाने मदत करूं. हा यत्न पोटाकरितां केलेला नव्हे, तेव्हां यांत कॉपी-राइटचा प्रश्न नाहीं. छापणावळ अथवा प्रकाशन-खर्च भरून निघाला, तर वरील फंड देणारी मंडळी आपापली रक्कम परत काढून घेईल, किंवा नव्या एखाद्या काव्यग्रंथाला अगर इतिहासग्रंथाला तोच फंड मदत देईल. नुकसान आलें, तर वाचकवर्गाची व काव्यसंशोधनाची प्रारब्धसीमा किती आहे याचा अंदाज कळेल, आणि आम्ही आपला यत्न वैदर्भकाव्यसंग्रहाच्या या दुसऱ्या भागाबरोबरच आटोपता घेऊं. श्री. गोपाळनाथ गोसावीनंदन, शिवदिनकेसरी, गोविंदनाथ, इत्यादि बरीच चांगली कविता वऱ्हाडांत उपलब्ध होण्याजोगी आहे, तथापि वाचकवर्ग उदासीन असला तर विनाकारण काव्यप्रकाशन करून पुराणकवींचा अपमान करावा, कीं, वरील पुंजी संपेपर्यंत प्रकाशन करीत जावें, हा प्रश्नच आहे. ज्यांनीं फंड दिला त्यांनीं तो अशा सत्कार्यांतून परत घेण्याकरितां नव्हे, पण निष्कारण कागदांत अडकण्यापेक्षां त्याच्या घरीं गेलेला बरा. खर्चापुरतीं पुस्तकें खपत गेलीं, तर फंडही जास्त जमूं शकेल. या व्यवहाराच्या प्रश्नाचा विचार संशोधकसमाज व साहित्यपरिषद् यांनीही करावा असें आम्ही सुचवितों. आमची सेवा समाजानें गोड मानून घ्यावी अशी सादर विनंति आहे.

# देवनाथांचें चरित्र, काव्यकला व कविता.

## पूर्ववृत्त व ग्रंथारंभ.

१ आम्ही दयाळनाथांच्या निबंधांत लिहिल्याप्रमाणें 'काव्यसंग्रह' मासिक पुस्तकामध्यें देवनाथांची कविता छापण्याला कै. वामन दाजी ओक या रसिक कविश्रेष्ठांनीं सुरुवात केल्यापासून सर्व महाराष्ट्रीयांचें लक्ष या अपूर्वलाघवी कवीकडे वेधलें, आणि रा. कावतकर, सरमोकाद्दम, शिंगबाळ आणि वैशंपायन यांच्या साह्यानें चार वर्षांच्या अवकाशांत रा. वामनरावजींनीं देवनाथांचीं सरासरी दोनशें पदें छापून काढलीं. जास्ती मिळेल तितकी कविता छापून काढण्याची त्यांची इच्छा व क. जावजीशेटजींची हिम्मत असूनही त्या वेळीं मठाधिकाऱ्यांनी पदें देण्याचें नाकारलें, यामुळें नाइलाजास्तव महाराष्ट्रीय वाचकवर्गाला या अमृतरसाचा पूर्णास्वाद घेतां आला नाहीं. शिवाय देवनाथांचे पणजेगुरु रंगनाथ व गोपालनाथ आणि शिष्य दयाळनाथ यांची बरीच कविता आपल्या संग्रहीं असून, श्रीदेवनाथांच्या पुस्तकाला लोकाश्रय मिळाल्यास सदरहु साधुत्रयींच्या प्रासादिक कवितेचा जीर्णोद्धार करण्याचा आपला मानस असल्याचें काव्यसंग्रहकारांनीं आपल्या प्रस्तावनेंत कळविलें होतें. त्यानंतर दहा वर्षांनी देवनाथांच्या ग्रंथाची दुसरी आवृत्ति निघाली, आणि गेल्या सालीं तिसरी आवृत्ति निघाली. परंतु पूर्वींच्या आवृत्तीपेक्षां नवीन आवृत्तींत जास्त पदें अगर माहिती हीं कांहींच आलीं नाहींत. याचें कारण काव्यसंग्रहकार रा. ओक व केळकर यांचा अकालमृत्यु, खुद्द काव्यसंग्रहाचें परनिर्याण, आणि त्यानंतर पुराणकाव्यप्रकाशनेच्छूंना सहकारी प्रयत्न करण्याच्या साधनांचा अभाव, हेंच दिसतें. ठाणें येथील प्रसिद्ध विद्वान् व कसलेले लेखक रा. विनायक लक्ष्मण भावे यांनीं चार वर्षें चालविलेलें 'महाराष्ट्रकवि' मासिक पुस्तक आज अस्तित्वांत असतें तरी देखील पुष्कळ उपयोग झाला असता. रा. भावे यांच्यासारख्या कर्तृत्वक्षम पुरुषांच्या हातून या कार्याचा उपक्रम पुन्हा लवकरच होईल अशी बळकट आशा आहे.

२ काव्यसंग्रहांत देवनाथांची कविता पहिल्या प्रथम प्रसिद्ध झाली, तेव्हां ती सर्व देवनाथांच्या मठाचे अधिपति यांनीं शुद्ध करून दिली होती हा मठ वऱ्हाडांत जिल्हा उमरावती, तालुका दर्यापूर, मौजे सुरजी अजनगांव, येथे आहे शाहणूर नदीच्या काठीं लहानशा वृक्षराजींनें मंडित, देवनाथांचें प्रथम उपास्य श्रीमारुतिराय यांच्या अनाच्छादित परंतु विस्तीर्ण अशा ओट्याशेजारी, आणि तेव्हांपासून आतापर्यंत दैववान् असणाऱ्या सुरजीकर देशपांड्याच्या वाड्याजवळचा हा मठ शंभरांहून अधिक वर्षे भगवन्नामस्मरणाचें ऊर्ज्जस्वल ध्येय इकडील लोकांच्या नजरेसमोर ठेवीत आहे प्राणापलीकडे पिढ्यान्-पिढ्या जपून ठेविलेले गुरुपरंपरेचे काव्यग्रंथ दुसऱ्याच्या स्वाधीन करण्याला सर्व मठाधिपति नाराज असतात; कारण गेलेल्या पोथ्या परत येणें बहुतकरून मुष्किल असतें परंतु 'काव्यसंग्रहकारा'नीं पहिल्यानें देवनाथांची कविता छापावयाला सुरुवात केली तेव्हां तत्कालीन सुरजी मठाचे अधिपति **श्रीभालचंद्रनाथ महाराज** यांनीं फक्त बाहेरून मिळालेलीं पदें दुरुस्त करून दिलीं; बाकी अस्सल पदें देण्याचें नाकारिलें याबद्दल काव्यसंग्रहकार आपल्या सूचनेमध्यें लिहितात—"हें काम इतक्या चांगल्या रीतीनें तडीस जाण्यास आमचे मित्र रा कावतकर हे कारण आहेत छापलेल्या पदांपैकीं बरींच पदें कावतकर यांनीं सुरजी येथील मठांतील अस्सल प्रतीवरून शुद्ध करून पाठविलीं रा कावतकर यांस अस्सल प्रती मठांतून पाहण्यास मिळत असत.. ...बाहेरून मिळतील तेवढीं पदें मठांतून शुद्ध करून देण्याची मठाधिपतींनीं कृपा केली हे त्यांचे सर्व महाराष्ट्रीयांवर उपकार आहेत देवनाथ महाराजांची आज्ञा नसल्यामुळें आणखी पदें देण्याचें मठाधिकाऱ्यांनीं नाकबूल केलें ही निरुपायाची गोष्ट समजली पाहिजे "

३ सदरहु मठाधिकारी म्हणजे गेल्या सालीं समाधिस्थ झालेले श्रीभालचंद्रनाथ हे होत यांनीं स्वतः चारपांचशें चांगलीं पदें केलेलीं आहेत काव्यसंग्रहांतील देवनाथचरित्रांत, देवनाथसांप्रदायाचे सत्रावे अधिपति रामकृष्णनाथ हे तारीख १ मे १८९१ ला स्वर्गस्थ होऊन हल्ली अठरावी पिढी चालू आहे, असें लिहिलें आहे म्हणजे १८९१ पासून १९११ पावेतों वीस वर्षे श्रीभालचंद्रनाथ हे मठाधिपति होते यांची कीर्तनशैली फार अप्रतिम, पुराणकवीवरचा व्यासंग दांडगा, मनवाली फकीरी वृत्ति, आणि व्यवहारज्ञ असा सुस्वभाव, यामुळें, यांच्या दर्शनाचा सुयोग सुरजी येथील मठांत जुळून आल्यावर, आम्हीं यांना देवनाथदयाळनाथांच्या कवितांबद्दल पुन्हा विनंति केली, आणि ती त्यांनी उदारपणानें मान्य केली मठाचे निस्सीम

शिष्य व पुरस्कर्ते श्रीमंत रघुपतराव दाजीसाहेब देशपांडे सुरजीकर आणि त्यांचे नातू श्रीमंत यशवंतराव बापूसाहेब देशपांडे या उभयतांनीं सुरजी अंजनगांव येथील शाळामास्तरांच्या मदतीनें व श्रीमंत रा रा वासुदेव विठ्ठल ऊर्फ अण्णासाहेब चांदेकर, तहशीलदार दर्यापूर, यांच्या देखरेखीखालीं मठसंग्रहाचें संशोधन केलें, आणि आम्हाला शुद्ध प्रती पाठवून दिल्या, याबद्दल आम्ही सर्वांचे फार ऋणी आहों रा दत्तोपंत कापशे व रा सदाशिवनाथ साने, हरिदास रामटेक, यांनी दयाळनाथाच्या उमरेड येथील मठांतून व दयाळनाथांचे दौहित्र यांच्या साहाय्यानें श्रीक्षेत्र रामटेक येथील लक्ष्मणाच्या पड्यांकडून आणखी कविता मिळविली याशिवाय वऱ्हाडांतील जागोजागच्या लोकांनीं बरीच कविता दिली त्यांचें उतराई म्हणून दयाळनाथांच्या नव्वद पदांचा संग्रह आम्हीं नुकताच प्रसिद्ध केलेला आहे, व देवनाथांचीं एकंदर पांचशें पदें आमच्याजवळ आहेत, ( यांत दोनशें काव्यसंग्रहांत पूर्वीं छापलीं गेलीं आहेत ) तीं हल्लीं आम्ही छापवीत आहों दयाळनाथांच्या शिष्यपरंपरेपैकीं सुरजीमठाध्यक्ष श्रीजयकृष्णनाथ, श्रीरामकृष्णनाथ व श्रीभालचंद्रनाथ यांचीही कांहीं कविता आम्हांस मिळालेली आहे या शिष्यत्रयांचे गृहस्थाश्रमी शिष्य फार सधन, समर्थ व चोहोंकडे पसरलेले आहेत ते पुढेंमागें आपल्या गुरूच्या—विशेषेंकरून श्रीभालचंद्रनाथांच्या—कवितेचें प्रकाशन करतील अशी आशा आहे हल्लीं त्या गादीवर बसलेले गृहस्थ उमरेड येथील असून त्याचें नांव **श्रीमारुतिनाथ ठेविलें आहे.**

४ कविता छापण्याबद्दलचा इनकार श्रीरामकृष्णनाथ यांचा मुख्यत्वें होता देवनाथांच्या वेळीं अगर पुढेंही कविता भक्तिभावानें उतरून घेण्याला कोणाचीही मनाई नव्हती, तथापि मठांतील बस्तावरून पदशुद्ध उतरण्याचा यत्न व श्रम न करितां द्रोणागिरिला औषधिसंग्रहासह उचलून नेणाऱ्या श्रीमारुतीच्या कीर्तीला मागें टाकणारें आणि बस्तांच्या बस्ता गडप करणारें भक्तमंडळ मठाला अपरिचित नव्हतें अशा गेलेल्या कांहीं बस्ता दुर्दैवानें पुढें केव्हांही हातीं न लागल्यामुळें व नेणारांच्या जवळही न राहल्यामुळें मराठी कवितेचें फारच नुकसान झालें आहे हें सांगणें नकोच तथापि हा आक्षेप रा कावतकर अगर देशपांडेमंडळ यांच्यासंबंधानें अर्थातच लागू नव्हता खरी गोष्ट अशी झाली कीं, एकदां श्रीरामकृष्णनाथ हे रस्त्यानें चालले असतां तुकाराममहाराजांच्या छापील गा ची पानें कोणा संग्रहेच्छु काव्यलोलुपाच्या केरकचऱ्याबरोबर जाऊन उकिरड्याचें विश्रामधाम करून

राहिलीं होतीं साधुनिष्ठ अशा त्या महात्म्याला ग्रंथाची अशी दुर्दशा झाल्याचें पाहून फार वाईट वाटलें; त्यांनीं ती पोथी घरीं आणिली, धुतली, पूजिली, आणि जतन केली तेव्हांपासून छापण्याकरितां कोणी कविता मागावयाला गेला तर ते नाहीं म्हणत, आणि हाच क्रम पुढे भालचंद्रनाथांनीं चालू ठेविला इतक्या प्रेमळ गुरुभक्तीला ब्राह्मसमाजाशीं असे कठोरवृत्तीचें कवच ठेवावें लागले, आणि यामुळेंच जागोजाग पोथ्यापुस्तकें आजपर्यंत बचावलीं सध्याच्या परिस्थितीमध्यें ज्याला पुराणग्रंथ जपून ठेवावयाचे असतील त्यानें मठांतून ठेवावे, किंवा ब्रिटिश म्यूझियमकडे पाठवावे मुंबई-च्या एशियाटिक सोसायटीमध्यें ठेविलेला ग्रांट डफसाहेबांचा अमूल्य इतिहास-संग्रह काय झाला, याचा पत्ता लागत नाहीं, आणि आपल्या मंडळीमध्यें बऱ्याच जणाकडे गेलेल्या पोथ्याची नांवनिशाणी लागत नाहीं, हें सर्वविश्रुत आहे दिवसेंदिवस मठपतींची ही संग्रहैकनिष्ठवृत्ति नाहींशी होत चालली आहे, आणि यामुळे जुन्या ग्रंथाना याहीपेक्षां वाईट दिवस येणार आहेत ही गोष्ट लक्षात आणून श्रीभालचंद्रनाथांनीं, पहिला रा कावतकरांना दिलेला नकाराचा जबाब ध्यानीं न आणतां, आपल्याजवळच्या देवनाथदयाळनाथांच्या पद-संग्रहाच्या नकला आह्मांला घेऊं दिल्या बरीचशीं पदें सांप्रदायिक असल्या-मुळे टीपा देण्याच्या वेळीं आम्हाला मदत करण्याचा त्यांचा आशीर्वाद होता, परंतु गेल्या सालीं पंढपुरच्या यात्रेला गेले असतां एकाएकीं त्यांचें देहा-वसान झालें, व त्यांचें ज्ञान त्यांच्याबरोबरच गेलें ते वारले, यामुळें कविता छापण्याबद्दलच्या त्यांच्या नकाराचा हा खुलासा आम्हीं केला आहे; एरव्हीं रा ओकांसारख्या पुण्यवंताचा शब्दसायक वृथा जावयाचा नव्हे श्रीदेवनाथांची आणखी कांहीं कविता व श्रीगोविंदनाथांची बरीचशी कविता ब्रह्माणपुरला श्रीभगवतनाथ यांच्याजवळ आहे, व ती त्यांनीं परमकृपाळू होऊन आम्हांस द्यावयाचें कबूल केलें आहे, याबद्दल आम्ही त्यांचे फार फार आभारी आहों. ती कविता आम्ही मिळाल्यास प्रसिद्ध करूं

काव्यसंग्रहाच्या कामीं किती अडचणी आहेत, त्या पुढें कसकशा वाढत जाणार, आणि बखरी व गाथा या दिवसेंदिवस होळींत अगर कचऱ्यांत नष्ट होत गेल्यामुळे प्राचीनकाव्येइतिहाससंशोधन कांहीं दिवसांनीं किती कठीण होणार, याची आपल्या मंडळीला थोडी ओळख होऊन प्रकाशनाच्या नाहीं तर निदान संग्रहाच्या कामीं तरी त्यांनीं थोडेसें झटावें, या आशेनें या पूर्व-प्रयत्नांचें विस्तृत वर्णन दिलें आहे वाचक याबद्दल क्षमा करोत प्रणिपात,

परिप्रश्न आणि सेवा या तिन्हीं उपार्जनसाधनांपैकीं जेव्हां जें कामीं पडेल तसा त्याचा उपयोग करून साधकानी पुराणग्रंथसाधन करावें अशी त्यांना विनति आहे

५ काव्यसंग्रहांत नाथपंथाच्या अठरा पिढ्याचें वर्णन दिलें आहे, त्यांत आदिनारायण, ब्रह्मदेव, अत्रिनाथ व दत्तात्रेय हे चार अमानुष व अनाद्यत गुरु झाले. तेथून अर्वाचीन कालांतील शिष्यपरंपरा अशी आहे:—

(५) जनार्दनस्वामी देशपांडे चाळिसगांवकर[1], जन्म शके १४२६=इ स १५०४, मृत्यु शके १४९७=इ स १५७५.
|
(६) श्री एकनाथमहाराज (शके १४७०–१५३१, इ स १५४८–१६०९.)
|
(७) नित्यानंद (पहिलें नांव गवाबा यानीं नाथांचें रामायण पूर्ण केलें)
|
(८) कृष्णनाथ
|
(९) विश्वंभरनाथ
|
(१०) मुरारनाथ
|
(११) रंगनाथ
|
(१२) गोपाळनाथ
|
खंडेराय — बाळनाथ — (१३) गोविंदनाथ — शेखसुलतान — अचलनाथ

(१३) गोविंदनाथ
|
(१४) देवनाथ
|
आत्माराम (नागपूर प्रांतांतील) — रामराव काळी एलिचपुरकर — (१५) दयाळनाथ — मल्हारनाथ ग्वालेरकर — सख्या गोपाळ पंढरपूर

सख्या गोपाळ पंढरपूर
|
माधव

---

१ यांचे गुरु नृसिंहसरस्वती, गुरुचरित्राचे नायक, यांचे नांव या परंपरेंत असावयाला पाहिजे. वाचकांनीं मत कळवावीं

६ रा सहस्रबुद्धे व रा विनायक लक्ष्मण भावे हे एकनाथांचा जन्मकाल शके १४७० व समाधिकाल शके १५३१ (इ० स० १५४८—१६०९) असा देतात. सन १८८६ च्या नवनीताच्या प्रस्तावनेंत मृत्युशक शके १५४६, म्हणजे पधरा वर्षें नतर ओढला आहे रा पांगारकर हे मृत्युशक शके १५२१, म्हणजे १० वर्षें अगोदर धरतात कृष्णदयार्णव व राघवकवि यांच्या कांहीं अप्रसिद्ध कवितेवरून त्यानीं हा शक दिलेला आहे रा पांगार-कर जन्मशक शके १४५०, म्हणजे इतर लेखकांनीं दिल्यापेक्षा वीस वर्षें अगोदर धरतात

७ नाथांचे गुरु जनार्दनस्वामी हे चाळिसगांवचे देशपांडे असून पुढें दौलताबादच्या यवनाधिपतींचे मुख्य मुत्सद्दी झाले. ह्यांचा जन्म फाल्गुन वद्य ६ शके १४२६ ला झाला असून हे आपल्या वयाच्या एकाहत्तराव्या वर्षी, म्हणजे शके १४९७ (इ स १५०४–१५७५) मध्यें वारले या वेळेला दक्षिणेतील ब्राह्मणी बादशाही मोडून आदिलशाही, कुतुबशाही, इमा-दशाही, निजामशाही, आणि बेदरशाही अशा पांच शाही झाल्यामुळें, मुसल-मानी सत्ता मोडकळीस येऊन महाराष्ट्रीय मुत्सद्दी आणि समशेरबहादुर यांच्या उदयकालाला सुरुवात झाली सरकारी दप्तर उर्दूतून मराठींत आलें. शिवाजी महाराजांचे आजे लुखजी जाधवराव याचे आजे अचलकर्ण यांना पांचहजारी मनसब मिळाली सन १५२९ मध्यें कचरसेन नावाचा ब्राह्मण बुऱ्हाणशहा याचा पेशवा झाला विजयानगरचें राज्य दक्षिणेंत हिंदुधर्माची उच्च पताका फडकवूं लागलें पुरुषार्थ आणि परमार्थ दोन्ही अत्युत्कट परा-क्रमानें हस्तगत करणारीं जीं नररत्नें यानंतर उदयाला आलीं, त्या पुण्य-श्लोकांच्या मगलगीतामध्यें आद्यनाम जनार्दनस्वामींचें लागतें

८ नाथांनीं भावार्थरामायण युद्धकांडाच्या चव्वेचाळिसाव्या अध्याया-पर्यंत सपविलें, आणि आपला निर्याणकाल आला हें त्यांनीं जाणलें त्यांच्या येथे गंगातीरच्या विधवेने आपला गावबा नांवाचा मुलगा नाथसेवेला अर्पण केलेला होता आणि पुरणपोळीचें नित्यश्रीर्नित्यमंगल असल्याखेरीज त्याचें पोटभर जेवणच होत नसे हल्लीप्रमाणे बहुविध विद्या आंसलेल्यारेखलेल्या काळांत घोकण्याची अवश्यकता नसल्यामुळें ह्याच्या निसर्गसपन्न प्रतिभेला नाथप्रवचनश्रवणाचा चटका लागला, आणि हा रसज्ञ व स्फूर्तिपूर्ण चनला नाथांनीं मत्र देऊन पाठ थोपटल्यावर त्यांची आत्मप्रतीति साहजिक जाग-

झाला आणि त्यांनीं नाथांचा ग्रंथ पुरा केला पण यांची स्वतंत्र रचना कोठें असल्याचें ऐकिवांत नाहीं यांचेंच नांव **नित्यानंद** असें पुढें प्रसिद्ध झालें.

९ गावबा ऊर्फ नित्यानंद यांचे शिष्य कृष्णनाथ यांचा जन्म शके १५५० ( इ स १६२८ ) व अनुग्रह शके १५७६ ( इ स १६५४ ) मध्यें झाला, असें श्रीभालचंद्रनाथ आपल्या ग्रंथांत लिहितात यांचे शिष्य विश्वंभरनाथ त्यांचे शिष्य मुरारनाथ मुरारनाथांचे शिष्य रंगनाथ आमच्या मतें निगडीकर अथवा मोगरेकर या दोन्ही रंगनाथांपैकीं नाथपरंपरेंतील आमचे रंगनाथ नसावे. कारण 'योगवासिष्ठसार' नामक रंगनाथांच्या नांवावर मोडणाऱ्या ग्रंथांत निगडीकर व मोगरेकर या दोहोंच्या गुरुपरंपरा दिलेल्या आहेत, त्या वर दिलेल्या परंपरेशीं जुळत नाहींत 'कविचरित्रा'-मध्यें रंगनाथ निगडीकरांचे गुरु निजानंद, आजेगुरु पूर्णानंद, व त्याच्यावरचे सहावे गुरु दत्ताशिष्य सदानंद दिले आहेत निगडीकरांच्या गुरुपरंपरेंत एकनाथ अथवा जनार्दन यांचाही समावेश झालेला दिसत नाहीं। श्रीभालचंद्रनाथाच्या आकस्मिक मृत्यूमुळें नाथपंथाची जी बरीचशी अमूल्य माहिती आमच्यापासून दुरावली त्यामध्येंच वरील गोष्टीचाही उलगडा करून घ्यावयाचा राहिला, हें आमचें व वाचकांचें दुर्दैव आम्हीं ही शंका काढून लहान तोंडीं मोठा घांस घेतला, पण यामुळें तरी बऱ्हाणपूरकर अगर ग्वालेरकर मठाध्यक्षाचें लक्ष चौकस आणि शोधक वाचकांनीं या विषयाकडे वळवावें आणि आमचा संदेह दूर करावा निगडीकर रंगनाथस्वामी हे आपल्या वयाचे बहात्तरावे वर्षीं मार्गशीर्ष वद्य १० शके १६०६ ला ( इ स १६८४ ) वारले ते मार्गशीर्ष शुद्ध १० शके १५३४ ला ( इ स १६१२ ) जन्मले जर कृष्णनाथांचा जन्म इ स १६२८ मध्यें झाला, तर त्यांचा पणतुशिष्य काय त्यांच्यापेक्षां सोळा वर्षांनीं वयानें वडील होता ? पणजेगुरु लोकोत्तरकीर्ति व अलोकसामान्य असले तर शिष्य, नातुशिष्य व पणतुशिष्य वयानें जास्त असणें शक्य आहे पण कृष्णनाथांचा कोणत्याही संतावलीत उल्लेख नाहीं' यामुळें कोठें तरी समजुतीचा घोंटाळा आहे असें वाटतें निदान निगडीकर रंगनाथस्वामीचीं जीं पदें 'महाराष्ट्रकवि' कार रा विनायकराव भावे यांनी छापलीं आहेत त्यांत रंगनाथांचे गुरु मुरारनाथ असें नसून **निजानंद** असें दिलें आहे याचा एकच मासला पहा—

" **निजानंदीं** रगे चित्त, रगोचिना ज्याचें ॥ तोंड पाहू नका त्याचें ॥ सिद्धांत वर्णायासी भय काय त्याच्या वाचे "

यावरून देवनाथांच्या गुरुपरंपरेंतील रगनाथ हे निगडीकर अथवा मोगरे-कर या उभय रगनाथांहून भिन्न असतील असें वाटतें, व श्रीभालचंद्रनाथ यांच्या ग्रथांत जरी याबद्दल स्पष्ट खुलासा नाहीं तरी अनुमान असेंच निघतें वाचकांनीं आपले विचार व माहिती हीं कळवावीत

कृष्णानंदापासून थेट मुरारनाथांपर्यंतचा वृत्तांत अधतामिस्त्रावृत दिसतो. नाथपरंपरेचे महेश्वर, ज्ञाते आणि चाहते यांनीं मेहनत करून माहिती मिळविल्यास आणि मोठें मन करून ती प्रसिद्ध केल्यास महाराष्ट्र सारस्वता-वर त्यांचे फार उपकार होतील तसेंच रगनाथ कोणते याचा उलगडा लाग-ल्यानें नाथपंताच्या शाखा ज्या दूरवर पसरलेल्या आहेत त्यांची मूलस्तभाशीं गांठ पडेल

१० रगनाथांचे शिष्य गोपाळनाथ, गोपाळनाथांचे गोविंदनाथ, त्यांचे देवनाथ, व त्यांचे दयाळनाथ, या चारी पुरुषांवर इतिहासदीपाचा प्रकाश कमी अधिक प्रमाणानें चांगला पडला आहे सुरजी अजनगांव येथील मठां-तून आम्हाला देवनाथदयाळनाथांची कविता उपलब्ध झालेली आहे दयाळ-नाथांनीं आपले आजेगुरु गोविंदनाथ यांच्या बऱ्हाणपूर येथील समाधीशेजारीं बसून त्या वात्सल्यपूर्ण पितामहाबद्दलचें जें रसाळ स्वभावचित्र रेखाटलें आहे तें वर्णन गोपाळनाथ, गोविंदनाथ व देवनाथ या तिघांनाही लागू पडतें तें असें:—

" बालवृत्ती हे जैं बाणे । क्रीडत स्वच्छंदानें ॥
दशा उन्मत्तता तैं राहणें । अबोलची बोलणें ॥
रसना स्थिरावली । ते मीं नमियेली गुरुराज माउली ॥
राजारंक पहा समदृष्टि । पाहे दशा जैं उली ॥
पिशाच वृत्तीनें अति हट्टी । देह आपुला आटी ॥
उग्रचि दिसे भली । ते मीं नमियेली ॥ "

अलमगीर बादशहाच्या मृत्यूपासून तों पेशवाईच्या असेरपावेतों हिंदु-स्थानभर जी धामधूम उडून राहिली होती, त्यामध्यें ज्ञातींची श्रेष्ठकनिष्ठता, पथाची पात्रापात्रता, आणि एकदर राजकीय व सामाजिक निर्बंध, यांची

बरीच उचलबांगडी झालेली होती गादीचा अधिकार पुत्राला द्यावयाचा नाही, जो गुरुकृपापात्र शिष्य असेल त्यालाच द्यावयाचा, असा स्वार्थत्यागी निर्बंध एकनाथमहाराजांनी घालून देऊन हरिपंडितासारख्या विद्वान् पुत्राकडे मठपरंपरा न सोंपवितां **गवबा** ऊर्फ **नित्यानंद** यांना मठाधिपति केलें, व तोच कित्ता त्यांच्या अनुगामी पंथप्रमुखांनीं चालू ठेविला, यामुळें गोपाळनाथ, गोविंदनाथ, देवनाथ व दयाळनाथ असे विद्वान् व तपोनिष्ठ पुरुष पंथभाग्यानें गादीला लाभले गोपाळनाथ हे आश्वलायन देशस्थ ब्राह्मण गोपाळराव हे हैदराबादला एकहजारी मनसबदार असतां सरकारांनीं एका ब्राह्मणाला फाशीची शिक्षा दिली, व यांनीं पुष्कळ रदबदली केली असतां फिरवली नाहीं, सबब वैताग घेऊन यांनीं सेवाधर्माच्याऐवजीं धर्मसेवा अंगीकारिली, व पुढें यांना रंगनाथबहाद्दरांचा अनुग्रह झाला, असें श्रीभालचंद्रनाथ लिहितात. रंगनाथ हे समाधिस्थ होऊन गुप्त झाले, तेव्हा श्रीशिवाजी राजे होते असें श्रीभालचंद्रनाथ लिहितात राजे इ स १६८० मध्यें वारले, म्हणजे गोपाळनाथ हे शतायुषमानपर्यंत वाचले असें म्हणावें लागतें; कारण गोपाळनाथांनीं देवनाथांच्या जन्माच्या सुमाराला, म्हणजे इ. स. १७५४ च्या सुमाराला, समाधि घेतली शिवाजीच्या निधनानंतर हे सत्तर वर्षें जिवंत होते हैदराबादच्या दरबारांत म्हणजे गोंवळकोंड्याच्या कुतुबशाहीमध्यें, कुलीन व तेजस्वी ब्राह्मणाला एकहजारी सरदारकी मिळणें दुर्घट नव्हतें; कारण मुरारराव, अकण्णापंत, मादण्णापंत अशांसारखे ब्राह्मण तेव्हां बादशहांच्या दिवाणगिऱ्या करीत होते ब्राह्मणाचा जीव वाचविण्याची इच्छा दरेक हिंदूला सहजस्फूर्तीनेंच येत होती, पण एकहजारी सरदारकी, व ब्राह्मणाला अभयदान भरदरबारांत मागण्याइतकी दरबारी कामकाजाची माहिती व आत्मप्रतीति, इतकीं अंगीं दृढ बळावणारा मनुष्य निदान पंचविशी तिशीच्या सुमाराचा असेल, निदान शिवछत्रपतीच्या मृत्युसमयीं तरी तो गुरुसेवा करून अनुग्रह घेऊन त्या वयाला पावला असेल, असें मानावयाला हरकत नाहीं हें खरें असल्यास हा महापुरुष शतायुमानाचा होता हें स्पष्ट आहे भालचंद्रनाथांच्या ग्रंथांत श्रीगोपालनाथांची जन्मतिथि नाहीं, म्हणून हीं अनुमानें नुकतेच वर लिहिलेले निगडीकर व मोगरेकर या दोन रंगनाथांशिवाय तिसरे रंगनाथ कोणी प्रसिद्ध होते कीं काय, याबद्दलची व गोपाळरावांची माहिती कोणीं सुचविल्यास उपकार होतील सातारा तालु-

क्यांत माहुलीजवळ त्रिपुटी गांव कृष्णातटीं आहे, तेथें गोपाळनाथाचा मठ आहे तिकडील लोकांनीं माहिती व कविता पाठविल्यास आह्मी जो गोपाळनाथ आणि गोविंदनाथ यांच्या कवितांचा संग्रह मिळाल्यास प्रकाशित करणार आहों त्यांत प्रसिद्ध करूं देवनाथांनी ' अग या कृष्णेच्या निजतटीं । वसताहे ब्रह्म अमुचें त्रिपुटीं ' आणि 'कृष्णातीरीं त्रिपुटीमाजी आमुचें ब्रह्मडें' अशीं दोन पदें केलीं आहेत, तीं त्रिपुटीच्या गोपाळनाथांच्या समाधीला अनुलक्षून आहेत आमच्याजवळ याची कांहीं कविता आहे ती फारच अल्प आहे जास्त मिळावी अशी सर्व काव्यहितेच्छूंना सविनय प्रार्थना आहे

११ श्रीगोविंदनाथमहाराज हे पूर्वाश्रमींचे गोविंदराव. याचा जन्म चिंचवड येथें देव यांच्या घराण्यांत झाला, असें बऱ्हाणपूरकर श्रीभगवतनाथ म्हणतात, व रत्नागिरी येथें झाला असे भालचंद्रनाथ सांगत, आणि एलिचपूर येथें छापलेल्या देवनाथांच्या चरित्रांत गोविंदनाथ हे रत्नागिरीकडील पराजपे घराण्यांत जन्मले होते असें दिलें आहे. पुणेंकर विद्वानांनीं मेहरबानीनें देव घराण्यांतून माहिती काढून कळवावी असो याचा जन्म शके १६४३= इ स १७२१ मध्यें झाला, आणि शके १७३३=इ स १८११ जून २४ ला यांनीं देह ठेविला म्हणजे तेव्हां यांचें वय नव्वद वर्षांचें होतें हे आणि जाल्हनापूर येथील आनंदीनाथ हे समवृत्ति व स्नेही होते यांनीं कर्नाटक, हिंदुस्थान वगैरे पुष्कळ मुलूख पाहिला होता पुढें अकोला जिल्ह्यांत घूसर गावीं यांनीं वस्ती केलेली होती यांनीं पुढें बऱ्हाणपूरला मठ स्थापन केला, तो हल्लीं रामराव काळी याचे नातू श्रीभगवन्तनाथ हे चालवीत आहेत "हे गोपाळनाथ यांचे मुख्य शिष्य होते यांनीं गुरूची सेवा फार दिवस मोठ्या भक्तीनें व प्रेमानें केल्यामुळें संतमंडळींत ते फार महत्वास चढले ते नेहमीं तीर्थाटन करीत असत फिरत फिरत ते वऱ्हाडांत सुरजी अंजनगांवीं आल्यावर तेथें त्यांनीं देवनाथांना उपदेश दिला व नंतर ते अकोलें तालुक्यांतील घूसर गावीं जाऊन राहिले तेथें त्यांनीं श्रीविठ्ठलाची मूर्ति स्थापन करून सर्व व्यवस्था केली. तेथें त्यांचें घर आहे तें अगदीं मोडकळीस आलेलें आहे ।" (प्रमोदसिंधु छापखान्यांत छापलेलें देवनाथांचें चरित्र ) "आम्हांस कळविण्यास फार आनंद वाटतो कीं, श्रीपांडुरंगनाथमहाराज व श्रीभगवन्तनाथमहाराज या उभयतांनीं अतिपरिश्रमानें घूसर येथील मठाचा फार उत्तम जीर्णोद्धार केला आहे गोविंदनाथाची माहिती आह्मी त्यांच्या पुस्तकांत जास्त देऊं.

ब्र्हाणपूरच्या मठांत त्यांनीं सर्व उपनिषदाचे सार असे पांच हजार अभग केलेले आहेत, ते व इतर पद्यसग्रह आमच्या पाहण्यात आलेला आहे देवनाथाचे विस्तृत चरित्र रा काव्येतकरानीं काव्यसग्रहांत दिलेलें आहे तें व रा रघुपतराव देशपांडे सुरजीकर यांनीं लिहून पाठविलेला वृत्तांत व भालचद्रनाथांचा ओंवीबद्ध ग्रथ हीं आमचीं मुख्य साधनें होत. तिन्ही मिळून माहिती तोलल्यास फार थोडी भरते, पण कालवश झालेल्या प्रत्येकाबद्दल ही अडचण असावयाचीच आहे त्या सामग्रीत आमची पाक-सिद्धि झाली आहे वाचकानी गोड करून घ्यावी देवनाथाचे लग्न झालें होतें कीं नव्हतें हा जसा अनिश्चित प्रश्न आहे, तसाच त्यांचे गुरु गोविंदनाथ हे रत्नागिरीकडील परांजपे घराण्यातले कीं चिंचवडच्या देवघराण्यातले, हाही वादाचा प्रश्न आहे सुटेल तेव्हां खरा

१२ उमरावती जिल्ह्यात एलिचपूर शहर हें पूर्वी हैदराबादकर नबाबांच्या सुभेदारांची गादी होती, व या नबाब घराण्याचा अधिकार वऱ्हाडभर चालत असून शेवटल्या बाजीरावाच्या वेळीं दोन हजार घोडा घेऊन नबाब सलाबत-खानांनी इंग्रजाना दाक्षिणेपर्यंत कुमक केली होती असा इतिहासांत दाखला आढळतो या एलिचपूरच्या सुभ्यांत सुरजीअजनगांव हें शहर आहे शहाणूर नदीच्या एका बाजूला सुरजी गाव आहे व दुसरीकडे अंजनगांव आहे येथून जवळच सातपुडा पर्वताच्या विशाळ रांगा लागल्या असून येथें गोंडकोरकू लोकांचें माहेरघर व डाकूचें निवासस्थान असा हा डोंगर प्रसिद्ध आहे गाविलगड व नरनाळा हे इग्रज व मराठे यांच्या दरम्यानच्या युद्धांत प्रसिद्धीस आलेले किल्ले येथून जवळच असून युद्धाच्या शेवटचा तह खुद्द सुरजीअजनगांव येथेंच झाला अशा सर्व प्रसिद्ध ठिकाणीं राजोपत कमाविसदार यांच्या पोटी देवराव जन्माला आले "पवित्र ग्राम सुरजी येथें अवतार धरिला। शके सोळाशें शहात्तरीं नवमासीं प्रगट झाला" असें मल्हारनाथ आपल्या आरतींत म्हणतात या आरतीवरून जन्मशक पक्का ठरतो, आणि शिवाय हल्लीचे सुरजीकर श्रीमंत रघुपतराव हणमंत ऊर्फ दाजीसाहेब देशपांडे यांचे आजे खुशालराव हे शके १६७६ मध्ये जन्मले असून ते व देवनाथ एकाच सालीं जन्मले असें समजते तेव्हा या दोन पुराव्यांवरून जन्मशक १६७६ ( फ ११६६, इग्रजी १७५४ ) हा पक्का धरा-वयाला काहीं हरकत नाहीं देवरावांचे वडील बधु व्यंकटराव हे त्यांच्याहून

तीन वर्षांनी वडील होते, व धाकटे सुदरपतबाबासाहेब हे तीन वर्षांनी धाकटे होते, असें श्री भालचद्रनाथ लिहितात तिघां बंधूंच्या बाललीला आणि देवरावांच्या बाळपणांतील अद्भुत चमत्कार यांचें वर्णन भालचंद्रांनीं फारच रसाळपणाने केले आहे कालवशाने तो ग्रंथ पुढे प्रसिद्ध झाल्यास भाविकांनीं वाचण्याची संधि दवडूं नये, व तोंपर्यंत असा ग्रंथ केव्हां तरी प्रसिद्ध झाला पाहिजे अशी भावना ठेवावी एवढेंच आम्ही सुचवितों

**१३** देवगाव आणि श्री रघुपतराव दाजीसाहेब देशपांडे यांचे आजे आणि देवरावांचे लगोटमित्र श्री खुशालरावबाबासाहेब देशपांडे सुरजी-अंजनगावकर याचा जन्म एकाच साली झाला असल्यामुळें जरी नाथाचा जन्मशक माहीत नव्हता तरी बाबांच्या जन्मशकावरून तो जन्मकाल शके १६७६ असा चरित्रकारांना ठरवितां आला त्या वेळीं पेशवेसरकारचा बोल-बाला अखंड भरतखंडावर गाजुन राहिला होता. श्रीमंत बाळाजी बाजीराव ऊर्फ नानासाहेब पेशवे यांच्या आशीर्वादानें सर्वत्र विजयी झालेल्या सरदा-रांची त्या वेळची हकीकत विजयश्रीवांचून दुसरें कांहींच सुचवीत नव्हती उभयतां खासे नानासाहेब व भाऊसाहेब आणि दिवाण महादाजी अंबाजी पुरंदरे हे त्या वेळीं कर्नाटक सर करावयाला गेले होते विजयासिंगानें जयाप्पा शिंद्याला त्याच साली उत्तर हिंदुस्थानांत मारेकऱ्यांकरवीं ठार मारविलें असून जयाप्पाचा मुलगा जनकोजी याच्या पुढील रणशूरत्वाचीं पूर्वचिन्हें त्या सालीं स्पष्ट दिसावयाला लागलीं होतीं पुढें दहा पधरा वर्षांनी स्त्रीवश होऊन फाजील महत्वाकांक्षी बनलेले श्रीमत रघुनाथराव दादासाहेब या वेळीं ज्येष्ठ बधूच्या पूर्ण आज्ञेंत वागत होते, आणि अजमीर, पुष्कर, कुंभेरी, इत्यादि उत्तरहिंदुस्थानांतील दुर्भेद्य स्थळांना मोर्चे लावून ब्राह्मणाला क्षात्रविद्या कशी अवगत होती याचा सर्वांना प्रत्यय दाखवीत होते ज्यांनीं पुढें जगांत मोठे समर्थ अशी पदवी मिरविली, आणि ज्यांना अकबराच्या तोडीचे असें इग्रज मुत्सद्यांनी वाखाणिलें ते श्रीमत माधवराव पेशवे या वेळीं नुकती मुंज होऊन ब्राह्मणाच्या नित्यकर्मांत तरबेज झाले होते त्याच्या पहिल्या पराक्रमांत मारले गेलेले विठ्ठल सुंदर हैदराबादकर दिवाण, यांना त्याच सुमाराला दिवाण-गिरीचीं वस्त्रें मिळालीं असून त्यांचा साडेतीन शहाण्यांतला शहाणपणा इतक्यांतच झळकावयाला लागला होता, आणि त्यांच्या अगोदरच्या पिढीत मुत्सद्देगिरींत प्रसिद्ध झालेल्या रामचद्र मल्हाराची वर्षतिथी होऊन गेल्याला

फार दिवस लोटले नव्हते प्रसिद्ध पादशहा अहमदशहा अबदल्ली दुराणी याने आदल्या वर्षी स्वारी करून लाहोर प्रांत जिंकला होता, परंतु त्याची समशेर कशी प्रखर आहे याचें मराठ्यांना अजून स्वप्न पडलेलें दिसत नव्हतें. सतीधर्माची पूर्णसाक्ष पटवणारी श्रीमती रमाबाईसाहेब हिचें माधवराव पेशव्यांशीं याच सालीं लग्न झालें होतें, व जून १७५४ मध्ये दादासाहेबांनीं अहमदशहा बादशहाला दिल्लीच्या तक्तावरून काढून अलमगीरला बादशहा केल्यानें पेशव्यांचें सामर्थ्य नर्मदापारच्या रजवाड्यांना उत्कृष्ट रीतानें व्यक्त झालें होतें देवनाथांच्याप्रमाणेंच मराठी भाषेवर प्रभुत्व गाजविणारे अमृतराय कवि आदल्या सालीं वारले होते, आणि दक्षिणेंतील नेपोलियन हैदरनाईक हा अद्याप श्रीरंगपट्टणच्या हिंदुराजांचा पाईक म्हणून कालक्षेप करीत होता पानिपतावर पेशव्यांची दौलत गारद करविणारा नजीबखान रोहिला हा अद्याप प्याद्याच्या जमादारीपलीकडे चढला नव्हता खुद्द वऱ्हाडांत शिंदखेडचे रामचंद्रराव जाधवराव हे जवळ मोठी फौज बाळगून कधीं निजामाला तर कधी मराठ्यांना मदत करीत नागपूरचे राज्यसंस्थापक श्रीमंत रघोजीराव भोंसले हे दोन वर्षांअगोदर वारले होते त्यांच्या वडील बायकोचा मुलगा वयानें लहान होता, आणि धाकट्या बायकोचा मुलगा जानोजी हा वयानें वडील आणि कर्ता असल्यामुळें त्याला सेनासाहेब हें पद आणि सुभा नागपूरची वस्त्रें देऊन शिवाय सेनाधुरंधर हें नवीन पद देण्यांत आले होतें जानोजीसाहेबांनीं वऱ्हाड व बंगाल यावर स्वारी करून अलीवर्दीखानापासून कटकप्रांत व बंगालबहारच्या चौथाईबद्दल बत्तीस लक्ष रुपये घेतले होते, आणि निजामाकडून गाविलगड व नरनाळा हे वऱ्हाडांतले किल्ले सर केले होते एवढा जरी चोहोंकडे बोलबाला होता तरी महाराष्ट्राच्या अस्ताचीं अंतर्गत आणि बहिर्गत कारणें हळू हळू दिसावयाला लागली होतींच सर्व मुलूखभर ढालीतरवार बांधणाऱ्या लोकांचा सुकाळ झाला असूनही खुद्द पुणें जिल्ह्यांतला शिवनेरी किल्ला कैलासवासी बाजीराव बल्लाळ पेशवे यांच्या वेळीं सुमारें वीस वर्षांपूर्वीं मोगलांकडे गेलेला होता तो अद्यापपावेतों लढून हस्तगत झाला नव्हता आणि तो अखेरीस किल्लेदाराला जहागिरीची लालूच दाखवून हस्तगत करावा लागला आणि राजे विठ्ठल शिवदेव विंचूरकर याना आपल्या चांदवड तालुक्यांतील जहागिरीच्या सनदांमध्यें मोंगलांचीही एक सनद असावी असें झालें होतें. म्हणजे शिपाईगिरीचा अंत पुंडपणांत होत

चालला होता, आणि आत्मप्रत्ययाला उतरती कळा राष्ट्रांत लागत चालली हें उघड दिसत होतें महाराष्ट्रीयत्व आणि हिंदुत्व यांची मध्यान्ह टळून सावल्या उलट फिरावयाला लागल्याची ती वेळ होती मोंगल अथवा मराठे, मुसलमानी धर्म अथवा हिंदुधर्म सगळ्यांची क्षणनिद्रा जवळ येत चालली होती समुद्राच्या भरतीच्या वेळेला लाटांचें आंदोलन होतें, ओहोटीच्या वेळेलाही होतें, पण भरतीच्या वेळेला दर आंदोलनाला समुद्र पुढें येतो, आणि ओहोटीच्या वेळेला जरा पाणी दर क्षणाला पुढें आलेलें दिसलें तरी परिणामाला जास्त मागें गेलेलें दिसतें, अथवा युद्धप्रसंगीं अपयशी बाजूचीही कधीं कधी सरशी झालेली दिसते, पण परिणामीं ती सरशी म्हणजे अपयशाच्या आंदोलनाचा धक्का एकदम बसू नये एवढ्यासाठींच झालेली दिसते, असा प्रकार हिंदुस्थानचा सोळाव्या शतकापासून होता, व महाराष्ट्राचा अठराव्या शतकांत होता भगवंताचें अधिष्ठान नाहीसें झालें होतें, व पुढें सांगितल्याप्रमाणें साधुसंतांचेंही या भूमींतून निर्याण होत चाललें होते परमात्म्याला येथला भूमिभार उतरावयाचा होता, आणि मोंगल पुढें गेले तर मराठे, शीख यांचेही गांठोडें बांधलें जात होतें श्रीकृष्णानें हजारों वर्षांपूर्वी कौरवपांडवांचें निर्दाळण करून पुन्हां छप्पन्न कोटी यादवही निर्मूळ केले, परंतु ते करण्याच्या अगोदर सर्व विद्वान् ऋषि, साधू, तपस्वी यांना दूर केलें असें एकनाथ म्हणतात, तो उतारा येथें देतों विस्तार झाला तर होवो नाथ म्हणतातः—

“ उतरला धराभार येथ । सत्य न मनी कृष्णनाथ ।
यादव उरले अति अद्भुत । तेही समस्त निर्दळावे ॥ ३१० ॥

ये अवतारीं हृषीकेशी । म्हणे हेंचि कृत्य उरलें आम्हासी ॥
निर्दळोनी निजवंशासीं । निजधामासीं रिघावें ॥ ३११ ॥

तो यादवांमाजि माधवो । कालात्मा देवाधिदेवो ।
जाणोनि भविष्याचा भावो । काय अपूर्व करिता झाला ॥३१२॥

नारदादि मुनिगण । त्यासि पाचारूनि आपण ॥
वेरूं सांघे शीघ्र गमन । स्वयें श्रीकृष्णसाक्षेपें ॥ ३१३ ॥

ज्यांपासूनि संत दूरी गेले । तेथें अनर्थाचें केलें चाले ॥
हें यादव निधनालागीं वाहिलें । लाघव केलें श्रीकृष्णें ॥ ३१४ ॥

भक्त संत साधू ज्यापाशीं । तेथें रिघु नाहीं अनर्थासी ॥
जाणे हें स्वयें हृषीकेशी । येरां कोणासी कळेना ॥ ३१५ ॥
जेथें संतांचा समुदावो । तेथें जन्ममरणां अभावो ।
हा श्रीकृष्णचि जाणे भावो । तो करी उपावो ब्रह्मशापार्थ ॥३१६॥
जेथूनि संत गेले दुरी । तेथें सद्य अनर्थु वाजे शिरीं ।
हें जाणोनियां श्रीहरी । द्वारकेबाहेरी ऋषि घाली ॥ ३१७ ॥ "

रा रा खरेशास्त्री यांचें सुंदर व सत्यपूर्ण " नानांचा अधिकारयोग " हें पुस्तक वाचावें, म्हणजे राष्ट्रांतील पुरुषार्थाच्या भांडवलाला कशी ओहोटी लागली होती, हें स्पष्ट दिसते महाराष्ट्रवाङ्मयाचा इतिहास पाहिला तर या काळांत बुद्धिऱ्हासाचा आणि मतिभ्रंशाचा प्रत्यय येतो सोळाव्या शतकानंतर हिंदुस्थानांत संस्कृतविद्येचा ऱ्हास झपाट्यानें होत चालला नवा ग्रंथ, नवा कवि, नवा नामांकित ज्योतिषी, नवा महाभागवत, नवा जगन्मान्य योद्धा, विश्वाला आकलन करणारा मुत्सद्दी, असा महाराष्ट्राच्या बाहेर बहुतकरून कोणी झाला नाही, आणि महाराष्ट्रांतही क्वचितच एखादा झाला असें दिसतें हिंदुस्थानांतील हिंदुमुसलमानांच्या ऱ्हासाची, व महाराष्ट्राच्या अपराह्णकाळाची सुरुवात झाली होती

१४ परंतु अपराह्णकालाला सुरुवात झाली म्हणजे आधीं बुद्धि जाते आणि मग भांडवल जातें अशी म्हण आहे, त्याप्रमाणें या वेळीं जी भाग्यो दधीची ओहटी सुरू झाली होती त्यांत ग्रंथकारांच्या शक्तीचा ऱ्हास हा स्पष्ट दिसावयाला लागला होता रा पांगारकर यांनी महाराष्ट्रसारस्वताचे ज्ञानेश्वरकालीन ( शके ११९४–१२२० ), एकनाथकालीन ( श १४७०–१५३० ), समर्थकालीन (१५३०–१६३६शके ), मोरोपतकालीन १६२०–१७४० व प्रस्तुतचा आँग्लकालीन गद्यग्रंथाचा काळ असे पांच विभाग स्थूलमानानें व एकेक काळच्या म्होरक्या कवींच्या नांवानें दिले आहेत ते पहातां पहिल्या काळीं ज्ञानेश्वर व नामदेव ही मुख्य रत्नें असून गोरा, सांवता, जनी, निवृत्ति, सोपान, मुक्ता, चोखा, नरहरी, बोधला इत्यादि सर्व जातीचे लोक "विठूचा । गजर हरिनामाचा" करण्यात दंग झाले होते असें दिसते या काळीं पंढरपूरच्या विठूच्या ध्वजा उभारून सर्व सजीव झालेल्या जाती वाळवंटीं चंद्रभागेच्या कांठीं हिंदुधर्माला उज्ज्वल स्वरूप देण्यांत गर्क झाल्या होत्या.

" प्रभु साळ्याभोळ्यांची बहुवात्सल्यें कथा पितो कानें " असा या प्रभूचा लौकिक सर्वत्र पसरला होता सगळ्याच जाती याच्या आश्रयाला आल्या असून

" शिंपी, वाणी, माळी, कुंभार, महार, यवन, चांभार
बहु जड तरले; व्हावा मग शेषाचा उणा न कां भार ? ।
बहु पिंजारी वारिक, खाटिक, सोनार, चोर, मोमीन
वेश्या दासी तारी प्रभुचरिताब्धींत चित्त हो मीन ॥ "

मोरोपंतकृत पंढरीमहात्म्य.

सुप्रसिद्ध रामानंदाचे शिष्य भगवद्भक्त कबीर, आणि ज्ञानदेवाचे वडील विठ्ठलपंत ज्ञानदेवाची बहीण मुक्ताबाई इचा शिष्य विसोबा खेचर हा नामदेवाचा गुरु कबिराचा मुलगा कमाल याच्या वेळेपर्यंत नामदेवाचें नांव उत्तरेपर्यंत पसरलें असून कमालानें कबीर व नामदेव या दोघांचाही बोलबाला फार प्रेमानें वर्णिला आहे

' वोही साही हजरत मौला खडा पंढरपुरवाला है
दुबले भगत दोनो भये उनोसे करो बोलबाला है ॥ १ ॥

दखनम्याने नामा दरजी उनोका विठ्ठल बंदा है
और सेवा कछू न जाने अंदरभीतर केशव है ॥ २ ॥

उत्तरम्याने भयो कबीरा रामचरणका बंदा है
उनोका पूत कहे कमाल दोनोका बोलबाला है ॥ ३ ॥ '

नामदेव हे लोकसंग्राहक होते ज्ञानदेव हे तर कवींचे कवि अद्वैतामृतवर्षिणी आणि भवद्वेषिणी अशा गीतामातेचें दूध त्वचेआड होतें ते बालकांना प्राप्त करून देणाऱ्या त्या भवतारक आद्यवैद्याबद्दल जास्त काय लिहावें ?

१५. दुसरा एकनाथीकाळ ( शके १४७०–१५३० ) म्हणजे अकबराच्या मृत्यूपर्यंतचा काळ या वेळेला विठूचें पंढरीचें लोकसंग्रहणकार्य सपलें असून फार पिढीजाद चालत आलेला पण आतां विशेष डोके वर काढू पाहणारा दत्तसांप्रदाय जनसमाजात दृग्गोचर व्हावयाला लागला होता गुरुचरित्रासारख्या असडविजयी ग्रथाचे नायक श्रीनृसिंहसरस्वती व त्यांचे शिष्य जनार्दनस्वामी चाळीसगांवकर देशपांडे व त्याचे शिष्य एकनाथ यांचा कीर्तिपरिमळ या वेळी चोहोंकडे पसरला होता. जनार्दनांचे

गुरुबंधु दासोपंत यांनीं तर इजिप्तच्या मनोऱ्यांएवढी ग्रंथरचना केली होती. आनंदतनय, रघुनाथपंडित, वाक्यवृत्तिकार हंसराज, उद्धवचिद्घन, मानपुरी, शिवराम वगैरे कवींनीं धर्मजागृति झालेल्या ईश्वरलोलुप देशबांधवांना ज्ञानामृत पाजण्याचें ब्रीद धरून संस्कृत भाषेंतील बरेचसे धर्मग्रंथ मराठींत आणण्याचें काम सुरू केलें, व कांहीं स्वतंत्र रचनाही केली. आतां नुसत्या ज्ञानेश्वरीच्या चाळवाटीनें तृप्त होण्याजोगें सारस्वत राहिलें नसून त्याची युवावस्था येत चालली होती.

१६. येथून पुढें सारस्वताचा समर्थकाल आला ( शके १५३०–१६३६ ) श्रीसमर्थ व त्याचें पंचायतन आणि समग्र रामदासी पंथ यांचा सारस्वतसमूह केवढा विस्तृत आहे हें रा. शंकरराव देव सर्वांना फार परिश्रमानें शिकवीत आहेत. त्या अफाट सागराचा नुसता अंगुलिनिर्देश करितों. वामन, मुक्तेश्वर, रंगनाथ, श्रीधर, तुकाराम, विठ्ठल, केशव, जयराम, बहिरा पिसा, रामदास या कवींची कृति सागराप्रमाणें गंभीर व अथांग, वायूप्रमाणें समाजाला जीवनाधार, आणि सूर्याप्रमाणें मार्गदर्शक झाली. भारत, भागवत, रामायण, पुराणें, इत्यादि सर्वांचें मंथन करून त्याला या कवींनीं संस्कृतसुभाषितसंग्रहाची आणि आपल्या उज्ज्वल प्रतिभेची जोड दिली, आणि जुनी संस्कृति व नवी रीति या दोहोंचा उत्तम जम बसला. या विकासकालामध्यें महाराष्ट्रसारस्वताला जें श्रेष्ठत्व प्राप्त झालें, त्याच्यायोगानें त्या सारस्वताला अमरत्व आलें हें निर्विवाद आहे. या काळच्या मुक्तेश्वर, शुभानंद, इत्यादि कवींमधून निसर्गाचें वर्णन जागोजाग आढळतें, उच्च काव्यप्रतिभा दृग्गोचर होते; भाषेचें व देशाचें भक्तिभाग्य उचंबळलेलें दिसतें, निसर्गाचा व विश्वाचा पिता आणि भर्ता याच्या चरणीं आपल्याला अशेषनिरभिमानतेनें वाहून घेणें एवढीच चढाओढ करून येते. अनंतहस्तें कमलाकरानें वरदानमंडित केलेल्या या कालांत वर लिहिलेल्या ज्ञानयज्ञदीक्षितांनीं सर्व मंगलाचें मंगलायतन अशी जी काव्यकृति करून ठेविली तिला आम्ही दुरूनच वंदन करितो, आणि तिची बहुविधा भक्ति करण्यांत भूषण मानणाऱ्या समाजाला कधींही मालीन्य यावयाचें नाहीं अशी फलश्रुति सांगतों.

१७. चवथा काल समर्थांचा व साधूंचा जाऊन दैन्याचा येत चालला होता. मध्वमुनीश्वर, अमृतराय, शिवदिनकेसरी, मोरोपंत, महिपती, प्रभाकर दातार, देवनाथ, सोयरोबा, अनंतफंदी, रामजोशी हे या काळांतील प्रमुख

कवी, परंतु मोरोपंत व महिपती यांजसारखी ग्रंथरचना दुसऱ्या कोणाची नाहीं, आणि देवनाथांसारखें आत्मनिवेदन दुसऱ्या एखाद्याचेंच सांपडेल या वेळेला हरिदास कवी पुष्कळ झाले, पण हरिदास्य रोडावण्याचा हा काळ होता या वेळीं संतकवींची महिपतींनीं अखेरची पुण्यतिथि केली, संस्कृत-मधील उरल्यासुरल्या साहित्याची मोरोपंतांनी अखेरची मोजदाद केली, आणि कळपातून चुकून मागें राहिलेल्या देवनाथांनीं आपण केवळ तालसुराचे हरिदास नसून फक्त देवालाच अनन्यशरण होणारे शिपाई आहों अशी सर्वांची खात्री करून आपली यात्रा संपविली लहानसहान पदें फार रसाळ करणारे असे बरेचसे हरिदास या काळीं होऊन गेले, आणि त्यांची निवडक दोन चार पदें ऐकिली तर फार गोड वाटतात, पण विविधसंग्रह असल्यावांचून प्रभुत्वपद येत नसल्यामुळें आम्ही त्यांना उच्चपद देण्याचें धाडस करीत नाहीं या शेवटच्या काळात देवनाथांना यांना आपली यात्रा संपवावी लागली हें पाहिले असता मनाला जरा उद्वेग होतो नाथांचीं शेवटचीं वीस वर्षे बाजीरावाच्या कार-कीर्दीत गेलीं, आणि रावबाजीवर बाजी झालेलीही त्यांनीं पाहिली, पण त्यांच्या अव्वल बाळपणीं एकनाथीभागवत व ज्ञानेश्वरी यांसारख्या पोषक खाद्यांवर त्यांचा ज्ञानपिंड वाढला होता, आणि हरिदास वाढतील, पण हरिदास्य कमी होईल असें एकाएकीं दिसत नव्हतें वर दिलेल्या कवीमंडळावरून दिसेल कीं, देव-नाथांच्या जन्मकाळीं राष्ट्राच्या सारस्वतसंपत्तीचा भर निघून गेला होता, आणि दिवा मालवतांना मोठा होतो त्याप्रमाणें सवाईमाधवराव, नाना फड-णवीस, मोरोपंत, देवनाथ, यांसारखीं कांहीं मोठीं माणसें आपली इहयात्रा आटोपून गेल्यानंतर राष्ट्रदीप एकदमच मालवला गेला, आणि त्यांच्या निधन-समयीं त्यांना पूर्ववैभव हें केवळ दुःस्वप्नाप्रमाणें झालें ज्ञानभारानें लवलेल्या विद्वानांच्या जागीं वावदूक, शिपायाच्या जागीं पेंढारी, ज्ञानदिग्ग-जांच्या जागीं पढतमूर्ख वावरू लागलेल्या या काळांत नवीन घराणें स्थाप-णारा राजा अथवा सरदार निघाला नाहीं, नवा पंथ अथवा ज्ञानपरंपरा निर्माण करणारा ज्ञानी निपजला नाहीं, याचा दोष जसा देवनाथांकडे नाहीं, तसाच नाना फडणिसाकडेही नसून कालाच्या करालवक्त्रानें राष्ट्राला कवलमय केल्याचा हा परिणाम होता भागवत, भारत इत्यादि ग्रंथांचें नाथांना परि-शीलन दांडगें होतें हें त्यांच्या काव्यकृतीवरून स्पष्ट दिसतें 'अचाट वचडें, छकुडें इत्यादि शब्दरचनेवरून आधुनिक कवींचे त्यांचें ज्ञान दिसतें असें

असतां मोठा ग्रंथ त्यांनी केला नाहीं, याला कांहीं अशीं कारण त्यांची राववृत्ति, गुरु व विठ्ठल यांच्या चरणीं मनोवृत्ति पूर्णपणें अर्पण केल्या असल्यामुळें साहजिक आलेली कविपणाबद्दलची उदासीन निरपेक्षता, आणि कांहीं अशीं वर वर्णन केलेली जिकडे तिकडे कालि मातल्याची परिस्थिति हीं मुख्य कारणें होत यासाठीं आम्हीं या प्रारंभसुंदर पण परिणामीं कष्टद परिस्थितीचें इतकें वर्णन केलें, तें लक्षांत ठेविलें असतां नाथांचा चरित्रक्रम लवकर उलगडेल

१८ देवरावांच्या बालपणाबद्दलची विशेषशी माहिती उपलब्ध नाहीं, आणि असणें शक्यही नाहीं अलीकडे फोटो काढण्याची कला निघाल्यापासून बालपणाचें थोडें तरी वर्णन चरित्रकारांना देतां यावयाला लागलें, कारण चार महिन्यांचें मूल होऊन तें देवाच्या पायांवर घालण्याकरितां देवळांत घेऊन जातात तेव्हापासून तर त्या मुलाचा त्याच्या नूतनपरिणीत पत्नीसह फोटो घेतात, तेव्हांपावेतों फोटोचें कौतुक ज्याचें त्याचें होत असतें. आमच्या चरित्रनायकाच्या वेळीं तें शक्य नव्हतें फारच कुलीन असा सरदार घराण्यांतला किंवा राजघराण्यांतला पुरुष असला तर त्याच्या बालपणापासून अखबारनवीस त्याचा वृत्तांत लिहून ठेवीत अलीकडे त्याच्या रोजनिशा लिहिण्याचा प्रघात पडला आहे या दोहोंपैकीं कांहींच देवरावांसबंधानें झालेलें नाहीं कारण मध्यम कुळांतील जन्म आणि काळ अशांततेचा, यामुळें या गोष्टी शक्य नव्हत्या तथापि तेजस्वी लेंकराच्या बाळपणांत ज्या गोष्टी व्हावयाच्या त्या सर्व त्यांच्या होत्या हूडपणा, लहान मुलेंबाळें घरींचशीं जमवून त्यांच्यांत आपला मोठेपणा मिरवावयाचा, त्यांच्या खोड्या काढून त्यांना चिडवून पुन्हां त्यांना प्रसन्न ठेवावयाचे आणि आपल्या कह्यांत आणावयाच, त्याचा म्होरक्या बनून आपल्या पोरचेष्टांनीं गाव भडावून सोडावयाचा, ह्या गोष्टी त्यांच्या बालचारित्र्याचें नित्यांग होतें याशिवाय त्यांच्या हातून बालपणींही कांहीं दैविक चमत्कार झाले असें भालचंद्रनाथ लिहितात त्यांच्याइतकें त्या चमत्कारांचें यथायोग्य वर्णन देणें हें आमच्या लेखणीच्या आटोक्यांतलें नाही

१९ देवरावाची विद्या कांहींच नव्हती असें कोणी म्हणतात, आणि कोणाकोणाची अशीही समजूत आहे कीं, त्यांना मुळींच लिहितां वाचतां येत नव्हतें. ही समजूत काव्यसंग्रहकारानीं नमूद केलेली आहे, व हल्लींच्या-

सारखीं विद्यार्जनाचीं साधनें त्या काळीं उपलब्ध नसल्यामुळे तशी समजूत बळावणे साहजिक आहे पण असे होण्याचें कारण बहुजनसमाज एक-गुणैकदृक् असतो हेंच होय रामदास, हनुमानाप्रमाणें बलिष्ठ विनोदी आणि तामसी होते, आणि लोकांनीं त्याच्यावर शेंपटाचा आरोप केला आहे शिव-भूपाचा बाप त्याहून गुणकीर्तीनें लहान होता, या गोष्टीचें रूपांतर लोक-वाक्याने असें होतें कीं, शिवाजी हा यत्किंचित् पाटलाचा मुलगा असून त्यानें आपल्या बाहुसामर्थ्यानें राज्य कमाविलें असाच भाव देवनाथांच्या अक्षर-शत्रुत्वाचा होय जुन्या लोकांत विद्या कमी, लिहिण्याची सार्वत्रिक कमतरता, चिठ्ठीपेक्षां निरोपाचा प्रघात विशेष, आणि महती अंगीं आली म्हणजे प्रत्येक शब्द लिहून काढावयाला तयार असणाऱ्या शिष्यमंडळाची सेवापरा-यणता, इत्यादि कारणांनी नाथांना लिहिण्याचें फारसें काम पडत नसेल, पण बेताचें लिहिणें, वाचणे, पुस्त्या, खरडे गिरविणें, बरेसे मोडी अक्षर इतकें झाल्याखेरीज साधारण गृहस्थितींतल्या ब्राह्मणाला राहणें शक्य नव्हतें शिवाय भारतभागवत, वेदचतुष्टय, एकनाथ, ज्ञानेश्वर, इत्यादि विद्याभांडारांचें परिशीलन ज्यांनीं आस्थेनें केलें, सरस्वतीनें ज्यांच्या जिव्हाग्रीं बसून सहजस्फूर्तीचें आणि अस्खलित असें वक्तृत्व केलें, त्या शारदाकंठा-भरणाला बावन्न अक्षरें न यावीं इतकें त्यांनीं त्या कानामात्रावेलांट्यांचें काय पाप केलें होतें ? एका शब्दानें चतुरंगदळ थरारून सोडणाऱ्या सेना-पतीच्या सर्व आज्ञा त्याच्या तोंडून अक्षर न निघतां तर्कानें आणि नित्य-क्रमाच्या अनुरोधानें पाळल्या जातात, म्हणून तो मुका आहे असें मानणें हास्यास्पद होईल एखादी गोष्ट दहा पांच वेळ लिहिली गेली म्हणजे ती आपो-आप खरी बनते हेंच खरें

२० देवनाथांना वेदपठन फार आवडे आणि चांगले वैदिक ब्राह्मण मिळाले तर ते त्यांना नेहमी वेदघोष करावयाला लावून त्यांची योग्य संभा-वना करीत असें समजतें. त्यांची स्मरणशक्ति दांडगी असल्याचीं चिन्हें त्यांच्या ग्रंथांत जागोजाग आढळतात ज्ञानेश्वरी व एकनाथ यांच्यातले पुढे अपरिचित झालेले शब्द व सर्व जुन्या ग्रंथांतून आणि विशेषेंकरून वेदांत-चर्चेच्या ग्रंथांतून आढळणाऱ्या विशिष्ट कल्पना यांचा त्यांनी जागोजाग उपयोग केलेला आहे हल्लीं आलमान्या व थोडक्या आकारांतलीं सुंदर छपाईची बुकें असूनही जे शब्द वाचून लक्षांत रहात नाहींत ते त्यांच्या

काव्यातून लीलेनें ग्रथित केलेले दिसतात साक्षरता नसून भिरवणाऱ्या गावाळाची ही शक्ति नव्हे

२१ तरी लिहिता येणें न येणें हा कांहीं महत्वाचा मुद्दा नाहीं येत होतें ही तर आमची खात्री आहेच, पण आम्हांला हें सुचविणें आहे कीं, हल्लींच्या काळी ज्याप्रमाणें लघुलेखनकला आणि टाइपरायटिंग आलें तर उत्तम विद्वान् अथवा वक्ता समजत नाहींत, फक्त चांगला नकलनवीस गणला जातो, त्याच-प्रमाणें चांगलें अक्षर वळवितां येणें न येणें हा त्याकाळीं मोठासा गुणदोष मानला जात नव्हता कारकुनी करावयाची असेल त्यानें वळणदार अक्षर काढावें बाकीचे त्याबद्दल तटस्थ असत गृहस्थाच्या मुलाला दांडपट्टा, बोथाटी वगैरे गुण अत्यावश्यक असत, आणि अश्वारोहणपाटव हें हल्लींच्या वाक्पाटवाइतकेंच प्रधान अंग मानलें जात असे इतक्या तयारीला पोहोंचल्यावर म्हणजे सरासरी बारा वर्षांच्या वयाला देवनाथांचें लग्न झालें असावें आम्ही झालें असावें म्हणतों. कारण यासंबधानें एकाच ठिकाणीं दोन तीव्र मतभेद आहेत वीस वर्षांपूर्वी काव्यसंग्रहकारांना जी परस्परविरुद्ध माहिती मिळाली तीच आतां तितक्याच आग्रहानें प्रतिपादिलेली मिळते श्रीभालचंद्रनाथांनीं लिहिलेल्या ग्रंथांतला सातवा अध्याय विवाहवर्णनाचा आहे ते लिहितात कीं, देवरावांचें लग्न बाराव्या वर्षी वऱ्हाडांतील जळगावला झालें. यांच्या सासऱ्याचें नांव कृष्णराव कुटुंबाचें माहेरचें नांव काशी व सासरचें नांव रमा. दुसऱ्या पक्षीं सुरजीकर रघुपतराव दाजीसाहेब देशपांडे आम्हांला कळवितात कीं, त्यांचे वडील हणमंतराव यांना बाळपणांत देवनाथांचा सह-वास घडला होता व त्याच्या पूर्वचरित्राची माहिती होती, आणि ते वडील देवनाथांचा कधींच विवाह झाला नव्हता असें सांगत आतां देवनाथांसंब-धानें जी पूज्यता व जो अधिकार मठाधिकाऱ्यांचा तोच खुशालरावबाबा देशपांडे यांच्या वंशजांचा, आणि विशेषेकरून रघुपतराव दाजीसाहेब यांचा. अशा दोघांमध्यें इतका तीव्र मतभेद पडला यावरून चरित्रलेखकाचें काम किती दुष्कर असतें हें वाचकांच्या लक्षांत येईल, आणि पुढें ज्या गोष्टी लिहिल्या जातील त्याबद्दल वाचकांनीं सहृदयता ठेवावी अशी त्यांना विनंति आहे

२२ रा रघुपतराव दाजीसाहेब यांनीं देवनाथांबद्दल जें हस्तलिखित टिप्पण आम्हांला करून पाठविलें त्यांतील अस्सल उतारा येथें देतों ते लिहितात कीं, " सुरजीकर देशपांडे हणमंत खुशालराव (रघुपतरावांचे वडील)

यांनीं आपले तरुणपणांत देवनाथास पाहिलें होतें. त्याची माहिती हणमंत-रावांस पूर्णपणें होती हणमंतरावांनीं स्वतः सांगितलें कीं देवनाथांनीं लग्न केलें नाहीं देवनाथ सुरजींचेच राहणारे होते तेव्हां हणमंतरावांचे म्हणण्या-पेक्षां दुसऱ्याचें म्हणणें बिलकुल निराधार आहे हणमंतरावांचे वडील खुशाल-राव हे देवनाथांचे बालमित्र होते, व समवयस्क होते तेव्हां ते लग्न झाल्याचें सांगत नाहीत व दुसरे कोणी सांगतात हें निव्वळ खोटें आहे त्याचें लग्न झालें नाहीं हेंच खरें त्यांना मुलगी होती ती त्यांच्या भावाची होती " हा नास्तिपक्षीचा पुरावा अस्तिपक्षीं श्रीभालचंद्रनाथांचा ग्रंथ खुद्द भालचंद्र-नाथ वारले असल्यामुळे त्यांच्या माहितीचें मूळ कळणें शक्य नाहीं पण त्याच्या बाजूचा साधारण सबळ पुरावा म्हणजे आमच्या या नूतन ग्रंथांतील २१४ अभंग हा होय तो अभंग असा:—

" त्रेतायुगीं रामें दिधलें वरदान । मगरीचें ऋण फेडावया ॥ १ ॥
कलीयुगामाजी देवनामें करून । जगउद्धारण करिसी तूं ॥ २ ॥
म्हणूनियां येणें झाले आम्हांलागीं । कलीचे प्रसंगीं सहजासहजीं ॥ ३ ॥
पूर्वींच या युगीं झाला रामदास । मगरी जन्मास आली तेव्हां ॥ ४ ॥
वरायातें मगरी आम्हा आली जेव्हां । त्याग केला तिचा तेव्हां आम्हीं ॥ ५ ॥
पुन्हा कलियुगीं अधर्मप्रवृत्ती । म्हणूनि श्रीपति धाडी आम्हां ॥ ६ ॥
देवनाथ म्हणे ऋण फेडायासी । आतां मगरीसीं वरीयेलें ॥ ७ ॥"

**२३** यावरून त्याचें लग्न झालें असावेंसें वाटतें, पण हा अभंग आम्हाला सुरजीच्या मठांत मिळाला नाहीं हा इतर ठिकाणीं हिंडत असतां रा अग्नि-होत्री याना मिळाला हा जर खुद्द देवनाथमहाराजाचा असला, तर ते आपल्याला स्वतःला रामदासांचा व मारुतीचा अवतार मानीत होते कीं काय हा प्रश्न साहजिकच उद्भवतो पेशवाईच्या अखेरच्या काळात जर त्यांनीं आपल्याला धर्मसंस्थापक असें मानलें असेल तर तो समर्थांचा विशिष्ट मनो-धर्म होय आम्हांला वाटतें कीं हा त्याच्या शिष्यांपैकीं कोणी तरी रचिलेला अभंग असावा शिष्य झाला तरी वस्तुस्थिति खोटी लिहिणार नाहीं तिच्या कारणांचा मात्र आपापल्या भावनेप्रमाणें विपर्यास करील, तेव्हा या अभंगाच्या अस्तित्वावरून आम्हाला असें वाटतें कीं नाथसाहेबांचें लग्न झालें असावें, आणि प्रपंचसागरांत स्त्रीनौकेचा नावाडीपणा थोडासा होतो न होतो तोंच

ईश्वराने त्यांना भूमिगत केलें असावें श्री हणमतरावांनीं देवनाथांची उत्तर-वयोमर्यादा पाहिली असल्यामुळें पूर्ववृत्ताची माहिती त्यांना असणें अशक्य आहे तथापि हीं आमचीं अनुमानें आहेत जळगांव वगैरे ठिकाणीं हिंडून तपास लावण्याचा यत्न आह्मीं केला नाहीं व्यासंगव्यभिचारामुळें आम्हांला तें जुळलें नाहीं, आणि तितकी खोल पाळेंमुळें तपासण्याइतकें शरीरदार्ढ्य व मनोदार्ढ्य आमचे नाहीं आम्हाला या मुद्यावर जी सामग्री जमवितां आली ती आम्ही वाचकांना सादर करितों पुढें जो भाग्यवान् निपजेल त्यानें जास्त शोध लावावा आमचें काम फक्त त्याच्या मार्गांतले कांहीं कंटक दूर करून रस्ता झाडून ठेवण्याचें आहे, तेवढें आम्ही आनंदानें करीत आहों एवढी गोष्ट खरी कीं पूर्वप्रारब्धानुसार देवरावांना सहधर्मचारिणीचा सहयोग नव्हता किंवा अत्यल्प होता तो आटोपल्यावर आमचे देवराव ईश्वरप्रेमाने अनन्यबद्ध होऊन ईशचरणीं देह अर्पण करिते झाले, आणि हरिनामाचा गजर महाराष्ट्रभर करण्याकरिता जी मनाची तळमळ, व्युत्पन्नता, देवतासाधन, इत्यादि तयारी लागते तिचा त्यांना आतां परिचय व्हावयाला लागला तुकाराम-महाराज म्हणतातः—

'देव भक्तालागीं करूं नेदी संसार । अंगें वारावार करुनी ठेवी ॥
भाग्य यावें तरी अंगीं भरे ताठा । म्हणोनि करंटा करुनी ठेवी ॥
स्त्री यावी गुणवंती नसती गुंते आशा । यालागीं कर्कशा पाठीं लावी॥
तुका म्हणे मज प्रचीत आली देखा । आणीक या लोकां काय सांगों'

२४ परमेश्वरानें देवनाथांची अंगें वारावार करून ठेविली, आणि ईश-प्राप्तीचा व परमार्थसाधनाचा मुख्य पाया गुरुदास्य याच्यासाठीं जें वैराग्य अंगीं बाणावयाला पाहिजे, व त्या वैराग्यासाठीं जें लौकिक औदासिन्य पाहिजे, त्या तयारीला त्याना लाविलें शहाणूर नदीच्या कांठावर आखाडा होता, तेथें मठाचा संकल्प होत चालला स्त्रीपुत्रांच्या जागीं शिष्यशाखा ईश्वर निर्माण करीत चालला "बसुनिया महाद्वारीं । अवघे म्हणती दे दे हरी । दिवाळखोर नारायण । त्याला सकळांचें ऋण" देवरावांनीं दिवाळ-खोर नारायणाच्या द्वारी धरणें घेतलें, आणि आपलें भक्तिऋण परत मागा-वयाला लागले हरिनामाचें खत त्यांनीं जपून ठेवलें ईशचरणाचें गहाणक्षेत्र आपल्या ताब्यात घेतलें. निर्धन देवराव परमार्थाचे सधन सावकार बनाव-याला लागले आखाडा सुटत चालला मठाचें पुढें कळेलच

# आखाड्याचा मठ.

२५ देवनाथ हे जन्मत: देवराव होते, हें पूर्वी सांगण्यांत आलेंच आहे. मल्हारनाथ ह्यानीं आपल्या आरतींत म्हटल्याप्रमाणें —

महारुद्र प्रेरणेनें नाथजीनें नाथ केला ।
शुद्ध जें ब्रह्म तेंची स्वयब्रह्म तूंचि झाला ॥

अशा रीतीनें गोविंदनाथांचा अनुग्रह झाल्यानतर देवरावाचे देवनाथ झाले. जो तेजोस्फुल्लिंग प्रपचामध्यें सर्वांना भिवावितो तो परमार्थामध्यें सर्वांना दिपवितो ज्या चित्तशुद्धीमुळें ससारातल्या रोजच्या व्यवहारांत हजारों लोकाचे मन आपलेकडे ओढलें जातें त्याच चित्तशुद्धीचे समीकरण ब्रह्मज्ञानामध्यें झाल्यानतर सहस्रावधि लोकांना ईश्वरचरणी लीन करण्याची प्रेरणा आणि पात्रता बाणते यामुळेंच आयुष्यामध्यें ज्याच्या सर्व आकांक्षा पूर्ण झाल्या नाहींत, सद्धशमडन असा ज्याचा लौकिक चोहोंकडे पसरलेला नाही, पाखरांना वटवृक्ष त्याप्रमाणें हजारो दीनजनांना कल्पतरु असा ज्याचा प्रत्यय समाजाला आला नाहीं, तो दुबळा पामर प्रपचांत राहिला तरी भणग व परमार्थांत गेला तरी नुसता भीकमाग्या असावयाचा यासाठी चांगला सरदार अथवा श्रेष्ठ साधु निपजावयाला कुलपरपरा उच्चशुद्धीची असावी लागते असे सर्व शास्त्रें आक्रोशानें सांगतात राजवंशात जन्मलेला म्हणूनच ध्रुवाला राज्यपदाचा त्याग करितां आला. रविकुलदीपक अशाच हरिश्चंद्राला स्वप्नांत राजदान करतां आले. ज्या ज्या मानानें परपरा मोठी त्या त्या मानानें पुढील परिस्थितीवर अधिकार चालविण्याची दांडगी पात्रता अंगी येत जाते. हे सिद्धांत आजचे नवे नाहींत देवनाथ लहानपणीं हूड व तालिमबाज होते ते पुष्कळशीं उनाड मुलें बरोबर घेऊन खेळत असत आपले तालमीचे आखाड्याभोंवतीं सर्व मुलें गोळा करावयाचीं, त्यांना आपलेबरोबर तालमीचा नाद लावावयाचा, तालिमबाजांचें रूप व तालिमबाजांचे अगविक्षेप होतां होईतों आपलेमध्यें आणावयाचे आपले पंचक्रोशींत आपला आखाडा सर्वांत मोठा करावयाचा आणि त्या आखाड्याचे आपण मुख्य वस्ताद बनावयाचें ही त्यांची महत्वाकांक्षा होती, आणि ती त्यांनीं मनांत आणल्याबरोबर तडीस नेली. परंतु त्यांचे मनाची प्रगति एवढ्यावरच थांबली नाहीं या छात्रवृत्तीच

ईश्वरभक्तीचा अंकुर उगवला व बळावला; आणि त्यामुळें देवरावाचे देवनाथ त्यांना गुरुरुपेने व पात्रतेने होतां आलें रंकाचा कधींही नाथ होत नाहीं रंकाला अनेक जन्मसिद्धींचें सामर्थ्य येत गेल्यानंतर त्याचा राव बनतो आणि श्रीमदू-र्जितसामर्थ्यविभूति असा जो राव असेल त्याच्यावर वैराग्यामृताचें वारंवार सेचन झाल्यावर मग त्या रावाचा नाथ होतो दासीच्या दासपणाची कांहीं जरी किंमत नसली तरी आपले उष्टे तुकडे सोडून आपले प्रियकरा-बरोबर सती जावयाचें हें तिचे हातून कधींही व्हावयाचें नाहीं स्वर्गांत उष्टे तुकडे मिळाले नाहींत तर पुढें आपले कसें होईल या काळजींतच ती आपली उरलेली कष्टप्रद संसारयात्रा पार पाडील परंतु सर्व राजोपचार जिचेपुढें अष्टसिद्धींप्रमाणें राबत आहेत अशीच एखादी भाग्यवान् सती आपल्या ऐहिक सौख्याचा त्याग करून पतिमार्गनिरत होईल तेव्हा क्षात्रवृत्ति ही वैराग्यवृत्तीची मातोश्री होय, आणि ज्याला राव होतां आलें नाहीं तो नाथ होऊं शकणार नाहीं, हाच सिद्धांत खरा आमचे चरित्रनायकानें आपला आखाडा उत्तम रीतीनें चालवून श्रेष्ठ प्रकारचें लोकनायकत्व सिद्ध केलें आणि पुढें शंभर वर्षांहून जास्त टिकणारी अखंड शिष्यपरंपरा ठेवून आपलें भक्तिभाग्यही तितकेंच बळाविलें कालाचे वक्रगतीमुळें तो काळ आखा-ड्यांचा असूनही जिकडे तिकडे माजलेल्या कलीनें घोड्यावर स्वार अस-लेल्या ब्राह्मण पादशाहीला केवळ स्मृतिशेष करून सोडिलें परंतु भगवद्भक्ति आणि ईशसाधन याचें वैभव मार्कंडेयांप्रमाणें चिरायु असल्यामुळे नाथांचा मठ लोकांना सदोदितचा आकाशदीप राहील व मठाधिपती धर्मजागृतीकरितां अहर्निश जागतील अशी निदान देवनाथांची पुण्याई आहे मग कालगति काय असेल ती खरी

---

# राव, नाथ आणि संत.

६६ रावावांचून नाथ होऊं शकत नाहीं हें वर सांगितलेंच आहे. तसेंच संतपणाची सावली पडल्यावांचून नाथपणा दृढावत नाहीं हेंही आग्रहानें सांगितलें पाहिजे संत हा महासागरातील जलाप्रमाणें आहे नाथ हा जागोजागच्या जलाशयाप्रमाणे विशिष्ट समाजाला सुखकर, बोधप्रद आणि

मार्गदर्शक होतो आपण व आपले म्हणविलेले याचे शाप वांचविण्याकरितां खऱ्या रणधीराला हजारों शत्रूंवर चाल करून रावपणा दाखवावा लागतो आपला संघ, आपला धर्म, आपला परपराधिपति बुद्ध याना शरणागत जाऊन त्याची ध्वजा म्हणून फडकत असणाऱ्या नाथाला शाप आणि शर ही दोन्ही सज्ज ठेवून कधी कधी रावपणा दाखविण्याची वेळ येते परंतु सत जो असतो तो सर्वांभूतीं शरण गेल्यानें त्याला नाथपणाही सदोदितचाच, आणि संताची लीनता ही देखील नेहमींची असते ईश्वरानें व्यापलेल्या अणुरेणूंचे जेथें आपण दास झालों तेथें आपल्याला दासपणा नाही; वृक्षपाषाणापासून जेथें आपण ईश्वरत्वाचा मान दिला तेथें आपणाला मानीपणा नाहीं; व्याघ्रवृकांपासून, सर्वांपासून जेथें ममता ठेविली तेथे ममत्व अथवा मीपणा राहिला नाही तो नाथपणा अगीं पूर्ण बाणून पुन्हां सर्वत्र लीन झालेले असे संत होत. त्यांचेबद्दलच “ मऊ मेणाहूनी आम्ही विष्णुदास ' असें तुकारामबोवा म्हणतात परतु त्यांचा नाथपणा अगर रावपणा त्यांनीं झांकलेला असतो; गमावलेला नसतो म्हणून ' कठीण वज्रास भेदूं ऐसे " असें ते सांगतात “ भले तरी देऊं गांडिची लगोटी, नाठाळाच्या काठी देऊं माथा ” असें जेव्हां ते म्हणतात तेव्हां ते नाथवाणी बोलतात व रावचारित्र्याची लोकांना खूण दाखवितात एरव्हीं नाथपणा दाखवावयाचा नाहीं हें तर संतांचें ब्रीद असतें “ कर्ता करविता नारायण ” आहे आपण केवळ द्रष्टारूपानें प्रचीति पहावी “ आलिया भोगासी असावें सादर ”, विनाकारण देवावर भार घालूं नये; हें सताचें पहिलें ब्रीद. दुष्ट येऊन द्रौपदीची विटबना करतात, परतु धर्मराज भीमसेनाला मागें ओढतो, कारण काळजी भगवताला मिराबाईचेपुढें राण्यानें विषाचा पेला आणून ठेवला, ती तें विष निर्भय चित्तानें प्याली, परंतु देवाचा गळा मात्र काळा पडला वाण्याने कबीराचे बायकोजवळ एक रात्रीची विलासयाचना केली, कबीर स्वत:च तिला खांद्यावर घेऊन चालला, संकट पडलें बिचाऱ्या द्वारकाधीशाला अतिथी श्रियाळ चागुणेजवळ मांस शिजवून मागू लागला, लेंकराचा वाली क्षीरसागरनिवासी. कयाधूला प्रल्हादाला मांडीवर घेऊन वीष पाजण्याची नवऱ्यानें आज्ञा केली, तान्हुल्यांचा त्राता लक्ष्मीपति दुष्काळपीडित ब्राह्मणांना धान्य लागलें, लुटविणार दामाजीपंत, राजदरबारांत हुडी पोहोंचविणार रुक्मिणीपति म्हणून सतांनीं कलिकाळाला जिंकलेलें, आणि सत काल, स्थल, परपरा, धर्म, संघ इत्यादि सर्व

बंधनांचे पलीकडेच जे सदोदितचे हरीला बद्ध आणि ज्यांनीं दयाघनाला नेहमीं भक्तीनें आकळिला त्यांनीं नाथ व्हावयाचें तरी कोणाचें आणि त्यांनीं राव-पणाही दाखवावयाचा कोणावर ? ही नाथाची आणि संताची संगति व विसंगति झाली नाथ ही राव आणि संत याचेमधील पायरी होय, आणि म्हणूनच मानीपणा, करारीपणा, आग्रह, गुरूचा अथवा शिष्यांचा अभिमान इत्यादि क्षात्रगुण ज्या ज्या महात्म्यांचे चरित्रांत दिसतात त्यांचेमध्यें संतपणाचा अभाव नसून व संतपणाचें मिश्रण आहे असें समजावें रावपणावाचून नाथपणा यावयाचा नाहीं व दोहोंवांचून संतपणा यावयाचा नाहीं संतांना पंथ नकोत, अगर मठ नकोत ज्या झाडाखालीं बसतील तो त्यांचा मठ ज्या दुबळ्यांवर त्यांची सावली पडेल ते त्यांचे पंथानुयायी ज्या मार्गानें चालत जातील तेंच पुण्यक्षेत्र ज्याला हात लावतील तो देव जें वाक्य उच्चारतील तो वेद इतकेंच नव्हे तर जो शाप देतील तो अनुग्रह होतो परंतु अज्ञजनांना असे संत ओळखण्याची मारामार पडते सूर्यकिरण फुकट प्रकाशतो म्हणून त्याला कोणी जपत नाहीं तोच रात्रीचे दिव्याचा व्यवहारामध्यें हिशेब होतो म्हणून संत हे ईश्वरस्वरूपी असतात व नाथ हे ईश्वर-प्रतिनिधी होत पंथ, मठ, गुरुपरंपरा व शिष्यशाखा, मंत्र, चमत्कार, राज-चिन्हें इत्यादि उपाधींनीं परिवेष्टित होऊन संतांनाच जगदोद्धारार्थ नाथपणा स्वीकारावा लागतो त्यांत कधीं संतांची शांतता अंगीकारावी लागते तर कधीं रावपणा गाजवावा लागतो राव, नाथ आणि संत यांचा परस्पर-संबंध असा आहे. आम्ही दयाळनाथांचे चरित्रांत म्हटल्याप्रमाणें जलचर आणि रत्नें यांचेयोगें भेवडावणाऱ्या पण पुन्हा जवळ बोलावणाऱ्या रत्नाकराप्रमाणें देवनाथ हे भीषणगंभीर होते आतां केलेल्या मीमांसेनें त्याचें भीषणगंभीरत्व कसें उचित होतें हें लक्षांत येईल

---

## अनुताप.

२७ रावपणानें अनुग्रहपात्रतेचा पाया घातला गेला, पण वैराग्य आणि सत्संगप्रीति यांचेंही बीज मुळापासून रुजलें गेलें असल्यामुळें देवरावांचा पुढला मार्ग सुकर होत चालला विश्वांतील चैतन्यतत्त्व प्रकृतीची घडामोड कालाच्या साह्यानें करीत असते, आणि कीटकादिकांच्या सृष्टीपासून देव-

दूतांच्या कोटीपर्यंत सर्वांची सदोदित उत्क्रान्ति होत असते. त्याला आपण कर्मविपाक म्हणतों यांत जोडलेल्या गोष्टी मोडल्या जातात, विगलित झालेल्या वस्तू जोडल्या जातात. आपापल्या चित्तसंस्कारांप्रमाणें आपण कांहीं घटनांना चांगलें म्हणून वाखाणतों, कांहींना वाईट म्हणून दूषितों, सर्वांवर पापपुण्याचा आरोप करितों परंतु जगच्चालक सूत्रधार हा सर्वच गोष्टी समुच्चयानें सुखकर करितो म्हणून 'बाइटानें भलें। हीनें दावीलें चांगलें' हा प्रत्यय सृष्टीमध्यें अहर्निशीं येतो असाच प्रकार देवनाथांचा निव्वळ रावपणा सुटून वैराग्य येण्याचा झाला वडील राजोपंत यांनीं कमाविसदारी केलेली, आणि ज्येष्ठ बंधु व्यंकटराव रिसालदार यांचा लष्करी अधिकार मोठा दुसरे बंधु सुंदरपंत बाबासाहेब पांडे यांचा मुलकी अधिकार दांडगा तेव्हां तिसऱ्या बंधूनें बाळगोपाळ सवंगडी मिळवून शहाणूग्नदीच्या थडीं क्रीडत असावें ही गोष्ट त्या कुटुंबसंरक्षक ज्येष्ठ बंधूला असह्य झाली, आणि मातोश्रीच्या तोंडून त्यानें देवरावांची कानउघाडणी करण्याचा यत्न केला शंभर शहाण्यांची सारख्या प्रसंगीं एकच वर्तणूक होते हें मागें बादशहाला बिरबलानें सिद्ध करून दाखविलें होतें, आणि इतिहासाचे दाखलेही असेच आहेत कीं मानी पुरुषाचा अपमान झाला म्हणजे फोडलेला तरु अधिक भरानें वाढतो त्याप्रमाणें मानी पुरुषाच्या वैभवाची तेव्हां सुरुवात होते विठ्ठल शिवदेव विंचूरकर यांची निर्भर्त्सना वडील बंधूनें केल्यावरून तेही घर सोडून निघाले होते, आणि हैदराच्या स्वारीच्या वेळीं तो सरदार आपल्या भाग्यशिखरावर चढला असून बहात्तराव्या वर्षी आठ आठ तास घोड्यावर बसण्याचें त्यांचें सामर्थ्य लष्करी अखबारनवीस मोठ्या कौतुकानें वर्णीत. तोच प्रकार पुढें पचवीस वर्षांनीं देवरावांचा झाला पालखीपदस्थ झाल्यावाचून नातलगांना तोंड दाखवावयाचें नाहीं असा रावांनीं संकल्प केला, समोरचें ताट दूर सारलें, आणि आपल्या वीरप्रसू मातोश्रीच्या आणि गृहदेवतांच्या समोर साष्टांग नमस्कार घालून राव घराबाहेर पडले त्या वेळच्या आयांना हे रोजचे अगवळणीं पडलेले प्रकार होते तथापि मातोश्रीला काय दुःख झालें असेल याची कल्पना आज दूरच्या शाळेंत अथवा नातलगाकडे विद्यार्जनाकरितां लेंकरूं पाठविणाऱ्या आईबापाना वेगळी द्यावयाला नको "सत्रांत रुद्ररूपें देहभावा विसरला। तेथून तीन अब्दीं गोविंदनाथा शरण गेला" असें मल्हारनाथ आपल्या आरतींत म्हणतात सत्रांत हा

शब्द सत्राशेंत या अर्थी योजिला आहे म्हणजे देवरावांचा जन्म शके १६७६ (फ ११६६, इं १७५४), मुमुक्षुत्व शके १७०० (फ ११९०, इ. १७७८), गोविंदनाथांची भेट व अनुग्रह शके १७०३ (फ ११९३, इ १७८१); मल्हारनाथावर देवनाथांचा अनुग्रह शके १७२० (फ १२१०, इं १७९८), मृत्यु शके १७४३ चैत्र शुद्ध नवमी (फ १२३३, इ १८२१), पेशवाईनंतर तीन वर्षांनीं, अशी यांच्या चरित्रक्रमाची ठळक जन्त्री बसते

---

# अनुग्रह.

२८ अनुताप होऊन देवराव कसे बाहेर पडले याची हकीकत आता सांगितली अनुताप हें बीज आहे, आणि अनुग्रह हें त्याचें फळ होय मनुष्याचा एक मार्ग सुटला आणि दुसरा सुसंगतपणें लागला नाहीं म्हणजे त्याची जी अर्धवट स्थिति होते तिला पिसाटपणा अथवा पिशाचपणा म्हणतात बालोन्मत्तपिशाचादिक वेगवेगळाले साधूचे प्रकार असल्यामुळें कोणी भाविक असल्या प्रारब्धादिक पिसाटपणालाही साधुत्वाचा मान देतात, पण ती अर्थातच त्याची चूक होय लोकांनीं उगीच आपल्यामागें लागून आपल्याला उपाधि लावू नये म्हणून कित्येक वेळां पक्के असलेले साधू पिशाचवृत्तीचा अवलंब करितात, पण तो त्यांचा पिसाटपणा नव्हे देवरावांचा पहिला पिसाटपणाच होता कोणी कच्च्या मांत्रिकानें कांहीं मंत्राराधना करावयाला सांगितली, त्याच्या क्रियेंत चूक होऊन बुद्धिभ्रंश झाला, आणि मग त्याच मांत्रिकाच्या सांगण्यावरून अनुष्ठान केल्यानें आराम पडला आणि साक्षात्कार झाला त्या वेळीं देवतेनें यांच्या जिव्हेवर रामनामाचीं अक्षरें काढलीं असें कोणी सांगत, तर कोणी भाविक लोक तीं अक्षरें आपण स्वतः पाहिल्याचें सांगत इतका साधुभक्तीचा जिव्हाळा असलेले दैवाचे पुतळे जागजागीं आढळतात, पण त्यामुळें भक्तिमार्ग जास्त दृढावतो असें मात्र नाहीं

२९ ही साक्षात्कार देणारी देवता म्हणजे मारुती मारुतीची सेवा देवरावांनीं फार निग्रहानें चालविली. सुरजीअंजनगांवापासून वीस कोसांवर बारी म्हणून खेडें आहे. हें अकोला जिल्ह्यांत जळगांव तालुक्यांत आहे तेथे हनुमंताचें जागृत स्थान असल्यामुळें या गावाला 'हनुमंताची बारी' असें

नांव पडलें  सुरजी येथील मारुती हाही असेंच जागृत स्थान आहे असें म्हणतात  श्रीरघुपतराव दाजीसाहेब यांचे मूळपुरुष कै विठोजी नारायण देशपांडे यानी हिजरी १०८७ ( इ स १७०९ ) मध्यें हा मारुती स्थापिला. हा अजून उघड्या चवथऱ्यावर आहे व माझें देवालय बांधूं नका असा दृष्टांत देत असल्याचें समजतें  देवराव आपल्या आखाड्यातले उपास्य हनुमान याची नेहमीं भक्ति करीत आणि वीस कोसांवर वारीच्या हनुमंताच्या दर्शनाला जात  मी सुरजींत आहेंच, सबब इतकें दूर येण्याचें कारण नाहीं ' असा वारीच्या मारुतीनें दृष्टांत दिल्यामुळें त्यांनी वारीला जाणें बंद केलें, आणि सुरजींतच आराधना सुरू केली  मागें सांगितलेली पालखी-पदस्थ होण्याची प्रतिज्ञा आईजवळ करून देवराव घराबाहेर पडल्यावर त्यांना मारुतीखेरीज बोलाचालावयाला आधार राहिलाच नाहीं. या मारुतीचे गबाभट कुडले नावाचे उपासक होते  लोक म्हणत कीं मारुती त्याना वानररूपानें दर्शन देई आणि त्यांच्याशीं संभाषण करी  गबाभटानीं मारुतीची व देव-रावांची भेट केली, आणि मारुतीच्या प्रेरणेनें गोविंदनाथानीं येऊन देवरावांना सनाथ केलें, अनुग्रह केला, आणि देवनाथ हें नांव ठेवलें  सद्गुरूचा अनु-ग्रह झाल्याचें ऐकून मारुतीरायाला फार कृतार्थ झालोंसें वाटलें, आणि ' प्यारे उलट कमलमों पलट देखले मौजा ' या पदानें आपली स्थिति व्यक्त केल्या-वर मारुतीनें संतोषानें शीघ्रकवित्वाचें वरदान दिलें  या वेळीं त्यांचें वय सरा-सरी वीस बावीस वर्षांचें होतें  नाथ कीर्तन करावयाला लागले  त्यांत समयस्फूर्तीनें जीं पदें, लावण्या वगैरे येतील त्या म्हणाव्या  तथापि अशीं पदें लहान लहान पदांपैकींच असावींत. जीं फार मोठी पदें आहेत त्याला क्वचित् तयारी लागतही असेल  अशी तयारी करणें यांत कांहीं गौण नसून तें सर-स्वतीचें षोडशोपचाराचें वंदनच होय  बाकी नाथ शीघ्रकवि होते व फार श्रेष्ठ प्रतीचे शीघ्रकवि होते हें त्यांच्या कवितेवरून स्पष्ट दिसतें  जसें शीघ्र-कवित्व तसेंच वक्तृत्वही फार उत्तम होतें  प्रतिपादन चांगलें त्यांत व्यवहार व परमार्थ यांची जोड चांगली बसलेली  गृहस्थाचें लेंकरू असल्यामुळें व तालिम-बाजांचें नायकत्व केलें असल्यामुळें शापादपि शरादपि सामर्थ्य, शास्त्रावलोकन, सत्यनिष्ठा, शास्त्रोच्चाराला व्यवहारपाटवाची व समयसूचकतेची जोड, शरीर-सौंदर्य, मर्दानी आवाज, बेफिकीर व बेमुर्वतीची भाषणशैली, दुसऱ्याला खालीं मान घालावयाला लावण्याचें नजरेचें सामर्थ्य, दांडगी आत्मप्रतीति,

आणि ईश्वरवाक्याच्या समर्थनार्थ देह खर्ची घालण्याची तयारी, इतक्या सामग्रीनिशीं जें थोराचें लेंकरूं देशसंचार करावयाला निघालें आणि कीर्तनकार बनलें, ज्याला गोविंदनाथांसारख्या बहाद्दुरानें देशकालयोग्य वर्तणुकीची तालीम दिली, त्याला पाखंडधूत्कार सहन होत नसत आणि ज्ञानाध उलूकांना तो भिववी आणि ताळ्यावर आणी यांत नवल कसलें? गोविंदनाथाचे जे अभंग आमच्या पहाण्यांत आलेले आहेत त्यावरून नव्वदाव्या वर्षी वारलेला हा पुरुष देवनाथांचा गुरु व्हावयाला सर्वथैव पात्र होता यावद्दल कांहीं शंका रहात नाही यांच्या चारित्राची व कवितेची कांहीं माहिती येथे द्यावी असा विचार होता, पण जमल्यास यांची कविता छापावी असा विचार आहे, त्या वेळीं आम्ही स्वतःची व वाचकांची इच्छा पूर्ण करूं आज विस्ताराला भितों. या सत्पुरुषाची आणि श्रीमारुतीची कृपा झाल्यापासून देवरावांना सनाथत्व झालें गुरु, उपास्यदैवत आणि शास्त्र या तिन्ही दुर्लभ गोष्टींची जोड देवनाथांना लाधली[१]

१. काव्यसंग्रहकारांनीं ही मारुतीच्या व गोविंदनाथांच्या भेटीची गोष्ट फार प्रेमळपणानें दिली आहे. विस्तारभयाकडे दुर्लक्ष करून ती पुढें देतों

"इकडे गोविंदनाथ म्हणून परम सत्पुरुष नाथपंथी भागवतसमदार्शी भगवद्भक्त प्रवास करीत होते. हे कोंकणस्थ ब्राह्मण होते. अकोला (वऱ्हाडांत) तालुक्यांत घुसर म्हणून गांव आहे, तेथचे हे रहाणारे. ह्या ठिकाणीं गोविंदनाथमहाराजांचें अद्यापि घर आहे असें म्हणतात. त्यांस दृष्टांत झाला कीं, सुर्जी गांवी कोणी देवराव म्हणून आहे त्याची वैराग्यवृत्ति होऊन चित्तशुद्धि चांगल्या प्रकारची झालेली आहे याकरिता तिकडे जाऊन त्यास अनुग्रह द्यावा. असा दृष्टांत होतांच गोविंदनाथ फिरत फिरत सुर्जीस आले. तेव्हां देवरावाची स्वारी मारुतीचे चवथऱ्यावर असलेल्या दीपमाळेजवळ आसन घालून बसली होती. त्या वेळची देवरावांची पारमार्थिक योग्यता किती म्हणून वर्णन करावी!! वैराग्यवृत्तीमुळें मुखावर आलेला तो उदासीनपणा, निस्पृहतेची ती झांक, उपास्य मानलेल्या देवतेचे ध्यानाकरितां केलेली ती अर्धोन्मीलित दृष्टि मधूनमधून साक्षात्कारामुळें उत्पन्न होणारे अष्टसात्विक भाव व तदंगभूत अंतःकरणांत उदय पावलेली ती संतोषवृत्ति व तीमुळें उपोषणापासून शरीरावर होणारे विकार न होतां उलट आलेली तुष्टिपुष्टि, प्रत्यक्ष दर्शन होऊन आतां खास आपलें काम झालें हें पाहून होणारा आनंद, हीं सर्व त्या देवरावांचे मुखावर स्पष्टपणें दिसत होतीं. अशी ती मुद्रा पहातांच गोविंदनाथांनीं पक्कें ओळखलें कीं, भगवंतांनीं दृष्टांत देऊन अनुग्राह्य म्हणून जें पात्र सांगितलें तें हेंच. असें जाणून गाडींतुनच हांक मारिली, "देवराव! इकडे ये. ही हांक ऐकतांच देवरावास किंचित् आश्चर्य वाटलें कीं,

(पान ३२ पहा)

# पालखीपद.

३० गुरुमाउली भेटली तरी जन्ममाउलीचे डोळे अजून निववावयाचें होतेच. बायकांची जात व्यावहारिक जास्त वेदान्तांत ज्याला आपण नित्यानित्य म्हणतों त्यांतल्या नित्यपरमेश्वर वस्तूवर त्यांची भक्ति मनापासून असते, पण अनित्य अशा मायिक वस्तूकडे त्याचा ओढा पुरुषांपेक्षां जास्त

( पान ३१ वरून पुढें चालू )

' माझे ओळखीचे गृहस्थ नसतां एकाएकीं माझें नांव घेऊन हांक मारितात हे काय ? परंतु असेल कोणी तरी, ' असें समजून कांहीं बोलले नाहींत परंतु, गोविंदनाथांनीं पुन स्पष्ट सांगितले कीं, ' तुजवर अनुग्रह करण्यास आज्ञा झाली आहे तर मज-बरोबर चल ' तें ऐकून देवरावांनी मारुतीकड बोटे दाखवून सांगितलें कीं, ' हा गुरु येथें बसला आहे. याहून दुसरा गुरु नाहीं, तो करील तें प्रमाण, दुसरे कोणाची आ-म्हांस जरूर नाहीं, आह्मी येत नाहीं. असें उत्तर मिळतांच गोविंदनाथ यांनीं आपली गाडी मागें जेथें तालमीचा आखाडा होता म्हणून लिहिलें आहे तेथें नदीतीरीं असलेल्या पिंपळाचे झाडाखालीं नेली व तेथें ते गाडी सोडून बिऱ्हाडास उतरले. त्याचा नित्य नियम असा असे कीं, दिवसां झोंप घ्यावयाची व रात्र झाली म्हणजे मग शौचमुखमार्जन व स्नानपूजा वगैरे सर्व विधि करून रात्रभर भजनपुराण वगैरे संप्रदाय चालवावयाचा व उजाडण्याचे वेळीं पुन निजावयाचें असा होता. जसें भग-वंतांनीं गीतेंत [ गीता—अ० २ श्लो० ६९ ] म्हटलें आहे कीं,

या निशा सर्वभूतानां तस्यां जागर्ति संयमी।
यस्यां जाग्रति भूतानि सा निशा पश्यतो मुने ॥

ह्या भगवदुक्तीप्रमाणेंच व्यवहार होता. असो. इकडे देवराव गोविंदनाथांस मागें सांगितल्याप्रमाणें उत्तर देऊन पुन. तेथेंच बसले. रात्र झाल्यावर मारुतीने देवरावांस सांगितलें कीं, ' तूं गोविंदनाथ म्हणून येथें आले आहेत त्यांजकडे जा. ते तुजवर अनु-ग्रह करतील. ' त्यावर देवरावांनीं रागानें उत्तर दिलें, ' महाराज, आपण मला आपला म्हटलें आणि आतां दुसरीकडे बोट दाखवितां हें काय ? मी कोठेंही दुसरीकडे जाणार नाहीं. ' त्यावर मारुतीनें सांगितले कीं, ' तुला तिकडेच सर्व प्राप्त होईल, ह्याकरितां तूं तिकडे जा.' त्यावर देवरावांनीं निरुपाय होऊन ' मला गेलेंच पाहिजे ना ? असें त्रिवार उच्चारून विचारून ' जावें ' अशी आज्ञा होतांच मध्यरात्रीं तसेच निघून जेथे नदीतीरीं' गोविंदनाथ उतरले होते तेथें गेले व त्यास साष्टांग नमस्कार घालून सर्व वृत्तांत निवे-दन केला. गोविंदनाथानीं विनोदानें म्हटलें, 'का, येत नव्हता, मग आतां कसे आला ?'

( पान ३३ पहा )

असतो मुलालाही आपली पहिली ऐहिक कमाई मातोश्रीला नेऊन दाखवावी ही महत्वाकांक्षा फार असते. पहिलें बक्षीस, पहिली प्राप्ति, पहिला मानपान हीं आईला अर्पण करण्यात पुत्राला समाधान वाटतें, आणि तेवढीं मुलानें गौरवानें आणि स्मरणानें आणून पुढें ठेविलीं म्हणजे मातोश्रीला पुढें कशाचीही इच्छा रहात नाहीं नाथांनीं मातोश्रीचे कोड पुरविलें गुरूची आज्ञा घेऊन नाथ जगदुद्धार करावयाला निघाले ते बडोद्याहून फिरत फिरत पुण्यास गेले, आणि तेथें त्यांच्या कीर्तनाचा फारच लौकिक झाला पुण्याचें पुण्य-

---

( पान ३२ वरून समाप्त )

हे ऐकून देवराव म्हणतात, ‘ ज्यानें आम्हास आश्रय देऊन ‘ आपला ’ म्हटलें त्यानेंच जाण्यास सांगितल्यावर मग काय उपाय ’ ’ नंतर गोविंदनाथ म्हणाले, ‘ त्याच्याच आज्ञेवरून आम्हीं येताना आपल्यास हाक मारिली परंतु, त्या वेळचा आपला खडखडीत जबाब ऐकतांच आमचा निरुपाय झाला ’ त्यावर देवराव म्हणाले, ‘ झालें तें झालें, आतां शरणागताचें रक्षण करून कृपा करावी ’ मग गोविंदनाथांनीं देवरावास सहा महिने आपल्याबरोबर वागविलें व त्यास नित्य समागमें घेऊन सुर्जीच्या आसपास रानांत व गावोगांवीं फिरावें असा क्रम चालविला एके दिवशीं अकोट तालुक्यांत ( जिल्हा अकोला, प्रांत वऱ्हाड ) वाई म्हणून गांव आहे तेथें मुक्काम झाला; व मध्यरात्री गोविंदनाथ त्यांस बरोबर घेऊन त्याच गांवच्या रानांत गेले. आणि तेथें बसून कांहीं पारमार्थिक गोष्टी चालल्या असतां गोविंदनाथ देवरावास एकाएकीं म्हणाले, ‘ देवराव ! या वेळेस क्षुधा लागली आहे व पुरणाची पोळी पाहिजे. ’ देवनाथ म्हणाले, ‘ ठीक आहे आतां सर्व सामग्री आणून सिद्ध करतो ’ असें म्हणून वाई गांवांत जाऊन तेथील शिवाजी पाटलाचे घरून सर्व सामान आणून स्वतः स्वयंपाक सिद्ध केला व पुरणाची पोळी करून पात्र वाढलें आणि सद्गुरूस भोजनास उठण्यास सांगितलें. तेव्हां गोविंदनाथांस आश्चर्य वाटून ते म्हणाले, ‘ देवराव ! एवढ्या रात्रीं सामान मिळवून स्वयंपाक सिद्ध केलास काय ? ’ त्यावर ‘होय’ असें उत्तर देताच ‘ठीक आहे’ असें म्हणून भोजनास बसले देवरावांस समोर बसवून एक ग्रास आपण खावा व एक ग्रास देवरावांच तोंडात घालावा. अशा रीतीनें भोजन चाललें असतां देवरावाचे मस्तकीं हस्त ठेवून त्यास अनुग्रह दिला याच वेळीं देवरावांचें देवनाथ असें नांव ठेविलें आणि सांगितलें की, ‘ आतां लोकानुग्रह करून जगदुद्धार करावा. ’ ही अनुग्रहाची हकीकत दुसऱ्या कोणासही माहीत नव्हती. फक्त मागें जे खुशालरावबाबा देशपांडे म्हणून त्यांचे समवयस्क खेळगडी होते असें लिहिलें आहे, त्यांजपाशीं तेवढी देवनाथांनीं स्वतः सांगितली व तीच पुढें कर्णपरंपरया सर्वश्रुत झाली असो पुढें लवकरच गोविंदनाथ आपल्या प्रदेशीं नागपुराकडे चालते झाले. इकडे देवनाथ यांस सद्गुरूचा अनुग्रह झाल्यामुळें अत्यानंद होऊन कृतार्थता वाटूं लागली. गुरुवाक्य, शास्त्र, आत्मप्रतीति यांची एकवाक्यता होऊन स्वसाधानवृत्ति अगावर वसूं लागली.

पूजन आताप्रमाणेंच तेव्हांही होतें. तेथील विद्वान् व समर्थांनीं त्यांची चांगली समोवृत्ता केली. थोरले माधवराव पुन्हां जन्माला आले असें ज्या बालप्रभूच्या जन्माच्या कालीं सर्व सरदारांनीं एकमेकाना पत्रव्यवहारानें कळविलें, ज्याच्या बाललीलांवरून तत्कालीन मुत्सद्दी पुढील राज्यधोरणाचे शकुन बांधीत, एकदर जगाच्या ज्ञात व अज्ञात इतिहासामध्यें परिक्षितीच्या मागून गर्भस्थ अशी ज्याच्या नांवाची द्वाही फिरली, व बारभाईच्या रूपानें श्रीकृष्णपरमात्म्याचें सुदर्शन ज्याच्या रक्षणार्थ अखंड समोंवार फिरत होतें, तो सवाई माधवरावमहाराज या वेळीं पेशवाईचा मालक असून त्याच्या नांवाचा सवाई डंका चोहोंकडे वाजत होता त्याचा मुख्य प्रधान नाना फडणवीस हा मात्र विद्वानांचा फारच कडक परीक्षक असल्यामुळें 'गडसास्वडयोर्मध्ये द्राविडो लुडबुडाम्यहं' अशी त्याच्या वेळीं प्रत्येक विद्वानाची अथवा अविद्वानाची स्थिति होई नाथांना त्या मुत्सद्याचा अनुभव काय आला होता हें निश्चित करणें कठिण आहे पेशव्याच्या मातुश्री श्रीमती गंगाबाई या या वेळीं नुकत्याच वारल्या होत्या, आणि मातुश्रींनीं अनुग्रह घेतला असें जें रा कावलकर लिहितात त्या बाई पेशव्याच्या अगर दुसऱ्या कोणी थोर घराण्यांतील दुसऱ्या एखाद्या बाई असाव्या असें वाटतें[1] नाथांचा फार गौरव होऊन त्यांच्या इच्छेप्रमाणें घोडेस्वार पालखीनिशीं त्याना सुरजीकडे रवाना करण्यांत आलें, आणि मातुश्रींच्या डोळ्यांचे पांग फिटले. सरंजाम परत झाला, आणि आखाडयाच्या जागीं स्थापिलेल्या मठांत राहून नाथांनीं आजूबाजूच्या मुलुखांतून जगदुद्धाराचें काम चालविलें

---

## जगदुद्धार व काव्यरचना.

३१ देवनाथांच्या कविता छापून प्रसिद्ध झाल्याला आज वीस वर्षांवरतीं जास्त काळ लोटला; आणि तेव्हांपासून या कवीची कीर्ति विदर्भाची सरहद्द ओलांडून सर्वत्र महाराष्ट्राला आक्रमण करावयाला लागली आहे तथापि कीर्तिपरिमल हा केवळ मुद्रणाच्या द्वारेंच पसरतो असें कोणी समजूं नये.

---

१ ऐतिहासिक लेखसंग्रह भाग ६ वा यांत रा. खरे शास्त्री मिरजकर हे लिहितात कीं, मातुश्री गंगाबाई या तारीख १२,७,१७७७ ( शके १६९९ ) ला वारल्या. यानंतर चार वर्षांनीं नाथांना अनुग्रह झाला असें श्री. मल्हारनाथांच्या आरतीवरून स्पष्ट दिसतें.

ग्रा. प्र.

सरोवराच्या निश्चल पाण्यामध्यें एखादा लहानसा खडा टाकला असतां त्याचीं एकमेकांसभोंवतीं अनंत वर्तुळें उत्पन्न होतात आणि त्या वर्तुळांचें आंदोलन चारी थडींपावेतों जाऊन पोहोंचतें अशीच गोष्ट महापुरुषाची असते त्याच्या अंगीं जितके गुण असतील त्यांतल्या प्रत्येकावर वेगळ्या वेगळ्या कारणामुळें लुब्ध झालेलें वेगळें समाजमंडळ बनत जातें, आणि त्याच्या छायेचा आसरा जितक्या कमीअधिक प्रमाणानें त्यांना मिळतो, तितकाच पाठिंबा त्याच्याकडून त्याला पोहोंचतो नाथाचा प्रवास कर्नाटक, महाराष्ट्र, उत्तरहिंदुस्थान या सर्व प्रांतांतून होत असल्यामुळें नाथांनीं तिन्ही भाषेंत कविता केली आहे आम्हांला पुष्कळांनीं असें वारंवार सांगितलें आहे कीं, नाथांनीं काशी, ग्वाल्हेरकडे असतांना जशी हिंदुस्थानींत कविता केली त्याचप्रमाणें कानडी भाषेंतही त्याचीं दोनतीनशें पदें आहेत आम्हांला त्यांच्यांपैकीं एकही मिळालें नाहीं, व मिळतें तरी या भागांत कदाचित् आम्हीं त्याचा समावेश केला नसता तथापि कर्नाटक मुलुखामध्यें मराठी व कानडी ह्या दोन भाषा चांगल्या जाणणारे असे पुष्कळ विद्वान् गृहस्थ आहेत भाषा-भिवृद्धीकरितां त्यांचे प्रयत्न अहर्निश चालू आहेत, आणि पुढेंमागें महाराष्ट्र-संस्कृतीचा कन्नड मुलुखावर काय काय परिणाम झाला याचा शोध करण्याची जर कोणाला स्फूर्ति झाली तर त्याला इकडील कवींनीं तिकडील भाषेमध्यें ग्रंथरचना केली आहे या गोष्टीपासून पूर्वकालीन हिंदूंच्या धार्मिक ऐक्यत्वाबद्दलचा बोध घेतां यावा म्हणून आम्हीं येथें हा निर्देश केला आहे. पूर्वींचे कवी दोन दोन तीन तीन भाषांतून कविता करीत याबद्दल आश्चर्य मानावयाला नको. रामजोशी, अमृतराय, देवनाथ, वगैरे कवींनीं ज्याप्रमाणें मराठीबरोबर इतर भाषांतून कविता केली आहे त्याचप्रमाणे मानपुरी, निपट-निरंजन, गिरिधर, चंद्रसखी इत्यादि हिंदुस्थानी कवींनीं मराठी भाषेंत कविता केली आहे मात्र असे कवी थोडे, आणि कवितादेवीच्या अनन्यगतिक-नितांतसेवनानें जी फार मोठी फलप्राप्ति व्हावयाची ती एका भाषेला चिकटून राहिल्याचा निश्चय केल्यावांचून होत नाहीं सरस्वती ही विद्यादात्री खरी, तथापि भोजराजाच्या दरबारांतील पंडित नवरत्नांची आराधना केल्या-वांचून जसें दरबारांत नवीन पंडिताना प्रवेश घेत नसे तसेंच सरस्वतीमंदिरां-तील पूर्वींच्या सर्व देवतांचा आशीर्वाद झाल्यावांचून नवीनाला देवपणा प्राप्त होत नाहीं. ग्रंथारंभीं पूर्वींच्या संस्कृत व प्राकृत कविश्रेष्ठांना वंदन करावयाचें

व मग आपल्या ग्रंथाला सुरुवात करावयाची हा महाराष्ट्रकवींचा सामान्य प्रघात आहे हें वंदन केवळ औपचारिक न होतां ग्रंथपरिशीलनानेंच झालें पाहिजे, आणि तसें झाल्यावांचून तें फलद्रूप होत नाहीं हें उघड आहे असें परिशीलन आपली सर्व शक्ति एका भाषेलाच खर्च केली असतां जितकें चांगलें होतें तितकें दोन अथवा अधिक भाषांचें परिशीलन करावें लागलें असतां चांगलें होऊं शकत नाहीं हा दोष नव्हे, हें केवळ परिस्थितीचें मूळ आहे. नाथांचा आयुष्यक्रम एका जागेला अथवा एका क्षेत्राला मर्यादित न होतां सर्व मुलूख हिंडण्यामध्यें गेला; अर्थात् ही गोष्ट तत्कालीन परिस्थितीला हितावह अशीच झाली, तथापि या प्रवासीचारित्र्यामुळें त्याच्या हातून एखादा विशाल ग्रंथ निर्माण न होतां लहान लहान पदें पुष्कळ रचिलीं गेलीं मोठा ग्रंथ लिहिण्याकरितां जो शांत काळ लागतो, त्याचें चीज होण्याजोगी जी विद्वानांची एकवाक्यता लागते, ती सर्व या काळीं नष्ट होऊन जसें लक्ष्मीपुत्रांमध्यें व समशेरबहादरांमध्यें अराजक माजत चाललें होतें तशीच अनास्था व उदासीनता विद्या आणि धर्म यांच्याबद्दल समाजाची होत चालली होता जो उठला तो कवी, आणि जो उठला तो साधू, असा सुळसुळाट झाला होता. ही स्थिति गुजराथ व उत्तरहिंदुस्थानामध्यें त्या काळीं झाली होती हें महात्मा दयानंदसरस्वतीच्या ग्रंथावरून स्पष्ट दिसतें लोकांमध्यें पेंढार माजलें आणि व्यवस्थित शांततेचा भंग झाला होता, यामुळें जसें नायकाचे सरदार बनावयाला लागले तसेंच चार वेदान्ताच्या गोष्टी सांगतां येऊं लागल्याबरोबर भोंदूचे साधू होऊं लागले होते गोपाळनाथांनीं पुढील पदांत म्हटल्याप्रमाणें:—

तुम्ही या गांवचे का त्या गांवचे ।
आडनांव तुमच्या काय बाचे ॥ ध्रु० ॥
बहुत भले दिसतात, जपध्यान करितात ।
कळाकुसरीनें युक्तीनें धीटपाठ बोलतात ॥ तुम्ही० ॥ १ ॥
यत्रंमंत्र कळास्त्र लाविती मुद्रा घोकिती शास्त्र ।
म्हणावीं सार, हीं पार, सर्व च्यार या गांवचे ॥ तुम्ही० ।२।

विनआडनांवाचे म्हणजे विनपंथाचे, विनगांवचे म्हणजे बिनमठाचे आणि बिनबापाचे म्हणजे विनगुरूचें, परंतु दिसण्यांत भले, जपध्यान करणारे, कळाकुसरी युक्तीनें धीटपाठ बोलणारे, थोडेंबहुत शास्त्र घोकणारे पथ

मूळ वस्तूपासून दूर सुटलेले, अशा अनेक पाठान्तर साधूंचा सुळसुळाट व्हावयाला लागला होता पेशवाईंतील तेज नष्ट होऊन तिच्याबरोबरच विद्येचेंही तेज लुप्त होत चाललें होतें नाथासारख्या सच्चा धर्मभक्तांनीं चोहोंकडे प्रवास करून जागोजाग हरिनामाचा गजर केल्यामुळें विद्येचे भोंदू आणि विद्येचे भारवाहक या दोघांनाही आळा बसला हें नाथांचें मनापासून आणि खरें खरें असें कार्य झालें आणि हाच नाथाचा खरा जगदुद्धार होय नाथांचें मुख्य क्षेत्र जो वैदर्भ देश हा त्या वेळीं धड मराठी अथवा धड मुसलमानीही नव्हता राजकारणामध्यें कांहीं अम्मल निजामचा, कांहीं भोंसल्यांचा, कांहीं पेशव्यांचा आणि या सर्वांमध्यें शेखडल्लासारख्या पेंढाऱ्याचा होता आज लोकवस्तीनें गजबजलेलें वऱ्हाड बऱ्याच भागांतून निर्जन असें होतें आणि सगळ्याचा अन्नदाता जो कुणबीवर्ग त्याला वाटेल त्या चोरांनीं लुटावें आणि वाटेल त्या फकिरानें अथवा साधूनें फसवावें अशी स्थिति होती. मुसलमानी फकिराच्या वेदान्ताला भुलून सर्वांभुतीं एकच परब्रह्म भरलेलें आहे याची प्रतीति घेण्याकरितां गुळाची गाय करून तिचे तुकडे करून प्रसाद म्हणून भक्षण करणाऱ्या अनेक ब्राह्मणांना या वेळी बहिष्कृत करण्यांत आलें होतें. ही जर उच्च वर्णांची स्थिति तर बाकीचे लोक दिसेल त्या धडग्याला नवस करीत अथवा प्रत्येक नाक धरणाऱ्याच्या मागें भक्तिभावानें लागत यांत त्यांचा दोष नाहीं आपल्याला ठाऊक असेल तें लोकांना शिकवावें व लोक हळू हळू शहाणे करून सोडावे अशी समर्थांची आज्ञा आहे आणि यालाच जगदुद्धार म्हणतात.

**३२** हा जगदुद्धार शब्द वाचला म्हणजे वाचक साहजिकपणे घाबरतात एखादा बहुश्रुत विद्वान् चोहोंकडे कथाकीर्तनें, पुराणें अगर व्याख्यानें देत हिंडला असतां त्याला जर जगदुद्धार म्हणावयाचे, तर मग दुनियेंत जे महान् धर्मसंस्थापक झाले त्यांच्या कृतीला काय म्हणावयाचें ! पण ही परिभाषा आहे, आणि आम्ही तिनें बद्ध आहों. वैद्याला नारायण हरि भावावयाचें, औषधाला जान्हवीतोय म्हणावयाचें, वक्त्याच्या आसनाला व्यासपीठ म्हणावयाचें, पुराणिकाला सूत म्हणावयाचें, टाळ, मृदंग वाजवतील त्यांना संत म्हणावयाचें, भगवें पांघरील त्याला साधू अथवा महंत म्हणावयाचें ही परिभाषा जुन्या ग्रंथांतून फार आढळते मुसलमानी अमलाखालच्या लोकांत मुलाला शहाजादा, घराला दौलतखाना, पाटलाला महाराज, कारकुनाला दिवाणजी, शिपा-

वाला जमादार, अंमलदाराला नबाबसाहेब हीदेखील बहुमानाची परिभाषा लावली जाते, आणि दोहोंमध्यें तत्व एकच जुन्या ग्रंथांतून जगदुद्धार शब्द येतो त्याचा अर्थ हरिनामाचा गजर करीत हरिदास्याचा प्रसार वाढविणें हाच होय साधुसंतांचें क्षेत्र एवढेंच "परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृतां। धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगेयुगे" असा जो जगदुद्धारयत्न असतो तो अशेषगुणसंपन्न भगवताचा बाकी जो जो यत्न मनुष्य करील त्याला थोडें-बहुत भगवंताचें अधिष्ठान असलें म्हणजे तो जगदुद्धारच झाला. देवनाथ हे पडत्या काळांतले साधू होते हें मागें लिहिलें आहेच वाचक पृच्छा करतील कीं पडत्या काळांतल्या, पेशवाईचा अंत पहावयाला जगलेल्या, साधूच्या हातून जगदुद्धार काय झाला? त्याला उत्तर हेंच कीं पाहतां पाहतां धर्म बुडत असणाऱ्या त्या काळात ज्यानें ईश्वरनामाची ध्वजा उभारली त्याचें धैर्य व त्याचे समाजावर उपकार फारच मोठे समुद्राचा बांध फुटला म्हणजे एक मनुष्य आड पडल्यानें महापूर अडत नाही ही गोष्ट खरी ही आबालवृद्धांना समजते ही जाणणारा मनुष्य खरा खरा व्यवहारचतुर होय हेंही आम्ही जाणतों परंतु हें जाणून सुद्धां जो मनुष्य त्या महापुराच्या आड पडतो, बरोबरीच्यांच्या मत्सराला जुमानीत नाही, अपचसमर्थांच्या डोळाला भीक घालीत नाहीं, आणि केवळ आपण ईश्वराचे शिपाई, ईश्वरसेवेवांचून आपल्या देहाला किंमत नाहीं, आपल्या लौकिकाला मोठेपणा नाहीं, आणि आपल्या थोरपणाला खरें भाग्य नाहीं असें जो जाणतो, तोच खरा ज्ञानी आणि तोच परमेश्वराचा लाडका परमेश्वरी चमत्कार म्हणजे मूढ लोकाना वाटतें कीं, पांगळ्याला चालावयाला लावावें किंवा मुक्याला बोलावयाला लावावें परंतु भरतीच्या वेळीं पाणी थोडें मागें गेलेलें मधून मधून दिसतें आणि ओहोटीच्या वेळीं पुढें आल्याचा भास दिसतो हा चमत्कार सर्वांत सुखप्रद आणि बोधप्रद होय समाजाचें अथवा माणसाचें भाग्य वाढावयाला लागलें तरी मधून मधून सकटें येऊन न कळत वाढलें उतरावयाला लागलें तरी मधून मधून सुखाचें किरण येऊन हळू हळू उतरतें दिवसाला ढगांनीं सूर्यकिरण सौम्य होतात तर रात्रीच्या चांदण्यानें अंधकाराची तीव्रता थोडीशी बोथटते असें नसलें तर अज्ञानग्रस्त मर्त्यसमाज भाग्य काळांत उन्मत्त होऊन अनन्वित कृत्यें करिता आणि उतरत्या काळांत एकदम घाबरून जाऊन पूर्वपरंपरा सोडता व पदभ्रष्ट होता दोन्हींपासून वांचविणारें हरिनाम हें मोठें औषध होय आणि हें देणें हाच जगदुद्धार.

३३ नाथांना एका जागीं बसून ईश्वरसेवा करणें फार आवडे आणि चोहोंकडे हिंडण्याचा व्यवसाय त्यांच्या अजगरवृत्तीला प्रतिकूल होता, परंतु गुरुआज्ञेवरून त्यांनी तो स्वीकारला, याचें स्पष्टीकरण पुढील भागात येईल नाथाची जी अत्यंत ईशनिष्ठा, गुरुचरणीं मिलिंदवृत्ति आणि धर्मप्रीति अखंड-रूपानें वास करीत होती तिचें फळ म्हणून ईश्वरानें त्याना अमोघ कवित्व-स्फूर्ति दिली रा कावतकर लिहितात कीं, मारुतीनें नाथांच्या शिरीं वरदहस्त ठेवला आणि आजपासून बोलशील तें कवित्व होईल असा आशीर्वाद दिला. ही दंतकथा असली तरी यांतील बीज तितकेंच खरें आहे नाथांनीं सरस्वतीची सेवा केली नाहीं लोक नेहमीं अतिशयोक्तीनें बोलतात आणि नाथांना लिहितां वाचतांनाही येत नसे अशी दंतकथा अद्याप चालू आहे, तिची असत्यता आम्हीं पूर्वीं दाखविलीच आहे त्यांतील खरी गोष्ट एवढीच कीं, कवितेचा गुण आपले अंगीं यावा म्हणुन नाथांनीं कधीं परिश्रम केले नाहींत, व्याकरणाची खटपट केली नाहीं, न्यायशास्त्राला शिवले नाहींत, काव्यालकार त्यांच्या पायाशीं लोळत होते, तथापि श्रीमताची भाग्यवान् गृहिणी ज्याप्रमाणें एकाद्याच बहुमोल दागिन्याचा स्वीकार करिते आणि बाकीचे पेटींत पडूं देते, त्याप्रमाणें दोन चार अलंकारांच्या पलीकडे नाथ गेलेले दिसत नाहीत. पूर्वकवींची नवरसाची सामग्री सिद्ध असतां ज्याप्रमाणें लहान लेंकरूं पानांतला एखादा पदार्थ आवडला म्हणजे त्यावरच ताव मागीत बसतें, त्यासारखीच नाथांनीं भक्तिरसाची लयलूट केली गोपींचीं आणि कृष्णमुरलीचीं पदें पाहिलीं तर नाथ शृंगारवर्णनांत रंगेल आणि कुशल होते असें दिसतें, परतु तेथेंही शृंगार झांकला जाऊन ईशभक्तीचा मात्र वाचकावर परिणाम होतो गुरूवरची नाथांचीं पदें पाहिलीं तर वेदान्तचर्चेमध्यें आणि ब्रह्मचिंतनाच्या आकलनामध्यें नाथ बरेच पुढें गेले होते असें दिसतें, परतु तेथें देखील गुरुभक्ति आणि आत्मसमर्पण याच्याकडेच वाचकांचें मन वेधतें आपण उत्तम कविता करावी आणि चित्रकाव्य फार उत्तम वठलें म्हणून श्रोत्यांकडून वाहवा मिळवावी हा नाथांचा हेतु कोठेंही दृष्टीस पडत नाही, आणि नाथांनीं लोकांकरितां कविता केलीही नाहीं नाथ हें परमेश्वराचें लेंकरू होतें, त्यांचें बाळसें, त्यांचा अभिनय आणि त्यांचे आविर्भाव यांना मोहित होऊन सरस्वतीनें त्यांना आपल्या अंगाखांद्यावर खेळविलें म्हणून ते यदृच्छेनें सरस्वतीपुत्र भासतात. आणि म्हणूनच ते जें जें बोलले तें तें

साहजिकगतीनें काव्य म्हणून निर्माण झालें, त्यानें लोकांच्या मनोवृत्ति शुद्ध झाल्या, काव्याला कल्पकलेची जोड असली. त्यांची वेळ आल्याबरोबर

क्षीरतरुनें शालू दिला हा लाक्षारस दुसऱ्यानें ।
इतर लतांनीं हात उभारुनि दिधले हे दागिने ॥

याप्रमाणें त्याचे काव्यसाहित्य त्याच्यासमोर मूर्तिमत उभें ठाकलें समर्थांसमोर ऋद्धिसिद्धि हात जोडून तिष्ठत असतात त्या अशा.

३४ नाथाच्या कवितेचें वर्गीकरण आम्हीं प्रारंभीं जी अनुक्रमणिका दिली आहे त्यावरून समजेल तथापि येथेंही थोडक्यांत सागतों नाथांनीं श्रावणाख्या कृष्णजन्म आणि अहिमही हीं तीन आख्यानें रचलीं रामावर, श्रीकृष्णावर, गुरुगोपाळनाथावर व आनंदीनाथावर, विठ्ठलावर आणि नर दुबेलतेला साहजिक जडलेल्या भवभ्रांतीवर नाथानीं सुंदर कटाव रचलेले आहेत. काव्यसंग्रहकारांनीं सहा छापले होते, आम्हाला आणखी तीन मिळाले देवतावरतीं ज्यीं नाथानीं पदें केलीं त्यात गणपतीचीं दोन, जगदंबेचीं तीन, शंकराचीं पांच, जेजुरीच्या खंडोबाचें एक, मारुतीचीं नऊ आणि श्रीरामाचीं एकोणतीस, अशीं एकूणपन्नास पदें आहेत सीतास्वयंवरासेरीज रामचरित्रातला दुसरा विशिष्ट असा प्रसंग वर्णलेला नाहीं नाथाचा ओढा व आम्हीं दयाळनाथाच्या चरित्रांत सांगितल्याप्रमाणें दयाळनाथाचाही ओढा कृष्णचरित्राकडे जास्त होता असें दिसतें आमच्या संग्रहांत कृष्णाच्या बालक्रीडेवर अकरा, गोपीगान्हाण्यांबद्दल चार, कृष्णमुरलीनें गोपी लुब्ध झाल्या त्यावर सोळा आणि विरहावर नऊ अशीं एकंदर चाळीस पदें श्रीकृष्णावर आहेत ईश्वराला मातोश्री म्हणून आळविल्याचे दाखले महाराष्ट्र कवितेंत जागोजाग आढळतात; परंतु आपण व ईश्वर हीं एकमेकाचीं प्रेमभाजन हा जो उच्च कवितेचा विशिष्ट मासला शेखसादी वगैरे फारशी कवींच्या ग्रथांत असल्याचें ऐकूं येतें, त्याचा संस्कार नाथाच्या मनावरती होऊन तशा प्रकारचीं पदें नाथांनीं केलीं आहेत. ( पद १०२ पासून १०६ पर्यंत पहा )

---

१ [एलिचपुरकर नबाबांचा व नाथांचा प्रेमभाव होता हें पुढील भागांत येईल क्वचित् प्रसंगी हिंदु साधूंचा आणि मुसलमान साधूंचा अतिप्रेमसंबंध असे आणि ते परस्परांच्या ज्ञानरसाचे अभेद भावानें आकंठपान करीत, हें अकोट येथील नरसिंगबोवांच्या उदाहरणावरून वऱ्हाडांत सर्वश्रुत आहे. शेखमहंमद आणि कबीर यांची उदा-

( पान ४१ पहा )

"देख सुरत टक लागि नैनसो नैन भेद कर दिया" हें उर्दूपद देवनाथांनीं एलिचपूरकर नवाब सलाबतखा यांच्यासमोर कीर्तन करताना रचलें होतें आणि त्यांच्या आग्रहावरून त्यास उर्दूपदेंही करून दिलीं होतीं हें पुढील भागात येईल जसा देवनाथांचा संस्कार उर्दूभाषाभिज्ञावरतीं होत होता तसाच मुसलमानी फकिराच्या गूढ ज्ञानाचा संस्कार आमच्याही चरित्रनायकाला होता हें त्यांचीं जीं वेदांतपर हिंदुस्थानी पदें आम्हीं छापलीं आहेत त्यावरून स्पष्ट दिसेल. नाथांचीं कृष्णचरित्रपर जीं हिंदुस्थानी पदें आहेत, त्यांत ब्रिजभाषेची झांक मारते, आणि वेदान्तपर हिंदुस्थानी पदामध्यें निव्वळ उर्दूभाषा दिसते यामुळें त्यांच्या काव्यगंगेमध्यें तुळशीदासादिकाचा प्रवाह किती होता आणि फकिरीज्ञानाचा ओघ किती होता हें रसिक वाचकांना ओळखतां येईल आजचा विद्वान् केवढाही देशभक्त आणि देवभक्त झाला तरी बर्क, मेकॉले, मिल्टन, कार्लाईल वगैरे पाश्चिमात्य तत्ववेत्त्याचे ग्रंथ अवश्य वाचील हीच बहुश्रुतता तेव्हांच्याही विद्वानांत होती देवनाथांत होती याबद्दल संशय नाहीं निदान हीं जीं पाच पदें आहेत हीं आर्य

---

( पान ४० वरून समाप्त )

हरणें तर आपल्या डोळ्यासमोर आहेतच इंग्रजी विद्येचा परिचय आमच्या विद्वानांत घडल्यामुळे त्याचे परिणाम जसे मराठी सारस्वतावर झालेले हल्ली दृष्टीस पडतात, त्याचप्रमाणें तेव्हांच्या हिंदुमुसलमान साधूंच्या परस्पर प्रेमाचीं आणि सहवासाचीं गोड फळें निःसंशय महाराष्ट्र समाजाला चाखावयाला मिळाली आहेत. खुद्द समर्थासारख्या प्रपंच आणि परमार्थ ह्या दोन्ही कुबड्या कांखेत वाळगणाऱ्या साधूवर त्याच्या आयुष्यारंभाच्या आसेतुहिमाचल प्रवासामध्यें इस्लामधर्मतत्वाचा काय परिणाम घडला होता आणि त्यांच्या मनोवृत्तींना अथवा त्यांच्या लोकशिक्षणाला त्यामुळें कोणती दिशा प्राप्त झाली होती याचा जर कोणी शोध लावील तर मोठी बहार होईल. हें सामर्थ्य आमच्यात नाहीं. परंतु असा कांहीं संबंध समर्थांच्या आयुष्यांत आलेला असावा अशी आमची मनोदेवता साक्ष देते. रा राजवाडे यांनीं जें श्रीसमर्थ रामदास यांचें चरित्र ग्रंथमालेंत लिहिलें आहे, त्यात त्यांनीं समर्थांच्या मनाच्या श्लोकांतील एक ऐतिहासिक गूढ काढिलें आहे. ते असें म्हणतात कीं, या श्लोकांची वृत्त रचना मुसलमानी फकिरांच्या फारशी, उर्दू, व मराठी सवालांच्या वृत्त रचनेसारखी हुबेहूब दिसते. फकिरांच्या करिमांतील "करीमा बिबक्षायि बर्हालि या" आणि "मना सज्जना भक्तिपंथेंचि जावें" या दोहोंमध्यें फक्त अंत्याक्षराचाच फरक आहे, हें वाचकांच्या चट्दिशी ध्यानांत येईल. अमृतराय कवींचें सुदामचरित्र हें तर हुबेहूब करीमाच्याच चालीवर आहे. ]

संस्कृतीबरोबर फकिरी संस्कृतीचा मेळ झाल्याचीं निदर्शक आहेत अशी आम्हाला खात्री आहे या मेळामुळे महाराष्ट्र सारस्वताचें पूर्वी कोटकल्याण झालें इंग्रजी अध्ययनाचे मराठी भाषेवर अनिष्ट परिणाम होतील अशी हल्लीं देखील कांहींना भीति वाटते, परंतु पुढील समर्थ व स्फूर्तिपूर्ण ग्रंथकार इंग्रजी भाषेचा उपयोग मंगलप्रद करून घेतील अशी आम्हाला आशा आहे, कारण ही प्रभुकृपेची गोष्ट आहे गंगेंत यमुना मिश्र झाली तरी गंगा कायमच राहील याविषयीं चिंता बाळगावयाला नको

३५ रामचरित्रापेक्षा नाथानीं कृष्णचरित्र जास्त आवडीनें रचिलें आहे असें मागें लिहिले आहेच मुक्ति मिळेपर्यंत जिवाचें आचरण कसे असावें याचा बोध साधुसंत श्रीरामचरित्रापासून घेतात, परंतु जीवन्मुक्त कृष्णपरमात्म्याच्या चरित्रावर सर्वांचा भर फार गृहस्थाश्रमी असो कीं संन्याशी असो, बालवृद्ध असोत कीं महान् तत्ववेत्ते असोत, या सर्वांना श्रीकृष्णचरित्राच्या कथा गर्भावस्थेपासून अवतारसमाप्तीपर्यंत सारख्या मनोरम वाटतात. कृष्णमूर्ति जवळच्यांना कशी दिसे याबद्दल वामनपंडित सांगतातः—

मल्लां वज्र गमे, नरां नृप गमे, काम स्वयें स्त्री जनां ।
गोपां आप्त, खलां नृपप्रभु, शिशू मातापित्यांच्या मना ।
कंसा मृत्यु, अशक्त पामरजनां, संतांस तत्वामृत ।
श्रीशेषासन यादवां हरि दिसे रंगांत रामान्वित ॥

जशी कृष्णमूर्ति जवळच्या लोकांना दिसली, तसेंच हजारों वर्षें लोटल्यानंतर अजूनपावेतों कृष्णचरित्राचें तेज सर्व लोकांवर पडतें आया ज्याप्रमाणें लहान लेंकराचें परोपरीनें कौतुक करितात त्याप्रमाणें आज हजाराहून अधिक वर्षें महाराष्ट्रांतील साधुसंतानीं कृष्णचरित्राचें कौतुक केलें आहे रामकृष्णचरित्रें हीं रूपकें आहेत असें एखाददुसऱ्या प्राचीन ग्रंथकारानें आपलें मत दिलें आहे, पण बाकीचे साधू हीं चरित्रें मृगजळभास असें मानीत नसून परमेश्वराचे सगुणावतार आहेत असें मानतात, आणि त्यामुळे ईश्वरलीलेच्या प्रत्येक गोष्टीचें आश्चर्य मानितात निर्गुण परब्रह्म सगुण साकार होऊन जगदुद्धारार्थ गोकुळांत अवतरलें; केवढें हें आमचें भाग्य, करुणामेघश्याम प्रभूचा केवढा हा उपकार, अशा चिंतनांत आमचे सर्व साधू विस्मित आणि दंग झाले आहेत श्रीधरांच्या हरिविजयामध्यें ग्रंथकारापासून गोपगोपींपर्यंत प्रत्येकाला या प्रभुरूपेचें कौतुक करतांना देहभाव नष्ट झालेले आहेत हीच

तल्लीनता कृष्णचरित्रवर्णामध्यें देवनाथांची दिसून येते तोच श्रीकृष्ण पंढरपुरांत विटेवर उभा राहिला आहे अशा भावनेनें नाथांनीं विठोबाचें आराधन अशाच प्रेमानें केलें आहे

" देवनाथ म्हणे मी अज्ञान वर्णुं किती ।
हरिविजयाचे ग्रंथीं दाखला पहा बरा शोधून ।
सध्यां पंढरपुरीं विटेवरी उभा मनमोहन " ( पद ६५ ).

३६ निगमागमाना अगम्य असा प्रभु नंदयशोदेस्तव तान्हें बाळ, गोपाळांस्तव सवगडी, गोवत्सांस्तव बालगोप, व्रजकुमारीस्तव नवकिशोर, अर्जुनासाठीं सारथी, धर्मप्रभूसाठीं उच्छिष्टें काढणारा, श्रितलज्जारक्षणार्थ अंबरावतारी, वेगवेगळाल्या भक्तांसाठीं वेगवेगळाला प्रपंच कसा धारण करिता झाला हें कौतुक आमच्या नाथांनीं पूर्वींच्या कवींप्रमाणें वारंवार वर्णिलें, तरी वर्णनलालसा राहिलीच. हा भक्तिचमत्कार चिंतनीय आहे नाथ आपल्या आश्चर्यांत दंग आहेत सुखस्वप्न संपावें असें कोणाला वाटत नाहीं, त्याप्रमाणें मायोपाधीच्या कोशांना फोडून बाहेर पडलेल्या संतजीवांना ईश्वरलीलेच्या मायामोहांत पुन्हां मुद्दाम गुरफटून घ्यावेंसें वाटतें हीं चरित्रें बोधपर रूपकें आहेत असें कोणी सांगतलें तरी त एकावरसें वाटत नाहीं नरदेह मलमूत्रमय असून मर्त्य आहे या उपदेशाचा ठसा जसा देहवंताला पटत नाहीं, तसेंच ईश्वरी लीला ऐकून अश्रुधारा वहावयाला नकोत हें साधूना वाटत नसे. नाथांनीं कृष्णचरित्रांत आपल्या सर्व मनोवृत्ती मुरविल्या, आणि हें परब्रह्म बाळलीला करतें आणि आपल्याला व विश्वाला रिझवितें हा ईश्वरी उपकार व महाचमत्कार मानला

' करारविंदेन पदारविंदं । मुखारविंदे विनिवेशयंतं ।
वृक्षस्य पत्रस्य पटे शयानं । बालं मुकुंदं मनसा स्मरामि ॥ '

म्हणून बालमुकुंदाचेंच आवडीनें स्मरण करणाऱ्या परम भागवताप्रमाणें नाथांनी आवडीनें बालकृष्णाचें कौतुक केलें आहे, तें आमच्या वाचकांनीं वारंवार लुब्धतेनें वाचून आपल्याला पावन करून घ्यावें नंदराणीचें भाग्य नाथ वर्णितातः—

" सभाग्यभाग्यें ते नंदाची राणी ।
श्रुति या गाती गुणकीर्ति निजवाणी ।

ध्याती योगी सनकादिक मुनि ध्यानीं ।
विश्वात्मा तो नंदाच्या आंगणीं ।
पयपानास्तव घालीतो लोळणी ॥ " ( पद ६४ ).

कृष्णाचा नाच ( प ६५ ) नाथांनीं बहारीचा दिला आहे

'धन्य भाग्य गौळीयांचें । ज्यांचे घरीं ब्रह्म नाचे ।
वर्णितां वेदशास्त्रा । पडे गाढ मौन वाचे ॥
कांवळी खांद्या काळी । हातीं काळीच काठी ।
होरे ! होरे ! शब्द करी । धांवे वत्सांचिये पाठीं ॥
देवनाथप्रभु ज्यासी । शिणतां वर्णिल्या श्रुती ।
तेथें मज पामराची । काय चालेल मती ॥' ( प. ६६ ).

२७. अशी कृष्णरूपाची मोहनी नाथांसारख्या विरक्ताला पडली, मग व्रजबाला राधा लुब्ध झाली यात नवल काय ! श्रीकृष्णाच्या वृषभदोहनाबद्दल नाथांनीं ( प ७१ ) पद केलें आहे. श्रीकृष्णाच्या अवतारीपणाबद्दल हजारों वर्षें महाराष्ट्र साधूसंतांची ज्या गोष्टींनीं खात्री पटली त्यांतील ही एक होय. राधा जवळ उभी असतां तिच्या रूपानें मोहित झाल्याचें निमित्त करून त्या निर्विकार प्रभूनें वृषभदोहनाला सुरवात केली, तों हातातील दुग्धपात्र भरलें पूतनावधापासून प्रभुत्वाबद्दल विश्वासपूर्ण असलेल्या गोकुलवासीयांना या नवीन चमत्काराचें जें कौतुक वाटलें त्यापुढें हा राधामोहन स्वतःच मोहित झाला होता कीं पूर्ण ब्रह्मचारी होता असल्या गोष्टींची चर्चा करण्याचें त्याना प्रयोजन नव्हतें या गोष्टीबद्दल नाथांचा ठाम सिद्धांत झाला कीं,

" आद्यदीप श्रीकृष्ण तयाची ते राधा ज्योती ।
परमपुरुष हा दयाळ श्रीहरि त्याची ते प्रकृती ॥
हा चित्सिंधू ते चित्सरिता ऐक्यपणें मिनती ।
खचित रवी परि पूर्ण तयाचि अबाधि ते दीप्ती ॥ " ( पद ९५ ).

नाथांनीं लिहिलेलें मत बरोबर होतें किंवा चुकीचें होते हा प्रस्तुतचा प्रश्न नव्हे. या गोष्टी भागवतकार श्रीशुकांनीं लिहिलेल्या; आणि महाराष्ट्रमंडन सर्व कवी, आणि निदान देवनाथ, त्या सगुण, सत्य आणि रूपकरहित मानतात एवढेंच सांगावयाचें आहे कृष्णचरित्र व रामचरित्र यांबद्दल देवनाथांची मनोरचना काय होती व त्यानें त्यांच्या काव्यरचनेवर काय परिणाम झाला हें सांगितलें

"नवल वाटतें मला सुंदरी । नेणों जाली काय कसी परी "
पाहतां यातें बाह्यांतरीं । व्यापक हा चहुंकडे ।
हरीरूप अखंड नयनांपुढें " ( प. ८४ ).

नाथ कृष्णमोहानें इतके भायावलेले गेले होते

"दधिपयनवनीत भक्षितो चोरुनी दांटोनी गोंवळा देया ।
सांगती गान्हाणीं, गोंवळ कामिनी, ऐकुनी हांसत माया ।
ब्रह्मांडकोटिचा चालकबाळक, भावितो नंदाची जाया ।
नाना खेळलीळा कौतुक दावितो, ध्यास हा कैलासराया गे
माय ! " ( प. १३२ )

निजकार्य अंगिकारितो दासांचें, स्वअंगें सांडुनि लाजा ।
चिद्धन चैतन्य निर्गुण साकार, अवतरलें भक्तिकाजा ग माय "

निर्गुण साकार अवतरलें, म्हणून कृष्णचरित्राच्या प्रत्येक गोष्टीचें आम्हाला कौतुक, आम्ही त्याबद्दल शंका काढीत नाहीं, लोक आरोप करतील तर त्यांना जबाब देण्याच्या भरीस न पडतां कानांत बोटें घालतों; ही जुन्या लेखकाची मनोरचना होती ही ध्यानांत ठेवून नाथांचीं कृष्णवर्णनपर काव्यें वाचावीं मनोरंजन आणि बोध ही दोन्ही होतील

३८ कृष्णाची बालक्रीडा, गोपीगान्हाणीं ( ७२—७६ ) कृष्णमुरली, कृष्णविरह व कृष्णभेट ( ९३—१०१ ) असे आह्मीं कृष्णपदांचे वेगळे विभाग केले आहेत प्रत्येक पदाबद्दलचें मनोहर स्वरूप दाखविण्याजोगें आहे, पण वाचकांनीं हा आनंद आपला आपण करून घ्यावा वारंवार भेटीनें प्रेम वाढतें आणि किंमत कळते, तसेंच वाचकांनीं हीं पदें वारंवार वाचलीं तर त्यांना त्यांतील माधुर्य जास्त उमगेल आणि भक्तिभावना दृढावेल ईश्वराला प्रेमपात्र केलेलीं पदें अतिशुद्धमनानें आणि पवित्रभावनेनें वाचावीं

३९. देवनाथांचे आह्मीं ६६ धांवे छापले आहेत नाथांचा आजपर्यंतचा लौकिक मुख्यत्वें त्यांच्या धांव्यांवरून त्यांच्या मनांत आलेल्या विकारांचे तात्काळचे आदर्शरूप हे त्यांचे धांवे होत नाथांना छक्केपंजे नव्हते, आरशासारखा निर्मळ परंतु लेंकरासारखा चचल असा त्यांचा स्वभाव होता हें पुढें त्यांचें स्वभावचित्र दिलें आहे त्यांत येईल वर सांगितलेंच आहे कीं, मागील ग्रंथांतरीं जितक्या गोष्टी दिल्या आहेत आणि विशेषेंकरून ईश्वराच्या पतित-

पावनत्वाबद्दल जितक्या आहेत त्या सर्वांवर नाथांचा पूर्ण भरंवसा होता. या देहांतच सगुणसाक्षात्कार व्हावा, आपली मनोवृत्ति राधा आपण परमेश्वराची नोवरी म्हणून संकल्पिली, तिचा त्यानें अखंड स्वीकार करावा, हा सुखसोहळा भोगण्याकरितां नाथांनीं देवाची परोपरीची विनवणी केली आहे.

“ तुजवरी, अनन्य मी वरीं, तुझी नोवरी, श्रीपरमानंदा ।
हरिं वेगीं भवभयबाधा ॥
गोपती गोपिकारमणा ॥
मम मती प्रार्थि तुज करुणा ॥
चूकती सकळ भवभ्रमणा ॥
असें करीं, धरुनियां हरी, तारिं भवपुरा, चिद्धना अबळा ।
ये देहिं दाविं सुखसोहळा ” ( प ११८ )

मोरोपंत देवाला लाजवितात कीं,

‘ अजामिळ अघासुर व्रजवधू बकी पिंगळा
अशां गति दिली उरे न तृण भेटनां विंगळा ’ ( केकावली ).

नाथ देवाला तीच आठवण देतात

“ प्रल्हादास्तव चिरुनि स्तंभीं मारिलें दुष्ट छळका !
निजजनतारका सत्य दाविलें ब्रिद यदुकुलतिलका !
परमसदय अति हृदय असुनि मजविशींच निर्दय कां
पतित थोर उत्कृष्ट म्हणुनि संकष्ट म्हणासि हरि कां ॥
द्विज अजामिळादी गणिका उद्धरिली
मम पातक याहुनि वजनिं अधिक भरली
यास्तव उपेक्षा माझि हृदयिं धरिली
तव नामानळें न जळति पापें आलें नाहीं कर्णा
तारिं तारिं भवपुरीं मला श्रीहरी ऐकें करुणा ” ॥ ( प ११९ )

ही नाथांची अखंड याचकवृत्ति होती आपल्याला पदरीं घेण्याबद्दल ते कधीं कधीं देवाजवळ लगट करीत

‘ हे परात्परा सोयरिया विश्वंभरा
घेईं पदरीं, किमपी उपेक्षा न करीं
दे प्रेमभजनरस, करीं वास अंतरीं ’ ( प. १२२ ).

४०. या धांव्यांतील बहुतेक धांवे अतिसुंदर आहेत त्यांतील कांहींचा अंगुलिनिर्देश करणें म्हणजे बाकीच्यांचा अपमान करणें आहे तथापि ‘ जय जय हरिनारायण ’ ( प. १६३ ) हें ऐशीं कडव्यांचें पद वारवार वाचीत जाव हें सुचवितों या सर्व धांव्यातून नाथांनीं भवसागराचे भीषणत्व, ईश्वराची करुण कोमलता, आपली दीन याचकवृत्ति, प्रपंचाचा तिटकारा, प्रभूचरण-लोलुपता, भगवताचें पतितपावनत्व, त्याचा ब्रीदाभिमानीपणा, आपण अनंत-गुणें पातकी तथापि सच्चे हरिभक्त असल्यामुळें पावनयोग्य, इत्यादि अनेक वर्णनें दिलीं आहेत ज्यानें त्यानें आपापल्या डोळ्यानीं पहावीं त्यांत दोन पहाण्याजोग्या विशेष गोष्टी म्हटल्या म्हणजे नाथ आपली प्रभूजवळ शिफारस करतात तीः—

“ नेणें भक्ती कांहीं ज्ञानकळा । अज्ञानाचा पुतळा ।
परि मम भाग्य आलें एक फळा । मी दास तुझा गोपाळा ।
जन्मुनियां जगीं म्हणवीलों जी । माझी तुला काळजी ॥ ३ ॥
देवा दास तुझा मी म्हणवीलों । त्रिजगामाजी मिरविलों ।
भजनप्रेमा धरुनी मनिं आलों । नामामृतरस प्यालों ।
स्पर्शिल काय तनू हे काळजी । माझी तुला ॥ ४ ॥
आहें अपराधी मी परि तूझा । अभिमान तुज माझा ।
गर्जे पापीं पावन ब्रिद ओजा । गडिया केशवराजा ।
दावीं सत्य करुनी यातें आजी । माझी तुला ॥ ५ ॥ ” ( प.१५२).

आणि या प्रभुसेवेच्या भावनेबरोबरच आपले गुरु गोविंदनाथ याच्या अनु-ग्रहानें व हस्तावलंबानें आपण खात्रीनें तरणार ही भावना

हरिपदिं अति झाली वृत्ति संलग्न आतां
मज कवाळे अशी हे शक्ति नाहीं कृतांता ।
हरिभजनप्रतापें पूर्ण स्वानंदवृत्ती
जगदिशें गुरुरूपें दीधलें नाथहस्तीं ॥ ( प १२५ )

या दोन भावना नाथांच्या धांव्यांतून दृष्टीस पडतात यांत नाथांची मनो-धारणा गंगेसारखी पवित्र आणि निर्मळ दिसून पडते, आणि शेवटल्या बाजी-रावाच्या पदरच्या टाळकुट्या, चहाटळ आणि स्तुतिपाठक हरिदासांच्या योग्य-तेचा हा ब्राह्मण नसून एकनाथमुक्तेश्वरांच्या उद्यानांतील चुकून बाहेर पडलेलें हें वांसरूं आहे आणि बावरल्यासारखें होऊन आपल्या मातेकरितां टाहो

फोडलि आहे असें वाटतें. नाथ जुन्या कवींच्या जोडींतील होते याबद्दल नाथांची भाषासरणीही उत्तम पुरावा देते, पण त्याबद्दलचा विचार पुढील भागांत करूं.

**४१.** धांव्यांनंतर आम्हीं नाथाचे कांहीं अभंग दिले आहेत. नाथ पंढरीला गेले असतां एकदां एका ब्राह्मणानें विठ्ठलमंदिरांत त्यांच्यासमोर बाराशें नमस्कार घातले; तेव्हां आपण बाराशें अभंग विठ्ठलपर करावे असा नाथांनी संकल्प केला, आणि तो पूर्णही केला असें म्हणतात. आजपावेतों दोन अभंग उपलब्ध होते, आमचा संग्रह तीसपावेतों झाला आहे. ज्यांना जास्त मिळेल त्यांनीं पुढील आवृत्तीकरितां जमा करून आमच्याकडे पाठवावा. या अभंगांपैकीं शेवटला मात्र चर्चा करण्याजोगा आहे त्याबद्दल या चरित्राचा अठरावा भाग पहावा. नाथ कवींमध्यें ओवी एकनाथाची, अभंग गोविंदनाथांचे, आणि पदें देवनाथांचीं, हीं सरसपणें मनावर बिंबतात. अभंगानंतर आम्हीं अपूर्ण मिळालेलीं पांच पदें दिलीं आहेत. पुढील आवृत्तीपर्यंत संग्राहकांनीं पूर्ण करून द्यावीं अगर त्यांबद्दलची जास्त माहिती सुचवावी (पदें २१५–२१९)

**४२.** विठ्ठलावरची एकंदर पसतीस पदें आहेत, त्यांत विठ्ठलाचें विशेष वर्णन असें नाहीं. सर्व पदें धांव्याच्या स्वरूपाचीं व योग्यतेचीं आहेत, आणि आम्ही त्याचा पहिल्यानें धांव्यांतच समावेश करणार होतों; पण पंढरीनाथाच्या चरणीं जाऊन पोहोंचल्यावर तेथील भक्तिगंगेच्या ओघांत सापडलेल्या नाथांना विशिष्ट भावना होऊन मग त्यांनी हीं पदें म्हटलेलीं, तेव्हां यांचें विशिष्टत्व कायम रहावें म्हणून आम्हीं त्याचा वेगळा भाग केला आहे. पंढरीच्या विठूचा बोलबाला कबीरकमालांच्या वेळेपासून आतापावेतों सारखाच चालत आला आहे, आणि पुंडलिकाच्या भावभक्तीनें कटीवर हात ठेवून विटेवर उभा राहिलेला हा प्रभू पंडितापासून भोळ्याभाबड्यापर्यंत सर्वांना इतकें ठक पाडतो कीं भगवद्भक्त प्रल्हाद बडवे यांनीं त्याला 'ठकडा विठ्ठल' ही पदवी दिली. श्रीकृष्ण हाच विठ्ठलरूपानें उभा आहे ही नाथांची भावना होती हें मागें दिलें आहेच. नाथांची गुरुबहीण बऱ्हाणपुरची सईबाई इच्याजवळ नाथानीं आपला पंढरपुरचा प्रवासाचा वृत्तांत सांगितला, आणि ' सये ग बाई पुरला मनिंचा हेतु ' या पदामध्यें आपलें विठ्ठलप्रेम व्यक्त केलें (प. २२७) ' माझि विनवणी, विनवणी हरिला सांगा ' (प. २१२) या पदानें आणि यासारखेंच ' चाल चाल वेगीं ! कृष्णा मनमोहना ' (प. १४०) या पदानें

नाथ आपल्याबरोबर संसारीजनांनाही कारुण्य पूर्ण आणि आर्त करून सोड-सात वाचकांना समरस करून घेण्याची नाथाची हातोटी या पदांवरून स्पष्ट दिसते ' पतित पावनारे । शरण पातलों मी द्वारीं ' ( प २७२ ) या पदांत नाथांनीं सुमारें दीडशें पुराणसाधुंचा स्तव केला आहे. ही संतप्रशस्ति फारच ऐतिहासिक महत्वाची आहे रा राजवाड्यांनीं ग्रंथमालेंत देवदास व मंकंद यांच्या ज्या संतप्रशस्त्या छापल्या आहेत, त्यानंतर मोरोपतांची सन्मणिमाला, गोविंदनाथांची संतप्रशस्ति व ही देवनाथांची या तीन फार महत्वाच्या आहेत काव्यसंग्रहांत आणिक छापलेली आहे या सर्वांत देवदासाच्या खालो-खाल देवनाथांची संत प्रशस्ति फार मोठी व महत्वाची आहे यांतील दीडशें साधूपैकीं दहाबारा सेरीजकरून बाकीच्या सर्व साधूंचें आह्मीं थोडक्यांत वर्णन दिलें आहे त्यांच्या ऐतिहासिक कालनिर्णयाच्या कांहीं मुद्यांचा विचार करावयाचा होता, पण या पदावरील टीपा फार वाढल्या, आणि भारत इतिहास-मंडळाकडून लुप्तनाम होत चाललेल्या साधुसंतावर नित्य नवा प्रकाश पडत आहे, म्हणून हें काम पुढील आवृत्तीवर सोंपवितों आपल्या काळच्या परमविख्यात साधुसंतांचा नामनिर्देश करून नाथांनीं इतिहासशोधकांवर फार मोठे उपकार करून ठेविले आहेत नाथांनीं संत मात्र दिले, पण कवींचा उल्लेख नाहीं यावरून आणि रघुनाथ पंडितांची गोष्ट दिली आहे त्यावरून नाथांना कवित्वापेक्षां साधुत्वाचा आदर जास्त होता हें लक्षांत येईलच. थोडी आश्चर्याची गोष्ट अशी आहे कीं, वऱ्हाडच्या साधूचा उल्लेख जितका गोविंद-नाथाच्या संतप्रशस्तींत आढळतो तितका देवनाथांच्या या पदांत दिसत नाहीं आह्मी गोविंदनाथाच्या संतप्रशस्तीवर टीपा लिहूं त्या वेळीं या प्रश्नाचा जास्त खुलासा करूं या प्रशस्तीसारखेंच ' विठोबा चाल गड्या सुखधामा । पंढरिच्या हाकमा ' ( प २३९ ) या रसाळ पदांत नाथानीं पंढरीशानें कांहीं साधूंना महाप्रसगांतून कसें वांचविलें याबद्दल एकेका कडव्यांत एकेक दंत-कथा दिली व नाथ देवाचे व जुन्या साधूचे उतराई झालेले आहेत. ईश्वर संत-रूपानें अवतरतो हा नाथांचा भाव.

' आणीक संतभक्त, किती प्रकट गुप्त ।
मागें झाले पुढें होती, त्यांचे पायीं दंडवत ॥
वर्णावें काय वाचे, कांहीं न लगेचि अंत ।
अवतार त्यांचे धरिले तारावया पतीत " ॥ ( पद २७२ ).

अशा अनंत प्रकटगुप्त संतांना नाथांनीं नमिलें आहे. या संतप्रशंस्त्यांबद्दल रा. राजवाडे प्रथमालेंत लिहितात, " देवदाससंतमालिकेच्या उपसंहारांत संत-चरित्रें वाचल्यापासून फायदे काय होतात याची थोडक्यांत मीमांसा कवीनें केली आहे थोर पुरुषांचीं म्हणजे संतांचीं चरित्रें वाचल्यानें विपन्न प्राण्याना मोक्ष अथवा मुक्ति प्राप्त होते असें देवदास म्हणतो थोर पुरुषांवर आलेलीं संकटें, त्यांतून मुक्त होण्यासाठीं त्यांनीं केलेले प्रयत्न व त्यांत असतांना त्यानीं दाखविलेलें धैर्य, हें पाहून व मनन करून, कोणता प्राणी बंधमुक्त होणार नाहीं ' संतचरित्रें मनन केल्यानें मानासिक आधि तर नाहींशा होतातच, परंतु शारीरिक व्याधींच्या वेदनाही कमी होतात असा कवीचा अभिप्राय आहे या शेवटच्या विधानाच्या समर्थनार्थ पूर्वेकडील व पश्चिमेकडील प्राचीन व अर्वाचीन इतिहासांतून शेंकडों दाखले साक्षेपी वाचकांस आढळतील " नाथ संत-चरित्रांचें आत्मशुद्धीकरितां पारायण करीत वाचकांनींही करावें विठ्ठल-पदांच्या शेवटीं सेनान्हाव्याचें आख्यान ( प २५० ) दिलें आहे तें फार रसाळ आहे

**४३** यानतरचीं ज्याण्णव पदें ( २५१–३४६ ) गुरुपर व ब्रह्मपर आहेत. ' तें तूं ब्रह्मचि पूर्णपणें ' ( २५१ ) या पदांत नाथांनी थोडक्यांत निर्गुण-निर्विकार परब्रह्माचें वर्णन जीव हा ब्रह्मच आहे असें सांगून तत्वमसि महा-वाक्याचा अनुवाद केला आहे ' एकें गे सखयेबाई जिवींची ही खूण ' ( २५३ ) व आणिक कांहीं पदांतून नाथांनीं केवळ परंपरागत गुरूपदेशानें माहीत होणाऱ्या ' गुप्तगंगेचा थाट सभर घनदाट ' याबद्दल ओझरतें दिग्दर्शन केलें आहे उफराटी दृष्टि, असमसाहस तेज, औटपीठ, उन्मनीच्या माथां समरस होणें, समाधिव्युत्थान इत्यादि अनुभवी गोष्टींचा उल्लेख केलेला आहे. हीं पदें अर्थातच सांप्रदायाच्या बाहेरच्या लोकांकरितां नव्हेत आणि आम्हीं टीपा दिल्या ही आमच्या अधिकाराबाहेरची गोष्ट झाली; पण या टीपा रा. गोविंद कृष्ण पर्वते, वकील, दर्यापूर व रा पुरुषोत्तमरावबाबा पाळेकर, वकील, उमरावती, या दोघाच्या विद्वत्तेचें फळ आहे एवढा आह्मी सप्रेम उल्लेख करतों बारा पदें ( २५४–२६५ ) गोपाळनाथ, आनंदीनाथ, तुकाराम व गोविंदनाथ या चार गुरुश्रेष्ठांवर आहेत बाकीच्या पदांतून गुरु व परब्रह्माची एकवाक्यता दाखविली असून गुरुकृपेशिवाय साक्षात्कार होत नाहीं, ' गुरुबिन कौन बतावे बाट बडा कठिण जमघांट ' हा उपदेश नाथांनीं अत्याग्रहानें उपदेशिला आहे

निजसुखसाधनाकरितां सद्गुरुचरणीं भावें शरणागत जावें ( प २६९ ) मात्र निर्वळ शब्दज्ञानानें हें काज व्हावयाचें नाहीं ( प २७२ ) 'वैऱ्याचा जिंकिला गांव । काळाचि खुंटली धाव ।' हा गुरुकृपेचा भाव ( प २७३ ), द्वैताची रांडोळी करावी ( प २७४ ), दीपाचे ठायीं कर्पूर त्याचप्रमाणें गुरूचे ठायीं शिष्यानें विरावें (प २७५.) ही नाथांची शिकवणी; आणि श्रुतिअर्थाला उमजून गुरुगोविंदाला भजावें हा लोकाना आग्रह ( २७६–२८२ ) पतिव्रतेची पतीशी प्रथम भेट झाली ह्मणजे तिला जो आल्हाद होतो तो नाथ गुरुप्राप्तीबद्दल दाखवितात ( २८३–२८९ ), आणि गुरुरायाचा हस्त धरून परभुवना गेल्याबद्दल आपणच आपले कौतुक करितात ( २९९–३१६ ) आपणच ब्रह्म हें गुरुगुज खरें, तथापि साधनचतुष्टयावांचून गुरुलाभ होत नाहीं आणि गुरुलाभावांचून गुजलाभ होत नाहीं ह्मणून वर्णाश्रमस्वधर्मसाधनानें पापपुण्याची होळी करून अंतःकरणसशुद्धि साधावी ह्मणजे गुरुदाताराला दया येते, ह्मणून नाथ साधनचतुष्टयाचा उपदेश देतात ( प ३१८ ) प्रचीति आल्यावर मध्येंच कोणी अभ्यास सोडतात, आणि अपूर्णपणामुळें वृत्तिद्वेष उत्पन्न होतो, तो टाळण्याचें नाथ सुचवितात ( प ३१९ ). अभ्यासदार्ढ्य आलें ह्मणजे जीव उन्मनींच्या माथां जातो ( प ३२२ ) हाच विषय नाथांनीं पुढील पदात तऱ्हेतऱ्हेचीं रूपकें देऊन सजविला आहे हीं पदें सामान्य वाचकांकरिता नव्हेत, परतु मुमुक्षु अथवा अधिकारी याच्या पूजासाहित्याची सामुग्री म्हणून आह्मीं ही तयारी केली आहे. गुरुसेवा व ईशप्राप्ति यांवर नाथाचीं नऊ पदें आहेत ( ३३२–३४० ) त्यांतलें संत व लिंगाईतवाणी यांच्यावरील रूपक ( ३४० ) व त्यावरील इतर कवींचीं टीपांत दिलेलीं पदें हीं फारच मनोरजक आहेत दोन पदानीं नाथ ( ३४२–३ ) आत्मानुभवप्रशंसा करितात एका पदांत तापीमाहात्म्य ( ३३१ ) व एकांत गीतामाहात्म्य ( ३४१ ) वर्णिलें आहे

४४. येथून पुढें चाळीस पदें बोधपर स्फुटें आहेत यांत पहिलीं दहा पदें नाम महात्म्यावर आहेत भिक्षेवर दोन पदें ( ३५३—४ ) आहेत, त्यांतील पहिल्या पदाची प्रासगिक स्फूर्ति होती; ती गोष्ट टीपेंत पहावी ती फार मनोरजक आहे व नाथांच्या स्वभावविशेषाची निदर्शक आहे पुढील चार पदांत विपक्षीयावर कोरडे ओढले आहेत, त्यांतील एक पद प्रसगस्फूर्तीचें आहे, त्याचा इतिहास प्रस्तावनेच्या पचविसाव्या भागांत पहावा. नाथ कोपले

ह्मणजे प्रतिवादीला अनुलक्षून अस्सल शब्द वापरावयाला कचरत नसत असें दिसतें. प्रपंच मूढांवर तीन पदें ( ३८०-३८२ ) आहेत एकवीस पदें ( ३५९-३७९ ) नरतनूच्या क्षणभंगुरतेवर आहेत यांतील 'अमोल काया जाइल वायां जशी कांच कीं फुटे फटकन्' या एकच फटक्यानें आबालवृद्धांच्या ह्रदयाला अमोल चटका लाविला आहे, आणि आजपावेतों सर्वलोक त्याच्या अनुपम अमृतरसाचा घुटका घेत आहेत " विठ्ठल मम प्राणसखा जिवींचें जिवन भेटेल कैं " या एकाच पदावरून जसें भुजंगनाथाचें नाव सर्व विश्रुत आहे, व बाकीचीं त्याचीं दोनचारशें पदें नष्ट झालीं तरी या एका पदावरच जसें त्यांचें नांव दुमदुमेल, तसेंच 'अमोल काया' या पदावर देवनाथांचें नांव कायम राहील काव्य जिवत राखण्यानें हरिदासांनीं मायभाषेवर अनंत उपकार केले आहेत; ते स्मरून समाज या संस्थेला आपल्या औदार्यनिर्झरानें पल्लवीत राखोत देहप्रारब्धतेच्या भीषणत्वाबद्दल नाथांना नेहमीं चकित झाल्यासारखें वाटे, आणि त्यांनीं केलेलें पद ( प ३८४ ) व त्यावरील टीपांत दिलेलीं इतर साधूंचीं पदें हीं दोन्ही संस्मरणीय आहेत

४५ सरासरी शंभर पदें हिंदुस्थानी आहेत त्यांत एक नानाफडणिसावरचें आहे त्याबद्दलची दंतकथा पुढील भागांत येईल. 'जो तनलागे सोही तनजाने' ही नाथांची ह्मण वऱ्हाडभर पसरली आहेत शंकराचीं तीन व श्रीरामाचीं नऊ पदें आहेत कृष्णपदांमध्यें गोपीगाऱ्हाणीं, होरीचा खेळ, राधाविलास याला प्राधान्य आहे. हीं सर्व पदें उत्तरहिंदुस्थानच्या मुलुखांत झालीं होतीं, आणि तिकडच्या संस्कृतीला अनुरूप अशींच आहेत बारामासीच्या पदांवरून नाथांचें व्रिजभाषावाचन व्यक्त होतें, तर 'देख सुरत टक लागी नैनसे' इत्यादि सलाबतखान इलिचपुरकर नबाब यांच्यासाठीं रचलेल्या पदांवरून नाथ हे रांगडी भाषेचे जिगरदोस्त होते असें दिसतें. नाथ ज्या ज्या भाषेंत बोलले ती ती त्यांना प्रसन्न झाली, व जें बोलले तें कवित्व झालें. गुरुमाउली व मारुतीराय या उभयतांचा आशीर्वाद खरा ठरला

४६ ज्ञानसंग्रहामध्यें जें देवनाथांचें चरित्र प्रसिद्ध झालें होतें तेंच प्रमोदसिंधु छापखान्यांतून पुस्तकरूपानें बाहेर पडलें असें कळलें. त्यांतील नाथांच्या कवितेवरचा सुंदर अभिप्राय पुढें देतों:—

" देवनाथाच्या आजमितीस ज्या कविता अवलोकनांत आल्या आहेत त्या पाहूं गेलें असतां त्यांनीं स्वतंत्र अशीं दोनच आख्यानें रचलेलीं आढळ-

तात पहिलें श्रावणाख्यान व दुसरें कृष्णजन्म दोन्ही आख्यानाचीं कथानकें सोपीं व सर्वश्रुत अशींच आहेत हीं आख्यानें खेरीजकरून त्यांनीं रचलेल्या अवांतर कवितांचा संग्रह फार मोठा आहे त्या अनेक अध्यात्मविषयक असून विशेषेंकरून बहुतेक ईश्वरस्तुतिपर आहेत हीं वाचून सद्रहु कवि मोठा भक्तिपरायण व देवाचा भुकेला होता असें स्पष्ट दिसून येतें. मोरोपंताच्या केकावलीप्रमाणें हीं देवनाथाचीं भक्तिपर पदें त्यांच्या कवित्वशक्तीचे, उदात्त वैराग्याचे व प्रेमळपणाचे स्वारस्यानें परिपूर्ण आहेत देवनाथाच्या खऱ्या कवित्वाचा मासला यांतच सांपडतो यांपैकीं कित्येक मोठमोठाले कृष्णपर व रामपर कटाव देवनाथानें हिंदुस्थानी भाषेंत रचिले आहेत देवनाथाचे देवस्तुतिपर सर्व कटिबंधानें कृष्ण, राम, मारुति, गणपति, पंढरीचा पांडुरंग गुरुदेवता वगैरे सर्व देवांची स्तुति केलेली आहे, परंतु त्या सर्वांत रामाच्या व कृष्णाच्या वर्णनाचीं पदें फारच मनोहर असून शब्दसौंदर्य, अर्थमाधुर्य, वचनकोमलता, अनुप्रास, अर्थलालित्य वगैरे असंख्य गुणांनीं परिपूर्ण आहेत, ती इतकीं कीं, त्यांतील सरस कोणतें व नीरस कोणतें याचा निवाडा मुळींच करता येत नाहीं प्रत्येक कटिबंधांतील भाषालाघव व शब्दरचना मोठी मनोहर व चित्रविचित्र भासूं लागते. रामजोशाच्या बोधपर लावण्यांप्रमाणें देवनाथकवीचे कांहीं उपदेशपर व वेदांतपर कटिबंध आहेत, त्यांपैकीं ' अमोल काया जाइल वायां '' हें देवनाथाचें बोधपर पद्य आबालवृद्धांच्या तोंडीं असून तें इतकें सुरस व वैराग्यपर आहे का, ऐकणाऱ्यास तात्कालिक स्फूर्ति उत्पन्न होते देवनाथाच्य काव्यसौंदर्याचा, शब्दसौष्ठवाचा व अर्थलालित्याचा मासला पाहणें असल्यास त्याचे देवस्तुतिपर व वेदांतपर व बोधपर निवडक उतारे काव्यसंग्रहांतून दिले आहेत ते वाचून पहावे एकदरींत देवनाथकवीला अमृतराय, आनंदतनय, वामन, मुक्तेश्वर वगैरे कवींच्या मालिकेंत गोंवण्यास आह्मांस कोणतीही शंका वाटत नाहीं. ''

४७ देवनाथांच्या पदांच्या चालींबद्दल रा कावतकराचे पुढील उद्गार अगदीं यथार्थ आहेत:—

" पदांच्या चाली कोणी नवीन प्रकारांनीं हल्लीं म्हणूं लागल्यास त्यांतील बराच रसभंग होतो असें अनुभवास आले आहे देवनाथांच्या कवितेस 'पदें' म्हणण्यापेक्षां 'लावण्या' म्हणणें जास्त प्रचारात आहे आणि त्या म्हणण्याच्या चाली ज्या परंपरया चालत आल्या आहेत त्याच चालीनें त्या म्हटल्यास

कार समाधान होतें. ह्यांच्या प्रासंगिक कवितेवरून ह्यांचें प्रसंगावधान, शीघ्रकवित्व आणि निस्पृहता हीं किती स्पष्ट रेखल्यासारखीं दिसतात ! परमार्थविषय हा प्रापंचिकास रुक्ष तर खराच, परंतु देवनाथासारख्या साधुपुरुषाकडून त्याची लावणी झाल्यास व त्या लावणीवर योग्य वेळीं मननरूप जलसिंचन झाल्यास शेवटीं रसाळ फळांचा लाभ कां बरें होणार नाहीं ! अवश्य झालाच पाहिजे ' योजकस्तत्र दुर्लभ' ' यांच्या कवितेंत वृत्तभग, अपशब्दप्रयोग, विचारांची पुनरावृत्ति, वगैरे दोष आहेत; परतु प्रासादिक वाणी कोणी रोध करूं शकणार नाहीं व त्या रोधाची ती पर्वाही करीत नाहीं. ह्यांच्या कवितेंत थोडा चित्रकाव्याचाही मासला आहे "

हें अक्षरशः खरें आहे वाचकांनीं स्वत वाचून अनुभव घ्यावा त्यांना यांतील प्रत्येक शब्द सत्य असल्याची साक्ष पटेल.

**४८.** आह्मीं स्वतःची पडिताई लढविली, आणि नाथांच्या काव्यकुशलतेबद्दल इतरांच्या साक्षी दिल्या, नाथांची मनोरचना अमुक प्रकारची असून त्यामुळें त्यांची काव्यरचना तमुक प्रकारची झाली आहे असाही आह्मीं अदाज बांधला, पण वाचक विचारतील कीं, याला खुद्द नाथांचा कांहीं पुरावा आहे कीं हा केवळ आमच्या स्वैर मनःकल्पनाचा खेळ आहे । आह्मी नाथांचाच पुरावा काव्य कसें असावें याबद्दलचा देतोंः—

> ज्ञानविचार बहु अवलोकिले भागवतादिक ग्रंथहि सारे ॥
> पद्यपदें अमरादिक पाहुनि भारत आदिक शास्त्रपसारे ॥
> तर्कविशेष यथार्थ मती अति युक्ति अशा सकळांही कळांहीं ॥
> काव्यकला त्रिकळा विफळा, एक नाहिं जरी हृदिं प्रेमकळाही॥१॥
>
> गायन सुंदर सुस्वर कंठहि तान म्हणे अति ठेवणिची ॥
> करनाचुनि पद तालधरी बरी सांग वदे गत उंचनिची ॥
> संस्कृत छंद प्रबंध रची, रुचि दावित त्या चतुराहि कळाही ॥
> काव्यकळा विकळा विफळा एक नाहिं जरी हृदिं प्रेमकळाही ॥२॥

या व्याख्येसबधानें काव्यरसिकांत तीव्र मतभेद पडेल यांत शका नाहीं. छंदप्रबंध, गीर्वाण अथवा प्राचीन मराठी शब्दांचा भरणा, अलकार, दृष्टांत, हें सर्व सरस्वतीचें चतुरगदळ आहे, प्रेमकळा हें मात्र अंगांतलें राजरक्त. प्रेमकळा मुख्य, तथापि चतुरगदळाचें वैभव असावयाला पाहिजे त्याच्या'

योगानें नव्या वाङ्मयामध्यें जुन्या संस्कृत वाङ्मयाची परंपरा कायम रहाते, कवीला स्वैरगति येत नाहीं, पूर्व कवींचा मान रहातो, काव्यपद्धतीचा जो उच्च दर्जा अनेक कविश्रेष्ठांनीं राखिलेला आहे त्याला कमीपणा येत नाहीं. नाथ या उपांगाचा धिक्कार करीत नाहींत, ते फक्त प्रेमकळेचें जास्त महत्व दाखवितात. ही प्रेमकळा नाथांच्या प्रत्येक ओळींतून दृष्टीस पडते, आणि म्हणूनच नाथांच्या कवितेला महाराष्ट्रभाषा जिवंत आहे तोंवर अमरत्व राहील श्रेष्ठ प्रेमकळेमुळें नाथांना श्रेष्ठ काव्यकळा आली नाथ काव्यमीमांसेला समर्थ होते कीं नाहीं ही शंकाच आहे, पण त्यांच्या ईश्वरप्रेमानें त्याना काव्यमय केलें, सरस्वतीची त्याच्यावर प्रसन्नदृष्टि झाली, ईश्वर पावला. शास्त्राध्ययन, गीर्वाण सारस्वतपरिशीलन, अमरादिक दांडगें कोशभांडार, इतकें जवळ असून प्रासादिक जिवंत कवितेची एक ओळ रचतां येत नाहीं, आणि नाथांच्या मुखांतून ईशस्तवनाचा अखंड धबधबा बाहेर पडतो, हा नाथभक्तीचा चमत्कार होय कुब्जेच्या प्रेमानें श्रीकृष्ण गोपींना सोडून गेले त्याबद्दल रामजोशी वर्णन करितातः---

> " बाइगे आह्मी उदास बसलों अजि यमुनेच्या तिरीं ।
> यत्न न करितां बसले जागीं तिनें मिळविला हरी " ॥

हीच गोष्ट नाथांची व तत्कालीन विद्वान् कवींची झाली कवित्वशक्तीमध्यें नाथ कुब्जेप्रमाणें अपूर्ण, पण ईश्वरानें त्याच्या भक्तीला लुब्ध होऊन त्याना बसल्याजागीं स्फूर्ति दिली ते बोलले तेंच कवित्व झालें ईश्वरकृपेवांचून सिद्धि नाहीं हें प्राचीन कवि कंठरवानें सांगतात, त्याचें हें संस्मरणीय उदाहरण होय

---

## नाथांची शब्दकळा.

८९. नाथांची काव्यकळा वर्णिली, पण नाथाच्या शब्दकळेबद्दल दोन शब्द सांगावयाचे राहिले बरींच मोत्यें एकत्र केलीं म्हणजे हार होतो; त्याला प्रत्येक मोतीं सुढाळ आणि पाणिदार पाहिजे व शिवाय जवाहिऱ्याची कुशलता पाहिजे. यासाठीं काव्यजोहोरी जुनीं टिकलेलीं शब्दमौक्तिकें पसंत करितात, आणि सावधपणें पारखून नवीन शब्दमौक्तिकांची त्यांत नित्य भर

घालीत असतात सरस्वतीदेवीच्या नित्यनूतन आवडीनिवडीप्रमाणें एका शतकास काहीं शब्द लौकिकाला चढतात, ते दुसऱ्या काळीं पुन्हा मागें पडतात; पुन्हा शेंदोनशें वर्षांनीं नवा मुलामा चढून अथवा नव्या समर्थकवीनें अंगीकारिले असतां पुन्हां कीर्तीला चढतात घराण्याची अथवा इमारतींची घडामोड होते, पण राष्ट्र अथवा शहर कायम रहातें, तशीच शब्दांची घडामोड होते, पण भाषा कायम रहाते भाषा ही परब्रह्म कोटी, पण एकेक शब्द तेतीस देवतांप्रमाणें देवतारूप आहे कल्पना, शब्द, जोडणी, धाटणी, स्फूर्ति, संतकृपा आणि समाजप्रेम इत्यादि सर्व गोष्टी जमाव्या तेव्हां एक कवि प्रसिद्ध होतो, आणि यालाच यश म्हणतात हें निष्काम श्रमावाचून साध्य होत नाहीं. पूर्वजांच्या आशीर्वादानें सत्पुत्र उदरीं येतात, त्याप्रमाणें पूर्वकवींची अखंड सेवा झाल्याशिवाय नवा ग्रंथकार यशस्वी व्हावयाचा नाहीं, ही सेवा आमच्या कविपरंपरेमध्ये स्पष्ट दिसते एकनाथांनीं ज्ञानेश्वरीची जोपासना केली, तुकारामानें एकनाथी भागवताचें एक हजार वेळ पारायण केलें, वामन उंटभर पोथ्या बरोबर बागवी, मोरोपंताचा संस्कृत व्यासंग सर्वविश्रुत आहेच, मूळ भारताबरोबर सर्व प्राकृत भारतें पाहून त्यांचा वाग्जल्प मुक्तेश्वर उघडकीस आणतो, असें प्रत्येकाचें दांडगें अध्ययन होतें यामुळें मराठी भाषेंतील शब्दांची परंपरा अजून नष्ट झाली नाहीं आता शाळेंत संस्कृत पुष्कळसें घोकून त्यावर वाढलेल्या कविश्रेष्ठांना मोक्षदानी, कैवल्यदानी इत्यादि, मराठी कवींनीं हजारों वेळ वापरलेले शब्द, अपरिचित वाटतात हा कालमहिमा आहे, पण यानें भाषाभांडाराला आम्ही जागा चुकल्यामुळें मुकत चाललों आहों पूर्वीच्या ग्रंथकारांनीं परंपरेनें ग्रंथांचे अध्ययन केलें, यामुळें शब्दकला कायम राहिली, ही गोष्ट सर्व भाषांतून दृष्टीस पडते, परंतु आमच्या हिंदुस्थानी, बंगाली, मराठी, गुजराथी, तेलगू वगैरे भाषांतून आणिक एक विशेषत्व शब्दकलेला असें आलें आहे कीं, आमच्या वेगवेगळाल्या पंथाचें वेगळें ग्रंथभांडार असतें, आणि त्या पंथांच्या ग्रंथकारांमध्यें तें पौनःपुन्यानें येतें ज्ञानेश्वरीचे शब्द एकनाथांत दिसतात व एकनाथी भागवतांतले शब्द व कल्पना तुकारामाच्या अभंगांत दिसतात पण त्या प्रमाणानें त्या मोरोपंतांत येत नाहींत; अमृतराय, रामजोशी यांच्या हातीं लागलेल्या नाहींत, विद्वज्जीवनकार महापंडित विठ्ठलकवि याला तर अगदींच पारख्या आहेत, पण देवनाथांतून जागोजाग आहेत, हें आम्ही ज्या ठिकठिकाणीं टीपा दिल्या आहेत त्यांवरून व्यक्त होईल. शब्द,

साहित्यामध्ये हेंच ऐतिहासिक गूढ दिसतें वरपडा, पटकुळा, लह्राम, उद्दाम, सैरा, चांग, खोपा, सांगडिया, त्रिवाचा, आकळे, आतळे, निवटणें, विनटणें, लाफा, सभराभर, रांडोळी, ढवा, बंभाळा, गुथ, सांडा, घवघव, अस्मासाहस, नितनवरा, धमकटे, उठाण, उड्डाण, हिंपुटी, भवद्गे, प्रवध, फरदा, शेखी, वाहतों, खिजतो, हाव पडला, वायदा, पालवीं, पल्लवीं, कडकडी, आर्षभाव, उसत, सैरा, आथि, नाथिले, सत्वाथिला (वगैरे आथि शब्दांचीं रूपें) धडफुडा, धडधडित, तारुण्य, हुडहुडी, दारिद्र्य, वोवरी, तगमग, चहुबाहीं क्षेमालिंगन, सेवा, केंवा, कणवा, धांवणें, मनमयूर, पावनविरुद, भवगोवा, उसंग, संकष्ट, अकुमाळ, चक्र, डाथर, चळथा, बाप श्रीहरी, वोजा, कठ सोकला, वैखरी, निजहटी, सबोखिली, समला, आभरले, धिंवसा, वहिलें, अपंगिलें, लागवेगें, थोपे, साद, चरळा, निमाला, ओहरें, वाटपाडिया, सत्यवाचा, उठाणे, अट्टहास्यें, मरळा, ठकडा विठ्ठल, गिंवसुनि, वगैरे शब्द व आम्हीं जोडलेल्या देवनाथ कोशांतील सुमारें शभरदीडशें आणिक शब्दांवरून असे दिसून येईल कीं, नाथांचें शब्दभांडार एकनाथज्ञानेश्वराच्या परंपरेंतील होतें. शब्द देखील मोठे हट्टी असतात, सभेंत तीन तीनदां ' अध्यक्षमहाराज आणि सभ्यगृहस्थ हो म्हणून पुढें कपाळाचा घाम पुसण्याची वेळा आणणारे पुष्कळ एखादा भलता शब्द अडल्यानें सुंदर काव्य नकटें होतें, तर एकच शब्द वावगा पडल्यानें जोरदार भाषणाची चोहोंकडे थट्टा होते. यासाठीं केवळ शब्दावडंबर म्हणून नाकें मुरडणाऱ्यांनीं शब्ददेवतेचा मान राखावा धडफुडा, सत्वाथिला आणि चांग या तीन शब्दांवरचे आमचे उतारे पहावे म्हणजे या लिहिण्याचा प्रत्यय येईल चांग शब्द एकनाथांत सहज पानें उलटतांना दहापंधरा वेळ आला, पण मोरोपंताकडे तो ढुंकून पहात नाहीं कारण मोरोपंत व्याकरणावर वाढलेले; पण केशवस्वामी, देवनाथ वगैरे संतपरंपरेच्या कवींवर चांग शब्द कृपादृष्टि ठेवतो सत्वाथिला शब्दावरील टीपेनें असें दिसतें कीं, अस्ति ' या संस्कृत शब्दाचें प्राकृत ' आथि हें रूप झालें, त्याला मागें न लागून नाथि झालें, त्यालाच प्रत्यय लागून नाथिलें, आथिलें असे क्रियासाधित शब्द आले. ' आथि' याला विशेषणें व नामें हीं दोन्हीं मागें जोडलीं जातात, आणि त्याचें क्रियापद बनून पुढें त्याला कालवाचक वगैरे क्रियापदाचे प्रत्यय लागतात. उदाहरणार्थः–सत्वाथिला, भ्याडाथिला, नामाथिला, गर्वाथिला, गुणाथिला, रंगाथिला, समाथिला, कामाथिला, भयाथिला, इतकीं रूपें आमच्या टीपेंत ( पद. १५० )

उदाहरणांसकट दिलीं आहेत त्यांवरून दिसतें कीं, मुक्तेश्वरापर्यंतच्या कवींवर या शब्दाचें प्रेम होतें तेथून तो पुन्हां जो तपश्चर्या करावयाला गेला तो देवनाथांकरितां पुढें आला विठ्ठल, मोरोपंत वगैरे काहीं कांहीं संस्कृतानुगामी कवि आम्हीं शोधले, पण त्यात हा शब्द आम्हांला आढळला नाहीं एखादा कवि चुकून या शब्दाचा प्रयोग करता तर ठिगळासारखा लावता. या शब्दाचे जुन्या कवींनीं अति हाल केले आहेत तरी तो त्यांच्यावर मात्र प्रसन्न मूळ रूप आथि रगानें युक्त झालेलें तें रगाथिलें नामानें अंकित, प्रसिद्ध झालेलें तें नामाथिलें; पण भ्याडाथिला म्हणजे नुसता भ्याडच खडाळ्याच्या घांटांतुन आगगाडीला वर ओढावयाचें झाले अथवा खालीं सोडावयाचें झालें तरी रस्ता विकट असल्यामुळें दोन इंजिनें लागतात, त्याप्रमाणें आथि, नाथि या विचित्र मारुतरूपाला भावावलेल्या कवींनीं मागे रग, नाम, भ्याड असे शब्द व पुढें कालवाचक प्रत्यय लावून त्या मूळरूपाला चालन दिलें, तें देवनाथांपर्यंत रेटलें. आतां मात्र हा शब्द बाजूच्या रुळांवर पडलासा दिसतो, पुढें एखादा शब्दस्तोम—महानिधि ग्रंथकार अवतरून त्यानें सर्व जुन्या शब्दांबरोबर यालाही जागें केलें तर नकळे

५० या शब्दविचारावरून देवनाथांची जातकुळी एकनाथज्ञानेश्वराशीं जुळते हें स्पष्ट दिसेल धांव्यांतील बहुतेक सामासिक शब्द सहस्रनामांतले दिसतात निघोट, चिद्गगन, आरसचित्त, अक्षरूप, निजदीप्ति, निजगुज, गुरुगुज, नयनभेटी, ज्ञानविज्ञान, समाधिव्युत्थान, निजखूण, उन्मनीचा वाट वगैरे शब्दपराज्ञानाचे व साधुसंतांच्या नित्य चर्चेतले होत तसेंच वादपी, जपतपी, साक्षपी, वातपी, वगैरे काहीं शब्द जबरीनें बनविलेले आहेत चल्या ( जबरीनें ), कठ सोकला, सवंगणें, मरळा, नगलेणीं, तोपक, हवेल्या, मायदळ, चोहरी, शुभा, चिर्दि, चिंद वगैरे कांहीं शब्द विदर्भ देशातच जास्त प्रचलित आहेत. मेहेर, जामेवार, नकीब, चाजिंद, तस्लीम, श्मश्रू, मतवाला, छेलछबेला वगैरे शब्द नाथाच्या उर्दू व हिंदुस्थानी भाषाच्या ज्ञानाचें फळ होत याप्रमाणें अनेक ग्रंथांतून व मार्गांनीं नाथांचें शब्दभांडार जमलें आहे त्याची पूर्ण विल्हेवारी करावयाला आमच्यात सामर्थ्य नाहीं आमचा कोश हा या बाजूचा प्रथम प्रयत्न आहे या भागात आम्हीं पूर्वीं म्हटलें होतें कीं, नाथांच्या शब्दसाहित्यावरून नाथ प्राचीन महाराष्ट्रकवींच्या शिष्यमंडळांत शोभण्यासारखे दिसतात, आणि वरील शब्दविवेचनावरून हें उघड दिसेल अशी आम्हांला आशा आहे.

वेणूपर व कृष्णपर जीं पदें आहेत त्यांतील शब्दकृति मधून मधून शुक-भागवतांतील झळकते, आणि म्हणूनच याच्या व आनंदतनय, गोविंदराव वणीकर इत्यादिकांच्या पदांतून अलौकिक शब्दसाम्य दिसतें, तसेंच 'अचडें बचडें छकुडें ' हा अमृतराव, मध्वमुनीश्वर या पूर्वील कवींचा शब्दालंकार आहे ( प ३७० ). ' पायीं वाहणा शाहणा ' ( प २५० ) हे शब्द अमृतराय अथवा त्याचा शिष्य ब्रह्मगिरी या दोघांपैकीं एकानें रचिलेल्या सुदामाख्यानांतील

' अनत ब्रह्मांडें ज्याच्या पोटीं । सांवळा जगजेठी ॥
काळी घोंगडी काळी काठी । काळा दोरा कंठीं ॥
बोली म्हाराची शुद्ध मराठी । नेसुनि लंगोटी ॥
पायीं वाहणा मोठा शहाणा । पतीत पावन नाम जयाचें ॥
वारी संकट हरि दामाजींचें । कौतुक देवाचें ॥ '

या कडव्याची आठवण करितात देवनाथ जन्मावयाच्या अगोदर एक वर्ष अमृतराय आटपले; तेव्हां अमृतरायाचें पद असो अगर ब्रह्मगिरीचें असो, देवनाथांच्या वेळीं ' पायीं वहाणा मोठा शहाणा ' हें जगत्पावनाचें जगदुद्धारक वर्णन नाथांच्या युवावस्थेपावेतों आबालवृद्धांच्या तोंडीं असलें पाहिजे यांत शंका नाहीं, आणि नाथांच्या संबंध ग्रंथभांडारांत या दोनच जुन्या शब्दरचना आम्हांला सांपडल्या, यावरून नाथांची जुन्यांचें कौतुक करण्याची निरभिमान बुद्धि सिद्ध होते नाथ जुन्या कवींचे वारस होते, तथापि त्यांनीं जुन्यांचें एखाददुसरेंच कल्पनारत्न घेऊन आपल्या चतुराईनें जास्त शोभिवत कोंदणांत बसविलें हें उघड आहे सर्व काव्यजगती व्यासोच्छिष्ट आहे; व्यासकृतींत नाहीं तें कोठेंही जगतांत नाहीं, हा सिद्धांत महाराष्ट्र ग्रंथकार शिरसावंद्य मानतात; तथापि त्या कविश्रेष्ठाला वंदन करून प्रत्येकजण आपापल्या स्फूर्तीप्रमाणें आपली करामत लढवीत असतो, आणि एकमेकाची एखाददुसरी आवडलेली शब्दचमत्कृति आपल्या कृतींत मिसळवून एक कवि दुसऱ्याचा बहुमान करितो समर्थ राजकुमाराला इतर रजवाडे आपल्या मुलुखांतून जहागिरी देतात, हा त्याचा अपमान नसून गौरव आहे. नाथ इतर कवींचा गौरव करून परीक्षा केल्यावांचून करीत नसत हें वरील प्रकारचीं उदाहरणें दोहोंहून अधिक आढळत नाहींत यावरून स्पष्ट दिसतें.

५१. समर्थांनीं कवींना शब्दसृष्टीचे ईश्वराची उपमा दिली आहे, तेव्हां सृष्टीची प्रतिसांवत्सरिक उलटापालट कवि करितात यांत नवल नाहीं, तथापि आह्मी दयाळनाथांवरील निबंधांत लिहिल्याप्रमाणें " रसमहाची शब्दप्रकृतीशीं मेळणी झाली असतां पुनःपुन्हां नवता धारण करणारें रमणीयरूप काव्याला प्राप्त होतें. अगदींच निर्दोष अशी स्त्री पाहणाऱ्या राजपुत्राला अखेर जन्मांधबधिरमूक नवयौवना मिळाल्याची कथा अरबी गोष्टींत आहे; तसेंच कोणत्याही काव्यांत न आलेली कल्पना जो आपल्या काव्यात देईल तोच खरा कवि असें मानणाऱ्या अरसिकांची आह्मी मनापासून कींव करूं. सर्व काव्यसृष्टि व्यासोच्छिष्ट आहे, तींत नवीन असें कांहींच नाहीं तथापि रोजच्याच पदार्थांना रोज नवीनपणा देते ती सुगरीण खरी, आणि पूर्वींच्या कल्पनांना जडावाचें कोंदण करून श्रीमंतांचें लेणें बनविणाऱ्या कारागिराची धन्यता खरी. जो कारागीर ज्या कलाचा असेल तशी त्याची कृति उतरेल. देवभक्तांचें अभेदित्व सर्व कवींनीं वर्णिलेलं आहे त्यांत देवनाथ, मीराबाई, आनंदतनय व दयाळनाथ या चौघांचीं वर्णनें देतों, म्हणजे एकच मूर्ति चार कुशल कारागिरांच्या हातून घडताना सौंदर्यभिन्नता कशी येते हें दिसेल:—

( १ ) आश्चर्यदीप श्रीकृष्ण तयाची ती राधाज्योती ।
परमपुरुष हा दयाळ श्रीहरि त्याची ते प्रकृती ॥
हा चित्सिंधु ते चित्सरिता ऐक्यपणें मिनती ।
खचित रवी परिपूर्ण तयाची अबाधि ते दीप्ती ॥

—देवनाथ.

( २ ) हीच कल्पना आनंदतनयकृत सेतुबंधांत पहा·—
स्वामी चातक मी, सुधाजलद तूं, मी भक्त तूं अंबिका ।
तू श्रीचंद्र, चकोर मी, तपन तूं, मी कोक झालों निका ॥
मी तों एक तरंग, तू जलनिधी, मी भूमि तू रेणुका ।
मी तंतू, पट तूं, परंतु धरिसी लौकीक लोकाधिका ॥

( ३ ) कृष्णभजनाला वाहिलेल्या मिराबाईच्या कमलमुखांतील पद पहा:—

" जो तुम तोडो पिया मै नहीं तोडूं ।
तोडूं तोरा संग कृष्ण कोन दुजा जोडूं ॥ ध्रु० ॥
तुम भये तरुवर मैं भयी पखिया ।
तुम भये सरोवर मैं भयी मछिया ॥

तुम भये गिरिवर मैं भये चारा ।
तुम भये चंदा हम भये चकोरा ।
तुम भये मोती प्रभू हम भये धागा ।
तुम भये सोना हम भये स्वागा ॥
बाई मीरा कहे प्रभू ब्रजके बासी ।
तुम मेरे ठाकोर मैं तेरी दासी ॥

( ४ ) आणि या वरच्यांच्या जोडीला दयाळनाथाचें पद पहाः—

" तू दिनपति मी कांति तुझी आजि कोप कसा करिशी ।
जळाविण मीन तळमळी तशी ॥
साधन तरि कोणतें करू मी तुझिया प्राप्तीशीं ।
किति ह्मणुनिया अंत पाहसी ॥
॥ छद ॥ मी सरिता तूं सागर
मी चातक तूं जलधर
मी तारा तूं शितकर
॥ टीप ॥ आगळीक नसतांनि नजर कां मजवरती वांकडी ।
सख्या तूं जिविंचा जिवलग गडी " ॥

परमस्नेहाळ ईश्वरमाउलीशीं तादात्म्य करून घेण्याचे चौघांचे चार प्रकार वर दिले आहेत त्यांत देवनाथाच्या प्रत्येक कल्पनेला वेदांतस्वरूप देण्याचा, मिराबाईचा अभिजात स्त्रीला अनुरूप असें आत्मसमर्पण करण्याचा, आनद-तनयाचा बहुश्रुत विद्वद्रत्नाला साजेलसा वर्णनयत्न दिसतो. तिन्ही गुरूंनीं दयाळनाथांच्या मस्तकावर वरदहस्त ठेविलेला आहे.

शब्दरत्नें ज्या जोहोऱ्याच्या हातीं पडतील तो आपापल्या बुद्धिबलानुरूप त्याची जोडणी करितो, त्यांत कोणी कोणाचा बांधला गेला नाहीं, सेव्यसेवक नाहीं. असा अधिकउणा संबंध कोणी जबरीनें दाखवू लागेल तर तो आह्मी क्षुद्रदृष्टीचा समजू अलीकडे एक इंग्रजी कवि घेऊन त्याच्याशीं एक मराठी कवि तोलावयाचा ही चाल पडली, ती तर आमच्या मतें अगदीं अप्रस्तुत व गौण आहे. काशी आणि रामेश्वर दोन्ही परमधामें. तेथें पोहोंचल्यावर तेथल्या भक्तिसुखांत दंग व्हावें, देवद्वारीं क्षणभर उभें राहून ज्ञानमुक्ति साधाव्या, याच्याऐवजीं कोणी जर तेथील रस्त्यांच्या लांबीरुंदीची मोजमाप घेऊं लागेल तर तो शोधक खराच, पण भक्त नव्हे आणि रसज्ञही नव्हे.

५२. या शब्दकलेसंबधानें लिहितांना प्रख्यात कोशकार मोल्स्वर्थ-साहेब यांचे आह्मी फार फार आभार मानितों, आणि त्यांना लक्ष वेळ धन्यवाद देतों मराठी भाषेंतील जे पन्नास पाऊणशे अगदीं जुने शब्द देवनाथांत आलेले असे आह्मां मागें दिले आहेत, त्यांचा आह्मीं प्रत्येक ठिकाणीं विस्तृत व आमच्या मतें यथायोग्य अर्थ दिला आहे, परंतु या कोशाची व कैलासवासी माधव चंद्रोबा याच्या संस्कृत–मराठी कोशाची जर आम्हाला मदत नसती तर पुष्कळ शब्दांचे अर्थ केवळ अजमासानें द्यावे लागते मोल्स्वर्थसाहेब व त्यांचे सहकारी शास्त्री यांनीं जुने जुने शब्द ओंवीबद्ध ग्रंथांतून आलेले आहेत त्यांचे योग्य अर्थ देऊन पुष्कळ ठिकाणीं ग्रंथांतील उतारे दिले आहेत एका 'निज' शब्दाचीं पुष्कळशीं सामासिक रूपें होऊन ओंवीग्रंथातून त्यांचे वेगवेगळाले अर्थ दिले आहेत, व ज्या पुष्कळ शब्दाचा अर्थ हल्लींची टीकाकार मंडळी अंदाजाच्या गोळ्या मारून लावते त्यांचे जमेल तोंपावेतों बिनचूक अर्थ मोल्स्वर्थमध्यें सांपडतात; आणि इतकें होऊ-नही कांहीं शब्द असे आहेत कीं, त्याचा वाटेल तेथें वाटेल तो अर्थ लागतो आणि त्यांनीं मोल्स्वर्थलाही हात टेंकावयाला लाविले आहेत. याबद्दल आमची 'वहिलें' शब्दावरील टीप पहा या सर्वांगसुंदर कोशाचा अनमोलपणा व दुर्मिळपणा लक्षांत आणून सरकारनें तो पुन्हां विद्वन्मंडळीच्या साहाय्यानें छापावा अशी सविनय विनंति आहे मराठी—मराठी असा बृहत्कोश निघेल तो सुदीन पण असा निधड्या छातीचा लेखक अगर प्रकाशक सध्यां तरी कोणीच दिसत नाहीं

---

# साधुसमागम आणि पंडितांशीं गांठ.

५३. जगदुद्धार करण्याकरितां हिंडणें हें सुळावरच्या पोळीसारखें कठीण काम आहे या व्यवसायाला बहुरंगी लोकनायकत्व असावें लागतें. चांगली व्युत्पन्नता पाहिजे, आवाज पाहिजे, साथ पाहिजे, वक्तृत्व दांडगें हवें, संस्कृत प्राकृत कवींचा परिचय असेल तितका बरा, स्वत: कवित्व आल्यास दुधांत साखर, आणि बहुतां लोकांचें मन राजी राखण्याची हातोटी पाहिजे श्रोत्यांमध्यें नानाविध लोक असतात, त्यांत प्रत्येकाला कांहीं तरी

दुर्गुण असतोच दुर्गुणांची निंदा करावयाची हा बाणा, परंतु कोणाच्याही मनाला न दुखवितां होईल अशी शिताफी पाहिजे नाहीं तर हरिदासानें कौतुकानें जांबुळीच्या झाडाखालीं नवल वर्तल्याची गोष्ट सांगावी, आणखी एखाद्या वर्मीं लागलेल्या श्रोत्यानें ' वर्तलें तर वर्तलें, तुझ्या बाचें काय गेलें ' असा रोकडा जबाब देऊन रसभग करावा आरतीच्या तबकांत पैसा टाकण्याकरितां आणलेला असतो तेवढ्याच्या मोबदल्यांत आब्रह्मस्तबानिरूपण झालें पाहिजे बरोबर लोक असतील त्यांची मर्जी राखली पाहिजे, गावांतल्या गृहस्थांना प्रेमाचा जिव्हाळा लाविला पाहिजे, सावकारांना औदार्याचा पाझर फोडला पाहिजे, असे अनेक प्रसंग असतात, ते सर्व पार पाडणारा चतुर पुरुष असला, चांगला व्यवहारदक्ष असला, तरच त्याचें परमार्थनिरूपण पटतें नाहीं तर मूलकाळाबद्दल पाठांतर केलेलें जागोजाग ओकत गेलें तर ऐकतो कोण ? जे समर्थ असतात ते आपल्या वाणीनें लोकांना मोह पाडून आपला कार्यभाग उरकतात, आणि दुसरे आपल्या पूर्वजांच्या अथवा गुरुपरंपरेच्या लौकिकाच्या खोट्यानाट्या गप्पा सांगून आपली महती वाढवितात, तथापि समर्थ असो अथवा परपुष्ट असो, प्रत्येक विद्वानाला ' बोद्धारो मत्सरग्रस्ताः प्रभव. स्मयदूषिता' " या अडचणीचा प्रत्यय पदोपदीं येतो नाथसाहेबाना त्यांच्या तेजस्वी व तापट स्वभावामुळें हा प्रसग बारंवार येई. कोणी कोणी लोक मुद्दाम वाद घालून छळ करावयाला पहात, कोणी छळ करावयाला येत, पण प्रेमपूर्ण होऊन जात, कोणी नुसतीच गमतीची कुस्ती करून नाथाच्या व आपला लौकिक वाढवून घेत, कोणी आदरपूर्वक क्षेमालिंगनाला येत, तर कोणी पुत्रप्रेमाचा पान्हा फुटून भेटावयाला धांवत एलिचपूरचे हरशास्त्री व बाळापुरचे नाना गावली, महाराष्ट्रांतील अनतफंदी व मद्रासकडील रघुनाथ पडित अरणीकर आणि जालन्याचे आनदीनाथ यांच्या गोष्टी येथें मासल्यादाखल देतों

---

## आनंदीनाथांची भेट.

५४. देवनाथचरित्रामध्यें गोविंदनाथांनतर प्रमुखस्थान आनदीनाथांना दिलें पाहिजे मनमाडवरून औरंगाबादकडे आगगाडी जाते त्या फांट्यावर जालना स्टेशन आहे. त्या गांवीं हे सत्पुरुष रहात असत यांची वृत्ति

सदोदित उन्मत आणि पिसाट अशी असे हे सदा आपल्या विचारांत दंग असावयाचे. लोक जवळ येऊन उपाधि द्यावयाला लागले तर दगड मारून त्यांना दूर पळवून लावावयाचे, मनस्वी शिव्या द्यावयाच्या, हें यांच्या साधुत्वाचें बाह्य लक्षण. अशांच्या भेटीला याच्यासारखा समक्या साधु गेला तरच टिकावयाचा गोविंदनाथांचे व यांचें फार प्रेम असल्यामुळें गोविंदनाथ त्यांच्या दर्शनाला गेले आणि घरेच दिवस उभयतां प्रेमानें एका जागीं राहिले रोज उभयतांचें आत्मानात्मविचारावर संभाषण चालावयाचें देवनाथांना आपल्या प्रवासांत असतांना पत्ता लागला कीं, गुरुमहाराज जालन्याकडे जवळच आहेत, तेव्हां ते तावडतोब दर्शन घ्यावयाला आले, आणि गुरूच्या तालमेंत वाढलेल्या त्या शिष्याची परीक्षा पाहून आनंदीनाथांनाही पराकाष्ठेचें समाधान वाटलें नाथांनीं उभयगुरूंची देहसेवा सत्पुत्राप्रमाणें केली 'महाराज आनंदी हो अवतरले जग ताराया' हा कटाव, अरुपानंदीं अद्वय श्रीगुरु दत्ताचे अवतरला। हरीची अद्भुत गुणलीला । (पद २५७); सच्चिद्घन आनंद आनदी दत्तात्रय मूर्ती। कलियुगीं धरी अवतार, कीर्ति हे व्यापक त्रैजगतीं (पद २५८), आनंदि जाल्हनापुरीं धरी अवतार। जगीं वृत्ति दाविती दृष्टि करी आधार (पद २५९); आनंदी त्र्यक्षरी मंत्र स्वमुखें उच्चारा (पद २६०) वगैरे कवनें रचावीं, आणि उभयगुरूंना झोंपाळ्यावर बसवून त्यांना झोंके देतांना हीं पदें म्हणण्यांत आपल्या देहाचें सार्थक मानावें, हा त्यांचा नित्यक्रम होता असे काहीं आनदांचे दिवस लोटल्यावर उभयतां गुरुशिष्य आनदीनाथांचा निरोप घेऊन जालन्यास परत आले.

---

## अनंतफंदीची कुस्ती.

५५ रा रघुपतराव दाजीसाहेब सुरजीकर लिहितात कीं, देवनाथ पंढरपुरास गेले तेव्हां आंवढेनागनाथ येथें मुक्काम होता त्यांच बरोबरचा ब्राह्मण मांदा झाला होता सबब येथें राहिले. त्या वेळीं नांदगावं खंडेश्वर येथील साधु 'गुंडो' (हे लक्ष्मण गुंडोचे वडील होते, यांचें नांव स्मरत नाहीं) हे पंढरीचे यात्रेस जात असतां आंवढ्यास नाथसाहेब आहेत ह्मणून उतरले. नाथसाहे-

यांची भेट झाली नंतर ते पंढरीस जाण्यास निघाले त्या वेळीं नाथसाहेबांनीं पांडुरंगास आपला निरोप सांगावा, ह्मणून गुंडोस सुचविलें त्या वेळीं नाथांनीं पदरूपानें निरोप पाठविला तो—

## पद.

माझि विनवणी, विनवणी हरिला सांगा ;
कधीं भेटाल पांडुरंगा ॥ ध्रु० ॥

हें पद केलें तें गुंडोनें लिहून घेतलें नंतर गुंडो गेले कांहीं दिवसांनीं नाथही पंढरपुरास गेले तेथें कांहीं दिवस राहिले पांडुरंगाचे दर्शनास जेव्हां जेव्हां देवळांत जात असत, तेव्हां सभामंडपांत बसून एक नवीन पद रचून ह्मणत असावे त्या पदांपैकीं कांहीं पदें काव्यसंग्रहांत देवनाथांचें चरित्र प्रसिद्ध झालें आहे त्यांत आहेत एके दिवशीं एकें ब्राह्मण पंढरीचे देवळांत आला व त्यानें सभामंडपांत बाराशें नमस्कार विठोबास घातले नाथ तेथेंच बसले होते त्यानीं पाहून ह्मटले कीं, तुह्मीं बाराशें नमस्कार घातले, पण आह्मी उद्यां बाराशें अभंग येथें नवीन रचल्यावांचून उठणार नाहीं त्याप्रमाणें नाथ दुसरे दिवशीं पंढरीचे देवळांत येऊन सभामंडपांत बसून बाराशें अभंग नवीन रचून ह्मटले तेव्हां तेथून उठले यांत सर्व वेळ गेला ही देवनाथांची ख्याति ऐकून त्या काळीं एक कवि अनंतफंदी म्हणून होते ते पंढरपुरास आले आणि नाथांशीं भेटून असें म्हणाले कीं, तुमची आमची कुस्ती करूं. नाथांनीं "बरें आहे" म्हणून सांगितलें नंतर पुंडलिकाचे देवळासमोर शामियाना देऊन या उभयतांचें भजन सुरू झालें फक्त जेवणापुरते घरीं जात होते बाकी रात्रंदिवस भजन चाललें होतें एक लावणी अनंतफंदीनें म्हणावी व दुसरी तेच वेळीं रचून नाथांनीं म्हणावी याप्रमाणें तीन दिवस चाललें. चवथे दिवशीं अनंतफंदीचे गुरूनीं फंदीस म्हटलें कीं, हे नाथ अवतारी आहेत. यांच्यापासून तुह्मास जय मिळणार नाहीं यांच्याशीं समेट करावा याप्रमाणें नाथांचा व फंदीचा समेट झाला त्यापैकीं एक लावणी काव्यसंग्रहांत लिहिली आहे ती ही कीं, फंदीनें नाना फडणविसाची तारीफ केली व देवनाथांनीं विरुद्ध ह्मटलें. फंदीनें

सवाई माधवराव पेशवे सवाई डंका बजाया ।
फडनवीस नानाके देखो अकलने क्या गजब किया ॥

याप्रमाणें पद म्हटलें नाथांनीं याचे विरुद्ध

अनतफंदीनें नानाफडणीसके अक्कल तारीफ कीई ।
क्या है उसकी अक्कल दौलत पेशवाई डुबादियी ॥

पद रचिलें अशीं पुष्कळ पदें त्या वेळीं रचिलीं आहेत त्यांपैकीं कांहीं पदें काव्यसंग्रहांत आहेत—"

५६ ही जी नाना फडणविसाच्या पदाची गोष्ट वर दिली आहे हीच के भालचंद्रनाथांनी आम्हाला दर्यापूर मुक्कामीं सांगितली होती त्यांनीं असेंही सांगितलें कीं, काव्यसंग्रहकार के वामनराव ओक यानीं त्यांना या फडणविसाच्या पदाबद्दल विचारिलें, तेव्हां त्यांनीं ओकांना सांगितले कीं, हें पद नानाच्या निंदापर नसून फक्त फंदीच्या कुस्तींतील होतें फंदीनीं एका विषयाचें एका बाजूनें प्रतिपादन करून शीघ्रकवित्वाचें पद रचिलें कीं नाथांनीं त्याच्या उलट बाजूचें प्रतिपादन करावें, आणि नाथांनी मंडनपर शीघ्रपद म्हटले कीं फंदीनीं खंडनपर म्हणावें ओक व भालचंद्रनाथ यांच्या या गोष्टी एका स्टेशनावर झाल्या होत्या, व ओक काव्यसंग्रहांतील देवनाथाच्या पुढील आवृत्तींत ही टीप देणारही होते, पण त्यांच्या अकालमृत्यूमुळें ही गोष्ट जागच्याजागीं राहिली आम्हाला भालचंद्रनाथांनीं ही गोष्ट आम्ही व के अण्णासाहेब चांदेकर तहशिलदार त्यांना दर्यापूरच्या राममंदिरांत भेटावयाला गेलों असतां सांगितली त्यांची माहिती अर्थात् ऐकीव, पण या कुस्तींतीलच हें पद असावें असें आम्हालाही वाटतें नानाखेरीज दुसऱ्या कोणत्याही ऐतिहासिक पुरुषावर नाथांची कविता नाहीं, यावरून नाना त्या कालच्या अनन्यसाधारण पुरुषांत मोडत होते हें स्पष्ट दिसतें.

---

## रघुनाथ पंडिताची भेट.

५७. श्रीमंत रघुपतराव दाजीसाहेब सुरजांकर लिहितात कीं, " नाथ जेव्हां पंढरपुरास गेले म्हणून सांगितले आहे तेव्हां तेथें कोणी रघुनाथ, पंडित म्हणून आले होते. त्यांनीं नलदमयंतीचें एक नवीन चरित्र नुकतेंच रचिलें होतें. तें चरित्र नाथांस दाखविलें आणि आपली इच्छा अशी प्रदर्शित

केली कीं, याचा उपयोग आपले कीर्तनांत व्हावा नाथांनीं हसून उत्तर दिलें कीं, 'पंडितजी' माझा नियम शिळा पदार्थ ग्रहण करण्याचा नाहीं व परान्न सेवन करीत नाहीं आणि मी जीवाचा भक्त नाहीं सबब आपण म्हणतां हें माझ्यानें मान्य करवत नाहीं ' पंडितजीनें प्रत्युत्तर केलें की, ' ही गोष्ट मजला माहीत आहे कीं, आपण कोणाची कविता म्हणत नाहीं व नवीन कविता रचून ती म्हणत असतां परंतु, आपले कालचेच कीर्तनांत आपण एक तुकारामाचा अभंग म्हटला व ज्ञानेश्वराच्या तीन ओंव्या म्हटल्या त्याही तर शिळ्या व परक्या अन्नाप्रमाणेंच आहेत त्या आपण ग्रहण केल्या म्हणूनच मीं ही आपणास विनंति केली नाथांनीं पुन्हां उत्तर केलें कीं, 'पंडितजी, असें म्हणणें ही तुमची चूक आहे पहा तो पदार्थ शिळा आहे हें खरें; परंतु तो घृतपक्व आहे, यास्तव तो शिळा होऊ शकत नाहीं असें तुमचेच धर्मशास्त्रांत लिहिले आहे तुमचा पदार्थ घृतपक्व नसून तैलपक्वही पण नाहीं नुसता तव्यावर भाजला आहे म्हणून तो शिळा होतो. दुसरें पहा कीं, तें परान्नही होत नाहीं जो आपला सगोत्र किंवा सपिंड असेल तो पर मानता येत नाही त्याचें परान्न कसें होईल ? हेंही शास्त्रांत पहा तुकाराम, ज्ञानदेव हे व आम्ही सगोत्र व सपिंड आहोंत तेव्हां तें आम्हांस परान्न नाहीं आपली कविता तव्यावर भाजलेला पदार्थ आहे असें जें मीं म्हटलें त्याचा अर्थ आपणास जर समजला नसेल तर मीं सांगतों आपण या चरित्रांत मनुष्याचे लीलेचें वर्णन केलें आहे मनुष्याचें वर्णन करणें मला मान्य नाहीं म्हणूनच मीं म्हटले कीं, मी जीवाचा भक्त नाहीं पंडितजीस नाथांनीं असेंही म्हटलें कीं, आपण अशा कविता रचण्यांत काय लाभ आहे यात कांहीं परमार्थ नाहीं आता आपण श्रम करून हें चरित्र रचलेंच आहे तर मी आपला संतोष राखण्याकरितां दयाळास सांगतों. आपण त्याजला हें चरित्र द्या तो याचा उपयोग करील ' नंतर रघुनाथ पंडिताने दयाळनाथांची भेट घेऊन तें चरित्र दिलें दयाळांनीं त्याचा गुरूचे आज्ञेवरून स्वीकार केला, व ते कीर्तनांत त्याचा उपयोग कधीं कधीं करीत असत. पुढें रघुनाथपंडितानें कविता करण्याचा नाद सोडला असेंही कोणी म्हणतात. ''

५८. परंतु ही गोष्ट फारच वादग्रस्त कोटींत येइल असें वाटतें. रा. वि. का राजवाडे यानीं ग्रंथमालेमध्यें जे वाङ्मयात्मक लेख लिहिले त्यांत रघुनाथ पंडितांचा काल शके १५८२–१६४२ असा दिला आहे. रघुनाथ

पंडितांनीं रामदासांवर भक्तिरसपूर्ण अष्टक रचिलें आहे, त्यांत ते आपल्याला रामदासाचा शिष्य म्हणवितात आणि वर्तमानकालाचा उपयोग करून वर्णनसमयीं समर्थ जिवंत होते असें दर्शवितात मद्रास इलाख्यांत अरणी शहर आहे, तेथें चार मराठी कवि झाले, पहिला आनंदतनय, दुसरा रघुनाथ पंडित, तिसरा सुभानराव व चवथा गोसावी नंदन कंगाल हे ब्राह्मण आरणीचे ! परंतु ते शूर रणांगणींचे ' हा श्लोकार्ध सर्वांमुखीं त्या प्रांतीं असलेला आढळून येतो ग्रंथमालेंत रा राजवाडे यांनीं आनंदतनयाची हकीकत देतांना शके १६२२ मध्यें आनंदतनय होते असें दिलें आहे, आणि रघुनाथ पंडितांची मुलगी आनंदतनयांच्या मुलाला दिली असून उभयतां कीर्तन करीत असें लिहिलें आहे, तेव्हां दयाळनाथांच्या वेळेपर्यंत रघुनाथ पंडित होते कीं नव्हते हा वादग्रस्त प्रश्न आहे पुढील शोधकानीं जास्त शोध लावावा यासाठीं ही सर्व माहिती संकलित केली आहे इकडे वऱ्हाडांत रघुनाथ पंडित आणि देवनाथ दयाळनाथ यांच्या भेटी झाल्याची गोष्ट प्रचलित आहे, आणि रा राजवाडे सबळ कारणें देऊन जो शक बसवितात, तोही विचारणीय आहे. याचा निवाडा होणें कालांतराची गोष्ट आहे

---

## हरिशास्त्रीची निंदा.

**५९.** श्री रघुपतराव दाजीसाहेब लिहितात की, " एक वेळीं नाथ इलिचपूर येथें असतांना—

**निबिड सघन हे मध्य शार्वरी हरि वाजवि मुरली ॥**

व

**गुणातित जे निर्गुण म्हणती मुळ ओंकाराचें ॥**

या दोन पदांवर तेथील हरिशास्त्रीनें वाद केला कीं, एकाच अर्थाचीं दोन पदें तुम्ही एकाच ठिकाणीं घातलीं हें काव्याच्या रीतीनें अशुद्ध आहे याजवर एक महिनापावेतों रोज कीर्तनांत नाथांशीं हरिशास्त्रीनें वाद करावा व नाथांनीं त्याचें खंडण करावें नाथ शास्त्री आल्यावांचून कीर्तनच करीत नसत. शास्त्री आला म्हणजे वाद सुरू व्हावा नाथांनीं त्याचें खंडन वेदांनीं करावें.

तरी हरिशास्त्री वाद करून नाथाशीं वाढतच होता नाथानीं त्याच वेळी एक पद रचिलें तें असें—

**प्रबल स्वमनीं मज नवल नानुभवि न त्यास श्रुति माने।**
**अप्रत्ययी परि अहं प्रत्ययें मिरवित अभिमानें ॥ प ३५५.**

हें पद म्हणून त्याजला निरुत्तर केले दुसरे दिवशीं आणखी तयारी करून नाथाशीं वाद करण्यास प्रवृत्त झाला त्या वेळीं हरिशास्त्र्याचे वडील जिवंत होते त्याना हा सर्व मजकूर समजला त्यांनी मुलास म्हटलें कीं, तू नाथाशीं व्यर्थ वाद करितोस, तो प्रासादिक आहे. तुझी शिकलेली विद्या त्याचेसमोर चालावयाची नाहीं तू त्याजला शरण जा नाहीं तर त्याचे कोपाने भस्म होशील ' असें म्हणून ते दिवशीं हरिशास्त्रीचे वडील नाथांचे कीर्तनास येऊन कीर्तन सपल्यावर हरिशास्त्रीस नाथांचे पायावर घालून त्यांची क्षमा मागितली ते दिवशींही नाथांनीं एक पद म्हटलें तें असें—

**सार घ्यावा हा अनुभव देहीं।**
**शब्दज्ञानाचें काज येथ नाहीं नाहीं ॥ प २७२.**

हीं दोन्ही पदें काव्यसंग्रहांत लिहिलीं आहेत तेव्हांपासून हरिशास्त्रीनें आपला शास्त्रीपणाचा अभिमान सोडून नाथांचे कवितेचें भजन करूं लागला. पुढे त्याचे वंशांत वामनशास्त्री झाले तेही भजन करीत असत " शास्त्रीपडितांचा आणि सतांचा हा विरोध पूर्वापारचा चालत आलेला आहे, आणि शास्त्र्यांनीं सतांना तुच्छ मानलें आहे तर सतांनींही सव्याज उसनें फेडलें आहे. परंतु यामुळें संत व पडित यांच्यामध्यें तुलना करण्याचें धाडस आह्मां प्राकृतांनीं करू नये पडितही वद्यच होत. 'वेदाचा तो भार आम्हासीच ठावा, येरांनी वहावा भार माथां असा टोमणा तुकारामबोवा पडितांना मारतात, पण वैदिकांनीं जर वेदाक्षर जपून घोकलें नसतें, आणि पंडितानीं त्याची अर्थपरंपरा कायम राखली नसती, तर भोंदू सतांपासून खऱ्या धर्माचें रक्षण करणें हें सच्च्या सतांना फार कठीण पडतें. वेद हे अपौरुषेय त्यांत जी ज्ञानप्रतिभा भरली आहे त्या तेजोगोलांतील एखादा किरण ईशरूपेनें एकेका साधूच्या वांट्याला येतो सगळा येता तर पुराणपुरुषवेद् अद्यापपावेतों अस्तित्व धरून रहाण्याची शक्यता नव्हती. वेदवेदांगांना न सोडता ज्या साधुसतामीं नवी रचना केली त्यांची ती कृति धर्मांच्या कसोटीला उतरली, बाकी-

त्यांचें भंड फुटलें जुनी ज्ञानपरंपरा सुटल्यामुळें ब्राह्मणांची बुद्धि भ्रष्ट झाली होती, आणि रामदासांनी म्हटल्याप्रमाणे " कित्येक दावलमलकास जाती । कित्येक पीरास भजती । कित्येक तुरुक होती । आपुले इच्छेनें ॥३२॥ ऐसा कलियुगींचा आचार । कोठें राहिला विचार । पुढें पुढें वर्णसंकर । होणार आहे " अशी समाजस्थिति होऊं लागली असतां पंडित हे श्रुवतान्याप्रमाणें प्राचीन ज्ञानाचें अचलत्व स्थापितात आतां आपले पाठांतर मात्र हरिनामापेक्षा अथवा समाजप्रगतीपेक्षा श्रेष्ठ असा अभिमान धरितात, तेव्हां संतांना आणि परमेश्वराला तो उतरवावा लागतो हरिर्दाता हरिर्भोक्ता या भावनेनें वक्ता पुराण अथवा कीर्तन सुरू करता झाला म्हणजे मध्येंच व्याकरणाची अथवा न्यायाच्या घटपटाची खटपट आड घालून त्याच्याशीं वितंडवाद करण्याची दुष्ट खोड पुष्कळ पंडितांना असे, आणि कधीं कधीं ती त्यांच्या मत्सरग्रस्ततेची, तर कधीं व्यवहारशून्यतेची तर कधीं क्षुद्रमनाची साक्ष पटवी, पण पंडिताची कसोटी जागजागीं लागे म्हणूनच खोट्या संतापासून खरे संत ओळखले जात, एवढें लक्षांत ठेविलें पाहिजे सच्चा संत पंडिताला लोटांगण घालावयाला लावी, तर कच्चा संत पंडितासमोर असला म्हणजे अर्धमेला होई हेंही विसरतां कामा नये पंडितांत तरी कोणी छलबुद्धीचे असत तर कोणी योग्य परीक्षा उतरली असतां कीर्ति वाढविणारे होते. हरिशास्त्रींच्या वादाची गोष्ट वर दिली आहे, याच्या उलट नाना गावलींची सांगतों

---

## नानागावलींचा पोटशूळ.

६०. नाथ फिरत फिरत अकोला जिल्ह्यांत आले, आणि यांच्या अपूर्व सभाजयाचा सर्व शास्त्रीमंडळाला विषाद वाटून नाथांचा तेजोभंग व्हावा या मार्गाला सर्वजण लागले सर्व उतरत्या काळांतले विद्वान् नवा ग्रंथ अथवा नवा शोध यामध्यें चालण्याचें डोकें कोणाचेंच नसून सर्व जुन्या वाक्यांचा कीस पाडणारे आणि द्विजांच्या वाचेमध्यें जे अमोघवीर्य अथवा वावदूकपणा भरलेला असतो त्याचा प्रत्यय देणारे होते. विद्या आली तरी तेज असल्यावांचून चालत नाहीं, आणि तें तर कोणालाच नव्हतें तेव्हां सर्वजण अकोला जिल्ह्यांतील बाळापूर येथें नाना गावली नांवाचे विद्वान् पुराणिक रहात होते

त्यांजकडे गेले श्रीमद्भागवत ग्रंथावर यांचें परिशीलन इतकें जबर होतें आणि वक्तृत्व इतकें अस्खलित चाले कीं, यांना भागवताची पोथी खुद्द श्री-व्यासांनीं दिली आहे असा सर्व भाविकांचा समज होता खुद्द काशी क्षेत्रांत त्यांना व्यासजी ह्मणत बाकी त्या काळचे काशीतले पंडित परीक्षेंत कितपत ठेने हें समजत नाहीं कारण आर्यानाथ मोरोपंत हे आपले ग्रंथ घेऊन त्यांजकडे गेले असतां त्या पंडितांनीं मध्येंच एक शलाका घालून पोथी उघडली, आणि चार श्लोक निघाले ते वाचून तेवढ्यावरच त्यांनीं पंतांचें गौरव केलें ही पद्धत जरा आळसाची, पण प्रोफेसर परांजपे (पराडकरांच्या महाभारताची प्रस्तावना) दूषण देतात इतकी ती दूषणार्ह नाहीं हल्लीं तरी विद्यार्थ्यांची परीक्षा साधारण याच धर्तीवर चालते, आणि मुद्दाम वाईट भाग शोधून काढला असें कोणी म्हणावयाला नको तथापि काशीतला मान्य विद्वान् म्हणजे सामान्य हिरा नव्हे अशा या व्यासजींकडे पंडितांनीं जाऊन त्यांना नाथांशी वाद करण्याची गळ घातली व्यासजी पंडित होते तसेच व्यवहारचतुर होते. त्यांना पोट-शुळाची व्यथा असे, आणि वाद करावयाचा झाला तर त्यांचा पोटशूळ उठे करावयाचा नसला तर कशाला उठतो ! त्यांनी मंडळींची समजूत केली कीं शूळ उठला तर वाद करीन कीर्तनांतील वक्तृत्वाला नानांनीं सारखी मान डोलावली विद्वानाचे परिश्रम विद्वानानें जाणले कीर्तनानंतर नानांनीं नाथांना धन्यवाद दिला, आणि सर्व विद्वानांत त्यांच्याबद्दल प्रेमभाव उत्पन्न करून दिला आणि नाथांना निरोप दिला नाथ थोर तर खरेच, पण गावली निर-भिमानतया थोर. तेही प्रच्छन्न साधुच होते. एरव्हीं ते वादाचा हट्ट धरते तर गांवकरी शास्त्रीमंडळ त्यांच्या बाजूनें कोल्हेकुई माजवावयाला तयार होतेंच त्या अराजक काळांत जास्त विद्वान् कोण याचा निर्णय मारामारीनें अथवा शिव्यागाळीनेच होत असे खुद्द रामदासांना वामन पंडिताचें समाधान मारुतीचें रूप धरून व पुच्छ आपटून करावें लागलें होतें अशी कथा आहे, आणि देवनाथांनाही एकदां असाच प्रसंग आला होता तो असा:—

## ' ब्राह्मणे द्वयि हस्तिनि. '

६१ नाथांच्या एका कीर्तनसप्ताहामध्यें न्यायव्याकरणाला सज्ज करून एका पंडितानें दर शब्दाला अडवावयाचें असा क्रम चालविला. कांहीं दिवस

नाथांनीं वाद केला, तरी पंडिताचा क्रम सुटेना. व्यासपीठावरचा वक्ता श्री-व्यासजी असें मानावें, हा जो पूर्वापारचा श्रेष्ठसमत मार्ग तो या बिचाऱ्याला दिसेना. लौकिकवान् मनुष्य पुढें आला म्हणजे त्याच्याशीं थोडासा धटिंगण-पणा करून त्याच्यावर जय झालासें मिरवावयाचें ही स्वल्पकष्टार्जित यशाची लालसा प्रत्येकाला असते, आणि आपल्यापेक्षां श्रेष्ठ असेल त्याला लोक-मान्यतेच्या पदावरून खालीं खेंचून आपण परभारें त्याच्या जागेवर उडी मारून बसावयाचें हा श्रेष्ठपणाचा सवंग मार्ग बिचाऱ्याला दिसतो. शेवटीं एक दिवस नाथ संतापले. 'विद्याविनयसंपन्ने ब्राह्मणे गवि हस्तिनि । शुनि चैव श्वपाके च पंडिताः समदर्शिनः ' हा श्लोक त्यांना म्हणावयाचा होता. त्यांनीं 'विद्या-विनयसंपन्ने ब्राह्मणे ' हें पद म्हणून त्या अविनीत ब्राह्मणाजवळ गेले, आणि 'ब्राह्मणे गवि हस्तिनि ' म्हणण्याच्याऐवजी ' ब्राह्मणे द्वयि हस्तिनि ' म्हणून उभयहस्तांनी फाल्गुन पौर्णिमेचा मूकभाव दाखविला. ब्राह्मण बिचारा या न्यायशास्त्राला अनभिज्ञ होता. तो भेदरून तटस्थ बसला, आणि पुन्हां सभा संपेपर्यंत त्यानें वादाचें नांव घेतलें नाहीं.

---

## चमत्कार.

## मुलाची समाधि.

६२ नागपुराला देवनाथ होते तेव्हां कांहीं लोकांनीं त्यांना म्हटलें कीं, देवनाथ लाखाचें कीर्तन करितात. यांनीं सांगितलें कीं, आम्ही त्याहून जास्त किंमतीचें करून दाखवूं. मग एक दिवस नाथांनीं दयाळनाथांना कीर्तन सुरू करावयाला सांगितलें, आणि तें रंगांत येऊन श्रोत्यांची चित्तवृत्ति तन्मय झाली असतां आपण दोन वर्षांचें मूल समोर ठेवून त्याची जी समाधि लाविली, ती कीर्तन संपेपर्यंत तशीच होती. मुलाची दृष्टि सारखी देवनाथाकडे लागली होती हें पाहून लोकांना महदाश्चर्य वाटलें. निरूपणाला चमत्काराची योग्य जोड मिळाली.

# तरुण स्त्रीची समाधि

६३. सामर्थ्यवान् पुरुष जेथें जेथें असेल तेथें त्याच्यामागे सिद्धि, संपत्ति षड्रिपू इत्यादि लागावयाचेच, आणि या सर्वांना चालन देण्याकरितां कामनाबद्ध पुरुषांच्या अथवा स्त्रियांच्या झुंडीही पाठीस लागण्याचें भय असतें एकदां नाथांनीं फिरतां फिरतां एका गांवीं मुक्काम केला, तेव्हां थोडक्याच दिवसांत पुष्कळ लोक त्याचे शिष्य झाले, त्यांमध्यें एका श्रीमंत गृहस्थानें सहकुटुंब नाथांचा अनुग्रह घेतला, आणि त्यांना घरीं आणून ठेविलें त्यांची सेवाचाकरी होत असतां गृहस्वामिनीला नाथकामना झाली, तेव्हां नाथांनीं तिची समाधि लाविली ती सात दिवस उतरली नाहीं सगळे लोक घाबरले, पण गृहस्थ सुज्ञ होता नाथ अभय करतील ही त्याची खात्री झाली बाई आठव्या दिवशीं शुद्धीवर आली तेव्हांपासून ती पूर्ण निरिच्छ होऊन उत्तम गतीला लागली सन्मार्गाच्या अंकुरांना ज्ञानकिरणाचें पोषण मिळालें [ दाजीसाहेब देशपांडे सुरजीकर यांजकडून आलेली माहिती ]

---

# राजाराम राघवांची कुशंका.

६४ पण या गृहस्थासारखे सगळेच विचारी नसतात श्रीमंत भोंसलेसरकारच्या ताब्यांत गाविलगडचा किल्ला असतांना तेथें राजाराम राघव नांवाचा अधिकारी होता तो देवनाथांचा शिष्य होता, व त्याची स्त्री नाथांची शिष्यीण होती त्यानें एक दिवस नाथांना थाटाची मेजवानी दिली, आणि भोजनोत्तर नाथ एका लाधनींत आराम घेत असतां त्याला कोणीं सांगितलें कीं, दोन स्त्रिया नाथांची सेवा करीत आहेत तो पापशंकेनें पहावयाला गेला असतां त्याला दोन माकडतोंडे परिचारक दिसले, तेव्हां तो मागल्या पायानें परतला पुढें निरोप घेतांना नाथ त्याला म्हणाले कीं, तुला बुद्धिभ्रंश झालेला दिसतो, हें वैभव जाण्याचें लक्षण आहे नंतर थोड्याच दिवसांत कंपनीसरकार व भोंसलेसरकार यांचें युद्ध होऊन गाविलचा किल्ला इंग्रजांकडे गेला आणि राजाराम राघव भ्रष्टपद झाला [ दाजीसाहेब देशपांडे सुरजीकर यांजकडून आलेली माहिती ]

---

## मूल उठलें.

६५. प्रवासांतून व एरव्हींही देवनाथांच्या हातून कांहीं कांहीं चमत्कार झालेले रा कावतकरांनीं नमूद केले आहेत, व कांहीं रा दाजीसाहेब देशपांडे यानीं मागाहून कळविले आहेत त्यांत मुख्य चमत्कार काशी येथे कीर्तन करीत असतां मूल उठविल्याचा होय दयाळनाथांनीं सुरजीचा मठ सांभाळल्यावर देवनाथ तेथून नागपूरला गेले, आणि नागपूरला पुष्कळशीं कीर्तनें करून पुढें काशीस गेले तेथे नित्यसांप्रदायाप्रमाणें कीर्तन करीत असतां एका बाईनें त्याच वेळेस वारलेलें मूल दुःखाच्या आवेगांत महाराजांच्या पायावर आणून घातलें नाममाहात्म्य चाललेलें, आणि परीक्षेची वेळ आली महाराजांनी

' ' धांव धांव श्रीहरी ' विश्वेश्वर विश्वंभरणा ।
ओढवलें संकट राखीं ब्रीद जात रमारमणा ॥'

अशा ध्रुपदाचें ब्यायशीं कडव्यांचें पद ह्मटलें. ( आम्हांला अद्याप हें पद मिळालें नाहीं ) मूल जागें झालें, पण आपल्यासाठी प्रभूला संकट पडलें ह्मणून नाथांनीं जें कीर्तन सोडलें तें बरेच दिवस पुन्हां केलें नाहीं

---

## एलिचपूरकराचा पुनर्जन्म.

६६. एकदां नाथसाहेबांचा मुक्काम एलिचपूर येथे असतांना तेथील एक श्रीमान् गृहस्थ आजारी पडला स्त्री तरुण, पण पोटीं संतान नाही ती नित्य नाथांचें दर्शन घेऊन पतीला आराम पडण्याकरितां तीर्थ मागे नाथानीं तिला तीन दिवस तीर्थ दिलें, आणि चौथ्या दिवशीं सांगितलें की, आतां याचा मृत्यु आठ दिवसांवर राहिला आहे, याला कांहीं उपाय नाहीं बाईनें अति आकांत करून नाथांची करुणा भाकिली, तेव्हां कबूल करून ते आठव्या दिवशीं तिच्याकडे गेले, आणि पति अचेतन स्थितीला जात असतां तिच्याकडून त्याला अर्धें आयुष्य अर्पण करविलें, आणि त्या गृहस्थाला थोड्या वेळानें उतार पडावयाला लागला, आणि चारआठ दिवसांत तो खडखडीत बरा झाला उभयतां स्त्रीपुरुषांनीं न आच्या अनुग्रह घेतला, त्यांना नाथरूपेने

दोन मुलें झालीं, आणि पुढें अकरा वर्षांनीं उभयतां पतिपत्नी एकाच दिवशीं निवर्तलीं [ दाजीसाहेब देशपांडे यांजकडून आलेली माहिती ]

---

## भातकुलीच्या देशपांड्याचा पुनर्जन्म.

६७ उमरावती जिल्ह्यांत भातकुली गांव आहे, तेथील रा० रामकृष्णपंत देशपांडे याचे वडील शनिवारीं दुपारीं वारले, आणि तितक्यांत नाथ आपल्या शनिवारच्या नित्यसांप्रदायिक फेरीला निघाले असतां घरात रडण्याचा गोंधळ त्यांनीं ऐकिला नाथांनीं सर्वांना समजाविलें कीं, यांना फक्त मूर्च्छा आलेली आहे, पाच घटकेंत सावध होतील गृहस्थ थोड्या वेळात सावध झाला, आणि कांहीं दिवसांनीं बरा झाल्यावर त्यानें नाथांची चारसहा महिने सेवा केली, आणि मग ते दुसरीकडे प्रवासाला गेले [ दाजीसाहेब देशपांडे यांजकडील माहिती ]

---

## ब-हाणपूरकराचें पुनरुज्जीवन

६८. नाथ ब-हाणपूरहून व-हाडांत येत असतां वाटेंत एक बाई सहगमन करीत होती, आणि प्रसंगानुरूप गावक-यांची गर्दी, मुलांची निरवानिरव, आणि उभय कुलांतील सर्व लोकांची रडारड चाललेली पाहून नाथांनीं गाडी थांबविली, तिला परावृत्त करण्याचा पुष्कळ यत्न केला, आणि ती मुळींच वळेना तेंव्हा तिला मंगलप्रद आश्वासन दिलें सर्व जणाना फार आश्चर्य वाटलें, पण नाथांच्या तेजाकडे पाहून हा कोणी महातपस्वी आहे अशी सर्वांची खात्री झाली, आणि सर्व चितेजवळ जातात तों प्रेत श्वास टाकतांना दिसलें सर्व जण त्याला उठवून परत घेऊन आले नाथांनीं तेथें कांहीं दिवस सेवा घेऊन पुढें प्रयाण केलें, मात्र जातांना त्याला बजाविलें कीं, देहातीत अवस्थेंत तुला जें कांहीं दिसलें असेल त्याबद्दल तूं मुखावाटे अवाक्षर देखील काढूं नको [ दाजीसाहेब देशपांडे यांजकडील माहिती ]

---

## उदेपूरकर बैराग्याची समाधि.

६९ काशियात्रेकरितां उत्तर हिंदुस्थानात गेले असता नाथसाहेबानीं उदेपूर शहरी मुक्काम केला होता महाराणासाहेबांकडून फार मोठी देणगी मिळण्याच्या लल्लुचीने एका बैराग्यानें समाधि लाविली होती, पण ती त्याला उतरता न आल्यामुळे तो प्रेतरूप पडला असून देहाजवळ दरबारचा खडा पाहरा होता राणासाहेबांच्या इच्छेनुरूप नाथांनी त्या बैराग्यासमोर समाधि लावून त्याची समाधि उतरविली, आणि राणाजी फार मोठी बिदागी देऊं लागले तेव्हां तिचा निरिच्छपणें त्याग करून ती सर्व त्या बैराग्याला देवविली राजधानीत नाथांची पुष्कळ कीर्तनें झाली, त्यांतील बहुतेक कविता नाथानीं हिंदुस्थानी भाषेत रचून म्हटली होती. राणाजींनीं सप्रेम निरोप दिल्यावर नाथ काशीला गेले. बैरागी शेवटपर्यंत सेवेंत राहिला. जाण्याच्या अगोदर राणाजींनीं नाथांना सुचविलें की, आपले पूर्वजन्मवृत्त काय होतें हें समाधि लावून जाणण्याकरितां आपण या बैराग्याला सांगितलें होतें, पण आपला हेत तसाच अपूर्ण राहिला, तेव्हा नाथांनीं राणाजीकडून समाधि लाववून त्या समाधिस्थितीत त्यांना त्यांचें सर्व वृत्त कळविलें, आणि त्या पुण्यश्लोक हिंदूपदपादशाहाचे सर्व मनोरथ पूर्ण केले. [दाजीसाहेब देशपांडे यांजकडील माहिती ]

---

## नरखेडचें लंकादहन.

७०. नागपूर जिल्ह्यांत काटोल तहशिलींत नरखेड गाव आहे, तेथील राममंदिरांत नाथांचें कीर्तन चालू असतां लोकांनीं लंकादहनाचें कीर्तन ऐकण्याचा आग्रह धरिला नाथ कीर्तनात आख्यान कधीही लावीत नसत, फक्त निरूपण करीत, पण लोकाग्रह जबर पडला, आणि आख्यान लागलें मारुतीचें लांगूल राक्षसांनीं पेटविलें असतां त्यानें सर्वत्र कशी आग लावली याचे वर्णन नाथांनी करण्याला व बाहेर आग लावण्याला एक वेळ आली. नाथांनीं अगोदर बजाविलें होतें की, कीर्तनातून कोणी उठून बाहेर गेलें न पाहिजे, त्याप्रमाणें भाविक होते ते घरदाराची पर्वा न करतां शेवटपर्यंत बसले, आणि

अर्धेकच्चे होते ते बाहेर धांवले. चमत्कार असा झाला कीं, जे बसून राहिले त्यांच्या घराकडे अग्निप्रसाद न वळतां जे बाहेर पडले त्यांचीं घरें मात्र पेटूं लागलीं नाथाना मर्जीविरुद्ध कोणतीही गोष्ट करावयाला लावली तर परिणाम वाईट होई, आणि त्यांच्यावर ज्याची शेवटपर्यंत निष्ठा राहील त्याचें निःसंशय कल्याण होत असे [ दाजीसाहेब देशपांडे यांजकडील माहिती. ]

## शेखडल्लाला गोटेमार.

७१. नाथाच्या वेळी वऱ्हाडात शेख डल्लाँ नावाचा प्रसिद्ध डाकेखोर होता. " उप्पर अल्ला, और नीचे मैं शेख डल्ला " असें तो उघड म्हणे अजनगांव

---

१ इंग्रजसरकार, निजामसरकार व रयत या सर्वांना शेख डल्लाची पीडा होती. इ स १८०४ सालीं इंग्रजसरकारचा व हैदराबादकरांचा तह झाला तेव्हांपासून वऱ्हाडमध्यें मोठी लढाई अशी झाली नव्हती, पण लहानसहान पुंडपाळेगार फार बळावले खुद्द निजामशाहींत गोदावरीतीरापासून हैदराबादपर्यंत धुमाकूळ माजला होता. देशमुखांच्या शिंदखेडचा मुलूख तर चोरांचें माहेरघर बनला होता जनरल वेल्स्लीनीं १८०३ मध्यें लिहून टेविलें होतें कीं, या मुलुखांत सरकार असें कोणी दिसतच नाहीं. ह्या सालीं पेंढाऱ्यांनीं वाशीं, टाकळी, अडगांव वगैरे गांवें लुटलीं होतीं. १८०९ सालीं इलिचपुर लुटण्याचा त्यांनी यत्न केला, पण तो विफळ झाला आदल्यासालीं पातूरची राखरांगोळी डाकूंनीं केली. १८१३ सालीं फत्तेखर्डा परगणा लुटला गेला. १८१८ सालीं सवाई बाजीराव पेशवे आणि कर्नल आडाम्स यांची यवतमहाल जिल्ह्यांत पांढरकवडा येथें मोठी लढाई झाली, आणि तेव्हां शिपायगिरींत शिरलले कांहीं लोक डाकू बनले. पण सर्वांत जास्त उपद्रव मेळघाट प्रांतात होता. कारण १८०४ च्या तहानें मेळघाटचे परगणे पेशवेसरकारकडे दिले गेले होते, आणि ते राजधानीपासून दूर असल्यामुळे येथें टीक बंदोबस्त होईना शेख डल्ला व त्याचे साथी यांनीं १८१४ पासून उपद्रव द्यावयाला सुरुवात केली. १८१६ मध्यें पेशव्यांनी त्यांजवर फौज पाठवून त्यांचा मोड केला, पण ते पुन्हां बळावले, आणि उत्तर हिंदुस्थानचे पेंढारी व नागपूरचे राजे अप्पासाहेब भोंसले या दोघांनाही त्यांनीं फार मदत केली. अखेरीस बराच उपद्रव देणें झाल्यावर १८२० सालीं ( म्हणजे देवनाथ समाप्त झाले त्या सालीं ) एका शिखानें डल्लाचा मेळघाटांत खून केला, आणि त्या डोंगरपट्टीची गडबड बंद झाली. हा वृत्तांत वऱ्हाड ग्याझेटीयरमध्ये पहावा. यावरून देवनाथांची व शेखडल्लाची गांठ त्यांच्या आयुष्याच्या शेवटल्या पांचसहा वर्षांत पडली असेल असें वाटतें

प्रांतांतील लोक उमाजी नायकाप्रमाणें याचाही फार मोठा पोवाडा म्हणून दाखवितात हाताखाली पन्नासेपाऊणशें लोक बाळगावे, यात्रेकरू लोक व लग्नाच्या वराती यांना लुटावें, सदोदित हत्यारबंद व्हावें, हा त्याचा नित्यक्रम वान नदीच्या कांठीं वानखेडें गाव आहे, तेथें एकदां त्याची व नाथांची गांठ पडली नाथाजवळ पधरावीस माणूस होतें सर्वांनीं नदीच्या कांठीं स्वयंपाक पाणी करून विश्रांति घेत असता, डह्या आपल्या टोळीसहवर्तमान कोणी श्रीमत शिकार सांपडली आहे असें समजून त्यांना लुटण्याकरिता आला इतक्यात शेंकडों वानरांनी त्याच्या लोकांवर दगडगोट्यांचा मार केला, आणि एक दगड त्याच्या छातींत लागून तो मूर्च्छा येऊन पडला सावध होतांच त्यानें आपले लोक दूर केले, आणि एकटा नाथासमोर येऊन त्यांना शरण गेला, आणि त्यानें पुष्कळशा मोहरा त्याच्या समोर नजराणा म्हणून ठेवला नाथांनीं त्या सर्व परत केल्या, आणि तूं स्वकष्टार्जित द्रव्य सपादावयाला लाग म्हणजे आम्ही त्याचा स्वीकार करू असें सांगून त्यांनीं त्याला वाटेला लावलें (दाजीसाहेब देशपांडे यांजकडील माहिती) नाथाना वनचर लोकांचें दैवी साहाय्य उत्कृष्ट प्रकारचें होतेंच, पण खुद्द त्याची मडळी गोफणगुंडा, निशाणबाजी, दांडपट्टा वगैरे मर्दानी पेशांत त्याच्या देखरेखीखालीं तरबेज झालेली होती हें विसरतां कामा नये नाथ जाणत होते कीं, आपल्या बचावाला आपण सिद्ध असल्याखेरीज ईश्वर उगीच धांवून येत नाहीं कारण एरवी ब्रह्मज्ञानाची कसोटी ती काय राहिली ! पेंढाराचा चोहोंकडे सुळसुळाट झालेल्या व बेबंदशाही माजलेल्या त्या काळांत स्वतःच्या पगडीच्या बचावाकरितां दोन हात करण्याचें अगर दोन शिव्या देण्याचें ज्याला सामर्थ्य नसतें तो रावपणाच्याही लायक न राहता सतपणाच्या कल्पना तर दूरच राहिल्या आत्मरक्षणार्थ नाथ स्वतः सदोदित जागे असत, म्हणून ईश्वरही त्याच्या पाठीमागें नेहमीं उभा असे.

---

## मलकापूर-बोदवडचा मोहरम.

**७२.** या गांवी मोहरमाच्या वेळीं, निळकंठराव देशपांड्यांचे वडील होते, त्यांजकडे नाथ उतरले असतां मोहरममध्यें एकादशीच्या दिवशीं नाथांचें कीर्तन झालें. तेव्हां कीर्तनांतील टाळवीणामृदंगांचा आवाज बंद करण्याकरितां

मुसलमानांनी चारी बाजूंनी इमारत वेढली¹, आणि शेसवाशें हत्यारबंद लोक जबरीनें आंत शिरावयाला लागले इतक्यांत अकस्मात् पुष्कळशी वानरफौज आतून बाहेर येऊन तिनें हल्ला करणाऱ्यांना पिटाळून लाविलें, पुष्कळांना जखमी केलें आणि सर्वांची दाणादाण केली आंतल्या लोकांना या गोष्टीचा शेवटपर्यंत सुगावा देखील लागला नाहीं दुसऱ्या दिवशीं तेथील काजीनें नाथाची माफी मागितली व आपल्या लोकाकडून त्याच्यापुढें तोबा करविला पुढें शनिवारीं नाथ सांप्रदायपद्धतिनुरूप भिक्षेस निघाले असतां वरो-

१ निजामाच्या अमलाखालीं वऱ्हाडांत हिंदुमुसलमानांची भांडणें सदोदित चालू असत, आणि पुढें हा मुलूख इंग्रजी अमलाखालीं येईपर्यंत या भांडणांचा प्रकार कायमच होता या सर्व भांडणांतून मलकापुरचें नांव फार पुढें येतें वर दिलेली हकीकतही १८१० —१८२० इसवीमधील असावी १८२० इसवीमध्यें नाथ वारले १८२२ पासून १८४१ पर्यंत हैदराबादची सूत्रें राजा चंदूलाल यांच्या हातीं होतीं. अर्थातच त्या वेळीं हिंदुमुसलमानांपैकीं एकाचाच जोरदार पक्ष रहाणें शक्य नव्हतें. हिंदूंचा प्रधान म्हणून त्यांना कांहीं सवलती होत्या, आणि मुसलमानांचा नबाब म्हणून त्यांना कांहीं जोर होता दोघेही वाटेल तितके भांडत, निजामदरबार वऱ्हाडचा मक्ता लावून काढी, आणि मक्तेदार लोकांना पिळीत देशमुख, देशपांडे आपल्या वतनदारी हक्कांकरितां भांडत, आणि रजपूतमुसलमानांचीं युद्धें हमेशा चालत ग्याझेटीयरकर्ते ( १८७० सर चार्लस लॉयल ) लिहितात कीं, शहरोशहरांतून रजपूत–मुसलमानांचीं आपसांतून युद्धें चालत आकोटमध्यें एकदां अशाच मारामाऱ्या गल्लोगल्लींतून झाल्या होत्या, आणि १८४० इसवीमध्यें मलकापुरला रजपुतांनीं लुटलें व जाळून टाकलें. १८३७ सालीं एका रजपुतानें एका मुसलमानाचा पिंपळगांवच्या यात्रेंत अपमान केला, त्यावरून मुसलमानानें त्याला ठार मारलें. रजपुतांनीं या गोष्टीचा दंश राखिला, आणि पुढें बारा वर्षांनी दत्ताळें गांवच्या लालसिंग रजपुतानें या खुनाचा सूड उगविण्याकरितां तीन हजार हत्यारबंद हिंदु जमा केले, आणि नांदेडहून पांचशें शीख त्यांच्या कुमकेला आले पातुरकर मुसलमानांनां ही खबर अगोदर पोंचली, आणि त्यांनीं मलकापुरच्या मुसलमानांना गुप्त इशारा पाठविला पहिल्यानें शीख व रजपुतांनीं मिळून मलकापुरच्या मुसलमानांचा पराजय केला, शहर जळून ओसाड पाडलें, इतक्यांत बऱ्हाणपुरच्या मुसलमानांची कुमक मलकापुरकरांना आली, आणि पुन्हा युद्धें सुरू झालीं पोलीस आणि तालुकदाराची फौज यांच्यानें दंगा मिटेना, तेव्हां मेजर आर्थर वुडहॅम हे हैदराबादकरांची फौज घेऊन आले, आणि त्यांनीं रजपुतांना पिटाळून लावून पुन्हां स्थीरस्थावर केलें लालसिंग १८७० सालपावेतों जिवंत होता इतक्या पुडपाळेगारीतून वांचून मुलुखाला आतां सर्वत्र शांतता मिळाली आहे, आणि सरकारच्या सद्दीमुळें झालेल्या या शांततेचा सर्व लोक अखंड उपभोग घेत आहेत यामुळें देवनाथांवर आलेला प्रसंग कोणाला दंतकथा अशी वाटेल, पण आम्हीं दिलेलो इतिहासाची साक्ष येथें ततोतंत पटते.

वर भजनी दिंड्या टाळवीणामृदंगभेरींच्या गर्जनेनें भजन करीत चालल्या होत्या, पण नाथांचा प्रताप माहीत झाल्यामुळें त्यांना कोणींच हरकत केली नाहीं, आणि तेव्हांपासून त्यांच्या यशाचा बोलबोला चोहोंकडे सारखा वाढतच गेला ( दाजीसाहेब देशपांडे यांजकडील माहिती ) मोंगल पादशाही मोडली आणि पेशवाईचेही तुकडे व्हावयाला लागले निजाम, भोंसले यांच्या साठमारिशी अमलांत वऱ्हाडला एकछत्री सत्ताधीश असा कोणीच नव्हता इंग्रज सरकारचा भाग्यसूर्य अद्याप क्षितिजाच्या फारसा वर आला नव्हता, पेंढार चोहोंकडे माजलें होतें, अशा या काळांत ज्याला वाटेल त्यानें वाटेल ती गडबड करावी अशी स्थिति होती. हीं जीं बाह्यांवरून भांडणं होत ही केवळ गावकुटारांचींच असत, याचा पत्ता सरकारपर्यंत भांडणें विझल्यावर मात्र पोंचे, आणि सगळेच हत्यारबंद पण कोणीच शिपाई नाहीं अशी स्थिति असल्यामुळें या क्षुल्लक भांडणांपासून देशस्थितीला तिळमात्र अपाय होत नसे या वेळच्या लष्करी चळवळी अथवा सामाजिक धामधुमी ह्या झोंपीं गेलेल्या समाजाचे आळेपिळे होते, याहून जास्त त्यांची किंमत नव्हती समाज शिथिल होता, आणि लोकांना शंभर वर्षांची अगर त्याहून जास्त चिरस्थायी शांतता व सौख्य देण्याकरितां टाकलेलें ईश्वराचें मोहनास्त्र आपलें काम हळू हळू करावयाला लागलें होतें नाथ बरोबर लोक बाळगून जगदुद्धार करावयाला हिंडूं लागल्यावर आणि त्यांचें वजन चोहोंकडे बसल्यावर, किंबहुना दयाळनाथांचाही जम चोहोंकडे बसून सुरजीच्या मठांत त्यांचें अधिष्ठान पक्कें झाल्यावर मगचीं ही गोष्ट असावी हें निर्विवाद आहे

---

## मर्कटांकडून प्रायश्चित्त.

७२ ' अघाडी चले रामराजा। पिछाडी बंदरके फौजा ' ही प्रत्येक लोकमान्य पुढाऱ्याची वैभवसपत्ति असते, आणि ही महाराष्ट्रयुगांतला रामराजा समर्थ रामदासस्वामी यानें आपल्या सर्वज्ञ वाणीनें बिनचूक वर्णिलेली आहे भगवताचें कृपाछत्र ज्या ज्या माणसावर असतें त्याच्या रक्षणाची व लौकिकवर्धनाची इच्छा धरून अनेक माणसें सहजस्फूर्तीनें पुढें येतात. भिक्षुकांना माकडांनीं मारल्याची पुढील गोष्ट दाजीसाहेबांनीं कळविली आहे

ती दैवी चमत्काराची नसून मानवी लीलेची आहे असें आम्हांला वाटतें दाजीसाहेब लिहितात कीं, "नाथ एकदां एका गांवांत कीर्तनें करीत असतां तेथील कोणी दुराचारी बहिष्कृत ब्राह्मण अकस्मात् मृत्यु पावला. त्याचा प्रेतसंस्कार आपण करावयाचा नाहीं, इतर जातीकडून करावयाचा, असा तेथील ब्राह्मणांनीं निश्चय केला. तेव्हां नाथानीं अनाथकार्य समजून स्वतः त्याचें दहन केलें तेव्हां तेथील विप्रवृंदानें नाथांना बहिष्कृत करावें असें ठरविलें, आणि उघड कोणी त्यांजपुढें कबूल करीना, तथापि त्याच्याकडे जाणें मात्र सर्वांचें बंद झालें तपासाअंतीं नाथाना सरें कारण समजलें तेव्हां त्यांनीं आपण होऊन प्रायश्चित्त घेण्याचें कबूल केलें, आणि मडळींतील एक ब्राह्मण प्रायश्चित्तविधीकरितां निवडला गेला सकाळीं त्याला बोलावणें गेलें असता भटजी कण्हत पडलेले दिसले, आणि त्यानीं सांगितलें कीं, नाथांना नुसता प्रायश्चित्त देण्याचा विचार केल्याबरोबर रात्रीं एका हनुमानबांधवानें येऊन मला पुष्कळसें बडविलें आतां मी जर खरोखर त्यांना प्रायश्चित्त देईन तर माझा प्राणच जाईल नाथ शुद्ध आणि पूत आहेत. त्यांना प्रायश्चित्ताचें कारणच नाहीं नाथांनीं हें ऐकतांच ते ब्राह्मणाला जाऊन भेटले. आणि त्यांनीं त्याचें शांतवन केलें." या गोष्टीचें मूळ शुद्ध नाथांना शेवटपर्यंत ठाऊकही नसेल, पण आह्मी ही निव्वळ मानवी लीला समजतों. कारण नाथांचा अधिकार व जगदुपकृति हीं एवढ्या थोर दर्जाचीं होतीं कीं त्यांच्या अपमानाचा मोबदला घ्यावयाला गांवांतील कोणाही सहृदय सशक्त मनुष्याला स्वयंस्फूर्तीनें प्रेरणा झाली असती, मग नाथांचें उपास्यदैवत मारुति याच्या अनुयायांना अशी स्फूर्ति व्हावी यांत नवल नाहीं.

७४ याप्रमाणें नाथांचे बारा लोकविश्रुत चमत्कार आह्मी दिले. यांतील एक दोन काव्यसंग्रहांत आले होते. बाकीचे पाऊणशें वर्षांच्या वृद्ध दाजीसाहेब देशपांड्यांनीं आमच्या विनंतीला मान देऊन प्रवादस्थितींतून लेखस्थितींत आणले हे त्यांचे फार उपकार आहेत. वऱ्हाडांत व इतर सर्व ठिकाणीं विद्वानांचें संरक्षण जमीदारांनीं केलें, व पुढेही ईश्वरी इच्छा असल्यास करतील. विद्येचें पुनरुज्जीवन आणि प्रगति हें अमृतफळ त्यापासून निःसंशय उपजेल अशी आमची पूर्ण खात्री आहे.

# नाथांचें स्वभाववर्णन.

७५ नाथांच्या अलौकिक दंतकथा मागें दिल्या. व्यवहारानुसार चौघां-बरोबरींच्या लोकांच्या गाठी पडत, तेव्हांच्या त्यांच्या परंपरास्मृतींच्या कथा लिहिल्या आतां त्यांच्या स्वभाववर्णनाच्या ज्या गोष्टी उपलब्ध आहेत त्या लिहितों राव व संत अशा मिश्रणाचें नाथपण नाथांच्या अंगीं होतें हें मागें लिहिलें आहेच एकनाथ हे पूर्णसंत होते, व पोटच्या हरिशास्त्रीपासून तहत् स्नान केल्याबरोबर अंगावर थुंकणाऱ्या विश्वामित्रावतारी यवनापर्यंत त्यांच्या अखंड सत्वशीलतेनें सर्वांना जिंकलें, आणि पूर्ववयात त्यांची तपश्चर्या व त्यांची समरधीरता तशाच श्रेष्ठप्रतीची होती हें त्यांच्या चरित्रावरून दिसतें समर्थ रामदास हे पूर्ण संत व पूर्ण राव होते ' समर्थाचिया सेवका वक्र पाहे। असा सर्व भूमंडळीं कोण आहे ' ही ज्याची निष्ठा होती, रोजचा प्रपंच दुःखमय असला तरी ईश्वरनामाची साखर घालून त्याचा कडूपणा घालवावा कसा हीच ज्याची मुख्य शिकवणी; " येथें कां रे उभा रामा, मनमोहना मेघश्यामा। काय केली शरयूगंगा, येथें वाहे चंद्रभागा," इतकें विठोबाला पंढरींत म्हणण्या-इतकी ज्या निर्गुणोपदेशकाची सगुणरामरूपीं वृत्ति रंगलेली, त्या ब्रह्म-निष्ठाला ' हा धकाधकीचा मामला। कैसा चालवे ' अशकाला ' इतकें पूर्ण बाणण्यापुरतें रावपण कायम होतें एकनाथांचे आजे भानुदास यांनीं कृष्ण-मुरलीला ' कोण्या गं श्रीमंताचें वेणूवाजे ' म्हणून आळविलें होतें, त्याप्रमाणें महाराष्ट्रसरस्वतीचें नाथ हें श्रीमंत लेंकरूं असून त्यांच्या वेणुरवानें सर्व लोक सप्रेम तल्लीन होत, तर समर्थ व बाबानानक यांच्या वाणीनें लोक संसार-दुःखें विसरून आणि ईशचरणीं मनोमय करून परमार्थक्षम होत. देवनाथ हे राव व संत यांचे तत्कालानुरूप श्रेष्ठ प्रतिनिधि होते, व ते एकनाथ किंवा समर्थ यांच्या शिष्यत्वाला पूर्ण पात्र होते त्यांच्यांत रावगुण व संतगुण दोन्ही होते, पैकीं रावगुणाचें भासलें देतों.

पहिला गुण त्यांचा मनमिळाऊपणा व लोकसंग्रह. संबंधाच्या लोकांना खुष कसें ठेवावयाचें, त्यांच्या दोषांवर पांघरूण घालून त्यांतच आनंद कसा माना-वयाचा व दहाजणांचें मन आपल्याकडे कसें वेधावयाचें, ही कला ते पूर्ण

जाणत त्यांच्या विनोदीपणानें कोणाचें मन दुखविलें न जातां ज्यावर त्यांचा हल्ला होईल तोही खुष व्हावा ही खुबी असे

## गोपाळजीचा धांवा

७६. या **विनोदीपणा**ची मुख्य गोष्ट आमच्या संग्रहांतील गोपाळजीचा धावा या पदाची आहे नाथांच्या बरोबर गोपाळजी नांवाचा पखवाजवाला होता गृहस्थ अति गुणी, पण अफिमी डबी हातीं सांपडल्यावर, मग प्रत्यक्ष भगवंतानें मोक्षठेवा पुढें आणला तरी दूर सारावयाचा अशी वृत्ति. यामुळें कीर्तनाच्या वेळीं डबी त्याच्या हातीं लागू देऊं नये अशी नाथ फार खबरदारी घेत असत. एकदां नाथ कीर्तनाला उभे राहिले असतां स्वारी रंगली, आणि सर्व वृत्ती अफीममय झाल्या. नाथांनी लागलीच खालील पद म्हणावयाला सुरुवात केलीः--

माझी तुला काळजी । सांवळ्या ! येई तूं गोपाळजी ! ॥ ध्रु० ॥
बहुत त्रासलों मी संसारीं । म्हणउनि तुझिये द्वारिं ॥
शरण आलों रे मी कसारी । भवपुरीं मजला तारीं ॥
माझें मन तुझिये पदिं राजी ॥ माझी० ॥ १ ॥
मी तों अपराधाची खरि रासी । क्षमानिधी तूं होसी ॥
बा रे क्षमा करीं अन्यायासी । धरीं मला हृदयासी ॥
ठेवीं अखंडित पदसरोजीं । माझी० ॥ २ ॥
आहें अपराधी मी परि तुझा । अभिमान तुज माझा ॥
गजें पावन पाई त्रिदवोजा । गडिया केशवराजा ॥
वेगीं येईं, न लावीं लव पळ जी ॥ माझी० ॥ ३ ॥
आतां आटापी दुस्तर माया । विनवीं पंढरीराया ॥
धांवें वेगीं करुणा ऐकोनियां । दिसोंदिस हे काया ॥
झिजते, त्यावयास काळ टपला जी ॥ माझी० ॥ ४ ॥
नेणें भक्ति कांहीं ज्ञानकळा । अज्ञानाचा पुतळा ॥
परि मम भाग्य आलें एक फळा । दास तुझा गोपाळा ॥
जन्मुनियां जगीं ह्मणविलों जी ॥ माझी० ॥ ५ ॥

धनांधाचे द्वारीं बहु आर्ता । वृत्ति उबगली फिरतां ॥
धांवें ये तनु हे व्याधिग्रस्ता । लवकरी करिं बा ! चिंता ॥
स्मरसिल काय तनू हे काळजी ॥ माझी० ॥ ६ ॥
भीमातटवासा गुरुगोविंदा । देवनाथपदवरदा ॥
आतां किमपी न करीं वायदा । सत्वर परमानंदा ॥
धांवें ये भेटें चंव बाहें जी ॥ माझी० ॥ ७ ॥

पद अति उत्तम रंगलेलें, आणि सर्व श्रोते तल्लीन झाले नाथांनीं गोपाळजीची दुसऱ्या दिवशीं थट्टा केली कीं, गोपाळकृष्णाला आळवावें लागतें त्यापेक्षां तुम्हीं विनवणी जास्त करावी लागते पुन्हां त्रास देऊं नको गोपाळजी लाजिल झाले, व फिरून कधीं सेवेंत अतरले नाहींत, अशी गोष्ट सांगतात. ही खरी असल्यास शीघ्रकवित्व आणि विनोद या दोहोंची साक्ष पटविते; आणि नसली तरी विनोदीपणा दाखविते कारण अगांत एवढा विनोद असल्यावांचून अशी गोष्ट कोणी शिष्य रचिताना आणि ती आजपर्यंत लोकांत प्रचलित न राहती.

७७. विनोद हें लोकसंग्रहाचें अंग आहे, तरी नुसत्या विनोदावर लोकसंग्रह होत नाहीं विनोदाबरोबर श्रेष्ठप्रभुत्व आणि स्वपक्षपालकत्व असेल तरच लोकसंग्रह होतो हा **स्वजनपालनाचा गुण जगू-गणूची गोष्ट** उत्तम रीतीनें व्यक्त करिते नाथ अकोटाकडे फिरावयाला गेले तेव्हां जगू व गणू या दोन शूद्र शिष्यांना त्यांनीं मठ सांभाळावयाला ठेविलें होतें एकदां चोरांनीं मठावर दरवडा घातला, आणि हे दोघे फार शौर्यानें लढून मरणोन्मुख झाले लोकांचें धांवणें येऊन चोर पकडले गेले, त्यांना शिक्षा झाल्या, आणि नाथही तत्काळ दाखल झाले. आल्याबरोबर त्यांनीं दोघांनाही कुरवाळलें, आणि ते वांचत नाहींत हें पाहून त्यांच्या इच्छा काय आहेत हें विचारिलें. आमचें कांहीं तरी नाव मागें रहावें अशी विनंति करून उभयतांनीं आपले प्राण सोडले; आणि नाथांनीं गुरुपुण्यतिथीच्या वेळीं यांच्या नांवचे दोन सजातीय जेवू घालण्याचा क्रम पाडला, तो अजून चालू आहे. त्यांच्या आश्रितांची तरतूद लाविली असेल हें सांगणें नकोच.

# बडोद्याचे दोन ब्राह्मण.

७८ नाथांच्या संग्रहीं आले, त्यांचाही नाथांनीं असाच प्रतिपाळ केला. नाथ पहिल्यानें प्रवासाला निघाले तेव्हां बडोद्याकडे त्यांचा मुक्काम झाला होता, आणि दानांबुपर्णाशनावर उदरपूर्ति होत होती. इतक्यांत चार अनाथ भणंग ब्राह्मण तेथें आले, आणि यांचें तेज पाहून यांची सेवा करण्याचा मनोदय त्यांनीं कळविला. चार दिवस नाथांबरोबर निराहार काढतांच त्यांचीं गात्रें विकल होऊन मरणोन्मुख स्थिति आली. तेव्हां नाथ त्यांच्याकरितां भिक्षेला बाहेर पडले. भिक्षेकऱ्याचें कोठेंही कठिण काम. कवित्वयाचनेकरितां बुद्धीची झोळी करून सरस्वती मातेकडे जावें तर तीदेखील काव्यशब्दांची भिक्षा घालावयाला कष्टी होते, मग शारीरिक कष्ट करून नवऱ्यानें चार शेर दाणे घरांत आणले असले तर त्या दरिद्र्याची कष्टाळू गृहिणी त्यांतली मूठभर भिक्षा घालते वेळीं कातावली तर तें क्षम्य आहे, पण तितकेंच अनुकंपनीय आहे. पुराणिकासारख्या विद्वानाच्या घरीं नाथांसारखे भिक्षेला गेलेले, पण घरांतल्या चंद्रमौळी स्थितीला कातावलेल्या कजाग गृहलक्ष्मीनें भिक्षादान न करतां गालिदान सुरू केलें. नाथांना अशा तोफखान्याचा हा पहिलाच प्रसंग असावा, पण त्यांनीं भिक्षेवांचून जावयाचें नाहीं असा निश्चय केला, आणि भिक्षेवरच पद म्हणावयाला सुरुवात केली. हें पद आम्हांला अलीकडे उपलब्ध झालें आहे. तें असें:—

जळो मागत्याचें जिणें । धिग् धिग् हें लाजिरवाणें ॥ ध्रु० ॥
जो कीं ब्रह्मज्ञानी योगी । फिरतो वासनेच्या संगीं ।
सुख नाहीं अंतरंगीं । आंगीं क्रोधाचें ठाणें ॥ १ ॥

धरुनी वासना अंतरीं । भिक्षा मागूं जातां द्वारीं ।
त्रिविध जन हे नानापरी । ताडिताती वाग्बाणें ॥ २ ॥

धरुनी वासनेचा बंड । द्वारीं दिसतो जैसा लंड ।
कामना न पुरे उदंड । दुःखित होतो निजमनें ॥ ३ ॥

कोणी म्हणती धष्टपुष्ट । कोणी म्हणती आळशी नष्ट ।
कोणी म्हणती न करी कष्ट । रोजगार होईना याच्यानें ॥ ४ ॥

शेवीं प्रपंच ना परमार्थ । दोहीं पक्षीं बुडाला स्वार्थ ।
वदला वाणी देवनाथ । याहुनि बरवें हें मरणें ॥ ५ ॥

बाईनें जितकें तोंड सोडावें, तितकें नाथांनीं एकेक कडवें जास्त म्हणावें. इतक्यांत पुराणिकबोवा बाहेरून आले, त्यांनीं कुटुंबाला रागें भरून भिक्षा घालवली, आणि नाथांची क्षमा मागितली आणखी दोन घरें भिक्षा मागितली, पण तेथें अशीच दशा. तेव्हां नाथ परत आले, आणि गणपतीपुढें धरणें घेऊन बसले त्या कठीं प्राण आलेल्या ब्राह्मणांना नाथ तलवार उपसून गणपतीवर धांवले व गणपती दोन पावलें भिऊन माघारा सरला असा भास झाला! कांहीं वेळानें एका गृहस्थानें गणपतीपुढें कांहीं अर्चाद्रव्य ठेविलें, तें घेऊन नाथांनीं त्या ब्राह्मणांना भोजन घातलें चौघांनींही नाथांचे पाय सोडावयाचे नाहींत असा निश्चय आमरणांत पाळला त्यांपैकीं एकजण गवई झाला, एक मृदंगपटु बनला, दोघे लेखक झाले. ते कीर्तनसमयीं दौतलेखणी घेऊन बसत व नाथांच्या मुखांतुन तात्कालिक स्फूर्तीनें जें निघेल तें टिपून घेत, व फावल्या वेळीं उभयतांचीं टिपणें ताडून पाहून त्यावरून कवितेची शुद्ध प्रत तयार होत असे आमच्या संग्रहांतील ' नारायण नारायण जयजय हरिनारायण ' वगैरे पदें अशाच शीघ्रकवित्वाच्या मासल्याचीं आहेत असें वाटतें.

---

## गौळणीची धुळवड.

७९. समाजांत नेहमीं मिळूनमिसळून प्रेमानें वागावयाचें, हा नाथांचा प्रेमळपणा पहिल्यापासून शेवटपर्यंत कायम राहिला होता. सुरजी मठाची चोहोंकडे मान्यता होऊन नाथांचें वैभव वाढलें होतें, तरी जुन्या सवंगड्यांच्या शब्दाला ते नेहमीं मान देत जरी संसारी जनांपासून त्यांना सदोदित पृथकत्वानें वागावें लागे, तरी ते सांसारिक जनांची किंमत जाणत असत व त्यांना योग्य मान देत. एकदा सर्वांनीं त्यांना शिमग्याच्या धुळवडीला यावयाला आग्रह केला, आणि सर्वजण लहानथोर भाव विसरून एकमेकांना उखाणे घालूं लागले, त्यांत नाथांनीं तेथील भागीरथी गवळिणीच्या नांवाचा उखाणा घातला. बाईनें रागानें दह्यादुधाचें मडकें नाथांच्या डोक्यावर फोडलें, तेव्हां नाथ संतुष्ट

झाले, आणि त्यांनी बाईला आशीर्वाद दिला त्या दिवसापासून बाईची वृत्ति सन्मार्गाकडे लागली, आणि ती फार शांत, सुविचारी व ज्ञानी झाली पुढें तिनें नाथांचा मंत्र घेऊन ती नित्य नाथांच्या दर्शनाला येत असे

८०. नाथानीं आपले लंगोटीमित्र खुशालरावबाबा देशपांडे यांचें प्रेम असेंच अखंड कायम ठेविलें होतें, व उभयता एकमेकांवर किती बहुमान करीत याची आठवण सुरजीकडील लोक अजून काढतात नाथ शेवटल्या प्रवासाला निघाले तेव्हां त्यांनीं **सुरजीकरांना निरोप** पाठविला

**पद**

रमते नाथ फकीर । कुइ दिन याद करोगे ॥ धु० ॥

कुइ दिन ओढे शाल दुशाला । कुइ दिन भगवें चीर ॥ कुइ० ॥ १ ॥
कुइ दिन खावे मेवा मिठाई । कुइ दिन पीवे नीर ॥ कुइ ० ॥ २ ॥
कुइ दिन हाथी कुइ दिन घोडा । कुइ दिन पाव जंजीर ॥ कुइ० ॥ ३ ॥
कुइ दिन बस्ती कुइ दिन जंगल । कुइ दिन मुइपेशीर ॥ कुइ० ॥ ४ ॥
कुइ दिन महलोंम्याने सोते । कुइ दिन गंगातीर ॥ कुइ० ॥ ५ ॥
तुम अहो खुशाला रहो खुष हाला । फिर न मिले ये शरीर ॥कुइ०॥६॥
देवनाथ प्रभुनाथ गोविंदा । तूं है सच्चा पिर ॥ कुइ दिन० ॥ ७ ॥

हा निरोप गेला तेव्हां ही साधूच्या नित्यक्रमाची गोष्ट आहे असें सर्वांना वाटलें, पण पुढें ते ग्वाल्हेरला समाप्त झाल्याची वार्ता ऐकून सर्वांना अति खेद झाला, 'फिर न मिले ये शरीर' हे शब्द त्यांनीं स्वतःच्या ताटातुटीबद्दल सुचविले होते असें सर्वांना वाटलें, आणि अशा महात्म्याच्या सहवासाचा जास्त फायदा आपण घेतला नाहीं याची त्यांना अति हळहळ झाली नाथांचा लोकसंग्रह असा अजब होता

८१ या लोकनायकत्वाला लागणारा जो मनमिळाऊपणा पाहिजे असतो तो नाथांच्या ठिकाणीं इतका वास करीत होता कीं, ते जेथें जात तेथें मोठमोठे लोक त्यांच्या फकिरीवृत्तीला सहन करूनही त्यांच्यावर लुब्ध असत. खुशालरावबाबाप्रमाणेंच नवाब सलाबतखान एलिचपूरकर यांचें देवनाथांवर प्रेम होतें १८०३ सालीं जनरल वेलस्लीला कुमक करण्याकरिता निजामानें राजा महिपतराम याला मोठी फौज देऊन पाठविलें होतें, आणि युद्ध आटपल्यावर त्यालाच वऱ्हाडचा सुभा नेमिलें, पण तो आपल्या मालकावर उठला,

आणि शेवटीं होळकराकडे पळून गेला असतां तिकडेच त्याचा खून झाला त्याच्या जागीं निजामानें राजा गोविंदबक्ष याला वऱ्हाड व औरंगाबाद या दोन सुभ्यांच्या कामावर नेमिलें. एलिचपूर शहर व आजूबाजूचे परगणे यांचा कारभार नबाब सलाबतजंग करीत असे. सलाबतचे वडील इस्मायलखान हे हैदराबादच्या रिसाल्यांत मोठ्या हुद्यावर होते त्यांची नेमणूक एलिचपूरच्या सुभ्यावर झाली असता त्यानीं हुजूरविरुद्ध बंड केलें, आणि त्या गर्दीत स्वतः मारले गेले हुजूरनीं गुन्हा मनांत न आणतां, व शिपाईगिरीवर मेहेरनजर करून, सुभायतीचें काम इस्मायलखानचे चिरंजीव सलाबतखान यांजकडे चालविलें, आणि १८०३ सालीं या खानांनीं जी मदत दिली त्याचें वर्णन जनरल वेलस्लीनीं सरकारकडे केलेल्या सुनावणींत योग्य रीतीनें दर्ज केलें आहे १८१७ सालीं यांनीं सरकारला पेंढाऱ्यांचा बीमोड करण्याच्या कामांत बरीच मदत केली १८१८ सालीं यांची सोळा लाखांची जहागीर होती, ती १८३२ सालीं यांच्या मुलाच्या वेळीं खालसा झाली सलाबतखान फार धोरणी व शूर पुरुष होता. रा दाजीसाहेब देशपांडे लिहितात कीं, " नाथ एलिच-पुरास त्याचे शिष्य रामराव काळी यांजकडे उतरत, व तेथें बरेच रहातही असत एके दिवशीं तेथील नबाब सलाबतखान हा कीर्तनाला आला. नाथांचे कीर्तनांतील सर्व नियम त्याला माहीतच होते तो आपले मर्यादेनेंच वागला. त्याला समजावें म्हणून नाथांनीं त्या दिवशीं उर्दू भाषेंत पद रचून त्यावर कीर्तन केलें 'बिना भगत भगवान भजन बिन कहू कैसे भवतरण' या पदावर कीर्तन झालें त्याला पुढें नाथांचें फार वेड लागलें होतें. तो दर्शनावांचून कधीं रहात नसे नाथांचा अनुग्रह व्हावा असें त्यानें नाथांना पर्यायानें सुचविलें, पण स्वधर्मपराङ्मुखतेचा मळ आपल्याला लागूं देऊं नये असें सांगून नाथांनीं त्याला परावृत्त केलें त्यानें दुसरें कीर्तन ऐकण्याची इच्छा दर्शविली तेव्हां नाथांनीं 'देख सुरत टक लागी नैनसो नैन भेदकर दिया' या पदावर कीर्तन केलें नाथांना त्यानें जातांना पुष्कळ नजराणा देऊन आपल्या भक्तीच्या बळावर त्यांजकडून त्याचा स्वीकार करविला त्याला धर्मविषयाचें वेड फार होतें, आणि सगळा कार-भार फत्तेजंग खानावर सोंपवून तो ईशसेवेंत काळ घालवी. त्यानें नाथांपासून-ही कांहीं उर्दूभाषेंत पदें रचून घेतलीं होतीं. अज्ञान लोक त्याला वेड लागलें असें म्हणत ' वरील अवतरणावरून नाथांचा मनमिळाऊपणा दिसतोच,

पण सलाबतखांचा प्रभुपणाही स्पष्ट दिसतो हरिदास, फकीर, मुल्ला, कथेकरी, शिपाई, कारकून, शेतकरी, जमीनदार, व्यापारी, सर्व प्रकारचे व पेशाचे लोक राजमुखाचें प्रसन्नदर्शन व्हावें म्हणून धडपडत असतात, आणि राजा आपल्यावर खुष आहे असे प्रत्येकाला वाटावयाला लावणें हेंच प्रभुत्वाचें मुख्य अंग असतें त्यानें नाथांचा थोरपणा जाणून त्यांचा गौरव केला हें त्याच्या थोरपणाला उचितच होतें याहून जास्त धार्मिकपणांत जर तो गुंग झाला असता तर त्याचें राज्य टिकणें कठिण होतें प्रत्येक सरदार दिसेल त्याचें आपलें भलेपण असावें हें जसें विद्वानाला वाटतें, तसेंच प्रत्येक लक्ष्मीपुत्राला प्रत्येक विद्वानाचा गौरव करावा असें वाटतें खान, चदूलाल, यांजसारख्या गुणग्राही लोकांकडे प्रत्येकाचें चीज व्हावयाचेंच नाथ गुणी होते, खान गुणज्ञ होता आपापल्या गादीला शोभेसे होते त्यांचा स्नेह मंगलप्रद पण बरोबरी-चाच होता असें आम्हांला वाटतें एवढी वशीकरण विद्या नाथांची जर थोराशीं चाले, तर गरिबावर त्याचे प्रेम किती असेल व ते नाथांकरितां कसे तुटून पडत असतील याचा विचार वाचकांनींच करावा शेख डल्लाची गोटे-मार, मर्कटाचें प्रायश्चित्त व मलकापूरचा मोहरम वगैरे पूर्वी येऊन गेलेलीं प्रकरणें या गुणांचींच सूचक असावीं असें कधीं कधीं आम्हांला वाटतें

८२ नाथांचा स्वभाव अति शांत आणि विवेकी असा जुने सवंगडी आणि बहुजनसमाज यांच्याशीं असे, पण पुराणिकबुवाच्या बायकोसारखें विचित्र माणूस मिळालें म्हणजे त्यांच्या विनोदाला हट्टाची जोड मिळे, आणि कधीं कधीं बरोबरीच्या लोकांनीं मत्सरानें अवहेलना केली किंवा स्मयदूषित प्रभु दुर्लक्ष करू लागले म्हणजे नाथांचा हट्टीपणा आणि आग्रहीपणा अमर्याद होई, आणि त्यांचा रावपणा प्रत्येकाला अनुभवे **राजा रघोजीची गोष्ट** नागपूरला अशीच घडली नाथांचें कीर्तन फार उत्तम होतें अशी सर्व सरदार, पंडितांच्या तोंडून कीर्ति ऐकून राजांना फार आनंद झाला, आणि त्यांच्या आग्रहावरून नाथ वाड्यात कीर्तनाला गेले कीर्तनांत हुक्का, चिलीम कोणीं ओढू नये असा सक्त नियम असतां कोणी हुजऱ्यानें राजांचा हुक्का भरसभेंत आणला, त्यावरून नाथांनीं त्यांची तेथल्या तेथेंच कानउघाडणी केली. ( रघुपतराव दाजीसाहेब देशपांडे यांजकडील माहिती ) आमच्या कटाव-संग्रहांतील श्रीमंतीच्या धुंदीचा एक कटाव याच प्रसंगाला अनुलक्षून आहे

असें कोणी म्हणतात, पण आम्हाला वाटतें कीं, प्रत्येक कवीनें लक्ष्मीपुत्रांवर भडिमार केला आहे त्या मासल्याचाच हा कटाव असावा.

८३ दुसरी गोष्ट **नरनाळ्याचे किल्लेदार दिवाकरभाऊ** यांची हा किल्ला आकोटाजवळ तीन कोसांवर आहे नाथ अकोटास भिक्षेला निघाले असतां, त्यांची दिंडी किल्लेदारांच्या आळींत आली, तेव्हां टाळकुट्यांच्या आवाजानें नित्यकर्माला त्रास होऊं नये, व बिदागीचा घोरही पडूं नये या-साठीं दिवाकरभाऊंनीं दरवाजा बंद करावयाला सांगितलें असाच बंद राहील असें नाथ उद्गारले, आणि परतले भाऊंच्या जवळील मंडळींनीं त्यांचा मानी-पणा दूर करून नाथाची माफी मागावयाला मन वळविलें, आणि सर्वजणांनीं नाथाना परत फिरण्याबद्दल आग्रह केला, पण त्यांनीं निक्षून सांगितलें कीं, आतां भाऊंची व आमची पुढील शनिवारीं वाटेंतच गांठ पडेल फुलाबोलाची गोष्ट; पुढील शनिवारी नाथांची दिंडी त्या आळीकडे जात होती तों समोरून दिवाकरभाऊची प्रेतयात्रा येत होती. हा नाथाचा शाप नव्हता, फक्त भविष्य कळलें होतें

८४ ग्वाल्हेरला अखेरचें कीर्तन करतांना अपमान करणाऱ्या महंताला नाथांनीं आपल्याबरोबर जाळून घेतलें हें तिसरें उदाहरण होय. या प्रसं-गाची हकीकत पुढें देऊं त्यावरून नाथांची रुद्रवृत्ति पूर्ण कळयाला येईल. या सर्व गुणांबरोबरच नाथांचे संतगुण प्रमुखपणें झळकतात. नाथ मनानें अतिशय साधे, लहान लेंकरासारखे होते दयाळनाथानीं लाखाचें कीर्तन करून दाखविलें, तर नाथानीं लहान मुलाची समाधि लावून दोन लाखांचें कीर्तन केलें हें मागें आलेंच आहे. फर्दानीं कावेतेच्या कुस्तीला आव्हान केलें, नाथांनी तीन दिवस कुस्ती भिडविली कोणा एका गोसाव्यानें आपल्या शिष्याची तारीफ केली, तेव्हा नाथांनीं दयाळनाथांच्या शिष्यगुणांचा विकास किती होता हें लागलेंच प्रत्ययाला आणून दाखविलें (रा जयराम केशव असनारे, वकील यांनीं लिहिलेलें मार्मिक व रसाळ दयाळनाथचरित्र पुढें मागें प्रसिद्ध झाल्यास त्यांत या सर्व गोष्टींचा खुलासा पूर्णपणें येईल) साधु व पहिलवान याच्याप्रमाणें नाथांची थोडीशी अजगरवृत्तिही होती असें वाटतें. रा रघुपतराव दाजीसाहेब देशपांडे लिहितात कीं, ‘ देवनाथाची वासना केवळ अजगरवृत्ती–विदेहस्थिति–होऊन रहावें अशी होती, परंतु गुरूनें सांगितलें की, अशा स्थितींत राहून जगावर उपकार होणें नाहील लोकांना

सुमार्गी लावणें व त्यांचा उद्धार करणें हें नाथाचे ब्रीद आहे तेव्हा तुम्ही एकनाथांचा मार्ग स्वीकारावा यामुळें देवनाथांनीं कीर्तन, भजन, तीर्थयात्रा व देवदर्शन केलें, व जेथें जेथें गेले तेथील मुख्य देवतेचें वर्णन केलें " जरी एरव्हीं त्यांना अजगरवृत्ति आवडे तरी वेळेला त्यांचें बुद्धिचापल्य व वाद्कौशल्य त्यांना कामीं पडे 'प्रबळ स्वमनिं मज नवल नानुभवि न त्यासि श्रुति मानें' हें पद म्हणून नाथांनीं हरशास्त्रीची कशी खोड मोडली हें मागें दिलें आहेच 'ब्राह्मणे द्रावि हस्तिनी' ही त्याच मासल्याची गोष्ट मागें दिली आहे पंढरपूरला एका ब्राह्मणानें बाराशें नमस्कार देवाला घातले. नाथांना लागलीच त्यावरून स्फूर्ति झाली की आपण विठोबावर बाराशें अभग रचावे आजपर्यंत यांपैकीं दोनच अभग छापले गेले होते आम्हांला तीस मिळाले ते आम्हीं दिलेले आहेतच या गोष्टींवरून नाथांच्या मनाची तल्लीनता व साधेपणा व्यक्त होतात जसा त्यांचा स्वभाव, तशीच त्याची कविता. दोहोंत अलकार, पाचपेंच, नवरस वगैरे कांहीं नाहींत एक ईश्वरार्पण होतें, आणि तें श्रेष्ठप्रतीचें व अनन्यभावाचें होतें त्याच्या जोरावर नाथ प्रपंचसागरांतून पार पडले शास्त्रीपंडितांसारखें विशाल अभ्यसन नसलें तरी ज्ञानापुढें ते अनन्य भक्तीनें लीन होते, आणि यामुळें वादविवादाला अथवा निरूपणाला त्यांच्या बुद्धीची कुशाग्रता अप्रतिहत चाले. जशु काय,

'नको कांहीं पडों ग्रथाचिये भरीं। शीघ्र व्रत करीं हेंची एक ॥
देवाचिये चाडे आळवावें देवा। ओस देहभावा पाडोनीयां ॥
साधनें घालितीं काळाचिये मुखीं। गर्भवास सेखीं न चुकती ॥
उधाराचा मोक्ष होय नव्हे ऐसा। पतनाची इच्छा आवश्यक ॥

हा तुकारामाचा अभग आपलें उच्च ध्येय म्हणून त्यानीं आपल्या उशाशीं बाळगला होता. आपल्या देहभावाला ओस पाडून देवाचिये चाडे देवाला आळवणें, काव्यालंकारांच्या नादीं न पडता अनन्य भावानें प्रभूला शरण रिघणें, ही त्यांच्या यशापयशाची गुरुकिल्ली होती हें त्यांच्या प्रत्येक पद्यावरून व धांव्यावरून स्पष्ट दिसतें 'पतिव्रता मन पतिशीच भेटो। तैसें आम्ही विठोमाजी नांदों' या कामीं त्यांचें व तुकारामाचें एकमत या अनन्य लीनतेला कोणी व्यवहारी जन एकमार्गी म्हणतील, पण असें नसतें तर त्यांची मनोरचना व त्यांची काव्यरचना हीं दोन्हीही त्याच्या चारित्र्यात उत्कृष्ट दर्जाचीं वठलीं नसतीं गीत, पद्य, छद, प्रबंध तालांवर त्यांचा भर नव्हता,

तसेंच छक्केपंजेही त्यांना येत नव्हते, आणि यामुळें नित्य व्यवहारांत जरी त्यांना पदोपदीं वैरी आड येत, तरी स्नेही व कौतुक करणारेही पुष्कळ मिळत त्यांच्या वेळचे जे कवी व वक्ते होऊन गेले त्यांत मोरोपंत, महिपती व अमृतराय यांच्या जोडीला फक्त देवनाथच बसतील याचे कारण त्यांची व्युत्पत्ति अल्प असली तरी उपरति दांडगी होती त्यांची मनोवृत्ति त्यांच्याच शब्दांत वर्णावयाची म्हटली म्हणजे अशी होती:--

"हे प्रभो दान बांधवा ।
छंद तुझा निर्द्वंद्व द्वंद्व हरि पद दाविसि केधवां ॥
( चाल ) मम मनोवृत्ति तुजवरी ।
जाहली तुझी नोवरी ।
निशिदिनिं हे मानस वरी ।
युगसम लवपलक्षण तुजविण हा विबुधबंधछेदना ॥
नवनीरदतनु कोमलगात्रा दानवकुलकदना । नंदाच्या नंदना"

त्यांची मनोवृत्ति ईश्वराची नोवरी झाली होती, याहून संतपणाचें जास्त भाग्य फळाला येणें शक्य नाहीं हें भाग्य यावें म्हणून संतमहंत जन्मोजन्मीं तप आचरतात. नाथांना एवढी भक्तिवासना होती यामुळेंच वाचकांना त्यांच्या ग्रथांचें कितीही वाचन झालें तरी तृप्ति झालीसें होत नाहीं

८५ हा भाग फार वाढला, तथापि देवनाथदयाळनाथांची जोडी वऱ्हाडभर प्रसिद्ध आहे, यासाठीं दयाळनाथाच्या निबंधांत आह्मीं जी गुरुशिष्यांच्या स्वभावाची तुलना दिली होती तीच येथें उतरून घेतों "देवनाथांची कविता आणि वृत्ति हीं दोन्ही, ईशचरणीं मनोलय झाल्यामुळें, साधारण मनुष्याला उदात्त आणि रौद्रस्वरूपी वाटतात कुशंका काढणाऱ्या छलकाला आपल्याबरोबर पावकपावन करून घ्यावयाचें, खलकुटिल ग्रामकटकांना आपल्या वानरशिष्यांकडून मार देववून ताळ्यावर आणवावयाचें, इत्यादि रौद्रकर्में त्यांच्या नामसी चारित्र्याचें नित्यांग होतें अगच्या तेजःस्फुलिंगाला गुरुकृपेची जोड मिळाल्यामुळें त्यांचा कीर्तिप्रकाश सर्वांना दिपवी आणि भिववी जलचर आणि रत्नें यांच्यायोगें भेवडावणाऱ्या पण पुन्हां जवळ बोलावणाऱ्या रत्नाकराप्रमाणें ते भीषणगंभीर होते. ईशकृपा व्हावी म्हणून त्यांनीं गुरूची वाट न पाहतां सडतर तप केलें, मन्त्रप्रयोगाला चूक होऊन पिशाचवृत्ति धारण केली, घरीं सर्वांकडून हालअपेष्टा सोसली, वैऱ्यांहातीं वर्म न जावें म्हणून

प्रसंगोपात् झटापटी केल्या, आपल्यासाठीं आपल्याला शोधीत वाट चालत गुरूला यावयाला लाविलें, आणि " आपुलिया हातीं कापा माझी मान । जगीं अपमान होऊं न द्या " या तुकोबांच्या उक्तीप्रमाणें त्यांनां आपला मान राखून प्रयाण केलें. ते स्वपराक्रमावर यशःकीर्तितपःश्रीमंत झाले. त्यांना ईशित्वाची सिद्धि होती व दयाळनाथांना तितक्याच अंशीं वशित्वाची सिद्धि प्राप्त झाली होती. दयाळनाथ हे पहिल्यापासूनचे गर्भश्रीमंत. त्यांना नाथांसारख्या समर्थ पित्यानें मांडीवर घेतलें, गोविंदनाथांसारख्या प्रेमळ आजानें त्यांचें लालनपालन केलें, विद्वन्मंडलानें व बहुजनसमाजानें त्यांचें जागोजाग कौतुक केलें. चातुर्मास्यांत चंदुलालमहाराज, रायराजे, सरकारनिजाम, असल्या श्रोतृमंडळापुढें कवित्व, गायन, भगवद्भक्ति, विद्वत्ता इत्यादि गुणांचें चीज होऊन हैद्राबाद येथें त्यांनीं आपल्या वयाच्या अठ्ठेचाळिसाव्या वर्षी देह ठेविला "

८६ लहानपणापासून देवनाथ हत्यारबंद रहात व रानावनांतुन निर्भय फिरत हें मागें सांगितलेंच. त्या काळीं साधूलाही लुटणारे शेखडल्लासारखे लोक असत. यामुळें ही शिपाईवृत्ति नाथांना अवश्यच होती. त्यांना पुढें भोंसलेसरकारानें पालखीचा मान दिला होता व त्या पदालायक ते श्रीमंती बाण्याचाही पोषाख करीत असें दिसतें. त्यांच्या बरोबरीचा आश्रितवर्ग व फिरता शिष्यसंघ पुष्कळ असून प्रापंचिकाच्या सर्व चिंता या आगंतुक प्रपंचाकरितां त्यांना बाळगाव्या लागत. कालकरवालाचा घाव चुकविण्याकरितां भगवन्नामाची ढाल त्यांना नेहमीं समोर ठेवावी लागे, आणि प्रपंचसागरांतून तरण्याची नौका जें द्रव्यसाधन त्याचीही त्यांना वारंवार जरूरी पडे. काशीयात्रा करून नाथ ग्वाल्हेरला गेले तेव्हां त्यांना पांच हजार रुपये कर्ज होतें, तें पुढें दयाळनाथांनीं नागपूरला गेले असतां फेडलें. त्याची हकीकत दयाळनाथांच्या चरित्रांत आम्हीं दिली आहे. देवनाथांचा हा सार्थक स्वभाव आजन्म राहिला. त्यांची नित्यदिनचर्या मठाधिपति महंतासारखी अथवा राजदरबारच्या अधिकाऱ्यासारखी असे. याचें वर्णन प्रमोदसिंधु छापखान्यांत छापलेल्या लहान पण सुंदर देवनाथचरित्रांत दिलें आहे तेंच येथें देतों; वाचकांना गोड लागेल.

" सत्पुरुषांचे वागणुकीचे हेतूंच्यासंबंधानें साधारण लोकांचा जो समज तो कधीं कधीं भ्रांतिमुलक असल्यामुळें त्यास सामतर्चे वर्णन त्या दिशेस अनुसरून नाहीं असें भासतें. त्याना वाटतें कीं, साधु झाला ह्मणजे त्याला अमुक

कशाला, तमुक कशाला, त्यानें जगलांत जाऊन आपला कालक्षेप करावा परंतु खरा प्रकार असा आहे कीं, साधुदीक्षा स्वीकारण्याचे पूर्वगामी कालांत त्यांनीं ज्या वृत्तीचा स्वीकार केला असेल तिचा कांहीं संस्कार मागें राहतो वृत्त्यंतरानंतरही साधूच्या वागणुकींत तो दिसतो ह्मणजे बालोन्मत्त, पिशाच्च, राजयोग वगैरे जी वृत्ति त्यांनीं धारण केली असेल त्या अनुरोधानें त्यांचें वर्तन असतें यामुळें साधूंनीं जंगलांतच काळ घालविला पाहिजे असें होत नाहीं त्यांत व इतर जनसमूहांत तारतम्य इतकेंच कीं, प्राप्त सुखाबद्दल आनंद व अनिष्ट प्राप्तीबद्दल खेद ही वृत्ति त्यांजमध्यें नसते. कारण साधु हे सुख व दुःख या दोहोंशींही अलिप्त असतात अर्थात् सुखप्राप्तीसाठीं किंवा दुःखनिवारणार्थ ते कधींही यत्न करीत नाहींत दैवयोगें प्राप्त झालेल्या सुखदुःखोपभोगास ते सदासर्वदा सादरच असतात होईल तें होवो अशी उदासीन वृत्ति त्यांची असते अस्तु रंगनाथाप्रमाणेच देवनाथ हे मोठ्या शिलेदारी थाटानें रहात असत म्हणजे अंगांत भरजरी अंगरखा, पांघरण्यास उत्तम वस्त्र, नेसण्यास रेशिमकांठी धोतरजोडा, डोकीस मौल्यवान् पागोटें व गळ्यांत अलीबंद असून त्यास तलवार लटकलेली असे, व बसण्यास उमदा घोडा असे देवनाथाना घोड्यावर बसण्याचा नाद बाळपणीं होता व पुढेंही तो राहिला. एलिचपूरकर त्र्यंबक जगन्नाथ ऊर्फ सखारामपंत देशपांडे यास निजामसरकारांतून बसण्यास पालखीची नेमणूक होती परंतु देवनाथास पालखी नाहीं व ते पालखींत बसत नाहींत म्हणून देशपांडेही पालखींत बसत नव्हते पुढें या देशपांड्यांनीं व इतर भाविक नागपुरस्थ थोर थोर मंडळींनीं खटपट व मध्यस्थी करून भोंसलेसरकाराकडून देवनाथ यांस पालखी देवविली. परंतु देवनाथांस मनापासून पालखींत बसण्याचें आवडत नसे मंडळींच्या आग्रहावरून कधीं कधीं तिचा ते घोड्याचेऐवजीं उपयोग करू लागले वैराग्यव्यवहारांत त्यांनीं तीन चार वेळ सर्व ऐहिक ऐश्वर्याचा त्याग करून सर्वत्यागी झाले तरी त्यांची प्रारब्धगति कांहीं विलक्षण होती तितक्या वेळींही पुनरपि पूर्ववत् ऐश्वर्यप्राप्ति त्यांस झाली तेव्हां " प्रारब्धकर्मणां भोगादेव क्षयः " या न्यायानें जें जें प्राप्त होईल त्याचा अंगीकार करावयाचा असा त्यांनीं पुढें क्रम ठेविला होता "

# शिष्यप्राप्ति.

८७. नाथांचा प्रभाव वाढत जाऊन त्यांच्या चरित्राची पूर्णावस्था होत चालली, तसतशी त्यांना आपला वाढलेला पसारा आटोपण्याजोगा शिष्य मिळण्याची काळजी वाटू लागली. जग द्वंद्वमय आहे; या द्वंद्वांपैकीं एक कोठेंही जन्माला आले कीं परमेश्वर दुसऱ्याला कोणीकडे तरी जन्माला घालतो, आणि पूर्वकर्मानुसार त्यांची आयुष्ययात्रा सुखदुःखाची चालते. हाच नियम गुरुशिष्यांचा असतो नाथांना शिष्य पुष्कळ, पण त्यांत पुढें नांवें ऐकूं येतात असे थोडे.

देवनाथ ( समाधि ग्वाल्हेर इ. स १८२१ )

- सखे गोपाळ पंढरपूर मठ (आतां मठ मोडला.)
  - माधव
    - नरहरिनाथ
- दयाळनाथ समाधि इ. स १८४८ हैद्राबाद येथें मठ सुरजी अंजनगांव
  - जयकृष्णनाथ सुरजी येथें समाधि.
    - रामकृष्णनाथ सुरजी येथें समाधि. मृत्यु १, ५, १८९१.
      - भालचंद्रनाथ वारले इ. स. १९११ पंढरपूरला.
- मल्हारनाथ मठ ग्वाल्हेर. आतां गंगाधरनाथ. ( यांच्याकडील माहिती आम्हांला नाहीं. तिकडील वाचकांनीं पुढील आवृत्तींत समावेश करून घ्यावा. )
- रामराव काळी

वाचकांच्या परवानगीनें आमच्या दयाळनाथांवरील निबंधांतला उतारा पुढें देतों:—

“श्रीदेवनाथांचे वऱ्हाडांत दोन शिष्य प्रमुख—एक दयाळनाथ व दुसरे रामराव काळी काळी आश्वलायन ब्राह्मण हे वऱ्हाडाच्या इतिहासांत पूर्वीं फार नाणा-बलेलें नबाबी शहर एलिचपूर येथील रहाणारे. यांचें घराणें फार जुनाट व नामांकित आहे. रामरावबाबाचे आजे राजा त्रिंबकराय ऊर्फ तिमाराय काळी. हे मोंगलाईच्या वेळीं सुप्रसिद्ध एलिचपूरकर नबाब इस्मायलखान पन्नी यांचे-कडे होते. रामराव याचा वंशवृक्ष असाः—

रामराव काळी
- यशवंतराव नाना काळी, वास्तव्य एलिचपूर.
- पांडुरंगनाथ काळी. हे फार चांगले कवि होते.
  - गोपाळनाथ
    - रंगराव
  - गोविंदनाथ
    - रामराव
  - भगवतनाथ
    - हे हल्लीं वऱ्हाण-पूर येथील नाथ-मठाचे मुख्य आहेत.
  - देवराव
    - भय्यासाहेब, सोनाळें येथें राहातात.

श्रीक्षेत्र रामटेक जिल्हा नागपूर येथें पांडुरंगनाथ काळी यांचे शिष्य रा. सदाशिवनाथ साने नांवाचे वृद्ध व विद्वान् शिष्य आहेत. त्यांनीं स्वतः देवनाथ व दयाळनाथ यांची बरीच अप्रसिद्ध कविता आम्हांला दिली व कांहीं तेथील गडावरून लक्ष्मणाच्या पंड्यांकडून देवविली. याबद्दल आम्ही त्यांचे फार आभारी आहों. तेथें देवनाथ व दयाळनाथ यांची जास्त कविता असेल असें वाटत नाहीं, पण असल्यास ती व गोपाळनाथ व गोविंदनाथ यांची कविता शोधक वाचकांनीं मिळवून पाठवावी. देवनाथांचे शिष्य सख्या गोपाळ यांनीं पंढरपूर येथें देवनाथांनीं मठ स्थापिलेला चालविला होता, व त्यांच्या मागून त्यांचे शिष्य माधव व माधवनाथांचे शिष्य नरहरिनाथ यांनीं चालविला होता. हल्लीं त्या मठाची परंपरा खुटली असें श्रीभालचंद्रनाथ सांगत. इ. स. १७९८ मध्यें देवनाथांनीं ग्वाल्हेरला मठ स्थापून तेथें श्रीमल्हारनाथ यांची योजना केली, आणि सध्यां त्या मठाला श्रीगंगाधरनाथ यांनीं सनाथ केलें आहे असें ऐकतों. तिकडील माहिती याहून जास्त मिळाल्यास ती माहिती आणि

गोपाळनाथांची व गोविंदनाथांची अप्रकाशित कविता मिळाल्यास ती कविता, अशीं दोन्हीं छापून प्रसिद्ध करूं. बऱ्हाणपूरचे मठाधिपति श्रीभगवतनाथमहाराज यांच्याजवळ कविता व माहिती हीं दोन्ही पुष्कळ आहेत. कालवशानें अनलपुराणवस्तु स्मृतिपथाला गेल्या आहेत. त्या दर्शेतून आपल्या गुरुपूर्वजांच्या कृतीला वाचविण्याचा त्यांनीं निश्चय केला आहे, व त्याची अनुज्ञा असल्यामुळें प्रकाशनाचें अल्पस्वल्प काम आम्ही आनंदानें करीत आहों.

ही बाहेरील शिष्यपरंपरा झाली पण देवनाथांनीं खुद्द आपल्या आवडत्या सुरजीअंजनगांवच्या जन्मभूमींतील मठाचें आधिपत्य श्रीदयाळनाथ यांजकडेच सोंपविलें होतें. दयाळनाथांचा जन्म शके १७१० कार्तिक शुद्ध १४ ला (इ. स. १७८८) झाला व त्यांनीं शके १७५८ (इ स. १८३६) मध्यें दक्षिण हैदराबादला देह ठेविला यांचे वडील दर्यापूरपासून सात कोसांवर मूर्तिझापूर, तालुक्याचें ठिकाण आहे, तेथील राहणारे हा मौनसगोत्री यजुर्वेदी ब्राह्मणाची सर्व संतति अल्पायुषी मरे, तेव्हां त्यानें आपलें शेवटील फळ हरि नावाचा मुलगा पांच वर्षांचा होतांच श्रीदेवनाथचरणीं वाहिला. हरि रूपानें जितका सुंदर तितकाच पुढें अंतःकरणाचा दयाळू दिसून आल्यामुळें भीमस्वरूपी आजेगुरु श्रीगोविंदनाथ यांनीं त्याला प्रेमानें दयाळ्या म्हणून हांक मारावी, आणि निर्गुणाला सगुण करणाऱ्या अमोघ संतवाणीच्या प्रेमळ प्रभावानें दयाळ्याला पूर्णाधिकार येऊन त्याचेच पुढें दयाळनाथ बनले. मुलाच्या अल्पायुषीपणानें गांजलेल्या बापाने, साधूच्या पायांवर लेंकरूं वाहिलें तर त्याला मार्कंडेयाचें आयुष्य मिळेल या सद्भावनेनें प्रेरित होऊन श्रीहरीला देवनाथांच्या पायांवर घातले, आणि त्यांनींही सुलक्षणी बाळ पाहून त्याचा स्वीकार केला व मोठा होईपर्यंत नाथाची ही भेट तूं जतन करून ठेव, असें बापाला बजाविले पुत्रापेक्षा जास्त ऋणानुबंधानें सेवा व सदाचरण दाखवणारा अनंत जन्मींचा जोडीदार शिष्य नाथांना प्राप्त झाला तेव्हां—

> " लेतां अनुपम गुज लाधलें । मी माझें मजमाजि मिसळलें,
> मीपण मुळिं आटलें । माझें निजरूप मज भेटलें ॥
> झाली भेटी, पडली मीठी, पोटीं सामावलें । अंतर्बाह्य प्रकाशलें ॥" (देवनाथ)

आणि गुरुपणाला पूर्णत्व आणणारा निजसुखसाधक शिष्यलाभ त्यांना झाला. पुढें श्रीहरीला आणिक एक भाऊ झाला, तेव्हां देवनाथ हे श्रीहरीला

बरोबर घेऊन गेले. त्या वेळीं श्रीहरीचें वय सहा वर्षांचें होतें. दोन वर्षांनीं सुरजीअंजनगांवच्या मठांत त्याची थाटाची मुंज केली, आणि लग्न करविलें. सुनेचें नाव राधाबाई ठेविलें. संस्कृत व प्राकृत कवींचा बराचसा अभ्यास, आणि कांहीं उर्दू व उत्कृष्ट गायन, आणि ' गुरोस्तु मौनं व्याख्यानं शिष्यस्तु छिन्नसंशयः ' असा गुरुगृहवासाचा आणि तपोनिष्ठसंतसमागमाचा लाभ, यांच्यायोगानें श्रीहरीचा सर्वांगसुंदर विकास व्हावयाला लागला. देवनाथ जितके तामसी व शीघ्रकोपी, जराशी चूक अथवा लबाडी न सहणारे तित-काच श्रीहरि शांत व कोमल होता. श्रीदेवनाथांनीं सवाईमाधवरावांचें रामराज्य पाहून पेशवाई बुडाल्यावर चार वर्षें ते जिवंत होते, आणि तेलीउदमीसुद्धां ढाली बांधून पेंढार कर्मांत सामील होण्याचा दिवस जाऊन निव्वळ रागरागि-ण्याच्या मानमान्यतेचे दिवस त्यांच्या डोळ्यांसमोर झळकावयाला लागले होते. अशा स्थितींत श्रीगोपाळनाथांनीं वर्णिलेला त्रैलोक्यांत फिरणारा नाथांचा सोटा व मारुतीरूप वेगळें करून जिकडेतिकडे कलि मातल्यामुळें आलेल्या कठिण काळांतून मठाला व संप्रदायाला निभावून नेणारी शांत विभूति पाहिजे होती; ती दयाळनाथांच्या योगानें नाथसंघाला लाधली. श्रीगोविंदनाथांना या आपल्या नातशिष्याची अखंडप्रसन्नता पाहून फारच कौतुक वाटे. श्रीहरीच्या लग्नप्रसंगीं त्यांचें ऐंशींहून अधिक वय झालें होतें, व प्रत्येकाचा गुन्हा आपल्या अंगावर घेऊन आश्रितांना देवनाथांच्या क्रोधपरामर्षापासून बचावण्याची व प्रसंगानुरूप त्याबद्दल स्वतः ताडनप्रसाद घेण्याची याची अपूर्व कला पाहून ते याचा फारच जिव्हाळा करीत व आपल्या पथप्रधानकीला याच्याहून दुसरा योग्य इसम मिळणार नाहीं अशी त्यांनीं खूण बांधली. शिक्षणाला बाप पाहिजे आणि शिक्षा चुकवावयाला आजा-आजी पाहिजेत. गोविंदनाथांनीं श्रीहरीची पुष्कळ शिक्षा वाचविली, व याच्या दयाळूपणामुळेंच याला ही जास्त भोगावी लागते हें लक्षांत ठेवून त्यांनीं त्याचें नाव दयाळ्या ठेविलें. गोविंदनाथांच्या या अहेतुक आणि निस्सीम प्रेमाबद्दल दयाळनाथांना पुढें आयुष्यामध्ये वारंवार गहिंवरून आठवण येत असे. गोविंदनाथांनीं बऱ्हाणपुरला समाधि घेतल्यानंतर देवदयाळूंची जोडी समाधिदर्शनाला गेली असतां दयाळनाथांनीं त्यांच्यावर जें पद रचिलें, तसें सुरस व प्रासादिक पद दयाळनाथांच्या कवि-तेंत अन्यत्र क्वचितच आढळतें. गोपाळनाथ व त्यांच्या अगोदरचे ' राजारंक पहा समदृष्टी ' वागवणारे सरदारसाधु कसे बाणेदार व विरक्त असत यांचें

मूर्तिमंत गोविंदस्वरूप नजरेसमोरून नाहीसें झाल्यामुळें त्यांना फार खेद झाला, आणि त्या वेळीं साठीच्या घरांत आलेले श्रीदेवनाथ हेही आपल्याला असेच एखादे दिवशीं सोडून जातील या कल्पनेनें तर त्यांचा उद्वेग जास्तच दुणावला.

" आसन मुद्रा हे उपाधी । नेणेंची निरवधी ॥
नाथ गोपाळींगोविंदीं । भेद नसे त्रिशुद्धी ॥
चित्पदीं आनंदली । माउली ॥
तेची कामदुघा दयाळू । देवनाथ कनवाळु ॥
करीत दासाचा प्रतिपाळू । अगणितगुणकल्लोळू ॥
नामामृत दुभली । माउली ॥ "

–दयाळनाथ.

यांना औरस वंश नाहीं मुलीचा वंश रामटेकउमरेडला आहे. यांच्या मागून यांच्या गादीवर ( १६ ) जयकृष्णनाथ आष्टीकर, मृत्यु इ स १८५१, ( १७ ) श्रीरामकृष्णनाथ, मृ १-५. १८९१, ( १८ ) श्रीभालचंद्रनाथ, मृ. १९११ पंढरपूर येथें, ( १९ ) श्रीमारुतीनाथ उमरेडकर, इतके बसले आहेत. यांनीं गुरुकृति जपून ठेविली व आम्हांला दिली हे फार उपकार आहेत. श्रीभालचंद्रनाथानीं कविता चांगली केली आहे गुरुपरंपरेवर ओंवीग्रंथही केला आहे वैदर्भविद्वान् पुढें मागें चीज करतीलच. "

---

## ८८. नाथपरंपरेवरील स्तोत्रें व मतमतांतरें.

मागील परंपरेंत पंढरपुरचे माधवनाथ यांचें नांव दिलें आहे त्यांनीं खालील आरती भाविक लोकांच्या नित्यपाठाकरितां करून ठेविली आहेः––

जयदेव जयदेव सच्चित्सुखसिंधो ।
पंचप्राणें आरति श्रीगुरु दिनबंधो ॥ ध्रुवपद ॥
नारायण विधि अत्री दत्तात्रय नामा ।
नामरुपातित होसी अनंत गुणधामा ।
मायाग्रस्त जिवातें निरखुनि पदमहिमा ।
दाविंत मानवलोकीं नतजनहितउगमा ॥ १ ॥

जनार्दनाचा एका नित्यानंद सखा ।
कृष्णनाथ ये नामीं विश्वेश्वर भजका ॥
नाथ मुऱ्हारी योगी रंगाच्या जनका ।
गोपाळा गोविंदा दावी निजलोकां ॥ २ ॥

देवनाथ हृत्कमलीं गोपालसखा झाला ।
चौदा रत्नें झालीं एक जशी माला ॥
शोभे विठ्ठलकंठीं व्यापुनि पदकमला ।
आरति करतां माधव नित्य सुखी झाला ॥ ३ ॥

विठ्ठलकंठीच्या माळेला कोंदण कनकाचें ।
दयाळनाथ नामाचें जडियेलें साचें ॥
जयकृष्णनाथ नामीं पदक मोत्यांचें ।
कृष्णनाथ पद गाउनि ध्याउनियां नाचे ॥ ४ ॥

पहिलीं तीन कडवीं माधवनाथ यांचीं आहेत. चवथें कडवें उमरावती जिल्ह्यांतील दर्यापूर तालुक्यात बाभळी येथें रावजी सराफ ऊर्फ कृष्णनाथ नांवाचे गृहस्थ रहात त्यांनीं केलें. हल्लीं या कृष्णनाथाचें कोणी उरलें नाहीं व बाभळीस त्यांचा पत्ताही लागेना.

आणखी रामकृष्णनाथ यानीं खालील अष्टक केलें आहे.

नारायणापासुनि बोध झाला, तेणें सुखें तो विधि पूर्ण झाला ।
त्या पूर्णबोधास लिहून पत्रीं, केला सुखी तो निजपुत्र अत्री ॥ १
महाराज दत्तात्रयाचे कृपेनें, पुढें चन्द्रबोधासि ऐक्यत्व बाणे ।
कृपें बोधराजा जनार्दन प्रबोधी, जनार्दनकृपें एकनाथी समाधी ॥ २
अनेकीं असे विश्व व्यापूनि एका, कृपें नित्यआनंद भोगी स्वसूखा ।
स्वयें कृष्णआनंद कैवल्यराशी, विसोबाप्रती खूण ते पूर्णतेसी ॥ ३
विसोबा महाराज विज्ञानदानीं, स्वयें नाथ मुऱ्हारि चैतन्यखाणी ।
दयाळू महा रंगनाथ स्वरंगीं, परब्रह्म श्रीनाथ गोपाळयोगी ॥ ४
करुणानिधी नाथ गोपाळ ओजा, समाधीवरी नाथ गोविंदराजा ।
सखा सद्गुरूनाथ कैवल्यदाता, कृपें तारिलें बालका देवनाथा ॥ ५
असा व्याप्त सर्वांतरीं देवनाथ, तयाचे पदीं होउनीयां अनाथ ।
अशा पूर्व पुण्यें तारिलें त्वां दयाळा, दयाळूपणें तूंचि तूं कीं दयाळा ॥ ६

ग्रं. क्र. ९

दयाळू महाराज कृपांबुधी जो, शरणागताला नुपेक्षी कधीं जो।
भजे त्यासि दे पूर्ण आनंदराशी, दयाळूपणें तारिलें बाळकासी॥
अनन्य शरणागत त्यासि झाला, जयकृष्णनाथ पदिं जो स्मरण मुराला।
महाज्ञानि महाराज जयकृष्णनाथ, असे थाहि गोकुळिचे कृष्णनाथ॥ ८
जया वर्णितां चारिही स्तब्ध झालीं, रामकृष्णमती तच्चरणीं मुराली।

दयाळनाथांनींही देवनाथांच्या निर्याणानतर एक आरती केली आहे. ती अशीः--

आरती देवनाथा। निरंजन समर्था।
त्रिभुवनीं कीर्ति थोर। जगद्गुरु जगन्नाथा॥ ध्रु०॥

मधुमास शुक्लपक्ष। श्रीरामनवमी।
कीर्तनीं ठेविला हो। देह निजसुखधामीं॥

पंचप्राण पंचवाती। ध्यानीं लाविल्या ज्योती।
भावार्थ कापुरानें। स्वयंप्रकाश दीप्ती॥

दयाळू देवनाथ। महा कैवल्यदाता।
आरती ओंवाळोनी। चरणीं ठेविला माथा॥

कोणी एका भक्तानें 'देवनाथार्याष्टक' रचिलें आहे, तेंही येथें लिहिण्यासारखें आहे. तें असेः—

## आर्या

श्रीदेवनाथ गुरुजी, दास मी नमितों सहस्रधा तुजला।
विठ्ठलचरणीं प्रेमा, अखंड राहो असें वदा मजला॥ १

श्रीदेवनाथ नामें, वदतां वाणी पवित्र जाणावी।
ध्यानीं रूप तयाचें, ध्यातां मुक्ती घरींच आणावी॥ २

श्रीदेवनाथपूजा, नित्य करी जो हरीस आवडतो।
देतो निजपद त्यातें, आपण सेवा समग्र सांवडतो॥ ३

श्रीदेवनाथकीर्तिश्रवणें पठणें शिवास मानवतो।
शमदमशांति सुबोधें, गुरुभजनीं सर्व वंद्य मानव तो॥ ५

श्रीदेवनाथवृंदें, कीर्तनरंगीं रमोनि जनता हे।
भगवद्भजनीं लावुनि, हरिगुण गावे असेंच म्हणताहे॥ ४

श्रीदेवनाथमूर्ति, ब्रह्मरसाचीच मूस ओतविली ।
नवविधभजनसुखाची, भक्ति जशी पंढरींत पोतविली ॥ ६

श्रीदेवनाथरूपें, श्रीदत्तात्रय कलींत अवतरला ।
तत्संगें हरि रंगें, भोळा भाविक बहूत जन तरला ॥ ७

श्रीदेवनाथ कवि तो, काव्यसुधाकर चकोर रसिकांशीं ।
नवरस पूर्णपदें जो, पावन झाला जनांत जशि काशी ॥ ८

श्रीदेवनाथआर्याष्टक हें पढतां विरागविषयीं हो ॥
अष्टांगयोगभक्ति, ज्ञानाभिरुचीस पात्र विषयीं हो ॥ ९

---

## ८९. नाथांचें निर्याण.

विसाव्या भागांत राव, नाथ आणि संत यांतील फरक दाखविला आणि स्वभाववर्णनाच्या गोष्टी देताना नाथाचें रावपण कसे जागृत असे याबद्दल आह्मीं विवेचन केलें. संत जगदुद्धार करावयाला बाहेर पडले म्हणजे पुष्कळ असहिष्णु लोकांकडून पीडा होते; आणि असा परीक्षेचा प्रसंग कित्येक वेळां एखाद्या विद्वान् शास्त्रीशीं येई, तर एखाद्या वेळेला निव्वळ वावदूकाशीं येई. सतीचें सोंग घेतलें म्हणजे आगींत उडी घ्यावयाला कचरावयाचें नाहीं हा जसा खऱ्या जातिवंत बहुरूप्याचा बाणा, त्याप्रमाणें ईश्वरवाक्याला कधींहि असत्यता येऊं द्यावयाची नाहीं, त्याकरितां प्राण गेला तरी बेहेत्तर, हा नाथांचा संकल्प होता. नरतनूच्या क्षणभंगुरतेबद्दल नाथानीं हजारों कीर्तनें केलीं होतीं; आत्मा अमर असून अविनाशी आहे, व देहकर्म महा खोटें असून रामरावणादिकांनाही त्यानें सोडलें नाहीं ही त्यांची मनापासून समजूत होती. पेशवाईमध्यें महा दुष्काळ व बंडावा यांच्यायोगानें श्रीमंत घरें धुळधाणीला लागलेलीं व कुलस्त्रियाना बटकीपणा करण्याची वेळ आलेली त्यांनीं पाहिली होती, इतक्या सगळ्या प्रसंगांतून त्यांनीं आपला भाव आणि

---

१ या गोष्टींचें हृदयभेदक वर्णन अनंत फंदींच्या "माधवनिधन" ग्रंथांत दिलें आहे. त्यावरून पेशवाईच्या अखेरच्या काळाची व नाथांच्या उतारवयांतील काळाची महाराष्ट्रांतील स्थिति कशी होती हें कळेल.

भक्ति ही कायम राखली होती या भावभक्तीबद्दल जर कोणा शहाण्यानें कुठार-प्रहार करण्याचा प्रसंग आणला तर तो नाथांना कसा खपणार ? नाथ भाव-रक्षणार्थ सदोदित जागरूक असत, कलीमध्यें पाखांड माजलेलें डोळ्यांसमोर दिसावयाला लागून तनु व्याधिग्रस्त होत चालल्यामुळें या मोडत्या काळाला आळा घालण्याचें काम आपल्या शक्तीबाहेरचें होत चाललें याचा त्यांना फार खेद वाटे. श्रीकृष्णानें कौरव संहारल्यावर यादव संहारले आणि भूभार कमी केला, त्याप्रमाणें मोंगलांपाठीं मराठे हतबल होऊन श्रीकृष्णरूपी माधव पेश-व्याची कायाही नष्ट झाली होती नाथांना जीवितकर्तव्य राहिलें नव्हतें, पण देह-प्रारब्धाला मान देऊन ते काळ कंठीत होते कीर्तनांत मूल उठविल्यापासून पुन्हा असा देवावर भार घालण्याचा प्रसंग येऊं नये म्हणून ते कीर्तन टाळीत असें म्हणतात, पण लोकाग्रहास्तव त्यांना तें करावें लागलें; आणि "नैनं छिंदंति शस्त्राणि' या वाक्याची प्रचीति आपल्याबरोबर एका कुत्सित श्रोत्याला घडवून आणून नाथांनीं आपला भगवद्वाक्यभाव सफल केला. ज्ञानसंग्रहांतील चरित्रकार रा रा यशवंतराव केसकर यांनीं हा प्रसंग मोठ्या बहारीनें वर्णिला आहे. त्यांचे वक्तृत्वपूर्ण शब्द आम्ही पुढें देतों.——

"परंतु मृत बालकास उठविल्यावर देवनाथांनीं असा विचार केला कीं, आपल्या कीर्त-नास जनांनीं यावें व त्यासबधानें बरेवाईट झाल्यास ईश्वरास संकट घालणें म्हणजे नवीन उपाधि जडविणें होय; तर ती नको. पूर्वपाठाप्रमाणें हरिकीर्तन यापुढें करावयाचें नाहीं अशी त्यांनी त्याच प्रसंगीं प्रतिज्ञा केली व काशीस पुन कीर्तन केलें नाहीं या-प्रमाणें कांहीं दिवस लोटले. या समयीं ग्वाल्हेरचे राजाच्या पदरीं मल्हारनाथ नांवाचा एक हुद्देदार वजनदार सद्गृहस्थ ग्वाल्हेरीस रहात होता हा देवनाथमहाराजांचा शिष्य होता. मल्हारनाथ आपल्या घरीं दरवर्षी रामनवमीचा उत्सव मोठ्या थाटमाटानें करीत असे. त्यास इच्छा झाली कीं, आपले गुरु देवनाथमहाराज उत्सवाचे प्रसंगीं असावे. तदनुसार मल्हारनाथ यांनीं देवनाथांकडे जाऊन मोठ्या आग्रहानें त्यास सन्मानपूर्वक इतमामानें ग्वाल्हेरीस आणिलें रामजन्माचे दिवशीं सभामंडपांत रामजन्मासाटीं साधु-संत व इतर पौरजन श्रोतृसमाज फार मोठा जमला होता. मुख्यस्थानीं देवनाथमहाराज बसले होते. त्या प्रसंगीं दौलतराव शिंदे व पुष्कळ लहानमोठे शिंदेसरकारच्या पदरचे कारभारी त्या ठिकाणीं गेले होते. हा मंडप कोटास लागून मोठा कडेकोट तयार केलेला होता, व समोर एक दरवाजा होता. देवनाथमहाराजांची कीर्तनासंबंधी ख्याति होतीच. तेव्हां तेथें जमलेले लोकांस त्यांचें कीर्तन ऐकण्याची सहज इच्छा झाली व त्यांनीं देवनाथांची कीर्तन करण्यासाटीं प्रार्थना केली. परंतु आपण कीर्तन न करण्या-बद्दल केलेली प्रतिज्ञा त्यांनीं त्यांस कळविली. लोक ऐकतना. त्यांचे तोंडून हरिनाम ऐकावयाचेंच असा त्यांनी फार आग्रह धरिला. लोकांच्या आग्रहामुळें निरुपाय होऊन

देवनाथांनीं त्यांची विनंति मान्य केली; पण त्यांस सांगितलें कीं, मी यथामति कीर्तन करतो, परंतु परिणामीं यापासून काहीं ईश्वरीकोपसूचक घडल्यास माझा उपाय चालणार नाहीं व त्याबद्दल मला कोणीं दोष न द्यावा परंतु देवनाथांच्या मनांतील उद्देश न समजून हरिकीर्तन केल्यापासून ईश्वरी कोपाची भीति कशासाठीं अशी मनाची समजूत करून त्यांस कीर्तनास उभें केलें कीर्तन झालें. परंतु रामजन्माचें कथानक त्यांनीं लाविलें नाहीं तो भाग नंतर दुसऱ्या हरिदासानें केला या दुसऱ्या हरिदासाची त्या दिवसाचे प्रसंगानुरूप रामजन्मकथा झाली. कथेचा उपसंहार होऊन आरती होण्याचा समय येऊन पोहोंचला इतक्यांत एक महत् विघ्न आलें. तें असें कीं, सभामंडपाचे द्वारास एकाएकी आग लागली व हां हां ह्मणतां सर्व मंडपभर ती पसरली व एकच हाहाकार होऊन गेला या मंडपाची कशी काय रचना होती हें सांगण्यास काहीं साधन नाहीं परंतु या भयंकर प्रसंगीं मंडपांतील मंडळीस बाहेर जाण्यास मार्ग राहिला नाहीं काहीं लोकांनीं शिड्या लावून उड्या घालून व मोडतोड करून प्राण वांचविले. परंतु जमलेली बहुतेक मंडळी मंडपात सांपडली व बाहेर पडण्यास कांहींच मार्ग राहिला नाहीं या घोर प्रसंगीं स्वतःविषयीं जरी देवनाथमहाराज उदासीन राहिले तरी प्राणसंकटात पडलेल्या इतर जनसमूहासाठीं त्यांनीं हळहळ केली इकडे तिकडे पहातात तों दौलतराव शिंदे त्यांच्या नजरेस पडले. त्यांस पाहतांच देवनाथांनीं तेथें असलेल्या आपल्या शिष्यवर्गांत कृष्णभट म्हणून एक शिष्य होता त्यास हांक मारिली. हा शिष्य शरीरानें सुदृढ व गुरुभक्तींत तत्पर व संकटांत धीर धरणारा असा होता. त्यास देवनाथ ह्मणाले, "कृष्णा, आजपावेतों तू माझी सेवा मनोभावानें केली आतां माझी तुला शेवटची अशी आज्ञा आहे कीं, दौलतराव शिंद्यास पाठीवर घेऊन त्यांचा प्राण वांचीव. तुझा गेला तर जावो." आज्ञा होतांच जिवावर उदार होऊन कृष्णभटानें धाडस करून तो कोटावर चढला आणि पलीकडे खालीं राम म्हणून उडी घेतली. शिंद्यांस कांहीं एक दुखापत न होतां ते संकटांतून वांचले कृष्णभटाचे पाय मोडले. शिंद्यांनीं या कामगिरीबद्दल कृष्णंभटास व त्याचे वंशपरंपरेस दैन्यमुक्त केलें असें सांगतात. इकडे मंडपांत अधिकाअधिक कल्होळ होत चालला. इतक्यांत एक महान ह्मणून कुटिल पंडित मल्हारनाथाजवळ येऊन कुत्सित बुद्धीनें ह्मणाला, "महाराज, गडबड कशासाठीं? आपण तर प्रतिईश्वर आहां. आपणांस भीति कशाची? 'नैनं छिंदति शस्त्राणि नैनं दहति पावक' ही भगवदुक्ति आपणांस अवगत असेलच." देवनाथ म्हणाले, "यथार्थ आहे. गीतेंतील या वाक्याचें स्मरण आपणाला बरें वेळेस झालें गीतापाठ नित्य करतां वाटतें." पंडित म्हणाले, "तोंडानेंच पाठ करितों इतकेंच नाहीं पण वर्तनही तसेंच ठेवितों" देवनाथ हसून म्हणाले, "आपण म्हणता हें जर खरें आहे, तर "मयि सर्व मिदं प्रोक्तं सूत्रे मणिगणा इव" किंवा ' बीजं मां सर्वभूतानां विद्धि पार्थ सनातनम्" हीं वाक्यें आपल्या पठणांत असतीलच. तेव्हां 'नैनं छिंदंति' हें वाक्य केवळ माझ्यासाठींच नाहीं. आपणासही तें सारखेंच लागू आहे." त्यावर पंडितांनीं म्हटलें, 'तर मग मला कांहीं भीति नाहीं.' देवनाथमहाराज म्हणाले 'उत्तम आहे. आपण दोघेही बसूं या येथें' असें म्हणून त्या पंडिताचा हात धरून त्यास खालीं बसविण्याचा प्रयत्न देवनाथ करूं

लागले, तेव्हां आपल्या प्राणावर आतां संकट ओढवलें असें पाहून महंतांनीं देवनाथांचे हातास हिसका देऊन पलायन करण्याचा अत्यंत प्रयास केला पण व्यर्थ. या क्षणीं देवनाथांचे अंगाची फार काळपावेतो निद्रिस्थ असलेली तालीमबाजी पुन जागृत होऊन तिनें महंतास अष्टांगासहित भूमीस स्पर्श करविला सर्व बाजूनीं मंडपाला अग्नीनें घेरलेंच होतें हें वर लिहिलेंच आहे. थोड्या वेळांतच आंत सांपडलेल्या मंडळींचें अग्नि-नारायणानें भस्म केलें

या अग्निप्रलयातून मल्हारनाथ हा गृहस्थ वांचला श्रोतृसमाजाचा व विशेषेंकरून स्वगुरूचा नाश झालेला पाहून मल्हारनाथासारख्या भाविक सद्गृहस्थास किती दुःख व किती खेद झाला असेल याची कल्पना वाचकांनीच करावी.

देवनाथमहाराजांची कीर्ति ज्यांस सहन होईना अशा मत्सरी पुरुषांनीं सभामंडपास अग्नि लाविला असें ह्मणतात कांहींचें असें ह्मणणे आहे कीं, स्वप्रतिज्ञेविरुद्ध देवनाथांनीं कीर्तन केलें त्यामुळें हें प्राणसंकट उद्भवलें या दोन्ही गोष्टींत कोणतीही खरी असो परंतु आपल्या प्रतिज्ञेचेंविरुद्ध कीर्तन केले असतां कांहीं अपघात होईल अशी जी देव-नाथांस भीति होती व जी त्यांनीं कीर्तन करण्यापूर्वी नुकतीच बोलून दाखविली होती ती खरी झाली काकतालीयन्यायानें याचें समाधान कोणी करीत परंतु या दोन गोष्टी कारणकार्यरूपानें संबंधित दिसतात व अशी कल्पना असंभाव्य नाहीं तेव्हां या गोष्टीचे उपपत्तीसाठीं या ठिकाणीं काकतालीयन्यायाची नित्यप्रतीति होय असें मात्र ह्मणतां येणार नाहीं

या प्रसंगाची दुःखद वार्ता ग्वाल्हेरी येथील एका गृहस्थानें ब्रह्मणपूर येथील एका आप्तास पत्रद्वारें पाठविली होती हें अस्सल पत्र शिष्यपरंपरेचे हातून रामरावबाबा यांनीं पहाण्यास मागितलें होतें व तें त्यांनी जपून आपल्या संग्रहीं ठेविलें होतें. रामरावबाबा काळी याचे चिरंजीव नानासाहेब काळी यांनीं तें प्रत्यक्ष पाहिलें असून त्यांनींही तें मोठ्या काळजीनें बाळगलें होतें परंतु तें आतां पुष्कळ शोध केला असतांही सांपडत नाहीं एकंदर त्या वेळेस सभामंडपांत सातशें मनुष्यें जळून मेलीं व त्या संख्येत महंत पंडित व देवनाथमहाराजही होते असें त्या पत्रांत लिहिलेलें होतें.

अग्नि शांत झाल्यावर पाहिले असतां देवनाथमहाराज व महंत हे शेवटीं ज्या ठिकाणी बसले होते त्याच्या आजूबाजूच्या मंडळींचीं सर्व प्रेतें सांपडलीं. महंतांचें प्रेत सापडलें, परंतु देवनाथांचे शरीराचा कांहीं एक मागमूस लागला नाहीं. त्याचे अंगाव-रचा अर्धा जळलेला रुमाल व नेसण्याचे धोतराच्या निऱ्या एवढें मात्र सापडले हे पाहून सर्वांस मोठा चमत्कार वाटला

झालेल्या अनर्थाबद्दल मल्हारनाथ यांजला परम खेद वाटला परंतु गुरुमहाराजांचे-संबंधानें त्यांनीं अति आक्रोश केला. गुरुदर्शनावांचून अन्नपाणी घेणार नाहीं असा निर्धार करून गुरुमहाराजाचे नामस्मरण करीत ते बसले याप्रमाणें सहा दिवस लोट-ल्यावर सातवे दिवशीं त्यांस देवनाथांनीं दृष्टांत दिला कीं, मी ज्या ठिकाणीं मंडपांत बसलों होतों व माझें जळकें वस्त्र सापडलें त्या ठिकाणी जागा वीतभर खोल खोदिली

म्हणजे तींत एक मारुतीची मूर्ति निघेल ती माझीच असें समजून तुझी माझ्यावर जशी भावना होती तशी तिजवर ठेव व आतां व्यर्थ शोक करूं नको. दृष्टान्त होतांच गुरूचे आज्ञेप्रमाणें जागा खणली व तींत मारुतीची मूर्ति सांपडली. ती पाहून मल्हारनाथांस व इतर मंडळींस मोठा आनंद व चमत्कार वाटला. मल्हारनाथानें पुढें त्या ठिकाणीं देवनाथमहाराजांची समाधि बांधून तीवर मोठ्या समारंभानें मारुतीचे मूर्तीची स्थापना केली. ही समाधि अद्यापि कायम आहे.

देवनाथमहाराजाचे समाधिकालीं त्याचे समागमें जी शिष्यमंडळी होती त्या सर्वांस महाराजाचा जळका रुमाल, धोत्राच्या निऱ्या व वीणा वगैरे कीर्तनसामग्रीसह यांचे मुख्य शिष्य दयाळनाथ यांजकडे ग्वाल्हेरीहून मल्हारनाथांनीं पाठविलें. या वेळेस दयाळनाथ अंजनगांवसुरजी येथें होते. त्यांस गुरुनिधनाची वार्ता ऐकून अति खेद झाला. परंतु कांहीं वेळ एकांत विचार करून त्यांनीं तो दूर केला. देवनाथमहाराजांच्या वस्त्रें वगैरे गुरुभक्तिस्मारक वस्तु ग्वाल्हेरीहून आल्या होत्या त्यांचा आदरपूर्वक स्वीकार करून त्या प्रसादाचा अर्धा भाग म्हणजे रुमाल आणि वीणा रामरावबाबा काळी यांजकडे एलिचपुरास पाठविला व बाकीचें सामान आपणांजवळ ठेविलें. रामरावबाबा काळी त्या रुमालावर गुरुतुल्य प्रेम व भाव ठेवीत असत व कीर्तनसमयीं तो रुमाल पुढें ठेवीत. थोडे दिवसांपावेतों हा रुमाल काळी यांचे घराण्यांत भक्तिभावानें सांभाळून ठेविला होता. परंतु पंढरीचे रस्त्यांत या रुमालचें गाठोडें दुर्दैवानें गहाळ झालें. रामरावबाबा काळी यांचे चिरंजीव यशवंत नाना काळी यांनीं वीणा अजून जपून ठेविलेला आहे असें समजतें.

९० मल्हारनाथानीं देवनाथांवर या प्रसंगानंतर जी आरती केली ती सांप्रदायांत चालू आहे, व तीमुळें कांहीं विश्वसनीय शकतारखा वगैरे बरोबर मिळतात. ती अशीः—

आरती देवनाथा, गुरुवरा मोक्षप्राप्ता ॥ ध्रु० ॥

पवित्र ग्राम सूर्जी येथें अवतार धरिला ।
शके सोळाशें शाहत्तरीं नवमासीं प्रगट झाला ।

सत्रांत रुद्रकृपें देहभावा विसरला ।
तेथून तीन अब्दीं गोविंदनाथा शरण गेला ॥ आ० ॥ १ ॥

महारुद्रप्रेरणेनें नाथजीनें नाथ केला ।
शुद्ध जें ब्रह्म तेंचि स्वयंब्रह्म तूंचि झाला ।
तें सुख वर्णवेना कोटितेजाचे तेजाला ।
औट पीठ त्यागोनीयां निजरूपीं मग्न झाला ॥ आ० ॥ २ ॥

जड हे तारायासी देशोदेशीं वास केला ।
शीघ्र कविता रचोनि भक्तिरस चाखवीला ।
शके सत्राशें वीसांत दास धन्य हा केला ।
ब्रह्मरस पाजोनियां जिताची मुक्त केला ॥ आ० ॥ ३ ॥
त्रेचाळीशीं मधूमासीं शीत पक्षीं नवमीला ।
मध्याह्नीं भानु येतां त्या ग्वाल्हेर ग्रामाला ।
कीर्तनीं रमोनीयां अग्नितेजें तेज आला ।
मल्हारगुरुवरदा देह पृथ्वींत आटला ॥ आ० ॥ ४ ॥

९१. मंडपाला आग लागावयाच्या सुमारास नाथांनीं आपलें नित्य सांप्रदायिक पद म्हटलें:—

देवराया ! देवा ! तुझे पायीं । तुझ्या कृपें लागलों निजसोयी ॥
नाथ साहेबा हें चित्त तुझे पायीं । गडीपणा तूं सोडुं नको भाई ॥
मुगुटमणि सद्गुरु चूडामणी । केलें वदित प्रगट जनीं वनीं ॥
भेटि होतां हें ऐक्य झालें ठायीं । बरें वाइट तूं मानुं नको कांहीं ॥
गडी केला रंगनाथ मिठी पायीं । तुटी नव्हे आणिक दुजें कांहीं ॥

आणि सर्वांला बाहेर काढून लावून आपणही बाहेर पडण्याच्या तजविजींत ते होते. ते विनाकारण जिवांवर उदार झालेले नव्हते, अगर देह नाशिवंत ह्मणून उगीच कांट्यावर घालावा यासाठीं त्यांनीं बाळपणची तालीमबाजी संपादिली नव्हती. परंतु अक्षयुद्ध हें अशास्त्र, त्यांत कपटपाशांचें युद्ध हें घातक, असें जाणूनसुद्धां ज्याप्रमाणें धर्मराजाला स्वयातिधर्मसंरक्षणार्थ अक्षद्यूताचें आव्हान स्वीकारावें लागलें, त्याप्रमाणें अशा विकट प्रसगीं भगवें पांघरलेला व विद्वान् म्हणवणारा मत्सरदूषित महंत भगवद्वाक्याची प्रचीति दाखवा, असें आव्हान करावयाला आला असतां नाथांना तें स्वीकारावें लागलें. विठ्ठलाचे दास म्हणविल्यावर सतीपणाला अतरून कसें चालेल ! नाथांनीं आयुष्याची मर्यादा संपली हें जाणलें, आणि ईश्वराचा शेवटचा धांवा केला, तो बडोद्यास शिष्य झालेल्या दोन काव्यनिष्ठ ब्राह्मणांनीं लागलाच उतरून घेतला.

तुज काय म्हणावें आह्मीं । दयाळू नाथ जगाचा तूं स्वामी ॥ध्रु०॥
पावन ब्रीद तुझें गा कंसारी, वेद गर्जती चारी ।
पतित तारिले त्वां बहु भारी, गजगणिका व्यभिचारी ॥

ऐकुनि कीर्ति तुझी बा पुतनारि, शरणागत मी द्वारीं ।
आलों ठेविं मला निजपदपक्षीं ॥ तुज० ॥ १ ॥
आधीं पल्लविं उचलुनियां घ्यावें, मग परतें लोटावें ।
दिसतें उचित काय जी हें बरवें, कृपाघना ! बोलावें ॥
दास तुमचा जेणें म्हणवावें, तेणें विलया जावें ।
नवल वाटतें अंतरयामी ॥ तुज० ॥ २ ॥
करुणासागरा श्रीगोपाळा ! कृष्णा ! त्रिभुवनपाळा ।
पांडवपाळका जी घननीळा, नंदयशोमतिबाळा ॥
झालें मानस हें अतिविकळा, तव विरहाग्निज्वाळा ।
दुःखित झालों मी बहुत श्रमी ॥ तुज० ॥ ३ ॥
विश्वोद्धारका गुरु गोविंदा, किति भोगावी आपदा ।
सरली आयुष्याची मर्यादा काळें काढिल्या फरदा ।
अजुनि दया येईना का मदा, बोल परमानंदा ।
रतला देवनाथ प्रभु नामीं ॥ तुज० ॥ ४ ॥

काव्यसंग्रहाच्या कामीं या ब्राह्मणांची एकनिष्ठा जर आतांचे विद्वान् दाखवितील तर केवढी ज्ञानसेवा होईल ? नाथांनीं त्या ब्राह्मणांना लागलीच बाहेर जावयाला सांगितलें. एकीकडे भगवान्नामस्मरणानें संतपणा जागरूक केलेला आहे, दुसरीकडे आपली सगळी पहिलवानगिरी आणि रावपणा स्मरून आपली निंदा करणाऱ्या महंताला काळाची मगरमिठी मारलेली आहे, अग्निनारायणाला नश्वरदेहाची आहुति होत आहे, पुढील काळ अमरत्वाची माळ गळ्यांत घालीत आहे, गतकाळ झालेल्या ईशसेवेबद्दल शाबासकी देत आहे, मन ब्रह्मानंदीं निमग्न आहे, अशा स्थितींत या धर्मवीरानें पंचप्राणांच्या पंचारतीं आणि भावार्थांचा कर्पूर उजळून शके १७४३ ( इ. स १८२१ ) मध्यें रामनवमीच्या प्रसंगीं मध्यान्हीं पुण्यदिवशीं पुण्यश्लोकपणें निर्याण केलें. वीराला रणांगणावर मृत्यु, आणि धर्मवीराचें धर्मवाक्यरक्षणार्थ निर्याण हीं दोन्ही मंगलप्रद होत. पावकार्पण झालेल्या नाथांनीं आपला संतपणा व रावपणा दोन्ही गाजवून अखेर मारली, आणि आपली नाथपदवी सार्थ केली. आज नाथ खरोखरचे पालखीपदस्थ झाले. त्यांच्या नश्वर देहाबद्दल खेद न मानतां त्यांच्या चारित्र्याचें सार्थक झालें आणि त्यांचा आत्मा पूत व ईश्वरप्रेमभाजन झाला याबद्दल वाचकांनीं आमच्याप्रमाणेंच समाधान मानावें.

# १२. उपसंहार.

आम्ही दयाळनाथचरित्राच्या शेवटीं म्हटल्याप्रमाणें " गोपाळनाथ, गोविंदनाथ आणि देवनाथ हे तिघेही नाथबहाद्दर ' नाथांचा सोटा ' त्रैलोक्यांत फिरवणारे होते तिघेही वैराग्यदंडकारण्य होत. आज ईशकृपेनें नाथांची कृति वाचकापुढें मांडीत आहों. ही अल्पसेवा ईश्वराला आणि ईशभक्त वाचकांना पसत पडल्यास, पुढें गोविंदगोपाळांची कविता, आणि मिळेल तितकी इतर वैदर्भकवींची कविता प्रसिद्ध करण्याचा इरादा आहे. " श्री. आप्पासाहेब सरमोकादम व उभयतां वणीकर देशमूखबधू यांनीं दयाळनाथ–देवनाथांचा संग्रह जमविण्याच्या कामांत रा. अग्निहोत्री यांना जी मदत केली त्याबद्दल त्याचे आभार मानावे तितके थोडेच.

साधुसतांनीं पावन केलेल्या विदर्भदेशांत आल्यापासून गेलीं पांच वर्षे देवनाथदयाळनाथाच्या प्रकाशनाचा पूर्वरंग चालला होता तो आज सपला. रा. शारंगपाणी व रा मा. खरे वकील, उमरावती, यांची मदत व रा. माधवराव डोकस वकील यांचें सान्निध्य नसतें तर हें कार्य अजूनही लांबतें देवनाथाच्या ग्रंथप्रकाशनाच्या कामीं ज्या भाग्यवतांची मदत होत आहे त्यांचा नामनिर्देश योग्य स्थळीं होईलच. महाराष्ट्रभर पुराणइतिहासकाव्यप्रकाशनाचा उत्साह वाढत आहे. ईश्वरानें त्यांतला वांटा समर्थ विदर्भस्थांना द्यावा; महत्कार्य घडून येईल. आमचा हा सामग्री जुळवण्याचा पहिलाच यत्न; त्यांत लिहिण्यापासून व टीपा देण्यापासून शेवट प्रस्तावना लिहीपर्यंत बरेच बोधप्रद अनुभव आले ते पुढील लेखकांकरितां स्वतंत्र प्रसिद्ध करू, येथील जागा अडवीत नाहीं. नाथांच्या सेवेचा सकल्प नाथांनीं आणि ईश्वरानें पार पाडला; यांत दोष अनत आहेत; मूळ या गोष्टीला लागणारा अधिकार हा आमच्यांत नाहीं; हीं सर्व वैगुण्यें आम्ही जाणून आहोंत. पुढें वैदर्भकाव्यसग्रह याहून जास्त मिळावा, सग्राहक पुरुष जास्त अधिकारी असे निपजावे, असें आम्ही देवाजीजवळ विनवितों वाचकांनीं हा यत्न गोड मानून घेतल्यास जास्त यत्न करण्याला उत्तेजन येईल.

उमरावती, ता. ९।५।१९१३. अक्षय्यतृतीया.

# देवनाथमहाराजांच्या मराठी पदांची

# अनुक्रमणिका.

[ **टीपः**—आम्हीं अंकानुक्रमणिका व अकारानुक्रमणिका अशा देवनाथी पदांच्या दोन अनुक्रमणिका दिल्या आहेत या अनुक्रमणिकांतून न आलेलीं, म्हणजे अर्थातच या ग्रंथांत न आलेलीं, अशीं देवनाथांचीं वरीचशीं पदें वऱ्हाड व इतर प्रांतांतून प्रचलित असतील. सूज्ञ वाचकानी लक्ष ठेवून आम्हांला कळविल्यास आम्ही वेळोवेळीं असा नवा मिळालेला संग्रह प्रसिद्ध करीत जाऊं. ज्याला जें नवीन पद मिळेल तें त्यानें आमच्याकडे अगर सेक्रेटरी भारत-इतिहास-संशोधन मंडळ यांजकडे पाठवीत जावें अशी विनति आहे. ]


### अ

अगबाई सांवळियाचा ... ८९
अग या कृष्णेच्या निजतटीं २५५
अगा मी शरण तुला आलों ३३५
अचल अमल आद्या ... ५३
अर्जुनि कां न कळे ... ३७७
अर्जुनियां तरि हरि .. ९४
अधिष्ठानी सिद्धासन .. २१३
अनाथ मी दीन ... ... १७८
अनाथाच्या नाथा .. ... १८३
अपारा अगम्या ... ... २५४
अबला मति प्रार्थिते ... ९५
अभय वरद कर . . २७५
अमल कमल दल ... .. २३७
अमुचें ब्रह्म हरी ... ... २४९
अमोल काया ... ... ३६५
अरुपानंदीं अद्वय श्रीगुरु ... २५७
अरे हो कृष्णा ... ... १२८
अरे हो रामा ... ... ३३
अरे श्रीरामा ... ... ४६
अशी मनोवृत्ति राधिका ... २१७
अहारे मेल्या कृष्णा ... ७९
अहो अंजनी नंदना ... १९७
अहो लाभ सहज घडे .. ३३८
अंजनीतनय रामदूता ... २६
अंबे तुझी देखियली ... १७

### आ.

आजचिया लाभा ... ... १९९
आज दिवस हा ... .. ३१४
आझुनी कां रे नयेसी ... १४९
आटोपितां नाटोपेची ... १८२
आत्मा आपण विश्व ... ३२१
आत्मा गणराज ... १९३
आत्मारामा सुखैकधामा ... १०८
आत्मा हा अनुभवीं ... २७०
आधी कैसे मज ... ... १७४
आनंदी जाल्हना पुरी ... २५९
आनंदी त्र्यक्षरी मंत्र ... २६०

आम्ही लिंगाइत वाणी ... ३४०
आमुचें ब्रह्म कृष्णालटीं ... २०७
आशक आम्ही पिसे ... १०५
आहारे ऐसें कैसें ... ... ८८
आहारे कैसें केलें .. ... ३१९
आहारे रांडेच्या पोरा ... ३७२
आहारे रांडलेका ... ... ९
आहारे विधात्या .. .. २१८
आहें मी पतीत ... ... १९१
आहो आहो गुरुराजया ... ३१७

इ.

इतकें मातें द्यावें ... ... २०२
इतुकें देईं दान ... ... २४६

उ.

उत्तम हा नरदेह ... .. ३६६
उत्तम नरदेह तुला ... ३६८
उद्धवा सख्या तुम्ही . १०१
उदो बोला उदो ... ... ३२५
उमज उमज मन ... ... ३७१
उमजे मचित्तारे ... ... २७७

ऐ.

ऐक यशोदे बाई ... ... ७५
ऐकेंगे सखये बाई ... ... २५३

क.

कणबाळा दयाळा ... ... ३८
कमलनयन रामा ... ... ४३
कमलनयन हरीगा ... १५७
करावें स्मरण ज्याचें ... २११
करि कपिराज सखा ... २७
करुणाघन दिनबंधु ... २२०
करुणा शोडपी हे ... ... १९२
कांजी हें जग ख्याल ... १६०
कां न मुखीं हरिनाम ... १७१
कां माझी तुजलागीं ... १२७
काय करिसी गतिरे ... १२४
काय केलें रांडलेका ... २१०
काय तें सामर्थ्य ... १७३
काय माझी गति ... ... १४३
काय माझी तुम्हालागीं ... १७५
काय म्हणुनि सांग ... १३६
कां रे न भजसी ... ... ३७४
कां रे भजसी ना या ... २८१
कां रे हरि भजनावीण ... १६९
कां वेळ असा लाविला ... २१६
काहो भजना भावें ... ३३७
किती तरि तुज शिकवूं ... ३३२
केलि कशी मोहनी... ... ७०
कोणीकडे तुम्ही जातां ... १०६
कृपा होतां श्रीगुरूराजयाची ३१५
कृष्ण कृपालय ... ... १५६
कृष्णा कां रे असा... ... ७१
कृष्णातीरीं त्रिपुटी माजी ... २५६

ख.

खटपट किती नटुनी ... ३७८
खेळ पोरा भोंवरा ... ... ३२३

ग.

गडिया नदि दूधडिया .. ३६०
गडे आम्हाकडे पाहीं ... १०३
गारे गा राम गारे ... ... ५६
गारे श्रीरगाला उमगारे ... ११४
गुतोनियां पडलों ... ... २०३
गुरु तर सुख मज ... ... २९६
गुरू दयाळा परम कृपाळा... २९४
गुरुनाथजींचें स्वरूप ... ३१६
गुरुनाथ निरंजन साचा ... ३००
गुरुनाम तुझें सुखकारी ... २६८
गुरुरायाचा हस्त ... ... २९९
गोकुलपति हरिये ... ... १३१
गोकुलवाल्या मज ... ... ११३
गोकुळीं गोवळ वेष... ... ६७

गोविंदजी पाय तुमचे ... १४५
गोविंदनाथ पचाक्षरी मंत्र... २६२
गोविंदा मधुसूदना ... ... १२५
गोविंदा रामा कृष्णा ... १२६
गोविंदा रामाहो ... ... ११५

घ

घ्यारे वदनीं हरिनाम ... ३४९
घेईरे गड्या गुडगुडी ... ३८३

च.

चक्रपाणी काय मनीं ... १५५
चाल चाल चाल चाल ... १०२
चाल चाल दयाळा रामा ... ४९
चाल चाल वेगीं कृष्णा ... १४०
चाल गे सखये आतां ... ३०३
चालगे सखये जाऊं . . ३०२
चाल त्वरें हरि ... ... १४६
चाल सख्याजी ... ... ९६
चित्त चक्रचाळा ... . . ३२४
चेटकी मोठा नंदाचा नंदन ७२

ज.

जगदात्मा लोचनीं पहावा ... ३३४
जगद्व अक्षरें चारी ... १५
जननी जनक माझा ... १७९
जन्मोनियां जगीं ... ... १८७
जयजय आदि भवानी ... १६
जयजय बलभीमाहो ... २५
जयजय श्रीरामराम ... ५२
जयजय हरिनारायण ... १६३
जयदेव जयदेव जयजी योगींद्रा २६५
जयदेव जयदेव जय विघ्नहरणा १४
जयदेव जयदेव जयसद्गुरुनाथा २६४
जयदेवी जयदेवी ... ... ३४१
जय रविजा तापी ... ... ३३१
जरि तुम्ही राम न गाल ... ४१
जरि पाहशील अंत ... ११६
जळो मागल्याचें जिणें ... ३५३
जळो याची हे मुरली ... ९०
जागरे जाग बापा ... .. १४२
जागा भगवद्भजनीं... .. २४७
जाणुनि भजरे ... ... २८०
जाणोनियां आधीं ... ... १८६
जाणोनियां भ्रमसी ... ... ३७९
जो विश्व व्यापुनि ... ... २४१

झ

झर झर झर झर ... ... ३६४

त.

तनु उत्तम श्रीनाथे ... ३६३
तनों तनों तों तननन ... ८६
तरि का या कृपणता ... १९०
तरि मग तुज काय ... १६७
तरि मजवरी करी कृपा ... १०९
तारक ब्रह्म विटेवरी ... २३०
तारक श्रीराम राम ... ... ५७
त्यासम मूर्ख जनीं ... ... ३५७
तुकाराम चतुराक्षरी . . २६१
तुज काय म्हणावें ... ... १३३
तुझा मुखडा अजब ... १०४
तुझिया रंगणीं नाचावें ... १४७
तू करुणाब्धी म्हणविसी ... १६१
तू जपरे जपरे जपरे ... ३६
तू नाम जपसी रे वाचे ... ३५०
तूं पाहेरे रूप ... ... २७३
तूं माझा धनी ... ... २४३
तें तूं ब्रह्मचि पूर्णपणें ... २५१
तें रुप देखिलें नयनीं ... २८
तें रुप पाहावें ग बाई ... २६७
ते समदर्शी भलेरे ... ... ३४२
तें ब्रह्म गोजिरें हें ... ... ६६
त्रेतायुगीं रामें दिधलें ... २१४
तो धन्य वैभवाचा ... ... १८

तो नर धन्य जनीं... ... ३२२
ता मज आवडे हो... .. ३२

द

दयानिधे जयकेशव ... ११२
द्रव्या कडोनि उन्मत्त . ३८१
दाता धन्य गुरूहो .. .. २९७
दीन दयानिधि कां रे १६२
दीनबंधु भवताप निवारीं ... १२१
देव मग दुर नाहीं .. ... ३३९
देवा तुझ्याहुनी बरे ... २०१

ध

धन दरकुटें भगी ... ३७०
धन्य धन्य धन्य . . २९८
धन्य श्रीगुरु, गुरुनाथ भोळा २९१
धन्य श्रीगुरु, गुरुनाथराणा २९५
धराया हरिभजनाचा . ३४८
धरीं रे मना हरिनामीं ... ३५१

न

न करी स्मरण त्याचें २१२
न मागों भिक त्याला . ३५४
नलगे मज कांही ... .. १८१
नवल झालेंग साजणी ... २८४
नसे नाम ना रूप ... ... २६३
नाच नाच वा कसा .. ६५
नाथ दयाघन हो ... .. ३०१
नाथ सखा सुखदानी ... ३०६
नाथा जडलेंरे गोविंदा ... ३१०
नामामृत रसरसने . २९०
नाहीं ज्या विकार रे ... २५२
निज जाग जीवना . . २१९
निजसुख साधनीं .. ... २६९
निज हृदयीं गुरुरूप ... २८९
निबिड सघन हे ... ... ७७
निश्चळ ससमिर यमुना ... ८३
नेणुनियां आत्मस्वरूपा ... १०
नेणे भक्तिभाव ज्ञानकळा ... १८५
नंदनदना अहो सुखसदना... १३९
नंदनदना विश्वसूत्रा .. ११७
नंदाच्या नंदना ... ... ११६

प

पतित पावन अभिधान ... ३११
पतित पावना रे .. ... २३२
पतित मी साचा . . १८०
पवनतनुज सुखदानी . ३१
पांडुरग स्मर अभग ... २२५
पार्थां ते तरले ... ... ३५२
पार्वतीचा पति शिव भोळा... २३
पावना श्रीरामा येईं .. ५१
पाहासी अजुनी काय विठोबा २४४
पाहासी अजुनी काय रामा ४५
पाहासी कां निर्वाण ... २४५
पाहुनी निरुपम ... ... ३१२
पढरपुरवासिनी ... .. २२८
प्रभुरे आत्मारामा ... ... १२०
प्रचळ स्वमनिं मज ... ३५५
प्रियकरा भुवनसुदरा ... ११८

फ.

फिररे फिर मागें ... ... २७९

ब

बाई माझा प्राणसखा . . ५०
बाई मी माणुसपणावेगळी ३२६
बाई म्यां देखिलें लोचनीं .. २८३
बाईल पैशाची पैशाची . ३८०
बाप श्रीनाथ गोपाळ ... २०८
बारे ये विठ्ठला आतां ... १९४
बुद्धीचें आसन ... २०९
बौद्धयाचें मदनांत ... ... ३२७

भ.

भक्तोत्सल भवशमना . १३७
भक्तोत्सला त्रिभुजनार्दन ... १५८

भजन करी रामाचे ... ३४७
भजभज गोपाल .. १११
भजभावें विठ्ठल बरवा .. १२
भज मनुजा हनुमान .. २९
भवपुरीं बुडतों हरि ... २२३
भवभय वारीं हरी . . १५४
भावें जडलों तुझे पायीं .. १९५
भावें जो हरिनाम ... ... ३८२
भावें भजतां हरी ... ... २३३
भुवनसुंदरा—सुंदरा ... १४१
भूभार फाराचि ... ... २

**म.**

मग तूं ब्रह्म मइयारे ... ३६१
मज अनाथाची मती ... १९८
मज का उपेक्षिसी रामा ३४
मधुर अलापें सुरस... ... ८२
मधुसूदना कमलनयन १२०
मन भजभजरे आतां . ३०७
मन हे मुरालें . ६
मना तूं भजरे गुरु गोविंद... २८८
मना रामपदाबुजीं ... ३७५
मनू ऐक तनू राऊळीं ग ... २७४
महादेव महादेव ... ... १९
महाराज आनंदीहो... .. ११
मार्गे कोणाचें त्वां . . ... १७६
मार्गे गेलें मागिल परी ... २०६
मार्गे बहुला जनां तारिलें .. १८८
माझा जाऊ पाहे प्राण ... २०४
माझी कां न हरी .. ... १४४
माझा तुला काळजी ... १५२
माझी विनवणी ... ... २२२
मां पालय गोपाल . . ... १०७
मां पाहिकृष्णा . .. १३०
माय बापा सद्गुरु ... ३३०
माय बाळालागीं .. .. १८४
मारुती राया साभाळ . ३०
मालवी सहज भवाला ... १६४
मिरविती व्यर्थ जनीं ... ३५६
मी बाळ तुझें तानये .. २२१
मी बाळ तुझें लडिवाळ ... १५३
मी सागतसें तुजपाशीं ... २१५
मुनीजनमानसहसा .. १३५
मुरली वाजविली . ... ८१
मोठ्या मौजेचा पंढरिराणा २३४
मौज काय पाहातोसि २२९
मंद मंद वाजवी . ... ८५

**य**

यदुकुलभूषणासि . ... ९८
यदुराज वृंदावनिंगे .. ... ८७
यशोदे बहु दुःख गांजिलें ... ७३
यागे यागे गुरुपायीं ... ३०८
या गोविंदें मुरलीनादें ... ८४
या हरिची मज आवड . . ६९
येई सांवळे विठाबाई २३१
येईं सीतापति रामा ... ४०
येउदे दया .. ... ... १५१
ये कसारी मी दीन ... १२२
येगे येगे सांवळिये ... ... १२९
येबा गुरुराया ... ... ३०४
ये बा ये गोपाळा . ... १७७
ये बा ये दिनबधु . . ... ५
येरे कृष्णा गोविंदा ... १४८
योगियांच्या नये ... ... ९९

**र**

रघुविर राजाराम ... ... ४
रमारमण रमानाथ... ... ९२
रस रसने नाम ... ... ३४५
राघोबा श्रीराम ... ... ४७
रामकृष्ण नाम सुगम ... ३३३
रामकृष्ण राम राम ... ४२

रामजनीं या विजनीं ... ४४
राम न कां स्मरसी ... ३९
रामनाम मंत्र थोर ... ... ६१
राम म्हणा तुम्ही राम ... ५५
राम वरिला सुखदानदाई ... ५८
राम सोयऱ्या सुखदायका ... ५४
रामहरे रे कृष्णहरे ... . ३४६
रायें दुर्योधनें गांजितां .. १८९
रूप तुझें नयनीं .. .. २००

ल.

लज्जा तूज हरी .. ... १३४

व.

वक्रतुंड गजकर्ण ... ... १३
वदनीं राम सखारे .. ... ६०
वाजविलीस त्वां कशी ... ७८
वानरसेना घेऊन ... ... ३
वायु तनय महाराज ... २४
वाटेवरि हरि उभा ... ... ७६
विठ्ठल त्रै अक्षरा क्षरातित २२४
विठ्ठल रुखमाई . . २४२
विठोबा चाल गड्या ... २३९
विठोबा पाहसि अजुनीं काय २३६
विठोबा व्यापक जनीं विजनीं २२६
विनवणी ऐक गड्यारे ... २३५
विमल कमलदल ... ... ११९
विमल निजरूप ... ... ३१३
वियोगानळ जाळित ... ९३
वृथा मनीं कोण करी चिंता ३७३
वृंदावनीं हरिनें . . ... ८०

श.

शिव शिव शिव काय गती ३८४
शिव शिव शिव हर ... २२
शिव हर हर ... ... २०
शिशुमिसें तुज हांका मारी... ५४
श्रमसी काय उगा ... ... ३४३
श्रीकृष्णा कमलावरा ... २४०
श्रीकृष्णा मनमोहना ... २४८
श्रीगुरुचरणीं रतलें ... ... २९५
श्रीगुरुची माय ... .. २८५
श्रीगुरुच्या निजस्वरूपा ... २६६
श्रीगुरुच्या पदीं ... ... २८६
श्रीगुरु दयाळ भेटेल ... ३०९
श्रीगुरुनाथ दयार्णव ... ३२८
श्रीगुरु पदीं रतरे ... ... ३२८
श्रीगुरु मूर्ती तुजप्रती विनति ३२०
श्रीगोविंदा कां न भजावें २८२
श्रीभगवंतीं प्रीति जडावी ... ३३६
श्रीरघुविर सुखकर येवो ... ५९
श्रीराजा रघुनाथ ... .. ३९९
श्रीराधावदनारविंद .. ... ६८
श्रीराम जयराम ... ... ३७
श्रीरामा रावणारी ... ... ३५

स

सखयानो जा जागे ... १००
सख्या कठिण काय ... १५९
सखये गुरुनें नवलाव .. २८७
सखये आनंद नदराजगृहीं ६२
सखे निर्विकल्पतरु ... ... २७८
सखे मज भेटवीं ... ... ३०५
सच्चिद्धन आनंद आनंदी ... २५८
सजणे कृष्णा जा वेगीं ... ९७
सजणे जाई आणींगे ... ४८
सदय बहुत मृदु ... ... १७०
सद्गुरुनाथ रायें ... ... ३२९
सद्गुरु मायबापा ... ... २९३
सद्गुरुवांचोनी देव ... २०५
सभाग्य भाग्यें ते ... ... ६४
सयेग बाई पुरला ... ... २२७
साधन आणिक कां ... ३४४
सांब सदाशिव भजा ... २१

सार घ्यावा हा अनुभव ... २७२
सावध हो ऐकें निजमना ... ३१८
सावध होइ मना ... ... ३७६
सांवळ्या पंढरिनाथा ... २३८
सांवळ्या सगुण सुंदरा ... १५०
सांवळें ब्रह्म तें मज ... ६३
सांवळी सुकुमार मूर्ती ... १३२
सूर्यवंशीं अजराज पुत्र ... १
संसार नव्हे हा सार ... २७१

ह

हरि अघभय सहरणा ... १३८
हरि आवरीं माय यशोदे ... ७४
हरिगुणीं लागला ... ... १६८
हरिभजनाचा धराया ... १६५
हरि वाजविशी मधुर ... ९१
हरिवांचुनि काय जिणें ... १७२
हरि सांग तुज नयेचि ... १६६
हरि हा भज भजरे... ... ११०
ही तनू प्राप्त तुजला ... ३६७
ही तनू बहुत सुख घनू ... ३६९
हीनदीन बहु संकटीं ... २५०
होईल काय गतीरे... ... ३६२

क्ष.

क्षणभंगुर नरतनु ... ... ३५९

ज्ञ.

ज्ञान विचार बहू अवलोकिले ३५८


# देवनाथमहाराजांच्या हिंदुस्थानी पदांची अनुक्रमणिका.


अ.

असिया हरदरसन को ... ४०४
अचरे भयो मनहीमो ... ४४१
अधर धरि रिया शाम ... ४३९
अपने घट माहबे .. ... ४५०
अपने मनकी . ... ४५३
अबकर दिल दिवाने ... ४७३
अंतसमयको आवे . .. ४६५

आ

आज मोरी सांवरियासों ... ४०७
आटो जाम हरबिन ... ३९१
आधीं रैन सैन कान्ह ... ४३१
आसतन मान ... ... ३१३

उ.

उधोजी प्यारे ... ... ४४२

ऐ.

ऐसी कैसी बन्सी ... ... ४३४
ऐसो मन जान ... ... ४८८

क

करले बे साचे पीर ... ४५६
कर हरजीको ध्यान ... ३८९
कहुं बालक कहु तरुण ... ४८७
काहेको मेरे सतावत ... ४२१
केतो कहिये कान्हा .. ४१७
कैसी मोहन बन्सी... ... ४२९
को खेले तोसु होरी ... ४४५

ख.

खटपट सगरी ... ... ३८७
खासा ये तन पाया .. ४५९
खासी ये नरदेहीरे... ... ४६०

| | |
|---|---|
| खेलुगी आज मैं होरी ... | ४४४ |

**ग**

| | |
|---|---|
| गुरु कृपाका अंजन ... | ४६९ |
| गुरु द्यांव ... ... ... | ४५२ |
| गुरुपद पायाजी .. .. | ४६३ |
| गोकुळवाला ब्रिजवासी ... | ४०३ |

**घ**

| | |
|---|---|
| घटघटमों बिराजे ... ... | ४६८ |

**च**

| | |
|---|---|
| चल शामसुंदर .. ... | ४४८ |
| चलोरी सखिया ब्रिजको . | ४३० |
| चुहे बादल उडे ... .. | ४५१ |
| चोर गुंज लेजावे बे ... | ४७२ |

**ज**

| | |
|---|---|
| जमुना तटपें ... ... | ४२८ |
| जाग जाग भौंर भई ... | ४२४ |
| जा मनमोहन बेग . ... | ४१५ |
| जुग जुग जियो . .. | ४९० |
| जो तन लागे ... | |

**त**

| | |
|---|---|
| तट जमुनाको तीर ... | ४१२ |
| त्रिकुट शिखरपर ... ... | ४६२ |
| त्रिभुवनको पालनवाला ... | ८ |
| तुम सदा मगनमों ... ... | ४७१ |
| तेरे पदरसकी प्यासी .. | ४०८ |
| तेरे बन्सीनें कान्हा ... | ४१६ |
| तै जनम अकारत . .. | ४८१ |

**द.**

| | |
|---|---|
| दइमारे कैसी बन्सी ... | ४३८ |
| दरद न आवे बेदरदीको . . | ४११ |
| देख सुरत टक लगी ... | ४४९ |
| दो दिनकी जिनगानी ... | ४७६ |

**ध**

| | |
|---|---|
| धनमान प्रवासी ... ... | ४८० |

**न**

| | |
|---|---|
| नहि मानत राम सबे घट ... | ३९३ |
| निगुरे क्या कियावे ... | ४६१ |
| नंद नंदन कान्हा ... | ४१८ |

**प**

| | |
|---|---|
| प्यारे उलट कमलमों पलट | ४६७ |
| प्यारे मौज बडी गुरु घरकी | ४६४ |
| पावो गे सुजान .. | ४५७ |
| पिपीलीकासों ब्रह्म तलोंजी | ४५८ |
| प्रीतकी रीत कठीण | ४५४ |

**ब.**

| | |
|---|---|
| बजी कान्हा बन्सी ... ... | ४३३ |
| बाजिरी बजिरी माई | ४२६ |
| बन्सी कुंज बनमों . ... | ४२७ |
| बन्सी बजावन हारे .. | ४३५ |
| बरसत आयो मेहुला ... | ४०५ |
| बालमजी बालमाजी ... | ४०१ |
| बिना भगत भगवान . | ४६६ |
| ब्रिजमें होरी राधा ... ... | ४३७ |
| ब्रिजवासी नंद कन्हया ... | ४१६ |
| बैरन रैन गई ... ... | ४४० |

**भ**

| | |
|---|---|
| भई भवर उठ जाग ... | ४८३ |
| भजमन शिवहर भोलाजी . | ३९० |
| भली फकीरी छाड जिकीरी | ४७८ |

**म.**

| | |
|---|---|
| मतवारे तु ऐसी क्या ... | ४३२ |
| मनमोहन नंद कन्हय्या . | ७ |
| मनमोहन सखि मोरा | ४२० |
| मुरलीवाले छेल छबीले .. | ४५२ |
| मूर्शद मेरा यार ... ... | ४७४ |
| मैं तो नहि जानी ... ... | ४८९ |
| मोरे नैनन छाया .. ... | ४०२ |

**य.**

| | |
|---|---|
| या जगभऱ्या तो क्या ... | ४७९ |

येरी प्रीत मोहन ... ... ४२३
ये ससार बडो दुखदायी .. ४९१

**र**

रमते नाथ फकीर .. ... ४८६
राम न जाने काहा .. ४७५
राम न जाने तो ... . ४००
रामबिना कछु और न जानियो ३९६
रामबिना कछु और नहीरे ३९२
रामभजन बिन वृथा भयो ३९५
राम राम राम राम भजले ३९८

**ल**

लगन लाग रहिराम .. ३९७

**व.**

वापरसों तनमन वारो ... ४०९

**श**

शास्त्र कोसोख सखि . ४८५

**स**

सखी मेरे पिय कौन बतावे ४०६
सबमो कुदकर मरत ... ४८४
साथी कोइ नहि अपना .. ४७७
सुदर न पायी अखियो माथी ४१९
सुनरी सुन माई ... ... ४१४
सुनरे सुन मनवा ... ... ४७०
सूमके माल को .. ... ३८६
सोची अकलवत बडा ... ३८८

**ह**

हमतो बैरागी .. ... ४५५
हरि मनमोहन ... ... ४२५
हित तेरो तू राम सुमर ... ३९४
हे मतवारे ऐसी ... ... ४३६
हो तैं जान दिवाने सच्चा .. ४८२
होना खेलुगी होरीरे .. ४२२
होरी खेलन आयी ... ... ४४७
होरी खेलन आयो कन्हया ४४७
होरी खेलन आयो मतवारोरी ४४३


## देवनाथांचा अकारविल्हेनें

# शब्दकोश.


**अ**

अकल्पित = अकस्मात ... ३१४
अघमर्षण दुर्वासाचे ... ११७
अचडें बचडें छकुडें . ३७०
अजन्मजन्मा... ...२ ( ६६ )
अजामिळ ११५, ३६, ३७, ५३, ५७
अट्टहास्यें २ ( २१ ), २ ( ५६ )
अतसि = जवस ... ... ७
अतूट = अखंड .... ... २२४
अदेख देखणा* . ... २६२
अधित = अभ्यासिलेलें ... ३७१
अनुहत ध्वनी ...२९१, ६
अन्नसत्र दुर्वासाकरितां ११७
अपरोक्ष ... .. २६१, १३३
अपगिलें = जवळ केलें ३४, १५१
अपांगपातें = वांकड्या नजरेने ७६
आबा बाबा तात्या काका पक्षी-
पावन सपत्तीचे... ... ९

अमरुपी . .. ... ५८
अमाय = मोजमाप नाहीं असा २६३
अरूपरूप ... ... ... १३२
अरुवार = मऊ, नाजूक, सुबक १०३
अरुषभाव ... ... १२५, १४०
अवलीला = सोडचा ( नाम ) २३७
" = सहजगतीनें ( क्रिया-वि ) ... ... .. २६५
अविट = कधीं न विटणारी ३११, ३३७
असमसाहस = असह्य, भयंकर २७०
अहंब्रह्म हें स्वरूप ... .. ३२१
अहिल्या .. .. ३६, ४०
अहं ब्रह्मास्मि ऊर्मि जिथें आटे २७२
अनुपकारी गर्वी म्हैसा ... ३५४
अळुमाळ = अल्प .. ९, ९५
अंतःकरणाचे डोल्हारीं २ ( ६४ )

आ

आकळणें = माहिती होणें ... २९५
आकलिला = प्राप्त करून घेतला २७
आकळून = कवटाळून ... ३०२, ११६, ३८२
आक्राबाई = भिकारपणा . ३८१
आतळणें = संलग्न होणें, चिकटणे २२४
आतुडलें = सांपडलें ... ६
आत्मनिवेदन ... ... २२०
आत्मलिंग ... ... ... २२२
आत्मानात्मविचार .. ३१८
आत्म्याला तीर्थराजाची उपमा ३२१
आदौ पल्लवि उचलुनियां घ्यावें, मग परतें लोटावें १३३
आम्ही लिंगाईत वाणी .. ३४०
आरतें = आवडे ... ... १४
आरसचित्त... ... ... १३२
आर्षभाव ... ... ... १४०
आसुडणें = जोरानें एकदम ओढणें, फोडणें ... ... १६४
आळ = हट्ट ... ... ... १२१

इ

इहामळमूत्रभोग ... ... ३१८

उ

उगली = उगी. चूप ... ९९
उगाणा = उगवणी, वसूल ११४
उघड समाधि .. ... ३६६
उजदारा = अगदीं पुढील दर वाज्याला ... .. ३६८
उठाण = जोर करणें, उसळी मारणें .. ८२, १०३ १५९
उठाणें = चिन्हें . ... २(१३)
उडाण = उठाण, उत्कंठा, जोर ५८
उतारी = प्रवासी ... ... २५८
उदित = अनुभव घेतलेले... १०३
उदोपद .. ... ... ३२५
उदोबोल .. ... ३२५
उन्मनीचा घांट उल्लंघणें ... ३१२
" " चढणें २७५, २९९
" " च्या माथा नांदणें ... ३०२, २६५
" " माथा ३२२, २६३
उपमन्याला क्षीरसिंधू ११७, १६२, १६७, ३६
उबगली = कटाळली ... १५२
उभारा = उत्साह, जोर, अवडंबर, यत्न ... ... ८६
उभारी = उत्साह, जोर ... १५८
उमाळा = हुंदका ... ... २३४
उर्वरित = शिल्लक, राहिलेला २७१
उसग = उत्संग, मांडी, ओसग ... ... १३७, १६०

उसगा = मांडीवर, कडेवर २४७, १६०, १२९
उसत = विसावा ... .. ४०

## ओ

ओहरें = वधूवरें .. ...२ ( ३ )
ओवरी = खोली ... १५०
ओजा = तेजस्वी ... ... १५१
औटपीठ गोल्हाट ... ३२०

## क.

कज = कमळ . १३६
कजनाक्षा = खंजरीट, पक्ष्यासारखे जिचे डोळे आहे ती ९५
कजाक्ष = कमलाक्ष .. २२१
कडकडी = गर्जना करितो ... १४५
कटिमाज = कटिमध्य ... १०३
कणवा = दया . ११५,१३८,१५१
कनकवसना = पीतांबरपरिधाना १५१
कपाटी = गुहा ... .. १०६
कपाट = द्वार . ... १०६
कपाळी = समुदायात जमलेले, २,३६
कबुकंठ = शंखासारखी मान १०३
कर्पूर दीपाचे ऐक्याप्रमाणें आत्म्याचें व ब्रह्माचें ऐक्य २७५
कर्मवल्ली हें ईश्वर देहा ... ३,७
कर्ममोचना = कर्मबीज भंजना ४२, १५१
कलाप = समूह .. . ८
कलुषालक = पापनाशना १६१
करकर = किरकिर ... ३८१
करकर मचणें = दारिद्र्याची किरकिर चालू रहाणें . ३८१
कांटे अंगीं उठती .. .. ३८४
कांतार = अरण्य .. ... २३९
कानडा ... १२५, २२७, २३९
कामख्याळ ... ... ... १२१
कामकुरंगी = कामविव्हल हरिणी ८३
काया छाया मायाही त्रिपुटी काव्य कळा विकळा विफळा येक नाहीं जरी हृदीं प्रेमकळाही .. ... ... ३५८
काल्या = दहींकाल्याचा प्रसाद ११३
काष्ठपुतळी = कळसूत्री बाहुलें २४
काळ चौघडा वाजवी .. ३७०
काळाच्या मुखीं काजळ मारणें २७३
कर्दम = कोंचडा .. ... १४०
कुचिंद = दोन डोकी, चार हातांचें पोरगें .. ... २८८
कुडा = वांकडा, दुष्ट ... ३७०
कुंदर = कुधा, गवत ... १५१
कुंदी = मारणें .. .. ९
कुंभा = कोंभा, मूळ . ४,२२
कृष्णरूपाचें वर्णन ... ६३,६६
कृष्णाचें वृषभदोहन . ७१
केंवा = किंमत ११५,१२१,१२५,१४८

## ख

खगारीवहन – विष्णु . ९३
खिजतो = खिजरी येतो, चिडतो ३५४
खेळीं खोविलें बाळपण ... २९४
खोपा = पांखराचें राहण्याचें घरटें, निवास .. .. २८८,३३
ख्याल = ( फारशी शब्द ) नेहमींचा खेळ किंवा सवय १०२

## ग

गजेंद्रमोक्ष .. ... ... ११५
गणिका पिंगला ... ११५,११९
गाही = साक्ष ... १६६,२९४
गिवसुनी = पकडून २,५८,१०,६७, २१०,१४५
गुणग्रामा .. ... ४९
गुंथ = भय, गुंतागुंत ... ६२२

गुप्त गंगेचा थाट .. ... २९६
गुरु आत्म्याचें देह नगरीमध्यें राज्य ... ... ... २७३
गुरुगुज .. .. .. ३१८
गुरूला भव वैद्याची उपमा २७३
गोइंद्रियचाळका = इंद्रियरूपी ओढाळ गुरांचें दमन करणाऱ्या .. २६२,९५
गोपती असें कां म्हणतात.. ११७
गोपी प्रेमानें वेडावल्या ... ७८,७९
गौप्य वस्तु ... ... २६२
गोमटी = सुंदर .. . ९०
गोरटा = गोरा .. .. ९९
गोरसचोरा (यांतील रहस्य) १३९
गोल्हाट औट पीठ .. .. ३२०
गोल्हाट औट पीठ .. ... ३२०
गोंवि = गुतागुत, संकट २६४
गोष्पद . .. ११०
गोष्पदवत भव मग सहजें .. ३६

## घ

घट मठ भग ... .. २९९
घडे येणे त्रिभुवन सुकुमारा २,२५,१,२३
घनवटे = दाटे ... २९१
घेपुदेपु = बिनव्याजी देवघेव, शुष्क भानगड ... ... ३६४
घोंटलें = स्थिर झालें ३१३
घोर = काळजी .. ३६

## च

चंग = ज्यू लोकांचें वाद्य .. ३६९
चांग = चांगला . ...२ (६२)
चतुर्थस्थानीं गुरु भेटे १०५
चोजविलें = कौतुक दाखविलें २९८
चळथा = खेपा, फेऱ्या २१३, १२१
चहूंभुजीं कवळणें = . ११५
चांचरली = बावरली . ३६३
चार सहा अठरा = वेद शास्त्रें पुराणें ३००, ३१३, २०० १०५
चारी वाचा = वेदचतुष्टय ३२०
चिद्घनचैतन्य, निर्गुण साकार अवतरलें भक्तिकाजागे माय १३२
चित्रगुप्त ते जया विलोकिती ९
चिंद = खेळ, ठगणूक . २८८
चेटकी = नाटकी .. .. ८१
चेतना = सद्सद्विवेकबुद्धि २९४
चोखडे = सुंदर . .. २२५
चोज = कौतुक ... २१३, ३१४
चौकडिया ... .. ... ३६०
चौर डोल . ... ... ३६०
चौऱ्यांशी लक्षयोनी .. १४०

## छ

छैलछबिला = रंगेला, रसीला २१३

## ज

जगजेठी = जग जिंकणारा ३१३,८३
जगडबर ... ... ११५
जगद्भास = जगत्पसारा ... २६०
जगात्रिविध भाषण .. ... २९३
जग = जधा ... ... १०३
जननी जठरीं नवमास ... २९४
जळत्या घरच्या वासा ओढणें ३५९
जात पळोपळ वैभव .. ... ५६
जार स्त्रियेचा ढवा .. . ३८२
जास्वदांवरील स्फटिकाचा मणी २९९
जोगवा ... ... . ३२५

## झ

झालीसे या कोटीची येथोनि आजि मर्यादा .. ... १२६

## ट

टाकमटिका = टाकटिकी, डौलीपणा ... ... ३८१
टिमटाम = नटणें मुरडणें ... ३८१

## ठ

ठकडा श्रीकृष्ण ... . ८२
ठक पडले = चकित झाले ६, २२४
ठेल = पुष्क ... ... २५८
ठेला = नटला .. ... २५८

## ड

डौरवी = नाश करी ... १८

## ढ

ढवळले = प्रकाशिलें, अति शुभ्र झालें .. . . ३१४
ढवा = नपुंसक राडेच्या पाठीमागें राहून गाणेंबजावणे करणारा ३८२
ढिसाळ = ढिसूळ, थोर १५, १२५

## त

तकसीर = गुन्हा ... ... २५०
तनुचि प्राप्ति महत्‌भाग्य . ३४९
तवर = हट्ट ... .. ... ९
त्वपद तत्पद असिपद .. ८३
ताफा = तरायची सांगड ३३,४९
तूर्या ... ... ... २९९
तोषक = जाजम, तढव ... ३८२
त्राहाटिले ... .. ... २६
त्रिगुण . ... . ३२०
त्रिताप = त्रिविधताप ... ९१,९९
त्रिदैवत ... ३२०
त्रिपुटी गाळोनी १३२,२२७
त्रिशुद्धी = निश्चयानें ३१८, ३४७
त्रुटी = चुटकी, अठरावेळ पापण्या हलवण्यास वेळ लागतो तो ... . . १०३

## थ

थाळा वाजणें (अनुहत ध्वनीचा) २९१
थुंका झेलणें .. ... ३८०
थोकलें = थांबलें ... ... ३१२

## द

दरकुटें = दरकदाऱ्या, सरदाऱ्या ३७०
दृष्टि मुरडून घेणें = मनोवृत्ती बहिर्मुख असतात त्या अंतर्मुख करणें . . ३३९
दृश्यतरंग = जगदाभास २८७
दशहृदय ... ... ३२०
दशवायु .. .. . ३२०
दाटुगी = श्रेष्ठ, समर्थ, थोर ३०२
दाथर = उखाडा २७४ ३६३
दीर्घलहू = दीर्घशंका, लघुशंका २९४
दुधड्या . ... . २३५
देखणा = पाहणारा २६२
देव भावाचा भुकेला ... ६५
देहकर्म खोटें .. ... ३८४
देहुडा = दरवाजा . ... ७६
देशिक = मार्गदर्शक गुरु २९५,३०२
दोप्रहराची छाया . २९४

## ध

धडधडित तारुण्य येणें .. २९४
धडफुडा ( मोठी टीप मुळांत ) ३७०
धमकटे = द्वाड कारटे . ९५
धरणें उठणें... . .. १७२
धवलें = धवल झाले, प्रकाशपूर्ण झालें ... २८७
धांगडी = द्वाड मुलगी . ७६
धापा दाटणें = श्वास कोंडणें ९९
धाये = संतोष पावे ... ३११
धाली = तृप्त झाली ९९
धालें = सुखपूर्ण झालें २८७
धावणें .. ... २२३
धांवणें करणे . .. २२३
धांवण्या धावणें ( मोठी टीप पहा ) ... . ३१०
धिंवसा=धीर, आधार १२८,१४५,२९३

धुपतसे=धुसफुस करितो ... ३८२
धूम्रकेतु = गणपति .. १३
ध्येय ध्याता ध्यान धारणा... २९२
ध्रुवबाळ ... . .. ३६, ५३

### न

नकीब = देवडीवाला ... ९
नखें सांडवी कोटिवदना ... ११७
नगजोद्धरा, गजेंद्रमोचना ... १५८
नगोद्धरा ... ... .. ११७
नटनागर = नटाप्रमाणें नवेपणा धारण करणारे चेटकी नाटकी .. . १०४
नयन बेटीं पाहणें .. .. ३१३
नरकाया . . . ३७
नरदेह पेठ माजी ज्ञानदुकान ३४०
नवन = स्तुतिप्रशंसा ... २९७
नागर = नगरांतील ते नागर सभ्य शहाणे खेडवळ नव्हे शहाणा समजस १०३
नातळे = स्पर्श होऊं देत नाहीं २२४
नाथिले = सत्वाथिले शब्द पहा २५०
नादर = दुर्मिळ, फार सुंदर (आरबी शब्द) . . १०३
नामदेव = . ३६
नामनगारे १६२
नामनगारे वाजविणें ... ३६३
नामनौका .. २६
नाममुद्रा .. ... ५३
नामरसायन . ... ३४५
नामरसायन प्रेमकळा . ३५८
नामाग्निनें न जळती किमपी न पातकें ऐशीं... .. १३७
नामाग्नि स्पर्शी पावतृण दाह २६५
नामामृत रस चाखणें ... २६
नामोच्चार ३७ = नाममहात्म्य ३७
नारद नारद तुंबर .. ३६, ३७
नारायण (व्याख्या) २६२
निगम = वेद ... ... ११६
निगमागमश्रुति = वेद ... २६५
निगुती = निश्चयानें, खात्रीनें ९३
निघोट = पूर्ण, ओतप्रोत, भरगच्च .. ... .. ३७८
निज = अत्यंत ... १६७, २२९
निजकाम = अत्यत श्रेष्ठ कार्य १३२
निजगिरा = अत्यत आक्रोशाची वाणी ... ... ... १५०
निजगुज = आत्मज्ञान, अत्यत गुह्य गोष्ट ... ... ३३२
निजठाय = निजधाम, आत्मस्वरूपज्ञान ... ... २८४
निजठायीं = अत्यत एकांतस्थळीं ... ... ... २२८
निजठाव = अत्यंत पवित्र व श्रेष्ठ स्थान ... .. २९३
निजदीप्ति = आत्मतेजानें देदीप्यमान ... ... ... १३२
निजपरब्रह्म . . . . ३८
निजबळें = अत्यत जोरानें १५०
निजभाव = हृदयांतील अत्यत गुप्त गोष्ट ... ... २५४
निजमेघ = सांद्र, सजल, भरलेला मेघ ... .. २९५
निजवस्तु .. ३५९
निजवस्तूचा अनुभवी उदय २५१
निजशब्द = थोर उपदेश... २९५
निजसुखठाय = अत्यत सुखाचें स्थान ... ... ... २९८
निजसंग = अत्यंत सहवास ३४८

निजस्वरूप = गुह्याद्गुह्यतर असें स्वरूप . .. २६६
निजहटी ... . १२५
निजात्मगतीचा=आत्मोद्धाराचा २८८
निजात्मरंगें रंगुनि आपणा जागीं मिरवावें पिसें ... ... ३७०
निजानद = अत्यानंद, ब्रह्मानंद २९५
नितनवरा ... ... २३
नित्यानित्यविवेक ... ३१८
निदान = शेवटची खरी गोष्ट २४५
निदान = शेवटी आणीबाणीचा प्रसंग .. ...८९,११६,२२८
निधड्या = निधड्या छातीचा ३६१
निपट = केवल, अगदीं, समळ ३७८
निमाला = मेला ... ... १ (१३)
निरंजन = मायारहित ... ३६१
निरामय = रोगरहित ... २२६
निरामेव = निरुपाधि ... २७२
निरुते = सत्वर, तांतडीनें ... ९३
निरुता = जोरानें ... ... १६३
निश्चयात्मक ... ... २६२
निवटी ... ... .. १३४
नष्टकर ... ... १३९,२५८
निसूर = गाढ ... ... ७८
निस्सिम कल्पसा वाटे = अत्यंत आक्रांत झालासा वाटे... ३८४
नीरद = मेघ ... ... ११६
नुगवे = समंजत नाहीं ... २५५
नेणती श्रुतीपारा . . ... १३७
नेति नेति निगमवचनोक्ति .. ८३
नेमा भरल्या = नेमलेला वेळ भरल्याबरोबर ... ... ३७४
नगी समशेर ... ... ३६५
न्हाणी हरीते सप्रेम नंदराणी ६२

## प.

परवाल दाढी ... ... ९
पटकुला = पितांबर . . ३२८
पडळ = पडदा ... ... २९१
पदिशूसळा दैव ठोकी कपाळीं २(५४)
परथडीनें धरुनिया करा ... १२५
परि = प्रकार .. ८५, १२०
परिकर = पुष्कळ ( ३ ) ३, २८४
पसारे = परिचारक.. ...( २ ) २
पल्लवीं = पदरांत . १४४, १३३
पाठक नाटक चेष्टा = नाटकांतल्याप्रमाणें पाठ भाषण करणे . . ... ... ३५६
पादतळीं ... ... २३०
पापपुण्यपर्वत .. ... ३१८
पायीं वाहणा शहाणा ... २६२
पावलांवर पाऊल टाकणें = समर्थ लोकांचे मार्गानें जाणें ... ३५९
पाहतेपणा ग्रासणें ... ३२२
पाहतां पाहण्याचा ठाव उरला नाहीं ... ... ... ३१४
पालवीं = खुणेनें बोलावणें ७
पालविशी = हातानें खूण करून बोलावतोस ... ... १७०
पिकलें = ओतप्रोत भरलें.. ३१२
पिशुनें = दुष्ट ... २२३, २९४
पिंगळा ३६, ३७, ५७,
पुंडरिक के भाव भगतसें ... ६
पैठा = शिरकाव, मार्ग, दरवाजा ३०३
पोसीं = पोशी ... ... २७४
पछी = पक्षी ... ... १०३
पंचविषय ... ... २९९
पांचवा देह कैवल्य ... ३१२
पांचाची मिठी करणें ... १०५
पांचांपासून पंचवीस ... ३१८

प्रतीति = अनुभव ... ... ३१९
प्रबंध = अखंड ओघ, काव्य-रचना ३०, ८६, १४७, २३४
प्रभू उदार दात्या याचक मीच भिकारी ... ... ३५
प्रत्यय = आत्मप्रचीति ... २६३
प्राणवायू आधारा नेणें ... ३२०

फ

फरदा = जमाखर्चाचे ताळेबंद .. ... १३३, १४५
फांके पडती = उपास पडती ३८१

ब

बक = पहारा, चौकी ... १०६
बहाल = कायम ... १०७
बळयां = जबरदस्तीनें ... १२२
बाजिंदा = लुच्चा, शहाणा
बालोन्मत्त पिशाचवृत्ति २६५
बाळहट्ट = लहान बाळाची भलतीच आळ .. ... १३७
बिदीं = गल्लींत बीद ( स्त्री )= गल्ली .. ... ... ९५
बिरुदें = स्तुतिस्तोत्रें .. ९, १३७
बोहरी = बाईलपणा... ८४, ३३७
बीद ... .. .. . २२१

भ

भक्तां आणि अभक्तां जो समगतीचा विठ्ठल... ... २२७
भक्तीचा व्यापार ... ... २७३
भक्तिद्रव्य .. ... ... ३४०
भक्तिपेठ .. ., ... १५०
भरजे = भरे, भरून जाई... ३५७
भरनजर = डोळेभर ... १०४
भवकोंभा ... ... ... २२
भवगोंवा ... ... . १३७
भवगोष्पदवत् ११०, २७५, ११०
भवचाकीं जसा भोंवरा तसा जीव फिरत ... ... १२०
भवदुर्गे = संसारांतील त्रास ९९
भवनदी ... .. .. ३३
भवपुरी ... ... ... ३७
भवपुरीं होत आपदा कर्णधारा परमानंद ... ... ११७
भवभान = संसारज्ञान ... २९९
भवरोगदहनमात्रा .. ११७
भवाब्धिची लहर कहर .. ११७
भावे = भाऊजी .. ... २८४
भिक्षेची महती ... . . २५४
भुलवण = भूल, ठक ... १६३
भेदत्रय ... ... .. २९९
भ्रमलेपणा = भवाची भ्रांति २७३
भ्रांतिस्थ विस्मृतीचळें होत बावरा १२०

म

मतवाला = खुशालचेंडू, उन्मत्त ९
मदनारिप्रिय = ( कसा हें वर्णन ) १३९
मदमत्सरादि सावजें ... १४३
मधुकैटभारी = ( व्याख्या पहा ) १३९
मधुसूदन ... ... १२०
मनमत्ततुरग ... ... १२८
मनमयूर ... ... ... ३२८
मनमयूर दान देणें... ... २०८
मनाला गजाची उपमा ... २७३
मनाला पशूची उपमा ... ३६३
मनाला मयूराची उपमा ... ९१
मनाला मोराची उपमा .. ३६९
मनोमय लावुनी ते सुंदरी दोरी हालवी ... ... २३५
मनोवृत्ति राधा ... ... ११८
मरणें तरि जितांचि मरावें... ३६३
मर्मणा = मर्मज्ञ ... ... ३३२

मरळा = मरायला टेंकलेला बैल वगैरे ... ... ... ३५५
मगळा = हंसाला .. ... २४१
महापाप (हरिविजयाचा उतारा) २,५
महावाक्य ... ... ... ३१२
महावाक्यार्थ . .. २९९
महानुभाव = उदार मनाचा ३२२
महाहाटी = अतिहट्टानें, हठयोगानें १०५
मातकर = त्रासदायक, क्लेशदायक . .. १०१
माती = मेलेलें मढें . २७३
मांदी = समूह ... ... २५०
मानसहंस = हृदयरूपी मानस सरोवरांत विहार करणारें हंसरूपी मन . . . ९३
मायदळ = पुष्कळ . ९
मायापवाद = मायापटल . २३४
मायेची बंधु आणि भगिनी २६३
माव = माया ... ... ६५
मिराशी . .. ... १४९
मिहिर = सूर्य .. .. २५२
मुकलें = मुकें झालें, मुकावलें ३१२
मुकुंद धर्मा = मुकुंदसेवेच्या श्रेष्ठ धर्माला ... .. ३४५
मुखीं धूळ घालिती ... १,१६
मुनिजनमन मांदारा ... ४२
मुद्रा = नाण्यावरील शिक्का २६५
मुनिमन मांदारा = मुनिमनाची हौस पुरविणाऱ्या कल्पवृक्षा ३६८
मुरदारा = मुरदाड, त्याज्य २७९
मुरमर्दना ... .. ... १२२
मुरलीच्या नादानें झालेली विश्वाची स्थिति ... ८६
मुरलीमुळें गोपींचा पिसाटपणा ९०,९२
मुरलीला सवतीची उपमा... ५०
मुलायम .. ... ३६०
मूळघरची वाट ... ३२६
मृगतोय आटलें ... ३१६
मृगससार = मृगजळासारखा मिथ्या संसार .. ... १०१
मृगांबु = मृगजल ... ३९,२७४
मृत् भांड = मातीचें भांडें, मिथ्या, नश्वर, आभास . ३१६
मृदुमृणाला = कोमलनाल .. ७७
मेहेर = सूर्य . .. ७७
मोठ्या आवेशानें = मोठ्या जोरानें . ... ... ३७०
मोहरी = मुरली, मोहित करी ७४,८४, १३५
मोक्षठेवा = मृत्यु साधन ... २,२२
मोन हें वाचे पडे ... ८४
मौळ = मस्तक . . २९१
मंदार = कल्पतरु . १२०
म्हणणें आटलें = शब्द खुटले २७०

**य.**

यया अर्थीं प्रभुराज दारीं आला १ ( २३ ), २ ( २५ ) पहा
यशोदाभाग्य ... ... ६४
येळकोट .. ... ... २३
योगयाग ... ... ... ३२५

**र.**

रगाथिले . . ... १५०
रति = अल्प, तिळमात्र . . १२०
रवितनय = यम ... २३४
रसरसना . . ३४५
रसरसने नामरसायन खा .. ३४५
रांडोळी = समूळ नाश ... २७४
रिघालें = शिरलें ... ... २८४
रुचिर चीर = सुंदर वस्त्र .. ९०

रुजी घालणें = भ्रमराचें गुंगुं करीत घिरट्या घालणें, बदकांचें एकमेकांच्या पाठीस लागणें ३७५
रूपरेखा ... ... ... २६१
रोकडा = तात्काळ, तूर्त ... १२५

## ल.

ललाम = तिलक ... ... २३०
लवण जळीं जैसा विरला ... ३६५
लवलाह्यां . ... ३०४
लक्ष्मीची वडील बहीण ... ३८१
लक्षांशें = लक्षपटींनें ३१९
लागवेगें = जलदीनें .१, २२३
लाहे = भेटे . . .. ... २३२
अतिलोभालाहो .. ... २३१
लिगाडीं = पेंचांत ... ... २३७
लिंगास्थिति ... ... २९९
लेखा = लेख, टिपण ... ३५९
लोकेषणा = लोकप्रियतेची वांछा ३७०

## व

व्रजांगना = गोकुळांतील बायका ९९
वंचिलें = प्रेरिलें ... ... २५०
वर्णाश्रम स्वधर्म .. ... ३१८
वरसी = वरवरची ... ... २७५
वर पडा = तत्पर, तयार ... २७४
वस्तू = आत्मज्ञान, ब्रह्मज्ञान ( टीप पहा ) २७१
वस्तू घेतां लाजवी चित्ता दूरि ठेवूनि यावें ... ... ३४०
वहिलें = तत्काळ, ताबडतोब, स्पष्टपणें .. ...३०, २३४, ३४
वाजपी = वाजपेय यज्ञ करणारे ३१२
वाढ = पुष्कळ ... १३७, २२३
वाणी = दिसणारी ... ... १०३
वाणी उच्चारित होरे होरे ... ६, ६६
वातपी = वाताशन करणारे ३१२
वादपी = वाद-प्रतिवाद करणारे ३१२
वारण = निवारण करणारे ... २८८
वाल्मीकीचें उफराटें नांव जपणें ५७
वाल्ह्याचा वाल्मीकि केला... ३६
वाव = फोल, व्यर्थ ... २७२
विकार ... ... ... २५२
विजन = अरण्य ... ... ३१४
विटाळ नातळे .. . २२७
विधान = निवारणार्थ यत्न १
विधिनिषेध = कर्तव्या कर्तव्यतेची आज्ञा ... ... ३१८
विनटणें = लीन होणें ३३२, ३६९
विनटिला = नष्ट केला ... ३६९
विनटे = जडे, चिकटे ... १३८, २२९, २३७, २७१ २७५, २८१
विरजें = विलीन होई ... ३६४
विवशी = जखीण ... १३८, २२१
विवेक अकुश .. .. २७३
विश्वकदंबा . .. २२
विश्व थाटीं = विश्वरचनेंत, विश्वपसाऱ्यांत .. ३१३
विषयामध्यें फुगडी घालणें... ३६५
विषयाला तृणाची उपमा ... ३६३
विज्ञान . .. ... १२५
वीची = ऊर्मी, लाटा ... १५१
वोजा = तेजस्वी, लखलखणारे १३२
वोरसे = पान्हावे, प्रीतिपूर्ण होई ३१२
वोसगा = मांडीवर . . . . ११५
वोहटे = ओसरे . . . १३७
व्यावृत्ती = परावर्तन, मागें पलटाविणें ... .. ३१८
व्युत्थान = ध्यानविसर्जन . ८४
व्युत्थान = तपस्यादिकांची समाधि ... ... ... ९७

### श.

शकराचा गरळ दाह . ५७
शब्दकुसरी = शब्दकौशल्य २७१
शमादिक षट्कसाधन . ३१८
शिकविलेला पोपट .. . ३५५
शिबिका = पालखी ३८२
शिराणी = अति दुर्मिळ वस्तु १७९
शिवकंठी विषभूषण झालें . ३४४
शुक . .. ३६
शुभा = गोंवऱ्या, लाकडे ... ३७०
शून्य परब्रह्म .. ... ३०३
शून्यी वृत्ति मिळे = विश्वाशीं एकरूपता होय... .. २९६
श्रुतिनिगदित = वेदांनीं सांगितलेले .. ... ३७१
श्रुतिवैखरी = वेदवाणी ... १७०
शेवीं = अंतीं, शेवटीं. ३७३, २८८
श्रवणार्थी = श्रवणोत्सुक ... ३११

### स

सगुणब्रह्मश्रीकृष्णरूप ... ६३
सदर = दिवाणखाना .. २
सत्वाधिला ... .. १५०
सघन = ओतप्रोत, सभराभर २७१
सट्टावट्टा=सराफीचा धंदा, सावकारी ... ... ... ३६४
सधन घनदाट ... ... २९२
सभर = ... ... ... ३३३
सभराभर = सबाह्य अभ्यतर १६३ २२४ २७५, ३२९
सभरप्रचुर = ... ... ... २०
समरसली = दोन रसांच्या एकीकरणामुळें एकवटलेली. ९५
समर्थ अमुचा गुरु शिरावर सूत्र तया हातीं... ... १०२
समला = मुंडासा, झोंकदार फेटा ३५५

९

समरसता=आपपराचा ऐक्यभाव २७३
समाधिव्युत्थान . १०५, १३७
सहा चार, अठरा ... १००
सवडी = सांवडासांवड करी, जमा करी . .. ३५४
साई = छाया, सावली .. ८६
साकारिला = आकार धरिता झाला ... .. २६३
साद = चाहूल, पायचळ १, १०
सांड = हेळसांड .. १५८
साधनक्रम = साधनचतुष्टय २१९
सायुज्य = चतुर्विधा मुक्तींपैकी एक, जीमध्ये ईश्वराचा व जीवाचा अभेद होतो ती. १८१
सायुज्यता = चार मुक्तींपैकीं एक २५९
साक्षी . ... .. २६१
साक्षिणी = तुर्यावस्था २६५
साक्षेपी = आग्रही, हट्टी .. ३१२
सुधासम वाक्य . ... ९
सूदिती = आंत दाबती ... ३,१४
सुनीळ = काळसर .. ... १०३
सुरवाडें = सुखानें .. . २७५
स्थूल, सूक्ष्म, कारण, महत्कारण ... ... ३२०, ३१२
सूक्ष्म मार्ग ... ... ३२०
सोंगिशी ... ... ... २३९
सोलीव = शुद्ध ... ... २३४
सोहंकोहं ... २९४
सोपान = जिना, शिडी, मोक्ष, पायरी .. ... ... २९५
संगी = साथी ... ... ३६६
संरस = स्वरेनें . ... ३७०
संचित क्रियमाण . ३१६, ३१८
संधान = लक्ष्य ... ... १, ४

संवळी = पूजेचीं उपकरणीं ठेवण्याची पेटकुली २०९
सभ्रम = ६९ ( चार पांच अर्थ आहेत )
सविती = आकलनशक्ति, बुद्धि ८४
सांकडीं = संकट ८४, २२५

**ह**

हतोटी = कौशल्य, चपळाई ३१२
हरिपदिं अति झाली वृत्ति सलभ आतां १२५
हवेली = मोठ्या इमारती ३८२
हलुवट = हालका .. ३,२
हाकम = प्रभु, मालक ६५,२३९
हाल = खबर, स्थिति, वृत्तांत १०७
हांवा पडला = उत्कंठित झाला १५३
हिंपुटी = बेजार, त्रासलेला ८२,१०६ १०५
हिंवसा झाला = थंडा पडला ३५७
हुडहुडी दारिद्र्य येणं . २९४
हंसकचरणा = पदभूषणें, तोरड्या जिच्या पायांत आहेत अशी ९५

**ज्ञ.**

ज्ञान आणि विज्ञान ३६६
ज्ञानशिखा आकळणें ३४५
ज्ञानसहित विज्ञान १५२

---

# देवनाथमहाराजांचे पदांची

# अंकानुक्रमणिका.

## आख्यानें, कटाव वगैरे

१ श्रावणाख्यान.
२ कृष्णजन्माख्यान
३ अहिमहि-आख्यान.
४ रघुवीर राजाराम भजावा हो
५ ये बा ये दीनबंधू गोविंदा
६ मन हें मुरालें । मन हें मुरालें
७ मनमोहन नंदकन्हय्या
८ त्रिभुवनको पालनवाला ।
९ आहारे रांडलेका, जन्मुनी काय
१० नेणुनियां आत्मस्वरूपा भ्रमला
११ महाराज आनंदी हो अवतरले
१२ भज भावें विठ्ठल बरवा,

## देवतापर पदें

### गणपति.

१३ वक्रतुंड गजकर्ण विनायक
१४ जयदेव जयदेव जयविघ्नहरणा

### जगदंबा

१५ जगदंब अक्षरें चारी जपतां
१६ जयजय आदिभवानी अंबे
१७ अंबे तुझीं देखियलीं थोर भाग्यें

### शंकर व खंडोबा.

१८ तो धन्य वैभवाचा । जो म्हणवी
१९ महादेव महादेव महादेव वदारे

२० शिवहर हरहर त्रिपुर गौरिहर
२१ सांब सदाशिव भजा गडे हो
२२ शिवशिव शिवहर शंभो पशुपते
२३ पार्वतीचा पति शिवभोळा


### मारुतीचीं पदें


२४ वायुतनय महाराज दयानिधि।
२५ जयजय बलभीमा हो बलभीमा
२६ अंजनीतनय रामदूता। वानरे-
२७ करिं कपिराज सखा। मना तूं
२८ तें रूप देखियलें नयनीं
२९ भज मनुजा हनुमान्। कृपाळू
३० मारुतिराया। सांभाळा ब्रीद
३१ पवनतनुज सुखदानी। अरे हा
३२ तो मज आवडे हो। प्रभुराज


### श्रीरामावर पदें.


३३ अरे हो रामा। कमलापत-
३४ मज कां उपेक्षिशी रामा।
३५ श्रीरामा रावणारी। अघभय-
३६ तूं जप रे जप रे जप रे
३७ श्रीराम जयराम जयजयराम
३८ कणवाळा दयाळा रामा। जय
३९ राम न कां स्मरशी। मना तूं
४० येईं सीतापती रामा शरयूतट-
४१ जरि तुम्ही राम न गाल। तरि
४२ रामकृष्ण रामराम।
४३ कमलनयन रामा धांवरे बा
४४ राम जनीं या विजनीं। श्रीराम-
४५ पाहसी अजुनी काय रामा
४६ अरे श्रीरामा। निगमागम तुझा
४७ राघोबा श्रीरामा दाशरथे हो
४८ सजणे जाईं आणी गे श्रीरामा।
४९ चाल चाल दयाळा रामा।
५० बाई माझा प्राणसखा रघुवीर
५१ पावना श्रीरामा। येईं गुणग्रामा
५२ जयजय श्रीरामराम रामकृष्ण
५३ अचल अमल आद्या वेदवंद्या
५४ राम सोयऱ्या सुखदायका।
५५ राम म्हणा तुम्ही राम म्हणा रे
५६ गारे गा राम गारे। रामाविंचुनि
५७ तारक श्रीराम। रामनाम वदा
५८ राम वरिला सुखदानदाई
५९ श्रीरघुवीर सुखकर येवो।
६० वदनीं रामसखा रे रामसखा।
६१ रामनाम मन्त्र थोर जाण


### कृष्णचरित्राच वर्णन

### बाळक्रीडा


६२ सखिये आनद नंदराजगृहीं
६३ सावळें ब्रह्म तें मज आवडे।
६४ सभाग्यभाग्यें ते नदाची राणी
६५ नाच नाच बा कसा गुणाचा
६६ तें ब्रह्म गोजिरें हो। खेळे
६७ गोकुळीं गोवळवेष क्रीडा करी
६८ श्रीराधावदनारविंदमिलिंदा
६९ या हरिची मज आवड बाई
७० केली कसी मोहनी ग राधे
७१ कृष्णा कां रे असा करिशी
७२ चेटकि मोठा नदाचा नद कान्हा


### गोपींगाऱ्हाणीं.


७३ यशोदे! बहु दुःख गांजिलें यानें।
७४ हरि आवरीं माय यशोदे। करि
७५ ऐक यशोदे बाई मुलाला
७६ वाटेवरि हरि उभा कशी मी


### कृष्णमुरलीचीं पदें


७७ निबिड सघन हे मध्यशर्वरी
७८ वाजविलिस त्वां कशी मदन-
७९ अहारे मेल्या कृष्ण्या। वाजविली
८० वृंदावनीं हरिनें अति मंजुळ

८१ मुरली वाजविली कृष्णानें ।
८२ मधुर आलापें सुरस वाजवी
८३ निश्चळ ससमिर यमुनानिर दें
८४ या गोविंदें मुरलीनादें मोहियलें
८५ मंद मंद वाजवि गोविंद मुरली
८६ तनों तनों त्रों तननन श्रीहरि
८७ यदुराज वृंदावनिं गे मधुरध्वनि
८८ आहारे ऐसें कैसे केलें त्वा
८९ अग बाई सांवळियाचा वेणू
९० जळो याची हे मुरलि अगे बाई
९१ हरी वाजविसी मधुर अशी
९२ रमारमण रमानाथ । की वेणू

## कृष्णविरह व कृष्णभेट.

९३ वियोगानळ जाळित त्रास देत
९४ अझुनियां तरि हरि कां ग बाई
९५ अबलामति प्रार्थिते हरितें प्रेम-
९६ चाल सख्यांं जी घनश्याम वरू
९७ सजणे कृष्णा जा वेगीं आणावें
९८ यदुकुलभूषणासी जाऊनी
९९ योगियाच्या नये ध्यानीं ।
१०० सखयानों जा जा गे गे हरि
१०१ उद्धवा सख्या तुह्मिं जाहो ।

## ईश्वराला प्रेमपात्र केलेलीं भक्तिपर पदें

१०२ चाल चाल चाल त्वरा करूनि
१०३ गडे आम्हांकडे पाहीं तुला
१०४ तुझा मुखडा अजब हिरकणी,
१०५ आषक आम्ही पिसे झालों ग
१०६ कोणीकडे तुम्ही जातां जातां

## धांवे.

१०७ मां पालय गोपाल । त्वरें ये मां
१०८ आत्मारामा सुखैकधामा
१०९ तरि मजवरी करिं कृपा सख्या
११० हरि हा भज भज रे । सकल
१११ भज भज गोपाल । रसने
११२ दयानिधे जय केशवराया ।
११३ गोकुलवाल्या । भज तारीं
११४ गा रे श्रीरंगाला उमगारे । ना
११५ गोविंदा रामा हो । गोपाळा
११६ नंदाच्या नंदना । नवनीरदतनु
११७ नंदनंदना विश्वसूत्रा । सख्या
११८ प्रियकरा, भुवनसुंदरा,
११९ विमलकमलदललोचन
१२० मधुसूदना । कमलनयन-
१२१ दीनबंधु भवताप निवारीं ये
१२२ ये कंसारी । मी दीन पतित
१२३ प्रभुरे आत्मारामा सखया
१२४ काय करिसी गति रे दयाळा
१२५ गोविंदा मधुसूदना
१२६ गोविंदा रामा कृष्णा गोपाळा
१२७ कां माझी तुजलागीं करुणा
१२८ अरे हो कृष्णा । गोविंदा । ये
१२९ ये गे ये गे सांवळिये माझे आई
१३० मां पाहि कृष्णा देव दयाघन
१३१ गोकुलपति हरि ये गोपाळा
१३२ सांवळि सकुमार मुर्ति मनोहर
१३३ तुज काय म्हणावें आम्ही
१३४ लज्जा तूज हरी । निजाची
१३५ मुनिजनमानसहंसा ।
१३६ काय म्हणुनि सांग । कशी
१३७ भक्तोत्सल भवशमना हरि तू
१३८ हरि अघभयसंहरणा ।
१३९ नंदनंदना अहो सुखसदना
१४० चाल चाल वेगीं कृष्णा
१४१ भुवनसुंदरा, सुंदरा चक्रपाणी।
१४२ जागरे जाग बापा । विश्वपाल
१४३ काय माझी गति तुज करुणा
१४४ माझी कां न हरी तुज ये

१४५ गोविंदजी पाय तुमचे चला
१४६ चाल त्वरें हरि लवकर यावें
१४७ तुझिया रंगणीं नाचावें । हेंचि
१४८ येरे कृष्णा गोविंदा गोपवेषा
१४९ आझुनि कां रे न येशी । हरी
१५० सांवळ्या सगुण सुंदरा चला
१५१ येऊं दे दया, दया देवदेवा ।
१५२ माझी तुला काळजी ।
१५३ मी बाळ तुझें लडिवाळ अरे
१५४ भवभय वारीं हरी । दयाघना
१५५ चक्रपाणि काय मनीं सांग
१५६ कृष्ण कृपालय पालय माम् ।
१५७ कमलनयन हरी गा तुम्ही
१५८ भक्तोत्सला विभु जनार्दन-
१५९ सख्या कठिण काय म्हणुनि
१६० कां जी हें जग व्याल । तरी
१६१ तू करुणाब्धि म्हणविशि तरि
१६२ दीनदयानिधि कां रे मज सांग
१६३ जय जय हरि नारायण, राधावर


( व्यायशी कडव्याचें पद )


१६४ मालवी सहज भवाला । भज
१६५ हरिभजनाचा धगया रंग
१६६ हरी सांग तुज नयेचि काय बा
१६७ तरि मग तुज काय न्यून हरि-
१६८ हरिगुणीं लागला वेध रे बा
१६९ का गे हरिभजनावीण काळ ।
१७० सदय बहुत मृदु हृदय हरीचें
१७१ का न मुखीं हरिनाम वदा रे
१७२ हरिवांचुनि काय जिणें। सख्या रे


अभंग व पांच अपूर्ण पदें.

( करुणाषोडशी )


१७३ काय सें सामर्थ्य न चले या
१७४ आधी केसें मज पदरीं घेतलें
१७५ काय माझी तुम्हालागीं नाहीं
१७६ मागें कोणाचें त्वा सांग केल बरें
१७७ ये बा ये गोपाळा करुणेच्या
१७८ अनाथ मी दीन शरण आलों
१७९ जननीजनक माझा तू मामा-
१८० पतित मी साचा जाणोनी पदरीं
१८१ नलगे मज कांहीं न मागें
१८२ आटोपीतां मज नाटोपेचि कदा
१८३ अनाथाच्या नाथा ये बा अनंता
१८४ माय बाळालागीं जरि मारी हातें
१८५ नेणे भक्तिभाव ज्ञानकळा कांहीं
१८६ जाणोनीयां आधीं केला
१८७ जन्मोनियां जगीं म्हणविलों
१८८ मागें बहुताजनां तारीलें पतितां
१८९ रायें दुर्योधनें गांजितां
१९० तरि का बा कृपणता धरिली
१९१ आहें मी पतित हें तों सत्य
१९२ करुणाषोडशी हे गुफुनि


( देवतापर अभंग )


१९३ आत्मा गणराज आरंभीं
१९४ बा रे विठ्ठला आतां चहुंबाहीं
१९५ भावें जडलों तुझे पायीं । माय
१९६ जरि पहाशील अंत । तरी हा
१९७ अहो अंजनीनंदना । निज-
१९८ मज अनाथाची मति । काय
१९९ आजाचिया लाभा नाहीं


( ईशस्तुतिपर अभंग. )


२०० रूप तुझें नयनीं नाम तुझें
२०१ देवा तुझ्याहूनी बरे मायबाप
२०२ इतकें मातें द्यावें दान ।
२०३ गुतोनीयां पडलों दुर्वासनामेळीं
२०४ माझा जाऊं पाहे प्राण । का


( गुरुपर अभंग. )


२०५ सद्गुरुवांचोनि देव नसे दुजा
२०६ मागें गेलें मागिल परी ।

२०७ अमुचें ब्रह्म कृष्णातटीं ।
२०८ बाप श्रीनाथ गोपाळा ।
२०९ बुद्धिचें आसन नेमाची सबळी ।

( बोधपर अभंग )

२१० काय केलें राडलेका । जन्म
२११ करावें स्मरण ज्याचें लोंचि
२१२ न करि स्मरण त्याचें
२१३ अधिष्ठानी सिद्धासन । सहजीं

( आत्मचरित्रपर अभंग. )

२१४ त्रेतायुगीं रामें दिधलें वरदान ।

( पांच अपूर्ण पदें )

२१५ मी सांगतसें तुजपाशीं जिवींचें
२१६ कां वेळ असा लाविला
२१७ अशी मनोवृत्ति गाधिका । तिनें
११८ अहारे विधात्या क्रियानष्टा
२१९ निज जाग जीवना हरि बा ।

विठ्ठलपर पदें

२२० करुणाघन दिनबंधु दयाळा ये
२२१ मी बाळ तुझें तानये पय पाजीं
२२२ माझी विनवणी, विनवणी
२२३ भवपुरिं बुडतों हरि तारी मज
२२४ विठ्ठल त्रैअक्षराक्षरातित
२२५ पांडुरंग स्मर, अभंग भग या
२२६ विठोबा व्यापक जनिंविजनीं
२२७ सये ग बाई पुरला मनिंचा हेतू
२२८ पंढरपुरवासिनी विठाबाई येई हो
२२९ मौज काय पाहतोसी ठेउनि
२३० तारकब्रह्म विटेवरि उभें । पाहें
२३१ येईं सांवळे विठाबाई । मजला
२३२ पतित पावनारे । शरण पातलों
२३३ भावें भजतां हरी । दास्य करी
२३४ मोळ्या मोजेचा पंढरिराणा ।
२३५ विनवणी ऐक गड्या रे विठोबा
२३६ विठोबा पाहसी अजुनी काय
२३७ अमलकमलदलनयन विभो
२३८ सांवळ्या पंढरिनाथा । लाज बा
२३९ विठोबा चाल गड्या, सुखधामा
२४० श्रीकृष्णा कमलावरा, सुखकरा,
२४१ जो विश्व व्यापुनि अलिप्तपणें
२४२ विठ्ठल रुखमाई । माय माझी

( अथवा जयद्रथवधाचें पद. )

२४३ तू माझा धनि बाप । विठोबा तूं
२४४ पाहसी अजुनी काय । विठोबा
२४५ पाहसी कां निर्वाण । विठोबा
२४६ इतुकें देईं दान । विठोबा इतुकें
२४७ जागा भगवद्भजनीं लागा प्रेम
२४८ श्रीकृष्णा मनमोहना कमल-
२४९ अमुचें ब्रह्म हरी ब्रह्म हरी ।
२५० हीन दीन बहु संकटीं पडतां

( अथवा सेना न्हाव्याचें आख्यान. )

गुरुपर व वेदांतपर पदें

२५१ तें तू ब्रह्मचि पूर्णपणें
२५२ नाहीं ज्या विकार रे । सदा
२५३ ऐकें गे सखये बाई जिविंची हीं

गोपाळनाथांवरचीं पदें

२५४ अपारा अगम्या अनामा अरूपा

( गोपाळनाथाष्टक )

२५५ अग या कृष्णेच्या निजतटीं ।
२५६ कृष्णातीरीं त्रिपुटीमाजी अमुचें

आनंदीनाथांवर पदें

२५७ अरुपानंदीं अद्वय श्रीगुरुदत्तचि
२५८ सच्चिद्घन आनंद आनंदी
२५९ आनंदि जाल्हनापुरीं धरी
२६० आनंदी त्र्यक्षरी मंत्र स्वमुखें

तुकारामावर पद

२६१ तुकाराम चतुराक्षरि मंत्र जपतां

## गोविंदनाथावर पदें

२६२ गोविंदनाथ पचाक्षरिमित्र
२६३ नसे नाम ना रूप रंगा विकारी
२६४ जयदेव जयदेव जय सद्गुरु-
२६५ जयदेव जयदेव जयजी योगींद्रा

## गुरुमाहात्म्यावर पदें.

२६६ श्रीगुरुच्या निजस्वरुपा ध्याउनि
२६७ तें रूप पहावें ग बाई । तरीच
२६८ गुरु नाम तुझें सुखकारी
२६९ निजसुखसाधनी सद्गुरु-
२७० आत्मा हा अनुभवीं आला गे ।
२७१ ससार नव्हे हा सार, करुनि
२७२ सार घ्यावा हा अनुभव देहीं ।
२७३ तू पोहेरे रूप घननीळ सावळ ।
२७४ मनु ऐक तनुराउळिं ग ।
२७५ अभयवरदकर गुरुवर स्मर
२७६ श्रीगुरुपदिं रत रे पदीं रत रे ।
२७७ उमजों मच्चित्तागे मद्मती ।
२७८ सखे निर्विकल्पतरू गुरू
२७९ फिर रे फिर मागें आता ।
२८० जाणुनि भजरे या गुरुनाथा ।
२८१ का रे भजसी ना या
२८२ श्रीगोविंदा कां न भजावें
२८३ बाई म्यां देखिलें लोचनीं
२८४ नवल झालें ग साजणी । ऐकें
२८५ श्रीगुरुची माय । झाल्यें मी
२८६ श्रीगुरुच्या पदिं भाव धरावा
२८७ सखये । गुरुनें नवलाव केला
२८८ मना तूं भज रे गुरुगोविंद
२८९ निजहृदयीं गुरुरूप पहावें ।
२९० नामामृतरस । रसनें भरावा ।
२९१ धन्य श्रीगुरू गुरूनाथभोळा ।
२९२ श्रीगुरुचरणीं रतले मानस न
२९३ सद्गुरू मायबापा । चे त्वरें
२९४ गुरुदयाला परमकृपाळा बुडलों
२९५ धन्य श्रीगुरू । गुरूनाथराणा
२९६ गुरुतर सुख मज आस सये
२९७ दाता धन्य गुरू हो धन्य गुरू
२९८ धन्य धन्य धन्य श्रीगुरुराणा ।
२९९ गुरुरायाचा हस्त धरुनियां
३०० गुरुनाथनिरजन साचा । कृपा
३०१ नाथ दयाघन हो । कृपानिधि
३०२ चालगे सखये जाऊ पाहू या
३०३ चालगे सखये आता पाहू या
३०४ ये बा गुरुराया, गुरुराया । साईं
३०५ सखे मज भेटवीं दयाळ नाथ
३०६ नाथ सखा सुखदानी । मला
३०७ मन भज भज रे आता । दयाळ
३०८ या गे या गे गुरुपायिं रता बाई
३०९ श्रीगुरुदयाळ भेटेल, दु ख आटेल
३१० नाथा जडलें रे गोविंदा, तुझिया
३११ पतितपावन अभिधान । श्रुति
३१२ पाहुनि निरुपम अरूप गुरु रे
३१३ विमल निजरूप, रूप गुरुरायाचें
३१४ आज दिवस हा सोनियाचा
३१५ कृपा होता श्रीगुरूराजयाची ।
३१६ गुरुनाथजींचें स्वरूप । निज-
३१७ आहो आहो गुरुराजया । क्षमा
३१८ सावध हो ऐकें निजमना,
३१९ आहा कैसे केले त्वा भाग्यमंदें ।
३२० श्रीसद्गुरुमूर्ती, तुजप्रती विनती
३२१ आत्मा आपण विश्वचराचर
३२२ तो नर धन्य जनीं । अनुभवी
३२३ खेळ पोरा भोंवरा । समस्वरूपीं
३२४ चित्तचक्रचाळा । खेळ असा
३२५ उदो बोला उदो आंत बाहिर
३२६ बाइ मी माणुसपणावेगळी झाल्ये
३२७ बोध्याचे मदनांत सखे मा
३२८ श्रीगुरुनाथदयार्णव तुझ्ता

३२९ सद्गुरुनाथरायें । दाखविलें नवल
३३० मायबापा सद्गुरुदेवदेवा । देई

### तापीनदीवरचें पद

३३१ जय रविजा तापी । तव नीर

### गुरुसेवा आणि ईशप्राप्ति

३३२ किति तरी तुज शिकवु जाण ।
३३३ रामकृष्ण नाम सुगम सोपि
३३४ जगदात्मा लोचनी पहावा ।
३३५ अगा मी शरण तुला आलों
३३६ श्रीभगवती प्रीति जडावी ।
३३७ कां हो भजाना भावें भजाना
३३८ अहो लाभ सहज घडे तरी कां
३३९ देव मग दूर नाहीं दूर नाहीं ।
३४० आम्ही लिंगाइल वाणी ।

### भगवद्गीतेवरची आरती

३४१ जयदेवी जयदेवी जय

### आत्मानुभवप्रशंसा

३४२ ते समदर्शि भले रे पार्था ।
३४३ श्रमसी काय उगा । रे मूर्खा

## बोधपर व स्फुट

### नाममहात्म्याचीं पदें

३४४ साधन आणिक का । रे
३४५ रसरसने नामरसायण खा
३४६ राम हरे रे कृष्ण हरे । भावें
३४७ भजन करी रामाचें । मग तुज
३४८ धरा या हरिभजनाचा रंग
३४९ घ्यारे वदनीं हरिनाम गुणी ।
३५० तू नाम जपसी गे वाचे ।
३५१ धरीं रे मना हरिनामीं छंद
३५२ पार्था ते तरले ते तरले जे

### भिक्षेवर दोन पदें

३५३ जळो मागत्याचें जिणें । धिक्
३५४ न मागों भिक्ष त्यांलों भिक्ष

### ज्ञानमदांधांची निंदा

३५५ प्रबळ स्वमनि मज नवल नानु-
३५६ मिरविती व्यर्थ जनीं हो व्यर्थ
३५७ त्यासम मूर्ख जनी । पाहतां न
३५८ ज्ञानविचार बहू अवलोकिले

### नरतनूची क्षणभंगुरता

३५९ क्षणभगुर नरतनु जाईल राजहंसा
३६० गंडिया नदि दूधडिया भरली
३६१ मग तू ब्रह्म गड्या रे ब्रह्म
३६२ होईल काय गती रे मूर्खा
३६३ तनु उत्तम हे श्रीनाथें तुजलागी
३६४ झरझर झरझर चालली नरतनु
३६५ अमोल काया जाइल वायां
३६६ उत्तम हा नरदेह तुला लाधला
३६७ ही तनु प्राप्त तुजला निजभाग्ये ।
३६८ उत्तम नरदेह तुला लाभला
३६९ ही तनू, बहुत सुखघनू, लाधली
३७० धन दरकुटे, भरी चिरकुटें उच
३७१ उमज उमज मन मूर्खा अज्ञुनी
३७२ आहा रे गंडिच्या पोरा, मूर्खा हें
३७३ वृथा मानिं कोण करी चिंता
३७४ कां रे न भजसी या श्रीरामा ।
३७५ मना रामपदांबुजी सख्या घाली
३७६ सावध होई मना । गड्या तू
३७७ अज्ञुनी कां नकळे । मना तुज
३७८ खटपट किति नटनटुनि करिशी
३७९ जाणुनिया श्रमसी । वृथा कां

### प्रपंचमूढांचीं पदें.

३८० वाइल पैशाची पैशाची ।
३८१ द्रव्याकडोनी उन्मत्त झाला
३८२ भावें जो हरिनाम सेविन

### किरकोळ स्फुट

३८३ येई रे गड्या गुडगुडी रे
३८४ शिव शिव शिव काय गती हे

## हिंदुस्थानी कविता

### किरकोळ स्फुटें

३८५ जो तन लागे सोही तन ज्याने
३८६ सूमके मालको चार दड
३८७ खटपट सगरी छांड दे इत्यादि
३८८ सोबी अक्कलवत बडा है

### शंकराचीं पदें.

३८९ कर हरजीको ध्यान । हो या
३९० भज मन शिवहर भोलाजी
३९१ आठो जाम हरबिन कछू

### श्रीरामाचीं पदें.

३९२ रामबिना कछु और नहीं रे
३९३ नहि मानत राम सबे घट
३९४ हित तेरो तू राम सुमर मन
३९५ राम भजनबिन ब्रिथा
३९६ राम बिना कछू और न
३९७ लगन लाग रही रामभजनसो
३९८ राम राम राम राम भजले मन
३९९ श्रीराजा रघुनाथ । भज मन
४०० राम न जाने तो नर जिया तो

### कृष्णपर पदें

४०१ बालमजी बालमाजी । अजब
४०२ मोरे नैनन छाया मतवारा जी
४०३ गोकुलवाला । ब्रिजवासी
४०४ अखियां हर देखनको ललचाई
४०५ बरखत आयो मेहुला । गरज
४०६ भसी मेरो पिया कौन बतावे ।
४०७ आज मोरी सावरियासों लागी
४०८ तेरे पदरसकी प्यासी । भला
४०९ वापरसा तनमन बारो । मुरली
४१० ब्रिजवासी नंद कन्हय्या
४११ दरद न आवे बेदरदी को
४१२ तट जमुनाके तीर चलाहो
४१३ आसतनमान माई जसोदा
४१४ सुनरी सुन माई जसोदा ।
४१५ जा मनमोहन बेग सीधार
४१६ तेरे बन्सीने कान्हा । कियो
४१७ केतो कहिये कान्हा तोहे ठग
४१८ नद नदन कान्हा । गोरस हूं
४१९ सुदरन पायी आरि वो मायी
४२० मनमोहन सखि मोरा
४२१ काहे को मोरे सतावेरे
४२२ होना खेलूगी होरी रे तोसू
४२३ येगे प्रीत मोहनसो लगी येरी
४२४ जाग जाग भौरभयी
४२५ हरी मनमोहन या मधुसूदन
४२६ बजिरी बाजिरी माई बन्सी
४२७ बन्सी कुज बनमों मधुर बजी
४२८ जमुना तटपे निकट बजावे
४२९ कैसी मोहन बन्सी बजाई ।
४३० चलोरी सखया ब्रिजको छाड
४३१ आधी रैन सैन कान्ह बन्सी
४३२ मतवारे तु ऐसी क्या बन्सी
४३३ बजी कान्ह बन्सी तेरी ।
४३४ ऐसी कैसी बन्सी बजाई
४३५ बन्सी बजा बनहारे । अब
४३६ हे मतवारे । ऐसी क्या
४३७ ब्रिजमें होरी राधा गोरी
४३८ दइमारे कैसी बन्सी बजाई
४३९ अधर धररिया श्याम मुरली
४४० बैरन रैन गयी गहरी मां
४४१ अचरे भयो मनहीमों आज
४४२ उधोजि प्यारे मनकी मनमें
४४३ होरी खेलन आयो मतवारोरी
४४४ खेलुगी आज मैं होरी ।
४४५ को खेले तोसु होरी । ठग
४४६ होरी खेलन आयी या

४४७ होरी खेलन आयो कन्हय्या
४४८ चल श्यामसुंदर मनमोहन

### गुरुपर पदें

४४९ देख सुरत टक लागि नैनसों
४५० अपने घटमाही बे, भटकता
४५१ चूहे बादल उडे गगनसो कव्वा
४५२ गुरू दर्याव, दर्याव आप तूं ही।
४५३ अपने मनकी न काहुसो
४५४ प्रीतकी रीत कठीण निभाना ।
४५५ हम तो बैरागी बैरागी ।
४५६ कर लेवे साञ्चे पीर । दिलबिच
४५७ पावोगे सुजान । गुरुबिन कैसे
४५८ पिपीलिकासो ब्रह्मतलोंजी यो
४५९ खासा ये तन पाया यागें ।
४६० खासी ये नरदेही रे बाबा
४६१ निगुरे क्या किये बे । मायाप
४६२ त्रिकुट शिखरपर अलख
४६३ गुरुपद पाया जी अनुभव
४६४ प्यारे मौज बडी गुरूघरकी
४६५ अंतसमयको आवे यागे काल
४६६ बिनाभगत भगवान भजनबिन
४६७ प्यारे उलट कमलमो पलट,
४६८ घटघटमों बिराजे निरंजन
४६९ गुरू रूपेका अंजन पाया मेरा
४७० सुनरे सुन मनुवारे सुन मनुवा

### बोधपर पदें व प्रासंगिक स्फुटें

४७१ तुम सदा मगनमों डुलो ।
४७२ चोर गुज ले जावे बे । अब
४७३ अब कर दिल दिवाने पाक
४७४ मुर्षद मेरा यार । मनवा क्या
४७५ राम न जाने काहा जिया
४७६ दो दिनकी जिदगानी । भला
४७७ साथी कोइ नही अपना बें ।
४७८ भली फकीरी छांड
४७९ या जग भऱ्या तो क्या करना
४८० धनमान प्रवासी क्या करना ।
४८१ तैं जनम अकारन खोया रे
४८२ हो तैं ज्यान दिवाने सच्चा ।
४८३ भई भवर ऊठ जाग मनवा ।
४८४ सबमों फुद कर मरता क्या
४८५ शास्त्रको सीख सीख सयानो
४८६ रमते नाथ फकीर । कोइ दिन
४८७ कहु बालक कहु तरुन म्हतारा
४८८ ऐसो मन ज्यान । या जग हर
४८ मैंतो नहीं ज्यानी । ऐसो करें
४९० जुग जुगजीयो । हरीभजनके
४९१ ये संसार बडो दुःखदायी ।
४९२ मुरलीवाले छेल छबीले क्या

# श्रावणाख्यान.

## दिंड्या

सूर्यवंशीं अजराजपुत्र पाहीं, धीर औदार्यें सदा सर्वदाही, ।
पुरीं साकेतीं पुण्यग्रामवासी, त्याचि संपत्ती सदा अविनाशी. ॥ १
पोटिं नाहीं संतान तयायोगें, दिवारजनी दुःखीत हृदयरोगें, ।
तपाचरणीं त्यापुढें काळ गेला; परी नोहे संतान श्रमी झाला ॥ २
पुढें परिसा, वृत्तांत कसा जाला, रात्रिमाजी तो राव सुप्त जाला,
तये समयीं त्या स्वप्न काय जालें, तिघां जीवांचे प्राणनाश केले ॥ ३
घाबरोनी तो उठे, मनीं शंके[1], वसिष्ठासी प्रार्थुनी पुसे धाकें[2], ।
'स्वामि ! याशीं वीधानें[3] काय कीजे? दुःख निरसाया अभयदान दीजे'॥
मुनी बोले, 'तूं वनामाजि जाईं, श्वापदांस तिघां मारुनियां येईं, ।
हवन करितां अरिष्टनाश पाहीं' ऐकुनीयां तो जाय लवलाहीं ॥ ५
तटासीं तो लक्षोनि पाहि कैसें, गुल्मीं योजोनी दूर बैसलासे, ।
उदकपानालागुनी व्याघ्र हरणी शशक सूकर येतील ह्याचि ध्यानीं. ॥ ६
तये समयीं वृत्तांत काय झालें, तथा बोलाया चित्त उदित जालें, ।
पुण्यराशी श्रावण भक्तराणा, नरकत्राता तो पुत्र सत्य जाणा. ॥ ७
मातृपितृसेवेंत रत, सदाही, तदा वृद्धें बोलती त्यास पाहीं, ।
'सख्या ! सत्पुत्रें[4] जरी योग्य होशी, अम्हां नेत्रीं दाखवीं क्षेत्र काशी' ॥८
वचन ऐकोनी तदा सिद्ध जाला, स्कंधिं वाहोनी शीघ्र तो निघाला, ।
पूर्वजन्माची कथा जाण कैशी, सरितजीवनिं ते मत्स्ययोनि ऐशी ॥ ९
उष्णकालीं त उदक शुष्क जालें, मीन अवघे ते पूर्ण सलिलिं गेले, ।
तेथ किंचितजीवनीं मत्स्यबाल, राहतांही लोटला कांहिं काळ. ॥ १०

---

१ मनीं शंके—मनांत घाबरल्यासारखा झाला २ धाकें—या स्वप्नानें काय नावि अनिष्ट सुचविलें जातें याबद्दल मन साशंकित होऊन पुण्यश्लोक व सच्चरित लोकांना आगामी सुखदुखांबद्दल पूर्वीच स्वप्नें पडत असतात अशी सर्वसाधारण समजूत आहे व ती बहुप्रतीतही आहे ३ वीधान—विधि, उपाय, निवारणार्थ यत्न ४ सत्पुत्रासबंधानें श्रीधरस्वामींच्या पाडवप्रतापांत विवरणात्मक पन्नास ओंव्या फारच सुंदर आहेत, त्या वाचकांनीं अवश्य वाचाव्या. ( पांडवप्रताप अ. ३९ ओंव्या १०१–१५० )

एक दिवशीं मध्याह्निं बिंब आलें, तदा किरणीं तें उदक उष्ण झालें, ।
होय कासाविस बाल तये वेळीं, कोण त्राता त्याजला तये काळीं? ॥ ११
कपोतपक्षी पक्षिणी तया स्थानीं, तृषाहरणार्थ येति उदकपानीं, ।
पान करितां तेधवां जीवनासीं, बाळ बोले तें उभय पक्षियांसीं ॥ १२
'उष्ण उदकें मम प्राण पहा जाती, त्रिकळ होतों, मज कष्ट बहू होतीं, ।
मला नेऊनी खोल सलिलिं सोडा, यया कृत्यानें सुकृतभाग्य जोडा.' ॥१३
संतोषोनी उचलिलें तयें बाळा, तदा धांवे लगबगां अंतराळा, ।
दैवयोगें तैं विघ्न आड आलें, वणव्यानें आरण्य ग्रासियेलें ॥ १४
शिखा अग्नीच्या धांवती अंबरातें, थोर घाबरली पक्षिणी तदा ते, ।
धूम्र नेत्रीं लागतां विकळ झाली, बाळ पडलें अग्नींत तये वेळीं ॥ १५
म्हणे, 'हर ' हर ' धातया ' काय केलें! बाळ सुखिंचें अग्नींत भस्म झालें ।
तया विरहानें भ्रांति फार झाली, अग्निमाजी ते त्वरित आंग घाली. ॥ १६
लागवेगें तो पक्षि तेथ आला, अग्निमाजी त्यां बघुनि श्रमी झाला, ।
'उभय विरहानें वांचुन काय हो ' मी' सिद्ध झाला तात्काल कायहोमीं१७
हाहाकारें अग्नींत उडी घाली, पिता पक्षी पक्षिणी माय जाली, ।
मत्स्य बाळ श्रावण पोटिं आला, पूर्वजन्माचा असा योग झाला ॥ १८
उष्णतेनें श्रमताति मायबापें, रजनिमाजी चालोनि दिवा थोपे[1]।
मृदू वचनें बोलोनि मायबापां, तोषवूनी त्यां दूर करी तापा ॥ १९
तदा वृद्धें बोलती, 'सुकुमारा ' अरे वत्सा ' राजसा ' बा उदारा ! ।
तृषा लागे बा ' जीव होय कष्टी, उदक पाजूनी मना करीं तुष्टी.' ॥ २०
वचन ऐकोनी वृक्षिं कावडीला[2], जाय उदकासीं धरी आवडीला, ।
वनामाजी धुंडितां होय कष्टी, अकस्मात कासार पडे दृष्टी ॥ २१
निकट येवोनी झारि शुद्ध केली, उदक भरितां संतोषवृत्ति झाली, ।
तदा झारीचा शब्द पडे कानीं, दशरथाचें सधान तये स्थानीं. ॥ २२
मृगी पानास्तव तटाकासिं आली, असें जाणे, सधानिं[3] बाण घाली ।

---

१ थोपे—थांबे २ वृक्षिं कावडीला—कावड झाडाच्या फांदीला अडकावून. ३ संधान—पूर्वी शब्दाचा आवाज ऐकून निशाण मारीत असत. सदरहु प्रकारचे शब्दवेध हल्लींही प्रो० शहा व सरतानसिंग वगैरे मडळींनी ठिकठिकाणीं करून दाखविले आहेत. दिल्लीश्वर पृथ्वीराज याचें शरसधानकौशल्य इतिहासज्ञांना विदित आहेच सधान=लक्ष्य, निशाणाच्या मार्‍याची जागा

चापमुष्टींतुनि बाण तो निघाला, उदक भरित्या घातला पूर्ण घाला. ॥ २३
हृदयवर्मीं खोंचला तीव्र [1] भालीं, विकळ होई, भूमीस आंग घाली, ।
'हाय ! मेलों !' हा शब्द पडे कानीं, राव दचकोनी परम खेद मानी ॥ २४
अहा ! हत्या घडियली कीं नराची, विप्र किंवा सिद्धांतसाधकाची, ।
खेद चित्तीं मानुनी जवळ येई, पुसे त्यातें, 'सांग तूं कोण काई ? ॥ २५
ऋषी किंवा सिद्धांतपुरुष सांगें, घात केला नेणोनि [2] लागवेगें ।
महादोषी मी पूर्णपणें पाहीं, तयायोगें संतान होत नाहीं.' ॥ २६
येरु बोले, 'मी ऋषी नव्हें साचा, वैश्यवंशीं जन्मलों सत्य वाचा, ।
असो. जन्माची गती घोर साची, परी चित्ता चिंताचि फार जाची ॥ २७
वृद्ध मातापितरांसि वृक्षिं ठेवीं, सलिल न्याया त्यां चरण पुढें ठेवीं, ।
इथें येतां प्रारब्ध आड आलें, असो होणारें तेंचि सिद्ध झालें ॥ २८
हृदयिं सलतो शर, काढ लागवेगें, जाय घेऊनी सलिल तूं सवेगें, ।
मुकाट्यानें तूं उदक त्यांसि पाजीं, मृत्युवार्ता तूं कथन करीं माजी. ॥ २९
प्रथम सांगसि तूं जरिहि वर्तमान, श्राप देतिल ते, नव्हे उदकपान,' ।
असें ऐकुनि हृद्रोग तया जाला, उदकहस्तीं तो वृद्धनिकट आला ॥ ३०
[3] साद येतां बोलती, 'पुत्रराया ! सख्या ! आलासी [4] वंश उद्धराया.' ।
गौरवूनी बहु रिती बोलती ते, परी नेदी उत्तरा राव त्यांते. ॥ ३१
'अरे वत्सा ! तुज कष्ट फार जाले, मुखीं मौन्या कां तुवां साधियेलें ? ।
जरी बोलसि तूं आम्हुशीं सुवाचा, तरी प्राशूं जीवना, [5] मान साचा. ॥ ३२
हाचि निर्धार जाण सत्य साचा, आण वाहूं संकल्प हा जिवाचा. ।

---

१ भालीं—भल्ल किंवा बाणाग्र हृदयाचे मर्मस्थानीं जाऊन भिडलें या शब्दाचें सप्तम्यंत रूप चिंतनीय आहे हें केवळ वृत्तसुखार्थ आहे हें स्पष्ट आहे. २ लागवेगें—मूळ शब्द लागवेग ( पुल्लिंग ) = त्वरा, जलदी ३ साद—पाय-चाहूल. या शब्दाचा प्रचारांतील अर्थ हांक किंवा आरोळी असा आहे पण या ठिकाणीं तो नव्हे. कारण 'मुकाट्यानें तूं उदक त्यांसि पाजी' असा श्रावणानें दशरथाला इशारा केला होता. ४ वंश उद्धराया—उभयतां वृद्धांना वाटलें कीं आपल्या पुत्रानें सांगितल्याप्रमाणें जाऊन ताबडतोब पाणी आणलें म्हणून आनंदानें तूं खरोखर आमचे पोटीं कुलदीपक व वंशोद्धारक जन्मला आहेस असे उद्गार काढले हें त्यांचें आनंदपूर्ण आशिर्वचन व पुढील त्यांचा शोक या दोहोंतला भेद पाहिला म्हणजे कवीचें कारुण्यवर्णनप्रभुत्व व्यक्त होते. ५ मान साचा—हें तूं सत्य मान. "सत्य सत्य त्रिवाचा" हा जो शब्दसमुच्चय मराठी कवितेंत वारंवार दृष्टीस पडतो त्यासारखेच हे शब्द योजिले आहेत.

निश्चयातें ऐकूनि राव बोले 'होय दशरथ मी उदक आणियेलें.' ॥३३
वृद्ध म्हणती, "पुत्र तो कुठें गेला?" राव बोले 'मम हस्तकीं निमाला.'[1] ।
पुत्रमृत्यूचा शब्द पडे कानीं, पडति धरणीसी हाय शब्दवाणी. ॥ ३४
आंग टाकुनि लोळती दीनवाणी, गुणां स्मरुनी ते वदति दीन वाणी, ।
'धन्य पुत्रा! बा! स्ववंशानुसारा, वनीं मोकलुनी जासि कीं उदारा. ॥३५
कसें रायासी जीवदान केलें[2], अम्हां गहनीं त्यजुनिया भुकेलें[3], ।
अडामाजी अधींचि वोढियेलें, दोर कापुनियां आंत सोडियेलें, ॥ ३६
रात्रिमाजी उदकासि धाडियेलें, म्हणुनि रागें त्वां दूर गमन केलें?' ।
'पुत्र पुत्रा!' बाहोनी शब्द करिती, 'तुला कष्टविलें अह्मीं दिवसराती ॥३७
अरे बाळा' म्हणऊनि रूसलासी, कसा एकट तूं विष्णुपदा जासी? ।
अम्हां अंधांची यष्टि घोर रानीं, कुणीं चांडाळें घेतली हिरोनी' ॥ ३८
मुखीं घालिति ते तदा धूळ[4] साचे, फार कळवळलें चित्त तें नृपाचें, ।
वदे दशरथ त्यां, उदकपान कीजे, उभयवर्गीं[5] मग शाप अहो! दीजे' ॥
'अह्मी जैसें पुत्रासि आठवोनी, प्राण त्यजितों ह्रदिं प्राण सांठवोनी[6]।
तूंहि तैसा पुत्रासि आठवीशी, वियोगानें तात्काल प्राण देशी.' ॥ ४०
चिता रचुनीयां देह आर्थीं लावीं, वदूं...... . . . . .. ..वी, ।

---

१ निमाला—मेला २ कसे रायासी जीवदान केलें—तूं आपले जीव रायाचे हातांमध्यें कसे अर्पण केलेस जीवदान केलें हा वाक्प्रचार व त्याचा या पक्तींतील अर्थ ही दोन्हीही अनन्यसाधारण आहेत. ३ भुकेलें—या शब्दाचा अर्थ घोर अरण्यांत आम्हाला भुकेले ठेवून कां रायाला जीवदान केलेंस असा नव्हे किंवा आमची क्षुधा शमन झाल्यानतर मग बेलाशक जीवदान करावयाचें होतें असाही त्यापसून ध्वनि काढण्याचा नव्हे पुत्र उदरीं यावा ही दंपत्याची नेहमाची भूक श्रावणासारखा पुत्र पोटीं आल्यानें या वैश्यवृद्धांची जन्माची तहानभूक दूर होऊन आकठ तृप्ति झाली होती पुन्हा त्याच्या या आकस्मिक मृत्यूमुळें त्यांना सर्व ससारभर कसें अखंड औदासीन्य प्राप्त झालें याचें 'भुकेलें' या एका शब्दांत कवीनें जिवाला चटका लावण्यासारखें रसमथन केले आहे ४ मुखीं धूळ घालिति—अतिशोकाचें चिन्ह. ५ उभयवर्गीं—उभयतांना. ६ ह्रदिं प्राण सांठवोनी—आमचे पंचप्राण एका ठिकाणीं गोळा होऊन. मनुष्यांचा प्राण जावयाला लागला म्हणजे त्याच्या शरीरांतील सर्व पंचप्राण हृदयांत गोळा होतात व नतर ते त्याला सोडून जातात हात, पाय, कान, डोळे वगैरे इद्रियातील सर्व शक्ति आपआपल्या स्थानाला सोडून हृदयांत येतात. ७ देह आर्थीं लावीं—देहाचे सार्थक कर; शास्त्रोक्त क्रियाकर्मांतर कर.

मनीं चिंतुनि प्रभुपाय सदा साचे, देह सार्थका लाविले ज्यांचे ॥ ४१
क्रियाकर्मा तेधवां आचरोनी, शापवचना आठवी, मनीं मानी[1] ।
म्हणे, मजला संतती नव्हे साची, शंकुनगांठी[2] बांधिली आनंदाची ॥ ४२
शाप नोहे हा अनुग्रहाचि साचा, धन्य मानितसे दिवस आनंदाचा,' ।
फिरे मागें तो वसिष्ठासि सांगे, हवन मांडी[3] तो नृपहि सानुरागें ॥ ४३
तपीयाचें हें वचन खरें कीजे, राजयातें सायुज्यपदा दीजे, ।
'अंतकाळीं मग स्मरे जो सुताचा, मुक्तरूपी देह कीं जाण साचा ॥ ४४
अशा योगें त्यागिला देह जाणा, तथा परमा ती गती प्राप्त जाणा, ।
यया अर्थी प्रभुराज वंशिं आला, भक्तवचनातें पाळणें जयाला ॥[4] ४५

---

१ मनीं मानी—मनी भावे मनीं विचार करिता झाला २ शकुनगांठी = खूणगांठ ३ हवन मांडी—सूर्यवंशांत उत्पन्न झालेल्या दशरथ राजानें लोमपाद नावाच्या राजाकडून त्याचा जांवई ऋष्यशृंग यास बोलावून आणून पुत्रकामेष्टी केली म्हणजे त्याला चार पुत्र होतील असें सनत्कुमाराचें वचन आहे वाल्मिकी रामायण बालकाड सर्ग ११ विबुधप्रियरामायणामध्यें मोरोपतानीं याला अश्वमेध म्हटलें आहे

" ॥ श्रीश पद्मज ऋष्यशृंग सनत्कुमार तपोबळें ॥
॥ अश्वमेध वशिष्ट सत्क्रुतें स्वकीय कुतूहलें ॥

मोरोपंत–विबुधप्रियारामायण.

४ यया अर्थी प्रभुराज वंशी आला—श्रावणाच्या पित्यान दशरथाला शाप दिला कीं आमच्याप्रमाणें तूंही पुत्राला आठवून मरशील; सदरहु शापोक्ति सत्य करण्याकरितां व तसेंच दशरथ राजाला सायुज्यमुक्ति देण्याकरितां देवानें दशरथाचे वंशीं रामावतार घेतला. जर देवानें रामावतार घेऊन दशरथाचें पुत्रत्व स्वीकारलें नसतें व दुसरा कोणी दशरथाचा पुत्र झाला असता तर दशरथाला सायुज्यमुक्ति मिळाली नसती. कारण पुत्रास आठवून मरशील, असा शाप असल्यामुळें एरवीं जो भगवद्भक्त दशरथ राजा 'अंतकाले च मामेव स्मरन्मुक्त्वा कलेवर' या भगद्वाक्याप्रमाणें मरणसमयीं ईश्वरनामाचा घोष करून कैवल्यपदाला जाता तो शापामुळें ईश्वराला न आठवितां पुत्राला आठविला. ह्या अडचणींतून दूर व्हावें आणि 'तपीयाचें हें वचन खरें कीजे । राजयातें सायुज्यपदा दीजे' हे दोन्ही हेतु सिद्धीस जावे म्हणून 'यया अर्थी प्रभुराज वंशीं आला, भक्तवचनातें पाळणें जयाला' यासंबंधाची सर्वसामान्य कथा अशी कीं जयविजयांना सनकसनंदनानी पृथ्वीवर राक्षसरूपानें तीन वेळ जन्म घेण्याचा शाप दिला होता. या शापांतून त्याना मुक्त करण्याकरितां व

( पुढील पृष्ठ पहा. )

देवनाथाचा प्रभू दीनबंधु, पूर्ण व्यापक आनंद सांद्रसिंधू, ।
कीर्ति अपुली आपण वर्णिताहे, तया प्रभुचें यश जगीं गाजताहे ॥ ४६.

( मागील पृष्ठावरून चालू )

त्यांच्या विरोधभक्तीने संतुष्ट होऊन त्यांच्या पूर्वसंचिताचें दहन करण्याकरितां परमेश्वराला अवतार घ्यावयाचे होते यांतच रामावतार झाला या रामावताराचा श्रावणाच्या बापाच्या शापाशीं व मृत्यूशीं कांहीं संबंध नाहीं परंतु देवनाथमहाराजांनी आपल्या श्रावणाख्यानाच्या उपसंहारामध्यें हा सांधा इतक्या बेमालूम रीतीनें जोडून दिलेला आहे कीं त्यायोगानें या कवीची अति श्रेष्ठ प्रतिभाशक्ति व्यक्त होते. यया अर्थीं प्रभुराज वर्शीं आलाः—या लोकवाक्याला श्रीधरस्वामी लौकिकविचार मात्र समजतात

" गर्भवासा आला भगवंत । म्हणतां हासतील साधुसंत ।
लीलावतारी जगन्नाथ । जन्ममृत्यू त्या कैंचा ॥ ६७ ॥
ज्याचें करितां स्मरण । जाय जन्ममृत्यू खंडोन ।
तो राहिला गर्भी येऊन । कल्पांतीं घडेना ॥ ६८ ॥
उगाचि लौकिकभाव । दाविली मृत्युलोकींची ठेव ।
तो ब्रह्मानंद मृत्यु स्वयमेव । जन्ममृत्यू त्या कैंचा ॥ ६९ ॥
अनंत रूपें अनंत नामें । अनंत अवतार अनंत कर्में ।
अनंत लीला घनश्यामें । भक्तांलागीं दाविल्या ॥ ७० ॥
अनंत ब्रह्मांडें अनंत शक्ति । अनंत सुगींच्या अनंत कीर्ति ।
अनंत रूपें अनंत मूर्ती । अतर्क्यगति वेदशास्त्रां ॥ ७१ ॥
असो लौकिकविचार देख । गर्भी आला लक्ष्मीनायक ॥ "

श्रीधर–हरिविजय अ ३.

१ कीर्ति अपुली आपण वर्णिताहेः—देवनाथमहाराज म्हणतात कीं, प्रभूची कीर्ति वर्णन करण्याचे सामर्थ्य माझ्यांत नाहीं तर ईश्वरच आपल्या सामर्थ्यानें माझ्या मुखाच्या द्वारां आपली कीर्ति वर्णन करितो. याला अनुरूप तुकाराममहाराजांची उक्ति पहावीः–' आपुलिया बळें नाहीं बोलवत । सखा भगवत वाचा त्याची. '

# कृष्णजन्म.

### श्लोक

भूभार फाराच विकाररहीत त्याला,
  घे अमृताशनिं समागमिं त्या पित्याला, ।
गेला शरण विधि तो अविधीविनाशा,
  जो दीनवत्सल प्रभू पुरवी मनाशा. ॥ १
नीवेदिलें सकळ वृत्तहि देवराया,
  प्रार्थियलें अजास दुष्टकुळा हराया, ।
तों ऐकती ध्वनि अकल्पित सूर कानीं,
  जो बोलिजे विभु जगत्त्रयपालकांनीं. ॥ २
'मी अवतरेन यदुच्या कुळीं तसारे !
  सारे तुम्ही सुर हि यादव व्हा पसारे, ।
मारूनि दुष्ट करुं पालन सज्जनांचें,'
  हें ऐकतां सुरसमुच्चय सज्ज नाचे. ॥ ३
विदर्भाचे वंशीं जगजननि लावण्यभरणी
  अजन्मा ये जन्मा यदुकुळिंच भूभारहरणीं, ।

---

१ भूभार फाराचि–सज्जनाचे कृष्णजन्मासंबंधानें भागवतांतील दशम-स्कंदांतील पहिले अध्यायांत कथा वर्णिली आहे ती येणेंप्रमाणें:– ' पृथ्वी-वर लक्षावधि दैत्य मदोन्मत्त होऊन प्रजेस गांजूं लागले तेव्हां पृथ्वीला त्या दुष्टांचा भार सहन होइनासा झाला. तेव्हा तिनें गाईचे रूप घेतलें व अत्यंत खिन्न होऊन ती रडत रडत ब्रह्मदेवाकडे गेली. तिची ती दीन स्थिति पाहून इंद्रादिक देवांस व शंकरास बरोबर घेऊन पृथ्वीसहवर्तमान ब्रह्मदेव क्षीरसमुद्राचे कांठीं महाविष्णूकडे गेला; व त्यानें त्यांची मोठ्या काकुळतीनें प्रार्थना केली. तेव्हां आकाशवाणी झाली ती ब्रह्मदेवानें समाधीमध्यें ऐकिली व तिचा आशय त्यानें इंद्रादि देवांना सांगितला त्यात भगवनांनीं देवकीच्या उदरीं जन्म घेण्याचें कबूल केलें, असें आहे. अविधीविनाशा=विधि (नियमन, निबंध) आणि विनाश ज्याला नाहींत असा. २ ध्वनि अकल्पित— हें आकाशवाणीचें सूचक. विभु—(१) स्वामी, धनी, (२) सर्वशक्तिमान्, अपार शक्तिविशिष्ट. पसारे—परिचारक, सेवक.

जया गाती वेद श्रुति कवि हि व्यासादि सुरसा
हरीची ते लीला श्रवणीं स्थिर होवोनि परिसा. ॥ ४
उग्रसेनतनया आजि देवकी, नेमिला वर तिये वसुदेव कीं, ॥
ओहरें[1] मिरविती रथयानीं, कंस सारथि वरातप्रयाणीं[2] ॥ ५

## दिंड्या.

महोत्साहें मिरवितां वधुवरां या । थोर पोटीं स्वानंद कंसराया, ।
रथीं आपण सारथी जाहलासे । करी कौतुकालागिं मन उल्हासे. ॥ ६
शैलशिखरीं आदळे वज्र जैसें । तये समयीं जाहलें तया तैसें, ।
'देवकीचा सुत आठवाचि कंसा । तुझ्या प्राणातें हरिल जाण ऐसा.' ॥ ७
वदे ऐशी अंबरीं देववाणी । ऐकतांची दचकला कंस कानीं, ।
म्हणे, 'कैंची भगिनि हे मृत्युखाणी । रथाखालीं पाडिली धरुनि वेणी ॥८
वधूं इतें म्हणउनी हेत स्वमनीं । उभा ठाके खल, शस्त्र धरुनि पाणीं, ।
घाबरी ते सुंदरी अश्रु नयनीं । वदे भावा नेधवा दीन वचनीं ॥ ९
'काय कारण बा ' तूज वध कराया ? । काय केला अन्याय बंधुराया ।
बहुत होती मजवरी तुझी माया । कशी निष्ठुरता आजि आलि हृदया ।१०
माय मारी बाळासि जरी हातें । कोण त्यातें मग वांचवूं पहातें ? ।
कोण त्राता तुजवीण सांग मातें ? । बंधुराया ' दे प्राणदान मातें. ॥ ११

## श्लोक.

बहु प्रार्थिजे ते हरीलागिं माया । परी हिंसकालागिं न येचि माया, ।
करीं खड्ग घे नागवें मारण्यात । म्हणे, 'मृत्युच्या ह्या वधू कारणातें,'॥१२
वसुदेव बोले धरोनी करा या । 'स्त्रिहत्या कशी आदरीली कराया ? ।

---

१ ओहरें—नवरावायको. हरिविजय अ० २ ओवी १२८ 'मिरवावया दोघें वधूवरें॥ वरात काढिली कंसासुरें॥रथावरी बैसविलीं ओहरें॥ आपण धुरे सारथी जाहला ' तसेंच हा शब्द विठ्ठलकवी केरीकरकृत सीतास्वयवरांत सांपडतो:—
" त्रीसूत्रीं सुतवोनि सूत्रवलयें त्यां ओहरां बांधिलीं ।
आंबा शिंपुनि आणिलीं वधुवरें वेदीवरी बैसलीं "
वधूवरें या शब्दाचा ओहरें हा अपभ्रंश आहे, पण आतां आधुनिक कवींच्या प्रचारांतून तो जात चालला आहे. २ वरातप्रयाणीं—वरातीचे वेळीं कंस मोठ्या हौसेनें रथ हांकण्यास बसला होता. अंबरीं=आकाशांत.

सुजाणा ! तुझा सांग हेतू कमाहे ? महापाप[1] तूं जाणसी ना कसा हें?"॥१३
वदे यास तो स्वामि दैत्यादिकांचा । इयेपासुनी मृत्यु अस्मादिकांचा; ।
इचा आठवा पुत्र जो सत्य वाचा । करी घात तो आमुचीया जिवाचा. ॥

## दिंड्या.

ऐकुनीयां वसुदेव तया बोले । 'तुला अर्पिन होतील इला बाळें, ।
नव्हे वाणी असत्य कदा काळें । सोडिं देई जीवदान वेल्हाळे.' ॥ १५
उभयतां त्यां मग ठेवि बंदिशाळे । रक्षणातें बैसवी दैत्यपाळे,[2] ।
प्रथम झाला तिस पुत्र तये वेळे, । दिला कंसा नेऊनि शीघ्र काळें ॥ १६

## ओंव्या.

रायें बाळ पाहोनि नयनीं । दया उपजली अंतःकरणीं, ।
म्हणे, मृत्यु यापासोनी । आम्हांलागोनी नसेची. ॥ १७
निःकारण कां वधावा ? । ऐसें विचारूनी तधवां ।
कंस म्हणे, 'बा वसुदेवा ! । बाळ न्यावा निजठायां.' ॥ १८
वसुदेवें उचलोनी बाळा तया । आश्चर्य मानितसे हृदया, ।

---

१ महापाप—स्त्रीहत्येचें पातक किती मोठें आहे ह्याचें वर्णन हरिविजय व शिवलीलामृत यांत केलें आहे.

हरिविजय अध्याय २

येक रथभरी वधितां किडे । येक मेषवधाचें पाप घडे ॥
शत मेष मारितां घडे । यक वृषभहत्या पैं ॥ १४८ ॥
शत वृषभ वधिले । एक गोहत्येचें पाप घडलें ।
शभर गोवधांहून आगळें । ब्रह्महत्येचें पाप पैं ॥ १४९ ॥
शत ब्रह्महत्येचें पाप जाण । एक स्त्रीहत्यासमान ।
कंसराया तूं परम सुजाण । स्त्रीदान मज देईं ॥ १५० ॥

शिवलीलामृत अध्याय २

उदरांत गर्भ सूक्ष्म अज्ञान । वधितां दोष तुज दारुण ।
एक रथभरी जीव वधितां सान । तरी एक वस्त वधियेला ॥ ४८ ॥
शत वस्त वधितां एक । वृषभहत्येचें पातक ।
शत वृषभ तें गोहत्या देख । घडली शास्त्र वदतसे ॥ ४९ ॥
शत गोहत्येचें पातक पूर्ण । एक वधितां होय ब्राह्मण ।
शत ब्रह्महत्येचें पातक जाण । एक स्त्री वधिलीया ॥ ५० ॥
शत स्त्रियांहूनी अधिक । एक गुरुहत्येचें पातक ।
त्याहूनी शतगुणी देख । एक गर्भिण वधिलीया ॥ ५१ ॥

सत्यवाचा=मागें श्रावणाख्यानांतील टीप पहा. २ दैत्यपाळे—दैत्यसमूह.

म्हणे, आजि वाटपाडियों । कैशी दया उपजली ? ' ॥ १९
बाळ घेवोनी देवकीरमण । बंदिशाळे आला नलगतां क्षण ।
इकडे कंसमेलागुन । ब्रह्मनंदन पातला. ॥ २०
कंसरायें देवऋषी । बैसविला सन्मानेंशीं, ।
करोनि पाद्यार्घ्याचमनासी । षोडशोपचारेंशीं पूजिला. ॥ २१

श्लोक.

ऋषिवर मग बोले, ' सत्य हे चूक राया !
वसुंत अरि प्रवर्ते कोण घाता कराया ? ।
न कळुनि सुत त्याचा त्यासि दीला कसा रे ! '
विधिसुत वदताहे, ' मारिं हे तोकं सारे. ' ॥ २२
गेला असें वदुनि तो हितशत्रु साचा ।
मानूनि कंस करि घात तसाच सांचा, ।
जों सातवा धरित भूधर गर्भठाणें ।
तों देवकीस वरिती विरश्रीउठाणे, ॥ २३

छंद.

गर्भा आये फणीपाळ, भयी देवकी खुशियाल, ।
बडी आखियां भई लाल, मगनमस्त हालमों. २४
भरी खाशी ललकार, मुसळ नांगर हतियार, ।
लावूं दैत्यनको मार, करूं ठार पलखमों. ॥ २५

---

१ वाटपाडिया—वाटसरूस लुटण्याचें काम करणाराला 'आधींच वाटपाड्या चोरास । निरोप दिधला भुभुजें" शिवलीलामृत अ० १२ ओं० १३० २ ब्रह्मनंदन—नारद ३ वसुंत—आटामध्यें. ४ तोक—बालक. ५ हितशत्रु—बाह्यतः हित करितो असें दाखवून अहित करणारा.

हरिविजय अध्याय २ ॥

नारद हितशत्रु होय । हित सांगोन करवी क्षय ।
बाळहिंसा करितां पाहे । अल्पायुषि होय तो ॥ १८४ ॥
कुलक्षय होऊनि राज्य बुडे । ऐसें नारद सांगे निधाडें ।
कंसासी तें बुद्धि आवडे । म्हणे बरवें कथिलेंजी ॥ १८५ ॥

सांचा=सहाजणांचा

६ भुधर—शेष ७ विरश्रीउठाणे—विरश्रीचीं चिन्हें. ८ फणीपाळ—शेष ९ मगनमस्त हालमों—मदोन्मत्त स्थितींमध्यें १० पलखमो—क्षणांत, पळांत

वीरवानी बजे चंग[१], वसुदेव भया दंग, ।
कहे कोन भया रंग, थरक अंग कांपता. २६

कभू जाने रक्षपाल, अभी होवेंगा जंजाल, ।
लाज राखो भूपाल, भुवनपाल नाथजी ! ॥ २७

## ओंव्या

असो सात मास झालिया । जे हरीची निज योगमाया, ।
निज सत्ते सांगे तया । काढोनि नेइजे गर्भासी ॥ २८

गर्भ नेवोनि ते अवसरीं । घातला रोहिणीचे उदरीं,
सप्तमासिका गर्भांतरीं । देखोनि घाबरी झाली ते, ॥ २९

भ्रतार नसतां सन्निधानीं । नवलपरी गर्भधानीं, ।
तंव वदली आकाशवाणी । 'चिंता रोहिणि ! करूं नको. ॥ ३०

हा वसुदेवाचा गर्भ देख । पुत्र होईल दैत्यांतक, ' ।
ऐसें ऐकतां सम्यक[३] । जाहला हरिख[४] रोहिणीतें. ॥ ३१

सिंहावलोकनें[५] तत्वतां । श्रोतीं परिसिजे मागील कथा, ।
मातव्या गर्भाची अवस्था । झाली तत्वतां ऐशा परी. ॥ ३२

गर्भ गळतांची वार्ता । दूतीं निवेदिली मथुरानाथा, ।
कंस म्हणे, ' सर्वार्थतां । जपा आतां आठव्यातें. ' ॥ ३३

आठवा हा मोक्षदायक । म्हणोनि कंसासी बैसला धाक, ।
अट्टहास्यें[६] करोनि हाक । दूतांसि देख सांगतसे. ॥ ३४

---

१ चग—चांग, चांगली. २ छंद. २४ ते २७ पर्यंतचें वर्णन भागवतांतील दशमस्कंदत नाहीं परंतु अशा तऱ्हेचे पण याहूनही जास्त विस्तृत वर्णन हरिविजयात श्रीकृष्ण देवकीचे उदरीं शिरले त्या वेळीं वसुदेवानें देवकीला प्रश्न केल्यावर तिनें जें वीरश्रीयुक्त उत्तर दिले त्यांत आहे असेंच वर्णन राम कौसल्येचे उदरीं आले तेव्हांही आहे ३ सम्यक—चांगलें ४ हरिख—आनंद, संतोष ५ सिंहावलोकन—मागें पहाणें सिंहाला आपलें तोंड मागें करून स्वस्थपणानें बराच वेळ पहाण्याची संवय असते त्यावरून सिंहावलोकन हा शब्द प्रचारात आला, गत गोष्टींचें पर्यालोचन ६ अट्टहास्यें—( १ ) क्रोधावेशानें मोठ्यानें हंसून. ( २ ) दीर्घपरिश्रमानें व कष्टानें येथें पहिला अर्थ लागतो

## दिंड्या

आठव्याचा आठव भरा ठेवा, पूर्ण लक्षा तो आळसा न ठेवा, ।
मला गमला माझाच मोक्षठेवा[1], रुचत नाहीं उपभोग दुजा ठेवा ॥ ३५

आठव्यानें व्यापिल्या दिशा दाही, दिसे त्यातें सबाह्य अंतरींही, ।
कोण त्याचा तो योग असा पाही, वर्णिती त्या भाग्यासि पार नाहीं ॥ ३६

असो, ऐसा लागला छंद कंसा, पुढें झाला वृत्तांत कसा परिसा ।
दीनबंधू त्या पयोनिधीवासा, दया आली योजिला योग कैसा ॥ ३७

परित्राणाय[2] साधुच्या उभारा, धरी निवटाया[3] सर्व भूमिभारा, ।
बंदिशाळे त्या तया दिनोद्धारा, घडे येणें त्रिभुवनसुकुमारा[4] ॥ ३८

---

१ मोक्षठेवा—मृत्यूचें साधन. व्यवहारांतील मोक्षाचा अर्थ ह्या ठिकाणीं नाहीं कारण कंस हा पावन दैत्यांपैकीं नव्हता कंसाच्या उत्पत्तीसंबंधानें श्रीधर कवीनें हरिविजयांत वर्णन दिलें आहे, तें असें:—

> उग्रसेन मथुरानाथ । कंस दुरात्मा त्याचा सुत ।
> परि तो पितृरेत नव्हे निश्चित । अन्य वीर्य मिसळलें ।
> उग्रसेनाची स्त्री पतिव्रता । परम सात्विक शुचिस्मिता ।
> एक दैत्य आला अवचिता । तेणें उचलोन ते नेली ॥ १०३ ॥
> अरण्यांत नेऊन बळें । सती भोगिली चांडाळें ।
> मग दैत्य म्हणे ते वेळे । पुत्र तुज होईल ॥ १०४ ॥
> मग सती काय बोले बोल । तुझा पुत्र जो कां होईल ।
> त्यासी श्रीकृष्ण वधील । आपटोन क्षणमात्रें ॥ १०५ ॥
> सती देखोन क्रोधायमान । दैत्य पळाला टाकोन ।
> त्यावरि कंस दुर्जन । पुत्र जाहला तोचि पैं ॥ १०६ ॥

असें अपवित्र जनन असल्यामुळें कंसाला कृष्णहस्तें मोक्षाची इच्छा नसून मृत्यूची भीति मात्र वाटत होती

२ परित्राणाय—संरक्षणार्थ 'परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृतां । धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे ॥' हे भगवद्गीतेंतील वाक्य पहावें. उभारा धरी=उद्योग करी, अवडंबर पसरी; पसारा मांडी. ३ निवटाया—नाहींसा करण्याकरितां, नाश करण्याकरितां ४ घडे येणें त्रिभुवनसुकुमारा—परमेश्वर पहिल्यापासून त्या ठिकाणीं पाठिराखेपणानें उभा होताच. जो सतत दीनांच्या सन्निध आणि स्मरणमात्रें प्रकट त्याचें गर्भावतरण श्रीधरस्वामी 'लौकिक विचार समजतात हरिविजय अ० ३ यांत स्वामी म्हणतात, तो उतारा श्रावणाख्यानांतील पृष्ठ १३६ टीपेंत पहा

### श्लोक.

अज अजित अजन्मा जन्म घेऊ पहातो,
प्रगट तिजपुढारीं अष्टवर्षी पहा ! तो, ।
चतुर्भुज करिं चारी आयुधें शोभती तें
निरखुनि मनिं देवा देवकी तोषली ते ॥ ३९

उभा जो प्रभू त्या जगत्कारणातें,
रमावल्लभू दुःखसंहारणातें, ।
नमूनी सती पादपद्मा वरीते,
वदे देवदेवा तया सुंदरी ते. ॥ ४०

कृपाळा ! प्रभू ! हे घनश्यामवर्णी,
तनू चित्प्रभा भा अशी कोण वर्णी ? ।
फणी शीणला, वेद मौनावलेती,
महद्भाग्य मीं देखिलीं पावलें तीं ॥ ४१

'कृपाळा ! स्मरे नेम पूर्वील साचा,
नसावा कदा योग हा आळसाचा, ।
किती भोगिजे ही अशी बंदिशाळा,
त्वरें बाळ हो ! तोडें काळा विशाळा. ' ॥ ४२

वदे श्रीहरी, 'बाळ होतों कुळातें, त्वरें नेउनी घालिजे गोकुळातें, ।
दिसां थोडक्या बंदिशाळा तुटावी, अशी नेमिली चित्तिं चिंता तुठावी.'
वदोनी असें सांडिली ती अहंता, त्वरें बाळ होतो प्रभू कंसहंता, ।
इला वाटलें मद्धृदीं पूर्ण जन्मा, प्रभू जाहला बाळ कीं हा अजन्मा.[१] ॥४४

---

१ प्रभु जाहला बाळ कीं हा अजन्मा–कृष्णजन्मासंबधानें भागवतांत कथा आहे कीं, पहिल्यानें कृष्ण जन्माला आले तेव्हां चतुर्भुज, पीतपीतांबरशंखचक्रगदायुक्त असें रूप त्यांनीं धारण केलें व नंतर देवकीच्या विनवणीवरून त्यांनीं लौकिक बाळाचें रूप धारण केलें यासबधानें हरिविजयांतील ३ऱ्या अध्यायांत वर्णन आहे, तें येणेप्रमाणें:—

तूं विश्वंभर बहु थोर । परि लोक म्हणती माझा पुत्र ।
ऐसा होईं तूं राजीवनेत्र । आळी माझी पुरवावी ॥ १६५ ॥
हरि म्हणे ते वेळां । मी बाळक होईन अवलीळा ।
परि मज सत्वर गोकुळा । नेऊनियां घालावें ॥ १६६ ॥

( पुढील पृष्ठ पहा )

रघुविरजनकानें मारिलो तोच मास ।
पारि दिन अजि पूर्णा वृद्धि जे ये तमास ।
तिथि तरि वसु जाणा, काळ वर्षाऋतू कां
यदुकुळकुळदीपा जाहला जन्म तोकां ॥ ४५
दे मध्य शार्वरिच वासर सौम्य जाणा,
संयुक्त रोहिणि शिशुत्व घडे किं जाणा,
होतां किशोर सुर–तोष करी तनाना,
त्या दुंदुभीसहित वाजति वाद्य नाना ॥ ४६

दिंड्या.

विमानाची जाहली नभीं दाटी, सुरानदें वर्षती सुमनवृष्टी, ।
विधीआदी अमरेंद्र धूर्जटी, बंदिशाळे पातले देव कोटी ॥ ४७
मित्रपुत्रादी आपणास तीतें, प्रदक्षणूनी आदरी स्तुतीतें, ।
असें देखोनी हास्य किजे नाथें, नमुनि गेले ते आलिया सुपंथें ॥४८
दिशा व्यापीत तनूदीप्ति ज्याची, अशी पाहोनी मूर्ति श्रीअजाची, ।
हर्षवृत्ती सुर शेषतनू ज्याची, परी चित्तीं चिंता हि बहू जाची॥४९
बहू सुंदर जाहलीं सहा बाळें, वधीयेलीं या दुष्ट कसकाळें, ।
कोटि भानूंचें तेज नखीं लाळे, असें लाभे, निववील कसे डोळे? ५०

---

( मागील पृष्ठावरून समाप्त )

भगवान् बाळरूप झाल्यानंतर कसे दिसावयास लागले याबद्दल मध्वमुनीश्वराचें पद आहे तें येणेंप्रमाणें:—

अचडें बचडें छकुडें । माझें ॥ ध्रुवपद ॥
विकसितपंकज लोचन ज्याचें । जननि म्हणे हें चिपडें ॥ माझें० ॥ १ ॥
त्रिभुवनपाळक बाळक त्याला । पांघुरविति घोंगडें ॥ माझें० ॥ २ ॥
आंगणिं रांगत मंजुळ बोलत । सोन्याचें ठिकडें ॥ माझें० ॥ ३ ॥
मध्वमुनीश्वर खेळवि अकीं । ब्रह्मसनातन उघडें ॥ माझें० ॥ ४ ॥

—अनेककविकृत पदसंग्रह भाग ३, पान ५३.

१ रघुविरजनकानें मारिला तो श्रावणमास २ वसु—अष्टमी ३ तोका—बालकाला ४ शार्वरि—रात्र ५ वासर=दिवस ६ सौम्य=बुधवार. ७ किशोर = बालक ८ मित्रपुत्रादि = यम वगैरे. मित्र म्हणजे सूर्य, त्याचा पुत्र यम. त्यानें नमस्कार आधीं केला कारण काळाचाही काळ जन्मास आला म्हणून ९ असें लाभे, निववील कसे डोळे—हें असें बालक लाभे कसें ( कंसाच्या हातून सुटणार तेव्हां लाभणार ) आणि ( मोठें होऊन ) डोळे निववील कसें !

## श्लोक.

वदे देवकी आपुल्या वल्लभातें, 'त्वरें गोकुळा न्या रमावल्लभातें,
म्हणे तो तिलें, 'जागिजे द्वारपाळीं, कपाटें इहें[1] दुष्ट मोठे कपाळीं[2]. ॥ ५१
असो लाज हे त्या जगत्पाळकास,' वदोनी असें घे त्वरें बाळकास,
हृदीं लाविला तो शिशू चक्रपाणी, तयीं लोटिलें लोचनालागिं पाणी ॥

## पद

'भाग्यहीन मी' देवकि वदली विनवी वसुदेवा,।
'निर्दय हृदयीं उचलुनी नेतां कसें देवदेवा?'॥ ध्रुवपद ॥
सजल सघन घन गगनीं वळला वर्षत सुकाळीं,।
घोर शार्वरी आज भासते काळासम काळी[3],।
सदय मृदू अति हृदय कठिण कां मात दुःखाळीं[4]।
लोटुनि नेतां चिद्रव...जो शिशु हा ये काळीं?॥ निर्दय० ॥ १ ॥
सहा मारिलीं बाळें कंसें सातवें गळालें,।
आठवा हा तुम्ही नेतसां मन कां हो! चळलें?।
घाबरला जिव निघूं पाहतो, कर पद हे गळले,।
जन्मांतरिंचें कोण पाप तें न कळे हें फळलें[5]?॥ निर्दय० ॥ २ ॥
स्नेहभरें मीं स्नेहें[6] नाहीं जाउळ माखियलें,।
पायांवरि घेउनी कुमारा नाहीं न्हाणियलें,।
नाहीं दिधली घुँटी[7] स्वहस्तें, नाहीं पाजियलें,।
कुळिंचे दैवत त्यात नाहीं सटवीशीं पुजिलें ॥ निर्दय० ॥ ३ ॥

---

१ कपाट—द्वार २ कपाळ=समुदाय, जमाव ३ काळी—भयंकर ४ दुःखाळीं—दुःखानळीं ५ जन्मांतरिंचें कोण पाप तें नकळे हें फळलें=पूर्वजन्मींचें कोणतें पाप आडवें आले हें कळत नाहीं नुसत्या जन्मातर शब्दाचा अर्थ 'पूर्व जन्मांतरींचें दुष्कृत' असा दोन पदांत गोविंदमहाराज वर्णीकर यांनीं केलेला आहे. 'नाहीं सुकृत वा माझ्या पदरीं। मज दीना तारीं। जन्मांतर आडवें पडलें भारी। हें कोण निवारी।' (अनेककविकृत पदसंग्रह भाग दुसरा पद २८४, वर्णीकर गोविंदमहाराजांचें पद) तसेंच त्याचेंच पद २५५ पहा "कैसें जन्मांतर आडवें पडलें। विषयीं मन बुडलें." ६ स्नेहें—तेलानें. ७ घुटी—बाळकडू.

कठीण केलें मन वसुदेवें गमली सीमा या, ।
मुक्त कपाटें झालीं घेउनि निघतां अमाया,
देवनाथप्रभुची हे ऐशी अतिदुर्धर माया, ।
स्रवति लोचनीं जीवनबिंदु ती खेद करी माया ॥ निर्दय० ॥४॥ ५३

### श्लोक.

तुटे शृंखळा मुक्त झालीं कपाटें, तया द्वारपाळाचिया नेत्र पाटें, ।
सुखें [शार्वरी] माजि निद्रा कडाडो, पिता पुत्र घेवोनि जातो धडाडा ५४

### सवाई

अजि मेहु गडाड गडाड बराखत बूंद बडी गहरी टपके,
अजि रात अंधारि परी नहिं सूजत जात चलो पगके टपके, ।
फणिराज करे फणछाय तनू, प्रभु छानि लगाय रह्यो चुपके, ।
चल ठाड रह्यो तटपे जमुनाजळ जात चढ्यो लहरी लपके. ॥ ५५

### श्लोक.

शिरीं घे वसूदेव त्रैलोक्यराया, यमूना चढे पादरेणू वराया, ।
पदें स्पर्शतां मार्ग तो वेगळाला, त्वरें देव घेवोनि ये गोकुळाला ॥ ५६
यशोदेसि ते जाहली योगमाया, तिनें लाविले लोक निद्रे रमाया, ।
पहा ते कशी नंदपत्नी सुदेवा, सुता घेत, ठेवी वसूदेव देवा. ॥ ५७

---

१ गमली सीमा या—दुःखाची सीमा अथवा कडेलोट झालासें वाटलें कारण ईश्वर पोटीं आला एवढा भाग्योदय, आणि लागलेंच त्याला अतरावें लागलें एवढें महद्दुःख २ अमाया—श्रीकृष्णाला माया म्हणजे पार अथवा मर्यादा नाहीं ज्याला त्याला. अगर मायेच्या पलीकडचा ३ जीवनबिंदु—पाण्याचे थेंब. ४ मुक्त झाली कपाटें:—वामन म्हणतात, " असंगाचें शस्त्र प्रभु उचलितां तीं उघडती । कटाक्षें कृष्णाच्या अघटित विचित्रेंच घडती ॥ " ५ निद्रा कडाडा—निद्रा लोटली, निद्रा पातली. कडाडली = त्यांच्यावर कोसळून पडली; इतके ते गाढनिद्र झाले धडाडा=बेधडक, राजरोसपणें ६ मेहु—मेघ. ७ गडाड गडाड बराखत=गडगड आवाज करून पर्जन्य वर्षू लागले ८ गहरी—रेलचेल, पुष्कळ. ९ चुपके—चिकटून १० पहाते..... देवदेवा—पहा यशोदा कशी भाग्यवान् की, वसुदेव सुता घेत, देवा ठेवी, म्हणजे वसुदेवानें झोंपी गेलेल्या यशोदेच्या कुशीतून योगमायेला घेऊन देवाला तिच्याजवळ ठेविलें वामनपंडित म्हणतात.—

यशोदेसि होता सुता योगनिद्रा । समस्तां स्त्रियांयुक्त ये गाढ निद्रा ॥
न जाणेचि ती पुत्रिकीं पुत्र काही । न ते लक्षिली आणिकां बायकांहीं ॥

वसुदेव घे ते स्वरें मायराणी, पुन्हां पातला तो तया दुःखखाणी, ।
कपाटें तशीं, जागती द्वारपाळीं, पदीं शृंखळा देव ठोकी कपाळीं ॥ ५८

१ कपाटें तशीं, जागती द्वारपाळीं=पहिल्याप्रमाणेंच कपाटें बंद झालीं व द्वारपाळ पूर्ववत् जागू लागले यांत कपाटाचें क्रियापद अध्याहृत आहे. २ पदीं शृंखळा देव ठोकी कपाळीं=म्हणजे परत आल्याबरोबर दैवानें अगर जी योगमाया परत आणली होती तिनें पायांत बेड्या ठोकल्या कपाळीं= नशिबीं. ब्रह्मदेवानें वसुदेवाची ललाटरेषा शृंखलारूपी काढिली, ती केवळ श्रीकृष्णाच्या चरणसरोजरेणुस्पर्शानें क्षणभर बदलली होती ती वसुदेवानें श्रीकृष्णाला दूर करून योगमायेला जवळ केल्यामुळें पूर्ववत् शृंखलारूपी झाली. श्रीधरस्वामी हरिविजयांत म्हणतात:—

वसुदेव परम ठकला । कृष्णहातींचा दूर टाकिला ।
माया आणितां शृंखळा । पायीं दृढ तैसीच ॥
हिरा ठेवून आणिली गार । सूर्य देऊन घेतला अंधकार ।
पाच देवून निर्धार । कांच घरा आणिली ॥
परीस देऊन घेतला खडा । पंडित देऊन आणिला वेडा ।
चिंतामणी देऊन रोकडा । पलाडु बळेंचि घेतला ॥

कारण ज्या वेळेला श्रीकृष्णाला कडेवर घेऊन वसुदेव बाहेर पडला होता त्या वेळेस

अवलोकितां श्रीकृष्णवदन । बेडी तुटली न लागतां क्षण ।
ज्याचें करितांच स्मरण । भवबंधन नीरसे ॥

वामनपंडितांची यावरची कोटी फार प्रेमळ व ज्ञानमय आहे. ते म्हणतात कीं, श्रीकृष्ण प्रभुच्याच आज्ञेनें जरी वसुदेवानें प्रभूला देऊन योगमाया घेतली, तरी त्यानें तो जन्माचा आंचवला पुन्हां कंसवध होईपर्यंत वसुदेवाचें बंधमोचन झालें नाहीं करितां पंडित सुचवितात कीं,

निघालीसें वाटे, क्षण चरणिं बेडी तरि पडे ।
न बंधाचा कंद त्रिभुवनपतीवीण उपडे ॥
जईं राया कंसा गज वधुनि मल्लांसह वधी ।
पुन्हा कृष्णप्राप्ती करुनि सुटका ते निरवधी ॥ २७ ॥

अनंतजन्मार्जित सुकृतामुळें कृष्णचंद्राचें पितृत्व प्राप्त होऊनही योगमायेपासून व तदंगभूत शृंखलाबंधनापासून वसुदेवाची सुटका झाली नाहीं हें पाहून पंडित सर्व भवबंधमुमुक्षूंना इशारा देतात कीं.—

हरी ठेवी, माथां उचलुनि गृहा ये झडकरी ।
हरीच्याही बाच्या चरणिं दृढ ते बंधन करी ॥
हरीच्या आज्ञेही करुनि इतरातें न यजिजे ।
अनन्यें सद्भक्ती करुनि हरितें त्याचि भजिजे ॥ २८ ॥

( पुढील पृष्ठ पहा. )

## ओंव्या.

आनकदुंदुभीस ते क्षणीं । कैसें वाटलें अंतःकरणीं, ।
कीं अमृतकुंभ ओलांडोनी । कांजी वदनीं घातली ॥ ५९
सुधापालटें घेतली कांजी । कल्पवृक्ष देवोनि घेतली भाजी ।
वसुदेव तैसा झाला राजी । समयो पाजी म्हणोनियां ॥ ६०

## श्लोक

करीं देवकीच्या त्वरें दे तिला हो । अटाहास्यें ते घेतसे शोकलाहो, ।
दुतीं जाणवीलें तया कंसराया. उठे तो उतावीळ घाता कराया. ॥ ६१
तिला 'दे' म्हणे, 'बाळ' जैं त्रीदशारी, वदे ते, 'नव्हे पुत्र तो, हे कुमारी; ।
दयाळा ! तुझा क्रोध चित्तीं निवारीं, करीं कन्यकेचें च घे दानवारी'॥ ६२
न मानीच तो लोटुनिया सुशीळे, पदीं गीवसुनी आपटावीच शीळे ।

---

( मागील पृष्ठावरून समाप्त )

' देव जोडावयासाठीं ॥ करणें जिवलगाशीं तुटी ' असें शिवदिनकेसरी सांगतात ' नारायणीं जेणें घडे अंतराय ॥ हो कां बापमाय त्यजावीं तीं ' असें तुकाराम सांगतात वामनांचा उपदेश याहून सूक्ष्म आहे कारण ते म्हणतात कीं, हरीच्या आज्ञेनें हरीसेवा अंतरणार असेल तर हरीची आज्ञाही दूर सारावी वेगवेगळ्या साधुकवीचें वेगवेगळें वर्णनलाघव आहे. श्रोता आपापल्या अधिकाराप्रमाणें बोध घेत असतो.

१ ' सुधापालटें घेतली कांजी । कल्पवृक्ष देवोनी घेतली भाजी ॥ '

असेच शब्द या प्रसंगाला अनुलक्षून हरिविजयांत आहेत तसेंच अमृत विकूनि कांजी घ्याला ॥ तैसा नरदेहीं भोगू भोगविला ' एकनाथी भागवत अ० २०, ओं० १९२ २ अटाहास्य =

" ऐसें बहुला ऐकोनी । भयभीत झाली तेचक्षणीं ॥
अनुताप अंगीं भरोनी । रडों लागली अट्टहास्यें ॥'
— शिवलीलामृत, अ० १२, ओंवी ६१.

३ शोकलाहो—रड ४ गीवसूनीं:—हातीं धरून शोधणें, धरणे असे या शब्दाचे अर्थ आहेत ज्ञानेश्वरी ३–२५०

हें आंगातरि घडलें । जीवीचि आथि जडलें ।
परि नातुडाति गिविसिलें । ब्रह्मादिकां ॥

तसेंच,

जैसी चंदनाची मूळी । गिवसूनि घेइजे व्यालीं ।
—ज्ञानेश्वरी ३–२५५

( पुढील पृष्ठ पहा )

तदा निष्ठुरा जाय ते अबरी हो! खळालागिं बोलावया आदरी[1] हो! ॥६३
वदे ती तया, 'श्रीहरी जो अकर्ता, वसे भूवरी तो तुझा घातकर्ता'।
स्वयें गुप्त ते बोल ऐके, उगा हो, अधोमूख तो पातला नीज गेहा ॥ ६४

## ओंव्या.

इकडे गोकुळीं नंदसदनीं। यशोदा जागत जयीं ते क्षणीं,।
पुढें सुकुमार कैवल्यदानी[2]। पुत्र नेटका देखिला ॥ ६५
जवळा आल्या परिचारिका,। तिहीं देखिलें बाळका,।
हर्षयुक्त गेल्या सुमुखा। नंदासि देखा सांगावया ॥ ६६
नंदें उत्साहभरित मनें। उभविलीं गुढिया तोरणें,।
गोभूहिरण्यरत्नदानें। द्विजां अपार दीधलीं. ॥ ६७

## छंद.

अंगनांचे थवे दाट। आले ब्राह्मणांचे थाट,।
वाद्यें वाजती संघाट। नादें काष्ठां[3] घूमती ॥ ६८
वाजे सनई घनघोर,। नगारनकी लगे झोर,।
बाजे कर्ना बंभोर,। दिसा नाद घूमती ॥ ६९
ढोल जतर दूताला। बाजे मिरदंग अरु ताल,।
खिना चपला करताल,। अजब ख्याल सुनाये. ॥ ७०
झनक झांज झनत्कार,। गुनी गावे ललकार,।

---

( मागील पृष्ठावरून समाप्त. )

केरीकर विठ्ठलकवि यानें " गवाशिलें=पकडलें " असें एक रूप दिलें आहे. 'दोघां जणां गवाशिलें नृप वेत्रधारीं ॥ बाळा तयास विनवी बहुतांप्रकारीं ॥' विठ्ठल केरीकरकृत बिल्हणचरित्र, श्लोक ३३ एकनाथमहाराज हा शब्द 'शोधणें' या अर्थी लावतात " त्रिभुवनवैभवाचे माथां ॥ ब्रह्मपदाची समर्थता ॥ तो ब्रह्माही निजस्वार्था ॥ होय गिंवसिता हरिचरण॥" एकनाथीभागवत, अ २-७४९ तसेंच नामदेव " नामा म्हणे नाम गाईन निर्विकल्प ॥ येशी आपें-आप गींवसीत "

१ आदरी—खळाशीं बोलूं सुद्धां नये, पण त्याचें मरण सुचविण्यापुरती ती त्याच्याशीं बोलली, हाच तिनें त्या दुष्टाचा मोठा आदर केला २ कैवल्यदानी—मोक्षदानी, सुखदानी वगैरे शब्दांतील ' दानी ' शब्दशकलाप्रमाणे येथीलही रूप चिंतनीय आहे ३ काष्ठा—दिशा. ' दिशस्तुककुभः काष्ठाः ' अमर.

सौरमंडल सीतार, । सारंगी भी बाजती ॥ ७१
नफेरी अरु मोरचंग, । घडियाल बाजे चंग[2], ।
घटा खूब मचा रग, । नदद्वार सबघडी. ॥ ७२

---

१ सनई, कर्णे, बाजे, ढोल, मृदग, वीणा, चिपळ्या, करताळ, झांज, सारमंडळ, सतार, सारगी, नफेरी, मोरचंग, घडयाळ इतकीं वाद्यें नदद्वारीं ' सबघडी ' वाजत होतीं. यांतील कांहीं मुसलमानी आहेत, आणि पुढे सांगितलेल्या, तोफा, गरनाळा, कडाबिनी, सुतरनाला, या मुसलमानी शब्दांनीं दर्शित केलेल्या उल्हादयंत्राबद्दल लिहावयालाच नको. देवनाथाच्या कवितेंत एकंदरींत मुसलमानी शब्द कमी, परंतु युद्धोपकरणांबद्दल अलीकडे शतघ्नी वगैरे कांहीं कांहीं प्राचीन ग्रथांतील शब्द जरी लोकांना कर्णगोचर व्हावयाला लागले आहेत, तरी महाराष्ट्र कवींच्या मध्यकालामध्यें सग्रामसाहित्याचें दीक्षागुरुत्व कांहीं काळपर्यंत मुसलमानांकडे गेलें होतें व त्याचा परिणाम भाषेवर बराच झाला आहे २ चग—चंग अथवा चांग म्हणजे चांगला. ज्ञानेश्वरीमध्यें हा शब्द चांगू या रूपानें आला आहे

ज्ञानदेवो म्हणे निवृत्तिचा । चांगू उव'ओ धरूनु उन्मेषाचा ।
मग हा संवादु हरिपार्थाचा । भोगा बापां ॥

—ज्ञानेश्वरी ३–२७१

तसेंच १३ व्या अध्यायात,

लौकिकाचा उद्वेगु । शास्त्रांवरि उभगू ।
उगेपणीं चांगू । आथि भरू ॥

—ज्ञानेश्वरी १३–९२

तसेंच—

सहस्रदलाचा मेघु । पायरवु वारिखानि चांगु ।
तो मूल वेन्हीं ओघु । आप्पूनियां ॥

—ज्ञानेश्वरी १८–१०३३.

यापासून चांगावें म्हणजे चांगुलपणा असा साधित शब्द ज्ञानेश्वरींत दिला आहे

जें गीतार्थाचें चांगावें । मोक्ष उपाय परि आघवें ।
आणि शास्त्र उपाय कि न्हव । प्रमाणसिद्धा ॥

—ज्ञानेश्वरी १८–१२२४.

या चांगावें शब्दाची चतुर्थी ' चांगावेया ' म्हणजे चांगुलपणास, अशीही ज्ञानेश्वरींत आलेली आहे.

एकनाथीभागवतामध्यें गुरूपासनेचें महत्व वर्णन करीत असतांना नाथ महाराज म्हणतात:—

( पुढील पृष्ठ पहा. )

छुटे तोफा गरनाल, । कडकक्षान शुतरनाल, ।
सभा सबहि भई लाल । गुलालनाके मार है. ७३
थरक पात्रा थतकार । भये थाडे चोपदार, ।
खूब भरते ललकार, । अजब भाग नंदका ॥ ७४
देवनाथप्रभु लाल । भयो नंदाजिको बाल, ।
दुष्ट दैत्यनको काल, । इच्छपाल दासको ॥ ७५

---

( मागील पृष्ठावरून चालू )

न चुकतां निज मार्ग । न हालतां धुरेचें अंग ।
न करिता आणिकांचा पांग । भोई चांग मी होईन ॥

—एकनाथीभागवत १२–५६९.

त्यजोनियां सकळ भोग । यमनियमेंसि योगमार्ग ।
आसनस्थ होउनि चांग । देऊनि मुद्रा सांग अवधारी ॥

—एकनाथीभागवत २०–२५०

तसेंच १८ व्या अध्यायांत नाथ म्हणतात:—

विष्णुकल्पित जो भाग । तो जळीं घालावा सांग ।
भूतकल्पित जो विभाग । तो पृथ्वीवरी चांग ठेवावा ॥

—एकनाथीभागवत अ० १८, ओं० ११९

तसेंच २० व्या अध्यायांत नाथ म्हणतात:—

निषेध मुखें करितां त्यागु । वेद त्यागवी विषयसंगु ।
हें वर्म जाणोनि जो चांगू । तो होय निःसंगू महायोगी ॥

—एकनाथी भागवत २०–३३३.

अमृतरायांनीं चांग याचें स्त्रीलिंग चांगा केलें आहे.

धांव धांव बा तू श्रीरंगा । तवपदिं गंगा ।
उद्धवली तापत्रयभंगा । पवित्र चांगा ।

—दुर्वासयात्रा कटिबंध.

अगदीं प्राचीन ज्ञानेश्वर कवि, त्याप्रमाणेंच मध्यकालीन नाथमहाराज यांनीं ज्याप्रमाणें हा शब्द कविलोकाचा लाडका करून ठेविला आहे, त्याप्रमाणें अलीकडच्या कवींचा तो प्रेमविषयक झालेला दिसत नाहीं या शंभर दोनशें वर्षांत या शब्दाचा लक्षांत ठेवण्याजोगा असा उपयोग कोल्हापूरकडील प्रेमळ हरिभक्त विठ्ठलनाथ आजरेंकर यांनीं केलेला दिसतो त्यांचें पद ( काव्यसंग्रह व्हॉ २४, पद ६६ )–

( पुढील पृष्ठ पहा. )

### श्लोक.

असो ये रिती पूर्ण उत्साह झाले, तदा नंदराणीपुढें श्रीहरी तो, ।
कशी लेइली सर्व अंगास न्हाणें, मधें शोभली वेष्टिता अंगनांनीं ॥ ७६
करें घे बरें बाळ पायांवरी ते, तदां त्यास न्हाणावया आदरीते ।
भरी भक्तिगंगाळिं ते प्रेमपाणी, स्नेहें माखिला तो शिशू चक्रपाणी ॥ ७७

### पद

न्हाणि हरितें सप्रेम नंदराणी। आणि तीच्या भाग्याचि कोण वाणी ॥ध्रु०॥
ज्याच्या स्नेहें देहभावा केले परते, । ज्याच्या स्नेहें जाळीलीं सर्व दुरितें ।

---

( मागील पृष्ठावरून समाप्त. )

राधिकेचा रंग पाहुनि कृष्ण दंग जाहला ॥
वेणी फणी करुनि भांग । काजळ कुंकू ल्याली चांग ।
गोरे अंग चोळी तंग । दाखवी श्रीहरीला ॥

हें प्रत्येकाला माहीत आहेच. हा शब्द नाथांच्या कृष्णजन्मांत दोन ठिकाणीं आलेला आहे. देवनाथमहाराजांनीं—

योग याग तपन चांग साध्यता घडे । करिसि सांग साधनांग देह कोरडें ॥

या पंक्तिद्वयामध्यें हा शब्द 'चांगला' या अर्थींच योजिला आहे 'केवळ गोविंदासाठीं केला चाग भांग वो' असें आनंदतनयाच्या पदांत आहे. केशवस्वामींनीं चांग शब्द 'चांगलेपणें, उत्तमपणें' अशा अव्ययार्थीं योजिला आहे. 'सर्वही भोग भोगुनी चांग। भोगींच व्हासी त्यागरे' केशवस्वामीकृत पद ६६९ वें (अनेककविकृत पदसंग्रह, भाग १ ला) आधुनिकांच्या कवितेंतून हा शब्द फारसा येत नाहीं. परंतु हा कूपयंत्रघटिकाविधि भाषेमध्यें पुष्कळ शब्दांच्यासंबंधानें दृष्टीस पडतो भाषेमध्यें जे शब्द एका काळीं नागरसारस्वताचें अंतरंग म्हणून असतात, ते कांहीं दिवसांनीं प्रांतिक अथवा ग्राम्य होऊन बसतात, व जे शब्द एका शतकांत नावडते असतात तेच पुढील एखाद्या शतकामध्यें नामांकित लेखकांच्या हस्तस्पर्श झाल्याबरोबर भाषानभोमंडलामध्यें देदीप्यमान दिसावयास लागतात महाराष्ट्रभाषेचें ऐतिहासिक व्याकरण लिहूं इच्छिणाऱ्या भावी विद्वानांनीं या फेरबदलाचें सोपपत्तिक विवेचन केल्यास तें फार मनोरंजक होईल; आणि हिंदुस्थानाच्या बऱ्याच प्रांतांतून पसरलेल्या महाराष्ट्रभाषेला इतर सारस्वतांच्या स्वैर संगतीनें ईषत्भ्रष्टता येण्याची जी भीति आहे तीही दूर होईल

१ न्हाणि हरितें सप्रेम नंदराणी—असेंच हुबेहूब वर्णन कृष्णदास कवींनीं केलेलें आहे ( अनेककविकृत पदसंग्रह, भाग २, पद ३५ ). तेंही इतकें सुंदर आहे कीं, विस्तारभय न मानतां खालीं देतों:—

( पुढील पृष्ठ पहा. )

ज्याच्या स्नेहें सायुज्यसौख्य भरिनें, । स्नेहें त्याचें जाऊळ माखी करिं ते ॥
गंगा जन्मे ज्याचिया चरणकमळीं, । त्यावरी पाणी घालीती हस्तकमळीं ।
ब्रह्मादिक वंदिती पदरजधूळी, । पदींची ती घेवोनि लावि भाळीं ॥ २

( १६० पृष्ठावरून चालू )

न्हाणी न्हाणी त्या निर्मळातें न्हाणी ।
गंगाचरणीं त्यावरि मी घालीं पाणी ।
भाव नंदन्वि, हे भक्ति यशोदा राणी ।
न माय गगनीं पायावरी चक्रपाणीहो ? ॥ ध्रुवपद ॥
ज्याच्या स्नेहें देहबुद्धिविरहित केलें ।
ज्याच्या स्नेहें देहाचें मीपण गेलें ।
ज्याच्या स्नेहें मन तन्मय होऊनि ठेलें ।
त्याचे मस्तकिचें जावळ माखि तेलें हो ॥ न्हाणी० ॥ १ ॥
ज्याची प्राप्ति नोहे नाना अनुष्ठानें ।
सर्वथाही न लभ्य या कष्टानें ।
ज्याचे श्वासी वेदाचीं अधिष्ठानें ।
त्याचें नासिक उजळीते आंगुळयानें हो ॥ न्हाणी० ॥ २ ॥
ज्याचे स्मरणें दोषी वैकुंठासी जाती ।
ज्याच्या ध्यानें शिव लाभे पर विश्रांती ।
ज्यातें स्तविता ते वेद मौनें ठाती ।
त्याचे भाळीं लाविती निजचरणाची माती हो॥ न्हाणी०॥३॥
कृष्णदास प्रभु पुत्रातें अवलोकीं ।
मीपण नेऊनि उपदेश केला सखीं ।
वृत्ति बोलतां चालतां मूकीं ।
त्या कृष्णाचे न्हाणुनि कान फुंकी हो ॥ न्हाणी० ॥४ ॥

असेंच एक पद आनदतनयाचे आहे (आनदतनय—काव्यसंग्रह पद १६३ ) तें येथें देतों:—

भाग्य मोठे त्या गोपीगोपाळांचें ॥ ध्रुवपद ॥
विश्वव्यापी तो बैसे त्यांचे अंकीं । निर्मळरूपी आंगणीं रांगे पंकीं ।
उदार मोठा, परि धुंडता गोरस शिकीं । ज्याच्या संगें क्रीडतां दानव जिंकी ॥
जगदाधारा वाहती बाळा बाळा । निर्विकारा बोलती काळा काळा ।
निगमागमा करिताती चाळा चाळा । निजकर्म्या भेटती येळोवेळां ॥ २ ॥
शब्दातीता गौळणी देती गाळी । त्रिभुवननाथा यशोदामाय पाळी ।
निश्चय आत्मा हिंडतो गोकुळ-आळीं । नाचत वाहे आनंदतनय टाळी ॥ ३ ॥

पांडवप्रतापकार श्रीधरांचे पद आहे:—

ब्रह्मांडाच्या कोटीरे ! सांठविपेल्या पोटीरे ।
यशोदा त्या घेऊनीयां पाजी दुधाची वाटीरे ॥
ब्रह्म निर्विकार रे ! नाहीं ज्या आकार रे ।
गौळियाचे घरीं तोची दिसतो साकार रे ॥

( पुढील पृष्ठ पहा. )

देवनाथप्रभु अवर या विश्वा कीं, । अग त्याचें पुसोनि वदें झांकीं, ।
सर्वात्मा जो व्यापक अणुरेणु कीं । मुखानिळें तयाचे कर्ण फुंकी ॥ ३

### घनाक्षरी

अंतःकरणाचे डोल्हारीं । आत्मा निजविला श्रीहरी, ।
मनोमय लावुनी दोरी । ते सुंदरी हालवी ॥ ७१

---

( मागील पृष्ठावरून समाप्त )

याच अर्थाचें पद रामजोशाचेंही आहे कृष्णदास, रामजोशी, दयाळनाथ, आनंदतनय यांनी व इतर कवींनी ही एक कल्पना आपापल्या परी वेगवेगळ्या शब्दांनीं दिली आहे रसिकानीं तुलना करून गुणावगुणबाहुल्य ठरवावें. जोशी-बुवा म्हणतात'--

चालः—दामाजीपंताची रसद । यवन बेदरचा अधिकारी ॥

त्या रामाला पायावर अबला म्हाणी हो ।
ज्याच्या पदिंचें तारिल अगाला पाणी हो ।
तो विश्वाला प्रसवला तयाची टाळू ।
माखून म्हणतो तान्हयासी भय न शिटाळू हो ॥ १ ॥
जो गुरू केला शकगादि सुरलोकांनीं हो ।
जो दैत्याच्या नुघडितो नेत्र हाकांनी हो ।
ह्याच्या कुर्र म्हणुनी फुंकिती कानीं हो ॥ २ ॥
अनंतकोटीब्रह्मांडें ज्यामधीं माती हो ।
करिती ज्याच्या पदरजासि नवस रमा ती हो ।
त्या कविराया निजपदिंची लाविती माती हो ॥ ३ ॥

१ अंतःकरणाचे डोल्हारीं:--

हृदयाला डोल्हाऱ्याची उपमा मुक्तेश्वरांनींही दिली आहे पण ती कामुक-भावानें दिली आहे.

सुरतसंग्रामीं शीणला । मग भुजपंजरीं वहिला ।
मज ऐसियें पहुडला । हृदय-डोल्हारां तुज ऐसा ॥
—मुक्तेश्वर, शुकरंभासंवाद अ० १, ओंव २६७

२ मनोमय लावुनी दोरी ते सुंदरी हालवी'--

योगियांची विश्रांतिशेज अशा श्रीकृष्णाला जेव्हां पाळण्यामध्यें घातलें तेव्हां श्रीधरस्वामींनीं वर्णन केलें आहे तें येणेप्रमाणें:--

तेराव्ये दिवसीं पाळणां । पहुडविला वैकुंठराणा ।
श्रीकृष्ण हें नाम जाणा । मग स्थापिलें जाणोनि ॥ १ ॥
करितां नाना साधनीं । नये ब्रह्मादिकांचे ध्याना ।
त्यासीं घालून पाळणां । 'जो जो' म्हणोनी हालविती ॥ २ ॥
वेदशास्त्रां नये आया । भोगींद्र जाहला हरीची शय्या ।
तो पाळणां निजोनियां । लीला दावी भक्तांतें ॥ ३ ॥

( पुढील पृष्ठ पहा )

जन्मा आला येणें रीतीं, । लीलावतारी श्रीपती ।
पुढें बाळलीला प्रीतीं । सादर श्रोतीं परिसिजे ॥ ८०
देवनाथप्रभूची लीळा । अजन्मजन्माचा[1] सोहळा ।
वर्णितां तो सिद्धि नेला । श्रीगुरुनाथ दयाळें ॥ ८१

( मागील पृष्ठावरून समाप्त. )

जो पयाब्धिहृदयनिवासी । पद्मा सेवी पादपद्मासीं ।
उरगरिपुवहन ज्यासी । पाळणां त्यासि पहुडविलें ॥ ४ ॥
जलजनाभजलजलोचन । जलधिशायी जलदवर्ण ।
जयविजय कर जोडून । द्वारीं उभे जयाच्या ॥ ५ ॥
सनकादिक सनत्कुमार । हृदयीं चिंतिती निरंतर ।
जें मन्मथशत्रुध्येय साचार । नारदादिकां गुह्य जें कां ॥ ६ ॥
जें मूळ आदिमायेचें । जें पक्व फळ निगमवल्लीचें ।
जें देवतार्चन कमलोद्भवाचें । पाळण्यात खेळतसे ॥ ७ ॥
जो विद्वज्जनमानसमराळ । जो वैकुंठीचा वेल्हाळ ।
निजभक्तवरदतमाळनीळ । तो पहुडला पाळणां ॥ ८ ॥
जो अनंतगुणसंपन्न । अनंत नेत्र अनंत वदन ।
अनंत बाहु अनंत चरण । त्यास 'जो जो' म्हणोनी हालवी ॥ ९ ॥
जो अलक्ष अपरंपार । जो आदिमायेचा निजवर ।
जो त्रिभुवनाचा आधार । जो वंद्य निगमागमां ॥ १० ॥
जो विराटवृक्षाचें मूळ बीज । जो योगियांची विश्रांतिसेज ।
जो आदिप्रणवाचें निज । तो पाळणां पहुडला ॥ ११ ॥
जो वेदविद्याचळदिनकर । जो ब्रह्मांडनगरीचा स्तंभ थोर ।
जो दानवसमरप्रतापधीर । पाळणां तो पहुडविला ॥ १२ ॥
अज्ञानगजच्छेदक पंचानन । जो मायाघोरविपिनदहन ।
जो सर्व आनंदा आद्यकारण । ब्रह्मपूर्ण श्रीकृष्ण ॥ १३ ॥
पाळण्याभोंवत्या सुवासिनी । शांति क्षमा दया उन्मनी ।
उपरति सद्विद्या कामिनी । 'जो जो' शब्दें हालविती । १४ ॥
निर्वाण दीक्षा तितिक्षा स्वरूपस्थिती । मुमुक्षा निष्कामनाप्रतीती ।
सुलीनता समाधि सद्‌वृत्ती । लीला गाती आनंदें ॥ १५ ॥
परा पश्यंती मध्यमा वैखरी । गर्जें गाती चारी नारी ।
चारी मुक्ती निर्धारी । चहु कोणीं तटस्थ ॥ १६ ॥
घरांत मुख्य या सुंदरी । इतरा बैसल्या बाहेरी ।
जागृती सुषुप्ति नारी । त्यांस हरी दिसेना ॥ १७ ॥
असंभावना विपरीत भावना । विक्षिप्ता त्यागितां येतां जाणा ।
तुर्या दावी शहाणपणा । जाणती असे बहुत मी ॥ १८ ॥
चारा सोळा चौदा नारी । गलबला करिती बाहेरी ।
चौसष्टी दाविती कळाकुसरी । परी अंतरीं प्रवेश नव्हे ॥ १९ ॥

श्रीधर–हरिविजय अ० ४, ओंव्या ६६–८१.

[1] अजन्मजन्माचा –"अज, अजित, अजन्मा" असा जो अनादि आणि जन्मरहित परमेश्वर, त्याच्या जन्माचा.

# अहिमहि आख्यान.

वानरसेना घेउनी समस्त । सुवेळेसी आले वैकुंठनाथ ।
कुंभकर्णादि इंद्रजीत । मर्दिले समस्त रजनीचरं ॥ १
चिंतातुर दशानन । नावडे अन्नउदकपान ।
नावडती अळंकार भूषण । पेटला चिंताग्नि अंतरीं ॥ २
मग विद्युज्जिव्हा प्रधान । तयालागीं बोलावून ।
विचारीं बैसला रावण । म्हणे कैसा कठिण काळ हा ॥ ३
म्हणे शत्रुप्रताप अद्भुत । वधिले कुंभकर्णादि इंद्रजीत ।
बहुत चित्त चिंताक्रांत । विचार यांत सांग कांहीं ॥ ४
प्रधान बोलिला उत्तर । पाताळीं अही मही असुर ।
महाबळवंत प्रतापशूर । करितिल संहार शत्रूचा ॥ ५
आतां विचार लंकापती । हाचि योजावा निश्चितीं ।
बोलाउनी तयाप्रती । गौरवावें प्रीति आदरें ॥ ६
संतोषला लंकापती । म्हणे प्रधाना विचार सुमती ।
तुझीये बुद्धिपुढें निश्चितीं । बृहस्पती हलुवटें ॥ ७
येथें जाली कैसी परी । आधींच जार अविचारी ।
जाला स्त्रीराज्यांत कारभारी । दुराचारी पापात्मा ॥ ८
आधींच राजा बहुत नष्ट । त्यावरी प्रधान बुद्धिभ्रष्ट ।
दोघां पडली ऐक्यगांठ । अनर्था स्पष्ट उणें काय ॥ ९
आधींच केवळ अधर्मरासी । साह्य झाले तस्कर त्यासीं ।
परहरणार्थ फिरती दिननिशीं । मग अनर्थासी काय उणें ॥ १०
आधींच इच्छित शंखध्वनी । त्यांत पौर्णिमा आली फाल्गुनी ।
आधींच काळोखी रजनी । आली सन्निधानीं अमावास्या ॥ ११
अहंकारें भरला मानसीं । निंदी हरिहर-प्रतिमेसी ।
देखोन शंके सज्जनासी । तरि अनर्थासि उणें काय ॥ १२
आधींच प्रज्वळला अग्नि थोर । त्यासि साह्य जाला कर्पूर ।
वरी स्नेह पडिलें परिकर । मग विचार कायसा ॥ १३

---

१ राक्षस २ हलका, क्षुल्लक. ३ परिकर ( असें संस्कृतांत विशेषण आहे ) = सहाय्यक, मदतगार.

आधींच उन्मत्त दुर्जन । त्यांत केलें मद्य-पान ।
वरी जालें फणि-डशन । तैसें जाल जाण रावणा ॥ १४
असोत आतां हे दृष्टांत । पाताळा पाठविलें लिखित ।
ऐकोनियां वृत्तांत । आले धांवत अही मही ॥ १५

## श्लोक

पाताळींहुनि दुष्ट ते अहिमही ऐकोनियां ऊठले ।
दोघे येउनि गुप्तरूप मग ते लंकाधिपा भेटले ।
बोले सद्गद होउनी उभय त्यां मंदोदरीचा पती ।
शत्रू मानव ख्यात अद्भुत शरें मत्कुळ निर्दाळिती ॥ १
मर्दीले घटश्रोत्र[1] शक्रजितही[2] संकष्टसें देखिलें ।
त्या अर्थी निजसाह्य म्हा सुहृद हो तुम्हांप्रती वाहिलें ।
ऐसें ऐकुनि बोलती उभयतां 'हे राज्यचूडामणी ।
खेदा तूं न करीं समस्त अरि हे मर्दू तुझे ये क्षणीं' ॥ २
ऐसें ऐकुनि रावणें, स्वहृदयीं तो तोषलासे अती ।
वस्त्रें भूषणिं गौरवी अतिप्रिती लंकेश दोघांप्रती ।
आज्ञा घेउनियां असूर मग ते वायूरुपें चालिले ।
चित्तीं हेंचि मला गमे उभय कीं काळेंचि बोलाविले ॥ ३
बिभीषणाचे मग दूत तेथें, गुप्त स्वरूपें श्रवणासि होते ॥
तेही त्वरें येउनि रामसैन्यीं । स्वामीचिये सांगति शीघ्र कर्णीं ४

## ओंवी.

नळ नीळ सुग्रीव जांबुवंत । अष्टाधिकारी मुख्य हनुमंत ।
बिभीषणें केला श्रुत । जाला वृत्तांत सर्वही ॥ १६
सुग्रीव म्हणे मारुतीसी । काय करावें ऐसीयासीं ।
मारुती सकळ सैन्यासीं । सामर्थ्येंसि रक्षावें ॥ १७
मी रक्षितों दोघेजण । एसें बोलोनि वायुनंदन
पुच्छें दुर्ग रचिले जाण । अति सघन उद्भट ॥ १८
द्वादश योजनें पृथ्वी आंत । वरुतें भुवमंडळ परियंत ।
रचिलें दुर्ग अत्यद्भुत । वायूच्या कुमरें ॥ १९

---

१ कुंभकर्ण (घट = कुंभ श्रोत्र = कर्ण) २ रावणाचा मुलगा इंद्रजित.

लांब रुंद योजनें सात । वज्र दुर्ग सभोंवत ।
हस्तीं धरूनी पर्वत । बैसे जागृत मारुती ॥ २०
निशी माजी निद्राभर । आंत दोघे सुकुमार ।
बाह्य रक्षिती महावीर । वानरसेना ॥ २१
नळनीळ वालीकुमर । जांबुवंत महावीर ।
स्वबळें देती भुभुःकार । रक्षिती रामा ॥ २२
वायुरूपें असुर ते क्षणीं । आले दुर्गसन्निधानीं ।
दुर्गा लागोनि खोंदणी[1] । पाहती फोडूं ॥ २३
वज्रदुर्ग सकळ पाहीं । शीण आला दोघांलाही ।
न फुटे न तुटे केल्या काहीं । वज्रदुर्ग ॥ २४
शिणले दोघे रजनीचर । न लगे पुच्छा अंत पार ।
अहो हा प्रत्यक्ष ईश्वर । अंजनीतनयो ॥ २५
मग ऊर्ध्व उडोनि गेले । ध्रुवमंडळ ओलांडिलें ।
अकस्मात उतरले । दुर्गाचे आंत ॥ २६
तंव निद्रिस्त दोघेजण । बंधू रामलक्ष्मण ।
वरी घातिलें मोहन । असुरें तेव्हां ॥ २७
तेथें कोरिलें विवर एक । सात योजन लांब देख ।
हातीं घेऊनि मंचक । असुरें नेला ॥ २८
पाताळ सिंधूचिये तिरीं । वेगीं आले दुराचारी ।
विवरद्वारीं शिळा भारी । दिधली तेव्हां ॥ २९
मकरध्वज दैत्य थोर । चारी कोटी असुरभार ।
रक्षावया विवरद्वार । ठेविला तेथें ॥ ३०
दुरात्मे ते पापरासी । वेगें आले महिकावतीसी ।
बांधोनिया नागपाशीं । रक्षिलें दोघां ॥ ३१
देवनाथ म्हणे पाहा । कर्म बळी हें ईश्वरदेहा[2] ।
तेथें किती वदावा हा । मानवकेवा ॥ ३२

---

१ खोंदणी = खोदणें = खणणें. खणणें याला खोदणें हा हिंदुस्थानी शब्द आहे. २ देवनाथांचें " शिव शिव शिव काय गती हे देहकर्म खोटें " हें पद व त्याखालील टीपा पहा. ईश्वर समर्थ असला तरी देहकर्म हें त्याला लागलेंच.

### श्लोक

सुवेळेसीं झालें वृत्त तव कसें राम सेयनीं ।
निशाकांता झाला लय मग उदे वासरमणी ॥
विभो श्रीरामाचें पदयुग नमायास निवतीं ।
जव आले तेथें तंव उभय मूर्ती न दिसती ॥ ५

### ओंवी

एकचि जाला आकांत । घाबरले सुग्रीव हनुमंत ।
नळ नीळ जांबुवंत । हडबडिले समस्त वानर ॥ ३३
कपी करिती रूदना । म्हणती हे राम चराचरजीवना ।
आम्हां अनाथवानरगणां । कां रघुनंदना उपेक्षिलें ॥ ३४
सुग्रीव आणि वायुकुमर । म्लान मुख नयनीं वाहे नीर ।
तों तेथें बिभीषण भक्त चतुर । आला सत्वर धांवोनी ॥ ३५
बिभीषण म्हणे साचार । योग्य नव्हे हा विचार ।
वैरियां कळतां समाचार । येतील सत्वर युद्धासी ॥ ३६
बाहेर मात न फिटतां । विचार करावा निरुता ।
त्रिभुवन शोधोनियां आतां । ठाई रघुनाथा पहावें ॥ ३७
सुग्रीव बोले वचन । ऐसा कोण बळी वीर गहन ।
शोधोनियां हें त्रिभुवन । श्रीरघुनंदन भेटवीं ॥ ३८
बिभीषण देत प्रत्युत्तर । शिरीं भला वायु-कुमर ।
शोधोनि काढील राम सौमित्र । चिंता अणुमात्र न कीजे ॥ ३९

### श्लोक.

श्रीरामप्राप्तीसुखसंपदानें । धांवोनियां मारुतिच्या पदांतें ।
आलिंगना वानर सर्व देती । सप्रेम ते सर्वहि बोलताती ॥ ६
तूं आमुतें सद्गुरु पूर्णरुद्रा । ऐसी सखा भेटविं रामचंद्रा ।
स्फुरण आलें मग त्या कपींद्रा । म्हणे क्षणें आणिन राघवेंद्रा ॥ ७
तों देखिलें मुख भयंकर वीवराचें मूर्धींच त्या उमटलें पद आसुराचें ।
हो योजनें द्वादश लांब मोठें । आश्चर्य हा त्या कपिलागिं वाटे ॥ ८

---

१ सयनीं = सैन्यीं वृत्तसुखाथ (अथवा वृत्तदुःखामुळें) असें रूप करावें लागलें. ही कविता अगदीं अपक्कपणची असावीसें वाटतें

ता सिद्ध सत्वरगती विर पांच पाहा ।
नळ नीळ आंगद मुकुंदहि मारुती हा ॥
पंथींच त्या रिघति हो मग वीवराच्या ।
समिा न हो बळ पराक्रम त्या विरांच्या ॥ ९

हो आक्रमीत पथिं त्या विर पांच जाती ।
त्या मध्यभागीं गळता कपिराजशक्ति ॥
तों ते गळीत पडती कपि वीवरांत ।
पुच्छें करूनि मग रुद्र तया विरांत ॥ १०

बांधोनि चाघे हरिपुच्छभागीं ।
श्रारामदूत अरिघातक जात वेगीं ॥
पादांचि त काहाडि जे शिळ वावराची ।
बाह्य प्रदेशिं मग शक्ति चहू विरांची ॥ ११

केलें तिहीं त्या बहु पालटाला ।
आले त्वरें सिंधुचिया तटाला ।
तों ते स्थळीं रक्षण वीर होते ।
उठावले देखुनिया अहो ते ॥ १२

तों पांचही अद्भुत रूप घेती ।
घेती तरू त्या अरिप्राणघातीं ॥
हो पाठवीले मग त्या विलोका ।
ते वेदकोटी अरि यमलोका ॥ १३

देखुनी बळप्रताप अरीचा ।
ऊठला सुत तईं मगराचा ॥
रीचवे वरि सुता समीर त्या ।
वीरमीठि पडती उभयांच्या ॥ १४

परस्परें ते भिडताति देखा ।
वर्मस्थळें हाणिति एकमेका ॥

---

१ समि (मी) राच्या (वायूच्या) सुतावरी (मारुतीवर) जाऊन रीचवे=एकदम तुटून पडला. रिचवण = कोसळन पडणें, ( पाऊस ) मुसळधार पडणें.

क्रोधावला ना मग वज्रदेही ।
वोपीतसे मुष्टि असुरदेहीं ॥ १५

बळें करोनि मग पाडियला क्षितीं तो ।
त्याच्या उरावरि बसे मग मारुती तो ॥
बोले तयासि मग जानकिशोकहर्ता ।
स्मरें तयासि तुज संकटिं सोडवी १६

तो मगरीसुत ते क्षणीं वदतसे श्रीमारुती मात्पिता
तो असता तरि मर्दुनी तुज बळें मत्प्राण संरक्षिता
ऐसें ऐकुनि हांसुनी कपि पहावा ... .. .
म्हणती क वदतो कसा असुर हा आश्चर्य वाटे मनीं ॥ १७

मी ब्रह्मचारि मजला सुत केविं जाला ।
ऐकोनि शंकित रघोत्तमदूत जाला ॥
पुसे वृतांत सकळीं मगरीसुता त्या ।
तूं ब्रह्मचारिसुत होसि वदे कसा त्या ॥ १८

हनुमंत मीच म्हणसी विपरीत मेदू ।
सांगें रिती कवण हे सकळार्थ हेतु ॥
वदोनियां मग पदांप्रति बोलताहे ।
जे काळिं रामअरिची पुरि जाळली हे ॥ १९

जाळोनियां नगर सिंधुचिये तटाकीं ।
तो घर्म त्या निढळिंचा मग त्यांत टाकी ॥
त्या गीळिलें मगरिनें निर उत्तमातें ।
तो गर्भ कीं जननित सुतजन्म मातें ॥ २०

सत्य म्हणोनि वदिजे कपि मारुतीनें ।
हो भेटला निजसुताप्रति त्या प्रितीनें ॥
आली समीप मगरी, कळतांचि तीतें ।
येवोनिया करितसे नमना पतीतें ॥ २१

---

१ वोपीतसे = ओपीतसे = अर्पितसे, देत असे. २ मेदू हा शब्द मातू = मात, गोष्ट, असा असावा

नमन करुनि तेव्हां बोलिली काय वाचे ।
परम भिम स्वरुपा दाविजे तधवांचे ॥
तदुपरि मग दावी रूप तो त्या सतीते ।
नमित पदरजाते पूर्ण आनंद तीतें ॥ २२

तेव्हां ते मगरी म्हणे महिपुरीं स्वक्षेम सीतापती ।
सौमित्रासह नागपाशिं असुरें बांधोनियां रक्षिती ॥
नेऊनी उदईक त्या उभयतां देती बळी देविला ।
ऐकुनी मगरीस त्या मग कथा श्रीरुद्र[1] तो बोलिला ॥ २३

सांग बा तरवेल केवि उदधी कार्यासि जाणें त्वरा ।
बैसा मद्वदनीं म्हणे उतरितें नेऊनि पैलेतिरा ॥
श्याले ते कपि ऐकुनी मग तयां ठेऊनि पैलीकडे ।
येशश्वी जयराम गर्जत सुखें तो मारुती पैं उडे ॥ २४

## सवाई

येउनियां महिकावतिसीं मग देउळिं देविचियांत कपी तो ।
जैं शिरला स्वकरें उचली तया देविसि मोरिमध्ये दडपीतो ॥
तीव्र विशाल भयंकर रूप हें धारन देत कपाट पटाया ।
स्थानिं तिचे स्वयें देविच होउनि बैसे करीं अरितें निवटाया ॥ १

सरली रजनी रजनीचर ते मग सर्व मिळोनि पुजेसि करीती ।
शकटावरि अन्न बहुत जसे नग दुग्ध दधी घट चार भरीती ॥
उपभोग अनेक रितीं सुमनें बहु भयपखालि निमांम अज्यांतें ।
मुख्य अहीमहि रावण आसुर नीघति ते कुळदेविपुजेतें ॥ २

घालिति गोंधळ घोळ विणे करताळमृदंग हे बाजति गाती ।
नाचति देविबिदें वदती स्तुतिस्तोत्र कितेक अनेक करीती ॥
लोटुनि द्वार करें पाहती परि आढळ ते किमपी हि न हाले ।
आसुर स्तब्ध क्षणेकचि तें मग देविरुपें कपि आंतुनि बोले ॥ ३

धन्य तुम्ही निजभक्त मला प्रिय अंतरिं हो बहु तुष्टलिसें मी ।
घोर विशाळ भयंकर मी मम देखोनियां रुप भ्याल जी तुम्ही ॥
पूजन अर्चन दुग्धदधीमधु आदिक सर्वहि घेउनि अर्पा ।
देउळ शीखरिं धार गवाक्ष तें भक्त हो त्यांतुनि सर्व मदर्पा ॥ ४

---

१ श्रीरुद्र. कारण मारुती हा रुद्राचा अवतार होता.

## ओंवी

ऐकूनियां ऐसा शब्द । असुरांसी परमानंद ॥
समर्पिती पूजारविंद । गवाक्षद्वारें ॥ ३३
दधिदुग्धमधुसहित । समर्पिती पंचामृत ।
शुद्धोदक स्नानार्थ । घालती वरूनी ॥ ३४
हनुमंत गवाक्ष वाटां । सर्वही प्याला वटघटां ।
सर्वेचि नैवेद्याचा मोठा । अर्पिला हारा ॥ ३५
भक्षियेलें सर्वही देख । मग प्रक्षाळिलें मुख ।
देखोनियां बहुत दुःख । देवीला जालें ॥ ३६
पूजा न मिळे पूज्यान्यांसी । अती दुःख त्या मानसीं ॥
धांवोनि आले मोरीपासीं । पाहाती डोळां ॥ ३७
बिंदु मात्र न दिसे नयनीं । म्हणती जाली कैसी करणी ।
हातीं काष्टातें घेउनी । सुदिती[1] न्हाणी ॥ ३८
मोकळी करिती मोरी परी । बाहेर नये तिळभरी ।
काष्ठप्रहार देवीशिरी । बैसती तेव्हां ॥ ३९
अतिशयेंसी काष्ठप्रहार । हाणिताती वारंवार ।
देवी म्हणे हें कर्म घोर । आडवें आलें ॥ ४०
असुरें आणिला सीतावर । पूजा घेतो कपी वरि ।
मजवरी थोर मार । कोण हें कर्म ॥ ४१
रुद्ररूपिणी देवी बोले । असुरास तये वेळे
म्हणे मी बहुत तुष्टलें । भक्त हो आज ॥ ४२
आता वेगीं करा त्वरा । सत्वर आणा रघुवीरा ।
सगळेंची दोघां वीरा । गिळीतें आतां ॥ ४३
ऐकोनियां असुर वाणी । धांवत गेले तये क्षणीं ।
पावलेति अंतर सदनीं । राघवापासीं ॥ ४४
तोडोनियां नागबंधन । काढिलें वरिल मोहन ।

---

१ सुदणें, सुदवणें, सुदणें हीं तिन्ही रूपें संस्कृत स्यूत शब्दापासून झालीं आहेत. यांचे अर्थ ओंवणें ( दोरा ), अडकवणें ( माळ ), आत जबरदस्तीनें दाबून घालणें ( काठी इत्यादि ) असे आहेत त्या शब्दाचें मूळ संस्कृत व हिंदुस्थानी या दोन्ही भाषांत सापडतें, असें मोल्स्वर्थ म्हणतो. २ नागपाश = वरुणाचें आयुध, अस्त्रविशेष, नागाकृति बंधनसाधन येथें तिसरा अर्थ लागतो.

सावध जाले दोघेजण । लक्ष्मणराम ॥ ४५
सावध जाले चापपाणी । भौंवतें पाहे विलोकुनि ।
आपुलें कोण्ही न दिसे नयनीं । असुरची सारे ॥ ४६
असुरें दोघां घालोनि स्नाना । लेववीलें वस्त्रभूषणा ।
वाद्यें वाजती नाना । लागला घोष ॥ ४७
मिळोनियां रजनीचर । हांका देती भयंकर ।
बळी द्यावया सत्वर । आणिलें रामा ॥ ४८
मुख्य असुर आहि मही । कपाटासी लोटुनी पाही ।
राम लक्ष्मण दोघांही । घातिल आंत ॥ ४९
आंत आले सुकुमार । देवी दिसे भयंकर ।
वदन विक्राळ भ्यासुर । दिसती दाढा ॥ ५०
येऊनियां देवीचरणीं । नमिता जाला चापपाणी ।
तंव ती बोलिली गर्जोनी । राघवालागीं ॥ ५१
फाडियले विशाळ वदन । वटारले दोन्ही नयन ।
म्हणे आतां तुम्हांसी कवण । रक्षिता सांग ॥ ५२
तुमचा जो कां साहाकारी । स्मरा त्यातें ये अवसरीं ।
ऐकोनियां रावणारी । बोलता जाला ॥ ५३
म्हणे संकटीं निजभक्त । येती मातें शरणागत ।
त्यांचे निवारुनी आघात । रक्षीं मी त्यांतें ॥ ५४
तो मी आजी ये प्रसगीं । स्मरू सांगें कवणालागीं ।
परी एक अंतरगीं । आठवे मातें ॥ ५५
जरी तो या समयांत । सखा असता हनुमंत ।
निर्दाळोनि या विघ्नांत । रक्षिता आम्हांसी ॥ ५६
आतां हनुमताचे ठाईं । कृपा करीं वा तूचि आइ ।
गहिंवरला ऐसा रघुराई । तये वेळीं ॥ ५७
जाहला तो सद्गद चित्तीं । प्रेम अश्रू नयनीं स्रवती ।
रूप प्रगटोनी मारुती । स्वामीतें भेटे ॥ ५८
रामचरणीं ठेवी माथा । हर्ष जाला सीताकांता ।
उचलोनी हनुमंता । पोटेसीं धरी ॥ ५९
राम म्हणे बा प्रियकरा । प्राणसखया वायुकुमारा ।
सीमा नाहीं उपकारा । तुझिये कांहीं ॥ ६०

मारुती म्हणे जी स्वामीनाथा । सर्वही व्यापक तुझा सत्ता ।
पुराणपुरुषा श्रीगुरुनाथा । दाविसी लीला ॥ ६१
राम म्हणे रे कपिनाथा । समस्त वैरी मृत्युपथा ।
पाठवितों परी चिंता । संकट एक ॥ ६२
धनुष्यबाण नाहीं जवळी । राहिलें तें तये स्थळीं ।
ऐशियासी काहीं केली । पाहिजे युक्ति ॥ ६३
मग होउनियां गुप्त । क्षणें जाउनी हनुमंत ।
धनुष्यबाण आणोनि देत । राघवा हातीं ॥ ६४
देवनाथ म्हणे कोण्ही । दुजा नाहीं त्रिभुवनीं ।
बळिया भक्तशिरोमणी । मारुतीसम ॥ ६५
पाठिसी घालोनी चापपाणी । आपण जाला भवानी ।
घनरवें गर्जोनी । बोले वाणा असुरातें ॥ ६६
म्हणे मत्ता अहिरावणा । आधीं येई तूं दर्शना ।
मग बोलावीन महिरावणा । निजवरदान द्यावया ॥ ६७
संतोषोनि निजप्रीती । वर देईन निश्चिती ।
तुम्हां आणि लंकापती । समान संपत्ती दोघांतें ॥ ६८
तंव आत गेला अहिरावण । घ्यावया देवाचें दर्शन ।
तव रुद्रें पादघातें करोन । केला दुर्जन पिष्ट तो ॥ ६९
तो दणदणाट ऐकोन । शहाणे उठाति तेथून ।
म्हणती पुढें दिसे विघ्न । कैंचें पूजन देवीचें ॥ ७०
मागें रावणें आणिली सीता । एक वानर आला अवचिता ।
नगर जाळोनि तत्वतां । लंकानाथा विटंबिलें ॥ ७१
येथेंही दिसे तैसी परी । यांहीं आणिला रावणारी ।
आतां गती न दिसे बरी । शाहणे घरीं चालले ॥ ७२
इकडे पुजारी ते वेळीं । रिघों पाहे देउळीं ।
तंव तो कपी महाबळी । नेत्रकमळीं देखिला ॥ ७३

---

१ निजप्रीती = अति प्रीति. निज याचा कवितेंत समासामध्यें अत्यंत, नितांत असा अर्थ होतो. याचीं उदाहरणें देवनाथांच्या टीपेंत इतरत्र दिलेलीं आहेत तीं पहावीं.

पळतां पडे अडखाळोनि । भोवडी वळली वदनीं ।
करितची शंखध्वनी । पळे ऐकुनि दुरात्मा ॥ ७४
असुरांसी सांगे साचार । म्हणे कैंची देवी महावानर ।
जेणें जाळिल लंका नगर । तोचि हा चोर ये स्थळीं ॥ ७५
ऐसें ऐकोनियां वचन । कितेक असुर गतप्राण ।
कितीक पळाले उठोन । भयें करोन तेधवां ॥ ७६
एकचि जाहाला हाहाःकार । कपाटें[1] लाऊनि सत्वर ।
घरोघरीं दडती असुर । कंप थोर सर्वांगीं ॥ ७७
अहिमही मुख्य असुर । सिद्ध करोनी दळभार ।
हांका देती येकसर । उभे समोर युद्धासि ॥ ७८
म्हणती खळा निघें बाहेरी । बहु बागविली वळ कूसरी[2] ।
तुवां जाळिली लंका नगरी । तैसी परी न चले येथें ॥ ७९
ऐकोनि अंजनीनंदन । स्कंधीं घेतवी रामलक्ष्मण ।
उभा ठाकला उठोन । युद्धकंदन करावया ॥ ८०
पुच्छें देऊळ उपटोनी । देवीसह भिर्कावीलें गगनीं ।
श्रीरामें कोदंड[3] चढवोनि । रणांगणीं उभा ठाके ॥ ८१

---

रविमंडन[4] राजिवनयन रघोत्तम धीरसमीर[5] उभा रणरंगीं ॥
गोजिरें ठाण[6] तें वोढुनियां धनु लाउनि बाण रिपु प्रति भंगी ॥
मर्दियले मग सैन्यसमूह ते एक उरे महिरावण जेव्हां ॥
अद्भुत रूप भयंकर घेउनि येकसरें शर मोकालि तेव्हां ॥ ५ ॥

---

१ कपाट ( संस्कृत ) = द्वार. २ कुसरी ( स्त्री० ) = चातुर्य, हा शब्द संस्कृतांत सांपडला नाहीं व मोल्स्वर्थनें याची मूळभाषा दिली नाहीं ३ धनुष्य या अर्थी हा शब्द पुल्लिंगी रूपाचा. दुसरा अर्थ भृकुटी, भोंवई असा होतो. ४ रविकुलाला मंडन-शोभा आणणारा रघुनाथ ५ धीरसमीर = मंदमंद शीतळ असा वायु त्याच्यासारखा शांत आणि स्वजनांना सुखद रणरंगधीर श्रीराम. ६ ठाण = पवित्रा तुकारामबोवाच्या अभंगांत ध्यान शब्द आला आहे तसाच हुबेहूब शब्द आहे, मात्र हा 'स्थान' पासून झाला आहे

"सुंदर तें ध्यान उभा विटेवरी । कर कटावरी ठेऊनीयां ॥
तुळसीहार गळां कांसे पीतांबर । आवडे निरंतर हेंचि ध्यान ॥"

—तुकाराम.

## कटाव

अवतार धरिला रामें धर्मातें संरक्षाया ।
रक्षाया सज्जनांतें दुष्टाचें कुळ मर्दाया ॥ ध्रु० ॥

मांडोनियां वज्र ठाण, धनुषिं लाउनिया बाण, ओढीयेला आकर्ण, समीरगती शर सोडियला तो गेला वपु असुराचि भेदुनी, स्रवे रुधिर थवथवां भूमीवरी, परी नवल तें रक्तबिंदु हो जितुके तितुके कोट्यावधि महिरावण होती, तितुकेही श्रीरामावरि ते बाण सोडती, सीतापति आश्चर्य करितसे, जाणुनि संकट, निर्वाणींचा भक्त सखा, त्याकडे विलोकी, वर्म जाणुनी सुत अंजनिचा उडे तेथुनी, क्षणें पातला मगरीसन्निध, पुसे तिला हे रक्तबिंदु महिरावण होती, सांग मला हें वर्तमान, तंव ती मगरी वदे जी, शिव वर दे महिलागीं असे हा मला न ठावे कांता त्याची चंद्रसेनी हो नांव तयेचें, विदित सर्व हें तिला पुसावे रामरूपीं मनवेग तिचा सांगेल पतीचा यथासांग अरि-मृत्युमार्ग, येइल कळाया ॥ अवतार धरिला० ॥ १ ॥ ऐकोनियां मगरीवचना कपीनें साधिलें उड्डाणा, आला चंद्रसेनेच्या सदना, देखोनी तिणें हास्यवदन मग म्हणे कपी कां येणें जालें, बोले मग मारुती तियेतें, माते संकटानें जाणुनी आलों येथें, मला सांग तुझ्या पतीतें मृत्यु कसा तो, वचन ऐकतां हांसे गद्गद पतिव्रता ते, हनुमंतातें सुभाषित वदे, शाक्य म्हणे निज भाक देई गा, राम भोगीं, निज अंतरंगीं मम चित्तवासना पुरवावी, तैं सर्व सांगतें, ऐकोनियां त चिंताजाळ कपीतें पडलें, दुर्धर या समयातें जाणुनि मग त्या सतीतें भाक दिली मग ती बाळी वदे, म्हणे मी एक सांगतें, पाताळीं तें सुधाकुंड बहुपुंड अशी तें स्थळीं नांदती, शिववरद या मही प्रति हरआज्ञा मानुनि भ्रमर धांवती, अमृतानें चंचु भरिती, युद्धसमयीं त्या रक्तबिंदुवरि सुधाबिंदु आणोनि घालिती, रक्तसुधा एकत्र होय तैं कोट्यावधि महिरावण उठता, सुधाबिंदु तो बंद होय जरी तरीच हा असुरासि मृत्यु ये ॥ अवतार धरिला० ॥ २ ॥ ऐकोनियां कपि शीघ्र उडाला, तत्क्षणीं पाताळासीं गेला, भ्रमरभार[२] तंव येत देखिला, देखोनियां कपि बहुत कोपला, भ्रमरभार संपूर्ण मारिला, कुंडासन्निध वेगीं

---

१ वज्रासारखा मजबूत अढळ पवित्रा. "ठाण वज्रापरिस महान्" असें पुढें देवनाथांनीं पहिल्या कटिबधांत म्हटलें आहे २ भार = संभार, समूह.

पातला, उठावला तो मुख्य अमर, युद्धासि ठाकला, मुष्टिघात त्या हृदईं दीधला, गर गर गर गर भोंडी येउनि पडे भूमिवरि हृदयावरी अरिन्द्र बैसला, थर थर थर थर कंप सुटे, कर जोडुनियां मग चरण धरित, अति विनीत भावें सरक्षावें, म्हणे मला मी आज्ञाधारक, करुणा ऐकोनि सोडविला मग संरक्षिला, म्हणे तयाला सुधावृष्टिला कदापि न करीं, कार्य संधिला येई लाकरी, आज्ञा शिरीं वंदिली तयानें कपि उड्डाणें येत वरी, तें नमन करुनि श्रीरामचरणीं मग कणिं सांगतो, म्हणे स्वामी निज बाण सोडुनी प्राण अरिचा मुक्त करा जी, वदनवचन श्रुत होतां रामें बाण सोडिला, कठनाळ त्या बाण छेदिला, मृत्यु पावला असुर, पडला भूवरि त्याचा देह अचेतन, यशस्वी श्रीरघुनंदन जाला, जयजयकारें सुरगण दरुनि सुमन वर्षती, राम सोयरा पूर्णकाम विश्राम निजांचा, धर्मरक्षणीं चापपाणी, अवतार धरी, करीं धनुष्यबाण राजीव-नयन धरि, रिपुकाननदहन कराया ॥ अवतार धरिला० ॥ ३ ॥

## ओंवी.

मर्दोनियां महिरावण । विजयी जाला रघुनंदन ।
उभय बंधू आणि वायुनंदन । परस्परें करोनि भेटती ॥ ८२
हनुमंतें नमुनी चरण । उभा ठाकला कर जोडुन ।
श्रीराम हृदयीं उचलोन । देत आलिंगन प्रीतिनें ॥ ८३

## पद

तुझिया उपकारा उपकारा । मिति नाहीं कपिवीरा ॥ धु० ॥
सीता नेतां रावण । शुद्धी[1] आणोनि तोषविलें मन ॥ १
भक्त विरक्त उदारा । मत्प्रियप्राणा वायूकुमरा ॥ २
असुरें येथें आणिलें । भवानीरूपें त्वां रक्षिलें ॥ ३
देवनाथ म्हणे रघुनाथें । हृदयीं धरिलें हनुमंतातें ॥ ४

## ओंवी

रामें हृदयीं आलिंगिला । मारुतिमीं चिंताग्नि झोंबला ।
मुखमृगांक[2] उतरला । तों तो देखिला श्रीरामें ॥ ८४

---

१ शुद्धि = शोध, बातमी, वार्ता. २ मृगांक = चंद्र. मुखचंद्रमा उतरला, म्लान झाला.

राम म्हणे हनुमंताला । काय चिंता पडली तुला ।
मुखमृगांक कां उतरला । सांगें मला प्रियकरा ॥ ८५
मारुती म्हणे रघुराया । महिरावणाच्या मृत्युकार्या ।
चंद्रसेनेतें पुसावया । गेलों ठाया तियेचे ॥ ८६
तंव ते म्हणे मज लागोनी । रामभोगार्थ इच्छा मनीं ।
भाक देशील तरी निदानीं । सांगेन ये क्षणीं पतिमृत्यु ॥ ८७
समय देखोनियां कठिण । मग म्या दिधली भाक दान ।
कार्य जाले आतां उद्विग्नमन । चित्तीं चिंताग्नि झोंबला ॥ ८८
राम म्हणे या मारुती । मी तों एकपत्नीवृत्ति ।
सर्वही चरित्र तुज प्रती । ठावें निश्चिती कपींद्रा ॥ ८९
तरी एक करीं कपिनाथा । जेणें तुझी भाक नव्हे वृथा ।
भग न माझिये व्रता । ऐसी युक्ति आतां योजावी ॥ ९०
कपी उडाला तेथोनी । गेला चंद्रसेनेच्या सदनीं ।
तीतें म्हणे वो चापपाणी । इथें क्षणीं आणता ॥ ९१
परी सुदृढ असावा मंचक । रामभारें भंगतां देख ।
मग तो वैकुंठनायक । क्षण एक न बैसे ॥ ९२
तंव ते म्हणे कपिवीरा । हा राक्षसीमंचक अवधारा ।
मानवी वीराचेनी भारा । भगेल निर्धारा केवीं पैं ॥ ९३
पुनरपि म्हणे मारुती । सांगितली निश्चयोक्ति ।
मंचक भगल्या सीतापती । न बसे कल्पांती जाणिजे ॥ ९४
मग माझी मोकळी जाली भाक । तंव ते म्हणे रति एक ।
चिंता न करीं देख । आणीं नायक वैकुंठींचा ॥ ९५
तेथुनी निघाला अंजनीकुमर । मग जो रक्षिला होता भ्रमर ।
त्यातें बोलउनी सत्वर । सांगे विचार त्या कर्णी ॥ ९६
तेणें जाउनी राजसदनीं । काय अद्भुत केली करणी ।
शुष्क पर्णवत करोनी । मंचक कोरोनी ठेविला ॥ ९७
मग करोनि नमस्कार । स्वस्थाना गेला भ्रमर ।
घेऊनिया सीतावर । वायुकुमर निघाला ॥ ९८
वेगीं पातले राजमंदिरा । उपभोग साहित्य ते अवसरा ।
सिद्ध करोनि सुंदरा । मार्ग निर्धारा करीतसे ॥ ९९

सुमनसेज करोनि चांग। परिधान केलीं वस्त्रें नग[1]।
तव तेथें पातला सीतारंग। जो भवभग जगद्गुरु ॥ १००
चरण ठेवितांची वरी। मंचक भगला ते अवसरीं।
तेथोनि परतला रावणारी। देखोनि सुंदरी क्षोभली ॥ १०१

## साकी.

वदली सति सक्रोधें मग ती मारुतिसि वामा
इच्छा भग्नि मनिंची कपट्या नेतोसि कसा रामा ॥
शापिन म्हणे तें ऐकोनी राम शांतवी भामा
कृष्णस्वरुपें भोगिसी मातें होसी सत्यभामा ॥

## सवाई

शांतउनी मन त्या सतिचें मग सत्वर राम कपी नियती तें।
स्थापियला मकरध्वज तो मगरीसुत त्या महिकावतितें ॥
वायुसुतें उभयांप्रति वाहुनि स्कंधिं त्वरें मग सिंधुतिरा ये ॥
पांच तिरांप्रति राघव पाहुनि हर्ष तया हृदयांत न माये ॥ ६
पांचहि रामपदां नमुनी मग भेटति भूधर मारुतिला ते।
नीघतिते त्वरितागति तेथुनि पावलेति सुवलाचलिं कीं ते ॥
घालिति सर्वहि वानर ते रघुवीर पदाप्रती दंडवतातें।
आलिंगिलें हृदयीं कपिशीसही प्रेमभरें सकळां विधितानें ॥ ७

## ओंवी

हर्षभरें आनंदयुक्त। परात्परसोयिरा[2] रघुनाथ।
थोर सानां समस्तांत। राम भेटत अत्यादरें ॥ १०२
सुग्रीव जांबुवंत बिभीषण। भावें घालिती लोटांगण।
कृपासिंधु रघुनंदन। प्रेमें करोनी आलिंगी तयां ॥ १०३
सर्वांचि नमोनि लक्ष्मण। मग धरिती मारुतीचे चरण।
म्हणे तू मद्गुरु आम्हासीं पूर्ण। रघुनंदन भेटवीला ॥ १०४

---

१ नग – दागिने, दुसरा अर्थ व्यवहारांत संख्या असा आहे, जसें हत्ती नग दहा; घोडे नग पंचवीस नग – हत्ति, हा अर्थ सुप्रसिद्धच आहे. २ परात्पर सर्वोत्तम, उत्तमाहून उत्तम. या 'ओल्या मातीत' प्राण आहेत तोंवर लौकिकी सोयरे कामाला येतात, पण त्रिकालसाथी असा सोयरा फक्त परमेश्वर म्हणून त्याला परात्पर सोयरा म्हटलें आहे.

म्हणती धन्य धन्य वायुकुमरा । मिति नाहीं कृतोपकारा ।
मर्दुनियां रजनीचरा । परात्परसोयरा आणिला ॥ १०५
पुढें रावणवधाची विचारणा । करील अयोध्येचा राणा ।
देवनाथें नमूनियां चरणां । अहिमहीआख्यान संपविलें ॥ १०६

---

# कटिबंधसंग्रह

( ४ )

रघुवीर राजा राम भजावा हो ! ॥ ध्रुवपद ॥

जो पट्टाधिकारी मोठा, स्वरुप घनघटा, अमोल शिरिं फेटा, पांघरि दुपटा, जरीचा सुटा, वरी पितकटासि दशरथबेटा, शोभति पायिं वांकी तोडर नागु लुटा, वाजत चुटचुटा, चालत लुटलुटा, वरिष्ठ सुभटा[1], शर-सुच्या तटा, वसत हृद्घटा, स्मरुनि भवसिंधु तरावा हो ! ॥ रघुवीर० ॥ १
कोटि रविसम प्रभा, प्रभा श्याम नाभा[2], परी रंग अभा, भानुकुळिं उभा[3], रणीं जो सुभा, त्रैलोक्याचा गाभा, स्वानंदपदलाभा, घेउनि निज-

---

१ सुभटा = चांगला योद्धा, श्रेष्ठ वीर.

घोर घोषसुभटीं रणिं केला । नाद तो गगनि भेदित गेला ॥
( विठ्ठल केरोकरकृत रुक्मिणीस्वयंवर सर्ग ५ श्लोक ३ )

सुभट महावीर जो झुंजतां रणीं नोटोपेचि कृतांत भट हा ।
इतिहद कां करी धीटपणें हा ॥
( पांडुरंग कविविरचित द्रौपदीस्वयंवर. )

तसेंच आनंदतनय म्हणतातः---

रघुवीर नृपतिकुलहीर सुभट रणधीर निबिडतर तीर जसा ।
शरभार गगनि अनिवार रचुनि, भडिमार करिति सुकुमार कसा ।
रिपुधुर उठति भरपुर, सकळ अविदूर भरुनि शरपूर तदा ।
चकचूर करिति कर ऊर चरण शिरसूरकुलज रणशूर तदा ॥
( आनंदतनयकृत विश्वामित्रयज्ञरक्षण श्लोक २९ )

२ नाभा–आकाश. अभा=कांति नाभापरि रंग अभा = आकाशाप्रमाणें निळ्या रंगाची दीप्ति घेउनि निजनभा–निजनभा म्हणजे काय ! ३ रणीं जो सुभा–रणीं जो शूर सरदार श्रीरामचंद्रांनीं रणांगणांत एकदां पुढें पाऊल टाकलेलें कधीं मागें घेतलें नाहीं अशी त्यांची ख्याति होती.

नभा, प्रगटरुप स्तंभांतरिं जो चिरि उभा, त्या दुष्टपतिसभासि प्रिय स्मर भावें चिरिल काळ जिभा, उपाडि भवकुंभा[1], नमुनि सप्रेम गावा हो ! ॥ रघुवीर० ॥ २

चिमणी कमान, ज्याचा चिमणासा बाण, ठाण वज्रापरिस अतिमहान्, सानतनु कोमल स्वरुप, रुपमनु, अविट चित्प्रभानु, प्रभा ज्याचि वाणु, किति‍क नवभानु, कौसल्यानंदनु, कमळलोचनु, राघववचनु[3], अविट ज्याचि सगट, सिरीं मोरमुगट, विराजितप्रभाघनु, रामधनि अनुहात जोडुनि तुतें देवनाथ प्रार्थि मनु, सानु ऐसें वय, तनुसि यम ने म्हणुनि, निकट निष्कपट होउनि राम हृदयिं स्मरावा हो ! ॥ रघुवीर० ॥ ३

## काटिबंध ( ५ )

ये बा ! ये दीनबंधु गोविंदा गोपीरमणा ! ॥ ध्रुवपद ॥

मी तों पतीत आहें परी, पावन बीद तुझें कसारि !, दावीं सत्य करूनी हरी !, मुरलीवादना जनार्दना ! ये, मदनारिप्रिय ! असुरमर्दना ! नंद-नंदना ! भुवनत्रयपालका ! दयाळा ! नवनीरदतनु परम कृपाळा ! कोण कळवळा, तुजवांचुन करि? ये घननीळा! पूर्ण स्नेहाळा ! वेळा त्वा अति-दुर्धर जाणुनि, जननी ! बाळापरि[4] तुज पाहें, पाळिं लळा जी, श्रीगोपाळा करीं संरक्षण, विलया ने भवदुष्कृततरु, तार तू मजलागिं अनाथा श्रवण करीं मम करुणा ॥ ये बा० ॥ १

सर्वोत्तमा ! स्वसंवेद्या ! पूर्णपरात्पर ! अनादिआद्या ! वैकुंठाधिप ! वेदवद्या ! भीमातटिं कर कटीं विटेवरि, नीट उभा राहसी, सांग तयाचें

---

१ भवकुभा–भववृक्षाचा कोंभा=कुंभा=मूळ ( समूळ ) उपटून टाकतो २ लहान, चिमुकली श्रीकृष्ण बाळपणीं चोर्यांचें धनुष्य करीत ' धनु करुनि चुईचें चांगल ठाण मांडी । पुढिल सरळ जंघा वांकुडी वाम मांडी '

( वामनपंडित–बालक्रीडा, श्लोक ६७ ).

३ राघववचनु–राघव ज्याचें नांव आहे असा. सानतनु=लहान देह. रूपमनु–मनुष्यरूपी. अविट ज्याची सगट=ज्याच्या स्नेहाचा कधींही वीट येत नाहीं. ' अविट ' म्हणजे अविकार्य असेंही रूप आहे ' अविट चित्प्रभा कोण वर्णी ' देवनाथ खगारिशयना=खगारि=( शेष ) त्यावर शयन आहे ज्याचें नवभानू–बालार्क. ४ जननी ! बाळापरि तुज पाहें:—हे आई ! मी तुला बाळाप्रमाणें मानतों याकरिता

काय पाहसी ? आझुनियां तरि का जि ! न येसी, वेळा ऐशा, हे जगदीशा ! दिशा शून्य तुज पिशा ह्या वृत्तिं[1], दशा हे अतिदुर्दशा, निशा अविद्यावशात् मन, भवपाशामध्यें गुतुनि पडलों, अशांत ये, घे पशासें[2] या भ्रमनाशास्तव प्रार्थियलें परि, कशालागि तूं गुतलासि हरि ! त्वरित धांव बहु भारी संकट वारीं, उद्धरिं दीन असा मी खगारिशयना ! कमललोचना ! कर्ममोचना ! नुपेक्षीं या मम वचना ॥ ये वा० ॥ २

हांकारितां[3] भगिनीच्या काजा, धांवसि निजबिरुदाच्या लाजा, गोमतितटवासा ! महाराजा ! योगीमनविश्रामधाम, निजभक्तकामकल्पद्रुम तो हरि, ऐशापरि श्रुति वर्णिताति विधितातमात हे विविधप्रकारीं, परीं अंतरीं आश्चर्य वाटतें, या अवसरीं, का कसारी ! मन कठीण केलें, विश्वालय, आजि कालियमर्दन ! दीनजनप्रतिपालक कृष्णा ! शांतविसी तूं निजजनतृष्णा, तुजवांचुनियां सांग वितृष्णा ! कोण हरिल तापत्रय[4]उष्णा ! जिष्णुसारथ्या ! विष्णुसख्या ! गणगोत तूंचि मम, इष्ट मानसीं स्पष्ट समजलें, बुद्धिभ्रष्ट या नष्ट संगतीं, कष्ट पावलों, मी माझें म्हणवोनी भुललों, नश्वर मद पीउनी मातलों, अलंकार अहंममतेचे ल्यालों, द्रव्यास्तव धनिका अनुसरलों, देशविदेशांतरही फिरलों, तेणें विशेषाचि दोष आचरलों, निजसुखस्वहितालागीं विसरलों, घालों स्वप्नांतरगत[5] नुमजुन, कन्यापुत्रस्नुषादिक माजी, ममताकर्दमिं जाउनि पडलों, तुटवीं आतां बहु अवघडलों[6], हरहर ! काळकरीं सांपडलों, ! याचक मी तव द्वारीं अडलों, झडकरि घालीं प्रेमभक्ति, मी अनाथ, तूं गुरुनाथ दयाळू, परमकृपाळू, विनति ऐकें सुखसदना ! ॥ येवा० ॥ ३

परमउदारा ! पशुपतिमित्रा ! कमललोचना ! कमनियगात्रा ! विश्व-

---

१ तुज पिशा या वृत्ति–या वृत्ति तुझ्या चरणाच्या ठायीं पिशा झाल्या = पिसाट झाल्या=वेडावल्या. २ घे पशास=हा 'पशास' शब्द काय असावा ? ह्या 'पिशास' कीं ह्या 'पशूस' ? मूळ शब्द काय असेल तें कळवणाराचे उपकार होतील ३ हांकारितां भगिनीच्या काजा–भगिनी द्रौपदीनें आपल्या संकटकाळीं आक्रोश करून हांका मारल्या असतां गोमति–या नदीच्या कांठीं द्वारका शहर आहे ४ वितृष्णा–तृष्णा विगता झाली आहे अशा परमेश्वरा ! तुजवांचुनि तापत्रयउष्णा कोण हरिल ? ५ घालों स्वप्नांतर्गत नुमजुनि– सगळें स्वप्नमय आहे हें न जाणतां त्या संसारस्वप्नांतच रममाण झालों. ६ अवघडलों–संकटांत पडलों, घटमळलों

चराचरव्यापकसूत्रा ! हीन अती मतिमद दीन मी, शरण ठावि सुकुमार चरण ते जननमरण भवदुःख हरण करि, दयानिधी हरि ! तारिं मला, अतिदुस्तर हा अघसागर भरला, भ्यालों जीव बहू घाबरला, फार पतितजन त्वां उद्धरिला, पावन घोष हृदीं सचरला[1], म्हणउनि दास पदीं अनुसरला, भक्तवत्सला ! साच करीं ब्रिद विलंब न लावी, ये तारिन म्हणवोनि पालवीं[2], कृपाघना ! येउनी पल्लवीं[3], षड्रिपु हे बाहेर घालवीं. दाह करित करित भवदीप मालवी, तव गुणगणयश वाणि बोलवी प्रेमयुक्त भजनास चालवीं, हेंचि दान दे, मान वचन, सधान कठिण, मी सान बाळ, तूं जननि म्हणुनि तुजलागीं बाहे, देवनाथप्रभु ये लवलाहें, धांव, भेट बा ! कवळुनि बाहे, साह्य होई मज मायबाप गणगोत आम निज इष्ट सोयरा, प्राणसखा हरि ! तूंच एक तुजवीण नसे, ये बैस हृदयिं तव रूप दावि निजनयना. ॥ ये बा० ॥ ४

## कटिबंध ( ६ ).

मन हें मुरालें, मन हें मुरालें, स्वरूपीं विरालें हो ! गर्क झालों मी. ॥ ध्रुवपद ॥ फुटला कल्पनेचा माठ[4], केला षड्वैऱ्यांवर काट[5], लंघिलें त्रिकुट हट गोल्हाट, पाहतां मोठा अवघड घाट, परंतु झाली पायवाट, सहस्रदळकमळीं अफाट, फांकली प्रभा ही लखलखाट देखिली मूर्ति महानिर्‍हाट, सदा वाद्यांचा घनघनाट, वाजति अनुहतध्वनी थाट, तयापरतेंही स्वरूप घनदाट, सिणल्या श्रुति करिती बोभाट

---

१ पावन घोष हृदीं सचरला–फार पतित जनत्वां उद्धारिला असें श्रुतिस्मृति पुराणें व साधुसत नेहमीं म्हणतात हा त्यांचा पावन पुण्यकारक घोष ( वारंवार आणि अट्टाहासानें तुझ्या महिमानाचा केलेला उच्चार ) माझ्या हृदीं सचरला ( ठसावला; प्रेरणा करता झाला ) बिंबला, म्हणून हा दास तुझ्या पदीं अनुसरला २ पालवीं–हातानें खूण करून अथवा वस्त्र वगैरे हालवून बोलावणें "पालवि तो करीं उभारूनि बाहें " पालव=पल्लव=फडका, असा अर्थ हिंदीभाषेंत व वऱ्हाडच्या प्रचारांत आहे पालवणें=बोलावणें, खूण करून बोलावणें, असा शब्दार्थ वऱ्हाडच्या प्रचारांत आहे. ३ कृपाघना ! येउनी–हे दयाघना ! तूं आपल्या दयाजलानें मला ( शुष्क असलेल्या ) आर्द्र करून पल्लवित कर पालवी फुटव आणि टवटवी आण ४ माठ=मातीचा रांजण ५ काट केला=वार केला, घाव घातला, चढाव केला. या शब्दाची उत्पत्ति हिंदुस्थानी भाषेंतून आहे असें मोल्स्वर्थ म्हणतो.

अशा स्वरूपाची पडली गांठ, जैसा लवणजळींचा पाट, मिळालें मन तैसें सरपाट[1], गुरूची सत्ताही अचाट, आतां काळानें नव्हे एक झ्यांट, जिवपण गेलें जिवपण गेलें स्वरूपीं विरालें हो ' ॥ गर्क० ॥ १

झाला अहंपणाचा नाश, जाळिला दुरित कल्पनाभास, गळाला मायामय आभास, गाळिलें भेदअभेदास, आत्मा ब्रह्म स्वय अविनाशं[2], नाहीं नामचि अनामास, नाहीं रूप तथा अरुपास, पाहतां आतुडलें हस्तास, पाहतेपणास करुनि ग्रास, नेनाविण केसें नेनास, प्रकाशातीत झाला प्रकाश, नाहीं निमित्त ज्या तेजासं[3], पावले कोटी रवि लोपास, वर्णितां ठक पडलें वेदासं[4], तें हें उघड दिठी उदास, देवनाथाच्या निज-हृदयास, गुरुनें अखड केला वास, मनोरथ पुरले, मनोरथ पुरले, स्वरूपीं विरालें हो ' ॥ गर्क० ॥

---

१ सरपाट=समरस, लीन, एक जसें पाण्यास मीठ एकजीव होते तसें माझें मन आत्मस्वरूपी एकजीव मिसळलें २ आत्मा ब्रह्म स्वय अविनाश—आत्मा हा ब्रह्मच आहे आणि सदोदितचा अविनाशी आहे असा प्रत्यय बाणला ३ नाहीं निमित्त ज्या तेजास—ज्या तेजाला दुसरें कांही आदि कारण नाहीं, जें स्वयंप्रकाश आणि अनादिसिद्ध आहे ४ ठक पडले वेदांस—यथार्थ वर्णन करावयाला वेद असमर्थ झाले ठक=आश्चर्यचकित होण्याची स्थिति

पाहता मोठा अवघड घाट, परंतु झाली पायवाट ।

यासंबंधानें कबीर आपल्या एका पदांत म्हणतात'—

गुरुबिन कौन बतावे बाट ॥ध्रु०॥ बडा बिकट यमघाट ॥ गुरु० ॥ १ ॥
भ्रांति की बाडी नदियां बिचमों । अहंकारकी लाट ॥ गुरु० ॥ २ ॥
मद मत्सरकी धार बरसत । माया पवन घनदाट ॥ गुरु० ॥ ३ ॥
काम क्रोध दो पर्वत ठाडे । लोभ चोर संगात ॥ गुरु० ॥ ४ ॥
कहत कबीरा सुन मेरे गुनिया । क्या करना बोभाट ॥ गुरु० ॥ ५ ॥

तसेंच मिराबाई एका पदांत म्हणतात

नांव किनारे लगाव प्रभुजी नांव किनारे० ॥ ध्रु० ॥
नदिया गहरी नाव पुरानी । डुबत जहाज तराव ॥ १ ॥
ग्यान ध्यानकी सागड बांधी । दबरे दबरे आव ॥ २ ॥
मीरा कहे प्रभु गिरधरनागर । पकरो उनके पाव ॥ ३ ॥

धनु=ध्वनी आतुडलें—सांपडलें गवसलें

(१) योगियांचे ध्यानीं ध्याता नातुडेसी । तो तूं आम्हापाशी मागेपुढें ( २ )
तुका म्हणे तुझे पाय आतुडती । त्या म न विपत्ती गाड रेवा ( ३ )
परि नातुडति गिवसिले । ब्रह्मादिका ॥

—ज्ञानेश्वरी ७—२५०.

नैन—डोळा दिठी—दृष्टीस.

## काटेबंध (७)

मनमोहन नंदकन्हय्या । व्रिजवासी अजबविलासी. ॥ ध्रुवपद ॥ करधर मुरली अधर लगावे, अजब तऱ्हेकी बैन[1] बजावे, सुन सुन गौवा दौरी आवे, रगरंगकी अजब तऱ्हेकी, गौवा बाकी धुन मुरलीकी, नीकी सुनको, नइ नइ बछिया, लइ लइ अछिया, चितरी कबरी, सुफेद प्यारी, शामरंग गुलजार हजारी, काली पीली लालजर्द, बेहरि कपिला रंग करारी, सोरि दौरके, जमुनाके तट, राहण करकर, नजर देख, व्रिजपालबालको, उठाय सिरको, चरणछुई तब दौरकान चुचकार लई जो, तीन लोकके नाथ कहावे, दयाल कर गोअंग फिरावे, कर अगसंग, भवभग मिटावे, सब घटमों भरपूर भरा हट, आप अकेला, नंदलाल गोपाळ आपही, गोकुलपत अविनाशी ॥ मनमोहन० ॥ १

पूरनब्रह्म परमात्मा सुभावे, ज्याको भेद विधीहि न पावे, ज्याको सुरमुनि अखंड गावे, सो गवळनके पीछे दौरे, मिळाय सारे, गोपबाल जमुनाके तटनट परमट हाकर, देत हटे बलि मारेमारे, निजभक्तनके, काज सुधारे, फनी कालया जलमों घेरे, नाथ फनीको बीख निकारे, सुये ग्वालसो जिवाय सारे, अघासूर धर पगसो चीरे, मारे कसासुरकी नामी नामी अग बग केसी, तृणासूर असुर संहारे, गोबछियनको अहंकारधर विधी चुरावे, ग्वाळबालये तमाम सारे, ऐसि ज्यानके आप बने सब, ग्वालबालये गऊबछिरिया, नइ नइ अछिया, तऱ्हातऱ्हाको, जैसा

---

१ बैन बजावे–वेणु वाजवतो ज्याको भेद विधीहि न पावे–ब्रह्मदेवालाही ज्याचा अंतपार लागला नाही असा

> गोळणीसहित यशोदा । खेळवीत सच्चिदानंदा ।
> ज्याचे स्वरूप शेषवेदां । ठाई न पडे सर्वदा ॥ हरिविजय–

असेंच वाक्य ब्रह्मदेवाच्या तोंडी आहेः––

> ऐसें देखोनि विश्वाता । म्हणे क्षीराब्धिशायी माझा पिता ।
> ज्याचा महिमा वर्णितां । वेदशास्त्रा अतर्क्य ॥ १ ॥
> याच्या नाभिकमळीं जन्मलों । दिव्यसहस्र वर्षें मी श्रमलों ।
> कमळनाळामाजीं उतरलों । जाजावलों बहुत मी ॥ २ ॥
> मग अत्यंत निर्बुजोनी । कमळावरी बैसलों येवोनी ।
> मग या जगद्गुरूनें तेचक्षणीं । दिव्यज्ञान उपदेशिलें ॥ ३ ॥

ज्याको रंग तैसो ऐनबैनको स्वरूप धरके, काठि कमरिया, हातमो सूदें, आपअपसमो कुंदे फादे, देख बिर्धा अभिमान हारके नीके मनसो सुभाव धरिके, चरणकमल सुकमलनाभ शरणागत आयो, सत्यलोकको बासी ॥ मनमोहन० ॥ २

चारो भुजसु आयुध धारे, कटतट पीत पितांबर पेहरे, निजभक्तनको काज सुधारे, भगतकाज, जदुराज लाजतज, पंडुराजसुत अर्जुनजीके रथके गाडीवान बिराजे, तुरंग ले पानीसे न्यावे पूछपाछके धोय धाय, ज्योपजाप रथखूब उडावे, परदलमो सैराट भिडावे, अतिरथी पग तुरंग उडावे, कर बागदोर चुचकारत मूसो, बानी उच्चारत होरे[1] होरे पुंडरीकके भाव भगतसो, बिटप थारे, नंददुलारे, तीन लोकमो व्यापक सारे, तन्हातन्हाके खुब पसारे, अजब रंग श्रीरंग बिराजे, भीमाके निरतीरे[2] दिगंबर बजे टाल मिरदंग झलरिया, गावे निजजन, प्रेममगन हो डुले सदावो अजब नैनसो, देवनाथकी चरणकमलसु ऐनरूपसो; लगी लगन मस्तान हमेशा, आप रूपमो भयो मिरासी. ॥ मनमोहन. ॥ ३

---

१ बानी उच्चारत होरे होरे—अर्जुनाची मोतद्दारी श्रीकृष्णानीं केल्याचें सुरस वर्णन बऱ्याच काव्यातून आलें आहे (१) अर्जुनतुरगमातें जो स्वकरानें करी खराराजी—मोरोपत (२) असा प्रभुहि सेवका भजासि खासदारापरी—मोरोपत (३) हयदोरे धरि स्वकरें होरे वदन पार्थरहंबरी—देवनाथ (४) रणीं श्रांत असतां जी निरीक्षुनी ॥ चोळी कुंतिकुमरांचे वाजी—विठ्ठलकवि केरीकर (५) तपे विधीला उपदेश हो हो। परत जो पार्थहयांस हो 'हो' ॥ म्हणे मुखीं त्या मधुकैटभारी। आश्चर्य हें मानिलि देव भारी ॥—वामन. (६) दुर्जन मारुनि अर्जुनसारथि होउनि धरिशी दोरे ॥ तुरग तेव्हां नाचति जेव्हां करशी होरे होरे—मध्वमुनीश्वर (७) भाववळे केशवस्वामी धुतो नर—घोडीं घोडीं—केशवस्वामी (८) क्षीरसिंधूवासारे। लक्ष्मी ज्याची दासीरे। अर्जुनाचीं घोडीं धूता लाज नाहीं त्यासीरे ॥—श्रीधर (९) इंद्रादिक नमिती सुर पद ज्याचें। जें ध्यान शिवाचे ॥ सनकादिक स्तविती मंजुळाचे। नृप मुक्तिपुरीचे ॥ तो हरिहर करि धरुनि रहवरि योजित चारा दोर त्याचे ॥ वर्णाकर गोविंदरायांचें पद

२ भीमाके निरतीर दिगंबर—विठ्ठलाची मूर्ति दिगंबर आहे पुजारी पीतांबर नेसवितात 'हा भीमातीर दिगंबर। आदिपुरुषपरात्पर। आनंदसांप्रदाय थोर। तेथुनिया वाढला ॥'—हरिविजय अ० ३६.

## कटिबंध ( ८ )

त्रिभुवनको पालनवाला । भज साहेब नाथ गोपाला[1] ॥ ध्रुपवद ॥

जो है नामरूपसो न्यारा, अलख अगम अगोचर प्यारा, सो गुरु आप रूप बिस्तारा, महरा खूब भरा दयाबलहरा, ज्याकी बाकी सो हर-हीरा, बसेजि देहदहेर बिचखनहीं[2], काला पीला हरा लाल कछु रंग तऱ्हाको, निजरंगसो, अभंगजू, प्रभु या जगमाहें, घटघट व्यापो लगट लगाये, गुरुपुत्र श्रीगुरुकृपासो बिकट घाटको, पलट कमलसो उलट चले, जब निकट धीटमन, पलट रह्या तद, अयन रूप, निजनयन प्रगट लखलखाट भयो उजियाला ॥ त्रिभुवनको० ॥ १

नयननहरमो छुटत फुवारे, चांदसुरजबिन झलकत तारे, कोट मदनवा रुपपेवारे, छाय रह्यो हर अरूप रूप, अनुप जगतमो, सरगसिरत-पाताल भू, आप, तेज अकास, समीर, पंचतत्व सब आप आप बने चारो बानी, चारो खाना चारो तन आकार अजब ये, निराकारको रूप बिराजे, तऱ्हातऱ्हाको रूपरंग बिस्तार, सारकर बिचार देखत, पार न पावे बिधि बेद अनत अपार तीन लोकमो, व्यापकसो हर, विश्वभर गुरुसाहेब आप अकेला ॥ त्रिभुवनको० ॥ २

पाई गुरूकिरपाकी छाप, भाग्यो मायाभरमकलाप, जित देखो तित आपहि आप आप एक अनेक एक कछु कही न ज्यावे, अचल अमल-घट, अमल कमलमो, व्याप रह्यो है, जलमो थलमो, जमालसाई, कमाल देखा अलखखलकमो, भऱ्यो खूब भरपूर चलकमो, रसिकरूप अरूपरूपसो भये दंग तद गुग अनूइत, चंग बजत रह्यो नाद घुमाय, घुंघुंघुघु घुमरछाई, जोग जुगतकी रहनी पाई, आपआपममो रंग लपट रहे, निसंग अटल श्रीगुरुनाथ गोविंदबिंदसिर आप बिराजे, देवनाथके नैन बागमो छाय रह्यो गुलाला[3] ॥ त्रिभुवनको० ॥ ३

---

१ भज साहेब नाथगोपाला—हा कटाव गोपालनाथांवर रचिला आहे. हे देवनाथांचे गुरु गोविंदनाथ याचे गुरु यांचा मठ सातारा तालुक्यांत माहुली-जवळ त्रिपुटी गांव आहे तथें आहे यांच्या कवितेचा शोध सार्त्रानें तेथें लागेल असें सुरजी अजनगाव मठाचे माजी मुख्य श्रीभालचंद्रनाथ यांनी मला सांगितले होतें तिकडील शोधकांनीं अवश्य शोध करावा २ विचखन—विचक्षण, बुद्धिमान्, विद्वान् कलाप=कदंब, समूह कळप अलख—अलक्ष्य, अगोचर, हें परब्रह्माचें विशेषण आहे पलख—पळ, क्षण हा फारशी भाषेतील शब्द आहे ३ गुलाला—हें एक प्रकारचें फूलझाड आहे असें मोल्सवर्थ म्हणतो.

## कटिबंध (९).

आहारे ! रांडलेका जन्मुनि काय केलें ? ॥ ध्रुवपद ॥

कवडी कवडी करुनी जोडी, विप्रालागीं हात न जोडी, वेश्येलागीं शालजोडी, बसावयाला खासी घोडी, पखालदाढी[1], शालजोडी ये आंगावर, जरतारी पगडी, घडी घडी दे ताव मुछावर, छडीबरदार पुढें चालती बडेजाव करी, रौप्य काठिया, भालदार चोपदार नकीब, खिजमतगार, भरुनि गुडगुडी[2], करी धरुनियां ओढी, मुखांतून धूर काढितो, लोडीं टेंकुनि टेंकुनि सदरीं[3] बसतो, बरवा दिसतो तृणकाडीसम इतर लेखितो, गाढी अभिमानाची पेटी, बेटाबेटी, पोटीं निजसुखवृद्धीकरण करी, प्रौढी उंच धरी, ओढी काळ हें कसें कळेना रति पळलव क्षण आयुष्य सर्वही सरलें ॥ आहारे० ॥ १

चोवीस पाठी जामेवारें[4], गांडिस किनखापी विजार, पायीं बानाती पैजार, जडावाचे अलंकार, बहु आंगावरतें, शिरीं शिरपेंच, कानिं चौकडा, उंच गळां मोत्यांची कंठी, दंडावर सोन्याची पेटी, नवग्रह च्या पोंहोच्या मनगटीं, हिरकणीच्या मुद्या बोटीं, बहु पोटीं खुशाल मशाल जळती, पालखींत होउनि स्वारी जी, समागमें ते स्वारपायदळ, अती-

---

१ पखालदाढी शालजोडी—पखालदाढी म्हणजे फार मोठी दाढी पखाल-पार्वती = फार मोठी ओबडधोबड बायको असा मोल्स्वर्थमध्यें शब्द आहे. मुछावर—मिशांवर. हिंदी मुछी २ भरुनि गुडगुडी—गुडगुडी कशाची असावी याबद्दल रामटेककर हरिदास रा. आपाजीपंत साने यांनीं एक देवनाथांचें पद पाठविलें आहे तें शेवटीं बोधपर भागांत जोडलें आहे तेथें पहावें नकीब=हा अरबी शब्द आहे समर्थांच्या देवडीवरला नोकर ज्याचें काम आल्या-गेल्यांची वर्दी द्यावयाची असें असतें, आपल्याकडील भालदार चोपदार. ( मोल्स्वर्थ म्हणतो:—नकीब A person in the train of a great-man; he who proclaims the titles, introduces visitors &c ) ३ सदरीं—सदरेमध्यें, दिवाणखान्यांत. ४ चोवीस पाठीजामेवार—चोवीस दुणी घातलेला दरबारी अगरखा. a ओढी काळ हें कसें कळेना:—" लोहघनाच्या जाड कवाडा आड बसा कीं बाड चिरा । काळ सखत पाताळतळांतुनि काढिल अंबुधिमाजि शिरा ॥ "—रामजोशी.

मायदळ[1], पुढें चालती, अजब थाट एकथाट गुणिजनं[2], भाट गर्जती, अचाट बिरुदें[3], रस्त्यामध्यें दाट दाटणी[4], वाट फुटेना, नैश्वर्याच्या ऐश्वर्यामध्यें, मस्त कसा जी, वस्त जसा उन्मत्त, तसा परि जसा काळ हा[5] उभा लक्षितो, वेळ कसा अलुमाळ कळेना, वळेनाचि रति चित्त,खळाचें, हरिभजनीं बहु मोलाचें जीवित खोवियलें ॥ आहारे० ॥ २

जिरें हिंग वरी, लसुण फोडणी, कोशिंबिरि खोबरें किसुनी, मुळें कांकड्या चिरुनी, वरते लवण, मिर्यांचें तीक्ष्ण, त्यावरी दधि लावुनी सुंदर, चटणी हरभऱ्याची दाळ ठेंचुनी, नारळाचा गर्भ ओला, बहु दाट चारोळ्या, पीठ कस्तुरी केशर घालुनी, आम्ल मिळविलें, तऱ्हेतऱ्हेचीं, बहुत लोणचीं, हारित मिरच्या, तिखट वाटलें, यापरि चटण्या, चिरियल्या वरि, आलें लिंबू, सुगंधित नीर, सुवर्ण चंबुपात्र तें, तसें त्यांत आचमनी, तशी ते करीं घेउनी, परिषिंचामि' करोनि चित्रावति घातिल्या, अहंकृतीच्या, प्राणाहुती जी, दुर्मद करीं त्या, मुखीं घातल्या, बहु

१ मायंदळ--अतिशय, पुष्कळ. (हें विशेषण आहे) (many, much, abundant, lots, quantities &c ) २ गुणीजन--मुनीजन हा छापील पाठ अशुद्ध आहे सुरजी अजनगांव येथील मठाच्या व देशपांडे घराण्याच्या संप्रदायाप्रमाणें खरा पाठ 'गुणीजन आहे असें सुरजीवरून श्रीमत राजेश्री रघुपतराव, दाजीसाहेब व श्रीमत राजेश्री यशवंतराव बापूसाहेब देशपांडे कळवतात ३ बिरुदें--यजमानाच्या स्तुतीपर गीतें भाटचारण इत्यादि लोक लग्नप्रसंगीं अगर इतर मंगलकार्यांत व समाजांत म्हणतात तीं ४ दाटणी=गर्दी. रस्त्यामध्यें इतकी दाट दाटणी (गच्च गर्दी) कीं वाट फुटेना इतर जाणाराला रीघ मिळत नाहीं. ५ काळ हा उभा लक्षितो— 'उभा काळ विकाळ लक्षितो होय प्राण्या सावध झटकन्' देवनाथ. "झोंप नव्हे हा काळ तुजला ग्रासाया पाहतो। आयुष्य घेउनियां जातो ॥ नाशवंत हा नरदेह क्षणभंगुरमूर्ति। पडशील काळाचे हातीं ॥ हरिभजनाविण तुजवरता काळ करिल कोप। होईं जागा आवरीं झोंप" तुकाराम. "मूर्ख तो संसारीं माझें माझें करी। मृत्यू बरोबरी हिंडतसे ॥ हिंडतसे काळ सांगाती सरसा। धरी भरवसा नेणोनियां" रामदास. वस्त=बोकड. अलुमाळ=फार थोडा अल्प. नैश्वर्य=नाशिवंतपणा. (कवितेतील शब्द); या नाशिवंतपणाच्या ऐश्वर्यामध्यें दंग रति=रतिमात्र, तिळमात्र 'खडीमध्यें पावरती.'

मिळाले, पंक्तिपावन संपत्तीचे, आबा बाबा, तात्या काका[1], दादा नाना, संकट पडल्या एक दिसेना, विपत्तिकाळीं कोणि पुसेना, हरामखोर ते, कारभारी पहा, पंक्तिस घेउनी, भोजन करितो, ग्रास घेतां, गळीं अडकतो, आचाऱ्यावर बहु कडकडतो. समोर न ज्याच्या बहु फडकतो, बहुत सावजी, क्रोधयुक्त, प्याद्याचा फर्जी, पुर्जीनाचि कधीं देवविप्रगुरु विषयगर्जी, अतिशयचि कडक, मर्जी पाहुनियां ते अर्जी करिती, तों रावजी हृदयामाजी, सौख्य मानिती, इंद्र आपणासमान लेखिती, मीच असा अभिमान समाजीं, पडे अहो जी, यमाजीची स्वारी येतां, कोण पाजिला सोडवितो मग तुमजे लवही, हरामबुद्धित विरमलें मन, पहा आजि या कामसर्पें डंखियलें ॥ आहारे० ॥ ३

विषयमद्याचा पिउनी प्याला, धुंद सदा झाला मतवाला[2], मीच म्हणे एक दवलतवाला, परंतु साला, वालाभम हेमधर्म करीना, भला बुराजी पर न आपुला, कदा न पाहे, दासीला दे पदार्थ इच्छित, घालि पित्याला बाहिर ज्याला लाज न वाटे बटकीच्याला, संता ठेवुनि, पाठीं फिरवी, दुश्चित कां जन्मतां न मेला, असा कशाला भूमिं भारला जगीं असा बाजिंदे[3] बावा, आता हिरवा, गर्वाचा सरडाचि मातला, उदइक परवां सरणा लावुनि, काळ ओढी, सोडविता मग कोणि दिसेना, संपत्ति गेल्या दैन्यवाद, भक्षायाची विपत्ति नाना, परि उमजेना, अंतःकरणामाजी प्रकारा, बुद्धिविचारा, सांगों जातां वसवस कुतरा पाठिं लागतो, वडिलाचें शिकाविलें न माने, जवानिचिया तवरा[4]मध्यें सैरा

---

१ आबा बाबा तात्या काका—भट्टवंशकाव्यामध्ये हीं सर्व टोपणनावें एकाच संस्कृत श्लोकांत मजेदार गोंविलीं आहेत. पंक्तिपावन संपत्तीचे.—' शिते तवर तीं भुतें भोंवतीं कोण कुणाचा सखा जिवा ' रामजोशी " हे कोण बायकोचे मामे । घरांत वागती रिकामे । सासर शाल्योदन खाणें । भोजनभाऊ केवळ " अमृतराय " सुखाचे सांगाती सर्वही मिळती । दुःख होतां जाती निघोनिया ॥ निघोनियां जाती संकटाचे वेळे । सुख होतां मिळे समुदाव ' रामदास कारे भुलसीरे । कवणातें । अवघें संपत्तीचे नातें ॥धु०॥ आपादादा काकाजी । तात्या भावोजी । धन ज्यासाठीं जोडावें । तें तीं मसणी गाडावें । कडदोरा तोडुनि घेती । येती तैसेची जाती । उद्धवचिद्घन म्हणे रामा । धरी तूं नामाचा प्रेमा ॥ २ मतवाला—उन्मत्त, खुशालचेंडू ३ बाजिंदा—लुच्चा शहाणा ४ तवर (अरबी शब्द )=तोरा, भर. तुमजुनि पुत्रकामिनी मित्र कसे हे—' रांडा पोरें वेचक चोरें जवर मिळवितां तंवर थवा ' रामजोशी वाल=रती, चव यांसारखें सोन्याचें माप तवर=हद्द, तापटपणा सैरा= सैरावैरा, मोकाट.

जैसा नवरा फिरतो, मनात लहरा तैसा व्यापाराचे फदीं छदें शिरुनी बंदीं पडतो, कुदी करिल रविपुत्र कसें, अणुमात्र कळेना, उमजुनि पुत्र-कामिनी, मित्र कसे हे, आप्तसखे निजमनांत मानियले ॥ आहारे० ॥ ४

आम्हांमध्यें घरात करकर, गेली संपत्ति ते भरभर, विपत्तिकाळें केलें जर्जर, दुःखित अतर, भ्रष्टत्वा दडवुनि नष्टपण बहु कष्ट भोगवी, अश्वादि गज उष्टरखाना एक दिसेना विष्णुपत्निची ज्येष्ठ भगिनी, बहु सहिष्णु-पणें, निजगृहांत शिरली, इष्टमित्र, अपवित्र म्हणुनि, चेष्टा करिती, स्त्री-पुत्र निशिदिनीं, नष्ट मनें कलहासी करुनी, दिनरात्र फिरतसे, मिळे-नात कण मुष्टिभरी, अति कष्टि जीव परि, हांव सोडिना, क्षणेक दो प्रहरांची छाया, तद्वत माया, हृदयामध्यें अनुभव येतां, परी फिरेना, बुद्धि खराची, सोय हिताची कदा स्मरेना, लाजिरवाणें जिणें मिरवितो त्रास न ये चित्तास पहाहो, येतां सन्निध काळदुतातें, दया न उपजे नेतो काढुनि प्राण प्रेतरूप शरीर अचेतन, कांता ते आक्रांत करि बहु, यम-पार्षद ते उचलुनि नेती, चित्रगुप्त ते जमा विलोकुनि बसुला भिडवुनि बाकि काढिती, मोटी कैद महा ते वैद्यजी रोग पाहुनी औषध देती, दृढतर लोहस्तंभिं बांधिती, कुळासहित त्या नरकिं बुडविती, कुंभीपाकीं नेउनि घालिती, देवनाथ म्हणे हर हर हर हर काय गती, हे मदमती, तुज वेद विप्रगुरुवडिलानें, बहु शिकविलें, परंतु त्यातें सुधासम वाक्य उपेक्षुनि, आत्मस्वहित बुडविलें ॥ आहारे० ॥

---

कुदी=मारणें ( कणीक तिंबणें ). करकर=किरकीर, कुरकूर विष्णुपत्नीची ज्येष्ठ भगिनी=आक्काबाई, दारिद्र्य सरणा=चितेला यमपार्षदते उचलुनि नेती चित्रगुप्त ते जमा विलोकुनि—ही कल्पना अमृतरायांनी फार बहारीची बेठविली आहे. " हा देह पांचांचा । पांचजण नेतील । जीव हा अज्ञानी न्यायाला । धर्मदूत येतील । हिशेब पापाचा पुण्याचा । चित्रगुप्त घेतील । केल्या कर्मांचें फळ बापा । अवश्य ते देतील । प्राण्या मुळूं नको नटु नको स्वहिता अंतरशी ' प्रत्येक कवीचें या विषयावर विवेचन आहे. कुंभीपाकी नेउनि घालिति —यमलोकांत शायशीं प्रकारचे नरककुंड आहेत त्यांपैकी एक. सुधासम वाक्य—सुधा अमृत यासारखें गोड आणि परिणामीं हितकर आत्मस्वहित बुडविलें:—स्त्रीपुत्रादि आप्तविषयांचें रक्षणभरण केल्या-मुळें नव्हे, तें करणें स्वकर्तव्यच आहे, परंतु ईश्वराचें स्मरण सदोदित न ठेविल्याबद्दल

कटाव ( १० )

नेणुनियां आत्मस्वरुपा भ्रमला हा पशुवत नर कीं ॥ ध्रु० ॥

भोगी दुर्मद कठिण विषयकीं, वृद्धि अधिकाधिक संशय कीं, नकळे श्रीगुरुवचनाशय कीं, वृथा जन्म सत्पथाचरणाहि न यथार्थ श्रुतिसमतार्थ गिवसुनि, कसुनि स्वमन सम विषय वमन कधिं, करि न दमन भव-शमन अमल, सारमणा पदिं न करी नमन, कुपथिं करी गमन, अविद्या-विपिनिं भ्रमत, तमउदय करित, तैं स्वसुतदारधनिं रत, मोहभ्रम भरत, हृदई मन विरत त्यांत मति चरत विषयतृणिं कधिंन फिरत, प्रभुपद न स्मरत, स्मृति सकळही विसरत, वनिताअधरगत, अमृतरसांतचि तर कीं॥ नेणुनियां० ॥ १

घालुनि अहंकृति करदोरा, मत्सुतमत्कन्यामद्दारा, मानुनि आर्जवितो सरदारा, लवपळ पळक्षण विकळ होत, हळहळित चित्त अति, प्रबळ वित्त मेळऊं म्हणुनि, श्रम सबळ करित, आर्जवी नृपातें; नृपा त्यजुनि मज कृपाकरित मग, दरिद्रविटपा सहज नाश, धन पाश बद्धमनिं आस सरस, म्हणे रजनि दिवस कधिं करि न अळस, करकमळ जोडी, पद कमळ धरित, बहु विनित स्तवित, जी जी महाराज अजी महाराज नाना परिची ग्लान करित, अतिम्लानवदन धरि, धनि धनिकसदन फिरे रदन विचाकि, परि मदनदहन प्रियसखा करि न मधुसुदनदयाघन पथा-ब्धिजाप्रियकर कीं ॥ नेणुनियां० ॥ २

नेणे हृदयस्था गुरुराया, सेवी द्रव्यास्तव बहु रायां, फिरतो भूवरि उदर भराया, साक्षेप आजि निजकक्ष मेळवुनि, लक्ष धरुनि, आनि दक्ष-पणें उभयाक्ष, सहृदप्रतिपक्ष साधि, गत लपत लपत जव टपत बसत उंदिरास बोका, शंका नमानुनि रंकापरि पद गरका देउनि धनिकाच्या अंकावरि लोळे, बळें मनोरथ फळे न तेव्हां डहुळ हृदय उचंबळे, बहु दुःखें न चळे परंतु मानस मिळे त्याच रसिं बळेंचि नाचि मन, काळ

---

१ मागें कृष्णजन्मावरील अष्ठावन्नाची टीप पहा. २ मा लक्ष्मीच्या प्रिय-करा परिद्रविटपा–दारिद्र्यरूपी वृक्षाला ३ साक्षप–निश्चय, निग्रह येथें साक्षेपें–निश्चयें, निग्रहें असा अर्थ. ४ आपली मंडळी; आपल्या पक्षाचे लोक; दुसरा अर्थ वादांत वादी–प्रतिवादीच्या ज्या परस्परांवर कोट्या चाल-तात त्या. याशिवाय कक्ष शब्दाचे आणिक पुष्कळ अर्थ आहे.

घड्याळें वाजवितो, हें नकळे मुर्खा, टका वांछुनि धक्का खात कटकाला जातो, अटकाविल यम झटका देउनि फटकाविल मग सखा कोण सुटका करिल, सांगा लटका हा व्यवहार जाणुनि भटका उगें कशास्तव देवनाथ प्रभुनाथ निरंजन समान व्यापक जग सारी स्थावर कीं ॥ नेणुनियां० ॥ २

## कटाव आनंदनाथांवर ( ११ )

महाराज आनंदी हो अवतरले जग ताराया । गुरुराज आनंदी हो ॥ध्रु०॥

पाहतां दिव्य दिगंबर मूर्ती, जगतीं भली पसरली कीर्ती, बालोन्मत्त पिशाचवृत्ती, लोह ताम्राच्या आणि पितळेच्या, तऱ्हेतऱ्हेच्या, बोटीं पौंच्या, गळ्यांत माळा रुद्राक्षांच्या आणि तुळसींच्या, पहा शिरीं मंदील शोभतो, जरतारी तो, निमाजामा अंगरखा तो, अंगिं घालतो, कमरेस पटका कसुनि बांधितां लीला दावितो; अनंतरीतिच्या, पटक्यांमाजी नळकांड्याच्या, मध्यभागीं त्या घालुनि कैंच्या, नानापरिचे व्याघ्राचे ते सिंहमुखाचे, करीं कंकणें, बालवृत्तिचे, क्षणांत येणें तैं सर्वांसीं मधुर भाषणें, रावरंक हा समान नाणें, लागति सिद्धि पदा या ॥महाराज०॥१

अवधूत माहाराज योगी, चिद्घन संपदा भोगी, विचरे स्वच्छंदी निजरंगीं, मश्रूची हे तुमान उंची, कास कांसली, पट जोड्याची लीला प्रभूची, वर्णन शक्ती केविं घडेची; त्यागुनि वसना नग्नाच हिंडे, कवळी धोंडे, दुष्ट जनांचीं फोडी तोंडें, भक्तजनांचें वारी सांकडें, चिद्घन रूपडें; स्थूलसूक्ष्म शोधोनी पाहे, कारण महाकारण अपरा हे; अचाट अद्भुत थाट उन्मनी, घाट चढोनी, नीट पायरीवरता पाय ठेउनी, योगिराज आनंदी स्वयें विलसतो, निजनामें भवबंद छेदितो, भक्ताला साकार भासतो. खळकुटिलाला काळ दीसतो, स्फुरद्रूप अमूप तेज हें नांदतसे या विषया । महाराज० ॥ २

त्रिगुणात्मक श्रीदत्तदयाळा, पूर्णब्रह्म हें पाहतां डोळां, निजहृदयीं आनंद कोंदला, विश्वंभरवस्तू सार सुखाचें, भांडार अलौकिक माहेर खरें, त्वंपदतत्पद उभयमुख हें असिपद तिसरें, गाळुनि पाहे सदानंद

---

१ टका वांछुनी ( द्रव्य प्राप्तीची इच्छा मनीं धरून ) धका खात ( कितीही त्रास पडला तरी तो सोसून ) कटकाला जातो ( फौजेंत जाऊन शिरतो ) कांहीं तरी द्रव्य मिळून दुनियेंत प्रतिष्ठा वाढावी या बुद्धीनें

आनंद सदोदित, पूर्णधाम कैवल्य विसावा स्वामी आनंदी हृदयीं ध्यावा, नयनीं पहावा, चौऱ्यायशींच्या उगवी गोंवा, अत्रितनय महाराज दयाळा, पूर्णकृपाळा, युग वर्णितां निगम शीणले, शेषाचें हें वदन भंगलें, तेज अनामय स्वरूप प्रकटलें, भक्त भले भाविक जाणती, येर नेणती, कुटिळ खळ ज्यांलागुनि जे मनुष्य भाविति जन्मपंक्ति त्यां कदा सरेना, तया दुर्जना नर्कवास हा कदा सरेना, देवनाथ वंदे परब्रह्म अनाथा, अशुध्या त्या प्रतिभावें माक्षेपें ये मुक्ति वराया ॥ महाराज० ॥ २

## कटाव ( १२ )

भज भावें विठ्ठल बरवा । निजभक्ता प्राणविसांवा ॥ ध्रु० ॥

सद्गुरुनाथा शरण असावें, आपुलें निजगुज स्वहित पुसावें, तद्वचनें तें निज मनसावें, सत्स्वरुपीं हें चित्त वसावें, कामक्रोध हे समविकारी, दुराचारी, हे दूर करीं; अविचारीं पाळिती, स्वहित नाडिती, अंगीकृत भवपाश गोंविती, नको संगती, गती विगतिमति; विचार शोधीं, बोधीं मन, निरुपाधी होउनि, अवधी पाहतो काळ संधी, तधीं तुज कोण; सोडवी जाण, बरें अज्ञान, निरसुनी भान, कर्में भुललासी, हिताचें रुचे तुला हरिनाम न कां तें ? कांतेच्या वचनासि मानिसी, मोहें करुनी पिसाटलासी, अहर्निशीं हा यम नेमासी, पाहतो समय तो कठिण जाणुनी, स्वरें विचार, कीं तो सार निरंतर, शुद्ध मनें अंतरीं योजावा ॥ निजभक्तां० ॥ १

सार विचार निरंतर हा कीं, नामामृत सप्रेमें चाखीं, साधन खटपट शीण सकळ कीं, शिणतां किमपी प्राप्त नव्हे कीं, नामस्मरणीं विनट, बरा निष्कपट होउनी, कैवारी तुज कृपादृष्टीनें, पाहे तैं भवकष्ट चुकती, नष्ट संगती त्यागीं, तुला हें स्पष्ट सांगतों, इष्ट सोयरा भीमातीरीं पंढरीसी हरी विटेवरी नांदे, चिदानंद साकारब्रह्म तें, पुरुषोत्तम विश्राम निजाचा, तात विधीचा, पतितपावन पदीं बीदाचा तोडर साचा, पती रमेचा, सर्व घटीं जगजेठी भरला, पीतपटीं कटीं हात शोभला, निजभक्त हृदयांत रेखिला, वडिलधाकुला एकएकुला, चराचरीं अत्यंत व्यापला, वेद श्रुतिला अगम्य जो कीं, तो भूलोकीं, भक्तिसीं गोंविला, उभा राहिला, विटेवरी भूवरी वैकुंठ पंढरी, कंसारी प्रत्यक्ष नांदते.

तातमात, स्मर नाथकृपाळू मनांत, उगवी क्षणांत, हा भवगोंवा ॥ निजभक्तां० ॥ २

भक्तवत्सल दयाळ मोठा, स्मरतां करि भवसिंधू खोटा, अक्षयीं ध्यास हृदयीं नीलकंठा, हरितो निजभक्ताच्या कष्टा, त्या सुश्रेष्ठा, भावें भजे वैकुंठपतीतें, अहममता ते, त्यागुनियां ते, आकळिते जळींस्थळीं काष्ठासी सभर तें, अणुरेणु ब्रह्मादि व्याप्त ते, आप्तानाप्त ( आत्मानात्म ? ) कदापि असेना, असुनि दिसेना, गुरुकृपेंविण कदा दिसेना, आपआपणा, आत्मभुवना राज्य कराया, सद्भावें या सद्गुरुपायां, शरण रिघाया, तयें निजठायां, निजानंद आनंद स्थिरावे, स्थीरपणें आत्मत्व वरावें, स्वहित करावें, प्रेमादरें हरिनाम स्मरावें, किती शिकवावें, हित उमजाया, अमोल सखया, हे नरकाया, अगणित पुण्यें सांपडलीया, उगी कासया खोंविसि वाया, समज उमज करीं काज आपुलें, गुरु पाउलें, धरीं हृदयीं दृढ. गूढवस्तु मग, ध्यास तुतें निजगाढ अनुभवें, गुरुनाथ गोविंद निरंजन, ब्रह्मसनातन, शामवर्ण घनश्याम सदाघन, देवनाथ ज्ञानांजन नयनीं वाणी हरिगुणकीर्तन, नामीं अणुभरि विसर नसावा ॥ निजभक्तां० ॥ ३

---

# पदसंग्रह.

## देवतापर पदें.

### पद ( १३ )

वक्रतुंड गजकर्ण विनायक हिमनगजापुत्रा ! ।
चतुर्भूज ! फरशांकुशमाला ! वरद ! विश्वसूत्रा ! ॥ ध्रुवपद ॥

गणाध्यक्ष गणनाथ गजानन जय विश्वाभरणा ! ।
भालचंद्र लंबोदर देवा ! जय मूषकवहना !

चाल ॥ हे अग्रपूजका अग्रकार्यस्मरणा[1] ।
हे अग्रज । वरदा । अग्रहारदमना । ।
हे अग्रदेवसुत अग्रबुद्धिधरणा[2] ॥
टीप ॥ सिंधुरांतका जृंभनदमना गिरिजोदरभरणा ! ।
धूम्रकेतु[3] ! विद्यालय ! प्रभुजी । धीप्रद ! स्वातंत्रा ॥ वक्रतुंड०॥१॥
दुडुदुडुदुडुदुडु येइ त्वरें बा ऋद्धिबुद्धिकांता ! ।
रंगमूर्ति ! करिं दंग सभा हे त्रिविधक्षुद्रशाला ! ॥
चाल ॥ हे भक्तदयालो रिपुपंचकशमना ! ।
अवतार युगायुगीं धृतविग्रह नाना ।
दाविशि लीला बहु भयकृत भयहरणा ! ॥
टीप ॥ चार वेद अठराहि पुराणें नेती गुण आतां[4] ।
चौदा विद्या चतुःषष्टि दे कला भक्तत्राता ॥ वक्रतुंड० ॥ २
ऐकुनि करुणा धांवत आला वरदरंगदाता ।

---

१ कार्याच्या अग्रभागी–प्रारंभीं ज्याचें स्मरण होतें तो २ अग्रदेवसुत – अग्रदेव म्हणजे महादेव त्याचा मुलगा ३ धूम्रकेतु विद्यालय प्रभुजीः–हे धूम्र-केतु ! ( धूम्रकेतुर्गणाध्यक्षो भालचंद्रो गजाननः, असा मंत्र आहे ) हे विद्यालय ! (विद्यारंभे विवाहे च गणपतिस्तवन सर्वप्रसिद्ध आहे) हे प्रभुजी ! अशीं तिन्ही संबोधनें गणेशपुराणांत सांगितलें आहे, श्रीगजाननाचें कलियुगा-मध्यें धूम्रकेतु असें नाव राहीलः—चत्वार्यस्य रूपाणि चतुर्षु च युगेषु च । कृते दशभुजो नाम्ना विनायक इति श्रुतः ॥ त्रेतायुगे शुक्लवर्णः षड्भुजोसौ मयूर-राट् । सिंधु हत्वा पालयत्सोऽवतीर्य स्वालये प्रिये ॥ स एवाय रक्तवर्णश्चतुर्बाहु-विराजितः । अवतीर्णो गृहे नौहि सिंदूर निहनिष्यति ॥ नाम्ना गजानन इति त्रैलोक्ये ख्याति मेष्यति । अयं कलियुगे देवि धूम्रकेतुरिति प्रथाम् ॥ ( गणेशपुराण उ० अ० १२९ ). ४ चार वेद अठराहि पुराणें नेती गुण आतांः––हरिविजयांत श्रीधरस्वामी यासंबधानें असें लिहितातः—जयजय अनंत ब्रह्मांडनायका ॥ चतुराननाचिया निजजनका ॥ चौघांशींही नव्हे अवांका । तुझें स्वरूप वर्णावया ॥ १ ॥ साहीजण वेडे होती । अठरांची खुंटली गती । चौघीजणी तटस्थ पहाती । रूपस्थिति न वर्णवे ॥ २ ॥ पांचा नुरेची ठाव । चारी सहजचि जाहलीं वाव । चौदाजणींची ठेव । नचले स्वरूप वर्णावया ॥ ३॥ शिणल्या बहुत चौसष्टी । आठजणी बहुत कष्टी । अकराही हिंपुटी । स्वरूप तुझें वर्णितां ॥ ४ ॥ आणीक एक बारा देखण्या । सोळाजणी चतुर शाहण्या । आणि चौघी डोळे मोडण्या । लाजोनिया तटस्थ ॥ ५ ॥ पचविसा जाहली वाव । तिघांचें नुरेचि नांव । दोन्ही म्हणणें हा भाव । हेंही तेथें विरालें ॥ ६ ॥

( पुढील पृष्ठ पाहा. )

शुंडादंडीं मोदक विलसे सायुध रिपुहंता ॥
चाल ॥ हा पीत पितांबर अहिभूषण त्याला ।
कर्णांत कुंडलें किरिटा रवि भ्याला ।
नाचवि सूत्र हातीं धरुनी विश्वाला ॥

---

( १९५ पृष्ठावरून समाप्त )

चहू मुखांचा वर्णितां भागला । पांचामुखाचा तटस्थ राहिला । साहा मुखाचा दडला । कपाटामाजी जाऊनी ॥ ७ ॥ सहस्र मुखांचा वर्णितां देख । तोही जाहला तळीं तल्पक । थोरथोराशीं पडले अटक । एक मुखें काय वर्णूं ॥ ८ ॥ जीमुतीचे बिंदु किती । हेही एक वेळा होय गणती । निराळी पाईं वेधती । परि तुझी स्थिति अगम्य ॥ ९ ॥ होईल पृथ्वीचे वजन । गणवेल सिंधूचें जीवन । अवनीवरी किती तृण । मोजवेल गणितातें ॥ १० ॥ अवर आहे किती विती । हही गणवेल रमापती । परी तुझे गुण निश्चितीं । न वर्णवती कोणालें ॥ ११ ॥

या ओळींत चार वेद व अठरा पुराणें एवढ्यांचाच उल्लेख आहे, पण बहुतकरून भारतवर्षीचा प्रघात ‘ चार सहा अठरांचा ’ एकदम नामनिर्देश करावा असें आहे उदाहरणार्थ ज्ञानदेव म्हणतात.--‘ धुतांच मोतीं जळीं हरपलें सखोल मोठें पाणी ॥ चला पाहूं सहा चार अठराजणी ॥

१ गणपतींनीं पीत पीतांबर धारण केला असून त्यांच्या सोंडेत मोदक शोभतो व ते ऋद्धिबुद्धिनायक आहेत असें वर्णन शिवदिनकेसरीनेंही केलें आहे २ कर्णांत कुंडल किरिटा रवि भ्याला--कुंडलाचें तेज इतकें होतें की, त्यांना पाहून रवि भ्याला कुंडलें पाहून रवि लाजला असें माणिकप्रभु आपल्या एका पदांत विठ्ठलाचें वर्णन करितांना म्हणतात.--‘आज विटेवरी निट विठ्ठल सखा देखियलागे । भाळीं गंध केसरी तिलक कस्तुरी रेखियलागे ॥धृ०॥ शिवाकार मुकुट मस्तकासि शोभतो । कुंडलाचें तेज पाहुनि रवि लाज पावतो । शोभे नासिक कर्ण नेत्र आकर्णवदन हास्य ’ तसेच ‘उगवले दोन्ही वासरमणी । तैसीं मकराकार कुंडलें श्रवणीं ’ ही श्रीधर कवींची उपमा आहे पांडवप्रताप अ १ ओं ७ ३ नाचवि सूत्र हातीं धरुनी विश्वाला--यासंबधानें एकनाथ म्हणतात:--“ॐ नमो सद्गुरु सांबसूत्री । चोऱ्यायशीं लक्ष पुतळ्या यत्रीं । नाचविशी निजतन्त्रीं । प्राचीन दोरी स्वभावें ॥ १ ॥ दोरी धरली दिसों न देशी । परी पुतळ्या स्वयें नाचविशी । नवल लाघवी कैसा होशी । अलिप्तसी सर्वदा ॥ २ ॥ जेथ जसी ज्याची पूर्वगती । तें भूत नाचे तेशा रीती । ते नाचवीत चेतनाशक्ती । तुझ्या हातींविणहातें ॥ ३ ॥ जेवीं का अचेतन लोहातें । चुंबक खेळवी निज सामर्थ्यें । तेवीं तू सकळ भूतांतें । निजसत्तें नाचविशी ॥ ४ ॥ ऐशीं सदा नाचती परतन्त्र । तरी अभिमानाचें बळ थोर । सत्य मानोनि देहाकार । आम्ही

( पुढील पृष्ठ पहा )

टीप ॥ देवनाथ तूं आद्यअंतकृत दासदुरितहरिता !
दृश्यवासना भक्तरूप तूं आतगोतमित्रा ॥ वक्रतुंड० ॥ ३

पद ( १४ )

जयदेव जयदेव जयविघ्नहरणा ।
ओंवाळूं भावार्थें आरति तव चरणा ॥ ध्रु० ॥
आरते आरती गणपति जय सच्चित्पुरुषा
मूषकवहना ! गहना ! तुरविसि अघलेशा
गजवदना सुखसदना मुनिमानसतोषा
स्मरती निजजन त्यांच्या हरिसी भवक्लेशा ॥ १
लंबोदर सुखगव्हर[1] गुणमंदिर देवा
मृदुतर शुंडा सिंदुर सुंदर वरि दूर्वा
नूपुर पायीं राजति करिती मधुर रवा
पीतपीतांबर कांसे विलसे अतिबरवा ॥ २
चारिभुजा अति ओजा[3]; करिं अंकुशफरशां
धरिसी, हरिसी भवभय, स्वामी विघ्नेशा !
लाडू मोदक अशना सुरवर पदरेषा
नमिती, मनिंची साची पुरविशि निज आशा

( १९६ पृष्ठावरून समाप्त. )

स्वतंत्र म्हणविती ॥ ५ ॥ आम्ही सज्ञान अति ज्ञाते । आम्ही कर्मकुशल कर्मे कर्ते । मूर्ख समस्तें । ऐशा अभिमानातें वाढविती ॥६॥ एव देहाभिमानाचे हातें विसरोनि आपुल्या अकर्तृत्वातें । स्वयें पावले कर्मबधातें । जेवीं स्वप्नावस्थेतें विषबाधा ॥ ७ ॥ स्वप्नीं अतिशय चढलें विख । आतां उतरलें निःशेख । तेवीं बंध मोक्ष देख । सत्यत्वें मूर्ख मानिती ॥ ८ ॥ हे तुझे खांबसूत्रीची कळा ! मिथ्या सत्यत्वें दाविशी डोळां । हा अतिशयें अगाध सोहळा । तुझी अतर्क्य लीला तर्केना ॥ ९ ॥ " एकनाथी भा० अ० २२.

१ सुखाचें गव्हर म्हणजे गुहा शांतिनिवासस्थान २ शोभती ३ तेजस्वी ४ सुरवर तुझी पदरेषा नमिती असा अर्थ आरते आरती गणपति'— आरत म्हणजे आर्त, प्रेम. आरतणें=आवडणें, प्रेम वाटणें असें क्रियापद आर्त ( आतुर झालेला, कोण्या एखाद्या गोष्टीचा छंद धरून तिच्यासाठीं भ्रमिष्ट झालेला ) शब्दापासून मराठी कवींनी केलेलें आहे आरतें=आवडीनें असें क्रियाविशेषणात्मक रूपही आढळतें. " आम्ही झोंबू परम आर्तें । परी हे वडविली लातें । असो जे मानिलें त्यांचिया चित्तें । तेंचि मान्य आमुतें " —मुक्तेश्वर, आदिपर्व २९-१३५ येथें आरती आरतें=तुझी आरती ( करणें ) मला आवडतें, असा अर्थ.

श्रीमद्देशिकगुरू गणपति गोविंद
देवनाथप्रभु ! नाथा ! लागे तव पायीं छंद ॥ ३

पद ( १५ ).

जगदंब अक्षरें चारी जपतां वांछीलें पुरवी ।
स्वकृपाश्रृत जीवनीं वर्षे भवभय ती तुरवी. ॥ ध्रुवपद ॥
जगत्त्रयव्यापक जे अणुरेणु गाति श्रुति पैज ।
जगडंबर अति ढिसाळ[1] दुर्धर घडि मोडी सहज
जननी त्रैलोक्याची दावी निजासि निजगुज ।
जन्मजरामरणादिक वारित स्पर्शुनि पादरज ॥ जगदंब० ॥ १
गाति नेणति श्रुति, शेष वर्णितां जिव्हा द्विभाग ।
सारिगमपधनिसा रागें गाती सुरकिन्नर सांग ।
गजास्यताताग्रा[2]श्रित तत्त्व ( ? ) जाति अव्यंग ।
गर्जति जे उदोकारें निज त्या दे पद अभंग. ॥ जगदंब० ॥ २
दंभं दर्पाभिमानहरणं दमनासुरवृंदं ।
दंष्ट्रातीक्ष्णमट्टाहासं कंपित विश्वमिदम्
द्वंद्वातीत दनुजाविभेदं अर्पितस्वात्मपदं ।
दंडन खलजनखंडन भवभयअक्षयअभेद ॥ जगदंब० ॥ ३
बहु सप्रेमें भजतां गाळुनि[3] आभास प्रतिबिंब ।
बळिया[4] आत्मा अनुभवि प्रगटवि निजात्मनिजबिंब ।
बहु जगभासा तुरवी व्यापक दावी गुरु सांब ।
बहिरंतर्गत देवनाथ हा स्मरतो जगदंब ॥ जगदंब० ॥ ४

---

१ जगडंबर अति ढिसाळ=डंबर, आडंबर म्हणजे मोठा डौल, पोकळ पण अवाढव्य भपका. ढिसाळ म्ह० ढिमूळ, मोठें पण पोकळ. २ गजास्यताताग्राश्रित (?) = म्हणजे काय ? ३ गाळुनि आभास प्रतिबिंब, बळिया आत्मा अनुभवि प्रगटवि निजात्म निजबिंब=प्रेमानें उपासना केली असतां सर्व दृश्य जगद्रूपी आभास नश्वर वाटून आत्मस्वरूपाचा साक्षात्कार होतो. अशाच तऱ्हेचे केशवस्वामीकृत ' उदो रणाचाईगे मुळपीठे आई ॥ उदयास्तुवीण तुझा नित्य उदय पाहीं ॥ धण्याचेनि नेटपाटें । घरिचे घरीं ओळखी झाली जाणें नलगे कोठें ॥. प्रकृतिपुरुषा भेटी होता बोलणें झालें वाव । फिटला देहभाव । मुळिंची गोडी घेतां मीतुंपणा कैंचा ठाव ॥' अनेककविकृत पदसंग्रह, भाग १ पद ६८८. ४ बळिया—पक्केपणें, दृढपणें, पूर्णपणें.

ग्रा. क

## पद ( १८ ).

जय जय आदिभवानी अंबे मातापुरवासिनी[1] वो ! ।
चित्कळामालिनी निजजनपालय सुखदायिनी वो ! ॥ ध्रु० ॥
सिंहाद्रीपर्वतीं नांदसी निजसत्ते रेणुके वो !
पूर्णब्रह्मयोगिने योगीजनमानसमोहके वो ॥
दीप ॥ भवभयसंहारके देवी मूळपीठनायकी वो ! ॥ जय जय० ॥ १
महिषासुरमर्दिनी[2], विश्वाधारे त्रिभुवनजननी वो ! ।
पशुपति ब्रह्मा विष्णु अखंड तुजला ध्याती ध्यानीं वो !
दीप ॥ सुरवरवरदायिनी नारद तुंबर गाती गाणीं वो ! ॥जय जय०॥२

---

१ मातापुरवासिनी—वऱ्हाड व निझामच्या सीमेवरील माहूर या देवीच्या महास्थानाला इकडे मातापूर असें म्हणतात. २ महिषासुरमर्दिनीः—महिषासुर नावाच्या दैत्याला मारणारी सप्तशतींत महिषासुरवधाचें वर्णन आहे तें येणेंप्रमाणेंः—देवांचा राजा इंद्र व असुरांचा राजा महिषासुर हे दोघे युद्ध करूं लागले त्यांत इंद्राचा व इतर देवांचा पराभव झाला तेव्हां सर्व देवांनीं ब्रह्मदेवाजवळ गाऱ्हाणें केलें तेव्हां ब्रह्मदेव त्या सर्व देवांना बरोबर घेऊन हरिहराजवळ गेले हरिहरांनीं त्यांचे ते सर्व गाऱ्हाणें ऐकिल्याबरोबर, हरि, हर व विधि यांच्या मुखापासून मोठें तेज निघालें व तसेंच ते वेळीं इंद्रादि देवांच्या देहांतूनही तेज निघालें तीं दोन्हीं तेजें एकवटून त्यापासून एक दिव्य स्त्री उत्पन्न झाली तीच देवी होय तिचें मुख शिवाचे तेजापासून उत्पन्न झालें, मस्तकावरील केश यमतेजापासून, भुज हरितेजापासून, स्तनयुग्म सोमतेजापासून, कटिजंघ व ऊरु इंद्राचे तेजापासून, नितंब भौमतेजापासून, चरण ब्रह्मदेवाचे तेजापासून झाले सूर्याच्या तेजानें चरण अरुणांगुलि झाले हातांचीं बोटें वसुतेजापासून, नाक कुबेरतेजापासून, दंत प्रजापतितेजापासून, नयन पावकतेजापासून, भृकुटि संध्यातेजापासून कर्ण मारुततेजापासून झाले सदरहु देवीला शिवानें आपल्या शूळापासून शूळ उत्पन्न करून दिला विष्णूनें आपल्या चक्रापासून चक्र उत्पन्न करून दिलें. वरुणानें शुभ्रवर्णाचा शंख दिला अग्नीनें शक्ति दिली. मारुतानें दिव्यचाप व शरपूर्ण भाते दिले. इंद्रानें आपल्या वज्रापासून वज्र उत्पन्न करून दिलें यमानें काळदंडापासून दंड उत्पन्न करून दिला वरुणानें पाश दिले प्रजापतीनें रुद्राक्षाची माळा दिली. ब्रह्मदेवानें कमंडलु दिला. देवीच्या सर्व रोमरंध्रांत सूर्यानें आपलीं किरणें स्थापिलीं—काळानें तरवार व

( पुढील पृष्ठ पाहा. )

श्रीविष्णो वाराही भद्रकाळी श्रीभगवती वो ।
भक्तवत्सले सदये महिमा न कळे वेदश्रुती वो ॥
ध्रुप ॥ शरणागततारके अंबे अंतःकरणीं तुझी गती वो ॥जय जय०॥३
शुंभनिशुंभांतके[1] माते दुरितक्षयकारके वो ।

( १९९ पृष्ठावरून समाप्त )

ढाल दिली क्षीरोदधीनें जीर्ण न होणारीं वस्त्रें व हार दिला विश्वकर्म्यानें उत्तम रत्नें व सोनें यांनी जडलेलीं कुंडलें दिलीं तसेंच विश्वकर्म्यानें देवीला चंद्रहार, हातपायांत घालावयाचीं भूषणें, परशु, निरनिराळीं अस्त्रें, अभेद्य कवच हीं दिलीं समुद्रानें नेहमीं प्रफुल्लित राहणारी पद्ममाला दिली हिमालय पर्वतानें सिंह बसावयास दिला धनपतीनें सुरापात्र दिलें. शेषानें तिला नागहार अर्पण केला व तसेंच 'अन्य त्रिदशांनीही सर्वस्व विभूषणायुधानी तीं, सन्मानिली बहुमता, जैसी प्राणाधिका सुधा सीता ॥' या पंताचे उक्तीत लिहिल्याप्रमाणे सर्व देवांनी तिचा सत्कार केला अशा आयुधांनीं व अलंकारांनीं युक्त होऊन देवीनें महिषासुराबरोबर युद्ध आरंभिलें; व त्याचा वध केला 'तेव्हां दिव्य कृपाणें मस्तक खंडन करूनि असुरहित । तो महिष पाडिला श्रीदेवीने, जो सदैव असुरहित ॥' अशी पंतोक्ति आहे.

१ शुंभनिशुंभांतके—शुंभ व निशुंभ या नावाचे दोन राक्षसबंधु होते ते संपत्ति, विद्या व बळ यांनीं उन्मत्त होऊन इंद्रादि देवतांना त्रास देऊं लागले, तेव्हां इंद्रादि सुरगण हिमालय पर्वताला जाऊन गौरीची स्तुति करावयास लागले गौरी गंगेच्या स्नानाकरितां तेथें आली असतां तिनें त्यांचें स्तवन ऐकिलें गौरीच्या शरीरापासून 'शिवा' नावाची देवी निघाली. तिची कांति ते वेळीं कृष्ण असल्याकारणानें तिलाच कालिका असें लोक म्हणतात. तिचें सुंदर रूप चंडमुंड नांवाच्या शुंभनिशुंभ राक्षसांच्या सेवकांनी पाहून त्या स्वरूपाचें वर्णन त्यांनी शुंभ दैत्य राजाजवळ केलें तेव्हां शुंभानें आपल्या दूताबरोबर आपल्याला वश होण्याबद्दल देवीला निरोप पाठविला तेव्हां देवीनें उलट निरोप शुंभाला पाठविला तो पंताचे आर्येत आहे—

जो मज जिंकील रणीं, मम गर्वातें करील जा दूर ॥
तो मज समबळ माझा, भर्ता होइल जनांत जो शूर ॥
ऐसा मत्पण, यास्तव करुनि रणीं गर्वहानि शुंभानें ॥
किंवा शीघ्र धरावा, जिंकुनि मज, पाणि हा निशुंभानें ॥

हा निरोप दूतानें शुंभाला कळविला तेव्हां शुंभ अत्यंत रागावला व त्यानें चंडमुंडांस तिला धरून आणण्यास आज्ञा दिली त्या युद्धांत चंडमुंड मारले गेले चंडमुंड यांना मारल्याकारणानें देवीला चामुंडा म्हणतात नंतर शुंभनिशुंभ स्वतः गेले त्या युद्धांत ते दोघेही दैत्य मारले गेले.

जय दीनोद्धारके निजजनमानसकल्पलतिके वो ! ॥
टीप ॥ देवनाथ निजरसनें सेवी नामामृत कौतुकें वो ! ॥ जय जय० ॥ ४

## पद ( १७ )

अंबे तुझीं देखियलीं थोर भाग्यें पाउलं ॥ ध्रु० ॥
अवलोकिति पदकमलां लोचन ।
नेणों कोण जन्मार्जित तप आह्मीं साधिलें ॥ १
सुंदर सुकुमार अतिशय राजस ।
पाहतां जन्मार्जित दुःख हें भगलें २
सिंहासनीवरि बससी अंबे ।
कृपावंते ये माबाई दीनजन माउले ॥ ३
शुकसनकादिक चिंतिति अंतरीं ।
ब्रह्मा विष्णु रुद्र देव तिन्ही तुझे तान्हुले ॥ ४
देवनाथ निजभावें विनवि जननिये ।
नुपेक्षावें दीनाप्रति राखीं ब्रीद आपुलें ॥ ५

## पद ( १८ ).

तो धन्य वैभवाचा । जो म्हणवी दास शिवाचा ।
शिवशिवशिवशिव शिवशिवशिवशिव अखंड जप करी वाचा॥ध्रु०
प्रेमयुक्त अति विरक्त मानसीं नाश करुनि कामाचा ।
घोष वदनिं हर त्रिपुरगौरशशिशेखर या नामाचा ॥ १ ॥
शिवरात्रीव्रत पुण्यपरायण आचरी नेमें साचा ।
बिल्वपत्रीं करि शिवार्चनातें अद्भुत महिमा त्याचा ॥ २ ॥
डौरवी[1] कामा घटाटोप तो रुद्राक्षाभरणाचा ।
भस्म अंगीं, शिवस्मरणें चुकवी घोर जन्ममरणाचा ॥ ३ ॥
स्मरणें शिवस्वरूपचि झाला सुरला ठाव भयाचा ।
देवनाथ शिरीं पदरज वदी जाला दास तयाचा ॥ ४ ॥

---

१ डौरवी कामा—कामाचा नाश करी असा अर्थ काय ? मोल्सवर्थमध्यें डौरणें या शब्दाचे बरेच अर्थ दिले आहेत, पण त्यांत येथें लागेसा एकही नाहीं

## पद ( १९ )

'महादेव महादेव महादेव ' वदा रे ! ॥ ध्रुवपद ॥
पशुपति हर त्रिपुरगौर । परमसदय पार्वतिवर ।
स्वकरीं धरित त्रिशुलडमर । हरित मदा रे ॥ महादेव० ॥ १
भक्तोत्सल पञ्चवदन । सुंदर अति अधररदन ।
ध्याल हृदयिं मदनकदन । सौख्य सदा रे ! ॥ महादेव० ॥ २
अंगिं भस्म भूषणास । धरित सर्वदा उदास ।
काळविघ्न भजति यास । न करी...रे ! ॥ महादेव० ॥ ३
दयाळ नीलकंठ परम । पांघरे गजव्याघ्रचर्म ।
स्मरतां हरित दुरित कर्म । ..आपदा रे ! ॥ महादेव० ॥ ४
देवनाथप्रभु कृपाल । भालचंद्र विश्वपाल ।
वर्णिताति यश विशाळ । निगम सदा रे ! ॥ महादेव० ॥ ५

## पद ( २० ).

शिवहरहरहर त्रिपुरगौरिहर दुर्धर भवपाशा ।
जय पशुपते पार्वतीशा ॥ धृ० ॥
भवभयहर शिरिं गंगाधर शिर–जटाजूटगहना ।
विश्वात्मया नंदिग्रहना ॥
करिं पाशडमरु रिपु समरीं वधिशी, अमर मदनदहना ।
स्तविति तुजलागुनी अघशमना ॥
विमल तुझें पदकमल दाविं, भव शमल दुःखनाशा ॥ जय० ॥ १
पंचवदन सुखसदन करिशि अरिकदन निर्विकारा ।
करुणानिधे सौख्यसारा ॥
पाशांकुशधर फरशडमरकर तूणीर अतुट स्वकरा[1] ।
आयुधें विलसति विश्वंभरा ॥
भवजलनिधिभर सभर[2] प्रचुरें[3] तंव उठति क्रूर लहरा ।
येईं शिवसांब कर्णधारा ॥
जन्ममरणभयहरण ! दाविं तव चरण, हरीं क्लेशा ॥ जय० ॥ २
[ रौद्र ] त्रीनयन निरखुं किति अयन[4] बहुत स्वामी रुद्रा ।

---

१ अतुट स्वकरीं=अक्षय, ज्यांतील बाण कधीं संपत नाहींत असा तूणीर=भाता २ सभर=जोरानें. ३ प्रचुर=पुष्कळ ४ अयन=मार्ग.

विनवीं म्हणुनि हृदय सार्द्रा ॥
मम इष्ट तेंचि दे, कष्ट चुकवि, हरिं दुष्ट भ्रांतिनिद्रा ।
निज तारका त्रिभुवनेंद्रा ॥
मी बाळ, ठेविं पदिं भाळ, चुकविं हा काळ, भालचंद्रा ।
देईं स्वन्नामनिजमुद्रा ॥
हे देवनाथप्रभु नाथ वदवीं गुण स्वार्थपरसपुरुषा ॥ जय० ॥ ३

## पद ( २१ ).

सांब सदाशिव भजा । गडे हो सांब सदाशिव भजा ॥ धृ० ॥
क्षणभंगुर हे नरतनु जाइल वायां । निजसुखहिन उमजा ॥ १
शैलसुतावर व्याप्त चराचर । जाणुनि हृदयिं भजा ॥ २
देवनाथप्रभु नाथ निरंजन । आत्मा देव हा पुजा ॥ ३

## पद ( २२ )

शिवशिव शिवहर शंभो पशुपते ॥ धृ० ॥
हे पशुवाहन भस्मविभूषण हिमनगजापति सांबा ।
विश्वरूपा विधिवंदित पदरज विश्वेशा विश्वकदंबा[1] ।
विमलपदांबुज चिच्छक्ती स्वकरें सिंहानी[2] जगदंबा ।
तें मज दाखवीं या निजलोचनीं उपडुनियां भवकोंबा[3] ॥ १
पंचवदन दशभुजा जटाजुटीं शोभतसे शिरिं गंगा ।
वामांगीं विराजत शैलसुता जाळिसी दुष्ट अनंगा ।
त्रिभुवनआलय निजजनपालय जननी तू घे उसंगा ।
नामामृत प्रेमपान्हा पाजुनिया ने हा भव भंगा ॥ २
शीतल चंद्र सुशोभित भाळीं कर्पूरगौर त्रिनेत्रा ।
व्यापक तूं हर सर्व चराचर पावना पशुपाळमित्रा ।
निगमादिक तुज वर्णितां शिणले निजाचिया निजमंत्रा ।
भवरोगें ग्रासिलि काया देईं नामरसायनमात्रा[4] ॥ ३

---

१ विश्वकदंबा=विश्वाच्या कल्पवृक्षा (कदंब. कल्पवृक्षयो.–अमर ); विश्वाधारा. कदंब=आंस, गाडीचा आस. २ सिंहानी–हा शब्द कोशांत सांपडत नाहीं. सिंहयानी=पार्वती असा शब्द सांपडतो ३ भवकोंबा–भववृक्षाचा कोंब म्हणजे अंकुर उपडुनियां ४ भवरोगें माझी काया ग्रासिली तुझी नामरसायनमात्रा दे.

देवनाथप्रभु गुरुगोविंदा शिवा तुज भेद न कांहीं ।
जिविंचा जिवलग सोयरा अमुचा आलिंगीं ये दश बाहीं ।
शरण मी पातलों पावन ऐसी ऐकुनी निगमाची गाही[1]।
आणिक कांहीं न मागें तुजलागीं ठेवीं मला निजपायीं ॥ ४

## पद ( २३ ).

पार्वतिचा पति शिव भोळा जेजुरगडपर्वतीं ।
सोयरा नांदतो हैबती[2] ॥ ध्रुवपद ॥
दैत्यभारें[3] दुर्धर भूमीवर मातले तुंबळ ।
खळानें त्राशिलें भूमंडळ ॥
दैत्याधिपती मणीमल्लें[4] तो दुष्टरूप चांडाळ ।
गांजिले ऋषि आणि द्विजकुळ ॥
विध्वंसिले यज्ञ सकळही झाला हलकल्लोळ ।
किं धाकें सुरांसि सुटला पळ ॥
विधि इंद्रादिक शरणागत हे कैलासाला जाती ।
सुर गाऱ्हाणें शिवाला देती ॥ पार्वतिचा० ॥ १
गाऱ्हाणें ऐकुनि देवानें दिधलें आश्वासन ।
कृपाळु दाता पशुवहन ॥
दैत्य मर्दुनी धर्म रक्षिलें पतितासी पावन ।
किं धरिला अवतार सगुण ॥
दीनदयाळ राव मैराळें[5] भस्मलेप त्यागुन ।
किं अंगीं हळदीचें उटण ॥
निळ्या घोड्यावरते स्वार खांडा[6] घेउनि हातीं ।

---

१ तूं ( शरणार्ता ) पावन ऐसी निगमाची–वेदांची गाही ऐकुनि मी शरण पातलों २ हैबती=हयवान्, घोडेस्वार देव शंकरानें खंडोबाचा अवतार घेऊन घोडेस्वार होऊन दैत्य मारले म्हणून त्याला हयवान् अथवा हैबती हें नाव मिळालें. ३ भार=संभार, समूह. ४ ब्रह्मांडपुराणाच्या बाविसाव्या अध्यायावरून पांडवप्रतापकार श्रीधरकवींनी मल्हारीमाहात्म्य रचिलें आहे. त्यांत मणी व मल्ल असे दोघे भाऊ असुर होते असें दिलें आहे ५ राव मैराळ=मराळ–हंस याची तनु पिंवळी असते, आणि मल्हारीला हळदीचें उटणें आवडतें. ६ खांडा=दोन्हीं बाजूंना धार असलेली तरवार.

म्हाळसा झाली हिमनगसुती[1] ॥ पार्वतिचा० ॥ २

वामभागीं राणि म्हाळसा चिच्छक्ति[2] सुंदरी ।
किं दुसरी बाणाई धनगरी[3] ॥
कडेपठारीं[4] ठाणें देवाचें वसविली गड जेजुरी ।
गडाला नवलक्ष पायरी ॥
चंपाषष्ठी[5] यात्रा भरती, आनंद होतो भारी ।
पाहा देव नितनवरा[6] मल्हारी ॥
वाघे मुरळ्या भजन करिती भंडार उधळती ।
किं वाघे वेळकोट[7] बोलती ॥ पार्वतिचा० ॥ ३

निर्गुण मूर्ति देव महिपती सगुण रूप मल्हारी ।
केली दैत्यावरते स्वारी ॥
दैत्य मर्दुनी धर्म रक्षिले, पतितांचा साहाकारी ।
किं ठाणें वसविलें गड जेजुरी ॥
दीनदयाळ राव मैराळ भगवी ध्वजा उभारी[8] ।
किं हरुषे सुरवर बहु अंतरीं ॥

१ हिमनगसुती—हिमालय पर्वताची कन्या पार्वती ही म्हाळसा या नांवानें खंडोबाची अर्धांगी म्हणून अवतार धारण करती झाली २ आदिशक्ति माया ३ पार्वतीच्या अवतारावरोबरच गंगेनेंही शंकरावरोबर राहण्याकरितां धनगराच्या कुळांत बाणाई नांवानें अवतार घेतला अशी जेजुरीला आख्यायिका आहे ४ कडेपठार हें जेजुरीपासून दोन मैलांवर आहे येथें खंडोबाचा मूळ अवतार झाला. ५ मार्गशीर्ष शुद्ध षष्ठी. या दिवशी मल्हारीचा अवतार झाला म्हणून यात्रा भरते. “ मासामाजी उत्तम मास । हरीची विभूती मार्गशीर्ष । शुद्धपक्षीं चंपाषष्ठीस । शततारका नक्षत्रीं ॥ १०९ ॥ रविवारी प्रगट अवतार । मणिमल्लमर्दन परमेश्वर । देवऋषिगंधर्वनर । यात्रा अपार भरलीसे ” ॥११०॥ श्रीधरकृत मल्हारीमाहात्म्य पुढें श्रीधर म्हणतात कीं, चंपाषष्ठीला रोटी, वांग्याची भाजी आणि क्षीरोदन याचें ब्राह्मणाला उत्तम भोजन द्यावें; आणि कोणी मूढ लोक पलांडू भक्षण करावे म्हणतात, पण याला मूळ संस्कृत ग्रंथांत आधार नाहीं. ६ सदोदित आंगाला हळद लावून पिवळा झालेला, नवऱ्या मुलासारखा, म्हणून नितनवरा ७ येळकोट ( कानडी )=सातकोट. हे शंकराचे गण आहेत, व युद्धसमयीं मल्हारीला साह्य करावयाला होते मल्हारीचे ऊर्फ खंडोबाचे वाघ्या-मुरळी वर्गांचे भक्त नेहमीं वेळकोट शब्दाचा जयजयकार करितात. ८ जेजुरीगडावर भगवा झेंडा प्राचीनकाळापासून चालत आला आहे

त्रैलोक्यामधें सत्ता ज्याची व्यापक सर्वांभूतीं ।
किं भोळ्या भक्तांचा सारथी० ॥ पार्वतिचा० ॥ ४
गुरुकृपेनें झालें सोपें फळला निजसद्भाव ।
गुरुनें दाखविलें नवलाव ॥
देह जेजुरी पाहें अंतरीं विचार मुळचा ठाव[1] ।
प्रकाशे चिद्धन रुप भवभव ॥
सद्गुरु गोविंदनाथ निरंजन आत्मा खंडेराव ।
लक्षितां उसावला अनुभव ॥
देवनाथाचा समर्थ धनि रे ! ज्ञानखांडा हातीं ।
मार्दिले निंदक खळ दुर्मती ॥ पार्वतिचा० ॥ ५

---

## मारुतीपर पदें.

### पद ( २४ ).

वायुतनय महाराज दयानिधि । वायुतनय महाराज ॥ ध्रुवपद ॥
रजनीचरसंहारका[2] निजजनसुखकरणा ।
पिंगलनयना परमउदारा मायामदहरणा ॥ वायु० ॥ १
रुद्ररूपा भीमप्रतापा जय वानरवेषा ।
शरणागत मी दीन तुझा हरी वारीं भवक्लेशा ॥ वायु० ॥ २
वारीं हे अघ दुर्घट देउनि कृपा अभयवरदा ।
पतित मी तूं पावन देवा ! राखावें बिरुदा ॥ वायु० ॥ ३

---

१ असाच अभंग पहाः—
" काया हे पंढरी आत्मा हा विठ्ठल । नांदतो केवळ पांडुरंग ॥
भावभक्ती भीमा उदक ते वाहे । बरवा शोभताहे पांडुरंग ॥
दयाक्षमाशांती हेंची वाळुवट । मिळालासे थाट वैष्णवांचा ॥
ज्ञानध्यानपूजा विवेक आनंद । हाचि वेणूनाद शोभतसे ॥
दश इंद्रियांचा एकमेळा केला । ऐसा गोपाळकाला होत असे ॥
देहीं देखिली पंढरी जनिंवनीं । एका जनार्दनीं वारी करी ॥"
२ रजनीचर=राक्षस.

बुडतां या भवपुरीं उतारी येई कर्णधारा।[1]
त्रिभुवनीं मातें आणिक नाहीं तुजविण आधारा ॥ वायु० ॥ ४
अन्यायी अपराधी परि मी दास म्हणतों तुझा।
तुजविण राखी कोण दयाळा साभिमान माझा ॥ वायु० ॥ ५
तूंचि सकळ गणगोत सोयरा आप्त बहिण भ्राता।
येईं त्वरें ब्रिद राखीं आपुलें तूंचि मातापिता ॥ वायु० ॥ ६
करुणारव परिसुनि धांव लौकरी विनवणी हे मान।
लव पल क्षण हा विलंब न लावीं स्वामि सख्या हनुमान! ॥ वा० ७
हांक दिधली महाद्वारीं हे नयन मार्ग पाहती।
देवनाथ हे काष्टपूतळी[2] सूत्र तुझ्या हातीं ॥ वायु० ॥ ८

## पद ( २५ )

जय जय बलभीमा हो बलभीमा[3]। अद्भुत तव बलगरिमा ॥ ध्रुवपद ॥
जय जय मारुतिराया। निजजनसुखदायक प्रभुवर्या ॥ जय जय० ॥ १
रामदूत सुखसारा। पिंगलनयना परमउदारा ॥ जय जय० ॥ २
रजनीचरसंहारा। तारा भवभय सर्व निवारा ॥ जय जय० ॥ ३
सीताशोकविनाशा। मत्प्रियप्राणा वानरवेषा ॥ जय जय० ॥ ४
दुर्धर या भवजीवनीं। तारु तूंचि मज द्रुमपाणी ॥ जय जय० ॥ ५
आणुनियां गिरिद्रोणा[4]। दिधलें लक्ष्मणा जिवदाना ॥ जय जय० ॥ ६
षड्रिपुंवरि करि मारा। अंजनितनया अतिसुकुमारा ॥ जय जय० ॥ ७
मम हृदयीं बैसोनि। दावीं ब्रह्मरूप जग नयनीं ॥ जय जय० ॥ ८
बुडतां या भवकर्दमीं। काढीं ठेवीं तव पदपद्मीं ॥ जय जय० ॥ ९

---

१ बुडतां या भवपुरीं उतारी येई कर्णधारा:—पद नंबर ११७ वर टीप पहा. २ काष्टपूतळी सूत्र तुझ्या हातीं:—देवनाथ कळसूत्राचें बाहुलें आहे व त्या बाहुल्याला बांधलेलें सूत तुझ्या हातांत आहे ३ बलगरिमा=बलाचें महत्व, मोठें बल ४ आणुनियां गिरिद्रोणा:—रामरावणांचे युद्धाचे वेळीं लक्ष्मणाला शक्ति लागून तो मूर्च्छित पडला होता त्याची मूर्च्छा नष्ट करणारी वनस्पति द्रोणागिरि पर्वतावर होती तो पर्वत मारुतीनें तांबडतोब जाऊन आणला; व त्या पर्वतावरील वनस्पतीचा उपचार करून लक्ष्मणाची मूर्च्छा नाहींशी झाली व लक्ष्मण तांबड वि शुद्धीवर आला.
'लंगोट बंधन हुंगांत शेंपुट अंजनीसुत काळतोंडारें। रातोंतून जेणें शेंपटीसी बांधून संकष्टि आणिला धोंडारे ॥' एकनाथमहाराज, अ. प. स. १.

रुद्ररूपीया ताता । अनाथनाथा श्रीहनुमंता ॥ जय जय० ॥ १०
देवनाथप्रभु दाता । न लवीं लव पल क्षण ये आतां ॥ जय जय० ॥ ११

## पद ( २६ )

अंजनीतनय रामदूता । वानरेश्वरा सौख्यदाता हो । ।
साह्य होईं निजपायीं ठेवीं मज येईं कृपावंता । ॥ ध्रुवपद ॥
अद्वयानंदा कपिवीरा । रुद्ररूपिया समरधीरा हो ।
चरणकमल अतिविमल दावि भ्रम शमल निर्विकारा ॥
भवाब्धी बहु दुस्तर सैरा । उठती कठिण तीव्र लहरा हो ।
नाहीं मिति न सोसती अंत किति पाहसि कर्णधारा ॥
ग्रासी दुर्जनमत्मरकुतरा । लोभमोहादि करिति मारा हो ।
रतिपति करि मतिभंग त्वरितगति ये दीनोद्धारा ॥
चाल ॥ षड्रिपुदमन भयशमन नमन तुज ये वानरवेषा ।
अतिशय कुपथिं करिं गमन, गणित हे श्रम न परमपुरुषा ॥
ह विषयँ वमनसम स्वमन नमन करि भ्रमण त्वरित क्लेशा ॥
टीप ॥ भोगि निशिदिनीं विषयगर्ता । वश्यँ अज्ञानदृश्यदुरिता हो ।
जितेंद्रिया आवरीं मनोजय करिं वारीं चिंता ॥ अंजनी० ॥ १
पवनात्मजा प्रतापार्का । पतितपावना पुण्यश्लोका हो ।
पाव त्वरें घे धांव चरणिं दे ठाव मला रंका ॥
राघवप्रिय केसरितोका । अजि रजनीचरसंहारका हो ।
त्रिभुवनगुणसुंदरा उदारा अभयवरद दे कां ॥

---

१ भवाब्धी बहु दुस्तर सैरा । उठती कठिण तीव्र लहरा हो:—पद ११७ २ टीप पहा. २ अतिशय कुपथिं करिं गमन=अतिशय कठीण मार्गीं गमन करितोस. ३ गणित हे श्रम न=त्या श्रमाची गणती करितां येत नाहीं ४ विषय वमनसम इ० = याचा अन्वय हे विषय वमनसम, स्वमन नमन, क्लेशा त्वरित भ्रमण करि ५ वश्य अज्ञानदृश्यदुरिता:—अज्ञान म्ह० अविद्या, माया; दृश्य=याह्य नाशवंत जग; दुरित = पाप, या तिहींना माझी मति वश झाली आहे त्या मला पाण्याला उद्धर.

भवार्णवि तारक पैं जे कां । निजाप्रति देसि नामनौका हो ।
गुरुतीर परंपार करित जानकीशोकहरका ॥
चाल ॥ हे दयानंध सुखघना उदधिलघना बलाध्यक्षा ।
लक्ष्मणप्राणरक्षणा पर्णभक्षणा पिंगलाक्षा ॥
तू परमसदय परि अदय कां जि हो प्रगट हृदयदक्षा ॥
टीप ॥ अजी अव्यया अपरिमीता । अरूप अक्षया अनंता हे- ।
तुजविण तरि मज कोण जाण या भवीं भयत्राता ॥ अंजनी० २
पर्वतोत्पाटनद्रुमपाणी । कलुषांतकां मोक्षदानी हो ।
अद्भुत तव बल प्रबल देसि सुख अचल निजा स्मरणीं ॥
तम हाटक तनु तद्वर्णी । अघटित पुच्छाची करणी हे- ।

---

१ नामनौका=नामरूपी नौका ही नौका मला देऊन तूं मला गुरुतीर परपार केलेंस. सद्गुरुरूपी परतीरला पार नेऊन पोंचवलेंस. याबद्दल मिराबाई म्हणतातः—

राम चरनं धन पायो मैया मैं तो राम० ॥ ध्रु० ॥
संत संगत सद्गुरु प्रतापसें भाग बडो बनी आयो ।
खर्च न खूटे वाकू चोर न लूटे दीन दीन होत सवायो ।
नीर न डुबे वांकू अग्नि न जाले धरणी धर्यो न समायो ।
नामको नाव भजनकी बतियां भवसागरसे तार्यो ॥
मीराबाई प्रभु गिरिधर शरने । चरनकमल चित्त लायो ॥ मैया ॥ ४ ॥

२ परपार=अगदीं पलीकडे ३ बलाध्यक्षा—बल ( वानरसैन्य ) याच्या सेनापते ! ४ कलुषांतका=पापाचा नाश करणाऱ्या ५ हाटक=सोनें ६ अघटित पुच्छाची करणीः—मारुतीनें आपल्या पुच्छानें रावणाच्या अशोक वनाचा नाश करून टाकला नंतर मारुतीला बांधून रावणासमक्ष नेलें. रावणानें त्याच्या शेपटीला चिंध्या गुंडाळण्यास सांगितलें व त्यावर तेल ओतून तें पेटविण्यास सांगितलें व शेपटी पेटवून सर्व गावांतून त्याला फिरविलें नंतर त्याच शेपटीनें मारुतीनें सर्व लंका जाळिली व नंतर आपलें पुच्छ समुद्रांत विझविलें यासंबधानें मोरोपंत आपल्या सवाईरामायणांत म्हणतातः—

दिव्यअशोक वनद्रुम मोडुनि, सर्व दिगंबर तो नरि थोपें ॥ २७ ॥
तो दशकंठ सभेप्रति बांधुनि घेउनि बोलविला बहुवक्ता ।
स्पष्ट तया कळवी सकळक्षय हें फळ केवळ उत्पथसक्ता ।

( पुढील पृष्ठ पहा. )

अशोकवन त्रोटिलें असुर आटिले लंकादहनीं ॥
तोषविलि ते सीता जननी । भुभु:कारें कंपित अवनी हो ।
भडभड रिचविति भगणें, विमानें पळविति सुर गगनीं ॥
चाल ॥ बहु शैल हुडे बहु खचले बैसले ते दिग्गजटाळे ।
हे थरथरथर कांपती पळों पाहती तिन्ही ताळे ।
सरसावि मान फणि, तळीं सत हडबडलीं पाताळें ॥
टीप ॥ दशा हे उड्डाना करितां, शुद्धि घेउनियां हनुमता हो ।

---

( २०९ पृष्ठावरून समाप्त )

पेटवि तैलपटावृत पुच्छ, न शक्र असें खळ मानुनि शंका ।
त्या 'फिरवा स्वपुरांत' म्हणे अपमान करूनि महाप्रभु भक्ता ॥ ३० ॥
चालविला कपिवीर जिहीं गुरु पुच्छ करूनि तया बहु घोळी ।
जी अतिभव्य पुरी मणिकांचन भासुर दीप्ति तिची करि होळी ॥

( मोरोपंत मयाईरामायण सुंदर कांड ) तसेंच सदरहु पुच्छाचे प्रतापाबद्दल मुक्तेश्वर आपले रामायणांत म्हणतात ' उपटुनि तरु पुच्छे एकदां लक्षकोटी । पिळुनि महित गाकी निर्फळी दारु सांडी ॥ चौदा सहस्त्र वनरक्षपाळा । बांधोनि पुच्छीं भवडी निराळा । ताडुनि भूमी, गतजीव केले, । झुगारितां सिंधुजळीं बुडाले ॥ बाघुनि वेरातरुमार पुच्छें । चीटूनि पृथ्वीवरि वातवत्सें । टाकी समुद्रीं बहु कच्छ मच्छे । सोल्यावळी क्रीडाति सर्व इच्छें ॥ वनपर्व २३९ व २४०

१ अशोकवन त्राटिले:—लंकेंत रावणाचे अशोक वन होतें त्यातील सर्व झाडांचा नाश मारुतीनें केला २ त्राहाटिलें=जोरानें ठोकले हा शब्द फक्त कवितेच्याच प्रचारांत येतो 'आज्ञापितां दुर्योधनें । रणभेरी त्राहाटिल्या ' ३ भगणें=नक्षत्रें ४ दिग्गजटाळे—ऐरावत, पुंडरीक, वामन, कुमुद, अंजन, पुष्पदंत, सार्वभौम व सुप्रतीक असे अष्टदिशांचे आठ संरक्षक हत्ती त्यांचेही कानटाळे बसले एवढा मोठा आवाज झाला म्हणजे पर्वत, हवेल्या, हुडे खालीं पाडल्यामुळे इतका भयंकर आवाज झाला कीं, सर्व अष्ट दिशा त्या आवाजानें दुमदुमून गेल्या टाळें, तोंडाचा खालचा व वरचा भाग ' दिग्गजांचीं टाळी बैसती ' हें अवतरण मोल्स्वर्थन याच अर्थात दिलें आहे ५ तिनी ताळे= तिन्ही लोक अतल वितल सुतल इ० ६ सरसावि मान फणि तळीं=तळीं फणि मान सरसावि असा अन्वय आहे तळीं म्हणजे पाताळांत शेषानेंही आपली मान सावरली, इतक्या शैलहुडे वगैरे खचल्यामुळें धक्का बसला. ७ दशा हे इ०—हे हनुमता हो ! शुद्धि घेऊनियां (सीतेचा शोध घेऊन) उड्डाणाला करितां ( केलें असतां ) हे दशा ( लंकेची झाली ) असा अन्वय. परंतु ' समुद्र गेले तिरा ' हें काय ! ' समुद्र ऐलें तिरा ' अशा पाठानें अर्थ जुळतो.

समुद्र नेले तिरा येसि भेटसि श्रीरघुनाथा ! ॥ अजनी० ॥ ३
अजि दशवदनदर्पहरणा । दयाळा निजजनसुखकरणा हो ! ।
अहिमहिअसुरांतका हे भवतारका विघ्नहरणा ॥
विश्वव्यापका जगदुद्धरणा । कृपाळा तव अंतःकरणा हो ! ।
पतित दीनमति हीन तुझा तुजला यावी करुणा, ॥
विमलरूपा विश्वाभरणा । काय पाहसी मदाचरणा हो ! ।
क्षमा करीं भवपुरीं तारिं अजि हरी दाविं चरणा ॥
चाल ॥ अजि सांग होय तरि अन्य साह्य मज कोण कठिण काळीं ।
हा त्रिविध ताप करि भग्न वपू विरहाग्नि तुझा जाळी ।
घाबरा जीव तुजवीण दिसति ह्या शून्य दिशा सकळी ॥
दीप ॥ ग्रासि सुमरी हे मोहममता । बा धांव त्वरें आतां हो ! ।
देवनाथनुत विनितमात तूं तात गुरुनाथा ॥ अजनी० ॥ ४

## पद ( २७ ).

करिं कपिराज सखा । मना , करिं कपिराज सखा ॥ ध्रु० ॥
पदांबुजीं रमवुनियां मानस । त्यागीं अन्यसुखा ॥ मना तूं० ॥ १
नामामृतरस सेवुनि सादर । अन्यरसास न खा ॥ मना तूं० ॥
क्षणिक हें नश्वर इंद्रिय जड सुख । मानीं माम्य विखा. ॥ मना तूं० ॥ २
देवनाथप्रभु चिंतुनि अंतरिं । आकळिं ज्ञानशिखा. ॥ मना तूं० ॥ ४

---

१ दशवदनदर्पहरणा—रावणाचा गर्व हरण करणारा २ अहिमहिअसुरांतका—याबद्दल जास्त माहिती पाहिजे असल्यास याच पुस्तकांतील देवनाथांचें अहिमहिआख्यान वाचावें ३ नामामृतरस सेवुनि सादर अन्य रसासि न खा.—मोरोपंत आपल्या नामरसायनामध्ये म्हणतात.

'सर्वाभिष्ट पदार्थामध्ये तू फार मिष्ट नामरसा !
पामरसाच्युत सांवहि तुज सेविति जेविं भृंग तामरसा ॥
सनकादि बंधु चवघे, नारद, शुक, शंभु मारुती चेले ।
नेले भुलवुनि गेले संसारांतूनि फार वश केले ॥

४ आकळणें=आलिंगिणें, साध्य करून घेणें, अंकक्षीत आणणें. ज्ञानशिखा=ज्ञानज्योत.

## पद ( २८ ).

तें रूप देखियलें नयनीं ॥ ध्रुवपद ॥

जें सुखसागर वानररूप उदार मनोहर वसत वानरसयनीं. ॥ तें० ॥ १

जो कपिवीर महाधिर गंभिर जोडुनियां कर तत्पर राघवचरणीं. ॥तें०॥ २

विध्वंसुनि वन मारित नदनें दचकत आपण रावण अतःकरणीं. ॥तें०॥ ३

देवनाथप्रभु दीनदयाघन अंजनिनंदन अद्भुत ज्याची करणी. ॥ तें० ॥ ४

## पद ( २९ ).

भज मनुजा हनुमान् । कृपाळु, भज मनुजा हनुमान् ॥ ध्रु० ॥

भावें स्मरतां पदकमळातें । रावतसे घरिं ज्ञान. ॥ कृपाळु० ॥ १

पूजनीं अर्चनीं प्रेमें कीर्तनीं । सांडुनियां अभिमानें ॥ कृपाळु० ॥ २

निश्चय हा पदिं दृढतर झालिया । कांहीं नसे तुज वाण. ॥ कृपाळु० ॥ ३

सद्गुणिं कीर्तनिं तन्मयमानस । दे पद मग निर्वाण. ॥ कृपाळु० ॥ ४

आत्मत्वें जग ब्रह्म चराचर । दे दिठि सहज समान ॥ कृपाळु० ॥ ५

देवनाथप्रभु ईक्षणिं सहजें । लाधत अनुभवखाण ॥ कृपाळु० ॥ ६

## पद ( ३० )

मारुतिराया । सांभाळा ब्रीद आपुलें ॥ ध्रु० ॥

काय मती हे वर्णन करी । तुझिया प्रतापाची थोरी ।
जिव्हा जातसे चांचरी । शब्द पैं मौनावले ॥ १

हृदयीं प्रगटावें आतां । हेंची मागणें समर्था ।
वदवीं नामामृतकथा । यावें दयाळुवा गुण वहिलें ॥ २

तुझिया नामाचा प्रबंध । येवो मुखीं लागो छंद ।
तोडुनि माया हो निर्द्वंद्व । मानस पाहिजे केलें ॥ ३

---

१ वानरसयनीं=वानरसेन्यीं २ विध्वंसुनि वन मारित नंदन=मारुतीनें रावणाच्या अशोक वनाचा विध्वस केला व त्याचा मुलगा अक्ष उर्फ अखिया मारिला. ३ निरभिमानपणें श्रवणं कीर्तनं विष्णोः स्मरणं पादसेवन । अर्चनं वंदनं दास्यं सख्यमात्मनिवेदनम् ॥ अशी नवविधा भक्ति करून ४ वेडीवाकडी, अडखळत. ५ वहिलें=तात्काळ, लवकर पद ३४ वरील टीप पहा या शब्दाचे अर्थ अनेक आहेत, पण तीन मुख्य आहेत, त्यावद्दल २३४ पदातील चवथी टीप पहा. ६ अखंड निरंतर ओघ; श्लोकादिकाची रचना; असे दोन्ही अर्थ कै माधवचंद्रोबा यांच्या संस्कृत मराठी कोशांत सांपडतात.

देवनाथ सद्गुरू दाता । त्याविण ठाव नाहीं रिता ।
सुंदर ठेवीं चरणीं माथा । धांउनि पाहिजे आलें ॥ ४

पद ( ३१ ).

पवन तनुज सुखदानी । अरे हा पवनतनुज सुखदानी ॥ ध्रु० ॥
उदधी लघुन भीमपराक्रम साह्यकरी द्रुमपाणी[१] ।
अभयवरदकरें स्पर्शुनि दाखवी ब्रह्मचि हें जनिंवनिं ।
देवनाथप्रभु नाथनिरंजन उघड दिसे लोचनीं ॥

पद ( ३२ ).

तो मज आवडे हो । प्रभुराज हनुमान् ॥ ध्रु० ॥
उदधीसीमा उल्लंघुनि सीमा बळ प्रौढीची
निगमादिक हे नेणति गरिमा ।
माशुद्धि[२] करी, मारुनि अरी, हरि[३] वरी यश,
दावी प्रतापमहिमा ॥ १ ॥
या श्रुतिवर्मा उमजुनियां कीं, हा धृतचर्मांबरधर[४] कीं,
श्रीउमापति रमापतीच्या दास्यधर्मा ।
हर्षें लक्षित नाशित कर्माकर्मविकर्मा ॥ २ ॥

---

१ हातांत वृक्ष ज्याच्या आहे असा. २ माशुद्धि=मातोश्री सीता इचा शोध. शुद्धी करणें=शोध लावणें. ३ वान्नर=मारुती ४ धृतचर्मांबरधर म्हणजे अगावर चामडीखेरीज दुसरें वस्त्र नसणारा, नग्नदिगंबर, मारुती हाच गजचर्मांबर-परिधान करणाऱ्या उमापति रुद्राचा अवतार. हा रमापतीच्या सीतापतीच्या दास्यधर्माला हर्षें लक्षित ( फार आनंदानें करितो, ) आणि तेणेंकरून कर्माकर्म-विकर्मांचा नाश करितो, सर्व प्रकारच्या पूर्वकर्मांचा नाश करून मुक्तस्थितींत राहतो.

# रामपर पदें.

## पद ( ३३ ).

अरे हां रामा ! । कमलापतकामलनामा[1] ॥
करुणाघनमेघश्यामा[2] । सुखधामा आत्मारामा ॥
जय शरभूतीरनिवासा । योगीजनमनविश्रामा ॥ ध्रु० ॥
त्रिभुवनपति परम उदारा । भरताग्रज दशरथकुमरा ॥
ताटिकांतक रघुनाथा ! । मखपालन[3] अहिल्योद्धारा[4] ॥

---

१ पहिल्या ओळींतील 'कमलापत कामलनामा' हा समास सोडवायचा कसा व त्याचा अर्थ कसा लावायचा ? हे कमलापत ! हे कोमलनामा ! असा पाठ असेल काय ? कमलापतका + अमलनामा असा विग्रह केला तर दुसरा ठीक लागतो, पण पहिल्या शब्दाची वाट काय ? पतका=पति असें केलें तर जमतें, पण तसा पतका शब्दाचा उपयोग अन्यत्र पाहण्यांत नाहीं विद्वानांनीं समाधान करावें.

२ करुणाघन मेघश्याम—करुणाघना ! आणि मेघश्यामा किंवा करुणाघन हें मेघश्यामाचें विशेषण मोरोपंतांनीं 'करुणामेघश्याम' असा एक समास योजिला आहे, परंतु त्यापासून अर्थोपत्ति बरोबर होत नाहीं करुणामेघ+श्याम किंवा करुणा+मेघश्याम अशीं पदें पाडावयाचीं, आणि अर्थसंगति कशी लागणार ? हा शब्द 'अहिल्योद्धारां'त आहे.

'विश्वामित्रें आपत्कालें करुणामेघश्याम ।
गौतमजायामरुभूमीप्रति आणियला अभिराम ॥ "
मोरोपंत—अहिल्योद्धार—( साकीबद्ध ) १.

३ मखपालन—विश्वामित्रमखरक्षका ४ अहिल्योद्धारा:—गौतमस्त्री अहिल्या इजकडून नेणतपणें सुरपतीशीं व्यभिचार घडला यास्तव क्रुद्ध होऊन तिला गौतमानें शाप दिला कीं, तूं साठ हजार वर्षें शिळा होऊन रहाशील. तिच्या अनुतापानें करुणाकंपित झालेल्या त्या तपोनिधीनें पुन्हां तिला उःशाप दिला कीं, साठ हजार वर्षें होऊन गेल्यानंतर श्रीकृष्णाच्या पदरजस्पर्शानें

( पुढील पृष्ठ पाहा. )

चाल ॥ जय कार्मुकधरें रघुवीरा ! ।
षड्रिपुत्वर करिं बा ! मारा ।
मज दीना दे पदिं थारा ॥
टीप ॥ जय गुणातिता गुणगहना । हे पावन पतितोद्धारा ॥ अरे० ॥ १
शरणागतवत्सल देवा । जगव्यापक हे जगदीशा ! ॥
अति सत्वर येइ सुखसदया । परमात्मा पूर्णपरेशा ! ॥
चाल ॥ हे भवगजमत्तविनाशा ! ।
हे मायातीत अविनाशा ! ।
सीतापति ! हरिं भवक्लेशा ॥
टीप ॥ नामामृतरस सेविन मी । लागलि हे मम जिव आशा ॥अरे०॥

---

( २१४ पृष्ठावरून समाप्त. )

पुनीत होऊन तुझा उद्धार होईल त्याप्रमाणें विश्वामित्रमखरक्षणानंतर रामानें तिला पुनीत केल्याची कथा सर्वप्रसिद्ध आहे कोणी शंका घेईल कीं, साठ हजार वर्षे शिळारूपानें काढण्याचें अहिल्येच्या नशीबाचें चुकलें नाहीं मग उःशाप तो काय झाला, तर रामचरणपांशुस्पर्शानें तिच्या मूळवासनेचाही लय झाला व ती अक्षय कैवल्याला पात्र झाली. अजाणतेपणें धातुपात्र विटाळलें गेलें तें ऋषिकृत देहदंडानें शुद्ध झालें, पण त्यापासून जी वासनेची व प्रवृत्तीची अधमता प्राप्त झाली व जी त्याच देहाकरवून पुन्हा पुन्हा पापें करविती, तिचें निर्मूळविनाशन परात्पर गुरूच्या पदसान्निध्यानें झालें. म्हणून मोरोपंत म्हणतात, " प्रायश्चित्तें पापें जळती, मूळवासना राहे ।

तेही भस्म करावी हें बळ तुझिया चरणीं आहे ॥ "

मयूरकवि—अहिल्योद्धार.

१ कार्मुकधर·—ज्यानें कार्मुक ( धनुष्य ) हातीं धरल्यामुळें असुरतरूंचें समूळ छेदन झाले असा. ' शरकार्मुकसहमेळें शोधित असुरतरूचीं मुळें हो ' रामदास. ' अभिनवकार्मुकपाणी । निगमगाति पुराणीं ' रामदास.

श्रुति वर्णिति गुणगण गातां। म्हणविशि तूं करुणासिंधु ॥
तरि कां बा! माझी करुणा! तुज येइना दीनबंधु! ॥
चाल ॥ किती कल्पनीक मन रोधूं।
तव पदरज मजला वेधू।
करि श्रवणा निजउद्बोधूं।
टीप ॥ संसार दुस्तर तरवीं। तोडीं हा दुःखसंबंधू ॥ अरे० ॥ २

---

१ म्हणविशि तू करुणासिंधु.—या आपल्या पदवीचें रक्षण कर, कारण भगवद्भक्त तुला ही पदवी देतात, आणि तूही हौसेनें लावून घेतोस.

'पतीतपावन करुणासिंधू या नामासाठीं।
युगायुगीं अवतार धरुनिया तारिसि जगजेठी ॥
अजामिळ ध्रुव वाल्मिक गणिका रिस वानर कोटी।
तारावा हा मुकुंदराज येवढें अवघड काय! ॥' मुकुंदराज

शब्दाला शब्द जोडून समास करावयाचे, व त्यांचीं विशेषणें बनवावयाचीं, असे कुशब्दसृष्टीचे ईश्वर अनेक निर्माण होतात, पण समासित शब्दाची उपयुक्तता यथार्थत्वें दृष्टीस आली म्हणजे कविलाघवाचा पूर्ण प्रत्यय होतो 'करुणाव्याघ्र' 'करुणाशार्दूल' अशीं विशेषणें अप्रयोजक झालीं असतीं, कारण करुणा शांतिदायक असते, आणि तो गुण जलाचा आहे तथापि करुण सरिता, करुणानदी वगैरे शब्दांनीं भगवद्दयासिंधूचें अगाधत्व स्थापित होत नाहीं. कर्मवन्हीनें सदोदित जळत असलेल्या आत्म्याला चिरशांति द्यावयाला अफाट, अगाध आणि अखंड असा जलाशय पाहिजे, म्हणून ईश्वराला करुणासिंधु हाच शब्द सर्वोत्कृष्ट लागतो ही कल्पना रामदासानीं फार सुंदर रीतीनें वर्णिली आहे. 'जळत हृदय माझें जन्म कोट्यानुकोटी
मजवरि करुणेचा गघवा पूर लोटीं
तळमळ निववीं रे राम! कारुण्यसिंधु।
षड्रिपुकुळ माझे तोडिं यांचा समधू ॥

रामदास—करुणाष्टक.

भवाला त्याच्या अमितत्वामुळें भवसागर म्हणतात, तपनत्वामुळें भवताप म्हणतात. हा ताप शमविण्याला करुणासिंधु पाहिजे

२ तव पदरज मजला वेधू—तुझें पदरज माझें मन वेधितें, मोहितें अथवा वेधू म्हणजे लक्ष, ध्यानस्थान, निशाण पहिल्या अर्थी 'वेधु लाविला गोविंदें परमानंदें, आनंदकंदें, वेधू लाविला' या पदांत एकनाथानीं वेधू शब्द योजिला आहे.

जय जय श्रीगुरु गोविंदा[1] । गोपाळा मायबापा ॥
सांगडियां[2] सत्वर येई बा ! । भवनदिमधिं बुडतो तापा[3] ॥
चाल ॥ विश्रांति त्रिभुवनभूपा ।
दासासि तव पद खोपा[4] ।

---

१ श्रीगुरु गोविंदा, गोपाळा मायबापाः—श्रीगोविंदनाथ हे देवनाथांचे गुरु, व गोपाळनाथ हे गोविंदनाथांचे गुरु. देवनाथांचीं जीं गुरुपर पदें आहेत त्यांत गुरूला ईश्वरस्थानीं कल्पून तदनुसार वर्णिलें आहे, व गुरूची ईश्वराशीं आणि परब्रह्माशीं तुलना केली आहे. परंतु विशिष्ट देवतांचें किंवा साधारण परमेश-गुणगणाचें वर्णन करतांना देखील देवनाथ शेवटीं आपल्या गुरूचें नांव आणि-तात. या पदांत रामापासून सुरुवात आहे. संबंध पद राममय आहे, पण शेवटली मोक्षयाचना गुरु गोविंदनाथांना संबोधून केलेली आहे. ह्याच प्रकार देवनाथाच्या व तसेच दयाळनाथाच्याही पदांतून सर्वत्र आढळेल. प्रत्येक कवि हरएक पदांतून आपलें नांव शेवटीं देतोच, आणि बहुतेकजण आपलें व आपल्या गुरूचेंही नांव देतात. यामुळें सारस्वताच्या ऐतिहासिक अध्ययनाला नितांतावश्यक अशी कविपरंपरा आपल्याला माहीत होते; ही पद्धति इतर सारस्वतांत नाहीं. २ सांगडिया—नदीपैलतीरीं वाहून नेण्यासाठीं सांगड चाल-विणाऱ्या. 'गडिया । नदि दूथडिया भरली सद्गुरु करिं सांगडिया ' देवनाथ. ३ भवनदिमधिं बुडतो तापाः—या भवाला आमच्या हिंदू कवींनीं जि-तक्या विविधवर्णनानें आळविलें आहे, इतकीं विशेषणें ईश्वराच्याही वांट्यास येणें कठीण. भवजळ, भवकर्दम, भवपंक, भवगहन, भवकानन, भवनदी व भवसागर व भवडोह आणि तत्सदृश इतर शब्द, भवताप, भवभुजंगम हीं विशे-षणें म्हणजे आमचीं रोजचीं खेळणीं. यांत आम्ही रोज खेळ खेळतों, आणि तीं आमच्या पूर्ण परिचयाचीं, कारण भयानक व्याघ्रसिंहादिकांचीं पिलें त्यांच्यापुढें निःशंक खेळतात, त्याप्रमाण आमचीही नाव भवसागरांत निःशंक चालते. भवडोहालाही आम्ही भीत नाहीं, कारण भवसागरापुढें त्याचा काय पाड ! याना भीत नाहींसें पाहून कांहींजणांनीं भवसागरडोह शब्द योजिला आहे. 'मी पडलो भवसागरडोहीं ॥ कोणकरिल भवपार ?' आनंद तनय. 'बुडलोंरे भवसागरडोहीं । तारि लवलाहीं शरणा ' काव्यसंग्रह ग्रंथ २४ पान ३० — रमण—तनयकृत पद "मी बुडतों भवसागर डोहीं । येऊं दे कांहीं करुणा रे ।" माणीकप्रभूचें पद मी बुडतों भवसागरडोहीं । नेउनि पार अम्हां, मच्छमुनीश्वर. आधींच सागर अगाध, आणि त्यांतही खोल डोह. ४ खोपा—निवास पाखरें आपलीं अंडीं घालण्याकरितां घरकुल तयार करि-तात तें. या दासाला तुझें पद हें खोपा म्हणजे निवांत आश्रयस्थानच आहे.

दाखविं निजनयनीं स्वरूपा ॥
टीप ॥ देवनाथ विनवी भावें । गुरुनाथा हरिं भवतापा ॥ अरे० ॥ ४

## पद ( ३४ ).

मज कां उपेक्षिसि रामा १ । गुणग्रामा मंगळधामा २ ॥ ध्रुवपद ॥
जाणुनियां मी अपराधी । घेतलें मज त्वां पदरीं ॥
अंगिकार केला आतां । लोटावें काय दूरी ? ॥
तुजवांचुनि कोण मातें । सांग बा ३ भवनिधि तारी ॥
येईं सीतारमणा । सोयऱ्या दशवदनारी ४ ॥ मज० ॥ १
पावन हें ब्रीद खरें बा ५ । वेदश्रुति वदनीं गाती ॥
नारिलेसि पतित मागें ६ । ऐकुनिया ऐसी कीर्ति ॥

---

१. अंगिकार केला आतां लोटावें काय बा दूरी='तुज काय म्हणावें आम्ही आणि ' मी बाळ तुझें तान्हये ' या देवनाथांच्या दोन पदांत आणि इतर पुष्कळ कवींच्या काव्यांतून हीच कल्पना आढळते. ' आहें अपराधी मी परि-तूझा, अभिमान तूज माझा,' देवनाथ २ दिलें फिरुनि घेतलें अशि अकीर्ति लोकीं नहो, सुनिर्मळ तुझीं पदें कधिं तरी विलोकीन हो। मोरोपत—केकावली, २ हीनदीन मतिमंद माझी कीर्ति कां केली । लाविसी नेत्र आतां तरी ब्रिदावली गेली। सर्वही जगामाजी दास तूझा म्हणवीलों।सोडीले जरी मज त्वां तरि वाया मी गेलों ॥ दयाळनाथ ४ आहें अपराधी मी परि तुझा ॥ अभिमान तूज माझा देवनाथ. ५ पहिलें दीनाला दावुनि आशा ॥ मज कांजी निराशा ॥ करणें हें योग्य नव्हे जगदीशा ॥ पद्माक्षि विलासा ॥ वणीकर गोविंद महाराज. ६ पतित म्हणोनी आलों शरणागत ॥ अनाथाचा नाथ म्हणती तुम्हां ॥ तें आपुलें ब्रीद सांभाळी अनंता ॥ नको लोटूं परता दास तुझा ॥ भानुदास महाराजाचे करुणा-पर अभंग ७ पायीं दिधला पिंड । आतां दड नाहिंरे रघुराया । आधीं मी अपराधी ।तरि कां केला अंगीकार। अंगिकार केलिया आतां । कायसा विचार। नरहरि कवी ८ जननी हे जाणे बाळकाचें वर्म । सुखदुःखधर्म जें जें कांहीं ॥ अधांतुडें जेणें दिधला आधार । त्याचाही विचार तोची जाणे ॥ शरणागता जेणे घातलें पाठीशी । तो जाणे तेविशीं राखों तया ॥ कासे लागे तया नलगती सायास । पोहोणारा त्यास पाग्यावी ॥ तुका म्हणे जीव विठ्ठलाचे हातीं ॥ दिला त्याची गती तोची जाणे ९ अंगीकारावरी अव्हेराची मात । नोहे हें उचित देवराया ॥ नुपेक्षिसी चित्ती ऐसा हा भरवसा । दिसोनि निराशा झाली आतां ॥ नामदेव. १० अंगिकारिलें आधीं आता लोटितसां वेगळें । दासी होउनि ब्रीद मिरविलें शेवटीं हें कां फळे ? । देवनाथ.

याचक मी आलों द्वारीं । दे दान सीतापति ! ॥
भुवनत्रयपालक रामा । मुनिवृंदें तुजला ध्याती ॥ मज० ॥ २
कौशिकमखसरक्षणीं । वधिलें खर त्रिशिरा दुषणा ॥
लागतांचि पद्पांसू हे । उद्धरली गौतमललना ॥
सुकुमारा राजिवनयना । भक्तवत्सल भवभयहरणा ॥
कोदंडभजना रामा । विश्वेशा सीताजिवना । मज० ॥ ३
पूर्णत्वें सत्य त्रिवाचा । अपराधी होतों पहिले ॥
घेतलेंस जेव्हां पदरीं । तेव्हां कोणातें कळलें ॥
उपेक्षा करणें आतां । अनुचित हें प्रभुला वहिलें ॥

---

१ ऐकुनियां ऐसी कीर्ति याचक मी आलो द्वारीं.—देवाला आळवणारे साधुसंत भगवंताच्या कीर्तीची वाखाणणी करीत, परंतु ही कीर्ति अगदीं लटकी म्हणून विष्णुदास नाम्यानें देवाला खालील अत्यंत प्रेमळ शिव्या दिल्या आहेतः—

'पतितपावन नाम ऐकुनी आलों मी द्वारा
पतितपावन न होसि म्हणुनी जातों माघारा ॥धु०॥
सोडीं देवा ब्रीद आता न होसी अभिमानी
पतितपावन नाम तुजला ठेवियलें कोणी ॥ १ ॥
घेसी तेव्हां देसी ऐसा असशी उदार
काय देवा रोधूं तुमचें कृपणाचें द्वार ॥ २ ॥
उच्छिष्टाचें शीत देवा न टाकिशी बाहेरी
कोणी दिधली भगवल तुजला भूषणाची थोरी ॥ ३ ॥
नामा म्हणे चा तुमचें नलगे मज कांहीं
प्रेम असों या हृदयीं तुमचे आळवीन पायीं ॥ ४ ॥

२ वहिलें'—मोल्स्वर्थमध्यें आहे कीं या शब्दाचें मूळरूप वहिला. हा क्रियाविशेषण व विशेषणार्थी कवितेंत येत असतो 'वहिलें' हेंही रूप कवितेंत येते व याचे तीन अर्थ दिले आहेत (१) वेंगळें, निरनिराळें, तुटक ' झडझडोनि वहिला निघ । माझे भक्तांचिये वाटे लाग " ॥ " जंवकाळ असे दुरी ठेला । तंव तू हरिगुण गाय वहिला " " पायिक तात्काळ बोलाविला । म्हणे हात तोडून टाक वहिला " (२) लवकर, तडकाफडकीनें, तावडतोब (३) खात्रीन, निःसंशय " त्याचा दास मा जाण वहिलें । करीन कंदन लंकेचें " " आठ राक्षस रावणें पाठविले । रामास मारून यावे वहिलें " पुढें कोशकार टीप देतात कीं, या शब्दाचे हे तीन अर्थ खात्रीचे आहेत, पण अनंत अर्थांनीं या शब्दाचा उपयोग कवितेंत केला जातो ज्यानें त्यानें आपापल्या सोईप्रमाणें लावावा. येथें तिसरा अर्थ लागतो. मारुतीच्या पदांत दुसरा अर्थ लागतो. पहिलें—पूर्वी, प्रारंभीं, पहिल्यानें.

दिनबंधु दिनानाथा । पाहिजे अपंगीलें[1] ॥ ४
मदनारिमित्रा रामा । जगजेठी निजजनपाळा ॥
अपराध घालीं पोटीं । देवाजी दीनदयाळा ॥

येऊं दे करुणा हृदयीं । मजलागीं परम कृपाळा ॥
मज दीना नोपक्षावें । दाखवीं निजपदकमळा ॥ मज० ॥ ५
घाबरला जिव हा भारी । सोसवेना दुःख हें आतां ॥
धांव घे सत्वर सखया । अयोध्यापति रघुनाथा ॥
बुडतों मी भवनदिमाजी । कर देउनि काढीं नाथा ॥
गणगोत सकळही माझे । तूंचि कीं मातापिता ॥ मज० ॥ ६
श्रीगुरु गोविंदा रामा । जय जय जी कार्मुकपाणी ॥
पाऊल दाखवीं आतां । करुणारव ऐकें श्रवणीं ॥
करिं क्षमा अपराधाची । निष्ठुरता न धरीं स्वमनीं ॥
देवनाथ विनवी भावें । ठाव दे अक्षय चरणीं ॥ मज० ॥ ७

## पद ( ३५ ).

श्रीरामा[?] रावणारी । अघभयसंकट वारीं ।
श्रीरघुनंदन अरिकंदन जय शरयूतीरविहारी ॥ ध्रुवपद ॥
कामदुघा तूं निजजनवत्सा पाळिसि अतिसुखकारी ।
सत्स्वरुपामृत चाखविसी रस निवडुनि सर्व विकारी ॥श्रीरामा०॥१
जपत नाम त्या मृगजळवत जग भासत सर्वप्रकारीं ।
सतत वसति हृदयांत जि ज्याच्या वदत श्रुति अविकारी ॥श्री०॥२
मुनिजनहंसा . हिंसा ध्यात तुतें त्रिपुरारी ।
शमन करुनि विषें भूषण कंठीं शोभवि अंग विखारीं॥श्रीरामा०॥३

---

१ अपंगिलें—जवळ केलें. (दुसरा अर्थ विकलांग असणें) दोन्ही मोल्स्वर्थच्या कोशांत सांपडनात कोदंडभजना—सीतास्वयंवराच्या प्रसंगीं शिवधनुष्यभंग करणाऱ्या श्रीरामा ! २. शमन करुनि विष—त्रिपुरारि पदाशीं या सर्व पदांचा संबंध लावावयाचा. त्रिपुरारी विष शमन करुनि कंठीं भूषण शोभवी विखारीं अंग शोभवी चतुर्दश रत्नांपैकीं हालाहल हें शंकराच्या वांट्यास आलें तें त्यानें प्राशन केलें असतां सर्वांगाची आग व्हावयाला लागली म्हणून शिरीं गंगा, ललाटीं चंद्र आणि अंगावर विखार म्हणजे साप धारण केले तरी दाह शांत होईना, तो शंकरानें रामनामाचा जप करावयाला लागल्याबरोबर शांत झाला. कंठीं विष धरिलें त्यानें गळा निळा पडला, म्हणून शिवाला नीलकंठ हें नांव मिळालें.

श्रीगुरु गोविंदा श्रीरामा । शरणागतकी द्वारीं ।
देवनाथप्रभु उदार दात्या याचक मीच भिकारी ॥ श्रीरामा० ॥ ४

पद ( ३६ ).

तूं जप रे जप रे जप रे श्रीरामनाममंत्र ।
गोष्पदवत भव मग सहजें तारक पूर्ण पवित्र ॥ ध्रुवपद ॥

---

१ देवनाथप्रभु उदारदात्या! याचक मीच भिकारी–यांत देवनाथप्रभ! उदारदात्या! हीं संबोधनें आहेत हे उदार दात्या देवनाथप्रभ! मीच याचक भिकारी आहें 'देवनाथप्रभु उदारदाता याचक मीच भिकारी' अशा पाठाचा अर्थ 'देवनाथाचा प्रभु उदारदाता आहे पण मीच अभागी भिकारी याचक आहें' भिकारी=दैवहीन, प्रारब्धाचा करटा, देवासारखा उदारदाता असूनही कर्मरेषा आडवी आल्यामुळें ज्याला काहींच लभ्यांश होत नाहीं असा. प्रभु हा खरोखरच अत उदार असल्यामुळें निष्फलयाचकत्व हें भणगपणाचें लक्षण ईश्वराच्या अद्भुत औदार्याबद्दल अनंततनय म्हणतातः—

' ऐकाहो ! अद्भुत देणें त्या एका भगवंताचे ॥ धृ० ॥
नेणें पूजा नेणे सेवा ॥ शरणागत मी आलों देवा
म्हणतां देउनियां निजठेवा ॥ दिधलें स्थाल सोन्याचें ॥ १ ॥
केवळ मुग्धाचीये धाटी । आली घेतां दुग्धासाठीं
दिधली क्षीराब्धीची वाटी । बाळक धालें विप्राचें ॥ २ ॥
उंचीं वैसायाच्या काजा । निघतां विपिना गाजावाजा
केला अढळपदींचा राजा । निरखी अर्जुनी जनसाचें ॥ ३ ॥
भेटी नेले पोहे मुष्टी । तेणें देवा झाली तुष्टी
आली सौभाग्यासी पुष्टी । झालें कल्याण दुबळ्याचें ॥ ४ ॥
बोले आनंदाचा बाळ । होती मक्याचे वाचाळ
पांगुळे लंघिति पर्वतमाळ । होईल पियूष विखाचें ॥ ५ ॥

२ गोष्पदवत् भव मग सहजें तारक हा पूर्ण पवित्र–मग सहजें भव गोष्पदवत् हा ( रामनाम मंत्र ) पूर्ण तारक पवित्र असा अन्वय रामनाममंत्रोच्चार करीत राहिल्यानें हा भवसागर गोष्पदाएवढा म्हणजे पावसाळ्यांत चिखलांत गाईचा खूर उमटला म्हणजे जें लहानसें पाण्याचें डबकें होतें त्यासारखा भवसागर अगदीं सोपा व उल्लंघनीय होईल ही कल्पना इतरत्रही सापडते. " मुक्तेश्वराचा श्रीगुरु ॥ दत्तात्रय परब्रह्म अवतारू ॥ स्मरतां झाला भवसागरू ॥ गोष्पदप्राय सद्रूकां " मुक्तेश्वरकृत हनुमताख्यान गोष्पद शब्द अतिऱ्हास ' या अर्थी योजिला जातो " कुजलतेला महाल मानुनि रमलों ग

( पुढील पृष्ठ पाहा. )

पातकि हा दुर्धर मोठा तारिला नाम घेतां ।
वाल्याचा वाल्मिक केला गुरुतर हे प्रभुची सत्ता ।

---

( २२१ पृष्ठावरून समाप्त )

आम्ही मुली ॥ गोष्पद समजुनि दिनांत शतदां यमुना ओलांडिली " रामजोशी. भवसागर हा गोष्पदवत् तरून जावा ही कल्पना संस्कृत भागवतांतून महाराष्ट्र कवींनी घेतली असावी कारण भागवतांतील दशमस्कंधांतील तिसऱ्या अध्यायांतील ३० व्या श्लोकांत आहे ॥ त्वय्यंबुजाक्षाखिल सत्वधाम्नि । समाधिनावेशित चेतसैके ॥ त्वत्पादपोतेन महत्कृतेन । कुर्वंति गोवत्सपदं भवाब्धिम् ॥

१ वाल्याचा वाल्मिकी झाला गुरुतर हे प्रभुची सत्ताः–प्रभूची सत्ता एवढी मोठी कीं, वाटपाड्या वाल्या डाकूचा आद्यकवि वाल्मिकि झाला रंकाचा राव करणाऱ्या या जगन्नियंत्याच्या कर्तुमकर्तुमन्यथाकर्तुं शक्तीचें खालील वामनपंडितानीं केलेलें वर्णन फार बहारीचें झालें आहेः—

पाहे पां द्रुपदी सती गुणवती दुर्योधनें गांजिली;
कीं जे नग्न म्हणोनि भग्न मतिनें बुद्धी कुडी योजिली ।
तेव्हां चित्रविचित्र देऊनि चिरा केली कशी माव रे
इच्छा मात्र धरी हरी तरि करी रंकास कीं रावरे ॥ २९ ॥
झाला राजसुयज्ञ धर्मसदनीं, तेव्हां कशी आवडी
उच्छिष्टें चतुरांकरीं चतुर तो दीनापरी सावडी ।
ऐसे पांडव वाढवी निज दये पाहूनि सद्भावरे
इच्छा मात्र धरी हरी तरि करी रंकास कीं रावरे ॥ ३० ॥
जो योगी हृदयारविंदतरणी, जो कारणीभूत या.
विश्वाला, ग्मला मनांतुनि जपे चिन्मूर्ति शंभू तया ।
तो कैसा गवळ्या घरीं हरि भला दावी शिशू भावरे
इच्छा मात्र धरी हरी तरि करी रंकास कीं रावरे ॥ ३१ ॥
ऐश्वर्ये जगतींत जे मुखरणी क्षिराब्धिची कन्यका
नाहीं योग्य हरी पदाब्ज धरण्या चिद्रूपिची धन्यका ।
तो गोपीलुगडीं घडी करुनि घे मानोनि उत्सावरे
इच्छा मात्र धरी हरी तरि करी रंकास कीं रावरे ॥ ३२ ॥
लंकेचा अधडा प्रताप निधडा होता दहा तुडरे
केला ख्स्त पलिस्त त्या कपिरिसें गाजोनियां लढरे ।
पाषाणा तरवी चमू उतरवी दे दुंदुभी धावरे
इच्छा मात्र धरी हरी तरि करी रंकास कीं रावरे ॥ ३३ ॥
कुब्जा अब्जमुखी सखी करुनियां उद्धारिली साच कीं;

( पुढील पृष्ठ पाहा )

शतकोटी रामायण हें वदवीला अज्ञुन गाथा ।
शरयूतिरवासी ज्याचा ध्यास हा पार्वतिकांतों ॥ तूं जप रे० ॥ १
उत्तानपाद ध्रुवबाळ स्मरतां दे अढळ पदातें ।
क्षीरसिंधू दे उपमन्या निज सत्य हरी आपदा ते ।
वाहतांचि भगिनी भावें चिर पुरउनि दे अभयातें ।
माहाकारी निजदासाचा भक्तवत्सल हरी भयातें ॥ तू जप रे०॥ २
नारायणपुत्रमिषें तो पातकी द्विज उद्धरिला ।

---

( २२२ पृष्ठावरून समाप्त. )

सांगो काय किती असा यदुपति दावी तमासाच कीं ।
हस्ती नक्र पशू तया शिशु ध्रुवा दीला कसा ठावरे
इच्छा मात्र धरी हरी तरि करी रकास कीं रावरे ॥ ३४ ॥
वामन पंडित—विराटपर्व अ० ५ श्लोक २९—३४

१ ध्यास हा पार्वतीकांता—इतका कीं खुद्द पार्वती जरी श्रीरामचंद्राविरुद्ध बोलली तरी तें शिवाला खपत नसे:—

म्हणे पार्वती श्रीहरी देवमूर्ती । जयाचें करा सर्वदा ध्यान चित्तीं ॥
करी शोक तो वल्लभेलागीं रानीं । पिनाकी म्हणे 'ना वदें पापवाणी' ॥
मुक्तेश्वर—रामायण–अरण्यकांड श्लो १०७

२ वाहतांचि भगिनी भावें:—द्रौपदीनें भक्तीनें आळवितांच तिला विवस्त्रतेच्या काळिमेपासून बचावलें आपल्या भावभक्तीबद्दल द्रौपदी म्हणते "माझा भाव आणि भक्ति । तेचि जमदग्नी रेणुका सती ॥ कुशब्द शस्त्रीं कौरवदैत्यीं ॥ सन्यासिली अवनिये ॥१४२॥ ते निवटुनि धराभारा । फेडी भार्गव परशुधरा ॥ द्रौपदी सती वसुंधरा ॥ पांडव द्विजां अर्पी कां ॥ १४३.
मुक्तेश्वर–सभापर्व अ १५

३ नारायणपुत्रमिषें.—अजामिळ हा जातीचा कनोजा ब्राह्मण हा एका शूद्र स्त्रीवर अनुरक्त झाला आणि तिच्या पोटच्या पुत्राचें नांव त्यानें नारायण ठेविलें या नाराणाचा त्याला रात्रंदिवस ध्यास लागला होता, कारण त्या लावण्यवती शूद्र स्त्रीपासून झालेल्या एकंदर दहा मुलांपैकी हा सर्वांत कनिष्ठ होता अंतकाळीं त्याला यमदूत न्यावयाला आले तेव्हां अपत्यस्नेहानें त्यानें 'नारायणा ये' अशी त्या मुलाला हांक मारली त्याबरोबर विष्णुदूतांनी येऊन त्याला यमकिंकरांपासून वांचविलें. तेव्हां याची पश्चात्तापानें

( पुढील पृष्ठ पाहा. )

पढवितां शुका बोलें[1] तारिली गणिका कुशीला ।
शीला[2] हे पादरजें कीं सुंदरी केली दुशीला ।

---

( २२३ पृष्ठावरून समाप्त. )

चित्तशुद्धि होऊन त्यानें पुन्हां कांहीं दिवस भूलोकावर तपश्चर्या केली आणि तो अंतीं सायुज्यपदास जाता झाला. देवाला न बोलवतां तन्नामसदृश स्वपुत्राला बोलावले तरी तेवढ्यानेंही मोक्ष मिळाला, मग जाणतेपणें जे आपलें आयुष्य भगवन्नामस्मरणात वेंचतील त्यांना अवश्य उत्तम लोक मिळणारच हा भाव. यावर वामन पंडित आपल्या नाम सुधेमध्यें अजामिळकथेच्या समर्थनार्थ म्हणतातः--

' जसजसा अतिसादर कीर्तनीं तसितशी हरिभक्ति फुगे मनीं ॥
परि पुरातन पातक तों नुरे मलतसे हरिनाम वदो पुरे ॥
न कळत कळतां घे उत्तम श्लोक नामें सहज निजगुणें ही नासती पापधामें॥
न कळत कळतांही घालिती अग्नि जेथें करि सहज गुणें तो भस्म जाळूनि तेथें॥

१ पढवितां शुका बोले'—'पढवितां पुंसा बोलें' हा छापील पाठ अर्थबोधक दिसत नाहीं. मिथिलापुरींतील पिंगळा वेश्येनें आपल्या पाळीव पोपटाचें नाव राघोबा ठेवले होतें. त्याशीं करमणूक करितांना हें संकेतनाम वारंवार तिच्या तोंडी येत असे. ' बा रे रामा । राघवा । बोल रामा । जेवीं रामा ! पिंजरा बैस रामा। खळं रामा, वेळ कंठे न रामा । ऐशी रामा ते वदे रामनामा । मरणसमयीं ' कंठीं प्राण सत्राण ' आले असतांनाही तिनें पोपटाला ' रामा राघोबा ' अशा हांका मारल्या, त्यानें ती उद्धरली म्हणून आनंदतनय आपल्या गणिकोद्धारांत म्हणतात ' संकेतनाम पढतां चढली पदासी ॥ भोगी अपाप निजनायक रूपदासी ॥ भावें जपे तरि तया न जगांत जोडी ॥ आनंदनंदन सुसंभ्रम हात जोडी ॥' मुक्तेश्वर या गणिकेबद्दल म्हणतात "पक्षियातें तुझें नाम॥ ठेऊनि कुंटिणी स्मरे राम ॥ तिये लागीं वैकुंठधाम ॥ वस्तीस तुवां दीधलें ॥ ' मोरोपंत म्हणतात " अभिधान शुकासि तुझें पढवुनिया मोक्ष पिंगला लाहे " नाम हें पतिप्राप्तीप्रमाणें ईश्वरप्राप्ति सुखद करवितें असें केकावलींत आहे:-- "हरि व्यसन पाप हें बहु कशास कायाधवा ॥ परि त्वरित भेटवी तुजही योगमायाधवा.' २ शीलाः—प्रस्तर शिळा, पाषाण. कुशीला--भ्रष्टशीला गणिका. दुशीला-मूळची शीलवान् परंतु इंद्रदुराचारामुळें नंतर शीलभ्रष्ट झालेली अहिल्या.

पशुपति घे नाम वाचे[1] गरदाह समुळ शमविला ॥ तू जप रे० ॥ ३
गोविंद श्रीगुरुदाता स्मरतां दे निजपद हातीं ।
शुक वामदेव ऋषि नारद[2] सनकादिक ज्याला गाती ।
जगदात्मा व्यापक ज्याच्या ह्रदिं असतां नयनीं पाहती ।
देवनाथ तन्मय ध्यानीं रमरम ह्या वृत्ति राहती ॥ तू जप रे० ॥ ४

---

१ पशुपति घे नाम वाचे—चतुर्दश रत्नांपैकीं हलाहलाचा शंकरानें कंठीं स्वीकार केल्यामुळें सर्वांगाचा दाह झाला तो शशि, गंगा आणि सर्प यांच्या धारणानें शमला नाहीं. मग शंकरानीं सारखें रामनाम स्मरण केलें तेव्हां तो दाह शमन झाला. २ नारद—भागवतामध्यें नारदांनीं आपलें जन्मवृत्त व्यासांना सांगितलें त्यावरून त्याचेबद्दलची माहिती येणेंप्रमाणें:—

हे पहिल्या जन्मांत एका दासीचे पुत्र होते व ती दासी कोणी वेदवित् साधूच्या पदरी रहात होती. ते साधु इतर ऋतुमध्यें बाहेर प्रवास करीत असत व वर्षाकाळांत एकत्र जमत. ते वेळीं नारद लहान बालक होते, त्यांची वृत्ति बालपणींच फार शांत होती. त्यांचें लक्ष खेळण्याकडे नसे, ते त्या साधूंची नित्य सेवा करून त्यांच्या मताप्रमाणें वागत. नारदाची अशी वृत्ति त्या साधुजनांनीं पाहून त्यांनीं नारदाला आपलें उच्छिष्ट खाण्यास परवानगी दिली. त्यामुळें नारदाचें पातक सर्व भस्म झालें व त्याचें मन शुद्ध झालें. अशा रीतीनें नारद त्या साधूंची सेवा करीत असतां ते प्रत्येक दिवशीं श्रीकृष्णांच्या कथांचें कीर्तन करीत असत, तें त्यांना एकण्यास सांपडे व त्यामुळें नारदांची श्रीकृष्णाचेठायीं भक्ति लागून त्यांचें मन स्थिर झालें व त्यांचे हातून अखंड उपासना होऊं लागली. चातुर्मास्यानंतर त्या साधूंनीं बाहेर जातेवेळीं भगवतानीं सांगितलेल्या व अतिशय गुह्य असलेल्या ज्ञानाचा नारदास उपदेश केला. त्यामुळें त्यांना मायेचें सामर्थ्य कळून येऊन ब्रह्मज्ञान पूर्णपणें प्राप्त झालें. नंतर नारदांची आई एका ब्राह्मणाचे घरीं दासीचें काम करूं लागली. तेथेंच ते आपल्या आईबरोबर राहूं लागले. आई सर्पदंश होऊन लवकरच मरण पावली, ते वेळीं नारदमुनि पांच वर्षांचे होते. आई मरण पावल्यानंतर नारद देशपर्यटण करूं लागले. एके दिवशीं अरण्यांतून हिंडत असतां ते फार थकून गेले तेव्हां त्यांनीं एका नदीचे डोहांत स्नान करून संध्यादि कर्मे आटोपून जलप्राशन केलें व एका पिंपळाच्या झाडाखालीं बसले व साधुजनांनीं सांगितल्याप्रमाणें भगवंताचें ध्यान करूं लागले. तेव्हां हळू हळू श्रीहरीची मूर्ति त्यांच्या हृदयांत प्रगट झाली. श्रीहरीचे मूर्तीचें दर्शन झाल्याबरोबर ते आनंदसागरांत बुडून गेले; व त्यांना दुसरें कांहीं दिसेनासें झालें. तितक्यांत

( पुढील पृष्ठ पाहा. )

## पद ( ३७ )

श्रीराम जयराम जय जय राम वदा वाचे ।
तराल भवपुरीं सार्थक होईल जन्माचें ॥ ध्रु० ॥
फिरुनियां मागुती न ये कदापी ऐसी नरकाया ।
विसरुनियां श्रीरामा कां हा जातां नरका या ॥ श्रीराम० ॥१॥
गाती मुनिजन ध्याती नारदतुंबर गुणगणीं । ॥

---

( २२५ पृष्ठावरून समाप्त )

तें श्रीहरीचें रूप एकाएकीं त्याच्या हृदयांतून नाहींसे झालें ते स्वरूप पुन्हां पाहण्याची नारदांनी पुष्कळ खटपट केली, परंतु त्याना तें दिसलें नाही तेव्हां ते वेळीं श्रीहरीनें आकाशवाणीनें सांगितलें ' तुला ह्या जन्मीं पुन्हां दर्शन होणार नाही एकदां जें दर्शन दिलें तें केवळ ईश्वरदर्शनाची उत्कंठा लागावी या हेतूनें दिलें व ईश्वराची भक्ति सतत कर म्हणजे पुढचे जन्मीं तू ब्रह्मपुत्र नारद होशील व माझ्या कृपेनें पूर्व जन्माची स्मृति नष्ट होणार नाहीं ' नंतर नारदांचा देह गळून पडला व ते मुक्त झाले. मुक्त झाल्यानंतर कल्पांताच्या समयीं ह्या उत्पन्न केलेल्या सकळ सृष्टीचा प्रलय करून क्षीरसमुद्राच्या जलामध्यें भगवतानीं शयन केलें असतां व ब्रह्मदेव शयन करण्याचे बेतांत असतां ब्रह्मदेवाचे श्वासाबरोबर नारदांनीं ब्रह्मदेवाचे पोटांत प्रवेश केला पुढें ब्रह्मदेव सृष्टि उत्पन्न करूं लागले, तेव्हां त्यांच्या प्राणापासून जन्मास आले; व पृथ्वीवर पर्यटन करूं लागले श्रीमहाविष्णूचे अनुग्रहानें त्यांच्या गतीला कोठेंही प्रतिबंध नाहीं

१ भवपुरीं—भवनदीच्या पुरामधून २ फिरुनियां मागुती कदापि नये ऐशी नरकायाः—कारण लक्ष चौऱ्यायशीं योनी भ्रमण करतांना मनुष्यजन्म फार विरळा येतो 'पुष्पफळ औषधी जीवन । त्याचेनि सर्गे गर्भस्थान । पावोनियां हीनाहीन । देह धरिती प्रारब्धें ॥ ५८ ॥ द्विपदें चतुष्पदें षट्पदें । ऐशीं शरीरें अनेकविधें । धरोनि कर्म भोगिती अब्दें । मनुष्यांचीं असंख्य ॥५९॥ दुःखभोगाचे पर्वत । सोसितां जन्म असंख्यात । पुण्ययोगें अकस्मात । मनुष्यदेह पावती ॥ ६० ॥ मनोगुण इंद्रियां चेवविती । इंद्रियें विषयांतें शोधिती । विषयलाभालाभ देती । लोभा आणि शोकातें ॥ ६५ ॥ तींच जन्मांतराचीं बीजें । हें वर्म कोणा नेणवे सहजें । शरीरसुखाचेनि ओझें । सत्य संसार भाविला ॥ ६६ ॥ पुण्याधिक्यें स्वर्गगमन । पापाधिक्यें अधःपतन । पापपुण्य समसमान । तैं नरदेह पाविजे ॥ ६९ ॥ मुक्तेश्वर—आदिपर्व—अ० २०

वर्णितां महिमा ज्याचा शिणली वेदाची वाणी ॥ श्रीराम० ॥२॥
नाम घेतां तरले पापी अजामिळ गणिका ।
राम राम राम दोन्हीं अक्षरें घोका ॥ श्रीराम० ॥ ३ ॥
भजा भक्तिभावें निश्चय ठेवुनिया पायीं ।

---

१ वर्णितां महिमा—' वर्णिती महिमा ' या पाठापेक्षां हा खरा

२ शिणली वेदाची वाणी—सुरजी अजनगांवाहून श्रीमंत दाजीसाहेब देशपांडे लिहितात की, तेथील घोषसांप्रदाय ' शिणली कुंठित, वाणी ' असा नसून ' शिणली वेदाची वाणी ' असा आहे

३ दोन्ही अक्षरें घोकाः—अजामिळ व पिंगळा ही केवळ संकेतदर्शक नामोच्चरणानेंच तरली, वाल्मीकि हा उलट्या उच्चारानें मुक्तिपद पावला. ईश-स्वरूपाची कल्पना न होतां केवळ अक्षरोच्चारांत कार्यसिद्धि आहे, अशा शंका तुरांना ज्ञानी पुरुषांनीं आपापल्यापरी उत्तरे दिलीं आहेतच, पण कबीरमहाराज सर्वांच्या पुढें जातात आणि रामापेक्षां नामच श्रेष्ठ असें प्रतिपादितात.

" नाम रामसे जादा भाई । नाम रामसे जादा ।
सागर ऊपर फत्तर तारे रघुविर पावे खेदा ।
वाला था सो वाल्मिक हुवा भेट भई नारदा । १ ।
मारा मारा येही मंतर उनके अतर भेदा ।
उलटा ज्याके सुलटा हुवा तरुवर फत्तर भेदा । २ ।
रामनामकी धूम उठी जब जंगल हुवा मक्का ।
जो जानेसो पद पावेगा नहीं कालका धोका । ३ ।
नाम लिया जद राम मिलेगा जम ही हुवा राजी
कहत कबीरा सुन भाई साधो वैकुंठ नौबत बाजी । ४ ।

४ ' भक्तिभावें निश्चया ठेवुनियां पायीं '—मुख्य भक्तिभावाच्या निश्चयाचें बळ पाहिजे ज्ञान, वैराग्य वगैरे मोक्षदायक गुण अंगीं बाणले पाहिजेत. च, पण सर्वांना आधारभूत अशी संशयरहित निश्चयदृढ भक्ति पाहिजे. आचार, विद्या, वय, जात, रूप, धन इत्यादिकांची शिफारस भक्तीपुढें लटकी पुन्हां कबीर पहा—

' सुन सुन साधोजी । राजाराम कहोजी ।
भावभक्तिका भूका साई जोगजुगत नहि पावे
भगत भूल गये गम दिवाने निजपद वांको देवे ॥ १ ॥
व्याधका आचार क्याथा ध्रुवकी उम्मर थोडी
गजेंद्र कहा विद्या पढाथा जात विदुरकी कडी ॥ २ ॥

( पुढील पृष्ठ पहा. )

देवनाथ प्रभु दाता स्मरतां भवभय मग नाहीं ॥ श्रीराम० ॥४॥

पद ( ३८ )

कणवाळा दयाळा रामा ! ॥ ध्रु० ॥
जयजय सीतामनोभिरामा । श्रीरघुपति सार्वभौमा ! ॥
न कळे वेदांसि तुझा महिमा ॥ कण० ॥ १ ॥
किति तरी दुःख सोसावें । सांग आम्हीं शरण कुणा जावें ॥
विनवितों तुझ्या पायीं भावें ॥ कण० ॥ २ ॥
झाला जीव बहुत घाबरा । कांहीं सुचेना अंतरा ।
तारीं निजाचिया माहेरा ॥ कण० ॥ ३ ॥
कोठें गुतलासि नेणवे । किति म्हणोनी तुज बाहावें ?
खगवहनीं बैसुन यावें ॥ कण० ॥ ४ ॥
जयजय गोविंदा ! गुरुवरा ! । जगव्यापक विश्वंभरा ।
देवनाथप्रभु दातारा ॥ कण० ॥ ५ ॥

---

( २२७ पृष्ठावरून समाप्त )

क्या मरदुमा उग्रसेनकी सूरत क्या कुब्जेकी ।
धनभारीसे राम मिलत बात जाने सुदामजीकी ॥ ३ ॥
कहत कबीरा सुन भाई साधो राम मिलत है भक्ती ।
जतर मतर लपट हुवे, रामभजनसे मुक्ती ॥ ४ ॥

१ स्मरतां भवभय मग नाहीं—असा सुरजीअंजनगांवमठाचा व रा. रघुपतराव देशपांडे यांच्या येथील पाठ आहे. प्रभुसारखा दाता अनन्य व दुर्लभ; याचक भिकारी वृत्तीचा असला तर मात्र याचना निष्फळ होते असा भाव. २ अंतरा=चित्ता, अंतःकरणा. ३ निजाचिया माहेरा=परब्रह्माच्या माहेरघरा. निज शब्द वेदांतात ब्रह्म या अर्थी मराठी कवी योजितात. ४ खगवहन=गरुडरूप वाहनावर—खगवहना बसून यावें असें म्हणण्याचें कारण, देवानें अतित्वरेनें यावें अशी प्रार्थना केली आहे. मुक्तेश्वर कवि देवाच्या वेगाबद्दल सभापर्वांत लिहितातः—मन पवन गरुड तिघे । सत्वर करती पाठिलाग । तरी नाटोपे श्रीरंग । टाकोटाकीं जातसे ॥ १८७ ॥ ऐसिये लांतडी धांविन्नला । द्रौपदीपाठीं उभा ठेला । कीं हृदयींच प्रगटला । पाठिराखा कैवारी ॥ १८८ ॥ मुक्तेश्वर सभापर्व अ० १५

## पद ( ३९ )

राम न कां स्मरसी ? । मना ' तूं ॥ ध्रु० ॥

लक्षुनि जेविं मृगांबुसि तो मृग धांवत ते रिति तूंहि तसा करिसी ॥रा०॥
कामकलाप हे पापें यथार्थ; प्रलापमुखें भवतापत्रया वरिसी ॥राम०॥ २
सार त्यजोनि, असारें कसे सुतदारधनादिक फार हृदीं धरिसी ॥ राम० ॥
देवनाथप्रभुच्या स्मरणाविण दुस्तर जीवनसागर कसा तरसी ॥ राम० ॥ ४

## पद ( ४० )

येईं सीतापति ' रामा ' शरयुतटवासिया ' ॥ ध्रु० ॥

सुंदर आनन कुंदरदा । मनमोहन मेघश्यामा ' ॥ येईं० ॥ १ ॥
गाती श्रुतिनिगमादिक शेषही । नेणे तव गुणमाहिमा ॥ येईं० ॥ २ ॥
पादरजें सती गौतमऋषिवधूं । उद्धरिं सुखधामा ॥ येईं० ॥ ३ ॥
देवनाथप्रभु नाथा । चराचरीं व्यापक आत्मारामा ॥ येईं० ॥ ४ ॥

## पद ( ४१ ).

जरि तुम्ही राम न गाल । तरी मग होईल कसा हाल ॥ ध्रु० ॥
कन्या सुत दारा धन दुर्धर । ही मोहमदिरा प्याल ॥ १ ॥
विषयविलासें हें मन रमतां । फुगविल कीं यम गाल ॥ २ ॥
न भजोनि ब्राह्मण साधु संता । धनलोभेंच भुलाल ॥ ३ ॥
देवनाथप्रभु नाथ गोविंदजी । भावें पद न वराल ॥ ४ ॥

## पद ( ४२ )

रामकृष्ण राम राम ॥ ध्रु० ॥

गोवर्धनधर गोपीवर हरी । कालयमर्दन ये कंसारी ।
येईं बापा धांव मुरारी ॥ १ ॥

---

१ कामकलाप (विषयसमूह) हे यथार्थ (खरोखर) पाप=पापप्रद अधोगतील नणार आहेत २ प्रलापमुखें=मुखानें प्रलाप करून ( ? ) या ओळीचा याहून चांगला अर्थ कोणी सुचवावा ३ सामर्थ्यपूर्ण तत्व, ईश्वरचरणांसारखें ४ नाशवंत, अशाश्वत ५ भवसागर. ६ कुंदरदा—कुंद म्हणजे कुंद पुष्प. रद= दांत कुंद पुष्पासारिखे दांत ज्याचे आहेत तो. ७ गौतमऋषिवधू=अहल्या. ८ चराचरिं=स्थावर जगमाचे ठायीं 'जलचर स्थलचर व्यापुनि तो जगदात्मा दशांगुळें उरला '—मोरोपंत

करुणासागर ह्मा श्रुति वाणी । गाती महिमा शास्त्रपुराणीं ।
ना ऐकसी कां करुणा कानीं ॥ २ ॥
कर्ममोचना[1] कमनीय गात्रा[2] । कमललोचना पशुपतिमित्रा ।
येवा येवा राजीवनेत्रा ॥ ३ ॥
योगीमुनिजनमनमांदारा[3] । ये गोविंदा परम उदारा ।
देवनाथप्रभु जगदोद्धारा । रामकृष्ण राम राम ॥ ३ ॥

## पद ( ४३ )

कमलनयन रामा धांवरे बा ॥ ध्रु० ॥
दुःखित मी बहुत जालों रघुपति । स्मरतां संकटीं धांवरे बा ॥ १ ॥
श्रीशरयुतटवासा रामा । पावन हें तव नांव रे बा ॥ २ ॥
देवनाथ स्मरतो भावें । सदय बहुत गुरुराय रे बा ॥ ३ ॥

## पद ( ४४ ).

राम जनीं या विजनीं । श्रीराम रगीं रगलें आई ॥ ध्रु० ॥
राम ध्यानीं राम मनीं । राम आसनीं शयनीं ।
भरला अतरबाहीं ॥ १ ॥
राम जिवींचें जीवन । राम कैवल्याची खाण ।
राम मनाचें मोहन । सर्वांतरात्मा पाहीं ॥ २ ॥
राम सोयरा निजाचा । राम विसांवा जिवाचा ।
राम चालक या देहाचा । सर्वही सुख त्यापाईं ॥ ३ ॥
देवनाथ सद्गुरु दाता । ठेवी अभय वरद कर माथा ।
रामीं केली संलग्नता । सुंदर लाविला सोई ॥ ४ ॥ श्रीराम० ॥

## पद ( ४५ ).

पाहसी अजुनि काय रामा ॥ ध्रु० ॥
आप्त सखा गण गोत तूं । होसी बाप आणि माय ॥ १ ॥
पावन हे बिरुदावळी साची । दाखवि दे पदीं ठाय ॥ २ ॥

---

१ अशेष कर्मबीज–भजना २ कमनीय–सुंदर गात्रें–अवयव ज्याचे असा. ३ मांदार = पाच देवतरूपैकीं एक. " पचैते देवतरवो मांदार, पारिजातकः । सतान, कल्पवृक्षश्च पुंसि वा हरिचंदनम् " कल्पतरु म्हणावयाचें तशासारखाच हा मांदार शब्दाचा उपयोग केलेला दिसतो

घाबरली मम वृत्ति दयाघन । म्हणुनि तुजला बाहाय ॥ ३ ॥
अविलंबें ये बाहतसें तुज । करुणा मोकलीं धाय ॥ ४ ॥
देवनाथ प्रभु गुरु गोविंदा । घालिं उडी हो साह्य ॥ ५ ॥

पद ( ४६ )

अरे श्रीरामा । निगमागम तुझा नेणती महिमा ॥ धृ० ॥
राजिवलोचन भवभयमोचन ब्रह्मसनातन पावननामा ॥ १ ॥
मुनिमखरक्षण अहिल्योद्धारण । दिनजनप्रतिपालन हे सुखधामा ॥ २ ॥
देवनाथप्रभु गुरु गोविंदा । वर्णित गुणगण श्रुति परि न कळे सीमा ॥ ३ ॥

पद ( ४७ )

राघोबा श्रीरामा दाशरथे हो राघोबा ॥ धृ० ॥
ताटिकामर्दन अहिल्योद्धारण । मुनिमखपालन हे सुखधामा हो ॥ १ ॥
हे भवभंजन जगदोद्धारण । मुनिमनरंजन हे गुणग्रामा हो ॥ २ ॥
श्रीगुरुगोविंदा ब्रह्मानंदा । देवनाथवरदा तारक आम्हां हो ॥ ३ ॥

पद ( ४८ )

सजणे जाई आणीगे श्रीरामा ।
माझ्या जीविंच्या जीवना पूर्ण कामा ॥ धृ० ॥
विरह दुःखित मानस गे माझें पाहीं ।
विव्हळ जालें गृह धदा न सुचे कांहीं ।
रामा वांचुनि सोयरा आणिक नाहीं ।
त्याविण शून्य वाटती दिशा दाही ॥ १ ॥
कठिण मन कां केलें गे रामरायें ।
न सुचे मजला आतां मी करु काय ।
उठ उठ वेगीं वेउनि येई माये ।
रामप्राप्तिस्तव मी धरीतें पाय ॥ २ ॥
जळो जळो गे ससार दुःखरूप ।
कैंचा कन्या सुत आणि माय बाप ।
मिळति खाया वाउगा संताप ।
मरवये डोळां दाखवा रामरूप ॥ ३ ॥
राम माझ्या जिविंचें निज जीवन ।
रामविरहे दुःखित गे माझें मन ।

रामाविण व्यर्थचि हें काय जीणें ।
एक वेळां दाखवा त्याचे चरण ॥ ४ ॥
नेणों कोठें गुंतला रामराजा ।
मनोभावें जालें मी त्याची भाजा[1] ।
रूप त्याचें पाहीन डोळां वोजा[2] ।
सांग दया येउ दे महाराजा ॥ ५ ॥
जळो गे जळो लौकिक भाव बाई ।
अंतरविला येणें मज शेषशायी ।
न रुचे मजला आणिक आतां कांहीं ।
प्रेमें धरिलें श्रीरामरूप हृदयीं ॥ ६ ॥
श्रुति ह्या गाती गुणगण ज्याचे वाणीं ।
शुकसनकादिक रतले ज्याचे ध्यानीं ।
नारदादी गाताती नामगाणीं ।
देवनाथप्रभु नायदाता धनी ॥ ७ ॥ ॥ सजणे जाई० ॥

## पद ( ४९ )

चाल चाल दयाळा रामा । जय सीता मनोभिरामा ॥ ध्रु० ॥
जय शरयूतिरनिवासा । रघुपति ! रविवंशोत्तंसा ।
जय मायामदमोहहरणा । मनमोहन ! मदहासा ।
जय परम पुरुष ! परमात्मया । पतितोद्धर ! पयनिधिवासा
भक्तवत्सल । भवभयहरणा । विश्वेशा अघविध्वंसा ॥ १ ॥
नवनीरदतनु ! सुकुमारा । रघुनंदन ! कुंदरदना ।
कार्मुकधर ! कमनियगात्रा । कमलाक्षा ! दानवकदना ।
श्रुतिशास्त्रें गुणगण गाती । कौसल्यात्मज ! सुखसदना ।
हे दाशरथे ! रघुराया । दाखवीं मनोहर वदना ॥ २ ॥
शुकसनकादिक हृदयीं ध्याती । करिताती सुरवर नमना ।
मदनारीमित्रा[3] रामा । अयोध्यापति ! श्रमशमना ।

1 भाजा = भार्या. 2 वोजा = ओजस्वी, तेजस्वी. 3 मदनाचा अरि–शत्रु–त्याला भस्म करणारा मदनारि शंकर त्याचा मित्र. कारण रामनामाच्या स्मरणानें शंकराच्या गळ्याचा दाह शांत झाला.

कलुषांतक[1] करुणाजलधी । निजईक्षणीं चुकविसि भ्रमणा ।
हे गुणातीता गुणग्रामा[2] । सुखधामा षड्अरिदमना ॥ ३ ॥
रक्षोनि मुनिमख स्वत्तें[3] । मर्दिलेसि राक्षस थोर ।
पदरजेंचि उद्धरली ते । गौतमवधु सुशिला त्वारें ।
देउनियां मिटक्या बापा । शबरीचीं भक्षिलीं बोरें ।
मी भक्तिहीन म्हणउनि मजला । उपेक्षिसी काय बा रे ॥ ४ ॥
किति पतित त्वां उद्धरिले । आलिया नुपेक्षिसि शरणा ।
वर्णितांचि निगमें स्वमुख । कीर्ती हे ऐकुनि कर्णा ।
शरणागत आलों भावें । भाकितों तुजला करुणा ।
हरीं जननमरणदु खातें । जग व्यापक जगदुद्धरणा ॥ ५ ॥
अति दुःखित मति हे जाली । घाबरलों सोसवेना ।
भवताप निवारीं येरे । राघोबा राजिवनयना ।
भुवनत्रयपाला सखया । सीतापति भूधरशयना ।
अज्ञानतमनाशना ये । हनुमंत मानसमोहना ॥ ६ ॥
अति दुस्तर दुर्धर बा हे । भवनदींत बुडतों ताप्यां ।
तूं कर्णधार ये वेगें । उतरीं परतिरासी बापा ।
किति म्हणुनि दुःख भोगावें । चौऱ्याशीं चुकवीं खेपा ।
हे देवनाथ-प्रभुदास्या । मेळवीं बा निजात्मस्वरुपा ॥ ७ ॥

## पद ( ५० )

बाई माझा प्राणसखा रघुवीर ॥ ध्रु० ॥
नवनीरदतनु अतिसुकुमार जो । श्रमवी शरयूतीर ॥ १
कुंदरद्द्युति[5] सुंदरनासिक । मदनमनोहर वीर ॥ २
करधृतशरधनु[6] जो रणधीर गे । अक्षय पाठीं तुणीर ॥ ३
देवनाथप्रभुचें मुख सेवित । नामामृतरस क्षीर ॥ ४

---

१ पाप नाश करणारा २ ग्राम=समूह ३ बळानें, सामर्थ्यानें ४ छा प ४ वर टीप पहा ५ कुंदपुष्पासारख्या दांताची प्रभा ६ रामदासांनीं एके ठिकाणीं असेंच वर्णन केलें आहे'-करिं शरचाप विलासे दानवा काळरूप मानें भासे । दास म्हणे रणकर्कश रामें अंतक तोही भासे ॥

अनेक क. पद सं. भाग १ पद २३१

## पद (५१).

पावना श्रीरामा । येई गुणग्रामा वो ॥ ध्रु० ॥
दशरथनृपतनया रघुनाथा । अनाथ मी शरण तुज हे सुखधामा ॥ १
मुनिमखपालन अहिल्योद्धारण । दीनजनोद्धारा पावननामा ॥ २
देवनाथप्रभु नाथ श्रीगोविंदा । आठविती तुझ्या हर्दी निज पादपद्मा वो ॥

## पद (५२).

जयजय श्रीरामराम रामकृष्ण रामा । जय दाशरथे रामा ॥ ध्रु० ॥
शरयुतीरवासी राम । जानकीमनोभिराम[1] ।
भक्तवत्सल पूर्ण काम । राम सौख्यधामा ॥ जयजय० ॥ १
सकलकलुषशमन राम । दुष्टअसुर दमन राम ।
भावें तुज नमन राम । राम मार्द्भीमा ॥ जयजय० ॥ २
निजजनसुखकरण राम । त्रायातमहरण राम
निवटिं जन्ममरण राम । विनति पादपद्मा ॥ जयजय० ॥ ३
मदनदहनमित्र राम । स्वामी कमलनेत्र राम ॥
लीलागुणपवित्र राम । गाती श्रुतिमहिमा ॥ जयजय० ॥ ४
नारदादि साधु राम । त्यांतें तव वेधु[2] राम ।
तारिसी भवसिंधु राम । गाती तव नामा ॥ जयजय० ॥ ५
विश्वहृदयसाक्षी राम । दीन मी उपेक्षीं राम ।
कृपादिठीं[3] निरीक्षीं राम । मानमाविश्रामा ॥ जयजय० ॥ ६
कामक्रोध दंडीं राम । दुरित सर्व खंडीं राम ।
हातींचें न सांडीं राम । पावें गुणग्रामा ॥ जयजय० ॥ ७
वृत्ति बहुत सभय राम । देई त्वरित अभय राम ।
दावीं पाय उभय राम । जनकसुता वामा[4] ॥ जयजय० ॥ ८
देवनाथ विनवि राम । दास तुझा म्हणवीं राम ।
विरह तुझा शमवीं राम । राम पूर्ण ब्रह्मा ॥ जयजय० ॥ ९

---

१ मनोभिराम = मनाला अभिराम आल्हाद देणारा. २ वेध, छंद. ३ कृपादृष्टीने. ४ जनकसुता सीता ज्याची वामा स्त्री आहे तो.

# श्रीरामस्तोत्र.

## पद (५२)

अचल अमल आद्या वेदवंद्या मुरारी ।
परमपुरुष रामा राघवा रावणारी ॥
दिनमणिकुलदीपा[1] आत्मया रामचंद्रा ।
भवजलधि तराया दे तुझी नाममुद्रा[2] ॥ १
शरयुतिरनिवासा भार्गजीताभिरामा[3] ।
मदनदहनमित्रा विश्वसूत्रा श्रीरामा ॥
मुनिजनमनध्येया ये गुणाच्या समुद्रा ।
भवजलधि तराया दे तुझी नाममुद्रा ॥ २
सम-अतसिसुपुष्पा कांति तेवीं विराजे ।
स्तविति हृदयिं ध्याती सर्वदा योगिराजे ॥
स्वरुपिं सुखसमाधी घेति जे योगनिद्रा ।
भवजलधि तराया दे तुझी नाममुद्रा ॥ ३
कमलनयन कान्हा सर्वसंहारकारा ।
करिं धरिं कनमाळा पावना निर्विकारा ॥
अघतम रजनीच्या हारका पूर्णचंद्रा ।
भवजलधि तराया दे तुझी नाममुद्रा ॥ ४
अज अजित परेशा बाळगोपाळ वेषा ।
व्रजजनसुखदाया मदहासा रमेशा ॥
भवगजमदनाशा अद्भुता श्रीमृगेंद्रा ।
भवजलधि तराया दे तुझी नाममुद्रा ॥ ५
अघबकपुतनातें मोक्ष दिल्हासि कैसा ।
स्वरुपिं मिळविलें त्या द्वेषभावेंच कसा ॥

---

१ दिनमणि ( सूर्य ) याच्या कुलाला दीप-उज्ज्वल करणारा असा. २ तुझ्या नामाची खूण. मुद्रा=शिक्का. शिक्का कट्यार भवजलधि तरण्याकरितां तू आपली नाममुद्रा दे म्हणजे मारुतीनें ज्याप्रमाणे दगडांवर रामनाम कोरून त्यांना तरावयाला लावलें त्याचप्रमाणें तू मी मूर्ख दगड असें समजून माझ्या जिव्हेला रामनामाचा अखंड सहवास राहील असें कर म्हणजे मी भवसागर तरेन. ३ भार्गवाला-परशुरामाला ज्यानें जीत-युद्धांत चित केलें, तो अभिराम मनोहर श्रीराम

विरथिं व्रजस्त्रिया त्या तारिल्या दानवेंद्रा ।
भवजलधि तराया दे तुझी नाममुद्रा ॥ ६
शिशुमिषें तुज हांका मारि नारायणा जी ।
निवडुन अघ त्याचे तारिले ब्राह्मणा जी ।
कठिण समयिं बा त्वां सोडवीले गजेंद्रा ।
भवजलधि तराया दे तुझी नाममुद्रा ॥ ७
अढळपदि सुनीतिबाळ तो बैसवीला ।
पितपट भगिनीतें संकटीं नेसवीला ॥
उचलुनि जिवविले गोवळे मंदराद्रीं ।
भवजलधि तराया दे तुझी नाममुद्रा ॥ ८
नवविध सुमनांची गुंफुनी प्रेममाळा ।
शिशुपणिं तव कंठीं अर्पिली मेघनीला ॥
अतिप्रिति तुज पावो सांवळ्या यादवेंद्रा ।
भवजलधि तराया दे तुझी नाममुद्रा ॥ ९
दशरथनिजरूपा तूझिया विश्वनाथा ।
रमविं विनविं देई स्वात्मसौख्या अनाथा ॥
स्वकरिं धरुनि तारीं देवनाथा कवींद्रा ।
भवजलधि तराया दे तुझी नाममुद्रा ॥ १०

## पद (५८).

रामसोयऱ्या सुखदायका विबुधबंधछेदका ॥ ध्रु० ॥ करुणापारावारा नवनीरदतनु अति सुकुमारा ॥ राम० ॥ १ ॥ शरयूतीरविहारा ।

---

१ अजामिळाला. २ सुनीति ही ध्रुवाची मातोश्री. ३ द्रौपदीला. ४ मंदर अद्रीला–पर्वताला. ५ या शब्दावरून ही कविता नाथांनीं आपल्या शिशुपणीं केली असेल असें अनुमान काढणें योग्य होणार नाहीं. याचा भावार्थ इतकाच कीं मी तुझें मूढ लान्हुलें बालक, ही वेडीवांकडी माला तुला अर्पितों; तूं इचा स्वीकार कर. शिशुपणीं = शिशुपणें = बालभावानें. ६ दशरथाच्या निजस्वरूपा–पुत्रा 'आत्मा वै पुत्रनामासि' म्हणून. ७ करुणापारावारा व शरयूतीरविहारा हीं विशेषणे श्रीमत् शंकराचार्यांनीं आपल्या '॥ नारायण नारायण नारायण जय गोविंद हरे ॥' या स्तोत्रांत दिलेली आहेत.

करुणापारावारा वरुणालय गंभीरा ॥ नारायण ॥
शरयूतीरविहारा, सज्जनऋषिमंदारा ॥ नारायण ॥

मुनिमखरक्षण परमउदारा ॥ राम० ॥ २ ॥ देवनाथ–प्रभुदाता । भावें शरणागत तुज आतां ॥ राम० ॥ ३ ॥

## पद ( ५५ )

राम म्हणा तुम्ही राम म्हणा[१] रे ॥ ध्रु० ॥ या नरदेहीं येउनि सार्थक, रामरुपीं ध्या विसावा रे ॥ राम० ॥१॥ रतिपळ क्षणक्षण आयुष्य जातें, हा नरदेह असे उसना रे ॥ राम ॥ २ ॥ देवनाथ प्रभुच्या निजस्मरणें, काळ तुम्ही न कदापि गणा रे ॥ राम ॥ ३ ॥

## पद ( ५६ ).

गा रे गा राम गा रे । रामावांचुनि अन्य भजा तुम्हि होईल हा शिमगा रे ॥ ध्रु० ॥ जात पळोपळ वैभव, याविषयीं पूर्णपणें उमगा रे ॥ गा रे गा० ॥ १ ॥ लंपट होउनि मानुनि अति सुख, विषय किती भोगा रे ॥ गा रे गा० ॥ २ ॥ देवनाथप्रभु प्रार्थुनि भावें, प्रेमदान मागा रे ॥ गा रे गा० ॥३॥

## पद ( ५७ )

तारक श्रीराम । रामनाम वदा वाणी ॥ ध्रु० ॥ गरळदाह विकळ करित, लावि सकळ शीतळास । शीतल नव्हे म्हणुनि जपत, नाम शूळ–पाणी ॥ तारक० ॥ १ ॥ नारदोपदेश पाप, हरुनि तारि वाल्मिकास । उफराटें जपत नाम अक्षरें दोन्ही ॥ तारक० ॥ २ ॥ स्वसुतामिषें अजामीळ गणिका शुक पढवितांचि । अद्भुत प्रताप दावी तारियलीं पापिणी ॥ तारक० ॥ ३ ॥ सद्गुरुगोविंदनाथ, निर्विकल्प पूर्णमात । देवनाथ ध्यात हृदयीं, गात सतत प्राणी ॥ तारक० ॥ ४ ॥

---

१ रामनामासंबधानें समर्थ आपल्या मनाच्या श्लोकांत म्हणतात –
मुखीं नाम नाहीं तया मुक्ति कैंची । अहंता–गुणें यातना ते फुकाची ॥
पुढें अन्त होईल तो दैन्यवाणा ॥ म्हणोनी म्हणा रे म्हणा देवराणा ॥

२ जात पळोपळ वैभव–वैभव प्रत्येक पळाला नाहींसें होतें म्हणजे वैभव हें क्षणभंगुर आहे तें केव्हां नाहींसें होईल याचा नेम नाहीं ' लक्ष्मीस्तोय-तरंग–भंगचपला विद्युच्चलं जीवितं ' असें शिवापराधक्षमापन स्तोत्रांत आहे

३ गरळदाह = हलाहल नावाचें विष शंकरानी प्राशन केलें त्यामुळें त्याच्या अंगाचा अतिशय दाह झाला तो शांत होण्याकरितां जगांतील सर्व थंड वस्तु त्यांनीं अंगावर धारण केल्या तरी दाह शांत होईना. शेवटी रामनामाचे

( पुढील पृष्ठ पहा )

## पद ( ५८ )

राम वरिला सुखदानदाई ॥ ध्रु० ॥
नवपल्लव नव कोमलहस्तीं । शोभतसे लघु दानदाई ॥ १
हंस हरिणी चुकतां जैशी । खुंडित रानोरान पाहीं ॥ २
अमेरुषी[1] मन हें चकोर पदाग्रीं । जळाविण मीन हैराण राही ३
जनकजननीपण व्यर्थचि गेलें । जीव कसा जातो न बाई ॥ ४
द्विपांतराहुनि नृपाळ आले । परि मज जनकासमान बाई ॥ ५
जननीपित्याला जाऊनि सांगा । न धरावा अनुमान कांही ॥ ६
देवनाथप्रभू उदार पाहुनी । मन करी फारचि उंडाण[2] बाई ॥ ७

---

( २३७ पृष्ठावरून समाप्त )

स्मरण केल्याबरोबर शंकराचा दाह शांत झाला समर्थ आपल्या मनाच्या श्लोकांत म्हणतात:—

भजा राम विश्राम योगेश्वराचा । जपा नेमिला नेम गौरीहराचा ॥
निवाला स्वयें तापसी चंद्रमौळी । तुम्हा सोडवी राम हा अंतकाळीं ॥

नाममाहात्म्यासंबंधानें श्रीधर आपल्या हरिविजयांत याप्रमाणें लिहितात:–

या श्रीरंगाचें स्मरण । यातुल्य तप दुजें आन ॥
नसे शोधितां त्रिभुवन । परम पावन नाम देखा ॥ १ ॥
आणिक अष्टादश पुराणें । बोललीं सत्यवतीहृदयरत्नें ॥
परी नामाहून विशेष साधनें । सर्वथाही नव्हेती ॥ २ ॥
पाप तत्क्षण हस्ती । याची तोंवरी जाणिजे मस्ती ॥
नामसिंहप्रताप-कीर्ती । ऐकिली नाहीं जोंवरी ॥ ३ ॥
ऐकतां नामसिंहप्रतापा । पळ सुटे मत्त मातंगपापा ॥
लपावया नमिळे खोपा । गतप्राण होती तेव्हांची ॥ ४ ॥
पाप जाळावया समस्त । हरिनाम अग्नि धडाडित ॥
क्षणें दुरित काष्ठें जाळित । प्रताप अद्भुत न वर्णवे ॥ ५ ॥
नामाग्नीनें न जळे । ऐसें पाप कोणी नाहीं केलें ।
वाल्मीकें बहुत पाप जोडिलें । परी नाहीं उरलें नामापुढें ॥ ६ ॥
गणिका आणि अजामिळ । इहीं केले दोषकल्लोळ ॥
परी नामाचें अद्भुत बळ । जाळी सकळ क्षणार्धें ॥ ७ ॥

१ अमरुषी शब्दाचा अर्थ बरोबर लागत नाहीं. अमृतैषी असा शब्द असेल काय ? पण त्यानें या सुंदर पदाचा छंदोभंग होतो. २ उंडाण, उत्कंठा, जोर.

## पद ( ५९ )

श्रीरघुवीर सुखकर येवो । मज नवरा वो । सखयानों यत्न करावो ॥ध्रु०॥
मी पाहुन बसलें येथें सकला राया । आपणासि योग्य वराया ॥
परि एक नयें मज चित्तीं नाथ कराया । निजहस्तें हस्त धराया ॥
उत्साह नसे कोणाला धनु आवराया । लागले भूमि उकराया ॥
वाटतस मजला अवघे उदर भराया । निज कुळाभिमान हराया ॥
छंद ॥ म्हणति हें चाप मोठें ॥
बसविली लज्जा पाठीं ॥
काळज धडधड करी पोटीं ॥
हासताति सुजनथाटी ॥
टीप ॥ तिलक्यांत ऋषींतुनि उठला अमरतुरा हो । सखयानों यत्न करावो ॥
जें चाप शिवाचें सत्य करिल रहा हो । जानकीसि तो हो नाहो ॥
रावणादिकांचे कांहीं न चले ज्याहो । गेली हरुनी लज्जा हो ॥
छंद ॥ पण कठिण परशुरामाचें ॥
करपंकज मृदु रामाचे ॥
पणवचन नव्हे कामाचें ॥
टीप ॥ सांगा जनका जावाई तोचि वराहो । मज नवरा वो । सखयांनो यत्न करावो ॥ २ ॥
वेधिलें मला श्रीरामें हरुनि मनासी । पाहतांचि श्रीवदनासी ॥
लागतांचि तटस्थावस्था निजनयनासी । अर्पुनियां तनुसुमनासी ॥
या रघुपतिचें लावण्य नये मदनासी । काय सांगावें या जनासी ॥
छंद ॥ यापरी विश्वाची माता ॥
दे रघुवीर मज जामाता ॥
बोले सखयांनो आतां ॥
जाउनियां सांगा ताता ॥
टीप ॥ देवनाथ सुत तो स्वामी तोचि वरा हो ॥
मज नवरा वो । सखयानो यत्न करावो ॥ ३ ॥

## पद ( ६० )

वदनीं रामसखा रे रामसखा । कोण करी भवधोका ॥ ध्रु० ॥
रामहरी गोविंदा । स्मरतां सरला मायिक धंदा ॥ १ ॥

फिरतां हेंचि जगतीं । रामचि केला हा सांगाती ॥ २ ॥
देवनाथप्रभु राघव । भजतां दिधलें निजसुखवैभव ॥ ३ ॥

पद ( ६१ )

राम नाम मंत्र थोर जाण मानवा ॥
सनकसनंदनादि—शुक मानवा ॥ धृ० ॥
पढवितोंचि शुकमुख । जपतां झालें प्राप्तसुख ।
दे हरूनि दुःख सकळ । स्वरुपिं साधना ॥
करित शरण चित्त यासि । योगि पाळवा ॥
स्वानुभवीं वरुनि गूज । भाव आठवा ॥ १ ॥ राम० ॥
उफराटा करितां जप । भस्म करुनि सकळ पाप ॥
वाल्मिकास ताप हरुनि । सौख्य तेधवा ॥
दे दयाळु मंत्रजप त्या । दीन बांधवा ।
हृदयभवनिं प्रगटविला । श्रीरमाधवा ॥ राम० ॥ २ ॥
जाश्वनीळ होत विकळ । शमवि गरळदाह सकळ ॥
देत सौख्य विपुल नाम । जपत शांभवा ॥
भजति त्यास अंघिकारि । देत वैभवा ॥
देवनाथ जपत नाम । माळवी भवा ॥ राम० ॥ ३ ॥

---

## कृष्णचरित्राचें वर्णन.

पद ( ६२ ).

सखिये ! आनंद नंदराजगृहीं ॥ धृ० ॥
कृष्णजन्मदिनिं व्रजजननायिका देती रत्न महीं ॥ आनंद० ॥ १
तैल हरिद्रा कुंकुम चंदन सिंपिती गोप दहीं[1] ॥ आनंद० ॥ २
होउनि पूर्ण मनोरथ जाती गुणिजन याचकही ॥ आनंद० ॥ ३
गोपवधू म्हणताति यशोदे बाई हें भाग्य नव्हतें कधीं ॥ ४
देवनाथ म्हणे जननीस्तव[2] अगणित कोण कथीं ॥ आनंद ॥ ५

---

१ कुंकुमचंदनाचे सडे पूर्वी मंगलकार्यांत घालीत असत, तसे तैलहरिद्रांचेही घालीत असत काय ? २ जननीचा स्तव ( असें पुत्ररत्न प्रसविल्याबद्दल ) अगणितच झाला तो कोण कथीं ( कोण वर्णूं शके ) ?

## पद ( ६३ )

सांवळें ब्रह्म तें मज आवडे । त्याविण अन्य हें नावडे ॥ ध्रु० ॥
गुणगण गाती ह्या श्रुति निजवाणी । ज्या स्तवितां शिणती योगी ब्रह्मारण्यीं ।
ब्रह्मादिकां न कळे करणी । तें हें रांगे नंदाच्या आंगणीं ॥ सांवळें० ॥ १
दुडदुडां धांवे वत्साचिये पाठीं, । कांबळी खांदा हातीं काळी काठी. ॥
भोंवतीं शोभे गोवळांची दाटी । गोजिरें रूप बरवा जगजेठी[२] ॥साव०॥ २
पहातां नयनीं जयाचें रूपडें । संशयाचें मूळ हें उपडें ॥
भेदाभेदालागीं शून्य पडे । व्यापक जिकडे पाहों गे तिकडे. ॥ सांवळें० ३
भूललें मन पाहुनि हरिरूपा । समरस वृत्ती चुकल्याती खेपा[३] ॥
निर्लज्ज नामीं सांडियली त्रपा[४] । मोडिल्या प्रपंचाच्या[५] खेपा ॥ सांवळें ॥ ४
देवनाथप्रभु हा गोविंद । निशिदिनीं त्याचा भजलागीं छंद ॥
ज्याच्या नामें तोडिल हा भवबंध । स्वरूपीं त्याच्या भोगितों आनंद ॥ ५

## पद ( ६४[६] )

सभाग्यभाग्यें ते नंदाची राणी ॥ ध्रु० ॥
श्रुति ह्या गाती गुणकीर्ति निजवाणीं ।
ध्याति योगी सनकादिक मुनि ध्यानीं ॥
विश्वात्मा तो नंदाच्या आंगणीं ।
पयपानास्तव घालितो लोळणी ॥ १ ॥ सभाग्यभाग्यें० ॥
रडतां मागे दे नवनीतासि जननी ।
गडबड लोळे आंगणीं त्या सुखदानी ॥

---

१ पुढील पदावरील पहिली टीप पहा २ जगाला जिंकणारा, आकलन करणारा; जगदेकवीर. ३ जन्ममरणाच्या व अनेक जन्मांतराच्या खेपा ४ नाम घेतांना निर्लज्ज झालों, त्रपा (लाज) सांडली ५ विश्वसंसारांतील जन्ममरणाच्या ६ हजारो वर्षे हिंदुधर्मांतील ग्रंथकारांनीं व साधुसंतांनीं जें कृष्णचरित्राचें कौतुक केलें आहे तें हेंच निगमागमांना अगम्य असा प्रभु नंदयशोदेस्तव तान्हें बाळ, गोपाळांस्तव सवंगडी, गोवत्सांस्तव बालगोप, व्रजकुमारींस्तव नवकिशोर, अर्जुनास्तव सारथी, धर्मप्रभूसाठी उच्छिष्टें काढणारा, असा वेगवेगळाल्या भक्तांसाठीं वेगवेगळा प्रपंच धारण करिता झाला हें कौतुक आजपर्यंत आमच्या कवींनीं लाख वेळ वर्णिलें तरी वर्णनलालसा राहलीच हा भक्तिचमत्कार चिंतनीय आहे हें पद आणि पुढील दोन्ही पदें याच एका भावनेचीं निदर्शक आहेत.

जवळि आली माता दे खेळणीं ।
घेवोनि स्वकरीं लाविला स्तनपानीं ॥ २ ॥ सभाग्य० ॥
शमवि विष तें हृदिं स्मरतां शूळपाणी ।
पदरजीं शीला उद्धरी ऋषिकामिनी ।
क्रीडे तो हा नंदगौळियासदनीं ।
मेळवोनी व्रजबाळें चिमणीं ॥ ३ ॥ सभाग्य० ॥

पद (६५)

नाच नाच बा कसा गुणाचा तूं सारंगपाणी
तुझा नाच चांगला मजला सांगताति[१]गौळणी ॥ ध्रु० ॥
उठुनी प्रातःकाळीं यशोदा करिती घुसळण ।
नाच नाच रे मुरारि शब्द जाणवला तीणें ।
आधींच हा कंसारि नाटकी मोठा जगजीवन ।
धरणीवर पाऊल टाकितां नाचत त्रिभुवन ।
नाचती उतरंड्या[१] जीवंनी[२] नाचती देव संगीनें[३] ।
करी यशोदा विस्मय असे कां झालें मनमोहन ।
चाल ॥ आली घरांतुनि बाहेर झाली बावरी ।
गेली पुसाया तों भट नाचतो द्वारीं ।
रस्त्यांत नाचती पाहुणे[४] व्यापारी ।
पाणवठ्यां नाचति नारी घेउन घागरी ।
कोतवाल नाचतो दिवाण चावडीवरी ॥
दीप ॥ रस्त्यांत गुजरली धूम[५] नाचती शेटी[६] महाजन वाणी ।
सवदा घ्यावया आले गिऱ्हाइक नाचतो दुकानीं ॥नाच०॥१
देशमुख देशपांडे पाटील नाचत चवधरी ।
कुळकर्णी रयत नाचती भणंग भिकारी ।
हाकिम[७] नाचतो गद्दीभंवताला शिबंदी[८] सारी ।

---

१ पदार्थांनी भरलेली मडकीं एकावर एक रचून कोंपऱ्यात ठेवलीं असतात तीं २ सजीव झालेलीं असा अर्थ वाटतो ३ सगळे, समग्र नेहमींचा अर्थ धाधून असा आहे ४ पाहुणे व्यापारी = बाहेर गावांहून हाट बाजार करायला आलेले व्यापारी (?) ५ गर्दी, गडबड ६ (संस्कृत) श्रेष्ठी, नगरशेट ७ राजाकडील अधिकारी, सरदार ८ शिबंदी, फौज.

मुजुमदार फडणीस नाचती सर्वहि अधिकारी ।
सराफ[1] चांटी शिंपी सोनार कांसार ओतारी ।
खाती तांबटकार तांबोळी[5] नाचे पानफेरी ।

चाल ॥ तो नाचतो जिनगर तोडितो ताल ।
सुतार नाचतो वाकसें सोडुन दिलें ।
तेली नुसता घाणा गाळीत राहिला ।
संबळ वाजवी गुरवाचें अंग सुजलें ।
सैनी वाजवितां तोंडाचा जाला बेहाल ।

दीप ॥ सांळी कोष्टी मोमिन विसरुन गेले पाजणी ।
नाहीं हातामध्यें धोटेफणी गेले भुलोनी ॥ नाच० ॥ २

गणेश सरस्वती नाचती कैलासीं देव ।
ब्रह्मा विष्णु महेश नाचती नारद गंधर्व ।
महामहा ऋषि समर्थ तयांचें कोठवर घेऊं नांव ।
व्यास वाल्मिक वशिष्ठ बृहस्पति द्रोणी शुकदेव
अगस्ति कुंभकर्ण आथिज मार्कंडेय ध्रुव ।
अठ्यायशीं सहस्रऋषी नाचती धरूनीयां भाव ।

चाल ॥ कैलासीं नाचती उमा महेश्वर ।
रामलक्ष्मण अठरापद्में वानर ।
काशी गंगा अयोध्या चालती स्थिर ।
सप्तपाताळीं नाचतो फणिवर ।
आकाश पृथ्वी उठला थयथयकार ।

दीप ॥ यशोदेची भ्रांती उडाली करी विस्मय मनीं ।
धन्य धन्य केशवा नकळे तुझि अघटित करणी॥ नाच०॥ ३
चरण रजाची प्राप्ती ब्रह्मादिकांसि नाहिं जाहली ।

---

१ सोनें चांदी खुर्दा विकणारा व विकत घेणारा २ कापडविक्यांची जात. ३ भांडीं ओतणारा ४ लोहार ५ पानेंविक्या ६ घरोघर विड्याचीं पानं विकण्याकरितां फेरी घालणारा असा अर्थ काय ? ७ हा शब्द मोल्स्वर्थमध्यें सांपडत नाहीं. ८ नुसता घाणा गाळीत राहला म्हणजे आंत तीळ वगैरे न टाकता उगीच घाणा फिरवीत राहिला ९ लुगडीं विकणारा. १० खळ देण्याचें यंत्र. ११ कापड विणण्याचें यंत्र.

धन्य भाग्य यशोदेचें पायांवर न्हाऊं घाली
उच्छिष्ट भक्षावया इंद्रादिकें माव[1] केली ।
यासि होइना प्राप्ती गोपाळासि ग्रास घाली ।
चाल ॥ देव भावाचा भुकेला मी सांगू किती ।
भक्ताचें उच्छिष्ट काहाडी सभेप्रती[2] ।
शेष शिणला त्याची कुंठित झाली मती ।
देवनाथ म्हणे मी अज्ञान वर्णूं किती ।
टीप ॥ हरिविजयाचे ग्रंथीं दाखला पहा बरा शोधुन ।
सध्यां पंढरपुरीं विटेवरी उभा मनमोहन ॥ नाच० ॥ ४

## पद ( ६६ ).

तें ब्रह्म गोजिरें हो[3] । खेळे यमुनातीरीं ।
ध्याताति योगि ध्यानीं । व्यापक जें चराचरीं ॥ ध्रु० ॥
नानालीला खेळ करी । गोपगडी मिळवुनि ॥
वर्णितां गुणगणगाथा । शिणली शेषाची वाणा ॥ तें ब्रह्म० ॥ १
दधि पय नवनीत । भक्षितां हे चोरूनी ॥
बांधिती हृदयस्तंभीं । निजभावें गौळणी ॥ तें ब्रह्म० ॥ २
यशोमती माय ज्याची । पीता ज्याचा नंद ॥
अवतार भक्तकार्या । पूर्ण सच्चिदानंद ॥ तें ब्रह्म० ॥ ३
धन्य भाग्य गौळीयांचें । ज्यांचे घरीं ब्रह्म नाचे ॥
वर्णितां वेदशास्त्रां । पडे गाढ[4] मौन वाचे. ॥ तें ब्रह्म० ॥ ४
कांबळी खांदा काळी । हातीं काळीच काठी ॥
'हो रे ! हो रे ' शब्द करी । धांवे वत्सांचिया पाठीं[5] ॥ तें ब्रह्म० ॥ ५
वज्रांकुशध्वजचिन्हें[6] । शोभताति पादाब्जीं ॥
कोटीरवीतेज लोपे । ज्याच्या पदनखतेजीं ॥ तें ब्रह्म० ॥ ६
पीतांबर कास कासे । गळां शोभे वैजयंती[7] ॥

---

१ माव केली=माया केली, लबाडी केली २ धर्माच्या राजसूय यज्ञाल पत्रावळी काढल्या ३ अत्यंत, निखालिस भक्तिभावानें ४ मोठें 'गाढ बाढ दृढानिच' अमर ५ "अनंत ब्रह्मांडें ज्याचे पोटीं । सावळा जगजेठी ॥ काळी घोंगडी काळी काठी । काळा दोरा कटीं " ॥ दामाजीपंतावरील पद. ६ "वज्रांकुश ध्वज सरोरुहभूषणाढ्यं " भागवत ७ विष्णुकंठींची माळ.

चतुर्भुज शंखचक्र । गदा पद्म हें हातीं ॥ तें ब्रह्म० ॥ ७
विप्रपदाचिन्ह[1] धरी । जो कां आपले हृदयीं ॥
त्रैलोक्यनाथ गोकुळीं । नांदे स्वयें शेषशायी ॥ तें ब्रह्म० ॥ ८
मयूरमुगुट शिरीं । मकराकृति कुंडलें ॥
आकर्ण शोभताती । भव्य तेज फांकलें ॥ तें ब्रह्म० ॥ ९
सुंदर दीसताहे । सरळ नासिकशोभा ॥
कमलनयन देवराव । केवळ गगनाचा गाभा[2] ॥ तें ब्रह्म० ॥ १०
कुंदरदन मंदहास्य । दिनानाथा गोपाळा ॥
अनंत ब्रह्मांडें हीं । पोटीं साठविली कळा[3] ॥ तें ब्रह्म० ॥ ११
देवनाथप्रभु ज्यासी । शिणल्या वर्णितां श्रुति ॥
तेथें मज पामराची । काय चालेल मती ॥ तें ब्रह्म० ॥ १२

## पद ( ६७ ).

गोकुळीं गोवळवेष क्रीडा करी घननीळ वृंदावनीं ॥
हुतुतु हुंबली खेळे विलास हे सौंगडे मिळऊनी ॥ ध्रु० ॥
पीतपटें कट राजतसे[4] अरे अद्भुत पाहें बरें ॥
मुनिजनमानस मोहक श्रीमुख पाहतां द्वैत हरे[5] ॥ १
अणुरेणु ब्रह्मादिव्यापत चराचरीं वर्णिती ज्यासी श्रुती ॥
तो यमुनातिरीं गोपगड्यांसह खेळत गोपीपती ॥ २
सनकसनंदन व्यास शुकादिक पाहती ज्या नयनीं ॥
तो गिंवसुनि[6] गुणीं[7] बांधिती गौळणी आपुलिया सदनीं ॥ ३
घेउनियां वनीं चारित धेनुसि वेणु धरी अधरीं ॥
भुलउनी रवें त्या व्रजकामिनी राधेसी हस्तीं धरी ॥ ४
देवनाथप्रभुनाथ निरंजन ब्रह्म सनातन रे ॥
तो नटनागर रूप मनोहर यशोमतिनंदन रे ॥ ५

---

१ भृगुऋषीनें लत्ताप्रहार केला त्याचें वक्षस्थळावरील चिन्ह याला च श्रीवत्स म्हणतात २ गगनासारखी मेघश्याम कांति असलेला. ३ "अनंत ब्रह्मांडें पोटीं सांठविली ही कळा" असा अन्वय. ४ पीतपटानें पीतांबरानें शोभतसे. ५ मोहक श्रीमुख पाहतांच द्वैतभावना नष्ट होऊन अद्वैतसुखांत मन तल्लीन होतें. ६ पकडून. ७ दोरीनें.

## पद ( ६८ )

श्री राधावदनारविंदमिलिंदा ॥ ध्रु० ॥

नंदनंदन कुंदरदा हरी, वृंदाप्रिय हे देव मुकुंदा, ये बाये चित्सुखकंदा ॥ १
मंदमती परि परमानंदा, गुणछंदान्वयपदारविंदा, सेवितामोदमिलिंदा ॥ २
वृंदावनिं चारिसि गोवृंदा, देवनाथप्रभु सदानंदा, श्रीगुरुनाथ गोविंदा ॥ ३

## पद ( ६९ )

या हरिची मज आवड बाई ॥ ध्रु० ॥

सुंदर नागर रूप मनोहर । जो नंदनंदन चारितें गाई ॥ १
स्मरतां वाचे नाम जयाचें । भवभयछेदना जो सुखदाई ॥ २
मी निजभावें सखे अनुसरलें । देवनाथप्रभुच्या निजपायीं ॥ ३

## पद ( ७० ).

केली कसी मोहनी । गे राधे केली कसी मोहनी ॥ ध्रु० ॥

क्षणभरि घरिं हरी राहीचना गे । येत तुझे सदनीं ॥ १
न करी भोजन क्षणहि निजेना । ध्यास तुझाच मनीं ॥ २
जो श्रुतिशास्त्रांलागिं अगोचर । ज्याला ध्याती मुनी ॥ ३
पूर्णपरात्पर जो तुज मोहिलें । माधव बाळपणीं ॥ ४
देवनाथप्रभू सांठविला हृदां । भाग्य तुझेंचि जनीं ॥ ५

## पद ( ७१ ).

कृष्णा कांरे असा करिसी ॥ ध्रु० ॥

क्षणभरही घरीं बैससिना हरी । वणवण कां फिरसी ॥ १
निजसीना क्षणही जेवसि ना । दुग्धाहि तें न पिसी ॥ २
राधेनें तुझें मोहियलें मन । जाहली वृत्ती पिशी ॥ ३
सांडुनि गाईसी घेउनि दोहना । वृषभ कसा दुहसी[1] ॥ ४

---

१ श्रीकृष्णाच्या अवतारीपणाबद्दलची व्रजवासियाची खात्री ज्या अनेक गोष्टींनीं पटली त्यांपैकींच ही एक होय राधा जवळ उभी असता तिच्या रूपानें मोहित झाल्याचें निमित्त करून त्या निर्विकार प्रभूनें वृषभदोहनाला सुरुवात केली, तों कांहीं वेळानें हातांतील दुग्धपात्र भरलें पूतनावधापासून प्रभुत्वाबद्दल विश्वासपूर्ण असलेल्या गोकुलवासीयाना या नवीन चमत्कारीच जें कौतुक वाटलें त्यापुढें हा राधामोहन स्वतः मोहीत झाला होता कीं, पूर्ण ब्रह्मचारीच होता, असल्या गोष्टींची चर्चाच करण्याचें त्यांना प्रयोजन नव्हतें.

राधेचिया गृहा जाउन येसील । येथुनि बांधीन खांबासी ॥ ५
देवनाथप्रभु पळभर आंगणीं । नेत्रीं न कां दिससी ॥ ६

पद ( ७२ )

चेटकी मोठा नंदाचा नंदकान्हा ॥ ध्रु० ॥
यमुनापुलिनीं बैसुनि गान । गातो मुरलीमध्यें तान ।
आमुचा हरियेला प्राण । भुललों आह्मी व्रजांगना ॥ १
लीला नाटकी अपिती । ब्रह्मादिकां न कळे गती ।
आमुच्या संसाराची माती । केली मोहियलें स्वमना ॥ २
याला दहींदुधाची गोडी । गोरस खाउनि मडकें फोडी ।
करितो नानापरिच्या खोडी । यासी कांहीं बोलवेना ॥ ३
श्रीगुरुगोविंदाची लीला । वर्णितां वेदशेष शीणला ।
देवनाथें हृदयीं धरिला । स्मरतो वंदुनियां चरणा ॥ ४

---

## गोपीगाऱ्हाणीं.

### पद ( ७३ ).

यशोदे ! बहु दुःख, गांजिलें यानें ।
मोहिलें चित्त कान्हानें ॥ ध्रुवपद ॥
दुडदुडा हरि कानडा रिघे मंदिरीं ।
माझी सासु गेलि बाहेरी ॥
एकांत वेळ श्रीकांत न्याहाळुनी बरी ।
धांवत जवळी आला हरि. ॥
चाल ॥ घाली हात गळ्याभीतरीं, ।
दों करीं कुचांतें धरी, ।
माझी तोडियली गरसोळी ॥

---

१ वाळवंटात हल्लीं यमुनेचें पुलिन ऐलतीरावर नसुन पैलतीराकडे गेलें आहे असें वाटतें. देवनाथांच्या उत्तरहिंदुस्थानांतील प्रवासाच्या वेळीं कसें काय होतें कोण जाणें. कदाचित् पैलतीरकडल्या पुलिनांत बसून मुरली मधुरस्वानें आम्हांला पिशा करून यमुना उतरून जावयाला लावतो म्हणून जास्त चेटकी व सख्याळ असें दासबावयाचा भाव असेल.

टीप ॥ दृढतर धरित सुरहर घेतो चुंबन ॥ मोहिलें० ॥ १
यशोदे ! ऐक किति तरी दुःख सोसावें ।
गोकुळा त्यजुनियां जावें ॥
बाहेरी केली बोहरी[1] किती सोसावें ।
हाणोनि तोंड फोडावें ।
चाल ॥ वाटतें पुरला अंत काय सांगावें ।
. .. . ...... ........... ।
......... ... . ........... ॥
टीप ॥ दाजला वर्णितां शिणला वेद, धरि मौन ॥ मोहिलें० ॥२
माझे घरिं सासु म्हातारी अविद्या खरी ।
अहंकार सासरा भारी ॥
नांदती दीर दुर्मती सहाजण[2] अरी ।
हा त्यांचें नांव ना धरी ॥
चाल ॥ साजणी गृहिं येउनी मला धरि करीं ।
चहुंकडे पाहें घावरी ।
. ....... .. .. . ..... .. ॥
टीप ॥ निजबळें मला बोधिलें मुरळ घालून मोहिलें ॥ ३
मधुर मुरली सुस्वर वाजवी कर्णीं ।
विंधिलें पाहुनि रूप नयनीं तन्मय स्वसनीं ॥
नाठवे दुजी काहणी ।
पाहता न दिसे रिता ठाव जननी ॥
चाल ॥ व्यापिला चक्रपाणी ।
.... . .. ..... . ..... ॥
.. .. ... ............. ... .. ॥
टीप ॥ मायाभास मिटे आभास मन उन्मन ॥ मोहिलें० ॥ ४
यापरी भोगिं श्रीहरी सखे साजणी ।
संसारा घातलें पाणी ॥
केलें असें लाविलें दिसे तुटलि वाणी ।
लाविलें निजध्यानीं ॥

---

१ बोहरी = नाश, वाईटपणा. २ सहाजण = षड्रिपु.

चाल ॥ नाटकी तुझा सुत की भक्तवरदानी ।
दुरिताचि करि हानी ।
..... ..... ............... ॥
टीप ॥ देवनाथ हृदयीं गुण गात छंद अनुदिन[1] ॥ मोहिलें० ॥ ५

## पद ( ७४ ).

हरि आवरिं माय यशोदे । करि खोडी बहू ॥ ध्रु० ॥
गोप मुलांसह येउनि मंदिरीं । भक्षित नवनीतलोंदे[2] ॥ १ ॥ करि० ॥
नष्ट बहु व्रजनारिंस कष्टवि । यास गृहींच असोंदे ॥ २ ॥ करि० ॥
मथुरेच्या वाटेंत रोकितें[3] घाटगे । फोडिले माटे[4] मुकुंदें ॥ ३ ॥ करि० ॥
मागतसे भलतेंसें हा दान गे । यापरि छळित विनोदें ॥ ४ ॥ करि० ॥
देवनाथप्रभु वाजवी मोहरि[5] । मोहित मानस नादें ॥ ५ ॥ करि० ॥

## पद ( ७५ ).

ऐक यशोदेबाई मुलाला शिकवीं ग नाहिं बरें ॥
दुष्ट राज्य कंसाचें बुडविल हा बहुतांचीं घरें ॥ ध्रु० ॥
श्रवण करीं तुजपाशीं सांगतें पुत्राचीं लक्षणें ॥
रजनिमाजि मंदिरीं प्रवेशे सर्व गोवळगण ॥
उंच शिका लावुनी एका उतरी मोठे युक्तीनें ॥
आपण भक्षी स्वकरें गडियांलागीं दे वाटून ॥
असो भक्षिलें भक्षो फोडुनी टाकी रसभाजन ॥
पसरुनि दे आंगणीं पळुनियां जाय जगन्मोहन ॥
छंद ॥ करी खोडी नानापरी ग ॥
सोसावें किती म्हण तरी ॥
कां छळितो ग तूझा हरी ॥
टीप ॥ काय करावें कोठें जावें त्रासलें अंतर ॥ दुष्ट० ॥ १
दुसरी गौळण आली म्हणे गे किशोर लहान कसा ॥
ऐक ढंग बेढंग सोडुनी चव बोले भलतिसा ॥
जात होति पाण्याला घेउनी घटकटिं माझी स्नुषा ॥

---

१ अनुदिन = नित्य. २ नवनीताचे-लोण्याचे, लोंदे-गोळे. ३ रोखणें=अडवणें [ हिंदुस्थानी शब्द ]. ४ मातीचे घडे, हांडे. ५ मुरली.

कुंज गलिमधें मार्ग रोधुनी अडवित झाला पिसा ॥

........................................ .. .........

स्पष्ट सांगतें नष्ट तुझा सुत कष्ट देत कां असा ॥

छंद ॥ हा गांजीतो ऐशा रिती ग ॥

आंवरीं तुझा यदुपती ग ॥

आम्हीं जाउनि मथुरेप्रती ॥

टीप ॥ सांगितल्यावरी कंसा शिक्षा करील मग दुर्धर ॥ दुष्ट राज्य० ॥ २

तिसरी आली म्हणे ऐक ओ यशोमती सुंदरी ॥

मध्यरात्रीचा समय पातला हरी माझे मंदिरीं ॥

सुत माझा आणि स्नुषा उभयतां निजले शेजेवरी ॥

दाढी पतिची वेणी तीची देउनी गांठ निजकरीं ॥

अघटित करणी करुनी पळाला मुकुंद ते अवसरीं ॥

उदयोकरी दिनमणी सरुनियां गेली तम शार्वरी ॥

छंद ॥ ती जागृत होतां क्षणीं ॥

उठे गृह धंद्या लागुनी ॥

नये उठतां शंकित मनीं ॥

............... ............... ................. ॥

............ .. ... ............ ................. ॥

......... ................................ ............... ॥

................................................................ ॥

................................................................ ॥

टीप ॥ सोडिं लवकरी म्हणुनि बैसला उठूनि तो झडकर ॥

दाढि वेणिची गांठी पाहतां नैनीं करी आश्चिर ॥ ४ ॥

काय जाहलें पुढें सांगतों श्रवणिं ऐक तत्वता ॥

स्वकर सोडित ग्रंथी परि ती न सुटेची सोडितां ॥

म्हणुनि आणुनी शस्त्र कापी न कापेचि कापितां ॥

त्रासुनि अग्नी लावुनी जाळी न जळेची जाळितां ॥

कसें करावें काय जाहलें कांतेला पुसतां ॥

तंव ती म्हणे हरी काल बोलिला राजबिदीं खेळतां ॥

छंद ॥ गोरसा न देसी तरी ॥

अघटीत करिन सुंदरी ॥
हीं करणी तथाची खरी ॥
टीप ॥ ऐकुनि ऐसें तेणें स्वकरें धरुनी तिचा कर ॥
शरणागत हरीलागि चालिला भावें शुद्ध अंतर ॥ ५
मागें आपण पुढें हळुहळू चालत गजगामिनी ॥
चावडिये पातले उभयतां लज्जित झाले मनीं ॥
नंदाजवळी हरी बैसला देखियला लोचनीं ॥
कर जोडुनियां उभे ठाकले करिताती विनवणी ॥
दीनदयाळा काय म्हणावें तुजला या दिन जनीं ॥
करुणाघन तूं ऐकुनि करुणा वर्षें कृपाजीवनीं ॥
छंद ॥ अपराध करावा क्षमा ॥
दिनबंधू सर्वोत्तमा ॥
शिक्षेसी झाली सीमा ॥
टीप ॥ अनाथनाथा आम्हि भगवंता दास तुझे किंकर ॥
कृपानयनिं हरी पाहें ग्रंथिका सोडीं ये सत्वर ॥ ६
नंदनंदना मुरलिवादना मधुसुदना श्रीहरी ॥
शरणागतवत्सला येउं दे दया आमुचि अंतरीं ॥
आद्य अनामय अरूप तो तूं श्रुति गाती गुणगणा ॥
हरावया भूभार सगुणरुप धरिलें मनमोहना ॥
दुष्ट मर्दुनी धर्म रक्षुनी ताराया सज्जना ॥
धरीयला अवतार गोकुळीं सगुण नारायणा ॥
सनक सनंदन वामदेव शुक नारद करि कीर्तना ॥
फणिवर थकला शिणलिं पुराणें महिमा वर्णवेना ॥
छंद ॥ जगदीशा जगदोद्धारा ॥
मदनारि मित्र श्रीवरा ॥
अघ शोषण करुणाकरा ॥
टीप ॥ त्वरा करीं वा वारीं संकट जनार्दना लौकरी ॥
मायबाप गणगोत सखा तूं तुजविण नाहीं हरी ॥ नंदनदना० ॥७
करुणा परिसुनि करुणासिंधू द्रवला जगजीवन ॥
हास्य करुनि स्वच्छंदें वदे गोविंद तिये लागुन ॥

काल कशी बोललास घरिं तूं येशिल आजपासुन ॥
वृषभासुडीं तुज लागिं बळें मीं खांबासीं बांधिन ॥
म्हणोनि तुजला प्रचीत ऐशी दाविली नारायणें ॥
ऐसें ऐकुनी चरणिं लागली नयनें स्रवे जीवन ॥
छंद ॥ मग बोलत ती सुंदरी ॥
अन्याय क्षमा करिं हरी ॥
उपजली दया अंतरीं ॥
टीप ॥ कृपा दिठी पाहतां सुटली ग्रंथि हर्ष निर्भरा ॥
झाली उभयतां गृहा पातलीं नसुनी श्रीकरधरा ॥ ८ ॥
देवनाथप्रभू लीला नाटकिं छळिलों बहुतां रितीं ॥
सत्य सांग हें आह्मीं आतां सोसावें म्हण किती ॥
अनित्य सांडुनि नित्य हाचि हृदिं भरला कीं श्रीपती ॥
बुडवीला संसार आमुचा नाठवे गृहसुतपती ॥
नेणों चेटक फार करुनियां हरिली येणें मती ॥
दिनमपि रजनी साय प्रातर पुत्र तुझा हृद्वतीं ॥
छंद ॥ यावांचुनि दुसरें नसे ॥
पाहूं जिकडे तिकडे तसें ॥
असें येणें लाविलें पिसें ॥
टीप ॥ न सुचे कांहीं गोविंदाविण चित्तिं अन्य दूसरें ॥
नयनाचे आंगणीं उभा हा पाहतां नीरंतर ॥ ९ ॥

## पद (७३)

वाटेवरि हरि उभा कसी मी जाउं यमुने जीवना ।
थर कंपित वाटे शंकित मति जाली जावेना ॥ ध्रु० ॥
मुरली धरुनी अधरीं पाउलें ठेउनियां देहुडीं[1] ।
मार्ग रोधुनी उभा भोंवते वेष्टित व्रजसौंगडी ।
पितांबराची कास कसितसे करीं खांदा घोंगडी ।
मयुर मुगुट शिरीं कर्णि कुंडलें मान करुनि बांकुडी ।
छंद ॥ गाडे शोभति दोहींकडे ।

1 देहुडी=देवडी, दिंडीदरवाजा.

मध्यें घननीळरूपडें ।
फांकली दीप्ति बहुकडे ।
ध्याति मुनिजन गुणगण गाती श्रुति व्यापक त्रिभुवना ।
द्विखड जाल्या अहिपतिजिव्हा महिमा वर्णवेना ॥ वाटेवरी० ॥ १
केव्हांची मी उभी कसी तरी जाऊं यमुनेथडी ।
हरि जाला बावळा मला पाहुनियां घालिल उडी ।
काय करूं मला कांहिं सुचेना सासुग माझी कुडी ।
म्हणेल मजला उशीर कां गे लाविलासि धांगडी ।
छंद ॥ मति काय करूं मी तरी ।
घाबरलें बहु अंतरीं ।
सोडिना मार्ग श्रीहरी ।
भय सासूचें व्याकुळ मानस उभें मला राहवेना ।
बहुलाउनि[1] तरि कोणे येकिकडे नेईल जगजीवन ॥ वाटेवरी० ॥ २
सगुण सांवळा खेळत खेळत मंद टाकि पावलें ।
आपादलंबिनि वनमाला करिं शंखचक्र शोभले ।
चतुर्भुज नवनीरदतनु सुखीं कोटि रवी लोपले ।
नाना परिच्या लीला गाती व्रजगौळ्यांचीं मुलें ।
छंद ॥ फाल्गुण मास साजणी ।
हरि क्रीडत वृंदावनीं ।
व्रज वृंद जालि दाटणी ।
गुलाल बुक्का उडत मध्यें विधिइंद्रासहि रिघवेना ॥
तेथ पामर जावयास हृदि धरी काय भावना ॥ वाटेवरी० ॥ ३
देवनाथप्रभु लीला नाटकी नाथनिरंजन असा ॥
अपांगपातें[2] पाहतां मजला सोडिल सांगा कसा ॥

---

१ बहुलावुनि, भुलवून, फुसलावून. २ अपांगपातें=अपाग ( अपांगः अपागं अशीं पुल्लिंगी व नपुसकलिंगी दोन्हीं रूपें ) म्हणजे डोळ्याचा बाहेरील–कोपरा, वाकड्या नजरेनें धांगडी–द्वाड बहाटळमुलगी या शब्दाचें मूळ फारशींतून असावें काय ! मोल्स्वर्थच्या कोशांत धांगड (स्त्रीलिंगी) द्वाड आडदांड पोरगी; धांगड अथवा धांगडा ( विशेषण )=जाडाभरडा दोरा, ओबडधोबड माणूस अथवा जनावर, धांगडणें=धांगडधिंगा घालणें; धांगडा=धांगडी=धांगला =धांगड-धिंगा, इतके शब्द व त्यांचे अर्थ दिलेले आहेत

त्रिदाभिमानी पूर्ण ब्रह्म ह्या श्रुति गाती संरसा ॥
पतितपावन गर्जे ऐसा निजनामाचा ठसा ॥
छंद ॥ तो हरी नैनिं देखिला ।
संशयो समुळ आटला ।
जिव जीवपणा मूकला ॥
दुसरें येणें जाणें खुडलें कांहिं मला आठवेना ॥
गलितभेद भवभ्रांती फिटली तुरली देहभावना ॥ वाटेवरी० ॥४

## कृष्ण-मुरली.

### पद ( ७७ )

निबिड सघन हे [1]मध्यशार्वरी हरि वाजवि मुरली ।
मम मानस वश झालें विशेषें नति त्या रविं मुरली ॥ ध्रु० ॥
भर्ता भोक्ता आलिसुमशरतनुअब्जि ऐक्य असतां ।
भव्य सुखद रव मंजुळ गुरुतर तैं श्रवणीं बसतां ॥
हिमनगजापतिचा-अरिसा[3]यक होय हृदयीं सलता ।
पद्चालीं अलि तसेंच वृंदावनिं कोणी नसतां ॥
चाल ॥ लागला छंद त्या रवांत सुम[4]नाचा ॥
विगलीतवसन पथ धरीत भ्रमणाचा ।

१ निबिड सघन मध्यशार्वरीः-मेघ आल्यामुळें काळाकुट्ट अंधार पडलेल्या मध्यरात्रीं हरि मुरली वाजवि. शार्वरी= रात्र. २ ( भर्ता भोक्ता आलिसुमशर तनु अब्जि ऐक्य असताः-भर्ता भोक्ता हाच कोणी अली म्हणजे भ्रमर हाच सुमशर म्हणजे मदन याचें माझ्या तनु अब्जीं ऐक्य असतां ( माझा भ्रतार मजशीं रममाण असतां ) मुरलीचा भव्य सुखद गुरुतरमंजुळ रव कानीं पडतां हिमनगजापतीचा अरि मदन याचा सायक बाण हृदयीं सलता झाला. ३ हिमनगजा पार्वती तिचा पति शिव त्याचा अरि जो मदन त्याचा सायक म्हणजे बाण गोपींच्या हृदयांत मदनबाण सलता होय. म्हणजे ती कामव्यथेनें विव्हल झाली. ४ सुमनाचा या ठिकाणीं स्वमनाचा अशी शब्द योजना केल्यानें अर्थ ज्यास्त चांगला जुळतो.

लक्षोनि अयन चालत फणिशयनाचा ॥

टीप ॥ प्रपंचिं अरुची धरि, रुचि हरिपदसरोजाचि वरिली ।

तगमग अति जिविं लगबग करुनी वनवृंदीं शिरली ॥ निवि० १

कनककमलमृदुमृणालअशनी वहन गहन ज्याचें ।

मुक्तिमुखगत प्रमुख मनोहर मुख तत्पितयाचें ॥

बालमेहरशत लज्जितगति, बा ! भालचंद्र ज्याचें ।

नाम जपत, शम दाहा गरळगळ, रूप वंद्य प्रभुचें ॥

चाल ॥ मनमीन आकळी बळें प्रेमसूत्रें ।

रवबाण हाणितां भेदि मोहयत्रें ।

तनुभावरहित जाहलीं गलित गात्रें ॥

टीप ॥ रमारमण निजवदन विलोकुनि मति जी अनुसरली ।

---

१ अयन=रस्ता, कृष्ण जिकडे आहे तिकडचा रस्ता लक्षून मीं चालू लागली हा सर्व ओळीचा अर्थ. २ प्रपंचिं अरुचि = संसाराबद्दल तिटकारा ३ रुचि हरिपदसरोजाचि वरिली = हरिच्या कमलरूपी पायाची मीं आवड धरिली ४ वनवृंदीं = वनांतील झाडींत ५ कनक कमल मृदु मृणाल इ०-तों रूप वंद्य प्रभुचें:--कनकमल म्हणजे मानससरोवरांतील सुवर्णकमल याचे मृदुमृणाल म्हणजे कोमल नाल, याचें अशन करणारा तो कनककमल, मृदुमृणाल अशनी मानससरोवरातील राजहंस तो ज्याचें गहन ( उत्तम ) वहन ( आसन ) असा जो ( ब्रह्मदेव. ) मानससरोवरातील सुवर्णहंस कनककमलाचीं देठें खातात, ब्रह्मदेवाचे वाहन आहेत, आणि नीरक्षीराचा निवाडा करतात हा कविसमय सुप्रसिद्ध आहे तत्पितयाचें ब्रह्मदेवाचा बाप जो विष्णु ( येथें कृष्ण ) याचें मुख प्रमुखमनोहर (अत्यंत मनोहर विशेष मनोहर) असून मुक्ति मुखगत ( मुक्तिदायक ) आहे. बालमहरशत=शत बालसूर्य, लज्जितगति होतात प्रभुरूपापेक्षां आपले रूप उणें म्हणून भालचंद्र शंकर ज्याचें नाम जपत, ( आणि तेणेंकरून ) गरळहालाहलदाहा भालचंद्राच्या कंठाचा शम पावे असें प्रभूचें वंद्यरूप मेहर हा फारशी शब्द आहे ६ मनमीन आकळी बळें प्रेम-सूत्र—प्रेमरूपी जाळ्यानें तो ( हरी ) ( माझे ) मीनरूपी मनाला मोठ्या जोरानें आवळून टाकतो प्रणयाविद्ध मनाला " जशी काय जीवनाविण मासळी " ही उपमा आमच्या कवींनीं वारंवार दिली आहे ७ रवबाण हाणितां भेदि मोहयत्रें = माझे मनाला त्या मुरलीच्या आवाजानें मोह पाडून ( हरीनें ) त्या रवानें माझ्या मनाचा भेद केला.

गरसम[1] घर करि हर हर रवगति हृदयीं सचरली ॥निबिड०॥ २
सजल सघन घन वळला गरगर संभर स्रवति बिंदू ।
सजल चीर[3] अति रुचिर समीरणें ये साधित द्वंद्व ॥
न गणुनि श्रम सम मानस धरी ईशपदांबुजि छंदू ।
आनंदसिंधु दिनबंधु रविजातटिं ब्रह्मानंदू ॥
चाल ॥ स्वानंदपूर्ण निरखितां रूप नयनीं ।
समरसें चित्त सांठवी हृदयभुवनीं ॥
नासला भास जाहला ऐक्य मिळणीं ॥
दीप ॥ पूर्ण ब्रह्म गोविंदजिची श्रीमूर्ति मनीं भरली ।
देवनाथ सायुज्यवृत्ति त्या सुखांत तरतरली ॥ निबिड० ॥ ३

## पद ( ७८ ).

वाजविलिस त्वां कशी मदनमोहना चक्रपाणी ।
जळो आग लागो रे ! तुझि मुरली हे घरघेणी ॥ ध्रुवपद ॥
मध्यरात्रिचे अवसरिं निसूर निज आली मजला ।
निचेष्टीत मी झालीं असतां भ्रतारसेजेला ॥
मुरलीरव अतिमधुर सुस्वर स्वर कानीं शिरला ।
दचकुनि उठलीं कांहिं सुचेना जीवच घाबरला ॥
तशीच झालें बावरी मग त्यां कुंजमार्ग धरिला ।

---

१ गरसम=घराला गराची उपमा मोरोपंतानींही दिलेली आहे " गरसम घर सम जानिया हरिनामामृतरसांत तरतरले " मोरोपंत. 'स्वगति' ऐवजी 'ध्वनी कशी' पाठ आहे असें श्रीमंत दाजीसाहेब देशपांडे कळवितात. २ संभर स्रवति बिंदु=जोरानें पावसाचे थेंब पडू लागले ३ चीर=वस्त्र ४ समीरण=वारा ५ ये साधित द्वंद्व=दावा साधतो एकीकडे पावसानें भिजतो, आणि त्यांतच वाऱ्यानें वैर साधल्यामुळें ओल्या वस्त्रावर वारा लागुन थंडीनें कुडकुडतो हें अभिसारिका वर्णन आहे. ६ रविजातटीं = यमुनेच्या तीरीं हा आनंदसिंधु ( कृष्ण ) मुरली वाजवीत असल्याकारणानें पूर्ण ब्रह्मानंद त्या यमुनेच्या तिरीं आहे छापील प्रतींत रवि ज्या व तटीं असे तीन शब्द निरनिराळे लिहिलेले आहेत, पण तो रविजातटीं असा पाहिजे रविजा म्हणजे सूर्यकन्या यमुना नदी तिच्या तटीं म्हणजे तीरावर ७ निसूर = गाढ ८ तशीच झाली बावरी मग त्यां कुंजमार्ग धरिला'—श्रीकृष्णाचा मुरलीरव ऐकून गोपींना किती वेड लागले ह्याबद्दल वामनपंडितांचें वर्णन फारच मनोहर आहे रासक्रीडेमध्ये वामन म्हणतात

( पुढील पृष्ठ पहा. )

घोर निशीं अतिभ्यासुर गगनीं मेघ वळुनि आला ॥
गजशुंडाहत धारा गर्जुनी वर्षतसे पाणी । जळो० ॥ १
सजल चीर जाहलें शीत सुटलें कंप अंगा ।
खडखड वाजति दांत होत प्राणांत कलुषभंगा ॥
कष्ट बहुत संकष्ट परि न मानोनि अंतरंगा[1] ।
पदिं अनवाणी कुंजवनीं मी आलें श्रीरंगा ! ॥
ऐसा करिसी काय म्हणुनि सोसणें किती दगा ।

---

( २५६ पृष्ठावरून समाप्त )

कृष्णानुरक्ता पहिल्याच होत्या । वेणु ध्वनी आयकतां अहो त्या ॥
आधींच कृष्णा सकला सकामा । पावा करी फारच वृद्धि कामा ॥
वेणु तो परिसतां व्रजदारा । चालिल्या त्यजुनियां गृहदारा ॥
टाकिलीं सकलही गृहकामें । व्याकुळा परम होउनि कामें ॥
दुहिति त्या त्यजिती निजदोहनें । मन असे हरिलें मनमोहनें ॥
त्यजुनि रांधण वाढण धावल्या । त्वरित कृष्णपदाप्रति पावल्या ॥
स्तन धरूनि मुखीं पिति लेंकुरें । त्वरित लोटुनियां निकरें करें ॥
द्विरदराजगती गजगामिनी । हरिसि पावलिया व्रज कामिनी ॥

त्या इतक्या बावऱ्या झाल्या कीं आर्यमार्गसुद्धां सोडायला तयार झाल्या.

शरदिंदु यामिनी, वेणुरवें कामिनी । जाती गजगामिनी, प्रेमें हरिच्या ॥
कामें सर्व सोडिती, आर्यमार्ग मोडिती । गृहपाश तोडिती, प्रेमें हरिच्या ॥
दोहनें वधुजनें, त्यागिलीं सभाजनें । चित्त भवभजनें, वेधिलें असें ॥
एकी अन्नें काढितां, स्वजनासि वाढितां । वेणू कानीं पडतां, त्याही धांवल्या ॥
एकी शेष जेविती, एक पती सेविती । त्याही वेगे धांवती, काम विव्हला ॥
एकी स्तनीं लेंकुरें, जातां लोटुनि करें । शासने भयकरें, ते निघाली ॥
विपरीत भूषणें, दिसती न दूषणें । चित्तीं व्रजभूषणें, वेध लाविला ॥
एकी नाकीं बाळिया, कानीं मोती ल्यालिया । त्याही वेगें आलिया, जेथे हरी तो ॥

ईश्वराच्या मुरलीवादनानें त्यांचे अष्टभाव हरिपदीं लीन झाले आणि

वडिलीं वर्जिलिया, पतिनीं गांजिलिया । तरी नाहीं लाजलिया, पावल्या हरी ॥
त्यागुनि मताभिमान, स्वकुल अभिमान । गातो विना तान मान, वामन गुण ॥

१ अंतरंगा=स्वमनांत.

व्रज सोडुनियां जावें योगीमानसाब्जभृंगा ॥
कोठुनि कैंची आणियली सवत महामोहिनी । जळो० ॥ २
आम्ही भोळया झालों बावऱ्या सकळहि व्रजनारी ।
भुलविलें आमुचें मानस, पाणी घातलें संसारीं ॥
विश्वव्यापका चित्तचाळका गोवर्धनधारी ।
कोणि तुला शिकविना नदनंदना पूतनारी ! ॥
काय करावी गती सांग श्रीपति ! हे निर्धारी ।
ध्यास तुझा हृदयास निशिदिनीं मधुकैटभारी ॥
प्रपंच धंदा कांहिं सुचेना नावडे अन्नपाणी । जळो० ॥ ३
देवनाथ प्रभु गुरु गोविंदा कां रे ! असा छळसी ।
बहुत श्रमलीं आवरीं आतां वृत्ति झाली पिशी ॥
मान विनवणी प्राणविसांव्या ! अंत किती पाहसी ।
तोडिं समुळ तरि मायावल्ली श्रीमत्हृषिकेशी ॥
दुःख वाटतें मनीं लोकईषणा मला ग्रासी ।
म्हणउनि विनवणि अशि मुरली कां मोहक वाजविसी ॥
आसनीं शयनीं भोजनीं गमनीं रूप तुझें नयनीं ॥जळो०॥४

पद ( ७९ ).

अहा रे ! मेल्या कृष्णा । वाजविली कैसी मुरली ॥ ध्रुवपद ॥
तुझ्या मुरलीची मधुर ध्वनी । अकल्पित पडली श्रवणीं ।
विव्हल झालीं अंतःकरणीं । गृहधंदा मी विसरलीं ॥ अहा रे० ॥ १
तुझ्या मुरलीचा सुस्वर तान । ऐकुनि विसरलीं देहभान ।
गृह सोडुनियां धरलें रान । वृंदावनांत मी शिरलीं ॥ अहा रे०॥ २
मुरली ना हे केवळ बाण । माझा हरियेला प्राण ।
संसार केला दाणादाण । हृदयीं येऊन संचरली ॥ अहा रे० ॥ ३

---

१ व्रज सोडुनिया जावें:—गोकुळांतील लोक नंदयशोदेला देखील असेंच लडिवाळपणानें भेवडावीत. २ गृहधंदा मी विसरली'—भागवतांत दशमस्कंधांत मुरलीचा रव ऐकून गोपींची कशी काय स्थिति होते हें खालील श्लोकांत वर्णन केलें आहे.

( पुढील पृष्ठ पहा )

दीनानाथ गुरुगोविंदा । पतितपावना परमानंदा ।
देवनाथ भजनीं धंदा । वृत्ती तव रूपीं जडली ॥ अहा रे० ॥ ४

पद ( ८० )

वृंदावनीं हरिनें अतिमंजुळ वाजविला सये ! वेणू ॥ ध्रुवपद ॥
वाहातसे मुरलीमधें ये राधे ! । भुललि काय मी नाणू[1] ॥ वृंदावनीं० ॥ १
मागतसे भलतेसें हें दान । बैसविली याणें कान्हू[2] ॥ वृंदावनीं० ॥ २
देवनाथ प्रभु नाथ निरंजन । मूर्ति मनोहर सानू[3] ॥ वृंदावनीं० ॥ ३

पद ( ८१ )

मुरली वाजविली कृष्णानें । नंदाच्या कान्ह्यानें ॥ ध्रुवपद ॥
रात्र झालीसे दों प्रहर । मधूर मुरलीस्वर ॥
कानीं पडताती सुस्वर । विव्हळ झालें अंतर ॥
बाई मोहियलें मनमोहनें । नंदाच्या० ॥ १
बाई ऐका गे, सखे ऐसी । छाळितो हा हृषीकेशी ॥
घालुनि मुरलीमधें मोहनीसी । वृत्ती केली पिशी ॥
बाई मोहियलें मनमोहनें । नंदाच्या० ॥ २

---

( २५८ पृष्ठावरून समाप्त. )

दुहन्त्योऽभिययु' काश्चिद्दोह हित्वा समुत्सुकाः ॥
पयोधिं श्रित्य संयावमनुद्वास्यापरा ययुः ॥ ५ ॥
परिवेषयन्त्यस्तद्धित्वा पाययन्त्यः शिशून्पय' ।
शुश्रूषन्त्यः पतीन्काश्चिदश्नन्त्योऽपास्य भोजनम् ॥ ६ ॥
लिम्पन्त्यः प्रमृजन्त्योऽन्या अञ्जन्त्यः काश्च लोचने ।
व्यत्यस्तवस्त्राभरणाः काश्चित्कृष्णान्तिकं ययु ॥ ७ ॥
ता वार्यमाणाः पतिभिः पितृभिर्भ्रातृबन्धुभि ।
गोविन्दापहृतात्मानो न न्यवर्तन्त मोहिताः ॥ ८ ॥
अन्तर्गृहगताः काश्चिद्गोप्योऽलब्ध विनिर्गमाः ।
कृष्ण तद्भावनायुक्ता दध्युर्मीलितलोचनाः ॥ ९ ॥
दुःसहप्रेष्ठविरहतीव्रतापधुताशुभाः ।
ध्यानप्राप्ताच्युताश्लेषनिर्वृत्त्या क्षीणमङ्गला' ॥ १० ॥

—भागवत दशमस्कंद अध्याय २९.

१ नाणू = नेणू. २ बैसविली याणें कान्हू = म्हणजे काय ! ३ सानू = लहान.

अतारसेजेला, अगे पलंगीं । निजलीं मी रतरंगीं ॥
मुरलीस्वर तेव्हां अतिसगी । शिरला अंतरंगीं ॥
तशीच चालली गे । धडक्यानें । नंदाच्या० ॥ ३
पाहतां मुरलीचा स्वर बाई । ऐसा त्रिभुवनिं नाहीं ॥
चेटकि[1] नाटकी अग बाई । मोठा शेषशायी ॥
ग्वाही दीधली, वेदानें । नंदाच्या० ॥ ४
देवनाथाचें मन नादें । मोहियलें गोविंदें ।
लागुनि भजनाच्या निजछंदें । रमवीलें स्वानंदें ॥
वृत्ती झालीसे तल्लीन । नंदाच्या० ॥ ५

## पद (८२).

मधुर अलापें सुरस वाजवी मानसमोहक हरी ।
जळो गे ! मुरली याची बहुकहरी[2] ॥ ध्रुवपद ॥
मध्यरात्रिचा समय सखे ! मी निजलें पतिसह शयनीं ।
अकल्पित येउनि पडली मम श्रवणीं ॥
जीव घाबरा कांहीं सुचेना विव्हळ झालें मनीं ।
आलें पद्चाली यमुनापुलिनीं ॥
सजल सभर हे बिंदु टपकती मेघ वळला गगनीं ।
चमकति सौदामिनी[3] त्या अति कडकडोनी ॥
टीप ॥ घोर शार्वरी नयनीं दिसेना भयभीत अंतरीं । जळो० ॥ १
बहुत हिंपुटी[4] फिरतां सखये, एकट मी त्या वनीं ।

---

१ चेटकि नाटकी अगबाई:—
ईश्वराची चेटकी नाटकी माया कशी आहे याचें वर्णन मध्वमुनीश्वरांनीं आपल्या एका पदांत केलें आहे तें पद येणेंप्रमाणें:—

मन मोहन यादवराया रे ! ॥ ध्रु० ॥
वामन होउनि दान तू मागसी । लहान मानवी काया रे ! ॥ मन० ॥१॥
दंड कमडलु मंडितसे तनु । पूजितसे नृपजाया रे ! ॥ मन० ॥ २ ॥
यमुना जळामाजी खेळ तूं खेळसी । चेटकि नाटकि माया रे ॥ मन० ॥३॥
कीर्ति सदोदित मध्व मुनीश्वर । मागतसे गुण गाया रे ॥ मन० ॥ ४

अ. क. प स. भाग ३ पद १५०.

२ बहुकहरी = फार कहर करणारी ३ सौदामिनी = वीज ४ हिंपुटी = हिंपट = थकलेला, कटाळलेला, खिन्न.

हरिच्या विरहें व्याकुळ हृद्भुवनीं ॥
मदनबाण केरी उठाण प्राण जाईल कीं ये क्षणीं ।
वाटतें अश्रु लोटले नयनीं ॥
तुंबळ यमुना भरली दुथडी खळखळ वाजे पाणी ।
सावजें बोभातीं गे त्या जिवनीं ॥
टीप ॥ परम समय हा कठिण पातला काय करूं सुंदरी ॥ जळो० ॥ २
मुरली नव्हे गे केवळ चेटक, वाजवि धरुनि अधरीं ॥
आम्ही पिशाच झालों व्रजनारी ॥
मोहियलें गे ! मनास येणें ठकडा हा पुतनारी ।
घातलें पाणी आमुचे संसारीं ॥
त्राम दिधला या मनमोहनें सोसावें किति तरी ! ।
सोडुनी जावें हे गोकुळनगरी ॥
टीप ॥ थकित जाहलें काय करावें छळतो ग नानापरी ॥ जळो० ॥ ३
देवनाथ प्रभु श्रीगोविंदें हरियेलें गे ! मना ।

---

१ करि उठाण – जोर करणें, उसळी मारणें. येथें हा शब्द देवनाथांनीं पुल्लिंगी किंवा नपुसकलिंगी योजिला आहे कोण जाणे, बाकी वामनपंडितांनीं हा शब्द नपुसकलिंगी योजिला आहे. " श्रीरामरूपीं शरचाप हातीं । हा भाव गाली हरिचा पहातां ॥ ते दाविती श्रीहरिदास ठाणें । प्रेमें मनाचीं उठतां उठाणें." हरिविलास ७–२४. २ बोभाती = ओरडतात. ३ ठकडा हा पुतनारी, घातलें पाणि आमुचे ससारीं :–यानें आमच्या संसारबंधनाचा छेद केला, आमचा अनेक जन्मार्जित कर्मसंचय हरिला, आणि नुसतें नाम आमच्या स्वाधीन केलें. असा हा लबाड. त्यालाही महाठक भेटतात भगवद्भक्त. " जो या त्रैलोक्याचा ठक । त्या ठकाचे वेद पाठक । त्या ठकासही महाठक । बरा पुंडलिक भेटला"॥ प्रल्हादकृत पांडुरंगमहात्म्य. मोरोपंत म्हणतात कीं, श्रीकृष्णठकाला नामदेव हा महाठकडा भेटला —

' हा विठ्ठल ठक ठकिले ठक, ठक पडिलें ठकासि जो हरितो ।
नामचि देतो दाउनि निजार्थ जनसंचितार्थ सहरितो ॥ १ ॥
यासहि नामा ठकडा भेटे मग यासि ठकविलें तेणें ।
सद्गुणगायन निपुणें बेधियला कृष्णसारसा जेणें " ॥

असाच श्लोक पांडवगीतेंत आहे:—

' नारायणो नाम नरो नराणां । प्रसिद्धचोरः कथितः पृथिव्याम् ।
अनेकजन्मार्जितपापसंचयं । हरत्यशेषं स्मरतां सदैव. "

लव पल क्षण हरिवांचुनियां गमेना ॥
अशनीं शयनीं भोजनीं गमनीं हरिविण अन्य दिसेना ।
हरिचें भरलें गे ! रूप या नयनां ॥
दिनमपि रजनी सायंप्रातर नामामृतरसरसना ।
सेवितां जडली वृत्ति हरिचरणा ॥
टीप ॥ समरस स्वरुपिं समाधिसोहळा भोगित स्वसुखाभरी ॥जळो०॥४

## पद (८३).

निश्चळ ससमिर यमुनानिर दे लहर उष्णकाळीं ।
तटिनिकटीं जगजेठी ओष्ठपुटीं वेणु कवळी ॥ ध्रु० ॥
कदंबवृक्षीं मुमुक्षुदानी वेणु अधरिं धरिला ।
मत्त स्वर षड्रागरागिणी बिभास आळविला ॥
तंत वितंत घन सुस्वर सोरट राग वदला ।
जळचर भूचर खेचर वनचर समूदाय जुळला ॥
चाल ॥ तंव वृषभानुसुता ते राधा । गृहिं अनयाचे करितां धंदा ।
वेणुस्वर ऐकुनि गोविंदा । हृदयीं विव्हल झाली मुग्धा ॥
टीप ॥ चंद्रनभाची अभा क्षितीवरी पडली निशिकाळीं ।
मृगनयना गजगमना आली श्रीकृष्णाजवळी ॥ निश्चळ० ॥ १
ये हे राधे ! ऐसी ध्वनी मुरलीमाजि वाहे ।
शुष्क द्रुमपत्र खडखडती हरि चकित पाहे ॥

---

१ ससमिर = वायुसहित. उष्णकाळीं ( उन्हाळ्यांत ) निश्चळ ( नेहमीं स्थिर वाहणारें ) यमुना निर ससमिर लहर दे ( वायूची मन्द झुळूक आली असतां हेलकावे खातें ) असा अन्वय. २ जगजेठी = जगांत सर्वापेक्षां श्रेष्ठ जेठी–हा शब्द जेष्ठिन् या शब्दापासून झाला आहे पुट = कोणत्याही वस्तूचा द्रोणासारखा आकार करतात तो तटीनिकटा = कांठावर बसून ओष्ठपुटीं = ओंठाला जोडून. त्यांत मुरली धरून ( हस्तपुट, कर्णपुट, अजलिपुट, असे वेगळे समास आहेत. ) ३ अभा = कांति, शोभा चंद्रानें व्याप्त अशा नभाची अभा पडली. ती अभिसारिकेला अनुकूल अशी थोडकीशी काळी पडली. नुसती चंद्राची अभा असती तर काम व पद दोन्ही बिघडती.

कामकुरंगी खंजरीटनयना ये उभि राहे ।
त्वपद् निरसुनि तत्पद् शोधुनि असिपदिं सुख लाहे ॥
चाल ॥ हे वेदश्रुति मुख्य जाणा । हरिसुख घ्याया आली सगुणा ।
केवळ शामविलासिनि तरुणा । चुंबन देउनि पाहे वदना ॥

---

१ कामकुरंगी = कामानें विव्हल झालेली हरिणी ( त्याप्रमाणें शोभणारी ). रामजोशांनीं ' कामिकुरंग ' असा पुल्लिंगी शब्द योजिला आहे " नितंबिनी वागुरा पसरल्या कामि कुरंगाला " रामजोशी २ खंजरीटनयना–खंजरीट हा एक प्रकारचा पक्षी आहे. ३ त्वपद्निरसुनि तत्पद् शोधुनि असिपदिं सुख लाहे= जीव ब्रह्म आहे म्हणजे जीवात्म्याचें व ब्रह्माचें ऐक्य आहे हे दाखविण्या-करिता वेदांत ग्रथांत ' तत्त्वमसि ' ह्या वाक्याचा उपयोग केलेला आहे. त्वंपद् = मनुष्याचा स्वतःचा जीव तत्पद् = ईश्वर, ब्रह्म. असिपद् = जीव व ईश्वर याची मिळणी म्हणजे ऐक्यता होणे राधेनें त्वपद् निरसुनि म्हणजे आपला अहंभाव किंवा जीवभाव सोडून देऊन, तिनें तत्पद् शोधून म्हणजे ब्रह्मपद् शोधून किंवा कृष्ण परमात्मा हा साक्षात् परब्रह्म आहे असें जाणून ती असिपदाचेठायीं सुख पावली म्हणजे ती ईश्वरस्वरूपीं निमग्न होऊन तन्मय झाली. ती आपल्या देहभावाला विसरून कृष्णमय झाली श्रीकृष्णाची मुरली ऐकून राधाकृष्णाविषयींच्या विचारामध्यें इतकी गढून गेली कीं, ती आपल्या स्वतःला विसरून जाऊन कृष्णमय झाली त्वपद्तत्पदाच्या एकरूपत्वानें असिपदाची आनंदसमाधी कशी प्राप्त होते याबद्दल मुक्तेश्वरानीं आपल्या रंभाशुकसंवादात श्रीशुकयोगींद्रांकडून वदविलें आहे—

" बुद्धिबोधा होय मिळणी । चित्तचैतन्या बुजावणी ।
अहंता राहे सोहंपणीं । मन उन्मनी तल्लीन ॥ ३११ ॥
या उभयताचा संयोग । तया म्हणिजे **योग** ।
ते संसारी सुखसंभोग । तें योगांतर जाणिजे ॥ ३१२ ॥
कीं तत्पद् ऐसें बोलिजे शिवा । त्वपद् ऐसें जीवा ।
दोघे येती ऐक्यभावा । तें असिपद् बोलिजे ॥ ३१३ ॥
दोघांचिये मिळतिये संधी । लाधे महत्वानंद समाधी ।
तेचि योगांत बुद्धी । आत्मविद्या मानिली ॥ ३१४ ॥
तेही कळा करूं उघडी । उकलू गुह्याची घडी ।
गुणग्राहक जोडी । जों जे स्वरूप ऐकता ॥ ३१५ ॥
ऐका तत्पद् तो ईश्वर । तो जाणावा द्विप्रकार ।
मायाशबल ब्रह्मविकार । हा वाच्यार्थ तिहींचा ॥ ३१५ ॥

( पुढील पृष्ठ पहा. )

टीप ॥ जघनिघटघटसठ भरूनी उरला अंतराळीं ।
मीमांस सांख्यामति प्रकृति पुरुष राधेजवळीं ॥ निश्चळ० ॥ २
कुंजवनीं तो चक्रपाणी विलसित राधेसीं ।
विरामरामा मेघश्यामा जडली स्वरूपासीं ॥
त्रिकुट श्रीहाट गोल्हाट औटपिट ब्रह्मरंध्रामीं ।
सुख भोगितसे राधा धरुनि स्पर्धा सगुणासी ॥
चाल ॥ मधुरिपु भोगी सुख सायासीं । कुंजवनीं क्रीडे कृष्णासीं ।
महामहा योगी जपतपरासी । परि ते ध्याना न ये कवणासी ॥
टीप ॥ गोपगडी संवगडी थर्डावरि कडोविकडि न्याहळीं ।

---

( २६३ पृष्ठावरून समाप्त )

माया विनिर्मुक्त निष्कंप । सत्य ज्ञानानंद स्वरूप ।
तोचि लक्ष्यार्थ निर्लेप । परमात्म्याचा जाणिजे ॥ ३१७ ॥
त्वंपद तो जीव सहजे । तोहि द्विधा जाणिजे ।
वाच्य लक्ष्य हें बोलिजे । उभयांश तयाचे ॥ ३१८ ॥
स्थूल सूक्ष्म दोन्ही देहे । परि वेष्टुनी चैतन्य राहे ।
तोचि वाच्यार्थ म्हणिजे पाहें । सबळ अंश जीवाचा ॥ ३१९ ॥
देह द्विधा विनिर्मुक्त । प्रत्यक्चैतन्य निर्धूत ।
तोचि बोलिजे लक्ष्यार्थ । जीवात्म्याचा निर्धारें ॥ ३२० ॥

१ जघनिघट—ही ओळ खरी काय आहे ? हीच कल्पना पांडुरंगकवींनीं आपल्या रामगौरवांत उत्तम वर्णिली आहे

“ घटामठां व्यापुनियां निराळें । राहें स्वयें आपण कीं निराळें ।
सर्वांतरीं राहुनि तूं तसाची । वेदांत बोले असि गोश साची ॥ ”

अशींच पदें वर्णीकर गोविंदराव महाराजांचीं आहेत वैदर्भकाव्यसंग्रह-दिदृक्षूंनीं तीं काव्यसंग्रहा( निर्णयसागर )मध्ये पहावीं देवनाथांचे वरील पद योगपर आहे गोविंदरायांचीं भक्तिपर आहेत

नेति नेति इतिहास परी निगमवचनोक्तिः—एकनाथ महाराज म्हणतातः— “ ज्यासि आदि ना अंतु । जें मध्यस्थिति रहितु । जें गुण ना गुणातीतु । अच्युतानंतु अद्वयत्वें ॥ ६८० ॥ त्या स्वरूपाचा वचनपाठ । करावया वेदें केली सटपट । तेथ श्रुतीचाही बोभाट । लाजिला करूनि कष्ट नेति नेति वादें ॥ ६८१ ॥ वेदू काय नेणोनि परतला । जाणोनि न बोलवेचि बोला । याचि लागीं तो मौनावला । तटस्थ ठेला निःशब्दें ॥ ६८२ ॥ शब्दांतीं ब्रह्मज्ञान । हे वेदें पावोनि पूर्णखूण । शब्दें शब्द निषेधून । दृढ मौन तेणें धरिलें ॥६८३॥

तंव गोकुळिंच्या मुग्धा आल्या मिनल्या वनमाळी ॥निश्चळ०॥३
षोडशदळ द्वादशदळ द्विदळच्या दोन्ही युवती ।
दशदळ षडदळ चतुर्थदळिं सगुण हरितें पाहती ॥
नामरूपातित वस्तु त्या गोपी तैं सुख घेती ।
नेति नेति इतिहास परि निगमवचनोक्ति ॥
चाल ॥ ऐशी वस्तू रासोल्हासीं । यामिनि मानी गोपीकांसी ।
लीला नटला मृग क्रीडेसी[1] । न वर्णवे हो ! या जिव्हेसी ॥
टीप ॥ देवनाथ भावार्थ कवी चरणारविंदजवळी ।
जेणें जपतपसाधन तव गुणमहिमा मी बरळीं ॥ निश्चळ० ॥ ४

## पद (८४).

या गोविंदें मुरलीनादें मोहियलें मन गडे ! ।
हरिरुप अखंड नयनापुढें ॥ ध्रुवपद ॥
भुवनसुंदरें गुणमंदिरें वाजविली मोहरी[2] ।
कीं नादें मम मानस मोहरी[3] ।
निर्विकारें, श्रीमुरारे ! केली ग ! बोहरी[4] ।
कीं अवघा प्रपंचमद संहरी. ॥
चाल ॥ या हरिलागीं काय म्हणावें ।
सांग सखे ! तरि किति सोसावें ! ।
कांहीं सुचेना काय करावें ॥
टीप ॥ मन हें झालें वेडें ॥ हरिरुप० ॥ १
नंदनंदनें या मधुसूदनें लाविलें गे ! ऐसें ।
कीं जनिंवनिं अवघा आपण दिसे ॥
कंसमर्दनें, मुरलिवादनें, अघटित केलें कस ? ।
कीं आभास कांहिंच उरला नसे ॥
चाल ॥ नवल वाटलें मला सुंदरी ।
नेणों जालें काय कसि परी[5] ।

---

१ मृग क्रीडेसी—म्हणजे काय ? या पाठांत कांहीं घोंटाळा आहेसा वाटतो.
२ मोहरी = मुरली. ३ मोहरी = मोही ४ बोहरी = वाईटपणा, सत्यनाश.
५ परि = प्रकार. मी बरळीं = मी बरळतों, बडबडतों, नेणतेपणें बोलतों.

पाहतां यातें बाह्य अंतरीं ॥
टीप ॥ व्यापक हा चहुंकडे. ॥ हरिरुप० ॥ २
कुंदरदन सुखसदन अगे ! हा मदनदहनप्रियगडी ।
सांवळा क्रीडत यमुने थडीं ॥
राजस सुंदर मूर्तिमनोहर जो गोवळ संवगडी ।
वर्णितां श्रुतिशास्त्रां सांकडी[1] ॥
चाल ॥ जो योगी हृद्ध्येय हरी हा ।
स्मरतां भव दुष्कृत संहरि हा ।
वेणु वाजवी नानापरिहा ।
टीप ॥ ओढी आपणाकडे. ॥ हरिरुप० ॥ ३
आम्ही अबळा या व्रजबाळा नेणों याची गती !
वेणुरवें भुलली आमुची मती ॥
लागट होउनि या हृद्भुवनीं नंदात्मज यदुपति ।
भोगवी समाधिसुखसंविती ॥
चाल ॥ समाधिव्युत्थानीं हरि विलसे[2] ।
याविण कांहीं अन्य न भासे ।
देवनाथ गुण वर्णित ऐसे ॥
टीप ॥ मौन हें वाचे पडे[3] ॥ हरिरुप० ॥ ४

## पद ( ८५ ).

मंद मंद वाजवि गोविंद मुरली. ॥ ध्रुवपद. ॥
वृंदावनीं वृंद गोपवृंदसह मुकुंद हरि ।
मदनदहनप्राणमित्र[4] अधरिं कसा धरली ॥ मंद० ॥ १

---

१ सांकडी = अडचण, काठिण्य २ व्युत्थान = तिरस्कार, आडकाठी; ध्यानावसर्जन, तपस्यादिकाची समाधि. येथें दुसरा अर्थ लागतो सदोदित चित्ताची समाधी केलेल्या मनुष्याला समाधीस्थितींचें आकलन झाल्यावर ईश्वरैक्य होतें म्हणून तेथें हरि विलसे असें पद योजिलेलें दिसतें ३ मौन हें वाचे पडे:—“ मनाचें मनपण गेलें । जेथ बोलांचें बोलणें ठेलें । जेयांमाजीं सांपडलें । ज्ञेय दिसे ” ज्ञानेश्वरी ४–१६१ ४ मदनदहन = शंकर; त्याचा प्राणमित्र म्हणजे प्रियमित्र वृंदावनीं वृंद ( देव श्रीकृष्ण ) मुकुंद हरि मदनदहनप्राणमित्र यानें गोपवृंदसह बालगोपालासहवर्तमान उसतांना (मुरली) अधरिं कशी धरली हें कौतुक येथें वर्णिलें आहे

आळवितां तान सुरस संगित रस सुरस कसा ।
मोहियलें चित्त नादें येउनि हृदयीं शिरली ॥ मंद० ॥ २
कुंदरदन सौख्यसदन सच्चिदानंद तनु ।
देवनाथिं श्रवणमननीं मूर्ति मनीं भरली ॥ मंद० ॥ ३

पद ( ८६ ).

तनों तनों त्रों तननन श्रीहरि हा वाजवि मुरली ॥ ध्रु० ॥
वृंदावनकुंजामाजी मधुरध्वनि उठला बाई ! ।
सुस्वर रव श्रवणीं पडला गृहदार न सुचे कांहीं ।
अतिगुरुतर हे तमरजनी मेघाची पडली सांई ।
अतिभ्रमिष्ट चालें मार्गी पडलें मी नादप्रवाहीं ॥ तनों० ॥ १
गीतें संगित तान प्रबंधें रव मोहक त्या मुरलीचे ।

---

१ सांई=छाया, सावली २ गीत संगीत तान प्रबंधें. . सुर असुरादिक स्थिर झाले:—या सर्व ओव्यांतून चराचरादि सृष्टि स्थिरावल्याचें जें वर्णन आहे तें मूळ संस्कृतांतच असून त्यांतून बहुतेक सर्व प्राकृत कवींनीं आपापल्या रुचिभिन्नत्वानें कमी अधिक रंगविलेलें दिसतें. मूळ भागवतांतील श्लोक असे:—

व्योमयानवनिताः सहसिद्धैः । विस्मितास्तदुपधार्य सलज्जाः ।
काममार्गणसमर्पणचित्ताः । कश्मलं ययुरपस्मृतनीव्यः ।
वृन्दशो व्रजवृषा मृगगावो । वेणुवाद्यहृतचेतस आरात् ।
दंतदष्टकवला धृतकर्णा । निद्रितालिखितचित्रमिवासन् ॥
बर्हिणस्तबकधातुपलाशै-। र्बद्धमल्लपरिबर्हविडंबः ।
कर्हिचित्सबल आलिसगोपैः । गाः समाह्वयति यत्र मुकुंदः ॥
तर्हि भग्नगतयः सरितो वै । तत्पदांबुजरजोऽनिलनीतं ।
स्पृहयतीर्वयमिवा बहुपुण्याः । प्रेमवेपितभुजाः स्तिमितापः ॥

श्रीकृष्णाच्या मुरलीचा रव ऐकून जी चराचर विश्वाची स्थिति झाली त्याचें वर्णन सूरदासानीं खालील पदांत केलें आहे

बांसरी बजाय आज रंगसो मुरारी ।
शिव समाधि भूलि गयी मुनि मनकी तारी ॥ बांसरी० ॥ ध्रु० ॥
बेद भनत ब्रह्मा भुले भुले ब्रह्मचारी ।
सुनतही आनंद भयो लगी है करारी ॥ बांस० ॥ १ ॥
रंभा सब ताल चुकी भूमी नृत्यकारी ।
यमुना जल उलटी बहे सुधिना सम्हारी ॥ बांस० ॥ २

( पुढील पृष्ठ पहा )

सुर किन्नर नर तल्लिन ते महिसहित अहिपति नाचे ।
वर्णनीं शिणल्या वाणी, न चले मुख वेद श्रुतीचें ।
शेषाच्या चिरल्या जिव्हा, अघटित गे । करणें याचें. ॥ तनों० ॥ २
मंजुळ ध्वनि सुंदर वाई । वाजवितां पडतां श्रवणीं ।

---

( २६७ पृष्ठावरून चालू. )

श्रीवृंदावन बन्सी बजी तीन लोक प्यारी ।
ग्वाल बाल मगन भयी ब्रजकी सब नारी ॥ वास० ॥ ३ ॥
सुंदर शाम मोहन मुरली नटवर वपु बारी ।
सूर किशोर मदन मोहन चरण कमल बलिहारी ॥ ४ ॥

देवनाथाचें प्रकृत पद तर सुंदर आहेच पण याहीपेक्षा जास्त सुंदर आनंद-तनयाचें पद आहे तें येणेंप्रमाणेः—

वृंदावनिं वाजवि मुरली हरि मंजुळ कुंजविहारी ।
भुलल्या ब्रजनारी, भुलले तरुवर भारी, अतिमंद वाहे वारी ॥ ध्रु० ॥
ऐकताचि मुरलीरव तो महिसहित अहिपति डोले ।
कोकिलादि शुकबक मैना काननीं शब्द न बोले ।
खुटलाचि रविरथ गगनीं, वायू तो मार्ग न चाले ।
चाल ॥ वृक्षाचें पत्र न हाले । अप्सरा नृत्य निमाले ॥
गंधर्व थक्कित झाले ॥ वृंदावनिं० ॥ १ ॥
लुब्धुनिया मग मृगगाई व्याघ्रांवरि टाकिती माना, ।
गर्जना मेघ न करिती नाचती मयूरां जाणा ।
होत्या त्या वन्ध्या ललना प्रसवति त्या पुत्र निधाना ।
चाल ॥ थक्कित ते मधिं नाना । सुर न करिती अमृतपाना ॥
विसरले मुनि जपध्याना ॥ वृंदावनिं० ॥ २ ॥
गुंजारव विसरुनि भ्रमर मुरलींत झाले मग्न ।
× × × × × × × × × × ×
वाटे कैलासाहुनि पातला पिनाकपाणी ॥
चाल ॥ गंगा आणि यमुना दोन्ही पातल्या स्वर्गाहूनी ॥
लागल्या मुरली ध्याना ॥ वृंदावनिं० ॥ ४ ॥

वामन पंडित आपल्या वेणुमधेतील श्लोकांत म्हणतातः—

मोहती व्रज पशु मृगगाई । आमुचें नवल काय अगाई ॥
स्तब्ध होति लिखितें जसिं चित्रें । वेणुच्या ध्वनि रसेंचि विचित्रें ॥ १५ ॥
मातृस्तनींचा रस आननांत, तो होय वेणुध्वनि काननांत ॥
गळे गिळेना पय वासुरांतें, आश्चर्य वाटे गगनीं सुरांतें ॥ १७ ॥

गणपतीच्या तांडव नृत्याचें वर्णन वणीकर गोविंद महाराजांनीं ज्या पदांत

खग मृग अति तल्लिन झाले ते पिऊ विसरले पाणी ।
वृक्षाचें पत्र न हाले, रविरथु स्थिरावला गगनीं ।

( २२७ पृष्ठावरून समाप्त. )

केलें आहे तें पद अशाच प्रकारचें आहे. तें केवळ विदर्भस्थ असल्या कारणानें, त्याच्या पदाचा थोडा उल्लेख येथे केला आहे. तें पद येणेंप्रमाणें:—

स्वच्छंदें नृत्य करितो स्वानंद पुरनिवासी
त्रिभुवन जन मोहित झाले देह स्मृति न कळे त्यासी ॥ ध्रु० ॥
× × × × × × × × × × ×
ब्रह्मप्रियादिक सखे सारे, नर्तवितो लावुनि ध्याना ।
चाल ॥ हालति ना पादप नाना । ऋषि मुनि तपि त्यागिति ध्याना ।
सुर विसरति अमृतपाना ॥ १ ॥ स्व० ॥
गौतम सरिताजळ तेव्हां वाहतां ते वेग विसरली ।
मृग व्याघ्रचमरि वैरातें त्यजुनी एके स्थळिं रमली ।
चाल ॥ द्वेषबुद्धि सर्वही हरली । मनोवृत्ति तयाची फिरली ।
गणपतिच्या ध्यानीं मुरली ॥ स्वच्छंदें० ॥ इ० इ० इ०

असेंच वर्णन एकनाथी भागवतांत आहे आपल्या वेणुगीतानें गोपकन्या कशा वेडावल्या याचें श्रीभगवान् सद्गदित अंतःकरणानें वर्णन करितात, “ ऐकोनि माझें वेणुगीत । गोपिका सांडुनि समस्त । निजदेहातें न सांभाळित । मज गिंवसीत पातल्या ॥ १०८ ॥ सांडुनि पतिपित्याची चाड । न धरोनि वेदशास्त्रांची भीड । माझे ठायीं निजभाव दृढ । प्रेम अति गोड गोपिका ॥ १०९ ॥ पुत्रस्नेह तोडोनि घायें । विधोतें रगडुनि पायें । माझे आवडीचेनि लवलाहें । गोपिका मज पाहों पावल्या ॥११०॥ त्याचपरि जाण गाई । वेणुध्वनीं वेधल्या पाहीं । व्याघ्रभय विसरल्या देहीं । माझ्याठायीं विनटल्या ॥ १११ ॥ माझ्या वेणुध्वनीं वेधलें मन । वत्सें विसरलीं स्तनपान । मुखीचा कवळ मुखीं जाण । माझें ध्यान लागलें ॥ ११२ ॥ माझ्या वेणु श्रवणारतव जिहीं । निजवैर सांडुनि देहीं । येरयेरावरि माना पाहीं । व्याघ्रहरिणें तींहीं विनटलीं ॥ ११३ ॥ अध्याय १२ वा या ठिकाणीं जे पाचसहा उतारे दिले आहेत त्यांतील प्रत्येक ओळ देवनाथाशीं ताडून पाहावी म्हणजे बरेंचसें साम्य दृष्टीस पडेल ‘ महिसहीत अहिपति नाचे ’ असें देवनाथ म्हणतात, तर ‘महिसहीत अहिपति डोले’ असेच शब्द आनंदतनयांत येतात ‘ वृक्षाचें पत्र न हाले, रविरथू स्थिरावे गगनीं ’ या देवनाथांच्या पंक्तीमध्यें आणि आनंदतनयांच्या ‘ खुटलाचि रविरथ गगनीं वायू तो मार्ग न चाले ’ या शब्दपंक्तींतील सादृश्य चिंतनीय आहे. ‘ सांडुनियां सकळहि द्वंद्वा ’ चें उत्तम उदाहरण एकनाथांच्या ‘ येरयेरांवरि माना पाहीं । व्याघ्रहरिणें तींहीं विनटलीं ’ या कल्पनेमध्यें प्रगल्भत्वानें दिसतें. या सर्व सादृश्याला कारण मूळ भागवतांतील कल्पना होय.

सुर चकित पहाति अवघे, सुकले रसअमृतपानीं ॥ तनों० ॥ ३
तृण भक्षिती ना त्या गाई, पक्ष्यांनीं त्यजिला चारा ।
वनिं व्याघ्र वृकादिक मारि हिंसेचा त्यजति उभारा[1] ।
नरनारी स्तब्धचि अवघे सोडुनियां मोहपसारा ।
गर्जना मेघ न करिती, मुनि त्यजती आत्मविचारा[2]. ॥ तनों० ॥ ४
सुर असुरादिक स्थिर झाले, सांडुनियां सकळहि द्वंद्वा ।
अघटित हे लीला न कळे वर्णिता न वर्णवे वेदा ।
मांवळलिं शास्त्रें साही बोलतां न शकती शब्दा ।
देवनाथ प्रभु त्या गातो निजभावें नामप्रबंधा[3] ॥ तनों० ॥ ५

पद (८७).

यदुराज वृंदावनिं गे मधुरध्वनी वाजवी वेणू ॥ ध्रु० ॥
सांवळें सगुण रूपडें, नंदाचा नंदनसानू[4] ।
मेळवोनियां व्रजबाळें, वृंदावनीं चारत धेनु ।
अग्रजासह करी क्रीडा, व्यापक जो अणुरेणू ।
वर्णितां मौनही वेदां, तेथें मी काय वानू ॥ यदुराज० ॥ १
वाजतांची सुस्वर रव तो, भरलेंसे त्रिभुवन नादें ।
तृण त्यजुनी तटस्थ वरतीं, करिती माना गोवृंदें ।
मधुपान विसरती पाहती, अति चकीत ते सुरसमुदे[5] ।
गर्जती न मेघही तेव्हां, वृकव्याघ्रही त्यागिति द्वंद्वें॥यदुराज०॥२
भूआपअनिळवायूचा, खुटला वेग ना चाले ।
जलनिधी स्तब्धची झाला, वृक्षाचें पत्र न हाले ।
चालती न रविशशि गगनीं, रजनीचर बहुतचि भ्याले ।
जलचरें न पीती पाणी, मुनि मननालागिं विसरले ॥यदुराज०॥३
अतिभ्रमित सकळ गजगमना, ऐकतांची मुरली श्रवणीं ।
जोडवीं अनुवट[6] बिचवे, काढुनियां घालिती कानीं ।
केतकी मूद ताननवेडे[7], मौक्तिकादि लेती चरणीं ।

---

१ उभारा=अवडंबर. २ ब्रह्मचिंतन आत्मचिंतन ३ नामवर्णना, नाममाहात्म्य. ४ नंदनसानू=लहान मुलगा, चिमणा बाळ. ५ ते सुरसमुदे [ सुरसमुदाय=देवसभा ] अतिचकित झाले, आणि क्षणभर मधुपान [ अमृतपान ] करूं विसरले ६ एक प्रकारचा दागिना. ७ कानांतील दागिना.

फेडुनियां वस्त्रें तेव्हां, बैसताति शिरिं गुंडोनी ॥ यदुराज० ॥ ४
देवनाथ प्रभु[1] गोविंदें, अघटित हे केली करणी ।
नरनारी तटस्थ अवघे, सेविती ना अन्नपाणी ।
नाटकी व्रजपती दावी, गुणलीला चक्रपाणी ।
वर्णितां कदा वर्णवेना कुंठित हे कविची वाणी ॥यदुराज०॥ ५

## पद ( ८८ )

आहारे ऐसें कैसें केलें त्वां परमानंदा ॥ ध्रु० ॥
वाजविसी मुरली ध्वनि । अकस्मात पडतां कानीं ।
आम्ही व्रजाच्या कामिनी । भुललों अबला मतिमंदा ॥ १
मदनमोहना हे श्रीपती । भुलविली मुरलीनादें मती ।
अमुच्या संसाराची माती । केली हरियेलें द्वंद्वा ॥ २
आम्ही गोंवळयाच्या नारी । भोळया बहुत कीं पूतनारी ।
तुझी मुरली मधुरस्वरीं । वाजे न सुचे गृहधंदा ॥ ३
देवनाथप्रभू तव पायीं । जडलों तुझें स्वरूप हृदयीं ।
भोगूं अखंड आणिक कांहीं । नेणों आम्ही गोविंदा ॥ ४

## पद ( ८९ )

अग ! बाई ! सांवळियाचा वेणु वाजे वृंदावनीं ग ! ध्रु० ॥
मध्यभागीं झाली रजनी । पतिसह सुखशयनीं ।
निजलें मी असतां श्रवणीं । अकल्पित पडला ध्वनि ग ॥ अग० ॥ १
रव नव्हे साजणी । विंधियलें कामबाणीं[3] ।
विव्हळ मी अंतःकरणीं । चाल जातें अनवाणी ॥ अग० ॥ २
देवनाथप्रभू धनी जनिं । वनीं भरला नयनीं ।
आसनिं शयनीं गमनीं । त्याविण कोण निदानीं[4] ॥ अग० ॥ ३

---

१ " हे देवनाथप्रभू ! ( आम्ही ) तव पायीं जडलों तुझें स्वरूप हृदयीं अखंड भोगूं, ( हे ) गोविंदा ! आम्ही आणिक कांहीं नेणों " असा अन्वय. २ मध्यभागीं झाली रजनी–मध्यभागीं आली रजनी, रजनी मध्यभागीं आली, मध्यान्हरात्र झाली ३ हे साजणी ! हा (मुरली) रव नव्हे हें मला ( कृष्णानें ) कामबाणीं विंधियेलें ( असें समज ). ४ निदानीं–शेवटी, अखेरच्या आणीबाणीच्या प्रसंगीं.

## पद (९०)

जळो याची हे मुरलि अगे ' बाई '
श्रवणीं पडतां देहभान नुरे कांहीं कांहीं ॥ ध्रुवपद. ॥
उभा कुंजवनीं सुरें मेळवीतो । मधुर आलापें वेणु वाजवीतो ॥
[1]तानमानाच्या गती आळवीतो । नादें गोपींचीं मनें भुलवीतो ॥ १
[2]रुचिर नेसलिसे चीर तये वेळां । निघे बाहेर तों मेघ वरुनि आला ॥
विजा चमकती तेज बंबाळा । घोर शार्वरी कांहीं न दिसे डोळां ॥ २
शेजीं असतां गे ! माझा गृहधनी । अकल्पीत येवोनि पडे कानीं ॥
हृदयिं शिरुनियां घाली मोहनी । [3]पिशी झालें मी आलें कुंजभुवनीं ॥ ३
छळी आम्हां ते यास प्रीय झाली । [4]सवत नेणों हे कोठुनियां आली ॥

---

१ तानमानाच्या गती आळवीतो—वेगवेगळाल्या सुस्वर आलापाच्या गती गातो. २ रुचिर चीर—सुंदर वस्त्र ३ घालि मोहनी । पिशी झालें मी आलें कुंजभवनीं—"घालुनि मुरलिमध्यें मोहनीशी । वृत्ती झाली पिशी" देवनाथ पिशी झालें मी आलें कुंजभुवनीं:—श्रीकृष्णाच्या वेणुध्वनीनें ऐकणाऱ्या बायांना पिसाटपणा कसा संचरत असे याचें श्रीमाणिकप्रभूनीं फार गमतीचे वर्णन दिलें आहे:—

कृष्णा तुझ्या वेणूंत कायरे ॥ ध्रु० ॥
डोळ्यांत कुंकू काजळ कपाळीं । हळदिशिं मटमट खायरे ॥ १ ॥
गाईचीं वासुरें म्हशिसीं सोडी । बैल दोहायास्तव जायरे ॥ २ ॥
माणिक म्हणे प्रभु मुरली मुकुंदा । मन्मन तत्पदीं धायरे ॥ ३ ॥

४ सवत नेणों हे कोठुनियां आली:—

आज मुरली गोविंद वाजविलो ॥ ध्रु० ॥
स्वये मुरलीनें योग कोण केला । जेणें लोभें हरिहस्त बसायाला ।
नेणें हरिचा मुखचंद्र चुंबियेला । तुच्छ गमली मागील रम्य लीला ॥ १ ॥
मधुर मुरली ऐकतां चित्त मोहे । चित्र जैसें तैसेच उभें राहे ।
ऐसें चैतन्य जडनीर वाहे । पहा वेणूत कोणी काय आहे ॥ २ ॥
एक म्हणती ही सवत कोठें होती । प्रेमफांसा घालुनी घर घेती ।
पिसें वेडें लावुनी वनी नेती । म्हणे नारायण कृष्णसंग देती ॥ ३ ॥

हरिविजयामध्यें श्रीधरस्वामींनीं मुरलीचें व आपादलंबी वनमालेचें भाग्य वर्णन करून जगन्मातेला वनमालेबद्दल सवतीमत्सर उत्पन्न झाला अशी कल्पना लढविली आहे "पूर्वीं तप आचरला बहुवस । धन्य धन्य तोचि वंश । रत्नअधरीं रमाविलास । धरूनि वाजवी सर्वदां ॥१५॥ कमळेहून तप मोठें । वेणू आचरला

( पुढील पृष्ठ पाहा. )

वश केला गे । इनें वनमाळी । पाणि संसारा आमुचिया घाली ॥ ४
काय म्हणुनि हे पेटलिसे द्वंद्वा । सुखें नेदी आम्हासि गृहधंदा ॥
देवनाथाच्या प्रभु सदानंदा । इनें मोहियलें चिदानंदकंदा ॥ ज० ॥ ५

## पद (९१).

हरी ! वाजविसी मधुर अशी मुरली कशी रे ! ॥ ध्रु० ॥
धन्य नेणवे प्रताप । श्रवणीं पडतां हरी त्रिताप[1] ॥
नाठवेची मायबाप । बंधु स्वसा रे ! ॥ हरी० ॥ १
सभरसरस सुरस तान । ऐकतांचि जाय प्राण ॥
जीवनरहित मीन मान । वेध असा रे ! ॥ हरी० ॥ २
देवनाथप्रभु खचित । हेंचि काय तुज उचित ॥
जाहला हा पूर्णचित्त । मयुरपिसा[2] रे ! ॥ हरी० ॥ ३

## पद (९२).

रमारमण रमानाथ । कीं वेणु वाजवी कुंजवनांत ॥ ध्रु० ॥
बाळी बुगडी नेसुनि लुगडीं । करणफूल कानांत ॥ कींवेणु० ॥ १
घर सोडुनियां बाहिर निघाल्या । उभ्या गोपि आंगणांत ॥कीं वेणु०॥२
देवनाथ प्रभुनाथ निरंजन । मोहियेल्या एक क्षणांत कीं वेणु० ॥ ३ ॥

---

( २५२ पृष्ठावरून समाप्त )
बहुत वाटे । तरींच अधरीं धरिला वैकुंठपीठें । सदा लियेतें न विसंबे ॥ १६ ॥ हरीच्या गळयाची वनमाळा । आपादलंबिनी मकरंद आगळा । सदासर्वदा पडली गळां । द्वेष उपजला कमळेशीं ॥ १७ ॥ म्हणे मी चरणींच राहिलें । हिनें आपाद हरीस आवरिलें । हें न चुके कदाकाळें । भक्तिबळें बळावली ॥ १८ ॥ हरी धरी नाना अवतार । हे गळयाची नव्हे दूर । इचा किती करावा मत्सर । झाली प्रियकर कृष्णातें ॥ १९ ॥ पडली हें न सुटे गळां । मग तिसीं स्नेह वाढवी कमळा । गुणगंभीर सांवळा । दोघीं सेविती प्रीतीनें ॥ २० ॥ हरिविजय अ. १७वा.

१ त्रिविधताप नव्याण्णव पदावरील टीप पहा.

२ जाहला हा पूर्ण चित्त मयूर पिसारे:-त्याचा अन्वय असा ' हा चित्तमयूर पूर्ण पिसा जाहला, ' या ठिकाणीं देवनाथानीं पूर्वींच्या पदांत जसें 'मनमयूर' हें पद घालून मनाला मयूराची उपमा दिली तद्वतच चित्ताला मयूराची उपमा दिली आहे तसेंच मनाला ' मनगज, मनतुरग, मनगजेंद्र ' अशाही संज्ञा दिलेल्या ठिकठिकाणीं आढळतात.

---

# कृष्णविरह
## व
# कृष्णभेट.

### पद (९३).

वियोगानळ जाळित त्रास, देत हरि मम मानसहंस हो[1] ।
विरहबाण हरि प्राण, न ये कां यदुवंशोत्तंस ॥ ध्रुवपद ॥
तिळा मनोवृत्ति अबळा[2], म्हणे तुझिया मी पदयुगला हो ।
नमन करित, जा त्वरित आणिं सखये श्रीघननीळा ॥
म्हणावें त्रिभुवनभूपाळा, अत पाहसि किति पशुपाळा हो ।
चाल चित्तचाळका; विकळ झाली ते वेल्हाळा ॥
चाल ॥ हे मदनमोहना ! विभो ! दुःखदहना ये मधुसूदना ।
हे विश्वव्यापका हरी रमानायका सौख्यसदना ।
हे मुरलिवादना[3] दावि यशोदा चुंबित ज्या वदना ॥
टीप । नंदनंदन गोविंदास, विनवी ये रिति अरिध्वंस हो ॥ विरह० ॥ १
प्राण घाबरा करूं काय, सासेना विरह मला माय हो ।
युगसम लव पल जात मला, हरि आणिं, त्वरित जाय ॥
वाहुं किति मोकलूनि धाय, सख्याला कां करुणा नये ? हो ।
तळमळ जिविं, गोपाळ मला दाविना कसे पाय ? ॥

---

१ मम हृदय हेंच मानससरोवर यात विहार करणाऱ्या हंसपक्ष्या । "माझें मानससरोवर । प्रेमकल्हारीं सुमनहर । राजहंस रुक्मिणी वर । सदा स्वानंदें क्रीडतू ॥ १५० ॥ आजि गेलास कवणे ठायां ? । मुक्तमुक्ताफळें चरावया । गोविलास म्हणोनि माया । माझी तुवां सांडिली ?" ॥ १५१ ॥ मुक्तेश्वर सभापर्व. २ अबला मनोवृत्तिदूतिला म्हणे, (कीं) मी तुझिया पदयुगला नमन करित. सखये त्वरित जा ! श्रीघननीळा आणीं ! त्रिभुवन-भूपाळा म्हणावें (कीं) पशुपाळा ! किती अत पाहशी ! चित्तचाळका । ते वेल्हाळा विकळ झाली ! (आतां तरी) चाल ' असा अन्वय. ३ हे मुरली-वादना ! ज्या वदना यशोदा चुंबित, (तें) दावि यारिति (येणेंप्रमाणें) अरिध्वंस नंदनंदन गोविंदास विनवि; असा अन्वय.

चाल ॥ निर्वाण मांडिलें कसें लावुनी पिसें मला आधीं ।
श्रुति वर्णिताति सरसें[1] नाम तरि असे दयाउदधी ।
परि परम कठिण हा दिसे प्राण जातसे नसे अवधी ॥
टीप ॥ तुला करुणा तरि हृदयास, येऊं दे आजि श्रीनिवास हो ॥ विरह०॥२
ऐक सखये तुज विनवीतें, कृपा करिं जाय माय निरुतें[2] हो ।
बोधविं बुधजनसखा विरहानळशिखा जाळि मातें[3] ॥
यमुनातिरिं गोवत्सांतें चारितो जाय सांग त्यातें हो ।
दया नये तिचि, हरी तरी येऊनि मारिं हातें ॥
चाल ॥ हे कमलनयन अहिशयन खगारीवहन[4] दैत्यकदना ।
बहु बहू रिती प्रार्थुनी आणिं साजणी निजसदना ॥
वधिं मदनबाणगे ! प्राणदान दे, दाविं हरीवदना ॥
टीप ॥ तुझी अनुचरि मी होत दास, किमपि न करीं हा आळस हो॥विरह०
असी राधिकामनोवृत्ती, तिनें प्रार्थिली भक्तिदूती हो ।
नमन करुनि पदयुगळिं म्हणे वेल्हाळि ऐक विनंती[6] ॥
तुझ्यासम्मतें[5] मज प्राप्ति, घडे हें वाटतसे चित्तीं हो ।
तुझ्या ठायिं विश्वास, बाधिं तूं कास भजनिं निगुती[6] ॥
चाल ॥ प्रभु देवनाथ न ये नाथ सांग मी लक्षु किती अयना ।
तुजविण नव्हे माउले कार्य, समजलें त्या फणिशयना ।
क्षणभरी न करिं आळसा दाविं राजसा अजी वदना ॥
टीप ॥ गोपिवल्लभा गोवळास, भेटवीं जननी दयाळास हो ॥ विरह० ॥४॥

## पद (९४)

अजुनियां तरि हरि कां ग बाई ! येईना ? ॥ ध्रुवपद. ॥
विरहें व्याकुळ घाबरलें अतिशय ।

---

१ जोरानें आक्रोशपूर्वक. नाम तरी असे दयाउदधि ( आणि असेंच ) श्रुति वर्णिताति सरसें; परि हा ( पाहिला तर ) परम कठिण दिसे ( आणि इकडे माझी स्थिति कशी तर ) प्राण जातसे, अवधि नसे २ सत्वर, तांतडीनें. ३ विरहानळशिखा मातें जाळी ( असें ) विबुधजनसखा ( जाणत्यांचा सहकारी; म्हणून थोडक्या सूचनेनें लवकर उमगणारा ) बोधविं ( उपदेश कर; समजाव ) ४ म्हणजे काय ! ५ तुझ्या मदतीनें तुझ्या संमतीनें. ६ निश्चयानें, खात्रीन. हें पद दयाळनाथाचें आहे, असं वाटतें.

तगमग जिविं बहु प्राण कां गे ! जाईना ! ॥ अझुनि० ॥ १
सुखकर सुंदर मदनमनोहर ।
सांवळा सकुमार कां ग ! भेट देईना. ॥ अझुनि ० ॥ २
गुरुतर मोहक मधुरालाप तो ।
सुस्वर मुरलीचा नाद कां गे ! होईना ॥ अझुनियां० ॥ ३ ॥
देवनाथप्रभु कां गे ! निष्ठुर जाहला ।
आलिंगुनि प्रेमें हृदयीं उचलुनि घेईना ! अझुनियां० ॥ ४ ॥

## पद (९५).

अबलामति प्रार्थिते हरितें प्रेमयुक्त राधा ।
कमलनयन जगजिवन हरी तव विरह मला बाधा ॥ ध्रुवपद ॥
विश्वभूषण भवशमन दयाघन हे परमानंदा ! ।
अघटित तव गुण चरित नाकळे मौन पडलें वेदा. ॥
दुरित गर्व हरिं सर्व, दयार्णव ! तोडिं समुळ भेदा ।
मुरलीधर गोवर्धनधर ! मति तत्पर त्वत्पादा ॥
चाल ॥ तव विरहाग्नी अतिशय जाळी ।
ज्वाळा उठताती हृत्कमळीं ।
कृपाघना वर्षे वनमाळी ॥
श्लोक ॥ अकळविमळरूपा स्वामि वैकुंठपीठा ! ।
निशिदिनिं तव नामीं ध्यास हा नीळकंठा ! ।
अतिसदय सुदाता विश्वताता दयाळा ।
भवपुरिं बुडताहें तारिं मातें कृपाळा ! ॥
टीप ॥ दुःखतरू अतिवृद्धि ययाच्या समुळ करीं छेदा ।
गोइंद्रियचाळक[1] हरि गोवळ गोपति गोविंदा ! ॥ अबला० ॥ १ ॥

---

१ गोइंद्रियचाळक—इंद्रियरूपी ओढाळ गुरांचें दमन करणाऱ्या, हा समास उलटा झालेला दिसतो. इंद्रियांना गुरांची उपमा संस्कृत वाङ्मयांत सर्वतोदृश्य आहे एकनाथमहाराज आपल्या गोपाळाच्या भूपाळींत म्हणतात:—
'उठिं रे गोपाळा उघडीं स्वरूपलोचना
सरलि अविद्याराती उदय झाला रविकिरणा ।
इंद्रियगोधनें नेईं निर्गुणकानना
सुटलीं मानसवत्सें तुजविण नाकळती कोणा' ॥

एके दिनीं वृषभानुनंदिनी जे हसकचरणा[1] ।
जळ आकर्षणिं ते गजगमनी जात असे यमुना ॥
कटावरी घट निकट वाट पदिं चालत शुभवदना ।
नदद्वारावरुनि निघत तैं दृष्टि पडे कान्हा ॥
चाल ॥ गोदोहन करितां विभु साक्षी ।
बाळा हरिमुखकमळ निरीक्षी ।
जो योग्यां ध्यातां न ये लक्षीं ॥
श्लोक ॥ देखुनि गोपतनयेप्रति गो त्यजूनी
दोही हरी वृषभ पात्र करीं धरूनी ।
तों पातली त्वरित अंगणिं नंदजाया
देखे असें त्यजुनि गो वृषभा दुहाया ॥
टीप ॥ दटावुनि वदे नंदराणि हरि चक्रपाणि सुबुधा ' ।
त्यजुनि गाय वृषभासि दोहिसी भ्रमिष्ट तूं बहुधा. ॥अबला०॥ २ ॥
वदत माय श्रुत वचन होत त भीत बहुत कान्हा ।
हळुच ह्मणतसे गमत जननि ! आश्चर्य आज नयना ॥
स्तन चार हरपुनी एक जाहले मला आकळेना ।
बहु वेळ श्रमत अळुमाळें[2] न ये गाइला कसा पान्हा ॥
चाल ॥ जालें कर्म महा पैं खोटें ।
दैवत खंडेराव हें मोठें ।
चुकली नवस असें मज वाटे ॥
श्लोक ॥ ऐकूनि वाक्य हरिचें मग जों निरीक्षी ।
द्वारीं उभी तरुणि देखिलि कंजनाक्षी[3], ।

---

१ हसक हा संस्कृत पुल्लिंगी शब्द=पादभूषणें, तोरड्या हसकचरणा=तोरड्या जिच्या पायांत आहेत अशी जळआकर्षणें=विहिरींतून किंवा नदींतून पाणी वर आणण्याकरितां २ अळुमाळ=अल्प पान्हा याचे विशेषण. "म्हणुनी कमंडलूचें जळ । नयनीं स्पर्शिलें अळमाळ । सूर्यवर्णाहु नितेजाळ । ताडप्रमाण तेजस्वी"॥ मुक्तेश्वर आदिपर्व अ ४३ ओं १४१ ३ कंजनाक्षी=कंजन व कंजक या दोन्ही पुल्लिंगी संस्कृत शब्दांचे अर्थ मेना, पोपट, मदन असे के माधव चंद्रोबा यांनीं आपल्या विशाल संस्कृत मराठी कोशांत दिले आहेत हा शब्द नाथांनीं आपल्या कवितेंत योजिला असेल असें वाटत नाहीं. आम्हाला वाटतें खजनाक्षी ( खंजना = खजरीट पक्ष्याची स्त्री तिच्यासारखे डोळे आहेत जिचे तो ). कविसांप्रदायात या विशेषणाचें प्रचारबाहुल्य सार्वत्रिक दृग्गोचर होतें.

राधास बोलत दटावुनि नंदराणी
'कां गे उभी धनकडे [1]विंदिं ! आणिं पाणी ॥
टीप ॥ अधोवदन परतली म्हणे सांवळया विश्वकंदा ॥
विरहबाण हरि प्राण किती भोगणें दुःख आपदा. ॥ अबला० ॥ ३
यमुनातीरीं भरित उदका सुंदरी कंजनयनी ।
अकस्मात येउनी पाठिसीं उभा चक्रपाणी ॥
उदक भरुनि तों फिरे द्दष्टि तों पडत मोक्षदानी ।
पीतपटें कट राजत पाहातां निकट वदे रमणी ॥
चाल ॥ म्हणे राधिका विश्वोद्धारा ।
भूधरशयना भुवनसुंदरा ।
तव विरहानळ जाळि उदारा ॥
श्लोक ॥ विश्वात्मया जगदिशा हरी देवदेवा
माझी गती तरि कसी वद वासुदेवा ! ।
तुझा वियोग अतिदुर्धर साहवेना
मातें कदापिहि उपेक्षिं दयानिधाना ! ॥
टीप ॥ अज अव्यय अक्षया अनादि पुरुष परम सुखदा ।
जळो जिणें हें व्यर्थचि तुजविण श्रीपरमानंदा ॥ अबला० ॥ ४
आद्यदीप श्रीकृष्ण तयाची तों राधा ज्योती ।
परम पुरुष हा दयाळ श्रीहरि त्याची ते प्रकृति ॥
हा चित्सिंधू ते चित्सरिता ऐक्यपणें मिनती ।
खचित रात्रि परिपूर्ण तयाची [2]अबाधित दीप्ती ॥

---

१ विंदी=चीद ( दोन्हीं स्त्रीलिंगी )=गल्ली २ अबाधि = अखंड, बाधरहित, खंडरहित. मिनती = एकजीव होती, एकांतएक मिसळती.

आद्यदीप श्रीकृष्ण तयाची तों राधा ज्योती इ०—दीप व ज्योति, प्रकृति व पुरुष या उपमानीं उभयतांचा परस्पर अखंड अनुराग आणि चिरसयोगित्व दाखविलें जातें अशीच कल्पना आनंदतनयांनीं आपल्या सेतुबंध आख्यानांत मारुतीच्या संभाषणात योजिली आहे:

स्वामी चातक मी सुधाजलद तूं; मी भक्त, तूं अंबिका; ॥
तूं श्रीचंद्र, चकोर मी, तपन तू मी कोक झालो निका ॥

( पुढील पृष्ठ पहा. )

चाल ॥ वेदपुरुष हा ते श्रुति जाणा ।

---

( २७८ पृष्ठावरून समाप्त )

मी तों एक तरंग, तूं जलनिधी, मी रेणु तूं भुमिका ॥
मी तंतू, पट तूं; परंतु धरिसी लौकीक लोकाधिका ॥ ( २६ )

याला अन्वर्थक मीराबाईचें पद पहाः—

"जो तुम तोडो पिया मैं नहीं तोडू ।
तोरी प्रीत तोडी संग कोन कृष्ण जोडू ॥ ध्रु० ॥
तुम भये तरुवर मैं भयी पखिया ।
तुम भये सरोवर मैं तेरी मछिया ॥ जो तुम० ॥ १ ॥
तुम भये गिरिवर मैं भयी चारा ।
तुम भये चंदा हम भये चकोरा ॥ जो तुम० ॥ २ ॥
तुम भये मोती प्रभु हम भये धागा ।
तुम भये सोना हम भये स्वागा ॥ जो तुम० ॥ ३ ॥
बाई मीरा कहे प्रभु ब्रजके बाशी ।
तम मेरे ठाकोर मैं तेरी दासी ॥ जो तुम० ॥ ४ ॥

देवनाथांचे पट्टशिष्य दयाळनाथ यांचें पद पहाः—

"तू दिनपति मी कांति तुझी आजि कोप कसा करिशी ।
जळाविण मीन तळमळी तशी ।
साधन तरि कोणतें करू मी तुझिया प्राप्तीसी ।
किती म्हणुनिया अंत पाहसी ।
छंद ॥ मी सरिता तूं सागर । मी चातक तू जलधर ।
मी तारा तु शितकर ।
टीप ॥ आगळीक नसतांनि नजर कां मजवरती वाकडी ।
चाल सख्या मनमोहना युगसम तुजविण जाते घडी ।
सख्या तूं जिविंचा जिवलग गडी ॥ २ ॥
मनोवृत्ति भाकिती अशी करुणा ते विरहीणी ।
दयाळा मानीं रे विनवणी ।
तू आत्मा मी प्रकृती तुझि हे अनादिची मेळणी ।
कदापि न दिसे दूजेपणी ।
टीप ॥ तूं दीप प्रभा मी बरी । तू सागर, लहरि मी खरी ।
अन्यथा नव्हे वैखरी ।
देवनाथप्रभुदयाळ भवनदि उतरीं पैलथडी ॥ सख्या तूं० ॥ ३ ॥

स्वरूपीं समरसली गजगमना ॥
समाधि आसुनि ये व्युत्थाना ॥
श्लोक ॥ आत्मत्विं ते उघड सौख्यसमाधि भोगी
घेऊनि जीवन निघे मग ते शुभांगी ।
जो देवनाथ वरद प्रभु विश्वयोनी
प्रार्थी तयासि पुढतीं गुणरत्नखाणी ॥
दींप ॥ म्हणे, 'विश्वव्यापका ! रमानायका ! मी मतिमंदा ।
दास तुझी म्हणावितें, ठेविं पदिं, तोडिं सकुळ द्वंद्वा.' ॥अबला० ॥ ५

## पद ( ९६ ).

चाल सख्या ! जी घनश्याम वरूं ॥ ध्रुवपद
निजात्म निजगृहामाजि जाउनी शिरूं ।
ब्रह्मरूप सृष्टि सकल लोचनीं भरूं ॥ चाल० ॥ १
गुरुसिं शरण जन्ममरणरहित पद वरूं ।
सेवन करुनि बोधाजिवन, जिवपणा हरूं ॥ चाल० ॥ २
व्याप्त दशदिशांत सर्व मंद लंकरू ।
देवनाथ श्रवणिं मनानिं मूर्ति मनिं भरूं ॥ चाल० ॥ ३

## पद ( ९७ )

सजणे ! कृष्णा । जा वेगीं आण वितृष्णा ।
हरिवांचुनि कोण माझी बोळवी गे ! सांग तृष्णा ॥ ध्रुवपद ॥

---

१ दोन रस पूर्णत्वानें एक होतात त्याप्रमाणें एकवटली; तद्रूप झाली; लीन झाली २ समाधि ( अंतःकरण विषयांपासून निवृत्त होऊन ईश्वराचे ठायीं लागावें या हेतूनें प्राणायामादि साधनांनी चित्ताची जी एकाग्रता करतात ती ) आसुनि ( समाधि योग साध्य झाल्यावर तो यत्न नेहमीं न करतां नित्य व्यवहार करावयाला लागून ) व्युत्थाना ( तपस्यादिकाची समाधी, ध्यानविसर्जन ) ये म्ह० ध्यानविसर्जन करितो आत्मस्वरूपाची प्राप्ति झाल्यानंतर तें स्वरूप सदोदित मनात ठेवून जेव्हां बाह्यव्यवहार होतो त्याला समाधिव्युत्थान म्हणतात एकनाथी भागवत अ ३ ओं ६६–७१ याचा उतारा पुढें दिला आहे तो पहा. तेथें समाधि आणि व्युत्थान याची फोड फार मार्मिक केली आहे. ३ व्याप्त दशदिशांत सर्व मंद लंकरू=म्हणजे काय ? ४ तृष्णा इच्छा विगत झालेला असा निर्विकार प्रभु त्याला दुसरा अर्थ सुचवावा.

विरहाग्नी अतिशय पोळी, भडभड ह्या उठती ज्वाळा ।
व्याकुळ मम प्राण झाला दाखवीं गे ! हरिरूप डोळां ।
कधिं पाहिन गे ! निजनयनीं योगीजनचित्तमराळा ॥
चाल ॥ गोकुलपाल श्रीघननीळा ।
व्रजवासीया गोपाळा ।
जा सांग तुझिया पदयुगुळा ॥
टीप ॥ दाखविं तिस तारीं दयाळा तुजवांचुनि कोण कृपाळा ? ॥ स० ॥१॥
हरिविरह मला साहवेना मनमोहन येइना कां गे ! ।
आजि कठिण मानस केलं मायि या अंतरंगें ।
योगीजनहृदयनिवासा सत्वरी वेउनि ये गे ! ॥
चाल ॥ मज कांहींच मनीं नुमगे ।
किति सोसू गे ! भवंदगे[1] ।
मन विटलें नश्वर भोगें ॥
टीप ॥ दाखवीं ग ! हरिपद दृष्टीं न करीं हा विलंब, जा गे ! ॥ स० ॥ २ ॥
वृंदावनवृंदविहारा अझुनी कां नुपजे करुणा ।
युगसम हा लव पळ जातो दुःखित बहु अंतःकरणीं ।
अति सदयहृदय मृदु त्याचें तरि माझी दया कां ये ना ? ॥
चाल ॥ षड्स मळा रुचती ना ।
घरधदहीं सुचती ना ।
सखे ! प्राण रिघों पाहती ना ॥
टीप ॥ हरिप्राप्तिस्तव गे ! बाई ! धरितें मी तुझिया चरणां ॥ स० ॥ ३ ॥
देवनाथ प्रभु गोविंदें निष्ठुरता धरिली हृदयीं ।
हरिविरहकाम मजलागीं छाळितो अतिदुःखदायी ।
सखे ! बाई वेळ बहु झाला अझुनि कां नये शेषशायी ।

---

१ भवदंगे=भवातील ससारातील दंगे त्रास उपाधी योगीजनचित्तमराळा— योगीजनांचे हृदय हेच मानससरोवर येथें क्रीडा करणाऱ्या हंसपक्ष्या—हें ईश्वराचें विशेषण सर्व कवींचें आवडतें आहे मायि या अतरंगें=माते ! यानें आपल्या अंतरंगीं ( अंतःकरणात ) कठीण मानस केलें असा अर्थ असावासें वाटतें. अर्थद्विरुक्ति दिसते

चाल ॥ हरिप्राप्तिस्तव करूं ? काय ! ।
शिणलें, बहु अन्य उपाय ।
...... ........................ ॥
टीप ॥............ .. ...... .. ... ..... ॥ सजणे० ॥ ४

## पद ( ९८ ).

यदुकुलभूषणासी जाउनी आणा ॥ ध्रुवपद ॥
निशापति तीव्र किति ? पुष्प जाती प्राणहरणीं ॥
करूं मी सये ! काय ? आतां ठेवीं भाळीं पाणी ॥ यदुकुल० ॥ १
वधू येती हाटींहुनी, हाची सर्व बोल कानीं ।
कुब्जे कुब्जेलागीं हरि लागलासे ध्यानीं ॥ यदुकुल० ॥ २
देवनाथप्रभुसीं स्तव करुनी आणी तूं युक्ती करुनी ।
तरीच तूं मायपरी धन्य धन्य वानीं ॥ यदुकुल० ॥ ३

## पद ( ९९ ).

योगीयांच्या न ये ध्यानीं । वर्णितां शिणली श्रुतीची वाणी ।
तो नंदाच्या आंगणीं । सांवळि ग ! माझी. ॥ १
न कळे जो ब्रम्हादिकां । बाळलीला करा कौतुका ।
उंबरा चढतां धरितो टेंका सांवळि ग ? माझी ॥ २
दुडदुड आंगणीं रांगत जाये । 'माय यशोदे' म्हणवुनि बाहे
स्मरतां निगमासी होतें साह्य । सांवाळि ग । माझी ॥ ३
रडतां किमपी उगलि न राहे । माता उचलुनि घे जे कडिये ।

---

१ वर्णितां शिणली श्रुतीची वाणी=वेदांलाही ज्याचें वर्णन करतां येत नाहीं. २ निगम=वेद स्मरतां नि होतें साह्य म्हणजे काय? ३ उगलि=उगा. माय यशोदे म्हणवुनि बाहे:—यशोदेसकट सर्व विश्वाचा जो पितामह त लीलाविग्रहकारी भगवान् यशोदेला बोबड्य। बोलांनीं बाहतो.

" विश्वाचा जनीता। म्हणे यशोदेसी माता ॥ १ ॥
ऐसा भक्तांचा अंकीत । लागे तैसी लावी प्रीत ॥ २ ॥
निष्काम निराळा । गोपी लाविवेल्या चाळा ॥ ३ ॥
तुका म्हणे आलें रूपा अव्यक्त चांगलें ॥ ४ ॥

विश्वीं व्यापुनि आलिप्त राहे । सांवाळि ग ! माझी. ॥ ४
माता नेउनिया निजसद्‌ना । चुंबन देउनि पाहे वदना ।
स्वरुपें उणें आणी मदना । सांवाळि ग ! माझी, ॥ ५
आंगणीं गडबड घे लोळणी । माता देताहे खेळणीं ।
नेउनि निजवी पाळणीं । सांवळि ग ! माझी, ॥ ६
निजवितां निज ये ना । बाहेर आणितांही ये ना ।
बाळलीला दावी नाना । सांवाळि ग ? माझी, ॥ ७
धरितां हातीं...धदा ' अकस्मित आली राधा ।
तिच्चिया जवळी देत यशोदा । सांवाळि ग ! माझी ॥ ८
राधा बोलत...नेटें । कां गे ! रडतेसी गोरटे ? ।
राधा देखुनि हर्षें दाटे । सांवाळि ग ! माझी ॥ ९
राधिकेनें ते अवसरीं । उचलुनि घेतां कडियेवरी ।
उगी राहे निर्विकारी[1] । सांवाळि ग ! माझी. ॥ १०
राधेलागीं बोलत माता । मातें श्रमवीलें.. ता ।
उगी राहे गे त्वां घेतां । सांवळि ग ! माझी ॥ ११
आतां स्वगृहीं घेउनि जाईं । राधा अवश्य म्हणुनि पाही
घेउनि आली ते निजगेहीं । सांवाळि ग ! माझी ॥ १२
दूध भात कालवोनी । पुढें ठेवित कामिनी ।
राधा धाली[2] पाहुनि नयनीं । सांवळि ग ! माझी ॥ १३
श्रीमुख लक्षित उभी राधा । कामबाणें केली बाधा ।
जाणुनि तिच्चिया अंतरंगा । सांवळि ग ! माझी ॥ १४
तिचें विव्हळ पाहुनि मन । राधे ! मुख कां झालें म्लान ? ।
हळुच बोलताहे वचन । सांवळि ग ! माझी ॥ १५
मी तों मुग्धा वयसा पाहीं । उगेंच बोलुनि होतें काई ।
मोठी असती जरी कान्हाई । सांवाळि ग ? माझी ॥ १६

---

१ निर्विकारी=विकाररहित; सदोदितचा विकाररहित असा परब्रह्ममूर्ति
२ धाली=तृप्त झाली.

धापा टाकुनियां पोटीं । हळूच बोले ते गोरटी ।
मूर्ति सगुण धाकुटी । सांवळि ग ! माझी ॥ १७
राधेलागीं चढला कीं मद । बोलुनि हृदयीं झाली सद्गद ।
ऐकुनि हंसताहे खदखद । सांवळि ग ? माझी ॥ १८
मोठी होऊं ? बोले वचना । ऐकुनि हांसे व्रजांगना ।
पुरवा भक्तांची कामना । सांवळि ग ! माझी ॥ १९
तेव्हां धरुनी तरुण रूप । पुरवी मनींचा संकल्प ।
हरी दासाच त्रीताप । सांवळि ग ! माझी ॥ २०

१ गोरटी—गोरी. गोरटीच्या ऐवजीं खरा शब्द गोमटी असा कदाचित् असावा अशी शंका आली होती पण जुने कवी गोरटी व गोमटी या दोन्ही शब्दांचा उपयोग करीत असें खालील विठ्ठलकृत विठ्ठज्जीवन काव्यांतील उताऱ्यावरून लक्षांत येईल. गोमटी—सुंदर. गोरी व सुंदर म्हणजे गोरीगोमटी, परं गोमटीप्रमाणें गोरटी शब्द फारसा ऐकण्यांत किंवा आधुनिक प्रचारांत नाहीं.

'रामें दिव्य वनीं विहार करित । सीतासवें गोरटी ।
कृष्णें रासविलास गौळणिसवें केला कलिंदीतटीं;
रामें त्यागिलि मैथिली, लुटविलीं अंत:पुरें माधवें;
दोघे तारक पूर्णब्रह्म, जनहो ! ध्यावे गिरागौरवें ॥ ३९ ॥
विष्णूची अवतारपंक्ति गणना होइल कालांतरी,
पैं लागे बलरामकृष्णमहिमा वर्णावया वैखरी
ते दोघे जगदीशव्यापकपणें सोमार्कबिंबोद्भटीं
या पेक्षा स्तुति काय विठ्ठल म्हणे वर्णूं मुखें गोमटी ॥ ४० ॥
विठ्ठलकृत—विठ्ठज्जीवन

२ व्रजांगना=गोकुळांतील बायका ३ कामना=इच्छा. ४ त्रीताप=त्रिविध-ताप—आधिदैविक, आध्यात्मिक व आधिभौतिक आधिदैविक=देवतांच्या क्षोभापासून होणारा, जसें वीज पडणें आध्यात्मिक=मनाच्या अथवा शरीराच्या रोगापासून होणारा आधिभौतिक=पंचमहाभूताच्या क्षोभानें होणारा. जसा भूकंप, अतिवृष्टि या पदासारखेंच पण लहान असून चटकदार असें केशवस्वामींचें पद आहे.

निज तेजें सांवळी । साजे नंदाची बाळी । स्वानंदाची पुतळी । कान्हाई माझी ।१।
चक्रिरामाची धाकुटी । रूपें दिसे वरदंटी । पाहतांना निवे दृष्टी । कान्हाई माझी ।२।

( पुढील पृष्ठ पहा. )

देहभाव समूळ त्यागी । राधा समाधिसौख्या भोगी ।
व्यापक बाह्य अंतरंगी । सांवळि ग ? माझी ॥ २१ ॥
देवनाथाची निजजननी । गातां कुंठित श्रुतिची वाणी ।
जिची अघटित न कळे करणी । सांवळि ग ? माझी ॥ २२ ॥

पद ( १०० ).

सखयांनो जा जा, गे हरि लवकरि आणा ।
विरहाग्नि जाळि मम प्राणा ॥ ध्रु० ॥
नेणों पूर्वकर्म हें कस आडवें आलें ।
म्हणुनिय पाय अंतरले ॥
सखे मार्ग लक्षितां हरिचा, लोचन शिणले ।
दुःखित बहु अंतरिं झालें ॥
अतिसदय हृदय मृदु त्याचें, कठिण का जालें ।
आश्चर्य मला हें गमलें ॥
छद ॥ मी काय करू गे तरि आतां ।
समजाविल कोण अनंता ।
उपजेल का दया हरिचित्ता ।
टीप ॥ ममवृत्ति जाउनी कोण सांगे मनमोहना ॥ विर० ॥ १
अतिविव्हळ[1] मानस माझें हरिच्या भजनीं ।
हरिवांचुनि युगसम रजनी ॥
म्हण घटिका लवपळक्षण हा जातो सजणी ।
जा आणि सखे सुखदानी ॥
कां निष्ठुर मानस केलें नकळे स्वमनीं ।
करुणानिधि हे श्रुतिवाणी ॥

---

( २८४ पृष्ठावरून समाप्त. )

श्याम सुंदर ती बाळा । रूपें दिसे सोनावळा ॥
चैतन्याची जीवनकळा । कान्हाई माझी ॥ ३ ॥
निजरूपाची तरणी । कैवल्याची सुखदानी ॥
केशवाची स्वामिणी । कान्हाई माझी ॥ ४ ॥

१ अति आतुर. या ठिकाणीं विव्हळ शब्द आतुर, उत्सुक या अर्थी योजिलेला दिसतो.

छंद ॥ गज स्मरला नक्रें धरितां ।
धांवलासि पळाह न लगतां ।
भगिनीच्या त्या आक्रांता ।
दीप ॥ धांवोनि पुरविलीं वस्त्रें करितां स्मरणा ।
माझीच कां नये करुणा ॥ विरहाग्नि० ॥ २
तुम्ही चव्रघी सहाजणी अठरा जिवलग सखिया ।
जा शोधा त्या यदुराया ॥
कोणि भक्तिसखी भेटुनी ने चाळवुनियां ।
कीं वनीं मेळउनि गडियां ॥
खेळतसे खेळां श्रीहरि नाना, परि या ।
सांगेल कोण प्रभुवर्या ॥
छंद ॥ ममवृत्त नेउनी कानीं ।
वियोगाग्नि जाळितो तरुणी ।
भवहरा येइ धांवोनि ।
दीप ॥ विनवणी करिल गे कोण तया जगजिवना ।
वळवोनि आणिं ममसदना ॥ विरहाग्नि० ॥ ३
हरिप्राप्तिस्तव तुम्ही श्रीगुरु मज गे बाई ।
ह्मणवोनि लागतें पायीं ॥
जा जा गे त्वकरि आणा तो अहिशायी ।
दुःखित मी झालें हृदयीं ॥
जो आद्यअनामय गाती निगमं सदा ही ।
ध्याताति योगिजन हृदयीं ॥
छंद ॥ गोविंद सखागुरुदाता ।
जा आणा त्या गे अनंता ।
नंदात्मज हरि श्रीमंता ।
दीप ॥ हा देवनाथ सुत विनवित प्रार्थित करुणा ।
भेटवा कलुषसंहरणा ॥ विरहाग्नि० ॥ ४

---

१ सकटकाळ. २ " धुतांचि मोतीं जळीं हरपलें सखोल मोठें पाणी । चला पाहूं साचार अठरा जणी ". ३ वेद.

## पद ( १०१ ).

उद्धवा सख्या तुह्मि जाहो ।
मथुरेहुनि प्राणविंसावा येउनि याहो ॥ ध्रु० ॥
जाउनी सख्यासी विचारा ।
त्रासिल्या अवघ्या गोकुळींच्या दारा ॥
तुजविण जीव झाला वारा ।
मृगसंसारं[1] दुःखाचा पसारा ॥
छंद ॥ प्रपंच हो आतां आम्हा कदापि नसावा ।
मनोहर ग गेला कोण्या गांवा ॥
दृष्टी पडेना आतां जीवींचा प्राणविंसावा ।
टीप ॥ अक्रुरा बरें त्वां केलें घोर जिवा हो ॥ उद्धवा० ॥ १
श्रीहरि जरि भेटेल तेथ ।
श्रुत करा सख्याला अवघा वृत्तांत ॥
कितिग बघूं मुरलीच्या पंथें ।
येकदा अधरधरमुरली येउनी येथें ॥
छंद ॥ धन्य हा सखा स्नेहें बरा भिन्न जाहला
प्रीतिच्या वृत्तीं कसा टाकोनी गेला ॥
मनमोहना निष्ठुर कां जाहला ।
कुब्जेसि कसा रतलाहो शोध करा हा ॥ उद्धवा० ॥ २
श्रीहरिला वृत्तांत श्रुत जाहलें ।
निजदासब्रीदाभिमानी गृहाप्रति आले ॥
गोपीमानस घोर निवालें ।
प्रीतिनें साधियेल्या मुद्रा तद्रुप झाल ॥
छंद ॥ गोपीमनोहरा तारीं दीनबंधू ।
श्रुतिशास्त्रें गाती तुह्मा करुणासिंधू[2] ॥
दासदेवनाथ करीं द्वारपासिंधू ( ? ) ।
पूर्ण करीं दया मज आतां उद्धवा हो ॥ उद्धवा० ॥ ३

---

१ संसार तुझ्याविण मृगजळवत् आणि शून्य असा वाटतो. २ म्हणजे काय ? ३ खरा पाठ काय असावा ? " दास देवनाथ करी द्वारापाशीं शब्दू " असा असावासें वाटतें.

# ईश्वराला प्रेमपात्र समजून केलेलीं भक्तिपर पदें.

## पद ( १०२ )

चाल चाल चाल चाल त्वरा करुनि ये नंदाचे बाळी ।
आशक तुजवर आम्ही तुझें रूप पाहूं नेत्रकमळीं ॥ ध्रुवपद. ॥
निगमवचन गुण रूप तुझें वर्णितां श्रवणीं पडलें ।
ऐकतांच तव रूप पाहुनि,मन उतावळें झालें[2]॥
घरबार बंधु सुत दार सखे तुजसाठीं सकळ त्यजिले ।
विरह तुझा अत्यंत मातकरे[3] कंठिं प्राण उरले ॥
टीप ॥ महा ठगणी ना दिससी नयनीं असुनियां जवळी । आशक० ॥ १
निर्विकार तू निरुपम उपमा नसे तुला दुसरी ।
अनत कोटि ब्रह्मांड खेळ हा तुझाच पुतनारी ॥
जगत्पाल हा ख्याल[4] तुझा तू व्याप्त चराचरीं ।
किति ग पाहाशिल अत त्वरित ये काढि जीव भारी ॥

---

१ या पदासारखेंच गोड व बहुतेक अशाच कल्पना भरलेले वणीकर गोविंद-महाराज यांचें पद ( काव्यसंग्रह ग्रंथमाला पुस्तक २४ पद ०८२ ) पहा आशक तुजवर आम्ही—देवाला आईबाप म्हणून आळविलेलीं पदें पुष्कळ आहेत. आपण स्त्री व प्रभु आपला प्रियकर अशी भावना धरलेलीही काहीं आहेत, पण देवाला माशुक बनविणारीं पदें हें व गोविंदमहाराजाचें पद हीं दोनच आमच्या पहाण्यात आलीं 'तुजवर आम्ही फिदा एकदां बोल पद्मलोचने हें वणीकरांच्या पदाचें ध्रुपद आहे २ तवरूप पाहुनी मन उतावळें झालें:—

'राजसे ग ! कैकाचे मन मोहिलें
राजसे ग ! हे प्राण पदीं वाहिले
राजसे ग ' पंढरिस तुला पाहिलें
तुझें ध्यान लागलें विकळ जिव होत असे साजणी ॥ १ ॥
ध्रुवनारद प्रल्हाद व्यास शुक सनकादिक ते भले
कर जोडुनि प्रार्थितां तुला पाहुनि स्तब्ध राहिले
निजसुरुतधन पदरी घेउनि उगे उभे राहिले ' गोविंदराय वणीकर—

या शेवटल्या तीन ओळींशी देवनाथाच्या 'सनकसनंद नारद मुनिजन तुझ्या रुपीं जडले । कचटाळिन तू मोहें ओढितां पुन्हां नाहीं फिरले " या ओळी तोलून पहा. ३ मातकर = मात करणारा, चित करणारा, त्रासदायक, क्लेशदायक. ४ ख्याल = ( फारशी शब्द ) नेहमींचा खेळ. सोड, सवय

टीप ॥ पहिलि भाक तुज हांक मारिली वचना सांभाळीं, ॥आशक०॥ २
मनक सनंदन नारद मुनिजन तुझ्या रूपीं गडले ।
कवटाळिण तू मोहें ओढितां पुन्हा नाहिं फिरले ॥
उद्धव अक्रुर प्रिये तुला तव रूपींच अनुसरले ।
विधि इंद्रादिक थकित वर्णितां निगमही शिणले ॥
टीप ॥ तुझ्या रूपाच्या छंदें स्मशानीं लोळे चंद्रमौळी ३ । आशक० ॥ ३
समर्थ अमुचा गुरू शिरावर ४ सत्र तयाहातीं ।
तुझ्यासाठिं आम्ही फकीर झालों धरुनि तुला हातीं ॥
अंग सांवळें अरुपनिर्मळें अघटित तव स्थिती ।
कदा सोडुना तुलें भोगुं निजमनांत अतिप्रीती ५ ॥
टीप ॥ दत्तनाथ म्हणे प्रेमें बांधिलें तुला हृदयकमळीं । आशक० ॥ ४

## पद ( १०३ ).

गडे आम्हांकडे पाहीं तुला भोगाया मन वाञ्छी ।
हासुनी बोल आम्हासि ग आम्ही परदेशी पंछी ६ ॥ ध्रु० ॥
नारदें नागरें रूप तुझें ऐकुनि सखे मोठीं ।
उत्कंठा मनीं झालि एकदा पाहावें तुला दीठीं ॥

---

१ पहिली भाक, तुज हांक मारली, वचना सांभाळीं " ये यथा मां प्रपद्यन्ते तांस्तथैव भजाम्यहं " इत्यादि पूर्वीचीं ईश्वराने भक्तांना दिलेलीं आणभाकरूपी वचनें आहेत, ( तीं स्मरून ) मी तुज ( आत्मोद्धारार्थ ) हांक मारली आतां तू आपल्या वचनाला सांभाळ, मी तर आधकपिसा झालोंच आहें. २ मोहें ओढितां पुन्हा नाहीं फिरल-एकदा ईश्वरचरणीं ध्यान लागून विरक्तता आंगीं बाणल्यावर पुन्हा मायाभ्रांतीमध्यें सापडले नाहीत ३ चंद्रमौळी शंकर हा फकिरांतला फकीर. याला एकदा ब्रह्मज्ञानाची चटक लागली म्हणून सर्व विश्व विसरून तो स्मशानांतच रममाण झाला हें फार सुंदर रूपक आहे ४ समर्थ आमुचा गुरु शिरावर-आमुचा गुरु आमचा पाठीराखा म्हणून उभा आहे भवभयें भ्यालों दारुण । यालागीं तुज आलों शरण । निवारीं माझें जन्ममरण । भावें श्रीचरण दृढ धरिले ॥ ३५७ ॥ तूं स्वामी असतां शिरीं । मज मृत्यू बापुडें केवीं मारी । भावें लोटांगण चरणावरी । रूपा उद्धरीं कृपाळुवा ॥ ३५८ ॥ एकनाथी भागवत अ २७ ५ तुलें कदा ना सोडूं, निजमनांत ( आम्ही ) अतिप्रीति भोगूं असा अन्वय अर्थस्पष्ट आहे ६ पक्षी ७ ( आरबी शब्द ) दुर्मिळ फार, सुंदर Rare, excellent, precious, wonderful. ८ सभ्य, शहाणें, हुशार, चाद्विदूशक ( नगरांतील ते नागर, खेडवळ नव्हे असे ).

अवणापासुनी विरह व्याकुळ बहु झाला पोटीं ।
अन्नपाणि हें गोड न लागे होत जीव कष्टी ॥
काय करावें कसें करावें कशी होईल भेटी ।
दिवस रात्र हे युगासमान जात पळें त्रुटी ॥
धन स्वदारा स्रग्चंदन उपभोग तुच्छ छी छी ॥ हांसुनी० ॥ १

विरह जाळि अति मला अवस्था भारी जाहलीसे ।
तुझ्या गांवचे माहितगार चौंथे जण खासे ॥
आले त्यांनीं सांगितलें रूप तुझें होतें जैसें ।
पुसुनी त्यांला बांधुनि कंबर निघालों मग तैसें ॥
तुझा ज्यासी व्यवहार देसिक साहु भेटलासे ।
धरुनी मनगट तणें तुजला दाविलें राजसे ॥
रूप पाहतां हृदयिं भेदलें जमा बाण बरछी ॥ हां० ॥ २

गई केले ज्वामर्द भले हे काणें होता वार्ता ।
प्रतित मला ही आली नयनीं रूप तुझें पाहतां ॥
विव्हळ झाल मानस दगा देउं नको आतां ।
अगसंग देउनी करीं मनोकाम आज पुरता ॥
चैन पडेना काय करूं असें वाटतसे चित्ता ।
सुखशयनीं भोगावें लाभ नाहिं याजपरता ॥
विकळ होतसें जीव जळाविण तळमळी जशी मच्छी ॥ हां० ॥ ३

जिवलग गडणी एक सखे लावण्य रत्न खाणी ।
तुझ्या रुपाला उपमा यावया नाहिंग त्रिभुवनीं ॥
शिरीं बालमुगुट तेजाळ भाल वीशाल कमलनयनीं ॥
सुंदर नासिक सरळ ओंष्ठ आरक्त कुंदरदनीं ।
कंबुकंठ हनुवटी कपोलें मृदु मंद हास्य वदनीं ॥

---

१ अठरा निमेष म्हणजे अठरा वेळ डोळ्यांची पापणी हालणें याला जो वेळ लागेल त्याला त्रुटी म्हणतात २ चार वेद ३ गुरु हाच सावकार किंवा मला शहाजोग सचोटीचा माणूस देशिक = गुरु, दिशा दाखवणारा ४ भाला ५ शंखासारखी तीन रेषांनीं चिन्हित अशा मान अशी मान असणें हें मोठ भाग्याचें लक्षण समजतात ६ ( पुल्लिंगी ) गाल.

करपल्लव अती सुंदर जे कां उदित श्रमहरणीं[1] ।
उदरीं त्रिवळि नळि नाभी सुशोभित ऊरवच्छलांछी[2] ॥ हां० ॥ ४
अपाद लंबिनि वनमाला ती गळां भव्यवर्णी[3] ॥
कटीमाजें[4] पाहे मृगराज धरुनियां लाज दडे विजनीं[5] ॥
जानु जंघे[6] पोटऱ्या सुनिळ[7] ते समान पद दोन्ही ।
सुकुमार बहुत अरुवार[8] पादतल प्रवाळसमवर्णी ॥
वांकी तोडर नूपुर मंजुळ वाजत उठत ध्वनी ।
दृग योगि निःसंग पाहतां अंग गोरवर्णी ॥
देवनाथ स्वस्वरुपाचा धरि छंद अन्यनेच्छी ॥ हांसुनी० ॥ ५

## लावणी ( १०४ ).

तुझा मुखडा अजब हिरकणी, तेज दिनमणी[9], सखे गोरा रंग ।
तुझें नटनागरें[10] रूप नयनिं पाहुनि आम्ही आषक झालों दंग ॥ ध्रु० ॥
तुझि तनू बहुत सकुमार, वर्णिती चार, साहा अठराजण ।
ऐकोनि कीर्तिरव कानीं, नगमे दिनरजनी, उतावळें मन ।
कधि पाहिन डोळेभरी, भोगिन अंतरीं, जाळी विरहाग्न ।
उपभोग, गमति मज रोग, नरुचे काहीं वाटे विषम[11] अन्न ।
बहु वृत्ति उदासिन गडे, मला आवडे, सुतदाराधन ।
अग श्वान मन जैसें[12], तसें त्यजुनि राजसें, ग सेविलें वन ।
अग विचार करुनि मानसीं, आलों तुजपासीं, धरुनि सत्संग ।
माथां न धरीं आडवा पदर, उघड भर नजर[13], पाहु दे अंग ॥ तुझें० ॥ १

---

१ अनुभव घेतलेले, अनुभवी (ज्या हातांना दुसऱ्याचे श्रमपरिहार करण्याची नेहमीचीच सवय आहे असे ) २ भृगुनें लत्ताप्रहार केल्यामुळें श्रीवत्स हें लांछन ज्याला उरोभूषण झालें आहे असा ३ भव्य दिसणारी ४ कटिमाज = कटिमध्य संस्कृत मध्यपासून माज ५ अरण्यांत ६ जंघा ७ काळसर. ८ मऊ नाजुक, सुबक ९ सूर्य १० चेटकि, नाटकी, लीलानाटकी यासारखाच हा शब्द दिसतो नट = पुनःपुन्हां नटाप्रमाणें नवता धारण करणारें आणि नागर = सभ्य सुंदर असें जें ईश्वरस्वरूप तें ११ कडू, वर्ज्य, द्वेष्य, तुच्छ. १२ म्हणजे काय ? १३ भर नजर = डोळेभर, पूर्ण नजरेनें, मोकळेपणें

तूं कपटी लपविशी सुखडा, बहुत अंग वेडा, माझा जीव ।
अतिसदय हृदय मृदु तुझें कठिण मजविशीं, जालें येईना कींव ॥
तव विरहबाण करि उठाण, विकळ बहु प्राण, दुःखी सदैव ।
जाळी यागाग्नि हृत्कमळीं, कृपांजळीं, वर्षें दाहा नीवव ॥
उदकाविण तळमळी, जशी मासळी, जाहलें तदैव ।
गडे तुझ्या गळयाची आण, विनवणी मान, विरह निर्वाव ॥
घरदार, त्यजुनि निर्धार, करुनि आधार, तुझा अव्यंग ।
अनुसरलों अति आवडी, घातली उडी, जालों निःसंग ॥ तुझें० ॥ २

तूं उपेक्षिल्या मग कसें, एक राजसें, जन्म वीफळ ।
वाटतो मला होईल, स्वसुख जाइल, म्हणुनि हळहळ ॥
चाल झटपट अति निकट सखे मग लंपट उतावेळ ।
घाबरा जीव बावरा करीं त्वरा उशीर न लावि एकपळ ॥
मन हृदयसुवनिं निजतेजें सुमनशेजेवरि निश्चळ ।
धरोनि निजावें मनीं समाधिसुखशयनीं भोगू अविकळ ॥
स्वानंद पूर्ण अक्षयीं, ज्या नाहीं सदा अभंग ।
देवनाथगुरुकृपारंग लुटतसे रावश्रीरंग ॥ तुझें० ॥ ३

## पद ( १०५ )

आपक आम्हीं, पिसें झालों ग [1] तुजवरतें ।
नको होऊ नयनाच्या परतें [2] ॥ ध्रुवपद. ॥
वर्णिती चारी माहि [3] कसे बाचें ।
अतिशय तेज स्वरूपाचें ॥

---

१ जोर करणे, उसळी मारणे ( मागें पद नंबर ५९ पहा ) २ याचे अर्थ व्यंगरहित, दोषरहित, पूर्ण, संपूर्ण येथें संपूर्ण, पूर्ण असा अर्थ लागला. २ परतें = पलीकडे ३ चारि = चार वेद माहि = सहा शास्त्रें ४ अतिशय तेज स्वरूपाचें इ० = हरिविजयात परमात्म्याचें तेज कसें असतें याबद्दल वर्णन दिलें आहे तें असें—यालागीं लक्षार्थ योजनें प्रमाण । पहुडल्या नील जीमूत वर्ण । कोटी मदन ओंवाळून । नखावरून सांडिजे ॥ ३७ ॥ कल्पांतीचे सहस्र आदित्य । तैसी दिव्य मूर्ति प्रकाशवंत । परम तेजस्वी कुंडलें तळपत । मकराकार उभयकर्णी ॥ ३८ ॥ ( ह. वि. अ० २ )

कोटि रवि लज्जित पदनखीं तेज त्याचें ।
गणति कोण करि रतिमदनाचें ?[1] ॥
चाल ॥ अग सखे ! अशी श्रुतिवाणी[2] ।
अग सखे ! एकिली कानीं ।
अग सखे ! धरुनियां स्वमनीं ॥
टीप ॥ हेतु, चित्तसरितें ।
पातलों शोध करित पुरतें ॥ आषक० ॥ १ ॥
बैसला हृदयीं श्रुतिवचनबाणफटका ।
लागला मनीं तुझा चटका ॥
सार वाटेना संसार समुळ लटका[3] ।
निघालों तोडुनिया तटका ॥

१ कोटि रवि लज्जित पदनखीं इ० याचा अन्वय येणेप्रमाणेः—त्याचें पदनखीं तेज ( इतकें होतें की ) कोटि रवि लज्जित ( मग तेथें ) रतिमदनाचें गणति कोण करि ? = याचा अर्थ ईश्वराच्या पायाच्या नखाचें तेज इतकें उज्ज्वल आहे की, त्या तेजापुढें कोटि रवींच्या तेजाची प्रभासुद्धां फिकी दिसते अशी जेथें स्थिति आहे तेथें रतिमदनाच्या तेजाची कोण गणति करणार. २ अग सखे अशी श्रुतिवाणी—कोटि आदित्य अथवा रतिमदनांचे जोडे ईश्वरचरणांच्या नखाग्रावरून ओंवाळावे असें एखादें वेदवाक्य आहे काय ? ३ सार वाटेना संसार समुळ लटका—'हा प्रपंच लटका मुळींहुनी' असा उपदेश शिवलीलामृतांत सातव्या अध्यायांत शिवयोगी यांनीं पद्माकर व सुमती यांना सांगितला आहे " म्हणे वत्से सुमति ऐक । कांहो रडसी करसी शोक । तुझे पूर्वींचे पतिपुत्रजनक । कोठें आहेत सांगपां ॥ ७ ॥ आलीस चौऱ्यायशीं लक्ष योनी फिरत । तेथिंच स्वजन सोयरे आप्त । आले कोठून गेले कोठें त्वरित । सांग मजपाशीं वृत्तांत हा ॥ ८ ॥ तूं नानायोनी फिरशी । पुढेंहि किती फेरे घेशी । कोणाचे पुत्र तूं का रडशी । पाहें मानसीं विचारूनी ॥ ९ ॥ शरीर धरावें ज्या ज्या वर्णी । त्या त्या कुळाभिमानें नाचती प्राणी । परी आपण उत्पन्न कोठूनी । तें विचारुनी न पाहती ॥ १० ॥ त्वां पुत्र आणिला कोठून । कोण्या स्थळीं गेला मृत्यु पावोन । तूं आणि हे अवघे जण । जातील कोठें कवण्या देहा ॥ ११ ॥ आत्मा शिव शाश्वत । शरीर क्षणभंगुर नाशिवंत । शरीराकारणें शोक करिशी व्यर्थ । तरी पडलें प्रेत तुजपुढें ॥ १२ ॥ जळीं उठती तरंग अपार । सवेंचि फुटती क्षणभंगुर । मृगजळचि

( पुढील पृष्ठ पाहा. )

चाल ॥ अग सखे ! उदासीन वृत्ती ।
अग सखे ! विरह जाळित चित्ती ।
अग सखे ! प्राण रिघों पाहती ॥

---

( २९३ पृष्ठावरून समाप्त. )

मिथ्या समग्र । तरी बुडबुडे सत्य केसेनी ॥ १३ ॥ चित्रींच्या वृक्षच्छाये बैसला कोण । चित्राग्निनें कोणाचें जाळिलें सदन । तेथें गगा लिहिली सहित मीन । कोण वाहोनि गेला तेथें ॥ १५ ॥ वध्यासुतें द्रव्य आणोन । भीष्म कन्या मारुतीस देऊन । गंधर्व नगरींचे वऱ्हाडी आणून । लग्न कोणे लाविलें ॥ १६ ॥ वाऱ्याचा मंडप शिंवून । सिकतादोरें बांधिला आवळून । शुक्तिका-रजताचें पात्र करून । खपुष्पें कोणी भरियेलें ॥ १७ ॥ कांसवीचें घालूनि घृत । मृगजळींचे मीन पाजळती पोत । ते चरणीं नेपुरें बांधोनि नाचत । जन्मांध पाहत बैसले ॥ १८ ॥ अहिकर्णाचीं कुंडलें हिरोनी । चित्रींचे चोर आले घेवोनी । हा प्रपंच लटिका मुळींहुनी । तो साच कैसा जाणावा ॥ १९ ॥ मुळींच लटिकें अशाश्वत । त्याचा शोक करणें व्यर्थ । क्लेश तरूचें उद्यान समस्त । शरीर हें उद्भवलें ॥ २० ॥

विठ्ठलकवीच्या एका पदांत अशीच कल्पना दिली असून त्यामध्यें खरोखर चटका कोणाला लागला याचें वर्णन आहे

"लागला चटका । हा प्रपंच अवघा लटका ॥ ध्रु० ॥
चटका लागला मिरेला । छळूनि विष दिधलें तिजला ।
निर्भय होउनियां मनाला । घेतला गुटका ॥ १ ॥
चटका लागला कबिराला । छळू संत आले घरला ॥
बायको विकून सावकाराला । मारिला फटका ॥ हा प्रपंच० ॥ २ ॥
चटका लागला जनीला । सोडून दिधलें गणगोताला ।
वेगळें होउन जन्ममरणाला । तोडिला तटका ॥ ३
चटका लागला विठ्ठलाला । शरण ब्रह्मानंद पदाला ।
विसर न पडे दिवानिशीला । लवपळ घटका ॥ ४ ॥

तसेच मध्वमुनीश्वराचेः--

'मी तोडुनि आलों तटका । तो जिवा लागला चटका ।
मजविण त्यां युगसम घटका । आठवतें प्रेम जयांचें ॥

हें पद प्रसिद्धच आहे. तडका तोडून ( अशीच म्हण मोल्स्वर्थमध्यें दिली आहे ) एकदम, तडकाफडक, तडाक्यानें सर्व विल्हेवाट लावून फटका=आघात घाव पुढें पहा.

टीप ॥ कांहीं सुचेना तें ।
गुज सांगावें कवणातें ॥ आषक० ॥ २ ॥
शोध करितांना झालों बहु कष्टी ।
शोध लागेना हिपुटी[1] ॥
करुनि पांचाची एकंदर मीठी[2] ।
शोधिलीं तत्त्वें तुजसाठीं[3] ॥
चाल ॥ अग सखे ! भूमि समही ।
अग सखे ! शोधिल्या त्याही ।
अग सखे ! पडसीना ठायीं ॥
टीप ॥ लावण्यसगुणभरिते ।
चुडालों तुझ्या विरहगर्ते ॥ आषक० ॥ ३ ॥
शोधिले चारी वेद बहु नेटें ।
चतुर्थ स्थानीं गुरु भेटे[4] ॥
वरद कर माथां देवोनि लाविं वाटे ।
खूण दाविली वचनें खोटें ?[5] ॥

---

१ हिपुटी=बेजार, त्रासलेला. 'तो फार हिपट झाला, तो फार हिपटवाणा झाला' म्हणजे थकला, त्रासला, बेजार झाला अशा अर्थानें वऱ्हाडांत वाक्यप्रचार आहे. २ करुनि पांचाची एकंदर मिठी--पंचतत्त्वें एकत्र करून त्यांचा नरदेह बनलेला आहे. "जायाचें हें सकळ लेणें । मागता देतां लाजिरवाणें । तनु-घर बांधिलें त्रिगुणें । पांच वांसे आणोनियां ॥ २६ ॥ याचा नाहीं भरंवसा जाण । केधवां लागेल न कळे अग्न । का हें झालें वस्त्र जीर्ण । ऋणानुबंध तव तगे ॥ २७ ॥ शिवलीलामृत अ ७

३ शोधिलीं तत्त्वें तुजसाठीं:--शंकरा तुझ्या परमेश्वररूपाचा साक्षात्कार व्हावा म्हणून "सकल तत्त्वें शोधितां साचार । तेसा हिमाचलीं त्रिपुरहर । विलोकिला जगदंबेनें ॥" शिवलीलामृत अ १४-७६.

४ चतुर्थस्थानीं गुरु भेटे--काव्यसंग्रहकार गुरुग्रह चतुर्थस्थानीं येतो असा अर्थ करितात. अजनगावकर बापूसाहेब देशपांडे 'चतुर्थस्थानीं म्हणजे समाधिविधींतील तुर्यावस्थेमध्यें मनुष्य पोंचल्यानंतर सद्गुरुकृपा सहज होते' असा अर्थ सुचवितात. ५ खूण दाविली वचन खोटें:--तू वरदकर माथां देवोनि वाटे लावीं तू लावशीलच अशी मला वेदानें अगोदर खूण दाविली आहे. हें वेदवचन खोटें काय ? असा येथें प्रश्न आहे असें श्रीमंत दाजीसाहेब देशपांडे कळवितात.

चाल ॥ अग सखे ? दया गुरुनाथा ।
अग सखे ! आलिया लावि पथा ।
अग सखे ! उन्मनीं माथा ॥
दीप ॥ चढवीनि गुरु वरतें ।
लक्ष दाविलें गुणातीतें ॥ आषक० ॥ ४ ॥

पाहुनि रूप तुझें हर्ष अंतरंगा ।
निववि देखोनि अंगसंगा ॥
उशिर न लावीं तू चिदानंदगंगा ।
तुझ्या स्वरुपीं देई जागा ॥
चाल ॥ अग सखे ! मनोरम बाळे ।
अग सखे ! सगुण वेल्हाळे ।
अग सखे ? ब्रीद आपुलें ॥
दीप ॥ चालवीं त्वरेंतें ।
पाववीं कामपूर्णतेतें ॥ आषक० ॥ ५ ॥

तुझा पाहुनियां थाट स्वरूपाचा ।
खवळला काम योगियांचा ॥
निजीं निजशयनीं भोगुं भोग साचा ।
सोहळा सुखसायुज्याचा ॥
चाल ॥ अग सखे ? तुला जनिं विजनीं ।
अग सखे ? पाहु निजनयनीं ।
अग सखे ! समाधिव्युत्थानीं[1] ॥
दीप ॥ नाहीं तुजपरतें ।
हृदयीं धरियलें देवनाथें ॥ आषक० ॥ ६ ॥

---

१ समाधि-व्युत्थानिं=आत्मस्वरूपाची प्राप्ति झाल्यानंतर, तें स्वरूप सदोदीत मनास ठेवून जेव्हां बाह्यव्यवहार होतो त्याला समाधिव्युत्थान म्हणतात एकनाथमहाराजांनीं समाधिव्युत्थानाचें स्पष्टीकरण खालील ओव्यांत केलें आहे भवमळ कल्पना जाण । ते कल्पना मनाआधीन । तें मन स्वरूपीं जाहलिया लीन । तेव्हां वस्तुचि होणें सर्वत्र ॥ ६६ ॥ जेणें स्वरूपानुसंधानें । सुखें क्रीडतु चिद्धनें । क्रीडा दैवयोगें करणें । देहाभिमानें विरहित ॥ ६७ ॥ पावोनि निजसुखप्राप्ती । मनादि इंद्रियें उपरमतीं । अणुभरी स्फुरेना वृत्ती । समाधि बोलती या नांव ॥ ६८ ॥ तेंचि स्वरूपीं ठेवुनि मन । बाह्यस्फुर्तीचें स्फुरे भान ।

( पुढील पृष्ठ पहा )

## पद ( १०६ )

कोणीकडे तुम्ही जातां, जाता जिवलगा [1] ।
घडीभर बसा, गोष्ट सांगा ॥ ध्रुवपद ॥
विरह तुमचा जी ! तुमचा जी ! साहीना ।
चित्त पायांविण पाहीना ॥
माझी करुणा दया, दयाच येईना ।
कठिणता काय म्हणुनि स्वमना ॥
तुम्हीं धरियली, धरियली जगजीवना ।
हात जोडितें विनति माना ।
दासि मी तुमची, तुमची जिवलगा ! ॥ घडीभर० ॥ १
आधि घेतलें, घेतलें मला पदरीं ।
लोटितां काय म्हणुनि दूरी ! ॥
आहे अपराधी, अपराधी गोष्ट खरी ।
अंगिकारिल्यावरी दूरी ॥
उपेक्षू नये, नये जी निर्धारीं ।
शरण आलिया दीन द्वारीं ।
चला या घरीं, घरीं लागवेगा ॥ घडीभर० ॥ २

---

( २९६ पृष्ठावरून समाप्त )

ते दशा गा व्युत्थान । साधुजन बोलती ॥ ६९ ॥ उंबऱ्यावरी ठेविला दिवा । तो जेवीं देखे दोहीं सवा । तैसी व्युत्थानदशा जीवभावा उभयस्वभावा देखणी ॥ ७० ॥ लवणजळा समरसता । तेवीं स्वरूपीं विरवूनि चित्ता । समाधि व्युत्थाना हाणोनि लाथा । निजीं निजस्वरूपता पावोनी ॥ ७१ ॥ ए भा अ. ९

१ चित्त पायाविण पाहीना–तुमच्या पायांवांचून दुसरी कोणतीच वस्तू लक्षांत नाहीं २ कठिणता–निष्ठुरपणा ३ निर्धारीं–निश्चयात्मकपणें ४ दीनोद्वारीं–असें मूळच्छापील प्रतीत होतें, पण श्रीमंत रघुपतराव दाजीसाहेब देशपांडे यांनीं सुरजी अंजनगांवाहून ' दीन द्वारीं ' असा पाठ लिहून पाठवला आहे आणि त्यायोगानें अर्थापत्ति योग्य होते

साधनांतरीं, अंतरीं लक्ष कोटी ।
साधलीं बहु तुम्हांसाठीं ॥
गिरीकंदरीं कंदरीं जी कपाटीं ।
बैसलें धैर्य धरुनि पोटीं ॥
योग साधिला, साधिला महाहाटीं ।
झालें मी फार हिंपुटी ॥
दृष्टि तुम्ही न पडा, न पडा भवभंगा ॥ घडीभर० ॥ ३

अंतरगृहीं गृहीं जी सात चकीं ।
अष्टभावाच्या पर्यंकीं ॥
प्रेमभरित म्यां भरित म्यां रचिली कीं ।
भक्तिनें सुमनसेज निकी ॥
लहर मदनाची, मदनाची महाबांकी ।
दुःख दे मला जाचते कीं ॥

---

१ साधनांतरीं—कीं साधनांतरें असा पाठ ? २ कपाटी—कपाट म्हणजे द्वार. गिरिकपाट = गिरिगव्हर, गुहा ३ महाहाटी—अतिहट्टानें, फारनिग्रहानें. ४ हिंपुटी—बेजार, त्रासलेला ' तो फार हिंपुट झाला हिंपट्वाणा झाला. ' म्हणजे त्रासला असा वाक्यप्रचार वऱ्हाडांत अद्याप आहे निकी—खरोखर ५ सातचकीं—चक म्हणजे माजघर, अंतर्गृह असा अनुमानाचा अर्थ कोणी कोणी सुचवितात मोल्स्वर्थच्या कोशांत चका हा पुल्लिंगी शब्द "किल्ल्यासभोंवार अगर राजवाड्याच्या आसपास दिलेली पाहरा चौकी " या अर्थी योजिला आहे, आणि तोच अर्थ बरा दिसतो कारण अशाच अर्थानें या शब्दाचा प्रयोग रघुनाथपंडितांच्या नलदमयंती आख्यानांत झालेला आहे –

"नल म्हणाला मज धरूनिया बाहीं । तुला कोठेंही चकअटक नाहीं ॥
सकळ भुवनें तरि फिरुनि राजगेहीं । एक नवरी मज योग्य वरी पाहीं "॥

'सातचकीं' हा शब्दप्रयोग आनंदतनयांत आहे'–

काय वर्णूं लावण्य कामिनीचें । इंद्रचंद्रां नेणवे रूप जीचें ॥
पंकजाक्षी निःशंक सात चकीं । रक्षपालां पाडोनि मोहपकीं ॥
जाति झाली कृष्णासि घेऊं अंकीं । होय दाता आनंदतनय रंकीं ॥

काव्य संग्रहांत ' शांत बकी ' व अजगांवकरांच्या कविचरित्रांत ' शांत चकी ' असे पाठ दिलेले आहेत, पण ते दोन्ही हस्तदोष दिसतात.

चला या, त्वर, त्वर अगसगा ॥ दडींभर० ॥ ५
द्वैत अद्वैत गाळुनीयां सहज ।
स्वरूपीं अखंड मन विरज ॥
अक्षयीं पहुडूं, पहुडूं सुखसेजे ।
भागु स्वानंदसायुज्य ॥
हेंचि मागणें, मागणें गुरुराजे[1] ।
इतुकें दान मला दीजे ॥
देवनाथाच्या, नाथाच्या अंतरंगा ॥ दडींभर० ॥ ६

---

# धांवे.

## पद ( १०७ ).

मां पाळय गोपाळ त्वरें ये । मां पाळय गोपाळ ॥ ध्रु० ॥
ऐकुनियां श्रवणीं करुणारव । दुडुदुडु धांवत चाल ॥ १
नामसुधामृत दे क्षुधितासि तूं । जननी जेऊं घाल ॥ २
अंगीकृतासी दुराविसी जरी । जाईल कीं मग ताल[1] ॥ ३
पतित उपेक्षिल्या राहील काय जी । पावन ब्रीद वहाल[2] ॥ ४
पाहसी अर्जुनी कौतुक कां हरी । सांगितला तुज हाल[3] ॥ ५
हे मुरलीधर मधुमुरमर्दन । नंदानंदन लाल[4] ॥ ६
देवनाथप्रभू सर्व क्षमा करी । ठेवीतसे पदीं भाल ॥ ७

## पद ( १०८ )

आत्मारामा सुखैकधामा मंगलधामा गोविंदा ।
आप्त सुहृद गणगोत सखा तूं तुजविण नाहीं अन्य कदा ॥ ध्रु० ॥
श्रीयदुवर्या, प्रतापसूर्या, मायातीता, अनंता ।
मानसमोहना, हरि खगवहना, विश्वजीवना, श्रीमंता ॥

---

१ ताल जाईल = बदसूर होईल, शिस्त बिघडेल २ कायम मज पतिताला उपेक्षिल्या तुम्ही ( पतिताचे ) पावन ( हें ) ब्रीद वहाल राहील काय जी ! ३ हकीकत, स्थिति, वृत्तांत ४ नंदाला आनंदन मोद देणारा श्रीकृष्ण लालाजी.

श्लोक ॥ हे राम राम जय राम जगन्निवासा, ।
हे राम राम भवतारक सार्विलासा ॥
हे राम राम भरताग्रज जानकीशा ।
हे राम दावि नयनीं तव पादरेषा ॥
मुनिहृद्भुवनविहारा साराभार विचारा श्रुति करिती ।
न कळसि तू कमलावर वर्णनिं फणिवर शिणला ते करिती॥आत्मा०
श्लोक ॥ हे कृष्ण कृष्ण जय कृष्ण हरे मुरारे ।
नदात्मजा जगदिशा करुणाकरारे ॥
गोपीपते अगयुगोद्धरणा कृपाळा ।
गोरक्षणा विनविती तुज गोप बाळा ॥
कमलापति हरि कमलदलाक्षा[1] कमठरूपें[2] करधृतकंजी[3] ॥
कच्छमच्छ वामनावनारा योगिजनमानसरंजी ॥ आ० ॥ २
श्लोक ॥ मदनदहनमित्रा नंदपुत्रा हरीरे ।
अजअजित अनामा या अघा संहरीरे ॥
श्रवण करुनि माझी कारुणा देवराया ।
तव भजन मला दे भीमसिंधू तराया ।
श्रीमद्गुरुवर सदानंद ये मायामद महरणा ।
दत्तनाथ नत पादकमळि तू पावन यदुकुलराणा ॥ आत्मा० ॥ ३

## पद ( १०९ )

तरि मजवरी करिं कृपा सख्या तू । ह्मणविसि कीरे दयाळ ॥ध्रु०॥
तारियले द्विज अजामिळादिक । वेश्या गणिका वेल्हाळ[4] ॥ १
वाचविला क्षिरसिंधु देउनी । उपमन्या द्विज बाळ ॥ २

---

१ कमलदलासारखे डोळे ज्याचे असा २ कासवरूप कूर्मावतारी धारण करणाऱ्या ३ हातीं कमल ज्याने धारण केले आहे अशा । अगयुगोद्धरणा = अग पर्वत याचे युग ( दोन पर्वत ) उद्धरणारा सांवरणारा कच्छावतारीं मंदर-पर्वत पाठीवर घेतला, व कृष्णावतारीं गोवर्धन नखाग्री धरिला. ४ हा शब्द वेल्हाळ की व्याळ आहे ? व्याळ म्हणजे कालिया सर्प याचे पाठ वाचकांनी सुचवावे

बैसविला ध्रुव अढळ पदीं त्वां । निवटुनियां भवजाळ ॥ ३
उचलुनी नखीं गोवर्धन गिरी । वांचविले गोपाळ ॥ ४
गांजियले बहु सज्जन दुर्जन । मर्दियेला शिशुपाळ ॥ ५
सर्व हरुनि मग बळिचें आपण । होसी कीं द्वारपाळ ॥ ६
देवनाथप्रभु पुरवीं आळी । ये पाळीं लडिवाळ ॥ ७

## पद ( ११० )

हरि हा भज भजरे । सकल दुरित तम वारी ॥ ध्रु० ॥
अजामळ गणिकादि तरली घेता नाम जयाचें ।
उद्धरिला गज मर्दुनि नक्रा साचे ब्रीद तयाचें ॥ हरि हा० ॥ १
मागतांचि क्षिरसिंधू दे उपमन्या द्विजबाळा ।
अचळपदीं ध्रुव बसविला त्या शरण जाय गोपाळा ॥ हरि हा०॥ २
लज्जा रक्षियली भगिनीची ज्याणें वस्त्राहरणीं ।
अपमानुनिया दुर्जन अंबर पुरवी अघटित करणी ॥ हरि हा०॥ ३
मंदस्मितमुख कुंदरदन जो कमलनयन हरिदाता ।
भवगोष्पदव्रत सहजचि हो[१], नाम जयाचे गातां ॥ हरि हा० ॥ ४
श्रुति शिणल्या वर्णितां, थकला शेषहि गातां वदनीं ।
बालभाव धरि आगणिं रांगे, नवगोळियां मदनीं ॥ हरि हा० ॥ ५
मेळवोनि सौंगडे गोपिंचें साचित[२] औरस चोरी ।
गिंवसुंनि[३] भाव हृदयमंदिरीं बांधिति ज्या व्रजनारी ॥हरि हा०॥ ६
शंखचक्रआयुधें शोभती गदापद्म चौंहातीं ।
पीतवसन तनु अति सुकुमार योगी नेनीं पहाती ॥ हरि हा०॥ ७
अर्जुन सारथि होउनि धरितो चौकरिं हय दोरे ।
दासाचा हरिदास दयाळु कां म्हणोनि न वदोरे ॥ हरि हा०॥ ८
विश्वंभर हरि जगदीश्वर हरगरळदाह जो नुरवी ।
नाम जयाचें जपता भावें निजजनवांछित पुरवी ॥ हरि हा० ॥ ९
श्री गोविंद गुरु प्रभुदाता तारक भवसागरीं ।
देवनाथ भजनीं करुणाघन जो अघताप निवारी ॥ हरि हा०॥ १०

---

१ ज्याचें नाम गातां दुस्तर भवसागर गाईच्या पावलासारखा ओलांडायला सुलभ जातो ' गोष्पद मानूनि दिनान शतदा यमुना ओलांडली ' रामजोशी
२ जमवलेले. ३ पकडुनि.

## पद ( १११ )

भज भज गोपाल । रसने भज भज ॥ ध्रु० ॥

केशव माधव मुरमर्दन हरि । श्रीधर जगपालं ॥ रसने० ॥ १

कंसांतक मधुसूदन यादव । कालांतक कालं ॥ रसने० ॥ २

राधावर जगदीश्वर ईश्वर । नंदयशोदाबाल ॥ रसने० ॥ ३

चत्वारिभुज पीतवसनकटि । मृगमदनिजभालं ॥ रसने० ॥ ४

देवनाथकृत वदन भावय । गुरुपद रजभालं ॥ रसने० ॥ ५

## पद ( ११२ )

दयानिधे जय केशवराया ॥ ध्रु० ॥

भवनदिचें जळ तुंबळ भरलें । धांवें उतराया ॥ दयानिधे० ॥ १

तुज वांचुनि मज कोण दयाघना । सांग करी माया ॥ दया० ॥ २

दीन अनाथ मी आलों भावें । शरणागत पायां ॥ दया० ॥ ३

देवनाथ प्रभुनाथ निरंजन । येवों द्यावी दया ॥ दया० ॥ ४

## पद ( ११३ )

गोकुळवाल्या । मज तारीं मुरलीवाल्या ॥ ध्रु० ॥

गोपी नामरसामृत प्याल्या । चिन्मयभूषण आंगी ल्याल्या ।
स्वरुपीं तन्मय होउनि रमल्या । पांडवाच्या हरि निजसाल्या ॥ १

गोप मुलासवें खेळसि हुमल्या । यमुनाजळीं मर्दिसि काल्या ।
शेषादिक स्तवितां गति शमल्या । वर्णितां श्रुति त्याही भ्रमल्या ॥ २

निर्मळ भक्तिभाव भुकेल्या । खासी गोपकरींच्या काल्या ।
अघ बक केशी मारनवाल्या । श्रीगुरु संदिपनाच्या चेल्या ॥ ३

तव गुणकीर्ती वेदें स्तविल्या । बुधजनिं हृदयीं त्या अनुभविल्या ।
त्यांणीं स्वरुपीं मति रमविल्या । चळथा जन्ममरण चुकविल्या ॥ ४

---

१कस्तुरिका. २ निजसाल्या=निजसाल्याजवळ=अगदीं जवळच्या साळ्या-जवळ ( मेव्हण्याजवळ ) द्रौपदी व सुभद्रा या दोघी पांडवजाया श्रीकृष्णाच्या भगिनी यामुळे तो पांडवांचा द्विगुणसाला झाला ३ कालिया सर्प ४ दहिंकाल्याचा प्रसाद. ५ सेपा, फेऱ्या, पोळ्या, भाकऱ्या, पत्रावळी इत्यादि एकावर रचतात त्याच्या समूहाला चळथ म्हणतात आंगी=आंगात घालावयाची बंडी

पुणे

नंदांगणिंच्या रांगनवाल्या । गाईवत्स चारनवाल्या ।
पाजीं तव नामामृत प्याल्या । देवनाथगुरु छैल छबेल्या ॥ गोकु० ५

पद (११४)

गा रे श्रीरमाला उमगा रे । ना तरी सिमगा रे ॥ गा रे० ॥ध्रु०॥
नंदानंदा श्रीगोविंदा । सच्चित्सुखकंदा ॥
वादा प्रतिवादा त्यागुनि भेदा । निजधामीं नांदा ॥
दीप ॥ सदय धवल अतिविमला स्वरुपा हृत्कमळीं भोगा ॥ गा रे० ॥ १
कामा हराया भगुनि रामा । सीताअभिरामा ॥
नामा अनामा निजसुखधामा । भज भज विश्रामा ॥
दीप ॥ श्रमरहिता श्रीरामापतिगुण, निगमादी नेणाति गा गा रे! ॥गा रे०॥
नाना कल्पना हृदयीं नाणा । स्थिर ठेवूनि स्वमना ॥
मानावमाना समदृश्य उगाणा । भावें विभू गा ना ? ॥

---

१ तव नामामृताचा पेला त्या पेल्याला ( दुसरें या शब्दाचें रूप प्याल्या, प्याल्याला ) पाजीं मला पाज २ छैल, छबिला, रसीला, रंगेला असे अनेक समानार्थक शब्द नागरीप्रचारिणी सभेने छापलेल्या तुळशीकृतरामायणाच्या मानसकोशांत सांपडतात हा शब्द मूळ हिंदुस्थानी खरा पण मराठी कवींचाही आवडता आहे. " छबिलें स्वरूप । स्वरूप विठ्ठलाचें । वदन पाहिलें अवचित त्याचें ' कमलानंदन.

३ निजधामीं नांदा:–मनामधून मीतूपणाची कल्पना दूर करून स्वात्मसुखसाधनीं रत व्हा ' नाना मतांतरीं भरी न भरावे । निजाचें घर ओळखावे रे ' केशवस्वामी. ४ कामा हराया'–कामा हराया, रामा भगुनि, सीताअभिरामा श्रीरमापतीसुखधामा विश्रामा नामा भज भज असा अन्वय कामक्रोधादिक षड्वैऱ्यावर काट करण्याकरितां स्त्रीवगैरेच्या मोहांत न गुरफटतां ईश्वराला भजा नाणा= न आणा, आणू नका ५ मानावमाना समदृश्य उगाणा'–तरच ईश्वरप्राप्ति होईल

'मानापमानाचें गोंवे । अवघे गुंडाळुनि ठेवावें ।
हेंचि देवाचें दर्शन । सदा राहो समाधान ' तुकाराम

उगाणा.–मूळ क्रियापद उगाणणें ( उगविणें ) हा शब्द कवितांतूनच जास्त रूढ आहे उगाणणें = गोळा करणें, गुंडाळणें, विशेषेंकरून देवानें भक्ताचें पापपुण्य एक करून त्यांचा भार आपल्यावर घेणें व त्याना मोकळें करणें, त्यांचा योगक्षेम वाहणे असा या शब्दाचा अर्थ मोलस्वर्थ देतो " दोष माझे नाणीं मना । करीं पापाचा उगाणा " येथे उगाणा म्हणजे उगवा, उगवाना असे क्रियापदरूप आहे

टीप ॥ देवनाथ वदे नाथ वदा मग नाश सहज भवरोगा रे [१] ॥ गा रे० २

पद ( ११५ )

गोविंदा रामा हो । गोपाळा रामा जी [१] ॥ ध्रु० ॥

जय भीमातीरवासा । भवभयहारका जी ॥
गोकुळगोपवेषा [२] । रुक्मिणी नायका जी ॥
दिनबंधु दिनानाथा । भवतापहारका [३] जी ॥
टीप ॥ पावन विश्वपाळा । चिर्ममौख्यदायका जी ॥ गोविंदा० ॥ १

अज्ञाननाशना रे । पंढरिराज देवा ॥
ये धांव त्वरें येई । येउं दे तुळा कणवा [४] ॥
वर्णितां श्रुति शिणल्या । पामरा काय केवा [५] ॥
टीप ॥ दीन मी शरण आलों । राखीं लाज वासुदेवा ॥ गोविंदा० ॥ २

चालतां मोहपंकीं । अतिशय रुतलों बा ॥
तुजविण कोण काढी । भवजाळीं गुंतलों बा ॥
सोसेना दुःख भारी । फार मी कष्टलों बा ॥
टीप ॥ तळमळी जीव म्हणुनी । अजी शरण पातलों बा ॥ गोविंदा० ॥ ३

बहु आळविनां येइना । करुणा काय रे बा ॥
किति अंत पाहतोसी । दाखवीं पाय रे बा ॥
लावितां उशिर आता । प्राण हा जाय रे बा ॥
टीप ॥ तुजवीण कोण माझी । बाप आणि माय रे बा ॥ गोविंदा० ॥ ४

---

१ भग नाश सहज भवरोगा.—याबद्दल तुकोबा म्हणतात.

'रामनामावण सेवी मना रे ।
भवरोगाप्रति औषध हेंची । वेंचुनि नलगे कांही धना रे ।
इंद्रियदमनपथ्यें ज्याचीं । त्यागीं तू विषय परि वमना रे ।
गातां हरिहर मुक्तचि हेंची । व्यर्थ तुका भग जाशिवना रे ।'

अ. क्र. पदसंग्रह १–१८०

२ गोकुळ गोपवेषा–गोकुळामध्यें गोपवेष धारण करणाऱ्या. ३ भवतापहारका–पद ४ वरील 'भवनदीमाधि' ची टीप पहा. ४ कणवा–कणव व कणवा (स्त्रीलिंगी) = दया, माया " वेढियेलों चोरीं अंतर्बाह्याकारी । कणवा माझी हरी नये तुज. ' ५ केवा = किंमत, वजन मोठेपणा " ठक पडलें कमलाक्षवा । आमचा केवा तो किती

द्विज अजामीळ गणिका । पातकी तारिले बा ॥
स्मरतांचि नाम वाणी । पशुगजा रक्षिलें बा ॥
अबरीष राजियाचे । गर्भवास सोसिले बा ॥
टीप ॥ ऐकुनी कीर्ति ऐसी । पदिं चित्त वेधलें बा ॥ गोविंदा० ॥ ५
द्रौपदी आळवीतां । तू करिसी धावणें बा ॥
भोजनीं तृप्त केले । ते ऋषी पाहुणे बा ॥

---

१ द्विज अजामीळ गणिका—अजामिळ कनोजा ब्राह्मण शूद्रस्त्रीवर भुलून व्यभिचाररत झाला तिच्यापासून त्याला दहा मुलें त्यांत कनिष्ठ नारायण यांचें नांव त्याच्या मुखीं वारंवार येई तें अंतसमयीं नेणतपणें आलें, एवढ्यावर विष्णुदूतांनीं त्याची यमदूतांपासून सुटका केली आणि त्याला सन्मार्गाला लावून अंतीं सायुज्यपद दिलें पिंगला गणिका आपल्या आवडत्या पोपटाला प्रेमानें ' राघोबा ' अशी वारंवार हांक मारी अंतकालच्या त्या हांकेनें तीही तरली. याबद्दलची सविस्तर टीप पूर्वी आलेली पहा. २ पशुगजा रक्षिलें बा—गजेंद्रमोक्षाची कथा द्रविडदेशींचा इंद्रद्युम्न राजा मलयाचलावर नारायणाचें आराधन करीत असतां त्यानें ध्यानैक-परायण झाल्यामुळें जवळ आलेल्या अगस्ति ऋषीचा आदरसत्कार केला नाहीं त्यामुळें ऋषीनें त्याला 'गज हो' असा शाप दिला, पण पुन्हां दयार्द्रदृष्टीनें 'श्रीविष्णु तुझा उद्धार करील' असा उःशाप दिला पुढें देवल ऋषीच्या शापानें जो हुहू गंधर्व नक्र झाला होता त्याचें व जलपानार्थ सरोवरात गेलेल्या या गजेंद्राचें हजार वर्षें युद्ध होऊन शेवटीं भगवतानें सुदर्शनानें नक्राचें तोंड कापून गजेंद्राला मोकळा केला व दोघांनाही सद्गति दिली, अशी कथा भागवतांत आहे ३ अबरीष राजियाचे गर्भवास सोशिले बा—श्रीमद्भागवत नवमस्कंद अध्याय ४ यांत अंबरीषाचें आख्यान दिलेलें आहे अंबरीषावर दुर्वासांचा कोप होऊन त्यावर दुर्वासांनीं एक कृत्या सोडिली, परंतु तिजपासून अंबरीषाचें रक्षण करण्यास श्रीविष्णूनीं सुदर्शनचक्र प्रेरिलें व कृत्येचा नाश करून अंबरीषाचें रक्षण केलें एवढीच कथा असून अंबरीषाकरितां भगवतानें गर्भवास सोशिला असें कोठें त्या कथेंत आढळत नाहीं तेव्हां अशा अर्थाची दुसरी एखादी कथा असल्यास नकळे. ४ धावणं करीं = धांवून ये, तुझा धांवा करितात त्याना बचावायला धांवणें कर या शब्दावर विस्तृत टीप ३१०पद पहा भोजनी तृप्त केले ते ऋषी पाहुणे बा'—दुर्वासाला अन्नदान देऊन यावर दयाळनाथांचीं दोन अति सुंदर पदें आहेत विश्वामित्राला तृप्त केल्याची अशीच कथा मुक्तेश्वरानें वर्णन केली आहे ' अरे मी भक्तिचा भुकेलों रे । केलों तैसा झालों रे ॥ धांवुनि आलों द्रौपदीचिया । भाजीपानासाठीं रे ' निजानंदस्वामींचें पद.

संकट वारियेलें । भगिनीचें ते क्षणीं बा ॥
टीप ॥ तुज पतितपावना रे । किती करुणा भाकणें बा ॥ गोविंदा० ॥ ६
अतिविनत देवनाथें । विनविले पाय रे बा ॥
खगवहन फणीवहना । बैसूनि येईं रे बा ॥
कवळूनि चहूंभूजीं । मज क्षेम देईं रे बा ॥
टीप ॥ तूं माय तानुलें मी । वोसंगा येईं रे बा ॥ गोविंदा० ॥ ७

## पद ( ११९ ).

**नंदाच्या नंदना । नवनीरदतनु[3] कोमलगात्रा दानवकुलकंदना ॥ ध्रु० ॥**
**नदिपतिजाप्रियतमा[4] । नदिवहन हर त्रिपुरगौरमनप्रियकर पुरुषोत्तमा ॥**

---

१ कवळून चहूंभूजीं मज क्षेम देईंरे बाः—" ते मज निरवधि आवडाति । भक्त महा सुमती ॥ दोंवरि दोन भुजा घेउनी आलों या काजा । कीं कवळावें अग तयांचें हृदयीं चोंहातीं ' असे निजानंदांनीं ईश्वराचें सकारण चतुर्भुजत्व स्थापन केलें आहे. उद्धव—श्रीकृष्णाच्या भेटीचें भागवतकार वर्णन देतातः—" ऐसें बोलोन श्रीहरी । आवडी चारी बाह्या पसरी । उद्धवातें प्रीतिकरि । हृदयीं धरी स्वानदें ॥ देवें सद्भक्ता क्षेम दिधलें । निजहृदयीं हृदय एक झालें । सांगणें पुसणें सहज ठेलें । बोलणें बोलें भाशिलें ॥ चहू वाचा पडलें मौन । जीवू विसरला जीवपण । एका तुष्ला जनार्दन । स्वानंदघन सद्भक्तां ॥" असें निजहृदयीं हृदय एक होणें हेंच खरें क्षेमालिंगन, असें एकनाथमहाराजांनीं समर्पक विवरण केले आहे. ज्ञानोबा म्हणतात, कीं भक्तालिंगनाच्या हर्षातिरेकानें देवाला एकदां दोन हात जास्त फुटले "संत भेटती आजी मज । तेणें झालों चतुर्भुज । दोन्ही भुजा स्थूळीं सहज । दोन्ही सूक्ष्मीं वाढिल्या ॥ आलिंगनीं सुख वाटे । प्रेम चिदानंदीं गोठे । हर्षें ब्रह्मांड उलटे । समूळ उडे मीपण " ज्ञानदेव गाथा.

२ ' ओसगीं ' म्हणजे मांडीवर ' केशवा ! अनंता ! श्रीरंगा ! मुनिजनमानसभृंगा ! अचळ अद्वय अभंगा । पावें पांडुरंगा ॥ घेई झडकरि ओसंगा । निरसीं संसृतिदुंगा ।' कृष्णदास कवि.

३ नीरद – मेघ, नीर म्हणजे पाणी देणारा नवनीरदतनू—नवीन मेघांप्रमाणे श्यामकांति ४ नदीपति—सागर त्यापासून जन्मलेली लक्ष्मी तिचा **प्रियतम.**

मायाशार्वरितमा । हरिसि धरिसि करिं भरिसि स्वमुख अतिनिज तूं तात मा ॥
चाल ॥ गुणातिता षड्गुणा ।
श्रुति वर्णिति त्वद्गुणा ।
नाकळसी गुणगणा ॥
टीप ॥ श्रमुनि श्रमुनि मग धरिती मौन्या करिती पदवंदना ॥ १
जय जय जी जगदीशा ।
मुनिजनमनविश्रामधाम हरि निगम वर्णिती यशा ॥
ऐकुनि वृत्ती पिशा ।
स्वमन मीनवत तळपत लक्षुनि प्रभुपदरजआमिषा ॥
चाल ॥ हे प्रभु त्रिभुवनआलया ।
वसे पद्मा पदआलया ।
नुपेक्षीं शरण आलिया ॥
टीप ॥ यदुकुलमणि फणिशयना गहना कालियअहिमर्दना ॥ नं० २
मंदरधर माधवा ।
मंदहसितमुख कुंदरदन मुनिवृंदसौख्यसिंधवा ॥
हे प्रभो दीनबांधवा ।
छंद तुझा निर्द्वंद्व द्वंद्व हरि पद दाविसि केधवां ॥
चाल ॥ मम मनोवृत्ति तुज वरी ।
जाहली तुझी नोवरी ।
निशिदिनिं हे मानस वरी ॥

---

१ मायाशार्वरितमा हरिसि–मायारूप रात्रीच्या अंधकाराला ज्ञानोदयानें दूर करितोस. हरिसि…तात मा यांत दोन अक्षरें राहिलींशीं वाटतात व अन्वयार्थही कठीण दिसतो २ नाकळसी = आकळत नाहींस, साध्य होत नाहींस. ३ निगम–वेद ४ मीनवत तळपत–मनाला मीनाची, गजेंद्राची वगैरे उपमा जागोजाग आढळते मीन जसा आमिषाला म्हणजे गळाला लावलेल्या भक्ष्याला पाहून चपळाई करतो तसें मन हें प्रभुपदरजाबद्दल सोत्कंठ झालेलें आहे. ५ छंद केधवां–हरि तुझा निर्द्वंद्व द्वंद्वपद केव्हां दाविसी हा छंद. द्वैतभाव ज्या ठिकाणीं गळून पडतो असें तुझें श्रीपदयुगुल केव्हां दिसेल हा निदिध्यास. ६ मम मनोवृत्ति जाहली तुझी नोवरीः– परमेश्वराच्या ठायीं मातृभाव कल्पून आपल्याला अपत्यभाव आणणारे कवि

( पुढील पृष्ठ पहा. )

टीप ॥ युगसम लव पद क्षणों तुजविण हा विबुधबंधछेदना ॥ २
गोविंदा गुरुवरा ।
विमलकमलदललोचन कोमल पद दावा मावरा ॥
मम करुणा श्रवणीं वरा ।
दुस्तरतर अतिदुर्धर भव, कर देउनि मज सांवरा ॥
चाल ॥ जय जय पतितोद्धरा ।
मज पतितातें उद्धरा ।
ब्रिद साच करा श्रीधरा ॥
टीप ॥ देवनाथ नत प्रार्थित करुणानाथ मुरलिवादना ॥ न०॥ ४

## पद ( ११७ ).

नदनंदना विश्वसूत्रा । सख्या पशुपतिप्राणमित्रा हो ! ॥
रमारमण अघशमन नमन तुज ये राजिवनेत्रा ! ॥ ध्रु० ॥
मंदरोद्धरा मदनताता । मधुसूदना रमाकांता हो ! ॥
मजवरि करिं हरि दया प्राणसखया श्रीअनंता ॥

---

( ३०७ पृष्ठावरून समाप्त )

पुष्कळ आहेत, पण देवनाथांनीं या पदांत आपल्याला नोवरी मानले आहे व दुसऱ्या एका पदात (पद १०५) आपल्याला आधकाची उपमा लावली आहे.

मम मनोवृत्ती तुझी नोवरी झाली, पण त्याप्रमाणें तूंही आपल्याकडून माझ्यावर निस्सीम प्रेम करशील तर माझ्या जिण्याचे सार्थक असा भाव यावर निजानद म्हणतात:—

" रविशशिविण जैसी, दिनरजनी, शोभा न पवे माय !
वांचुनि घनबिंदू, क्षिरासिंधू, टाकुनि चातक जाय
मीना जळ नाहीं, परि पाहीं, दधिमधु सेविल काय
तैसे तुजविण हो, मज माय, अपाय ते ऊपाय
कंठीं कृष्णमणी, न विराजे, कुंकम न वसे भाळीं
त्याविण वधु सर्व, शृंगारा, लेउनि काय जाळी ! "

यासाठीं ' कंठी कृष्णमणी ' रात्रंदिवस असून भक्तिसौभाग्य कायम असावें एवढीच जिवाची धडपड. पुढें एका पदांत ' मनोवृत्ति राधा ' असें म्हणून मनोवृत्तीची व राधेची तुलना केली आहे

१ लव पद म्हणजे फार लहान असा क्षण म्हणजे एकेक पळ तुजविण युगसमान वाटतो. २ पशुपतिप्राणमित्रा—शंकराच्या जिवलग सख्या.

माधवा ये मायारहिता । यदुवंशमणि ! श्रीमंता हो ॥
मुनिजनमनहारका दीनतारका कृपावंता ॥
चाल ॥ हे विबुधवंधच्छेदका विश्वपोषकामूळकंदा ।
हे परात्परा सुखकरा आदिईश्वरा चिदानंदा ॥
हे गुणातिता षड्गुणा भक्तभूषणा परमसुखदा ।
टीप ॥ प्रभो हे सच्चित्सुखपात्रा । निगमनिजबीजमूळमंत्रा[1] हो ।
अधोक्षजा श्रीअजा कमलजाप्रिय कमनियगात्रा ॥ नंद० ॥ १
शिणल्या श्रुति वर्णिति महिमा । नेणवे अद्भुत तव गरिमा हो !
मां पालय अच्युता ममांतरगत आत्मारामा ॥
शरण मी तुला पूर्णकामा । मान विनवणि हे गुणग्रामा हो !॥
भवाब्धिची अतिलहर कहर[2] करि ये मंगलधामा ।
चाल ॥ षड्रिपू गांजिती दुष्ट, वारिती कष्ट, अंतःकरणीं ॥
हे मनोवृत्ति या न्याइं व्याघ्रसमुदायीं जशी हरणी ॥
श्रीहरी बहुत घाबरी किति परोपरी विनवुं चरणीं ॥
टीप ॥ दीनवत्सला पुण्यक्षेत्रा । पूर्णब्रह्मा हरि स्वातंत्रा हो ॥
आजि आद्य तू वैद्य देईं भवरोगदहनमात्रा[3] ॥ नंदनंदना० ॥ २

---

१ वेदांचें मूळरहस्य व मूळबीज असा जो तू २ भवाब्धिची लहर अति कहर करी असा अन्वय ३ 'आजि आद्य तू वैद्य देईं भवरोगदहनमात्रा'—ईश्वराला अथवा गुरूला भवरोगाची व्यथा दूर करणाऱ्या वैद्याची अथवा भवपिशाच्चाची बाधा निवारणाऱ्या पंचाक्षऱ्याची उपमा जागोजाग दिलेली आढळते. 'सम' रसता रसमजरी। रस देउनियां रोग दवडिला दुरी। आरोग्य देहनगरीं' देवनाथ. परंतु कबीर म्हणतात कीं, आपल्या हृदयातील भक्तीची ज्योत हेंच खरें भवरोगरसायन आहे.

'भक्तिरसायन बडाजि होवे भवरोगनका झाडा ॥ ध्रु० ॥
श्रवण परिक्षितीं कीर्तन नारद स्मरण करे प्रल्हादा ।
पग सेवन लछमीसें हुवा हरीचरण चित्त जडा ॥ १ ॥
अरचन किया पृथुराजनें वंदन अक्रुर किया ।
दास्य किया सो हनुमानजीनें निसिदिनीं आगे खडा ॥ २ ॥
सख्यभक्ति अर्जुननें पाई बलीनिवेदन किया ।
तनमनधनही सब दे डारा हात जोडकर खडा ॥ ३ ॥

( पुढील पृष्ठ पहा )

बुडत भवपुरीं होत आपदा ! कर्णधारा परमानंदा हो १ !
विरहबाण हरि प्राण माज विनवणी श्रीगोविंदा ॥

---

( ३०९ पृष्ठावरून समाप्त )

भक्ति करेगा जो भवरोगी मुक्ती उनकी दासी ।
पोथीपुरानकुरान देखे दुजा मार्ग नहिं बडा ॥ ४ ॥
भक्तिबिन कोई नरतन जावे सब शास्तरमों देखा ।
दुजा उपाय नही जानके कबीर भक्ति नहिं छोडा ॥ ५ ॥

गोपाळनाथांचें खालील पद सदैव सस्मरणीय आहे.

" वैद्यें गुण केला बा गुण केला । संशय अवघा हरिला ॥ ध्रु० ॥
भवरोगाचा झाडा । आत्मप्रचीति देऊनि पुढां ॥
तळमळ जीवपणाची भारी । औषध देऊनि केली दूरी ॥
शांतिसुखाचें पथ्य । मन मारुनि केलें हित ॥
गोपाळनाथ म्हणे मी रोगी । सद्गुरु वैद्य मिळाला वेगीं ॥

१ बुडत भवपुरीं होत आपदा कर्णधारा परमानंदा हो––भवसागराच्या अति कहर लहरींमध्यें जीव बुडत आहे, आणि या भवजलाच्या खोल भोंवऱ्यांतून जीवनौका सुखरूप तारून नेण्याकरितां योग्य नावाडी फक्त गुरु अथवा परमेश्वर होय, अशी कल्पना मराठी कवींतून वारवार आढळते. मोरोपंत आपल्या केकावलींत म्हणतात––

" स्मरे घडि घडि प्रभो ! भवपयोधिच्या पारदा ॥ ११५ ॥
तुझें यशचि तारितें परि न केवळा तारवें ।
सहाय असिला असें तरिच शत्रुला मारवें ।
न भागवत भेटतां न घडतांहि सत्संगती ।
न अज्ञहृदयें तशीं तरि यशोरसीं रंगती ॥ ११६ ॥
बुडे, बुडवि सागरीं तरि, सुकर्णधाराविना ।
सहाय नसतां स्वयें परतटासि ती दाविना ॥
सहाय भगवज्जना तव सुकीर्ति जेव्हां करी ।
तईंच उतरी भवोदधितरीं जनां लौकरी ॥ ११७ ॥

कान हातीं धरून निजगुज सांगणारा म्हणून श्रीगुरूला व भक्तवत्सल परमेश्वराला कर्णधार म्हणतात, असेंही एकनाथ महाराजानें व्याख्यान आहेः–– " कानीं निजगुज उपदेशिता । यालागीं गुरु कर्णधार म्हणती तत्त्वतां । कानीं धरितांच उद्धरी भक्तां । यालागीं सर्वथा गुरु कर्णधार ॥ १७५ ॥ भवाब्धीमाजी नरदेह तारू । तेथ सद्गुरु तोचि कर्णधारू । त्यासी अनुकूल वायु मी

( पुढील पृष्ठ पहा. )

तारिल्या ब्रजवासी प्रमदा । व्यभिचारिणि गणिका मदा हो ।
नगोद्धरा उद्धरिली रक्षिली त्वां पावनबिरुदा ॥

( ३१० पृष्ठावरून चालू )

श्रीधरू । भवाब्धिपरपारू पाववया ॥ १७६ ॥ कैसा गुरु कर्णधार कुशळ । आवर्त खळाळ आदोळ । चुकवूनि विकल्पांचे कल्लोळ । साम्यें पाणिढाळ सवेग काढी ॥ १७७ ॥ ” भागवत अ २० वा.

ईश्वराच्या कर्णधारकत्वावर रंगनाथस्वामींनीं संपूर्ण रूपक बनविलें आहेः –

धांवें पावें कर्णधारारे! निर्विकारारे! देवा देशिकराया ! ।
भवजळीं बुडतों मी ये काळीं, मायामृगजळीं घेई पार कराया ! ॥ ध्रु० ॥
दुस्तर अतिचंचळ जळ तुंबळ कांहीं केल्या तुटेना ।
मगरी आशा तृष्णाकल्पना, दुर्वासना यांची मिठी सुटेना ।
यांणीं मज बुडवितां पाताळीं, तुजविण वळीं सोडविता दिसेना ।
लक्ष चौऱ्याशीं आवर्त, मिथ्या विवर्त, माजी जळचरें नाना ॥ धांवें० ॥
रजतम हे दोन गुण, महादारुण, वक्र नक्र सदाही ।
कामक्रोधादिक सर्प रे, त्यांचा दर्प रे ! सोसवेना कदाही ।
परस्पर मदमान तळपती, लाटा उसळतां, स्वर्गपर्यंत पाहीं
जन्मजरा आणि मरण, सस्मरण चक्र लागला देहीं ॥ धांवें० ॥
अनुकंपा नौका घेउनी, वेगीं येउनी, मज काढुनि नेई
नावाडिया गुरुनायका, सुखदायका, यश निर्दोष घेई ।
मायानदी मृगजळवत, करुनि त्वरित, सुखशाश्वत देई
सहजपूर्ण निजरंगारे ! निःसंगारे ! करुणाकर तू होई ॥ धांवें ॥ ३ ॥

पुढील एकनाथांचें वर्णन पहाः—“ मायाजलें भवसागरू । भरला असे अति दुस्तरू । त्याचा उतरावया पारू । होय तू तारू मुनिराया ॥ ९१ ॥ याचें सकळ जळ क्षार । माजी सावजें अनिवार । एकएकें चराचर । गिळिलें साचार निजशक्ती ॥ ९२ ॥ लाटांवरी अचाट लाटा । मोहाचिया अतिदुर्घटा । आदळती अविवेकतटा । धैर्याचिया कांठा पाडीत ॥ ९३ ॥ अहंकुवावो वाजतो थोरू । अवघाचि कवळे सागरू । मी माझेनि गर्जे घोरू । अति दुर्धरू गर्जत ॥ ९४ ॥ नाना वासनांचा वळसा । पाहें पां भवताहे कैसा । येथ तरावया धिंवसा । नव्हे सहसा सुरनरां ॥ ९५ ॥ क्रोधाचें प्रबळ भरतें । भरी दोषाचिया तरियातें । असूयातिरस्कारांची तेथें । चिडाणीं उठे अनिवार ॥ ९६ ॥ कामपर्वताचीं शिखरें । विषमें भासती अपारें । आशे इच्छेचीं वरी थोरें । झाड विषयाकुरें वाढलीं ॥ ९७ ॥ संकल्प विकल्पाचे मीन । निंदेच्या सुसरी दारुण ।

( पुढील पृष्ठ पाहा. )

चाल ॥ जो स्वसुतमिषें[1] पाहतां तुला वाहता परमपुरुषा ।
तव नाम अनळ अतिप्रबळ सकळ तृणवत्[2] जाळित कलुषा ॥

---

( ३११ पृष्ठावरून समाप्त. )

ब्रह्मद्वेषाचे नक्र पूर्ण । सागरीं जाण तळपती ॥ ९८ ॥ एवढाही हा भवसागरू शोषिता तूं आगस्ती साचारू । तुझेनि भवाब्धी पैलपारू । पावेन हा निर्धारू झाला आम्हां ॥ ९९ ॥ ” एकनाथी भागवत अध्याय दुसरा.

एकनाथांच्या अगोदर ज्ञानेश्वरींत सातव्या अध्यायांत रूपक आहे.—“आतां महानदी हे माया । उतरौनिया धनंजया । मी होडजे हें आया । कैसेनिये ॥६६॥ जिये ब्रह्माचलाचां आघाडां । पहिलेया संकल्पजलाचिया उभडा । सवेंचि महाभुतांचा बुडडा । सानां आला ॥ ६७ ॥ जे सृष्टिसचाराचेंनि ओघें । चढत कालकलांचेनि वेंघें । प्रवृत्तिनिवृत्तीचीं तुगें । तटें साडी ॥ ६८ ॥ जे गुणघनाचेंनि वृष्टिभरें । भरली मोहाचेनि महापूरें । घेउनि जात नगरें । यमनियमाचीं ॥ ६९ ॥ जे द्वेषाचां आवर्ती दाटत । तेथ मत्सराचे हक्रे पडत । माजि प्रमादादि तलपू आंत । महामीन ॥ ७० ॥ रतिचेया घेटा । आदळती कामाचिया लाटा । तेथ जीवफेन संघाटा । सीघ दिसे ॥ ७२ ॥ अहंकाराचिया चलिचां । वरी मदत्रयाचिया उकलिया । जेथ विषयोर्मीचे कलिया । उल्लालु घेति ॥ ७३ ॥ उदो अस्तूंचे लोंढे । पाडित जन्ममृत्यूचे चोंढे । जेथ पांचभौतिक बुडडे । होत जात ॥ ७४ ॥ एक स्वयंबुद्धीचा बाहीं । रिगाले तेयांची नाहीं । एक जाणिवेचां डोहीं । गर्वें गिलिले ॥ ८० ॥ एकीं विद्येचिया सांगडी । घेतलिया अहंभावाचिया डोंडी । ते मदमीनांचा तोंडीं । सगळेचि गेले ॥ ८१ ॥ एथ एकचि लीला तरले । जिहीं भजोनि मातें वारिलें । तेया ऐलीचि थडिये सरलें । मायाजल ॥ ९४ ॥ जेयां सद्गुरु तारू पुढें । जे अनुभवाचिये कासे गाढे । जेया आत्मनिवेदन तरांडें । आकललें ॥ ९७ ॥ एणें उपायें मज भजले । ते हे माझी माया तरले । परी ऐसे भक्त विपाइले । बहुवस नाहीं॥९९”

( टीप पान ३१०–३११ वर )

विरहयाण'—अन्वय ' विरहयाण प्राणहरी श्रीगोविंदा विनति मान नगोद्धरा ! ( गोवर्धन पर्वत उचलून धरणाऱ्या ) ! पावनविरुदा ! त्वा व्रजवासी प्रमदा तारिल्या. मदा व्यभिचारिणी गणिका उद्धरिली रक्षिली.

गोपतिः—गोपाल अथवा पृथ्वीपति.

१ स्वसुतमिषें—अजामिळावर पद ३६ ची टीप पहा. २ तृणवत जाळित कलुषाः—केकावली पहा

' अजामिळ अघासुर व्रजवधू बकी पिंगळा
अशां गति दिली उरे न तृण भेटतां विंगळा. '

सोडविलें विप्रा तुवां प्रभो तोडुनियां यमपाशा ।
टीप ॥ शीण वर्णितां शेषवक्त्रा । उदारा त्रिगुणागुणयंत्रा हो ! ॥
अढळ पदासन दिलें भलें उत्तानचरणपुत्रा ॥ नंदनंदना० ॥ ३
अजी सायोज्य सौख्यसदना । मदनमोहना कुंदरदना हो ! ।
द्रौपदीलाजरक्षका यदुनायका कंसकंदना ।
नखें सांडवीं कोटि मदनां । प्रार्थितों तुला कमलवदना हो ! ॥
पुरवुनी वसन रक्षिली लाज भगिनीची केशिसुदना ।
चाल ॥ दुर्वास छळणिं ये वनीं सत्वहरणार्थ मनीं तृष्णा ॥
मागती मध्यरात्रिसी अन्न संकटीं पडे कृष्णा ।
ते समयीं आठवी सती म्हणे, 'श्रीपति धांव कृष्णा ! ' ॥
टीप ॥ येसि घालिसी अन्नसत्रा । जीवनीं निर्मुनियां पात्रा हो ! ।
तुमचि अघमर्षणें तृप्त करिसी तूं सर्वत्रा ॥ नंदनंदना० ॥ ४
कृपाळा हरि त्रिभुवनधन्या । विश्वपोषका वेदमान्या हो ।
दयाघना दिनबंधु दिला क्षिरसिंधु उपमन्त्या ॥

---

१ शीण वर्णिता शेषवक्त्रा–शेषाच्या जिव्हा चिरून दुभंग झाल्या असा ईश-वर्णन प्रसंगी सार्वत्रिक कविसमय दिसून येतो
"तुज वर्णी ऐसा तुजवीण नाहीं । दुजा कोणी तिहीं त्रिभुवनीं ॥
सहस्रमुखें शेष शीणला बापुडा । चिरलिया दाढा जिव्हा त्याच्या ॥ " तुकाराम
२ त्रिगुणागुणयंत्रा–सगुणनिर्गुणात्मानें विश्व व्यापिणाऱ्या ३ उत्तानचरण-पुत्रा–उत्तानपाद राजाचा मुलगा ध्रुव याला ४ नखें सांडवी कोटिमदना–कोटिमदन ज्याच्या एका नखाग्रावरून ओंवाळून टाकिले तरी रूपाला तुलणार नाहींत इतका सुंदर ५ अघमर्षणे–'साठ हजार खंड्या अन्न मला एकट्याला आणि याशिवाय वेगळे माझ्या शिष्यांना भोजनास पाहिजे,' असें दुर्वासानें मध्यरात्रीं सांगितल्याबरोबर द्रौपदीनें त्यांना स्नानास जावयाला सांगितले आणि कृष्णाचा धांवा केला थाळींत उरलेलें अथवा श्रीकृष्णानें तेथें मुद्दाम निर्माण केलेलें एक शाकापत्र खाऊन परमात्म्याची तृप्ती झाल्याबरोबर तिकडे स्नानार्थ गेलेल्या ऋषींची मायिक मेजवानीनें तृप्ती झाली आणि त्यांनीं धर्मराजाची माफी मागितली यावरचीं दयाळनाथांचीं दोन्ही पदें पहा. अघमर्षण–स्नानाच्या वेळीं पाण्यांत बुडी देणें
६ दिला क्षीरसिंधु उपमन्या:—वसिष्ठकुलोत्पन्न व्याघ्रपाद मुनीचा वडील मुलगा याचा धाकटा भाऊ धौम्य. लहानपणीं हा दुसऱ्या एका ऋषि-पुत्राच्या घरीं गेला असतां त्यानें त्याला दूधभात खातांना पाहिलें. घरीं

( पुढील पृष्ठ पाहा. )

विलया ने दुष्कृतसैन्या । देई बा ! निजसुखसौजन्या हो ! ।
अकळ तुझी हरि कळा यशोदाबाळा ये चिमण्या ॥

---

( ३१३ पृष्ठावरून चालू )

आल्यावर तो आपल्या आईजवळ पोटभर दूधभात जेवावयाला मागू लागला, पण दरिद्र्याच्या घरीं तो कोठून मिळणार ! तथापि 'दारिद्र्यचि कपट तीस तें पढवी' आणि तिनें पीठ पाण्यांत कालवून तें दूध म्हणून प्यावयाला दिलें असें रोज चाललें असतां एक दिवस त्याचा बाप त्याला एका जातवाल्याच्या घरीं यज्ञ चालला होता तेथें घेऊन गेला तेथें खरो खरींचें दिव्यसुरभिदुग्धपान घडतांच त्याला मातेचें ममताकपट कळलें, आणि घरीं परत आल्यावर तो मातेच्या हातचा 'पिष्टरस' पिईनासा झाला. त्या गोष्टीचा बिचाऱ्या विप्रस्त्रीला फारच खेद झाला, आणि

" कृष्णा । मज आलिंगुनि मस्तक हुंगुनि असें म्हणे माता ।
मागसि तें दुग्धोदन कैचें या तापसाजना ताता ॥
वाताहार करावा प्यावें जळ, शाकमूळफळ खावें ।
सुखभोगविहीनत्वें या आम्हां तापसांसि वळखावें ॥
बा ! आम्हां ऐशांची परमागति शिव, तया सदाराध्या ।
क्षीरोदन किति, पुरविल, सकलेच्छित, ईश्वरा सदाराध्या ॥

पुढें मातेच्या उपदेशानें त्यानें शिवाराधना आरंभिली, तेव्हां त्याचें अढळ-सत्व पाहण्याकरितां इंद्रानें त्याला ईप्सित वर मागावयाला सांगितले, परंतु शंकरानुग्रहलोलुप त्या बालकानें इंद्राचा धिक्कार करून 'शिवदर्शनच झालें पाहिजे' असा आग्रह धरिला वास्तविक शंकरानेंच हें इंद्राचें रूप धारण केलें होतें. उपमन्यूनें त्या वेषधारी इंद्राला आपली पूर्ण शिवभक्ति प्रगट करून स्पष्टपणें बजावलें कीं

' माझ्या ठायीं भगवान् हो शंकर उग्र कीं अनुग्र हरे ।
मागेन मागणें तें त्यासचि शापो करो अनुग्रह रे ' ॥
शीतकर थोर गणिला, उष्णकर कधीं लहान, कोकांहीं ।
त्वद्दत्त नव पदादिक शक्रा ! जा कीं रहा, नको कांहीं ॥ '

तेव्हां शंकरांनीं आपलें इंद्ररूप गुप्त करून साक्षात् शंकररूपाचें उपमन्यूला दर्शन दिलें, आणि अजरामरत्व त्रिकालज्ञान आणि सामचर्ग कल्पांतावधि अमृतोपम क्षीरसागराचें क्षीरादन, शाश्वत भक्तिसंपदा, आणि कल्पांतीं शंकरपदप्राप्ति इतके वर दिले. हा तंडी ऋषीचा शिष्य कृष्णासही यानेंच शैवी दीक्षा दिली. याची कथा महाभारत अनुशासनपर्वांत अथवा सौरपुराणांत आहे.

चाल ॥ किति तरी दुःख सोसणें सांग निजमनें पांडुरंगा ! ।
धरवेना धीर मज मनीं वैस येवोनि अंतरंगा ॥
दे प्रेम भजनरस असा वास हृदयीं करीं श्रीरंगा ॥
टीप ॥ नाशिं दुःसंगा अपवित्रा । स्वात्मगति देई भक्तितंत्रा हो ॥
देवनाथप्रभुनाथ तात मात तू पुत्रपौत्रा ॥ नंदनंदना० ॥ ५

## पद ( ११८ ).

प्रियकरा, भुवनसुंदरा, रुक्मिणीवरा, आजि गोपाळा ।
किति तरी पाहसी अंत येई कनुवाळा ! ॥ ध्रु० ॥
सुखकरा, मदनमनोहरा, नंदकुमरा, हरी मधुसुदना ।
सांवळ्या सुहास्यवदना ॥
श्रीधरा, पूर्ण भास्करा, अजी ईश्वरा, कशी न ये करुणा ।
चाल ॥ जगदीशा जगत्त्रयजिवना ॥
यदुपति चिद्घनानंदा ।
व्रजपति श्रीपरमानंदा ॥
यशोमतीसुता गोविंदा ।
टीप ॥ करिं त्वरा, अरे मुरहरा, समय नाहिं बरा, उठा घननीळा ॥
कशि कठिण आलि ही वेळा ॥ प्रियकरा० ॥ १

---

( ३१४ पृष्ठावरून समाप्त. )

वास्तविक ही सर्व कथा शिवमाहात्म्यपर आहे, व क्षीरसमुद्राचें आधिपत्य याला शिवानें दिलें, पण क्षीरसागराचें आणि विष्णूचें इतकें साहचर्य आहे कीं, त्यामुळें आधुनिक व मध्यकालीन काव्यांतून उपमन्यूचें उदाहरण बहुधा विष्णुस्तवनाच्या ओघांत दिलेलें आढळतें. उदाहरणार्थ, द्रौपदीचे धांवे रचणारे बरेचसे कवि प्रल्हाद, ध्रुव, उपमन्यु या बालचर्यांची सांगड विष्णुयश गातांना देतात. ही कथा सौरपुराणांत आहे, आणि शिवलीलामृत हा ग्रंथ स्कंदपुराणांतर्गत ब्रह्मोत्तरखंड यावरून रचलेला आहे. एवढ्यामुळें ही कथा शिवलीलामृतांत आली नसेल तर नकळे। बाकी वास्तविक पहातां ही अति प्रेमळ शिवभक्ताची कथा शिवलीलामृतासारख्या शिवमाहात्म्याच्या ग्रंथांत अवश्य यावयाला पाहिजे होती. विष्णुभक्तांमध्यें जसे ध्रुव आणि प्रल्हाद हे महाभाग बालकश्रेष्ठ, त्याचप्रमाणें शिवभक्तांमध्यें उपमन्यु आणि श्रियाळ हे दोघे होत. असें असतां विष्णुस्तवनांत याचा उल्लेख फार होतो, हें चिंतनीय आहे.

जगदिशा, त्रिभुवनईशा, वोस दाहि दिशा, तूजवांचोनी ।
जाळितो तुझा विरहाग्नि ॥
श्रीपति, खंति वाटती, होय कशि गती, नेणवे स्वमनीं ।
घाबरा जीव दिनरजनी ।
चाल ॥ लोचनीं अश्रुच्या धारा ।
चालुनी येति अपारा ॥
या जनीं न दीसे थारा ।
टीप ॥ भवहरा, करुनि ये त्वरा, अजी माधवा, विभो जगपाळा ।
निशिदिनीं ध्यास हृत्कमळा ॥ प्रियकरा० ॥ २

वामना ! चुकविं भ्रमणा, ठेविं या मना, सख्या तव पायीं ।
तुजविना कोणि मज नाहीं ॥
सुखघना, कंजलोचना, अजी तुजविना, असें मी कांहीं ।
ठेविना जीव या देहीं ॥
चाल ॥ जातसे प्राण विरहानें ।
होतसे विकळ या स्वमनें ।
गातसे तुझें गुणगाणें ॥
टीप ॥ नरहरी, नाम महिवरी, दीन उद्धरी[1], अरे कृपाळा ।
पावना परम स्नेहाळा ॥ प्रियकरा० ॥ ३

विधिहरा, तुझा अंतरा, ध्यास श्रीकरा, निगम तुज गाती ।
वर्णितां भागल्या श्रुति ॥
मनोहरा, जी विश्वंभरा, शीण फणिवरा, वर्णितां कीर्ति ।
मदनारिप्रिया सुखमूर्ति ॥
चाल ॥ गुणसिमा नाहिं सुखधामा ।
प्रियतमा विलसे पद पद्मा ॥
रजतमा वारिं गुणग्रामा ।
टीप ॥ किति तरी, विनवुं परोपरी, दया अतरीं, कशी न ये अचळा ।
व्यापका गुणवेल्हाळा ॥ प्रियकरा ० ॥ ४

---

१ नाम महिवरी दीन उद्धरी–महीवर तुझें नाम दीनोद्धार करतें.

श्रीहरी, बहुत अंतरीं, जालि बावरी, मनोवृत्ति राधा[1] ।
वाहतें येइं गोविंदा ॥
तुजवरी, अनन्य मी वरीं, तुझी नोवरी, श्रीपरमानंदा ॥
हरिं वेगीं भवभयबाधा ।
चाल ॥ गोपती गोपिकारमणा ॥
मम मती प्रार्थि तुज करुणा ।
चूकती सकळ भवभ्रमणा ॥
दींप ॥ असें करीं, धरुनियां हरी, तारिं भवपुरीं, चिद्धना अमळा ।
ये देहिं दावि सुखसोहळा ॥ प्रियकर० ॥ ५
निर्गुणा, आदिकारणा, विश्वतारणा, विभो अपारा ।
स्वामीया निर्विकारा ॥
मुनिजना, ध्यास निजमना, पूर्णकामना, सगुणसाकारा[2] ।
दिनबंधो दीनोद्धारा ॥
चाल ॥ श्रीगुरुनाथगोविंदा ।
दे वरू हरुनि भवआपदा ॥
तूं तरू स्वरुपसुखफलदा[3] ।
देवनाथ, भावें गुण गात, तात आणि मात, तूंचि मज सकळा ।
येऊं दे दया कनुवाळा ॥ प्रियकरा० ॥ ६

## पद ( ११९ ).

विमलकमलदललोचन[4] कृष्णा निजजनसुखकरणा ।
करुणाब्धे तुज यात्री करुणा, भवभयसंहरणा ॥ ध्रुव० ॥

---

१ मनोवृत्ति राधा–ईश्वराच्या ठिकाणीं ज्याप्रमाणे राधा अनन्यभक्तीनें रममाण झाली त्याप्रमाणें माझ्या सर्व मनोवृत्ती ईश्वरस्वरूपांत अखंड लय पावोत, हा भाव एका पदांत देवनाथ म्हणतात "मम मनोवृत्ति तुजवरी । जाहली तुझी नोवरी । निशिदिनीं हें मानस वरी" येथेंच पुढें ' तुजवरी । अनन्य मी वरीं । तुझी नोवरी ' असें आपणाला म्हणवून घेतलें आहे यासंबंधानें प्रस्तावनेंतील भाग २४ पहा २ सगुणसाकारा–गुण व आकार ज्याला आहेत असा. ३ तूं तरू स्वरुपसुखफलदा—निजरूपज्ञानाचें सुख हेंच फल देणारा असा तूं वृक्ष. ४ विमलकमलदललोचन–सुंदर कमलाच्या पाकळीप्रमाणें ज्याचे नेत्र आहेत असा.

मंदरधर हरि कुंदरदद्युत माधव श्रमशमना ।
मदनमनोहर मुकुंद भापति माया मद्रमणा ॥
मधुसुरमर्दन श्रीमनमोहन ममसतिगजदमना ।
मंदभानुपरि शरणागत मी तुला रमारमणा ॥
चाल॥ हे गोकुलेश हरि गोपति गोविंदा ।
हे गरुडध्वज गतिदायक स्वानंदा ।
हे गदाधरा गजतारक प्रभु सुखदा ।
दीप ॥ पयनिधिवासा, परमपरेशा, विधिहर तव चरणा ।
स्मरती भूधरशयना तो तूं येई दिनोद्धरणा ॥ विमल० ॥ १
सनकसनंदन व्यासशुकादिक नारद हृदिं ध्याती ।
परमपुरुष तूं आत्मारामा निगम तुला गाती ॥

---

१. मद्भानुपरि शरणागत—म्हणजे काय? २ गदाधर—श्रीविष्णूच्या गदेचें नाव कौमोदकी ३. पयनिधिवासा = क्षीरसागरशयना ४. भूधर-शयना—शेषभोगशयना शेष मस्तकावर पृथ्वी धारण करतो म्हणून त्याला भूधर अथवा धराधर म्हणतात ५ सनकसनंदन व्यास शुकादिक नारदः—पाडवांची आजी सत्यवती ही कौमारावस्थेंत असतां तिला पराशरापासून जो पुत्र झाला त्याचें नांव व्यास हा महाभारत व अठरा पुराणें, यांचा कर्ता. शुक हा कृष्णद्वैपायन व्यासाचा पुत्र घृताची नामक अप्सरा पृथ्वीवर शुकीचें रूप घेऊन संचार करीत असतां तिचें दिव्य सौंदर्य पाहून व्यास काममोहित झाला आणि व्यासापासून याचा जन्म त्या शुकीरूपी अप्सरेच्या पोटीं झाला म्हणून याचें नांव शुक पडलें हा उपजत ज्ञानसंपन्न, वैराग्यशील, अभिमान-शून्य आणि परम भागवत होता. याला तपोभ्रष्ट करण्याकरितां इंद्रानें रंभेला पाठविलें होतें, परंतु तिच्या लावण्यललितांचा याच्यावर कांहीं परिणाम न होतां तिला हतगर्व होऊन परत जावें लागलें यावर शुकरंभासंवाद या नांवानें अनेक कवींचीं काव्यें आहेत, त्या सर्वांत मुक्तेश्वराचें फारच रसाळ आहे नारद हा त्रिकालज्ञ स्वेच्छाचारी, सत्यप्रिय विनोदी, कलहलालस व बालब्रह्मचारी असा सर्वप्रसिद्धच आहे. सनक, सनंदन, सनत्कुमार आणि सनत्सुजात असे चौघे ब्रह्मदेवाचे मानसपुत्र हे चौघेही मोठे ब्रह्मनिष्ठ आणि भगवद्भक्त होते जयविजय द्वारपाळांनी यांना विष्णुद्वारीं प्रतिबंध केल्यामुळे त्यांना यांच्या शापानें तीन वेळ जन्म घ्यावे लागले, अशी कथा आहे.

मंदरधर[1] माधवा एक केशवा सख्या विनती ।
चरणकमल मृदु विमल दावि, मम नयन मीन पाहती ॥
चाल॥ हे दीननाथ दीनबंधु श्रीरंगा ।
हे सुरमर्दन मुनिहृदयकमलभृंगा ॥
हे भक्तवत्सला भवभयश्रीरंगा ।
टीप ॥ गोगोपीजनपालय कालयमर्दन सुखसदना ।
कर्ममोचका येइ त्वरें मज तारिं कंसकदना ॥ विमल० ॥ २
प्रल्हादास्तव चिरुनि स्तंभिं मारिलें दुष्ट छळका ।

---

१ मंदरधर—वामनपंडित दशावतारचरित्रांत म्हणतात·—

" कासवें धरुनि मंदरसाच्या । मथिला जलधि मदरसाचा ।
देव हो अमृतपान करा या । दानवांवरि कृपा न कराया ॥ "

" अमृतप्राप्तीकरितां देव आणि दानव समुद्र मथन करीत असतां रवी म्हणून केलेला मंदराचल जेव्हां बुडूं लागला, तेव्हां तो तारून धरण्याकरितां भगवतानें कूर्मावतार घेतला, व आपल्या पाठीवर त्या पर्वतास सहज धारण केलें भगवताच्या पाठीवर असलेला तो पर्वत सर्व देव आणि दानव घुसळीत होते, त्यामुळें त्याच्या पाठीला गोड वाटून त्याला त्यापासून झोंप आली त्या पर्वताचे घर्षण म्हणजे केवळ एखादा मुलगा पाठ खाजवतो त्याप्रमाणें त्याला वाटत होतें. " चिपळूणकरकृत भागवताचें भाषांतर

२ प्रल्हादास्तव चिरुनि स्तंभि·—सनकसनंदनसनत्कुमार आणि सनत्सुजात या ब्रह्मदेवाच्या चौघां मानसपुत्रांना विष्णुद्वारीं अटकाव केल्यामुळें व लघुरूपास्तव त्यांचा उपहास केल्यामुळें त्यांनीं कोपून विष्णूचे द्वारपाल जयविजय यांना शाप दिला त्या शापानें ते दोघे प्रथम हिरण्याक्ष–हिरण्यकश्यपु, पुढें रावण-कुंभकर्ण व पुढें शिशुपाल-वक्रदंत असे जन्मास आले व परमेश्वराच्या नारसिंह, श्रीराम व श्रीकृष्ण या अवताराच्या हातून वध पावून शापमुक्त झाले व निजधामास गेले हिरण्यकश्यपूला कयाधूच्या पोटून चार मुलगे झाले. त्या सर्वांत वडील प्रल्हाद होता एकदां इंद्रानें हिरण्यकश्यपूचा युद्धांत पराभव करून त्याला पळवून लाविलें आणि कयाधूला बंदिवासांत ठेविलें त्या वेळीं प्रल्हाद गर्भस्थ होता व गर्भावस्थेंतच त्याला नारदानें भगवद्भक्तीचा उपदेश केला पुढें विद्याभ्यास करावयाला लागल्यावर तो स्वतः हरिनामस्मरण करूं लागला व आपल्या सहाध्यायांनाही त्यानें त्याच मार्गाला लाविलें. मुनिशापानें पूर्वविस्मृति झालेल्या हिरण्यकश्यपूला ही गोष्ट सहन न होऊन त्यानें त्याला तैलतप्त कढईंत टाकिलें, कड्यावरून खालीं लोटलें, हत्तीच्या

( पुढील पृष्ठ पहा. )

निजजनतारका सत्य दाविलें निद यदुकुळटिळका ॥
परम सदय अति हृदय असुनि मजविशींच निर्दय कां ।
पतित थोर उत्कृष्ट ह्मणुनि सकष्ट म्हणासि हरि का ॥
चाल॥ द्विज अजामिळादी गणिका उद्धरिली ।

---

( ३१९ पृष्ठावरून समाप्त. )

पायाखालीं दिले; तथापि अचल श्रद्धा आणि सतत हरिनामाचा गजर याच्या-योगानें तो तरला अखेरीस बापाचा व त्याचा वाद होऊन ईश्वर जलींस्थलीं-काष्ठींपाषाणीं भरला आहे असा सिद्धांत यानें आग्रहाने प्रतिपादिला असतां व 'या अमुक एका खांबांत ईश्वर आहे' या बापाच्या नास्तिक प्रश्नाला आग्रहपूर्वक आस्तिकबुद्धीचें उत्तर यानें दिलें, यावर रागावून बापानें त्या खांबावर लाथ मारली, तों आतुन श्रीविष्णूनें नृसिंहरूप धारण करून हिरण्यकश्यपूला मारलें व प्रल्हादाची बापाच्या गादीवर स्थापना केली याच्या संरक्षणार्थ व वाक्य-प्रतीतीप्रीत्यर्थ भगवताला चवथा म्हणजे नारसिंह अवतार घ्यावा लागला आणि याचा नातू बळी याजपासून सर्व देवांचें संरक्षण करण्याकरितां पांचवा अवतार वामनरूपी घ्यावा लागला प्रल्हाद हा राक्षसांचा नेता व महेश्वर असून हरएक संकटांत ते त्याला शरण जातात व तो त्यांना दुःखमुक्त करतो भविष्य-पुराणात वर्णिलें आहे कीं प्रल्हादाकडे दैत्य वारंवार जाऊन कलियुगीं साम्राज्य प्राप्त करून घेतात व देव हे विष्णूकडे जाऊन आपल्याला सार्वभौमत्व प्राप्त करून घेतात व ही उलटापालट कलियुगाच्या शेवटपर्यंत अशीच चालणार आहे.

१. मजविशींच निर्दय कां:-यावर केकावली पहा:-

" तसाचि उरलो कसा, पतित मी नसें काय कीं
कृपाचि सरली असेंहि न घडे जगन्नायकीं,
नसेन दिसलों कसा, नयन सर्वसाक्षी रवी
विषाद धरिला म्हणों, न सुरभी विषक्षीर वी ॥ '

२. पतित थोर उत्कृष्ट म्हणुनि सकष्ट ह्मणशि हरि कां-हा फार मोठा पतित-याचे पापाचे डोंगर माझ्याच्यानें उचलवणार नाहींत असा तुला धाक पडला काय याला नामदेव म्हणतात " समूळ घेतला पृथ्वीचा भार। माझाचि जोंजार काय तुला ". ३ द्विज अजामिळ.. न जळति पापें-"अजामिळ अघासुर व्रजवधू बकी पिंगळा ॥ अशां गति दिली उरे न तृण भेटतां इगळा " केकावली-आगीची भेट झाली तर तृण शिल्लक रहात नाहीं, जळून भस्म होतें, त्याप्रमाणें तुझ्या नामाग्नीची आंच लागताच सर्व पापें तृणप्राय भस्म होतात. ही कल्पना पुष्कळ कवींनीं वेगवेगळाल्या प्रकारें दिली आहे अजा-

( पुढील पृष्ठ पहा. )

मम पातकें याहुनि वजनिं अधिक भरलीं ।
यास्तव उपेक्षा आझि हृदयिं धरिली ॥
टीप ॥ तव नामानळ न जळति पाप आलें नाहीं कर्णा ।
तारि तारि भक्तपुरीं मला श्रीहरि एकें करुणा ॥ विमल० ॥ ३
सच्चित्सुख आनंद गुरू गोविंद विश्वरूपा ।
अविट असख अक्षया दयाळा य त्रिभुवनभूपा ।
झडकरी भवडोहिं देउनि स्वकरें तारिं भवतापा ॥
पतितपावना राखिं ब्रिदा चिद्घना मायबापा ।
चाल॥ हे देवनाथप्रभु वरद पांडुरंगा ॥
ये त्वरें साह्य चूकवी काळदंगा ।
वांछिलें पुरवि देऊनि अंतरंगा ॥

---

( ३२० पृष्ठावरून समाप्त.

मिळगणिका यांवर ( पद ७ पहा ) विस्तृत टीपा दिल्या आहेत त्या पहा. ' आलें नाहीं कर्णा ' हा सुरजी अंजनगांव येथील मठांतील प्रचलित पाठ होय, असे श्रीमंत गणपतराव दाजीसाहेब देशपांडे लिहितात आणि त्यांनीच अर्थ गौरवयुक्त होतो ' परम सदय ' पासून ज्या सहा ओळी आहेत त्यांशी मुक्तेश्वराच्या खालील ओंव्या तुलाव्या—' पाय स्पर्शोनियां मुरारी । शिळा केली दिव्य नारी । तिये अहिल्येचिये सरी । मज उद्धरीं श्रीरंगा ॥ १२८ ॥ हरिसी भक्तांचीं संकटें । सांडिसी दासांचीं दुर्घटें । तो पुरुषार्थ आजि कोठें । आच्छादिला सांग पां ॥ १२९ ॥ सर्वी सर्वत्र तूं अनंत ॥ जाणसी जीवाचें मनोगत । माझा न कळेचि वृत्तांत । हें काय अज्ञान तुज आलें ॥ १३० ॥ कृष्णा ! तूंचि जनकजननी । वित्त गोत चक्रपाणी । तुज वेगळा न दिसे कोणी । मज निर्वाणीं सोइरा ॥ १३१ ॥ सर्वी सर्वत्र तुझे कान । सर्व देखणे तुझे नयन । आजि नायकसी वचन । एवढें व्यसन न देखसी ॥ १३२ ॥ तुझें व्यापकत्व काय झालें । माझें हृदय कां सांडिलें । एवढें निर्वाण कां मांडिलें । अहो कृष्णे जननिये ॥ १५७ ॥ कृष्णा तूं स्नेहाळ माउली । तूंचि कृपेची साउली । तुवा उपेक्षा जरी केली । मग जिणें कायसें ॥ १५८ ॥ म्हणों अपराध पाप बहुत । तेणे झालीस दयारहित । तुझेनि नाम एकें त्वरित । पर्वत जळती पापाचे ॥ १५९ ॥ मुक्तेश्वर— सभापर्व—अध्याय १५ वा

१. मम पातकें वजना अधिक काय भरलीं' —' जळीं पाषाण तारिले जड । मी काय तुज त्याहूनि जड । आतां पुरवीं जीवींचे कोड । मनीं घेतला विषयीं मोड । निदान पाहशी किती ? रामदास.

दौड ॥ स्वात्मस्वरूपीं रमविसि निशिदिनीं कृपारवीकिरणा[1] ।
खंडरहित अखंड समाधीसुख लाधे स्वसना ॥ विमल ० ॥ ४

पद ( १२० ).

मधुसूदना[2] । कमलनयनसुखसदना ।
हे दिनानाथ दिनबंधु दाविं निजवदना. ॥ ध्रुवपद ॥
जगजिवना । जन्ममरणभयहरणा ।
विश्वेशा त्रिभुवनपती पतितपावना ॥
तुज करुणा । यावी दीनोद्धरणा ।
हे मनोहरा श्रीधरा आदिकारणा ॥
चाल ॥ श्रीगोकुलपति गोविंदा गोपीवरा ।
हा जीव फिरत भवचक्रिं जसा भोंवरा[3] ॥
भ्रांतिस्थ विस्मृतिबळें होत बावरा[4] ।

---

१ कृपारवीकिरणा—कृपारवीच्या किरणा सूर्यरश्मीची उपमा आहे. ही पाठशुद्धि दाजीसाहेबांनी पाठविलेली आहे

२. मधुसूदनः—' जेणें कर्णमलोद्भव मधुनामा दैत्य मारिला चक्रें ॥ यास्तव मधुसूदन हें नाम तया ठेविलेंस मुनिचक्रें ' नामार्थदीपिका ३ भवचक्री जसा भोंवरा'—लहान मुलें भोंवरा अथवा फिरगी खेळतात त्या वेळीं त्या सभोंवार दोरी गुडाळून मग त्याला एकदम गति देतात ती गति संपे पावेतों तो भोंवरा एका विवक्षित कक्षेंत आपल्याच सभोंवार फिरत असतो त्याचप्रमाणें कर्मसूत्रानें बांधलेला हा जीव चौऱ्यांयशीं लक्षयोनीच्या पटांगणावर आपणा-सभोंवार भ्रमत असतो भवचक्र हें तन्नियामक कुलाल गति देईल त्याप्रमाणें फिरत असतें भवचक्र व भोंवरा या दोन वेगळ्या उपमांचा संकर येथें स्पष्ट दिसतो भवचक्र व भोंवरा हीं दोन्ही त्रयस्थ शक्तिचालकाच्या आदेशाप्रमाणें नियमबद्ध भ्रमण करतात, पण भवचक्रीं भोंवरा क्वचितच फिरेल ४ भ्रांतिस्थ विस्मृतीमुळें होत बावरा—जननमरणाच्या आवर्तांत सांपडल्यामुळें जीवाला आत्मस्वरूपाची भ्रांति होते आणि तो वारंवार देहाभिमानाच्या आणि जननमरणाच्या फेऱ्यांत सांपडतो, यांतून ईश्वरसेवेच्या योगानें तृप्त झालेला भगवान् हात देऊन वर काढितो म्हणशी जीवास देहा-भिमान । तेंही कथन अवधारीं ॥ ५५५ ॥ जीव अलिप्त मायागुणीं । ऐक सांगेन ते कहाणी । स्फटिक ठेविजे जैशा वर्णी । तद्रूपपणी तो भासे ॥ ५५६ ॥ हें नेणोनिया समस्त देहात्मवादे जाहले भ्रांत । स्वर्गनरकादि आवर्त । योगी

( पुढील पृष्ठ पहा. )

भवपुरीं बुडत कर देउनियां मांत्ररा ॥
टीप ॥ जनार्दना । जगपालय हरि कृष्णा ।
तनुदीप्त स्वतेजें तुझी आणि उणि मदना ॥ मधु० ॥ १
सुकुमारा । मुनिमानसमंदारा[1] ।
अविलंबें यावें प्राण बहुत घाबरा ॥
रति[2] उशीरा । किमपी न करि उदारा ।
तुजवांचुनि तरि मज कोण सखा सांवरा ॥
चाल ॥ तूं धांउनि ये करीं धरीं हरी सोडवीं ।
तूं जननी, मी तानुलें, मला लाडवीं ॥
दे अभयवरद कर शिरीं, भ्रांति ऊडवीं ।
मन स्वरूपीं समरस समाधिसुख वाढवीं[3] ॥
टीप ॥ गुणगहना । गुरुतर सौख्यनिधाना ।
जगतारक गोपीपति गोपपालना ॥ मधु० ॥ २
श्रमशमना । सुरवर करिती नमना ।
अजअजिता श्रीअच्युता ठेविं पदिं मना ॥

---

( ३२२ पृष्ठावरून समाप्त )

भोगवीत अभिमान ॥ ५६९ ॥ द्विजदेह आरंभुनी येथ । परमेष्ठी देहपर्यंत । स्वर्गसुख देहें समस्त । भोगवी निश्चित पुण्याभिमान ॥ ५७० ॥ याहुनियां अधोमुख येथ । द्विजत्वाहुनि खालते जात । नाना दुःखयोनीं भोगवीत । जाणे निश्चित पापाभिमान ॥ ५७१ ॥ येथ पापपुण्य कर्माचरण । तें वाढविताहे जन्ममरण । यात विरळा सभाग्य जाण । जन्ममरण च्छेदक ॥ ५७२ ॥ ज्यासी निष्काम पुण्याचिया कोडी । जिहीं स्वधर्म जोडिला जोडी । ज्यासी भूतदया गाढी । ज्याची आवडी द्विजभजनीं ॥ ५७३ ॥ तेहीं निजबोधें देहाची बेडी । तोडुनि जन्मरणांचीं कोडीं । उभवूनि सायुज्याची गुढी । परापरथडी पावले ॥ ५७४ ॥ त्यासी संसाराचे आवर्त । सर्वथा गेले नलगत । जेवीं बुडण्याचा संकेत । मृगजळाआंत असेना ॥ ५७८ ॥ ऐसे प्राप्त पुरुष गा येथ । संसारीं नाहीं गा बहुत । हिंडता अवघ्या जगांत । एखादा कदाचित देखिजे ॥ ५७९ ॥ एकनाथी भागवत अ० २२.

१ मंदार–कल्पतरू २ रति–अल्पमात्र, तिळमात्र ३ मनस्वरूपीं समरस समाधिसुख वाढवीं–माझें मन स्वरूपीं समरस कर ( मला आत्मप्रचीति दाव ) आणि स्वरूपदर्शनांत लीन झालेल्या माझ्या मनाला अखंड सौख्याचा उपभोग दे.

अहिदमना । सच्चिदानंद मारमणा ।
ये त्वरा करुनि तूं पूर्ण करीं कामना ॥
चाल ॥ त्वां तारियले गणिकादि अजामिळ द्विजा ।
मर्दोनि नक्र सोडविलें त्या पशु गजा ॥
राखिली लाज भगिनीची अधोक्षजा ।
फोडोनि स्तंभ रक्षियलें दैत्यात्मजा ॥
टीप ॥ खगवहना । अज्ञानतिमिरतृणदहना ।
ये धांव त्वर, तव विरह मला साहवेना ॥ मधु० ॥ ३
कां वेळ असा लाविला क्षिराब्धिवासा ।
जसि मोकलूनियां जाय हरिणी पाडसा ॥
हा न्याय तसा त्वां केला विश्वविलासा ।
गति काय मतीच्या पायिं सकळ भरवसा ॥
चाल ॥ स्तनपान न दे जसि रोषें जननि तानया ।
त्वां हरी तेचि परि केली मला कान्हया ॥
किति अंत पाहणें ? मन व्याकुळ कां न या ?
तव भजन पूजन अर्चन ध्या दान या ॥
टीप ॥ हे प्रभुचरणा । अजि आठवांलि हरुवना ।
हा देवनाथ अतिविनित करी प्रार्थना ॥ मधु० ॥ ४

पद ( १२१ )

दीनबंधु भवताप निवारीं ये मेघश्यामा ।
मायबाप श्रीहरी दयानिधि गोविंदा रामा ॥ ध्रु० ॥

---

१ गणिका—राघोबा असें आपल्या आवडत्या पोपटाचें नांव अंतकाळीं तोंडीं आल्यामुळें तरलेली कुटिणी. अजामिळ—शूद्रस्त्रीच्या पोटच्या नारायण नांवाच्या मुलाचें नांव मरताना घेतल्यामुळे विष्णुदूतांनीं यमदूताच्या हातून सोडविलेला ब्राह्मण. भगिनीची लाज—द्रौपदी-वस्त्राहरणप्रसंगीं स्थालीपाकप्रसंगीं शाकपर्ण खाऊन तृप्त झालेल्या भगवतानें दुर्वासाच्या टोळीला मायाभोजन देऊन पांडवाचें सत्त्व राखल्याचेंही उदाहरण कवी वारंवार देतात पण त्याला द्रौपदीची लाज राखली असें म्हणत नाहींत. दैत्यात्मज-प्रल्हादाची गोष्ट. २ मतीच्या पायीं—म्हणजे काय ? 'गति काय मम ? तुझ्या पायीं सकल भरवसा' असा पाठ असेलसें वाटतें. ३ तेचिपरि—तशासारखीच स्थिति.

[1]कामव्याळ अतिविशाळ डंखित तमाळनिळ सखया ।
अहिगरळ शमवीं गरुडध्वज[2] ! ला यादवराया ॥
विमलकमलदलनयन सुकोमलचरणयुगुलें सदया ।
हरिसि सकळ भ्रमपडळ दाविं तैं प्रकट भाग्य उदया ॥
ध्रुव ॥ दुश्यडफळ करि विफळ सकळ मग जन्म पूर्णकामा ॥मायबाप०॥१
आळ करितें[3] पदिं भाळ पाळ लडिवाळ काळहरणा[4] ।
अतिजाळजनितभवजाळ[5] भाळलोचनप्रिय सुखकरणा ॥
टाळ विघ्नदुष्काळि[6] बाळगोपाळदिनोद्धारणा ।

---

१ कामव्याळ-कामक्रोधादि षड्रिपूंना कोणत्या तरी हिंस्रक प्राण्याची उपमा द्यावयाची आणि त्यापासून आम्हाला सोडव अशी ईश्वराची प्रार्थना करावयाची ही संस्कृत-प्राकृत कवींची सार्वत्रिक चाल आहे देवनाथ कामवासनेला सर्पाची उपमा देतात, रामजोशांनी भिल्लाची उपमा दिली आहे -

"याच वनामाधें भिल्ल नांदतो काम नाम त्याला ।
पंचशरानें विश्व मोहिलें ठाऊक सकळांला
कामक्रोधादिक सांगाती जिंकिति काळाला
नितंबिनी वागुरा पसरल्या कामिकुरंगाला "

२ गरुडध्वज-तू गरुडध्वज आहेस आणि गरुडानें सर्व सर्पांना मारलें आहे तेव्हां तूं धावत आलास म्हणजे काम-व्याळाचें निर्मूलन तात्काल होईल. दुश्यडफळ-छापील पाठ 'दुशडफळ' असा होता दुश्यडफळ असा पाठ श्री. दाजीसाहेब देशपांडे यांनी सुचविला, पण दोहोंचाही अर्थ काय ? ३ आळ करित-हट्ट घेतो "स्या सन्मातितें पुरवुनि आळ सुखविलें तसें न यमुनेतें (आदिपर्व अ ३२ गीति ५३) 'आळचि घेउनि मी शिशु आळविलों निष्ठुर त्वदुर चाळीं' (मोरोपंत-आर्याकेकावली) धर्म म्हणे गुरुराया पुरवीं माझीहि ही दुजी आळ (सभापर्व अ १ गी. ४०). आळ म्हणजे खोटा आरोप असेंहि आहे तेथें आळ आणणें असा शब्दसमुच्चय योजतात हट्ट किंवा लाड किंवा कोड या अर्थी लहान लेंकराची आळ पुरवितात आळ म्हणजे बालक हें निवारतात "आळ निवारुनि माते, आळस टाकुनि धांव कुरवाळीं" (मोरोपंत-आर्याकेकावली)

४ काळहरणा—प्रत्यक्ष काळालाही जिंकणाऱ्या देवाधिदेवा ! ५ अति जाल जनित भवजाळ—हें मायेचें जाळें अति गुंतागुंतीचें आहे तुझ्या कृपेवांचून यांतून लवकर सुटका होणें नाहीं यासाठीं सत्वर धांव ६ विघ्नदुष्काळ विघ्नें हाच कोणी दुष्काळ यांना टाळून शांतिक्षेमाचा सुकाळ कर.

जरि वेळ शरीर अळुमाळ, ताळ जाइल विश्वाभरणा
टीप ॥ भ्रममाळ गळा विक्राळ दिसत बवाळ सार्वभौमा ॥मायबाप०॥ २

तार नार भवपार करीं निर्धार तुझे पायीं ।
सुकुमार पदीं दे थार, मला आधार दुजा नाहीं ॥
मारमदन[1] दुर्वार छळित मज फार दुःखदायी ।
वारसाहतपरिवार गरुडिं हो स्वार त्वरें येईं ॥
टीप ॥ सार दुष्कृतासार दान दे सार भजन प्रेमा ॥ मायबाप० ॥ ३

कदन करुनि अरि वदन दावि[2] सोयऱ्या दिनानाथा ।
कंसनिकंदन मुरलीवादन विभो मदनताता ॥
कालयमर्दन[3] देव जनार्दन सख्या रमाकांता ।
देवनाथ प्रभुनाथ चुकविं वा ! जन्ममरणचळथा[4] ॥
टीप ॥ कुंदरदन सुखसदन बोप मधुसुदन सौख्यधामा ॥मायबाप०॥ ४

---

१ मारमदन मार हेंच मदनाचे दुसरें नांव आहे 'मदनो मन्मथो मार' प्रद्युम्नो-मीनकेतन २ कदन करुनि अरिवदन दावी—या काम व्यालरूपी शत्रूचे थोबाड फोडून दाखवि व ' करि राज्य नको विठ्ठल । मग काळाच्या मुखि मार्गी काजळ' देवनाथ. ३ कालयमर्दन—कालिय नांवाचा महाभुजग यमुनाडोहांत रहात होता. एके दिवशीं गोपाळाचीं व कृष्णाचीं गुरेंवासरें तेथील विषदुष्ट पाणी प्याली व मरून पडलीं तेव्हां कृष्णानें डोहांत उडी घालून त्याला चांगलीच शिक्षा केली आणि ती जागा सोडून दुसरीकडे जाऊन रहाणें भाग पाडलें. हा रहात होता तोपर्यंत पक्षिश्वापदांनीं आजूबाजूला वस्ती करणें सोडलें होतें याच्या विषामुळें झाडेंमुळें जळून भस्म होत व डोहांतून नित्य भयंकर ज्वाळा निघत श्रीकृष्णानें मरून पडलेलीं लेकरें व गुरेंवासरें जिवंत केलीं आणि मग त्या डोहांत उडी टाकली व त्याच्याशीं युद्ध आरंभिलें काठावर असलेलीं गाईवासरें आणि गोपालबालक श्रीकृष्ण बाहेर आल्याखेरीज घरीं परत जातना, तेव्हां नंद राजा घाबरून सहपरिवार कालिया डोहाजवळ आला आणि फार शोक करूं लागला, परंतु बलिरामानें श्रीकृष्णाच्या अमानुषत्वा-बद्दल त्यांची खात्री करून त्याचें समाधान केलें आणि मग थोड्याच काळानें श्रीकृष्णही बाहेर आले अशी कथा आहे ही सुंदर कथा हरिविजयांत वाचावी. नामदेवाचेंही कालियमर्दन नांवाचें अभंगयुक्त आख्यान फार सुरस आहे. कालिय सर्पाला शिक्षा लावली तेव्हांपासून भगवंताला कालियमर्दन हें नाव प्राप्त झालें. ४ चळथा—ढीग, चळथ एकावर एक रचलेली.

## पद ( १२२ )

ये कंसारी । मी दीन पतित तव द्वारीं ।
ठाकलों उभा भवपुरीं तारिं मज हरी ! ॥ ध्रुवपद ॥
हे महाहटी, करिति तपें बहु मोठीं ।
मुनि शिणले[1] ब्रह्मारण्यीं हरी तुजसाठीं ॥
तूं जगजेठी, न पडसि त्याचे दृष्टी ।
त्या भक्तिस्तव तूं उभा ठेवुनि कर कटीं ॥
चाल ॥ हे दीनबंधु सांवऱ्या दयाळा हरी ।
तुज करुणा येउं दे कांहीं तरी अंतरीं ।
सांवळ्या विठू बा ! बळ्यां[2] येउनि धरिं करीं ॥
टीप ॥ हे पुतनारि, यमुनातीरविहारी ।
मी दीन करितों प्रार्थना येइ लौकरी ॥ ये कंसारी० ॥ १
हे तव ख्याती वर्णितां श्रुति बहु श्रमती ।
शुकसनकादिक मुनि नारद तुज चिंतिती ॥

---

१ मुनि शिणले ब्रह्मारण्यीं हरि तुजसाठीं'–वणीकर गोविंदरायांचें पद पहा.
' ध्रुवनारद प्रल्हाद व्यास शुक सनकादिक ते भले ।
कर जोडुनि प्रार्थितां तुला पाहुनि स्तब्ध राहिले ।
निजसुकृतधन पदरीं घेउनि उभे राहिले ।
तें टाकुनि तुज कसे प्रियकरे ! गवळी इष्ट वाटले ! "

तसेंच एकनाथः–" धर्म अहिंसादि सहित सत्य । त्याचेनि मी नव्हे प्राप्त । मुख्य वेदाध्ययनेंहि मी अप्राप्त । सांग समस्त जरी पढिले ॥ २६ ॥ तेथ तपें कायसीं बापुडीं । पंचाग्नि असार परवडी । कृच्छ्र चांद्रायणीं झालीं वेडीं । त्यांचे जोडीं मी न जडें ॥ २७ ॥ देहगेह सांडुनि उदास । विरजा होमीं हवी सर्वस्व । साधनीं श्रेष्ठ अति सन्यास । त्यासि मी परेश नातुडें ॥ २८ ॥ करितां श्रौत-स्मार्तकर्मांसि । कर्मठें झालीं पानपिसीं । तरी मी नाकळें त्यांसीं । क्लेशहोमेंसीं कष्टतां ॥ २९ ॥ गोदान भूदान तिळदान । दान देतां धनधान्य । त्यांसीं मी नाटोपें जाण । दानाभिमान न वचतां ॥ ३० ॥ सत्संगती वेगळें जाण । तात्काळ पावावया माझें स्थान । आणिक नाहींच साधन । सत्य जाण उद्धवा ॥ ४५ ॥ भागवत अ. १२ वा

२ बळ्यां = बळेंच जबरदस्तीनें असा खरा पाठ आहे. हा शब्द वऱ्हाडांत प्रचारांत आहे. हाच पाठ योग्यही दिसतो.

हे यदुपति, श्री दिनानाथ सुखमूर्ति ।
किति अंत पाहसी सांग सख्या यदुपती ॥

चाल ॥ हे गोवर्धनधर हरि मुरलीवादना ।
हे मायातीत मुकुंदा मुरमर्दना[१] ।
हे दयदयानिधि विभो मदनदना ॥

टीप ॥ बहुतांपरी, प्रार्थितों तुज अंतरीं ।
साकला कंठ आळवितां शिणलि वैखरी ॥ ये कंसा० ॥ २

हे महाराजा, पावना पंढरिराजा ।
द्विज अजामिळा तारिले तापसी द्विजा ॥
हे निर्लज्जा, पापिणि गणिकाबीजा, ।
पढवितां शुका तारिलें अधोक्षजा ॥

चाल ॥ हे विमलस्वरूपा हरी विश्वव्यापका ।
हे अमलकमलदलनयन कर्ममोचका ।
हे अधोक्षजा तू येई असुरांतका ॥

टीप ॥ हे सर्पारी, बहनामहिन हरी ॥
मी दीन तुला प्रार्थितों येई लौकरी ॥ ये कसारी० ॥ ३

हे गोविंदा, गुरुवर ब्रह्मानंदा ।
हे जगदुद्धारा प्रभो वारिं आपदा ॥
हे अतिसुखदा, मी अनाथ मज या वरदा ।
मी अखंड प्रार्थितों पदि हा भजनी धंदा ॥ ४

चाल ॥ हे देवनाथप्रभु दान्या कमलावरा ।
हे मदनारीमनप्रियकर करुणाकरा ।
हे परात्परा मोपरिया विश्वंभरा ॥

टीप ॥ घेई पदरीं, किमपि उपेक्षा न करीं ।
दे प्रेमभजनरस करीं वास अंतरीं ॥ ये कसारी० ॥ ४

---

१ मुरमर्दना—' जिणोनियां अमरपुरें । हिरोनि देवांचीं अतोरें । तीं कोंडोनियां समग्रें । मुरें महासुरें युद्ध केलें ॥ २२६ ॥ तो मुरमर्दन श्रीहरी । यालागीं नाम मुरारी "
एकनाथी भागवत अ. चवथा.

## पद (१२३)

प्रभु रे आत्मारामा । सखया सांवळिया गुणग्रामा ! ।
कुंदरदा अनिसुखदानंदा मदनसार्वभौमा ॥ ध्रु० ॥

सुरवरवरद परात्पर सुखकर मुनिजनमनविश्रामा ।
स्थिरचरव्यापक नित्य निरंतर दे तव भजनप्रेमा ॥ प्रभु रे० ॥ १
मुकुंद मदसहर मधुसूदन मापति पूर्णकामा ।
मदनारिप्रिय मानसमोहन मायातीत अनामा ॥ प्रभु रे० ॥ २
मनुजतनूधर मद्गतिदायक चालवि नित्य नेमा ।
देवनाथप्रभु नाथ निरंजन गुरु गोविंदा रामा ॥ प्रभु रे० ॥ ३

## पद (१२४)

काय करिसी गति रे दयाळा ! ॥ ध्रु० ॥
कोण मी कैसा केशा रीतीनें । आणियली स्वस्थिति रे ॥ दयाळा० ॥ १
जें जें होईल तें तें द्रुमतें । झाली मंद मति रे ॥ दयाळा० ॥ २
देवनाथप्रभु श्रीगोविंदा । फसली मनोवृत्ति रे ॥ दयाळा० ॥ ३

## पद (१२५)

गोविंदा मधुसूदना, कमललोचना, सख्या यदुवीरा ।
हे दीनबंधु माधवा, स्वामि केशवा ! करुन ये त्वरा ॥ ध्रुवपद ॥
भवजीवन अब्धिच्या थाटे, उसळती लाट, प्राण बावरा ।
तुजवीण स्मरावा कोण ? गणगोत आन तूं खरा ।
जय दाशरथी श्रीराम, योगिविश्राम, अजि रघुवीरा ।

---

१ गुणग्रामा–गुणसमूहा २ स्थिरचलव्यापक–आणि दहा आंगळें वरती. जलचर स्थिरचर व्यापुनि तो जगदात्मा दशांगुळें उरला ' मोरोपंत ३ मनुजतनुधर–पहिले चार अवतार मनुष्याचे नव्हते पुढले वामनापासून सर्व अवतार मनुष्ययोनींत झाले ४ फसली मनोवृत्ति रे–मी माझें मन एकदां अनन्यभावानें तुझ्या चरणी अर्पण केलं आहे आता माझी मनोवृत्ति तुझ्या ठायीं पूर्णपणें फसली म्हणजे पक्की रुतून बसली, आता बाहेर पडूं शकत नाहीं आतां काय गति करावयाची असेल ती कर फसली मनोवृत्ति म्हणजे माझ्या मनाला कोणीं फसवलें, धोका दिला असा अर्थ करावयाचा नव्हे ५ पद ११७ टी १ पहा

तू पूर्ण परात्पर गडी, नेइ परथडी, धरुनियां करा[1] ॥

श्लोक ॥ दिनकरकुळदीपा[2] ! आदिरूपा विभो ! रे
जगगुरु जगदीशा प्रार्थितों श्रीप्रभो ! रे ।
अकळहि गुणलीला वर्णितां वेदवाचा
शेषहि शिणतसे जी काय कैंवा[3] जिवाचा ॥

टीप ॥ हा अरुष भक्तिचा भाव दयाळा धांव घेइं धनु करां ।
षड्रिपू गांजिती अशी वेळ हे भारी जानकीवरा ॥ गोविंदा० ॥ १
नारायणपुत्रान्वयें छंद निश्चयें द्विजा लागता ।
अंतकाळिच्या समयिं उडी तूं सदय घालिसी स्वतां[4] ॥
सोडविलें विप्रा तथा स्मरारीप्रिया कैंचि कृपणता ।

---

१ नेई परथडी धरुनियां करा—शेवटपर्यंत साथ देणारा असा तूच एक परात्पर सवगडी आहेस बाकीचे सगळे मधेंच सोडतात, तू शेवटपर्यंत आधार दे आणि मला बचाव जगांतील जेवढें म्हणून माझें त्यातलें बरोबर काहीच येत नाहीं ' धनानि भूमौ पशवश्च गोष्ठे । भार्या गृहद्वारि जन. स्मशाने । देहश्चितायां परलोकमार्गे । कर्मानुगो गच्छति जीव एक. ' परतु कर्मांचाहि पाश तोडून आत्म्याला परगतीला पोंचविणारा परात्परगडी असा एकटा परमेश्वर. यासाठीं कबीराने देवाला बजावलें की.

" सावलिया गिरधारी लाला खबर लेना मेरी ।
खबर लेना मेरि नहि तो होगी तेरी मेरी ॥ ध्रु० ॥
भोजन देना तो अच्छा देना खासी सिरापुरी
बीडा देना तो अच्छा देना खासी लवंगसुपारी
कपडा देना तो अच्छा देना देना भडक जरतारी
घोडा देना तो अच्छा देना उप्पर अबदागिरी
जोरु देना तो अच्छी देना सब सतनकु प्यारी
चेला देना तो अच्छा देना जिकीर करेगा तेरी
बाला करना तो सच्चा करना सबकू लाग प्यारी
हात पकरकर रहा बताना मजल करना पुरी
कहत कबीरा सुनभई साधू मलकर माया मेरी.

२ दिनकर कुलदीपा:–कारण दाशरथी राम हा सूर्यवंशांतील होता ३ कैंवा–थोरी, किमत ४ उडी घालिशी स्वता –विष्णुदूत येऊन त्यांनीं अजामिळाला यमदूतांपासून सोडविलें अशी कथा आहे विष्णु स्वत. आल्याचा उल्लेख नाहीं याबद्दल जास्त टीप प. ३६ वर पहा.

त्वा धरियेला मजविशीं सख्या हृषिकेशि ! भेद तत्त्वतां ॥
श्लोक ॥ किति तरि पहासी रे ! अत आम्हां दिनांचा ?
तुजविण श्रम हारी कोण जी ! या मनाचा ? ।
अतिशय करिं वेगा टाकुनी वायु मागें
लवकरि हरि ! अनाथा पाव रे ! लागि वेगें ॥
टीप ॥ पुत्रासि गांजितां पिता अजी अच्युता दीनोद्धारा ।
लक्षिला भक्त निजहटी होउनि प्रगट स्तंभांतरा ॥ गोविंदा० ॥ २
आकळितां नक्रें गजा तयीं सकटासि आठवी पदा ।
ते काळीं करुणा तुला सख्या विठ्ठला ! हारिसि आपदा ॥
व्यभिचारिणि गणिका अती नव्हे ती सती तिच्या दुर्मदा ।
ही दोन्ही कुमती भली तुवां दीधली स्वरुपसंपदा ॥
श्लोक ॥ किति युगयुगअंतीं रक्षिले भक्त त्वां ते ।
कमलदलहिताक्षा ! दीन मी, पाव मातें, ।
करुणा अयकुनीयां भार्गवीजीतरामा
लवकरि हरि येईं श्रीसिताकांत रामा ! ॥
टीप ॥ बाळ तुझें लडिवाळ करिसि सांभाळ भुवनसुंदरा !
अज्ञान नाशिजे ज्ञानसहित विज्ञान पूर्णभास्करा ॥ गोविंद० ॥ ३

---

१ मजविशीं सख्या हृषिकेशी भेद तत्त्वता:—पुढील केका पहा.

तसाचि उरलो कसा पतित मी नसें काय कीं
कृपाचि मरली असेंहि न घडे जगन्नायकीं
नसेल दिसलो कसा ! नयन सर्वसाक्षी रवी
विषाद धरिला म्हणों न सुरभी विपक्षीर वी.

२ पुत्रासि गांजिता पिता:—प्रल्हादाच्या गोष्टीबद्दल येथें उल्लेख आहे ३ भक्तनिजहटी—बाप हिरण्यकश्यपु वारवार सांगे कीं विष्णु हा देव नव्हे आणि प्रल्हाद तितक्याच आग्रहाने त्याचें अस्तित्व प्रतिपादन करी. निज म्हणजे नितांत, अत्यंत असा अर्थ कवितेंत वारवार येतो याबद्दल पुढें पदावर टीप पहा ४ स्वरूपसंपदा—आत्मस्वरूपाचें ज्ञान हीच संपदा. ५ ज्ञानसहितविज्ञान—विज्ञान आणि ज्ञान या दोहोंच्यायोगानें अज्ञानाचा नाश कर ज्ञान आणि विज्ञान दोन्ही आली म्हणजे ज्ञातव्य असें कांहीच रहात नाहीं. मग तो

( पुढील पृष्ठ पाहा. )

ऐकुनि हे करुणावरी चाप श्रीहरी उडिच घातली ।
बुडतांचि भवार्णवजळीं धरुनि करकमळीं क्षणें कवढिली ॥
षड्रिपू मातले अति दुष्ट दुर्मती मर्द नाडिले ।
नळेसि ब्रह्मभुवनीं द्वैतकाहणी सर्व आथिले, ॥

श्लोक ॥ हरिपदीं अति झाली वृत्ति सलग्न आतां,
मज कवळि अशी हे शक्ति नाहीं कृतांता; ।
हरिभजनव्रतानें पूर्णस्वानंद वृत्ती
जगदिशगुरुरूपें दीधलें नाथहस्तीं ॥

टीप ॥ वंदे देवनाथ निजमनीं चित्त अनुदिनीं नासांतरा ।
कानडा सखा नावडा नेत रोकडा [१] कैं पैलेतिरा ॥ गोविंदा० ॥ ४

---

( ३३१ पृष्ठावरून समाप्त )

श्री अनंत । पार्थातें असें म्हणत । पैं गा तूं योगयुक्त । जालासि आतां ॥ १ ॥ मज समग्रातें जाणसी ऐसे । आपुलीया तळहातींचें रत्न जैसें । तुज ज्ञान सांगेन तैसें । विज्ञानेंसीं ॥ २ ॥ एथ विज्ञानें काय करावें । ऐसें देसी जरी मनोभावें । तरी पैं आधीं जाणावें । तेंचि लागे ॥ ३ ॥ मग ज्ञानाचिये वेळे । झाकती जाणिवेचे डोळे । जैसी तीरीं नाव न ढळे । टेकली साती ॥ ४ ॥ तैसी जाणीव जेथ न रिघे । विचार मागुता पाउलीं निघे । तर्कु आयणी नेघे । अंगीं जयाच्या ॥ ५ ॥ अर्जुना तया नाव ज्ञान । येर प्रपंचु हें विज्ञान । तेथ सत्यबुद्धी हें अज्ञान । हेंही जाण ॥ ६ ॥ आतां अज्ञान अवघें हरपे । विज्ञान निःशेष करपे । आणि ज्ञान तें स्वरूपें । होऊनि जाइजे ॥ ७ ॥ जेणें सांगनयाचें बोलणें खुंटे । गेकतयाचें व्यसन तुटे । हें जाणणें साने मोठें । उरों नेदी ॥ ८ ॥ ऐसें वर्म जे गूढ । तें किजेल वाक्यारूढ । जेणें थोडें न पुरे कोड । बहुत मनींचें ॥ ९ ॥ ज्ञानेश्वरी अ ७ श्लो २ ज्ञानसहितविज्ञान-पूर्णभास्करा—एवढा एक समास आहे

१ रोकडा—तुरुत तात्काळ, हरिपदिं अति झाली वृत्ति सलग्न आता —कशी याबद्दल नामदेव म्हणतात

माझा भाव तुझे चरणीं । तुझे रूप माझे नयनीं ॥ १ ॥
सांपडलों एकामेकां । जन्मोजन्मीं नव्हे सुटका ॥ २ ॥
त्वां तोडीली माझी माया । मी तों जडलों तुझ्या पायां ॥ ३ ॥
त्वां मज मोकलिलें विदेहीं । म्यां तुज घातलें हृदयीं ॥ ४ ॥
नामा म्हणे बा सुजाणा । सांग त्वां न ठकविलें कोणा ॥ ५ ॥

## पद ( १२६ )

गोविंदा रामा कृष्णा गोपाळा गोपीरमणा ।
भजतयामि अतिसुख देसी भक्तवत्सल भवभयहरणा ॥ ध्रुवपद ॥
शरणागत जे तुज येती आपदा हरिशी त्यांची ।
कमलापति कमलदलाक्षा करुणा तुज फार दीनाची ॥
विदुराच्या खासि कण्या रे । पोहे भक्षि सुदामयाची ।
हरुनियां दरिद्र दिधली नगरी त्या सोनियाची ॥ गोविंदा० ॥ १
अतितीक्ष्ण दश मिठी दे पंद नक्रे धरिला बाई [1] ।
ओढितांचि जळिं घाबरला स्मरला ता तुज ते समयीं ॥
करुणारव पडता श्रवणीं करुणा तुज आली हृदयीं ।
उद्धरिला पशुगज कीं तो कनवाळे शेषशाई [1] ॥ गोविंदा० ॥ २
पुरविलीस भक्तीं वस्त्रें स्मरतां ते द्रुपदबाळा, ।
रक्षुनियां लज्जा सतिची सबाखिली ते वेल्हाळा ॥
भक्तवत्सल पूर्ण ब्रिदाचा अभिमानी होसि दयाळा ।
तू धनी ह्मणुन मी बाहें जाणुनियां सकटवेळा ॥ गोविंदा० ॥ ३
देवनाथ प्रभु गुरु देवा विनवितसें पदारविंदा ।
ये सत्वर घालिं उडी बा [2] संरक्षीं आपुलया बिरुदा ॥
झालीसे या कोटीची येथोनि आजि मर्यादा ।
हा पाश तोडिं पदिं ठेवीं स्वामिया सदानंदा [1] ॥ गोविंदा० ॥ ४

## पद ( १२७ ).

कां माझी तुजलागीं करुणा येना ? ॥ ध्रु० ॥
पापी अजामिळ वेश्या गणिका ।
तारियलें तुवां भूधरशयना [3] ॥ कां माझी० ॥ १
उपमन्या पय, ध्रुवबाळा पदीं ।
बेसविलें तुवां राजीवनयना [3] ॥ कां माझी० ॥ २

---

१ संबोखिलि–शांतवन केले २ झालीसे या कोटीची येथोनि आज मर्यादा–आयुष्याच्या शेवटल्या काळांतील हें पद असावेंसे वाटतें. आतां मनुष्यकोटीमध्यें म्हणजे मनुष्य देहामध्ये सुद्धां रहाण्याची इच्छा नाही, याकरितां आतां मला अगदी मुक्त कर ३ अजामिळ, गणिका, उपमन्यु, ध्रुव यांच्या विस्तृत टीपा पूर्वी दिल्या आहेत.

पतित परी तुझा शरणागत मी ।
असतां अझुनी दुःख हें जाईना ॥ कां माझी० ॥ ३
देवनाथ प्रभु गुरु गोविंदा ।
न लावीं वेळ हे प्रगट नयना ॥ कां माझी० ॥ ४

पद ( १२८ )

अरे ! हो कृष्णा ! गोविंदा ! ये गोपाळा ! ।
तुजवांचून कोण करी रे ! मज दीनाचा कळवळा ? ।
अविलंबें पाउल टाकीं चाल वेगीं, हरि ! पशुपाळा ! ॥ ध्रु० ॥
जय यमुनातीरविहारा नंदात्मज जगदुद्धारा ।
तुजविण मज कोण उदारा ! त्रिभुवनपति ! हरि ! सकुमारा ? ॥
चाल ॥ नाना परि करि विकारा ।
धरिं मन हें हिंडत सैरा ।
आवरितां नावरे वारा ॥
टीप ॥ घाबरला जीव माझा हो साह्य येईं यदुवीरा ! ॥ अरे हो० ॥ १
दुर्दैं मजला छळिलें भारी पाहसि वा काय तमाशा ? ।
मी भक्तिहीन परि तुझा म्हणवितों, जगन्निवासा ! ॥
चाल ॥ जिवनाविण[1] जैसा मासा ।
मम प्राण तळमळी तैसा, ।
तव पायाचा मज धिंवसा[2]. ॥
टीप ॥ ये सत्वर, विघ्न निवारीं करुणाघन ! कुंजविलासा ! ॥ अरे हो० ॥ २
शरणागत वत्सल बापा ! किती अंत पाहसी ? ये गा ! ।
जय भीमातीरविलासा ! सायरिया पांडुरंगा ! ॥
चाल ॥ आवरीं मनमत्ततुरंगा[3] ।

---

१ जीवनावीण–पाण्याशिवाय २ धिंवसा–धीर, आधार. ते पाय जर मला मिळाले नाहींत तर मी काय करणार ? ३ मनाला तुरंगाची, गजाची, मयुराची उपमा दिली आहे त्याप्रमाणे मनाला श्रीधरस्वामींनीं व्याघ्राची उपमा दिली आहे. " मन इंद्रियांचा धनी । एकादश स्वर्ग त्यापासूनी । त्या मनास गाई वळोनी । हरिवीण कोणा नाणवे ॥ ३१ ॥ मन हें व्याघ्र भयंकर । दश-इंद्रियें त्याचीं पिलीं साचार । जिकडे उडी घेई मनव्याघ्र । पिलीं समग्र तिकडेची ॥ ३२ ॥ या मनव्याघ्रें थोरथोर । गिळिले पुन्हा दुजे करणार । भगांकित केला पुरंदर । कलंकी चंद्र जाहला" ॥ ३३ ॥ ( हरिविजय अ १३. )

सारथिया ये श्रीरंगा ! ।
प्रगटें मम अंतरंगा ॥
दीप ॥ निज नयनीं दावुनि स्वरूपा, नेईं हे भवभयभंगा ॥अरे हो०॥ ३
अति दुःखित मानसिं झालों, किति म्हणुनी तरि सोसावें ? ।
शरणागत तुजवांचुनियां सांग बा ! मज तारावें ॥
चाल ॥ मी पतित द्वारीं भावें ।
आलों बा ! मज तारावें ।
पावन ब्रीद संरक्षावें ॥
दीप ॥ देवनाथ प्रभु श्रीनाथा ! ऐकुनियां करुणा धावें ॥अरे हो०॥ ४

## पद (१२९).

ये गे ! ये गे ! सांवळिये । माझे आई ! कृष्णाबाई ! ॥ ध्रुवपद ॥
बुडतों मी भवडोहीं । ये लवलाहीं, ।
वृंदावनीं किति कान्हाई ! चारशिल किती गाई ॥ ये गे० ॥ १ ॥
भवदुरिता दुरि नेईं, । प्रगटावें माझ्या हृदयीं ।
आणिक मी न मागें कांहीं, । अखंडित ठेवीं पायीं ॥ येगे० ॥ २ ॥
देवनाथ प्रभु विठाई । उसंगा गे मजला घेई ।
जननी ये तूं सुखदायी । प्रेमपान्हा वेगीं देई ॥ येगे० ॥ ३ ॥

## पद (१३०)

मां पाहि कृष्णा ? देव ! दयाघन रे ! ॥ ध्रुवपद ॥
कुंदरद्युति मंदरधर हरी सनातन रे ! ॥ मां० ॥ १ ॥
कारण हे भवतारण ! मरणविघ्ननिवारण रे ॥ मां० ॥ २ ॥
श्रीमधुसूदन ! मुरलीवादन ! कालयामर्दन ! रे ॥ मां० ॥ ३ ॥
यदुकुलभूषण ! दैत्यविनाशन ! पांडवपालन रे ! ॥ मां० ॥ ४ ॥
देवनाथप्रभु श्रीगोविंदनाथ निरंजन रे ! ॥ मां० ॥ ५ ॥

## पद (१३१).

गोकुलपति हरि ! ये गोपाळा ! ॥ ध्रुवपद ॥
नंदतनय सुकुमार । कृष्णा ! दाखविं तव रुप या निजडोळां ॥ गो० ॥ १
कालयमर्दना देवजनार्दना ! मुरलीवादना ! त्रिभुवनपाळा ! ॥ गो० ॥ २

शिणल्या गुणगण वर्णितां ह्या श्रुति । योगीमुनिजनमानसचाळा ॥गो०॥३
देवनाथप्रभु गोरमचोरा । प्रगट यउनि मम हृत्कमळा ॥ गो० ॥ ४ ॥

पद (१३२).

सांवळी सकुमार मूर्ति मनोहर निर्विकार आकारा आली, ।
आपणाचि एक अनेक त्रिजगीं व्यापुनी अलिप्त ठेली ग ! माय ' ॥ध्रु०॥
ब्रह्मांडनायक मुनिजनपालक बालक नंदाचा झाला, ।
पचाग्निसाधन धूम्रपानादिक माधितां साध्य न त्याला, ॥
सनकसनंदना आराध्य दैवत अरूपरूपासी आला, ।
क्षीरसिंधूचे धामीं तो हा स्वामी गोराचे गोरस प्याला ग ' ' म.य० ॥ १
निगमागमश्रुति वर्णिता शिणल्या शब्द हा वदल्या नेति[6] ।
सहस्रमुखांचा वर्णिता शिणला, न चले खुंटली गती,
निर्गुण निष्क्रिय नामरूपातीत अनादि ज्योतीची ज्योती, ।
तेचि हे गोकुळीं नंदाचिये कुळीं प्रकाशली निजदीप्ति ग ! माय ! ॥सां०॥२
दधि पय नवनीत भक्षितो चोरुनी, वाटोनि गोवळा देया, ।
सांगती गान्हाणीं गोवळकामिनी एकुनि हांसत माया,
ब्रह्माडकोटिचा चालक बालक भाविती[10] नंदाची जाया, ।
नाना खेळ लीला कौतुक दावितो, श्याम हा कैलासराया ग माय॥सां०॥ ३
मधुमुरमर्दन मदनमनोहर शोभत चत्वारी भुजा,
शंखचक्रगदापद्म हे चहु करी आयुधे विलसति वोजा[12],
निजकाम अंगिकारितां दासाचें स्वअंगे सांडुनि लाजा, ।

---

१ प्रस्तावनेचे ३५ व ३६ भाग पहा २ सनकसनंदन अशासारख्या मोठमोठ्यानीच आराधना करण्याजोगे दैवत ३ स्वत रूपरहित परब्रह्म पण भक्तास्तव साकार झाले ४ केवढा हा भक्तांवर उपकार आणि केवढा अघटित चमत्कार हा असे देवनाथ कौतुक करितात ५ निगम, आगम, आणि श्रुति तिन्ही शब्दांचा अर्थ वेद ६ ईश्वरस्वरूपासंबधाने वेदांनी ' नेति, नेति' म्हणून हात टेकले ७ शेष ८ गीतेच्या तेराव्या अध्यायांतून हें वर्णन आहे " ज्योतिषामपि तज्ज्योतिस्तमसः परमुच्यते " गीता ९ आत्मतेजानें देदीप्यमान १० ब्रह्माडकोटीचा जो चालक त्याला नंदाची जाया बालक असें भाविली ( लहान तान्हुलें असे समजते ) केवढा हो हा चमत्कार ११ चार. १२ ओजस्वी, लखलखणारी, तेजस्वी.

चिद्धन चैतन्य निर्गुण साकार अवतरलें भक्तिकाजा ग ! माय ! ॥ सां० ॥
सद्गुरु गोविंद अनादिची आरसाचित्त गाळोनी त्रिपुटी, ।
रूपेंविना रूप प्रगट ना गौप्य जयासी पोट ना पाठी; ॥
तोंचि त सचल एकट एकला अनंत आकार थाटी, ।
देवनाथीं सुख साम्राज्यसंपदा लक्षितां गुरुपद दिठी ग ! माय ! ॥ सां० ॥

## पद ( १३३ )

तुज काय म्हणावें आम्हीं । दयाळू नाथ जगाचा तूं स्वामी. ॥ ध्रु० ॥
पावन ब्रीद तुझें गा कंसारी, वेद गर्जती चारी ।
पतित तारिले त्वां बहु भारी, गजगणिका व्यभिचारी ॥
ऐकुनि कीर्ति तुझी श्री पुतनारि, शरणागत मी द्वारीं ।
आलों ठेविं मला निजपदपक्षीं ॥ तुज० ॥ १
आदीं पल्लविं उचलुनियां घ्यावें, मग परतें लोटावें ।
दिसतें उचित हें का बरवें, कृपाघना ! बोलावें ॥
दास तुमचा जगीं म्हणवावें । तेणें विलया जावें ।
नवल वाटतें अंतर्यामीं ॥ तुज० ॥ २

---

१ दास तुमचा जगीं म्हणवावें तेणें विलया जावें—याबद्दल प्रभूजवळ खेद पुष्कळांनीं केला आहे. एक मासला पहा

‘कटिं कर ठेऊनि विठो काय मौज पाहासी ।
हांसति आम्हांसि लोक हे तुझे निवासी ॥ ध्रु० ॥
सिंहाचे बाळकाशिं गांजितात कोल्हीं ।
हे लाज कोणा आली ? ।
पतितपावन दीनानाथ ब्रीद प्रतिपाळीं ॥ कटिं० ॥
हरिणी वनीं पाडसासि मोकलोनि जाये ।
मग त्यासि गती काये ? ।
पक्षिणिचीं पिलें स्मराति तेविं तुतें बाहें ॥ कटिं० ॥
तुंचि बंधु तूंचि बहिण तूंचि तातमाता ।
तुजवीण कोण त्राता ? ।
शिवराम पुंडलीकवरद गणेशनाथा ॥ कटिं० ॥’

२ तेणें विलया जावें नवल वाटतें अंतर्यामीं—देवा घरीं साधू आणि भगवद्भक्त याचें दैन्यच आहे अशाबद्दल पुष्कळांचें देवदरबारीं गाऱ्हाणें गेलेलें आहे—

( पुढील पृष्ठ पाहा. )

करुणासागरा श्रीगोपाळा । कृष्णा ! त्रिभुवनपाळा ! ।
पांडवपाळका जी घननीळा, नंदयशोमतिबाळा ॥
झालें मानस हें अतिविकळा, तव विरहाग्निज्वाळा ।
दुःखित झालों मी बहुत श्रमीं ॥ तुज० ॥ ३
विश्वोद्धारका गुरु गोविंदा, किति भोगावी आपदा, ।
सरली आयुष्याची मर्यादा, काळ काढिल्या फरदा[1] ॥
अजुनि दया येईना का मर्दा, बोल परमानंदा ।
रतला देवनाथ प्रभु या नामीं ॥ तुज० ॥ ४

---

( ३३७ पृष्ठावरून समाप्त )

‘ देवा कोण आतां लारी । धुदी झाली दरबारीं ॥
पांडव तुज म्हणती सासा । दवडिशि त्यांतें वनवासा ॥
छळि निशि येउनि दुर्वासा । परि तो पावे सुग्रासा ॥
गोपी अनुसरल्या रासा । विरहें देसि तयां त्रासा ॥
आवडे तुज कुब्जा नारी । धुदी झाली दरबारीं ॥ १ ॥
त्वन्मुखिं बकि कुचविष घोटी । मानिसी देवकिसम पोटीं ।
ज्यांचीं आचरणें खोटीं । वद्विसि तेथुनि शतकोटी ॥
कीर्तनिं नारदरति मोठी । धड त्या न मिळे लंगोटी ॥
असि काय चाल तुझी भारी । धुदी झाली दरबारीं ॥ २ ॥ ’

राजारामप्रसादी

ऐकुनि कीर्ति तुझीः—ही निव्वळ फुकटची कीर्ति, बाकी देवाच्या हातून कधींच कोणाचें बरें व्हावयाचें नाहीं अशा लडिवाळपणाच्या शिव्या देवाला विष्णुदास नाम्यानें दिल्या आहेतः—

पतीतपावन नाम ऐकुनि आलों मी द्वारा ।
पतीतपावन न होशि म्हणुनी जातों माघारा ॥
सोडीं देवा ब्रीद आतां न होशी अभिमानी ।
पतीतपावन नाम तुजला ठेवियलें कोणी ! ॥
घेसी तेव्हां देसी ऐसा असशी उदार ।
काय देवा रोधू तुमचें कृपणाचें द्वार ? ॥
उच्छिष्टाचें सीत देवा न टाकिशी बाहेरी ! ।
कोणी दिधली भगवंत तुजला भूषणाची थोरी ? ॥

विष्णुदासनामा.

१ फरदा—जमाखर्चाचे ताळेबंद; माझें पापपुण्य किती आहे याचा बरोबर हिशोब अजमावण्याकरितां चित्रगुप्तानें आपले कागद काढले आहेत.

## पद ( १३४ )

लज्जा तुज हरि ! निजाची ॥ ध्रु० ॥

पडतां संकट निवटी क्षण दे[1] । परमामृतलहरी ॥ निजाची० ॥ १
तुजविण अमुचा कोण सखा दुजा । पालन कोण करी ॥ निजाची० ॥ २
देवनाथ ह्मणे राखिं विदांपति । भवजीवनीं तारीं ॥ निजाची० ॥ ३

## पद ( १३५ ).

मुनिजनमानसहंसा । यदुकुलवंशोत्तंस हरि ।
माधव वर जगदीश्वर ईश्वर स्मर नर नरहरी ॥ ध्रु० ॥
हरिल भय हर जाणुनि जो वाजवी मोहरी ।
चित्ता चित्पदास्पदनत जो भवभ्रमा सहरी ॥ मुनि० ॥ १
अतसिकुसुमनिभ कांतरुचि[2] ज्यां पूर्ण परेशार्वरी[3] ।
उदय करिल हृदिं आत्मादिनमणी नाशिल तमशार्वरी ॥ मुनि० ॥
धृतकरकंजी[4] व्रजजनरंजी सज्जनमनमोहरी[5] ।
हयदोरे धरि स्वकरें ' होरे ' वदत पार्थरहंवरीं[6] ॥ मुनि० ॥ ३
नंदतनय गोविंद गुरु श्रीसच्चित्पद अंतरीं ।
देवनाथ हृदिं चिंतित नांदत निजसुखसदनांतरीं ॥ मुनि० ॥

## पद ( १३६ )

काय म्हणुन सांग । कशी करुणा न ये रे ! ॥ ध्रुवपद ॥
भवजीवनिं बुडताहें । सांग कैंवि न होसी साह्य ।
आळवितां पाय । कशी करुणा न ये रे ! ॥ काय० ॥ १ ॥
त्रिभुवनपतिराय । आम्हां तूंचि सकळ बापमाय ।
मोकलितों धाय । कशी करुणा न ये रे ! ॥ काय० ॥ २ ॥

---

१ क्षण दे परमामृतलहरी–क्षणांत परमामृताची लहरी दाखवून देतो. २ अतसिपुष्प–जवसाचें नीळसर रंगाचें फूल ' अतसीपुष्पसंकाशं पीतवाससमच्युतं । ये नमस्यंति गोविंदं न तेषां विद्यते भय ॥ ' पांडवगीता. कांतरुचि–रमणीय दीप्ति ज्याची असा. मोहरी–मुरली तमशार्वरी=अंधकारपूर्ण रात्र. ३ पूर्णपरेशार्वरीः–हा काय शब्द असावा ? ४ धृतकरकंजी–कंज म्हणजे पद्म, कमल शंख, चक्र, गदा, पद्म यांपैकीं पद्म ज्यानें हातीं धरलें आहे तो. ५ सज्जनमनमोहरी–सज्जनांचें मन मोहणारा ६ पार्थरहंवरीं–अर्जुनाच्या रथावर बसून

देवनाथ वदन काय । म्हणुनी मांग अंतराय ।
उदाराचा राय । कशी करुणा न ये रे ! ॥ काय० ॥ ३ ॥

## पद ( १३७ )

भक्तोत्सल[1] भवशमना हरि ! तूं गुंतलासि कोठें ? ।
चाल त्वरें गोविंदा ! येउनि मम नयनीं प्रगटें ॥ ध्रुवपद ॥
कर्ममोचना कंजनयना[2] कृष्णा सुकुमारा ।
नंदतनय अच्युता गोकुलपति गोरसचोरा ॥
मुरलीवादन कंसनिकंदन मधुमुरसंहारा ।
गोमतितटवासिया[3] द्वारकापति दीनोद्धारा ॥
गुणगणवर्णित शिणला शेषहि नेणति श्रुति पारा[4] ।
जय जय पांडवपालक रुक्मिणिवल्लभ सुखसारा ॥
टीप ॥ वाढ वेळ[5] बहु झाला येईं सख्या मला भेटें । चाल० ॥ १ ॥
निजात्मगतिदायका, रमानायका, देवदेवा ॥
मायामयमददहना, मदनमोहना वासुदेवा ॥
किति अंत पहासी कशी हृषीकेशी न तुला कणवा ।
करुणासागर नाम सत्य करीं उगवीं भवगोवा[6] ॥
परम सदय तूं भवभय निवटुनि अभय वरद द्यावा ।

---

१. भक्तोत्सल = भक्तवत्सल. २ कंजनयना = कंज = कमल कमलनेत्रा. ३ गोमतितटवासिया = द्वारकाधीशा द्वारका ही गोमतीच्या कांठीं आणि अयोध्या ही शरयूच्या कांठीं ४. नेणति श्रुति पारा-भागवतातील दशमस्कंधांत वेदांनीं भगवंताची स्तुति केली आहे, त्यांतील उपसंहारांत वेद भगवताला म्हणतात 'हे आदिपुरुषा' तुझ्या गुणांचा अंतपार नसल्यामुळेच आम्ही (श्रुति) तुझ्या सगुण रूपाचें वर्णन करण्याच्या भरीस पडत नाहीं, आणि तुझ्या निर्गुण रूपाचें वर्णन करावयाचा विचार करूं तर तें अशक्यच आहे, ह्यामुळें तेंही आमच्यानें होत नाहीं ! परमपुरुषा, यामुळेंच, अमुक तू नव्हेस, तमुक तू नव्हेस, (नेति नेति ) अशा प्रकारें निषेधरूपानें वर्णन करून लक्षणादिक वृत्तीनीं तुझें यथार्थ स्वरूप व्यक्त करण्याचा प्रयत्न आम्ही करितों ' । ५ वाढ वेळ=बऱ्याच वेळा-पासून ६ उगवीं भवगोवा=हे संसाराचें जाळें मोकळें कर संसाररूपी जाळ्या-पासून मुक्त कर.

तूं जननी मी बाळ तान्हा उसंगाच घ्यावा ॥
टीप ॥ विरहबाण हरि प्राण मनीं अज्ञान दुःख वाटे । चाल० ॥ २ ॥
पतित बहू तारिले अजामिळ गणिका पापराशी ।
त्याहुनी पतित थोर मी, म्हणुनियां करुणा नायकसी ? ॥
वोंगळ वक्रा सरळा केली ते कुब्जा दासी ।

---

१ तू जननी मी बाळ तान्हा उसंगाच घ्यावाः–देवाला आई अगर बाप ह्या शब्दांनीं आळविण्याची सवय आपल्या सर्वांनाच आहे. वर्णीकर गोविंद–कवि हे आपल्या एका पदांत म्हणतातः–

हे व्रजपति नंदकुमारे सकुमारे कृष्णाबाई ! ।
सर्वस्वीं शरण तुज आल्या परता कधिं केला नाहीं ॥
पुरवोनि प्रीति तयाची कवटाळुनि धरिलें हृदयीं ।
कनवाळुपणाची थोरी कां केली माझे आई ! ॥
चाल ॥ गुणसरिते ! सत्वर येईं ।
साष्टांग नमन तव पायीं ।
सप्रेमें चुंबन देईं ॥ हे व्रजपति० ॥
तान्हें टाकुनि दूर माता लपली त्या कांहीं कळेना ।
लडिवाळ कराया आधीं त्यागिला तोचि टळेना ॥ इ०
( अ. क. प. स. २१४ भाग २. )

२ वोंगळ वक्रा सरळ केली ते कुब्जादासी–कुब्जा ही कंसाची दासी होती. ती अति कुरूप होती व तीन ठिकाणीं आंगानें वाकडी होती. कृष्ण व बळराम हे गोकुळांतून मथुरेला आले तेव्हां ते रस्त्यानें कंसाचे वाड्याकडे चालले असतां कुब्जेनें त्यांचे आंगास चंदनाची उटी लाविली, मग कृष्णानें तिची हनुवटी हातानें धरून व तिच्या शरीराला पाय लावून ती सरळ व सुंदर केली. श्रीधरस्वामींनीं हरिविजयांत कुब्जेबद्दल जी हकीकत दिली ती येणेप्रमाणेंः—

'तों कुब्जा कंसदासी ते वेळां । भावें पूजिला घनसांवळा । म्हणे ब्रह्मानंदा दीनदयाळा । कृपा करी मजवरी ॥ तों कुब्जा कंसदासी ते वेळां । दिव्य चंदन भरोन कचोळा । वाटे जातां देखे घनसांवळा । केवळ पुतळा मदनाचा ॥ तों कुब्जा विद्रूप दिसे बापुडी । कुरूप सर्वांगीं वांकुडी । परि हरिरूपीं तिनें गोडी । निजभावें धरिलीसे ॥ हेचि राम–अवतारींची मंथरा । कैकेयीची दासी द्वेषी रघुवीरा । रामें शापिली ते अवसरा । वक्र होईं सर्वांगीं ॥ मग ती लागली रामचरणीं । वर देई चापपाणी । राम म्हणे पुढें कंससदनीं । दासी होसी कुरूप तूं ॥ मी कंसवधार्थ मथुरेसीं येईन । तेव्हां तुज वाटेस उद्धरीन । असो तीस म्हणे जगज्जीवन । देईं चंदन आम्हाते ॥ तों ती कुब्जा भावार्थे । चंदन

( पुढील पृष्ठ पाहा. )

केव्हांचा मी आळवितों कां मजविशीं निजलासी ॥
नामाग्नीनें न जळति किमपि न पातकें ऐसीं ।
तरि पतित एवढा राखीं पावन बिरुदासी ॥
टीप ॥ आजि विनति हे मान हरि अज्ञानतिमिर प्रगटे ॥ चाल० ॥ ३
दुर्घट मायाघाट अघाट हा मला उलंघना ।
शरणागतवत्सला ह्मणुनि तुज प्रार्थियली करुणा ॥

---

( ३४२ पृष्ठावरून समाप्त )

लावी आत्महस्तें । अवलोकितां हरिमुखातें । सद्गद चित्तीं जाहली ॥ आंगीं चर्चूनियां चंदन । केलें हरीस साष्टांगनमन । कृष्णें तीस हातीं धरून । लाविला चरण शरीरा ॥ जैसा परीस झगटतां लोहातें । तात्काळ सुवर्ण होय तेथें । तैसी पावली दिव्य शरीरातें । अपांगपातें हरीच्या ॥ ४७ ते ५५ ॥'

हरिविजय अध्याय १९.

हीच कुब्जा पुढें जनाबाई या रूपानें कलियुगांत जन्माला आली म्हणतात

१ 'नामाग्नीनें न जळति किमपि न पातकें ऐसी' ही कल्पना देवनाथांत जागोजाग आली आहे पण याचें सुगम विशदीकरण जितकें वामनपंडितांनीं केलें आहे तितकें दुसऱ्या कोणाही महाराष्ट्र कवीनें केलेलें नाहीं नामानें पातक भस्म होतें, पण पातकामुळे जी कुवासना तिचा छेद करावयाला मात्र सद्गुरुकृपा किंवा ईश्वरकृपा पाहिजे.

'न कळतां पद अग्निवरी पडे । न करि दाह असें न कधीं घडे ॥
अजितनाम वदो भलत्या मिसें । सकल पातक भस्म करीतसे ॥
न जाणे शिशू अग्निची शक्ति कांहीं। जळो तूळ इच्छा अशी ज्यास नाहीं॥
तरी घालितां अग्नि कार्पासराशीं । जळे, ये रितीं नामही पाप नाशी ॥
एथें म्हणाल जळती जरि सर्व पापें । मूळें न कां जळति नाममहाप्रतापें॥
नेणोनि नाम म्हणतां दुरितासि जैसें । जाळी न कीं सकळ पातकमूळ तैसें ॥
धातूवरी अनळ नेणत बाळ घाली। तो अग्नि धातुमळ तों अतिशीघ्र जाळी॥
ताम्रादि भस्महि तया अनळेंचि जेव्हां। कर्ता अभिज्ञ बहु जाळिल धातु तेव्हां ॥'

प्रायश्चित्ताबद्दलही मोरोपंत असेंच म्हणतात 'प्रायश्चित्तें पापें जळती मूळ वासना राहे । तेही भस्म करावी हें बळ तुझिया (प्रभूच्या) चरणीं आहे ' आधुनिक साधुसंत नामाग्नीनें मूळवासनेचाही छेद होतो असें म्हणतात पण वामनपंडित इतके पुढें जातांना दिसत नाहींत २ आपल्या बिरुदाला पावन राखमलिन अगर दूषित होऊं देऊं नको बिरुद = सामर्थ्य अगर वैशिष्ट्य यांचा सूचक असा दोरा पायीं बांधतात तो; ( व्रत वगैरे वरील अर्थापासून निघालेले अर्थ आहेत ).

मोहजाळ अतिविशाळ वारीं मुनिमानसहरणा ।
निजात्मप्रतिती देईं पदिं गति निजजनसुखकरणा ॥
नारद शुक सनकादिक ध्याती जें अंतःकरणा ।
अरूप त्या निजरूपीं रमवीं समरस या स्वमना[1] ॥
टीप ॥ चिदानंदमती स्वानंदसौख्य दाटे ॥ चाल० ॥ ४
कल्पविकल्पें असुखकारकें समूळ सांडावें[2] ।
शांति क्षमा आणि विवेक वैराग्यासन मांडावें ॥
वंड त्यजुनि मन खंडरहित अखंड स्वरुपीं राहावें ।
समाधिव्युत्थानीं[3] तुज एका व्यापक पाहावें ॥
समत्वयोगें अंतरंगें अशा गुणां घ्यावें ।

---

१ अरूप ज्या निजरूपीं रमवीं समरस या स्वमना = भागवतांत नारदाचा व व्यासाचा संवाद आहे; त्यांत प्रथमस्कंधांतील पांचव्या अध्यायांत म्हटलें आहे, " कर्मकांडामध्ये कित्येक मंत्रांत भगवंताचें असें वर्णन केलेलें आहे कीं त्या यज्ञपुरुषाला चार शृंगें आहेत, तीन पाय आहेत इ० तेव्हां असल्या मंत्रांतून त्याला मूर्ति सांगितलेली असल्याकारणानें मूर्तित्वामुळें त्याचे आंगीं नश्वरत्वही येऊं शकेल हें लक्षांत आणून नारद सांगतात कीं, भगवंताची मूर्ति केवळ उपासनेकरितां मंत्रामध्यें वर्णिली आहे. वास्तविक त्याला मूर्ति नाहीं वास्तविक पहातां परमेश्वर केवळ चिदात्मक आहे व त्याला कोणतेंही रूप नाहीं असें असतां त्याला ह्या अवतारामध्यें अनेक रूपें प्राप्त झाल्याबद्दल वर्णन केलें आहे हें रूप महत्तत्व, अहंकार, पंचतन्मात्रा इ० जे प्रकृतीचे विकार त्यांच्या योगानें आत्म्याच्या ठायीं उत्पन्न झाल्यासारखें भासतें; परंतु हें खरें नव्हे " (चिपळूणकरकृत भागवताचें भाषांतर अध्याय ३) प्रथमस्कंध भगवंताला रूप नाहीं तो अरूप आहे व नारद शुक सनकादि ऋषींना भगवंताच्या अव्यक्त रूपाची पूर्ण ओळख झाली होती त्याच अव्यक्त स्वरूपाच्या ठायीं माझे मनाला एकमय कर, अशी प्रार्थना देवनाथमहाराज करितात २ कल्पविकल्पें असुखकारकें समूळ सांडावें —

सकल्प विकल्प चांवरा घालीं शून्य । मन करीं निमग्न हरीपायीं ॥
उपासना दृढ संतांचे चरणीं । तेंचि पै निर्वाणी तारक तूज ॥

३ (पा २९६ खालची टीप पहा). आत्मस्वरूपाची प्राप्ति झाल्यानंतर तें स्वरूप सदोदित मनांत ठेवून जेव्हां बाह्यव्यवहार होतो तेव्हां त्याला समाधिव्युत्थान म्हणतात. मागील टीपेंत एकनाथाचा उतारा दिला आहे तसें स्पष्टीकरण अन्यत्र क्वचित् आढळेल

स्वात्मभजनें निःसंगें जनीं विजनीं हिंडावें ॥
टीप ॥ देवनाथ प्रभु श्रीगोविंदा मागत बाळहट्टें[1] ।
कृपावर दे ऐसा जेणें जन्म मृत्यु वोहटे[2] ॥ चाल० ॥ ५

### पद ( १३८ ).

हरि ! अघभयसंहरणा । योगिजनमुनिमानसहरणा हो ।
दयाघना लोचना दाविं तव रूप सौख्यभरणा ॥ ध्रु० ॥
निगम[3] वर्णिती निर्विकारी । यशोदातनय पूतनारी हो ।
दास तुझा म्हणविलों, बहु कष्टलों या संसारीं ॥
होसि दासाचा साहकारी । अंत पाहसी किती कंसारी हो ।
भवाब्धिचा अति थाट[4], उसळती लाट क्रूर लहरी ॥
चाल ॥ तूं कर्णधार हा फार घाबरा जीव बहुत देवा ।
मज दीनालागिं आधार पायिं दे थार वासुदेवा ।
हा सार नव्हे संसार, वेगिं बा सार, तुला कणवा[5] ॥
टीप ॥ येऊं दे माझि, तारिं शरणा हो । दयाघना० ॥ १ ॥
वांझ प्रसवली[6] पुत्र पोटीं, अजि हे साच काय गोठी हो ।

---

१ बाळहट्टें=बाळ आळीनें तान्ह्या लेंकराचा हट्ट योग्य किंवा अयोग्य हे त्या लेंकराला कळत नाहीं; अपेक्षित असेल तें मिळेपर्यंत तो रडतच राहणार, तसें देवनाथ गोविंदनाथाना म्हणतात कीं माझा हट्ट योग्य असो कीं अयोग्य असो, बाळहट्ट म्हणून वडिलांनीं पुरवावाच २ वोहटे=ओसरे, निःसरे, नाहींसा होई, ओहटी लागे ३ निगम वर्णिती निर्विकारी=वेद, श्रुति ह्या तुझें रूप निर्विकारी असें वर्णन करितात व मी मात्र तुझा दास म्हणवला गेलों असून या संसाररूपी भीषण भवाब्धीच्या सगुणत्वानें नष्ट होऊं पहात आहें. तेव्हां तू निर्विकारी असल्याचा आणि मी तुझा दास म्हणवल्याचा मला काय फायदा ? "देव दासाचा साहाकारी । अंगें सर्व दुरितें वारी ।" असें साधुवाक्य असून माझा मात्र "अंत किती पाहसी" ४ भवाब्धिचा अति थाट:–पृ. ११३ वरील टीप पहा.

५ कणवा=करुणा हा संसार सार ( अर्थरूप ) नव्हे म्हणून बा वासुदेवा, याला वेगी सार म्हणजे याला लवकर दूर कर आणि मला भवाब्धीमधून मुक्त कर ६ वांझ प्रसवली इ०.–अति आश्चर्यानें देवनाथमहाराज म्हणतात कीं, निगम ईश्वराला निर्विकारी म्हणून वर्णिती, असे असून भवाब्धिचा अति थाट. कर्मसृष्टि नसूनही म्हणजे तिचें मिथ्यात्व असून वृत्ति

( पुढील पृष्ठ पाहा. )

नसुनि वृत्ति मोहिली, साच दाविला, कर्मसृष्टि ।
बांधिला मोहपाश कंठीं, फिरविलें नाना संकष्टीं हो ।
मी माझें म्हणविलें, चित्त भुलविलें, केलें कष्टी ॥
चाल ॥ धरि आस बहु हृदयास मानि उल्हास फार चित्ता ।
हिंडतां देशोदेशास न मनि मनि त्रास[1] बाहे चित्ता ।
करि घोर थोर सायास होत जगदास[2] वांछि वित्ता ॥
टीप ॥ अशी गति कां जगदुद्धरणा, केली त्वां हरि विश्वंभरणा हो ॥ दया० ॥
न मिळतां वित्त दुःख वाटे, उभे रोमांच कंठ दाटे हो ।
दुःखरूप संसार, रुतति हे फार विषयकाटे ॥
होत परिश्रमीं, चित्त न विटे, मागुती त्याच पथीं विनटे[3] हो ।
काय करूं माधवा, येईं येधवां, मला भेटें ॥
चाल ॥ जाहला मुक्त परि पाश न संडी आस गती कैसी ।
करु काय तरी मी यास, करितसे ग्रास माय विवसी[4] ।

---

( ३४४ पृष्ठावरून समाप्त )

मोहिली ( पुन्हां पुन्हां मनोवृत्तींना मोह पडून कर्मसृष्टीवर भरवसा बसतो ) साच दाविली ( ही सत्य अशी मनाला वाटू लागते ) तर ही कर्मसृष्टि मिथ्या असून सत्य जर मनाला भासते तर वांझ प्रसवली पुत्र पोटीं हे गोष्टी काय अजि साच हो ( वध्यापुत्र वगैरे ज्या कल्पना कानानें ऐकितों त्या देखील सत्य होतील काय ) ? एकनाथी भागवताच्या तिसऱ्या अध्यायांत वध्यापुत्रासारखे अशक्य दर्शनाचे कविसमय एकनाथमहाराजांनीं फार कुशलतेनें एकत्र ग्रथिले आहेत. आणि वेदांनीं ज्याप्रमाणें नेति नेति रूपी नकारात्मक सिद्धांतांनीं ईश्वराचें निर्गुणत्व वर्णन करण्याचा यत्न केला आहे, त्याप्रमाणें नाथांनी या अशक्य सिद्धांतांनीं हरिमायेचें रूप दाखविलें आहे. प. १०५ टीप ३ यांतील एकनाथी भागवताचा उतारा पहा

१ न मनि मनिं त्रास—इतका त्रास होतो तरी लोचटाप्रमाणें फिरफिरून संसार-अरण्यामध्यें भ्रमण करीत असतो.

‘ पोटासाठीं बारा दिशा । आम्हां हिंडविशी जगदीशा ’ तुकाराम

२ होत जगदास—प्रपचपाशांत पडल्यामुळें दुनियेची गुलामगिरी करतो.
३ त्याच पथीं विनटे—पुनः पुनः त्याच मार्गाला लागतो, जडतो, चिकटतो.
४ माय विवसी—माया हीच कोणी जखीण

जिवलगा बोढिं चित्तास या जि करिं वास हृषीकेशी ॥
टीप ॥ गुरुगोविंदा दावि चरणा, प्रकट तू हो अंतःकरणा हो ।
देवनाथनुत तारिं त्वरित बा लाविं तुझ्या स्मरणा ॥ दया० ॥ २

## पद ( १३९ )

नंदनंदना अहो सुखसदना हरि १ भवभयमोचना ।
दीनदयाळा परमकृपाळा ये राजिवलोचना ॥ ध्रु० ॥
गोकुलवासा जगन्निवासा सांवळिया हृषीकेशी ।
परमसदय मृदु हृदय तुझें तरि करुणा नायकसी ॥
अनाथनाथा रुक्मिणिकांता ति गाती संर्वसीं ।
पतितपावन नाम दयाघन ब्रिद हें वागविसी ॥
हान दीन परि तुझा म्हणवितों तुजविण मी परदेशी ।
करुणासागर नाम तुझें तरी कठीण का मजविशीं ॥
टीप ॥ गरुडावरि हो स्वार त्वरें ये श्रीयदुकुलभूषणा ॥ दीन० ॥ १
हरि मनमोहना अहिअरिवहनां गोपीपति अच्युता ।
अद्भुत ध्यातां निगम शीणले तव गुणगण वर्णितां ।
शुक वामदेव ऋषि नारद वाल्मिक सेविति नामामृता ।
तारिले बहू पतित अजामिळगणिकादी तत्वतां ॥
शास्त्र पुराणें गाति तारिसी आल्या शरणागता ।
ऐकुनि कीर्ति शरण पातलों निवटीं भवदुष्कृता ॥

---

१ जोरानें, मोठ्यानें, आक्रोशानें २ अहिअरिवहना–गरुडवाहना. ३ शुक-वामदेव–शुकानें भागवत रचून नाममाहात्म्य वर्णिलें. नारदानें तर नामाच्या उपदेशानें ' वाल्याचा वाल्मिक केला गुरुतर हे प्रभुची सत्ता ' वाल्मीकि हा केवळ नामानें उच्च पदाला चढला व नाममाहात्म्य वाढविण्याकरिलां त्यानें शतकोटि रामायण रचिलें. ४ निवटीं भवदुष्कृता–ज्या दुष्कृतामुळें पूर्वार्जित-पापामुळें भवबंधन झाले आहे त्याला दूर कर.

टीप ॥ मदनारिप्रियें मानसमोहना मधुकैटभमर्दना ॥ दीन० ॥ २
गोरसचोरा नंदकुमारा गोपीरमणा हरी ।

---

१. मदनारिप्रिय–शिवाला प्रिय शिवानें रामोपासना सुरू केली आणि नामस्मरणानें शिवकंठांतील हालाहलदाहाचें शमन झालें शिव आणि विष्णु यांच्या चरित्रांत किती साम्य आहे हें पाहिलें म्हणजे ते एकमेकांना प्रिय कसे हें दिसेल–

' गंगाभूषण रत्न सर्व मुकुटीं श्रीवत्स विष्णुस्तनीं
एकाची तनया सुधाब्धितनया, एकासि कात्यायनी ।
ज्यानें वामकरीं कपाळ धरिलें श्रीशंख एका करीं
एकें बद्धमयूरपिच्छ सरळें अर्धेंदु एका शिरीं ॥ ३५ ॥
एक द्वारवती पुरी वसतसे, एक स्मशानीं वसे
एका लोचन दोन, तीन, दुजिया, द्वी अक्ष शोभा दिसे ।
श्रीकंठें बलियागरंग मथिका, दक्षक्रतू शंकरें
एकाचें वृषयान, एक विनतापुत्रावरी आदरें ॥ ३६ ॥
एकें कोमलकांति सोज्वलचिताभस्में तनू लेपिली
एकें चंदनपंक मर्दुनि वपू गंधें सदा चर्चिली ।
एकें पै नरमुंडहार धरिले, स्वेच्छें शिरीयावरी
एकाचे हृदयीं नवीन तुळसीमाळा रुळे साजिरी ॥ ३७ ॥
एकाची घनसार अर्णयतनू दुग्धाब्धि फेणोपमा
एकाचि घननीळ कांति, गगना ऐसी दिसे नीलिमा ।
शृंगी वाद्य महेश्वरासिं मुरली वाहे स्वभू सर्वदा
एका शार्ङ्ग करीं, पिनाक दुजिया हातीं विराजे सदा ॥ ३८ ॥
एकें व्याल गळां विशाळ धरिला, विक्राळ तो वासुकी
एकें आसन घातलें पडदला, शेषाचिया तल्पकीं ।
कैलासी स्थित नीलकंठ, दुसरा वैकुंठवासी हरी
गौरीशंकर तत्समान मिळले, ते एक एकांतरीं ॥ ३९ ॥

विठ्ठलकवि केरीकर–विद्वज्जीवन–सातवा उल्हास

२ मधुकैटभमर्दना–मधुकैटभ हे विष्णूच्या कर्णमलापासून उत्पन्न झालले दोन असुर ( देवी भागवत १ स्कंध अ ४ ) हे विष्णूसच भीति दाखवूं लागले असतां तो यास म्हणाला कीं, वर मागा हे म्हणाले, ' तूंच पाहिजे तर वर माग ' त्यावरून विष्णूनें तुम्ही मला वध्य असावें म्हणून मागितलें यांनीं 'तथास्तु' म्हटल्यावर पुढें यास त्यानें मारलें त्या काळीं त्यांच्या शरीरमेदानें संपूर्ण पृथ्वी भरली, आणि तेव्हांपासून तिला मेदिनी असें नांव पडलें ३ गोरसचोरा हें विशेषण जसें येथें अति आवडीनें लाविलें आहे तसेंच तें गोपिकाच्याही

( पुढील पृष्ठ पाहा )

करुणा एकुनि धांव घेईं ये भवदुष्कृत संहरीं ॥
गोपमुलांसवें किती गोधनें चारिसी यमुनेतिरीं ।
केव्हांचा मी आळवितों, परि करुणा न ये अंतरीं ॥
दुर्धर मोठ्या उसळति लाटा भवसिंधूच्या निरीं ।
बुडतां घेईं कर्णधार तूं उतरीं पैल तिरीं ॥
टीप ॥ त्रिभुवनभूपा आदिस्वरूपा गुणातीत निर्गुणा ॥ दीन० ॥ ३
अमोल काया जाती सखया आयुष्याची घडी ।
अशाश्वत तनु शाश्वत नाहीं काळ वरी कडकडी,[1] ॥
कांहिं कळेना सांग किनि तरी क्रीडसी यमुनेथडी ।
कष्ट होति संकष्ट अशा या वेगीं घालीं उडी ॥
संचितसुखदा गुरुगोविंदा ये करुनी तांतडी ।
घाबरला जिव धाव घेईं ये अनादिचा तूं गडी ॥
टीप ॥ देवनाथ प्रभु वदे सोयऱ्या करीं कृपा ये क्षणीं[2] ॥ दीन० ॥ ४

## पद ( १४० ).

चाल चाल वेगीं, कृष्णा मनमोहना । दिनोद्धारका गरुडवहना । ध्रु० ।
संकटीं पडलों, अरे न सुचे मज कांहीं । म्हणुनियां शरण तुझ्या पायीं ॥

---

( २४७ पृष्ठावरून समाप्त. )

तोंडीं आवडीनेच उच्चारलें जात होते. " कृष्णास जरी देती गोरस । तरी शतगुणें वाढे विशेष । ते गृहीं सुदशा ये आसमास । गोरस हरीस अर्पितां ॥ ९१ ॥ हरिमुखीं बिंदुमात्र पडे । शतगुणें तात्काळ वाढे । जरी कृष्ण नये घराकडे । तरी गौळणी कष्टी होती ॥ ९२ ॥ कृष्ण आजी आला नाहीं घरा । म्हणोनि चिंताक्रांत गोपदारा । बिंदुमात्र अर्पितां श्रीधरा । गोरस वाढे असंभाव्य ॥ ९३ ॥ वटबीज मोहरीएवढें । परी पर्वताकार वृक्ष चढे । तैसा हरिमुखीं गोरस चढे । दशा चढे गृहासी त्या ॥ ९४ ॥ गाऱ्हाणें सांगती गौळणी । त्या उग्याच कौतुकें करोनी । परी मनामाजी चक्रपाणी । नित्य यावा गृहातें ॥ ९५ ॥ भलत्या कार्यमिसें करोनी । यशोदेच्या गृहा कामिनी । क्षणक्षणां येती फिरोनी । कृष्णनयनीं पहावया ॥ " हरिविजय–अध्याय ६ वा

१. कडकडी = गर्जना करीत आहे. गडगडत आहे २. करीं कृपावीक्षणा असाही एक पाठ आहे.

आलों दिनबंधु अरे ! अर्ष भाव हृदयीं । धरुनि सांवळ्या शेषशायी॥

चाल ॥ अरे हरी ! कमलनयनारे ।
अरे हरी ! फणिशयनारे ॥
अरे हरी ! जात वय सारें ।

टीप ॥ ग्रासील काळ वदना । प्राण घाबरा सौख्यसदना ॥ चाल० ॥ १

---

१ अर्षभाव हृदयीं:–बालभक्तिभाव. हा शब्द 'आरुष' अशा रूपानें मराठी कवितेंत पुष्कळ योजिला गेला आहे व त्या रूपांत त्याचा अर्थ वेडी-वांकडी, अडाणी, असा आहे किल्येक ठिकाणी याचा अर्थ जुनाट, गांवढळ, प्रचाराबाहेरचा असाही होतो. व्युत्पत्तिप्रदीपकार हे छांदिष्ट व आर्ष या दोन शब्दांबद्दल म्हणतात, " छंदस् म्हणजे वेद किंवा पद्य असा मूळ अर्थ आहे साम्प्रतकाळीं भाषाशास्त्रवेत्त्यांनीं ज्या भाषांस आर्यभाषा असें नांव दिलें आहे त्या सर्वांत संस्कृत भाषा फार प्राचीन होय तिला पुष्कळ काळ गेल्यावर पाणिनीनें तिचें व्याकरण केलें. त्या वेळेस जे शब्द लोकव्यवहाराच्या भाषेंत नसून केवळ वेदांत मात्र होते त्यांस त्यानें छांदस म्हटलें, त्यावरून व्याकरण-नियमाबाहेरचे जे वेदांत किंवा महाभारतासारख्या आद्य ग्रंथांत येणारे शब्द त्यांस छांदस असें नांव पडलें या शब्दांतील नियमबाह्य एवढा अर्थांश घेऊन ज्या मनुष्याचें आचरण लोकव्यवहारनियमाबाहेर असते त्यास छांदिष्ट असें म्हणण्याचा परिपाठ पडला त्यावरून छंदिष्ट किंवा छांदिष्ट याचा अर्थ यथेच्छ आचरण करणारा, वेडसर असा व्यवहारांत झाला आहे. आर्ष शब्दाचा इतिहास असाच आहे आर्ष शब्द ऋषि शब्दापासून झाला आहे त्याचा अर्थ ऋषींचा, ऋषींनीं उच्चारलेला, असा आहे. राजकृत नियमांनीं राजा बद्ध होत नाहीं,असा राजनीतीचा एक सिद्धांत आहे, त्याप्रमाणें व्यासवाल्मीकां-सारखे समर्थ व स्वतंत्र कवि व्याकरणनियमांनीं बद्ध होत नाहींत या अर्थाचा (निरंकुशः कवयः) कवीला प्रतिबंध नाहीं असा एक भाषातत्त्ववेत्त्यांचा सिद्धांत आहे त्याप्रमाणें व्याकरणनियमबाह्य एखाद्या शब्दाचा प्रयोग आढळला म्हणजे त्याला आर्षप्रयोग म्हणतात. त्यावरून लोकस्थितिनियमबाह्य आच-रण करण्यास आर्ष म्हणण्याचा संप्रदाय पडून आर्ष म्हणजे यथेच्छ वागणारा-वेडा, असा अर्थ झाला. " व्युत्पत्तिप्रदीप आवृत्ति २ री, पृष्ठ ३४

श्रीधरस्वामी म्हणतात:-' संत श्रोते चतुर पंडित । माझें बोलणें आर्ष अत्यंत। जैसा सरस्वतीपुढें मूढ बहुत । वाग्विलास दावितसे '

तुकाराम म्हणतात:–'रत्नाकरापुढें काचवटी समर्पिली । तैसी माझी आर्ष-बोली ( २ ) आरुष उत्तरें संतोषे माऊली । कवळोनी घाली हृदया आंत. '

नूतन तनु उत्तम, हे ब्रह्मरत्नखाणी । प्राप्त चौऱ्यांशीं लक्ष योनी ॥
हिंडतां झाली, ह पूर्व भाग्य पुण्यीं । विसरलों स्वहित क्रिया करणी ॥
चाल ॥ अरे हरी वृथा वय जाईल ।
अरे हरी कशी गति होईल ।
अरे हरी ! कोण मज देईल ॥
टीप ॥ तुजवांचुनि जगजिवना । बुडतां भवीं कर सुखकरणा ॥चाल०॥ २
तरुण वय माझें मदन करि क्लेशा । सुतासुतदारधनीं आशा ॥
द्रव्य मिळवाया हिंडलों देशोदेशा । गुंतुनी पडलों मोहपाशा ॥
चाल ॥ अरे हरी ! मिळविलें व्याहीं ।
अरे हरी ! बरवे जांवाई ।
अरे हरी उसंत कधिं नाहीं ॥
टीप ॥ मानिलें सौख्य जाणा । विषयवासना ग्रासि स्वमन ॥चाल०॥ ३
पडे उकरीतां कूकरा टाकि दाणे । खाति सकळ हा खाऊं नेणें ॥
परी सांडीना विश्रांति लभ्य नेणें । पुन्हां उकरितो साभिमानें ।
चाल ॥ अरे हरी ! तो धरी त्रास ।
अरे हरी ! झालें मज तैसें ।
अरे हरी ! करूं मी कसें ॥
टीप ॥ भवभयदुःखशमना । भक्तवत्सला पीतवसना ! ॥ चाल० ॥ ४
श्रम अद्भुत चिंता हा दुःखरूप असार । गोड मानिला कसा संसार ॥

---

१ हे ब्रह्म रत्नखाणीः—ब्रह्मरत्नखाणी = ब्राह्मणकुळांत जन्म. २ बुडतां भविं कर सुखकरणाः—हे सुखकरणा ! जग ज्जीवना ! मज भविं बुडतां तुजवांचूनि कोण कर देईल, असा अन्वय ३ उसंत—विसांवा ४ पडे उकरीतां कूकरा टाकि दाणे खाति सकळ हा खाऊं नेणें—कोंबड्याला संवय असते कीं, तो पुढें दाणे उकरीत जातो, मागून इतर कोंबडे किंवा पांखरें ने दाणे खातात आणि याच्याकरितां काहीच शिल्लक ठेवित नाहीत, याचें त्याला अगदीं भान नसतें हा फक्त पुढें उकरीत जातो. तसाच मनुष्य आपल्या पापपुण्याकडे न पहातां केवळ पुढें संचयाच्या मागें लागतो, आणि तो इतरांच्या मात्र उपयोगी पडतो याचे श्रम कोंबड्याप्रमाणें व्यर्थ होत.
( दाजीसाहेब देशपांडे )

५ पुन्हां उकरितो साभिमानें—मागें एका पदांत सांगितल्याप्रमाणें ' होत परिश्रमीं चित्त न विटे । मागुती त्याच पदीं विनटे. '

धनिक अर्जविले राजेही बहु १र्थी फार। द्रव्य धनियाचा धरुनि आधार
चाल ॥ अरे हरी ! द्रव्य बहु झालें।
अरे हरी ! सुहृज्जन आले।
अरे हरी ! मिळति भंवताले ॥
दीप ॥ वेष्टुनी असति जाणा। घाली मोह महा स्वमना ॥ चाल० ॥ ५
काळ तो गेला हे दिवस कठिण आले। सुहृद आप्त ते घरा गेले॥
दिसेना कोणी परदेशी ऐकिले। देह माझेंचि असे उरलें ॥
चाल ॥ अरे हरी ! म्हणुनि मज चित्तीं।
अरे हरी ! वाटते खंती।
अरे हरी ! कोणि सांगाती ॥
दीप ॥ नाहींच कळलें जाणा। बहु वाटलें दुःख स्वमना ॥ चाल० ॥ ६
चित्त वीटलें म्हणवोनि तुला हो ! कां। शरण मी आलों नंदतोका॥
कृपें अवलोकीं दिनबंधु पुण्यश्लोका। अभय वर देई मिटविं धोका॥
चाल ॥ अरे हरी ! ऐक अनंता।
अरे हरी ! माझि तुज चिंता।
अरे हरी ! तो तूं हे ममता ॥
दीप ॥ देवनाथ विनावि चरणा। येऊं दे करुणा गोपीरमणा !॥ चाल० ॥ ७

## पद (१४१)

भुवनसुंदरा, सुंदरा चक्रपाणी। मधुसूदना ! मोक्षदानी ! ॥ ध्रु० ॥
कमलऽोचना, लोचना कर्मदहना। कमलजापति गरुडवाहना ॥
रमावल्लभा, वल्लभा विश्वजिवना। कसी तुज न येचि बा ! करुणा ? ॥
छळिसी तरि किती, किती कनकवसना२। राजिवाक्षा३ ! हरि ! मनमोहना
गोपी भाकिती, भाकिती दीनवाणी ॥ मधुसूदना० ॥ १
मुरलिरव सुखद, सुखद मधुर भारी। दुष्ट आमुचें चित्त हारी ॥
मुरलि हे नव्हे, नव्हे महामारी। बहु त्रासविल्या व्रजनारी ॥
............................ ।.............. .........॥
प्राण घेतसे, घेतसे धसुनि श्रवणीं ॥ मधुसूदना० ॥ २
श्रवणिं ध्वनि पडतां, पडतां गृहधंदा। कदा नाठवे गोपिवृंदा ॥

---

१ विश्वाधारा. २ पीतांबर परिधान करणाऱ्या ३ कमललोचना.

शिरत मानसीं, मानसीं करित भेदा । नंदनंदन हरि गोविंदा ॥
कशास्तव असी अमि परमानंदा । धरिसि तरि कशी विश्वकंदा ॥
परमलाघवी, लाघवी पूर्ण मोहनी ॥ मधुसूदना० ॥ ३
मान विनवणी, विनवणि प्रभु गोपाळा ! । अशा मुरलिचा सांडि चाळा ॥
वाजविसी किती, किती वेळोवेळा । बहु श्रमि झालों आम्ही अबळा॥
दया तुज यावी, यावी कनवाळा । म्हणुनि प्रार्थियलें पदकमळा ॥
ठेवीं शिरिं त्वरें, त्वरें अभय पाणी ॥ मधुसूदना० ॥ ४
पतितपावना, पावना ऐक बापा । विबुधजनप्रिया विमलरूपा ॥
दुरितभवनदीं नदीं तारिं तापा । चुकविं चौऱ्यांशिं दुःख खेपा ॥
भरविं लोचनीं, लोचनीं स्वरूपमापा । कृपें दाखवीं मार्ग सोपा ॥
देवनाथीय, नाथीय ऐक्यें मिळणी ॥ मधुसूदना० ॥

## पद ( १४२ ).

जाग रे ! जाग बापा[३], विश्वपालका कृष्णा ।
दीन आम्ही उभे द्वारीं, आमुची बोळवीं तृष्णा ॥ ध्रु० ॥
त्रासलों प्रप[१]चीं या, बहु कष्टलों भारी ।
म्हणउनि शरण आलों, विभो ! तुझिया द्वारीं. ॥ जाग रे० ॥ १
सांग बा ! न्यून काय, हरि तुझिया भांडारीं ।
याचक भाक मागे, प्रेम देईं झडकरी. ॥ जाग रे० ॥ २
गुरुकृपें[२] उदयो झाला, हरि उदया आला ।
सुख तें काय सांगूं, जिवलग भेटला. ॥ जाग रे० ॥ ३
श्रीगुरुनाथराया, कृपासिंधु गोविंदा ! ।
देवनाथ प्रार्थिताहे, प्रभुपदारविंदा. ॥ जाग रे० ॥ ४

## पद ( १४३ )

काय माझी गति तुज करुणा न आलिया. ॥ ध्रु० ॥
हा भवसागर दुस्तर दुर्धर ।
उसळती लाटा माजीं समूळ बुडालिया ॥ काय० ॥ १

---

१ आम्हांला आत्मप्रचीति दे २ कृपेनें, दयेनें. ३ जागरे जाग–तूं आमच्या दीनवाण्या हांका ऐकूनसुद्धा अझून निजला आहेस तर लवकर जागा हो, हें विनवण्याचा हेतु.४ दयाळनाथांच्या कवितेची प्रस्तावना पॅरिग्राफ तेरावा पहा.

मद मत्सर काम क्रोध हीं सावजें[1] ।
देउनियां मिठि येणें वोढोनी नेलिया ॥ काय० ॥ २
तारक तुजविण दुजा नसे ।
यावयासि तुजलागीं उशिर हा झालिया ॥ काय० ॥ ३
देवनाथ प्रभुनाथ श्रीगोविंदा ।
म्हणवितों तुझा तुवां उपेक्षा केलिया ॥ काय० ॥ ४

## पद ( १४४ ).

माझी कां न हरी ! तुज ये करुणा ? ॥ ध्रु० ॥
मोहित पदीं व्रजबाला कामें । तारियल्या जी ! त्या तरुणा ॥ माझी० ॥ १
पद्माप्रिय ये सागरतीरीं । निजसी करुनी फणी अंथरुणा ॥ माझी० ॥ २
नंदपिता हरी सोडविला त्वां । नेतां जळिं पैं त्या वरुणा ॥ माझी० ॥ ३
देवनाथ प्रभु नाथ निरंजन । कृपाउदय करीं खगवहना ! ॥ माझी० ॥ ४

---

१ मद मत्सर काम क्रोध हीं सावजें:–माधव कवि म्हणतात,
' प्रपच पसरे कसा ! विठोबा प्रपंच पसरे कसा
वनीं वागुरें पसरि पारधी पिसे चिलकडे तसा— '
नाथांनीं कामाला ' एडका मदन तो केवळ पचानन ' असं वर्णिलें आहे रामजोशी त्याला भिल्ल म्हणतात " याच वनामधीं भिल्ल नांदतो काम नाम याला । पचशरानें विश्व मोहिलें ठाऊक सकळांला "

२ पद्माप्रिय ये सागरतीरीं निजसी करुनी फणी अंथरुणा–हे लक्ष्मीनाथा, फणी म्हणजे सहस्र फणाचा शेष याचें अंथरूण करून तूं त्याच्यावर निःशक निजतोस सस्कृत कवि यासबंधानें अशी कल्पना चालवितात कीं, साधारण व्यवहारी आणि डोळस मनुष्य सापापासून दहा गांवें दूर रहातो, असें असतां सर्वव्यवहारचतुर आणि कमलपत्रासारखे मोठे डोळे असणारा प्रभु भगवान् हा ज्याअर्थीं लक्ष्मीच्या प्रेमानें श्वशुरगृहीं वास करतो, इतकेंच नव्हे तर सहस्र फणा असणाऱ्या भयंकर सापावर आपण विश्रांति घेत आहों याचेंही त्याला भान राहिलें नाहीं, तेव्हां समर्थ लोक लक्ष्मीच्या साहचर्यानें आंधळे होतात हीच गोष्ट खरी
" लक्ष्मीः क्षमस्व वचनं मम दूषणीयम् । अधीभवति पुरुषास्तव दर्शनेन ।
नो चेत्कथ कमलपत्र विशालनेत्रो । नारायणः स्वपिति पन्नगभोगतल्पे ॥

३ नदपिता हरी सोडविला त्वां नेतां जळिं पैं त्या वरुणा:–ही कथा श्रीधरस्वामीकृत हरिविजयांत चौदाव्या अध्यायांत दिली आहे. नंद एकादशीव्रत करी व त्या दिवशीं त्याचा उपोषण–जागरणाचा नित्यनेम असे. एक दिवस

( पुढील पृष्ठ पाहा. )

## पद ( १४५ )

गोविंदजी ! पाय तुमचे चला येऊं या पाहूं या ॥ ध्रु० ॥
दुर्धर अतिभारी । उठे या भवाब्धिची लहरी[1] क्रूरकहरी[2] ॥
भयभीत मी अंतरीं । बहु व्याकुळ जीव, तुम्ही या जी कसारी ! ॥
सांवळिया पुलनारी ! । तुम्हां वांचुनियां जी ! कोण मला तारी ? ॥
भव दुस्तर लघूं या ॥ गोविंदजी० ॥ १
तुम्ही ऐका सर्वेशा ! । मी दीन माझी जी ! पदिं तुमच्या आशा ॥
गोवळा ! गोपवेषा ! । तुम्हीं उपेक्षिल्या जी ! गति आमुच्या कैशा ॥
नाथ! जी ! विश्वाधीशा । । या ठाव मला पदीं हरुनी भवक्लेशा; ॥
हें मस्तक वाहूं या. ॥ गोविंदजी० ॥ २
जय भीमातीरवासा ! । घ्या पल्लवीं[3] योगीजनमानसहंसा ! ॥
उपेक्षा न करावी सहसा, । रक्षा पावन ब्रीद श्रीनिवासा ! ॥
करुणा कां न तुम्ही परिसा? । मी अनाथ जी ! तुमच्या पायिं मला धिंवसा[4] ॥
रूप नयनीं गवसू[5] या. ॥ गोविंदजी० ॥ ४
देवनाथप्रभुवरदा । तुम्ही अझुनि जी किति पाहतां मर्यादा ॥

---

( ३५३ पृष्ठावरून समाप्त )

एकादशीव्रत पूर्ण करून द्वादशीस नंद अरुणोदयीं यमुनास्नानाला आला वरुणाच्या मनांत कीं, आदिनारायण श्रीकृष्ण हा अंशरूपानें सगुण अवतार धारण करता झाला, तर याच्या लीलेचा आपणही थोडा अनुभव घ्यावा, म्हणून नंदानें अघमर्षण करितांच वरुण त्याला पातालांत घेऊन गेला इकडे यशोदा आक्रोश करायला लागली असतां श्रीकृष्णानें तिचें शांतवन केलें, आणि आपण यमुनाप्रवेश केला पूर्वीं कालियामर्दनाच्या वेळीं श्रीकृष्णानें केलेला पराक्रम आठवतांच यशोदेला धीर आला इकडे श्रीकृष्णानें पाताळांत प्रवेश केला असतां वरुणानें त्याची आणि नंदाची षोडशोपचारें पूजा केली आणि श्रीकृष्णानें नंदाला तीरावाहेर आणून यशोदेची काळजी दूर केली अशी कथा आहे

१ लहरी=लाट २ क्रूरकहरी=अति कहर करून सोडणारी ३ पल्लवीं=पदरात. ४ धिंवसा=धैर्य, उत्कट इच्छा पद वरील टीप पहा. ५ गवसूं या=सांपडूं या, मिळू या रूप नयनीं गवसू या=रूप दृष्टीस पडूं या, सांपडूं या, गिवसूं या. कृष्णजन्मांतील या शब्दावरील सविस्तर टीप नंबर ५८ आहे ती पहा

नेमाचा वायदा । घडि भरल्यावर यम काढिल कीं फरदा[1] ॥
या मुद्रांकित सनदा । मग निर्भय होइन चित्सुखकंदा ॥
या दान स्वसवेशा ! ॥ गोविंदजी० ॥ ४

## पद ( १४६ ).

चाल त्वरें हरि ! लवकर यावें ॥ ध्रु० ॥
या भवसंकटीं पडलों जी ! मी । म्हणवुनि बाहतों वेगें धांवें ॥ चाल० ॥ १
तूं करुणाघन माय दीनाची । पळवीं मज उचलुनि घ्यावें ॥ चाल० ॥ २
देवनाथप्रभु श्रीगोविंदा ! । पावन ब्रिद आपुलें राखावें[2] ॥ चाल० ॥ ३ ॥

## पद ( १४७ )

तुझिया रंगणीं नाचावें । हेंचि दान बा मज द्यावें, ॥ ध्रु० ॥
तुझिया नामाचे प्रबंध[3] । राहो अनुदिनीं मज छंद ॥ तुझिया० ॥ १
भक्तिमुक्तीच्या माहेरा । नंदनंदना ! सुकुमारा ! ॥ तुझिया० ॥ २
देवनाथ विनवी । गोविंदा ! करुणा ऐकावी ॥ तुझिया० ॥ ३

## पद ( १४८ ).

ये रे ! कृष्णा ! गोविंदा ! गोपवेषा ! ।
दिनानाथा ! दाखवीं पादरेषा रे ! ॥ ध्रु० ॥
मानसमोहना ! खगवहना गोपीरमणा ।
हरि गुणगहना अघदहना भवभयशमना ! ॥
कमलनयना मधुसूदना ! कंसकदना ! ।
कां बा ! माझी अझुनी येईना करुणा ? ॥ ये रे ! कृष्णा० ॥ १

---

१ यम काढिल फरदा=आयुष्य संपण्याची वेळ आली म्हणजे यम आपली यादी काढून पाहील आणि तुमच्या पापपुण्याचा नक्की हिशोब काढील. फरदा=यादी हा फारशी शब्द आहे अशीच कल्पना पूर्वी देवनाथमहाराजांनीं आपल्या एका पदांत योजिली आहे

विश्वोद्धारका गुरु गोविंदा किती भोगावी आपदा ।
सरली आयुष्याची मर्यादा काळें काढिल्या फरदा ॥

२ पावन ब्रिद आपुलें राखावें=आपलें ब्रीद जसेंच्या तसेंच पावन राखावें. माझ्यासारखा पतित तारला गेला नाहीं या अपयशानें मलिन होऊं देऊं नये. हेच शब्द मागें आले आहेत

३ ग्रंथ, श्लोकादिकांची रचना (माधव चंद्रोबा-कृत संस्कृत-मराठी कोश).

मायातीता मुरमर्दन ! हे हरि देवा ! ।
वर्णितां शिणलें श्रुतिशास्त्र गुणवैभवा ॥
तेथें मज पामराचा काय केंवा ! ।
.................... ... ... ॥ ये रे ! कृष्णा० ॥ २
सनकादिक शुकव्यास तन्मय ध्यानीं ।
नारदतुंबर गाताती गुणगण गानीं ॥
पक्षिवहना अहिशमना ! मोक्षदानी ! ।
हे सुखसिंधो ! दीनबंधो ! चक्रपाणी ! ॥ ये रे ! कृष्णा० ॥ ३
देवनाथ भावार्थें करि विनवणी ।
प्रभु गोविंदा ! करुणारव ऐकें कानीं ॥
वृत्ति माझी लावीं बा ! तुझिये भजनीं ।
सगुणरूपा प्रगटावें या निजनयनीं ॥ ये रे ! कृष्णा० ॥ ४

## पद ( १४९ ).

आझुनि कां रे ! न येसी । हरी ! सांग दयानिधि ! ॥ ध्रु० ॥
घाबरला जीव कां कींव न ये । तुजवांचुनि मी परदेशी ॥ हरी० ॥ १
स्वरुपीं समरस भोगिन सोहळा । मानस हेच मिराशी ॥ हरी० ॥ २
देवनाथ प्रभु बहु करुणेचा । सागर तू ह्मणवीसी ॥ हरी० ॥ ३

## पद ( १५० ).

सांवळ्या सगुणसुंदरा, चला मंदिरा इंदिरावरा ।
अतिसदय हृदय मृदु तरि हरि तुम्ही कठीणता कां वरा ॥ ध्रु० ॥
होतां गुतलां कोठें, भक्तिपेठे मज नाकळे ।
कोण भक्त तरि ऐसा जेणें बोढियलें निजबळें ? ॥
बहु दुःखित मी झालें मानस विरहाग्नीनें जळे ।
दयाघना तुम्ही वर्षा या जी विझवा कृपाजळें ॥
अंगिकारिल आधीं आतां लोटितसां वेगळें ।

---

१ सामर्थ्य, थोरवी. २ एकजीव, तन्मय ३ वतनदारी, मिरास. ४ भक्तिपेठ=भक्तांचा व्यापार या शब्दावर (प २७३) टीप पहा ५ निजबळें—फार जोरानें, अत्यंत जोर करून निज याचा अर्थ कवितेंत नितांत, अत्यंत असा होतो ६ अंगिकारिले आधीं आतां लोटितसां वेगळें—दूर 'जाणुनिया मी अपराधी' यावर टीप पहा.

दानी होउनि ब्रीद मिरविलें शेवटीं हें कां फळे ? ॥

चाल ॥ हें उचित नव्हे श्रीधरा ।
या लवकरि स्वकरीं धरा ।
मी दीन मला उद्धरा ॥

टीप ॥ दीनबंधु जी करुणासिंधु ब्रीद हें सत्य करा ॥ अति० ॥ १

कुंदरदन[1] सुखसदन मदनमोहन जी मधुसुदना ।
तव विरह[2] कदन करि मदन जाळि मापति मुरलीवादना ॥
नावडती उपभोग रोग मज गमती सुरमर्दना ।
विखारवत शृंगार काय मी करूं या स्वकचदेना ॥

---

१ कुंदरदन=कुंदपुष्पाप्रमाणें दांत आहेत ज्याचे तो २ " तव विरह कदन करि मदन–विखारवत शृंगार काय मी करूं या स्वकचदना:"—कृष्णदास कवींनींही कृष्ण न आल्याकारणानें गोपीला किती विरहदुःख झालें याचें अशाच तऱ्हेनें मनोरम वर्णन केलें आहे

रमाकांत न ये मी वो । सये । काय करूं ॥ ध्रु० ॥
दूर करुनि चंदनासि । दावीं नंदनंदनासि ।
शशीकळा गमती रोग । नको सजणि भांग भरूं ॥ रमाकांत० ॥ १
श्रम मनिं बहु दाटताति । युगसम पळ वाटताति ।
म्लानवदन चंद्र नको दर्पणासी आणि धरूं ॥ रमाकांत० ॥ २ ॥
नवस करुनि चंडिकेशिं । दावीं मला हृषिकेशी ।
कृष्णदास विरहसिंधु सांग सखे ! केविं तरूं ॥ रमाकांत० ॥ ३ ॥

वरील पदाइतकेंच सुंदर वर्णन रमणतनय कवींनीं आपल्या पदांत केलें आहे तेंही येथे देतो:—

आणाना यदुराज ! झडकरि आणाना यदुराज ॥ ध्रु० ॥
माळ गळ्यांतिल व्याळसमचि, घननीळ नये सदनाला ।
वेळ नका बहु लावु तयाविण राहिना जीव आज ॥ झड० ॥ १ ॥
भोग सुखादिक रोग गमती वियोग न साहे सख्यानों ।
वेगिं आणि सये । बाई । तयाविण राहीना मम प्राण ॥ झड० ॥ २ ॥
नंदतनय व्रजवृंदसहित कालिंदितटीं करी लीला ।
मंदिरीं आणि सखे, रमणात्मज वंदित पादसरोज ॥ झड० ॥

रामदासपंचायतनांतील प्रख्यात साधु केशवस्वामी भागानगरकर (दक्षिण हैदराबाद) यांचें पुढील मनोहर पद पहा:—

( पुढील पृष्ठ पहा. )

युगसम लव पल क्षण तुजविण हा जातो सुरवदना ।
अंत किती पाहतां अनंता नंदाच्या नदना ॥
चौक ॥ हे सच्चित्सुखदायका ।
गोरक्षक यदुनायका ।
विनवणी श्रवणीं आयका ॥
टीप ॥ मी अन्यायी क्षमा करा अन्याया विश्वंभरा
हृषीकेशी मी दासी मस्तकीं ठेवा अभय करा ॥ स॰ळ्या०॥ २
अंतरगृह वोवरी वरी ते शुद्ध सत्वाथिली ।

---

( ३५७ पृष्ठावरून समाप्त )

भ्रांती पडदा फेडा माझा राम मजला दावा वो ।
त्रिविधतापें श्रमलें जिविंचा विसावा मेळवा वो ॥ ध्रु० ॥
चंदन पोळी, शशी बहुजाळी, दारुण विरहानळ वो ।
हरिविण दिशा दिसती उदास भेटवा गोपाळ वो ॥ १ ॥
सुमनहार जेविं विखार वेगीं परते काढा वो ।
हरिविण रस तो, सकल विरसतो, शोभा कैंची जडा वो ॥ २ ॥
करमुद्रिकावसनें देखा भूषण करु मी काय वो ।
काढा पैंजण वाजाती रुणझुण त्याविण मज न साहे वो ॥ ३ ॥
अशन शयन भोजन पान झालें विषप्राय वो ।
न घाला वारा होत उबारा हरिविण प्राण जाय वो ॥ ४ ॥
हरिविण कळा सकळा विकळा विरस हा शेजार वो ।
गुरुसी शरण रिघता केशवीं झाला साक्षात्कार वो ॥ ५ ॥

१ मी अन्यायी क्षमा कराः—असेंच देवनाथ महाराजाचें 'प्रभु मी अन्यायी अन्यायी परि क्षमावत तू आई' हें पद आहे २ वोवरी=ओसरी, ओटी असा अर्थ कोणी करतात. काव्यसंग्रहकारांनीं शतमुखरावणवधाख्यानाच्या टीपेंत खोली असा अर्थ दिला आहे तोही ठीक दिसतो "ऐकोनि श्रीराम उतावेळा। प्रवेशला सदन देउळा। वोवरा गर्भीं चिद्रत्नकळा। देखता झाला लोचनी॥" मुक्तेश्वर–शतमुखरावणवधाख्यान–ओं ९० अष्टभाव=अष्टभाव येणेंप्रमाणे

स्तंभ· स्वेदोऽथ रोमांच· स्वरभंगोऽथ वेपथुः ।
वैवर्ण्यमश्रुप्रलयौ अष्टौ भावाश्च सात्विका. ॥

स्तंभ=स्तब्धता. स्वेद=घाम येणें रोमांच=अंगावर कांटा उभा रहाणें वेपथु=कंप वैवर्ण्य=तोंडाचा वर्ण बदलणें अश्रु=डोळ्यांतून पाणी येणें. प्रलय=बेशुद्धि
३. सत्वाथिला = सत्वपूर्ण झाला. सत्वानें युक्त झाला आथि = आहे हल्ली

( पुढील पृष्ठ पहा )

अष्टभाव पर्यंकीं भक्तिनें सुमनसेज रचियली ॥
मार्ग पाहतां शिणले लोचन श्रुति मार्गे परतली ।
न दिसति कोठें हरी ऐकतां बहु मी घाबरली ॥

( ३५८ पृष्ठावरून चालू )

अस् धातूचें एकवचनीं वर्तमानकाळीं आहे असें रूप आहे, पण जुन्या कवितेमध्ये 'आहे' याच्याऐवजीं आथि असें रूप आढळते. संस्कृतमधील 'अस्ति' याचें आथि हें रूप झालें असावें आथि हा शब्द ज्ञानेश्वरींत आढळतो "हें अनावरत विचारितां । वायांचि थिंवसा उपजला चित्ता । यन्हवीं काइ भानुतेजीं खद्योता । शोभा आथी ? ॥ ज्ञानेश्वरी अ १ ओ ६७ "म्हणोनि अग्निसेवा न सांडितां । कर्मरेखा नोलंडितां । आथि योगसुख स्वभावता । आपणपांचि" ज्ञानेश्वरी ६–५१ "आता असो हें सकल । जाण पां ज्ञानासि अग्नि मूळ । तेया अग्निचें प्रयाणीं बल । संपूर्ण आथि" ज्ञानेश्वरी ८–१७ व्युत्पत्तिप्रदीपकार म्हणतात "अस् = असणें अस्ति = प्रा० अत्थि, आथि = आहे ज्ञानेश्वरींत आथि याचा प्रयोग आढळतो" मोल्स्वर्थच्या कोशात आथिला हा आथि याचा भूतकाळ असा दिलेला आहे. तो म्हणतो कीं असला, झाला या भूतकालवाचक रूपाबद्दल प्राचीन रूप आथिला हें होतें असणें याचा आथिला हा प्राचीन ग्रंथांतला भूतकाळ होय असें त्याचें मत आहे ज्याप्रमाणे धावणें = धांविन्नला, कोपणें = कोपिन्नला, मोहणें = मोहियला वगैरे रूपें झालीं आहेत, त्याचप्रमाणें असणेपासून पहिल्यानें आथि व मग आथिला शब्द झालेला दिसतो हा शब्द जेव्हां समासान्त असतो तेव्हां विशेषणरूप असून त्याचा अर्थ त्यानें युक्त, त्यानें पूर्ण असा होतो आथिला हा शब्द जेव्हां स्वतन्त्रपणें कवितेंत येतो तेव्हां त्याचा अर्थ पूर्ण, संपन्न असा होतो. रा राजवाड्यानीं आपल्या ज्ञानेश्वरीच्या शेवटल्या कोशात 'संपन्न' असा अर्थ दिला आहे 'ऐसेंनि गंभीरपणें । थिरावलेनि अंतःकरणें । आथिला तो जाणें । भानु इये" ज्ञानेश्वरी १–६१ आथिला याचीं इतर शब्दांशी समासान्त रूपें फार मजेदार आहेत, व ज्ञानेश्वरापासून देवनाथापर्यंत बऱ्याचजणांनीं ही सामासिक रूपें दिलीं आहेत, त्यांतील कांहीं थोडीं मासल्यादाखल देतों–रंगाथिलें = रंगयुक्त "पद्यबंध नागर । तेचि रंगाथिलें अंबर । जेथ साहित्य वाणें सपुर । उजलाचें" ज्ञानेश्वरी अ १ ओ ६ भ्याडाथिलें = भीतिपूर्ण झालेले, घाबरलेले "एक अत्यंत भ्याडाथिले । ते प्रतिभ्याड म्हणत झाले । कांहो बैसलेत उगले । शीघ्र विचार सांगाना" ? अवचित सुत काशीकृत द्रौपदीस्वयंवर सत्वाथिला = सत्वपूर्ण झाला "अनुष्ठानिया शतगुणें आगळा । एक इंद्रियजित बोलला । त्यागुणें विष्णुभक्त सत्वाथिला । जो भेदरहित निर्मत्सर" श्रीधर–हरिविजय ३४–१०१. "अंतरगृह

( पुढील पृष्ठ पहा. )

जळावीण मिन जैसा तसी तगमग जिवीं लागली ।
तुजसाठीं जगजेठी भुवनें चतुर्दश शोधिलीं ॥

चाल ॥ पाहतां थाकित झाली मती ।
न पडती ठायिं गोपिपती ।
आतां कैसी होइल गती ॥

नीप ॥ कोण मला दावील पाय मी काय करूं श्रीधरा ॥ अति० ॥ ३

देवनाथ प्रभु गुरु गोविंदा येइना कां करुणा ।
करुणासागर ब्रीद मिरविलें तुम्हींच नारायणा ॥
गणिका पापी अजामिळादी उद्धरले सज्जना ।
काय म्हणुन मजविशींच आली कठीणता जी मना ॥

---

( ३५९ पृष्ठावरून समाप्त )

बोवरी वरी ते शुद्ध सत्वाथिली " देवनाथ मुक्तेश्वरांनीं तर या रूपांची कमाल केली आहे त्यांचे मासले खालीं देतो ( १ ) तुझिया रूपाची अपारविंबें । नेशी आथिलीं परमशोभें । सलगी करती अत्यंत लोभें । हीं बालकें कव-णाचीं ? ॥ आदिपर्व १९–४४. ( २ ) " मत्स्यपित्तगोरोचन । धूपतैल सुगध-चूर्ण । केतकी कल्हार कुसुमसुमन । बहुपरिमळे आथिलीं " आदिपर्व २५–४७ ( ३ ) ' कन्या बहुत म्यां ऐकिल्या । त्यांमाजी लिधी नामाथिल्या । चित्रकें पटीं गोचर केल्या । वरी वाणिल्या परिक्षकीं " अ २५–९१ येथें नामा-थिल्या म्हणजे नामांकित, नामपूर्ण, प्रसिद्ध ( ४ ) गर्वाथिलें=गर्व पूर्ण केलें मुक्तेश्वर रामायणात बालकांडात खालील श्लोक पहा " संसारार्णवीं दुस्तरीं बहुयत्नू कामादिकीं मोहिलें । दंभोपाधिकनेमम।यिकसुखादाराधनें गोविलें । विद्यावादवितंड जालकलना सर्वांसि गर्वाथिलें । पद्मावल्लभपाद सुलभ जगीं निर्धारिता मानिलें ' ( ५ ) नामाथिला=निव्वळ नामधारी राहिला "विचारीं वसे सारनिःसार भेदू । वदे तर्क तो एकशास्त्री विवादू ॥ महामाजि नामाथिला एकमदू । निशे लागला एक दोषानुवादू " युद्धकांड श्लो ४५८ ( ६ ) समाथिला=शीतोष्णदुःखसुखाची पर्वा न करितां समत्वानें राहिला. " सीत-काळीं जळीं राहे सर्व साहे समाथिला । बिभीषणू सत्यसधू एकपादूतळीं उभा" उत्तरकांड श्लो ५० ( ७ ) कामाथिला=कामाकुल झाला " तपा आच-रतां भावें दशग्रीवें निरीक्षिली । धरी कामाथिला वेगीं देह त्यागी हुताशनीं " उत्तर० श्लो ७८ ( ८ ) भयाथिले=भीतिग्रस्त झालेले " वांचले पळती लाहीं दिशा दाही भयाथिले " श्लो १६ ( ९ ) गुणाथिले=गुणसपन्न " विश्रामले अत्यपूर्व हस सर्व गुणाथिले " श्लो १६५. १ न पडती ठायि गोपिपती—गोपीपती श्रीकृष्णाचा कोठेंही ठावठिकाणा लागत नाहीं.

कोण सखा सोयरा[1] तुम्हांविण सांगा मनमोहना ।
कृपावंत तुम्ही कृपा करुनियां पद दावा लोचनां ॥
चाल ॥ वर्णितां शिणल्या श्रुती ।
शेषाची न चले मती ।
तेथें मी पामर किती ॥
दीप ॥ विद्याभिमानी श्रवणीं ऐकुनी निगमाची निजगिरा[2] ।
शरणागत मी द्वारीं आलें[3] प्रभु त्रिभुवनसुंदरा ॥ सांवळ्या० ॥ ४

## पद ( १५१ )

येउ दे दया, दया देवदेवा ! शरण मी तुला वासुदेवा ! ॥ ध्रुवपद ॥
गुतलों माया, मायामोहपाशीं । जीव दुःखित बहु परदेशी ॥
कशी गत करूं, करूं हृषीकेशी । प्राण घाबरा कधीं येशी ॥
आज कीं उद्यां, उद्यां किंवा परवां । शरण मी० ॥ १
कमललोचना, लोचना कनकवसनां[4] ! कर्ममोचनां[5] गरुडवहना ! ॥
पतितपावना, पावना जी ! मनमोहना ! । कशी तुज न ये माझी करुणा ॥
दीन मी नेणें, नेणें भक्तिभावा । शरण मी० ॥ २
कुंदरद्युती[6], द्युती मंदहासा ! । दीनबांधवा श्रीनिवासा ! ॥
विश्वजीवना, जीवना काय ऐसा । किति मजविशीं धरशी आळसा॥
वर्णूं मी किति,किति कीर्ति केशवा ! । शरण मी० ॥ ३
पतित तारिले, तारिले बहु भारी । कीर्ति ऐकूनि आलों द्वारीं ॥
रमानायका !, नायका जी ! कंसारी । पतित एवढा भव भारी ॥
कीर्ति यशध्वजा, ध्वजा आजि उभवा । शरण मी० ॥ ४

---

१ सोयरा—या शब्दाची उत्पत्ति काय ? २ निजगिरा=अतिशयनिग्रहाची, आक्रोशाची वाणी निज याचा कवितेंत नितांत, अत्यंत असा अर्थ होतो ३ द्वारा आलें द्वारीं आलों असा पाठ कोठें म्हणण्यांत येतो, पण तो चुकीचा असावा छापील पाठ 'द्वारीं आलें' हाच शुद्ध दिसतो हाच पूर्वीच्या छापील प्रतींतील पाठ आहे, व 'दासी होऊनि बीद मिरविलें शेवटीं हें कां फळे' या ओळीशीं तो जुगतो

४ पीतांबर परिधान करणाऱ्या ५ 'अशेषकर्मबीजभजना' मुक्तेश्वर. ६ कुंदर=कुंधा नांवाचें गवत ( माधव चंद्रोबाचा संस्कृत-मराठी कोश ) कुंदर गवतासारखी ज्याची द्युति शोभा तो कुंदरद्युति

भक्ति वाहतों, वाहतों हरी ! तुजला । कदा वससी ना वा । उगला ॥
येसी धांवुनी, धांवुनी कसा प्याला । मीराबाईस्तव विष[1] प्याला ॥
माझी कां न ये, न ये सख्या ! कणवा[2] ॥ शरण मी० ॥ ५
चिरें[3] पुरवुनी पुरवुनी सत्य साची । लाज रक्षिली त्वां भगिनीची ॥
होसी माउली, माउली निजदासांची । चित्सागरा दयावीची[4] ॥

---

१ कसा प्याला । मिराबाईस्तव विषप्याला'—भक्तिविजयांत दिलें आहे कीं, मिराबाई ही उदेपूरच्या राण्याची मुलगी असून श्रीकृष्णरूपीं लीन झाल्यामुळें अविवाहित राहिली होती साधुसंतांशीं उघड भगवत्चर्चा नित्य केल्यामुळें लोकनिंदेला पात्र झालेल्या राण्यानें तिला विष प्यायला दिलं पण त्यानें तिला बाधा न होतां ईश्वराचा गळा मात्र निळा पडला । दुसरी गोष्ट अशीच आहे, पण त्यात ही जोधपूरच्या राजाची मुलगी असून उदेपूरची राणी होती सासूच्या रोषानें तिला वेगळें रहावें लागलें, आणि विषप्रयोगही झाला, पण बचावली हिचीं सर्व पदें ईशभक्तीपर असून फारच रसाळ व मधुर आहेत भजनसारस्वतांमध्यें इच्या पदाची पदवी फार उच्च लागते हिचीं ' झूलत राधासग । गिरिधर झूलत राधासग ' व ' भोलानाथ दिगंबर ये दुःख मेरो हरोरे ' हीं पदें महाराष्ट्रभर प्रसिद्ध आहेतच, पण याशिवाय इच्या पदांपैकीं दोन निवडक पदें देतों ह्यावरून इचीं कवित्वस्फूर्ति किती उच्च प्रकारची आहे हें ध्यानांत येईल.—

( १ )

माई मैनें गोविंद लीनो मोल ॥ ध्रु० ॥
कोइ कहे हलका कोइ कहे भारी । लियो है तराजू तोल ॥ १ ॥
कोइ कहे सस्ता कोइ कहे महंगा । कोइ कहे अनमोल ॥ २ ॥
ब्रिंदाबनके कुंजगलिनमों । लियो है बजाके ढोल ॥ ३ ॥
मिराके प्रभु गिरिधर नागर । पुरब जनमके बोल ॥ ४ ॥

( २ )

जो तुम तोडो पियां मै नहिं तोडूं । तोरी प्रीत तोडी कृष्ण कौन संग जोडूं ॥ध्रु०॥
तुम भये तरूवर मैं भयी पखिया । तुम भये सरोवर मै तेरी मच्छिया ॥ १ ॥
तुम भये गिरिवर मैं भई चारा । तुम भये चंदा हम भये चकोरा ॥ २ ॥
तुम भये मोती प्रभु हमे भये धागा । तुम भये सोना हम भये स्वागा ॥ ३ ॥
बाई मीराकहे प्रभु ब्रजके बासी । तुम मेरे ठाकोर मै तेरी दासी ॥ ४ ॥

२. कणवा = दया ३ वस्त्रें द्रौपदी भगिनीला पुरवलीं तीं ४ वीची = ऊर्मी, लाटा, दयेची लाट मजवर लोट आणि मजला गार कर " जळत हृदय माझे वर्ष कोट्यानुकोटी । मजवरी करुणेचा राघवा पूर लोटीं " रामदास,

लोटिं मजवरी, मजवरी दे निजविभवा ॥ शरण मी० ॥ ६
स्वामी सद्गुरू, सद्गुरू श्रीगोविंदा ! परमपुरुषा परमानंदा ! ॥
आविट अक्षया, अक्षया परमसुखदा । तोडीं हे मायिक अघआपदा ॥
होऊ नेदिं या, नेदिं या ज्ञानगर्वा[1] ॥ शरण मी० ॥ ७
प्रार्थितो अती, अती विनित[2] भावें । श्रवण देवोनि ऐकावें ॥
कृपासागरा ! सागरा त्वरित यावें । देवनाथासी अपंगावें[3] ॥
दीन आपुला, आपुला मला म्हणवा । शरण मी० ॥ ८

## पद ( १५२ )

माझी तुला काळजी । सांवळ्या येइ तूं गोपाळजी ॥ ध्रु० ॥
बहुत त्रासलों मी संसारीं । म्हणवुनि तुझिये द्वारीं ।
शरण आलों रे मी कंसारी । भवपुरिं मजला तारीं ।
माझें मानस तुझिया पदिं राजी ॥ माझी० ॥ १ ॥
मी तों अपराधाची खरी राशी । क्षमानिधी तूं होसी ।
बारे क्षमा करीं अन्यायासीं । धरीं मला हृदयासीं ।
ठेवी अखंडित पदसरोजीं ॥ माझी० ॥ २ ॥
नेणें भक्ती कांहीं ज्ञानकळा । अज्ञानाचा पुतळा ।
परि मम भाग्य आलें एक फळा । मी दास तुझा गोपाळा ।
जन्मुनियां जगीं म्हणवीलों जी ॥ माझी० ॥ ३ ॥
देवा ! दास तुझा मी म्हणवीलों । त्रिजगामाजि मिरविलों ।
भजनप्रेमा धरुनी मनिं आलों । नामामृतरस प्यालों ।
स्पर्शिल काय तनू हे काळ जी ॥ माझी० ॥ ४ ॥
आहे अपराधी, मी परि तुझा । अभिमान तुज माझा ।
गर्जे पायीं पावन ब्रीद ओजों[4] । गडिया केशवराजा ।
दावीं सत्य करुनी यानें आजी ॥ माझी० ॥ ५ ॥
मुखांबुजीं दंत नसतांना । करवीलें पयपाना ।

---

१ होऊ नेदिं या ज्ञानगर्वा–या माझ्या देहाला ज्ञानगर्वाचा विटाळ होऊं देऊ नको २ विनित = नम्र ३ अपगावें = जवळ करावें ४ तू (पतित) पावन हें ओजा तेजस्वी ब्रीद ( बिरूद, पण घुंगुरविणाऱ्या क्षुद्रकिंकिणी इ० ) पायीं गर्जे

आतां सदंत झालों असतांना । कसा न देसी अशना ।[1]
केलें ऐसें कठोण मन कां जी ॥ माझी० ॥ ६ ॥
धनांधांचीं द्वारें बहु फिरतां । वृत्ति उबगली आतां ॥
झाली ही तनु कीं व्याधिग्रस्ता । लोकरि करिं बा चिंता ।
येई वेगीं न लावीं लवपळजी ॥ माझी० ॥ ७ ॥
साधन काय तरी मी करुं जाणें । भक्तीयोगाहि नेणें ।
आतां कैसें माझें मज वाणें । सुफळ जेणें तेणें ।
दाता कोण देइल दान जी ॥ माझी० ॥ ८ ॥
एवढी निष्ठुरता कां धरली मनें । तू जननी मी तान्हें ।
पाहें निजास[2] कूर्मवत नयनें । जन्ममृत्युचें धरणें ।
उठवीं करीं सुखाचा सुकाळ जी ॥ माझी० ॥ ९ ॥
त्राता कोण मला जी तुजवीना । सांगें राजिवनयना ।
मायातीता ये हरि गुणगहना । गोपीमानस मोहना ।
नंदानंदन व्रजजनमनरंजी ॥ माझी० ॥ १० ॥
यमुनातीरविहारी सुखसदना । मधुसुरदैत्यकदना ।
अघबककेशी तृणासुरमर्दना । मदनदहनप्रिय वदना ।
दावीं[3] तोडीं या भवबंधा जी ॥ माझी० ॥ ११ ॥
आतां आटोपीं दुस्तर माया । विनवीं पंढरिराया ।
धांवें वेगीं करुणा ऐकुनियां । दिसोंदीस ही काया ।
झिजते न्यावयासी यम टपला जी ॥ माझी० ॥ १२ ॥
पहासी कौतुक अजुनी काय किती । घाबरी झाली वृत्ती ।
म्हणवुनि येतों बा तुज काकुळती । लज्जा तुझिये हातीं ।
विश्वोद्धारका मुरलीधर जी ॥ माझी० ॥ १३ ॥
पतित थोरला मी त्रिभुवनीं । मजसम नाहीं कोणी ।
पावन बांधियले ब्रिद ज्या चरणीं । तें मी पाहिन नयनीं ।

---

१ कंटाळली, कष्टली, त्रासली 'उबगलें मी सासऱ्या आतां मज माहेरासि न्याहो' २ निज आपलें लेंकरूं पिलूं त्यास कासवी आपल्या पिलाला स्तनपान देत नाहीं त्याच्याकडे फक्त सप्रेम दृष्टीनें पहाते तेवढ्यानें त्या पिलाचें रक्षण होतें अशी कल्पना आहे ३ वदना दावीं = आपलें तोंड दाखव; आपलें दर्शन दे

बळकट धरीन या हृत्सरोजीं ॥ माझी० ॥ १४ ॥
जननी तात तूं बंधु सोयरा । मजलागीं दातारा ।
घेईं पल्लवीं[1] न करीं अव्हेरा । निजाच्िया माहेरा[2] ।
गोकुळनाथा हे पशुपालाजी ॥ माझी० ॥ १५ ॥
होतें जिविंचें माझें गुज जें कां । हे दीनोद्धारका ।
पायीं निवेदिलें सुखदायका । बारे यदुकुलतिलका ।
आतां तुजला जें करणें तें करजी ॥ माझी० ॥ १६ ॥
भीमातटवासा गुरुगोविंदा । देवनाथप्रभु वरदा ।
आतां किमपी न करी वायदा[3] । त्वरें ब्रह्मानंदा ।
धांउनि ये भेटें चौबाहीं[4] जी ॥ माझी० ॥ १७ ॥

पद ( १५३ )

मी बाळ तुझें लडिवाळ अरे कनवाळा ।
घे धांव त्वरित आनंदयशोदाबाळा ॥ ध्रु० ॥
त्रैताप गांजिती फार मला संसारीं ।
भवपुरीं बुडतां पाहें अगे कंसारी ।
रिपु कामक्रोध सर्प गरळविष भारी ।
तुजवीण अशा संकटीं कवण मज तारी ।
नको लाऊं उशिर रुक्मिणीरमण गोपाळा ॥ घे धांव० ॥ १
बहु कीर्ति तुझी पूर्वापर पडली कानीं ।
पातकी फार बहु त्वां उद्धारिले प्राणी ।
जसि राघवें गणिका वाहुनि नेलि विमानीं ।
द्विजअजामीळ नारायणीं रतली वाणी ।
तोडिले पाश तयाचे त्रिभुवनपाळा ॥ घे धांव० ॥ २
द्रौपदी दुष्ट गांजिताति कौरव जेव्हां ।

---

१ पदरीं २ ज्यांना निज (आपले, माझे) असें म्हटलें त्याच्या माहेरघरा ३. वायदा करणें = अमुक काम पुढें कांहीं दिवसांनीं अमुक वेळीं हटकून करीन असा करार करणें आज काम तर करावयाचें नाहीं, आणि तोंडावर तर नाहीं म्हणत नाहीं म्हणजे मनुष्य भविष्यकाळाच्या आणाभाका देतो, तशीं तुझीं कोरडीं वचनें नकोत, खरोखर लवकर माझें इष्टकार्य कर. ४ पद ११५ची शेवटली टीप पहा.

ते वेळीं तसा यदुरंगा केला धांवा ।
मी दीन बहिण धाकुटी, माझिया भावा[1] ।
निर्मोचन करि दुःशासन पडला हांवा[2] ।
सांवळें रूप दाखवा माझिये डोळां ॥ घे धांव० ॥ ३
लगबग खगमनवायू टाकुनि मागें ।
येउनी उभा पांचाळी पृष्ठीभागें ।
देवोनि अभयवर कर्णीं निजगुज सांगे ।
होईल भस्म सहकुळीं दुःशासन हा गे ।
तसें पाव मला श्रीरंगा गोकुळपाला ॥ घे धांव० ॥ ४
जळीं नक्रगजेंद्रा नेलें वैकुंठासी ।
मी दीन तूं माझा परि कां रे नुद्धरिसी ।
सुखीं नास असतांची पडलों यमपाशीं ।
भोगितों कष्ट तरि विरुदावळि कां ऐसी[3] ।
हा देवनाथ करि विनती भवभय टाळा ॥ घे धांव० ॥ ५

## पद ( १५४ ).

भवभय वारीं हरी दयाघना ॥ ध्रु० ॥
वमनासम गजगमनीं लोचनीं दिसते ऐसें करीं ।
विश्वरूपी तूं व्यापक ऐशा उठवीं बऱ्या लहरी ॥
त्वद्ध्यानीं मन्मानस समरस निजसुख पूर्ण वरी ।
देवनाथप्रभु नाथनिरंजन भजवज सर्व हरी ॥ भव० ॥

## पद ( १५५ ).

चक्रपाणी काय मनीं सांग माधवा ।
उशिर काय म्हणुनि झाला येशी केधवां ॥ ध्रु० ॥
पतितपावन दीनानाथ दीनबांधवा ।
पतित थोर काय म्हणुनि भिसी येधवां ॥ १

---

१ द्रौपदीच्या वस्त्राची उपमा नाथ आपल्या भावाला ( भक्तीला ) देतात. हीच मुक्तेश्वराची उपमा पहा "माझा भाव आणि भक्ति । तोचि जमदग्निरेणुकासतीं । कुशब्द शस्त्रीं कौरवदैत्यीं । सन्नासिली अवनिये "सभापर्व १५-१४२
२ हांवा पडला = हांवे भरला = हांवभरी पडला = अत्युत्कंठिल झाला ३ मग पहिला लौकिक असा कसा ?

कुंतलासी रक्षणासी भक्तसाधवा।
प्राण माझा जाइल काय येशी तधवा॥ २
देवनाथ दीन, तारीं मन करुनि बोध वा।
मार तरी, एक तरी, दयासिंधवा॥ ३

पद (१५६)

कृष्ण कृपालय पालय माम्॥ ध्रु०॥
मुररिपुसहर! दीनजनोद्धर! नित्य निरंतर रक्षिसि राम॥ १
दासी तुझी विश्वची तुझ्या पदीं तारक तू मजलागीं राम॥ २
देवनाथप्रभू गुरुगोविंदा! सांवळिया गोपाळा राम॥ ३

पद (१५७).

कमलनयन हरी गा तुम्ही गा रे॥ ध्रु०॥
उमजुनि निजगुज भजनीं सादर व्हा न पुढें तरी हा सिमगा रे॥ १
द्वंद्वरहित निर्द्वंद्व मुकुंदीं मान सनापाखालि पगारे (?)॥ २
करधृतकंजी मुनिमनरंजन घ्या दृगंजनरूपीं रंगा रे॥ ३
देवनाथप्रभुनाथ! दयानिधे होइल निजसुख तें भोगा रे॥ ४

पद (१५८)

भक्तोत्सला विभु जनार्दनदेवदेवा।
विश्वालया अखिल चित्स्वरुपा सुदेवा॥
क्षीराब्धिवासि! जगत्पालक! चाल ये रे।
दीनोद्धरा! हरि! कशी करुणा न ये रे॥ १
हे पावना त्रिभुवनाधिपते मुरारी।
धांव त्वरें परमसंकट हें निवारीं॥
मी घाबरा बहुत कांपतसें भयें रे।
दीनोद्धरा! हरि कशी करुणा न ये रे॥ २
गोपीपते! अघनगोद्धर! गोकुलेशा!।
गोरक्षणा! हरि! गदाधर! श्रीपरेशा!॥
मारूनि नक्र गज रक्षियला स्वयें रे।

---

१ अघ म्हणजे पाप याचा नग=पर्वत त्या पापपर्वतापासून पतिताचा उद्धार करणारा दुसरा अर्थ—अघासुराचा उद्धार करणारा आणि नग=गोवर्धन पर्वत करगळी वरतीं उचलून धरणारा म्हणून अघनगोद्धर.

दीनोद्धरा हरि कशि करुणा न ये रे ॥ ३
गोविंदमाधवमुकुंद ! जगन्निवासा ! ।
मायातिता ! मदनमोहन ! माविलासा ! ॥
पाहें त्वरें मजकडे सदया दयें रे ।
दीनोद्धरा हरि कशी करुणा न ये रे । ४
मी बूडतों भवनदीं न दुजा उतारी[1] ।
तू सांग बा तुजविना मज कोण तारी ॥
आतां विलंब जरि तूं करिशील बा रे ।
दीनोद्धरा ! हरि कशी करुणा न ये रे ॥ ५
विश्वात्मया ! विबुधबंधहरा ! दयाळा ।
त्वां तारिले पतित थोर महाकृपाळा ॥
वेश्याअजामिळ हि तीं गणितां नये रे ।
दीनोद्धरा ! हरि कशी करुणा न ये रे ॥ ६
भीमातिरीं वससि पूर्णदिगंबरा ! रे ।
श्रीविठ्ठला ! जगदिशा ! नगजोद्धरा[2] ! रे ।
त्वन्नाम ये स्मरणिं पाप पळे भयें रे ॥
दीनोद्धरा ! हरि कशी करुणा न ये रे ॥ ७
मी जाहलों बहुत दुःखि मनांत भारी ।
त्वन्नामकीर्तिनिं ह्मणूनि धरीं उभारी[3] ॥
पाव त्वरें करुनि रक्षिं मला स्वयें रे ।
दीनोद्धरा ! हरि कशी करुणा न ये रे ॥ ८

---

१ उतारी हें ईकारान्त पुल्लिंगी नाम याचा येथें अर्थ कर्णधार–नावाडी मोल्स्वर्थच्या कोशांत A passenger on board a vessel; one alighting on a journey; a sojourner; a ferryman मोल्स्वर्थच्या वेळेपर्यंत उतारी याचा नावाडी हा अर्थ फक्त कवितेंतच येत होता असें यावरून स्पष्ट दिसतें. २ नगज (पुल्लिंगी) म्हणजे हत्ती जो गजेंद्र याचा उद्धार करणारा. नगज (विशेषण) म्हणजे पर्वतावर झालेला नगजा (स्त्रीलिंगी) = औषधोपयोगी पदार्थ विशेष, लघुपाषाणभेद असे अर्थ माधव चंद्रोबांच्या कोशांत दिलेले आहेत ३ उभारी=उत्साह, हिंमत, जोर, असा अनुमेय अर्थ मोल्स्वर्थमध्यें उभारा, उभारणी, उभार असे शब्द सांपडतात, पण उभारी शब्द सांपडत नाहीं.

आतां न सांड[1] करिं मौंझि अनाथनाथा !
संरक्षिं ये गुरुवरा ! आजि देवनाथा ॥
मी दीनदास मज तारिं प्रभू दये रे ।
दीनोद्धरा ! हरि कशी करुणा न ये रे ॥ ९

## पद ( १५९ )

सख्या कठिण काय म्हणुनि तुवां केलें हृदय रे ॥ ध्रु० ॥
गुणगण या गाती श्रुती । योगीजन हृदयीं ध्याती ।
पावन ब्रीद गर्जताति । असुनी सदय रे ॥ १ ॥
करुणाघन म्हणवितोसी । करुणा कां नाहीं कशी ।
निष्ठुर कां मजविशीं । होशी अदय रे ॥ २ ॥
विरहबाण करि उठाण[2] । पाहातसे जाऊं प्राण ।
धांव धांव धांव विनति मान । तारीं दयेरे ॥ ३ ॥
देवनाथप्रभू कृपाळ । दीनाचा लडिवाळ ।
पाळ, टाळ सर्वकाळ । करीं येऊं दे रे ॥ ४ ॥

## पद ( १६० ).

कां जी हें जग व्याल । तरी मग कां जी हें जग व्याल ॥ ध्रु० ॥
दोष करूं अम्हीं धर्मचि असुचा[3] । तारावया तुम्ही भ्याल ॥ १ ॥
नामामृतरसपान कराया । जरि न उसंगीं[4] घ्याल ॥ २ ॥
लावोनी कासेसी होवानी सांगडी । भवपुरीं पार न न्याल ॥ ३ ॥
देवनाथप्रभू आटोपुनि मन । स्वरूपीं थार न याल ॥ ४ ॥

## पद ( १६१ ).

तू करुणाब्धि म्हणविसि तरि कां नाइकसी करुणा ।
अनाथ मी शरणागत द्वारीं आला करुणाघना ॥ ध्रु० ॥
भवनदिचा पुर भरला जातो उसळति लाटा अती ।
दीन दयाळा ये कनवाळा घाबरली मम मती ।

---

१ सांड=हेळसाड, उपेक्षा २ ' मदनबाण करि उठाण ' यावरलि उठाण शब्दाबद्दलची ८२ पदाखालची टीप पहा ३ " दोष हे आचरावे हेंचि आम्हां उचित । तव पदीं ब्रीद गर्जे तारावे पतित" दयाळनाथ. ४. उत्संगा, ओसंगा, कडेवर.

विश्वजीवना राजिवनयना ये बा गोकुळपती ।
केव्हांचा मी आळवितों कां दया नये हृद्‌गतीं ।
छंद ॥ जय क्षीराब्धिवासा हरी ।
ये भवसंकट सहरीं ।
वाहतसें करुणास्वरीं ।
श्रवण करुनि उठि घालीं विलंब न करीं नारायणा ।
खगवहनीं बैसुनियां यावें मुनिमानसमोहना ॥ १
गोपावल्लभ गोवर्धनधर मिळउनि गोवळ गडी ।
नाना परिच्या लीला करितो खेळत यमुन थडी ।
वृंदापति वृंदावनवासा येइ करुनि तांतडी ।
मुरलिवादना मधुसुदना तूं भवनदिचा सांगडी ।
छंद ॥ ये नेई मला परतिरा ।
विश्वात्म्या जगदोद्धारा ।
मदनारिमित्र श्रविरा ।
कलुषांतकं[1] हरि कमनियगात्रा,[2] कठिणकर्म मोचना[3] ।
काय म्हणुनि ममविशीं हृदय. मृदु असतां, गोरक्षणा[4] ॥ २
दुःशासन ओढितां वसन त्या सभासदां देखतां ।
घाबरली द्रौपदी सती तुज बाहतांचि अच्युता ।
धांवलासि मनपवनाहुनि अति वेगें देवकिसुता ।
वस्त्रें पुरउनि भगिनीची तैं होसि लाज रक्षिता ।
छंद ॥ तूं कृपाळु तुजसम दुजा ।
नाहिं त्रिभुवनीं अधोक्षजा ।
भक्तोत्सल गरुडध्वजा ।
पीतांबर परिधान चतुर्भुज केली गजगामिना ।
द्रोण भीष्म विदुरादिक पाहती अपमानिमि दुर्जना ॥ ३
नक्रें देउनि मिठी ओढितां पशु गज आळवि तुला ।

---

१. पापनाशन । २ सुंदर अवयव ज्याचे असा ३ सडतर पूर्वकर्माच्या पाशांतून तारणाऱ्या ४ गोरक्षणा ( गोपगाई वगैरेचें रक्षण ) करिलां तुझें हृदय मृदु असतां मजविशीं कठीण ? मी पंकीं रुतलेली गाय असेंच समज आणि मला तार

घालुनियां उडी चक्र फेंकुनी दुष्ट नक्र मर्दिला।
शुका पढवितां उद्धरिली त्वां वेश्या गणिका तिला।
पुत्रमिषें घे नाम अजामिळ वदनीं तो तारिला।
छंद ॥ तू पतीतपावन असें।
श्रुति गर्जताति सरसें।
मजविशीं कठिण मन कसें।
देवनाथप्रभु सांग दयाळा भवोदधीतारणा।
क्षमा करीं अन्याय माय तूं विनती आणीं मना ॥ ४

## पद (१६२)

दीन दयानिधि कारे। मज सांग उपेक्षिसी ॥ धृ० ॥
तारियलें बहु मागें पतितां, पावन नाथ मुरारे ॥ १
निजवृत्तीं निगमादि नारद वाजावि नामनगारे ॥ २
घेत अजामिळ नाम सुतान्वयें हरिलें दुष्कृत सारें ॥ ३
उपमन्यू शिशु मागतांचि पय दिधला क्षीरसिंधू रे ॥ ४
तो ध्रुवबाळक अक्षयपदिं त्वां नेउनि बैसवीलारे ॥ ५
मी मतिमंद पतित परी तव दास रमारमणारे ॥ ६
घेउनि पल्लवीं लोटिसी कां दुरी बाप दिनोद्धारणारे ॥ ७
देवनाथप्रभु गोविंदा निजरूप दावीं नयनांरे ॥ ८

## पद (१६३).

॥ जय जय हरिनारायण ॥ धृ० ॥
राधावर जगदीश्वर। मनमोहन करुणाकर।
भज भज भावें रे मन। जय जय हरि नारायण ॥ १
भक्ति प्रेम सुधाकर। ध्यावा निशिदिनिं प्रियकर।
नामामृत करी प्राशन। जय जय० ॥ २
सुरवर मुनिवर गाती। अखंड हृदयीं ध्याती।
यदुकुलवंशाविवर्धन। जय जय० ॥ ३
यमुनातीर विहारी। स्मरतां भवभय हारी।
दीनोद्धर जगजीवन। जय जय० ॥ ४

---

१ हाच शब्द ३६३ पदांत आला आहे तेथील टीप पहा. २. सुतमिषें, पद वरील टीपांत वामनपंडिताचा उतारा पहा ३ पद ११७ ची टीप पहा.

मारी दुर्जन समरीं । दीनजन भवजळीं तारी ।
जो हरी नंदनंदन । जय जय० ॥ ५
गोपीवर पीतरजी । शोभत गोपसमाजीं ।
करधृत मुरली वादन । जय जय० ॥ ६
नवजल द्यल सारं ( ? ) । नवनीत गोरस चोरं ।
कमलदलायत लोचन । जय जय० ॥ ७
करधृत नग अंगुली । व्रजपति श्रीवनमाळी ।
वासव गर्व विमोचन । जय जय० ॥ ८
वत्सें नेतां विधिनें । सर्व हि नटला विधिनें[1] ।
व्यापक अद्वय चिद्घन । जय जय० ॥ ९
अभिमानातें गळला । शरणांगत विधि आला ।
भावें करि पदवंदन । जय जय० ॥ १०
स्मरतां नाम जयाचें । दे पद सायुज्याचें ।
तारक ब्रह्म सनातन । जय जय० ॥ ११
मही दे बळी जइं दानीं । लहानसी मूर्ति निदानीं ।
त्रिपदीं आटवी त्रिभुवन । जय जय० ॥ १२
पद देउनि शिरताळीं । घाली बळी पाताळीं ।
गोविंदाच्युत वामन । जय जय० ॥ १३
स्मरतां प्रल्हादांनी । धांवे स्वामी निदानीं ।
हिरण्यकश्यपुमर्दन । जय जय० ॥ १४
स्मरतां अजामीळा । निवटी पातक मेळा ।
काळातें करी कदन । जय जय० ॥ १५
उपमन्यें दीनबंधु । स्मरतां दे क्षीरसिंधु ।
श्रीमाधव मधुसूदन । जय जय० ॥ १६
ध्रुवबाळें हृदिं स्मरतां । धांउनि ये जो निरुता ।
अढळपदीं करी स्थापन । जय जय० ॥ १७

---

१. विधिनें = जसें पहिलें होतें तसें, यथाविधि, यथापूर्वपद्धति २ शिराच्या टाळीं माथ्यावर. ३. अखेरच्या संकटीं. ४. खरोखरीच यथार्थपणें सत्यत्वें-करून.

नामसुधेची कणिका । भक्षित जारिणी गणिका ।
तारियेली तत्क्षणिका । जय जय० ॥ १८
गज धरिता अधमानें । हांकारी प्रेमानें ।
म्हणे धांवें करुणाघन । जय जय० ॥ १९
हरियेलें गजकष्टां । मर्दुनियां पापिष्टा ।
फेंकुनि चक्र सुदर्शन । जय जय० ॥ २०
सद्भावें अजा या । स्मरतां पांडवजाया ।
छळितां कीं दुर्योधन । जय जय० ॥ २१
बळहत झाले पांडव । करिती दुर्जन तांडव ।
कोणी करीना भाषण । जय जय० ॥ २२
घावरी पाहे सती ते । भीष्मादिक असती ते ।
राहती मौनें विलक्षण । जय जय० ॥ २३
चाले सती त्या उपक्रम । जाले काय पराक्रम ।
गांजिति मातें दुर्जन । जय जय० ॥ २४
आसुडतां वसनातें । कोणी बोलति ना तें ।
तेव्हां करी विभुचिंतन । जय जय० ॥ २५
मुनिमानससंहरणा । ये ये रुक्मिणीहरणा ।
करिं हे विघ्ननिवारण । जय जय० ॥ २६
गांजिति दुर्जन मजला । कां करुणा न ये तुजला ।
हे कालियमुरमर्दन । जय जय० ॥ २७
ये ये लवकरी नाथा । तारीं दीनानाथा ।
हे माधवमुरमर्दन । जय जय० ॥ २८
हे कृष्णा गोपाळा । ये ये निजजनपाळा ।
यादव कुलमणि भूषण । जय जय० ॥ २९
मदनारी मनप्रियतम । मलकंदन पुरुषोत्तम ।
ये सत्वर संकर्षण । जय जय० ॥ ३०
भावें करि सती नमना । ये ये हरि भवदमना ।
विश्वंभर जगपालन । जय जय० ॥ ३१

---

१ नकानें. २ मौन्यरूप, स्तब्ध ३ हसडतां, फेडितां ४. ईश्वरस्मरण ५ मलनिवारक

नायकसी वचनातें । करुणा न ये मनातें ।
पाहसि कौतुक अर्जुनीं । जय जय० ॥ ३२
उदास ह्या दशदिशा । येरेये जगदीशा ।
राहसि कोठें गुंतुन । जय जय० ॥ ३३
रुक्मिणिसुखशेजेला । असती काय निजेला ।
उठ ये पक्षीवाहन । जय जय० ॥ ३४
हारविलें धन धर्में । वेष्टुनियां अधर्में ।
उगाचि बैसे अर्जुन । जय जय० ॥ ३५
न चले बळ भीमाचें । आज्ञेनें धर्माचें ।
कर्माची गति गहन । जय जय० ॥ ३६
ये ये गोकुळवासा । योगी हृदयनिवासा ।
व्याकुळ झालें हें मन । जय जय० ॥ ३७
नेणुनियां अकर्मा । खेळाति या द्यूतकर्मा[1] ।
वर्जितां ते सज्जन । जय जय० ॥ ३८
पांडव व्यसनीं पडले । दुर्जन अतिशय भिडले ।
हरतिल लज्जा विष्णो । जय जय० ॥ ३९
ये ये कमळाकांता । पावें ग्रा आकांता ।
आक्रोशें करि रुदन । जय जय० ॥ ४०
रुक्मिणी करिंच्या विडिया । खासि कितीं तरी गाडिया ।
सांगाडिया भवतारण । जय जय० ॥ ४१
करुणारव परिसोनि । गरुडारूढ बैसोनि ।
ये ये लवकरी झडकण । जय जय० ॥ ४२
कुब्जागृहीं हरी असती । कीं वैकुंठीं वसती ।
ये ये न लावीं पळ क्षण । जय जय० ॥ ४३
ये ये गे कान्हाई । कृष्णे माझे आई ।
पाहति वाट सुलोचन । जय जय० ॥ ४४
पाहसि अंत कितीं तरी । करुणा कां नये अंतरीं ।
धरलें कां निर्दयपण । जय जय० ॥ ४५

---

1. शकुनीनें कपटफांसे खेळावयाला घेतले होते हें दुष्कर्म न जाणतां.

ऐसी वाहतां करुणा । आली हरीतें करुणा ।
मन पवनाहुनि आगमन । जय जय० ॥ ४६
टाकुनि गरुडामार्गे । येउनि द्रौपदीमागें ।
दे सतीतें आश्वासन । जय जय० ॥ ४७
चिंता न धरीं मनिं ते । बोलत हरी भगिनीतें ।
देउनि तीस दर्शन । जय जय० ॥ ४८
सद्गद होउनि चित्ता । पाहे जो अवचिता ।
दृष्टीं देखे चिद्घन । जय जय० ॥ ४९
वंदुनियां चरणांतें । सती वदली वचनातें ।
नयनीं भरलें जीवन । जय जय० ॥ ५०
करुनी उभी निज सदरा[1] । धरिलें दुर्जनें पदरा ।
निष्ठुर कां केलें मन । जय जय० ॥ ५१
इकडे दुर्जन शकुनि । दुर्योधन हटकोनि[2] ।
उठवीला दुःशासन । जय जय० ॥ ५२
येउनि सन्निध नष्टें । वोढिली निरी पापिष्टें ।
क्रोधें घूर्णित[3] लोचन । जय जय० ॥ ५३
पहिल्या ओढिल्या अंबरीं । दुसरें देखे त्यावरी ।
सहाकारी जगजीवन । जय जय० ॥ ५४
चाउनि ओष्ठा दशनें । वसनामागें वसनें ।
आला ओढितया शीण । जय जय० ॥ ५५
दुःशासन अवधानी[4] । पातांबर परिधानी ।
शेवटचें हें कारण । जय जय० ॥ ५६
ऐसी देखुनि रचना । वदिलें भीष्में वचना ।
मांडियलें कुलबुडवण । जय जय० ॥ ५७
विदुर म्हणे त्या निरुतां[5] । फिर फिर दुष्टा परता ।
लाविसि कर तनुदाहन । जय जय० ॥ ५८

---

१ सभेमध्यें. २ हाक मारून ३ झोंपेनें गुंगलेला, लोळलेला, भ्रमलेला. ४ पाहे, लक्षी. ५. निश्चयात्मक, ठांसून, जोरानें, सात्रीनें हा शब्द नेहमीं कवितेंतच येतो.

विकर्ण म्हणे ये राया । कुळ–दहनासि कराया ।
द्रौपदी पूर्ण हुताशन । जय जय० ॥ ५९
गळला दर्प नृपाचा । सोडविलें प्रिय वाचा ।
जय जयकारें गर्जन । जय जय० ॥ ६०
अपमानूनि अभक्ता । भेटतसे निजभक्तां ।
केलें निज संरक्षण । जय जय० ॥ ६१
ऐसी दाउनि करणी । द्रौपदी वस्त्राहरणीं ।
द्वारावती ये परतुन । जय जय० ॥ ६२
तो हरी विश्वीं भरला । भरोनि अक्षयीं उरला ।
घालुनि पाहे अंजन । जय जय० ॥ ६३
भक्तीं हृदयीं धरिला । सद्भावेंसी वरिला ।
पुंडरिकातें आधन । जय जय० ॥ ६४
दृढ भा.. .. . । मातु पित्यांत त्यजुनी ॥
प्रेमें हरीतें बंधन । जय जय० ॥ ६५
सावधपणीं एकारे । पुंडलीक–उपकारें ।
सर्वही भरलें त्रिभुवन । जय जय० ॥ ६६
समपदीं विठ्ठल साचा । विटेवरी स्वामी निजांचा[1] ।
भक्तांस्तव आरोहण । जय जय० ॥ ६७
आत्मानाम विचाया । शरणागत त्या आर्या ।
जाउनि साधा निजधन । जय जय० ॥ ६८
हे तनु येइना मागुति । व्यर्थचि माया गुंतीं ।
फांसा पडले हे जन । जय जय० ॥ ६९
कोण मी हें समजेना । हित कांहीं उमजेना ।
पडली कैसी भुलवण[2] । जय जय० ॥ ७०
शरणागत गुरुराया । जावें स्वहित कराया ।
सद्भाव करा पूजन । जय जय० ॥ ७१
विवेक सारा सारीं । करणी त्यागी विचारीं ।
करीं गुरुपदीं मन अर्पण । जय जय० ॥ ७२

१ निजदासांचा, ज्यांना एकदां आपलें म्हणविलें त्यांचा २ भूल, ठक

माया मृगजळवत रे । व्यर्थांचि आभासत रे ।
नाहीं जीस खरेपण । जय जय० ॥ ७३
कितितरी हें सांगावें । जाणुनियां उमजावें ।
ऐसें करिं तूं अर्चन । जय जय० ॥ ७४
भावें गुरुपदीं लोळें । मग करुणा कल्होळें ।
करितां बीजारोपण । जय जय० ॥ ७५
मग अंकुर बीजातें । फुटतां वाढी पिकातें ।
साठवीं शूर्हीं ते कण । जय जय० ॥ ७६
सच्चित् घन चिद्रस । मन करिं त्यांताचि समरस ।
हेंचि समाधीसाधन । जय जय० ॥ ७७
ऐसें जें सभराभर । ते तू विश्वंभर ।
एकत्वें अवलोकन । जय जय० ॥ ७८
गुरुनाथा गोविंदा । भेद नसे गोविंदा ।
व्यापक नाथ निरंजन । जय जय० ॥ ७९
देवनाथ पदपद्मीं । वर्ततसे सुखसद्मीं ।
प्रेमें करी हरिकीर्तन । जय जय० ॥ ८०

## पद ( १६४ ).

मालवी सहज भवाला । भज मनमोहन मुरलीवाला ॥
गो गोपीजन पालय अक्षयें । निजजनलालनशीला ॥ ध्रुवपद ॥
मंदहास्य अरविंदसुलोचन । शामरंगतनुवाला ॥
नामामृतरस देउनि अघभय । नुरवि दरिद्र अशाला ॥ १
कंजीकरधृत कजजपाणी । कमला सेवि पदाला ॥
कमलनयन हा कमलनाभहरि । भजतां हरि आपदांला ॥ २
वृंदापति वनवृंदीं विहरत । गोपवृंदिं करि लीला ॥

---

१. सर्वांठायीं, सबाह्याभ्यतर २ वृंदा ही जालदर नामक राक्षसाची पतिव्रता स्त्री होती हिचें पातिव्रत्य विष्णूनें जालदराचें रूप घेऊन हरण केलें. हिच्या या पापामुळें जालदर मेला व ही सती गेली. तेव्हां विष्णूस तिचा विरह सहन होईना व तो तिच्या स्मशानात जाऊन बसला. पुढें वृंदेची तुळस झाली व ती श्रीविष्णूची पत्नी म्हणून तुळशीचें श्रीविष्णूशीं लग्न लावण्याचा प्रघात अजून चालू आहे.

भक्तोत्सल भयनाशन तो भजे । भागा गोपसुलीला ॥ ३
तनमनधन करि शरणागत हो । अर्पण गोविंदाला ॥
देवनाथप्रभु तारिल तुज मग । धरितां हृदयिं पदाला ॥ ४

## पद (१६५)

हरिभजनाचा धराया रंग ॥ ध्रु० ॥
नामामृतरस सेवुनि सादर मारा दुष्ट अनंग ॥ १ ॥
आत्महितास्तव भावें धरिं बा संताचा निजसंग ॥ २ ॥
तोडुनि आशापाश विवेकें व्हावें गे निःसंग ॥ ३ ॥
देवनाथप्रभु नाथकृपें मग भोगा सौख्य अभंग ॥ ४ ॥

## पद (१६६).

हरी सांग तुज नयेचि कायबा दया ॥ ध्रु० ॥
मदनदहनप्राणमित्र सूत्रधारिया ।
कुंदरदन मंदहास्य नंदतान्हया ॥
विरहानळ जाळित सकळ विकळ सांवळया ।
वांछी पादरेणू झाला उशिर यावया ॥ हरी० ॥ १
लवपळ क्षण मोजितसे हरु म्हणावया ।
टपत बसला उशासि काळ खावया ॥ हरी० ॥ २
दीनबंधु गुरुगोविंद ! स्वत्पदालया ।
दाविं विनावि देवनाथ प्रभु कृपालया ॥ हरी० ॥ ३

## पद (१६७)

तरि मग तुज काय न्यून । हरि लागें ध्यायीं ॥ ध्रु० ॥
मागतांचि पय, क्षीरसिंधु देत असे द्विज शिशुलागिं पाहीं । तरि मग० ॥ १
पावन हें ब्रीद विभो पतितोद्धारण ऐसें वेदश्रुति गाहीं । तरि मग० ॥ २
भावबळें शरण रिघुनि आप्त करीं ईशा भजन करुनि कांहीं । तरि मग० ॥ ३
जगचि सकल चित्स्वरूप पाहुनियां नयनीं स्वस्थपण राही । तरि मग० ॥ ४
चित्सिंधू पूर्णपणें भरला हा सारा जाण बुद्धि देई । तरि मग० ॥ ५

---

१ असंडित. २ उपमन्यूची गोष्ट मागें आली आहे ती पहावी. ३. साक्ष.

गुरुवरकर वरद शिरीं प्राप्त होत जेव्हां लक्ष धरी पायीं ॥ तरि मग० ॥ ६
देवनाथ नाथ सकळ समजुनि निजगुज रे नाम सुखीं गाई। तरि मग०॥७

पद ( १६८ ).

हरिगुणीं लागला वेध रे बा ॥ धृ० ॥
न सुचे मज कांहीं जीव माझा भागला । हरि० ॥ १
काय करूं कोण मज दाखवील पावला । हरि० ॥ २
देवनाथप्रभुनाथ विरहें कंठ दाटला । हरि० ॥ ३

पद ( १६९ )

कां रे हरिभजनावीण काळ । व्यर्थ कसा घालविसी ॥ ध्रु० ॥
कन्यासुतदारधनीं । इच्छा हे पूर्णमनीं ॥
मोहें तूं भ्रमिं भ्रमुनी । आत्मा म्हणुनि पोलविशी ॥ १
विद्यादी राजमान । भुलासि धरुनि साभिमान ॥
ज्ञानरहित पशुसमान । तोंड उगें हालविशी ॥ २
देवनाथ वदत मात । होत यांत आत्मघात ॥
हृदयिं असुनि चित्स्वरूप । ज्ञानदीप मालविशी ॥ ३

पद ( १७० ).

सदय बहुत मृदु हृदय हरीचें ॥ ध्रु० ॥
बाहतां जैसें बालक जननी । धांवत लगबग त्याच परीचें ॥ १
स्मरतां वत्सें गौरिवं धांवतु । निश्चयवाक्य श्रुतिवैखरिचें ॥ २
देवनाथप्रभु स्मरतां भावें । तारिल जळ या भवसागरिंचें ॥ ३

पद ( १७१ ).

कां न मुखीं हरिनाम वदा रे ॥ ध्रु० ॥
नश्वर सुख मनिं मानुनि भुललाउमजा करि यम बहु अपदा रे॥ १
मी माझें धनकण हे अवघे मत्कन्यासुत मोही तदा रे ॥ २

---

१. हें अत्यत गुह्य गुज निज याचा कवितेंत नितांत, अत्यंत असा अर्थ होतो. २ हातानें बोलावतासे, बाहतोस असा कोशात अर्थ सांपडतो. येथें अर्थाची संगति कशी काय ? ३ गाय जशी वांसराकडे जाते त्याप्रमाणें. ४. वेदवाणीचें.

क्षणभर मन स्थिर किमपी न राहे करितां व्यवहार गृहधंदा रे ॥ ३
देवनाथप्रभु व्यापक गोविंद[1] कां न स्मरा गुरुच्याच पदां रे ॥ ४

पद ( १७२ )

हरि वांचुनि काय जिणें । सख्यारे हरि वांचुनि काय जिणें ॥ धृ० ॥
धनदार सुतादिक फार आशा मनीं मोह कशा धरणें ॥ १
जाण असार हा सार नव्हे संसार वृथा मरणें ॥ २
देवनाथप्रभु नाथदयाल भजे न, तरी खलकाल नुठे धरणें ॥ ३

---

## करुणाषोडशी अभंग.

पद ( १७३ ).

काय तें सामर्थ्य न चले या प्रसंगा । काय झालें अंग शक्तीहीन ॥ १
माझिया प्रारब्धें काय हारविलें । तुम्हाहोनीं झालें बलिष्ट हें ॥ २
सुदर्शन गदा गमाविली देवा । म्हणोनी केशवा भय वाटे ॥ ३
देवनाथ म्हणे पावन वैभव । उगें कशास्तव वागवा रामा ॥ ४

पद ( १७४ )

आधीं कैसें मज पदरीं घेतलें । आतां कांजी केलें कठिण मन ॥ १
पतितपावना तुमची ब्रिदावली । ते वाटे निराळी ठेवियेली ॥ २
मज पतिताची जाहली उपेक्षा । म्हणुन सर्वसाक्षा ऐसें वाटे ॥ ३
देवनाथ म्हणे पतित मी भारी । ताराना तरि हरी सांडा ब्रीद ॥ ४

पद ( १७५ ).

काय माझी तुम्हालागीं नाहीं चिंता । पाहणें अनंता निर्वाणीं कां ॥ १
म्हणविलें आपुलें आतां परतें लोटा । उचित वैकुंठा नव्हे थोरा ॥ २
नाहीं अपराधाची माझिया गणना । क्षमासिंधुपणा साच कीजे ॥ ३
देवनाथ म्हणे मी तो हीन दीन । राखावा अभिमान बिरूदाचा ॥ ४

---

१ देवनाथप्रभु दयाळाला जर तुम्ही न स्मराल तर खल काळ हा जो धरणें धरून बसला आहे तो कधींही उठणार नाही

## पद ( १७६ ).

सांगें कोणाचें त्वां सांग केलें बरें । ठकविले थोर थोर तुवां ॥ १
ठकडा तूं होसी म्हणविसी उदार । चाळविलें पोर उत्तानाचें ॥ २
वेडाउनी पुत्रा मारिलें पित्यासी । स्वयें प्रगट होसी शुष्क काष्ठीं । ३
सोडविलें उपमन्या पिता माता बंधु । देऊनि क्षीरसिंधु चाळविलें ॥ ४
मारुनि वालीतें तारा सुग्रीवासी । देऊनि म्हणवीसी न्यायाधीश ॥ ५
ज्याची त्यासी लंका देउनियां जाण । उदाराचा राणा म्हणवीसी ॥ ६
पार्थालागीं गीता उपदेशुनि बोध । करविला वध सुहृदांचा ॥ ७
कालमाजी तुवा केलें कृत्य थोर । बहुतांचीं घरें बुडविलीं ॥ ८
नामदेवा त्वां करुनियां पिसें । लावियेलें कासे आपुलिया ॥ ९
देखतां तुकयाचा संसार बुडविला । शेंवटीं[1] पाठविला वैकुंठासी ॥ १०
किती तरी वर्णूं ऐसी तव ख्याति । चाळविले किती नलभे अंत ॥ ११
रोहिदास सांवता आणि सूरदास । चोख्या कबीरास बुडविलें ॥ १२
बुडविलें ऐसे न फिरले पुन्हा । ठकड्या नारायणा होसी ऐसा ॥ १३
किती बुडविले नेले निजपदा । वर्णितां गोविंदा पार नाहीं ॥ १४
देवनाथ म्हणे त्यजोनियां घर । घेतलें दावेदार पूर्वींचा तूं ॥ १५

## पद ( १५७ )

ये बा ये गोपाळा करुणच्या सागरा । दीनाच्या दातारा पंढरीराया ॥ १
जैसा तैसा दास ह्मणूनि नुपेक्षावें । आपुलें राखावें ब्रीद देवा ॥ २
पतितपावन तुमची गर्जे ब्रीदावळी । ते आजि सांभाळीं दीनानाथा ॥ ३
देवनाथ ह्मणे वैकुंठींच्या नाथा । पायांवरी माथा ठेवियेला ॥ ४

## पद ( १७८ ).

अनाथ मी दीन शरण आलों पायीं । माझे विठाबाई मायबहिणी ॥ १
तुजवीण माझी कोण पैं सोयरी । जन्ममृत्यु वारी येरझारा ॥ २
मायेवीण सांगा कोणासी कळवळा । बाळाच्या लडिवाळा पाळी कोण ॥ ३
देवनाथ म्हणे तुजवीण एक । कोण तहानभूक जाणे माझी ॥ ४

## पद ( १७९ ).

जननी जनक माझा तूं मामा चुलता । तुजवीण अनंता कोण दुजा ॥ १

---

१ शेवटीं, अंतीं.

बहिण भाऊ माझी आप्त गणगोत । तुजवीण निश्चित नाहीं कोणी ॥ २
आतां नको अंत पाहूं देवराया । शरण मी पायां आलों भावें ॥ ३
देवनाथ म्हणे आल्या शरणागता । उपेक्षा अनंता नाहीं नाहीं ॥ ४

## पद ( १८० )

पतित मी साचा जाणुनी पदरीं । घेतलें कां दूरी लोटा आतां ॥ १
गणित नाहीं नाहीं माझ्या अपराधाशीं । परिक्षमावंत होशी माऊली तूं ॥ २
क्षमा करीं आतां माझिया अन्यायां । नको मज पायापरतें लोटूं ॥ ३
देवनाथ म्हणे लोटिसी परतें । तरी मग मातें कोण तारी ॥ ४

## पद ( १८१ )

नलगे मज कांहीं न मागें आणिक । प्रेम भजन भीक घालीं मातें ॥ १
तुझिया स्वरूपीं उघडा करीं डोळा । दे सुखसोहळा सायुज्याचा[१] ॥ २
अखंडित तुझिया पायीं ठेवीं चित्त । देईं माझें हित माझे हातीं ॥ ३
तुझिया स्वरूपीं सदा रमवीं माझें मन । नाम संकीर्तन देईं प्रेमा ॥ ४
देवनाथ म्हणे उदार तूं दाता । रुख्माडेवीकांता सोयरीया ॥ ५

## पद ( १८२ ).

आटोपितां मज नाटोपेचि कदा । हें मन गोविंदा अनिवार ॥ १
अनंत कल्पना करी नानापरी । स्थिर क्षण भरी नोहे पायीं ॥ २
काय करूं आतां न चले उपाय । म्हणोनियां पाय आठविले ॥ ३
आतां वेगीं धांवें धावें पांडुरंगा । मन हें श्रीरंगा आटोपावें ॥ ४
आटोपोनि मन ठेवीं अपुले पायीं । प्रेमभजन भीक घाली मातें ॥ ५
देवनाथ म्हणे आटपोनि मना । तुझिया चरणापाशीं ठेवी ॥ ६

## पद ( १८३ )

अनाथाच्या नाथा ये बा ये अनंता । तुजवीण चिंता कोणा माझी ॥ १
कोण माझा आहे तुजवीण त्राता । शरण जाऊं आतां दुजे कोणा ॥ २
न पाहें न पाहें न पाहें निर्वाण । जाऊं पाहे प्राण पांडुरंगा ॥ ३
झाला माझा जीव बहु कासावीस । लागलीसे आस तुझे पायीं ॥ ४
देवनाथ म्हणे करुनी तांतडी । वेगीं घालीं उडी पंढरीराया ॥ ५

---

१ चतुर्विधा मुक्तिपैकीं एक, जीमध्यें ईश्वराचा व जीवाचा अभेद होतो ती.

## पद ( १८४ )

माय बाळालागीं जरी मारी हातें । बाचवूं पहातें कोण तया ॥ १
राजा प्रजेलागीं जरी मारी तोंडी । धांवोनिया सोडी कोण त्यातें ॥ २
तुह्मी उपेक्षिल्या कोण माझा त्राता । सांगा सांगा कांता लक्ष्मीच्या ॥ ३
ज्याचा जोर त्याजवरी सर्व भार । दुजा अंगिकार कोण करी ॥ ४
देवनाथ म्हणे विश्वाच्या जीवना । आतां नारायणा नुपक्षावें ॥ ५

## पद ( १८५ )

नेणें भक्तिभाव ज्ञानकळा कांहीं । माझें मज गाही देतें मन ॥ १
नेणें क्रियाकर्म स्नानसंध्या कांहीं । माझें मज गाही देतें मन ॥ २
नेणें योगयाग जपतप कांहीं । माझें मज गाही देतें मन ॥ ३
देवनाथ ह्मणे मी हीनदीन पामर । परि अंगिकार केला तुह्मी ॥ ४

## पद ( १८६ )

जाणोनियां आधीं केला अंगिकार।आतां कां अव्हेर करितां सांगा ॥ १
अपराधांच्या कोटी सकळही घालीं पोटीं। सावळ्या जगजेठी सोयरिया॥२
सर्वज्ञा सर्वेशा बोलूं काई फार । न पडावा विसर माझा आतां ॥ ३
देवनाथ ह्मणे दयाळा श्रीरंगा । जिवांच्या जिवलगा पंढरीराया ॥ ४

## पद ( १८७ )

जन्मोनियां जगीं ह्मणविलों दास । लागलों कांसेस तुमच्या देवा ॥ १
ह्मणविलों दास चरणाचा अंकित । करूं काकुळत आन कोणा ॥ २
तुह्मी मज एक मायबाप धनी । तुह्मावीण कोणी नाहीं मज ॥ ३
देवनाथ ह्मणे पाय दावा दिठीं । दया माझी पोटीं येऊं द्यावी ॥ ४

## पद ( १८८ ).

मागें बहुतां जनां तारिलें पतितां । मज विषयीं अनंता कठिण मन ॥ १
अजामिळ द्विज गणिका पापराशी । नेली वैकुंठासीं नाम-मात्रें ॥ २
नक्रें धरितां पायीं स्मरला भाव तुज । धावोनिया गज सोडविला ॥ ३
देवनाथ ह्मणे करुणासिंधु देवा । माझाचि कां व्हावा विसर सांगा ॥ ४

## पद ( १८९ )

रायें दुर्योधनें गांजितां भगिनोली । लज्जा रक्षियेली पंढरीराया ॥ १
मागतांचि पय उपमन्यु द्विजबाळ । क्षीरसिंधु तत्काळ दिधला त्यातें ॥ २

स्मरतां निज भावें दिधल वभव । अढळ पदीं ध्रुव बैसविला ॥ ३
देवनाथ म्हणे तू उदाराचा राजा । श्रुति गाती पैजा ऐशा वाणी ॥ ४

पद ( १९० )

तरि कां वा कृपणता धरिली वासुदेवा । उदारा केशवा मायबापा ॥ १
दयेच्या सागरा क्रूर आली लहरी । बहु मज अंतरीं नवल वाटे ॥ २
नामाहूनी काय पाप माझें थोर । म्हणुन पडला विचार तारावया ॥ ३
श्रुति गर्जतांती नामाचा प्रताप । नामाग्नि पापतृण जाळी क्षणें ॥ ४
देवनाथ म्हणे न जाळी नामाग्नि । ऐसें त्रिभुवनीं नाहीं पाप ॥ ५

पद ( १९१ ).

आहें मी पतित हें तो सत्य जाणा । रक्षावे पावना आपुलें ब्रीद ॥ १
जैसा तैसा तारीं म्हणविलों तुमचा । राखावा बिरुदाचा अभिमान ॥ २
याचक मी आलों उभा महाद्वारीं । प्रेम झडकरी घालीं भीक ॥ ३
येवोनि कीर्तनीं अंतर्बाह्य नांदा । नित्य नेम सदा चालवावा ॥ ४
निवारोनि विघ्न सरक्षावें बाळा । प्रेमाचा जिव्हाळा यावा दान ॥ ५
नामनौकेमाजी बैसवोनि देवा । येव्हढा तारावा पतित भवीं ॥ ६
किती म्हणुन प्रार्थू काय माझी मति । दयाळा श्रीपति करा जो कृपा ॥ ७
गोविंदा गोपाळा अन्यायाची क्षमा । करुनि पुरुषोत्तमा यावी भेटी ॥ ८
देवनाथ ह्मणे हांक महाद्वारीं । दिधली कळे हरी तैसें करा ॥ ९

पद ( १९२ ).

करुणाषोडशी हे गुंफुनि सुमनमाळा । घातली ही गळां पंढरीराया ॥ १
प्रीति पावो तुम्हां रुक्मादेवीरमणा । साष्टांग चरणा प्रणिपात ॥ २
आर्षभावें केली पायीं विनवणी । क्षमा चक्रपाणी करीं रे बापा । ३
देवनाथ म्हणे म्हणविलों मी तुझा । अभिमान माझा सांडूं नका ॥ ४

# देवतापर अभंग.

## अभंग (१९३).

आत्मा गणराज आरंभीं तुजलागीं । वंदू अंतरंगीं बैस आतां ॥ १
निर्विघ्न चालवीं देईं मति स्फूर्ति । वांछिलें जें चित्तीं पुरवावें ॥ २
चाराशत अभंग व्हावे एशी आशा । सिद्धि न्यावें ईशा गणाचिया ॥ ३
भक्ति ज्ञान माझी वैराग्याची खाणी । उघड करूनी दावीं स्वामी ॥ ४
देवनाथ म्हणे सिद्धिबुद्धिपति । इच्छिलें जें चित्तिं सिद्धि न्यावें ॥ ५

## अभंग (१९४)

बारे ये विठ्ठला आतां चहुं बाहीं । मातें क्षेम देईं पांडुरंगा ॥ १
आतां वाढवेळ लाविशील जरी । तरी माझी बरी नाहीं सोय ॥ २
उभय पक्षीं पाहतां गोष्टी हे वाकुडी । भोगानें ही कुडी ग्रासीयेली ॥ ३
आतां माझा जीव जाहला घाबरा । रुक्मादेवीवरा धांव वेगें ॥ ४
देवनाथ म्हणे न पाहें निर्वाण । कासावीस प्राण होतो माझा ॥ ५

## अभंग (१९५).

भावें जडलों तुझ पायीं । माय माझे हणुमाबाई ॥ १
किती पाहसी निर्वाण । माझा कंठीं आला प्राण ॥ २
फांसा गुंतलों लिगाडीं । कर देऊनि वेगें काढीं ॥ ३
घाबरला जीव । कृपावंते घेईं धांव ॥ ४
बळ न चले वरपडी । आतां वेगीं घालीं उडी ॥ ५
बहु होताती हे श्रम । विलंबाचें नाहीं काम ॥ ६
देवनाथ विनवी आई । लागवेगें धांव घेईं ॥ ७

## अभंग (१९६)

जरी पाहशील अंत । तरी हा जाईल वाहत ॥ १
याची होईल आपदा । बोल लागेल तुझिया बीदा ॥ २
पतित जाणुनियां आधीं । करीं धरिलें दयानिधी ॥ ३
देवनाथाचा तूं धनी । झालें विख्यात त्रिभुवनीं ॥ ४

## अभंग ( १९७ ).

अहो अंजनीनंदना । निज दासाच्या जीवना ॥ १
करुणा करीं कृपासिंधु । येईं धांव दीनबंधु ॥ २
वेगीं धांव येई आतां । राया राघोबाच्या दूता ॥ ३
वांचविलें लक्ष्मणा । आणुनियां गिरिद्रोणा ॥ ४
थोर उपकार हृदयीं । चिंतिती सुरवर मेळीं ॥ ५
धन्य धन्य पुच्छ बळी । केली लंकेची सहज होळी ॥ ६
सीताशोक नेला विलया । धन्य प्रताप मारुतीराया ॥ ७
देवनाथाची विनवणी । ब्रीद राखावें द्रुमपाणी ॥ ८

## अभंग ( १९८ ).

मज अनाथाची मति । काय वर्णावया कीर्ति ॥ १
बळ–प्रतापाची गरिमा । वर्णूं न शके शेष ब्रह्मा ॥ २
गुणवर्णनीं कुंठित मती । स्तब्ध जाहल्याती श्रुती ॥ ३
वर्णूं ह्मणतां शद्बमात्रें । जेथें वेडावलीं शास्त्रें ॥ ४
देवनाथप्रभु बळभीमा । करीं अपराधाची क्षमा ॥ ५

## अभग ( १९९ ).

आजचिया लाभा नाहीं अंतपार । तुष्टला दातार मारुतीराय ॥ १
ऐसें मज वाटे आतां नाहीं भय । आठवितां पायां प्रभूचिया ॥ २
सर्व सुखप्राप्ति होय अंतरंगीं । सत्ता हे दादुगी त्रिभुवनीं ॥ ३
नाम गातां वाणी मन मिळे ध्यानीं । विश्व हें लोचनीं ब्रह्मरूप ॥ ४
देवनाथ ह्मणे भाग्य फळा आलें । दया हे उदेली कपीनाथा ॥ ५

# ईशस्तुतिपर अभंग.

## अभंग ( २०० ).

रूप तुझें नयनीं नाम तुझें वाणीं । नाचतां कीर्तनीं मागें पुढें ॥ १
मागें पुढें उभा राहें नारायणा । भजन प्रेमदान देईं मज ॥ २
व्यापक तूं अणुरेणू महतादी । वर्णिलासी वेदीं आत्माराम ॥ ३
देवनाथप्रभू उदाराच्या राया । दे बा देवराया इतुकें दान ॥ ४

## अभंग ( २०१ ).

देवा तुझ्याहूनी बरे मायबाप । वारिताती ताप लेंकुराचा ॥ १
लेंकुरापासूनी कांहीं त्यां नमिळे । पुरवितातीं लळे आवडीनें ॥ २
गुणी हो निर्गुणी दोघे त्या सारीखे । न पाहती पारखे दोघांमाजी ॥ ३
भक्तां तूं तारीसी अभक्तां गांजीसी । ऐसा हृषीकेशी असशी तूं ॥ ४
भक्तीरूप लांच घेसी तूं भक्तांची । मग मुक्ती त्यांची करिसी दासी ॥ ५
देवनाथ म्हणे तुज ' लांचखोरा' । जरी या पामरा न तारीसी ॥ ६

## अभंग ( २०२ )

इतकें मातें द्यावें दान । विनंती मान दासाची ॥ १
आतां पाहतोसी काय । पुढें पाय करीं वेगीं ॥ २
अखंडित भजन प्रेमा । पुरुषोत्तमा ! मज द्यावा ॥ ३
प्रेमें गाईन नाम वाणीं । नाचेन कीर्तनीं आनंदें ॥ ४
देवनाथ याचक द्वारीं । प्रेमवारी घालावी ॥ ५

## अभंग ( २०३ ).

गुंतोनीयां पडलों दुर्वासनामेळीं । गती वनमाळी काय माझी ॥ १
दुस्तर दुर्धर मनाच्या कल्पना । आंवरलिया जाणा नावरती ॥ २
सदा विषयसुखीं रतलें हें चित्त । पुत्रजायावित्त गोड वाटे ॥ ३
आशाबद्ध हिंडे ऐसा देशोदेश । कायरे जगदीश ऐसें केलें ॥ ४
देवनाथ म्हणे झांजावलों फार । आतां पदीं थार देईं मातें ॥ ५

## अभंग ( २०४ ).

माझा जाऊ पाहे प्राण । कां वा पाहशी निर्वाण ।
करुणाराशी अभिधान । गर्जे जाण त्रिभुवनीं ॥ १
आम्ही दीन रे वा भोळीं । कर्म आम्हां हेंची वळी ।
पतित पावन ब्रीदावळी । ते सांभाळीं गोविंदा ॥ २
भक्तवत्सल ऐशीं बिरुदें । श्रुती गर्जताती छंदें ।
विश्वात्मया अहंवृंदें । परमानंदें सद्भावें ॥ ३
आतां वेगीं करीं त्वरा । पतित पावन शार्ङ्गधरा ॥
मातें अनाथा अव्हेरां । नव्हे थोरां उचीत ॥ ४
पतीत तारियेले बहू । तोडीयला कर्म विहू ।
जाणुनि आम्ही पायीं वाहू । प्राणराहू अर्पियेला ॥ ५
आतां जाणसी तें करीं । साह्य होईं कां लौकरी ।
देवनाथ जोडुनी करीं । भावें करी प्रार्थना ॥ ६

## अभंग ( २०५ )

सद्गुरु वांचूनी देव नसे दुजा । गुरुपुत्र ओजा जाणे खूण ॥ १
गुरु कर्म धर्म गुरु निज वर्म । गुरु पूर्ण ब्रह्म अनादीचा ॥ २
अनादिचा ठेवा सद्गुरु सोयरा । जेणें ब्रह्महिरा दाखविला ॥ ३
जनीं वनीं माझा सद्गुरु समर्थ । निजानंद चोख गुरुकृपें ॥ ४
सद्गुरु गोविंदनाथ निरंजन । स्वानंद सुखघन देवनाथ ॥ ५

## अभंग ( २०६ ).

मागें गेले मागिल परी । आतां सावध होईं तरी ॥ १
शरण जाउनि सद्गुरुराया । भावें धरीं त्याच्या पायां ॥ २
गुरु स्वमुखें निजगुज सांगे । ग्रहण करी त्यासम वागें ॥ ३
भाव पायीं धरी भोळा । सांडीं जाणिवेचा चाळा ॥ ४
सांडुनीया अभीमान । गुरुपायीं होईं लीन ॥ ५
कृपा करितां गोविंददाता । सहजें तरसी देवनाथा ॥ ६

## अभंग ( २०७ ).

आमुचें ब्रह्म कृष्णातटीं । त्रिपुटींत नांदे त्रिपुटी ॥ १
ज्याचे वर्णितां पोवाडे । वेद शास्त्र होती वेडे ॥ २
शिरीं शोभे शिवलिंग । पद दाता दे अभंग ॥ ३

तो हा नांदे कृष्णातिरीं । नाथ गोपाळ निर्विकारी ॥ ४
धन्याचा जो धनी दाता । ज्याची त्रिभुवनीं सत्ता ॥ ५
बाप पाळितो सकळ । देवनाथाचा लडिवाळ ॥ ६

## अभंग ( २०८ ).

बाप श्रीनाथ गोपाळा । माझा तुजलागीं कळवळा ॥ १
मी तों पतित सत्य जाण । ब्रीद तुझें हें पावन ॥ २
अविलंबें वेगीं यावें । दीना आपुल्या क्षेम द्यावें ॥ ३
बाप बैसोनी अंतरीं । साह्य होऊनि संकट वारी ॥ ४
देवनाथें विनविलें । ब्रीद रक्षावें आपुलें ॥ ५

## अभग ( २०९ )

बुद्धीचें आसन नेमाची संबळी[१] । आंत वनमाळी बैसलेती ॥ १
निश्चयाचा दोरा पूर्वानुसधान । त्यामाजी हें मन ओंवीलेंसे ॥ २
पंचमुद्रा लावी पंचही प्राणांसी । वायो स्तुती जपसी साशसार ॥ ३
पूजेलागीं सिद्ध त्रिगुणतूळसी । दशाइंद्रियांसीं सुम कीजे ॥ ४
सद्भावीचें पाणी स्नानालागीं व्हावें । निर्विकल्प असीं उटणें हें ॥ ५
अहंमात्रा धूप सोहंमात्रा दीप । चैतन्यनिजत्व ओंवाळीजे ॥ ६
संतवैष्णवांनो ! हाची नेम कीजे । वैकुंठीं होईजे चतुर्भुज ॥ ७
गुरुगोपाळनाथ वैकुंठींचा राजा । करीतसे पूजा देवनाथ ॥ ८

## अभंग ( २१० ).

काय केलें रांडलेका । जन्म गमाविला फुका ॥ १
कन्या पुत्र दारा धन । येथें गोंवियेलें मन ॥ २
उकरिलें विषयखत । बुडविलें आत्महित ॥ ३
अहो पाहियेला डोळां । नाहीं सुखाचा सोहळा ॥ ४
सोस धरिला संसाराचा । जैसा बैल तेल्याचा ॥ ५
थोर भाग्यें पाहें । प्राप्त झाला नरदेह ॥ ६
फार अभ्यासिल्या विद्या । परी तितुक्याही अविद्या ॥ ७
जळो जळो शब्दज्ञान । चित्तीं नाहीं समाधान ॥ ८
वदे वाणी देवनाथ । तुवां केला आत्मघात ॥ ९

---

१ पुजेचीं उपकरणीं ठेवण्याची पेटकुली.

## अभंग ( २११ ).

करावें स्मरण ज्याचें तैंची ध्यान । ध्यानीं तन्मय मन करुनी ठेवीं ॥ १
ध्यानाची ती खूण अवलोकीली दीठीं । साधोनी भृकुटी मध्य वेढा ॥ २
दूर करीं सांडीं नासाग्र पाहाणें । श्रीगुरूच्या खुणे उमजें वेगीं ॥ ३
व्यर्थ नको करूं शब्दाची चावटी । समाधान पोटीं नव्हे येणें ॥ ४
श्रीगुरुगोविंद आत्माराम दिठीं । पाहें सर्व सृष्टी ब्रह्मरूप ॥ ५
देवनाथ ह्मणे आणिक साधन । नको करूं स्मरण अंगीकारीं ॥ ६

## अभंग ( २१२ ).

न करी स्मरण त्याचें गाढवपण । जळो तें श्रवण मननावीणें ॥ १
श्रवण करावें स्मरणीं आदरावें । मननीं राखावें निजध्यासा ॥ २
निजध्यासीं होय सहजसाक्षात्कार । तुटे येरझार जन्मखेपा ॥ ३
देवनाथ ह्मणे स्मरणाचें फळ । अभागी केवळ नेणे मूर्ख ॥ ४

## अभंग ( २१३ ).

अधिष्टानीं सिद्धासन । सहजीं असे त्या सत्यपण ॥ १
जेथें जेथें हें शरीर जाय । तेथें तेथें बा तुझे पाय ॥ २
पाय असोत माझे मनीं । याची बैसावें योगासनीं ॥ ३
भावें विनवीलें देवनाथें । हेंचि भिक्षा देई मातें ॥ ४

---

# आत्मचरित्रपर.

## अभंग ( २१४ ).

त्रेतायुगीं रामें दिधलें वरदान । मगरीचें ऋण फेडावया ॥ १
कलियुगामाजी देवनामेंकरुन । जगउद्धारण करिशी तूं ॥ २
ह्मणुनीयां येणें जालें आह्मांलागीं । कलीचे प्रसंगीं सहजासहजीं ॥ ३
पूर्वींच या युगीं जालों रामदास । मगरी जन्मास आली तेव्हां ॥ ४
वराया ते मगरी आम्हां आली जेव्हां । त्याग केला तेव्हां तिचा आह्मीं ॥ ५
पुन्हां कलियुगीं अधर्मप्रवृत्ती । म्हणुनी श्रीपती धाडी आम्हा ॥ ६
देवनाथ म्हणे ऋण फेडायासी । आतां मगरीसी वरीयेलें ॥ ७

---

१ हा अभंग आम्हाला वादग्रस्त वाटतो. हा एखाद्या शिष्याचा असावा. तसें असलें तरी नाथांचें लग्न झालें असें मानण्याला हा सबळ पुरावा आहे. याबद्दल प्रस्तावनेचा अठरावा भाग वाचावा.

# पांच अपूर्ण पदें

## पदें ( २१५ ).

मी सांगतसें तुजपासीं जिविंचें गुज ।,हें नावडेग दृश्य मायिक मज ।
हरि भरला अंतरबाह्य प्रकाशिं सहज । कोटि भानूचें लोपोनि गेलेसें तेज ।
रूप पाहतां लोचनीं विरह साहवेना हरी । गुरूदेवनाथ कृपेचा वरदकर शिरीं
तणें मनोवृत्ति पातली निजमंदिरीं । देखिला विठो सांवळा उभा विटेवरी
दृह जे तटात मन हें बाइन उरली उरी । धुंद लागली ध्यानीं भजना करी
हरी अशि करुणा ऐकुन त्वरें चालली । श्रीहरी समीप जाउनि वृत्ति बोलली ।

मग दयानिधीतें करुणा हृदयीं उपजली ।
दुःखासि सारुनि मग भ्रांति उडविली ।
काय सांगूं हरिचि थोरी निवारिलें विघ्न हरी ॥

[ टीपः—पद २१६ हें पद १२० चें शेवटलें कडवें असें मागाहून आढळलें सबब येथें गाळीत आहों. ].

## पद ( २१७ ).

असि मनोवृत्ति राधिका । तिणें धाडिली भक्ति दूतिका ॥ ध्रु० ॥
लागोनि हरिपदयुगलीं । रतविलें रमानायका ॥ १
हे द्रौपदि–लाज–रक्षका । दीनजनपालय कंसांतका ॥ २
नको करू उपेक्षा साई । सखया विठ्ठला रमा नायका ॥ ३
येऊं दे कृपा अतरीं । तारी भवपुरीं । बुडतों ये क्षणीं सांवळा ॥ ४
नियम करोनि यमवंतो (......) सारिला द्वैत पसारा ॥ ५
गुरुदेवनाथ प्रभुवरा । साह्य व्हावेंजी त्वरें सुंदरा ॥ ६
असें ऐकुनि करुणास्वरा । दया उपजलि रुक्मिणिवरा ॥ ७
गुरुदेवनाथ प्रभुवरा । काय उत्तिर्ण व्हावें उपकारा ॥ ८

## पद ( २१८ ).

आहारे विधात्या क्रियानष्टा केलीस त्वां करणी ।
संसारामध्यें घालाघालुनि विधवा केलें बाळपणीं ॥ ध्रु० ॥

पतिविण धिग् जिणें माझें ग बाई मृत्यु नये अजुनि ।
वस्त्रभूषणें सर्वहि असतां कुंकवावांचुनि सुनी ।
परास्त्रिया पतिशेजे रमती गुजगोष्टी करुनी ।
मी मग झुरतें बाई आपुल्या मनीं ।
उगीच केवलवाणी फुटलें माझें प्रारब्ध ग बाई ॥ १ ॥

## पद ( २१९ ).

निज[1] जाग जिवना हरिवा । निज जाग जीवना हरी ।
तुझी आहे कवण नगरी ॥ ध्रु० ॥
पहा हो साही शहर मांडणी । पहा हो षड्चक्रावर उभवणी ।
पाहा हो तेथें वस्तुकार बहुजनी ।
उडान ॥ तेथें राहुनि चोर चोरी करी ॥ तुझी० ॥ १
पाहा हो माडीवरते चवथी माडी ।
पाहा हो नार बैसलिसे परवडी ॥
पाहा हो आल्या गेल्यास डोळा ते मोडी ।
उडान ॥ उन्मनी होय बावरी ॥ तुझी० ॥ २
पाहा हो चौघीजणी अति चपला ।
पाहा हो डोळे मोडुन न्याहाळिति डोळा ॥
पाहा हो तुर्या दाविति षोडश कळा ।
उडान ॥ मन गुंतलें तिच्या भीतरी ॥ तुझी० ॥ ३
पाहा हो देवनाथ माडीवर गेला ।
पाहा हो तिसी कवळून अंग सग केला ॥
पाहा हो चिन्मय गदीचें राज्य पावला ।
उडान ॥ सुख समाधी नाम वैखरी ॥ तुझी० ॥ ४

---

१ हें पद देवनाथमहाराजांचें नव्हे असें श्रीभगवंतनाथमहाराज मन्हाणपूरकर कळवितात. सुजींहून आलें सबब आम्हीं समावेश केला. जास्त माहिती मिळेल त्याप्रमाणें पुढील आवृत्तींत गाळून टाकूं.

# विठ्ठलपर पदें.

## पद ( २२० ).

करुणाघन दिनबंधु दयाळा ! ये पंढरिराया ! ।
अनाथ मी अतिदीन शरणागत तुझिया पाया ॥ ध्रुवपद ॥
समपद विटेवर कटि कर ठेवुनि काय मौज पाहसी ।
काय तुझे मानसीं हेत तंव सांग हृषीकेशी ! ॥
दुर्धर दुर्मद दुसरी वासना हे मजला ग्रासी ।
काम क्रोध मद मत्सर बांधुनि मन ममतापाशीं ॥
सोडवील तुजवीण कोण बा ! दुःख हें विध्वंसी ।
धावल्या अति जीव भ्याल्या ! तूं धांवुनि कधिं येशी ? ॥
दीप ॥ लोभ दंड हे दुष्ट मिळोनी विटंबिली काया । अनाथ० ॥ १

कष्ट बहुत सकष्ट जाणुनी ते पांडवपत्नी ।
'ये कृष्णा गोविंदा तूं' बाहत याज्ञसेनी ॥
करुणास्वर निजकर्णीं ऐकतां त्वरें मोक्षदानी !
धावलासि मनपवनाहुनि अतिवेगें, गरुड त्यजुनि ॥
दुष्ट बहुत दुःशासन फेडित धरुनि निरिसि पाणीं ।
पाहतां बा ! शेवटीं पितांबर नेसविला जघनीं ॥
दीप ॥ सत्वर निज भगिनिची लाज रक्षिली बा ! यदुराया ! ।अनाथ०॥ २

गजेंद्र नक्रें आकळितां तैं आळविलें तूज ।
चक्र फेकुनी नक्र मर्दिला, सोडविला गज ॥
भक्तकामकल्पद्रुम ऐशा श्रुति गाती पैज ।
शुका पढवितां वेश्या गणिका उद्धारली सहज ॥
पुत्रमिषें घे नाम तारिला अजामीळ द्विज !
त्याहुनि पतित थोर मी ! तूं तों पावन महाराज ॥
दीप ॥ लाज सकळही तुज, उपेक्षा न करिं परम सदया ! अनाथ० ॥ ३

---

१ समपद विटेवरि कटि कर ठेउनि काय मौज पहासी:–"कटिं कर ठेवोनि विठो काय मौज पाहसी । हांसति आम्हांसि लोक हे तुझे निवासी " शिवराम कवि २ मनपवनाहुनि अतिवेगः–'मनपवनाहुनियां राजा द्वारावतिचा । ऐकुनियां स्व सतिचा' दयाळनाथ. ३. त्याहून थोर पतित मीः–सगळ्या पाप्यांत मी अति पापी. चार चौघे येतील त्यांत जो सर्वांत जास्त थोर त्याचा लौकर व अधिक सन्मान झाला पाहिजे, या शिष्टाचाराकडे लक्ष ठेवून आधीं माझ्याकडे पाहून मला उद्धर मग अजामीळ, गणिका वगैरे लहानसहान आहेतच.

देवनाथ प्रभुनाथ तारिं हरि पुंडलीकवरदा ।
आत्मनिवेदनें पुजितां न्याहळीं, दाखविं या स्वपदा ॥
कृपाकटाक्षें पाहें साह्य हरि ! वारीं भवआपदा ।
हेंचि दानें दे, वमनासमान वाटो हे प्रमदा ॥
प्रेमभक्ति दे, नाम वदविं श्रीमुखिं, परमानंदा ।
स्वात्मस्वरूपीं रमविशि निशिदिनिं या चित्सुखकंदा ॥
टीप ॥ सगुणरूप साजिऱ्या येईं सोयऱ्या नयनिं उदया । अनाथ० ॥ ४

## पद ( २२१ ).

मी बाळ तुझें तान्ये ! पय पाजीं उसंगा घेईं ।
पंढरपुरवासिनि अंबे ! झडकरि ये माय विठाई ! ॥ ध्रुवपद ॥
भीमातटिं करद्वयपाणी ठेवुनियां कौतुक पाहसी ।
मोहपाशीं गुंतुनि पडलों, ग्रासितसे मायाविवशी ।
त्राता मज कोण दुसरा, तुजवांचुनी मी परदेशी ।
॥ टीप ॥ घाबरला जीव माझा, धांवुनि कधीं सांग येशी ? ॥ पंढर० ॥

---

१ पुंडलीकवरदा:--कारण इद्रविटेवर अक्षय उभा राहून मी सर्व कलिग्रस्तांचें तारण करीन असा वर तू पुंडलीकाला अठ्ठावीस युगांच्या अगोदरच देऊन चुकला आहेस. नामदेवाच्या वेळीं अठ्ठावीस शतकें झालीं होतीं त्या मानानें आतां चौतीस शतकें झालीं आहेत २. आत्मनिवेदनें पुजितां:--नवविधा भक्तींपैकीं अंतिम व अतिश्रेष्ठ भक्तिपूजन आत्मार्पणाचें होय "श्रवण कीर्तनं विष्णोः" इ० वामन म्हणतात "दास्य दे हारे तुझ्या चरणाचें । कीर्तन श्रवण आचरणाचें । दे अनन्य हृदयीं स्मरणाचें । हें न देसि तारे दे मरणातें" ३. हेंचि दान:--वमना समान हे प्रमदा वाटो हेंचि दान दे "ऋद्धि सिद्धी मुक्ति चारी । द्वारीं वोळगति कामारी । देखुनि बांतीचीये परी । अखंड रत हरि गुरुभजनीं" निजानंद ४ विवशी--दुर्दशेची अभिमानी एक देवता आहे जिचेयोगानें अनर्थकारककर्माचेठायीं प्रवृत्ति व हितकारक व्यापारापासून पराङ्मुखता होते. उदा० मूळचा सुखी होता पण घरात विवशी शिरतांच किमयेचे छंदास लागून बुडाला. ( २ ) द्वाड किंवा वाईट पायगुणाची स्त्री ५. तुजवाचुनि मी परदेशी:--तुझ्या स्वरूपानंदीं निमग्न राहून तुझ्या चरणांजवळ सदोदीत पडलें रहावयाचें हा माझा धर्म व हाच माझी इच्छा असें असता जन्ममरणाच्या फेऱ्यांत पडून गर्भवास झाल्यामुळे धरित्रीवर आल्यापासून तुझ्या स्वरूपाची विस्मृति पडली व तुझे चरण अंतरले. तूं मायबाप तुझी ताटतूट झाली. तुझे पाय हें माझें घर. तेंही सुटलें सबब परदेश.

आतिसदय हृदय मृदु आतां कठिण कां मानस केलें ? ।
मी पतित भारि ह्मणतां जी ! ताराया चित्त भ्यालें ! ।
एवढा जरी जी ! जोर, कासियासि तरि मग व्यालें ? ।
॥ टीप ॥ पतिताचे पावन ऐसें, ब्रिद[1] पायीं बांधियेलें. ॥ पंढर० ॥ २
तुजवांचुनि कोण मला गे ! भवसागरिं या भयत्राता ।
मम प्राण रिघों पाहातो कीं, लाविशी उशीर कां येतां ? ।
लक्षितसें मार्ग दयाळे ! विरहाग्नी जाळित चित्ता ।
॥ टीप ॥ स्तुतिभागा काय करूं मी, श्रुति वर्णिति गुणग[२]गाथा॥पंढर०॥३
प्रार्थितसें मी धावें, क्षणभरि हा विलंब न करीं ।
जरि दास तुझा ह्मणवितों, शरणागत आलों भिकारी ।
दे प्रेमभीक भजनाची, तोडुनियां सर्व विकारी ।
॥ टीप ॥ ये प्रगटे मम हृद्भुवनीं, कंजाक्षा[३] कैटभारी ! ॥ पंढर० ॥ ४
केव्हांचा आळवितों मी करुणारव न पडे श्रवणीं ।
माउली सुदीन जनांची, कनुवाळे ! विनवणी मानीं ।
तुजवांचुनि कोण आतां ? त्रैलोक्यीं तूंची जननी ।
॥ टीप ॥ उडि घालीं लवकर धावें, गिवसलें[४] मज दैन्यानीं ॥ पंढर० ॥५

---

१ ब्रिद पायीं बांधियेलें:—पायांतील तोडर्यांची उपमा ब्रीदाला पुष्कळांनीं दिलेली आहे "ब्रीदाचा तोडर गर्जे त्रिभुवनीं । तूंची एक धनी त्रैलोक्याचा" नामदेव " अनुपम्य मनोहर । कांसे शोभे पीतांबर । चरणीं ब्रीदाचा तोडर । देखिला देवो " ज्ञानेश्वर ' पीत वसन घन साजे । मुरडीक वाक वाजे । वर तोडरीं ब्रीद गाजे । कीर्ति विशाळाचे माजे ' ॥ रामदास. ब्रीद पायीं बांधिलें:—( एका फार जुन्या छापलेल्या मराठी कोशांत ) जो ज्या विद्याकलादि गुणाविषयीं बाणा बाळगतो त्याचें ज्ञापक चिन्ह म्हणून हस्तादिकांचेठायीं दोरा इत्यादि जें तो बाळगतो तें. दुसरा अर्थ बाणा. मोल्स्वर्थमध्यें बिरुद हा शब्द संस्कृतापासून झालेला असें दिलें असून त्याचे दुसरें रूप बिरूद असें दिलें आहे A thread etc. worn around arm etc. as a badge or token of ones excellence or superiority. उदा०—उष्ट्रांनीं बिरुदें बांधोन । तुंबरा पुढें मांडिलें गायन ॥ मकर बिरुदें पुढें चालति । ध्वज चिन्हें विराजिती । या शब्दाची जास्ती माहिती लागेल तर बरें. २. स्तुति भागा काय करू मी—तुझी स्तुति करण्याचें माझें सामर्थ्य तें कितीसें ३. कंजाक्षा—कमळासारखे डोळे आहेत अशा परमेशा. ४. गिवसलें—पकडलें, धरलें, गवसलें कृष्णजन्माख्यानावरील ५८ वी विस्तृत टीप पहा.

किनि ह्मणुन अंत तरि आतां, पाहतोसी करुणामूर्ति ! ।
मजला तों कांहीं सुचेना, घाबरी झाली वृत्ति ।
अंगिकार त्वां केलासी, मिरविलें ब्रिद श्रीजगती ।
॥ टीप ॥ देवनाथ जननी माझी, लज्जा हे तुझिये हातीं. ॥ पंढर० ॥ ६

## पद ( २२२ )

माझि विनवणी, विनवणी हरिला सांगा ।
कधीं भेटाल पांडुरंगा ! ॥ ध्रुवपद. ॥
संत तुम्ही दयाळ, दयाळ मज कृपा ! करुनि भेटवा मायबापा ॥
भवाब्धिमधें, मधें बुडतो ताफा[1] । कोण दाखवी मार्ग सोपा ? ॥
चाल । काय मी करूं । कोणता मार्ग तरि धरूं ॥
किती म्हणुनि चित्त आवरूं ।
टीप ॥ आवरू अंतरगा ॥ कधीं० ॥ १
गोपीवल्लभा वल्लभा गोपवेषा । कधीं दाविशी पादरेषा ॥
वोस तुजविणा तुजविणा दाहि दीशा । विरहीं जाल्या वृत्ति पिशा ॥
चाल ॥ जीव बावरा । भवनदी खोल भोंवरा ॥
बुडतों या जी ! सांवरा ।
टीप ॥ सावरा लागवेगीं[2] ॥ कधीं० ॥ २
जाहली बहू, बहू वाढवेळां[3] । कठिणता धरिली हृदयकमळा ॥
काय म्हणुनियां, म्हणुनियां जी घननीळा ! ।
त्वां धरियली विश्वपाळा ! ॥
चाल ॥ दिनोद्धारणा । भक्तवत्सल भयहरणा ॥
ऐकुनी माझि करुणा ।
टीप ॥ करुणा लागवेगा ॥ कधीं० ॥ ३
भगिनी द्रौपदी, द्रौपदी तिच्या काजा । कसा धांवलासि महाराजा !॥

---

१. भवाब्धीमध्यें बुडतो ताफाः--तापा असा पाठ नव्हे. ताफा असा पाठ माझें जहाज या भवसागरांत बुडत आहे तर तूं तार २. लागवेगाः—मूळ शब्द लागवेग पुल्लिंगी. जलदी, त्वरा लागवेगा हें तृतीयान्तरूप. हा शब्द फक्त काव्यांतच आढळतो. ३ वाढवेळाः—मूळ शब्द वाढवेळ वाढवेळा=पुष्कळ वेळ असा अर्थ.

वस्त्र पुरविलें, पुरविलें, तिच्या लाजा[1] । त्वां रक्षिलें महाराजा ! ॥
चाल ॥ होसि सज्जना । सांवळ्या दुःखभंजना ।
अपमानस कुरुं[2] दुर्जना ।
टीप ॥ दुर्जना गर्वभंगा ॥ कधीं० ॥ ४

प्रभु गुरुवरा, गुरुवरा नाथराया । शरणागत आलों पायां ॥
ऐकें करुणा, करुणा पूर्ण सदया । दिसोंदिस झिजतसे काया ॥
चाल ॥ झालि बावरि । अविलवें ये तांतडी ॥
जिविंचा तू जिवलग गडी ।
टीप ॥ गडी आत्मलिंगा[3] ॥ कधीं० ॥ ५

करुणा भाकितें, भाकितें दिनरजनी । दीनबांधवा मोक्षदानी ॥
ऐकें करुणा करुणा माझि श्रवणीं । केले अपराध मना नाणीं ॥
चाल ॥ पतितपावना ! । सांवळिया नारायणा ॥
भवपाशबंधछेदना ! । छेदना जी निःसंगा ॥
देवनाथासि तुंपक्षीं गा ॥ माझि० ॥ ६

## पद ( २२३ ).

भवपुरिं बुडतों हरि ! तारीं मज भीमातिरवासिया ? ॥
धांवुनि ये पंढरिराया ! ॥ ध्रुवपद. ॥

दुहिता सुत गृह दार धनीं मनिं जडली आशा ।
घातला मोह गळां फांसा ॥

---

१. लाजाः–प्रास सौकर्यार्थ लाजा असें रूप योजिलें आहे. सदरहु शब्दांचें रूप पुल्लिंगी मानण्याचें कारण नाहीं. वस्त्र पुरविलें आणि तिच्या द्रौपदीच्या लाजेला त्वां रक्षिलें. २. अपमानस कुरुः–हें रूप कोणच्या प्रकारचें ! तु सर्व दुर्जनांचा अपमान आणि मानखंडना केलीस असा अर्थ. पण हे शब्द नाथांनीं कोठून उचलले हें लक्ष्यांत येत नाहीं. ३. गडी आत्मलिंगाः–सखया आत्मारामा. आत्मलिंग म्हणजे शिवाचें मूर्त स्वरूप हृदयाच्या ठिकाणीं पांडुरंग सदोदित वास करितो म्हणून त्यास आत्मलिंग म्हटलें आहे.

घाबरला जिव काय करूं आजि मज न पुरे धिंवसा[1] ।
बैसला टपत काळ उसां[2] ॥
लवपलक्षण हरावयां[3] दया न ये करूं योग कैसा ।
सांग बा सांग श्रीनिवासा ! ॥
चाल ॥ तूं करुणासागर हरी । मम भवदुष्कृत संहरीं ।
कर देउनियां सांवरीं ॥
टीप ॥ दीनानाथ दिनबंधु दयाळा विनवीलें पायां । धांवुनि० ॥ १

गर्भवास दुःखास सोशिलें, जननिउदरकमळीं ।
पातलों बाहिर ते वेळीं ॥
वृथाच परि खोविलें बाळपण मुलांसवें खेळीं ।
विषय भोगिला तरुणकाळीं ॥
क्षीण दिसोंदिस काया वृद्धपणीं जरा येउनि कवळी[4] ।
गळित इंद्रियें झालीं सगळीं ॥
चाल ॥ सुतदारादिक दुर्धरीं । हांसती पिशुनें[5] सोयरीं ।
सोसेना दुःख अंतरीं ॥
टीप ॥ म्हणउनि तुज प्रार्थिलें कांहीं तरि दया येऊं दे हृदया । धांवुनी० ॥ २

वात पित्त कफ बहुत रोग हे तनु ग्रासिली येणें ।
उपायान्तर कांहीं नेणें ॥
बहु दुःखें दुखविलों दयाळा ! काय गति करणें ।
गुज हृदयींचें कोण जाणे ॥
एका तुजविण दयानिधे ! ऐकुनि मम करुणें ।

---

१. धिंवसा=धीर–ज्ञानेश्वरीमध्येंही 'धीर' असाच अर्थ आहे. " हें अनावरत विचारितां । वायांचि धिंवसा उपजला चित्तां । यन्हवि काइ भानुतेजीं खद्योता । शोभा आथी ! " ज्ञानेश्वरी अ. १ ओ. ६७. २ उसा = उशाशी. ३. लवपलक्षण हरावया:-हरण करतांना त्याला क्षणभर सुद्धां दया येणार नाहीं ४. कवळी:–ग्रासीतसे ५ पिशुन:–पिशुन पिशुना पिशुनम् असा तिन्ही लिंगांमध्यें हा शब्द संस्कृतांत चालतो. दुष्ट निर्दय, चहाडखोर, हलका, कमअस्सल, इत्यादि वाईट अर्थांत या शब्दाचा उपयोग होतो.

सांग बा ! कोण करिल धांवणें ? ॥

चाल ॥ त्वरितगति गरुडावरि बैसुनि । अवलंबें येई ये क्षणीं ।
दाखवीं रूप लोचनीं ॥

टीप ॥ भवभयसंहारका ये यदुनायका परमसदया । धांवुनी० ॥ ३

गोकुलपति गोविंदा श्रीगुरुवरा दीनोद्धारा ।
गोपीपती गोरसचोरा ।
नंदतनय गोवळ्या अरे सांवळ्या ! निर्विकारा ।
विमलरूपा विश्वाधारा
शिणत गिरा शेषाची श्रुतिही थकित न कळे पारा ।
परमपुरुषा पतितोद्धारा ॥

चाल ॥ पावना बुधमानसमोहना । कमललोचना कलुषदहना ॥
कर्ममोचना पक्षिवहना ॥

टीप ॥ देवनाथप्रभुदात्या बाह्यां कवळुनि भेटा या । धांवुनी० ॥ ४

पद ( २२४ )

विठ्ठल त्रैअक्षराक्षरातित अनुभव गुरुपुत्रा ।
तन्मय झाल्या वृत्ति जेणें सेविलि गुरुमात्रा ॥ ध्रुवपद ॥

---

१ धांवणें:--पद ३१० यावरील टीप पहा. शेवटल्या ओळीचा ' देवनाथ प्रभु दात्या या ( आणि ) या दासाला चारी बाह्या भुजांनीं कवळुनि भेटा आलिंगन द्या, ' असा अन्वयार्थ लावायाचा कीं ' देवनाथ प्रभुदात्या ! बाह्यां कवळुनि भेटाया पंढरिराया धांवत ये ' असा धृपदासह अन्वय लावायचा ? यांत ' भेटाया ' हा एकच शब्द धरावा लागतो रसिकांनीं पुढील आवृत्तीपर्यंत सुचवावे. २ कलुष दहना–पाप नाशका. मनुष्य कर्म करितो त्याप्रमाणें त्याला सुखदुःख भोगावें लागतें आणि त्यायोगानें त्याला केलेल्या कर्माचा यथायोग्य मोबदला मिळतो परंतु गुरुकृपेचा अथवा ईश्वरी कृपेचा थोरपणा असा आहे कीं, त्याच्यायोगानें पातक भस्म होतें इतकेंच नव्हे तर पातकाचें मूळ जी दुर्वासना तिचाही पूर्णपणें छेद होऊन मन सकल्पविकल्पांचे पलीकडे पोंचतें आणि निर्विकार स्थितींत रहातें या संबंधानें मोरोपंत म्हणतातः-- प्रायश्चित्तें पापें जळती मूळ वासना राहे ॥ तेही भस्म करावी हें बळ तुझिया चरणीं आहे ॥ ( अहल्योद्धार ) याबद्दल आणिक टीप 'नामाग्नीनें न जळति किमपि न पातकें ऐशीं ' ( पद ३३ ) याखालील टीप पहा. ईश्वर हा पापपुण्याचा मुलच्छेदक आहे आणि एकदां वासनाक्षय झाला म्हणजे निष्काम कर्म मात्र शिलक राहतें, अशा निष्काम कर्त्याला कर्मबंध नाहीं म्हणून कर्ममोचना हे पद लाविलेलें आहे

विहिताविहितविचारण जें तें सभराभरें सर्वीं ।
विजाति ना तें सजात म्हणणें पदार्थ ना पदवी ॥
विधिनिषेधाचा विटाळ नातळे नांत मध्य पूर्णीं ।
विकामलें तें विश्व विलासे चिद्वस्तु बरवी ॥ विठ्ठल० ॥ १
ठक पडलें श्रुतिशास्त्रपुराणा निगम मौन पाठ ।
ठळक स्वानदाची उसळे सुखसिंधुलाट ॥
ठळ ठळ ठळ ठळ ठसणें जेणें पडली ऐक्यगांठ ।
ठसलें श्रीगुरुगोविंद कृपे उजळे आत्मदीठ ॥ विठ्ठल० ॥ २
लक्षालक्षातीतरूप जें रूप अरूप अमलें ।
लक्षण वर्णन नोहे जयाचें शेषहृदय शिणलें ॥
लहरी जयाची अतूट ते गुरुभक्तां अनुसरले ।
लवण जळीं जसें देवनाथ मन स्वानंदीं भरलें. ॥ विठ्ठल० ॥ ३

---

१ सभराभर सभर मोठें, संपूर्ण, फार वजनानें, फार आवाजानें. सभराभर अथवा सभराभरित =अगदीं गर्दी झालेले, अशेष संपूर्णतेनें हा शब्द कवितें-तच सांपडतो विशेषेंकरून वेदांतपर कवितेंत. हा शब्द मोल्स्वर्थच्या कोशांत सांपडतो परंतु माधव चंद्रोबाच्या संस्कृत मराठी कोशांत सांपडत नाहीं ह्या शब्दाची व्युत्पत्ति कशी ? सभराभर सर्वीं=प्रत्येक जातमात्र पदार्थांच्यासंबधानें विहिताविहित विचारण–योग्य कोणतें व अयोग्य कोणते याबद्दलचा विचार.

२ विटाळ नातळे:—विटाळाचा संसर्ग, संपर्क होत नाहीं आतळणें:—संसर्गांत येणें त्याच्याशीं संबध असणें. जसें:–अन्याय आतळों न द्यावे ॥ विधिनिषेधाचा विटाळ नातळे = विधि अथवा निषेधाची कल्पना मनाला शिवत नाहीं विधि=अमुक कर्म अमुक रीतीनें करावं असा नियम धर्मशास्त्रां-त सांगितला असतो तो. निषेध=शास्त्रविरुद्ध वर्तन कवीचा आशय असा कीं, ज्याच्यावर एकदां गुरुकृपा झाली आणि विठ्ठलाच्या ठिकाणीं ज्याच्या वृत्ति तन्मय झाल्या तो सर्व बंधनांना श्रेष्ठ होऊन बसतो. कारण एका ईश्वराच्या ठिकाणीं वृत्ति विलीन झाल्यामुळें त्याचीं बंधनें आपोआप गळून पडतात.

३ ठक पडलें = भ्रम पडला. कळेनासें झालें. ८२ पदांतील 'ठकडा' शब्दा-खालची टीप पहा.

४ ठळक=स्पष्ट मोठी.

५ आत्मदीठ=आत्मदृष्टि,

६ लक्षणवर्णन=परमेश्वराच्या नानाविध गुणांचें वर्णन.

७ अतूट=तूट नाहीं असा अखंड लहरी जयाची अतूट ज्यांच्या अखंड प्रेमलहरी वाहत आहेत असे.

## पद ( २२५ ).

पांडुरंग स्मर अभंग,[1] भंग या भवा ।
सतसंग साधि रंग नीजवैभवा ॥ ध्रुवपद ॥
योग याग तपन[2] चांग साध्यता घडे ।
करिसि सांग साधनांग देह कोरडे ॥
वदसि वाग्विलास,[3] शब्दज्ञान चोखडें[4] ।
आत्मप्राप्तिविना जाण नुगवि सांकडें[5] ॥ पांडुरंग० ॥ १
करिसि साधनासि आस धरुनियां मना ।
श्रमसि व्हावयासि हेतु पूर्ण कामना ॥
शीण व्यर्थ गमत सर्व, भ्रमसि सज्जना[6] ।

---

१ अभंग=नित्य सदोदित भंग या भवा म्हणजे भवपाशाला भंग ठेविलाच आहे. २ योग याग इ० याचा अर्थ जरी " योग याग तपन चांग साध्यता घडे जरि करिसि सांग साधनांग देह कोरडे । जरि वदसि वाग्विलास शब्द-ज्ञान चोखड । तरी आत्मप्राप्तिविना सांकडें नुगवि हें जाण कोरडे=अतिघोर तपश्चर्येनें देह शुष्क होणें ३ वाग्विलास=वाक्पटुत्व. ४ चोखडें= चोखट, सुंदर. ५ नुगवि सांकडें = भवपाश बद्धतेचें परम संकट उगवणार नाहीं=मोकळे होणार नाहीं=त्याची गुंतागुंत सुटणार नाहीं= त्याच्या हिशोबाचा ताळा बरोबर लागणार नाहीं, मोलस्वर्थच्या कोशांत पुष्कळ अर्थ दिले आहेत त्यांपैकीं हे तीनच बरोबर लागतात. नुगवि= नुगवे या शब्दाचें हें वृत्तसुखाकरितां रूप दिलें आहे. ६ करिसि साधनासि इ० = पुढील अन्वयाचेयोगानें अर्थ चांगला लागेलः- हे सज्जना! मना आस धरुनिया साधनाचि करिसि आणि हेतु-कामना पूर्ण व्हावयासि श्रमसि, परंतु सर्व शीण मला व्यर्थ गमत-तूं उगाचि भ्रमसि तेव्हां ( काय कर तर ) स्मर हरीस ( म्हणजे ) पाश तुटति व यातना चुकति. आस=ईश्वरप्राप्तीची आस देवनाथांनीं एका पदांत म्हटल्याप्रमाणें:-

" ते महाहटी करिति तपें बहु कोटी ।
मुनि शिणले महारण्यीं हरी तुजसाठीं ।
तूं जगजेठी न पडसि त्यांचे दृष्टी ।
त्या भक्तास्तव तूं उभा ठेवुनि कर कटीं " ।

कलियुगामध्यें योगयागादिकापेक्षां नामस्मरणानें ईशप्राप्ति लवकर होते या मतावर कवीचा कटाक्ष दिसतो पांडवगीतेंत नामस्मरणाबद्दल म्हटलें आहे.

हरेर्नामैव नामैव नामैव मम जीवन ॥
कलौ नास्त्येव नास्त्येव नास्त्येव गतिरन्यथा ॥

साधन-योगसिद्धि साध्य होण्याकरितां केलेली जपातपादी खटपट.

स्मर हरीस पाश तुटति चुकति यातना. ॥ पांडुरंग० ॥ २

सजल जलदश्यामल हरि अंतरीं स्मरें ।
गुरु कृपाळ चुकवि काळ, वांछिलें पुरे[1] ॥
भव ढिसाळ[2] हा विशाळ भास तैं नुरे[3] ।
देवनाथ जपत नाम निजसुखा भरे. ॥ पांडुरंग० ॥ ३

## पद (२२६)

विठोबा व्यापक जनिंविजनीं. ॥ ध्रुवपद. ॥

भीमरथीतटीं नांदतसे हरि । निजजनसुखदानी ॥ विठोबा० १
अरुपरूप जें पूर्ण निरामय । अद्वय एकपणीं ॥ विठोबा० ॥ २
देवनाथप्रभु आत्मा गोविंद । पाह निजनयनीं ॥ विठोबा० ॥ ३

---

१ वांछिलें पुरे=नुसती इच्छा केली म्हणजे पुरे. यापेक्षा कांहीं करणें नको तुकाराम म्हणतातः–

अहो पडतां जडभारी । दासें आठवावा हरी ।
मग तो होऊं नेदी शीण । आड घाली सुदर्शन ॥

२ ढिसाळ–राजवाड्यांच्या ज्ञानेश्वरीच्या कोशांत सदर्हु शब्दाचा अर्थ थोर असा दिला आहे; मोठा थोरला विशाळ, जगडव्याळ असा अर्थ आहे

"मिथ्या जैसें मृगजळ । कीं स्वप्नींचें राज्य ढिसाळ ।
अहो प्राणी पापी सकळ । धनधान्य पुत्र इच्छिती" शिवलीलामृत ७–२८.

३ भास तैं नुरे–अशी भितीदायक कल्पना रहात नाहीं.

मोलस्वर्थच्या कोशांत ढिसळ, ढिसाळ, ढिसूर, ढिसूळ, असे चार शब्द असून त्याचा अर्थ, of fibre flabby, of loose and soft muscles असा दिला आहे परंतु तो व्यावहारिक अर्थ होय. कविसांप्रदायांतील अर्थ मोलस्वर्थच्या मदतगार शास्त्रीमंडळानें दिलेला दिसत नाहीं. ढिसाळ–स्थूळ, ढिसूळ, भव ढिसाळ म्हणजे बाह्यात्कारीं मोठें आणि महासमर्थ दिसणारें विश्वाचडंबर, पण हें परिणामीं अशाश्वत, ढिसूळ आणि फोंपसें असतें म्हणून याला ढिसाळ म्हटलें आहे. ४, निरामय–रोगरहित.

## पद (२८७)

सये ग बाई ! पुरला मावेंचा हेतु ।
देखिला विठो पंढरिचा फिटली मोतूं. ॥ ध्रुवपद. ॥
कानडा देव सांवळा विटेवरी उभा ।

---

१ सये ग बाई=बऱ्हाणपूरला देवनाथ महाराजाची सईबाई नांवाची गुरुबहीण होती. महाराज पंढरपूरहून आल्यानंतर बाईला व गोविंदनाथ महाराजांना भेटण्याकरिता बऱ्हाणपुरास गेले होते. त्या वेळेला बाईला उद्देशून त्यांनीं हें पद रचलेलें आहे श्रीमारुतीची गोविंदनाथ गुरु माउलीची आणि श्री-विठ्ठलाची कृपा होऊन अति आनंद झाल्याचे उद्गार ह्या पदामध्यें शेवटीं आहेत पंढरीच्या या खेपेमध्यें नाथमहाराजांची व आनंदफंदीचीं पदें तयार करण्यात चढाओढ सुरू झाली फंदीनीं एक पद कोणाच्या स्तुतीपर म्हटलें कीं, नाथमहाराज लागलींच त्याच्या उलट निंदापर पद म्हणत असत, व नाथमहाराज स्तुतिपर म्हणत तर फंदीबावा निंदापर म्हणत. याप्रमाणे उभयतांचें वाग्युद्ध तीन दिवस चाललें याच प्रसगीं फंदीनीं आपला नाना-फडनिसावरचा प्रसिद्ध पोवाडा रचला व नाथमहाराजांनीं नाना फडनिसाची विरुद्ध बाजू दाखविणारें हिंदी भाषेंत "सोबी अक्कलवंत बडा है नसीब शिकंदर उसका " हे पद शीघ्रकवित्वानें म्हटलें या पदाच्या दुसऱ्या कडव्यामध्यें अनंतफंदीच्या पोवाड्याच्या विशेष रीतीनें उल्लेख केला आहे ही गोष्ट सुर्जी अजनगाव येथील देवनाथाच्या गादीवरील कै० भालचंद्रनाथ हे सांगत होते त्यांनीं असेंही सांगितलें कीं, या सरस्वतीपुत्रांच्या कुस्तीमध्यें जीं कांहीं आणीक पदें एकाच विषयावरचीं परतु विरुद्ध प्रतिपादक अशीं उभय कविवर्यांनीं तात्कालिक स्फूर्तीनें म्हटलीं त्या सर्वांचें आपण पंढरपूरच्या यात्रेहून परत आल्यावर संगतवार वर्गीकरण करून देऊ परंतु त्यांचें देहा-वसान काहीं महिन्यांपूर्वी पंढरपुरला झाल्यामुळें हा बेत जागच्याजागीं राहिला.

२. कानडाः—या विशेषणाची उत्पत्ति बरोबर लागत नाहीं रूप-सादृश्यानें हा कान्हा शब्दापासून झाला असेल असें वाटतें. 'गौड बंगाली' शब्दा-प्रमाणेंच ' कर्नाटकी ' शब्द ' अमुक मनुष्य मोठा कर्नाटकी आहे' या वाक्-प्रचारामध्यें लीला नाटकी याअर्थी दृश्यमान होतो. विजयानगरच्या राजानी विठोबाला राजधानीत नेलें होतें, तेथून भानुदासानीं त्याला परत आणिले म्हणून कानडा असें नांव पडलें कीं काय अशीही शंका येते. कानडा म्हणजे अपरिचित अथवा कठीण या अर्थी

गुप्त तेंचि प्रगटवावें । असाध्य तेंचि साधावें ।
कानडें चि अभ्यासावें । सावकाश ॥ ( दासबोध—रामदास. )

( पुढील पृष्ठ पाहा. )

घवघवित त्यां देखिली गजाची शोभा ॥
कासिला पितांबर कासे प्रकाशली प्रभा ।
वेदश्रुति वर्णिति ज्यातें सवितृगाभा ॥
. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . ।
. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . ।
टीप ॥ भक्तांचें साह्य करितो दुष्टां घातू । देखिला० ॥ १

भीमातिरीं नांदे बाई । नाथ दीनाचा ।
वेदश्रुति वर्णिति सये ग । महिमा ज्याचा ॥
जे स्थळिं पुरला बाई काम योगियांचा ।
विभु नांदतसे पंढरिं, पति रुक्मिणीचा ॥
भक्तां आणि अभक्तां जो समगतिचा[1] ।
जिव्हाळा किं ग बाई । विश्वाचा ॥
टीप ॥ लीला हे तुमचे शेषा झाली मातु । देखिला० ॥ २

सनक सनंदन सनकादिकमुनि ध्याती ।
आराध्य दैवत त्याचें चिद्धनमूर्ति[2] ।

---

( ४०३ पृष्ठावरून समाप्त. )

कानडें कानडें वेदासीं कानडें । श्रुतीसी जो नातुडे गीतीं गातां ।
एकनाथगाथा अभंग ५९०.
परेहुनि परता वैखरीये कानडा । विठ्ठल उघडा भीमातटीं ॥
एकनाथगाथा अ० ५९४

पहिल्या कडव्याला मुळांतच पांच ओळी आहेत, सात नाहींत, असें श्रीमंत दाजीसाहेब देशपांडे कळवितात १ भक्तां आणि अभक्तां जो समगतीचा= देवाचा क्रोध जरी झाला तरी तो वराप्रमाणेंच फायदेशीर होतो कारण जे जे दैत्य देवानें मारिले ते ते सर्व वैकुंठाला गेले याबद्दल पांडवगीतेंत श्लोक आहे तो येणेंप्रमाणें

ये ये हताः चक्रधरेण राजन् । त्रैलोक्यनाथेन जनार्दनेन ।
ते ते पुरा विष्णुपुरीं प्रयाताः । क्रोधोऽपि देवस्य वरेण तुल्यः ॥

२. सनकसनंदनादि:—जे परमेश्वराला ध्यातील तेच चिद्धन मूर्ति ईश्वराचें आराध्य दैवत होत. ‘ प्रल्हाद नारद पराशर पुंडरीक ’ इत्यादि श्लोक सर्व प्रसिद्धच आहे.

शुक वामदेव प्रल्हाद भक्त अति सुमती ।
रक्षिला पित्यानें छळितां अभिनव शक्ति ॥
नारायण हरि गोविंदा करुणा उक्ति ।
ऐकतां धांवला विभु जो अति निजप्रीती ॥
प्रगटोनि स्तंभांतरीं मारिला दैत्यू । देखिला० ॥ ३

दुपेक्षी शरणागता आलिया द्वारीं ।
हरि पावन कीं पतिताचा दास साहाकारी ॥
हा अजामीळ आणि गणिका वेश्यानारी ।
तारिले पतित कीं मागें अतिशय भारी ॥
वेदांसी पडलें मौन वर्णितां थोरी ।
काळातित कालियमर्दन भिवरातीरीं ॥
न्टीप ॥ पार्वतीपती शिव ध्यातो हृदयाआंतू । देखिला० ॥ ४

श्रीरुद्रकृपें लाधली सोय ग मोठी ।
सद्गुरुनाथ गोविंद देखिला दृष्टी ॥
श्रीरुद्रनाथ गोविंद विठ्ठल त्रिपुटी ।
ऐक्यत्व जाहलें ठायीं पडली मीठी ॥
देखिले पूर्ण परब्रह्म जगजेठी ।
मोहक तुटला भास कल्पना खोटी ॥
टीप ॥ स्वानंद देवनाथासी समरस युक्तू ॥ देखिला० ॥ ५

## पद ( २२८ ).

पंढरपुरवासिनी विठाबाई ! येई हो ।
सावळिया आनंदें कीर्तनीं विठाबाई ! येई हो ॥ ध्रु० ॥
विठल भक्तांची माऊली । द्रौपदि हे वहिणुली ।

---

१. अभिनवशक्तिः—अतिशय बलिष्ठ अशा हिरण्यकश्यपूनें. हें ‘ पित्यानें ’ याचें विशेषण २ त्रिपुटीः—हा शब्द कर्ता कर्म आणि क्रिया या त्रिसगमार्थी नेहमी योजिला जातो उदा० ध्येयध्याताध्यान, ज्ञेयज्ञाताज्ञान, भज्यभजक-भजन, द्रष्टादृश्यदर्शन, भोक्ताभोज्यभोजन, उदा० ‘ जेथें ज्ञेयज्ञाताज्ञान निश्चित । ध्येयध्याताध्यान नाटक । त्रिपुटी कारण नाहीं जेथ । निजे तेथ निजबाळा ’ ॥

वैरियें गांजितां ते वेळीं । लज्जा त्वां रक्षिली ।
अद्भुत दाविला नवलाये ॥ पंढरपुर० ॥ १

अघभवजळ हा पुर दाटे । उसळति लाटा नेटें ।
कांहीं केल्या हा ना लोटे । संकट पडलें मोठें ।
जिव घाबरला करूं मी काये ॥ पंढरपुर० ॥ २

गजेंद्र नक्रानें गांजितां । आळवि तुज भगवंता ।
केलें धांवणें अनंता । रक्षियलें निजभक्तां ।
दोघे उद्धरिले अतिसदये ॥ पंढरपुर० ॥ ३

[1]माणकोजी बोधला भक्त भला । शरणागत तुज आला ।
छळितां अविधें रक्षिला । वाढविलें कीर्तीला ।
सुखपदिं दिधला [2]निजठायें ॥ पंढरपुर० ॥ ४

---

१. माणकोजी बोधला=हा धामणगांवचा पाटील होता. हा मोठा भगवद्भक्त होता त्याच्या बायकोचें नांव ममतायी त्याला तीन मुलगे होते पहिला लखमोजी, दुसरा यमाजी, तिसरा विठोबा यानें आपलें सर्व शेत लुटविलें होतें, सबब पांडुरंगानीं थोट्या ताटाला कणसें आणिवलीं व शेतांत पुष्कळ पीक होऊन पेवें भरलीं. पांडुरंगानीं साईचें सोंग घेऊन बोधलेबावाची सून मागितली असतां त्यानें मोठ्या आनंदानें यमाजीची बायको भागिरथी ही त्या साईच्या स्वाधीन केली साई तिला घेऊन गांवच्या वेसेपर्यंत गेला व तेथें भागीरथीला टाकून दिलें व तिला आपलें खरें स्वरूप दाखवून देव गुप्त झाले. मुसलमान राजानें बोधल्याची कीर्ति ऐकून त्याला आपल्याकडे बोलावून आणिले व त्याचा छळ करण्याकरितां मांसान्न शिजवून त्याला तें खाण्याचा आग्रह करूं लागला. तेव्हां बोधल्यानें पंढरीनाथाचा धांवा केला असतां मासाचीं फुलं झालीं या शेवटील कथेशीं प्रस्तुत पदाचा संबध आहे. हे धामणगांव पंढरपुरापासून १० कोसावर आहे २ निजठायें—स्वतः-च्या शिरसागराच्या ठिकाणीं किंवा स्वतःच्या अगदीं एकांतस्थानीं 'निज' याचा 'आपला' हा जसा अर्थ आहे तसाच 'विशेष अत्यंत नितान्त' असाहि दुसरा अर्थ आहे निजबोध, निजधाम, निजरूप, निजमूर्ति, निजगूज, निजलेख, निजवस्तु, निजसुकृत, निजसाधन, निजसुख, निजस्वरूप, हीं कवितेंत वारंवार येणारीं दुसऱ्या अर्थाचीं उदाहरणें होत.

तुकारामाचे कीर्तनीं[1] । उल्हाससी निजमनीं ।
अद्भुत प्रभुराया तव करणी । रक्षियलें निदानीं[2] ।
पतितपावन हें ब्रीद माथे ॥ पंढरपुर० ॥ ५
करुणा ऐकुनियां ये आतां । रखुमाईच्या कांता ।
तारीं देवनाथा अनाथा । शरणागत तुज आतां ।
हृदयीं आठवितों तव पाये ॥ पंढरपुर० ॥ ६

पद ( २२९ ).

मौज काय पाहतोसि ठेउनि कर कटीं ।
भीमातीरवासी करिं कृपादिठी[3] ॥ ध्रुवपद. ॥
वर्णिताति श्रुतिगुणास । पावना जगन्निवास ।
विनवि दास बांधि कांस येईं बा त्वरें ॥
मानसीं उदास[4] काय म्हणुनि सांग रे ।
अनाथ दीन, परि मी तुझा, भवभया हरें । मौज० ॥ १
सिंहाच्या बाळकास । कोल्हीं करिती उपहास[5] ।
म्हणुनि त्रास मम मनास आठवीं पदा ।
तूं समर्थ धनी असोनी होति आपदा ।
नवल वाटताहे, बोल लागे तव ब्रीदा ॥ मौज० ॥ २
दाखवोनि त्वरित पाय । चुकवीं सर्वही अपाय ।
तूंचि बापमायगोत सकळही मला ।
घाबरला जीव पायीं वेध लागला ।
खगारिशयन कमलनयन धांव विठ्ठला ॥ मौज० ॥ ३

---

१ तुकारामाच्या कीर्तनीं=तुकारामबोवाचें कीर्तन चाललें असतां तेथें शिवाजीमहाराज कीर्तन ऐकण्याकरितां बसले होते तों तेथें मुसलमानांनीं शिवाजीराजाना धरण्याकरितां घराभोंवतीं वेढा घातला तेव्हां पंढरीनाथांनीं शिवाजीचें रूप धरून घोड्यावर बसुन घोडा त्या घराचे बाहेर भरधांव काढला. तेव्हां तें पाहून सर्व मुसलमान शिपाई त्या घोड्याच्या पाठीमागें पळत सुटले. याप्रमाणें पंढरीनाथांनीं संकट टाळलें २. निदानीं–संकटाचा कळस झाला असता ३कृपादृष्टि. ४ तटस्थ अझून ज्याला कळवळा येत नाहीं असा. हा शब्द उदासीन सिन्न याअर्थी नव्हे. ' कटि कर ठेवोनि उभा काय मौज पहासि ' ५ ' सिंहाच्या बाळकासि गांजिताति कोल्ही । हे लाज कुणा आली । पतित पावन दिनानाथ ब्रीद प्रतिपाळीं ॥

सद्गुरू गोविंदनाथ । म्हणविशी अनाथनाथ ।
तरि हितार्थ मम, यथार्थ दाविं निजरूपा[1] ।
भक्तिहीन म्हणुनि काय करिसि ना कृपा ।
देवनाथ विनटे नामीं साडिला त्रपा ॥ गोविंद० ॥ ४

पद (२३०).

तारक ब्रह्म विटेवरी उभें । पाहें समपद[3] शोभे ॥ ध्रुवपद ॥
मयूरमुकुट शिरीं अनुपम । निजतेजें उद्दाम ।
कस्तुरीतिलक बरा अतिरम्य । रेखियलें ललामें ॥ तारक० ॥ १
मकराकृति कर्णीं कुंडल । सुंदर श्रीमुखकमळ ।
कमललोचन हा घननीळ । सच्चिद्धन गोपाळ ॥ तारक० ॥ २
द्विजपदचिह्न पहा हृदिं मिरवे । कटिं कर ठेविले बरवे ।
कासही कशियेली पितांबरें । सुंदर रूप साजिरें. ॥ तारक० ॥ ३
बांकी तोडर हे नखीं चंद्रकळा । ध्यातो हृदिं शिव भोळा ।
ध्वजवज्रांकुश हे पादतळीं । वामांगीं धृत कमळा ॥ तारक० ॥ ४

---

१ पूर्वील एका पदामध्यें निज शब्दाचे वेग वेगळाले अर्थ दिलेलेच आहेत निजरूप=स्वतःच अत्यंत गुप्त गुह्यात् गुह्यतर कोणालाही नकळूं देण्याचे असें स्वरूप मोलस्वर्थच्या शास्त्र्यांनीं याच शब्दाचे चिन्मयकला शिवात्मा असे दोन अर्थ दिले आहेत २ लज्जा विनटे =लीन होई जडून जाई. ३ समपद=संस्कृतमध्यें हा शब्द नपुंसकलिंगी आहे व त्याचा अर्थ धनुर्धरादिकांचेसारखे पाय ठेऊन जें उभें रहाणें तें असा अर्थ माधव चंद्रोबा यांनीं संस्कृत मराठी कोशांत दिला आहे ४ महान्, मोठा प्रबळ, समर्थ, तेजस्वी ५ हा शब्द पुल्लिंगी व नपुंसकलिंगी असा उभयलिंगी आहे याचा अर्थ चंदनादिकांचा कपाळास जो तिलक अथवा पुंड्र लावतात तो ६ भृगु ब्राह्मणानें ईश्वरांला प्रहार केला तें पदचिन्ह परमेश्वरानें मोठ्या आवडीनें आपल्या हृदयावर अभंग धारण केलें अशी कथा आहे या श्रीविष्णूच्या उरस्थलावरील पदलांछनाला श्रीवत्स असें नांव आहे ७ परमेश्वराच्या पदकमलतलावर ध्वज, वज्र आणि अंकुश हीं तीन चिन्हें आहेत याबद्दल अनेक कवींनीं वर्णन केलें आहे. भागवतकारांचा खालील श्लोक प्रसिद्ध च आहेः---

" संचिंतयेत् भगवतश्चरणारविंदवज्रांकुशध्वजसरोरुहलांछनाढ्यम् ।
उत्तुंगशोणविलसन् नखचक्रवाल–ज्योत्स्नाभिराहततमो हृदयांधकारम् "

( पुढील पृष्ठ पाहा. )

ग्रा. क्र.

निर्गुण निजरूप परात्परें । भक्तांस्तव साकार ।
वर्णितो गुणलीला साचार । न कळे त्याचा पार ॥ तारक० ॥ ५ ॥
सद्गुरु गोविंद अभेद । भेदातीत निर्द्वंद्व ।
देवनाथ स्वानंद । ब्रह्मीं ब्रह्मानंद. ॥ तारक० ॥ ६ ॥

## पद ( २३१ ).

येईं सांवळे विठाबाई । मजला झडकरी भेटि देई ॥ ध्रु० ॥
कीर्तनीं नाम तें तुझें । म्हणुनि हांसती लोक मज ।
सांडिली आम्ही हे लाज । बेशरम जालों निर्लज्ज ।
परि अंतरीं एक काज । दाखविं मज चरणांबुज ।
विश्व तारक तूं महाराज । घातलें तुजवर हें ओझें ।
दया येउंदे तुझे हृदयीं । मला झडकरी भेट देईं ॥ १
जन्म देतां तुज शिण आला । चरण हस्तानें बहु श्रमला ।
बोलतां लाज वाटे तुजला । मुका होउनी स्तब्ध जाला ।
हाका मारितां दूर गेला । दृष्टी न पुरे देखण्याला ।
नेत्रकमळानें अंध झाला । दोहि श्रवणानें बधिर झाला ।
काय करूं सांग माझे आई । मजला झडकरि भेट देईं ॥ २

---

( ४०८ पृष्ठावरून समाप्त. )

' राजा, ह्याप्रमाणें गोपींनीं अनेक कृष्णलीला करून दाखविल्या. त्यांनीं वृंदावनांतील वृक्षांना व वेलींना श्रीकृष्णाचा मार्ग वारवार विचारला, परंतु त्यांना शोध लागला नाहीं अखेरीस फिरतां फिरतां एका वनप्रदेशांत धुळीवर श्रीकृष्णाचीं पावलें उमटलेलीं त्यांच्या दृष्टीस पडलीं. त्यावरील ध्वज, कमल, वज्र, अंकुश व यव हीं चिन्हें पाहून त्या गोपी त्या मार्गानें श्रीकृष्णाचा शोध करीत चालल्या. '

—श्रीमद्भागवत दशमस्कंध अध्याय तिसावा

१ या शब्दावर मागे टीप दिलीच आहे. परमेश्वराचें अत्यंत गुह्य व अभक्तांना न कळू देण्याचें असें ज्ञानस्वरूप निर्गुण परमेश्वर भक्तांची होस पुरविण्याकरितां साकार होतो, म्हणजे सगुणरूप धारण करितो हा त्याचा सर्व भक्तांवर अतिशय अनुग्रह झाला म्हणून सर्व भक्तांनीं व कवींनीं फार कृतज्ञता बुद्धीनें कौतुक केलें आहे.

घातला भवसागरीं फांसा । कसा काढिशील जगदीशा ।
अमित झाला प्राण पेसा । तळमळि जिवनाविण मासा ।
लागली संसारीं आशा । अतां जिव असतोरे कैसा ।
ते भोगतां दुष्ट दशा । परी मिळेना एक पैसा ।
श्रीहरी सांग तूं कांहीं । मला झडकरी भेट देईं ॥ ३
विश्व तारके माय बहिणी । लागला छंद तुझे चरणीं ।
याव संसारदुःखहरणी । लक्ष्मी तूं जगज्जननी ।
अभय हस्तक ठेवि दोनी । देह ठेविला तुझे चरणीं ।
रामकृष्णातें आळवोनी । नित्य तुझे गुण गातों मनीं ।
देवनाथ अहर्निशीं ध्याई । मजला झडकरि भेट देईं ॥ ४

## पद ( २३२ ).

पतित पावनारे शरण पातलों मी द्वारीं ।
पतित थोर लाहे दीनानाथा मज तारीं ॥ ध्रुवपद ॥
पतित थोर थोर मागें तुवां तारिले हो ।

---

१ गळ, पाश. दुसऱ्या कडव्याचा अन्वयार्थ बरोबर लागत नाहीं. मला जन्म देतांना तुज शीण आला, मी तुझे चरणसंवाहन नित्य करितों म्हणून मम हस्तानें तव चरण श्रमला, म्हणून तुजला बोलतां लाज वाटे ? तूं मुका होऊन स्तब्ध झालास ? ( म्हणून माझ्या हाकांना ओ देत नाहींस ? ) कीं मी हांका मारतांच दूर झालास ( मला तारावयाचें नाहीं म्हणून ) ? कीं मला देखण्याला पाहण्याला तुझी दृष्टि नपुरे ? (तुझ्या दृष्टीचा पल्ला इतका दूरवर पोंचत नाहीं) कीं तूं नेत्रकाळानें अंध झाला ? कीं तू दोन्ही श्रवणांनीं बधिर झाला ? माझे आई ( तुझें लक्ष मजकडे लवकर लागावें याजसाठीं ) मी काय करूं तें सांग व मला झडकरी भेट देईं " असा अन्वयार्थ, कीं हीं सर्व वर्णनें भक्ताचीं स्वतःबद्दलचीं आहेत, किंवा दोन्ही वर्णनांची सरमिसळ आहे याचा उलगडा होईल तर बरें. लाहे-लाधे, भेटे, मिळे, पावे, फायद्यांत सांपडे. लाधणें-लाभणें याचें कवितेंत लाहणें हें रूप आहे. उ० " मेलाचि मरोनि लाहे । गेलाचि जावोनि लाहे कर्मवशें" ( २ ) ' मातरी जैसें तोय । साखर घालितां गुळचट होय । लवण मिळवितां पाहें । क्षारत्व लाहे तात्काळ.

ऐकोनि कीर्ति कानीं पायीं धरिला तुझिया लाहो ।
उशीर न लावीं, तारावया मजला हो ।
धांवणें करीं वेगें देवा रुक्मिणीनाहो ॥ १
तारियेली गणिका वेश्या पापी विप्र अजामेळा ।
यमपाश लिंगदेहा पडी ऐसीया वेळां ।
पुत्रमिषें नाम घेतां उडि घेसी उतावेळ ।
सोडविलें ब्राह्मणातें ऐसा होसी कृपाळ ॥ २
ओढियेला जळीं जेव्हां नक्रें देउनियां मिठी ।
न चलेची बळ त्याचें गज पडिला संकटीं ।
आठविले पाय तूझे नाम धरियेलें कंठीं ।
धांवोनि सोडविला पशु तुवां जगजेठी ॥ ३
दुःशासनें सभेमाजीं वस्त्रें फेडितां वेळीं ।
संकट जाणुनीयां अट्टाहासें पांचाळी ।
तुजलागीं बाहतांचि धांउनिया वनमाळी ।
पुरवोनि वस्त्रें तेव्हां लज्जा तिची रक्षियेली ॥ ४
मिराबाईसाठीं रामा घेसी विषाचा प्याला ।
सखुबाई पाठविली पढारीसि यात्रेला ।

---

१ लाहो=अतिलोभ. अत्युत्कट इच्छा. लाहो घेणें अथवा लाहो धरणें असा शब्द प्रयोग. हा शब्द मूळचा हिंदुस्थानींतला व तीतून मराठी भाषेंत आला असें मोल्स्वर्थ म्हणतो लाहो धरला =अतिलोभ धरिला, तुझ्या परप्राप्तीची अत्युत्कट इच्छा धरली. ( २ ) नफा, फायदा, लाभ 'प्रपच साधुनि ' परमार्थाचा लाहो ज्यानें केला । तो नर भला भलारे भला ' ( ३ ) सदोदितचा आक्रोश, टाहो ' शोकांत हा घे प्रभुनामलाहो ' २. अट्टाहासें=अति आक्राशाने, अति आग्रहानें ३. मिराबाई-उदेपूरच्या राजाची सून ही ईश्वरभक्तींत लीन होऊन साधुसंताच्या सेवेंत निमग्न असे, आणि प्रपचापासून विरक्त झाली होती. हें पाहून तिच्या नवऱ्यानें तिला पिण्याकरितां विषाचा पेला पाठवला ती तें विष शांतपणें प्याली, पण तिला त्याची कांहींच बाधा न होतां मंदिरांत श्रीकृष्णाचा गळा मात्र निळा पडला. हिची कविता फारच सुरस आहे ४ सखुबाई–संत सखू हें हरी नारायण आपटे यांचें नाटक पहा अथवा वाचा. भक्तासाठीं तो जगजेठी काय काय करावयाला तयार असतो याचा हा उत्कृष्ट मासला आहे.

धरोनियां रूप तीचें भ्रताराचा पूर्ण केला ।
काम, त्या काय वाणूं, न कळे अद्भुत लीला ॥ ५
दामाजीपंत भक्त पडतां संकटीं होगा ।
महार जाहलासी रसद भरियेली वगा ।
बोधल्यांचें पिकविलें पीक भक्तजिवलगा ।
दासाचा साभिमानी वेद गाति श्रीरंगा ॥ ६
निजांगेंसि होउनि वाणी शिंपिसी धान्य मोणी ।
लडीवाळ नामयाचा पाळितोसि चक्रपाणी ।
× × × ×

---

६ दामाजी मंगळवेढेकरानें दुष्काळांत बादशहाचें कोठार फोडून वांटलें आणि रयत बचावली सरकारधरणें आलें तेव्हां पांडुरंगाला संकट पडून त्यानें महाराचें रूप धरून सर्व रक्कम सरकारांत पटवली

' अनंत ब्रह्मांडें ज्याचे पोटीं । सांवळा जगजेठी ॥
काळी घोंगडी काळी काठी । काळा दोरा कटीं ॥
बोली महाराची शुद्ध मराठी । नेसुनि लंगोटी ॥
पायीं वाहणा मोठा शाहणा । ऐसें दिसतें रूप जयाचें ॥

हें त्या विठ्या महाराचें रूप अमृतराय आपल्या अमृतवाणीनें वर्णितात.

७ बोधला. माणकोजी बोधला पाटील पंढरपूरजवळील धामणगांवचा राहणार यानें आपलें शेत गरीबांकडून लुटविलें तेव्हां परमेश्वरानें थोट ताटांना कणसें आणलीं आणि रितीं पेवें भरलेली दाखवलीं ( महिपती–भक्तलीलामृत अ ५१) बोधल्यांनीं हासी नांवाच्या दासीला मुक्ति दिल्याची व प्रेत उठविल्याची अशा दोन कथा नामदेवाच्या गाथेंत आहेत, पण त्या महीपतीमध्यें आढळत नाहींत.

८ कोणत्या वाण्याचें रूप धरिलें होतें ? ही कथा काय आहे तें लक्षात येत नाहीं.

९ नामदेवाचा बाप दामाशेटी याचा श्रीविठ्ठलास नैवेद्य दाखविण्याचा नित्य क्रम असे. त्याना परगांवीं जावें लागले तेव्हा घरांतील लहान लेंकरूं नामदेव यानें देवाला नैवेद्य नेला, आणि पांडुरंगमूर्ति तो खाईना म्हणून उपास करून बसले, तेव्हां विठ्ठलाच्या पाषाणमूर्तीनें तो नैवेद्य खाल्ला अशी कथा आहे

दुसरी कथा ( संतलीलामृत अ. ८ वा ) अशी आहे कीं, पांडुरंगानें ज्ञानदेवाला स्वहस्तें समाधी दिल्यावर ज्ञानोबाच्या विरहानें व्याकूळ झालेल्या नामदेवानें पुन्हा ज्ञानदेवाची भेट करा असा हट्ट धरला व तो त्याचा हट्ट परमेश्वरानें पूर्ण केला.

अभंग तुकयाचे कागद तारियेले जीवनीं ॥
पैठणीं एकनाथा गेहीं[11] वाहतोसि पाणी ।
अघटित वर्णवेना लीला तुझी मोक्षदानी ।
उसंत[12] क्षण ही नाहीं दिवस आणि रजनी ।
कबीराच्या[13] मागावरि शेले विणसी चक्रपाणी ॥ ८
भानुदास[14] रोहिदास[15] कूर्मदास[16] रामदास[17] ।

---

१० तुकारामानें वेदांचा सारांश आपल्या अभंगांत सांगितला या अधर्माबद्दल रामेश्वर ब्राह्मणानें त्याच्या वह्या त्याजकडून इंद्रायणीच्या डोहांत बुडविल्या, परंतु त्या पांडुरंगानें तेरा दिवस डोहांत कोरड्या ठेविल्या, आणि त्याच्या दृष्टांतानें भक्तमंडळानें डोहांतून बाहेर काढल्या.

११ 'श्रीएकनाथ सदनी माधवजी सर्व काम तो करितो । स्वकरें चंदन घांशी गंगेचें पाणि कावडी भरितो' मोरोपंत.

१२ उसंत=उसथ =उसधि (उत्+संधि) स्त्रीलिंगी शब्द=विसावा, रिकामपणा.

१३ कबीर व त्यांचा पुत्र कमाल हे दोघेही हिंदुदेवतांची उपासना करणारे परम भक्त यांची आठवण वैष्णववीर फार प्रेमानें काढतात कबीराची स्त्री अशीच सत्वधीर होती कमालाचीं पांडुरंगावरील उत्कृष्ट सहा पदें आवल्यांच्या गाथापंचकांत पहा १४ विजयानगरचा रामराजा परमभागवत बनला, आणि देवाजीचे पाय न अंतरावे म्हणून त्यानें विठ्ठलमूर्ति पंढरीहून उचलली, ती विजयानगराला नेली- तेथें भानुदास देवाला भेटला देवानें रत्नमाला त्याच्या कंठीं घातली, तेव्हां दुसऱ्या दिवशीं राजदूतानीं त्याच्यावर चोरीचा आरोप आणून त्याच्या वधाकरितां शूळ तयार केला, तों त्या शुळाचा पल्लवित वृक्ष बनला हें पाहून सर्व राज्याधिकारी शरण आले, आणि भानुदास विठ्ठलमूर्तीला घेऊन पंढरपूरला परत आले. यांचा पुत्र चक्रपाणी, नातू सूर्यनारायण, आणि पणतु श्रीएकनाथ महाराज १५ रोहिदास हा चांभार जातीचा वैष्णववीर. महीपति ( भक्तलीलामृत अ. १२ वा ) लिहितात कीं, हा पूर्वाश्रमी रामानंदाचा ब्राह्मणशिष्य होता. एकाच घरून संपूर्ण भिक्षा न आणावी अशी गुर्वाज्ञा असतां यानें पावसाची झड असल्यामुळें वाण्याकडून दोघांपुरता शिधा दान घेतला. गुरूनें पुढील जन्मीं चांभार होशील असा शाप दिला तो खरा झाला, पण पूर्वपुण्यानें भगवद्भक्ति कायम राहिली. याचा व कबीराचा मनोरंजक वाद व दोघांना ईश्वराचें सगुण स्वरूपाचें दर्शन या गोष्टी महीपतीमध्यें वाचाव्या १६ कूर्मदास याची माहिती महिपतीच्या भक्तविजय ( अ. १६ ) ग्रंथांत पहा, हा पैठण येथील राहणारा जातीचा ब्राह्मण, हा जन्मापासून पांगळा व थोटा होता. याची समाधी लऊळ येथें आहे. भक्तविजयांत याची विशेष जास्त माहिती सांपडेल. १७ रामदास—श्रीसमर्थ महाराष्ट्रगुरु.

चोखामेळी[18] सेनान्हावी[19] आवडता माधवदास[20] ।
पिपाजी[21] सांवता[22] माळी प्राणसखा सूरदास[23] ।
अभिमान तुज त्यांचा त्यांणीं धरिली तुझी कास ॥ १

---

१८ चोखामेळा—महार देव याच्या हातचें जेवीत असे, अशी वार्ता उद्भवल्यावरून याला नांगराला बांधून ठार मारावें अशी सरकारांतून शिक्षा झाली असतां पांडुरंगानें याला वांचविलें. देवानें याच्या बहिणीचें रूप धारण करून महिनाभर याच्या बायकोचें बाळंतपण केलें. मंगळवेढ्याला गांवकुसू बांधावयाला याला विगारीनें धरून नेलें त्यांत तट कोसळून पडून याच्या सकट बरेच महार मेले, नामदेवानें प्रभुप्रेरणेने त्यांचें अस्थिविसर्जन केलें तेव्हां त्या अस्थि अखेरपावेतों नामस्मरण करीत होत्या अशी कथा नामदेवाच्या गाथेंत आहे. सन १९१४ च्या मासिक मनोरंजनांत रा. टिपणीस याचा सुंदर लेख आला आहे तो पहा. १९ सेना—न्हावी याच्यावरील देवनाथाचें पद पुढें पहा—याची कथा भक्तविजयाच्या ३४ व्या अध्यायांत पहावी. २० माधवदास—याची कथा महीपति ( संतलीलामृत अ. ४४ ) मध्यें पहा. हा महापंडित पण दरिद्री होता, किंचित् व्यावहारिक द्रव्य देवापुढें ठेवण्याचें त्याला सामर्थ्य नसल्यामुळें पंडेलोकांनी दर्शनाला अटकाव केला असतां यानें तीन दिवस उपोषण केलें. तेव्हा रमामाधवांनी येऊन याला भोजन घातलें आणि दर्शन दिलें. देव आपली रत्नजडित झारी याच्याजवळ विसरले ती दुसऱ्या दिवशीं लोकांनीं पाहिली तेव्हां त्यांना याचा साक्षात्कार पटला. आणखी याच्या पुष्कळ कथा दिल्या आहेत. दुसऱ्या आणिक एका माधवदासाची कथा भक्तलीलामृत अ. ४७ मध्यें दिली आहे. २१ पिपाजी—हा मध्यप्रांतांतील गढे मंडळाचा राजा—याला रामानंदांनीं उपदेश दिला. हा वैराग्यानें प्रपंचत्याग करून निघाला असतां त्याच्या अनेक स्त्रियांपैकीं पट्टराणी सीताबाई ही मात्र याच्याबरोबर गेली, वाटेंत वाघ भेटला असतां हांक मारताच तो याच्या पायांवर लोळू लागला. हा व याची बायको प्राचीन द्वारका पाहण्याकरितां समुद्रांत गेलीं असतां सात दिवस पाण्याखालीं राहिलीं आणि तेथें देवानें त्यांना द्वारका दाखविली. अशी कथा महिपति (संतलीलामृत अ. २१) सांगतात. २२ सांवतामाळी—याबद्दलचें दयाळनाथाचें पद पहा. २३ सुरदास—उत्तर हिंदुस्थानांतील सुप्रसिद्ध कवि, याला तुळशिदासाच्या बरोबरीचा मान आहे. याची कविता पुष्कळ आहे. हा जन्मांध होता, परमेश्वरानें याला दृष्टि देऊन सगुण स्वरूप दाखविलें, तेव्हां ईश्वररूप पाहिल्यानंतर इतर गोष्टी पाहिल्या असतां मतिभ्रंश होईल व तें सगुणरूप मनांतून नाहींसें होईल या भीतीनें यानें आपल्याला पूर्वीप्रमाणें आंधळा करून घेतलें.

सोनार नरहरी[24] गोरा[25] कुंभार भक्त ।
तुडविलें मातीमाजी बाळ कळें जावंत ।
घाबरा जीव जव्हां जाला तृषाक्रांत ।
सीतारामा धांव वेगें अट्टाहासें आक्रंदत ।
जीवन देऊनि वांचविला दास जनजसवंतें[26] ॥ १०
गणेशनाथ[27] बहिणाबाई[28] मालो नरहरी[29] दास ।

---

२४ नरहरी सोनार—हा जातीचा लिंगाईत सोनार. याचे कांहीं अभग प्रसिद्ध आहेत जास्त माहिती भक्तविजय अ. २० यांत पहावी. २५ गोराकुंभार—बालेघाटावरील तेरढोकगांवचा हा राहणारा हा ज्ञानेश्वराचा समकालीन होता जास्त माहिती भक्तविजय अ. १७ यांत पहावी यानें कामव्यवहार हातांना घडला म्हणून दोन्ही हात तोडून घेतले, ते भजनरंगांत असतां पांडुरगानें पूर्ववत् केले भजनाच्या नादांत याचे पोर पायांखालीं मेलें तें देवाने जिवत केलें २६ जनजसवत हा माध्यदिन ब्राह्मण तापीतीरीं बरेट गांवांत रहात होता तापी नदीला तीन दिवस पूर येऊन गांव वाहून जात असतां याच्या प्रार्थनेने प्रसन्न झालेल्या पांडुरगानें नदीचें सर्व पाणी शोषवून घेतलें ( भक्तलीलामृत अ. ५० ) २७ गणेशनाथ ( भक्तिविजय अ० ५५ ) रा वि० ल० भावे हे आपल्या महाराष्ट्र सारस्वतांत लिहितात कीं, "गणेश नाथाचीं कांहीं पदें मात्र उपलब्ध आहेत. हा शिवाजीचे अमदानींत असावा." जास्त माहिती भक्तविजयांत पहा २८ बहिणाबाई " स्त्रियामाजी देखिली ताई। तैशीच वेणा बहिणाबाई । रामदासांकित गिरिबाई। नुक्षिया पायीं विनटली " देवदासकृत संतप्रशस्ती, ही औरंगाबाद तालुक्यांत शिरूरची राहणार. ही तुकारामाची शिष्यीण हिचे सुंदर अप्रसिद्ध अभग रा धोंडो विश्वनाथ उमरखानी यांनीं छापविले आहेत २९ मालो नरहरी—नरहर धुंडिराज मालू भक्तकथामृताचा कर्ता तो हा असावा, हा भक्तकथामृता मध्यें अमृतराय व मध्वमुनीश्वर यांचें वर्णन देतो, व गोविंदनाथ आपल्या संतप्रशस्तींत याचें वर्णन देतात हा शिवदिनकेसरीचा शिष्य, शिवदिनची समाधि इ० स० १७७४ मध्यें झाली, व काव्यसंग्रह ( अनेक क ल, का. मा. भाग ४. पा. १४० मध्यें दिलेली नाथनामावळी शिवदिनच्या मरणानंतर असावीशी वाटते

आवडता लिंबराज[३०] वाहविलें जीवनास ।
वडवाळसिद्धनागा[३१] बहिरापिसा[३२] उदास ।
सेख लतीफ[३३] रामराजा[३४] ज्याचा महिमा विशेष ॥ १९
मच्छिंद्र गोरखनाथ[३५] गयणनाथ[३६] निवृत्ति[३७] ।
सोपान[३८] ज्ञानदेव[३९] मुक्ताबाई[४०] आदिशक्ती ।

---

३० हे कोण ? — ३१ वडवाळसिद्धनागा—या सिद्धांचें मुख्य स्थान श्रीक्षेत्र वडवाळ हें जी. आय पी. रेल्वेवर मोहोळस्टेशनाजवळ दक्षिणकडे एक मैलावर आहे. हे वडवाळकर सिद्धपुरुष नागनाथ यांचे शिष्य राघवचैतन्य, केशवचैतन्य व बाबाचैतन्य हे तिघे बंधु होत आणिक शिष्य बहिरापिसा तुकाराममहाराजाचे गुरु बाबाचैतन्य होत असें निरंजनस्वामीकृत केशवचैतन्य-कथाकल्पतरूच्या टीपेंत दिलें आहे महीपति हे तुकारामाचे शिष्य ३२ बहिरापिसा—हा जातीचा ब्राह्मण परळी वैजनाथ येथील राहणार. याची भागवताच्या दशमस्कंधावर मराठी ओंवीबद्धटीका आहे विशेष माहिती भक्त-विजय. अ ४४ येथें पहावी. हा वडवाळसिद्धनागा याचा शिष्य होता असें काव्यसंग्रहांतील उद्धवचिद्घनाच्या ग्रंथांतील साक्यांवरून दिसतें हा खाना-पूरचा राहणार असें गोविंदनाथाच्या संतप्रशस्तींत आढळतें ३३ शेख लतीफ हा जातीचा यवन, अवलियासाधु होता. तुकारामाच्या पूर्वीं होऊन गेला असा-वासें वाटतें, कारण मोरोपंत सन्मणिमालेंत म्हणतात:—

" ख्यात, तुकारामस्तुत, साधुसभाप्राणवल्लभ, लतीफा ।
हृदया स्मर त्यासिं, असो श्रीभगवद्भक्तजाति भलती वा "

परंतु तुकारामबोवांच्या गाथेंत याबद्दल उल्लेख आढळला नाहीं

३४ रामराजा—विजयानगर अथवा विद्यानगर ( अनागोंदी ) चा किरीटी रामराजा हा महा विठ्ठलभक्त होता यानें विठ्ठलमूर्ति पंढरीहून नेऊन आपल्या मंदिरीं स्थापिली, ती भानुदासानें एकादशीला पुन्हां परत आणली.

३५—४० मच्छिंद्रनाथांचे शिष्य गोरक्षनाथ, व त्याचे शिष्य गैनीनाथ. विठ्ठलपंताचीं चार मुलें निवृत्ती, ज्ञानदेव, सोपानदेव, मुक्ताबाई हीं सन्याशा-च्या पोटचीं म्हणुन जातिबाह्य, पण गैनीनाथांनीं निवृत्तिनाथांना अनुग्रह केला, व निवृत्तींनी ज्ञानदेवाना उपदेश दिला सोपान व मुक्ताबाई यांनी ज्ञानदेवांचा मंत्र घेतला मुक्ताबाईचा शिष्य विसोबा खेचर व त्याचा शिष्य नामदेव. गैनीनाथांनी निवृत्तिनाथांना त्रिंबकेश्वरीं अनुग्रह दिला असें आवट्यां-च्या गाथापंचकांत आहे.

प्रत्यक्ष रूप तुझें अद्भुत त्रिभुवनीं ख्याति ।
वर्णितां वर्णवेना गातां भागल्याति श्रुति ॥ १२
नारा[४१] माहदा[४२] विठा[४३] गोंदा[४४] ज्याचा अद्भुत प्रेमरंग ।
राजाबाई[४५] गोणाबाई[४६] जनाबाई[४७]चेनि संगें ।
दळूं कांडूं लागलासि आपुलेनि निजअंगें ।
हर्ष बहुत तुज वाटे लिहितां जनीचे अभंग ॥ १३
कान्हो पाठक[४८] भक्तराज आवडती कान्होपात्रा[४९] ।
निंबराज[५०] जयरामदास[५१] पढियंता विश्वसूत्रा ।

---

४१–४७ हे एकच घर होतें. खालील वृक्ष पहा.

दामाशेटी × पत्नी गोणाबाई

नामदेव × पत्नी राजाई — आऊबाई

नामदेव × पत्नी राजाई: नारा, महादा, गोंदा, विठा, लिंबाई कन्या

जनी अथवा जनाबाई ही दामाशेटीला अर्पण केलेली दासी होती. यांच्या कथा सुप्रसिद्धच आहेत. ४८. कान्हो पाठक–केंदूर गांवांत राहणारा विरक्त भगवद्भक्त. ( संतलीलामृत अ. ३२ ). याची कीर्ति ऐकून एकजण याला भेटायला आला, आणि याला शेंबड्या पोरीला खेळवतांना पाहून त्यानें याची निर्भर्त्सना केली, आणि पोरीचा मायापाश सोड असा उलटा उपदेश केला. यानें तात्काळ पोर विहिरींत टाकली पाहुणा पश्चात्तापानें पायां पडला, तेव्हां मूल आपोआप विहिरींतून वर चालत आलें अशी कथा आहे ४९ कान्होपात्रा–मंगळवेढें येथील श्यामा नायकिणीची ही कन्या ही दामाजीपंताचे वेळीं होती ही विठोबाची भक्तीण होती वि० मा० भक्तविजय अध्याय ३९ येथें पहावी ५० निंबराज– यांना गणपतिप्रसादानें उत्कृष्ट कवित्वस्फूर्ती आली; विठ्ठलानें याना ब्राह्मणरूपानें तुळशीमाळा आणि मेखळा दिल्या, आणि कीर्तनांत देव यांच्या खांद्यावर बालरूप धारण करून बसले होते ( भक्तविजय अ. ५१ वा. ) हे तुकारामाचे समकालीन ५१ जयरामदास– वडगांवकर स्वामी. हे रामदास पंचायतनांतील एक होत. " कृष्णकृपेचा सुकाळ

( पुढील पृष्ठ पाहा. )

विसा खेचैर[52] दासोपंत[53] देउनि भवरोगमात्रा ।
तारिति ते विश्व सारे भक्त तुझे राजीवनेत्रा ॥ १४
आचार्य गुरूदेव शंकरभारती[54] राजा ।
पिंगळा[55] महाज्ञानी परसा भागवत[56] दोजा ।
पुरंदर विठ्ठल[57] राजा ज्याची वैकुंठीं ध्वजा ।
वर्णावे किति वाचे भक्त तुझे गरुडध्वजा ॥ १५
श्रीधर स्वामी[58] ब्रह्मानंदप्रिय जगमित्रनागा[59] ॥
आत्यास्वामी[60] रंगास्वामी[61] दास तुझे श्रीरंगा ॥

---

( मागील पृष्ठावरून समाप्त )

झाला । दास जयराम भाग्यासि आला " असें यांनी आपल्या एका अभंगात म्हटलें आहे भागवतदशमावर टीका, अपरोक्षानुभवावर टीका, इत्यादि यांचे ग्रंथ आहेत रा अजगांवकर कृत कविचारित्रांत यांचें चरित्र चांगलें दिलें आहे

५२ विसाखेचर—हा साधु बारशी येथें राहणारा जातीचा ब्राह्मण. हा नामदेवाचा गुरु होता सराफीचा धंदा करीत असे ५३ दासोपंत—हा जोगाईच्या अंब्याचा राहणारा जातीचा ब्राह्मण. नृसिंहसरस्वतीचा शिष्य होता हा शके १५३६ त मृत्यु पावला दासोपंतकृत गीतेवर मराठी ओंवीबद्ध टीका ग्रंथ हा ग्रंथ सवा लक्ष आहे ५४ शंकर भारती—हे कोण ? ५५ पिंगळा ( पिंपळा )— ही कोण ? ५६ परसा भागवत—हा पंढरपूरचा ब्राह्मण विशेष माहिती भक्तविजयांत पहा हा लोकांस ' परिसा भागवत ' म्हणजे भागवत ग्रंथ ऐका असा उपदेश करीत असे म्हणून लोकांनीं त्याला ' परिसा भागवत ' नांव दिलें ५७ विठ्ठल पुरंदर—हा सुमारें १५० वर्षांमागें होऊन गेला याचें नांव विठ्ठलपंत पुरंदरे. ह्याची कानडी भाषेंत कविता पुष्कळ आहे ५८ श्रीधरस्वामी—जन्म श० १६०० झाला, व श० १६५० त मृत्यु याचे हरिविजय, रामविजय, पांडवप्रताप वगैरे ग्रंथ प्रसिद्ध आहेत हा रंगनाथ स्वामीचा पुतण्या होता ५९ जगमित्रनागा—हा परळी वैजनाथ येथील राहणारा ब्राह्मण ( भक्तविजय अ १९ ) मोठा वैराग्यशील आणि भगवद्भक्त. हा, नामदेव, सांवत्या माळी, गोरा कुंभार व परिसा भागवत हे समकालीन. ६०–६१ आत्यास्वामी रंगास्वामी—रंगनाथस्वामी निगडीकर यांना येथें रंगास्वामी म्हटले आहे हे रामदास, केशवस्वामी, जयराम, आणि आनंद मूर्ती या पांच जणांना 'रामदासपंचायतन' म्हणत यांचा नेहमीं सरदारी बाणा असून हे सदोदित पंचहत्यारी व स्वारीत असत यांनी कांहीं पदें केली आहेत यांनी शके १६०६ त समाधी घेतली. यांचे धाकटे बंधु विठ्ठलपंत ऊर्फ आत्यास्वामी यांनीं श १६२७ त समाधि घेतली.

पूर्णानंद[६२] शिवराम[६३] स्थिति ज्याची अभेद गा।
महिपति[६४] कविराज भक्तिविजय पैं गा।
भवार्णवीं नौका केली तारायासी अज्ञ जगा॥ ॥ १६

---

६२ पूर्णानंद–रंगनाथस्वामी निगडीकरांचे वडील व मोक्षगुरु बोपाजीपंत ऊर्फ निजानंदस्वामी यांचे हे गुरु हे कुलबुर्ग्याजवळील कल्याणीमठाचे अधिपती. अर्थात हे रामदासमहाराजांच्याही अगोदरचे ६३ शिवराम–या नावाचा एक कवि गोविंदनाथांच्या संतप्रशस्तींत तापीतीरचे पूर्णानंद याचें वर्णन आलें आहे, ते कोणी वेगळे असावेसें वाटते श्रीमंत नानासाहेब पेशवे यांचा समकालीन. गडिकाख्यान, मुद्रिकाख्यान, रामतुळशी, अपराधस्तोत्र व थोडीशीं पदें इतकी याची कृति. [ परंतु कदाचित् पुर्णानंदशिवराम हें नांव एकाचेंच दिलें असेल. तारीख २१ १ १९१३ च्या केसरींत एक पत्रव्यवहार आला आहे, त्यांत मोंगलाईंत कल्याणीस शिवराम स्वामी पूर्णानंद नावांचे एक स्वामी शके १६०० मध्यें झाले असें दिलें आहे व त्याचें एक ढोंगी गुरूवरील पदही दिलें आहे. गोविंदनाथ आपल्या संतप्रशस्तींत शिवराम नाशिककराचें नांव देतात. तो या कल्याणीकर कवीहून वेगळा असावा, कदाचित् देवनाथांनीं वर्णिलेला शिवराम पूर्णानंद हा असेल व गोविंदनाथांनी वर्णिलेला तो नाशिककर शिवराम असेल. याला दुसरा पुरावा हा पहाः–

" आपल्या भाषेच्या ओंवी काळाचे शेवटीं मृत्युंजयस्वामी, कृष्णदास व शिवराम स्वामी हे कवि झाले, मृत्युंजयस्वामींचा 'अमृतसार' नांवाचा ग्रंथ व पदें उपलब्ध आहेत. कृष्णदास व शिवराम हे दोघेही अनुक्रमे 'बाजीरावावर पद' व 'श्रीमंत नानासाहेब पेशवे याचे उपदेश' रचणारे कृष्णदास व शिवराम हें खास आहे कृष्णदास हे 'दासपंचायतनांतील' जयरामस्वामी वडगाव-करांचे गुरु यांचा ग्रंथ असल्याचें माहित नाहीं परंतु यांचीं पदें पुष्कळ ऐकू येतात यांपैकीं बरींच काव्यसंग्रहांत प्रसिद्धही झालीं आहेत यांनीं एके पदांत गुरुचरित्र कामधेनु। पठणीं ज्याचा नेम। असा उल्लेख केला आहे यावरून चरित्रकार 'गंगाधर सरस्वती' यांचा मागें दिलेला काळ बरोबर आहे, असें मानण्यास आणखी पुरावा होतो. शिवराम स्वामी हेही 'दास पंचायतनां'तील रंगनाथस्वामींच्या वडिलांचे गुरुबंधु होत याचे 'देहास बोध' वगैरे ग्रंथ व अनेक पदें आहेत " महाराष्ट्र सारस्वत वि ल भावे बी एससी. कृत. ]

६४ महीपती–( शके १६३७–१७१२ ) राहुरी तालुक्यांतील ताहराबाद येथें राहणार कुळकर्ण्याची वृत्ति चालवीत असतां सरकारी अधिकाऱ्यांशीं भांडण झालें म्हणून यानें नोकरी सोडली. भक्तविजय, संतविजय, भक्तलीलामृत, संत-लीलामृत हे याचे मुख्य ग्रंथ.

दादु[६५] नानक[६६] कमाल[६७] भाई रामानंद[६८] सोइया[६९] दास ।
सुंदर[७०] कविराज, कवित्व ज्याचें सुरस ।
निपट निरंजन[७१] ज्याचा स्वरूपीं वास ।
विठ्ठल[७२] कवि विश्वनाथ[७३] महामुद्गल[७४]दास ॥ १७

---

६५ दादू—दादू पिंजारी हा शालिवाहनाच्या १५ व्या शतकांत होऊन गेला राहणार काश्मीरचा यानें काढलेल्या पंथास 'दादूपंथ' म्हणतात ६६ नानक हा शीख अथवा नानकपंथ नामक धर्माचा उत्पादक जातीचा क्षत्रिय होता. याचें जन्म श० १४९१ मध्यें पंजाबांत बियानदीच्या कांठीं रामपूर येथें झालें. हा श० १४६१ मध्यें आपल्या वयाच्या ७० व्या वर्षी मरण पावला ६७ कमाल—कबीराचा पुत्र. हा रामभक्त होता. वि मा भक्तविजय अ ६ मध्यें पहावी याचीं पढरीच्या विठोबावर फारच अभिमानपूर्वक रचिलेलीं पांचसहा पदें गाथापंचकाच्या शेवटीं अवश्य वाचावीं ६८ रामानंद—कबीराचा गुरु यानें 'आनंद' नामक सांप्रदाय स्थापन केला हा फारच प्रसिद्ध भगवत्भक्त होऊन गेला—ज्ञानेश्वराचे वडील विठ्ठलपंत आणि कबीर असे दोघे रामानंदाचे चेले. त्या गुरूची महती काय लिहावी. ६९ सोइयादास हे कोण?

७० सुंदरकवि—हा हिंदुस्थानी कवी होता याच्या उत्तर हिंदुस्थानांत कांहीं कविता उपलब्ध आहेत. ७१ निपटनिरंजन—हा जातीचा गौड ब्राह्मण. दौलताबाद येथील राहणारा. याची कविता हिंदुस्थानी भाषेंत आहे. यास होऊन गेल्यास सुमारें २५० वर्षें झालीं रा धोंडो विश्वनाथ उमरखानी रा खामगाव हे सांगतात कीं तिकडील लोक याला निपटबावा म्हणतात आणि याची समाधी औरंगाबादेपासून दोन कोसावर आहे, व मठ आहे. रा उमरखानी हे शिवाय अशी माहिती कळवितात कीं, निपटनाथाचें ठिकाण औरंगाबादेपासून दोन कोसांवर आहे. येथें दरवर्षी माघांत जत्रा भरत असते, असें ऐकण्यांत आहे. निपटनिरंजन म्हणून कोणी प्रसिद्ध साधु याच ठिकाणीं बसून नेहमीं छंद म्हणत व ते छंद अद्याप औरंगाबाद येथील लोक जत्रेच्या वेळीं म्हणतात.

७२ विठ्ठल—हा ऋग्वेदी देशस्थ ब्राह्मण, शालीवाहनाच्या सोळाव्या शतकाच्या समाप्तीस होता याची चित्रकाव्याविषयीं प्रसिद्धी आहे विठ्ठल नांवाचे तीन कवी महाराष्ट्र सारस्वतांत प्रसिद्ध आहेत. ७३ विश्वनाथ—हा व साम्राज्यवामन असे दोघे वामनाचे शिष्य 'विश्वनाथ निजकिंकर वामनाचा' असे यानें म्हटलें आहे. याचें एक सुदामचरित्र आहे याची भाषासरणी थेट वामनासारखी आहे ७४ महामुद्गलदास—भक्तलीलामृत अ ४९ यांत महा मुद्गलभट्टाचें वर्णन दिलें आहे. याच्या मागें लुटीकरतां चोर लागले असतां राम, लक्ष्मण, भरत, शत्रुघ्न यांनीं शिपाई रूपानें याचें रक्षण केलें.

उद्बोधं[७५] केसरिनाथ[७६] विमलानंद[७७] केशवस्वामी[७८] ।<br>
अनंततनय[७९] भक्त नांदे शिवदिनपादपद्मीं[८०] ।<br>
वटेश्वर चांगदेव[८१] जागो निजानंद धामीं ।<br>
अनंत भक्त तुझे किति वर्णावे गा मी ॥ १८<br>
सहजानंद[८२] निजानंद[८३] कवि निरंजननाथ[८४] ।

---

७५-७६ उद्बोधनाथ व केसरिनाथ. शिवदिनकेसरीचे गुरु (केसोपंत मामलेदार) केसरीनाथ यांनीं शके १६७६ मार्गशीर्ष शुद्ध २ ला ज्ञानोबाच्या आळंदीस पोवारांच्या धर्मशाळेंत समाधी घेतली त्यांचे गुरु उद्बोधनाथ, यांनीं राशिनास शके १६०९ वैशाख वद्य ९ ला समाधी घेतली पैठण, राशीन व वऱ्हाडांत (देऊळगांव राजा) येथें या तिन्ही कवींची पुष्कळ कविता सांपडेल ७७ विमलानद-ज्ञानेश्वराची बहीण मुक्ताबाई इचा शिष्य प्रख्यात योगी चांगावटेश्वर. याचा शिष्य चक्रपाणी, त्याचा शिष्य विमलानद. तेथून दहा पिढ्यांनी शिवकल्याण. अशी परंपरा रा. राजवाडे देतात. जास्त माहिती मिळाली नाहीं. ७८ केशवस्वामी हे रामदासपंचायतनांतील एक साधु हे शके १५९० च्या सुमाराला वारले असावे यांचीं पुष्कळशीं पदें काव्यसग्रहांत छापलेलीं आहेत यांची वस्ती कुलबुर्ग्याकडे ७९ अनंत तनय--बहुतकरून आनदतनय. हा मद्रासकडे आरणी येथें राही रघुनाथ पंडित व गोसावीनंदन तिकडचेच आणि याचे व शहाजी महाराजांचे समकालीन काव्यसंग्रहांत कविता छापली आहे. ८० शिवदिनकेसरी-हा शिवदिन केसरी या नावानें प्रसिद्ध असलेला साधु पैठणाचा राहणारा जातीचा वाजसनेयी ब्राह्मण होता. हा केसरीनाथाचा शिष्य. यास होऊन गेल्यास सुमारें १२५ वर्षें झालीं याचीं पदें वगैरे बरींच आढळतात. यांनीं शके १६९६ माघी शिवरात्रीस समाधी घेतली. ८१ वटेश्वरचांगदेव-हा महासिद्ध होता, चवदाशें वर्षें जगला, वाघावर बसे व सापाच्या कोरड्यानें त्याला मारी असे याचे चमत्कार लिहिले आहेत. याला भेटीला जातांनाच ज्ञानदेवानी भिंत चालवली. हा पुन्हा मुधेश चांगा या नांवानें अवतरला अशी कथा आहे याला मंत्र मुक्ताबाईचा. ८२ सहजानद-रंगनाथ निगडीकरांचे वडील आणि गुरु निजामद, त्यांचे गुरु पूर्णानद, त्यांचे गुरु सहजानंद; तेच हे असावेसें वाटतें. समाधी कलबुर्ग्याजवळ. रामानंदापासून चवथी पिढी ८३ निजानद-पूर्वाश्रमीचे बोपाजीपंत घोडके नाझरेकर यांनीं पूर्णानंदस्वामीचा अनुग्रह घेतला, व मग निजानंद झाले. यांचे पुत्र रंगनाथस्वामी निगडीकर दासपंचायतनांतले ८४ निरंजन या नावाचा कवी दौलताबाद येथील राहणारा. याची कविता हिंदुस्थानी भाषेंत आहे कविश्रेष्ठ मुक्तेश्वराच्या मुलाचेंही नांव निरंजन होतें पण देवनाथ अनुलक्षून लिहितात तो भक्तलीलामृतांत ५० व्या अध्यायांत वर्णिलेला निरंजनस्वामी असावासें वाटत.

रघुनाथ[८५]पंडित राणा कवि थोर समर्थ ।
अद्भुत रस केला टीका नैषध ग्रंथ ।
अवतार जगदोद्धारा मध्वमुनीश्वर[८६]नाथ ।
कान्हया[८७] तुकयाबंधु तुज आवडता बहुत ॥ १९

जयदेव[८८] पद्मावती[८९] भक्ति ज्यांची दृढतर ।
गीतगोविंद ग्रंथ केला अर्थ काढियला सार ।
कलंक्यादि अवतार झाले नसतां साचार ।
वर्णिला अद्भुत गाथा म्लेंछ सहारादि चरित्र ॥ २०

प्राणगोपाळ[९०] गोमाबाई[९१] आईआदिपुरुष[९२] जाणा ।

---

८५ रघुनाथपंडित हा व आनंदतनय व गोसावीनंदन तिघेही मद्रास इलाख्यांतील आरणीचे. याचें नलदमयंती आख्यान सुप्रसिद्ध आहे. राजवाडे याचा काळ शके १५८२–१६४२ असा धरतात

८६ मध्वमुनीश्वर-काशींमध्यें अद्वैतानंद स्वामी होते त्यांचा हा शिष्य जातीचा ब्राम्हण. याचीं पदें वगैरे कविता बरीच आहे हा अमृतरायाचा समकालीन होता याचा उपदेश अमृतरायानें घेतला ८७ कान्हया–तुकारामबुवांचा भाऊ कान्होबा याचे अभंग प्रसिद्ध आहेत यानें आपल्या अभंगांत आपणास तुकयाबंधू असें म्हणवलें आहे ८८–८९ जयदेवपद्मावती जयदेव हा सुप्रसिद्ध गीतगोविंद या संस्कृत ग्रंथाचा कर्ता याची स्त्री पद्मावती हिनें पतिनिधनाची वार्ता ऐकतांच प्राण सोडला तेव्हां कवीनें श्रीविष्णूची या काव्यानें स्तुति केली आणि प्रभूनें प्रसन्न होऊन स्त्री पुन्हा जिवंत केली अशी आख्यायिका आहे.

९० प्राण गोपाळ–' प्राण गोपाळ प्राणापग्ना । अखंड त्यापासीं सभोंवता ॥ कृपा करोनी गोसावी सुना । करवी कविता अपरिमित ' देवदास संतप्रशस्ती ९१ गोमाबाई ( भक्तविजय अ ५५ ) अतिगरीब विधवा ब्राह्मणी चंद्रभागेच्या पुरांतून न्यायाला पैसा देववेना, तेव्हां विठ्ठलानें तिला खांद्यावर वाहून नेलें, आणि ब्राह्मण तिचा शिधा घेतना, तेव्हां विठ्ठलरुक्मिणी तिच्या येथें वृद्धब्राह्मणरूपानें मेहूण जेवले ९२ आईआदि पुरुष–व्यंकटेशस्तोत्रकार देवदास यांच्या संतस्तोत्रांत ' आईआदिपुरुषा दिधला वर ' असा उल्लेख आहे; आणि पंतप्रतिनिधि यांच्या पत्रव्यवहारांत ' श्री आई आदिपुरुष ' असा मायना आढळतो; यावरून या नांवाचा कोणी साधु पुरुष रामदास प्राक्कालीन असावासें वाटतें.

गोसाविनंदन[९३] कवित्व ज्याचें वर्णवेना ।
सतोबा[९४] नृसिंहदास[९५] संतोबापोवार[९६] राणा ।
गोपाळ बोदडकर[९७] प्रिय तुज नारायणा ॥ २१
निळोबा[९८] शामदास[९९] भक्त रामा जनार्दन[१००] ।
मुक्तेश्वर[१०१] कविराजा मोरेश्वर[१०२] ब्राह्मण ।

---

९३ गोसावीनंदन—यानें पुष्कळ कविता केली असें देवदास आपल्या संतप्रशस्तींत म्हणतो. यावरून हा रामदासपूर्वीचा कवि "गोसावीसुत वासुदेव कविरे त्या मोरयाला स्मरे" या श्लोकाचा कर्ता तोच हा असें वाटतें याचीं तीनशें पदें रा अग्निहोत्री यांच्या जवळ आहेत शोधकांना जास्त माहिती औरंगाबादेकडे मिळेल.

९४–९५ सतोबा नृसिंहदास हें एकच नांव असावें, कारण पुढें संतोबा पोंवार असें दुसरें नांव पुन्हां आलें नसतें सतोबा नृसिंहदास हे एक असले तरी कोण व दोन असले तरी कोण ? ९६ संतोबा पोंवार—याच नावानें भक्तविजयांत वर्णलेला एकसाधु. नामदेवानेंही यांचें चरित्र वर्णिलें आहे

९७ गोपाळबोदडकर—बोदवड हें वऱ्हाडांत भुसावळच्या अलीकडील स्टेशन येथें गोपाळ साधु कोण होता कोण जाणे ९८ निळोबा—तुकारामाच्या चौदा टाळकरी शिष्यांपैकीं एक शिष्य गाथापंचकांत यांची गाथा व अल्पसें चरित्र आलें आहे व भक्तिविजय अ ५५ त आहे ९९ शामदास—नंबर १११ ची शामसाधूवरची टीप पहा देवदासाच्या संतप्रशस्तींत एक शामदास आला आहे, तेव्हां तो रामदासाच्या अगोदरचा व श्यामा कवीहून वेगळा हें स्पष्ट आहे १०० रामा जनार्दन—"रामा न्हावी आणि जनार्दन। तुझिये नामीं अत्यंत लीन। त्या दोघां गड्यां तुझें ध्यान। सर्व काळ गोविंदा" देवदासाची संतप्रशस्ति हे दोघे वेगळें हें स्पष्ट दिसतें.

१०१ मुक्तेश्वर—जन्म श० १५३१ जातीचा आश्वलायन ब्राह्मण. बापाचें नांव चिंतामणि आईचें गोदूबाई याचे भारतादि ओंवीबद्ध ग्रंथ आहेत. महाराष्ट्र कविपरंपरेमध्यें कवि या नात्यानें याचा मान फारच आहे हा श्रेष्ठ कीं मोरोपंत श्रेष्ठ यासंबंधानं तज्ज्ञ लोकांत फार वाद झाला आहे १०२ मोरेश्वर. सवाई माधवरावांच्या कारकीर्दींत गोविंदकवि, मोरेश्वर, चतुरसाबाजी पांडुरंग, रामचंद्र मल्हार वगैरे कवी प्रसिद्धीस आले त्यांतील चंद्रावळीवर्णन नांवाची शृंगार कविता रचिणारा व वीरभद्र चरित्राचा कर्ता मोरेश्वर होता, पण तो हा नव्हे. याच्या अगोदर शंभर वर्षे होऊन गेलेल्या देवदासानें "मोरेश्वराचा बडिवार। वाढविला त्वां गोविंदा" असें ज्या भगवद्भक्ताचें आपल्या संतप्रशस्तींत वर्णन दिलें आहे तो हा. मोरेश्वर वासीमकर म्हटलें आहे यावरून कदाचित् पहिला असेल. शोधकांनीं कळविल्यास पुढें दुरुस्ती करूं.

वैराग्य थोर ज्याचें वाचे नव्हे वर्णन ।
केवळ ज्ञानसिंधु वासीमकर मुख्य प्राण ॥ २२
नांदेडकर शेषकवि[१०३] कोकिळ गंगाधर[१०४] ।
मृत्युंजय[१०५] ताईबाई[१०६] तुझिया पाईं निर्धार ।
जयरामात्मज[१०७] कृष्णदास[१०८] कृष्णदयार्णव[१०९] थोर ।

---

१०३–१०४ शेषकवी नांदेडकर व कोकिळ गंगाधरः—संतप्रशस्तीमध्यें देवदास म्हणतात कीं "दिग्रडकर गोपाळ तुझा दास । पूर्णदया तुझी कोकिळास । नामीं विनटला नांदेडकर शेष । प्रसन्न तयासीं झालोसी " यावरून हे दोघे दोन अडीचशें वर्षांपूर्वीचे कवि. [ भारत–इतिहास–संशोधक मंडळाचा शके १८३४ चा अहवाल म्हणतो कीं, कोकीळ हा कवि सवाशें वर्षांपूर्वींचा असावा; याचीं दीडशें पदें अभंग आहेत, औरंगाबाद जिल्ह्यांतील गंगातटाकीं सायखेडें गावीं याची समाधि आहे ]

१०५ मृत्युंजय— " मृत्युंजयो पडतां गंगोदकीं । तू धांवलासि एकाएकीं । हात ठेऊनि मस्तकीं । संतांत सरता पैं केला " देवदासाची संतप्रशस्ती हे राम दासांच्या पूर्वींचे. महिपतीनें ( भक्तविजय अ ४१ ) याचे चरित्र वर्णिलें आहे यांचा अमृतसार नांवाचा ग्रंथ व कांहीं पदें उपलब्ध आहेत हे सातान्याकडीला रहाणार. काव्यसंग्रह ( अनेककवी. ल. का मा १ पान १७७ ) मध्ये यांचें अमृतसार छापलें आहे महीपतीनेंही यांचें चरित्र वर्णिलेलें आहे.

१०६ ताईबाई—" स्त्रियां माजी देखिली ताई । तैशीच वेणा बहिणाबाई । रामदासांकित गिरीबाई । तुझियापायीं विनटली " देवदास. १०७ जयरामात्मज–याची एक संतप्रशस्ती रा राजवाड्यांनीं ग्रंथमालेंत प्रसिद्ध केली आहे. ते याचा काळ शके १५८०–१६४० असा ठरवितात.

१०८ कृष्णदास–वडगावीं कृष्णाजी अप्पा अभ्यंकर म्हणून साधु होते तेच हे यांनीं जयराम स्वामीस अनुग्रह दिला असें मोरोपंताच्या सन्मणिमालेवर टीपा देतांना काव्यसंग्रहकार म्हणतात–पण जयरामस्वामींचे गुरु कृष्णदास हे लढाईला गेले असतां चुकून ब्राम्हणाची समजून न्हाव्याच्या मुलीशीं त्याचें लग्न लागलें व त्यांना जातीबाहेर रहावें लागलें; पण शंकराचार्य शिक्षा करावयाला आले असतां त्यांना हे एकदम चतुर्भुजधारी विष्णु दिसावयाला लागले असे भक्तलीलामृतांत ( अ० ५० ) दिलें आहे. १०९ कृष्णदयार्णव—एक साधु यांनीं हरिवरदा नांवाचा पन्नास हजार ओंव्यांचा ग्रंथ केला आहे. रा. अजगांवकरांच्या कविचरित्रांत यांची माहिती बरीच रसाळपणें दिली आहे. यांचा ग्रंथही भागवताच्या दशमस्कंधावरील टीका आहे. अशीच मोठी टीका शिवकल्याणांनीं लिहिली आहे ती प्रकाशित होणें इष्ट आहे.

वर्णिता संत राणे बुद्धिलागीं नलगे पार ॥ २३
ऋषिश्वर जगन्नाथ[110] निर्मळ शाम[111] सिपाई ।
गिरिधरप्रभु[112] त्रिंबकप्रभु[113] सदा रत तुझिये पायीं ।
वर्णिल्या लीला ज्यांनीं रस अद्भुत पाहीं ।
गिरिधर[114] कविराय साक्या केल्या अंत नाहीं ॥ २४
अमृतराय[115] कवि थोर ज्याची अमृतवाणी ।

---

११० जगन्नाथ—ऋषिभक्तस्वामीचा शिष्य मुरारपरब्रह्म व हा दोघे, गुरुबंधु शंकराचार्यकृत वाक्सुधेवर याची मराठी ओंवीबद्ध टीका आहे मध्यप्रांतांत वर्धा शहराजवळ एका खेड्यांत जगन्नाथ नावाचा कोष्टी जातीचा कवि होऊन गेला. त्यानें लावणीवृत्तात सर्व महाभारत रचिलें असा लोकप्रवाद आहे तथापि देवनाथांनी वर्णिलेला कवि दुसरा नसून फक्त पहिलाच होय १११ शाम—काव्यसंग्रह लघुकाव्यमाला भाग ४ पान ७० येथें श्यामाकवीकृत हंसध्वज आख्यान दिलें आहे. खालीं टीप आहे कीं, या कवीचीं कांहीं आणखी पदें आहेत, पण माहिती उपलब्ध नाहीं तोच हा कवि असावासें वाटते नंबर ९९ च्या टीपेंतील शामदास वेगळा महिपतीच्या वेळीं एक श्यामा कवि होता असें वि. ल भावे लिहितात. ११२ गिरधरप्रभु—हे कोण ? ११३ त्रिंबकप्रभु—रा. भावे लिहितात ( महाराष्ट्रसारस्वत पान ३० ) कीं वामनाचा शिष्य विश्वनाथ, साम्राज्यवामन, गणेशनाथ, त्रिंबक, हे विठ्ठल केरीकरानंतरचे कवि त्रिंबकाचीं बरीच पदें आहेत यानें आपल्या एका पदांत 'धांव एकाकी एका जनार्दना । पावतो त्र्यंबका शीण रे ' असें म्हटलें आहे. यावरून हा नाथांचा शिष्य असावा पण त्रिंबक व त्रिंबकप्रभू हे दोन वेगवेगळाले असल्यास सुजाण वाचकांनीं कळवावें ११४ गिरीधर—वृंदावनीं गिरिधरलाल साधु होता. त्याच्यासाठीं सभेंत भरजरी वस्त्र घेऊन पडलें, आणि देवानें मेलेले प्रेत उठविलें. (भक्तलीलामृत अ. ४६), पण उत्तर हिंदुस्थानातील कवि साक्या करीत नाहींत, तेव्हां हा कोणी दुसरा कवि असावा समर्थ परंपरेंतील गिरिधर कवि (समाधी शके १६५१)यांनी पुष्कळ कविता केली आहे. ते हे असतील पण यांनीं साक्या केल्या आहेत काय ?

११५ अमृतराय—जन्म श० १६२० मृत्यु श. १६७५ हा औरंगाबादचा देशस्थ अश्वलायन ब्राम्हण—कीर्तन करितें असे. याचे कटाव वगैरे बरेच प्रसिद्ध आहेत याचीं पदें अती साधीं, रसाळ आणि कारुण्यपूर्ण आहेत. यांचा शुकरंभासंवादाचा कटाव आणि भोजनाचीं अथवा जामदारखान्याचीं वर्णनें व इतर कटाव पाहिले असतां मराठी गद्य यांच्या बरोबरच लयाला गेलें असें वाटावयाला लागतें.

अद्भुत कविता रस ख्याति विरूढली जनीं ।
यादव[११६] माणिकदास[११७] तुझे अखंड रत तुझिये भजनीं ।
नांदासि हृदयीं त्यांच्या पूर्णब्रह्म सौख्यदानी ॥ २५
ज्ञानबाई[११८] जेव्हां पडली सकटीं जाण आठवीले ।
पाय तुझे तेव्हां येसि नवलाव्र दाविंयेलें ।
फुलें केलीं मांसाच्र रक्षियेलें बिरुदासीं ।
दासाचा अभिमानी तारक तूं प्रभू होसी ॥ २६
चाऊ[११९] भाऊ[१२०] कामदेश[१२१] कमळाकर[१२२] ब्राह्मण ।
सर्प दंश जाला बाळा करिता संत भोजन ।
नामदेवें वाहियेलें तेव्हां येसी धांवून ।
उठविलें बाळ त्याचें न कळे तुझें महिमान ॥ २७

---

११६–११७–११८ हीं कोण ? यादवबोवा नगर औरंगाबाद या बाजूचे आहेत, असें ऐकितों व्यंकटेशस्तोत्रकार देवदासानें रचिलेल्या संतप्रशस्तीनंतर वीस वर्षांनीं मुकुंदानें एक संतप्रशस्ति रचली आहे त्यांत ‘ साधुविभूषण माणिकभट्ट धरामरकोविदमंडित कऱ्हापुरीं संतत रहात ’ असें लिहिलें आहे, यावरून माणिकदास हा कऱ्हाडचा ब्राह्मण रामदास कालीन् असावासें वाटलें. प्रसिद्ध कवि माणीकप्रभूला वारल्याला पुरतीं पन्नास वर्षें झालीं नाहींत तेव्हा तो हा नव्हे यादव कोण आणि ज्ञानबाई कोण ? वाचकांनीं खुलासा करावा.
११९–१२१ चाऊभाऊकामदेश—रा राजवाडे यांनीं जी देवदासाची संत-प्रशस्ती छापली आहे त्यांत चाऊ, भाऊ, काम, आणि उधेश अशीं चार नांवें आलीं आहेत; पण हे चवघे कोण असावे ? कामदेश हें एकच नांव कीं काम आणि उधेश अशीं दोन नांवें ? एक तर रा राजवाड्यांना मिळालेल्या प्रतींत हस्तदोष असावा, किंवा आमच्याजवळील देवनाथप्रतींत असावा आमच्या-जवळ अस्सल प्रत नाहीं व आम्हांला माहितही नाहीं. वाचकांनीं जास्त माहिती कळवावी.

१२२ कमळाकर—हा पंढरपूरचा ब्राह्मण याची बायको सुमती मुलगा पद्माकर. साधुसंताना घरीं भोजनाला निमंत्रण केलें असतां मुलगा अकस्मात् सर्पदंश होऊन मरण पावला, तरी सुमतीनें श्रियाळचांगुणेच्या गोष्टीवर ध्यान धरून मुलाचा मृत्यु कळूं न देतां धैर्यानें पानें वाढलीं नामदेव पाहुणे मंडळींत होते त्यांनीं अंतर्दृष्टीनें ही गोष्ट जाणून परमेश्वराचा धांवा केला, आणि मूल उठवलें ( संतलीलामृत अ. २९ )

सर्पदंश चैतन्यांनि[१२३] विष त्याचें उतरिलें ।
विठ्ठल मालोसाठीं[१२४] देवा तुवां अघटित केलें ।
कासाबाईची[१२५] आंवडी मोठी तिसीं हृदयीं धरियेलें ।
अनंत अंत न लागे भक्त भूमीवरी झाले ॥ २८
शेख महमंद[१२६] शंकरभट[१२७] केशव[१२८] भोळा भाविक भक्त ।

---

१२३ चैतन्य–हे कोण ? आणि यांना उठवल्याची कथा कोठें आहे काय ?

१२४ विठ्ठलमालो—हा कोण ? मालो नरहरीशीं याचा कांहीं संबंध होता काय ? भक्तलीलामृत अ० ४१ यांत जी मालोपंताची कथा दिली आहे तोच हा असावा काय ? १२५ कासीबाई–जयरामस्वामी वडगांवकराची गुरुबहीण काशीबाई इंद्रापुरकरीण होती व तिला तिच्या गुरूनीं समाधि घेतल्यावरही दर्शन दिलें, ही कथा अजगांवकरांच्या कविचरित्रांत आहे, पण देवनाथ अनुलक्षितात ती दुसरी कोणी असावी. या काशीबाईबद्दल एक माहिती मिळते ती अशी–शेखमहम्मद, गोदडशहा बुवा, रोळोबुवा आणि प्रल्हादराज असे चौघे श्रीगोंद्यांत साधू होते त्यांत प्रल्हादराज हे मलिकंबराच्या वेळीं दौलताबादेस फार मोठ्या हुद्यावर होते, पण लौकरच विरक्त झाले यांची शिष्यीण काशीबाई प्रल्हादराजांनीं श्रीगोंदें येथें मठ स्थापन केला होता तो अद्याप आहे. " प्रल्हाद पुरुषोत्तम, जयराम शिवराम काशी " अशी तिकडे परंपरा म्हणतात प्रल्हादाचे चिरंजीव पुरुषोत्तम, त्यांचे जयराम, त्यांचे शिवराम. शिवराम अति अल्पवयी असून काशीबाई ही मठाची व्यवस्था पहात, उपदेश देत, व आपलें नांव परंपरेला जोडीत असें ऐकतो ही बाई संतमंडळांत फार प्रतापी झाली म्हणतात वाचकांनीं जास्त माहिती कळवावी. देवनाथ अनुलक्षिलात ही दुसरी कोणी असावी, कारण जयरामस्वामी वड-गांवकराचे बाप व गुरु कृष्णदास तेव्हां वडगांवास जयराम व काशीबाई होती व श्रीगोंद्यास तशींच दुसरी होती असे वाटतें

१२६ शेखमहम्मद—हा कबीरपंथी अवलिया चांभारगोंदें येथें रहात होता. हा तुकारामाच्या वेळेस होता याचे अभंग व ' योगसंग्राम ' नांवाचा अष्टप्रकरणात्मक ओवीबद्ध एक ग्रंथही आहे याचें विस्तृत चरित्र अजगांवकरकृत कविचरित्र भाग १ यांत पहावें १२७ शंकरभट–याचें वृत्त माहीत नाहीं. मोरोपंतांच्या सन्मणिमालेंत एक शंकरबाबा दिला असून त्यानें सर्व लोक विठ्ठलभजनाला लावले असें लिहिलें आहे. व भक्तिविजयांत तें नांव आहे, पण तेथेंही जास्त माहिती दिली नाहीं. ' शंकरभट्टाची वेधली वृत्ती । आत्मारामास केली वैराग्यस्थिती ।' असें देवदासांनेंही याचें नांव दिलें आहे. १२८ केशव— हे कोण ?

दीघोबा[129] बोधानंद[130] तुज बहु आवडत ।
शिवबा[131] गुरव तुकाविप्र[132] वृत्ति ज्याची विरक्त ।
शेखसुल्तान[133] नानासाहेब[134] नागा बाबा[135] महंत !
परमहंस पूर्ण सिद्ध अद्भुत ज्याचें सामर्थ्य ॥ २९

त्रिगुणात्मक दत्तदेव[136] स्वरूप तुझें प्रसिद्ध ।
सर्वकाळ समाधि भोगी पूर्ण ज्ञानी चंद्रबोध[137] ।
जनार्दन[138] विश्वरूपीं एकनाथा[139] केला बोध ।
नाथाचिये पदारविंदीं नित्यानंदें[140] धरिला वेध ॥ ३०

कृष्णानंद[141] कृष्णरूप ब्रह्मानंदें डुल्लत ।
विसोबानंद[142] मुरारनाथ[143] निजरंगीं रंगनाथ[144] ।

---

१२९ दिघोबाः–हे जोगाईच्या आंब्याजवळील एका गांवाचे कुळकर्णी हें एकनाथाचे समकालीन व प्रासादिक पुरुष होते. १३० बोधानंद–कोण ? १३१ शिवबाः–' सिवा गुरव जातीचा । चाळा लाविला भजनाचा । तयासीं मार्ग वैकुंठीचा । सोपा करूनी दीधला " देवदास संतप्रशस्ति ही प्रशस्ती शके १६०८ मधील, तेव्हां गुरव त्याच्या अगोदरचा. याहून जास्त माहिती नाहीं १३२ तुकाविप्र–यांचा प्रयाणकाल शके १६९० असें रा. राजवाडे ( प्रभात मासिकपुस्तक १लें वर्ष अंक ७ वा ) व रा. पांगारकर मोरोपंत चरित्रांत म्हणतात, पण ता. २३ । १ ।१९१३ च्या केसरींत याचा समाधी शक वीस वर्षांनीं नंतर दिला आहे याची जास्त माहिती नाहीं १३३ शेखसुलतान '–यानें गोपाळनाथांचा मंत्र घेतला होता असें श्रीभालचंद्रनाथ आपल्या ग्रंथांत लिहितात पण रा. विनायक लक्ष्मण भावे यांनीं महाराष्ट्र सारस्वतांत ' शेखसुलतान आवैध । त्याचे हृदयीं गोविंद ' असें दिलें आहे, तर हा देवनाथाचा गुरुबंधु असेल हेंही शक्य आहे १३४ नानासाहेब–हे महाराष्ट्र ब्राम्हण माळव्याचे सुभे सरकारी कामांत चूक झाल्यामुळें यांनीं संन्यास घेतला. यांनीं हजारों भोजनें घातलीं. हे महादजी शिंद्याच्या वेळचे वाचकांनीं जास्त माहिती असल्यास कळवावी. १३५ नागाबाबा।–हे परळी वैजनाथ येथील साधू हे जनार्दन महाराजाच्या वेळीं होऊन गेले असें सांगतात शोधकांनी माहिती कळवावी. १३६ दत्तदेवः–श्रीदत्तमूर्ती नाथपंथाचे आदिगुरू १३७चंद्रबोधः–हे कोण ? १३८–१४६ जनार्दन एकनाथ, नित्यानंद, कृष्णानंद, विसोबानंद, मुरारनाथ, रंगनाथ, गोपाळनाथ, गोविंदनाथ, ही देवनाथांची गुरुपरंपरा

( पुढील पृष्ठ पाहा. )

अवतार विदेहाचा सर्वकाळ समाधिस्थ ।
जळामाजी एक आहे दुजा अग्निमाजी हस्त ॥ ३१
प्रत्यक्ष रूप तुझें नाथ गोपाळ योगी ।
शिरीं शोभे शिवलिंग सत्ता ज्याची दाट्टगी ।
पूर्णब्रह्म प्रगट झाला तारावयालागीं जगीं ।
स्मरतांचि नाम ज्याचें भवभयासि भंगी ॥ ३२
गोविंद श्रीगुरुराणा पूर्णब्रह्म अवतारी ।
प्रताप वर्णवेना स्तब्ध झाली वैखरी ।
अभयकर देउनि माथां प्रगटोनि अंतरीं ।
मतिमंद वाचस्पतिसम बोल करी ॥ ३३
आणीक संत भक्त, किती प्रगट गुप्त ।
मागें झाले पुढें होती त्यांचे पायीं दण्डवत ।
वर्णावें काय वाचे कांहीं नलगेचि अंत ।
अवतार त्यांचि धरिले तारावया पतीत ॥ ३४
करुणासिंधू पंढरिराया माझी ऐकुनियां करुणा ।
गरुडावरी बैसें वेगीं धांव घेंई नारायणा ।
निवारावें संकटातें गोपीवल्लभ गोरक्षणा ।
क्षमा करीं अन्यायाची जननी होसी मनमोहना ॥ ३५
आरोग्य करीं काया दास जावो नेदीं वाया ।
अपराध घालिं पोटीं दिनानाथ देवराया ।
माया वेडी तोडीं वेगीं भेटें उभारोनि बाह्यां ।
अव्हेर नकरीं माझा उडी घालीं लवलाह्या ।
भजनाचा छंद लावीं इतुकें दान दे बा देवा ॥ ३६
अपराधि सत्यसाचा परि तू क्षमावंत होसी ।
अंगिकार केला आधीं आतां कां बा अव्हेरिसी ।
कोण माझा तुजविण सांग बापा हृषीकेशी ।
हीन मी दीन झालो तुजवीण परदेशी ॥ ३७

---

( १२८ पृष्ठावरून समाप्त. )
यांची माहिती दयाळनाथाच्या व या पुस्तकाच्या प्रस्तावनेंत थोडीबहुत दिली आहेच. या टीपेंत जास्त देण्याचें कारण नाहीं.

तुजवीण पंढरीराया कोण राखी माझी सोय ।
गणगोत आप्त माझी तूंचीं बाप आणि माय ।
म्हणविलों तुझा तुझा काळ आम्हां शिरीं पाहे ।
राखें वा बिरुदावळी अझुनि पाहतोसि काय ॥ ३८

कोळिधीनें रूप तुझें धरुनीया चतुर्भुज ।
राजकन्या पर्णियेली विश्वें झालें चोज ।
परिक्षा करितां रायें तेणें आठविलें तुज ।
त्रिशस्त्रें घालुनि उडी रक्षियेली त्याची लाज ॥ ३९

भक्तिज्ञान कळा मेण नेणों जपतप कांहीं ।
मंदबुद्धि आर्त भावें शरण आलों तुझिया पाईं ।
कृपावंत कृपा करीं माय माझे विठाबाई ।
उसंगा घेउनीयां प्रेमभोजनपान्हा देई ॥ ४०

देवनाथ प्रभुदात्या आतां उशिर न लावीं ।
घाबरला जीव माझा वेगीं पाउलें दावीं ।
कवटाळुनि चौबाहीं भेदें उगवीं भवगोंवी ।
लक्ष्मीनायकाहो त्रिभुवन गोंसावी ॥ ४१

पद ( २३३ )

भावें भजतां हरी दास्य करी दासाचें ।
काय कार्य आणिक साधनाचें ॥ ध्रु० ॥
त्रिभुवनपती मी सांडोनी ऐसी प्रौढी ।
अर्जुनाचीं निजअंगें धुतो घोडीं ।
वेद ज्याची मर्यादा रक्षी गाढी ।
ब्राह्मणांचीं उच्छिष्टें पात्रें काढी ॥ भावें० ॥ १
निकरें छळितां निजदासा ऋषि दुर्वास ।
अंबऋषिचे सोशियले गर्भवास ।
नदगेहीं राखितो जो वत्सांस ।
गोपमुलां करीचे जेवी ग्रास ॥ भावें० ॥ २

---

१४७ ही कथा देवदासांनीही आपल्या संतप्रशस्तींत दिली आहे, पण याचें मूळ काय आणि कोठें सांपडेल हें लक्षांत येत नाहीं.

सव्यसाची विंधियला कामबाणीं ।
जाणुनि ऐसें अंतरीं चक्रपाणी ।
आपण जाला सुभद्रा [1] चक्षणी ।
पुरवी भक्तें वांछिलें जें जें मनीं ॥ भावें० ॥ ३

कलीयुगीं पढरिंत राजीवाक्ष ।
कर कटीं विटेवरी सर्वसाक्ष ।
पतितोद्धारीं धरोनी उभा लक्ष ।
स्वसत्तेनें भक्तिचा रक्षी पक्ष ॥ भावें० ॥ ४

निजांगेंसी होउनियां आपण वाणी ।
नाम्याघरीं धान्याची रचवी गोणी ।
जनीसवें रानांत वेंचा शेणी ।
दळीकांडी निजसवें मोक्षदानी ॥ भावें० ॥ ५

चोखामेळासांगातें गुरें वोढी ।
बोधल्याच्या पिकाची केली वाढी ।
सांवत्याच्या बागाला पाणी वाढी ।
पांडुरंगा भक्तिची ही आवडी ॥ भावें० ॥ ६

एकनाथागेहीं हरी वाहे पाणी ।

---

१ द्वारकेहून हस्तिनापुरास परतजातांना वाटेंत कुंजवनांतील कृष्णाच्या पलंगावर निजल्यानंतर अर्जुनाची विषयवृत्ति जागृत झाली व त्याला सुभद्रेची आठवण झाली त्याबरोबर कृष्ण सुभद्रारूप धारण करून तेथें आला परंतु अर्जुनानें तो पलंग कृष्णाचें शयनस्थान असल्यामुळें तिला परत जाण्यास सांगितलें सुभद्रारूपी कृष्णानें आपण आल्याची खूण म्हणून अर्जुनाचे हातांतील श्रीकृष्णानें त्यास दिलेली आंगटी मागितली व ती अर्जुनानें रात्रीं परत देईन असें वचन घेऊन त्यास दिली पुढें रात्रीं हस्तिनापुरांत सुभद्रेस आंगठी परत मागितली पण तिनें ती घेतल्याचें नाकारलें तेव्हां अर्जुनास सुभद्रेचा मुद्रिकेचा अभिलाष पाहून फार वाईट वाटलें व मुद्रीकादर्शन झाल्यास दोघांचे ही प्राण जातील असा पण केला पुढें श्रीकृष्णानें येऊन मीच सुभद्रा झालों होतों असें सांगून मुद्रिका परत दिली अशी कथा भविष्योत्तरपुराणांत आहे असें मुक्तेश्वरकृत स्फुटकाव्यें ( काव्यसंग्रह ५४ यांतील ९ वें काव्य अर्जुन कामपूर्ति ) वरून दिसतें.

कबीराच्या मागावरी शेले विणी ।
[illegible] लेणीं ।
सखूसाठीं अघटित केली करणी ॥ भावं० ॥ ७
मिराबाई विषाचा घेतां प्याला ।
विष तेंचि घोटुनी आपण प्याला ।
नरसी मेहत्याच्या हुंडीचा फडशा केला ।
दामाजाच्या रसदस्तव महार जाला ॥ भावें० ॥ ८
अभिमानी ब्रीदाचा गुरुगोविंद ।
श्रुति ज्याचे वर्णिती नाना छंद ।
भीमातीरीं नांदतो ब्रह्मानंद ।
देवनाथ भजताहे प्रेमानंद ॥ भावें० ॥ ९

## पद ( २३४ ).

मोठ्या मौजेचा पंढरिराणा । तुह्मि कां हो भजाना ॥ ध्रु०
भीमातटिं विटेवरी तो उभा । सोलिव[1] जो चैतन्याचा गाभा ।
त्रिभुवनिंचा सुभा[2] । सदय हृदय ज्याचें स्मरतां नाम
तारील भवजीवना ॥ १
फिरतां चौऱ्यांसी लक्ष योनि । हें प्राप्त निदानीं ।
जाली नरतनु पुण्यखाणी । स्वहिताची हाणी ।
केली गेली मागें आतां तरि मनिं उमजाना । वदाया श्री चरणां ॥ २
जेणें शत वर्षें वय निर्मित केलें । रात्रि मधें गेलें ।
अर्धें; अर्धें जें कांहीं उरलें । सुख दुःखें सरलें ।
अर्ध्यामध्यें तिन्हि पणें[3] विरलें । स्वहितासि विसरलें ।
हरिलें वय रवि तनेयें[4] आतां । विनयें जा तूं शरणागत जा हरिचरणां ॥ ३
कन्यासुतदारधनाची आशा । या देशविदेशा ।
फिरउनि आर्जविलें फार नरशा । विसरुनि जगदीशा ।

---

१ सोलीव=सोललेलें वरची साल काढून आंतला ज्याचा गाभा मोकळा केला आहे असें निव्वळ, शुद्ध, सोळा आणे २ सुभा=सुभेदार सरदार मालक. ३ तिन्हि पण बाळपण, तरुणपण, वृद्धपण. ४ यमानें.

द्रव्यास्तव वृत्ति पिशा । भोगिलें क्लेशा ।
लेशाहि त्यांतिल प्राप्त जाल्या होसी दुःखित अंतःकर्णा ॥ ४
जालें जें जें तें मागें गेलें । ऐकावें वहिलें[1] ।
अशाश्वत नरदेह जाण निर्मियलें । असतां तुज कळलें ।
विषयीं रमलासी मानस चळलें । तें दुःखें फळलें ।
रडसि चडफडिसि भारी अश्रु गाळिसी नयना ॥ ५
आतां स्वहिताची तूज अपेक्षा । तरि आणीं लक्षा ।
विनती हे देहपरित्यागीं दक्षा । त्या सर्वसाक्षी[2] ।
जारे शरणागत कमलदलाक्षा । श्रीगुरुची दीक्षा ।
ध्यारे हृदयीं भोगा स्वरुपीं समरस करुनि स्वमना ॥ ६
सांडा देह अहंममता स्फुंदं[3] । श्री परमानंद ।
पाहारे मनिं ब्रह्मानंद । धरा त्याचा छंद ।
देवनाथाचा प्रभु गोविंद । गा नाम प्रबंध[4] ।
समाधी स्वसुखें डोला बोला रामकृष्णहरी वदना ॥ मोठ्या ७

## पद ( २३५ ).

विनवणी ऐक गड्या रे विठोबा ॥ ध्रु०॥
चिंताग्रासित हें मानस निशिदिनीं । वारीं सांकड्या रे ॥ १
चिंतासरिताजळीं बुडतों मी । सत्वर घालिं उड्या रे ॥ २
निवटुनि काळिमा निर्मळ करिं मम । घालिन मी फुगड्या रे ॥ ३
इतुकें करीं तुझी आण मला रे । नरिघें पथिं दुधड्यां[5] रे ॥ ४
देवनाथ प्रभु साह्य त्वरें । गोविंदा उघड्या रे ॥ ५

---

१ वहिलें—हा शब्द कवितेमध्यें पुष्कळ अर्थांनीं योजिला जातो. त्यांत पहिला अर्थ स्पष्टपणें, स्वतन्त्रपणें, तुटकपणें, २ रा. अर्थ तात्काळ, तावडतोब. ३ रा अर्थ साग्रीनें, निश्चयानें. हे तीन अर्थ पुष्कळ ठिकाणीं येतात, व बाकीचे अनुमानानें लावायाचे असतात असें मोल्स्वर्थ म्हणतो. इथें दुसरा किंवा तिसरा अर्थ चांगला शोभेल. २ आतां तुज स्वहिताची अपेक्षा इच्छा, जर असेल तर हे माझी विनती (विनंति) लक्षा आणा, ध्यानांत धरा कीं, देहपरित्यागी देहावसानसमयीं त्या सर्वसाक्षी परमेश्वराला लक्षा लक्षांत आणा, ध्यानांत आणा, असा अन्वयार्थ. ३ उमाळा—हुंदका. ४ ग्रंथ, विषयविवेचन. काव्यरचना. नमामाहात्म्याचें वर्णन. ५ दुधड = दोगला, अस्पष्ट, द्व्यर्थी, लाक्षणिक अर्थ वाईट, हलका.

### पद ( २३६ ).

विठोबा पाहसी अजुनी काय ॥ ध्रु० ॥
घाबरलें मम मानस अतिशय दाखावि सत्वर पाय ॥ १
कांहीं सुचेना काय करुं मी न चले कांहीं उपाय ॥ २
कोण गती मज कांहींच नेणवे जन्म वृथाची जाय ॥ ३
दास तुझा हरी घोष असा जगीं होई वेगीं सहाय ॥ ४
देवनाथ प्रभु दात्या विठ्ठला तूंचि बाप आणि माय ॥ ५

### पद ( २३७ ).

अमलकमलदल नयनविभो जगजिवन देखिला नैनीं ।
समपद उभा विटेवरी, कटीं ठेवि द्वयपाणी ॥ ध्रु० ॥
वैकुंठपुरी, भूवरी, सख्या पंढरी, सत्य हें मानीं ।
हा पुंडरीकवरद पद्दानी[1] ।
सांवळा, सखे पींवळा, कटीं पटकुळा[2], शोभला जघनीं ।
वांकितोडरनेपुर गर्जति हो निज चरणीं ।
पार्वतीवरें, हृद्भुवनिं वरें, ध्याइजे खरें, अक्षरें दोन्हीं ।
शमलासे विषकल्लोळ जयाचे[3] रणीं ।
तोचि हा हरी, नांदे पंढरीं, तारि भवपुरीं, विनटतां[4] चरणीं ॥ १
॥ समपद उभा० ॥
अहो व्रज पुरीं, का नंदा घरीं, सखाश्रीहरी, धरी अवतार ।
रक्षोनि भक्त सद्भक्तां प्रती कीं विधि वधिले असुर ।
कांबळी शरीं, कीं खांद्यावरी, काठि धरि करीं, कीं विश्वोद्धार
वाचवावया व्रजजनां, वधी दुर्जना, जीवनीं विषधरे[5] ।

---

१ पद्दानी = आपल्या स्वतःचें पद देणारा २ पटकुळ = पाटोळा, पितांबर ३ समुद्रमथनामध्यें १४ रत्नें निघालीं त्यांत हालाहलविष शंकरानें ग्रहण केलें त्याच्या योगानें त्याला अतिशय दाह प्राप्त झाला तो विष्णूच्या स्मरणानें दबला अशी कथा आहे ४ विनटणें:---याचा नेहमींचा अर्थ रंगांत दंग होणें, खेळणें क्रीडाकरणें परंतु कवितेमध्यें सर्वार्पण करून लीन होणें, रममाण होणें रगून जाणें असे अर्थ लागतात. मोल्स्वर्थच्या कोशांत या अर्थाचीं ' पावले पावले आता । सतापाची विनटलों ॥' आणि ' साधु ईश्वर-चरणा विनटले । प्रल्हाद नरसिंहपदी विनटला ॥ हीं उदाहरणें आहेत. ५ विषधरः-- सर्प, कालिया

गोपिंच्या मुलां, सर्व करी लिला, अहो अवलिला[1], यशोदा कुमर!
यमुनातिरिं धेनू चारी वेणु धरी अधर ।
काळिया फणी, दुष्ट दंडुनी, सौख्य व्रज भुवनीं, देत पंकज पाणी ।
वर्णितां श्रुति, शिणल्या मति, दे यदुपती, लाघवीं करणा ॥ २
॥ समपद उभा०

पुत्र मिसें, हृद्भुवनीं वसे, हरिनाम करें, अजामिळ द्विज ।
करुणार्णवा, श्रीमाधवा, रक्षिं धांवें महाराज ।
जळचर स्वतांचि, तो जळ पितांचि, सुखीं अवचितांचि, धरिला गज।
कर जोडुनि विनवि श्रीहरी रक्षि माझी लाज ।
भक्त आवडी, धांवे तातडी, सकटीं उडी, घालि यदुराज ।
चक्रासि फेंकिलें नक्र मर्दिला सहज ।
तोचि मधुसुदन, करित अरिकंदन, यागा हृत्सदन, नांदतो ध्यानीं ॥
॥ समपद उभा० ॥ ३

पडुची सुन, गांजि दुर्जन, किं दुर्योधन, तो कुरु नृपती ।
वोढित जई दुःशासन वसन तैं खंती ।
विपरीत घटी, देखुनी दिठी आळवि हृद्घटीं, कीं द्रौपदि सती
म्हणे परात्परा श्रीवरा लाज अरी घेती ।
मनमोहना, हे जगजीवना, सख्या वामना, दयाघन मूर्ती ।
कृष्णाई धांवगे आई भगिनि तुझी ह्मणती ।
ज्या प्रति सती, कीं करुणा रीती, जाली प्रार्थिती, प्रेमें हृद्भुवनीं ॥ ४
॥ समपद उभा०

करुणास्वरें, भेदि अतरें, धांउनि त्वरें, पुरवि ते काळीं ।
फेडितां वसन चांडाळ थकित कर कमळीं ।
घालि मागुति, हस्त दुर्मति, देखिली सती, कशी पांचाळी ।
लखलखितवसन ते पीत चतुर्भुज वाळी ।
निजजनसखा, सतिस दे सुखा, दुर्जना मुखा, काळिमा आली
गंगात्मज द्विज द्रोणादि विदुर दे टाळी ।
॥ ५ ॥ समपद उभा०

---

1 अवलीला :— खोड्या.

अरे हा कली, अधर्में बळी, क्षिण नेमिलि, मानवायुर्दा ।
यास्तव उपजालि कृपा श्रीपरमानंदा ।
अहो महिवरी वसावि पढरी, नाम हें धरी पुंडरीक वरदा ।
दर्शनें हरी अघ सर्व दुरित आपदा ।
दक्षिणे भिमा, वाहे निरुपमा, स्नानि अधमा, मुक्ति दे प्रमदा
हा विठ्ठल त्रे अक्षरी मत्र मुखिं वदा ।
साधनशतें, हें देवनाथें, त्यागुनी रते, हरीच्या भजनीं ।
ज्ञानोदयतरणी उदयीं हरे तमरजनी ॥ समपद उभा० ॥ ६

## पद ( २३८ )

सांवळ्या पढरिनाथा । लाज बा तुझिये हातीं ॥ सांवळ्या ॥ ध्रु० ॥
दुर्धर जावो जळो हा भोग । येणें काया ग्रासित रोग ।
आतां कैसा साधे योग । म्हणुनि धाबरि वृत्ती ॥ सांवळ्या०॥ १
कैंची कोण सुसरी ममता । फांसा गोवियला जी पूरता ।
तुजाविण सोडवि कोण अनंता । धांवें पावें त्वरित गती ॥ सांवळ्या० ॥ २
लाउनि मरणा लागीं आशा । किति हिंडाविसी देशोदेशा ।
पतीत पावना जगदीशा । दयाळूवा श्रीपती ॥ सांवळ्या० ॥ ३
फांसा गुंतलों लिगोडीं । तुज वांचुनियां कोण तोडी ।
वेगें धाउनियां तांतडी । मातें काढीं सुखमूर्ती ॥ सांवळ्या० ॥ ४
आहे अपराधाचा केलों । परि तुझाच म्हणाविलों ।
तुझें नाम भूषण ल्यालों। या जगीं जाहली ख्याती ॥ सांवळ्या० ॥ ५
आतां प्रार्थना हेचि हरी । दुर्धर दुर्मद हा संहारीं !
तारीं तारा या भवपुरीं ! संकट वारीं शिघ्र गती ॥ सांवळ्या० ॥ ६
देवनाथ प्रार्थित भावें । आतां अविलंबें हरि यावें ।
क्षमा अपराध सर्व करावे । ब्रिद रक्षावें समर्थी ॥ सांवळ्या० ॥ ७

---

१ पेंचांत, कचाट्यांत, लचांडांत, अडचण मोल्सवर्थ म्हणतात! या शाब्दाचें मूळ व ठावठिकाण कोठे असावें तें बरोबर समजत नाहीं. प्रत्येक भाषेंत असे अनेक शब्द असतात, आणि त्याचा मूळ हेतु बरोबर न ठरवितां आल्यामुळें हुबेहूब अर्थ लावणें कठीण पडतें.

## पद ( २३९ ).

विठोबा चाल गड्या ! सुखधामा, पंढरिच्या हाकमा[1] ॥ ध्रु० ॥
गाती श्रुतिवाणी, गुणगाणीं । योगी ध्याती ध्यानीं ।
स्तावितां शिणलासे सहस्रफणी । जघनीं देउनी पाणी ।
नांदसी भीमातीरीं । सुखधामा ॥ १
मायानदीचा दुर्धर । भरला जातो पूर ।
कामक्रोधमदमत्सर । माजी तळपति सुशिर ।
ओढुनी नेती तिरीं । सुखधामा ॥ २
लहरीवरि[2] लहरी अतिचाढिया । भरला पुर दोथडिया ।
तुजविण कोण दुजा निजसैंगडिया । भवनदिच्या सांगाडिया ।
नेई पैलतिरीं । सुखधामा ॥ ३
अद्वय अपरिमिता, अनता । कृष्णा मायातीता ।
पांडवपाळकाजी श्रीमंता । लक्ष्मीच्या कांता ।
ये बा कंसारी । सुखधामा ॥ ४
गुंतलासी तूं तरि कोठें । भक्तीच्या निजपेठे[3] ।
धाया येई सख्या मज भेटें । लावीं निजात्मवाटे[4] ।
धरनीयां स्वकरीं । सुखधामा ॥ ५
किंवा भक्तीं तुला आळविलें । भावें चाळविलें ।
भवभय पैं त्यांच पळविलें । निजसुखें[5] त्यां कळवीलें ।
नांदसी तद्‌तरीं ॥ सुखधामा ॥ ६
एकनाथाच्या निजसदनीं । सखया चक्रपाणी ।

---

१ हाकमा, मालका.

२ " लाटांवरी अचाट लाटा । मोहाचिया अति दुर्घटा ॥
आदळली अविवेकतटा । धैर्याचिया कांठा पाडील ॥
एवढाही भवसागरू । शोषिता तूं अगस्ती साचारू ॥
तुझेनि भवाब्धी पैलपारू । पावेन हा निर्धारू झाला आम्हां " एकनाथ

३ निजपेठे=मुख्यस्थानांत, मुख्यठिकाणांत निजशब्दाचे वेगवेगळे अर्थ व त्याचीं वेगवेगळालीं स्वरूपें व समास पूर्वी दिलेले आहेतच. ४-निजात्मवाटे =आत्मसाधनाची खरी खरी मुख्य बिनचूक वाट. ५ निजसुख=ब्रह्मसुख, अत्यंत श्रेष्ठसुख.

खांदा कावडिला घेउनी । वाहात असशिल पाणी ।
जाहला उशीर तरी । सुखधामा ॥ ७
नरहरि सोनारा सांगातें । लेणीं घडशी हातें ।
उशीर म्हूण जाला वाटतें । यावयासी येथें ।
ठेविसी नग स्वकरीं । सुखधामा ॥ ८
सांवत्या माळ्याचे आवडिया । वाफे ओलिसी गड्या ।
भाजी उपडीसी कानडियों । बांधिसी काय जुडिया ।
विकसी बाजारीं । सुखधामा ॥ ९
चोखामेळा हा आवडता । भक्त तुझा अनंता ।
गुरें ओढिसी गुणवंता । विठाई ! म्हुण तुज आतां ।
येणें नव्हे तरी ॥ सुखधामा ॥ १०
रोहीदासाची तुज प्रीती । जोडे शिवशी हातीं ।
म्हणोनि तुज जाला श्रीपती । उशीर करुणामूर्ती-।
निजजनसाहकारी । सुखधामा ॥ ११
कूर्मदासासीं हृषीकेशी । काय भेटों जाशी ।
गुंतुनि तयाच्या भाकेशीं । लहुळीं राहिलासी ।
संकट ये वारीं । सुखधामा ॥ १२
बोधराजाच्या शेतासीं । लगबग लगबग जाशी ।
खुडिशी सोंगिशी उपडीशी । हातें कणगी भरिशी

---

१ वाफेओलिशी = भाजीच्या वाफ्यांना पाणी देऊन ओले ठेवितोस. २ कानडिया = याशब्दावर पूर्वी एकदां टीप आलेलीच आहे. ३ लहुळी=लव्हा लवाळा, लव्हाळा, लव्ही, लहूळा, इतकीं नांवें या गवताला आहेत. लव अथवा लवा हा संस्कृत शब्द आहे ४ सोंगिशी=सवंगतोस सवगणी=मळणी, कणीसतोडणी. भुसांतून, दाणे वेगळे काढण्याची क्रिया हा शब्द वऱ्हाडांत व मोंगलाईंत नित्य प्रचारांत आहे व हा फार प्राचीन शब्द आहे. ज्ञानेश्वरीच्या १३ व्या अध्यायांत ३८ ओंवी ' रजोगुण पेरि । तेंतुलें तत्व सोकरी । मग वेळे तम करीं । सवंगणी ' ॥ अशी आहे एकनाथी भागवतांत ४ थ्या अध्यायांत ' जो शेताची पेरणी करी । तोची देस सोकरी । तोचि राळालिया वरी । सवंगणी करी सर्वांची ' ॥ अशी ६१ वी ओंवी आहे. ५ कणगी = धान्य भरण्याच्या वांबूच्या ढोली

काम तुज भारी ॥ सुखधामा ॥ १३
सेन्या न्हाव्याचे धोंपटिशीं । घालुनियां खांकेशीं ।
श्मश्रू कराया जातोसी । म्हुण माझ्या हृदयाशीं ।
आठव नव्हे तरी । सुखधामा ॥ १४
मिराबाईच्या साह्याशीं । मज वाटे गेलासी ।
जाउनि सर्वेशा वेगेंसीं । दुर्धर विष प्यालासी ।
जाला श्रम भारी । सुखधामा ॥ १५
नरसी मेहत्याचें हराया । संकट दूर कराया ।
काय गेलासी यदुराया । हुंडीलागीं भराया ।
गुतसी मुरारी । सुखधामा ॥ १६
नामदेवाची बहु माया । तुजला पंढरिराया ।
काय गेलासी धांउनियां । धेनूला उठवाया ।
बापा पुतनारी । सुखधामा ॥ १७
कीर्तनीं तुकयाच्या घननीळा । वाजवितोसी टाळा ।
उशीर म्हुण जाला ते वेळां । यावयासि गोपाळा ।
होशी कैवारी । सुखधामा ॥ १८
किंवा नंदगृहीं गोकुळीं । गोपमुलांच्या मेळीं ।
गाई चारिशी वनमाळी । यमुनेच्या या पाळीं ।
काठी धरुनि करीं । सुखधामा ॥ १९
पेंद्या सुदामा वांकडा । घेउनियां बोबडा ।
रात्रीं पांघरुनी पासोडा । उघडिसी काय कवाडा ।
जाशी करु चोरी । सुखधामा ॥ २०
अधरीं धरुनीयां मुरलीशीं । सुस्वर वाजवीशी ।
घालुनि मुरलिरवीं मोहनीशीं । मन त्यांचें मोहीसी ।
भुलाविशि ब्रजनारी । सुखधामा ॥ २१
किंवा राधेच्या पलंगीं । निजलासी रतिरंगीं ।

---

१ सेनान्हाव्याचें एक सुंदर पद या ग्रंथांत आहे तें वाचून पहा. २ मिराबाईसंबधानें दुसऱ्या पदांत टीप दिलेली आहे ती पहा ३ पाळ नदीला अथवा ओढ्याला बांध बांधून काढतात तो नदीकांठ, नदीकिनारा.

म्हणुनी स्मृति माझी तुजलागीं । येइना अंतरंगीं ।
आळवुं किती तरी । सुखधामा ॥ २२
किंवा जाउनियां निजेला । रुक्मिणिच्या सेजेला ।
निद्रा लागली बहु तुजला । यास्तव उशीर झाला ।
जागा लवकरी । सुखधामा ॥ २३
किंवा खातोसी आवडिया । भामाकरींच्या विडिया ।
गुंफिसी नगवेणी राखडिया । नेसविशी लुगडीया ।
धरुनी दोहीं करीं । सुखधामा ॥ २४
सोळा सहस्र गोपिका । त्याच्या गृहीं कौतुका ।
करिसी क्रीडा अलौकिका । घेउनी लेंकीलेंका ।
रमसी संसारीं । सुखधामा ॥ २५
करुणासागर तूं पंढरीशा । त्रिभुवनपति सर्वेशा ।
माझी तुझिया पदिं आशा । या वेगें हरीं क्लेशा ।
पतीत उद्धरीं । सुखधामा ॥ २६
अंत पाहसी किती आतां । माधव मायातीता ।
मुकुंदमधुसुदना अच्युता । माझी तुजला चिंता ।
भवभ्रम दूर करीं सुखधामा ॥ २७
भक्तिज्ञानकळा गवसेना । मन ठाईं बैसेना ।
अझुनी पद इष्ट दिसेना । विरह मला सोसेना ।
दुःखित अंतरीं । सुखधामा ॥ २८
वेगीं येईं बा धांउनियां । गरुडावरि बैसुनियां ।
प्रगटें मम हृदयीं येउनियां । निजसुख मज देउनियां ।
स्पर्शीं अभय करीं । सुखधामा ॥ २९
श्रीगुरुगोविंदा हरिं आपदा । देउनियां स्वानंदा ।
वृत्ती रमवावी सर्वदा । स्वरुपीं ब्रह्मानंदा ।
दे हें दान करीं । सुखधामा
देवनाथाच्या प्रभुदेवा । ये बा वासुदेवा ।
भजनप्रेमाच्या वैभवा । देउनी माळवीं भावा[१] ।
विलंब या न करीं । सुखधामा ३१

---

१ भावा = भवा ( भवभयाला ) ?

# अथ पांडुरंगनमनस्तोत्र.

पद ( २४० )

श्रीकृष्णा कमलावरा सुखकरा करुण्यपूर्णेक्षणा[1] ॥
दीनानाथ दयानिधे भयहरा सद्भक्तसंरक्षणा ॥
गोपाळा गरुडध्वजा गुरुतरा तूं व्याप्त विश्वांतरीं ॥
भीमातीरदिगंबरा तुज नमो श्रीपांडुरंगा हरी ॥ १
भक्तांचें भयनाशना जनमना गोविंद हे श्रीपती ॥
हे गोपीरमणा स्वसौख्यसदना गाती तुतें ह्या श्रुती ॥
विश्वेशा भुवनेश्वरा भवभया येवोनियां संहरीं ॥
भीमातीरदिगंबरा तुज नमो श्रीपांडुरंगा हरी ॥ २
विश्वाच्या जनित्या विभो विश्वपित्या दासासि संरक्षित्या ॥
आमित्या[2] श्रुतिशास्त्र त्या नकळती गातां शिणेती स्मृत्या ॥
नित्यानित्यविचार सार करि त्या तूं नांदिसी अंतरीं ॥
भीमातीरदिगंबरा तुज नमो श्रीपांडुरंगा हरी ॥ ३
योगी योगबळें सदा कवळिती आरण्यवास स्थिती ॥
याज्ञीकें यजती परिभ्रममती शास्त्रार्थ ही सांगती ॥
वेदांतें पढती परी तुझिगती छोटेन त्यातें तरी ॥
भीमातीरदिगंबरा तुज नमो श्रीपांडुरंगा हरी ॥ ४
शोभे कंठ निळा विभूति विपुळा गंगा शिरीं निर्मळा ॥
भाळीं चंद्रकळा भुजीं दशबळा नांदे स्मशानस्थळा ॥
ध्यातो हृत्कमळा तुतें घननिळा त्वन्नाम घे वैखरी ॥
भीमातीरदिगंबरा तुज नमो श्रीपांडुरंगा हरी ॥ ५
श्रीव्याख्यानें[3] निवेदिलें निजकृपें त्वां त्या नराच्या मिषें ॥
नौका निर्मियली भवाब्धितरणी आज्ञा जगा साहसें ॥
ऐसा पूर्ण दयाळ नांदसि स्वयें वैकुंठ भूपंढरी ॥

---

१ कारुण्यानें पूर्ण आहे ईक्षण दृष्टि ज्याची असा. २ मिति ज्याला नाहीं असा म्हणजे कल्पनेच्या अथवा गणनेच्या बाहेर ३ श्रीव्याख्यान हा संबंध कशाबद्दल आहे !

भीमातीरदिगंबरा तुज नमो श्रीपांडुरंगा हरी ॥ ६

श्रीमत्भागवता स्वयें कथियलें त्या उद्धवा सान्वयें ॥
गोपी कामामिषेंचि तारिसि कसा कंसादि द्वेषान्वयें ॥
लीलानायक तूं तुतें स्मरति त्या भेदा तुरेची उरीं ॥
भीमातीरदिगंबरा तुज नमो श्रीपांडुरंगा हरी ॥ ७

तूं तूं तूं सकळांतरीं वभाशी तू व्यापोनि आलिप्त तूं ।
तूं तूं तू ह्मणणें न साहे तुजला तो आदिमध्यांत तूं ।
दीनोद्धारण तूं दयाळ प्रभु तूं तारीं भवाचे पुरीं ।
भीमातीरदिगंबरा तुज नमो श्रीपांडुरंगा हरी ॥ ८

श्रीगोविंदगुरू स्मरूं हृदिं धरूं सर्वत्रही त्वां कृपें ।
वृत्ती स्वात्मरुपीं सदा ममरसे हें दान देईं कृपें ।
नामें येई त्वरें विलंब नकरीं या देवनाथा तरी ।
भीमातीरदिगंबरा तुज नमो श्रीपांडुरंगा हरी ॥ ९

## पांडुरंगस्तोत्र (२४१).

जो विश्व व्यापुनि अलिप्तपणें निराळा,
हें वर्म ठाउक असे विबुधां मराळां[1] ।
जो गोकुळात हरि घालितसे तमामा,
तो नांदतो विटवरी अभिमन्युमामा ॥ १

भीमातटीं कर कटीं विलसे पहा कीं,
ज्याची सदा सदय कीं श्रुति कीर्ति हांकी[2] ।
ज्या नारदादि, स्तविती स्मरताति नामा,
तो नांदतो विटेवरी अभिमन्युमामा ॥ २

घे जन्म नाभिकमळांत कसा विधाता ?

---

१ मराळां (हंसांना) दूध, पाणी एकत्र केलें असता त्यांतलें पाणी टाकून द्यावयाचें व दूध मात्र घ्यावयाचें हें वर्म जसें हंसांना माहीत असतें त्याचप्रमाणें ईश्वर आणि विश्व हीं दोन्हीं एकजीव दिसत असलीं तरी ईश्वर विश्वापासून अलिप्तपणें निराळा आहे हें मर्म विबुध=पंडित यांना माहित आहे. २ कीं श्रुति (वेद) ज्याची ज्या परमेश्वराची सदा सदय नेहमीं दयापूर्ण आहे अशी कीर्ति हांकितात, (पसरवितात, घोषानें उच्चारतात) ज्या परमेश्वराची चारी वेद तो अनंतकरुणाघन आहे अशी चोहोंकडे ख्याति पसरवितात.

ज्या नामरूप गुणकर्म दिसे न ध्यातां ? ।
ध्यानींच जो प्रकटतो गुरुदेव आत्मा,
तो नांदतो विटेवरी अभिमन्युमामा ॥ ३
जो विश्वरूप नयनीं सखयार्जुनातें,
दावीत देत सुख जो प्रभु सज्जनातें ।
हस्तें धरीत हयरश्मि[1] सदास्य सीमा,
तो नांदतो विटेवरी अभिमन्युमामा ॥ ४
ज्या वर्णनीं गति नव्हे निगमादिकांची,
जो ध्येय[2] मूर्तिच शुकासनकादिकांची ।
व्यासादि ज्या स्तविति वाल्मिक पूर्णकामा,
तो नांदतो विटेवरी अभिमन्युमामा ५
जो भंगुनी धनुष[3] मातुलघातकर्ता[4],
जो दीनवत्सल हरी करुनी अकर्ता ।
जो ब्रह्मचारि आजि भोगुनि गोपरामा,
तो नांदतो विटेवरी अभिमन्युमामा ॥ ६
जो पूर्णब्रह्म हृदिं नांदत योगियांच्या,
गातां फणींद्र शिणला स्वगुणा जयाच्या ।
जो ईक्षणें करित नाश दुरीतकर्मा,
तो नांदतो विटेवरी अभिमन्युमामा. ॥ ७
नामामृतें हरित जो विष सांबवाचें[5],
गा रे ! तयास मुळ छेदित जो भवाचें ।
पद्मा सदा वसत सेवित पादपद्मां,
तो नांदतो विटेवरी अभिमन्युमामा ॥ ८
श्रीमद्गुरूवर दयाकर सौख्यसिंधू,
जो देवनाथवरद प्रभु दीनबंधू ।
जा रे ! तुम्ही शरण त्या हरि सार्वभौमा,
तो नांदतो विटेवरी अभिमन्युमामा. ॥ ९

---

१ घोड्याचा लगाम. वागदोर २ ध्यानवस्तु ३ धनुषभगुनी=रामावतारांत सीता-स्वयवराच्यावेळीं ४ कृष्णावतारीं भूभार हरण करण्याकरितां आपला मामा कंस याला मारणारा. ५ सांबवाचें = शांभवाचें = शंभूचे = शंकराचें

## जयद्रथवध ( २४२ )

विठ्ठल रुखमाई । माय माझी विठ्ठलरुखमाई ॥ ध्रु० ॥
कटिं कर ठेउनी, उभी विटेवरी, दीन जनां ताराया ।
सगुणस्वरूपें धरि अवतारा, भूभारासि हराया ।
निर्मियली नामनौका दासा भवजलतरणोपायी[1] ॥ माय ॥ १
नामनौके बसती जे त्यां, उतरुनि ने परतीरा ।
अखंड भजकाच्या स्वमना दे, अपुल्या स्वरूपीं थारा[2] ।
स्वसुखसमाधी तन्मय रमवी , लागुं न दे भववारा ।
दयाळू माउली रमले, योगी निरंतर पायीं[3] ॥ माय ॥ २
रणसंगरिं अभिमन्यु पडतां पार्थ तैं पण केला ।
न होतां हा अस्त दिनमणी, मारिन जयद्रथाला ।
चक्रव्युह तो करुनि कौरवीं, अर्जुनरिपु[4] लपवीला ।
भक्ताची अभिमानी, तुजला संकट पडलें आई ॥ माय ॥ ३
फेंकुनि चक्रसुदर्शन तेव्हां रविलागीं लपवीलें ।
अस्त पाहुनी पार्थें नयनीं अग्निकाष्ट मेळविलें ।
प्रदक्षिणोनी अग्नी तुझिया पदांबुजां नमियेलें ।
गांडिवधनु घे करीं त्यातें, सुचवीलें ते समर्थी ॥ माय ॥ ४
क्षात्रधर्म हा पंडुनंदना, नव्हेचि ऐसा जाणा ।
अग्निकाष्ट तूं भक्षिशि तरि कां ठेविशी धनुष्यबाणा ।
धनुष्य चढवुनी बाण गुणीं घे, स्वकरीं वेगीं सुजाणा[5] ।
आज्ञा वंदुनी स्वशिरीं अर्जुन, धनुष्य घे करीं पाहीं ॥ माय ॥ ५
अग्निकाष्टें भक्षितो अर्जुन, हर्ष कौरवां झाला ।
अतिसंतोषा मानुनी तेव्हां, जयद्रथ पाहों आला ।
जाणुनि ऐसें काढुनि चक्रा, प्रकट सूर्य तैं केला ।

---

१ भवजलामध्यें तरणोपाय होणारी ती भवजल तरणोपायी नामरूपी नौका आपल्या दासांकरितां निर्मियेली २ भजक भजन करणारे जे त्यांना आपल्या परमेश्वराच्या स्वरूपीं अखंड थारा-आश्रय दे. ईश्वर आपल्या भजकांचें मन आपल्या गुणांच्या ठिकाणीं अखंड रममाण करितो. ३ हे माझे दयाळू माउली ! योगी तुझ्या पायीं निरंतर रमले असें संबोधनार्थी वाक्य ४ जयद्रथ. ५ हे सुजाणा! वेगीं बाण गुणीं चढवूनि धनुष्य स्वकरीं घे असा अन्वय.

हा रवि हा रिपु पार्था मारीं, बाणविमर्दन लावीं ॥ माय ॥ ६
वदतां पार्थें सोडुनि बाणा, जयद्रथशिर उडवीलें ।
हाहाःकार रिपु कौरवसैनीं, अघटित त्वां घडवीलें ।
संकट वारुनि अर्जुनाचें, सत्य वांचवीलें ।
भक्तजनप्रतिपालक ऐसें, गर्जे ब्रीद सवाई ॥ माय ॥ ७
अद्भुत लीला शेषहि शिणला, वर्णितां गुणगणवाणी ।
विधिवासवाशिव स्तविती गाती, महिमा वेदपुराणीं ।
सनकसनंदनवामदेवशुक, योगी ध्याती ध्यानीं ।
व्यापुनी विश्व निराळीं नांदसी, दासाच्या निजहृदयीं ॥ माय ॥ ८
जन्मजरामरणासहि वारिसी, गाती नाम तयांचे ।
पुसा पढवितां तारिली गणिका, जाळुनि पातक तीचें ।
उद्धरिला गजपशुद्विज वर्णूं, काय मी भाग्य तयांचें ।
तारियलें बहु मागें पतितां, अंत न लागे कांहीं ॥ माय ॥ ९
भीमरथीतटवासिनी जननी, अंबे आदिभवानी ।
नवल वाटतें कैसी पाहसी कौतुक आजुनी नयनीं ।
मुनिजनमानसहंसे, धावे, पावें मज निर्वाणीं ।
देवनाथ भावें विनवी, विलंब न लावीं येई ॥ माय ॥ १०

## पद (२४३)

तूं माझा धनि बाप । विठोबा तू माझा धनि बाप ॥ ध्रु० ॥
दुर्धर पसरुनि मुख मज ग्रासित मारीं हा भवसाप ॥ १
जात पळोपळ वय हरि आयुष्य मोजितसे वयमाप ॥ २
तुजविण आणिक कोण सखा हरी या मनिंचा संताप ॥ ३
देवनाथप्रभुनाथ निवारीं बा सकळहि हा अघताप ॥ ४

## पद (२४४)

पाहसी अजुनी काय विठोबा ॥ ध्रु० ॥
घाबरलें मम मानस अतिशय । दाखविं सत्वर पाय ॥ १
कांहिं सुचेना काय करूं मी । न चले कांहीं उपाय ॥ २
कोण गती मज कांहिंच नेणवे । जन्म वृथा हा जाय ॥ ३

दास तुझा, हरी घोष असा जगा । होइ वेग त्वरि पाय ॥ ४
देवनाथप्रभु दात्या विठ्ठला । तूंचि बाप आणि माय ॥ ५

## पद ( २४५ )

पाहसी कां निर्वाण विठोबा पाहसी कां निर्वाण ॥ ध्रु० ॥
दुस्तर पाशीं पडलों गुंतुनि जाइल वाटे प्राण ॥ १
दीन अनाथ मी भाकितों करुणा नाइकती तव कान ॥ २
दीनदयाघन पावनब्रीद हें गाती श्रुति महिमानें ॥ ३
बहुकरुणेची तू मम जननी, बाळक मी अज्ञान ॥ ४
कठिण हें मानस काय म्हणुनियां माद्विषयीं भगवान ॥ ५
दीन अनाथ मी मागतसें भीक, काय तुझे घरीं वाण ? ॥ ६
सोडवीं सोडवीं घाबरला जीव दुर्धर हा यमबाण ॥ ७
मोहिनसे मज घालनियां गळां अद्भुत काळ कमानें ॥ ८
दास तुझा मी, नागविता मज चोर का हा धनमान ॥ २
सांग उपेक्षिसी काय तुझ्या मनीं वद वद सत्य निदानें ॥ १०
देवनाथप्रभुबाळक, जननी देसी न कां स्तनपान ? ॥ ११

---

१ हे हरि मी तुझा दास असा घोष ( लौकिक ख्याति ) सर्वजगीं जाहला आहे वेगीं सत्वर पाय दावी. २ तू दीनदयाघन. दीनावरती दयावृष्टि करून त्यांना निववणारा मेघ ( करुणा मेघःश्याम ) असा आहेस तूं पावन ब्रीद आहेस असें श्रुति चारी वेद तुझें महिमान गातात. ३ धनुष्याची कमान काळ माझ्या गळ्यांत घालून आपला शत्रू पूर्णपणें जिंकला गेला आणि त्याला निःशस्त्र व हतवीर्य केला याचें चिन्ह म्हणून पूर्वींचे वीर आपलें धनुष्य त्याच्या गळा अडकवीत 'धनुष्य घालूनियां गळां। वोढोनि आणला रथातळां। कापिन्नली भीमक बाळा। घनसांवळा देखतसे ॥

( एकनाथकृत रुक्मिणीस्वयंवर प्रसंग १२ ओंवी १३६ )

देवनाथ म्हणतात कीं काळापुढें मी इतका हतवीर्य होऊन गेलों आहें. आणि मी तुझा दास असूनही काळ मला मारितो, इतकेंच नव्हे तर अपमान आणि विटंबना करून मारितो

४ शेवटली खरी गोष्ट.

## पद ( २४६ ).

इतुकें देईं दान । विठोबा इतकें देईं दान ॥ ध्रु० ॥
त्यागुन सकळहि मायिक संगति स्वसुखें सेवीन रान ॥ १
नामामृतरस सेविन तवपद पाहिन नयनीं समान ॥ २
पाहें कृपादिठीं ठेवीं पदांबुजिं निःसंशय मज जाण ॥ ३
तवपदिं समरस वृत्ती ठेवीं तुरवीं देहाभिमान ॥ ४
देवनाथप्रभु! प्रगटें लोचनीं दासाची तुज आण ॥ ५

## पद ( २४७ )

जागा भगवद्भजनीं लागा । प्रेम विठ्ठला मागा ।
कल्पविकल्पा त्यागुनि बारे संतसमागमिं वागा ॥ ध्रु० ॥
सज्जनजनहो या गा ।
त्यागुनि सर्व कुसंगा ।
शरण रिघा श्रीरंगा ।
सद्बुद्धीसुविचारें साधा निजसुखसाधनयोगा ॥ प्रेम विठ्ठला ॥ १
मारा दुष्ट अनंगा ।
चुकवा रविसुतदंगा ।
गुरुवचनामृतगंगा ।
प्राशन करुनी सद्भावें घ्या चिन्मयसुख भोगा ॥ प्रेम० ॥ २
निजगुज गुरुला मागा[1] ।
घ्या प्रचीतिम उसंगा[2] ।
निजात्मरंगीं रंगा ।
देवनाथप्रभु नाथनिरंजन नेइल भवभय भंगा ॥ प्रेम विठ्ठला ॥ ३

---

१ आपली अगदीं जिवाच्या कलिजाजवळ जतन करून ठेविलेली गोष्ट गुरूच्याजवळ निवेदन करा

२ जें ज्ञान शद्धार्थानें ग्रहण केलें तें अनुभवाला पटणें ही प्रचीति, अथवा प्रत्यय उसगा हा शद्ध मोलस्वर्थच्या कोशांत नाहीं किंवा माधव चंद्रोबाच्या संस्कृत मराठी कोशांतही नाहीं गुरुकृपा झाली म्हणजे तुला शिकलेल्या ज्ञानाचा प्रत्यय करून घेतां येईल तो मग करून घे असा याचा अर्थ आहे. उत्सगा = कडेवर घेणें असा कवितेंत अर्थ आहे

## पद ( २४८ ).

श्रीकृष्णा मनमोहना कमललोचना अजी रघुवीरा
कितीतरी अंत पाहशी येइं सत्वरा ॥ ध्रु० ॥
भवजळीं, बुडतों येवेळीं, धरीं करकमळीं, सख्या अनंता ।
तुजवीण कोण मज आतां ॥
श्रीधरा अजी रघुवीरा, कीं विश्वंभरा कमलाकांता ।
मी अनाथ तूं श्रीनाथा ॥
छंद ॥ गोपती गोपिकारमणा ।
यदुपती देवकीतान्हा ।
तू मदनतात सुखसदना ।
टीप ॥ यदुराज, अजी महाराज, पंढरीराज करीं भवशमना ।
कंसारि मुरमर्दना दाविं निजवदना ॥ श्रीकृष्णा० ॥१
सुखकर अरे विश्वंभरा, नंदकुमरा, उठीं घननीळा ।
बावळगी विठो सांवळ्या येइं कृपाळा ॥
करिं त्वरा पूर्णभास्वरा, रुक्मिणीवरा, चिद्घना अमळा ।
मी दीन प्रार्थितों तुला ऐक कनवाळा ॥
छंद॥ बहु पतित मागें तारिले ।
गणिकादि अजामिळ ।
मर्दोनि गजा सोडविलें ।
टीप ॥ श्रीहरी, धांव लौकरी, पतीता तारीं,ऐकें करुणा ।
झडकरी येइं टाकुनी मागें मनपवना ॥ श्रीकृष्णा० ॥२
दीनबंधु, करुणा सिंधु, दुष्टां कंदू, वदति श्रुतिवाणी ।
कलियुगीं येइ धांउनी ॥
जाहला उशिर येवेळीं, जीव तळमळी, तूजवांचोनी ।
श्रीनाथसद्गुरू! येइं येइं धांवोनी ।
छंद ॥ तनया न भेटे जननी ।
रोषें बहु आकर्षोनी ।

---

१ येथें कांहीं दुसरा पाठ प्रचलित आहे काय ! या शब्दाची येथें चुका-चुकला काय ! २ पूर्ण दैदीप्यमान् ३ करुणापूर्ण ४ कंदन करणारा ५ अडुन मौन धरल्याचें मिष करून

गति तैसी जाहाली येक्षणीं ।

टीप ॥ लवपळीं, येउनी कवळीं, लावि हृत्कमळीं, निर्गुणा सगुणा ।

हा रामरायें तुज विनती करी प्रार्थना ॥ श्रीकृष्णा० ॥३॥

## पद ( २४९ ).

अमुचें ब्रह्म हरी ब्रह्म हरी । नांदत भिवरातीरीं ॥ ध्रु० ॥

कटिं कर ठेऊनि उभा । केवळ चैतन्याचा गाभा ॥ १ ॥

परमपुरुष सुखदाता । दे जो निजपद दासा स्मरतां ॥ २ ॥

ज्यास्तव ब्रह्मारण्यीं । शिणती योगी तापसी मुनी ॥ ३ ॥

चिदाकार गुणदीप्ती । नाहीं नामरूपगुणव्यक्ती ॥ ४ ॥

निर्गुण जे आकार । जालें भक्तास्तव साकार ॥ ५ ॥

देवनाथप्रभु दाता । शिणल्या श्रुति मुखीं गुणगण गातां ॥ ६ ॥

## पद ( २५० ).

हीन दीन बहु संकटिं पडतां सेन्याप्रति धावली ।

कृपाळू बहुत विठू माउली ॥ ध्रु० ॥

एक दिनीं सेन्या हरीअर्चनीं प्रातः समयीं बैसला ।

निवांताचि कामक्रोध निरसिला ॥

नेत्र लावुनी दृढ मानसीं ध्यानरसीं रसला ।

स्त्रियेसीं काय वचन बोलिला ॥

भंग ध्यानाचा न करीं प्रिये ग कोणि येइल सांग त्याला ।

सेना तो बाहेर कामीं गुंतला ॥

टीप ॥ अवश्य म्हणुनी पतिव्रता ते द्वारदिशीं बैसली ॥ कृपाळू० १॥

इकडे नृपवरासी काम श्मश्रूचें लागलें ।

त्वरित दूत सेन्यागृहीं वंचिले[२] ।

सेन्या सेन्या हांक मारितां शब्द श्रवणीं पडियेले

स्त्रियेनें नाहीं म्हणुनि विनविले ॥

दूत फिरूनी अर्जी कारितां राया सभे जाणविलें ।

---

१ हें पद देवनाथाचें नसून रामराव काळी यांचें असावेंसें वाटत.

२ वंचिलें = प्रेरिलें, धाडिलें, या शब्दाचा असा अर्थ दुसरीकडे सांपडत नाहीं.

दायादें दुष्टपणें मानविलें ॥
टीप ॥ म्हणती सेन्या गृहीं असोनी अन्यायी विठ्ठलीं ॥ कृपाळू० ॥२॥
ऐसें ऐकुनि भडाग्नी घृतें जेवीं शिंपियला ।
तेविं तो नृपति मनीं क्षोभला ॥
क्रूर यवन चांडाळ मग तो दूतांप्रति बोलला ।
आणारे सेन्या बांधुनि भला ॥
शूल भेदा अंगीं तयाच्या अन्यायी असला ।
आणारे त्वरित बांधुनी त्याला ॥
टीप ॥ चरण नृपाचे वंदुनी मांदी[१] दूतांची चालली ॥ कृपाळू० ॥ ३ ॥
ऐसा विचार श्रवणीं पडतां भक्तांचा कैवारी ।
जाला सद्गद बहु अंतरीं ॥
उभय नेत्रीं अश्रु स्रवती पीतांबरा सांवरी ।
पुसे हें रुक्मिणी आहे काय तरी ॥
काय सांगुं गे जहाज बुडालें माझें सुखाचें परी ।
चांडाळ दुष्ट गांजिताती परोपरी ॥
टीप ॥ काय करूं गे धीर धरवेना उडी तळवेटीं[२] घातली ॥ कृपाळू० ॥ ४
किरीट शिरींचा त्वरें काढुनी रुक्मिणीकरीं दिधला ।
फरफरां पीतांबर फोडिला ॥
कौस्तुभमणीसह वैजयंती कंठींचा हार तोडिला ।
कुरळ कुंतल भार सोडिला ॥
हरीणपाडस धांवे तैसा कुंडलजोडा फेंकिला ।
अरे अरे भक्त माझा गांजिला ॥
टीप ॥ वेगें सेन्याचे गृहीं येउनी धोपटी खांदा वाहिली ॥ कृपाळू० ॥५
ज्या शिरीं अनंतछत्र त्या शिरीं चिंध्यांचा वेटोळा ।
हरी तो नापिक झाला काळा ॥
जगत्पाल हा ख्याल जयाचा ध्यानीं ध्याय शिवभोळा ।
हरी तो नापिक जाला काळा ॥
ज्या करीं चारी आयुधें शोभती त्या करीं चिमटा काळा ।

---

१ मांदी = संभार, समूह. २ तळवटीं = तळाशीं, खालीं.

जगातें दर्पण दावी डोळां ॥
टीप ॥ ज्यास्कंधीं प्रियहस्त राधेचा धोपटी तेथ बैसली ॥ कृपाळु० ॥६
कटीं मेखळा वैजयंतीनें हृदय बहू शोभलें ।
तया अंगीं आंगडें जीर्ण लोंबलें ॥
पायीं वाहाणा शाहाणा[1] घालितां फोड येउनी फुटलें ।
नृपाचें भय मनीं वाटलें ॥
लगबग लगबग दूत करीं ते येउनि सभे नेटले ।
आणिला सैन्या जाणविलें ॥
टीप ॥ दीनदयाळु भक्तकैवारी हा मोहनी सभे घातली ॥ कृपाळु० ॥ ७
सैन्यासीं नृपवर ह्मणे केव्हांची वाट पहात बैसलों ।
अर्जी मी गुलाम हाजर जाहलों ॥
गुन्हेगार[2] मी हाजर धन्याचा वेळोवेळीं आलों ।
असा मी गुलाम हाजर जाहलों ॥
तकसीरें माझी माफ करावी स्वामीसेवे चुकलों ।
बंदा मी गुलाम हजर जाहलों ॥
टीप ॥ हस्त जोडुनी अर्जी करितां मर्जी नृपाची जाहली ॥ कृपाळु० ॥८
सुर असुरांचे मुगूट रुळती ज्याचे दिव्य चरणीं ।
हरी तो मुजरा करी लउनी ॥

---

१ 'पायीं वाहणा शाहणा घालितां' हे शब्द अमृतरायाच्या दामाजीचरित्रांतील आहेत हें स्पष्ट आहे अमृतराय हे शके १६७५ मध्यें वारले व त्यानंतर एक वर्षानें देवनाथ जन्मास आले. श्रीहरीनें दामाजीकरितां महाराचें रूप धारण केलें त्याचें वर्णन रायजी करितात.

‘ अनंत ब्रह्मांडें ज्याचे पोटीं । सावळा जगजेठी ।
काळी घोंगडी काळी काठी । काळा दोरा कंठीं ।
बोली म्हाराची थेट मराठी । × × स लगोटी ।
पायीं वाहणा मोठा शाहणा । पतीतपावन नाम जयाचें ॥ ’

‘ पायीं वाहणा मोठा शाहणा' या ओळीचें प्रतिबिंब सेना न्हाव्याच्या पदांत दिसतें मध्वमुनीश्वरांच्या अछडे बछडे छकुडे या शब्दत्रयीचा नाथानीं असाच दुसऱ्या एका पदांत उपयोग केला आहे. यावरून परगुणपरिमाणूना पर्वताकार देऊन त्याचें कौतुक करण्याची नाथाची आदरयुक्त निराभिमान बुद्धि प्रगट होते.

२ गुन्हा.

विधिइंद्रादिक निगम वर्णिती गुणासी सहस्रफणी ।
नृपासी जी जी वदे दीनवाणी ॥
सस्मित होउनि तस्लिम[1] करितो सहस्रवेळ धरणी ।
नृपातें दीर्घ गाजवी ध्वनी ॥
टीप ॥ सन्निध रायें हांक मारुनी श्मश्रुची आज्ञा दीधली ॥ कृपाळू० ॥ ९

ज्या करें हेमनगरा, क्षीर दे उपमन्या सागर ।
तया करीं चोळी नृपाचें शीर ॥
पार्थहयांची थापटुनि पाठी झेलीतसे वाग्दोर ।
तया करीं चोळी नृपाचें शीर ॥
टीप ॥ पाणी लवितां श्मश्रू झाला निद्रा रायासीं लागली ॥ कृपाळू० ॥ १०

त्रुटी वाजतां[2] श्मश्रू करुनी सावध रायासीं केलें ।
नृपानें नेत्रीं सेनासीं पाहिलें ॥
ह्मणे भला तूं भला भला वा काय श्मश्रू चांगलें ।
असें ना मागें कधिं घडियेलें ॥
हस्त तुझा माझे शिरीं लागतां सुख मनीं वाटलें ।
जन्माचें दुःख दुरी लोटलें ॥
टीप ॥ सुगंध तेलें पात्रीं भरुनी रत्नखचित ठेविलीं ॥ कृपाळू० ॥ ११

तेल हस्तकीं घेउनि तेव्हां तो पुढें उभा राहिला ।
सेन्या तो मर्दन करुं लागला ॥
अवचित तळवटी[3] दृष्टी पडतां तेलामाजी निरखिला ।
हरी तो चतुर्भूज देखिला ॥
श्यामसुलोचन रूपमनोहर किरीटकुंडल त्याला ।
कांसे पीतांबर कशियेला ॥
टीप ॥ सहस्रकराचें तेज झळाळे पूर्ण ज्योति बिंबली ॥ कृपाळू० ॥ १२

रूप देखुनी भूप मनीं तो तन्मय होउनी वरी ।
पाहे तों सेन्या मर्दन करी ॥
असें बिंबप्रतिबिंब असावें निरखी तेलाभीतरीं ।

---

१ तसलीम, = सलाम, मुजरा. २ त्रुटि वाजतां = एका चुटकीसरशी ३ तळवटी = बुडाकडे.

व्यापिला परब्रह्म श्रीहरी ॥
चकित होउनी थकित जाहला स्तब्ध नृपति अंतरीं ।
म्हणे हें अघटित आहे काय तरी ॥
टीप ॥ उभय डोळियां टक लागली स्वरुपीं मती त्रिंबली ॥ कृपाळू० ॥१३
सहजसमाधी लक्षालक्षीं चिन्मय रूप थाटलें ।
जीवाचे जिवलग आजि भेटले ॥
मीमाझें हें स्फुरण सर्वही अद्वैतीं भावळलें ।
सुखाचें नीर नयनीं लोटलें ॥
पुरे पुरे मर्दन करावें राया नाहीं वाटलें ।
सेन्यासी पाहून मन दाटलें ॥
टीप ॥ सावध सावध नृपवरा जी आज्ञा द्या मज भली ॥ कृपाळू० ॥१४
ओंजळभर होन रायें आणुनि सेन्याप्रती दिधले ।
प्रभूनें धोकटी सार्जी ठेविले ॥
येतों जी मुजरामज न्हाव्याचा, हरी वचन बोलिले ।
रायाच्या नेत्रीं नीर चालिलें ॥
माय बाळका हरिणी पाडसा वियोग घडतां रडे ।
नृपातें तेवीं दुःख जाहलें ॥
टीप ॥ प्रभु येउनी सेन्यागृहासी धोकटी वरी ठेविली ॥ कृपाळू० ॥१५
स्नानपान आसनींशयनीं नाना भोग पावुन ।
म्हणे मज न गमे सेन्यावीण ॥
क्षणक्षणां तें रूप आठवी नृपासी लागलें ध्यान ।
म्हणे मज न गमे सेन्याकारणें ॥
चैन पडेना सेन्यावांचुनी कंठीं उरला प्राण
तेव्हां ते हांसती सभाजन ॥
टीप ॥ सेन्यासी सत्वर दूत धाडिले सभा थाटें बैसली ॥ कृपाळू० ॥१६
थरथराटें गात्रें कांपती दोन प्रहर लोटले ।
म्हणे आजी माझें दैव फुटलें ॥
दीनवदनें बोभाति अगा ये पंढरिच्या पाटला ।

---

१ पूर्ण थाटानें.

आम्हांसी उबगलासि विठ्ठला ॥
ऐसा हा अति काळवायू आम्हांप्रती सुटला ।
वाटे आयुष्यतंतू तुटला ॥
लगबग लगबग दूत करिती येउनि सभे लोटले ।
हरीचें स्मरण वाचे सुटलें ॥
टीप ॥ सेन्यासी पाहुनी हर्ष नृपा मनीं धांव पुढें घेतली ॥कृपाळू०॥१७
कडकडाटें मिठी घालुनी धरुनि सेन्याचा हात ।
ह्मणे बा भलीच केली मात ॥
तेव्हां येउनी रूप दाविलें जें कां बा तेलांत ।
तें मज दाउनी पुरवीं हेत ॥
तेल आणुनी सेन्यानें पाहविलें रूप नाहीं दिसत ।
दोघेही मनीं झाले विस्मित ॥
टीप ॥ सेन्यासी गहिंवर थोर दाटला अंग धरणीसी घाली ॥ कृपाळू०॥ १८
हाय हाय मज रायें मारितां काय तुझें पैं गेलें ।
हरि असें कशासाठीं तरि केलें ॥
नष्ट दुष्ट आति भ्रष्ट असा मीं कष्ट तुह्मांसि दीधले ।
हरि असें कशासाठीं तरि केलें ॥
टीप ॥ पुरे पुरे राया सेवा तुह्मी हे धोकटी पायीं वाहिली ॥ कृपाळू०॥१९
जळो जळो हें पोट माझें आग लागो कामाला ।
हरि मत्संकटीं नापिक झाला ॥
क्षीरसागरें रमा अर्पुनी सिंहासनीं पुजियला ।
तो मत्संकटीं नापिक झाला ॥
जनकशुकदेव सनकसनंदन ध्यानीं ध्यातां शिणला ।
तो मत्संकटीं नापिक झाला ॥
टीप ॥ सेन्यासह नृपवर वनीं निघतां निजवस्तु भेटली ॥ कृपाळू०॥ २०
सेन्यासि पाहुनि पश्चात्तापें रायें राज्य त्यागिलें ।
ह्मणे मीं परब्रह्म शिणविलें ॥
अनंतकोटिब्रह्मांडातें रोमरंध्रीं नाथिलें[1] ।

---

१ ज्या परब्रह्मानें अनंतकोटि ब्रह्मांडांना आपल्या एका रोमरध्रामध्यें नाथिलें–नाहींसें केले त्या परब्रह्माला मीं व्यर्थ शिणविलें असा अर्थ दिसतो. आथि नाथी, आथिलें नाथिलें या शब्दांची व्युत्पत्ति पूर्वी एका पदांत येऊन गेलेली आहे ती पहा.

जळो मीं परब्रह्म शिणविलें ।
टीप ॥ धन्य धन्य हा संतसमागम कोण कमाई साधिली ॥ कृपाळू०॥२१
जे कां गाती ऐकती पढती सेन्याचें आख्यान ।
तयासीं भेटेल नारायण ॥
सत्य सत्य ही वरद वदली गुरुकृपेची खुण ।
तयासीं भेटेल नारायण ॥
नाथनिरंजनीं शरण रिघतां महत्पापें जळुन ।
तयासीं भेटेल नारायण ॥
देवनाथप्रभु दीनदयाघन कृपेची साउली ॥ कृपाळू० ॥ २२

---

# वेदांतपर कविता.

## पद (२५१).

तें तूं ब्रह्मचि पूर्णपणें. ॥ ध्रुवपद ॥
गुणवर्णादिक नाम रूपही । व्यापुनि ज्या असणें ॥ तें तूं० ॥ १
रंगातित[1] निज वर्णविणीं । वेद असे मौनें ॥ तें तूं० ॥ २
जें घनदाट ज्या पाठ न पोटही । नाहीं अधिक उणें ॥ तें तूं० ॥३
देवनाथ प्रभु आत्मा श्रीगुरु । अनुभवि निज स्वमनें ॥ तें तूं० ॥ ४

## पद (२५२)

नाहीं ज्या विकार[2] रे ! सदा निर्विकार रे ! ।
पूर्णबोधें निजानंदीं वृत्ती तदाकार[3] रे ॥ ध्रुवपद ॥

---

१ रंगातित – रक्त, श्वेत, कृष्ण आणि नील असे–स्थूल, सूक्ष्म, कारण, महाकारण असे चार देहांचे चार रंग कल्पिले आहेत ह्या चारी देहांच्या पलीकडे व ह्या चारी रंगांच्या पलीकडे ब्रह्म आहे. निज – ब्रह्म.
२ विकार वेदांतशास्त्रांत ६ सांगितले आहेत ते:– १ जायते = उत्पन्न होतो २ अस्ति = भासतो किंवा असतो ३ वर्धते = वाढतो ४ विपरिणमते = बदलतो ५ अपक्षीयते = जीर्ण होतो. ६ विनश्यति = नाश पावतो. हे सहा विकार देहाला व दृश्यमान सर्व जगताला आहेत, परंतु ब्रह्मस्वरूप या विकारांनीं रहित आहे. ३ तन्मय, तल्लीन.

भासेना आकार रे ! ......................
लक्षालक्षातीत आपण ब्रह्म साचोकार रे ! ॥ नाहीं० ॥ १
निर्गुण मूळ ॐकार रे ! । ........ .......... ।
आब्रह्मस्तभादि सर्वव्यापक जगदाकार रे ! ॥ नाहीं० ॥ २
कोटी मिहिराकार रे ! । ऐसे तेजाकार रे ! ।
गुरुपरातें अनुभव येरा अंधकार रे ! ॥ नाहीं० ॥ ३
गुरु सुवर्णाकार रे ! । जग नग अलंकार रे ! ।
मुळीं दृष्टी घालुनि पाहतां एकचि नानाकार रे ! ॥ नाहीं० ॥ ४

---

१ लक्ष्य व अलक्ष्य याहून अतीत. म्हणजे मनानें ज्याचें चिंतन करतां येतें, व ज्याचें चिंतन करतां येत नाहीं त्याहूनहि विलक्षण, म्हणजे सगुण व निर्गुण याहून अतीत. " सगुण निर्गुण । दोन्ही विलक्षण " निवृत्तिनाथ २ सत्य; खरें ३ ॐकार हा परब्रह्माचा वाचक आहे विष्णवादिक देवांची उपासना करण्याकरितां तत्स्वरूप शाळिग्रामादिक किंवा सुवर्णादिक प्रतिमांची लोक पूजा करितात व त्या प्रतिमांना देवतारूप मानितात, त्याप्रमाणें ॐकार म्हणजे प्रणव हा ब्रह्मस्वरूपाचा दर्शक आहे व त्याचें उपासनेनें ब्रह्मस्वरूपाची उपासकांना प्राप्ति होते ४ ब्रह्मलोकापर्यंत जें सर्व जगत् आहे तें व्यापून उरलें आहे ५ मिहिर = सूर्य कोटिमिहिराकार = कोटि सूर्याप्रमाणें ज्याचें तेज आहे असें ६ वरच्या ओळींत वर्णन केल्याप्रमाणें जरी ब्रह्मस्वरूप तेजस्वी आहे तरी त्याचा अनुभव गुरुपर–गुरूची सेवा करून ज्यांनीं गुरुकृपा संपादन केली – अशांनाच आहे – इतरांना (गुरुपर जे नाहींत त्यांना ) मात्र अंधःकार आहे हा विरोधाभासलंकार आहे. ७ ह्यांत " गुरु " शब्द ब्रह्मपर लावावा. कारण गुरुस्वरूपाहून ब्रह्मस्वरूप भिन्न नाहीं असें संस्कृत व प्राकृत कवि वर्णन करितात.

'गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णुर्गुरुर्देवो महेश्वरः । गुरुः साक्षात् परब्रह्म तस्मै श्रीगुरवे नमः ॥ अर्थ स्पष्टच आहे याप्रमाणें गुरु शब्द ब्रह्मार्थी लाविला म्हणजे अर्थ स्पष्टच आहे ब्रह्म हें सुवर्णाप्रमाणें असून जें जग ( नग – पर्वत हे जगांत अतर्भूत आहेत परंतु प्रासाकरितां नग शब्दाचा उपयोग केला असावा. किंवा नग म्हणजे अलंकार असा अर्थ घेतला तर जग हें अलंकाररूपी असून ब्रह्म हें सुवर्णरूपी आहे असा अर्थ ) अलंकार–दागिन्याप्रमाणें आहे. परंतु मूळ स्वरूपाकडे दृष्टि ठेवून पाहिलें तर एकच वस्तु नानारूप झालेली आहे जसें एकच सुवर्ण नानाप्रकारच्या अलंकाररूपानें प्रगट झालें आहे, त्याप्रमाणें

देवनाथीं अंगीकार रे ! । गुरु विश्वाकार रे ! ।
पाहतां आत्मा गोविंदा ऐसा तुटला भ्रमाकार रे ! ॥नाहीं० ॥ ५

पद ( २५३ ).

ऐकें गे ! सखये ! बाई ! जिविंची ही खुण ।
सांगतसें तुजपासीं श्रवणीं दे मन ॥ ध्रुवपद ॥
देखियलें नयनीं म्यां अद्भुत कसें, ।
एकचि नाथ निरंजन जगीं व्याप्त असे, ॥
जेवीं पटीं कीं तंतु ह विश्व तैसें, ।
एकपणीं ऐक्याची मूस वोतली असे ॥ ऐकें० ॥ १
अघटित हें गुरुनाथें दाविलें मला, ।
विहिर आकाशीं खालीं वाहे प्रवाह भला, ।
चाले तीन पाट पाणी वाफा सींपला, ।
हातपायांविण सोकी चाली वेळोवेळां ॥
गगनीं बैसोनि स्थिर तो राखितो मळा ॥ ऐकें० ॥ २

---

१ देवनाथांना ही गोष्ट पूर्णपणें पटली आहे कीं देवनाथानीं या गोष्टीचा अंगिकार केला आहे कीं २ पहिलें कडव्याचा अर्थ–मीं आपले डोळ्यांनी ( ज्ञानचक्षूंनीं ) अद्भुत गोष्ट अशी पाहिली आहे कीं, एकच निर्गुण ब्रह्म ( निरंजननाथ ) जगांत व्याप्त आहे जसे पटांत तंतू तसे जगांत ब्रह्म आहे – पटांतून तंतू काढून घेतले तर पट अदृश्य किंवा नष्ट होईल त्याप्रमाणें विश्वांतून ब्रह्मस्वरूप काढून घेतलें तर विश्व नष्ट होईल व जसे सोनार लोक सोन्याचा किंवा इतर धातूचा रस करून मुसींत ओततात व त्यापासून अलंकार तयार करितात त्याप्रमाणें ब्रह्मरसाची मूस ओतून जगत् निर्माण झाले आहे ३ हातपायाविण चाली इत्यादि–याला समानार्थक खालील श्रुति आहे.

अपाणिपादो जवनो गृहीता पश्यत्यचक्षुः स शृणोत्यकर्णः ।

अर्थः–त्याला हातपाय नसून तो फार जलद चालणारा व ग्रहण करणारा आहे नेत्र नसून पाहतो व कर्ण नसून ऐकतो.

४ श्रीगुरूंनी कधीं न घडून येणारी किंवा आलेली गोष्ट मला दाखविली. आकाशांत विहीर असून पाण्याचा प्रवाह खालीं वहातो, तीन पाटांनीं पाणी वहातें, व हातपाय नसलेला सोकारी वाफे तयार करून, वेळोवेळीं त्यांतील मातीं चाळतो व आकाशांत स्थिर बसून मळ्याचे रक्षण करतो—म्हणजे ब्रह्म जगताचे बाहेर असून, त्यापासून प्रवाह म्हणजे माया उत्पन्न झाली व सत्व, रज, तम या तीन गुण–रूप पाण्यानें वाफा बनला म्हणजे जग उत्पन्न झाले व निरवयव जें ब्रह्म तेंच या जगाचें उत्पत्तिपालन व संहार करितें व जगाचे बाहेर असूनही जग त्याचेच सत्तेनें चालतें

आणीक त्यां नवल देखिलें कीं हें
दृष्टी हे उफराटी करुनियां पाहें ।
अद्भुत कीं ते स्थानीं एक नगर आहे ।
भवतालीं एक [1]गंगा झुळझुळ वाहे ॥ ऐकें० ॥ ३

नगराचे पूर्वेसीं रविचंद्र कसे
अद्भुत तेजें गगन उजळलें दिसे ।
आदि अनादि जेथें कांहींच नसे ।
एकचि चिद्धन चिद्रूप ठाईंच असे ॥ ऐकें० ॥ ४

अनुभवें पाहतां बाई! रूप हातवटी ।
पडली ग! ते ठायीं निजऐक्यमिठी ।
[2]सद्गुरुनाथ गोविंदें दाविलें दिठी ।
देवनाथ स्वच्छंदें निजसौख्य लुटी ॥ ऐकें० ॥ ५

---

## गोपाळनाथाष्टक ( २५४ ).

अपारा अगम्या अनामा अरूपा
कृपाळा अजा स्वामिया चित्स्वरूपा ।
श्रुती शीणल्या वर्णितां गूणगाथा
नमस्कार श्रीब्रह्म गोपाळनाथा ॥ १

---

१ हे चरण कूट आहेत. ते योगांतील—विशेषतः हठयोगांतील इडा, पिंगळा, सुषुम्ना व सहस्रदलकमल मूर्धाचक्र यांना अनुलक्षून लिहिले आहेत २ हें स्वरूप पाहण्याची दिव्य दृष्टि सद्गुरुनाथ गोविंद यांनीं मला दिली आत्मसौख्याचा उपभोग मी देवनाथ यथेच्छ घेऊं लागलों. ३ आब्रह्मस्तंबादि—यांतला मूळ शब्द 'स्तंब' ब्रह्मलोकापर्यंत जे सर्व जगत् आहे त्यासह. (स्तंब म्हणजे अत्यंत सूक्ष्म एककोशी जीव—ज्याला आपण पाण्यावरील शेवाळें म्हणतो ते ). (ब्रह्मलोक हा ब्रह्मांडातील वरिष्ठ प्रतीचा शेवटचा लोक) ब्रह्मांडापासून तों अत्यंत क्षुद्र अशा स्तबापर्यंत सर्व वस्तूंत ओतप्रोत सारखा भरलेला.

परब्रह्म आब्रह्मस्तंबादि[3] सारा
स्वयें व्यापुनी वेगळा निर्विकारा ।
विभो सर्वसाक्षी दयाळा अनंता
नमस्कार श्रीब्रह्म गोपाळनाथा ॥ २
चिदानंद आनंदकंदावतारा[1]
नमो सर्वबीजात्मया सर्वसारा ।
स्मरे जो तया नांदवी मुक्ति माथां
नमस्कार श्रीब्रह्म गोपाळनाथा ॥ ३
कलीमाजि या सांब कैलासवासी
पदीं लागतां मालवी जो भवासी ।
चुके आपदा सर्वही नाम घेतां
नमस्कार श्रीब्रह्म गोपाळनाथा ॥ ४
तपोतेजें जैसा स्वतेजें स्फुलिंग ।
शिरीं शोभलें साजिरें दिव्यलिंग[2] ।
स्वभक्तासि जो पूर्ण सामान्य ( सन्मान? ) दाता
नमस्कार श्रीब्रह्म गोपाळनाथा ॥ ५
त्रिपूटीस आतीत[3] जो त्रीपुटीं हो
वसे स्वामिचा स्वामि[4] कृष्णातटीं हो ।
दिनानाथ श्रीनाथ स्वामी अनाथा
नमस्कार श्रीब्रह्म गोपाळनाथा ॥ ६

---

१ आनंदाचा कंद = मूलस्थान असा जो परमेश्वर त्याचा अवतार २ सत्पुरुषाच्या मस्तकावर शिवलिंगाचें चिन्ह असणें हें वर्णन जसे गोपाळनाथाबद्दल आहे, तसेंच शेखमहंमद बाबा योगसंग्रामकर्ते यांच्याबद्दलही आहे. शेखमहंमदबावांनीं:—

“ एकांताचे ठायीं नवलाव केले ॥ जानवें दाविलें चिरुनि खांदा ॥ १ ॥
मुळींचे ब्राह्मण आलो याचि ठायां ॥ दावियलें तया यज्ञोपवित ॥ २ ॥
सदा शिवलिंग अक्षय मस्तकीं ॥ देखिलें कवतुक जयरामांनीं ॥ ३ ॥”
अजगावकर–कृत महाराष्ट्र कविचरित्र पान २३८ ( भाग १ ला ).

३ ज्ञेय, ज्ञाता, ज्ञान यांना अगम्य किंवा हा भेदभाव विसरून सदोदित ज्ञानपूर्ण असणारा. ४ देवनाथाचा स्वामी जो गोविंदनाथ त्याचा स्वामी गुरु गोपाळनाथ. म्हणून स्वामीचा स्वामी कृष्णातटीं माहुली क्षेत्राजवळ त्रिपुटी गांव आहे तेथें अद्याप गोपाळनाथांचा मठ असून त्या मठाची परंपराही चालू आहे

क्षराक्षरातीत अव्यक्त जो कीं
परब्रह्म श्रीनाथराया भजा कीं ।
भजे त्यास जो त्या भवातीत कर्ता[1]
नमस्कार श्रीब्रह्म गोपाळनाथा ॥ ७
चळेना कदा जो ढळेना कळेना
श्रुती वर्णिती त्यांस जो आकळेना[2] ।
अरूप स्वयरूप साक्षी समस्तां ।
नमस्कार श्रीब्रह्म गोपाळनाथा ॥ ८
स्मरे नित्यभावेंसि जो अष्टकांहीं
न होती भवभ्रांति हे कष्ट कांहीं ।
स्वयब्रह्म बाणे समाधान चित्ता ।
नमस्कार श्रीब्रह्म गोपाळनाथा ॥ ९
अजी सर्व श्रेष्ठांत हा देवनाथ
पदा द्वैतभावें नमी देवनाथ ।
त्रिदाचा अभीमान रक्षी स्वभक्तां ।
नमस्कार श्रीब्रह्म गोपाळनाथा ॥ १०

पद (२५५).

अगे ! या कृष्णेच्या निजतटीं । वसताहे ब्रह्म आमुचें त्रिपुटीं.[3] ॥ ध्रुवपद ॥
नाम ना रूप ज्या कांहीं । पाहतां व्यापक निजठायीं. ॥ वसताहे० ॥ १
शिणले वर्णितां श्रुतिनिगम । नाशी अविद्या तमभ्रम ॥ वसताहे० ॥ २
संता आवडता त्रिजगीं । नाथ गे ! दयाळ प्रभु योगी ॥ वसताहे० ॥ ३
ज्ञेय ज्ञाता आणि ज्ञान । तुरे त्रिपुटीचेंही भान.[4] ॥ वसताहे० ॥ ४

---

१ जो त्यास भजे त्या भजकास भवातीत कर्ता भवसमुद्रांतून पार पाडून देणारा. २ आकळेना = आकलन होईना, बद्ध होईना, बुद्धिगम्य होईना. ३ 'अगे या कृष्णेच्या निजतटीं' व यापुढील पद हीं दोन्हीं पदें आपले परमगुरु म्हणजे गुरूचे गुरु गोपाळनाथ यांना अनुलक्षून केलीं आहेत. आमुचें ब्रह्म=आमचे ब्रह्मरूप गोपाळनाथमहाराज यांचा मठ त्रिपुटी येथें आहे. श्रुति निगम=या दोन्ही शब्दांचे अर्थ एकच आहेत. द्विरुक्ति केवळ प्रासाकरितां दिसते.
४ 'जो मी तिनी गुणांतें नातळता । अवस्थात्रयातें नाकळता ।
तिहीं अवस्थांतें प्रकाशिता । तो मी जाण चवथा तुरीय ॥ २७० ॥

(पुढील पृष्ठ पहा.)

विश्वीं कोंदलें घनदाट । नाहीं पोट न ज्या पाठ. ॥ वसताहे० ॥ ५
रक्षी दासासीं निदानीं । पूर्ण बिरुदाच्या अभिमानी. ॥ वसताहे० ॥ ६
नांदे निजरूप अक्षयीं । देवनाथाच्या निजहृदयीं. ॥ वसताहे० ॥ ७

## पद ( २५६ )

कृष्णातीरीं त्रिपुटीमाजी आमुचें ब्रह्मई ॥ ध्रुवपद. ॥
रंगातित जें निजरंग । अद्वय अनाम जें अनंग, ॥
अक्षय अविट जें अभंग । ज्यातें भंग हा नाहीं ॥ कृष्णा० ॥ १
भरलें निघोट जें घनदाट । ज्याचा श्रुति करिती बोभाट, ।
सतेज तेजें लखलखाट । व्यापक जें अंतर्बाही. ॥ कृष्णा० ॥ २
पाहतां स्वरूप हृदयातीता । नुरे द्वैताची हे वार्ता ।
त्रिभुवनीं अद्भुत ज्याची सत्ता । निजजनपालक सुखदायी ॥कृष्णा०३
जें कीं साराचेंही सार । सगुण वेषें जगदाकार ॥
देवनाथाचा आधार । अखंड थारे प्रभुपायीं. ॥ कृष्णा० ॥ ४

## पद ( २५७ )

अरुपानंदीं अद्वय श्रीगुरु दत्तचि अवतरला ।
गुरूची अद्भुत गुणलीला ॥ ध्रुवपद ॥

---

( पान ४६० वरून समाप्त. )
तिन्ही अवस्था तिन्ही गुण । द्रश्य द्रष्टा आणि दर्शन ।
त्रिपुटीप्रकाशिता पूर्ण । तो मी चवथा जाण तुरीय ॥ २७१ ॥
जो मी तुरीय सच्चिद्घन । त्या माझ्या ठायीं अवस्थागुण ॥
नभीं नीळिमा मिथ्या भान । तैसें नसतां जाण जग भासत ॥ २७२ ॥
-एकनाथी भागवत अध्याय २८.

१ अविकृत, निर्विकार २ आपली दृष्टि अंतर्मुख करून आत्मस्वरूपमनन करू लागलें असतां आपलें विश्वाशीं तादात्म्य अनुभवाला यावयाला लागतें आणि त्यामुळें द्वैताच्या कल्पनेचें बीजही रहात नाहीं. ३ श्रेष्ठांत श्रेष्ठ, बलवंतांत बलिष्ठ. ४ अखिल चराचर विश्व हें निर्गुण ब्रह्माचें बाह्य सगुणस्वरूपच आहे. ५ थारा, आश्रय, निवासस्थान ६ हीं चारी पदें आनंदनाथांवर आहेत हीं कोणत्या प्रसंगीं रचिलीं गेली याबद्दल प्रस्तावना पहा गुरुचरणांवरील प्रेमातिरेकाचा मासला म्हणजे या पदांतून जीं ईश्वरविषयक विशेषणें आनंदनाथांना लाविलीं आहेत त्यावरून चांगला दिसतो आतां पक्ष आहेत, पूर्वीं पंथ होते. ७ आनंदनाथ हे प्रत्यक्ष ब्रम्हरूप असून दत्तात्रेयांनींच हा अवतार घेतला आहे. महाराजांची गुणलीला फार अद्भुत आहे. अरूप, आनंदी, अद्वय—हे शब्द ब्रह्मस्वरूपाचे निदर्शक आहेत.

हा नाथनाथ[1] कलियुगांत करितो मात बहू भारी ।
पहा हा मानवतनुधारी ।
ना ब्राह्मण ना क्षत्रिय वैश्य शूद्र वर्ण चारी ।
वहूतीत[2] हा ब्रह्मचारी ॥
ब्रह्मचारि गृहस्थ वानप्रस्था त्रिपुटि सारी[3] ।
नव्हे हा यतिवेषधारी ।
परमहंस[4] परमात्म आनंदी सच्चिद्घनपुतळा ॥ गुरूची० ॥ १
निर्विकल्प हा निर्विकार आकार धरी ऐका ।
प्रभु हा पाळवि[5] भाविकां ॥
प्रेमे पहात रता ठायीं[6] निजसुख साधकां ।
भवजलतरणीं पहा नौका[7] ॥

---

१ गुरूचा गुरु–गुरुश्रेष्ठ. २–३ हा चार आश्रम व चार वर्ण याहून अतीत आहे ४ आश्रम–ब्रह्मचर्य, गृहस्थ, वानप्रस्थ व सन्यास ४ वर्ण–ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र. 'याला समानार्थक शंकराचार्यांचे हस्तामलस्तोत्रांतील खालील श्लोक प्रसिद्ध आहे'—

नाहं मनुष्यो न च देवयक्षौ । न ब्राह्मणक्षत्रियवैश्यशूद्राः ॥
न ब्रह्मचारी, न गृही, वनस्थो । भिक्षुर्न चाहं निजबोधरूपः ॥ १ ॥

४ संन्यासाश्रमांतील शेवटील पायरीवर असलेल्या संन्याशाला परमहंस म्हणतात. संन्याशी ४ प्रकारचे आहेतः–१ कुटीचक=पर्णकुटी करून रहाणारा. २ बहूदक=त्रिरात्राहून जास्त वेळ एक गांवांत वास न करितां गांवोगांव हिंडणारा ३ हंस. ४ परमहंस. या चरणाचा अर्थ स्पष्ट आहे कीं हा सच्चिदानंदघन ब्रह्मच आहे ५ पल्लवित करता–म्हणजे भाविकाचे मनांत भक्तीचा अंकुर असतो त्याला जास्त वाढवितो; रक्षितो

६ रताठायीं प्रेमे पहात–आपले भक्ताकडे प्रेमार्द्रदृष्टीनें पाहातो. साधकां, निजसुख–साधक–मुक्तीविषयीं खटपट करणारे लोकांना आत्मसुखरूपच हा आहे. ७ ही कल्पना श्रीमद्भागवतांतील खालील श्लोकावरून घेतली असावी.

नृदेहमाद्य सुलभं सुदुर्लभं प्लुवं । सुकल्पं गुरुकर्णधारम् ॥
मयानुकूलेन नभस्वतेरितं । पुमान् भवाब्धिं न तरेत्स आत्महा ॥ १ ॥

श्रीमद्भागवत, अ० २०, श्लोक १७.

अर्थ–दुर्लभ ( म्हणजे बहुत जन्मांनीं प्राप्त होणारी ) नरतनु ही उत्तम प्रकारची नाव होय, गुरु या नावेचा नावाडी आहे व मी अनुकूल वारा आहे व अशा सामुग्रीनें जो पुरुष भवसमुद्र तरून जाणार नाही तो आत्मघातकी होय.

पूर्ण सिद्ध, हा प्रसिद्ध मनिंचा कल्प समुळ टाकीं ।
भावें वदनीं नाम घोका ॥
नाम कारल आराम सर्वही चुकेल यमघाला ॥ गुरूची० ॥ २
हा योगीराज महाराज ग्रासितो माज दुर्जनाचा ।
पूर्ण साहाकारी दासाचा ॥
चव देहांचे साक्ष चढोनी घाट उन्मनीचा ।
खेळतो निजानंदिं साचा ।
निजानंद आनंदकंद निर्द्वंद्व स्वरूपाचा ।
ठायिं हा योग समाधीचा ॥
उघड समाधी निजात्मबोधें पूर्णपणें धाला ॥ गुरूची० ॥ ३
वदे बाळ, नाथ लडिवाळ; किती पाल्हाळ शब्दवाणी ।
अरे ! हा योगि महाज्ञानी ॥
ज्ञान आणि विज्ञानें ग्रासुनि योग कसे दोन्ही ।
नांदतो निजात्मानिजभुवनीं ॥

---

१ पूर्ण सिद्ध हा प्रसिद्ध, मनिचा कल्प समुळ टाका–हें प्रसिद्धच आहे कीं, हा आनंदीनाथ पूर्ण वैराग्ययुक्त आहे. यासंबधीं तुम्ही आपल्या सर्व शंका टाकून निःशंक विश्वासून रहा २ चव देहाचे साक्ष– हा चार देहांचा साक्षी आत्मा होय.

"स्थूल देह औटहात । रक्तवर्ण ब्रह्म तेथ ॥ १ ॥
श्वेतवर्ण सूक्ष्म देहे । अंगुष्ठपर्व दीसताहे ॥ २ ॥
अर्धपर्व कारण देहे । श्यामरूप प्रभा पाहे ॥ ३ ॥
महाकारण ते तुर्या निरुपम सुरकार्या ॥ ४ ॥
एका म्हणे ऐसें आहे । गुरुसि शरण जाउनि पाहें ॥ ५ ॥"

४ देह–स्थूल, सूक्ष्म, कारण, महाकारण. स्थूल–मांसमय, सूक्ष्म–वासनामय, कारण–माया महाकारण–तुर्यावस्थेतील आत्मा,

३ चढोनी घाट उन्मनीचा खेळतो निजानंदिं साचा–उन्मनीचा घाट-चढून निजानंदीं खेळतो–म्हणजे मनाची उन्मनी नांवाची अवस्था आहे तिला प्राप्त होऊन स्वानंदात निमग्न राहतो. उन्मनी–तुर्येच्या पलीकडील ५ वी अवस्था–याअवस्थेंत मनाचा पूर्णपणें लय होतो. धाला = तृप्त झाला. ४–५ ज्ञान आणि विज्ञान–शंकराचार्यांच्या मताप्रमाणें ज्ञान–ज्ञानानें प्रकाशित होणारें सत्य, ज्ञानरूप व अनंत असें जे ब्रह्म तें व विज्ञान म्हणजे अनुभवयुक्त ज्ञान. ज्ञानेश्वरांचे मताप्रमाणें–ज्ञान म्हणजे ब्रह्म व विज्ञान म्हणजे प्रापंचिक ज्ञान.

( पुढील पृष्ठ पहा )

दत्त दत्त अवधूत दिगंबर श्रुति गाती गाणीं ।
तोचि हा देखियला नयनीं ।
देवनाथ ह्मणे नाथ आमुचा पुर्ण ओळखीला ॥ गुरूची० ॥ ४

पद (२५८)

सच्चिद्धन आनंद आनंदी दत्तात्रयमूर्ती ।
कलियुगीं धरि अवतार, कीर्ति हे व्यापक त्रैजगतीं. ॥ ध्रुवपद ॥
गुणातीत जो निर्गुण सो गुणरूपिं प्रगट जाहला ।
अज अव्यय अनुपम आनंदी अनादिचा पहिला: ॥
नाम न रूप न गुण ज्यातें अरूपरूप ठेला[१] ।

---

(४६३ पृष्ठावरून समाप्त)

'तैसी जाणीव जेथ न रिघे । विचार मागुता पाउलीं निघे ।
तर्कु आयणी नेघे । आंगीं जयाच्या ॥
अर्जुना तया नांव ज्ञान । येर प्रपंच हें विज्ञान ॥ '
—ज्ञानेश्वरी, अध्याय ७. ओंवी ५१६.

या दोन शब्दांची व्याख्या एकनाथमहाराजांनीं आपल्या भागवतांत सांगितली आहे तीं अशी:—

करितां गुरुशास्त्रशुद्ध श्रवण । तेणें जाहलें तें म्हणिजे ज्ञान ।
त्याचा अनुभव तेचि विज्ञान । ऐक लक्षण त्याचेंही ॥ ४९ ॥
स्वयें स्वयपाक केला जाण । जाणे कटु मधुर लवण ।
जंव चाखिला नाहीं आपण । ते दशा सज्ञान ज्ञान म्हणती ॥ ५० ॥
केलिया रसाचें रसास्वादन । स्वयें गोडी सेवी आपण ।
ऐशी दशा तें विज्ञान । उद्धवा जाण निश्चितीं ॥ ५१ ॥ (ए०भा०अ०१९)
पहिलें शास्त्रश्रवणें ज्ञान । तदनुभवें होय विज्ञान
ऐसा ज्ञानविज्ञानसंपन्न । निरभिमान तो होय ॥१३३॥ (ए भा. अ. ७)

१ अरूपरूप ठेला:—रूप ज्याला नाहीं तें अरूप, निराकार अरूपत्व अथवा निराकारत्व हेंच रूप ते अरूपरूप, असें अरूपरूप ठेला = नटला ठेल १ (पुल्लिंगी व स्त्रीलिंगी) = गर्दी, लयलूट, अतिशय समृद्धि २ ठेल (विशेषण)=पुष्कळ; उ "पाऊस ठेल पडला;" "पीक ठेल आलें;" "माणसें ठेल जमलीं." ३ ठेलणें=ढकलणें, गर्दी करणें ४ ठेलाठेली=गर्दी, कोंडमारी. ५ ठेला (पु०) अथवा ठेली (स्त्री) = पोतें, गोणी, भेली ६ ठेला=हें ठेणें म्ह. उभें राहणें (स्था=तिष्ठ धातूपासून) ह्याचे धातुसाधित अव्यय आहे; हें फक्त कविप्रचारांत येतें. उ० "ठेला जोडूनि हस्तक;" "राजदृष्टीसन्मुख उभा ठेला," "त्याचे संगानि जे लागले । तेही तैसेचि होऊनि ठेले," येथे सहावा अर्थ लागतो आनंदीनाथ निर्गुणस्वरूपी होऊन राहिले, असा कवीचा आशय.

तारावया जडमूढ दयाब्धी कृपें उच्चबळला ॥

श्लोक ॥ एकीं अनेक नटला प्रभु तोचि हा कीं,
ज्याची सदा सदय जे श्रुति कीर्ति हाकी ।
आकार हा धरित तारकनीजभक्त, ।
सरक्षुनी निजजना निवटी[1] अभक्त ॥

टीप ॥ ब्रह्माविष्णुरुद्रत्रयासी ऐक्यरूप ज्योति ।
मानव तनुचा थाट, घाट एक अघटि ; तव स्थिती ॥सच्चिद्धन०॥ १
महद्भूतें[2] हा नाथ जगाचा अद्भुत विभु सत्ता ।
ॐकाराचें मूळ सकळ जो क्षराक्षरापरता[3] ।
साराचें निजसार धरी आकार भूमिवरता ।
अद्वय अपरंपार सार जो मानवतनुधर्ता ॥

श्लोक ॥ ता तोचि हे नरतनू धरि या कलीला, ।
स्वानंदयुक्त जगिं दावितसे स्वलीला ।
बालोन्मतादिक पिशाचगतीस दावी[4] ।
दावि स्थिती अघटितासि किती वदावी,

टीप ॥ चिद्धनघन चैतन्यपूर्ण[6] हा साक्षि सर्वभूतीं ॥
दे पदवी सायुज्य त्यांस जे सद्भावें स्मरती ॥ सच्चिद्धन० ॥ २
महायोगि निजरंगीं खेळतो, अभग पद ज्याचे ।
अनुभवि हे निजखूर्ण जाणती, भाग्य भाविकांचें. ॥

---

१ निवटी–संहारी नाहींसें करी २ महद्भूत–' एको विष्णुर्महद्भूतम्. ' ( विष्णुसहस्रनाम ) ३ क्षराक्षरापरताः क्षर व अक्षर यांहून निराळा म्हणजे उत्तम. क्षर–नश्वर–जो नाहींसा होतो तो–म्हणजे सर्व भूतें अक्षर–जो नश्वर नाहीं तो–म्हणजे मायोपाधियुक्त जीव. ' क्षरः सर्वाणि भूतानि कूटस्थोऽक्षर उच्यते।' ४बालोन्मतादिकपिशाचगतीस दावी–बाल म्हणजे मुलें, उन्मत्त म्हणजे माजलेले व पिशाच म्हणजे वेडे लोकाप्रमाणें योगी किंवा साधु राहतात. त्याचा हेतु हाच कीं, आपल्याला लोकापासून उपसर्ग म्हणजे ताप होऊ नये. ५ अघटितासि स्थिती दावी, किती वदावी–कांहीं तरी अघटित अशीच करणी करतो त्याचें कोठवर वर्णन करावें ६ चित् ( ज्ञानशक्ति ) हिनें घन ( पूर्ण भरलेला ) असा घन मेघ केवळ कोरडा ' गर्जंति केचित् वृथा,' अशापैकींचा मेघ नव्हे ७ निजखूण–अत्यंत गुप्त अशी खूण, आंतली गांठ अनुभवी जे असतात त्याना हा बाह्यात्कारी उन्मत्त पिसा आहे तरी अंतर्यामीं पक्का सिद्ध आहे या गुप्त गोष्टींची पक्की माहिती आहे जे भाविक असतील त्यानाच हें अनुभवभाग्य येणार. इतरांना कोठचें !

धरुनि कल्पना कुभाव मानिति मानव जे साचें[1] ।
रौरव गति भोगिती वदों किति जळो तोंड त्यांचें ॥
श्लोक ॥ संगीं असोनि हित नेणति सगधारी,[2]
छेदील काळ धरुनी शिर खर्गधारी ।
हा योगिराज महाराज जगन्निवास,
हो भाविकास विभुच्या स्वरुपीं निवास[3]. ॥
टीप ॥ हा नाथनाथ हृदयांत प्रीतिनें देवनाथ चिंती ।
परब्रह्म आनंदी जाणिजे वर्म महासंतीं ॥ सच्चिद्घन० ॥ ३

## पद ( २५९ )

आनंदि जाल्हनापुरीं धरी अवतार[5] ।
जगिं वृत्ति दाविती दृष्टि करीं आधार[6] ॥ ध्रुवपद ॥
वर्णितां गुणाला कदापि न कळे पार ।
समसमान सर्वांभूतीं करी व्यापार[7], ॥
जपताचि नाम निशिदिनिं कीं वदनीं सार[8], ।

---

१ साचें-खरोखरच ( क्रियाविशेषण ) भोगिती या क्रियापदाशीं संबंध. २ सासर्गिक, जवळचे ३ भाविक जो आहे त्याला या विभूच्या योगप्रभूच्या ब्रह्मस्वरूपीं अखंड धारा मिळो; याच्या सेवेनें तो ईश्वरस्वरूपी अखंड रममाण होवो ४ आनंदी हा परब्रह्म आहे हें वर्म महासती जाणिजे महासती याचें कारण येरां प्राकृत अभाग्यांना 'वर्म' कळण्याइतकें त्याचें भाग्य कोठचें ?

५ आनंदस्वामीविशेल हें तिसरें पद आहे. या पदामध्यें स्वामी स्वच्छंदानें वर्तणारे होते; ते एका ठिकाणीं रहात नसत; परंतु ते पूर्ण यागी असून केवळ ईश्वर आहेत व त्यांची आपले भक्तावर पूर्ण कृपा असते व जे त्यांचें अनन्य भावानें भजन करतील त्याना हा भवसागर सहज तरून जातां येईल असा भावार्थ आहे ६ दृष्टि करीं आधारः दृष्टि स्थिर करून पाहा यांची वृत्ति जरी स्वच्छंदी आहे तरी तूं चित्त स्थिर ठेवून त्यांचे ब्रह्मरूपावर नजर ठेव

७ व्यापारः-वर्तणूक सर्वांभूतीं समत्व दृष्टि ठेवून जगात निर्मोहत्वाने आपले व्यवहार चालवतो ८ सार, ( समर्थ, सारपूर्ण, बलिष्ठ ) "सार नाम निशिदिनिं जपतांचि की, निजदासा भव-पार करी हा निश्चय" असा अन्वय =आनंदी माहाराजांचे सामर्थ्यवान आणि पावन अशा नामाचा मुखानें जप केला असतां आपले भक्तांना महाराज भव म्हणजे संसारसागर यांतून पार करतील, उतरून नेतील ही निश्चित गोष्ट आहे

निजदासा निश्चयें करीत हा भवपार ॥
दातार दिनाचा[1] करी स्वइच्छाचार ।
कधिं राहात नगरामध्यें फिरे कांतारीं[2] ॥
जो साधक सद्भक्तासि खरा आधार ॥ जगिं० ॥
कधिं नग्नदिगंबर फिरे नगरिं उदास ।
कधिं अंगामध्यें झगा जरीजरतांस ॥
निजस्वरूपीं भरला रंग कसा अविनाश ।
भव आटुनि करि पदवाट[3] सखा दासास ॥
कधिं तुमान पायामधें कटीं कटियार ॥ जगिं० ॥ २
भगवंतें आणि निजभक्त एकची जाण, ।
धरिं निर्मळ हा निजभाव[4] नको अनमान ॥
आनंदी नव्हे मानवी रे भगवान ।
जगतारक या सृष्टीसि किं धरलें स्थान ॥
हा योगिराज महाराज ग्रासि विज्ञान ।
दुष्टासि भासतो काळ किं भक्ता सान[5] ॥
करिं स्मरणी माळा गळां श्रीशिवदातार[6] ॥ जगिं० ॥ ३
ऐकता स्तुती श्रवणासी दे उत्साय[7] ।
फिर अवनीं आणि दर्शना दाविले पाय ।
दर्शनें जाहलों पुनीत वर्णूं काय ।
आनंद भरला जिवीं हृदिं न समाय[8] ।
योगिनी देखिली दृष्टि आनंदीमाय[9] ।

---

१ दातार दिनाचा—दीनांचा कनवाळु, दीनांची इच्छा पुर्ण करणारा २ कांतार – अरण्य ३ भव आटुनि करी पदवाट दासास – भव म्हणजे संसार-सागर त्याला कोरडा करून आपले दासास म्हणजे भक्तास पदवाट, पायानें चालत जाण्याजोगा मार्ग करी – तात्पर्य भवसागर तरण्यास कठीण आहे तरी यांचे भक्तास त्यांतून सहज जातां येतें ४ निजभाव – एकनिष्ठ विश्वास, अत्यंत विश्वास. ५ सान – लहान. ६ श्रीशिवदातार – श्रीशंकराप्रमाणें भोळा व दाता – शंकरानें पार्वती व शिवलिंग दान दिलें, भस्मासुरासारख्यांना वर देऊन आपणावर संकटें ओढविलीं, पण आपल्या दानशीलतेमध्यें कमी केलें नाहीं, तसाच हा दाता ७ दे उत्साय–उत्साह देते. ८ नसमाय – न समावे, सामावत नाहीं ९ दृष्टीनें मीं आनंदीमाता योगिनी देखिली

कटिबंध सख्या ! हा छंद सदा मुखिं गाय ॥
वदे देवनाथ हें साधें नाम मनिं जप होसी भवपार ॥ जगिं० ॥ ४

## पद ( २६० )

'आनंदी' त्र्यक्षरी मंत्र स्वमुखें उच्चारा ।
होतां शरणागत पदिं भावें चुकेल भवफेरा[1]. ॥ ध्रुवपद ॥
आदिअनादी[2] अक्षर[3] पाहें क्षरातीत[4] कीं हा ।
अद्वयें[5] पूर्णपरात्पर आपण अपरा परकीआ[6] ।
आआ म्हणतां आत्मसाधनें विनटुनि[7] घ्या कीं हा ॥ आनंदी० ॥ १
नमिती शुकसनकादिक[8] ज्यातें तो हा जगजिवन ।
न कळे लीला शेषा[9] ज्याची नवल विंदानें[10] ।

---

१ भवफेरा = भवसागरांतील जन्ममरणाच्या अखंड येरझारी, ज्यांच्या-योगानें मनुष्य कंटाळतो पण परतीराला लागत नाहीं. २ आदि – अनादि – आदि (सगळ्यांत पहिला) अनादि (ज्याच्या अगोदर कोणी झालेला नाही असा). ३।४ अक्षर–क्षरातीत–दोन्ही शब्दांच अर्थ एकच दिसतो बाकी क्षरालाही आणि अक्ष–रालाही अतीत असा परमेश्वर आहे ५ आद्वय–अद्वय. ६ अपरा–परकीआ अपरां इतरांना हा पर वाटतो, पण हा आपण स्वतः पूर्ण परात्परच आहे परशब्द निर्वाण वाचक, उत्तम वाचक, जगदात्मावाचक असा आहे ' आद्वय पूर्ण परात्पर आपण, अपरा पर कीं हा ' असा अन्वय हा अपरां येरां प्राकृत जना-पर उत्तम असा दिसतोच, पण हा ' परात्पर परब्रह्मरूपीच आहे एवढ्या महासिद्ध कोटींतील हा पुरुष आहे ७ आत्मसाधनें विनटुनिः–आत्म-प्राप्तीचीं साधनें करून घेऊन. या पक्तीचें तात्पर्यः– " आ " " आ " म्हणतां म्हणजे " आनंदी ' या मंत्रांतील प्रथम अक्षराचा उच्चार होतो न होतो तोंच आत्मसाधनार्थ याच्याठायीं विनटा (चरणीं लीन व्हा) ८ शुक–व्यास-पुत्र ज्यानें परिक्षित राजाला भागवत सांगितलें तो सनकादिक–सनक सनन्दन, सनत्सुजात व सनत्कुमार हे चार ब्रह्मदेवाचे मानसपुत्र असून ब्रह्मनिष्ठ आहेत. ९ शेषा – शेष अनंत मुखांचा आहे परंतु तो सर्व मुखांनीं भगवतांचे गुण वर्णूं लागला तरी त्याला भगवंताचे गुण पूर्ण वर्णितां येत नाहींत. १० विंदान–कौशल्य, कळसूत्र हा शब्द कविसांप्रदायांत जास्त अपूर्वलाघव, अघटित घटना असा अर्थ उ० " प्राक्तनाचें विचित्र विंदान । दैवावरी काय बोल ठेऊन;" "थोर कर्माचें विंदान । वनीं रुदन करीत राजनंदन;" "ऐसें विंदान करुनि देव । परी हें कोणासि न कळे लाघव "

नम्र होउनी पाहें अतरीं अनादि निजखूणं[1] ।
नन ह्मणतां अनसुयानदन दत्तात्रय जाणें[2] ॥ आनंदी० ॥ २
दिगबरू हा स्वामि निरजन निर्गुण आनंदी ।
दीक्षा परमाद्भुत हे परम हंस निजानंदीं ।
दिव्यरूप स्थिति बाल्यपिशाचोन्मत्त विभु छदी[3] ।
दीदी ह्मणता ज्ञानदिवाकरें[4] स्वामी आनंदी, ॥ आनदी० ॥ ३
देवनाथ निजहृदयीं जपतां अनादींच सुख दे ।
[5]दमिलें इंद्रियव्यापारातें, हरिलिं समुळ द्वदें,[6] ।
दे घे त्यजोनी ऐक्यण्दाची अद्वयपद घे दे
दे दे म्हणतां देव चिद्धनीं भोग निजानंदें ॥ आनंदी० ॥ ४

## पद ( २६१ )

'[7]तुकाराम' चतुराक्षरी मंत्र जपतां निजहृदयीं ।
दे पद साम्राज्याचें येउनि मुक्ति रुळे पायीं ॥ ध्रु० ॥
[8]तूतू तू चैतन्य तूचि तूं त्यागुनियां मी तू ।

---

१ निजखूण – अगदीं गुप्त अशी आंतली गांठ. २ न अक्षराचा उच्चार तोंडून निघतो तोंच दत्तात्रयप्राप्ति झाली असें समज. ३ छदी – स्वच्छंदी-पद नंबर २५९ मध्यें 'दातार, दिनाचा करी स्वइच्छा चार' असें स्वामींचें वर्णन आहे यावरून छंदी असा पाठ योग्य आहे असें वाटतें ४ ज्ञानदिवाकर – ज्ञानसूर्य. ५ दमन केले ६ द्वदे – द्वद्वें शीतोष्ण, सुखदुःख, मित्र-शत्रू इत्यादिक द्विधाभावना जाऊन विश्वांतील ऐक्यभावनेला पोंचले. हीं सर्व पदें गुरुपर आहेत गुरूला शरण गेल्यावर गुरूचा उपदेश झाला म्हणजे मनाचे सर्व संकल्प-विकल्प जाऊन ब्रह्मसाक्षात्कार होतो असा या व इतर गुरुपर पदांचा भावार्थ आहे.

७ मोरोपतानीं मन्त्रभागवतांत किंवा मन्त्ररामायणांत ज्याप्रमाणें नारायण मंत्राची किंवा राममन्त्राची अक्षरें आर्यांतून गोंविलीं आहेत त्या-प्रमाणें "तुकाराम" या चार अक्षराचा मन्त्र कल्पिला. ८ ध्रुवपदाचा अर्थ आहे कीं "तुकाराम" या चार अक्षरी मन्त्राचा जप साधकानें केला असतां, त्याला आत्मज्ञानरूप साम्राज्याची प्राप्ति होऊन मुक्ति त्याचे पायीं रुळूं लागेल. मी तू असा भेदभाव तूं सोडलास तर हे जीवा, तूच चैतन्य म्हणजे ब्रह्म आहेस.

[1]तू साक्षी अपरोक्ष परात्पर आदिअनादि तूं ।
[2]तू पाहें मजमाजि सकळ हें विश्व चराचर तूं ।
[3]तूं तू ह्मणणें शब्द न साहे, अगम अगोचर तूं ॥ तुका० ॥ १
[4]कार्य कारण कर्तृत्वाचा संबंध तुज एका ।
कांहीं नदिसे, काळाचा तूं काळ नसे शंका ।
काळ त्रिकाळीं अबाधिततनु, शुद्ध बुद्ध नीका ।
काया छाया माया नसे तुज, अरुप रूपरेखा ॥ तुका० ॥ २

---

१ या ओळीचा अर्थः—तूंच साक्षी ( भा॰ स्कं ११ अ १३ श्लो २७ ) द्रष्टा ( म्हणजे देहाच्या ज्या चार अवस्था – जाग्रत्, स्वप्न, सुषुप्ति व तुर्या या सर्वांना पाहणारा असा ) तूं आहेस तूं अपरोक्ष ह्मणजे प्रत्यक्ष, परात्पर । पर म्हणजे श्रेष्ठ किंवा सूक्ष्म – आदि, ( सर्व जगताचा कारणभूत, ) अनादि ( तुझ्या आधीं कोणी न झालेला ) तू सर्व जगताचें कारण व तुझ्या अगो-दरचें दुसरें कोणी नाहीं. २ या ओळीचा अर्थः— माझ्यामध्ये म्हणजे आत्म-स्वरूपामध्यें तू म्हणजे हे जीवा चराचर ह्म० स्थावरजगम सर्व विश्व पाहा

इहैकस्थं जगत्कृत्स्नं पश्याद्य सचराचरम् ।
मम देहे गुडाकेश यच्चान्यद्द्रष्टुमिच्छसि ॥ भ. गी अ ११ श्लोक ७.

३ तू तूं म्हणणें शब्द न साहे—म्हणजे ही वस्तु व दुसरी वस्तु भिन्न आहे हें म्हणणें चालत नाहीं, कारण एकच चैतन्य सर्वत्र भरलें आहे अगम अगोचर तूं – मन, बुद्धि, वाणी व इंद्रियें यांना तुझें म्हणजे ब्रह्मस्वरूपाचें ज्ञान होत नाहीं.

४ तुला कार्य, कारण व कर्तृत्व या त्रिपुटीचा संबध नाहीं; तू काळाचाही काळ आहेस म्हणजे काळाची सत्ता तुझेवर चालत नाहीं, ही गोष्ट निःसंशय आहे; तिन्ही काळांत तुझी तनु अबाधित राहते, तू शुद्ध बुद्ध सत्यस्वरूप आहेस; तुला काया म्हणजे देह हीच कोणी एक छाया किंवा माया ही नाहीं, तू अरूप आहेस.

पहिल्या चरणावर समानार्थी गीतेतील खालील श्लोक आहेः—
कार्यकारणकर्तृत्वे हेतुः प्रकृतिरुच्यते
पुरुषः सुखदुःखानां भोक्तृत्वे हेतुरुच्यते ॥ गी अ. १३ श्लोक २१.

नीका – खरा.

काया, छाया, माया, — हे शब्द प्रासाकरितां योजले आहेत. काया ही छायेप्रमाणें किंवा मायेप्रमाणें नश्वर आहे सत्य नाहीं.

इदृशी राममायेयं या स्वनाशेन हर्षदा ।
न लक्ष्यते स्वभावोऽस्याः प्रेक्षमाणैव नश्यति ॥ योगवासिष्ठ.

रूपरेखा—चित्रांत काढलेल्या रेखेवरून रूपाची–आकाराची किंवा आकृतीची कल्पना येते. परतु ब्रह्म अरूप असल्यामुळें रूपरेखा त्याची होत नाहीं.

राणा त्रैलोक्याचा तो तुजविण नाहीं दुसरा ।
रानिंजनीं तूं व्यापक अममी अद्वय रे चतुरा ।
रात्रंदिवस भासतसे हा मायेचा थारा ।
राहणें येणें जाणें नसे तुज ब्रह्म विश्वकारा ॥ तुकाराम० ॥ ३

महा अखिल निजरूप रूपेंविण तो तूं पूर्णकाम ।
मनोन्मनीं सुख भोगी आपुलें निजात्मविश्राम ।
ममत्व हें तव ठायीं न आहे, निजजन हें धाम ।
मंथन करुनी रस सेविसी तैंच तुकाराम ॥ तुकाराम० ॥ ४

[3]देवनाथ ह्मणणेंचि आटलें पाहणेंपण समुदें ।
देणें घेणें मुळींच खुंटलें चिद्धन आनंदें ।
देउनि मग बलिदानातें मन निरसविलीं द्वंद्वें ।
देही असतां देहविदेहा चित्त स्वयंभ नांदे ॥ तुकाराम० ॥ ५

---

१ कडव्याचा अर्थ स्पष्टच आहे.

२ या कडव्यांतील पहिल्या व तिसऱ्या चरणांतील कल्पना, वर दुसरे कडव्यातील " = अरूपरूपरेखा " शब्दांत व पहिलें कडव्यांतील " तूं तूं म्हणणें शब्द नसाहे " या वाक्यांत आल्या आहेत. महा अखिल निजरूप – ..... मनोन्मनीं सुख भोगी आपुलें निजात्म विश्राम –– म्हणजे मन उन्मन झालें असतां म्हणजे विषयाकारता सोडून मन ब्रह्मस्वरूपाकार झालें असतां आत्मस्वरूपीं विश्रांतिरूप सुख तूं भोगतोस. निजजन हें धाम मथन करूनी रस सेविसी तैंच तुकाराम – याचा स्पष्ट अन्वयार्थ काय ?

३ याचा अर्थ – वरील कडव्यांत दिल्याप्रमाणें ब्रह्मकरणवृत्ति झाल्यावर मी देवनाथ असें म्हणणें आटन गेलें – नाहींसें झालें – मी देवनाथ अशी ममत्वभावना नष्ट झाली. ( ' पाहाणेंपण समुदें ' म्हणजे काय ? ) झालें ब्रह्मानंदांत मी निमग्न झाल्यामुळें देणें देणे ही खुटलें म्हणजे नाहींसें झालें आहे. नंतर मी मनाचे बलिदान देऊन ( ह्मणजे मनाचे सकल्पविकल्प सोडून दिल्यामुळें, ) द्वंद्वें म्हणजे सुखदुःख, शीतोष्ण, मित्रशत्रु, इत्यादि दुकलीही सोडून दिल्या आहेत.

मीपणाची उरी तूपणीं भेटतां । आपण पाहतां वाव झाली ।
वाव झाली देव देखतां दाटणी । दास म्हणे वाणी वेडावली । रामदास ॥

या चरणाचा समानार्थक याच कवीचा ' मन हे मुरालें ' हा कटिबंध ( पान १८२ ) पहा.

पद ( २६२ )

' गोविंदनाथ पंचाक्षरि मंत्र अखंडित हा जपा. ।
अखंड जपतां भावें चुकवीं जन्ममृत्युखेपा ॥ ध्रुवपद ॥
गोप्यवस्तु[1] चौपरती[2] निरुती[3] लक्षिति ते लागो ।
' गो ' इंद्रियचाळकपद[4] वरुनी सत्पथिं सम वागो ।
गोप जिला अति गोप्य, समुच्चयदुष्टविषय त्यागो ।
गोगौतमिसम[5] निर्मळ मन शुद्ध हें स्वरुपिं जागो ॥ गोविंद० ॥ १

---

१ गोप्यवस्तु = आत्मवस्तू परात्पर वस्तुचें ज्ञान, वस्तु हा शब्द ईश्वरस्वरूपार्थक आहे, "नपवे किमपि वस्तू सद्गुरूवीण हाता" देवनाथ  २ चौपरती= चारी वेदाच्या अलीकडील, वेद देखील जिचें गूढ उकलावयाला असमर्थ झाले अशी. ३ निरुती–निःसशय, खात्रीची जी गौप्य वस्तु ( ईश्वरविषयक नितांतगोपनीय ज्ञान अथवा गूढब्रह्मरूप ) निरुती चौपरती लक्षिती = ( निःसशय चारी वेदांना अगम्य असें मानतात ती ) हातीं लागो = मला बुद्धिगम्य होवो

४ इंद्रियरूपी ओढाळ गुरांचे दमन करणाऱ्याचें पद हा समास उलटा झालेला दिसतो. इंद्रियांना गुरांची उपमा संस्कृत वाङ्मयांत सर्वतोदृश्य आहे एकनाथमहाराज आपल्या गोपाळाच्या भूपाळींत ह्मणतात:—

" उठिं रे गोपाळा उघडीं स्वरूपलोचना
सरलि अविद्याराती उदय झाला रविकिरणा ।
**इंद्रियगोधनें** नेईं निर्गुणकानना
सुटली मानसवत्सें तुजविण नाकळती कोणा ॥ "

अन्वय:— जिला ( ज्याला ) गोप अति गोप्य ( समजती ) तें गोइंद्रियचाळक पद वरुनी ' ( हें मन ) सम सत्पथ वागो.

अर्थ.— गोप म्हणजे गवळी म्हणजे गोकुळांतील गोपाळ ज्या भगवंताच्या चरणाला अति गोप्य ( गुप्त ठेवण्याला योग्य ) समजतात त्या – गो म्हणजे इंद्रियें अथवा इंद्रियरूपी गुरें यांचा चालक ( चैतन्य उत्पन्न करणारा, ) जो ईश्वर त्याचे चरणीं लीन होऊन किंवा त्याचे चरणाचा आश्रय करून सम राहून (म्ह० निश्चल राहून म्ह० इष्ट किंवा अनिष्ट परिणाम घडून आले तरी चचल न होऊन ) सत्पथानें सन्मार्गानें हें मन चालो ५ अन्वय–' गो ' गौतमिसम निर्मळ (व) शुद्ध हें मन स्वरूपीं जागो गो म्हणजे गाय व गौतमी= पार्वती, शिवपत्नी यांच्याप्रमाणें शुद्ध व निर्मळ म्ह० कलकरहित हें मन होऊन ईश्वरस्वरूपीं जागृत राहो. तिसरे चरणातील ' जिला ' या सबधी सर्वनामाचा संबध दुसरे चरणांतील पद याकडे वर लाविला आहे. 'जिला' हें स्त्रीलिंगरूप असून, 'पद' हें नपुसकलिंगी आहे, यामुळें हा अन्वय बरोबर लागत नाहीं हें खरें, परंतु तसा अन्वय लाविल्यावांचून अर्थाची सगति जुळत नाहीं.

विश्वीं भरुनी उरलें तें गुज निजदृष्टीं दावी[1] ।
विकल्प छेदुनि ऐक्यपणें श्रीदूतपणा तुरवी[2] ।
विलास लाजो ऐक्य अनादि नानुस्वानुभवी ।
वेदश्रुति नेति नेति, गुज गुरु दे देहा पदवी[3] ॥ गोविंद० ॥ २
दमन इंद्रियां करुनी दमना सम सांडीं कुमद ।
दळकमलाक्षीवरें[4] स्मर हृदयीं, सेविं सुखामोदें[5] ।
हृद्दलसहस्रापरतें निरुपम निघोट जें सुखद ।
ह्मणता ' दत्तात्रयगुरु सच्चिदानंदकद ॥ गोविंद० ॥ ३
नामरूप ज्या नसेंचि कांहीं, अदेखदेखणा[6] ।
नाकळलें गुज वेदा ह्मणउनि धरियेलें मौना ।
नारायण आश्रया नारा, तें पद उमजाना[7] ।

---

१ सर्वविश्व व्यापून जें उरलें आहे तें गुह्य ब्रह्मस्वरूप श्रीगुरु आमचे डोळ्यांला दाखवून देतात २ व सर्व संशय छेदून म्ह० नाहींसे करून ब्रह्माशीं तादात्म्य करून देतात व यामुळे श्रीदूतपणा उरू देत नाहींत—म्ह० लक्ष्मीचें दास्यत्व नाहींसें करितात म्ह० लक्ष्मी किंवा संपत्तीयलद्द उदासीनता भक्तांचे मनांत उत्पन्न करितात ससारापासून मन परावृत्त झालें म्हणजे संपत्ति किंवा विपत्ति याची ब्रह्मनिष्ठ पुरुष पर्वा करीत नाहींत. ३ तिसरे चरणाचा अर्थ लागत नाहीं. चौथे चरणाचा अर्थः—वेद ज्या स्वरूपाचें वर्णन 'नेति नेति' ( म्ह० 'हें नव्हे' 'हें नव्हे' तर सकल दृश्यमान व भासमान पदार्थांहून भिन्न व अनिर्वचनीय असें तें आहे ) म्हणून करितात तें गुह्य स्वरूप श्रीगुरु दाखवून देतात व यामुळें भक्ताचे देहाला पदवी म्हणजे योग्यता, श्रेष्ठत्व देतात ज्या देहांतील जीवानें ब्रह्मस्वरूप अनुभविलें त्या देहाची योग्यता फार मोठी आहे हें तात्पर्य. ४ कमलदलाप्रमाणें अक्ष आहेत जिचे अशा लक्ष्मीचा जो वर. ५ सुखाचा परिमळ ६ अदेख = अदृश्य, देखणा = पाहणारा, देखणा म्हणजे पाहणारा असें इतर कवींमधून आढळतें " डोळां **देखणाचि** आहे । त्यासीं सूर्य नव्हतां साह्य । सिद्ध पदार्थ देखों न लाहे । स्तब्ध राहे अंधारीं " एकनाथी भागवत " सर्वी सर्वत्र तुझे कान । सर्व **देखणे** तुझे नयन । आज नायकसी वचन । एवढें व्यसन न देखिशी " मुक्तेश्वर–सभापर्व अदेख-देखणा = जरी तो अदृश्य आहे तरी त्याची दृष्टि सर्वांवर आहे तो जरी आपणाला दिसत नाहीं तरी तो सर्वांना पहातो ७ नारायण आश्रयानारा, तें पद उमजानाः—ईश्वराला नारायण कां म्हणतात याचें स्पष्टीकरण खालील श्लोकांत दिलें आहे

( पुढील पृष्ठ पहा. )

'नाना ह्मणतां नाथदयार्णवें फेडियली भ्रमणा ॥ गोविंद० ॥ ४
थै थै नाचति या निजवृत्ति समजुनि गुह्यार्थ ।
थरारिला हा काळ भयाभित फिरे घेउनि गुथें ।
थकति विधिहर शोधितां ज्याचा नुमगे भावार्थ ।
'थ' 'थ' ह्मणणें शब्द न साहे दुजेपणा नाथ ॥ गोविंद० ॥
एक परात्पर पूर्ण सदोदित भरला रे ! एक ।

---

नराज्जातानि तत्वानि नाराणीति विदुर्बुधाः ।
तस्य तान्ययनं पूर्वं तेन नारायण स्मृतः ॥ १ ॥
आपो नारा इति प्रोक्ता आपो वैनर सूनवः ।
अयनं तस्य ताः पूर्वं तेन नारायणः स्मृत· ॥ २ ॥

पंडित लोक नरापासून उत्पन्न झालेल्या तत्वाना नार असें म्हणतात तीं नारें पूर्वी परमेश्वराचीं अयनें झालीं होतीं म्हणून त्याला नारायण हें नांव पडलें. ( २ ) उदक नारायणापासून उत्पन्न झालें म्हणून त्याला नर असें म्हणतात. 'नर' (उदक) परमेश्वराचें अयन म्हणजे वसतिस्थान होतें म्हणून त्याला "नारायण" असें म्हणतात. नारतत्वांचें आश्रयपद तें नारायणपद, उमजा त्याचें आकलन करा. १ नाना इतकीं अक्षरें उच्चारलीं जातात न जातात तोंच मनाची भ्रमणा फेडून टाकतो हें कडवें स्पष्ट आहे अर्थ असा आहे कीं, ज्याला नामरूप नाहीं, जें दृष्टीला गोचर नाहीं, तरी जें प्रेक्षणीय आहे, ज्याचें वर्म वेदांना न कळल्यामुळें ज्याचें स्वरूप वर्णन करितांना वेदांनीं मौन धरिलें आहे. व जें जगाच्या उत्पत्तीला कारणीभूत होणाऱ्या तत्वाचें आश्रयस्थान आहे म्हणून ज्याला ' नारायण ' असें म्हणतात तें पद म्हणजे तें स्वरूप समजून घ्या. गोविंदनाथांचे नाममन्त्रांतील " ना ' या अक्षराचा उच्चार करताक्षणींच दयासागर नाथमहाराज हे सर्व भ्रम दूर करितात २ गुथ—गुंतागुंत. गुंथ घेऊन—गुंतून, गुरफटून घेऊन, भयानें आपल्याला गुतवून घेऊन ३ या कडव्याचा अर्थ=आपल्या इंद्रियाच्या वृत्ति ' थै ' ' थै ' नाचतात—व ( आकलन होण्यास फार कठिण आहेत ) ही गोष्ट ध्यानांत धरा; ज्याला पाहून काळ म्हणजे मृत्यु देखलि भीतीनें गुरफटला जाऊन पळतो, ब्रह्मदेव व महादेव हे ज्याच्या स्वरूपाचा शोध करून करून थकले, परंतु ज्याना त्याचा पत्ता लागला नाहीं; ' थ ' ' थ ' ( म्हणजे श्रीगुरु गोविंदनाथ याचे नाममन्त्रांतील शेवटचें अक्षर जें थ ) याचा उच्चार करतांक्षणींच दुजेपणा हा शब्द सहन होत नाहीं ( द्वैत नाहींसें होतें ). ' नाथ ' म्हणजे " नाथी=' नास्ति=नाहींसा होतो.

एका व्यसनीं भरला ह्मणतां शब्दचि मायीक ।
एक तूंचि तुजपरतें दुसरें नाहीं आणीक ।
एकानुभवितां देवनाथ गोविंदचि एक ॥ गोविंद० ॥ ६

## पद ( २६३ )

नसे नाम ना रूप रंगा विकारी ।
परब्रह्म आमाय[2] जो निर्विकारी ।
स्वयंवंद्य जो वादि वेदां समस्तां ।
नमो सद्गुरू स्वामि गोविंदनाथा ॥ १
श्रुती वर्णितां जो मतीतें कळेना ।
हृदीं चिंतितां योगियां आकळेना ।
न शेषासही वर्णवे गीत गातां ।
नमो सद्गुरू स्वामि गोविंदनाथा ॥ २
प्रकाशे हृदाकाशचित्सूर्य[3] पाहीं ।
उदयास्त ज्या लागिं कांहींच नाहीं ।
नसे पाठ न पोट या कीं समर्था ।
नमो सद्गुरू स्वामि गोविंदनाथा ॥ ३
निराकार निर्द्वंद्व साकारलासे[4] ।
स्वयें खेळतो खेळ लीलाविलासें ।
विलासीं नसे भेदअभेदवार्ता[5] ।
नमो सद्गुरू स्वामि गोविंदनाथा ॥ ४

---

१ या कडव्याचा अर्थः—सर्व जगांत परात्पर पूर्ण अखंड ब्रह्मच भरलें आहे; व तें एकच ब्रह्म जगद्रूपानें परिणाम पावलें, किंवा गुरु हेंच ब्रह्म तें देहधारी असल्यामुळें संसारी झालें हें म्हणणेंही मायिक म्हणजे चुकीचें आहे तूं व तें एकच आहे ( तत्त्वमसि ), तुझ्यावांचून दुसरें कांहीं नाहीं; व या एकपणाचा अनुभव घेतला असतां देवनाथ व गोविंदनाथ हे एकच आहेत; त्यांच्यामध्यें द्वैत मुळींच नाहीं २ आमाय = अमेय, ज्याला मीति अथवा मोजमाप नाहीं असा. ३ आकाशामध्ये उजेड देणाऱ्या सूर्याप्रमाणें भक्तांच्या हृदयांतील बुद्धिदाता. ४ साकार झाला असे; आकार धारण करिता झालेला. ५ सदा स्वानंदविलासात निमग्न झाल्यामुळें ज्याला सर्व विश्व एकाकारच दिसावयाला लागलें आहे.

अनेकीं असे एक व्यापूनि जो कीं ।
अशा आत्मया श्रीगुरूतें भजा कीं ।
कृपें खंडि जो जन्ममृत्यादि पंथा ।
नमो सद्गुरू स्वामि गोविंदनाथा ॥ ५
ज्ञेयज्ञानज्ञाता नसे ठाव हाही ।
ध्येयध्यानध्याता तुरे जेथ कांहीं ।
त्रयातीत[1] स्वानद दे जो निजार्था ।
नमो सद्गुरू स्वामि गोविंदनाथा ॥ ६
जगद्भास आभास नाहींचें, सारा ।
दिसे जो दिठीं तो तयाचा पसारा ।
कृपें ज्याचिया प्रत्ययें[3] होय चित्ता ।
नमो सद्गुरू स्वामि गोविंदनाथा ॥ ७
सदासर्वदा जो वदे नाम वाचे ।
तया देत भांडार पैं वैभवाचें ।
कदा त्या भवाची न बाधीच व्यथा ।
नमो सद्गुरू स्वामि गोविंदनाथा ॥ ८
कृपादान देऊनि या देवनाथा ।
सुखी नांदवी उन्मनीं नीजमाथां ।
सदानंद स्वानद दे जो अनाथा ।
नमो सद्गुरु स्वामि गोविंदनाथा ॥ ९

## आरती (२६४)

जयदेव जयदेव जय सद्गुरुनाथा ।
अकळा अमळा अढळा अगणित गुणगाथा ॥ ध्रुवपद. ॥

---

१ ज्ञेयज्ञाताज्ञान आणि ध्येय ध्याता ध्यान या त्रिपुटींना अतीत झालेला; भेदाची सर्व कल्पना नष्ट होऊन ज्याच्या अगीं पूर्ण अभेदत्व बाणलें गेलें आहे असा २ जगद्भास = जगत्पसारा; जगडंबर हा जगत्पसारा कांहीं वेगळा असेल अशी आतां मला कल्पनाच राहिली नाहीं जें जें दृष्टीस पडतें तो सर्व नाथस्वरूपी ईश्वराचाच पसारा होय अशी भावना माझ्या अंगीं पूर्ण बाणली आहे. ३ अनुभव, आत्मप्रचीति.

४ ही आरती सांप्रदायांत अद्यापि चालू आहे

पंचप्राणें आरति तुज सद्गुरुराया ।
ओवाळूं निजभावें अर्पित पदिं काया ॥
निर्गुण निर्विकारा स्वामी सुखसदया ।
स्मरतां तव नामासी दाविशि निजठाया ॥ जयदेव० ॥ १
सद्गुरु दातारा तूं मुक्तिपदीं ठाव ।
देशी म्हणुनी जडला पायीं सद्भाव ॥
भावें उगविसि गोंवे[1] ओळसि निजभावें ।
मी माझा मजमाजी दाखविला देव ॥ जयदेव० ॥ २
मन हें समरस स्वरुपीं अखंड सुखतर हो ।
कोंदला स्वानंदु अनुपम सुख लाहो ॥
निर्गुण निर्विकार भरला हा डोहो ।
मावळला आभास गळला संदेहो ॥ जयदेव० ॥ ३
जयजयाजी सद्गुरुनाथा गोविंदा ।
भेदाभेदातित तूं सच्चित्पदसुखदा ॥
निजसत्तेनें सोडुनि माया अपवादा[3] ।
दिधलें देवनाथा अनाथ स्वानंदा ॥ जयदेव० ॥ ४

---

## आरती (२६५)

जयदेव जयदेव जयजी योगींद्रा ।
श्रीनारायणप्रभुवर देई तव मुद्रा[4] ॥ ध्रु० ॥
पूर्णपरात्पर अद्वय अगणित तव लीला ।
निगमागमश्रुतिशास्त्रें[5] वर्णितां फणी शिणला ॥

---

१ गोंवे–गुंतागुंत, सकट. २ निजभाव–हृदयांतील अत्यंत गुप्त भाव. ३ आपल्या ज्ञानसामर्थ्यानें शिष्यांच्या नेत्रांवरील मायापटल दूर सारून

४ मुद्रा—रुपया, मोहोर, पुतळी इत्यादिकांवर जें चिन्ह असतें तें अथवा तशा मुद्रेनें अंकित शिक्का, चिन्ह० तव मुद्रा देई = तुझा शिक्का मजवर मार, मला आपला म्हणव, मग मी लोकांत खरें नाणें म्हणून चालूं शकेन. ५ निगम, आगम, श्रुति तिन्ही शब्दांचा अर्थ वेद

विश्वोद्धारा सारों पावनभवसलिलीं ।
निजसुख देउनि दासा तारिशि अवलीलीं ॥ जयदेव० ॥ १
पतितोद्धरणीं अवनीं मानवतनु वरिसी ।
बालोन्मत्तपिशाचवृत्ती ते धरिशी ।
ब्रह्मानंदें छंदें निजक्रीडा करिशी ॥
कृपाईक्षणमात्रें दीनजन उद्धरिसी ॥ जयदेव० ॥ २
साक्षिणि आसुनि नांदसि उन्मनिच्या माथां ।
सच्चित्स्वरुपा स्वामी अघटितगुणगाथा ।
विश्वांतर्गतव्यापक अद्भुत तव सत्ता ।
स्मरतां तव नामातें हरिसी अघदुरिता ॥ जयदेव० ॥ ३
निशिदिनिं गाती प्रेमें निजजन हृत्कमळीं ।
तव नामाग्नि स्पर्शें पापतृण जाळी ।
पतीतपावन अपुलें ब्रीद हें सांभाळीं ।
भावें देवनाथ जडला पदयुगुलीं ॥ जयदेव० ॥ ४

---

## पद (२६६)

श्रीगुरुच्या निजस्वरुपीं ध्याउनि स्वानुभव सांग वरावा ।
श्रीगुरुचा पदिं भाव धरावा ॥ ध्रु० ॥
द्वैताद्वैता गाळुनि ठाईं मीतूंपण हा भेद हरावा ॥ १
देवनाथप्रभुनाथनिरंजन पूर्णपणें निज नयनीं वरावा ॥ २

---

## पद (२६७)

तें रूप पहावें ग बाई । तरीच जन्मा यावें ग बाई ॥ ध्रु० ॥
उलटपलटकर, त्रिकुटशिखरपर ।

---

१ समर्था, बलिष्ठा २ सलिल = जल भवसागराच्या जलांतून पावन करणाऱ्या. ३ अवलीला, अवलिला, अवलिळा ( क्रियाविशेषण ) = अगदीं सहज, सहजगतीनें. ४ पूर्वीं टीप आली आहे ५ कृपापूर्ण असें जें ईक्षण पहाणें त्याच्यायोगानें. ६ तुर्यावस्था. ७ ( पाठभेदामुळें हें पद पुन्हां २८६ नंबरचें लागलें गेलें आहे). अत्यंत गोपनीय, गुह्याद्गुह्यतर असें रूप. ८ आत्मप्रचीति.

अमृत झरझर वाहे निरंतर ।
योगबळें गे बाई । तरीच जन्मा यावें गे बाई ॥ १
चिंतिति हरिहर, तें रूप नादरें ।
अलक्ष अगोचर, असे परात्पर ।
मन तेथें न्यावें गे बाई । तरीच जन्मा यावें गे बाई ॥ २
झांगझागड, वाजे अवघड ।
नाद भडाभड, होति कडाकड ।
अनुहात त्याचें नांद गे बाई । तरीच जन्मा यावें गे बाई ॥ ३
निजानंदें, निजआनंदें । देवनाथछंदें ।
रंगुनि जावें गे बाई । तरीच जन्मा यावें गे बाई ॥ ४

---

## पद ( २६८ )

गुरु नाम तुझें सुखकारी ॥ ध्रु० ॥
सेवितांची अतिआवडी हा रस नाशित सर्वविकारीं ॥ १
नामरूपीं मुख लोचनीं पाहतां संशय सर्व निवारी ॥ २
देवनाथप्रभुपावन ऐसी वाजवी निगम तुतारी ॥ ३

---

## पद (२६९)

निजसुखसाधनीं सद्गुरुचरणीं भावें शरणागता ।
जातां दे गुरु सायुज्यतां[२] ॥ ध्रुवपद. ॥
जप तप साधन खटपट करितां मनासि आला विट[१] ।
म्हणोनी हरिचे भजनीं निट ॥
होतां हरितें कृपा उपजली झाली सद्गुरुभेट ।
गुरुनें धरियेलें मनगट ॥

---

१ हा अरबी भाषेतील शब्द आहे. याचा अर्थ दुर्मिळ, आश्चर्यकारक, उत्कृष्ट असा होतो २ सायुज्यता–मुक्ति चार आहेत, त्यांपैकीं ही शेवटची होय सलोकता, सरूपता, समीपता, सायुज्यता लोकीं राहावें सलोकता । समीप असावें ते समीपता । स्वरूपींच व्हावें स्वरूपता । तिसरी मुक्ती ॥ १ ॥ निर्गुण अनन्य असतां । तेणें होय सायुज्यता । सायुज्यता म्हणजे स्वरूपता । निर्गुण भक्ति ॥ २ ॥ दासबोध ४ था दशक समास १०.

नेलें अंतरसदनीं करुनी जाणविला बोभाट ।
'सोऽहं' मंत्र हा उद्भट ॥
शिरतां अंतरीं दुःख दिगंतरीं झाली आरोग्यता ।
सकळही विटली दारिद्रता ॥ निज० ॥ १
सोऽहं मंत्रीं गुज लाधलें ओंकाराचें मुळ ।
जेथुनी उद्भवलें सकळ ॥
नामरूपातित वस्तू नाहीं वर्णव्यक्तिवीटाळ ।
नाहीं स्थीर ना चंचळ ॥
रंगातित निजरंगीं चंचळ अविट जें अढळ ।
स्वयंभ ज्योति ते निर्मळ ॥
नाम रूप ज्या नसेचि कांहीं अखंड त्या पूर्णता ।
आपुला आपण एकुलतां ॥ निज० ॥ २

---

१ पहिल्या कडव्याचा अर्थः—जप, तप इत्यादि साधनांची खटपट करून मन विटलें म्हणजे कंटाळलें, म्हणून हरीचे भजनीं निट होतां (एकाग्रतेनें हरीचें भजन केलें असतां) हरीला करुणा आली व सद्गुरूची भेट झाली, गुरूनीं हात धरून मला अंतरसदनी नेलें ( म्हणजे माझीं इंद्रियें जीं बहिर्मुख होतीं, विषयाकार होतीं तीं अंतर्मुख केलीं व विषयापासून निवृत्त केलीं ) व बोभाट जाणविला ( म्हणजे मोठ्या स्वरानें मला ज्ञान करून दिलें कीं जेणेंकरून माझे संशय व विपर्यय सर्व नष्ट झाले ) "सोऽहं" ( म्हणजे, मी ब्रह्म आहें असा ) उद्भट (स्पष्ट ) मंत्र माझे हृदयांत शिरल्यावर माझें दुःख दिगंतराला गेलें ( नष्ट झालें ), आरोग्यता मला प्राप्त झाली व माझें सर्व दारिद्र्यही नाहींसें झालें ( म्हणजे माझे मनाची तळमळ नाहींशी होऊन चित्त शांत झालें व असंतोषरूपी दारिद्र्य पार निघून गेलें ) कारण भागवतांत म्हटलें आहे "दरिद्रो यस्त्वसंतुष्टः" स्कंध ११ अ. १९ श्लो० ४४; बोभाट=बोध. २ दुसऱ्या कडव्याचा अर्थः— "सोहं" मंत्राच्या योगानें ( ओंकाराचें मूळ जेथुनि उद्भवलें सकळ ) उत्पन्न झालें असें जें ओंकाराचें म्हणजे प्रणवाचें मूळ जें ब्रह्मस्वरूप तें गुज लाधलें. तें ब्रह्म कसें आहे म्हणाल तर तें नामरूपातीत आहे, वर्ण व व्यक्ति यांचा त्याला विटाळही होत नाहीं, तें स्थिर नाही किंवा चंचलही नाहीं, रंगातित ( ज्याला रंग नसूनही ) निजरंगीं चंचळ ( त्याचे रंग वेळोवेळीं बदलतात ), अविट ( म्हणजे ज्याचा कंटाळा येत नाहीं ) व तें अढळ ( न हालणारें ) असें आहे; तें स्वयंभू असून तेजोमय आहे, अखंड आहे, पूर्ण आहे व एकच आहे.

एकचि म्हणतां अनेक दिसतो अनेकीं एकला ।
पाहतां आपणचि पीकला ॥
पिकला ना तो अपक्क सुकला अनेकीं ना एकला ।
जेथं शब्दचि मौनावला ॥
अनंत दिनमणी गाळुनि तेजें स्वतेज उदया आला ।
माजी देखणा बुडाला ॥
समरस झाली वृत्ती भ्रांती ठाव नसे बोलतां ।
चित्सुख निजअंगीं बाणतां[1] ॥ निज० ॥ २

सद्गुरु गोविंदनाथ निरंजन ज्ञानांजन दीधलें ।
लेनां अनुपम गुज लाधलें ।
मी माझें मजमाजि मिसळलों मीपण मुळिं आटलें ।
माझें निजरुप मज भेटलें ॥

---

१ अर्थः—एक म्हणावा तर अनतरूपानें दिसतो परंतु वास्तविक तो एकच आहे ( उ० एकं सत् विप्रा बहुधा कल्पयंति - म्हणजे तें सत् एक असून त्याची ज्ञाते पुरुष बहुत प्रकारानीं कल्पना करितात. ) तो एकच पिकला आहे—विस्तारला आहे म्हणजे एकच ब्रह्मस्वरूप विश्वरूपानें अनेकाकार प्रगट झालें आहे ( कारण श्रुति आहे " सोऽकामयत एकोऽहं बहुस्याम् "—म्हणजे मी एक आहें तर अनेक व्हावें अशी त्याला इच्छा झाली ) परंतु वास्तविक तो पिकला नाहीं, अपक्क ( कच्चा ) नाहीं किंवा सुकला ( वाळलेला ) ही नाहीं किंवा अनेकही नाहीं, त्याचे स्वरूप वर्णन करतांना वेद मौनावला (उगा राहिला) अनत दिनमणि गाळुनि ( सूर्याचें तेज एकत्र करून मुशीत एकत्र ओतून ) ज्याचें तेज उत्पन्न झालें आहे म्हणजे अनत सूर्यांचें तेज एकत्र केलें असता ज्याचे तेजाची कल्पना येईल. माजी देखणा बुडाला=देखणा (पाहणारा जीव) पद २६२, वरील ११ वी टीप पहा ज्याला जीवानें पाहिलें असता ( म्हणजे जीवाला आत्मसाक्षात्कार झाला असता ) हा देखणा ( पाहणारा जीव ) बुडाला = आपल्या जीवपणाला मुकला ( कारण श्रुति आहे कीं, ब्रह्मविद् ब्रह्मैव भवति—म्हणजे ब्रह्मवेत्ता ब्रह्मच होऊन जातो ); अशाप्रमाणें चित्सुख अंगीं बाणलें असतां म्हणजे ब्रह्मानंदीं वृत्ति लीन झाली असतां वृत्ति तन्मय होते व भ्रांति निर्मूळ—नाहींशी—होते तिचा पत्ताच रहात नाहीं व ठाव नसे बोलतां=बोलण्यालाही अवसर रहात नाहीं म्हणजे कंठ सद्गदित होऊन वाणी स्तब्ध होते.

झाली भेटी, पडली मीठी, पोटीं सामावलें ।
अंतर्बाह्य प्रकाशलें ॥
देवनाथ प्रभु निजसुखसाधनिं सेवी नामामृता
नामीं लाधली पूर्णता ॥ निज० ॥ ४

## पद ( २७० )

आत्मा हा अनुभवि आला गे[1], भेद गेला गे[2] नवल केलें गुरुरायें ।
तुजपाशीं सांगतें साजणी, मायबहिणी, श्रवणीं सादर होय[2]॥ ध्रुवपद ॥
प्रथम आंधार हें अज्ञान, होतें दारुण, मार्ग न दिसे डोळां ॥
सये ! मी झालें घाबरी, दुःखि अतरीं, अश्रु वाहाति खळखळां ।
भेटला श्रीगुरुसोयरा, पाहतां अतरा, त्यासि आला कळवळा ।
स्वकरें धरुनि मम पाणी, नेलें भुवनीं, ज्ञानदीप उजळिला ॥आत्मा०॥१॥
शुद्धस्फटिकमंडपांतरीं, दीपाचे परी, अंतर्बाह्य प्रकाश ।

---

१ चौथे कडव्याचा अर्थः—सद्गुरु गोविंदनाथांनीं मला ज्ञानरूपी अंजन दिलें तें मी ल्यालों असतां म्हणजे मीं त्याचा अनुभव घेतला असता अनुपम ( म्हणजे ज्याला उपमा नाहीं असें ) गुज ( गुह्यगोष्ट ) मला प्राप्त झालें, मी स्वरूपीं मिसळलों व त्यायोगानें माझें मीपण नाहींसे झालें, मला स्वरूप ( आत्मरूप ) प्राप्त झालें; माझी व माझे आत्म्याची भेट झाली, माझी व माझे आत्म्याची मिठी पडली ( मी आत्मरूप झालों. आलिंगन दिलें किंवा गळ्यांत गळा मिसळला ) तें आत्मरूप मीं आपलें पोटांत भरून घेतलें अतर्बाह्य प्रकाशलें ( मला सर्व तेजोमय दिसू लागलें ) मी देवनाथ मला आत्मज्ञानाचें सुख मिळावें म्हणून नामामृताचें सेवन करितों कारण नामानें पूर्णता प्राप्त झाली. २ आत्मसाक्षात्कार झाल्यावर माझा द्वैतभाव नाहींसा झाला ही अद्भुत गोष्ट गुरुरायांनीं घडवून आणली. हें वर्तमान सखे, मायबहिणी मी तुला सांगतें तर श्रवणीं सादर होय= लक्ष देऊन ऐक [ सखे, आई, बहिणी हे शब्द योजण्याचा हेतु आहे कीं आत्मज्ञान गुप्त आहे सबब जे अगदीं जिव-लग असतील त्यांनाच तें सांगावें. असा वेदांतज्ञानाचा निर्बंध आहे ] ३ पाहतां अतरा—त्यानें माझें अंतःकरण ओळखलें; मी अज्ञानांधःकारानें आर्त व करुणास्पद झालें आहे व माझ्या अंतःकरणांत मार्गदर्शक गुरुसोयरा भेटावा ही खरी इच्छा उद्‌ली असें त्यानें जाणलें आणि त्याला कळवळा आला.

कोटि रवितेज लोपलें, ऐसें फाकलें, तेज अस्मासाहस[1]।
पाहातां पाहाणें गळालें, ऐक्य मिळालें, चित्त झालें समरस ।
द्वैताद्वैत सर्व आटलें, सुख वाटलें झाला संशया नास[2]॥ आत्मा० ॥ २
आत्मा हा श्रीगुरु गोविंद, सच्चिदानंद, सखे ! देखतां दिठीं ।
देखणें स्वरूपीं विरालें, निखिल सचलें, ब्रह्म अद्वय सृष्टी[3]।
जाहलों आपुला आपण, पूर्ण चैतन्य, पडली आभासा तुटी[4]।
देवनाथ म्हणणें आटलें[5], शब्द खुटले[6], सांगों विसरलीं गोष्टी ॥आ०॥३

## पद ( २७१ ).

संसार नव्हे हा सार करुनि विचार, त्यागिं मीपणा ।
यें देहीं तुझा तू ब्रह्म उमज निजवर्म सद्गुरुखुणा ॥ ध्रुवपद ॥
कन्या सुत दारा धन, धरुनि अभिमान भ्रमाचे भरीं ।
भुललासि कसा ? नेणसी स्वहित मानसीं, विचार अंतरीं ॥

---

१ तेव्हां ( म्ह० गुरूनें ज्ञानदीप उजळल्यावर ) शुद्ध स्फटिकाचे मंदिरात दिवा लावल्यावर जसा आंत बाहेर प्रकाश पडतो, त्याप्रमाणें, कोटिसूर्यांचें तेजही ज्यानें झांकुळलें जाईल असें अस्मासाहस=(भयंकर, असह्य) तेज चोंहोंकडे फाकलें पसरलें अस्मासाहस—याचा अर्थ असह्य, भयंकर असा वाटतो एकनाथी भागवतांत हा शब्द 'असमसाहस' असा आला आहे "क्षोभला वायु असमसाहस । तो हरी जळाचा रस । तेव्हां जळाचा होय -हास । प्रळयमहातेजीं" ए० भा० अ० ३=१९२ रा० पागारकर तेथें टीपेंत 'भयंकर' असा अर्थ देतात. कदाचित् देवनाथांनीं असमसाहस हाच शब्द योजिला असेल आम्हीं छापील प्रतींत अस्मासाहस शब्द होता सबब कायम ठेवला. २ माझी दृष्टि मावळली, ब्रह्मासीं माझें एकीकरण झालें, चित्तही एकरस झालें, द्वैताद्वैत नाहींसें झालें व सर्व संशय नष्ट होऊन अद्वितीय आनंद मला झाला. ३ या कडव्याचा अर्थ=सच्चिदानंदरूप आत्मा हा खरोखर गोविंद गुरु हेच आहेत; त्यांना दृष्टीनें पाहिलें असता दृश्य, द्रष्टा व दर्शन ही त्रिपुटी नाहींशी होते. ( शब्दशः अर्थ स्वरूपात पाहणें नाहींसें होतें ) अद्वय जें ब्रह्म तें सर्व सृष्टींत निखिल—ओतप्रोत—अशेष संचलें ( सांठलेलें, भरलेलें ) दिसतें, म्हणजे सर्व ब्रह्ममय जग दिसतें ४ पूर्ण चैतन्यस्वरूप जें ब्रह्म तद्रूप मीही होतों, आभास म्ह० भ्रम सर्व नाहींसे होतात, वरती "द्वैताद्वैत सर्व आटलें" आलें आहे त्याचाच हा अनुवाद ५ मी देवनाथ हें म्हणणेंही संभवत नाहीं म्हणजे अहंभाव नाहींसा होतो. ६ तोंडातून बोल फुटत नाहीं व बोलण्याचें कांहीं राहत नाहीं. दयाळनाथानीं गोविंदनाथावरील पदांत म्हटल्याप्रमाणें "अबोलची बोलणें । रसना स्थिरावली."

करुनियां पाहें निजसोय, निजाचा ठाय लाधे निजकरीं[1] ।
कां तनु खोविशी वृथा नव्हे अन्यथा शब्दकुसरी[2] ॥

श्लोक ॥ अति अगणित पुण्यप्राप्ति हे जाण कार्या ।
उमजुनि हित येथें साधि बा ' निजकार्या ।
अमोल हे परि नाहीं शाश्वतार्या बिलोकीं ।
निजहितसुख जेथें साधना हेच लोकीं ॥

टीप ॥ हा विचार करुनि निजसार त्यजुनि आसार आवरीं मना, ।
कल्पना सकळ त्यागितां, पावसी हिता, तारिसी सज्जना ॥सं०॥१

हो सद्गुरुनाथा शरण, तुटे जन्ममरण निश्चयो मती ।
ठेवुनि पाहें विश्वास, गुरू अविनाश चुकवि दुर्गती ॥
निर्विकार भक्तिच्या बळें स्वरुप आकळे गर्जती श्रुती ।
गुरुविना प्राप्त न कदा शीण दुर्मदा साधनारिती ॥

श्लोक ॥ बहु बहु रिति असाध्या साधनातें करीतां
न पवे किमपि वस्तु सद्गुरूवीण हाता[3], ।
म्हणउनि गुरुदास्यालागिं तू अंगिकारीं,
धरुनि हृदयिं भावा, त्यागिं बुद्धी विकारी ॥

टीप ॥ ऐकुनी वचन तत्वतां, साधिं निजहिता, त्यजीं कल्पना ।
गुरुराज करिल तव काज, सांडुनी लाज, विनट साधना[4] ॥ स० ॥२

---

१ ' आत्मैव ह्यात्मनो बंधुरात्मैव रिपुरात्मनः ' गीता २ शब्दकुसरी=शब्द-कौशल्य ३ न पवे किमपि वस्तु सद्गुरूवीण हाता:—वस्तु=आत्मज्ञान, ब्रह्मज्ञान. ' सद्गुरुवीण ब्रह्मज्ञान । सर्वथा नव्हे नव्हे जाण । हें उपनिषदर्थें प्रमाण । परम निर्वाण सांगितलें ॥ ७ ॥ डोळा देखणाचि आहे । त्यासीं सूर्य नव्हतां साह्य । सिद्ध पदार्थ देखों न लाहे । ग्लब्ध गृहे अंधारीं ॥ ८ ॥ नाव तारी हे साचार । माजी बैसले थोर थोर । परी तारकेंवीण परपार । समर्थ नर न पावती ॥९॥ रत्न सांपडलें अवचितें । परी खरें खोटें संशय तेथें । रत्नपारखी करी मोलातें । अति यत्न त्यातें मग करिती ॥ १० ॥ ' —एकनाथी भागवत.

४ विनट साधना=साधनाची तयारी कर, साधनाला झगट, चिकट, साधन करावयास लाग. विनटणें—लीन होणें, चिकटणें, झगटणें उ०— "सतापायीं विनटलों." निवटणें—निर्दाळण करणे. ' देह अहंभाव रावण निवटूनी ' रामाची आरती.

गुरुराज प्रेरितां बीज अनुभवीं नीजउदयवस्तुला[1]।
होतांचि कळे निजवर्म तुटे दुष्कर्मयोग योगिला[2]॥
अविनाशी मीच मी खरा, नसे दुसरा भास आटला[3]।
आत्मा मी माझा एक, विश्वि हा देख सघनें[4] दाटला॥
श्लोक॥ मजविण पाहातां कीं दूसरा हा न दीसे
उर्वरितें[5] भरुनीयां मीच मी चिद्विलासें।
अविट अमळ माझा मीच मी एक लक्षीं
अकळ अरुप तो मीं अद्वयानंदसाक्षी.
टीप॥ अनुभव घेउनी असा, आत्मनिजरसा पाहें आपणा,।
विश्वात्मा मीची एक, भास अनेक दृश्य कल्पना.॥संसार०॥३
सद्गुरुनाथ गोविंद, पूर्ण निर्द्वंद्व ब्रह्मचिद्धन।
देखिलें, हृदयीं रेखिलें, समूळ आटलें द्वैत भीषण॥
नयनेंविन उघडोन, अरुप अयन, अनादि खूण।
हा देवनाथिं अनुभव, नवल निजठेव, हे नवलेंविण॥

---

१ गुरुराज प्रेरितां बीज अनुभवी नीजउदयवस्तुला = निजात्मज्ञानरूपी बीजानें कणिंग भरलेली आहे व आपलें मन हें तें बीं पेरण्यास क्षेत्र आहे. परंतु जर तें बीं पेरणारा सद्गुरु नाहीं तर बीं उगवणार नाहीं; अशी कल्पना एकनाथमहाराजांनीं आपल्या भागवतांत वर्णिली आहे " पर्जन्यें भूमी मार्दवा आली। बीजें कणिंग असे भरली। परी ज्ञातेन पेरणी नाहीं केली। तव पिकाची बोली पोचट "॥ ११०॥ ( एक० भा० अ० १० )

२ अनुभवीं नीजवस्तुलाउदय होतांचि ( आत्मज्ञानाचा साक्षात्कार किंवा अनुभव हृदयांतरीं व्हावयाला लागल्याबरोबर ) निजवर्म कळे ( मी कोण आणि कोठून आलों हें कळावयाला लागलें ) आणि योगिला ( योगिलेला, जन्मजन्मांतरीं सिद्ध झालेला ) दुष्कर्मयोग ( कर्मविपाक ) तुटे ( नाहींसा होतो मनुष्य कर्मबंधनांतून मुक्त होतो ). दुष्कर्मयोग म्हणजे वाइट कर्मांची जुळणी असें नव्हे, तर कर्मबंधन हें मुळांतच वाईट असल्यामुळें त्याची दुष्ट उपाधि व्यवहारांत आपण ज्याला सत्कर्म आणि दुष्कर्म म्हणजे पुण्य आणि पाप म्हणतो तीं दोन्हीं साधकाला बाधक, कारण 'पापपुण्य आड पडले पर्वत। राहीला अनंत पलीकडे '.

३ मीच मी खरा अविनाश, दुसरा ( विनाशी ) नव्हें, एतद्विषयींचा भास ( संदेह ) आटला (नष्ट झाला) आत्म्याच्या अविनाशित्वाविषयीं वृत्ति निःसंदेह झाली. ४ सघन=सभरामर, ओतप्रोत. ५ उर्वरित–उरलेला, शिलक राहिलेला

श्लोक ॥ समरसे निजवृत्ती नीजरूपीं मिळाली
अचल चल नसे ज्या भ्रांति सर्वे गळाली ।
अकळ गुरु गरीमा ज्यासि हा पार नाहीं
अनुपम निजवस्तू दाविली येच देहीं ॥
टीप ॥ देहीं हे विदेही स्थिती, हाहा ज्या प्रती शब्द साहिना[1] ।
सद्गुरुकृपा ज्यांप्रती तेचि जाणती अनुभवीं खुणा ॥ ससार० ॥ ४

## पद ( २७२ ).

सार घ्यावा हा अनुभव देहीं । शब्दज्ञानाचें काज येथें नाहीं नाहीं ॥ध्रु०॥
बोलुं जातां बोलासि नुरे ठाव[2] । पाहु जातां पाहणें झालें वाव[3] ।
नामरूपातिल पूर्ण निरामेव[4] । तरिच लाभे तुष्टेल गुरु देव देव ॥ सार० ॥ १
नयनिं येतां नयनासि स्वयें ग्रासी । विकासलें स्वतेज तेजराशी ।
व्यापकत्वें संपूर्ण लोकवासी । स्वजनपालन संहार नाहीं ज्यासी ज्यासी ॥ सा० ॥ २
न ये लक्षितां लक्ष लक्ष नेटें । अणूरेणुहुनि सहान महान मोठें ।
अहं ब्रह्मास्मि ऊर्मि जेथें आटे[5] । गुरूकृपें निजगुज हृदयीं प्रगट प्रगटे ॥ सार० ॥ ३
नसे पाठी ना पोट म्हणणें शब्द । जया स्तविती श्रुति मौन धरिति वेद ।
.. ..पूर्ण निजानंद । देवनाथाचा प्रभु मदानद नंद ॥ सार० ॥ ४

---

१ निमित्तमात्र देहधारणा परंतु वृत्ति विदेही आहेत असे दिसेल ज्याच्या-बद्दल म्हणतां येणार नाहीं, कारण त्यामध्यें द्वैताचा आरोप येतोच, आणि हा कसा तर " आत्म्यावेगळें तें अनित्य । हा पूर्वनिश्चय होता सत्य । आतां बुडाले नित्यानित्य । सबराभरित निजात्मा ॥ नेणपण निमालें सर्वथा । बुडाली जाणपणाची अवस्था ॥ गुणगुणीगुणातीतता । हेही तत्वता तेथ नाहीं "

—एकनाथ.

२ बोलुं जातां बोलासि नुरे ठाव—वाचातीत आहे ३ वाव—फोल, व्यर्थ. ४ निरामेव—निरामय, निरुपाधि ५ अहंब्रह्मास्मि ऊर्मि जेथ आटे—" तेव्हां ब्रह्माहमस्मि लक्षण । तेंही होवों लागलें क्षीण । सोहं हंसाची बोलवण । ते संधीं जाण होतसे ॥ तेथ देहींचि गेलें देहपण । जन्ममरणा आलें मरण । विश्वाचें न दिसे भान । आनंदघन कोंदला ॥ दीपीं दीपू एकवटला । मिळणीं एकचि होऊनि ठेला । तैसा वृत्तीचा लयो आला । निर्व्यंग पावला निजसुख ॥ तेव्हां आत्मा एकू अद्वैत । तेंहीं म्हणणें नाहीं तेथ । एवं द्वैताद्वैतातीत । नित्यनिश्चित निजात्मा ॥ " —एकनाथ अ० १०.

## पद ( २७३ )

तूं पाहें रे रूप घननीळ सांवळें । गुरूचें आठवीं पदयुगुळें[1] ॥ ध्रु० ॥
कोण मी आलों कोठुनी । हा विचार रे, विचार करिं निजमनीं ॥
कोण जनिता[2] आणि जननी । हे मायेची, बंधु आणि भगिनी[3] ॥
काळ टपतां दिनरजनीं । घडि भरल्या रे, भरल्या नेत उचलुनि ॥
चाल॥ गृह धन हे सुत सपती । सर्वहि बा ' त्यागुनि जाती ॥
कोणी येईचना सांगाती । हे ?३रेनें उचला माति ।
असें सांसर्गिक बोलती ॥
टीप ॥ द्या येइना रे, येईना एक तिळ ॥ गुरूचें० ॥ १
हा विचार करिं निजसारें । दिठिं पाहें वरें सद्गुरुपद सकुमार ॥
तेणें होशिल हा भवपार । हें त्यागीं रे त्यागीं दृश्य असार ॥
करीं भक्तीचा व्यापार । हें मानीं रे, मातेसम परद्वार ॥
चाल॥ हा भाव धरुनि निजमनीं । जो सद्गुरुचूडामणी ।

---

१ पदयुगुल = पदद्वय–दोन पाय २ जानिता = बाप ३ हे मायेची बधु आणि भगिनी = "बहिणी भाऊ घरासि येती । नातीं कोरुनि कोरुनि काढिती, अवघा मायेचा गोंधळ । बा तुझा चालला काळ, खायाला मिळती सकळ."
४ नाशवत देहाला तुकोबा देखील ओली माती असें म्हणतात " ओल्या मातीचा भरंवसा । कारे धरीशी मानसा " ५ निजसार = अत्यंत महत्वाचा, अत्यंत सारगर्भ असा. ६ करी भक्तीचा व्यापार–तुकाराममहाराजांचे भक्तीच्या व्यापाराबद्दल तीन अभंग आहेत ते येणेंप्रमाणें:—

बरवें दुकानीं बैसावें । श्रवण मनन असावें ॥ १ ॥
सार असाराचीं पोतीं । ग्राहक पाहोनि करा रितीं ॥ २ ॥
उगेचि फुगवू नका गाल । पुर्ण साठवावा माल ॥ ३ ॥
सत्य तराजू पैं धरा । नका कृत्रिम विकरा ॥ ४ ॥
तुका झाला वाणी । चुकवुनि चौऱ्यांशीच्या खाणी ॥ ५ ॥

दुसरा अभंगः—

मरणी आली मुक्त पेठा । करा लाटा व्यापार ॥ १ ॥
उधार घ्यारे उधार घ्यारे । अवघे यारे जातीचे ॥ २ ॥
येथें पंक्तिभेद नाहीं । मोठें कांहीं लहान ॥ ३ ॥
तुका म्हणे लाभ घ्यावा । मुद्दल भावा जतन ॥ ४ ॥

तिसराः— भक्ति ऋण घेतलें माझें । चरण गहाण आहेत तुझे ॥
प्रेम व्याज देई हरी । माझा हिशेब लवकर करीं ॥

( पुढील पृष्ठ पाहा. )

तूं शरण जाईं ये क्षणीं । तरणातां भवजीवनीं तारितसे दिनयामिनी ।
टीप ॥ गुज समज रे, समज होय कुशळ ॥ गुरूचें० ॥ २
गुरुमुखेंशिं उमजुनि खूण । मग आत्मा हा देवाचि कीं आपण ॥
आटलें द्वैत मीपण । उप्पर तों रे स्वयंस्वरूपचिद्धन ॥
असें असतां भ्रमलेपणें[1] । हें वृथाच रे, भुललें चचळ मन ॥
चाल॥ घे विवेकअंकुश करीं । मग चहडुनि माथ्यावरी ।
त्वरें मनगज हा आवरीं[2] । पेलावा सत्ता करीं ॥
टीप ॥ करिं राज्य न हो विव्हळ । मग काळाच्या मुखिं मारीं काजळें[3] ॥ गुरू० ॥

---

( ४८७ पृष्ठावरून समाप्त )

माझें मी न सोडीं धन । नित्य करितों कीर्तन ॥
तुझें नाम आहे खत । सुखें करी पंचाईत ॥
तुका म्हणे गरुडध्वजा । यासि साक्ष सद्गुरुराजा ॥

मिराबाईनें तर भक्तीचा व्यापार इतका केला कीं तिनें श्रीकृष्णाला तराजू तोलून आणि ढोल बाजवून विकत घेतला.

माई मैनें गोविंद लीन्हो मोल ॥ ध्रु० ॥
कोई कहे हलका कोई कहे भारी । लियो है तराजू तोल ॥ माई० ॥ १ ॥
कोई कहे ससता कोई कहे महेंगा । कोई कहे अनमोल ॥ माई० ॥ २ ॥
बिंद्रावनके कुंजगलीनमो । लीयो है बजाके ढोल ॥ माई० ॥ ३ ॥
मीराके प्रभु गिरिधर नागर । पुरब जनमके बोल ॥ माई० ॥ ४ ॥

१ भ्रमलेपणें—मनाला भ्रम झाल्याकारणानें  २ त्वरें मनगज हा आवरीं—खालील पद पहा:—

या मनगजेंद्रा आवरा जी ॥ ध्रुवपद ॥
नळ भूपाळा काय सोहळा । गाजियलें हरिश्चंद्रा जी ॥ या० ॥ १ ॥
सकुल रावण ठार मारिला । कलंक लाविला चंद्रा जी ॥ या० ॥ २ ॥
मरे दुर्योधन मित्रसबांधव । भगांकित केलें इंद्रा जी ॥ या० ॥ ३ ॥
नारद नारी, भस्मासुर भस्मचि । नग्न करी भालचंद्रा जी ॥ या० ॥ ४ ॥
श्यामसुत वदे जर्जर मुनिवर । काय पाड या नरेंद्रा जी ॥ या० ॥ ५ ॥

यासारखेंच ' एडका मदन ' हें प्रसिद्ध पद आहे.

३ मग काळाच्या मुखिं मारीं काजळ = काळास खालीं पहाण्यास लाव. यांतील प्रास व शब्दरचना अतिसुंदर आहे दासबोधामध्यें समर्थांनीं काळाची टांग मोडली आहे साधकाबद्दल लिहितांना ते म्हणतात:—ऐसी अंतरस्थिती बाणली । बाह्य निस्पृहता अवलंबिली । संसार उपाधी त्यागिली । या नांव साधक ॥ विकल्पाचा केला वधू । थापें मारिला भवसिंधु । सकळ भूतांचा विरोधू । तोडूनि टाकिला ॥ भवभयासि मडकाविलें । **काळाचें टांगें मोडिलें ।** मस्तक हाणोनि पाडिलें । जन्ममृत्यूचें ॥ ( दशक ५ समास ९ )

गुरुनाथवरदकरें शिरीं । तेणें तरशी रे निश्चय हा भवपुरीं ॥
समरसता रसमंजरी । रस देउनियां रोग दवडला दुरी ॥

---

१ वरदकर = वरप्रद हस्त २ रस देउनियां रोग दवडला दुरीः– समरसता (=निजात्मतानिजबोध, आपपराचा ऐक्यभाव,) या रसमजरीचा रस देऊन भवरोग दूर दवडिला. ह्या भवरोगाचा ताप किती असतो व त्यापासून काय काय परिणाम होतात, हें एकनाथमहाराजांनीं आपल्या भागवतांत सविस्तर वर्णिलें आहे " ज्या भवरोगाचेनि दर्पें । फुंकान तापली त्रिविध तापें । मी माझें येणें सकल्पें । वाग्जल्पें जल्पती ॥ २ ॥ पडिलीं द्वैताचिया दुखणां । तोंडींची चवी गेली जाणा । मुखा आला कडवटपणा । कटु वचना बोलतु ॥३॥ जेथें व्याधीचेनि सन्निपातें । विवेक हाणोनियां लातें । उमरडूनि धैर्य हातें । वासनावनातें हिंडती ॥ ४ ॥ ... .. .. ...
भवरोग भ्रमें भ्रमले कैसे । खावां नये ते खावों बैसे । करू नये तें करितां दिसे । योपितां सरिसे धांवत ॥ ७ ॥ तेथ धनभयाचे शारे येत । तेणें थरथरा कांपत । धाकें धाकें घामेजत । दडी देत गुप्तत्वें ॥ ८ ॥ भोगाभिमानु चढे देहीं । तेव्हां न राहे खाटे भुई । विधींचें पांघरुण टाकी पाहीं । डोळा ठायीं लागेना ॥ " इ०
( एकनाथी भागवत अ० १०. )

त्याचप्रमाणें रामदासांनींही रामरसायणाचा घुटका घेतल्याशिवाय भवरोगापासून सुटका होणार नाहीं असें सांगितलें आहे.

जागा जा गा झटका रे । गुरुपदिं जाउनि हटका रे ॥
रामरसायण घ्या तुह्मि घुटका । तरीच होइल सुटका रे ॥ ध्रु० ॥

रामदासांनीं भवरोगी कसा असतो याचें वर्णन खालील पदांत केलें आहे.

अनाथ मी हीन दीन दरिद्री, भजन नेणें कांहीं ।
तुजविण मज या जगीं पाहतां कोणीच नाहीं ॥ ध्रु० ॥
ज्ञान कळेना, ध्यान कळेना, मन वळेना देवा ।
विद्या नाहीं, वैभव नाहीं, ऐसा पूर्वील ठेवा ॥ अना० ॥ १ ॥
युक्ति असेना, बुद्धि असेना, शांति वसेना अंगीं ।
रामदास म्हणे दयाळा । ऐसा मी भवरोगी ॥ अना० ॥ २ ॥

कबीरांनीं भवरोगाला भक्तिरसायण हें औषध सांगितलें आहे.

भक्तिरसायन चडाजी होवे भवरोगनका झाडा ॥ ध्रु० ॥
श्रवण परिक्षिती कीर्तन नारद स्मरण करे प्रऱ्हादा ।
पग सेवन लछीमीसे हुवा हरीचरन चित जडा ॥ १ ॥
अर्चन किया पृथुराजनें वदन अक्रूर किया ।
दास्य कियासो हनुमानजीनें निसिदिन आगे खडा ॥ २ ॥

(पुढील पृष्ठ पहा.)

आरोग्य देहनगरीं । गुरु आत्मा हा राज्य नगरिचें करी ॥
चाल॥बोलाया नाहीं ठाव । बुडालें रूप आणि नांव ।

---

(४८९ पृष्ठावरून समाप्त.)

सख्य भक्ति अरजुननें पाई चली निवेदन किया ।
तन मन धनही सब दे डारा हात जोडकर खडा ॥ ३ ॥
भक्ति करेगा जो भवरोगी मुक्ति उनकी दासी ।
पोथी पुरान कुरान देखे दुजा मार्ग नहीं बडा ॥ ४ ॥
भक्ति बिन कोई तरन न जावे सब शास्त्रमो देखा ।
दुजा उपाव नही जानके कबीर भक्ति नही छोडा ॥ ५ ॥

भवरोगावर औषध देण्याला योग्य वैद्य सद्गुरुच होय, असें गोपाळनाथ-महाराज म्हणतात

वैद्यें गुण केला बा ' गुण केला । संशय अवघा हरला ॥ ध्रु० ॥
भवरोगाचा झाडा । आत्मप्रचीति देऊनि पुढा ॥ वैद्यें० ॥ १ ॥
तळमळ जीवपणाची भारी । औषध देउनि केली दूरी ॥ वैद्यें० ॥ २ ॥
शांतिसुखाचें पथ्य । मन मारुनि केलें हित ॥ वैद्यें० ॥ ३ ॥
गोपाळनाथ म्हणे मी रोगी । सद्गुरु वैद्य मिळाला वेगीं ॥ वैद्यें० ॥ ४ ॥
( अ० क० पदसं० भा० ३–पद १८७ )

या पदासारखी देवनाथमहाराजांच्या दुसऱ्या एका पदांतील ' अजि आद्य तू वैद्य देई भवरोग दहनमात्रा ' ही व तीखालील दुसरी आळ पहा

१ गुरु आत्मा हा राज्य नगरिचें करी'––आत्मा हा या देहनगरिचा स्वामी आहे. व तो देहनगरी ऊर्फ कुडीला सोडून गेला असतां तिला किती दुःख होतें तें दाखविण्याकरितां व तसेंच आत्म्याची तिचे ठायीं अलिप्तता दाखविण्याकरितां विष्णुदास नामदेवांनीं कुडी व आत्मा या उभयतांचे संवाददर्शक पद केलें आहे तें फारच मनोरम व प्रासंगिक असल्यामुळें तें येथें दिलें आहेः–

कुडी म्हणे आत्म्याला ! 'नका टाकून जाऊ स्वामी ! मजला ॥ ध्रु० ॥
तुझी माझी बाळपणाची बहु प्रीत । बसून दोघे पिंजऱ्यात ॥
आतां कसें केलें चचळ चित्त । ओढवलें सचीत ॥
आत्म्या ! तुझा कळेना मज अंत । जातोस वैकुंठांत ॥
कधीं पडशील रे, पडशील माझ्या डोळां ॥ कुडी० ॥ १ ॥
आत्मा म्हणे वचन ऐक कुडी । तुझी न माझी जोडी ॥
अंतर पडला नाहीं अर्ध घडी । पुढें गेले गडी ॥
आम्हां जाणें आहे तांतडी । तुटली मायेची बेडी ॥
आग लागो रे, लागो संचिताला ' ॥ कुडी० ॥ २ ॥

× × × × ×

( अ० क० प० सं० भाग १ पद ३५ पहा. )

वैऱ्याचा जिंकिला मात्र । काळाचि खुंटलि धांव ।
हा गुरुकृपेचा भावं ॥
टीप ॥ गड्या देवनाथ निर्मळ । करीं लाधला नाथ कृपेचा फळं ॥गुरूचें०॥४

पद ( २७४ )

मनु ऐक तनुराउळिं ग । गुरु आत्मा देव न्याहाळीं ।
मागुती न ये तनु ऐसी घे साध्य करुनि ये काळीं ॥ ध्रुवपद ॥
हिंडतां लक्षचौऱ्यांशीं योनी तूं बहु श्रमलासी ।
अनंतर जननीजठरीं येऊनि गर्भ धरलासी ॥
मळमूत्रदाथरीं ऐसा त्या दुर्गंधित पचलासी ।
अति दुखः गर्भवासाचें, जठराग्निमाजी कढलासी ॥
भरतांचि नेम नव मासीं तनू बाहिर जन्मलासी ।
लागतां अविद्यावायु भ्रमपाशीं वेष्टिलासी ॥
टीप ॥ खोविलें बाळपण खेळीं । अज्ञान मुलांचे मेळीं ॥मागुति०॥ १
सांडिं रे विषयमदचाळा, वरपडा होसि तूं काळा ।

---

१ एकनाथी भागवत अ० १० ओव्या ३४८–३७९ पहाव्या म्हणजे या कडव्याचें पूर्ण स्वरूप ध्यानांत येईल २ कृपेचा फळ हा पाठ काय असावा ? ३ दाथर = उकाडा ४ वरपडा होशि तूं काळा–काळाच्या जबड्यांत जाण्यास तयार असा अर्थ दिसतो. ज्ञानेश्वरीमध्यें राजवाड्यांच्या कोशांत वरपडा, वरिपडा म्हणजे ' स्वाधीन ' असा अर्थ दिलेला आहे या कोशामध्यें वरपडा व वरिपडा अशीं या शब्दाचीं दोन्हीं रूपे दिलीं आहेत महीपतींच्या भक्तिविजयांत वरपडा शब्द स्वाधीन अशाच अर्थानें आढळतो. " चार दिवस वैराग्य दाखवून । आपुली प्रतिष्ठा वाढविली त्यानें । पुनः मायेसी वरपडा होऊन । प्रपचीं जाऊन पडियेला " महीपति–भक्तिविजय अ० ४९ ओं० ५२

वरपडा शब्दाचें स्त्रीलिंग 'वरपडी' म्हणजे लुब्ध, मोहित या अर्थीं नाथांनीं दिलेलें आहे " ऐसी डोळ्यां आवडी । म्हणोनि कामिनी वरपडी । यालागीं गोपिकां गोडी । अतिगाढी गोविंदीं ' —भागवत अ० १–२९४

तुकाराममहाराजांनीं " वरपडी ' असें क्रियाविशेषणार्थी रूप योजिलें आहे " आणिक नको करूं चेष्टा । व्हाल कष्टा वरपडी ॥ १ ॥ सुखें करा हरीकथा । सर्वथा हे तारील ॥२॥ अनाथाचा नाथ देव । अनुभव सत्य हा ॥३॥ तुका म्हणे बहुता रीती । धरा चित्तीं सकळ ॥४॥ मायेसी वरपडा यासारखेंच कष्टवरपडी असें रूप दिसतें. येथें वरपडा याचा अर्थ कष्टाला ' पात्र ' ' जबाबदार ' असा दिसतो याही शब्दाची धडफुडा या शब्दाप्रमाणें कोणी

(पुढील पृष्ठ पहा.)

म्हणऊनि सांगतों गुज रे ! भज रामकृष्णगोपाळा ॥
तारुण्यीं स्त्रियेचे संगें, भोगिसी विषय अनुरागें ।
भ्रमलासि कसा मनीं मूर्खा ! मृग जेंवी मृगांबुतरगें[1] ॥
मागुती न ये असि वेळा, तुमगसी कसा चांडाळा ॥

(४९१ पृष्ठावरून समाप्त)

शब्दशास्त्रज्ञ सांगोपांग व्युत्पत्ति देतील तर बरें पुढील आवृत्तींत सामील करूं हाच अर्थ दासबोधांत दिसतोः- " ईश्वरेंवीण जी कामना । तेणें गुणें नाना यातना । पावती होती पतना । वरपडे प्राणी " दासबोध दशक ५ वा. समास २ रा ओवी ४२ वी दामोदर सावळाराम यंदे कंपनीनें प्रसिद्ध केलेल्या रामदासस्वामींच्या समग्र ग्रंथांना रा गोविंद नारायणशास्त्री दातार यांनीं खालीं टिपा जोडल्या आहेत त्यांत या ओंवीखालीं ' वरपडे ' शब्दाचा अर्थ ' दुःखी ' असा दिलेला आहे, पण आमच्यामतें ' कष्टा वरपडे म्हणजे ' कष्ट सोसण्याला पात्र ' याप्रमाणें ' पतना वरपडे ' म्हणजे पतनशील ओंवीचा अर्थ हा कीं, ईश्वरावीण जी कामना त्यामुळें नाना यातना होतात व अंतीं प्राणी आपला अधःपात करून घेतात तसेंच, ' अहं शरीर शिव आत्मा । शिव शरीर अह आत्मा । हें नेणे तो जन्मा । वरपडा होये ' ॥२३१॥ ज्ञानदेवकृत भक्तराज

१ मृग जेंवि मृगांबुतरंगें–मृगजळाच्या दृग्भ्रमाला ज्याप्रमाणें मृग भुलतो त्याप्रमाणें इतर पशुपक्ष्यांचीं उदाहरणें पहा:-

' सावध सावध सावध मनुजा । निजरूपीं सावध रे ॥ ध्रु० ॥
सिंह जळीं प्रतिबिंब विलोकुनि । निरखुनि देत बुडी ॥
हंस गगनिंच्या तारा उदकीं । घालित तेथ उडी ॥
मूढ कसा मृग नाभि उपेक्षुनि । हिंडत बुद्धि कुडी ॥
तेविं सखा हरि साडुनियां दुरि । फिरशी देशधडी ॥ सावध० ॥
इंद्रजाल मृगतोय तसें जग । दंभरस विलसे ॥
स्वप्निं दिसे गज मस्त तुरगम । सभ्रम तेविं दिसे ॥
क्रूर भवार्णविं कर्णधार गुरु । आन उपाय नसे ॥
पूर्णरंग निज रामपदीं मग । दुर्गम काय असे ॥

१ मृगांबुतरग–मृगांबूच्या तरगानें, मृगजळाच्या भासमानपणानें असा पाठ व असा अर्थ भालचंद्रनाथमहाराजांचे गुरु रामकृष्णनाथमहाराज सांगत, असें भालचंद्रनाथांनीं कळविलें होतें व श्रीमंत रघुनतराव दाजीसाहेब देशपांडे सुरजीकर हेही असेंच कळवितात निर्णयसागरच्या छापील प्रतींत ' मृगायुंत रंगे ' असा पाठ दिला असून ' मृगीशीं संयुक्त होऊन रमणें ' असा अर्थ दिला आहे आमच्या मतें हा पाठ लेखकप्रमादामुळें चुकीचा पडला असावा शिवाय त्याही पाठांतून दिलेला अर्थ निघतो कीं नाहीं, 'हा प्रश्न आहेच

हो शरण सद्गुरुराया, निजस्वरूपिं भोगीं सोहळा ॥
टीप ॥ द्वैतासि गाळुनी समुळीं। धरिं ध्यानीं हरि वनमाळी ॥माग०॥ २
हित साधीं याच प्रसंगें, करिं विचार गुरुसत्संगें ।
अनुभवितां निजगुज हृदयीं, सहजांत समुळ भव भंगे ॥
हरिनामरसीं या रंगें, चुकतील सकळ यमदंगे ।
गुरुकृपामृतातें सेवीं, ब्रह्म तूं होशी निजांगें ॥
टीप ॥ सद्भाव धरुनि हृत्कमळीं । हो लीन गुरुपदयुगळीं ॥माग०॥ ३
श्रीगुरूवरदकर माथां, बैसतां चुके भवव्यथा ।
निजस्वरूपीं वृत्ती रमवीं, म्हणउनी शरण हो नाथा ॥
विश्व हें ब्रह्म या अर्थी, समजुनी उमज परमार्थी ।
सुखसमाधि सोहळा भोगीं, हरिगुण गा देवनाथा ॥
टीप ॥ द्वैताचि करीं रांडोळी[1]। धरिं भक्ति हरिपदीं भोळी ॥माग०॥ ४

## पद ( २७५ ).

अभय वरदकर गुरुवर स्मरं[2] मग स्मरबाधा न घडे ।
सुखकर गुरुतर नित्य निरंतर चिन्मय रुप उघडे ॥ ध्रुवपद ॥
क्षणभरि तरि वरि सावध राहती जों वरि वरि करणें ।
करकर वर वर टाळुनि हरिहररासिं रसना भरणें ॥
गौरव हा तिस रौरव नामक गोष्पद भव तरणें[3] ।
श्रुतिमति अति गति अधिष्ठिती स्थिती सत्संगति करणें ॥

---

१ रांडोळी—समूळ नाश. शत्रूचा जीव घेऊन त्याच्या बायकांना रंडकी करणें, रांडोळी करणें. " थोर हरिसें पिटिली टाळी । साळ्यांमेहुण्या होईल कळी । कृष्ण करील रांडोळी । ते मी न्हाळी पाहीन " एकनाथ—रुक्मिणी-स्वयंवर- ७—७६

२ अभयवरद कर ज्याचा तो गुरुवर स्मर. ३ करकर (दुःखचिंता) इत्यादिकांना वरच्यावर टाळून आपली रसना जिव्हा हरिहराच्या नामरसीं भरून घ्या. एवढा रौरवासारखा मोठा भवसागर पण तो गाईच्या पावलासारखा तरावयाला सुलभ होऊन जातो, हा गौरव त्या हरिहररासिं रसना भरणें या चित्तवृत्तीचा ४ या ओळीचा अर्थ सत्संगति ही अति श्रुतिमति अत्यंत श्रुतिसम्मत-अशी गती, अधिष्ठिति ( नियमन, रक्षण ) व स्थिति घडवून आणते. अधिष्ठिति=नियमन, रक्षण.

चाल ॥ सत्संग करिल भवभग भ्रांति उडवी ।
अभग सहज निजरगप्राप्ति घडवी ।
निःसंग त्यागिं वैराग्यवृत्ति जडवी ॥[1]
टीप ॥ सांग शुद्ध चिद्रांगप्राशनीं द्वैतमूळ उपडे ।
आत्मसाधना विनटे नर मग भवपाशीं न पडे ॥[2] अभय० ॥ १

आत्मसाधना गुरुवचनामृतरसीं रसना चाखीं ।
तादृश तदंतर्यामीं गोडी काय असे निरखीं ॥
स्वानुभवोद्भव स्वसुखासाठीं निजमानस पोखीं[3] ।
ब्रह्म सबाह्याभ्यतर भरलें परि भक्ति नसो वरखीं[4] ॥
चाल ॥ गुरुनाथ व्यापुनी स्थावर जंगम हा ।
समरसें चित्तआत्मांबुधिसंगम हा[5] ।
सहजांत होत करि बा सत्संग महा ॥
टीप ॥ संगमीं त्या सुस्नात जाहल्या मन मळजळीं न बुडे ।
एकत्वें सुखशयनीं वृत्ती चिन्स्वरुपीं पहुडे ॥ अभय० ॥ २

---

१ सत्सगानें सग–बंध–रहित मनाची वैराग्यवृत्ति होऊन त्यागाकडे ( निवृत्तिमार्गाकडे ) जडते. २ एक वेळ मनुष्य आत्मसाधनामध्यें लीन झाला म्हणजे पुन्हां संसाराची चिंता रहात नाहीं ३ स्वानुभवाचें स्वसुख=निज-सुख=अत्यन्तसुख प्राप्त होण्याकरितां मन पोखीं–पोशीं=फारच मोठें कर क्षुद्र-दृष्टि जाऊन जेव्हा ब्रह्मांडाचें आकलन करण्याजोगी सर्वांतर्व्यापक बुद्धि येईल आणि आपला व विश्वाचा भेदभाव नष्ट होईल तेव्हांच ब्रह्मज्ञानाचा खराखरा अनुभव येत जाईल ४ ब्रह्म सबाह्यांतर भरलें अशी भावना होण्याइतकें मन मोठें होऊं दे, पण ब्रह्मनिष्ठत्वाच्या अहंपिशाचिकेनें झपाटला गेल्यामुळें तुला भक्ति (परमेश्वराची सगुणभक्ति) ही केव्हांही वरखी (पारखी) न होवो सगुणरूपाच्या ठायीं लोळण घेण्याइतका प्रेमळ निरभिमानपणा जोंपावेतों तुझ्या अंगीं येणार नाहीं तोंवर ब्रह्म सबाह्यांतर भरलें हें तुला समजलें तरी उमजणार नाहीं ५ आपल्या चित्तवृत्ती गुरुनाथरूपी अंबुधीच्या सागराच्या ठायीं संगम पावतात. अशा संगमीं सुस्नात झाल्यावर ( गुरुपदीं लीन झाल्यामुळें आपल्याला पावन करून घेतल्यावर ) मन जें आहे हें मळजळीं ( संकल्पवि-कल्परूपी कर्दमांत ) सांपडत नाहीं. आत्म्याची ब्रह्माशीं एकवाक्यता होऊन तो स्वरूपीं निमग्न होतो.

होतां ऐक्य उरी न उरी कर्पूर दीप-जैसा[1] ।
मिळतां येगें रीति स्वानंदें चित्स्वरूपीं तैसा ॥
पाहतां पाहाणें भ्रमलें[2] न चले शब्दाचा वळसा[3] ।
तें तू तूं तें ते मी नाहीं नाहीं आहेसा[4] ॥
चाल ॥ हें सभराभरें[5] भरलेंसे सर्वस्वीं ।
अनंतरवीतेजाहुनि तेजस्वी
हें वर्म जाणती तज्ज्ञ म तापस्वी ॥
टीप ॥ स्वानुभवें ज्या तद्रुप जे त्या हे झाडेझूडे ।
ब्रह्मरूप करि घोडे सर्वहि मुंगी माकोडे[6] ॥ अभय० ॥ ३

सच्चित्सुख आनंद गुरु गोविंद कृपाघन हा ।
वळला तैं मग गळला भवभ्रम व्यापक जनिं वनिं हा ॥
निघोट जो अति थाट दाटला निजात्मजीवन हा ।
पाहति त्याप्रति लोचन पहातेपण गाळुनि पण हा[7]॥
चाल ॥ हें परमधरात्पर गुज दे गुरु दाता ।
जो विश्वांतर्गत नांदे भयत्राता ।
वर्णितां शीणल्या श्रुति मुखिं गुण गातां ॥

---

१ दीपाला कर्पूर लागला म्हणजे कर्पूर दीपरूप होऊन ज्योतींत ज्योती मिसळते त्याप्रमाणें आत्मा हा ब्रह्मरूप होतो २. कारण द्रष्टा, दृश्य आणि दर्शन या तिन्ही कल्पनांचा लय झाला ३ वर्णनाच्या मागें व्याख्या येते, आणि व्याख्येच्या मागें द्वैत येतें, म्हणून शब्दातीत झालें ४ मी तूंपणाचा द्वैतभाव विराला. ५ सभराभर हें सबाह्याभ्यंतरित याचें अपभ्रष्ट रूप आहे आणि हा शब्द याच रूपानें हंसाच्या वाक्यवृत्ति ग्रथांत आला आहे, असें रा पांगारकर एकनाथी भागवत १०-३७० च्या टीपेंत म्हणतात ६ ब्रह्म सबाह्यांतर भरलें आहे अशी ज्याला आत्मप्रतीती आली त्याला झाडे झुडे घोडे मुंगी माकोडे सर्व ब्रह्मरूपच भासतात. ७ निघोट-ओतप्रोत. निजात्मजीवन-निज आपले दास यांचे आत्मजीवन जीवनाधार गुरुनाथ लोचन त्याप्रति पाहतेपण गाळून पाहति हा पण (हे प्रतिज्ञावचन कीं दासाचे नेत्र त्याच्याकडे द्रष्टादृश्यदर्शन हा भेदभाव नाहींसा करून पहातात) असा अन्वय काय ?

टीप ॥ देवनाथ पदकमळामोदा सेवित सुरवाडें[१]।
वाढे तें साम्राज्यसमाधी-सुख सुमना गाढें ॥ अभय० ॥ ४

## पद ( २७६ ).

श्रीगुरुपदिं रत रे पदिं रत रे ।
भव हा गोष्पदवत रे ॥ ध्रु० ॥
दिसती जे जे पसारे । ते तें जगनगहेमचि सारे १
दिसलें विश्वाकारीं । हेमाचि श्रीगुरू मृषा विकारी २
जाणुनियां चित्स्वरुपा । त्यागीं सर्व ही कल्पविकल्पा ३
पाहें घालुनि अंजन । देवनाथप्रभु नाथनिरंजन ४

## पद ( २७७ )

उमजें मच्चित्तारे मद्मती । व्यापक गुरु त्रैजगतीं ॥ ध्रु० ॥
श्रीगुरु ब्रह्मसनातन । सांडुनि फिरशी कां रे वनवन ॥ १
पाहुनी गुरुरूप डोळां । भोगीं आत्मत्वें निजसोहळा ॥ २
घालुनि पाहें अंजन । देवनाथप्रभु नाथनिरंजन ॥ ३

## पद ( २७८ ).

सखे निर्विकल्पतरूगुरू नाटकी ग ॥ ध्रु० ॥
निवटुनियां तमभ्रम , दाखवीत पूर्ण ब्रह्म ।
नेत चढुनि उन्मनींचा घांट कीं ग ॥ सखे० ॥ १
द्वैताचें पुसुनि मूळ , तुरवि नाम जात कूळ ।
चोजवित नयनीं स्वरूप, थाट कीं ग ॥ सखे० ॥ २
चित्स्वरूप दाखवीत, देखण्यास आटवीत ।
दृश्यपणा भास करवी, घोट कीं ग ॥ सखे० ॥ ३
सद्गुरू गोविंदनाथ, निर्विकल्प पूर्ण तात ।
देवनाथ भेदरहित, भाट कीं ग ॥ सखे० ॥ ४

---

१ पदकमळाच्या आमोदा सुगंधाला ( भ्रमराप्रमाणें लुब्ध होऊन ) सुरवाडे सुखानें सेवित. तें सुमना गाढें साम्राज्यसमाधि सुख वाढे ( ब्रह्म ज्ञानपूत झालेल्या मनाला ब्रह्मैक्यानें समाधिसौख्याचें क्षेत्र गाढें वाढे–फार वाढतें. ) असा अन्वयार्थ घ्यावयाचा काय !

## पद ( २७९ )

फिररे फिर मार्गे आतां । भज श्रीगुरुनाथा ॥ ध्रु० ॥
कारे वृथैव फिरशी रानीं । ही भ्रांती राणी ।
वरुनि वाउगा भरसि भराणी । न फिटेचि शिराणी[1] ॥
जाइल हें दो दिवसांचें सुख मानिसि अंतःकरणीं ॥ फिररे०॥१
दारा जातां हे करित विदारा । गृहधनसुतदारा ।
दारा मुरदारा[2] करुनि उदारा । भज त्या सरदारा ॥
भववारा न लगे भजतां प्रभु सच्चित्सुखमंदारा ॥ २
रंगा कां त्या मदनयनकुरंगा । भवजलधि तरंगा ।
माजी बुडशी कां मत्त तुरंगा[3] । गाई श्रीरंगा ।
देवनाथ प्रभु दाता भज त्या गुरू अंतरंगा ॥ ३

## पद ( २८० )

जाणुनि भजरे या गुरुनाथा । उमजुनियां श्रुतिअर्था ॥ ध्रु० ॥
एकीं अनेक सारा । भरला श्रीगुरुचाच पसारा १
जे जें हें भासे रे । तें तें गुरुविण अन्य नसे रे २
देवनाथ प्रभु आपण । व्यापक श्रीगुरु ब्रह्मसनातन ३

## पद ( २८१ )

कांरे भजसी ना या श्रीगुरुराया ॥ ध्रु० ॥
दुःखचि हें सुख मानिसि तूं परि । अशाश्वत हे जाइल काया ॥ १
मी माझें हें म्हणवुनि ओझें । वाहासी फिरसी शिणसी वांयां ॥ २
देवनाथप्रभुनाथजिच्या छंदीं । करीं हित अवुलें[4] विनटुनि पायां ॥ ३

## पद ( २८२ )

श्रीगोविंदा कां न भजावें ? ॥ ध्रु० ॥
निगमागमश्रुतिशास्त्रार्थान्वय । जाणुनि मनिं हें कां न यजावें[5] ! ॥श्री०॥१

---

१. शिराणी–सुख, आनंद, लोलुपता, दुष्प्राप्य अथवा दुर्मिळ वस्तू. येथें लोलुपता, आसोशी हा अर्थ लागतो. संसारांत कितीही रमलास तरी त्याची लोलुपता पुरणार नाहीं. २ त्याज्य, मुरदाड. ३. हे उन्मत्त झालेल्या घोड्या ४ जडून, लीन होऊन, लुब्ध होऊन. ५ पूजावें

कन्यासुतदाराधन अवघे । दुर्मद विषय यां कां न त्यजावें ? ॥ श्री० ॥ २
देवनाथ प्रभु नाथ निरंजन । आत्मादेव या कां न पुजावें ! ॥ श्री० ॥ ३

## पद ( २८३ )

बाई ! म्यां देखिलें लोचनीं श्रीगुरुराया ॥ ध्रुवपद. ॥
जो जो भासत होता त्रास । त्याचा सहजचि झाला नाश ॥
केला ब्रह्मांडाचा ग्रास । हरिली सकळ माया ॥ बाई० ॥ १
येथें पुरला माझा काम । पाहतां श्रीगुरु आत्माराम ।
स्वरुपीं भोगितसें विश्राम । स्वानंदेंसी निजठायां ॥ बाई० ॥ २
सद्गुरु गोविंदनाथ निरंजन । तेणें लेवविलें ज्ञानांजन ।
देवनाथीं समरस पूजन । दृश्य गेलेंसे विलया[1] ॥ बाई० ॥ ३

## पद ( २८४ )

नवल झालें ग ! साजणी ! । ऐकें जिवलग गडणी ! ॥ ध्रु० ॥
काम अहंकार दुर्धर । गांजिति भावे[2] दीर ।
आशा तृष्णा ह्या परिकर[3] । छळति नणंदा फार ॥ नवल० ॥ १
बाई ! सोसवेना हा मार । जालें मी बेजार ।
तैं मी रिघालें[4] गुरुघर । नाशियलें हें तिमिर[5] ॥ नवल० ॥ २
तिमिर नाशियलें गुरुराय । उलटें चालविलें माये[6] ।
तैं मी पावलें निजठायें । झालींसे निर्भय ॥ नवल० ॥ ३
निर्भय झालीं मी नाथ गोविंदीं । रतलीं सुखस्वानंदीं ।
देवनाथ हा स्वच्छंदी । आपण आदिअनादि[8] ॥ नवल० ॥ ४

---

१ दृश्य गेलेंसे विलया—द्रष्टादृश्यदर्शन असा त्रिविध भाव नाहींसा होऊन मनाला समरसता आली. २ भावे = भावोजी. ३ परिकर=समूह, परिवार, या-जारबुणगें. ४ शिरलें ५ अंधकार, डोळ्यांवरील पडळ. ६ विषयपराङ्मुख केलें, प्रवृत्तिमार्ग सोडून निवृत्ति मार्गाकडे चालविलें. ७ निजधाम, आत्मस्वरूपाचें ज्ञान (मला गुरुरूपेनें लाधलें) यासारखेंच आद्यकवि मुकुंदराय यांचें " उबगलें मी सासन्या अतां, मज माहेरासि न्याहो " हें पद पहा. ८ आपण आदि अनादि = आपणच आदि म्हणजे मूळकारण आणि आपल्यापेक्षां अगोदरचें कोणीही नाहीं असें जें अनादि अशा विशेषणांनीं युक्त परब्रह्म त्याच्याशीं गुरु गोविंदनाथांची तुलना केलेली आहे.

पद ( २८५ )

श्रीगुरुची माय । झालें मी दासी. ॥ ध्रुवपद. ॥

श्रीगुरुवांचुनी आणिक नेणें । आठवितें मी पाय. ॥ श्री० ॥ १

विश्वचराचर श्रीगुरुचें रूप । स्वरुपीं वृत्ति विलया जाय ॥श्री०॥२

देवनाथप्रभु नाथ निरंजन । अंजन दे तैं धाय ॥ श्रीगुरुची० ॥ ३

पद ( २८६ )

श्रीगुरुच्या पदिं भाव धरावा ॥ ध्रुवपद ॥

श्रीगुरूच्या निजस्वरूपईक्षणें । स्वात्मानुभव सांग वरावा ॥ श्रीगुरु० ॥ १

द्वैताद्वैता गाळुनि ठायीं । मीतूंपण हा भेद हरावा ॥ श्रीगुरु० ॥ २

देवनाथप्रभु नाथ निरंजन । पूर्णपणें निजनयनीं वरावा ॥ श्रीगुरु० ॥ ३

पद ( २८७ )

सखये ! गुरुनें नवलाव केला माय ।
अनूभवसुख तें वाचेसि बोलों काय ? ॥ ध्रुवपद ॥
अभयवरदें स्पर्शिलें स्वकरें मौळा ।
अनुभववस्तू दाविलिया निजडोळां ॥
अद्भुत पाहतां तेजाचा उठे बंबाळा ।
जया तेजीं लोपती रविशशिकळा ॥ सखये० ॥ १
त्या निजतेजें धवलें[1] हें चिद्गगन ।
पाहतां नयनीं समरस झालें मन ॥
वृत्ति समुळीं चित्स्वरुपीं झाली लीन ।
नुरे कांहीं भेदाचें अणुही भान ॥ सखये० ॥ २
तुष्टला हा गोविंद श्रीगुरु योगी ।
समाधि स्वसुखें धालें गे ! अंतरंगीं ॥
न पडे दृष्टि किमपिही दृश्यतरंगीं[2] ॥
..... .. .. ... ............ ॥ सखये० ॥ ३

---

१ निजतेजें धवलें = त्या अत्यंत तेजानें हें चिद्गगन धवलें =धवल झालें= सर्वत्र प्रकाशपूर्ण झालें. २ मी आपल्या अंतकरणांत समाधिसुखाच्या तन्मयतेनें धालें =सुखपूर्ण झालें, आणि दृश्यतरंगीं = दृश्य जें हें मायिक जगदाभास याच्या विविधतरंगीं, संसारमायेच्या अनंतस्वरूपाकडे ( माझी किमपिही दृष्टि लागत नाहीं )

देवनाथ प्रभु व्यापक या जनिंवनीं ।
पाहतां सरली देहाची सर्वही कहाणी[1] ॥
पाहतां पाहणें आटोनिया निजस्थानीं ।
साम्राज्यत्वें नांदे गे ! या चिद्भुवनीं ॥ मखये० ॥ ४

## पद (२८८)

मना ! तूं भज रे ! गुरु गोविंद ।
वारणें[2] विघ्ननिवारणकारणें[3] सच्चित्सुखारविंद[4] ॥ ध्रुवपद ॥
जाइल काया, जाइल माया वांया कां शिणसी ।
तें कां ग्रहण करावें दाणा न मिळे ज्या कणशीं[5] ? ।
सोस धरोनी माझें माझें उगाच कां म्हणसी ? ।
सेखीं[6] कांहीं तुझें नव्हे बा ! हें मायेचें[7] चिंद ॥ मना० ॥ १
असतां संपत्ती भोंवतीं मिळती सारीं खाणारीं ।
भामा चुलता बंधू बहिणी आणिक नरनारी ।
कन्यासुतदारादिक खाउनि मारीं जाणारीं ।
ममता सुसरी ओढित तीणें हा रचिलासे फंद ॥ मना० ॥ २
फिर फिर मार्गें येई वेगें या मार्गें आतां ।
'रामराम श्रीराम' नाम गा वदनीं गुणवंता ।
भवगर्जदमना[8] हरि 'श्रमशमना श्रीरुक्मिणिकांता' ।
शरणागत जा भावें प्रभुच्या नामीं धरीं रे ! छंद ॥ मना० ॥ ३

---

१ माझी अहंभावना पूर्णपणें नष्ट होऊन मी विश्वस्वरूपामध्यें विलीन होऊन गेलें निजस्थानीं साम्राज्यत्वें नांदे = मागील पदांत म्हटल्याप्रमाणें "तें मी पावलें निजठाय । झालिसे निर्भय" पाहतां पाहणें आटोनिया— द्रष्टादृश्यदर्शन अशी त्रिविधभावना नष्ट होऊन २ वारण = वारणार ३ विघ्ननिवारणकारण = विघ्नें नाहींशीं करण्याला कारणीभुत होणारें ४ सच्चित्सुखारविंद = सच्चित्सुखरूपी अरविंद म्हणजे कमल. ५ दाणा न मिळे ज्या कणशीं = ज्या कणसाला दाणा नाहीं तें कशाकरितां घ्यावें. ६ सेखीं = शेवटीं ७ मायेचें चिंद = खेळ, ठगणूक असा अनुमानाचा अर्थ. धाकी हा शब्द कोणत्याही कोशांत सांपडला नाहीं दोन डोकीं, चार हात इत्यादि चिन्हांनीं युक्त अशा जन्मलेल्या लेंकराला वऱ्हाडांत कुचिंद म्हणतात, असें रा० रा० डोंकरस वकील कळवितात. ८ भवगजदमना = संसाररूपी गजाचें दमन करणाऱ्या.

देवनाथ विनवी मन ! सांडीं विकल्पसंकल्पा ।
घेइ विसावा श्रीसद्गुरुच्या पदपंकजखोपा[1] ।
नाहीं संशय, निजात्मगतिचा[2] मार्ग सहज सोपा ।
स्वात्मानुभवीं रमतां होय मानस मग निर्द्वंद्व[3] ॥ मना० ॥ ५

## पद ( २८९ )

निजहृदयीं गुरुरूप पहावें । नलगे त्यासी विजनीं फिरावें ॥ ध्रुवपद ॥
सद्भावें गुरुसीं शरण रिघावें । अपुलें स्वहित पुसावें ॥ नलगे० ॥ १
मन हें गुरुपदिं अर्पुनि बापा । गुरुवचनामृतपान करावें ॥ नलगे० ॥ २
देह अशाश्वत जाइल वायां । जाणुनि ऐसें हरिनें भजावें ॥ नलगे० ॥ ३
देवनाथप्रभु नाथ निरंजन । त्या पदिं सुंदरा स्वस्थ असावें ॥नलगे०॥ ४

## पद ( २९० )

नामामृतरस रसने ! । भरावा ॥ ध्रुवपद ॥
सर्वांतर्गत श्रीगुरु व्यापक । जाणुनि या पदिं भाव धरावा ॥नामा०॥ १
आत्मा आपण उमजुनि अनुभवीं । मीतूंपण हा हेतु हरावा ॥नामा०॥ २
नयनद्वारें हृदयभुवनीं । सच्चित्सुखगुरु पूर्ण शिरावा ॥ नामा० ॥ ३
देवनाथप्रभु नाथ निरंजन । प्रेमादरें निज आप्त करावा ॥ नामा० ॥ ४

## पद ( २९१ )

धन्य श्रीगुरू, गुरूनाथ भोळा । दाविलें चिद्घन निजडोळां ॥ ध्रुवपद ॥
सखे ! गुरुवरें, गुरुवरें नवल केलें । अविद्यापडळ हारियेलें ॥
देउनि ज्ञानदीठी, उघड दावियेलें । पाहातां मन तन्मय झालें ॥
धरुनि निजकरीं, करीं उलट चालविलें । निजात्मनिजभुवना नेलें[4] ॥
चित्समरसें, भोगिन सुखसोहळा ॥ दाविलें० ॥ १

---

१ पदपंकजखोपा = सोपा म्हणजे पाखराचें रहावयाचें घरटें कमलासारखे पाय हेंच आश्रयस्थान. २ निजात्मगतिचा = आपल्या सद्गतीचा, आत्मोद्धाराचा. ३ निर्द्वंद्व = द्वैतरहित, ब्रह्माशीं ऐक्य झालेलें. पडळ = पडदा, आड आलेली वस्तू. कृपावरदपाणी = कृपावर देणाऱ्या हातानें. मौळ = मस्तक; घनवटें=दाटे, पुष्कळसें एकत्र जमे ४ माझ्या मनोवृत्ति ज्या नेहमीं बाह्य सृष्टीमध्ये निमग्न असत, तेथून त्या काढून त्यांना आत्मविचाराच्या आणि आत्मोद्धाराच्या मार्गाला लावलें.

काळ स्पर्शिलें, कृपावरद पाणी । दाविलें निजगुज निजनयनीं[1] ॥
ज्ञानरविउदय, उदय चिद्गगनीं । दवडली दुर्धर तमरजनी ॥
तेज घनवटे, घनवटे[2] हृदयभुवनीं । जाहली ऐक्यरूप मेळणी ॥
भास सर्वही, सर्वही सखे ! गळला । दाविलें० ॥ २
पाहें मी जिकडे, तिकडे पैं जाणा । व्यापिला सकलाहि गुरुराणा ॥
न दिसे दुजें, दुजें त्याजवीना । उभा नयनाचे आंगणां[3] ॥
वर्णितां श्रुती, श्रुती धरिति मौना । विसावा त्या स्वरुपीं स्वमना ॥
सखे ' निर्गुण, हा राजस पुतळा । दाविलें० ॥ ३
सकुळ आटलें, आटले आजि द्वंद्व । दाटला मनीं ब्रह्मानंद ॥
गुणातीत तो, निर्गुण निर्द्वंद्व । देखिला श्रीगुरु गोविंद ॥
देवनाथाचा, नाथाचा स्वानंद । तन्मय वृत्ति निजानंद ॥
अनुहत ध्वनी[4], ध्वनि वाजत थाळा[5] । दाविलें० ॥ ४

---

१ निजगुज म्हणजे मी व ब्रह्म यांचें ऐक्यत्वच आहे आणि भिन्नत्व नाही, ही जी गुह्यात् गुह्यतर ज्ञानाची कल्पना ती निजनयनी दाविली =माझ्या स्वतःच्या डोळ्यांनीं मला दाखविली, माझ्या प्रत्ययाला अनुभवाला आणली आजपर्यंत विश्वाकडे चर्मचक्षूनें पहात असल्यामुळें मला मी विश्वापासून वेगळा आहें अशी भावना झाली; नंतर गुरुवाक्यावर विश्वास ठेवल्यामुळें माझ्या व विश्वाच्या ऐक्यत्वावर माझा भरवसा बसला व गुरूच्या डोळ्यानीं मी ऐक्यत्व पाहूं लागलों; पुढें माझा मला प्रत्यय आल्यावर मी निजनयनी म्हणजे अनुभवजन्य ज्ञान-दृष्टीनें पहावयाला लागलों; नुसत्या विश्वासावर गुरुनयनांनीं पहावयाचें असें माझ्या सद्गुरूनीं ठेवलेंच नाहीं. २ एकत्र जमे, दाट होई ३ अगदीं डोळ्यासमोर, थेट नजरेच्या समोर ४ अनुहतध्वनि—अनाहत ध्वनि— [ " कानाचीं भोकें बंद केलीं असतां जो एक प्रकारचा नाद ऐकूं येतो तो; न वाजवितां उत्पन्न झालेला नाद.योगशास्त्रामध्ये नादानुसंधानाने ब्रह्मप्राप्ति होते असें सांगितलें आहे अनाहतध्वनीवर लक्ष्य लावल्यानें चित्त स्थिर होतें व सहज समाधि प्राप्त होते " रेळेकृत पातंजली योगदर्शन १२१ ते १२५ ] ५ थाळा—ताट—परात. ताटाला मेण लावून त्यावर एक काठी ठेवून तीवरून हात फिरविला असतां एक प्रकारचा नाद उत्पन्न होतो, त्याप्रमाणें अनाहत ध्वनि एकसारखा ज्या स्थितींत चालू रहातो ती स्थिति ( वृत्ति ) मला प्राप्त झाली असा कवीचा अभिप्राय आहे.

## पद ( २९२ )

श्रीगुरुचरणीं रतलें मानस न दिसे मज दुसरें ।
समरस त्या चित्स्वरुपीं पाहतां आठव ना विसरे ॥ ध्रुवपद ॥
देशिक रायें सोहं शब्दें गुज सांगुनि कर्णी ।
अनुपम उपमे विरहित तें हें दाखविलें नयनीं ॥
धव धव धव धव प्रकाश पडला उदय स्वात्मकिरणीं ।
स्वयंभ तेजःपुंज विकसलें चिद्रुप हृद्भुवनीं ॥
चाल ॥ व्यापक अद्वय अविट । भरला सघन घनदाट ।
तेथें शब्दा न फुटे वाट ॥
टीप ॥ अनुभवीं पाहातां निर्विकार ॥ समरस० ॥ १
गुणातीत जें निर्गुण म्हणती मुळ ॐकाराचें ।
स्वतेज तेजें विलसे न दिसे नाम विकाराचें ॥
काळें पिवळें ढवळें नव्हे तें अन्य प्रकाराचे ।
ज्याच्या भासें भासे हें वचन श्रुतिकाराचें ॥
चाल ॥ भासातित जेथें वस्तु । पाहातां गाळुनियां मी तूं ।
चिन्मय शिखागत तंतू ॥
टीप ॥ अनुभवीं गवसलें सारें ॥ समरस० ॥ २
नामरूप ना गुण वर्ण ज्या पोट नसे पाठी ।
निघोट जें अतिदाट घोटलें व्यापुनियां सृष्टी ॥
ध्येयध्याताध्यानधारणा आटोनियां त्रिपुटी ।
पाहतां पाहतां पाहणें विरालें समावलें पोटीं ॥
चाल ॥ दाविलें दिठिं गुरु गोविंदें । रतला देवनाथ छंदें ।
धालें मन ब्रह्मानंदें ॥
टीप ॥ लाधलें सुख परात्परें ॥ समरस० ॥ ३

## पद ( २९३ )

सद्गुरू मायबापा ! ये त्वरें नाथराया ! ॥ ध्रुवपद ॥
हिंडतां कष्टलों मी चौऱ्यायशीं लक्ष योनी ।
निजभाग्यें प्राप्त झाला नरदेह पुण्यखाणी ॥
सत्संग धरुनि येथें निजठाव तुझे चरणीं ।
टीप ॥ भ्रमवोनि चित्त माझें वसविली मायराणी ॥ सद्गुरू० ॥ १

सुत स्नुषा गळा घाली आणोनि मोहपाशा ।
भ्रमविलें चित्त माझें सोयऱ्या श्रीनिवासा ! ॥
न चलेच कांहीं देवा ! उपाय करूं कैसा ।
टीप ॥ ये धांव त्वरें आतां धरवेना मला धिवसा[1] ॥ सद्गुरू० ॥ २

वासना मला गोंवी हिंडवी देशोदेशा ।
सेववी धनिकदारा धरुनियां द्रव्यआशा ॥
बुडविलें स्वहित येणें जाहल्या वृत्ति पीशा ।
टीप ॥ मी काय करूं आतां सांवळ्या पंढरीशा ॥ सद्गुरू० ॥ ३

घाबरा जीव झाला दुःख हें सोसवेना ।
सद्गदित कंठ माझा शब्दही बोलवेना ॥
काढिं वा काढिं वेगीं लोचनीं पाहावेना ।
टीप ॥ जगत्रिविध[2] भाषणाचा शब्दही ऐकवेना ॥ सद्गुरू० ॥ ४

किति तरी अंत पाहासी कां दया येईना जी ।
मी पतित भारी म्हणतां उपेक्षा पावना ! जी ॥
तुझी ब्रिदावळी कैसी[3] हे दीनतारणा जी ।
टीप ॥ परिसावी ग्लानि माझी रुक्मिणीजिवना जी ॥ सद्गुरू० ॥ ५

देवनाथ प्रभुदात्या न लागो वेळ यावें ।
हीनदीन पतित तुझा प्रार्थितों प्रेमभावें ॥
तू जननि, तान्हुलें मी वोसंगिं मला घ्यावें ।
टीप ॥ पाजोनि प्रेमपान्हा निजस्वरूपा दाखवावें ॥ सद्गुरू० ॥ ६

---

१ धिवसा = धैर्य २ जग त्रिविध भाषणाचा इ०—जग हें त्रिविध प्रकारचें आहे; याच्या बऱ्यावाईट भाषणाचा एक शब्दही मला ऐकवत नाहीं मी अगदीं कंटाळलो निजठाव = अत्यंत पवित्र श्रेष्ठ असें स्थान, अनन्यगतीचें ठिकाण; अनन्यभक्तिपूर्वक मानलेलें निवासस्थान. कवितेंत निज = अत्यत असा अर्थ होतो. ३ तुझी ब्रिदावली कैसी:—रंगनाथस्वामी आपल्या गजेंद्र-मोक्षांत देवाच्या बीदावळीसंबधानें म्हणतात.—उद्धरिला अजमीळ अहल्या, तारियेली गणिका अधरासी । हिंसक व्याध जिवांप्रति मारूनियां शर ... ... भक्षित त्यासी । चोज कसें गुज सांग तयाहुनि पातक काय असे मजपाशीं । दीनदयाकर हे बिरुदावलि, वानिति वेद निरंतर कैशी ॥ ( रंगनाथकृत गजेंद्र-मोक्ष ) कविता १८.

## पद ( २९४ )

गुरू दयाळा परम कृपाळा [1] बुडलों भवडोहीं ।
तारुं तुजविना कोणी नाहीं ॥ ध्रुवपद ॥
कर्मविपाकें जननीजठरीं नवमास राहिलों ।
तेथें मळमूत्रानें कढलों ॥
जातवेद[2] संतप्त जाळीं बहुतचि श्रमी जालों ।
आजि तदनंतर जन्मलों ॥
सोहं मुळींचें स्मरण बुडालें[3] कोहं मुखिं वदलों ।
भ्रांतिअज्ञानतिमिरिं पडलों ॥
चाल ॥ खेळिं[4] खोविलें बाळपण ।
आलें धडधडित तारुण्य । गुतलें विषयावरि मन ॥
दीप ॥ जसा मिन गळाचिये ठायीं ।
चालेना उपाय करूं कायी ॥ गुरू० ॥ १

---

१. तारु तुजविना कोणी नाहीं:—निर्णयसागरी प्रतींत ' तारि तुजविना कोणी नाहीं ' ह्मणजे तुजविना मला तारी ऐसा कोणी नाहीं असा पाठ दिला; परंतु सुरजी अजनगाव येथील मठांत व श्रीमंत रघुपतराव देशपांडे यांच्या घराण्यांत ' तारू तुजविना कोणि नाहीं ' असा पाठ आहे. परमेश्वराला अथवा सद्गुरूला भवार्णवींचें तारू ही उपमा किती तरी यथार्थ आहे. इतर कविश्रेष्ठांनीं तारूं म्हणजे जहाज याच कल्पनेचा उपयोग केला आहे. रुक्मिणीचें हरण करून श्रीकृष्ण परत चालले तेव्हां विठ्ठलकवीनीं जगन्मातेला ' विश्वतारू ' म्हटलें आहे

" वैदर्भी वामऊरूवरि भुवनगुरू बैसली विश्वतारू
हस्ताब्जीं वेत्रधारू अति चपळ महत् वागवी चार वारू "

२. जातवेद्संतप्त—मातेच्या उदरांतील प्रखर जठराग्नि शेसी = अग्नी.
३ सोऽहं मुळींचें स्मरण बुडालें:—समर्थ आपल्या दासबोधात म्हणतातः—गर्भी म्हणे सोऽहं सोहं । बाहेर पडतां म्हणे कोहं कोहं । ऐसा कष्टी जाहला बहुत मोहें । गर्भवासी ॥ ( दशक ३, समास १, ओंवी ४७ ) ४ खेळीं खोविलें बाळपण:—

बाल्ये दुःखातिरेकान्मललुलितवपुःस्तन्यपाने पिपासा
निःशक्तश्चेंद्रियेभ्यो भवगुणजनिता जंतवो मां तुदन्ति ।

( पुढील पृष्ठ पाहा. )

प्रीत स्त्रियेची भारी म्हणुनी नृपती आर्जविलें ।
द्रव्य हें बहुत मेळवीलें ॥
प्रपंचखटपट करितां शिणलों वय सर्वाहि गेलें ।
नाहिं श्रेष्ठांचें ऐकीलें ॥

---

( ५०५ वरून समाप्त. )

नानारोगादिदुःखै रुदनपरवशो शंकर न स्मरामि
क्षंतव्यो मेऽपराधः शिव शिव शिव भो श्रीमहादेव शंभो ॥२॥
प्रौढोऽहं यौवनस्थो विषयविषधरैः पंचभिर्मर्मसंधौ
दष्टो नष्टो विवेकः सुतधनयुवतिस्वादसौख्ये निषण्णः ।
शैवीचिंताविहीनं मम हृदयमहो मानगर्वाधिरूढं
क्षंतव्यो मेऽपराधः शिव शिव शिव भो श्रीमहादेव शंभो ॥३॥
वार्धक्येचेंद्रियाणां विगतगतिमतिश्चाधिदैवादितापैः
पापै रोगैर्वियोगैस्त्वनवसिततनुः प्रौढहीनं च दीनम् ।
मिथ्या मोहाभिलाषैर्भ्रमति मम मनो धूर्जटेर्ध्यानशून्यं
क्षंतव्यो मेऽपराधः शिव शिव शिव भो श्रीमहादेव शंभो ॥४॥
शिवापराधक्षमापनस्तोत्र.

धडधडित तारुण्य आणि हुडहुडी दारिद्र्य या शब्दसमूहासंबधीं प्रस्तावनें-तील पान ५७ ( भाग ४९ नाथांची शब्दकला ) पहा रामदास महाराजांनीं मनुष्याच्या आयुष्यांतील दहा अवस्थांसंबंधानें उद्गार काढले आहेत. त्यांचें या पदाशीं साम्य असल्याकारणानें ते पद याखालीं दिलें आहे. रामदास म्हणतातः—" सावधान सावधान । वाचे बोला नारायण ॥ ध्रु० ॥ दश वर्षें बालपण । वीस वर्षें तारुण्य । आंगीं चढे मदन । मग कैचें व्यवधान ॥ साव० ॥ १ ॥ तिसांची होय भरती । दारापुत्रां लागे प्रीति । त्याचीच पडे भ्रांती । ही स्वरूपें स्थिति ॥ साव० ॥ २ ॥ चाळीस वर्षें झाला । डोळां चाळीशी आली । नेत्राशीं भुल पडली । न दिसती जवळि ॥ साव० ॥ ३ ॥ पन्नास वर्षें होतीं । हालती दांताच्या पंक्ती । श्याम केश शुभ्र होतीं।त्यासी म्हातारा म्हणती ॥साव० ॥ ४ ॥ साठीची बुद्धी नाठी । हातीं घेउनियां काठी । बसासा लागे पाठी । गांजताती कारटीं ॥ साव० ॥ ५ ॥ सत्तरीची हेचि रचना । बसविल्या उठवेना । उठविल्या हालवेना । हालविल्या चालवेना ॥ साव० ॥ ६ ॥ चार विसा मिळोन ऐशीं । मग तो झाला तापसी । जलावांण जैशी माशी । तैशी होय कासावीशी ॥ साव० ॥ ७ ॥ नवावरती पडतां पूज्य । मग ते होताती दुजे । अवघे म्हणती माझें माझें । न येती कोणी काजा ॥ साव० ॥ ८ ॥ शतायुषी पुरुष झाला । परि तो वायां गेला । रामदास याचे बोला । विरळा सावध तो झाला॥साव०॥९॥"

कन्यासुतदाराधन साचे मानुनि मन भुललें ।
जें करूं नये तें केलें ॥
चाल ॥ कळा चातुर्य निजअंगीं ।
रतलों विषयाचे संगीं । चेतना[1] नाहीं अंतरंगीं ॥
टीप ॥ मिळाले व्याही जावाई ।
त्याच सौख्यांत मस्त राहीं ॥ गुरू० ॥ २

दो प्रहरांची छाया संपत गेली बापुडी ।
आलें दारिद्र हुडहूडी ॥
प्रारब्ध उलटें पडलें करितां श्रम न मिळे कवडी ।
जीव हा दुःखित चरफडी ॥
अळंकारवस्त्रांचे लोभें स्त्री तडतड तोडी ।
मागे द्रव्याची गांठोडी ॥
चाल ॥ असें मन भवगाळीं फसलें ।
शोकें तारुण्य तेंहि गेलें । जरेनें ठाणें बसवीलें ॥
टीप ॥ झालि शक्ति हे क्षीण ठायीं ।
चढली नयनांवर शाई ॥ गुरू० ॥ ३

श्रवण झाले बधिर कांहीं दिसेचिना डोळां ।
झालों अविचारि आंधळा ॥
दीर्घ[2] लहूचें कठीण पडलें नाडि झाल्या गोळा ।
हांसतो पिशुनांचा[3] मेळा ॥
स्त्रीपुत्रादिक त्रास मानिती करिती कंटाळा ।
ऐशी कठिण आलि वेळा ॥
चाल ॥ सोसेना दुःख अतिभारी ।
म्हणउनि आलों तुझे द्वारीं । करुणार्णवा ! मला तारीं ॥
टीप ॥ अर्पिलें चित्त तुझे पायीं ।
नाथजी ! अभय त्वरें देईं ॥ गुरू० ॥ ४

---

१ चेतना—मनांतील सद्सद्विवेकबुद्धि, किंवा मरणोत्तर स्थितीची विवंचना. २ दीर्घलहूचे कठीण पडलें—दीर्घ शंका आणि लघुशंका ह्या व्यवस्थित उरकविणें कठीण पडूं लागलें. ३ पिशुन = दुष्ट.

पतितपावना राखीं ऐशी लाज ब्रिदाची ।
माउलि होसी अनाथाची ॥
शरणागतवत्सल उभयकरीं ध्वजा कीर्तीची ।
हे तो गाही[1] निगमाची[2] ॥
मायबाप अजि ताप निवविं करीं छाया कृपेची[3]।
कल्पना वारीं चित्ताची ॥
चाल ॥ सद्गुरुनाथा श्रीरंगा ।
देई मज पायीं तुझे जागा । नेई मम भवभ्रांति भंगा ॥
टीप ॥ सांवळे माय विठाबाई ! ।
सर्वदा मम हृदयीं राहीं ॥ गुरू० ॥ ३

देवनाथ म्हणे विनंति ऐकिजे बा रुक्मिणिरमणा ! ।
मोयऱ्या नाथा जगजीवना ॥
याचक असें मी द्वारीं उभा नेपेक्षीं गरुडवहना ! ।
देई मज भजनप्रेमदाना ॥
चाल ॥ सच्चिदानंदा जगजेठी ।
येऊं दे दया तुझे पोटीं । न लावि उशिर देइ भेटी ॥
टीप ॥ माझे कनवाळे आई ।
देई मज क्षेम चहूं बाहीं[4] ॥ गुरू० ॥ ४

---

१ गाही=साक्ष २ निगम–वेद. तू शरणागत वत्सल अशी ध्वजा तुझ्या उभय करीं फडकत आहे ( आणि त्यायोगें दोन आर्तांना तुझ्या चरणाशीं बोलावीत आहे ) अशी गाही साक्ष निगम वेद देतात ३. या ओळीचा अन्वय "हे मायबाप। अजिताप निववी। कृपेची छाया करीं" असा करावा. ४ पान ३०६ ची पहिली टीप ( पद ११५ खालची ) पहा. क्षेम=प्रेमालिंगन. 'प्रेम' शब्द छापील प्रतींत होता, खरा शब्द 'क्षेम' असावा असें वाटतें. पद ११५ चें शेवटलें कडवें पहा धरुनि कर उलट चालवीलें–प्रवृत्ति मार्गाकडे मनुष्याचा स्वाभाविक कल असतो तेव्हां प्रवृत्ति मार्गापासून उलटें निवृत्ति मार्गाकडे नेलें.

## पद (२९५)

धन्य श्रीगुरू, श्रीगुरूनाथराणा । नवल दाखवि मुखिं वदवेना ॥ध्रु०॥
सखे दैशिकें, दैशिकें[1] नवल केलें । धरुनि कर उलटें चालवीलें ॥
पंचसोपान सोपान[2] उलंघीलें । परात्पर निजभुवना नेलें ।
अविट तेथींचें वैभव दावियेलें । प्रकाशें भुवनत्रय भरलें ॥
तेज अद्भुत, अद्भुत पाहवेना ॥ नवल० ॥ १
पाहें मी जिकडे, तिकडे तेंचि भासे । भासणें समूळही नाशे ।
अखिल निजवस्तु, निजवस्तु पूर्ण विलसे । सबाह्यांतर व्यापोनि दिसे ।
देखणेपणा, पणा ठाव न दिसे । मनत्वा मनपण मुकलेंसे ॥
बुद्धि पांगुळी, पांगुळी वर्णवेना ॥ नवल० ॥ २
श्वेत रक्त ना, रक्त ना पित श्याम । पुर्ण रंगातित निःसीम ।
अचल अक्षय, अक्षय परंधाम । वर्णितां थकित श्रुतिनिगम ॥
सद्गुरूकृपें, कृपें अतिसुगम । जाणती अनुभवि हें वर्म ।
शब्दज्ञानिया, ज्ञानिया आकळेनां[3] ॥ नवल० ॥ ३
पूर्ण श्रीधनी, धनी गुरु गोविंद । अद्वय चिद्घन सुखकंद ।
कृपें दीधला, दीधला अभय वरद । महावाक्याचा[4] निजशब्द ॥
कार्णि सांगुनी, सांगुनी दावि निषेध । देवनाथासि निजानंदें[5] ।
प्राप्त जाहला, जाहला सांगवेना ॥ नवल० ॥ ४

## पद (२९६)

गुरुतर सुख मज प्राप्त सये ! सद्गुरूवाक्यबोधीं ।
गलितभेद भवभ्रांति फीटली झालि आत्मशुद्धी ॥ ध्रुवपद. ॥
नवल गुरूचा बोध रिपू हा कामक्रोध गळला ।
लोभ दंभ मद मोह सुबोधें मर्दियला मेला ॥
विवेक आणि वैराग्य स्थापुनि निजशांती विमला ।
प्राप्त तरी हें गुप्त समजलें शुद्ध भाव फळला ॥

---

१ दैशिकः—गुरु, मार्गदर्शक. २. सोपान—जिना, शिडी, घाटाची पायरी. मोक्षाच्या पांच ( पंचसोपान ) पायऱ्या चढून मी वर गेलों ३. वेदश्रुतीसुद्धां वर्णन करतांना थकतात; पण हें ज्ञान गुरुकृपेनें सुगम होतें हें वर्म अनुभवज्ञान्यांना माहीत आहे, शब्दज्ञान्यांना मात्र माहीत होणार नाहीं ४ तत्वमसि या महावाक्याचा थोर उपदेश. ५. अत्यानंद, ब्रह्मानंद

पतितपावना राखीं ऐशी लाज ब्रिदाची ।
माउलि होसी अनाथाची ॥
शरणागतवत्सल उभयकरीं ध्वजा कीर्तीची ।
हे तो गाही[1] निगमाची[2] ॥
मायबाप अजि ताप निवर्वि करीं छाया कृपेची[3]।
कल्पना वारीं चित्ताची ॥
चाल ॥ सद्गुरुनाथा श्रीरंगा ।
देईं मज पायिं तुझे जागा । नेइ मम भवभ्रांति भंगा ॥
टीप ॥ सांवळे माय विठाबाई ! ।
सर्वदा मम हृदयीं राहीं ॥ गुरू० ॥ ५

देवनाथ म्हणे विनति एकिजे बा रुक्मिणिरमणा ! ।
सोयऱ्या नाथा जगजीवना ॥
याचक असें मी द्वारीं उभा नोपेक्षीं गरुडवहना ! ।
देईं मज भजनप्रेमदाना ॥
चाल ॥ सच्चिदानंदा जगजेठी ।
येऊं दे दया तुझे पोटीं । न लावि उशिर देइ भेटी ॥
टीप ॥ माझे कनवाळे आई ।
देईं मज क्षेम चहूं बाहीं[4] ॥ गुरू० ॥ ४

---

१ गाही=साक्ष २ निगम-वेद. तूं शरणागत वत्सल अशी ध्वजा तुझ्या उभय करीं फडकत आहे ( आणि त्यायोगें दीन आर्तांना तुझ्या चरणाशीं बोलावीत आहे ) अशी गाही साक्ष निगम वेद देतात ३. या ओळीचा अन्वय " हे मायबाप ! अजिताप निवर्वी ! कृपेची छाया करी" असा करावा. ४. पान ३०६ चीं पहिली टीप ( पद ११५ खालची ) पहा. क्षेम=प्रेमालिंगन. 'प्रेम' शब्द छापील प्रतीत होता खरा शब्द 'क्षेम' असावा असें वाटतें. पद ११५ चें शेवटलें कडवें पहा. धरुनि कर उलट चालवीलें:-प्रवृत्ति मार्गाकडे मनुष्याचा स्वाभाविक कल असतो तेव्हां प्रवृत्ति मार्गापासून उलटें निवृत्ति मार्गाकडे नेलें.

## पद (२९५)

धन्य श्रीगुरू, श्रीगुरूनाथराणा । नवल दाखवि मुखिं वदवेना ॥ध्रु०॥
सर्व देशिकें, देशिकें नवल केलें । धरुनि कर उलटें चालवीलें ॥
पंचसोपान सोपान उलंघीलें । परात्पर निजभुवना नेलें ।
अविट तेथींचें वैभव दावियेलें । प्रकाशें भुवनत्रय भरलें ॥
तेज अद्भुत, अद्भुत पाहवेना ॥ नवल० ॥ १
पाहें मी जिकडे, तिकडे तेंचि भासे । भासणें समूळही नाशे ।
अखिल निजवस्तु, निजवस्तु पूर्ण विलसे । सबाह्यांतर व्यापोनि दिसे ।
देखणेपणा, पणा ठाव न दिसे । मनत्वा मनपण मुकलेंसे ॥
बुद्धि पांगुळी, पांगुळी वर्णवेना ॥ नवल० ॥ २
श्वेत रक्त ना, रक्त ना पीत शाम । पुर्ण रंगातित निःसीम ।
अचल अक्षय, अक्षय परंधाम । वर्णितां थकित श्रुतिनिगम ॥
सद्गुरूकृपें, कृपें अतिसुगम । जाणती अनुभवि हें वर्म ।
शब्दज्ञानिया, ज्ञानिया आकळेनां ॥ नवल० ॥ ३
पूर्ण श्रीधनी, धनी गुरु गोविंद । अद्वय चिद्घन सुखकंद ।
कृपें दीधला, दीधला अभय वरद । महावाक्याचा निजशब्द ॥
कर्णि सांगुनी, सांगुनी दावि निषेध । देवनाथासि निजानंद ।
प्राप्त जाहला, जाहला सांगवेना ॥ नवल० ॥ ४

## पद (२९६)

गुरुतर सुख मज प्राप्त सये ! सद्गुरुवाक्यबोधीं ।
गलितभेद भवभ्रांति फीटली झालि आत्मशुद्धी ॥ ध्रुवपद. ॥
नवल गुरूचा बोध रिपू हा कामक्रोध गळला ।
लोभ दंभ मद मोह सुबोधं मर्दियला मेला ॥
विवेक आणि वैराग्य स्थापुनि निजशांती विमला ।
प्राप्त तरी हे गुप्त समजले शुद्ध भाव फळला ॥

---

१ देशिकः—गुरु, मार्गदर्शक. २. सोपान—जिना, शिडी, घांटाची पायरी. मोक्षाच्या पांच ( पंचसोपान ) पायऱ्या चढून मी वर गेलों ३. वेदश्रुतीसुद्धां वर्णन करतांना थकतात, पण हें ज्ञान गुरुकृपेनें सुगम होतें हें वर्म अनुभवज्ञान्यांना माहीत आहे, शब्दज्ञान्यांना मात्र माहीत होणार नाहीं ४ तत्वमसि या महावाक्याचा थोर उपदेश. ५ अत्यानंद, ब्रह्मानंद

भावाभावा शांती झाली श्रीगुरू आप्त केला ।
चिद्धन घनें[2] निजमेघ साजणी ! गुरूकृपें वळला ॥
टीप ॥ क्षणभंगुर जगडंबर माया निरसली आधी[3] । गलितभेद० ॥ १
गुरुवरपदरज वंदितांचि शिरिं कुबुद्धिमुख फिरलें ।
सद्बुद्धि सखि शांति सुलिनता गृहांत हे शिरले ॥
चिद्धन घनसुखसार त्यजुनि आसार मनें वरिलें ।
कोटिरविलज्जीत स्वरूप तें हृदयभुवनीं भरलें ॥
गुप्त गंगेचा थाट सभर घनदाट उगमिं शिरलें ।
उगमरूप मग मीच पाहतां कांहिं नसे उरलें ॥
टीप ॥ चंचळजळ नदी सर्व आटली निश्चयात्मबुद्धी । गलितभेद० ॥ २
अनादिची निजवस्तु गुरूनें दाखविली नयनीं ।
पाहतांचि मन तन्मय समरस वृत्ति मिळे शून्यीं[4] ॥
शून्य विसरलें निखिल ऊरला प्रकाश चिद्गगनीं ।
अनुभव हा जिव शीव आटला व्योमशशीतरणी ॥
देवनाथ तो नाथ तोचि तो एक जनीं विजनीं ।
साक्षिरूप घ्या लक्ष लाउनी अनुभव घ्या कोणी ॥
टीप ॥ दया गुरूची समाधि साची वरिली निरुपाधी । गलितभेद० ॥ ३

पद (२९७)

दाता धन्य गुरू हो धन्य गुरू । जो भवसागरिं तारूं ॥ ध्रुवपद. ॥
जो कीं ईक्षणमात्रें । स्वरुपीं रमवी सत्तासूत्रें ॥ दाता० ॥ १
मस्तकिं दे अभयकर । ब्रह्मचि दाखवि विश्व चराचर ॥ दाता० ॥
तोडुनियां आपदांतें । दे जो निजसुख स्वात्मपदातें ॥ दाता० ॥ ३
श्रीगोविंद दयाघन । देवनाथ ब्रह्मचि निजनवनें[5] ॥ दाता० ॥ ४

---

१. प्रत्यक्ष ज्ञानाची प्राप्ति झाल्यामुळे श्रद्धा व अश्रद्धा या दोन्ही आपोआप मावळल्या. ज्ञानानें अश्रद्धा नाहींशी होतेच, व श्रद्धेवर विसंबून रहाण्याचें कारण उरत नाहीं २. सांद्र, सजल, केवळ शुष्क नव्हे असा. ३ मायारूपी आधी–पीडा निरसली नाहींशी झाली. माझ्या सर्व वृत्तींचा लय होऊन मी निश्वाशीं एकरूपता पावलें. ५ नवन = स्तुति, कीर्ति, प्रशंसा, निज म्हणजे अत्यंत, अतिशय ज्याचें नवन स्तुति, कीर्ति, प्रशंसा तो निजनवन असा येथें अर्थ घ्यावयाचा काय ? किंवा येथें दुसरा एखादा पाठ असावा ?

## पद ( २९८ )

धन्य धन्य धन्य श्रीगुरुराणा । माझें मज चोजेविलें निजनयना ॥
उघडी केली आत्मत्वें अनुभव दिठी । दृष्टि माजि हरपली सकळ ही सृष्टी ।
सचित्स्वरुपीं समरसें पडली मिठी । बोलें विसरे द्वैताचि सर्वही गोष्टी ॥ १
विश्वाकारें कोंदलें सभराभर । आदि मध्य अंत ना निरंतर ।
गौप्य प्रगट नाहीं जें परात्पर । सेवियलें साचें निजसार ॥ धन्य० ॥ २
संचलेंसे रंगातीत जें निजरग । आद्य जें कां अक्षय पूर्ण अभंग ॥
पावलें निजभाग्यें या सत्संग । मिळतां मिळणी द्वैताचा झाला भंग ॥ ३
कृपा केली गोविंद श्रीगुरुराय । समाधि स्वसुखें अतरीं घालिं माय ॥
अनुभव वार्ता वाचेसि बोलूं काय । देवनाथा लाधला निजसुखठाय॥धन्य०॥

## पद ( २९९ )

गुरुरायाचा हस्त धरुनियां परभुवना गेलों ।
देहिंच असता विदेहस्थितिनें जिताचि मी मेलों ॥ ध्रु० ॥
प्रपच आजवरी सत्य मानिला रतलों मी तेथें ।
दाराधनसुत मंदिर माझ्या संपादुनि अर्थ ।
अनुतापाचा उदय पावलों तंव अवघें व्यर्थ ।
जाणुनि मग मी शीघ्र निघालों धरिला गुरुपथ ॥

---

१ चोजविलें–माझे दृष्टीला नवल दाखविलें चोज--कौतुक २ मिळत मिळणी द्वैताचा झाला भंग–

त्वयि त इमे ततो विविध नाम गुणैः परमे
सरित इवार्णवे मधुनि लिल्युरशेषरसाः ॥

–वेदस्तुति, श्रीमद्भागवत, स्कध १०, अ० ८७, श्लोक ३१.

**अर्थः**—ज्याप्रमाणें गगा, यमुना इत्यादिक नद्या समुद्रात मिळाल्या म्हणजे यांचे नामरूपाचा लय होतो म्हणजे समुद्राचे पाण्यांत हें गगेचें पाणी किंवा हें यमुनेचें पाणी असें जसें सागतां येत नाहीं, किंवा भ्रमरांनीं नाना प्रकारच्या पुष्पांचा रस एकत्र करून मधु–मध तयार केल्यावर त्यांपैकीं हा रस बोरीचे फुलांचा, हा रस गुलाबाचे फुलांचा वगैरे जसें सांगतां येत नाहीं त्याप्रमाणें नानानाम, नानारूप, नानागुण धारण करणारे सपष्ट पदार्थ, हे भगवता तुमचे स्वरूपामध्यें तद्रूप होऊन लीन होतात. म्हणजे देवनाथमहाराजाचे भाषेंत बोलायचे म्हणजे भगवत्स्वरूपांत मिळणी झाली म्हणजे द्वैत खुंटतें.

चाल ॥ गुरुकृपावरदान मला फळलें ।
निजगुज माझें मजला तंव कळलें ।
[1]भवभान पूर्वींचें तें समुळीं गळलें ।
मी माझें मर्वहि स्मरण तें हरलें ।
टीप ॥ आनंदामृत प्राशन करुनी अभ्यतरिं धालों ॥ देहिंच० ॥ १

गुरुरायाचा विचार कथितों तरलों ज्यायोगें ।
जागृति स्वप्न सुषुप्ति उलंघुनि प्रवेशलों वेगें ।
दृष्टि देउनि कवतुकाला विलोकिलें त्यागें ।
[2]तुर्या देवी त्रिपुरसुंदरी तिच्या संयोगें ॥
चाल ॥ तिच्यापरिस सुंदर नार तिच्या वरती ।
उन्मनि विख्यात प्रबळ युवती ।
अविकल्प समाधी अशा श्रुति म्हणती ।
ते ठायीं गेल्यावर येणें ना पुढती ।
टीप ॥ योगी जाउनि रमती तेथें तन्मय मी झालों ॥ देहिंच० ॥ २

देतों घेतों येतों जातों पहातों निजकुंडिला ।
[3]पंच विषयीं यांचा आश्रय म्यां धरिला ।
[4]परंतु माझे सत्तेवांचुनि न चले जड गोळा ।
मी ऐसा साक्षात् सर्वात्मक गुणवर्जित भोळा ॥
चाल ॥ बोलतां मौन भगेना ............ ॥

---

१ भवभान– संसारज्ञान  २ तुर्यादेवी–जागृत, स्वप्न, सुषुप्ति व तुर्या या चार अवस्था आहेत त्यांपैकीं चौथी अवस्था हीच कोणी एक देवी ३ पंच विषय–शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध हे पांच विषय होत. ४ परतु माझे सत्तेवांचुनि न चले जडगोळाः—श्रीमद्भागवतांत तृतीय स्कंधांत २६ व्या अध्यायांत वर्णन आहे कीं, विराट्पुरुष उत्पन्न झाला तेव्हां त्याला सर्व अवयव फुटले व त्या त्या अवयवांच्या देवता आपआपल्या शक्तीसह त्याचे अवयवांत प्रवेश करित्या झाल्या. परतु विराट्पुरुष उठेना. परतु जेव्हां आत्मा त्याचे हृदयांत प्रविष्ट झाला तेव्हां विराट्पुरुष उठून उभा राहिला चित्तेन हृदयं चैत्यः क्षेत्रज्ञः प्राविशद्यदा । विराट् तदैव पुरुषः सलिलादुदतिष्ठत ॥ ७ ॥ याच कल्पनेला आधारभूत घेऊन हे चरण कवीनें रचिलें आहे.

जास्वंदावरि स्फटिकाचा माणि जैसा ।
ऐकुनि न आयके अनुभव हा ऐसा ।
जाणुनि कांहिंच नेण मी सहसा ।
दीप ॥ हें माझें मी वर्म जाणुनी परम सुखी झालों ॥ देहिंच० ॥ ३
लिंगास्थिति जरी जीव म्हणों तरी उपाधि मज नाहीं ।
हिरण्यगर्भ स्थिति शिव पाहतां उपाधिला तोही ।
घटमठभंगें महा आकाशीं अभेद ज्या पाहीं ।
तैसा मीही पूर्ण पुरातन भेदत्रय नाहीं ॥
चाल ॥ मी केवळ गुरुप्रसादें आत्माराम ।
महावाक्यार्थप्रत्ययें निष्काम ।
उन्मनि घांट उलघुनि निजसुखधाम ।
चरमाख्य अवस्था पूर्ण माझा ग्राम ॥
दीप ॥ देवनाथ हें नाम विसरुनी तत्स्वरुपीं भरलों ॥ देहिंच० ॥ ४

---

१ जास्वंदावरी स्फटिकाचा माणि जैसा:—'पंच कोशादि योगेन तत्तन्मय इवस्थितः। शुद्धात्मा नीलवस्त्रादि योगेन स्फटिको यथा ।-' शंकराचार्य—आत्म-बोध-श्लोक, १४—अर्थः-पंचकोशांचे सहवासानें आत्मा तत्तद्रूप भासतो—जसा स्फटिकमणि स्वतः स्वच्छ असतांही नीलादि रंगांचे वस्त्राजवळ ठेविला असतां त्या त्या रंगाचा दिसतो. या चरणांत " नीलादि वस्त्र " सोडून जास्वंदाचे फुलाची कल्पना केली आहे. २ लिंगास्थिति—माझा आत्मा सूक्ष्म-देहांत आहे तरी उपाधिरहित आहे. उपाधित्रितयादन्यमात्मानमवधारयेत् ॥ शंकराचार्यकृत-आत्मबोध, श्लोक १३. ३ उपाधिला—उपाधिपूर्ण झाला, उपाधियुक्त झाला. ४ घटमठ भंगें—'यथाऽऽकाशो हृषीकेशो नानोपाधिगतो विभु । तद्भेदाद्भेदवद्भाति तन्नाशे सति केवलः ॥ '—आत्मबोध श्लो. ५. अर्थः-सर्वव्यापक परमात्मा नानाउपाधींचे योगानें भिन्नभिन्न दिसतो, परंतु उपाधींचा नाश झाला म्हणजे त्याचें केवल रूप प्रत्ययास येतें. उदाहरणार्थः—आकाश सर्व व्याप्त आहे, परंतु घट मठ इत्यादि उपाधींच्या योगानें घटाकाश, मठाकाश, जलाकाश वगैरे भिन्न रूपांनीं भासतें; परंतु घटाचा व मठाचा नाश झाला असतां केवळ स्वरूपानें प्रत्ययास येतें त्याप्रमाणें ५ भेदत्रयः-सजातीय, विजातीय व स्वगत अशा तीन भेदांनीं रहित. ६ महावाक्यार्थः—" तत्वमसि " " अहं ब्रह्मास्मि " इत्यादि सोऽहम् महावाक्यांचा अर्थ जो जीवब्रह्मैक्य तो.

## पद ( ३०० ).

गुरुनाथ निरंजन साचा । कृपा करिसि तूं दासाचा ॥ ध्रु० ॥
पावनब्रीद तुझें तव पायीं । गर्जति चारी साही ॥
अठरा जणांची मति राही । जाली तटस्थ ठायीं ।
अतिशय पामर मी तव काई । बोलूं आतां पाहीं ।
माझी विनती परिसा साचा ॥ कृपा० ॥ १
महामहापतित त्वां उद्धरिले । गणिका अजामीळ ।
गोरासांवत्यानाम्यांचोखामेळे । दामाजीचे वेळे ।
पोतें घेउनि महार बीदराचा ॥ कृपा० ॥ २
विश्वव्यापक गुरू देवनाथा । वंदितों चरण माथां ।
दुडदुड धांवत येईं रघुनाथा । लवकर करिं बा आस्था ।
बाळक रामराय देह पांचांचा ॥ कृपा० ॥ ३

## पद ( ३०१ ).

नाथदयाघन हो । कृपानिधि नाथ दयाघन हो ॥ ध्रु० ॥
तोडुनियां अहंममता भारी । दाखवितो पद हो ॥ १
निशिदिनिं त्याचा छंद धरी जो । मग त्या भवभय नाहीं हो ॥ २
काय मी थोरी सांगूं गुरुची । निजगुज आपुलें देई हो ॥ ३
देवनाथप्रभु नाथनिरंजन । बाळक ठेवा पदीं हो ॥ ४

## पद ( ३०२ ).

चालग सखयें जाऊं पाहूं या श्रीगुरुगोविंदा ॥ ध्रु० ॥
पुसूं कल्पनेचें मूळ । शोधूं आपुलें उत्तम कुळ ।
जेणें सुख होय विपूळ । सारूं सकलहि गृहधंदा ॥ १
ज्या श्रुती शिणल्या गुण गातां । दादुगी त्रिभुवनीं ज्याची सत्ता ॥
नांदे उन्मनिच्या माथां । आकळूं ब्रह्मानंदा ॥ २
ज्यातें नाहीं दिवसरजनी । व्यापक जनीं आणि विजनीं ।
वृत्ती रमवूं त्या भजनीं । त्यागुनि वादा प्रतिवादा ॥ ३

---

१ हें पद देवनाथांचें नव्हे. रामरायकालींचें असावेंसें वाटतें. नाथांच्या मठसंग्रहांतून आलें, सबब आम्ही दिलें, २ श्रेष्ठ, समर्थ.

अग या अंतरवृंदावनीं । नांदे आत्मास्वरूपाणी ।
ज्यातें योगी चिंतिती ध्यानीं । त्यागुनी भेदाअभेदा ॥ ४
देवनाथप्रभु श्रीनाथ । ज्याची वेदा न कळे मात ।
× × × × × × ॥ ५

## पद ( ३०३ ).

चालगे सखये आतां पाहूं या श्रीगुरुनाथा ॥ ध्रु० ॥
दृष्टी दिसतें जें जें अमूप । तें तें भासे त्याच स्वरूप ।
होउनि राहूं कीं तद्रूप । न धरूं आणिका पंथा ॥ १
शोधूं साधनाच्या वाटा । त्यागूं अंश निघे जो खोटा ॥
निजात्मस्वरूपीं करूं पैठा । न धरूं आणिका पंथा ॥ २
नाहीं पृथ्वी आपतेज । नाहीं वायू गगण ओज ।
शून्यापरता तो महाराज । न धरूं आणिका पंथा ॥ ३
नाहीं रूपगुणनाम । सहजें अरूप तो आराम ॥
घेऊं त्या स्वरूपीं विश्राम । न धरूं आणिका पंथा ॥ ४
तो गोविंद श्रीगुरुदाता । त्याविण ठावचि नाहीं रिता ।
छंद त्याचा देवनाथा । न धरूं आणिका पंथा ॥ ५

## पद ( ३०४ ).

ये बा गुरुराया गुरुराया । सांडुं नको मम माया ॥ ध्रु० ॥
लोचनीं दाखवीं पायां । दासा जाऊं नेदीं वायां ॥ १
आवडी हे गुण गाया । अखंड नांदे माझ्या हृदया ॥ २
धांवुनि ये लवलाह्यां । उभये उभारूनीयां बाह्या ॥ ३
देवनाथप्रभुपाया । भजनप्रेमदान दे या ॥ ४

---

१ शिरकाव, दरवाजा, मार्ग (हा उर्दू हिंदुस्थानी शब्द आहे) उ० “ उपजोनि करटा नेणे अद्वैतवाटा । रामकृष्णीं पैठा कैसा होय. ” साधनाच्या वाटा शोधावयास लागूं आणि आत्मस्वरूपीं शिरकाव करू, आत्मज्ञानप्राप्तीच्याच वाटेला लागूं दुसरी वाट पहाणार नाहीं. २ ब्रह्मसाधन. अरूप, अलेख, निर्गुण, निराकार असें अनेक नकारात्मक शेष राहतें तें शून्य अथवा ब्रह्म. त्या ब्रह्मचिंतनाच्याखेरीज आह्मी दुसरी कोणतीही गोष्ट करणार नाहीं

## पद ( ३०५ )

सखे ! मज भेटवीं दयाळ नाथसोयरा गे ॥ ध्रुवपद ॥
विरहें मम प्राण जाय । काय करूं सांग माय ? ।
उपाय न सुचे कांहीं जिव घाबरा गे ! ॥ सखे० ॥ १
युगसमान जाय रात्र । नावडेचि वस्तुमात्र ।
पडत देह धरणीं कोणी सांवरा गे ! ॥ सखे० ॥ २
देवनाथ प्रभु सदये । कठिण काय म्हणुनि हृदय ।
निष्ठुरता धरिली काय, अंतरंगें ॥ सखे० ॥ ३

## पद ( ३०६ ).

नाथ सखा सुखदानी । मला भेटवा कोणी ॥ ध्रुवपद ॥
दुःखित बहु मी या संसारीं । नावडती नगलेणीं ॥ मला० ॥ १
निजरूप याचें पाहीन लोचनीं । गाईन मी गुणगाणीं ॥ मला० ॥ २
देवनाथप्रभु नाथनिरंजन । त्याविण कोण निदानीं ॥ मला० ॥ ३

## पद ( ३०७ )

मन ! भज भज रे ! अतां । धनि दयाळ गुरु दाता ॥ ध्रुवपद ॥
उदरानिमित्तें फिरशी वनवन । वाहसि कां चिंता ॥ धनि० ॥ १
नउ महिने जननीचे उदरीं । पाळसि निजसत्ता ॥ धनि० ॥ २
पालनार्थची रक्तमांस पैं । उत्पत्ती करतां ॥ धनि० ॥ ३
देवनाथप्रभु नाथ निरंजन । तारिसि निजभक्तां ॥ धनि० ॥ ४

## पद ( ३०८ ).

या गे ! या गे ! गुरुपायिं रता बाई ! ।
भ्रमें भुलल्या संसारसार नाहीं नाहीं ॥ ध्रुवपद ॥
वृथा कन्यासुतगेहधनआशा ।
मायाजाळीं गुंतोनि मोहपाशा ।
बुडविलें स्वहितासि केलें नाशा ।
पुढें होती या गती बदा कैशा कैशा ॥ या गे० ॥ १
शरण व्हावें सद्गुरूदेवदेवा ।
पदीं ठेवोनी शुद्ध निजभावा ।

निर्विकल्पें मनमयूर दान द्यावा ।
सोंधा अपुला निजआत्म निजठेवा ठेवा ॥ या गे० ॥ २
धन्य धन्य गोविंद गुरुराणा ।
नयनद्वारें सांठवा हृदयभुवना ।
जन्ममरणाचा ठाव नुरे जाणा ।
देवनाथाची विनति मना आणा आणा ॥ या गे० ॥ ३

## पद ( २०९ ).

श्रीगुरुदयाळ भेटेल दुःख आटेल । काय होइल ऐसें ? ॥ ध्रुवपद ॥
संसार मृगजळ वाटेल, चित्त विटेल, ।
दास्य मायामोह फिटेल, संशय तुटेल ॥ काय० ॥ १
अहंकार सर्वही गळेल, मन हें वळेल, ।
देहीं देव आत्मा कळेल, भाग्य फळेल ॥ काय० ॥ २
गुरुकृपाअंजन घेईन, नयनीं लेईन, ।
ब्रह्मरूप जग पाहीन, स्वसुखें धाईन. ॥ काय० ॥ ३
ऐशा विरहें वृत्ति विराहिणी, वदे साजणी, ।
देवनाथ वदे निजवाणी, ' भाव धरीं मनीं ॥ काय० ॥ ४

## पद ( २१० )

नाथा ! जडलें रे ! गोविंदा ? । तुझिया पदारविंदा ॥ ध्रु० ॥
हीन दीन मी मंदमती । परि लज्जा तुझिये हातीं ॥ नाथा० ॥ १
बहु मी अन्यायी, अन्यायी । परि क्षमावंत तूं आई॥नाथा०॥ २

---

१ आपलें चित्त संकल्पविकल्परहित करून गुरुचरणीं अनन्यभावानें लीन करावें. मुरलीच्या पदांतून " जाहला हा पूर्ण चित्तमयूर पिसा रे " असा चित्तमयूर शब्द आला आहे. मनगजेंद्र, मनव्याघ्र वगैरे जीं मनाचीं उपमानें आहेत त्याचप्रमाणें येथें मनाची मयूराशीं उपमा केलेली आहे. मयूर नेहमीं आत्मलुब्ध असतो, आपल्या पिसाऱ्याच्या प्रतिष्ठेत गुंतला म्हणजे त्याला दुसरें कांहींच दिसत नाहीं. तसेंच मनाचें झालें, याकरितां मन निरभिमान करून त्याला गुरुचरणीं लावावें.

अज्ञानि पाहासि कां निर्वाण । कंठीं उरला प्राण ॥ नाथा० ॥ ३
देवनाथाच्या प्रभु धन्या । ये धांव त्वरें धांवण्या ॥ नाथा० ॥ ४

---

१ ये धांव त्वरें धांवण्याः–धांवणें येणें म्हणजे चोरांपेंढारांची हाकाटी झाली असतां हांकआरोळी ऐकल्याबरोबर जे आजूबाजूचे लोक धांवून येतात, त्या साहाय्यसमुदायाला ' धांवणें येणें ' 'धांवणे आलें' असे म्हणतात. " जेणें विश्व पाजिलें दुर्धर । तोचि **करू धांवे** उतार । आपणची पाठविले तस्कर । **धांवणें काढिलें** आपणचीं "–हरिविजय. अ १४ ओंवी १६२.

तुकाराममहाराजांच्या अभंगांत धांवणें करणें असें वाक्य आहे.

शरण आले त्यासी न दावीं हे पाठी । ऐका जगजेठी विज्ञापना ॥ १ ॥
काळविनी तयांसी उत्तर झडकरी । यावें परिसा हरी विज्ञापना ॥ २ ॥
गांजिलियाचें **करावें धांवणें** । विनती नारायणें परिसावी हे ॥ ३ ॥

× × × × × × ×

तुका म्हणे आम्हां विसरावें ना देवा । परिसावी केशवा विज्ञापना ॥ ६ ॥

'दीनआर्त जो असेल त्यानें **धांवा** करावा ह्मणजे परमेश्वर **धांवणें** करून येतो ' या वाक्यावरून धांवा आणि धावणें या दोन शब्दांतील फरक लक्षांत येईल " तुका ऐक्यासि आला जाण । तरी माझा **धांवा** करील कोण । मग मी कोणाचें करूं **धांवणें** । वर्णील कोण गुण माझे ॥ १६० ॥ ऐसें जाणोनि दीनदयाळ । तुकयासि ह्मणे तये वेळ । न कीर्तनिं नाचतोसि जे वेळ । तेथें मी मननाळ तळतळ " महापात–भक्तलीलामृत अ. ३१ ओं. १६०–१. ' धांवणें करणें ' असाच प्रयोग मुक्तेश्वरांत आहे मुक्तेश्वर–रामायण–युद्धकांड पहा " म्हणे सैन्यकां, देखतां काय वेगीं । कपीं मांडिली थोर लंकेसि आगी ॥ गडा-रोंवतां बुजिला ओघ भेतीं । करा **धांवणें** माजवा युद्धख्याती " श्लोक ८९. धांवण्यास धांवणें=धांवा केलेला ऐकून मदत करावयाला धांवणें ' धायरा रघुनाथगजेंद्र । जाचीत ते शतमुखनक । ते काळीं सीताश्रीधर । भक्त **धावण्या धाविन्नला** " मुक्तेश्वरकृत शतमुखरावणवधाख्यान, ओंवी ८९. दुसरें उदाहरण " तूंचि गे माझी कुलस्वामिनी । मानसतुळजापूरवासिनी । कौरव महिषासुरमर्दिनी । धांवें धांवें धावाणिया " मुक्तेश्वर – महाभारत–सभापर्व–१५–१३२. संकटग्रस्तांनी जें बोलावणें करावयाचें त्याला ' धांवा करणें ' म्हणतात, आणि मदतीला धांवून येणें म्हणजे 'धावणें करणें' असें वर दिलेल्या तुकारामांच्या अभंगावरून स्पष्ट दिसतें, पण दयाळनाथांच्या एका पदांत 'धांवा करणें ' याच्याऐवजीं 'धांवणें करणें' असा शब्दप्रयोग आढळतो " बहु पापी त्वां तारिले । वेदशास्त्र मुखें ऐकिलें । म्हणुनी म्यां केलें

( पुढील पृष्ठ पहा. )

## पद ( ३११ )

पतितपावन अभिधान । श्रुति गाताति महिमान ।
कीर्ति ऐकुनियां[1] कान । तल्लीन झाले श्रवणार्थी ॥ १
रसना सेवी नामरसा । चित्तीं स्वरुपाचा ठसा ।
आत्मारामा श्रीनिवासा । हृदयीं धरिलें बळकट ॥ २
बळकट हृदयीं धरिलें जाण । पायीं अर्पी एक प्राण ।
संशयसहीत साभिमान । भेदाभेदू गळाला ॥ ३
श्रीगुरुगोविंदाचे पाय । हृदयीं धरितां मन हें धाय ।
अवघे गणगोत बापमाय । श्रीगुरुनाथ आमुचा ॥ ४
तापीतीरीं[2] मोक्षदानी । देवनाथाचा तो धनी ।
पाहतां अद्भुत त्रिभुवनीं । सत्ता ज्याची अवीट[3] ॥ ५

## पद ( ३१२ ).

पाहुनि निरुपम अरूप गुरु रे ! रूप तुझें लोचनीं ।
मिसळलों लवण जसें जीवनीं ॥ ध्रुवपद ॥
वेदांतवेदपार जें ! जया श्रुतिकर वाजपी[4]।
न्यायसांख्यादिशास्त्रवादपी ॥

---

( ५१८ पृष्ठावरून समाप्त. )

**धांवणें** ॥ मिठी दिधली लुडिया पायां " ॥ दयेंळनाथ [धांवणें यासारखेच धांवण, धांवणी हेही शब्द आहेत. 'धांवा करणें' याला समानार्थक ' धांवा मारणें=आक्रोश करून दुसऱ्याला मदतीला बोलावणें " असें मोल्स्वर्थमध्ये आढळलें. धांवण्यास पोंहोचणें, पावणें,= मदतीला जाऊन पोंचणें, धांवा मारणें= हांक मारून मदतीला बोलावणे. धांवण लागली,-धांवण सुटली= मदतीला जाणारी मंडळी निघाली

१ ऐकण्याला उत्सुक २ श्रीगुरुगोविंदनाथांची समाधि व मठ बऱ्हाणपूर शहरीं तापी नदीच्या कांठीं आहे धाय=धाये=संतोष पावे. ३ कधीं न विटणारी, कधीं न पडणारी. ४ वेदांत आणि वेदचतुष्टय यांच्याही पार जें ब्रह्मस्वरूप तें. वाजपी-वाजपेय यज्ञ करणारे. ' जया श्रुति कर वाजपी ' म्हणजे काय ? वादपी-वादप्रतिवाद करणारे, वितंडवादी, न्यायसांख्यादिशास्त्रांच्या योगानें वादाचा धुमाकूळ घालणारे.

श्रौतस्मार्तसिद्धाग्निहोत्रि ते खटाटोप साक्षपी[1] ।
करित जे पर्णाशन वातपी[2] ॥
साधनक्रम विविध अनुष्ठानादि जपतपीं ।
शिणल्या प्राप्ति नव्हे कीमपी[3] ॥
चाल ॥ हें असाध्य अति दुर्गम ।
परि साध्य वदे नीगमँ । श्रीगुरुकृपें सुगम ॥
दीप ॥ निगममुखें हें वर्म सखया । ऐकुनीयां श्रवणीं ।
प्रीतिनें देशिक केला धनी ॥ पाहुनि० ॥ २
धन्य धन्य देशिकगुरु कृपाघन वर्षिले ।
अभयकर वरद मौळिं स्पर्शिले ॥
' तत्त्वमसी सोऽहं ' महावाक्या उपदेशिलें ।
नवल निज नवलेंविणें दाविलें ॥

१ साक्षपी–आग्रही, साक्षेपी, आक्षेप ( हट्ट, आग्रह ) असणारे, हट्टवादी. २ वातपी–वाताशन करणारे; " विश्वामित्रपराशरादि मुनयो वातांबुपर्णाशनाः " ३ अशा प्रकारें जरी परोपरीनें शिणले तरी त्यांना स्वरूपप्राप्ति झाली नाहीं. ४ हें जरी असाध्य व दुर्गम, तरी साध्य असें वेद म्हणतात वेद सांगतात कीं, हें गुरुकृपेनें सुगम; आणि त्यांच्या मुखें हें वर्म ऐकून मी प्रीतीनें देशिक ( दिशा दाखविणारा, मार्गदर्शक ) सद्गुरु याला धनी केला त्यांच्या चरणीं लीन झालों. ५ अतिनवलाचा नवाईचा आत्मबोध मला केला, पण तो नवलेंविण दाविला (इतका सुगम केला कीं, मला त्याच्यांत नवीनपणा अथवा दुर्गमपणा कांहींच न राहून त्याची पूर्ण प्रचीति आली). नवलाई कांहींच ठेवली नाहीं. साक्षिणीः–म्हणजे ज्या अवस्थेंत जीव साक्षीरूपानें असतो ती तुर्यावस्था. सखी हें विशेषण देण्याचें कारण ही अवस्था इष्ट आहे म्हणून दिलें आहे.

कैवल्य पांचवा देहः–पांच देहांचें वर्णन कोठें आढळत नाहीं. चार देहातीत स्वरूप प्राप्त झालें असें दर्शविण्याकरितां पांचवे देहाची कवीनें कल्पना केली असावी

या दुसऱ्या कडव्याचा सारांश असा आहे कीं––गुरुजींनीं मजवर मेघाप्रमाणें कृपेची वृष्टि केली व त्यांनीं आपला वरद हस्त माझे मस्तकावर ठेविला, " तत्त्वमसि " म्हणजे तें ब्रह्म तू आहेस व ' सोहं ' म्हणजे मी ब्रह्म आहें, या महावाक्यांचा गुरूनीं मला उपदेश दिला व नंतर कधीं न अनुभविलेलें ब्रह्मस्वरूप त्यांनीं मला दाखविलें; तेव्हां स्थूळ, सूक्ष्म, कारण, महाकारण या चार देहांचा नाश होऊन मोहमदरूपी अंधःकार नाहींसा झाला, व सूर्याप्रमाणें तेजस्वी ब्रह्माचा उदय झाला, तेव्हां तुर्यावस्थेचा मीं अनुभव घेतला व मी उन्मनी अवस्थेला पोंचलों व कैवल्यरूप पांचवे देहाचा अनुभव घेऊन ब्रह्मस्वरूपीं लीन झालों.

स्थूल सूक्ष्म कारण महाकारणासि निरसिलें ।
मोहमदातिमिर विध्वंसिलें ॥
चाल ॥ जाहालि तमा आटणी ।
चिद्गगनें उदय दिनमणी । भोगिली सर्वी साक्षिणी ॥
टीप ॥ कैवल्य पांचवा देह उन्मनी घाट स्वयें लंघुनि ।
पावलें निजात्मनिजभूवनीं ॥ पाहुनि० ॥ २
अविट अमळ अनुपम्य अतिभव्य तेज फांकलें ।
कोटी रवींत तेज झांकलें ॥
आब्रह्मस्तंबादी निबिड, जगद्रूपीं थोकलें[1] ।
अनेकीं व्यापक तें देखिलें ॥
अनाम अद्वय अपरंपार ब्रह्म स्वयें पीकलें[2] ।

---

१ थोकलें=वर्तमानकाळीं थोकणें=थांबणें, गति बंद करणें. "थोकले अजांचे भार" हा शब्द फक्त कवितेंतच आढळतो. आब्रह्मस्तंबादि—४५८ पानावरील तिसरी टीप व ३७० पदाखालची टीप पहा २ ब्रह्म स्वयें पिकलें=पिकलें म्हणजे ओतप्रोत झालें अपरंपार झालें. सर्व ब्रह्ममय दिसू लागलें. पिकलें हा शब्दप्रयोग पुराणकवींची अत्युज्ज्वल काव्यप्रतिभा सुचवितो इतर कवीनीं सुद्धां 'पिकलें'हा शब्द अशाच अर्थानें गोंवून आपल्या काव्याला शोभा आणिली आहे

पांडुरंग कवि द्रौपदीस्वयंवराख्यानाच्या पदांत म्हणतात—

पांडवभाग्यकळा । हे वर्णितां शेषही थकला ॥ ध्रु० ॥ त्रैलोक्याचा नाथ जयातें । भाव बळें विकला ॥ हे वर्णि० ॥ ब्रह्मादीं न समाय हरी तो । पार्थरथीं टिकला ॥ हे वर्णि० ॥ मुख्य हरि जया वश्य तयातें । सौख्यनिधी **पिकला** ॥ हे० ॥ तसेंच केशवस्वामींनीं आपल्या एका पदांत 'पिकला' शब्द वरील अर्थानेंच योजिला आहे. "हृदया निर्गुण मूर्ति आलि वो बाई ! ॥ ध्रु० ॥ नामरूपातीत आनंद **पिकला** । सहजीं सहज भेट झाली वो बाई॥हृदया०॥" (अ प सं. भा. १ पद ७६८) 'सर्वाभूतीं चोहोंकडे । अधर्माची खाणी उघडे । समूळ कुडें कर्माचरण ॥१०३॥ तेणें पापाचार **पिके** । गगनचुंबित झालीं टेकें' (एकनाथी भा. अ० ५–१०४). केशवस्वामी आणखी एका पदांत म्हणतात—" बाळकृष्ण खेळतां निजअंगणीं । यशोदे नंदासी तेणें आनंद मनीं ॥ गोपी गोपाळ पहातां निवती लोचनीं । परमानंद **पिकला** ह्या त्रिभुवनीं "

श्रीधरस्वामीकृत हरिविजय अ० २३ " संसारगजदमन मृगेंद्र ॥ भक्तमन चकोरसुधाकर ॥ दुःखपर्वतभंजन वज्रधर ॥ कीं आनंदक्षेत्र **पीकलें** " ही तिसरी ओंवी पहा.

वर्णितां निगमशब्द मूकले[1]॥
चाल ॥ पाहतांचि निजरूप असें ।
तद्रूपीं स्वमन समरसे । श्रीगुरुकृपें वोरसे[2]॥
टीप ॥ देवनाथिं लाधलें स्वसुख उदय स्वात्मकिरणीं ।
ब्रह्मरूप उघड दिठीं जनीं वनीं ॥ पाहुनि० ॥ ३

पद (२१२)

विमल निजरूप, रूप गुरुरायाचें । घे अनुभवीं भाग्य त्याचें ॥ ध्रु० ॥
परब्रह्म तें, ब्रह्म तें स्वात्मभुवनीं । स्वयं चित्प्रकाश निजकिरणीं ॥
सभर दाटलें, दाटलें पूर्ण भरुनी । उघड चैतन्य जनीं विजनीं ॥
रंगरूपरहित, रहित निजवर्णीं । अविट चित्प्रभा कोण वर्णी ॥
टीप ॥ सज्जना! प्रचुरतर असे । सज्जना ! सकळिं जें वसे, ।
सज्जना ! वसुनि ना दिसे ना दिसे रूप ज्याचें ॥ घे अनु० ॥ १
पाठी पोट ना, पोट ना ज्यास कांहीं । निबिड निघोट सर्वदाही ॥
सकळ जें वसे, वसे अंतरबाहीं । व्यापुनी नुरे[3] दिशा दाही ॥
जया वर्णितां, वर्णितां चारी[4] साही[5]। श्रुति स्मृति न चले अठराही[6]॥
टीप ॥ सज्जना ! शब्द खुंटले । सज्जना! स्तब्ध घोटले[7] ।
सज्जना! स्वरुपीं आटलें । आटलें सुख तेथीचें ॥ घे अनु० ॥ २
स्वरुप पाहतां पाहतां नयनबेटीं[8] । पाहणें[9] हारपे तया पोटीं ॥
तेज अद्भुत ! अद्भुत दीप्ति मोठी, । तेज लोपलें रवी कोटी ॥
देह ध्याता, ध्येय हे ध्यानत्रिपुटी । नुरेचि हें विश्वथाटीं[10]॥

---

१ मुकले.–मुकावले, मुके झाले, स्तब्ध झाले. २ 'वोरसे' असा शब्द असावासें वाटतें. वोरसे = पान्हावे, प्रीती पूर्ण होई ३ नुरे–'उरे' असा पाठ असल्यास अर्थाला ठीक जुळतें. दशदिशा व्यापून उरतें हाच अर्थ पुरुषसूक्ताशीं व ब्रह्मस्वरूपाचे इतर ग्रंथांतील वर्णनाशीं जुळतो. ४ चारी–चार. ५ साही सहा शास्त्रें:– १ सांख्य, २ योग, ३ न्याय, ४ वैशेषिक, ५ मीमांसा, ६ वेदांत, ६ अठराही–अठरा पुराणें ७ घोटलें–स्थिर झाले. ८ नयनबेटीं = डोळ्याच्या आंतील पुतळी, स्वरूपप्रतिबिंब. ९ पाहणें हारपे तया पोटीं–त्या स्वरूपांत लीन झालीं असतां पाहण्याचें कांहीं रहात नाहीं. १० विश्वथाटीं–विश्वाच्या रचनेंत, विश्वाच्या पसाऱ्यांत.

॰प ॥ सज्जना भरोनि उरलें । सज्जना निगमीं वर्णिलें ॥
सज्जना विमल अर्चिलें । अर्चिलें अनिर्वाचें[1] ॥ घे अनु० ॥ ३
धन्य गुरुदयाळ, दयाळ जगजेठी[2]। आजि पाहतां कृपादृष्टि ॥
सहज उघडिली, उघडिली स्वात्मपेटी । वरी समरसें पडे मीठी ॥
ब्रह्मस्वरूप तें स्वरूप तें सकळ सृष्टी । देवनाथा गुरु हतवटी[3]॥
॰प॥ सज्जना ! द्वैत तें झडे । सज्जना ! प्रगट ऊघडे ॥
सज्जना ! पडळ तें उडे । उडे, संशयाचें ॥ घे अनु० ॥ ४

## पद ( २१४ ).

आज दिवस हा सोनियाचा झाला ।
स्वामी माझा हृदयभुवनीं आला ॥ ध्रुवपद. ॥
अकल्पित[4] निजतां जागी झालें ।
नवल नेत्रीं म्यां चोज[5] देखियेलें ।
अद्भुत तेजें ब्रह्मांड धवळलें[6] ।
पूर्णानंद निजज्योती प्रकाशलें ॥ आज० ॥ १ ॥
ज्योतिर्मय भासलें त्रिभुवन ।
भासाभास आटलें पडे शून्य ।
समरस रेतें तन्मय झालें मन ।
ब्रह्मरूप हें अवघें जन विजनें[7] ॥ आज० ॥ २ ॥
पाहतां पाहण्याचा ठाव उरला नाहीं[8] ।
कोंदाटलें निजरूप निजठायीं ।
अंतर्बाह्यव्यापक दिशा दाही ।
बोलों जातां मज बोलवेना कांहीं ॥ आज० ॥ ३ ॥

---

१ अनिर्वाचें–अनिर्वाच्य; वाचेला अतीत. भरोनी उरलें, निगमांनीं वेदांनीं वर्णिलेलें, विमल-पूर्ण-शुद्ध-अनिर्वाच्य ( वाचेपरतें, 'यतो वाचा निवर्तंते तद्ब्रह्म परम' ) असें परब्रह्म अर्चिलें-पूजिलें २ जगजेठी–जग जिंकणारा, जगदेकवीर. ३ हतवटी–कौशल्य, चपळाई. ४ अकस्मात्. ५ कौतुक, नवलाई. ६ अति शुभ्र झालें; पूर्ण प्रकाशमान झालें. ७ विजन=अरण्य, निर्जन प्रदेश. जन=जनांनीं भरलेला प्रदेश. ८ तें रूप पाहतां मी इतका तन्मय झालों कीं मी पहाणारा आहें, कांहीं पाहिलें जात आहे, व पाहण्याची क्रिया चालली आहे याचें मला कांहींच भान राहिलें नाहीं

कृपा केली गुरुनाथें श्रीगोविंदें ।
प्रतिती येतां निरसलीं सर्व द्वंद्वें ।
गुणगण वाणी गातसे प्रेमछंदें ।
देवनाथ नाचतो ब्रह्मानंदें ॥ आज० ॥ ४

## पद (३१५).

कृपा होतां श्रीगुरूराजयाची । तृप्ति झाली अनुभवीं आज यांची[1] ॥ध्रु०॥
आत्मस्वरूपीं रमविलें गुरूरायें । कृपा केली हे मुखें वदों काय? ॥कृपा०॥ १
जेथें जेथें हे फिरे निजदृष्टी । ब्रह्मरूप हे चोजवित सृष्टी ॥ कृपा० ॥ २
केली उघडी हे आत्मरत्नपेटी । निजवृत्तीची वरी पडे मिठी ॥ कृपा० ॥ ३
सोहंशब्दें फुंकूनि कर्णद्वारीं । दावि नयनीं हे ब्रह्म चराचरीं ॥ कृपा० ॥ ४
धन्य धन्य गोविंद गुरू दाता । कृपें दिधला स्वानंद देवनाथा ॥कृपा०॥ ५

## पद (३१६).

गुरुनाथजीचें स्वरूप । निजनयनिं दाटलें जी ॥
घालितां मुळीं दिठी निजसार भेटलें जी ।
संशय भंगला हा बंधन तुटलें जी ।
टीप ॥ आभास व्यर्थ झाला । मृगतोय आटलें जी[2] ॥ गुरु० ॥ १
नश्वर सुखालागीं मानस विटलें जी ।
अज्ञान भ्रांतिजाळ हें पडळ फीटलें जी ।
माया अविद्येचें हें वसन फाटलें जी ।
टीप ॥ हृद्गगनीं आत्मरविचें निजतेज थाटलें जी ॥ २
विश्व हें ब्रह्म अवघें अनुभवें वाटलें जी ।
संचित क्रियमाण प्रारब्ध काटलें जी[3] ॥
समरसें चिदानंदीं हें चित्त लोटलें जी ।

---

१ या दासाची देवनाथाची. २ दुरून मृगजळाचें सरोवर भरल्यासारखें दिसतें पण जवळ गेलें म्हणजे कोरडें वाळवंट दिसतें, तसें गुरुकृपेनें ज्ञान होण्याच्या अगोदर संसार हा भरल्या सरोवरासारखा सुखकर वाटतो, पण ज्ञानानंतर तो असार आणि मिथ्या वाटावयाला लागतो, किंवा जगाच्या द्वैतस्वरूपाची कल्पना आटली जाऊन चोहोंकडे अद्वैतस्वरूप दिसावयाला लागलें. ३ " ज्ञानाग्निदग्धकर्माणं तमाहुः पंडितं बुधाः "—भगवद्गीता.

टीप ॥ जन्म हें मरण मिथ्या भय सर्व खुंटलें जी[1] ॥ ३
गोविंददातयाचें[2] मानस तुष्टलें जी ।
निजकृपादान देता सबाह्य वेष्टलें जी ।
तेणें भेद कल्पनेचें मृद्[3] भांड फुटलें जी ।
टीप ॥ निजसुख देवनाथा हृदयीं प्रगटलें जी ॥ ४

## पद (३१७)

आहो आहो गुरूराजया ।
क्षमा करीं अपराध क्षमानिधी ॥ ध्रुवपद. ॥
हीनदीन मतिमंद परि तव दास म्हणवि, निर्द्वंद्व,
करुनि निजपदारविंदीं स्थिर राखीं मम बुद्धी ॥ १
नामामृतरसपान करविं, भव हरविं, तुरविं रति,
भरविं स्वरूप हृदिं, सरविं मायउपाधी ॥ २
श्रीमद्गुरुवर परमसदयकर अभयवरदकर
पूर्ण निरंतर देहीं भोगवीं उघड समाधी ॥ ३
देवनाथ प्रभु सदानंद स्वानंदकंद गोविंद
कृपाळु भेदरहित आभेद कृपांबुधी ॥ ४

## पद (३१८).

सावध हो ऐकें निजमना, आत्मसाधना, लक्ष ठेवीं यावरी ।
गुरुगुंज[4] अंतरीं समजावें, हीत उमजावें, ब्रह्म तूंची निर्धारीं ॥ध्रु०॥
प्रथम वर्णाश्रमस्वधर्में[5], करुनी स्वकर्में, विधीनिषेधां[6] गाळीं ।
स्नानसंध्यादिक सत्कृत्य, नित्य नैमित्य, वेदाज्ञेसीं पाळीं ।

---

१ जन्मरणाचें भय नाहींसें झालें २ ज्यानें निजकृपादान दिलें असा श्रेष्ठ दाता गुरुगोविंदनाथ. ३ मातीचें भांडें ( मिथ्या नश्वर आभास. ) ४ गुरुगुंज–गुरूपासून प्राप्त होणारें अत्यंत गुह्य ज्ञान. ५ वर्णाश्रमस्वधर्में–ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र हे चार वर्ण यांचे वर्णानुसार वेगवेगळाले धर्म. ब्रह्मचारी, गृहस्थ, वानप्रस्थ, संन्यासी अशा चार आश्रमांचे पुन्हां वेगळाले धर्म. ६ विधिनिषेध–अमुक कर्तव्य केलेंच पाहिजे, असा जो आदेश तो विधि, व न करावें अशी जी अनुज्ञा तो निषेध.

पूर्वकर्म संचितक्रियमाण, त्यावरी घालून, स्वानुष्ठानादी बळी ।
पापपुण्यें थोर पर्वत, आधीं त्वरित, करीं तयाची होळी ।।सावध०।। १
इहामुत्रफळभोगाची, योगत्यागाची, व्हावी वीतरागवृत्ती ।
शमादिषट्काचें साधन, बाह्य रोधनें, इंद्रियांच्या व्यावृत्ती ।
अंतःकरण चारी समशुद्धी, करुनी संवृद्धी, सांसर्गी अप्रीती ।
गृहपुत्रदारादिधनकण, मानावें वमन, राम आठवीं चित्तीं ।।सावध०।। २
आपआपणासीं पाहतां, द्वैता अद्वैता, कांहीं नुरेची ठाव ।
स्वयंब्रह्म शुद्ध भावना, होतां कल्पना, जाय आटोनी सर्व ।
स्थावरजंगमीं पैं एक, दीसे व्यापक, अवघा श्रीगुरुराव ।
जनींवनीं पूर्ण दाटला, भास आटला, ब्रह्मानंदानुभव ।।सावध०।।
मुमुक्षुत्व ऐसें स्वीकारीं, त्यागीं वीकारीं, आत्मानात्मविचारें ।

---

१ पूर्वकर्म संचितक्रियमाण—जीवाचें कर्म तीन प्रकारचें, संचित, प्रारब्ध आणि क्रियमाण. अनादिकालापासून प्रस्तुत जन्म प्राप्त होईपर्यंत केलेलीं सर्व कर्में मिळून संचित होतें. प्रवासास निघते वेळी जसें कांहीं आपण सामग्री बरोबर घेतों, तसें सांप्रत जन्म घेते वेळीं त्या संचितापैकीं जो भाग बरोबर आणला त्याला प्रारब्ध म्हणतात. प्रस्तुत जन्मामध्यें जीवाच्या हातून जीं कर्में होतात त्याला क्रियमाण म्हणतात. २ पापपुण्य थोर पर्वत— "पापपुण्य थोर पडले पर्वत । राहीला अनंत पलीकडे" तुकाराम पुण्यानें स्वर्गप्राप्ति होते, आणि तेथें सुखोपभोग मिळतात, आणि 'क्षीणे पुण्ये मर्त्यलोकं विशन्ति' यामुळे क्षीण पुण्य झाल्यावर प्राणी पुन्हां या जन्ममरणाच्या फेऱ्यांत सांपडतो, सबब जसा पापपर्वत दूर केला पाहिजे तसाच मुमुक्षूनें पुण्यपर्वतही दूर केला पाहिजे. "हें कर्म केलिया पाहें । राज्य कीं स्वर्ग प्राप्त होय । राज्यांतीं नर्क आहे । ऐसें बोलताहे वेदांत ।। १०० ।। स्वर्गीं काय सांगू सुख । पुण्य सरलिया लोटती देख । मागुती पहावया मृत्युलोक । स्वर्गनर्क भोगाया" एकनाथांची आमदलहरी ३ इहामुत्रफळभोगाची—येथून पुढें साधनचतुष्टयाचा ( चार साधनांच्या समुदायांचा ) विचार आहे चार साधनें अशीं:—१ (१) नित्यानित्यवस्तुविवेक—अविनाशी वस्तु कोणती आणि विनाशी किंवा नाश पावणारी कोणती, या गोष्टींचा निर्णय ( २ ) इहामुत्रफलभोगविराग—इहलोकींच्या किंवा परलोकींच्या फळाच्या भोगाची इच्छा नसणें ( ३ ) शमादिषट्कसंपत्ति—शम, दम, उपरति, तितिक्षा, श्रद्धा आणि समाधान हीं प्राप्त करून घेणें ( ४ ) मुमुक्षुत्व—मला मोक्ष मिळावा ही इच्छा ४ बाह्यरोधन—इंद्रियांच्या वृत्ति बहिर्मुख असतात त्या अंतर्मुख करणें ५ आत्मानात्मविचार आणि नित्यानित्यविवेक, या दोहोंचा अर्थ एकच.

( पुढील पृष्ठ पहा. )

नित्याअनित्याचा विवेक, करुनी सम्यक, ब्रह्म जैसा चोखारे ।
प्रत्यय घेऊनी अंतरीं, मग त्यावरी, करीं अभ्यासु बा रे ।
आत्मप्रतीति सुखसमाधी, होता त्रिशुद्धी, भासे ब्रह्मची सारें ॥ ४
श्रीगुरुगोविंद दयाळू, पूर्ण कृपाळू, अनादीचा सोयरा ।
निर्विकल्प निजमनभावें, शुद्ध सद्भावें, शरण जातांची द्वारा ।
तुष्टला प्रभु माझा निर्धारीं, पूर्ण अंतरीं, दया आली दातारा ।
देवनाथा प्राप्ती निजखूण, देतां वरदान, चुकवी चौऱ्यायशीं फेरा ॥ ५

## पद ( ३१९ )

आहा कैसें केलें त्वां भाग्यमंदें ।
प्राप्तवस्तु हारविली भूतद्वंद्वें ॥ ध्रु० ॥
श्रौतीस्मार्ती यजिताति खटाटोपें ।
शिणती मुनी तापसी अनूतापें ।
ध्याति योगी लक्षांशें[३] अपुल्या मापें ।
गुरुकृपें लाधले मार्ग सोपे ॥ १ ॥

---

( पृष्ठ ५२६ वरून समाप्त. )

अतति म्ह० सातत्यानें वर्ततो अखंडित सर्वव्यापी असतो तो आत्मा, व तद्व्यतिरिक्त नाशिवंत विश्वाचें जडस्वरूप तो अनात्मा. दिग्भेदानें आत्मानात्मविचार आणि कालभेदानें नित्यानित्यविचार; बाकी दोहोंची विचार्यवस्तू परब्रह्म हीच.

१ नित्यानित्याचा विवेक, करुनी सम्यक="देह अनित्य आत्मा नित्य । हा विवेक नित्यानित्य...जड तितुकें अनित्य । आणि सूक्ष्म तितुकें नित्य । याहीमध्यें नित्यानित्य । पुढें निरोपिलें " दासबोध द १३ स. १-११ व्यावृत्ति = परावर्तन, मागें पलटवणें, अंतर्मुख करणें. इंद्रियांचें बाह्यरोधन पहिल्यानें. त्रिशुद्धी = निश्चयानें. २ ब्रह्मप्राप्तीच्या मार्गामध्ये अनुभव आल्यापासून पूर्णतेची तद्रूपता येईपर्यंत जो अभ्यास अवश्यक आहे तो न केला तर पुन्हां द्वैतकल्पना उचंबळावयाला लागतात, आणि म्हणूनच त्वां भूतद्वंद्वें ( द्वैतभावाची कल्पना ज्याच्या ठिकाणीं पुन्हां प्रादुर्भाव पावू लागली अशा द्वद्वीभूत त्वां ) प्राप्तवस्तू ( हस्तगत झालेलें ब्रह्मज्ञान ) हारविलीस ३ अपुल्या मापें (आपण ठरवितों त्या मापाचें प्रमाण घेतलें असतां ) लक्षांश ( लक्षपटीनें ) श्रौतीस्मार्ती खटाटोपें यांजेती, मुनीतापसी अनुतापें शिणती, आणि योगी ध्याती हे सर्व आपल्या लक्षपटीनें श्रम करितात, परतु आपल्याला केवळ गुरुकृपेनें सर्व मार्ग सोपे होतात

साधनकर्में[1] साधिती जे सायास ।
लाधले ते तुजलागीं अनायास ।
प्रतीती[2] येतां सांडिला कां अभ्यास ।
अपूर्णपणें वृत्तिनें धरिला द्वेष ॥ २ ॥
श्रीगुरुपाईं निश्चयो होतां भारी ।
पूर्णब्रह्म आनंदें राबे घरीं ।
ओढुनि न्यावें घालावें माजघरीं ।
युक्ति[3] चुकुनी वर्तसी भ्रमवेव्हारीं ॥ ३ ॥

---

१ साधनचतुष्टयाच्या मार्गानें हे चतुर्विध साधनप्रकार कोणते हें पूर्वीं एका टीपेंत दिलेलेंच आहे २ प्रतीती=अनुभव; हा शेवटला ब्रह्मानुभव नव्हे, तर या मार्गानें आपण गेलों असतां आपल्याला ब्रह्मसाक्षात्कार होईल इतकी मनाची खात्री होण्यापुरता अनुभव. अपूर्णपणें=ज्ञानमार्ग दिसतो परंतु तो आक्रमण्याचे कष्ट (अभ्यास) करवत नाहींत अशा स्थितींत चित्तवृत्ति त्या मार्गापासून पराङ्मुख व्हावयाला लागतात देवनाथ सांगतात कीं, साधकानें मार्ग सत्य आहे अशी प्रतीति पटल्यावर दृढ अभ्यास धरिला पाहिजे, तरच पहिला विश्वास असतो त्याच्याऐवजीं साक्षात्कार होईल, नाहीं तर कष्टाला कंटाळलेल्या अर्ध्याकच्च्या माणसाला अपूर्णत्वानें मार्गाच्या सतत्याबद्दल शंका आणि साधनाबद्दल पराङ्मुखता व्हावयाला लागते. या ठिकाणीं द्वेष म्हणजे पराङ्मुखता, संशयग्रास एवढाच अर्थ घ्यायचा. या द्वेषाबद्दल पंचदशीकार म्हणतात:—

"बाढं संति स्वदार्ढ्यस्य हेतवः श्रुत्यनेकता
असंभाव्यत्वमर्थस्य विपरीता च भावना"—पंचदशी ७-९९

प्रमाणासंभावना, प्रमेयासंभावना, साधनविपरीतभावना, फलविपरीतभावना असे चार प्रकारचे वृत्तिद्वेष अच्युतराय मोडक या महापंडितानें आपल्या टीकेंत दिले आहेत. तेथेंच वाक्यप्रमाणजनितज्ञान असा शब्द आला आहे; त्याचाच समानशब्द देवनाथांनीं प्रतीति हा शब्द दिला आहे ३ युक्ति=गुरुकिल्ली गुरुसेवारताला ब्रह्मप्राप्ति होने, आणि गुरूनें साधनक्रम दाखविले आहेत, सोपें पण प्रतीती (वाक्यज्ञान)नेंच तू तृप्त राहिलास आणि अभ्यासक्रमाकडे दुर्लक्ष केलेंस ही तू युक्ति चुकलास, आणि भ्रमवेव्हारीं वर्तसी ( चार प्रकारच्या वृत्तिद्वेषांनीं अथवा संशयांनीं ग्रस्त झालास ) तथापि वाहिली ती गंगा आणि राहिलें तें तीर्थ असें समजून तूं आता तरी आपला आलस्यमार्ग सोड, आणि ऐक्यभावें ( अनन्यभावानें, गुरुश्रीरंगाला गुरुर्विष्णु त्याला ) शरण जा आणि त्या देवनाथप्रभूच्या पायीं अखंड जागा माग, म्हणजे तुझा अखंड कार्यभाग होईल

राहिलें तीर्थ वाहिली तेचि गंगा ।
उमजुनी मार्गे सज्जना फिर वा वेगा ।
एक्याभावें आकळीं गुरू श्रीरंगा ।
देवनाथप्रभुपायीं मार्गे जागा ॥ ४

पद ( ३२० )

श्रीसद्गुरुमूर्ती, तुजप्रती विनती करूं ।
तुज शरण आलिया सहजाचि हा भव तरू ॥ ध्रु० ॥
निर्गुणरूप तू, सगुणाप्रती येउनी ।
तू परमपुरुष परमात्मा आत्मा धनी ॥
प्रकृती तुझी, मायारूप होउनी ।
तिन्ही दैवतें[1] आत्मा त्रिगुणें[2] तुजपासुनी ॥
॥ छंद ॥ पांचापासुनी[3] पंचवीस[4] जाहले उत्पन्न ।
त्या पिंडीं स्थापिला तांहीं तुझा जीवपण ।
दशवायूचे[5] आधार निर्मियलें मन ।
स्थूलसूक्ष्मकारण[6] मध्यें महाकारण ।

---

१ ब्रह्माविष्णूमहेश २ सत्वरजतम. ३ पंचमहाभूतें—पृथ्वी, आप, तेज, वायु, आकाश यांजपासून ४ पंचकर्मेंद्रियें, पंचज्ञानेंद्रियें, पंचतन्मात्रा, पंचमहाभूत आणि अंतःकरणपंचक. वाक्, पाणि, पाद, पायु ( मलद्वार ), उपस्थ (जनन द्वार ) ही पांच कर्मेंद्रियें, अथवा कर्मेंद्रियपंचक पंचमहाभूतें अथवा भूत-पंचक वर दिलीच आहेत. पंचतन्मात्रा अथवा विषयपंचक म्हणजे शब्दस्पर्श-रूपरसगंध. ज्ञानेंद्रियपंचक म्हणजे चक्षुश्रोत्रत्वक्‌जिव्हा घ्राण अंतःकरणपंचक म्हणजे मनबुद्धिचित्तअहंकार हे चतुष्टय आणि अंतःकरण अथवा महाकारण हें पांचवें, असें अंतःकरण पंचक मिळून पांचाचे पंचवीस झाले. त्याचा पिंड तयार करून "तत्सृष्ट्वा तदेवानुप्राविशत्" त्या निर्मित पिंडाच्याठायीं ईश्वर जीवरूपानें प्रविष्ट झाला ५ प्राण, अपान, व्यान, उदान, समान, नाग, कूर्म, कृकर, देव-दत्त, आणि धनंजय असे दहा वायू. माधवचंद्रोबाकृत संस्कृतमराठी कोशांत यांचें विस्तृत वर्णन पहा ६ स्थूलसूक्ष्मकारणमध्यें महाकारण—पृथिव्यादि भूत-पंचकाच्या अस्थिमांसादि पंचवीस विकारात्मक जो तो स्थूलदेह. हा दृश्य असल्यामळें द्रष्टाजीव याहून भिन्न आहे. ज्ञानेंद्रियपंचक, कर्मेंद्रियपंचक, पंच-प्राण आणि अंतःकरणचतुष्टय मिळून एकोणीस त्रिपुटींचा जो बनलेला तो लिंगदेह अथवा सूक्ष्मदेह स्वस्वरूपाचें अज्ञान म्हणजे अविद्या, हा कारणदेह. स्वस्वरूप मला कळत नाहीं असें म्हणणारा जीव वेगळा आणि कारणदेह वेगळा. ज्यायोगानें वरील तिन्ही देहांचीं लक्षणें कळतात तो महाकारणदेह.

॥ टीप ॥ चारी वाचां भरलाँ गुणसागरू ।
धरि स्वहित माझा तू होय विश्वंभरू ॥ श्री० ॥ १

चर्मचक्षूप्रती ज्ञानांजन घातलें ।
दशहृदय[9] प्रेरितां व्रसितां त्या सुचविलें ॥
अहो विवेकांकुशें षड्वैरी गांजिले ।
ह्या पदांबुजीं मन दयांबुधिंत बिंबलें ॥
॥ छंद ॥ कुंडलासन घालुनी योग साधिला ।
हा प्राणवायू फिरवुनी आधारा[10] नेला ।
तेथें रस्ते तीन[11] पाहतां भ्रम पडला ।
सूक्ष्ममार्ग[12] मज उफराटीं[13] दाविला ॥
॥ टीप ॥ तेथें गोल्हाट[14] औटपीट या धरूं ।
पुढें माया परतुनी आलीसे धीर धरूं ॥ श्री० ॥ २

---

७ चारी वेदरूपीवाचांतून तुझा गुणसागर वर्णिला आहे, ८ पण ते मला दुर्बोध असल्यामुळें मी तुला विश्वंभराला शरण येलों तूच माझें स्वहित आहेस, मला मार्ग दाखविणें फक्त तुझ्या हातूनच होईल, किंवा चारी वाचांनीं वेदांनीं तुला अगम्य म्हटल्यामुळें आम्ही त्यांच्याकडे न जातां स्वहितार्थ तुझ्याकडेच धांव घेलों ९ दशेंद्रियाचा राजा मन हें आहे आणि हें दशेंद्रियांचें हृदय मुख्याधार आहे हा शब्द मनाच्या किंवा अंतःकरणाच्या अर्थी योजिला आहे असें वाटतें, एरव्ही दशवायूसारखें दशहृदय हें काय हें सांपडत नाहीं.

'मनो दशेंद्रियाध्यक्षं हृत्पद्मगोलके स्थित
तच्चांतःकरण बाह्येष्वस्वातन्त्र्याद्विनेंद्रियैः' पचदशा.

१० आधारा=मूलाधारचक्राचेठायीं ( प्राणवायु उलट्या गतीनें नेला ) ११ तीन रस्ते=मूलाधारचक्राचेठायीं प्राण गेला असतां तेथून इडा, पिंगला, सुषुम्ना या तीन नाड्या १२ सूक्ष्ममार्ग—सुषुम्ना नाडींतून कुंडलिनी शक्तीचा जो मार्ग तो. १३ उफराटीं—मूलाधार चक्र उलटवून अगर ज्या क्रमानें जीवत्व घेऊन स्थूल शरीराची प्राप्ती झाली त्याचे क्रमानें उलट एक एक अवस्था सोडण्याच्या मार्गानें १४ गोल्हाट—उलटी उडी १५ औटपीट—स्थूल, सूक्ष्म, कारण आणि महाकारण हे चार देह ओंकाराच्या साडेतीन मात्रांनीं संज्ञित आहेत. स्थूलाची अकारमात्रा, सूक्ष्माची उकारमात्रा, कारणाची मकारमात्रा आणि महाकारणाचा अर्धमात्रा म्हणून ह्या चौथ्या सर्वसाक्षी महाकारणाच्या अवस्थेचा आश्रय धरून राहिला असा औटपीट या धरूं याचा अर्थ आहे.

या ब्रह्मरंध्रीं महालिंब तो असे ।
पुढें पाहतां निर्भर चौगाण तें दिसे ॥
तेथें कल्पतरू सद्गुरु माझा वसे ।
त्या स्वरुपाचें लागलें मजला पिसें ॥
छंद ॥ भ्रांतीचें पडळ सहजचिं गेलें निघुनी ।
हें जळकट मळकट बळकट गुरुचरणीं ।
मी घालीन मिठी मुद्रागतलोचनीं ।
टीप ॥ तेथें साचारू सांगितला वीचारू ।
पुढें सहजचीं भावें तरलों भवसागरू ॥ श्री० ॥ ३

बहु श्रमलों मी पाहिल्या निजरूप ।
षट्चक्रें भेदुनी आलों तुम्हासमीप ।
पांचही मुद्रा शुद्ध उजळिला दीप ।
षट्चैतन्य मना अनुभवी माक्षेप ।
छंद ॥ गोविंदनाथ भरुनी उरला जो अद्वय ।
या देवनाथासी केलें हो निर्भय ।
मग निमग्न झालें तें हीं सांगतां नये ।
टीप ॥ तेथें साचारू सांगितला विचारू ।
सज्ञानी व्यापक भरला हा सद्गुरू ॥ श्री० ॥ ४

## पद ( ३२१ )

आत्मा आपण विश्व चराचर व्यापक पाहतां नयनीं रे ।
तन्मय नयनीं असतां राहणें हो का या जनिं विजनीं रे ॥ ध्रु० ॥

श्रीगुरुसुख निश्चित तें सेवुनि समजुनियां निज अर्थारे ।
मानस तत्पदीं रमतां मग तुज जाणें नलगे तीर्था रे ॥ १
तीर्थांचा तूं तीर्थराज हें वर्म श्रुतिचें ऐसें रे ।
श्रवणें मननें निजगुज बा रे लाधे निदध्यासें रे ॥ २
साक्षात्कारें वस्तू अद्वय आत्मा पाहतां आपण रे ।
अनुभव घेऊनि ऐसा बा रे सांडिं अहंकृतीचा पण रे ॥

अहंब्रह्म हें गाळुनि स्वरूपें तूंच तुझें हें पाहीं रे ।
तन्मय समरस होऊनि जा रे स्वस्थपणें मग राहीं रे ॥ ४

देवनाथ प्रभु गोविंदातें पाहतां या हृद्भुवनीं रे ।
मग भय नाहीं निजस्वानंदें निर्भय फिरतां अवनी रे ॥ ५

## पद ( ३२२ )

तो नर धन्य जनीं । अनुभवी तो नर जनीं ॥ ध्रु० ॥
विश्व चराचर ब्रम्ह निरंतर । पाहत जो ज्ञानी ॥ १
पाहतेपणाही ग्रासुनि[3] अपणा । देखत जनिं विजनीं ॥ २
स्वरुपीं समरस वृत्ति अखंडित । खेळत चिद्गगनीं ॥ ३

---

१ देवनाथ या पदांत उपदेश करितात कीं, गड्या! डोळ्यांनीं जर नीट पहा शील तर आपला आत्मा हा अखिलब्रह्मांडव्यापक असाच आहे, त्यापासून भिन्न नाहीं; आणि ही वृत्ति तुझ्या ज्ञानदृष्टीसमोर सदोदित असल्यावर संसारांतच राहीनास ? (विजनीं) जंगलांत तपश्चर्येला जाऊनच काय जास्त आहे ? श्रीगुरुसेव प्रसादाचें सुख अनुभवून, आणि आत्मस्वरूप बोध होऊन गुरुपदीं मानस लीन झाल्यावर मग तुला तीर्थाटण कशाला व्हावें ? कारण तीर्थांतील श्रेष्ठ तीर्थ तुझाच आत्मा होय असें वेद सांगतात श्रवणमनन-निदिध्यासरूप जो ब्रह्म-चिंतनाचा मार्ग त्यानें तुला निजगुज लाधेल आत्मसाक्षात्कार होईल. या साक्षात्कारानें तुझा आत्मा आणि वस्तू ( परब्रह्म ) या दोहोंतील अद्वयत्व तुला दिसेल. आणि हा अनुभव घेऊन तू अहंकारातीत हो. अहंब्रह्मास्मि ही कल्पना गाळ ( मी ब्रह्म आहें ही कल्पना नष्ट न होई तों पावेतों मी व ब्रह्म यांचा भेद कायम रहातो सबब शुद्ध ज्ञानाचा अनुभव येत नाहीं. मी ब्रह्म आहें ही भेद-भावना देखील गाळ आणि पूर्ण ब्रह्मरूपच हो ) आणि मग तूं स्वरूप पाहीं ब्रह्मपूर्ण होऊन जा. मिठाची पुतळी समुद्रशोधनाला गेली तर समुद्ररूपच होऊन जाते तसा ब्रह्ममय हो त्या ब्रह्मरूपामध्यें एकजीव होऊन तूं स्वस्थपणें राही व स्वानंदें फीर २ निर्भय फिरतां—नित्य ब्रह्माशीं जो एकरूप झाला त्याला जन्ममरणरूपी संसाराचें भयच राहिलें नाहीं. ३ द्रष्टादृश्यदर्शन या त्रिपुटीचा अंत करून व ब्रह्मरूपीं लीन होऊन जनींवनीं मीच आत्माराम सर्वत्र भरलों आहें अशी भावना करितो.

उन्मनीं मस्तकीं घालुनि आसन । नांदत चिद्भुवनीं ॥ ४
देवनाथप्रभु नाथनिरंजन । अंजन ले नयनीं ॥ ५

## पद ( ३२३ ).

खेळ पोरा भोंवरा । समस्वरूपीं स्वमन सैरा ॥ ध्रु० ॥
वैराग्याची आरी वरी विवेकाची जाळी ।
ज्ञानतळहातीं घालीं भक्तीकरांगुली ॥ १
हात करीं वरीं, मारीं आंत भूमीवरी ।
फिरवीत फिरवीत वेगीं ओढुनि घेई करीं ॥ २
अणीवरी घेऊनि दोरा गुंडीं माथ्यावरी ।
लक्ष लावुनि आंत ओढीं झेलीं बरच्यावरी ॥ ३
देवनाथ म्हणे निंदी लागे फेरीऐसा ।
फेरीयामागें फेरीया होशी तूची मग खासा ॥ ४

## पद ( ३२४ )

चित्तचक्रवाळा खेळ असा बाळा ।
व्योमाकार चक्र त्याच्या आंत घालीं डोळा ॥ ध्रु० ॥
प्रेमसूत्र आंत घालीं बळकट बसवीं फांसा ।
हळूहळू सुतीं लावीं ओढीं गगनपैसा ॥ १
तर्करहित तर्जनीच्यावरी फांसा देई ।
वरीवरी ओढीत ओढीत ओढुनी करीं घेई ॥ २

---

१ जाग्रदवस्था, स्वप्नावस्था, आणि सुषुप्ति अवस्था या जीवाच्या पहिल्या तीन अवस्था. आपणच ब्रह्म अशी भयेच्छारहित वृत्ति होणें याला तुरीयावस्था म्हणतात, तिचेंच परिणत स्वरूप उन्मनी. याबद्दल रा. विष्णूबावा ब्रह्मचारी यांनीं आपल्या वेदोक्तधर्मप्रकाशांत दिलें आहे, "शरीराचा व जगताचा साक्षित्वभाव आणि संकल्पविकल्प सोडून ज्ञानानें एका पंचप्राणरूप शुद्ध वायूचे आधारानें आपण निराकारतत्वच आहों व जग नाहीच असें अनुभविणें आणि यामुळें भय व इच्छा रहित होऊन अतिशय सुखी होणें अशा ज्ञानाच्या अवस्थेला तुरीय अथवा उत्तम अवस्था हें नांव आहे ह्या अवस्थेचा शुद्ध सत्वगुण असून ही सर्व अवस्थांचें मूळ आहे उन्मनी आणि मनरहित होणें ही अवस्था तुरीय अवस्थेचेंच उन्नत स्वरूप होय " २ हा शब्द काय !

हातामाजी गवसलीया पूर्णपणें गती ।
दशदिशा फेंकीं चक्र सूत्र ठेवी हातीं ॥ ३
देवनाथ म्हणे इकडेतिकडे खालवरी ।
फेंक निजानंदें सुखें खेळ माजघरीं ॥ ४

## पद ( ३२५ ).

उदो[1] बोला उदो आंत बाहिर उदो ।
जिकडे पाहें तिकडे अवघा ब्रह्मानंदीं जाओ ॥ ध्रु० ॥
उदोपदा प्रथम मीच आराधीन झालें ।
जोगवा मागूं आलें ।
उजळोनी आत्मज्योती मूळींचें ठायीं गेलें ॥ १
ज्ञानकवडी जडा जोडी बहू उदंड लेणें ।
गळां दरुशणें ।
कटीतटीं मणगटीं सर्व भूषणें ॥ २
उदया आलें भाग्य माझें काय सांगूं लोकां ।
माझें मीच देखा ।
संतांपायीं ठेऊनि डोई देवनाथसखा ॥ ३

## लावणी ( ३२६ ).

बाइ मी माणुसपणा वेगळी झाल्यें ग पिसाट ।
प्रपंच न रुचे म्हणुनी धरली मुळघरची वाट ॥ ध्रु० ॥
कोणे एकेदिवशीं प्रातःकाळीं होतें मी माहेरीं ।
रमता जोगी आला त्याची काय सांगूं थोरी ।
दिशावस्त्र परिधान करुनियां माझ्या शेजारीं ।
एकाएकीं येउनि बसला मज धरिलें पदरीं ।
छंद ॥ चाल सखये मी येतों निजठायां ।
बहुतांपरी गुरुकृपा करील छाया ।
प्रपंचभोंवरा फिरविल ही माया ।

---

१ उदो = उदयोस्तु. देवीभक्तांचा मंगलवाचक शब्द आहे. उदोपदा = मूळ मायेचें पद. आराधीन = उपासक, सेवेकरीण. हें रूपक परमार्थपर असून कुलाचारांत आणिलें आहे.

टीप ॥ असें बोलतां कर्णीं लागले करु नको आभार ।
प्रपंच न रुचे ॥ १ ॥
गुज दाखविलें हृदयपद्मीं प्रवेशिलीं वेगीं ।
तूं ते म्हणता वेडच्यावाणी ते जाले लागीं ।
लज्जा सोडुनि शीघ्र चाललीं केवळ अनुरागीं ।
बोधगर्भ हा मला राहिला उदरीं त्याच्यासंगीं ।

छंद ॥ लोक निंदिती मम वाईट करणी ।
माय म्हणे लेंक बहकली नवी तरणी ।
श्वानांच्या समुदायांत जशी हरणी ।

टीप ॥ देहबुद्धि हे दुष्टकल्पना केली सपाट ।
प्रपंच न रुचे ॥ २ ॥
प्रपंचाचें लुगडें सोडुनि जहालें मी उघडी ।
ममताचोळी काढुनि सये मी घालितसें फुगडी ।
त्रिगुणाची वेणी उकलुनी कामजुडा फोडीं ।
स्वयंभ म्हणतां पिशाच झालें त्रिगुणताप तोडीं ।

छंद ॥ मला गोडि लागली उत्तम संगतीची ।
मी अंकित जालें सद्गुरुचरणांची ।
कशि वाट मोडिली येण्याजाण्याची ।

टीप ॥ इत्यादिक जें साधन होतें चालविली वाट ।
प्रपंच न रुचे ॥ ३ ॥
शेणमाती काटंगोटे टाकले दुरदेशीं ।
परपुरुषाचा संग पावलीं मला आली हासीं ।
कुलबुडविणी कन्या जन्मली जननीचे कुशीं ।
हें जनकार्नी (?) हे जननयनी म्हणती वाचेसीं ।
छंद ॥ मी गरजवत एकासी अनुसरलें ।
माझें मजला कसें कळुं आलें ।
याचे संगतिनें सर्व कार्य घडलें ।

टीप ॥ देवनाथ म्हणे विश्वीं लाभ हा भरला घनदाट ।
प्रपंच न रुचे ॥ ४ ॥

## पद ( ३२७ ).

बोध्याचे मदनांत सखे मी झालींसे वेडी ।
चित्त चांदण्यामध्यें सख्या मी टाकिली पलगडी । ध्रु० ॥
वैराग्य सुपारी पान भरून तबकडी ।
दिव्यकात चुना आणूनी केली त्याची विडी ।
नम तंबाखु जाळावया भरून गुडगुडी ।
सत्रावीचें पाणी आणूनी भरलें तेच थर्डी ।
नाना परिचे विलास करितें साधन बहुरंगीं ।
परपुरुष भोगितें परतु पाप नाहीं अगीं ॥ १
क्रोध माझा भ्रतार त्याला ठेवियलें घरीं ।
मला लागलें वेड म्हणुनि मी हिंडतें परद्वारीं ।
मनिषा माझी सासु तिजला करुन आलीं चोरी ।
इच्छा माझी नणद राखण आहे मजवरी ।
अहंकार मासरा दीर हा पूर्वींचा वैरी ।
दंभ प्रपंच हा मज नलगे नलगे संसारीं ।
इतुक्यांशीं मी हात जोडुनी ठेविलें दुजे अंगीं ॥ २
चैतवारीं (?) दसव्रे द्वारीं गेली उल्हघोली ।
भक्ति माझी कुंटिन तिनें मज दाविियलें नेनीं ।
शूद्ध मतीच्या बंगल्यामध्यें निद्रागत होवोनी ।
अह सोहं सेवा करिती सन्निध बैसोनी ।
पाहणें पाहतां सद्गुरुनाथा झाळीसे मिळवणी ।
माझें सुख मीच जाणें बोलवेना वदनीं ।
श्रीगुरु गोविंदनाथ निरंजन देवनाथ भोगी ॥ ३

## पद ( ३२८ ).

श्रीगुरुनाथदयार्णव तुष्टतां पूर्णत्वें ऐकत्वा आलें ।
ब्रह्मानंदीं वृत्ती समरस जाहली, स्वसुखें सुखिया जालें ॥ध्रु०॥
भावाभाव जेथें समूळ आटलें, गोठलें तें निजसार ।
विरूढलें विश्वाकार ।
जयाचा अंत न पार ।

मावळलें क्षराक्षर ।
द्वैताद्वैता जेथें कडसणी राहिली नुरलें आपपर ग माय ॥ १ ॥ श्री० ॥
जया तेजीं रवि शशि हे लोपले न दिसे दिवस न राती ।
स्वयंभ ज्योतिची ज्योती ।
प्रकाशली निज दीप्ति ।
वर्णितां भागल्या श्रुति ।
निजभाग्यें निजवस्तुची गति मति लाधली सहजस्थिति ग माय ॥२॥ श्री०॥
सबाह्य अंतर नित्य निरंतर व्यापक दश ही दिशा ।
नाम न रूप न रेषा ।
वर्ण व्यक्ति कैची दशा ।
रीघ न पावे शब्दांशा ।
पाहतां पाहणें आटलें सहजीं वृत्ती ह्या जाहल्या पिशाग माय ॥३॥श्री०॥
श्रीगुरु गोविंद सच्चिदानंद गाळूनि त्रिपुटी मग ॥
उरलेसे जें तें आभंग ।
अखंड नाहीं ज्या भंग ।
स्वसुख समाधि रंग ॥
देवनाथ अनुभवितां गुरुकृपें वाजवि अनुहतचंग ग माय ॥ ४ ॥ श्री० ॥

## पद. (३२९)

सद्गुरुनाथ रायें दाखविलें नवल माये ॥ धृ० ॥
श्रीनाथें स्वकरें धरुनी एकांतीं नेलें मातें ।
फुंकुनियां कर्णद्वारें, दाखविलीं निज नेत्रांतें ।
पाहताचि प्रकाश जाला रवि शशी लज्जित तेथें ॥ १
अरूप रूप जें तें, निजतेजें सभराभर ।
आलक्ष लक्षातीत, वस्तु हे परात्पर ।
रक्त ना पीत शाम, रंगाविण रंग अणार ।
अपार पार नाहीं, व्यापिलें चराचर ॥ २
व्यापक अव्यापक, साहिना शब्द जेथें ।
निःशब्द शब्द कैसा, आटलें म्हणणें तेथें ।
तेंचि तें कोंदाटलें एकत्वें सरतें परतें ।
येरासि खूण कळेना, जाणती अनुभवी ज्ञाते ॥ ३

सद्गुरू श्रीगोविंद रूपेंविण रूपा आला
अनुभावितां देवनाथीं स्वानंदीं समरस जाला ।
सच्चिदानद त्रिपुटी गाळूनियां सिंधु भरला ।
नत्रलेंविण नवल चोज, दाखविलें गुरुनें डोळां ॥ ४

## दिंडी ( ३३० ).

मायबापा सद्गुरू देवदेवा । देईं प्रेमा मजलागीं वासुदेवा ॥
तुझ्या भजनाची संवय मला लागो । हृदयिं माझ्या निजरूप तुझें जागो १
अनाथ मी पळवीं मला ध्यावें । भजनप्रेमाचें दान तुवां यावें ॥ २
हेंचि मागें मी भावें पदीं भोळा । देवनाथाच्या पायीं लडीवाळा ॥ ३

## पद ( ३३१ ).

जय रविजा तापी । तव नीर पूर्ण प्रतापी[१] ॥ ध्रु० ॥
तापि तापि तव नाम वदति जे त्रिविधताप हा त्यास न बाधी कदापी॥ १
तटनिकटीं मुनि स्नानजपानुष्ठान करुनियां रमती निजस्वरूपीं ॥ २
देवनाथ करि स्तवन नमन पदीं निजात्मजीवनस्पर्शें तारिसि पापी ३

## पद ( ३३२ )

किति तरि तुज शिकवु जाण ।
मानवा सुजाणा मर्मणा[१] सुजाणा ॥ ध्रुवपद ॥
वेदशास्त्रपुराण तूज । सांगताति निजगूज[२] ।
जाणुनियां हृदयिं कसा त्यजसि नानमाना[३] ॥ किति० ॥ १
काय करिसि दंतकथा । भक्तिवीण ज्ञान वृथा ।
अनीतनी गासि किति । बा उगा तनाना ॥ किति० ॥ २
कन्याधनस्वसुतदार । मानियलें हेंचि सार ।

---

१ देवनाथांचे गुरु गोविंदनाथ याचा मठ तापीनदी काठीं बऱ्हाणपूरला आहे

१ मर्मणा—मर्मज्ञा ! २ निजगूज-आपली गुह्य गोष्ट आत्मज्ञान हें गुह्य आहे. हें अतपस्क, अभक्त, अशुश्रूषु, इत्यादिकांना सांगावयाचें नसतें ३ कसा त्यजिसि नानमाना=हृदयिं जाणुनियां अनमान कसा न त्यजिसि अनमान = कांकू करणें, घोंटाळ्यात पडण, जाणुन सुद्धा सन्मार्गाला प्रवृत्त न होणें. आतां तरी रेंगाळणें सोडून आत्म-हिताला लाग असा उपदेश त्याजिसि नानमाना— अजुन अनमान वेभरंवसेपणा कसा सोडून देत नाहींस.

हिंडे भ्रमविंजनि फार । कां मती फिरेना ॥ किति० ॥ ३
संतभक्त महानुभावें । तत्पदींच धरुनि भाव ।
भक्तियोग वरुनि सांगें वारिं जन्ममरणा ॥ किति० ॥ ४
देवनाथ वदतें मात । ग्रहण करीं हे हितार्थ ।
चराचरीं व्याप्त गुरू विनट भावें चरणा ॥ किति० ॥ ५

## पद ( ३३३ )

रामकृष्ण नाम सुगम सोपि साधना । एकनिष्ठ जपतां नाम तोडि बंधना ॥
सच्चिदात्मरूपिं ऐक्य खेळरे मना । विषसमान मान सकळ विषयकामना ॥
दृश्यभास यास त्यजिं जेविं वोमना । सद्गुरूसि शरण जाय तोडिं बंधना ॥
चराचरीं एक हरी सभॅर दाटला । अद्वितीय अपरोक्ष पूर्ण गोठला ।
गुरुविणा न, गाहि वेद यासिं भेटला । सद्गुरूसि शरण रिघुनि गाई विठ्ठला ॥
सद्गुरू गोविंदनाथ तात मात रे । भज कृपा बळेंचि उजळे तमांधरात रे ॥
घव घव प्रकाश पूर्ण आत्मज्योतरे । देवनाथ विनटे नामिं भवभिंमा तरे ॥

## पद ( ३३४ )

जगदात्मा लोचनीं पहावा ॥ ध्रु० ॥
स्वात्मरुपें स्थावरीं जंगमीं व्यापक हा जनिं वनीं पहावा ॥ जग० १

---

१ भ्रमकाननांत–भ्रमविजनिं  २ महानुभाव = उदारमनाचा, सभ्यगृहस्थ, कामक्रोध इत्यादिकांनीं ज्याचें मन चचल होत नाहीं असा  ३ सांग=समूळ समग्र  ४ वदत मात—कानांत गोष्ट हितगुजाची सांगतो  ५ विनट = लीन हो, जडून जा  ६ हा जो दृश्य आभास आहे म्हणजे दृश्य बाह्य जग सगळें सत्य आहे अशी जी मिथ्या कल्पना होते ती वमनासमान फेंकून दे; ओक आली म्हणजे जशी आपण गिळीत नाहीं दूर फेंकून देतों त्याप्रमाणें या द्वैतकल्पनेचा त्याग कर  ७ सभर = सभराभर = सबाह्याभ्यतर  ८ अपरोक्ष= समक्ष, प्रत्यक्ष  ९ गुरुविणा न; गाहिवेद यासिं भेटला = गुरुविणा न ( गुरूवांचून कांहीं नाहीं; सर्व शून्य आहे, सर्व व्यर्थ आहे. 'यासिं (हा जो मी सिद्धांत बोलतों याच्या प्रचीतीस) वेदगाही भेटला ( प्रत्यक्ष वेदच साक्षी आहेत ) वेद देखील हेंच साक्षीरूपानें सांगतात कीं, गुरूवांचून सर्व फुकट  १० भवभीमा तरे=भीमेचा पूर सांगडीनें तरून गेल्यावांचून जसें विठ्ठलदर्शन होत नाहीं तसेंच भवरूपी भीमानदीचा पूर उतरल्यावांचून गती नाहीं. याला नाम ही सांगड आणि गुरु हा सागडिया. यासाठीं 'गडिया नदि दुथडिया भरली सद्गुरु करि सांगडिया.' असें देवनाथ म्हणतात

श्रीगुरुच्या कृपें अनुभविं बैसवा, हृदय भुवनिं आसनीं पहावा ॥ २
देवनाथ प्रभुनाथ निरंजन, समरस ध्यानीं मनीं पहावा ॥ जग० ३

## पद ( ३३५ )

अगामी शरण तुला आलों ॥ ध्रु० ॥
तारक हा भवसिंधु वदे श्रुति, म्हणउनि अनुसरलों ॥ १
अजरामर पद देत तुझें हरि, नामामृत प्यालों ॥ २
देवनाथप्रभु गुरुगोविंदा, पदरजिं समरसलों[1] ॥ ३

## पद ( ३३६ )

श्रीभगवंनीं प्रीति जडावी ॥ ध्रु० ॥
आल्या नरदेहीं सार्थक हेंची । उमजुनी गुरुगुज भ्रांति उडावी ॥ १
आत्मानुभवीं उमजुनी आपणा । स्वरुपीं समरसवृत्ति बुडावी ॥ २
देवनाथप्रभु पहावा डोळां । अन्यपथीं अजि मती न दडावी ॥ ३

## पद ( ३३७ )

कांहो भजाना भावें भजाना श्रीगुरुराणा ॥ ध्रु० ॥
धरितां ज्याचा वेधू । या मनीं मृगजळवत भवसिंधू ॥ १
बोहरी[2] पापाची । त्रिभुवनीं अविट सत्ता ज्याची ॥ २
देवनाथ धरिला हृदयीं । श्रीगुरुगोविंदा जाणा ना ॥ ३

## पद ( ३३८ )

अहो लाभ सहज घडे तरी कां दवडावा ॥ ध्रु० ॥
हा मनमयूर स्वरूपीं समरस । सुखशयनीं पहुडावा ॥ १
श्रीगुरुच्या कृपें स्वानंदबोधें । निजनयन उघडावा ॥ २
देवनाथप्रभु श्रीगुरुआत्मा । प्रगट हृदयांत जडावा ॥ ३

## पद ( ३३९ )

देव मग दूर नाहीं दूर नाहीं । विचार करुनी पाहीं ॥ ध्रु० ॥
करुनी अंतरशुद्धी । भजनीं तन्मय झाली बुद्धी ॥ देव० ॥ १
दुष्ट कल्पना सारुनी । सावध होउन बैस आसनीं ॥ देव० ॥ २

---

१ पदधूलीच्यामध्यें एकरूप होऊन गेलों; सरमिसळ झालों. २ बोहरी = नासाडी, निर्मूलन " निर्विकारे श्रीमुरारे केली गे बोहरी । कीं अवघा प्रपंचमद संहरी " देवनाथ

दृष्टी[1] मुरडुनि घेई । समाधीसुखांत निमग्न राहीं ॥ देव० ॥ ३
सांडुनी अहंपणाला । हा देवनाथचरणीं रतला ॥ देव० ॥ ४

## पद ( ३४० ).

आम्हीं लिंगाइत वाणी । आमचा सर्वदा घ्याना कोणी ।
घेणाऱ्याचें हित होय न घे त्याची हाणी ॥ ध्रु० ॥
नरदेह पेठ माजो पांचखणी जाण । ज्ञान दुकान ।
विज्ञानेंसि वस्तु भरली शुद्ध सोऽहं केन ॥ आम्ही० ॥ १
वस्तु घेतां लाज चिन्ता दुरी ठेवुनि यावें । भक्तिद्रव्य घ्यावें ।
लक्षरुपी मोज घेउनि आपिआप व्हावें ॥ आम्ही० ॥ २
सद्भावेंसि संत गुरुसि शरण तुह्मीं जावें । हित करुनि घ्यावें ।
देवनाथ गुज सांगे देह लया पावे ॥ आम्ही० ॥ ३

## आरती भगवद्गीतेची ( ३४१ )

जयदेवी जयदेवी जय भगवद्गीते ।
परमामृतरसभरिते अगणित गुणचरिते ॥ ध्रु० ॥
भववारण संवारण तारणअघसिंधु ॥
त्वद्गुणश्रवणें पठणें स्वमना उद्बोधु ॥
घडवी उडवी भ्रांति श्रीपति दिनबंधू ॥
अखंड अंतरबाहेर हरि ब्रह्मानंदू ॥ जयदेवी० ॥ १
शूर महातेजस्वी रणपंडित योद्धे ॥

---

१ दृष्टि उफराटी उलटी करून, मनोवृत्ति ज्या सदोदित बहिर्मुख असतात त्या सर्व अंतर्मुख करून २ यावद्दलच्या सर्व टीपा व अन्य कवींची मनोहर वचनें पूर्वी २७३पदावरील टीपांत दिली आहेत ती रसिकांनी अवश्य पहावी, म्हणजे मीराबाई, तुकाराम, कबीर इत्यादि साधुसंतांनीं ईश्वराची भक्तिपेंठ कशी वसविली आहे याची अल्प कल्पना येईल वस्तु घेतां लाज चित्ता दूरी ठेउनि यावें—भक्ति करावयाची तर कोणाचीही लाज भीडमुरवत न धरितां अनन्यभावानें हरीला शरण रिघून केली पाहिजे 'समस्तांची लज्जा त्यजुनि भगवच्चिंतन करीं' ही वामनोक्ति प्रसिद्धच आहे. संतांनीं ईश्वराला मन समर्पण केलें, तेथें लाज उरेल कशी ! 'मनाचा विसार देऊनि मग ते मापाशीं बैसले संत, म्हणून त्यांना सबध भक्तिपेठ आपलीशी करतां आली.

दुर्धर भवभयतारक अष्टादश आध्ये ॥
श्रवणें पठणें मननें ज्याचें मन वेधे ॥
त्यातें मिळवीं स्वरूप निजात्मनिजबोधें ॥ जयदेवी० ॥ २
विश्वोद्धारें सारि अद्भुत तव महिमा ॥
वर्णन करितां शिणले शेषश्रुतिब्रह्मा ॥
त्वदर्थग्रहणें दाविसी निजात्मनिजवर्मा ॥
जडतो देवनाथ जननी पदपद्मा ॥ जयदेवी० ॥ ३

## पद ( ३४२ )

ते समदर्शी भले रे! पार्था! ॥ ध्रुवपद ॥
गविहस्तिनि शुनि चांडालादिक । मद्रुप अवगमले ॥ ते सम० ॥ १
जाणुनि आपणा स्वात्मानुभवीं । स्वरुपीं समरसले ॥ ते सम० ॥ २
विश्वचराचर ब्रह्म निरंतर । नयनीं देखियलें ॥ ते सम० ॥ ३
देवनाथप्रभु मी मजमाजी । जें ऐक्यत्वें रमलें ॥ ते सम० ॥ ४

## पद ( ३४३ )

भ्रमसी काय उगा । रे मूर्खा भ्रमसी काय उगा ॥ ध्रु० ॥
कन्यासुतदाराधनआशा धरिशी कां भ्रम गा ॥ १
स्वरुपानुभव नोहे जरी तरी अवघा हा शिमगा ॥ २
देवनाथप्रभुनाथ तूं नेणशी व्यापक सर्व जगा । रे ॥ ३

---

# नाममाहात्म्य पदें.

## पद ( ३४४ )

साधन आणिक कां । रे दोनची अक्षरें घोका ॥ ध्रु० ॥
न पडोनी भजनप्रवाहीं । भज भज रामची मग भय नाहीं ॥ १

---

१ ' विद्या विनयसंपन्ने ब्राह्मणे गवि हस्तिनि । शुनिचैव श्वपाकेच पंडिताः समदर्शिनः ' गीता

स्मरतां राम दयाघन । जालें शिवकंठीं विष भूषण ॥ २
देवनाथ प्रभु साचें । स्मरतां दे सुख निजवाचें ॥ ३

पद ( ३४५ )

रसरसने नामरसायण खा । ध्रु० ॥
गुरुपादांबुजसादरसेवनिं । आकळि ज्ञानशिखा ॥ १
चिद्रूपें करिं मानस समरस । नेच्छीं अन्य सुखा ॥ २
देवनाथप्रभु राम तयाविण । जाइल जन्म फुका ॥ ३

पद ( ३४६ )

राम हरे रे कृष्ण हरे । भावें वणिसि बोल वरें रे ॥ ध्रु० ॥
या नरदेहा पाहुणामि येउनि । साधन तूं तरि हेंचि करीं रे ॥ १
श्रीगुरुवचनाशय हा जाणुनि । स्वरुपीं समरस चित्त करीं रे ॥ २
श्रुतिसम तें जग ब्रह्मचि जाणुनि । द्वैत समूळहि त्यक्त करीं रे ॥ ३
देवनाथप्रभु नाथनिरंजन । व्यापक आत्माराम वरीं रे ॥ ४

पद ( ३४७ )

भजन करीं रामाचें । मग तुज भय नाहीं कर्माचें ॥ ध्रु० ॥
त्यागुनि कर्माकर्मा । रतसी भावें मुकुंदधर्मा ॥ १
जें जें दिसतें नेत्रा । तें तें पाहसी राजीवनेत्रा ॥ २

---

१ देवदैत्यांनीं समुद्रमथन करून चवदा रत्नें काढलीं त्यांत हालाहल नामक दुर्धर विष निघालें, त्याच्या तापानें विश्वाचा संहार होईल अशी भीति पडली तेव्हां तें विष शंकरानें आपल्या कंठीं धारण केलें त्याच्यायोगानें शंकराला अतिशय दाहा झाला, तेव्हां त्यानें गंगा, चंद्र, सर्पमाला इत्यादि शीतलतेकरितां धारण केलीं तथापि शांति वाटेना, तेव्हां अखेर विष्णुनामाचा जप करतांच त्याला पूर्ण शांति आली. आणि जें विष दाहक होतें तें निरुपद्रवी झालें व अनेक भूषणांपैकीं भूषणमात्र होऊन बसलें अशी कथा आहे. २ हे षड्रसांच्या रसज्ञे! अन्नरस खाऊन वृथा पुष्टतेचा रोग जडलेल्या जिव्हे, तू नामरसायन खा ३ गुरुपदांबुजाचें सादरसेवन करून ज्ञानाग्नीची ज्योत स्वाधीन करून घे; सेवेवाचून तुझ्या स्वाधीन व्हावयाची नाहीं. सेवा हाच त्याचा एक मार्ग आहे. ४ मुकुंदसेवा हाच श्रेष्ठधर्म. ५ जें जें डोळ्यांना दिसेल तें तें राजीवनेत्र ( कमलपत्र परमेश्वर ) यानें पूर्ण भरलेलें आहे अशी मनाची भावना धर

हरि हा एक त्रिशुद्धी[१] । व्यापक ऐसा निश्चय बुद्धी ॥ ३
देवनाथप्रभुनाथा । जाणुनियां तत्स्वरुपीं रमतां ॥ ४

पद ( ३४८ )

धरा या हरिभजनाचा रंग ; धरा या० ॥ ध्रु० ॥
नामामृतरस सेउनि सादर । मारा दुष्ट अनंग ॥ १
आत्महितास्तव भावें धरिं बा । संताचा निजसंगें[२] ॥ २
तोडुनि आशापाश विवेकें । व्हावें गे निःसंगें[३] ॥ ३
देवनाथ प्रभुनाथकृपें मग । भोगा सौख्य अभंग ॥ ४

पद ( ३४९ )

ध्या रे ! वदनीं हरिनाम गुणी. भावें मनीं त्रेध धरा. ॥ ध्रुवपद. ॥
दुःखरूप संसार । किमपि म्हणों नये सार, ।
कन्याधनपुत्रदार मोह फार, हा न बरा ॥ ध्या रे० ॥ १
तनुची प्राप्ती महद्भाग्य[४] । न हित साधी तो अभाग्य, ।
भक्तियोग धरुनि सांग आत्मयमन करा । ध्या रे० ॥ २
दमन करुनि स्वमनवहनें[५] । चिद्रस गुरुवाक्यग्रहण ।
ज्ञानानळीं[६] दृश्यदहनें गहनस्वात्मसुख वरा ॥ ध्या रे० ॥ ३
देवनाथ वदत भावें । श्रीगुरुसी शरण जावें ।
नामामृत सेवितांचि निजभाग्य[७] येइल घरा. ॥ ध्या रे० ॥ ४

---

१ निश्चयानें, प्रतिज्ञापूर्वक, खात्रीनें २ अत्यंत सहवास, दृढसंग निज = अत्यंत दृढ, अतिशय. ३ नित्यं च समचित्तत्वं इष्टानिष्टोपपत्तिषु ” गीता ४ चौऱ्यायशीं लक्ष योनीमध्यें नरतनु दुर्लभ आणि अतिभाग्यपर, कारण यांतच अल्पस्वल्प तरी भगवत्साधन करतां येतें, हें जो न करील तो खरोखरीचा अभागी जन्माला आला ५ आपल्या मनरूपी वहनाला घोड्याला; मनोतुरंगमाला ६ ज्ञानरूपी अनळ ( अग्नि ) त्याच्यायोगानें दृश्य मायिक जग याचा जो मोह होतो, आणि ब्रह्मापासून व आपल्या स्वतःपासून हें काहीं तरी वेगळें आहे असा मिथ्याभास होतो त्या आभासाचें दहन ( नाश ) करून ७ अत्यंत भाग्य. ओंवीकाव्यांत निज म्हणजे अत्यंत हा अर्थ होतो. ब्रह्मज्ञानासारखें परम भाग्य दुसरें नाही, यामुळें पर्यायानें ब्रह्मज्ञान भाग्य असा अर्थ घ्यावयाचा तनुची प्राप्ती महद्भाग्य । न हित साधी तो अभाग्य॥=नरदेहाची प्राप्ति होणें हें मोठें भाग्य आहे म्हणजे मोठ्या भाग्यानें मनुष्य देह प्राप्त होतो आणि त्यांत जो आपलें हित साधुन घेणार नाहीं तो मोठा अभागी. एकनाथमहाराजांनीं ही

( पुढील पृष्ठ पहा. )

## पद ( ३५० ).

तूं नाम जपसी रे ! वाचे । भय नाहीं मग काळाचें ॥ ध्रुवपद ॥
नश्वर देह शाश्वत मानुनि । वय गमविसी व्यर्थ फुकाचें. ॥ भय० ॥ १
आशातृष्णा त्यागुनि सर्वही । सार्थक करीं बापा [1] जन्माचें ॥ भय० ॥ २
रामकृष्णहरिध्यास हृदीं धरीं । तुटतिल पाशही सर्व यमाचे. ॥ भय० ॥ ३
प्रार्थितसें मना लागुनी सुंदर । नाम सदा मुखिं गाइं हरीचें. ॥ भय० ॥ ४
देवनाथप्रभु नाथसखा रे ! काय उणें मग आहे सुखाचें ? ॥ भय० ॥ ५

## पद ( ३५१ ).

धरीं रे मना हरिनामीं छंद ॥ ध्रु० ॥
केशव माधव वामन विष्णू । स्मर नरहरि करीं निर्द्वंद ॥ १
गोवर्धनधर गोपीवल्लभ । वाजवितो वेणू मंद ॥ २
देवनाथप्रभु गुरु गोविंद । तोडिल हा भवबंध ॥ ३

## पद (३५२).

पार्था ! ते तरले ते तरले । जे नामीं अनुसरले. ॥ ध्रुवपद ॥
वैराग्यें गरगरले । जे चित्सुखांत कीं तरतरले ॥ पार्था० ॥ १
शांतिसुखें आभरले [1] । जैसें लवण जळीं कीं विरलें ॥ पार्था० ॥ २
देवनाथिं मन सुरलें । स्वरुप ब्रह्म दिठीं जग भरलें ॥ पार्था० ॥ ३

---

( ५४४ पृष्ठावरून समाप्त. )
नरदेहाच्या दुर्लभतेबद्दल आपल्या भागवतांत खाली लिहिल्याप्रमाणें म्हटलें आहे. चौऱ्यायशीं लक्ष जीवयोनी । त्यांत मनुष्यदेहावांचुनी । अधिकारी ब्रह्मज्ञानी । आन कोणी असेना ॥ १६६ ॥ जेणें देहें होय मासी प्रासी । चालागीं आद्य देह यातें म्हणती । याची दुर्लभ गा आवाप्ती । भाग्यें पावती नरदेहा ॥ १६७ ॥ **भरतखंडीं नरदेहप्राप्ती । हे परमभाग्याची संपत्ती** । तेथही विवेकू परमार्थी । त्याचा वशवर्ती मी परमात्मा ॥ १६९ ॥ पावोनि श्रेष्ठ नरशरीर । जो नुतरेचि–संसार पार । तो आत्महत्यारा नर । सत्य साचार उद्धवा " ॥ १८९ ॥ ए. भा. अ० २०

१ शांतिसुखानें पूर्ण झाले, शोभविले "कामक्रोध मावळले देहीं । साचार शांति ज्याच्या ठायीं । माझें निजसुख त्याच्या पायीं । लोळत पाहीं सर्वदा ॥ ..७ ॥ तो जरी तें सुख नेघे । तरी तें सुख तया पुढें मागें जडोनि ठेलें जी सर्वांगें सांडितां वेगें सांडीना ॥ १०८ ॥ तो जेउती वास पाहे । तें दिग्मंडळ सुखाचें होये तो जेथ का उभा राहे तेथ सुखावलें राहे महासुख ॥ [illegible]९ ॥ त्याचें पाउल जेथें पडे । तेथें निजसुखाची खाणी उघडे । तो प्रसगें पाहे जयाकडे तेथें स्वानंदें वाढे परमानंद ॥ [illegible] ॥ –एकनाथी भागवत अ. १४.

# भिक्षेवर पदें.

## पद ( ३५३ ).

जळो मागल्याचें जिणें । धिगधिग हें लाजिरवाणें[1] ॥ ध्रु० ॥
जो कीं ब्रह्मज्ञानी योगी । फिरतो वासनेच्या संगीं ।
सुख नाहीं अंतरंगीं । आंगीं क्रोधाचें ठाणें ॥ १
धरुनी वासना अंतरीं । भिक्षा मागूं जातां द्वारीं ।
त्रिविध जन हे नानापरी । ताडिताती वाग्बाणें । २
धरुनी वासनेचा बंड । द्वारीं दिसतो जैसा लंड ।
कामना न पुरे उदंड । दुःखित होतो निजमनें ॥ ३
कोणी म्हणती धष्टपुष्ट । कोणी म्हणती आळसी नष्ट ।
कोणी म्हणती न करी कष्ट । रोजगार होइना याच्यानें ॥ ४
शेखीं प्रपंच ना परमार्थ । दोहींपक्षीं बुडाला स्वार्थ ।
वदला वाणी देवनाथ । याहुनि बरवें हें मरणें ॥ ५

## पद (३५४).

न मागों भिक त्याला[2] भिक त्याला । दयाच नाहिं ज्याला ॥ ध्रुवपद ॥
ब्राह्मण देखुनियां खिजतो[3] । वेश्याडफगाणियां रिझतो ॥ न मागों० ॥ १

---

१ हें प्रासंगिक पद आहे. यासंबंधाने आमच्या प्रस्तावनेचा भाग ७८ ( पृष्ठ ८५ ) पहा, व याशिवाय याच प्रसंगाच्या विस्तृत माहितीकरितां कविचरित्र ( ज. र. आजगांवकर ) पा. ४१७ पहा. शेखीं=अखेरीस शेवटीं. हा शब्द 'शिखर' शब्दापासून झाला असावा असे मोल्स्वर्थ म्हणतो

२ न मागों भिक त्याला:= " ब्राह्मणाची मुख्य दीक्षा । मागितली पाहिजे भिक्षा । ॐभवति या पक्षा । रक्षिलें पाहिजे ॥१॥ भिक्षा मागोन जो जेविला। तो निराहारी बोलिला । प्रतिग्रहावेगळा झाला । भिक्षा मागतां ॥ २ ॥ संतासत जे जन । तेथें कोरान्न मागोन करी भोजन । तेणें केलें अमृतपान । प्रतिदिनीं ॥ ३ ॥ श्लोक ॥ भिक्षाहारी निराहारी भिक्षा नैव प्रतिग्रहः । सदसद्वाऽपि भिक्षान्नं सोमपानं दिने दिने ॥ दत्त गोरक्ष आदी करोनी । सिद्ध भिक्षा मागती जनीं । निस्पृहता भिक्षेपासुनी। प्रगट होय ॥५॥ अखंड भिक्षेचा अभ्यास । तयास वाटेना परदेश । जिकडे तिकडे स्वदेश । लोकत्रयीं ॥६॥ भिक्षा म्हणजे अमरवल्ली । जिकडे तिकडे लगटली । अवकाळीं फलदायिनी झाली । निर्लज्जामी ॥१६॥" दासबोध, दशक १४ समास २. ३ खिजतो = रागावतो, चिरडतो, कातावतो.

श्वशुरादिक गृहीं सवडी[1] । बाहिर मातापित्यांतें दवडी. ॥ न मागों० ॥ २
अहंकारमदें फुगला । जो कां निंदितसे संतांला. ॥ न मागों० ॥ ३
देवनाथ म्हणे ऐसा । अनुपकारी गर्वी ह्मैसा[2] ॥ न मागों० ॥ ४

---

## ज्ञानमदांधांची निंदा.

### पद ( ३५५ ).

प्रबळ स्वमनिं मज नवल नानुभवि[3] न त्यास श्रुति माने ।
अप्रत्ययि परि अहंप्रत्ययें सिरवित अभिमानें ॥ ध्रुवपद ॥
स्वरुपानुभव नसतां नुसता शाब्दिक परिवार ।
शिकविला तो बोले जैसा शुक वारंवार[4] ।

---

१ सवडी = जमवतो, सांवडासांवड करितो २ अनुपकारी गर्वी ह्मैसा— "तारुण्याच्या मदें न मानी कोणासी । सदा मुसमुसी धुळी जैसा ॥१॥ अटोनी नेटोनी बांधिला मुडासा । **फिरतसे म्हैसा जनामधीं** ॥२॥ आधीं दीड पान वरतीच मान । नाहीं तो सन्मान मलियासी ॥ ३ ॥ श्वानाचिया परी हिंडे दारोदारीं । पाहे परनारी पापदृष्टी ॥ ४ ॥ तुका ह्मणे ऐसा थोर हा गयाळी । करितां टवाळी जन्म गेला ॥ ५ ॥ " तुकाराम. हेंही प्रासंगिक पद आहे. या पदासंबंधीं व नाथांचा साधारणपणे तत्कालीन विद्वान् मंडळीशीं काय संबंध असे हें पहाण्याकरितां प्रस्तावना भाग ५५ ते ६१ हे या पदाबरोबर अवश्य वाचावे या पदाचा उल्लेख प्रस्तावना भाग ५९ मध्यें आला आहे. ३ प्रबळ स्वमनिं मज नवल नानुभवि न त्यास श्रुति माने—'मज स्वमनीं प्रबळ नवल कीं नानुभवी ( असा असून ) त्यास श्रुति न माने ' असा अन्वय अप्रत्ययी= अननुभविक, अनुभवशून्य. अहंप्रत्ययें-मला असें वाटतें म्हणून तेंच खरें अशा मूढाभिमानानें ४ शिकवीला तो बोले जैसा शुक वारंवार-हा दृष्टांत व याला समानार्थक दुसरे पांच सात दृष्टांत असलेलें निजानंद-स्वामींचे रसगर्भ पद पहा " बोलणें फोल झालें । डोलणें वाया गेलें ॥ ॥ ध्रु० ॥ चित्तीं विषयाचा अभिलाष । नाहीं विश्रांतीचा लेश । मुखें ह्मणे निर्विशेष । परब्रह्म सचलें ॥ १ ॥ श्रवणीं दावी अष्टहि भाव । म्हणे मृगजळवत हें वाव । कवडी वेंचितां हा जीव । तळमळ करी सर्वस्वें ॥ २ ॥ परोपदेशीं पूर्ण ज्ञानी । मोहममता मत्सर मनीं । नागसुरें जैसा फणी । डोले परी विष वदनीं ॥ ३ ॥ शब्दें ब्रह्म कोण झालें । अन्न ह्मणतां कोण धालें । **शिकविलें तैसें बोले । शुकपक्षी पैं जैसा** ॥ ४ ॥ शिकला कळा विद्याछंद । नाहीं अंतरीं निर्द्वंद्व । सहजपूर्ण निजानंद । सर्वरंगीं न पाहे ॥ ५ ॥ "

ओस नगर परि व्यर्थ भोंवता उगाचि आवार ।
क्लीब परि शिरीं समला वागवि[1] स्वकरीं तलवार ॥
चाल ॥ तदन्यायें होय शब्दरचना ।
हें कदा न मानिति बुधजन या वचना ।
श्रीगुरुकृपेंविण कवित्वें रुचेना ॥
टीप ॥ जळो जळो तें ज्ञान, कवित्वा स्फुरे अहंस्फुरणें ,
कालवितां निजमतिनें कर्दम तुटे कालधरणें ॥ प्रबळ० ॥ १
परोत्कर्षे देखुनि लाचार कुबुद्धिन सरळा ।
होतो निंदा परि ह्या लावित शब्दांच्या चरळा ॥
दुर्वाक्याची रुची मुखीं ते सांडित विष गरळा ।
पाहतां दिसतो गोठ्यांतिल पशु बैल जसा मरळा[2] ॥
चाल ॥ मतिमंद करित परि छंद शब्द उघडा ।
अतिदुष्टहृदय जो साधुछळाणिं निधडा ।
मुसमुसितद्वैत मी ज्ञानि म्हणवि गधडा ॥
टीप ॥ जळो तयाचें तोंड शिणाविली रांड महा तेणें ,
पितृरेत तो नव्हे, बुडविला जन्म वृथा जेणें ॥ प्रबळ० ॥ २
वंध्या ते परि चिंध्या बांधुनि वाढविलें पोटा ।
पदर घेत वरि गरोदरीचा जगांत बोभाटा ॥
वेण न येतां पुत्र नव्हे हा फजीतिचा वांटा
तज्ज्ञ जाणती किती लपवावें सुइणिपुढें पोटा ॥
चाल ॥ कां पुत्रवतीच्या विरहें मन डोहळा ।
कां वांझेलागीं व्हावा असा डोहळा ।
हे निरयगती तो प्राप्त नव्हे सोहळा ॥
टीप ॥ ज्ञानि नव्हे अज्ञान भ्रमासीं उगी फिरे रानें
मदमत्सरमति भूतीं भरले ब्रह्म सभर जेणें ॥ प्रबळ० ॥ ३

---

१ शिरिं समला वागवी—उगीच मोठा झोंकदार फेंटा बांधून वीरभाव दाखवितो. २ बैल जसा मरळा—मरळ, मरगळ, मरगण बैल = अतिशय थकून मरायला टेंकलेला. मरगळ येणें, मरगळ मारणें, मरगळीस येणें = मेल्यासारखें थकून पडणें, मेल्यासारखे थकून पडल्याचें ढोंग करणें, असे दोन्ही अर्थ मोल्स्वर्थच्या कोशांत दिलेले आढळतात.

वृथापुष्ट मतिभ्रष्ट तयाचें नाम न घ्या वाणीं ।
नष्ट महा सज्जन मन कष्टवि जो इष्टाअशनीं ॥
श्रेष्ट महाजन एकनिष्ठ जे रत भगवद्भजनीं ।
स्पष्ट करित जो दुष्ट साधुच्या चेष्टा दिनरजनीं ॥
चाल ॥ जो सज्जन निंदापर सदैव नाचे ।
आजि कार्य तयाच्या न पडो दर्शनाचे ।
मग काय प्रयोजन त्यासि भाषणाचें ॥
दीप ॥ देवनाथ म्हणे काय काज त्या संगतिला करणें ।
स्वस्थ ठेवुनी मानस सज्जनीं 'हरि हरि' तें स्मरणें ॥ प्रबळ० ॥ ४

## पद ( ३५६ ).

मिरविती व्यर्थ जनीं हो, व्यर्थ जनीं ।
नानुभवी न श्रुतिमानी[१] ॥ ध्रु० ॥
अहंकारमद मोठा । भ्रमरूप अज्ञान दिवटा ॥ १
पाठक[२] नाटक चेष्टा । करुनी बोले कुशब्द श्रेष्ठा[३] ॥ २
सुविचाराच्या स्नेहें[४] । निजात्मदृष्टी पाजाळिना हे ॥ ३
देवनाथ म्हणे बधा । त्यांचा संग नये उपयोगा ॥ ४

## पद ( ३५७ ).

त्यासम मूर्ख जनीं । पाहतां न दिसे या त्रिभुवनीं ॥ ध्रु० ॥
अनुभविं निज नुमगला[५] । शब्दज्ञानें गर्वे फुगला ॥ १
धरुनी ज्ञानमदातें । करितो वादप्रतिवादातें ॥ २

---

१ स्वतःला अनुभव नसणारे आणि श्रुति जें सांगतात त्याच्यावर पूर्णपणें विश्वास न ठेवणारे २ पाठकनाटकचेष्टा ( पाठ केलेल्या नाटकांतल्या ज्ञानियाच्या जशा चेष्टा असतात तसा पोपटपची बोलणारा ) असा शब्द असेल काय ? ३ पाठकनाटकचेष्टा करुनी श्रेष्ठा ( आपल्यापेक्षां अनुभवी व श्रुतींना मानणारे अशा लोकांना ) कुशब्द बोले ( त्यांची निंदा करितो ). ४ तेलानें. ५ अनुभवानें उमगला नाहीं.

दावी जगीं प्रशंसा । श्रीगुरुकृपें झाला हिंवसा ॥ ३
देवनाथप्रभु नेणें । व्यर्थचि भ्रमला शब्दज्ञानें ॥ ४

## सवाई ( ३५८ ).

ज्ञान विचार बहु, अवलोकिले भागवतादिक ग्रंथहि सारे ॥
पद्यपदें अमरादिक पाहुनि भारत आदिक शास्त्रपसारे ॥
तर्कविशेष यथार्थगती अतियुक्ति प्रयुक्ति अशा सकळाही ॥
काव्यकळा विकळा विफळा, एक नाहिं जरी हृदिं प्रेमकळाही ॥ १
गायन सुंदर सुस्वर कंठहि तान म्हणे अति ठेवणिची ॥
कर नाचुनि पदताल धरी बरी सांग वदे गत उंचनिची ॥
संस्कृतछंदप्रबंध रची, रुचि दावित त्या चतुराहि कलाहि ॥
काव्यकळा विकळा विफळा एक नाहिं जरी हृदिं प्रेमकळाही॥ २
तीव्रतपें तपला, श्रुतिसंमत श्रौतहि स्मार्तहि याजनबुद्धी ॥
\+ \+ \+ \+ \+ \+
वाणिसि बोलत तेंच घडे, जग चाळवि खेळवि शब्दबलांही ॥
काव्यकळा विकळा विफळा एक नाहिं जरी हृदिं प्रेमकळाही॥ ३
देउनि टांच गुदीं अवरोधित वायुस, कुंडलिनी चढवीली ॥
शक्तिबळें त्रिकुटाप्रति लंघुनि नेउनि प्राणहि मस्तकिं घाली ॥

---

१ हिंसा या शब्दाचा नाश, घात, मृत्यु हा अर्थ सर्व प्रसिद्धच आहे परंतु हिंसा या विशेषणाचा अर्थ थंड असाही मोल्स्वर्थनें दिला आहे व तो येथें लागतोसा दिसतो श्रीगुरुकृपें हिंसा झाला = हा गर्वें फुगलेला शब्दज्ञानी जरी जगीं आत्मप्रशंसा दाखवितो, आणि वादप्रतिवादातें करितो तरी तो श्रीगुरुकृपें (आमच्या पुढें ?) हिंसा झाला (शांत झाला, थंड पडला, चुप झाला) असा अर्थ असावासें वाटतें. याहून दुसरा अर्थ असल्यास सुचवावा.
२ या सुंदर कवितेमध्यें देवनाथांनीं श्रेष्ठ काव्याचें खरें खरें हृद्य सांगितलें आहे. अमरकोशापासून सर्व संस्कृत पाठ करून महाव्युत्पन्न पंडित बनला, श्रेष्ठ गाणारा असला, भविष्यवादी, महावक्ता, तपस्वी, योगी, इच्छागती, पंचाग्निसाधक, शापानुग्रहसमर्थ, कसाही मनुष्य असला तरी हृदीं प्रेमकळा नसली, ईश्वराच्या चरणीं मनुष्य शरण गेला नाही आणि चराचराबद्दल मनीं प्रेम नसेल तर केवळ व्युत्पत्तीची काव्यकळा कधींही सफळा होणार नाहीं. प्रस्तावना भाग ४८ पान ५४ पहा.

बैसतसे प्रहरद्वय ते स्थळिं मागुति आणित त्यास तळाही ॥
काव्य कळा विकळा विफळा एक नाहिं जरी हृदिं प्रेमकळाही॥ ४
होउनि गुप्त स्वयें प्रगटे अजि जाय निघे मथुरा व्रज काशी ॥
शापबळें करि दग्ध भूमंडल दे सुख नश्वरही भजकांसी ॥
वास करी विजनीं जनिं हिंडत साहत शीतनिउष्ण जळांही ॥
काव्यकळा विकळा विफळा एक नाहिं जरी हृदिं प्रेमकळाही ॥ ५
तापत अग्निहि पांच महा आजि जो अतितीक्ष्णचि धूम्रहि प्राशी ॥
पाहत वक्रदिठीं तरि कंपित होत जगत्त्रय भीत जयाशीं ॥
भूतभविष्यहि जाणत वृत्त यथार्थ जळीं जड तारि शिळाही ॥
सर्व कळा विकळा विफळा एक नाहिं जरी हृदिं प्रेमकळाही ॥ ६
एक क्षणांत फिरोनि त्रिभूवन मागुति येत तयाचि स्थळातें ॥
पाहत सर्व जगासहि लोचनिं आपण त्या न दिसे बुबुळातें ॥
भूमिस स्पर्श नसोनियां आसन घालित दावित सिद्धिबळाही ॥
सर्व कळा विकळा विफळा एक नाहिं जरी हृदिं प्रेमकळाही ॥ ७
ईक्षणमात्रेंचि विश्व सुखी करि दवडुनि रोग निरोगित काया ॥
मान्य जगीं बहु तेणेंचि होतसे मानितसे कृतकृत्यपणा या ॥
एक मी सिद्ध, नसेचि दुजा, अजि बांधि अहकृतिपाश गळांही ॥
काव्यकळा विकळा विफळा एक नाहिं हृदीं जरि प्रेमकळाही ॥ ८
देवनाथप्रभु नांदत या हृदिं श्रीगुरु आत्माराम असा हो ॥
जाणुनि स्वानुभवें स्वसुखामृत पीउनि स्वस्थचि कां न बसा हो ॥
याविण साधन सर्व वृथा, हरिनामरसायण प्रेमकळा ते ॥
सेवित ते नर धन्य त्रिभूवनिं भोगिति पूर्णपणें सोहळा ते ॥ ९

---

## नरतनूची क्षणभंगुरता.

### पद (३५९).

क्षणभंगर नरतनु जाईल राजहंसा ।
ओढ जळत्या घरचा वासा ॥ ध्रु० ॥

---

१ घर तर जळतें आहे निदान काही लांकडें तरी वांचवावयाचीं, तसा आयुष्याचा ऱ्हास होत आहे, अजून तरी उरलेले दिवस सन्मार्गाला लाव.

जाती लवपळघटिका काळ लेखा[1] करितो ।
दिनरजनी माय म्हणे ग माझा पुत्र थोर होतो ।
आयुष्य हरुनि नेतो ।
छंद ॥ यालागीं सावध व्हावें । श्रीगुरुला शरण रिघावें ।
षड्वैरी हे जिंकावे । पाउलीं पाउल टाकावें[2] ।
परि अंतर न दुखवावें । आपणपर एकचि जाणावें ।
चाल ॥ जाणुनियां लीन असावें हरीच्या दासा ॥ ओढ० ॥ १
जैशी कां कोरित काष्टा कमळा पडली[3] ।
तैसी तुज तनु सांपडली ।
अवचिताचि पूर्वस्थिति नरतनु घडली ।
निजवस्तु[4] हातासि आली ।
छंद ॥ हे जतन करावी कैशी । ध्या पुसुनी संतांपाशी ।
ही समचरणाची[5] दासी । पदांबुज माय काशी ।
अक्षयी स्वर्गनिवासी । जग तारुनि तारायासी ।
चाल ॥ संतांची महिमा ऐशी सहजचि प्राशा ॥ ओढ० ॥ २
संतांशीं शरण निघाले मुक्तचि झाले ।
जन्ममृत्यूचें घाले सहजचि फिटले ।
ते अढळपदीं[6] बसविले ।
छंद ॥ संत दयाघन मोठे । धार्मिक उधर्मी लोटे[6] ।
क्षीरसागरिंचे हे घोंटे[7] । ब्रह्मींचे द्वारवंटे ।
दुष्टांसी तीक्ष्ण कांटे । साधकासि लाविति वाटे[8] ।
चाल ॥ संतांचें मायपोट घाली फांसा ॥ ओढ० ॥ ३

---

१ लेख, टिपण २ मागील समर्थ लोक ज्या पंथानें गेले तोच मार्ग बरोबर अनुसरावा. काष्टाला कोरतांना कमळा (भ्रमरी) यांतच अडकते तशी तुला ही नरतनु सांपडली, तुला वाटलें कीं ही तुला मिळाली, पण वास्तविक तूंच तिच्यांत बद्ध झालेला आहेस ४ आणिक जेव्हां नरतनूचा अकस्मात् नाश होऊन ती पूर्वस्थितीवर आली (म्हणजे देहांतील पंचतत्वांचा पचमहाभूतांत लय झाला) तेव्हां निजवस्तू (आत्मज्ञान) तुला प्राप्त झाली ५ विटेवरी जो समचरण सारखे पाय जोडून उभा त्या विठ्ठलाच्या पदाची दासी. ६–७ म्हणजे काय ! ८ वाटेला सन्मार्गाला लावतात.

मायेचा सर्व पसारा कां रे भुलला ।
श्रीगुरुनाथ कसा अंतरला ।
वय वृथाचि गेलें पडला घाला ।
नरतनूचा नाश केला ।
छंद ॥ कां रे संतवचन मानीना । निजगुज कां उमजुनि घ्याना ।
सावध अजुनी व्हाना । निजवस्तु आणा ध्याना ।
चाल ॥ म्हणे देवनाथ प्रभु पाहें आरसा ॥ ओढ० ॥ ४

## पद ( ३६० ).

गडिया । नदि दूथडिया भरली सद्गुरु करिं सांगडिया ॥ ध्रुवपद. ॥
वासवसम[1] मी मानिसि पाहुनि मालाच्या कोठडिया ।
हर्षें अतिउत्कर्षें बांधिसि द्रव्याच्या गाठोडिया ।
पर्वकाळिं त्वां धर्म न कवडी केला रे आठोडिया ।
समजें मनिं हें घातक हाणोनि फोडिल यम होटडिया । गडिया० । १
हेमभूषणें गळां अलंकृत मिरविशि किति चौकडिया ।
कर्णिं घालुनी वर बाळीतें मोतीं लावुनि बढिया ।
नवग्रह पोच्या हिरकणि मुद्रिया मणगटिं घालुनि काडियां ।
सुख मानिसि परि नुमजसि हित हें नकळत जानी घडिया । गडिया० । २
सप्तखणी या उंच हवेल्या बांधिसि किति आवडिया ।
तऱ्हेतऱ्हेचे बैठक आयने[2] लाविपल्या चौकडिया ।
काम सुनेरी बहुत मुलायम[3] चौरंडोल[4] हलकडिया ।
वर बैसुनियां कानेकरिंच्या खाशी किति तरि बिडिया ॥ गडिया० ॥ ३
अशाश्वत हें शाश्वत मानुनि करिशी रंगरगडिया ।
काळें तुजला बांधुनि नेतां वारी ना सांकडिया ॥
दंड यमाचा भोगिशि तेव्हां रडशी सोडुनि कुडिया ।
देवनाथ म्हणे यवन जैसा कापितसे बोकडिया ॥ ४

---

१ वासवसम=इंद्रासारखा. २ आयना=आरसा (फारशी) ३ मुलायम=मऊ गोड, सुंदर, उत्तम पाणी दिलेलें ( श्रेष्ठत्व दर्शविणाऱ्या अनेक शब्दांत हा शब्द आला आहे ) ४ चौरडोल = अंबारी.

## पद ( ३६१ ).

मग तूं ब्रह्म गड्या रे ब्रह्म गड्या । सोडिं अहमतिं ढुगड्या. ॥ध्रुवपद॥
वैराग्याग्नि सगड्या । पेटवीं स्वरूपीं घालीं फुगड्या. ॥ मग० ॥ १
वेंचिसि कां भ्रमकवड्या । फोडीं अहंकारमति उंबड्या. ॥ मग० ॥ २
वृत्ती करूनी निधड्या । निघ निघ लवकर जाती सुघड्या ॥ मग० ॥ ३
द्वैताद्वैत ह्या बेड्या । तोडुनि चुकविसि यमभय रगड्या. ॥ मग० ॥ ४
चित्सागरीं दे सुबुड्या । पाहें देवनाथप्रभु उघडच्या. ॥ मग० ॥ ५

## पद ( ३६२ ).

होईल काय गती रे । मूर्खा ॥ ध्रुवपद. ॥
विसरुनि या निजस्वरूपालागुनि । विषयीं रतली मति रे ॥ मूर्खा० ॥ १
अशाश्वत तनु समजुनि धरिसी । दाराधनीं प्रीती रे ॥ मूर्खा० ॥ २
वृद्धापें[1] तुज हें आल्या इंद्रियें । शक्ति मग गळती रे ॥ मूर्खा० ॥ ३
देवनाथ प्रभुनाथ निरंजन[2] । नाठविशी चित्तीं रे ॥ मूर्खा० ॥ ४

## पद (३६३ ).

तनू उत्तम हे श्रीनाथें । तुजलागीं दिधली बा रे !
करीं भक्ति राघोबाची । वाजवीं हे नामनगारे[3] ।
लागें संतगुरुच्या पायीं । निजस्वरूपा सहज विचारें ॥ ध्रु० ॥

---

* अहमति = अहंकार. सगड्या = शेगडी रगड्या = मार, रग्गे, धक्के. उबड्या = उबड, हांड्या. एकावर एक मडकें रचून जी उतरड रचतात ती. निधड्या = धैर्यवान्, हिम्मतवान्. सुघड्या = चांगल्या घटका.

१ वृद्धाप=वृद्धापकाळ. २ निरंजन=मायारहित ३ नामनगाऱ्यासंबधानें जनाबाई आपल्या एका पदांत म्हणतातः–" झडतो नामाचा चौघडा ॥ध्रुवपद॥ धरा सतरांचा हो मेळा । कारखाना झाला गोळा । वाजविती आपल्या कळा । प्रेमबळा आनंदें ॥ झड० ॥ १ ॥ झडतो नामाचा चौघडा । ब्रह्मीं ब्रह्मरुपींचा हुडा । संत ऐकताती कोडा । प्रेमबळा आनंदें ॥ झड० ॥ २ ॥ जनाबाई घड्याळ मोगरी । घटका भरतां टोला मारी । काळ व्यर्थची गेला तरी गजर करी आनंदें ॥ झड० ॥ ३ ॥ नामा दामा दोनी काळू । नारा विठा दमामे फैलू । चोघी सुना चारी हेलू । कडकडा बोल उमटती ॥ झड० ॥ ४ ॥ गोंदा म्हादा करणी करी । नादें दुमदुमली पंढरी । आवुचाई तुतारी । मंजुळ स्वर उमटती ॥ झड० ॥५॥ गोनाबाई नोबत पळा । नाद अंबरीं कोंदला । राजाई झांज मंजुळ बोला । मंजुळ स्वर उमटती ॥ झडतो० ॥ ६ ॥

योनि या लक्ष चौऱ्यांशीं । फिरतां तू बहु श्रमलासी ।
मळमूत्र दाथरामाजीं[1] । नवमास गर्भ धरिलासी ॥
चाल ॥ भरतांचि नेम दिवसासीं[2] । तनू बाहेर जन्मलासी ।
बालत्वदशा तुज ऐसी ॥
टीप ॥ लागतां अविद्यावायु सोहं मे श्रुति भुललासी ॥ तनु० ॥ १.
बालत्व मुलांचे संगें । खेळतां सर्व वीसरलें ।
येतांचि तरुण अवस्था । मन कांतेतें अनुसरलें ॥
चाल ॥ पशुवत् भ्रमविजनीं[3] फिरे रे । तृणविषयालागिं[4] सरे रे ।
सुख मानि किमपि न फिरे रे ॥
टीप ॥ सुतदार मनीं धरि प्रीति विसरुनियां स्वहित बरें रे ॥ तनु० ॥ २
जातांचि तरुण अवस्था । वृद्धत्व दशा तुज आली ।
क्षिण झालें तेज नेत्रांचें । श्रवणाचि देवता गेली ॥
चाल ॥ वय वर्षे सत्तर भरलीं । तनुमाजी शक्ति विराली ।
गृहदारसुलें हीं फिरलीं ॥
टीप ॥ बहु वाटताति श्रम तेव्हां अतिदुःखे मति चाचरली ॥ तनू० ॥ ३.
फिर मार्गे सत्वर आतां । गुरुनाथा शरण रिघावें ।
सद्भाव धरुनियां हृदयीं तत्पदीं हें मन अर्पावें ॥
चाल ॥ वचनामृत पान करावें । मग निजगुज जिविंच धरावें ।
स्वस्वरूपीं चित्त विरावें ॥
टीप ॥ प्रभु देवनाथ स्मर भावें मरणें तरि जितेंच मरावें ॥ तनु० ॥ ४

## पद ( ३६४ )

झर झर झर झर चालली नरतनु स्वस्थ बैसलासी ।
पट पट पट पट वय सरलें पुढें कैसें करसी ? ॥ ध्रुवपद ॥
अमोल काया जाइल वायां उमज पडेना ।
गर गर गर गर दिन आटले सोय सांपडेना ॥

---

१ दाथर=उकाडा. २ नेमदिवसासीं=नेमलेल्या दिवशीं. ३ भ्रमविजनीं=भ्रमरूपी निर्जन प्रदेशांत अविद्या=माया, ईश्वरी ज्ञानाचा अभाव ४ तृणविषयालागिं सरे=ज्याप्रमाणें तृणाकडे पशु धांव घेतो त्याप्रमाणें इंद्रियें विषयाला साहजिक उन्मुख होतात. न फिरे किमपि=कांहीं केल्या परावृत्त न होई. चाचरली=घाबरली.

सट्टाबट्टा[1] करिसी गड्यारे ! घेपुदेपु[2] नाना ।
आणखी तूं चिंता ठेविसी मष्करासि[3] जाणा ॥
चाल ॥ या कारभाराचें व्यसन वाइट ।
मी तुला सांगतों बुडलासि स्पष्ट ।
हा नरक लिहिला कपाळीं शेवट ।
हे यमदूत गांजिती तुला नीट ।
टीप ॥ फर फर फर फर पाश घालुनी ओढिति जीवासी ।
हर हर हर हर काय भूलला चुकेना यमजाची[4] ॥ झर० ॥ १
दा दिवसांचीं धनसुतदारा यांत नसे कांहीं ।
लटकी काया ममता माया फसला भवडोहीं ।
आयुष्य सरलें पुण्यहि सरलें संचित जें देहीं ।
अहोरात्र तूं खटपट करिसी दिनरजनीं पाहीं ॥
चाल ॥ तूं मार्ग विसरला सद्गुरुचरणाचा ।
तैं बळकट धरिला प्रपंच दोषाचा ।
'राम' म्हणतां रे ! कशि बसली वाचा ।
सर्वपरी तूं कैसा झाला बायलीचा ॥
टीप ॥ धिक धिक धिक धिक धिक जिणें तुझें विन्मुख नामासी ।
वन वन वन वन फिरुनी शिणला आला नरदेहासी ॥ झर० ॥ २
शास्त्रपुराण गीता भागवत सोडुनियां कामा[5] ।
लुट्ट लुट्ट लुट्ट लुट्ट सदा धांवसी विसरलासि रामा ॥
कन्यापुत्रसुनकलत्र कोणाचा मामा ।
आणिक तुज हे बंधु सोयरे ना येतिल कामा ॥
चाल ॥ मी तुला सांगतों सावध होय बा मूढा ! ।
तूं पटकन मरसिल कां झालासी वेडा ।
यम पायीं घालिल किल्लिकुलुप खोडा ।
जातिल मग या सर्व तुझ्या खोड्या ॥

---

१ सट्टाबट्टा=सराफीचा रोजगार, सावकारी. २ घेपुदेपु=बिनव्याजी देवघेव, निष्फळ व त्रासदायक धंदा; शुष्क मानगड. ३ मष्करासि=( ? ). ४ यमजाची= यमाची जाचणी. ५ कामा = कामसुखार्थ.

हें जाणोनी दुःख मानसीं कुरकुर कां करिसी ।
कुर कुर कुर कुर करुनी तरी ना चुके यातनेसी ॥ झर० ॥ १
प्रपंच करुनि होय रे ! अलिप्त न लगे त्याचे अंगा ।
करुणा करिल होय रे ! झडकरी भज पांडुरंगा ॥
पट पट पट पट विषय सोडुनी धरीं तूं सत्संगा ।
धरिं धरिं धरिं धरिं आज पाय,तूं, नेतिल भवभंगा ॥
चाल ॥ तूं दे सोडुनि हे अवघी खटपट ।
मग सोपी होइल तुला पायवाट ।
मग रामप्रतापें यम फिरविल पाठ ।
सहजचि चढशिल उन्मनिंच्या घाट ।
टीप ॥ देवनाथ म्हणे रे ! प्राण्या भज गुरुनाथासीं ।
हो हो हो हो शरण त्वरें तूं चुकविं यातनेसी ॥ झर० ॥ ४

## पद (३६५)

अमोल काया जाइल वाया जसी कांच कीं फुटे फटकन् ।
उभा काल विकाल लक्षितो वेळ होय सावध झटकन् ॥खूप समजा॥
कृतिं त्रेतीं द्वापारीं होती आयुष्याची बहु भरती
कळीमाजि शतवर्षें नेमिलिं तींहि न भरति पहा पुरतीं ।
बारा चौदा पधरा विंशति पंचविसांमधिं किती मरती ॥
मागें मेले पुढेंहि मरणार कोण करिल याची गणती ॥
आजा काका मामा मेला याची साक्षी ध्या चित्तीं ।
त्यांचे शोकें दुःखित मानस शेवट तुमची तेचि गती ॥
देह आपुला जाइल वारी धरा सोय कांहीं झटकन् ।
समय पातल्या उशिर न लागे गिळी काळ येउनि गटकन् ॥खुप स०॥
हत्तीघोडेमालखजीना कोणाची माविर माडी
शेवटि जाइल कांहिं न राहिल काय धरुनि याची गोडी ॥
तारुण्याच्या भरें घालशिल विषयभरें दाढुनि फुगडी ।
आहा शेवटच्या समय कठिण तो जेंव्हां काळ येउनि रवडी ॥
कांता सुंदर रंभा जैशी तिची मनाला प्रिय गाढी
जबरदस्त हा पाश स्त्रियेचा जशी कवाडा कुलुपकडी ॥

मोहसुसरी सोंगळ जी जळीं पाय धरुन ओढी मटकन् ।
जशी नंगी समशेर देहाचे तुकडे तुकडे करि कटकन् ॥फिर मागें॥ २

श्रीगुरुगोविंदनाथनिरंजनपदरेणू जेव्हां वरिला ।
आत्मा मी हा ब्रह्मसनातन, शुद्ध भाव तेव्हां कळला ॥
जिकडे पाहे तिकडे अवघा चराचरीं चिद्धन भरला ।
एकपणीं ऐक्यत्व लाधलें द्विधाभाव सर्वही हरला ॥
पुरला हेतू नयनद्वारें हृदयसरोजीं गुरु भरला ।
देवनाथ म्हणणेंचि आटलें लवण जळीं तैसा विरला ॥

विरला पुरला भरोनि उरला तो सुमनें गिळिला गटकन् ।
देहविदेही स्थिती बाणली जन्ममरण खंडित खटकन् ॥धन्य गुरु॥ ३

## पद ( ३६६ )

उत्तम[1] हा नरदेह तुला लाधला पूर्वभाग्यें ।
साधन ऐसें साध किं जेणें कीर्ति उरे मागें ॥ ध्रुवपद ॥

धनकणसुतकामिनि हे मानुनि सत्य स्वमन भुललें ।
न सुचे निशिदिनीं दुसरें अणुही विषयसुखा रतलें ॥
लंपट होउनि खटपट करितां पटपट वय सरलें ।
काळ वेळ सन्नीध पातल्या उघडति ना डोळे ॥
समय कठिण तो संगि न होती कोणी आप्तवर्गें । साधन० ॥ १

समज उमज अरे गमज टाकुनी शरण होय गुरुते ।
अशाश्वता तनु शाश्वत न दिसे समज मनीं पुरतें ॥
भवभ्रंशबद्धांशपाशें[2] सुखविषय करीं परतें[3] ।

१ उत्तम हा नरदेह:—" मनुजदेहमिमं भुवि दुर्लभं । समधिगम्य सुरैरपि वांछितं । विषयलंपटतामपहाय वै । भजत रे मनुजा: कमलापतिम् ॥" कमलापति अष्टक संगी = सोबती. २ भवभ्रंशबद्धांशपाश —संसारचक्राच्या गोत्यांत बद्ध करून टाकणारे पाश. ३ परतें करीं = दूर सारीं

गुरुवरकर शिरीं[1] कृपावरद मग प्राप्ति परेपरते[2] ॥
होचि देहिं स्थिति पूर्णविदेही[3] मनिं अनुभवीं वेगें । साधन० ॥ २
आत्मा आपण चिद्धन अनुभव समजुनियां देहीं ।
समरस करिं मन तयांत भोगीं समाधि निजठायीं ॥
उघडसमाधी निजात्मबोधीं उपाधिरति नाहीं ।
योग साधीं हा भोग त्यजुनि मग रोग नुरे कांहीं ॥
समसर्वभूतेषु पाहणें[4] तरीच भव भंगे । साधन० ॥ ३

---

१ गुरुवरकर शिरीं इ०:—" नरदेह आश्रऊन । ब्रह्मविद्या वाढली जाण । ते आपुलें जन्मस्थान । देहनिर्दळण केवीं करी ॥ गुरुवचनाचें अनुसंधान । निजस्वार्थालागीं सावधान । अविश्रम करितां मथन । ब्रह्मज्ञान तें प्रकटे ॥ प्रगटलें ब्रह्मज्ञान । उरों नेदी देहाचें भान । दृश्यद्रष्टादर्शन । करी प्राशन तात्काळ ॥ कार्य कर्म आणि कर्ता । ज्ञानज्ञेय आणि ज्ञाता । हें उरों नेदी सर्वथा । निजात्मता निजबोधें ॥ निजबोधें संसारदुःख । निरसूनि दिधलें निजसुख । निजात्मसुखीं निःशेख । माया गुणदोष नासले" एकनाथी भागवत अ. १० ओंव्या ३३७, ३४७ तसेंच पुढें नाथ म्हणतात:—"तेव्हां ब्रह्माहमस्मि लक्षण । तेंही होवों लागलें क्षीण । सोहं हंसाची बोळवण । ते सधीं जाण होतसे ॥ तेथ देहींचें गेलें देहपण । जन्ममरणा आलें मरण । विश्वाचें न दिसे भान । आनंदघन कोंदला ॥ तेणें सुखस्वरूप जाली दृष्टी । आनंदमय जाली सृष्टी । परमानंदें चढली पुष्टी । स्वानंदें मिठी घातली ॥ त्या सुखाची मर्यादा । कासयानें न व्हे कदा । जेथ मौन पडलें वेदा । वृत्ति तत्पदा पावली ॥ जैसा निरिंधन अग्नी । जाय निजतेजीं मिळुनी । तैशी वृत्ति अद्वैतपणीं । मिळे मिळणी सुखरूपीं ॥ गंगा सागरा मिनली । ते समुद्रचि होऊनि ठेली । कां लवणजळा भेटी झाली । मिठी पडली जळत्वें ॥ दीपीं दीपू एकवटला । मिळणीं एकचि होऊनि ठेला । तैसा वृत्तींचा लयो जाला । निर्व्यंग पावला निजसुख ॥" अ. १० ओंव्या ३५६–३६३. २ 'प्राप्त परेपरते=छापील पाठ 'प्राप्ति परपरते' असा आहे पण त्यानें व्याकरणसंगति ध्यानांत येत नाहीं. कृपावरद गुरुवरकर शिरीं झाल्यावर परेपरतें (परावाणीच्या पलीकडील जें ज्ञान) तें प्राप्त होतें असा अन्वयार्थ जुळतोसें वाटतें ३ देहप्राप्ति असतांही पुन्हां पूर्णविदेही स्थिति ती हीच हें तात्काळ आपल्या मनाला अनुभवाला आण ४ सम सर्वभूतेषु पाहणें:—"समं सर्वेषु भूतेषु तिष्ठंतं परमेश्वर । विनश्यत्स्वविनश्यंतं यः पश्यति स पश्यति" भगवद्गीता अ. १३ श्लो. २८ ज्ञान आणि विज्ञान प्रासुनी = ज्ञान आणि विज्ञान या दोहोंतील फरक काय याबद्दल पान ३३१ खालची पांचवी टीप पहा. उघडसमाधी = सहजसमाधि = समाधिव्युत्थान पान २९६ खालची टीप पहा.

देवनाथ तुज हात जोडी मन खोडी सकळ सांडीं ।
ज्ञान आणि विज्ञान ग्रासुनी पूर्ण खेळ मांडीं ॥
तूं तूं तू चैतन्य तूंचि तूं दुजा नसे धुंडीं[1] ।
सद्गुरुवचनें स्वात्मधनाची भरूनि घे हुंडी ॥
मान वचन, अनमान त्यजुनि,[2] हा अनुभव घे अंगें । साधन० ॥ ४

पद ( ३६७ )

ही तनु प्राप्त तुजला निजभाग्यें । सख्या तूं साधिं त्वरें हित जें ॥ध्रुवपद॥
देह अमोल्य परी अशाश्वत जाइल हें तुमजे ।
वास्तव साधन हेंचि करीं निजस्वात्मसुखा उमजें ॥ ही तनु० ॥ १
रामहरिजयकृष्णहरि हे वाणि सुखें गर्जें
चिद्घन हें सुखसार निरंतर सेविं सुखा पर जें[3] ॥ २
श्रीगुरु गोविंदनाथ निरंजन या पदिं मन विरजें[4] ।
देवनाथ निजस्वानुभवीं रूप सभराभरें भरजें[5] ॥ ही तनु० ॥ ३

पद ( ३६८ )

उत्तम हा नरदेह तुला लाभला सौख्यखाणी ।
आत्मा आपण ब्रह्म उमज अनुभवीं वचन मानीं[6] ॥ ध्रुवपद ॥

---

१ तूच परब्रह्मचैतन्य असें त्रिवार बजावुन सांगतो दुजा नसे धुडीं ( हा पाठ खरा असल्यास ) तू परब्रह्मचैतन्याशीं एक आहेस दुसरा नव्हेस याबद्दल धुंडीं ( शंका असल्यास शोध करून पहा ) हा छापील पाठ आहे दुसरा असल्यास सुचवावा. २. सद्गुरुवचनें ( त्या वचनावर दृढ विश्वास ठेवून ) स्वात्मधनाची ( आपणच परब्रह्मचैतन्य हें जें अत्यंत गुह्य ज्ञान आणि म्हणूनच फार मौल्यवान् धन त्याची ) हुंडी ( भांडें; हांडी ) भरून घे हें ज्ञान पूर्णपणें आपलेंसें करून घे. मान वचन ( मी जें वचन सांगतों, अनुभववाक्य बोलतों, तें मान = त्यावर विश्वास ठेव ) अनमान त्यजुनि = त्याबद्दलच्या सर्व शंका आशंका एका बाजूला ठेवून. ३ सुखा पर जें = तूं ज्याला नेहमीं सुख असें समजतोस त्याला पर ( अतीत, पार, श्रेष्ठ ) असें जें ( चिद्घन सुखसार तें निरंतर सेवीं ). ४ विरजे = विलीन होई, लीन होई सभराभर = मागें ४९५ पानावरची पांचवी व चारशें पानावरची पहिली टीप पहा, येथें अर्थ अन्तर्बाह्य—आंतून बाहेरून ५ भरजे = भरे, भरून जाई; पण असें रूप कोशांत कोठेंही आढळत नाहीं. ६ आत्मा आपण ब्रह्म इ०:— आत्मा हाच परब्रह्मस्वरूपी आहे असें अनुभवीं उमज ( आपल्या स्वतःच्या प्रत्ययाला आणून घे ).

ऊठ जाय गुरुपाय धरीं बा काय बैसलासी ॥
क्षणिक विषय मनिं सुख मानूनी त्यातच रमलासी ॥
कन्यासुतधनदारमोहा हार्दि फारच धरिसी ।
लंपट होउनि खटपट करितां बहुत श्रमलासी ॥
उलट उलट माघारा[1] चतुरा उगाच भ्रमलासी ।
अशाश्वत तनू शाश्वत नाहीं उठ कां निजलासी ॥
टीप ॥ जाग स्वरुपीं निजमार्ग धरुनि, बा ! लाग हरीभजनीं । आत्मा०॥१
भजन हरीला प्रिय, त्यागीं तुज प्रिय कनकदारा ।
जाय शरण निजभावें त्रिभुवनपतिहरिसरदारा ॥
रामकृष्णगोविंदछंद निशिदिनिं धरिं मुरहरा ।
करुणा उपजेल तुझी मग त्या मुनिमनमांदारा ॥
कृपावंत भगवंत धरुनि करिं गुरूसुभेदारा ।
निरविल तैं मग निजात्मस्वसुखें येशिल उजदारा[3] ॥
टीप ॥ लक्ष धरिसि करिं लक्षपति गुरू नेइल निजभुवनीं । आत्मा०॥२

---

उलट उलट माघारा:--प्रवृत्तिमार्गाला सोडून निवृत्तिमार्गाकडे वळ. २ मुनिमनमांदारा:—मांदार म्हणजे कल्पवृक्ष मुनिजनांच्या सर्व इच्छा विशेषें मोक्षेच्छा पुरविणारा मंदार हा पर्वतविशेष. हे दोन्ही शब्द वेगळे. निजमार्ग=अत्यंत श्रेष्ठ ( निज ) असा मार्ग; पर्यायानें ब्रह्मज्ञानप्राप्तीचा मार्ग ३ उजदारा:—उजदारा म्हणजे the first front floor अगदीं पुढचा दरवाजा असा अर्थ मोल्स्वर्थच्या कोशांत आहे उजदार, उजुदार अशीं दोन्हीं रूपें त्या ठिकाणीं दिली आहेत. कृपावंत भगवंत हा आपला मालक, राजा हा तुला हातीं धरून गुरूसुभेदाराला निरवील त्याच्या स्वाधीन करील ( तुला ज्ञानाजन देऊन तरबेज करण्याकरितां ) तेव्हां मग तूं आपोआपच निजात्मस्वसुखीं उजदारा येशील ( ब्रह्मज्ञानसौख्याच्या उंबरठ्यात येऊन पोंचशील ) त्यानंतर जर तूं लक्ष धरिशि ( गुरुचरणावर एकनिष्ठपणानें लक्ष ठेवशील ) तर तुला लक्षपति गुरु ( लक्ष = चित्त, मन, याचा गुरु = नियंता, चालक ; मनाला आकलन करावयाला लावून सन्मार्गाला लावणारा सद्गुरु ) करिं निजभुवनी नेईल ( करिं= हातानें धरून, इतक्या काळजीपूर्वक कीं तूं फसणार नाहीस निजभुवनी =उजदाराच्या अगदी आंत पलीकडे, ब्रह्मज्ञानाच्या मंदिराच्या अगदीं आंतमध्यें ). कारण ईश्वरानें गुरूच्या स्वाधीन केलें कीं तू मोक्षमंदिराच्या देवडीपावेतों पोंचलास, पुढें तू गुरूवर निःशंक विश्वास ठेवलास कीं तो तुला त्या मंदिराच्या अगदीं आंतल्या गाभ्यांत नेऊन पोंचवील.

पाहें लोचनीं निजात्मभुवनीं नादत चित्पुतळा ।
अनंत दिनमणि लज्जित तेजीं स्वतेजबळाळा ॥
नाम न रूप न वर्ण व्यक्ति गुण परमपुरुष भोळा ।
निघोट जो घनदाट थाटला व्यापुनी निराळा ॥
ज्या वर्णित मुखिं फणिवर शिणला श्रुतिशास्त्रमेळा ।
तो तूं तुजविण अन्य नसे निजस्वरुपीं लावि डोळा ॥
टीप ॥ समरस करिं मन भोगिं सोहळा समाधिव्युत्थानीं[1] । आत्मा० ॥ ३
देवनाथ प्रभुनाथ निरंजन कृपांजना देतां ।
निरसि तिमिरअज्ञान लाहसी सुख नयनीं लेतां ॥
उदय करिल चित्सूर्य जाय भ्रमअंधकार परता ।
मग तूं साच तूं शाश्वत बा हें निजगुज अनुभवितां ॥
गुरुवचनीं विश्वास धरुनि वरि बांधिं कास आतां ।
चिदानंद आनंदप्राप्ति तुज ऐक्यपणें रमता ।
टीप ॥ नसे अन्य तुजवीण एक तूं व्याप जनीं त्रिजनीं । आत्मा० ॥ ४

पद ( ३६९ ).

ही तनु, बहुत सुखघनू[2], लाधली मनु[3], थोर दैवें ।
हित अशांत[4] उमजावें ॥ ध्रुवपद ॥
किति तरी, विषयसुखभरीं भरिसि[5], अंतरीं कसें न कळे ? ।
भोगिसी दुरितसोहळे ॥
वैखरी[6], स्मरेना हरी, दुःखसागरीं, शरीर गळलें ।
भूललें चित्त अवळे ॥
सुसरी, नव्हे हे बरी, कट्यारी उरीं, दिली काळे ।

१ समाधिव्युत्थानीं = याबद्दल २१६ पानाखालची टीप पहा २. सुखघनू = सुखपूर्ण; सुखानें भरलेली ३ मनु = मानवी; मनुष्ययोनींतील ही मोल्यवान् कारण इच्यांतच ईश्वरभक्ति शक्य आहे ४ अशांत = इतक्यात; ही जोंवर आहे तोंपावेतोंच ५ विषयसुखभरीं भरिशी = विषयसुखाच्या भरीं लागतोस, त्यातच दंग होऊन पुढलें विसरतोस. ६ वैखरी = वाणीनें ( तृतीया ); शरीर गळलें = हा दाजीसाहेबांकडील पाठ. छापीलपेक्षां जास्त शोभतो. तसाच पुढें " कार्मि कां प्रीति करिशि " हा पाठ. अवळे = खिचेला. कट्यारी वरी = ' ही कामाची तलवार '.–सार = समर्थ, श्रेष्ठ.

का धुरें धुद डोळे ॥
चाल ॥ सांडि हा त्वरेनें छंद, अहो छंद ।
कालानें मांडिला फंद, अहो फंद ।
का बुद्धी झाली मंद, अहो मंद ॥
चाल दुसरी ॥ हा विचार नव्हे रे सार, अहो सार ।
या गुणें बुडाले फार, अहो फार ।
का उगाच वाहसी भार, अहो भार ॥
टीप ॥ वदों किती, फिरेना मती, कामिं कां प्रीति करिशि भावें ।हित.॥१
हा कुभंड, प्रीतिचा भंड, होईल मग दंड, देणें लागे ।
सत्पथीं म्हणुनि वागें ॥
तो प्रचंड, यमाचा दंड, करिल तनुखंड[1], फिरें मागें ।
उठिं उठिं त्वरित जागें ॥
हें बंड, त्यजुनि औदंड, भजनीं अखंड, चित्त लागे ।
भवमूळ समूळ भंगे ॥
चाल ॥ विषयाचा सांडीं रंग, अहो रंग ।
साधूचा धरावा संग, अहो संग ॥
हरिनामें वाजवि चंग, अहो चंग ॥
चाल दुसरी ॥ धरिं प्रीति हरीचे नामीं, अहो नामीं ।
नांदसी बरा सुखधामीं, अहो धामीं ।
विनटल्या मती श्रीरामीं, अहो रामीं ॥
टीप ॥ श्रीराम, पूर्णमनुकाम[2], करिल विश्राम, प्रीतिं गावें । हित० ॥ २
लाधली, तुला हे भली, ईश्वर दिली, बरी काया ।
खोवितोसि हे वाया ॥

---

१ तनुखंड = देहाची खांडें, तुकडे. औदंड = उद्दंड, पुष्कळ, प्रचंड. औदंड भजनीं जरि अखंड चित्त लागे तरी भवमूळ समूळ भंगे. २ पूर्णमनुकाम—व्युत्पत्ति काय ? विनटल्या—तल्लीन झाल्यास; पुढें निवटिला शब्द आहे त्याचा अर्थ नष्ट झाला. २६७ पदाखालची चवथी टीप पहा म्हणजे या दोन्ही शब्दांचे फरक दाखविणारीं उदाहरणें सांपडतील, वाजवीं चंग = चंग हा फारशी शब्द आहे. मोल्स्वर्थ म्हणतो कीं, हें ज्यू लोकांचें एक वाद्य आहे. हें आमच्या महाराष्ट्रकवींनीं कधींपासून उचललें ?

भ्रमभुलीं, कशी भुलली, मती भ्रष्टली, तुझी राया ।
इच्छिसी द्रव्य जाया ॥
थोरली, यमें धाडिली, दूति आपुली, चाळवाया
नेतसे निरयठायां ॥
चाल ॥ नेत्राचा तीक्ष्ण बाण, अहो बाण ।
लावोनी हरिते प्राण; अहो प्राण ।
मारिले थोर सज्ञान, अहो सज्ञान ॥
चाल दुसरी ॥ हे केवळ विषयमूळ; अहो मूळ ।
नाशील हे गृहकूळ, अहो कूळ ।
बहुत केली धूळ, अहो धूळ ॥
टीप ॥ चांडाळ, रांड हें जाळ, भासत काळ, मनोभावें । हित० ॥ ३
करिं त्वरा, तू जा बरा, शरण गुरुवरा, जाय वेगीं ।
श्रीगुरुराजयोगी ॥
सुखकरा, कृपा अंतरा, उदेल्या खरा; दु खभागी
मद्भाव धरीं अंगीं ॥
जयकरा; भ्रांत अंतरा; स्वरूपसुख धरा, अंतरंगीं ।
रंगोनि आत्मरंगीं ॥
चाल ॥ सहजची गळला भ्रम, अहो भ्रम ।
आपणची झाला ब्रह्म, अहो ब्रह्म ।
लाधला सुखें संभ्रम, अहो संभ्रम ॥
चाल दुसरी ॥ गुरुनाथ दयाघन थोर, अहो थोर ।
निवटिला सकळही घोर, अहो घोर ॥
स्वानंदें नाचे मोर, अहो मोर ।
टीप ॥ देवनाथ, भावें गुण गात, जाहली मात, न वर्णवे हित० ॥ ४

१ ... २ संभ्रम = याचे अर्थ ( १ ) आदर, सन्मान, सत्कार ( २ ) घाई, उतावळी ( ३ ) त्रास, धाक, दहशत, भय ( ४ ) लाभ ( ५ ) बुद्धिभ्रंश सहजचि गळाला भ्रम आणि ... जहाला ब्रह्म हा संभ्रम ( ब्रह्मै-क्याचा लाभ ) सुख लाधला ( अनायासें पावला ) येथें लाभ हा चवथा अर्थ लागतो स्वानंदें नाचे मोर = मनाला मयूराची उपमा. पद ७१ खालची टीप व पद १२८ खालची तिसरी टीप पहा. " निर्विकल्पें मनमयुर दान द्यावा " देवनाथ घो... = काळजी मात जाहली = अर्थात जिंकली

पद ( ३७० ).

धन दरकुटें[1], भरी चिरकुटें, उंच लेत गोमटीं
उमजना मतिमंद तनूची रक्षा हे शेवटीं ॥ ध्रुवपद ॥
नश्वरमदें अतिमत्त आपणा समजे मनीं आणिक ।
हय रथ गज वहनादी उभर बसुनि मिरवि सीबिके ॥
उंच हवेली नरम बिछाना, किनखापी तोषके ।
निजत बसत कानेला घेउनि मटमट घेतो मुके ॥
सुख मानुनियां भुलला भारी, करीतसे कौतुकें[2] ।
'अचडें बचडें छकडें'[3] म्हणउनि लाडवितो बाळकें ॥

---

१ धनदरकुटें भरी, चिरकुटें उंच लेत गोमटीं=धन आणि दरकुटें आपल्या घरांत भरतो, आणि उंच ( उंची, मौल्यवान् ) गोमटीं ( सुंदर, शोभिवत ) चिरें ( चिरगुटें,वस्त्रें ) लेत ( लेतो, परिधान करितो ) चिरें याच्याबद्दल चिरकुटें हा शब्द जसा तिरस्कारयुक्त योजिला आहे तसाच दरक ( दरकदारी, सरदारी, सरकारी वंशपरंपरेची नोकरी ) याबद्दल दरकुटें हा निंदाव्यंजक शब्द लिहिलेला दिसतो नश्वरमदें अतिमत्त आपणा समजे मनीं आणिक—नश्वरवस्तुवैभवाच्या मदानें अतिउन्मत्त आपणाला आपण कोणी तरी आणीकच (इतरांपेक्षा मोठे, विशिष्ट ) विशेष आहों असें समजतो २ करितसें कौतुकें = कौतुक ( नपुंसकलिंगी अर्थ लाड, चोज, सोहाळे ). अर्थ चिंतनीय आहे. ३ अचडें बचडें छकुडें = ( प्रस्तावना प्यारायाफ ५० पान ५८-५९ पहा ) ही शब्दपंक्ति नाथांच्या अगोदर मध्वमुनीश्वरांची "अचडें बचडें छकुडें माझें ॥ ध्रु० ॥ विकसितपंकजलोचन ज्याचे जननि म्हणे हें चिपडें " तसेंच " पार्थ हें बछडें बाळक अजुनी दुग्ध दिसे अधरीं । भुजवणियास्तव पशुपक्षि भिती निर्भय क्षेम करीं " अमृतराय पद. " बाळ खेळवा; पालख हलवा, रडूं लागला बाहिर न्यावा, अंगडेंकुंचडें अचडेंबछडें, कडिवरि घ्यावा माझें छकडें, नका नेऊं त्याला उघडें " अमृतरायकृत कटाव. प्रस्तावना भाग ५० पहावा. नाथांची रसिकता कळेल

चाल ॥ भोगितो विषय धडफुडा'।

---

१ **धडफुडाः**–( क्रियाविशेषण 'भोगितो' याचें ) पुढें पुढें करीत धडपडून, धडपड करीत पुढे जाऊन हा बहुलार्थी शब्द आहे याची उदाहरणें (१) कर्माभिनिवेशपरिपाडें। कामलोभ दृढ वाढे। तेणे दांभिक करणें घडे। क्रोधाचें चढे महाभरितें ॥ १४ ॥ ते काय करितील बापुडे। शुद्धसत्वें सांडिले फुडें। मग रजोगुणें कामाकडे। झाले **धडफुडे** अतिकामी ॥ १५ ॥ ए भा अ ५ येथेंही वरील अर्थ लागतो (२), 'वैराग्याचे निजनावाडे। अढळ बसले चहूंकडे। विषयांचे आदळ रोकडे। चुकवूनि **धडफुडे** काढिती कांहीं ए. भा २–३२२ येथें तोच अर्थ (३) सत्वर अथवा धडपडीनें या दोन्ही अर्थी " ज्याचा शेंबूड त्यास न फिडे। त्याच्या दास्यत्वें काय प्राप्ती जोडे। ऐकोनि निर्गुणीं धडपुडे। भजापां तुह्मी श्रोतेहो " शेख महम्मदबाबा (४) उघडपणें, दृग्गोचरत्वानें या अर्थी " सरळ बाहुदंड। न कळे कानवड। आंगुलिया **धडफुड**। खुणा दाविती गे माये " आवस्थांची ज्ञानेश्वरी गाथा पान ६३ (५) कुशल या अर्थी " निघंटु वसे मज्ञेपुढां। चमत्कारू जाणे गारुडा। पंचाक्षरी अतिगाढा। वैद्य **धडफुडा** रसज्ञ ॥ " ए भा ११–५३१ (६) खालील ओंव्यांत 'धडफुडें' या विशेषणाचा अर्थ 'सर्वांगी साक्षात्कारी' असा दिसतो "ज्ञानेंवीण भक्ती न घडे। म्हणती तें शब्दज्ञान धडफुडें। भक्तीस्तव जाण रोकडें। ज्ञान जोडे अपरोक्ष ॥ यालागीं माझें भजन करिता। ज्ञानाचा पांगु नपडे भक्तां। देहगेहामाजी वर्ततां। बंधन मद्भक्तां लागेना " एकनाथीभागवत ११–६७० (७) खालील 'धडपुडा' या क्रियाविशेषणाचा अर्थ तात्काळ " जेवीं का सैंधवाचा खडा। पडला सिंधूमाजी वडा। सिंधूचि येवढा। तेवीं तो धडफुडा ब्रह्म होय।" एकनाथीभागवत ११–७२१–(८) पुढील ओंवींत 'धडफुडे' म्हणजे उल्हासित अत्युत्कठित, असें असावेसें दिसतें " वाऊनि भूमंडलाचे वेढे। व्यंकटकटाक्षें बाण गाढे। रोकडे। केले **धडपुडे** सतेज " एकनाथीभागवत ६–२२५ (९) धडपुडा या विशेषणाचें स्त्रीलिंग 'धडफुडी', असें एकनाथमहाराज देतात " यालागीं हरिकीर्तनी गोडी। जयासी लागली धडफुडी। त्यासीं नानासाधनांच्या वोढी। सोसावया सांकडीं कारण नाहीं " एकनाथीभागवत ५–५६. रा लक्ष्मणराव पांगारकरांच्या निर्णयसागरीभागवतांत 'धडफुडी' या शब्दाचा अर्थ टीपेंत 'खरोखुरी, अंतःकरणापासून' असा दिलेला आहे. (१०) नवव्या अध्यायांतसुद्धां धडफुडी म्हणजे खरी असाच अर्थ पांगारकरांनीं दिला आहे. "आज्ञा जाणोनी **धडफुडी**। मेरू बैसका न सोडी। चेतना आज्ञा करी गाढी। अचेतन कुडी चेतवी" ॥ ९९ ॥ (११) परंतु काव्यसंग्रहांतील मुक्तेश्वरकृत

( पुढील पृष्ठ पहा. )

अति समय कठिण पुढें कुडा[1]।
वाजवी काळ चौघडा[2] ॥
टीप ॥ नेत जीव तनुप्रति शुभा[3] मग रचती गंगातटीं । उमजेना० ॥ १
जननिजनक निजआप्त सोयरे मामा आणि चुलता ।
घालुनिया यम पाश नेत कीं तुज देखतदेखतां ॥
जाणुनि ऐसें त्याच विषयिं तू रमसि फिरुनि मागुता ।
खटपट करसी हांव धरुनि तुज लाज न ये झीणतां ।
माया विद्या दृश्यभास कीं सकळही जाणतां ।
भ्रमसी दाढुनि उगाच याहुनि कोण तुझी मूर्खता ॥

---

( ५६६ वरून समाप्त )

हरिश्चंद्राख्यानांत रा. दामोदर केशव ओक बी. ए. यांनी " मज विश्वामित्र ऋषीपुढें । भूपाळत्व कायसें बापुडें । क्षणामाजी करीन वेडें । वचन धडपुडें बोलिला " या ओंवीखालीं धडपुडें म्हणजे ' कठोर, मर्मभेदक ' असा अर्थ दिला आहे. आम्हांला वाटतें कीं, निश्चयात्मक असा येथें अर्थ असावा (१२) मल्लहकवीकृत भरतभेटीमध्यें बिभीषण रावणाला उपदेश करतांना ह्मणतो:—

'जेणें पाप घडे, स्वमार्ग न घडे, शास्त्री दिसे वांकडें, ।
केली कीर्ति बुडे, शुभांत न पडे, जेणें घडे सांकडें,
जेणें शांति दडे, गुणांत न जडे, लोकांत नाम्ना उडे ।
तें हें सर्व कुडें, त्यजीं धडपुडें, घे येश गा रोकडें "

येथें धडपुडें हें कुडें याच्या विशेषणात्मक मानलें तर अर्थ वेगळा होईल. धडपुडें हें क्रियाविशेषण मानलें तर ' एकदम, तात्काळ ' असा अर्थ दिसतो. मोल्स्वर्थच्या कोशांत फक्त 'धडफुडीं' हें क्रियाविशेषणार्थी रूप दिलें असून quickly, promptly ' ( तावडतोब, लवकर. ) असा तेथें अर्थ दिला आहे. एकंदरींत अशा अर्थबाहुल्यात्मक शब्दाची सांगोपांग व सेतिहास उपपत्ति प्रसिद्ध होईल तर बरें. देवनाथांनीं एकनाथज्ञानेश्वराची शब्दकळा उचलली होती याची साक्ष या व इतर शब्दांवरून कशी होते याबद्दल प्रस्तावना भाग ४९ पहा.

१ कुडा=वांकडा, दुष्ट. २ काळ चौघडा वाजवीत वाजवीत जिवाला नेतो ( अखेरीस मीं देहांत केला याबद्दल यशोदुंदुभी वाजवून ) आणि मग तनूप्रति ( देहाला जाळण्याकरितां ) गंगातटीं ( नदीकांठीं ). ३ शुभा ( गोंवऱ्या विशेषेंकरून प्रेताला दहन करण्याकरितां रचलेल्या गोंवऱ्यांना हा शब्द लावतात ) रचिती

चाल ॥ हे क्षणिक रे संगती ।
जाणोनि सांडि अहंकृति ।
श्रुतिवाक्य वदति हे निती[1] ॥
टीप ॥ नेणुनि माझें माझें म्हणसी धनदाराकारटीं । उमजेना० ॥ २
किति तरि वायां शिणसिल आतां फिर मागें सज्जना
विनटुनि श्रीगुरुपायिं वदनिं करिं हरिनामें गर्जना ॥
काय करिसि हा भवरोग रे त्याज्य करुनियां जना ।
वैराग्यें तनुशीं शुष्क करावें सोडुनि लोकेशना[2] ॥
कन्यासुतगृहदारधनाची समुळ सांडिं वासना ।
गुरुकृपेनें स्वमना बैसवीं निजात्मनिजासनां[3] ॥
चाल ॥ घातक हे ईषणा खरी ।
पाहा दारा जैसी खरी ।
निश्चयें मान वैखरी ॥
टीप ॥ विनटें निजात्मसाधनीं दुस्तर कुटिळ वासना कुटीं । उमजेना० ॥ ३
यथायुक्तश्रुतीअन्वयग्रहणें नाम जपें सरसें ।
गुरुवचनाशयप्रत्यय जाणुनि चित्स्वरुपालयिं वसें ॥
मेळवुनि मन स्वरुपिं समाधिसुख भोगिसि समरसें
निजात्मरंगें रंगुनि आपणा जगिं मिरवावें पिसें[6] ॥

---

१ निती = नित्य, सदोदित २ लोकेषणा–लोकप्रियता अथवा लोकप्रसिद्धीची हाव द्रव्येषणा, दारेषणा, लोकेषणा या तीन ईषणा प्रसिद्ध आहेत ३ बाह्योपाधींपासून मनाची निवृत्ति करून आत्मस्वरूपाचेठायीं त्याची एकाग्रता कर ४ ईषणा = (कोणत्याही प्रकारची हाव, लोलुपता) खरा–गाढवी निश्चयें मान वैखरी = भाषे बोलणें सत्य मान ५. विनटें = तत्पर होई, लीन होई २३७ पदाखालीं चवथी टीप या शब्दाबद्दल पहा कुटीं = कुटून चूर्ण कर सरसें = त्वरेनें, वेगानें, जोरानें यथायुक्तश्रुतिअन्वयग्रहणें = श्रुतिस्मृतींनीं जो विधि सांगितलेला आहे त्याला अनुसरून. अन्वय = संबध, सारांश, ओघ, रोख, हेतु गुरुवचनाशयप्रत्यय = गुरुवाक्यांच्या आशयाचा ( तात्पर्याचा ) प्रत्यय ( अनुभव ). ६ निजात्मरंगें रंगुनि आपणा जगिं मिरवावें पिसें–आपण एकदा आत्मस्वरूपज्ञान करून घ्यावें म्हणजे जो आनंदातिरेक होतो त्याच्यायोगानें मनुष्य व्यवहाराच्या मर्यादेला ओलांडून पलीकडे जाण्यास पात्र होतो. अशाला दुनियेने पिसें म्हटलें तर तें त्याचें पिसेपण नव्हे तर तो संसाराला

( पुढील पृष्ठ पहा. )

सर्वं खलु इदं ब्रह्म श्रुतीचा अनुभव घे मानसें ।
आब्रह्मस्तंबादि[2] पाहतां तुजविण कोणी नसे ॥
चाल॥ या निगमनीजयुक्तिनें[3] ।
करिं समाधान युक्तिनें ।

---

( ५६८ पृष्ठावरून समाप्त. )

अलीन झाला असें समजावें एकनाथमहाराज आपल्या भागवतांत आत्मानंदाबद्दल लिहितात'---ह्मणे समार झाला वावो । जन्ममरणांचा अभावो । कळिकाळासी नाहीं ठावो । ह्मणोनिया पहा हो हाक फोडी ॥ ५७१ ॥ ऐशा हाकावरी हाका । फोडू लागे अलौकिका । सवेंचि गाये निजात्मसुखा । स्वानंदें देखा डुल्लतु ॥ ५७२ ॥ परम सख्याची गोड कथा । तृप्ती न बाणे स्वयें सांगता । तेवीं निजानुभवें हरि गाता । धणी सर्वथा पुरेना ॥ ७३ ॥ त्याचें गाणें ऐकतां । सुखरूप होय सज्ञान श्रोता । मुमुक्षां होय परमावस्था । जरी तो अवचिता गावों लागे ॥ ७४ ॥ गाता पदोपदीं निजसुख । कोंदाटे अधिकाधिक । वोसंडतां परम हरिख । स्वानंदें अलौकिक नाचों लागे ॥७५॥ सारूनि दुजेपणाचें काज। निरसोनि लौकिकाची लाज । अहंभावेंविण सहज । आनंदाचे भोजें अलौकिक नाचे ॥७६॥ जो मोलें मदिरा खाये । तो मदिरानंदें नाचे गाये । जेणें ब्रह्मानंदु सेविलाहे । तो केवीं राहे आंवरला ॥ ५७७ ॥ ए. भागवत अध्याय दुसरा. तसेंच रंगनाथस्वामी निगडीकर आपल्या पद्यांत ह्मणतात

\+ + + + +

शेवटील पाळी येणें गोड करू समुळीं ।
आन उपाय नसे या काळीं ध्यावा वनमाळी ॥ २ ॥
जन म्हणो वेडें परि मी न पाहे त्याच्याकडे ।
साधन तें साधावें ऐसें, परमपद जोडे ॥ ३ ॥

\+ + + + +

१ 'सर्वं खलु इदं ब्रह्म'=हें जें आहे हें सर्व ब्रह्मच आहे या वेदवाक्याचा २ आब्रह्मस्तंबादि पाहतां'--'महतो महीयान् । अणोरणीयांसमनुस्मरेद्यः' गाता स्तंब= गवताची काडी, अति सूक्ष्म पदार्थ कित्येकदा 'आब्रह्मस्तंभादि' येतें तो शब्दप्रयोग चुकीचा आहे ब्रह्मस्तंब = हा पुल्लिंगी शब्द अखिलविश्व या अर्थी महावीरचरित ३-४८ मध्यें आहे असें आपट्यांचा कोश सांगतो सकल चराचराचें आलोचन केलेंस तरी तुझा तूंच ब्रह्ममय भरला आहेस असा येथें अर्थ ३ निगमनीजयुक्तिनें = निगमांमध्यें ( वेदांत ) सांगितलेल्या निज ( सर्वोत्कृष्ट, अतिश्रेष्ठ ) अशा या युक्तीनें.

अतिनिर्विकल्प[1] भक्तिनें ॥
दीप ॥ देवनाथ प्रभुनाथ निरंजन भज भज हृत्संपुटीं[2] ॥उमजेना०॥ ४

पद ( ३७१ )

उमज उमज मन मूर्खा अझुनीं हित अपुलें कांहीं ।
आत्मा गुरु प्रत्यक्ष नांदतो अनुभव घे देहीं ॥ ध्रुवपद. ॥
अशाश्वत तनु जाईल हिचा नाहीं भरंवसा ।
जाणुनि ऐसें गोउनि घेसी उगाच भ्रमफासा ॥ उमज० ॥ १
पाहें वर्ष पन्नास वयाला पण गेला अर्धा ।
लव पल क्षण घडि मोजित तनुसीं काळ करिल स्पर्धा॥उमज ॥२
कन्यासुतगृहदारधनीं मनीं आस भरीं भरसी ।
उत्तम तनु जाइल मग फेरे चौऱ्याशीं फिरसी ॥ उमज० ॥ ३
श्रुतिनिगदित[3] परि अधित[4] अझुनी कर्म तुला न सुचे ।
फिर फिर फिर माघारा बा रे अमोल वय वेंचे ॥ उमज० ॥ ४
भाव धरुनि निजहृदयीं जाई शरण गुरुद्वारा ।
गुरुगुज मानि तू उमज लागों नेटीं भववारा ॥ उमज० ॥ ५
देवनाथ प्रभुनाथ निरंजन दे अंजन जेव्हां ।
आत्मा आपण ब्रह्म सनातन सुख लाहसी तेव्हां ॥ उमज० ॥ ६

पद ( ३७२ )

आहा रे रांडेच्या पोरा मूर्खा ! हें काय ॥ ध्रुवपद ॥
चौऱ्याशीं लक्ष रे, योनी ह्या हिंडतां, शेवटीं नरतनु पावे ।
त्या तनुमाजीं, उत्तम देह हा, ब्राह्मणजन्मासी यावें ॥
सच्छास्त्रश्रवणें, सत्संग साधुनि, स्वअगें ब्रह्मचि व्हावें ।
हें तों कांहीं तुवां, न केलें साधन, कैसेंनि निजगुज पावे रे ॥आहा.॥१
अत्युत्कट संपत्ती, कांता रूपवती, दुर्धर विषय मना ।
ब्राह्मणभोजन, अतिथिपूजन, कवडी न दिधली दाना ॥
आपपर कांहीं, वोळखिलें नाहीं, द्वाड़ामि थार न साना ।
वृथापुष्ट काया, सरक्षिली वाया, दोषही केले नाना रे॥आहा.॥ २

---

१ अतिनिर्विकल्प = अत्यंत एकनिष्ठ कोणत्याही प्रकारची विकृति किंवा भेद नाहीं अशा निःस्सीम भक्तीनें. २ हृत्संपुटी = हृदयरूपी पेटींत किंवा गाभाऱ्यांत संपुट ( पुल्लिंगी ) = ( १ ) पेटी ( २ ) पोंकळी, गाभारा " स्वात्यां सागरशुक्तिसंपुटपयः सन्मौक्तिकं जायते " भर्तृहरि नीतिशतक. ३ श्रुतिनिगदित = वेदांनीं सांगितलेलें. ४ अधित = अभ्यासिलेलें.

आलिया जन्मासी, मुलांचेनि संगें, बालत्व सर्वोहि गेलें ।
द्वादश षोडश, विंशति वय हें, विषयें तारुण्य नेलें ॥
वार्धक्य अवस्था, शक्ती क्षीण झाल्या, शरीर कदा न हाले ।
साधन हें साचें, सार्थक जन्माचें, कांहींच नाहीं झालें रे॥आहा०॥३
देवनाथ म्हणे, वाहिली ते गंगा, राहिलें तीर्थ जाणावें ।
स्वहितापेक्षा जरी, तरि बा रे वेगें, संतांसीं शरण जावें ॥
आपआपणातें, उमजुनि गुरुकृपें, समरस ब्रह्मचि व्हावें ।
जनीं वनीं मग, आपणची अवघें, द्वैतासी गाळुनि प्यावें रे॥आहा.॥४

पद ( ३७३ )

वृथा मनिं कोण करी चिंता ॥ ध्रु० ॥
जें जें दिसतें तें तें जाइल । भासणें भासकता ॥ १
अशाश्वततनू शाश्वत आतां । पाहतां आतौता ॥ २
स्वरुपीं समरस तन्मय मानस । आनंदें रमतां ॥ ३
देवनाथप्रभुनाथनिरंजन । नांदत हृदिं असतां ॥ ४

पद ( ३७४ )

कां रे न भजसि या श्रीरामा ॥ ध्रु० ॥
किति विषयीं घालिसी धुमामा । अतां दया न येइल कीं यमा ।
किति भरीं भरसी अधमा । तनु उचलिल भरल्या नेमा[१] ॥ १
सुतदारादिधनकणक्रमा । माजीं सिरोनि मन वरी भ्रमा ।
तेणें बहुतचि पावसि श्रमा । भ्रष्ट झालासि गुंतुनि कामा ॥ २
देवनाथप्रभुच्या पदपद्मा । स्मर झाली विषयभोगा सीमा ।
तनु फिरुनि नये हे उत्तमा भेदें देहिंच आत्मारामा ॥ ३

पद ( ३७५ ).

मना रामपदांबुजीं सख्या घालीं रुंजी[२] रे । ध्रु० ॥
क्षणभंगुर देह असा । मानितोसि भरंवसा ।
धिंवसा धरोनि भोगितोसि । विषय त्यजीं रे ॥ १
त्यागीं सकळ कल्पनेस उरों नेदिं भेदलेश ।
हरि तूं हरीं क्लेश । आत्मयाग त्यजिंरे ॥ २
देवनाथ विनवी दास । न धरीं किमपि अन्य आस ।
करुनि दृश्य ग्रास । आत्मा देव पूजीं रे मना० ॥ ३

---

१ नेमलेली वेळ भरल्याबरोबर २ भ्रमराचें गुगु करीत घिरट्या घालणें. "कमळें सुंदर विकासती । भ्रमररुंजी घालिती" दुसरा अर्थ बदकांचें एकमेकांच्या पाठीमागें धांवणें

## पद ( ३७६ ).

सावध होईं मना । गड्या तूं० ॥ ध्रु० ॥
शरणागतहृदीं भाव धरुनियां । जाईं श्रमशमना ॥ १
विषयविलासा सांडीं जैसें । वमती कीं वमना ॥ २
रात्रिपळ क्षणक्षण आयुष्य जातें । देह असे उसना ॥ ३
देवनाथ प्रभु नित्यनिरंतर । साठवीं हृद्भुवना ॥ ४

## पद ( ३७७ ).

अझुनी कां नकळे । मना तुज ॥ ध्रु० ॥
खोंविमि कां वय, माग अमोलिक, जाय वृथा तनु, मोजित काळ पळें ॥ १
वारधर्मी मना आन किती तरी, त्रास न मानिसी भोगिसि दुःखफळें ॥ २
देवनाथप्रभुनाथदयार्णव, तारिल हा भव आळवीं भावबळें ॥ ३

## पद ( ३७८ ).

खटपट किती नटनटुनि करिसी ? ।
चाल झटपट उठ भज सखा हरी ॥ ध्रुवपद० ॥
निपट कपट हृदीं लपटुनी ।
कामिनिसी मटमट दाम किती देशिल तरी ॥ खटपट० ॥ १
उच्च तट भट भाट म्हणसी ।
माझा राज पाट मटमट वय खातसे अरी ॥ खटपट० ॥ २
निकट प्रगट गुरु घटघट विलसत ।
वटवट सोडीं अनुभव चरीं ॥ खटपट० ॥ ३
देवनाथप्रभु दाट निघोट अविट जगीं ।
उलट अतुट सुख घेईं करीं ॥ खटपट० ॥ ४

## पद (३७९)

जाणुनिया भ्रमसी । वृथा का जाणुनियां भ्रमसी ॥ ध्रु० ॥
आपणपें निज आपणा पाहतां ब्रह्माचि तू असशी ॥ १
श्रीगुरुच्या कृपें उदय चिद्रवी कैंची दिवसनिशी ॥ २
कैंचीं कन्यासुतदाराधन हे माया त्रिवशी ॥ ३
देवनाथप्रभु पाहुनि रमवीं रसना नामरसीं ॥ ४

## पद ( ३८० )

बाइल पशाची पैशाची । माझी म्हणूं न ये साची ॥ ध्रु० ॥
असतां पुष्कळ पैका । वरच्यावर झेलीत शुका ॥ १

---

१ " हा देह पांचांचा पांचांचा, पांचजण नेतील जीव हा अज्ञानी न्यायाला, यमदूत येतील " असे पद टीपांत आलें आहे तें पहा २ निपट = केवळ, समूळ. निघोट = पूर्ण, भरगच्च. अतुट = अक्षय, अखंड सदोदितचें.

नसतां पदरीं कवडी । टाळ्या पिटुनी नाक मुरडी ॥ २
देवनाथप्रभु असला । तिचा संग करिल तो फसला ॥ ३

पद (२८९)

द्रव्याकडोनी उन्मत्त झाला विषय नेत्रीं चढला ।
लाल मुडास शिरीं अंगावरतें दुशाला ।
कानीं चौकडा धोतरजोडा घोड्यावर बैसला ।
अत्तर अर्गजा लाउनीयां सुखांत मस्त झाला ॥
छंद ॥ हे आजा काका मामा मेळविले ।
हे कीर्ति ऐकुनी अहिल्याबाई आले ।
हे मामीमावसीदादी जमा झाले ॥
भडभडभडभड कुटुंब रमलें पाहुनी सौख्यसदना ।
फडफड फडफड गांजिती दुःखें विटविती प्राणा ॥ १
द्रव्य सरल्या भडभड पळती अंती कोणी नाहीं ।
भाऊ पुतण्यापौत्र नातू मग कोणाची आई ।
टिमटाम टाकमटिका[1] मग ना चालेची कांहीं ।
करकर करकर मचली[2] घरामधें शिरली आकाबाई[3] ॥
छंद ॥ थूथूथू सर्वही जन करिती ।
हे प्रेमशब्द प्राणी कोणी न बोलती ।
हे कुटुंबकबिले व्यर्थ टोले देती ॥
धिग्धिग म्हणती सर्व आप्तगण अजुनि कां मरेना ।
फडफड फडफड गांजिति दुःखें विटविती प्राणा ॥ २
याचें त्याचें कर्ज काढिलें कुटुंबसंरक्षणा ।
लक्षुमीची वडिल बहिणी परि भिजला पुरेना ।
करार सरल्या धरणें येती बैसविती सजना ।
द्या ना ये[4] काजि म्हणता तरि तो पाहे दीनवदना ॥
छंद ॥ दूत लाउनियां फडफड ओढिती ।
आणिक मुखीं शिवीगाळ्या देती ।
मग सर्वहि जन तमाशाच पाहती ॥
कडकड कडकड फांके[5] पडती खाया अन्न मिळेना ।
फडफड फडफड गांजिती दुःखें विटविती प्राणा ॥ ३

---

१ टिमटाम टाकमटिका = नटके मुरडणें टाकठिकी; डौलीपणा. करकर = दारिद्र्याची किरकीर २ मचली = हा वऱ्हाडमधला शब्द 'झाली, जमली' या-अर्थी. उदाहरणें, 'भांडण मचलें, गर्दी मचली' ३ भिकारपणा. ४ द्या ना ये कजी = हा पाठ काय असावा ? द्या नाइकजी असा असावा ? द्या ना कधीं म्हणावें तर पुढल्या 'म्हणतां' शब्दाची संगति जुळत नाहीं ५ फांके=उपास.

इतुकें झालें, मूढ परंतु कांहींच समजेना ।
भर मना स्त्रीची प्रीत लागे दृढ धरना (?) ।
अतांतरि सावध होईं प्राण्या लागें गुरुचरणा ।
प्रपच उपाळ (?) आतां करीं दीनवदना ॥
छंद ॥ देवनाथ म्हणे माय तारीं मज दीना ।
मी आहें पातकी अधम सत्य जाणा ।
मज नाहीं त्राता दुजा तुजवीणा ॥
घडिघडि घडिवडि आणुनि अनुदिनीं अश्रुपात नयना ।
फडफड फडफड गांजिति दुःखें विटंबिनी प्राणा ॥ ४

## पद ( ३८२ )

( शार्दूलविक्रीडित वृत्त. )

भावें जो हरिनाम सेवि न कदा विश्राम नाहीं जया
नाहीं ज्यास परोपकार करणें ना सर्वभूतीं दया ।
लक्ष्मी गेहिं असोनि पाळि न कदा मातापित्या बांधवा
ब्रह्मा वेडझवा म्हणूनि विभवा देतो अशा गाढवा ॥ १
नाहीं दान व्रतादि तीर्थतपहो केलीं कदा दुर्जनें,
नाहीं निश्चय वेदवाक्यश्रुतिचा शास्त्रार्थ उच्छेदणें ।
मींची एक धनाढ्य मानुनि मनीं अर्पीत वेश्यां धना
ब्रह्मा वेडझवा म्हणूनि विभवा देतो अशा गाढवा. ॥ २
देखोनी द्विजराज माज चढतो ज्याचे स्वआंगीं बरा
गर्वें जाय भुलोनियां धनमदें रेडाच पैं दूसरा ।
कर्णीं कुंडल माळ मौक्तिक गळां दावी जगा मानवा
ब्रह्मा वेडझवा म्हणूनि विभवा देतो अशा गाढवा ॥ ३
कांतेचें गणगोत पोशित सुखें मानीच न श्लाघ्यता
जैसें रासभ मानलें तदुपरी लज्जा नसे भोगितां ।
वस्त्रें उंच बरीं सदा करि तिला संपादितां आर्जवा
ब्रह्मा वेडझवा म्हणूनि विभवा देतो अशा गाढवा. ॥ ४
विप्राचे पद क्षालिना, सुमनसें वेश्यापदांतें शिरीं
प्रेमें आकळुनी[1] सदा निजकरीं मानी सुखा अंतरीं, ।
आल्या साधु घरासि पाठ फिरवी हो दुःख वाटे जिवा
ब्रह्मा वेडझवा म्हणूनि विभवा देतो अशा गाढवा ॥ ५
ज्यातें वाटत त्रास क्रोध उसळे चित्तीं हरीकीर्तनीं
धर्मीं बुद्धि नसे, सदा धुपतस[2] चांडाळ तो या जनीं

१ कवटाळून. २ धुरतो, धुसफुस करितो.

ताठा देहिं बहू धरी धनमदें लेखीचना वासवा[1]
ब्रह्मा वेडझवा म्हणूनि विभवा देतो अशा गाढवा ॥ ६
श्रेष्ठीं शीकवितां कदापि न मनी[2], द्वेषी पित्यातें सदा,
बोले कुश्चळ नित्य दुष्ट कुरुपी वंदी स्त्रियेच्या पदा ।
गाथा तोषके लोढ टेकुनि मनीं मानीतसे वैभवा
ब्रह्मा वेडझवा म्हणूनि विभवा देतो अशा गाढवा ॥ ७
दासी दास बहूत अश्व गजही त्या शीबिका[4] पैं घरीं
चित्तीं हाव धरोनि खर्चित धना माडचा[5] हवेल्या करी, ।
वस्त्रें उंच अमोल पैठणि जरी शाला दुशाला नवा
ब्रह्मा वेडझवा म्हणूनि विभवा देतो अशा गाढवा ॥ ८
भावें सांबशिवा भवानि अथवा पूजीच ना माधवा,
भोगीतो विधवा स्त्रिया निशिदिनीं, ना आदरी बांधवां, ।
ना दाता धनवान होउनि नवा वर्ते जसा गा ' ढवा[6];
ब्रह्मा वेडझवा म्हणोनि विभवा देतो अशा गाढवा. ॥ ९
लक्ष्मीवंत असोनि संतविबुधीं सत्कीर्ति जो ना करी;
सांगें त्यावरि कोपला मग जसा श्वानापरी गुरगुरी ।
देवींना वचनें कदापि हि धनें, जारस्त्रियेचा ढवा
ब्रह्मा वेडझवा म्हणोनि विभवा देतो अशा गाढवा ॥ १०
ऐसा जो खळ दुष्ट त्या गृहिं धना राहोनियां कायसें ?
पूजीना द्विजसंतपाय कधिही दासीस अर्पीतसे ।
वाणी बोलत देवनाथ, पचतो तो नर्कि त्या ना शिवा
ब्रह्मा वेडझवा म्हणोनि विभवा देतो अशा गाढवा ॥ १५

## पद ( ३८३ ).

घेई गे गड्या गुडगुडी । रे गुडगुडी[7] ॥ ध्रु० ॥
देहचतुष्टयनारळ घेउनि अभवमेरू जोडीं ।
शांतिगंगोदक आंत भरुनिया सोहशब्द गुरगुडी ॥ १
चित्तचतुष्टयचिलीम ठेउनि सद्भावाची खडी ।

१ इंद्राला २ मानीत नाहीं ३ आजम, तढाळ, बैठका ४ पालख्या ५ मोठ्या इमारती. ६ ढवा = नपुंसक; रांडेच्या पाठीमागें गाणेंवजावणें करणारा. मोल्स्वर्थ एक म्हण देतो ती अशी = " मिणमिणीत दिवा, रुपणाचा केंवा, गाजराचा मेवा, हिजड्याचा ढवा" अर्थात् हे चारी निरुपयोगी—धनमदें रेडाच= " अठोनी वेठोनी बांधीला मुडासा । चालतसे म्हैसा जनामधीं " तुकाराम. ७ असेंच एक मध्वमुनीश्वरांचें गुडगुडीवरील पद महाराष्ट्रकविचरित्रांत रा. रा अजगांवकर यांनीं दिलें आहे

नमोमुद्रादिक चुकोटि भरुनियां ज्ञानाशी धडधडी ॥ २
ब्रह्मानंदीं लळी लोंवुनी अज्ञानधूम्र मोडीं ।
चिन्मयस्वरूपीं लाउनि गोळा देवनाथ धडधडी ॥ ३

पद ( ३८४ ).

शिव ! शिव ! शिव काय गती हे ! देहकर्म खोटें[1] रे ! ॥ध्रुवपद॥
सूर्यवंशीं रोहिदास । मातापित्या त्रिवर्गास ॥
कष्टविलें विश्वामित्रें हो ॥ शिव० ॥ १
रामपत्नी असुर यत्नीं । साध्वी ने अशोकवनीं ॥
चित्कळा जगत्त्रयजननी । दुःख सर्वी मोठें ॥ शिव० ॥ २
धर्मपत्नी कौरवांनीं । ओढियली धरुनि वेणी, ॥
ते क्षणीं निःसीम । कल्पसाचि वाटे[2] ॥ शिव० ॥ ३
देवनाथ चित्तीं । देखुनिया कर्म चिंती, ॥
धाव ! रे ! रमापति ! उठती आंगीं कांटे ॥ शिव० ॥ ४

---

१ देहकर्म खोटें—मनुष्याचें देहकर्म खोटें नाहीं, परंतु देवाच्या दरबारीं अंदाधुंदी झाल्याकारणानें सज्जनांस त्यांच्या सत्कृतीप्रमाणें या जन्मांत योग्य फळ मिळत नाहीं; असें राजाराम प्रासादी कवि विनोदानें आपल्या एका पदांत म्हणतात तें पद ५३८ पानावर टीपेंत दिलें आहे तेथें पहावें कर्मगति कधींही टळत नाहीं असें सूरदासांनीं आपल्या पदांत म्हटलें आहे ॥ करमगती टारे नाह टरे ॥ध्रु०॥ गुरु बसे पठे ज्ञाता पंडीत । रच पच लगन धरे ॥१॥ सीताहरन मरन दशरथको बनबन राम फिरे । पडुसुतके आप सारथी उन हुवे विपत परे ॥२॥ दुर्वासाको शाप दिवायो जदुकुल प्रलय करे ॥ ३ ॥ जीन आपन नही कियो आप बतको । जीनसे कछु चरे ॥ ४ ॥ सुरदास होनी सो हो गयी । कडकर साच करे ॥ ५ ॥ आनंदतनय हे आपल्या खालील पदांत होणाऱ्या गोष्टीला कोणी टाळूं शकत नाहीं असें म्हणतात । होणाऱ्या प्रारब्धासि काय यत्न चाले ॥ ध्रु० ॥ जेथें जेथें जे जे काळीं । जे कां लिहिलें असे भाळीं । ते तें न टळे हो वेल्हाळी । कोण टाळी भविष्या ॥ हो० ॥ पीयूषाचे खाणारे ही । देव वैद्य ज्याचे गेहीं । अमृताचा राजा पाहीं । चंद्र तोही क्षयरोगी ॥ २ ॥ इ० भले गांजिले जातात आणि लुचे साव होतात यावद्दलची लाज देवाला आहे असें विठ्ठल कवि म्हणतात ॥ त्वद्भक्तासि सदा वियोग विपदा, नीचगृहीं संपदा । हे कैसी बिरुदावली तव पदांभोजी रुळे सर्वदा ॥ १ ॥ हा भक्तासि उदार शब्द सुहृदांमध्यें न लागो कदा । हे लज्जावरदायका ! तुज गदापाणे ! कृपावारिदा ! ॥ १५ ॥. विठ्ठलकविकृतविद्वज्जीवन. २ निस्सीम कल्पसा वाटे = अत्यंत आकांत झालासें वाटे

# देवनाथांचीं

## हिंदुस्थानी पदें.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

# हिंदुस्थानी पदें.

## किरकोळ स्फुटें.

### पद ( ३८५ ).

जहि तन लागे सोइ तन जाने ॥ ध्रु० ॥
तरस रह्यो धनकामीनसो मन भयो है उदास और नहीं माने ॥ १
छांड जगतको जंगल बैठे ; नंग निसंग कछू नहीं जाने ॥ २
कोई कहे कछु पिसोबावरो । आपहि हसनो आपहि रोने ॥ ३
देवनाथप्रभुके निजरूपमें । खेलत निसदिन भयो मस्ताने ॥ ४

### पद ( ३८६ ).

सूमके मालको चोरदंड राजदंड धरमों,
मानो यारो एक नहीं कवरी है ।
ऐसो या कलिको बली है धर कहां कीजिये,
ऐसनकू नरकू बरजोरी है । ( १ )
सखी और सुरमा लाखनमो कोउ एक ।
ज्याके मनमों बिचारनेकधारणा सुधारी है ।
कहत बचन देवनाथ घरघर वे पुरुख नाहिं,
बनमाहिं अनेक बृच्छ, कल्पबृच्छ कह चारी है ? ॥

### पद ( ३८७ )

खटपट सगरी छाड दे खटपट हरिगुण बोल ॥
निपट निकट हर हेरले । कपटपट दे खोल ॥ १
भावहीको भूको । हरनहीं ग्यानअग्यानको ॥
जैसो भाव जाको । जैसो राम तैसो हो ॥ २
बिधिमनभावें तात जसोदापूत कर मात ॥
भावें प्रभु अमरनाथ । मेरो तो प्रभू सहकारी है ॥ ३

भक्तनको ऐसो जान । यह परब्रह्म भगवान ॥
सनकसनंदन धरत ध्यान । ज्याके हृदय कमलवास है ॥ ४
कहत बचन देवनाथ । मेरे तो परब्रह्म गुरुनाथ ॥
जैसो जाको मन भान । जैसो को नाथ तैसो है ॥ ५

## पद ( ३८८ )

सोबी अकलवंत बडा है नसीब सिकंदर है उसका ॥ ध्रुवपद ॥
जबलो पल्लो गठडी तबलग जो करेसो उसीका ।
हुता रावन कीरत बढी जद अंधधुंदमों राज किया ॥
तेहतिसकोटी देव पकडके दारबंदमों कैद किया ॥
सुनो अकलकी तारीफ जिन्हे चार बेदका सोज किया ॥
चौदाचौकडे राज झुकाया दौलत का खुब हजा लिया ।
छुटी पल्लोकी गठडी जद आध घडीकू डुबा दिया ॥
अकलकी बे नकल रही जिने समस्त कुलकु भस्म किया ।
बिबिखनने बहोत सिकाया जरा न माने उसीका ॥
आई कालकी घडी चुके नहीं फिरा काल जद दैतोंका ॥बस मौल०॥१
अनतफदिने नानाफडनीसकी अक्कलकी तारिफ किई ।
क्या है उसकी अक्कल दौलत पेशवेकी डुबा दिई ॥
जो मै करूंगा सोहि होयगा ऐसी मनमें गरूरी भई ।
मालखजीना आपने हात साबदके घर कछु न रही ॥
सवाई माधवराव मुवा जद अक्कल चोदी भूल गई ।
बाजिरावकू देता गादी सोबी जानत हुतासही ।
फिरा नसीबा चुकी किरिया कहां ठिकाना अकलका ॥
नमकहरामी करे साबदसो किने बजाया है डंका ॥बे अबी सुनो०॥२
छोटे छोटे अदमी बढाये उसीपासमों आन खडे ।
अपने आगे कछु गत नहीं जो होय सो आप बडे, ॥
ना खावदका घरही राखा ना फौजो साबूत खडे ।
मनमें मगरुरी करके गाफल ना बैरीसो जरा अडे ॥
कबकोका पहेरा यारो बदमस्तीसो बहोत चढे ।
कम्मगंडीया आखर नाना जा सिंदेके कैद पडे ॥

मिळाई सोई खोई यारो लिया ठिकरा अपजसका ।
देवनाथ कहे मुजे गरज नहिं राज डुबाया बहुनका ॥ वे कछु न०॥६

# शंकराचीं पदें.

## पद ( ३८९ )

कर हरजीको ध्यान । हो या मन कर हरजीको ध्यान ॥ ध्रु० ॥
या जगमो कोई और न जानिये पूरन भरो भगवान ॥ १
जलथलम्रिसपाखानबीचमो रूप भन्यो सब जान ॥ २
देवनाथप्रभु नाथनिरंजन सब घट मान समान ॥ ३

## पद ( ३९० )

भज मन शिवहर भोलाजी । भोलाजी जगपालाजी अलबेला जी॥ध्रु०॥
जटासीसपर घटा बिराजे गले रुडकी मालाजी ॥ १
कानोंमें कुंडल नाग बिराजे हाल बभूलनगोलाजी ॥
देवनाथप्रभु नाथनिरंजन निसदिन करो जपमालाजी ॥ ३

## पद ( ३९१ ).

आठो जाम । हरबिन कछु और नहिं जान ॥ ध्रु० ॥
रसनारस हररसको पीजिये । हिरदकमलरूप नैनसो देख ॥ १
जित देखो तित आप भयो है । अंतमा सबघट ताहिको चित ॥ २
देवनाथप्रभु व्याप रहो सब । येहि गुरुग्यान है या मन जान ॥ ३

# श्रीरामाचीं पदें.

## पद ( ३९२ ).

रामबिना कछू और नहीं रे ॥ ध्रु० ॥
जलथलपुरण, जित उत रामही ।
भर रह्यो जानियो ये मन मेरो ॥ १

सुरजकोटकी आभा पद्नख ।
हिरदकमलबिच नयन नेहारो ॥ २
देवनाथप्रभु अदर बाहर ।
व्याप रह्यो कही श्रुति ललकारे ॥ ३

## पद (३९३).

नहि मानत राम सबे घट भोंडो रे ॥ ध्रु० ॥
बेद कहता की मानत नाहीं मत्त भयो मदगेंडोगे ।
अनुभोको मन ग्यानहि नाहिन शब्दको स्वान दिखावत लांडो रे ।
देवनाथप्रभुनाथनिरजन । व्याप रह्यो जग धूडो रे ॥

## पद (३९४).

हित तेरो तु राम सुमर मन प्यारे रे । हित तेरो ॥ ध्रु० ॥
रामबिना तेरो साथि नही कोऊ । काहेकु कीच भरे भरदोरे रे ॥ १
सपत होय तो सेबे मिले सब । बीपत कोऊ रहे नहि नेरे रे ॥ २
मातपितासुतभाईलुगाई । कोउ न अत छुरावनहारे रे ॥ ३
साथ न आवत मान कहो तोहे । ये धनधाम जबे जम घेरे रे ॥ ४
देवनाथप्रभुनाथनिरजन । वाहे जपे सब डारे रे ॥ ५ ॥

## पद (३९५)

रामभजनबिन ब्रिथा भयो ।
बारबार नहिं आवत या तन कैसोही गत पायो ॥ १
श्रीरघुपतके चरणकमलसो कबुहु नैन लगायो ॥ २
देवनाथप्रभुनाथ गोविंदजीको रूपमें या मन नाहीं समायो ॥राम०॥३

## पद (३९६)

राम बिना कछु औरन जानीयो ॥ ध्रु० ॥
या जगमो सब राम भरा है, लछ लगाये कर मन मानीयो ॥ राम० ॥ १
अदर बाहेर राम निरतर, रामके रूपमो येह चित्त तानीयो ॥ राम० ॥२
देवनाथप्रभुनाथ गोविंदजी, आत्माराम या नैनन आनियो ॥ राम० ॥ ३

## पद (३९७)

लगन लाग रही रामभजनसो ।
और न कछु मन आवे मेरे राम. ॥ ध्रुवपद ॥

रामबिना मोहे चैन परे नही । झुटी दिखावत धनसुतधाम ॥ लगन० ॥ १
झुटो भाईचद्लुगाई । अवसर कोउ न आवे काम ॥ लगन० ॥ २
देवनाथप्रभु नाथ निरंजन । सचा है गुरु आत्माराम ॥ लगन० ॥ ३

## पद ( ३९८ )

राम राम राम राम भजले मन भाई ॥ ध्रु० ॥
तात-मात भ्रात सुत तेरा नहि कोई ।
रामभजनमुक होत पूर्ण ये कमाई ॥ राम० ॥ १
नेम धर्म क्रिया कर्म नाम बिना नाही ॥
श्रुती शास्त्र साक्ष देत कहत बात येही ॥ राम० ॥ २
शामप्रभू देवनाथ बिना नही कोई ।
हसत खेलत नाचत गावत सुमरण मनमाही ॥ राम० ॥ ३

## पद ( ३९९ )

श्रीराजा रघुनाथ । भज मन श्रीराजा रघुनाथ ॥ ध्रु० ॥
कहुको माता पिता और भाई । कहुको ए जामात ॥ १
कामिनीकामकी कठण पडत है । गहेरी अंधेरी रात ॥ २
जल अंजुलि जल जाय पलोपल । तब तनूसुहाग ॥ ३
देवनाथप्रभु नाथनिरंजन । साच बनी है बात ॥ ४

## पद ( ४०० ).

राम न जाने तो नर जिया तो क्या जी ? ॥ ध्रुवपद ॥
दलदवलल धन मालखजीना ।
और मुलुख सर किया तो क्या जी ? ॥ राम० ॥ १
गंगा गोमति रेवा तापी ।
और बनारस न्हाया तो क्या जी ? ॥ राम० ॥ २
गोकुल मथुरा मधुबन द्वारका ।
और अजुध्या कर आया तो क्या जी ? ॥ राम० ॥ ३
दर्वेषसे बडा जंगम जोगी ।
और कानफाडा आया तो क्या जी ? ॥ राम० ॥ ४
बेदपुरानकी चर्चा घनेरी ।
और शास्त्र पढ आया तो क्या जी ? ॥ राम० ॥ ५

जरहि जौहर महेल बनाया ।
सासितियां संग सोया तो क्या जी ? ॥ राम० ॥ ६
आत्मग्यानका खबर न जाना ।
और बानी बक दिया तो क्या जी ? ॥ राम० ॥ ७
देवनाथ प्रभु आत्मा गोविंद ।
इस नयनन्मों नहिं छाया तो क्या जी ? ॥

---

## कृष्णपर पदें.

### पद ( ४०१ ).

बालमूजी बालमूजी । अजब सुहानी रूप ॥ ध्रु० ॥
नटनागर नवनीर । गले वैजयंती माल ॥ १
कमलनयन गिरधारी माधो । छेलछबीला कान्ह ॥ २
देवनाथ प्रभु नाथ गोविंदजी । या मनमोहन नंदकिशोर ॥ ३

### पद ( ४०२ )

मोरे नैनन छाया मतवारा जी ॥ ध्रुवपद ॥
दोहा ॥ मोरमुगुट सीस सुहावे, कुंडलकी छबि कान ।
कमलनैनके रूपपे जान करू कुरबान ॥ अजी मत० ॥ १
वैजयंति बनमाला हे द्विजपद हृदय सुहाय ।
चार भुज कर आयुध धरे जो त्रिभुवनको राय ॥ अजी मत० ॥ २
टीप ॥ ... ......... ............ .. ...... ॥ मोरे० ॥ २
दोहा ॥ गोकुलमों गुमराह करी माखन खाय चुराय ।
नंदनंदन कान्हजी चोर बडे जदुराय ॥ अजी मत० ॥ १
पीत वसन कटि राजता, नुपुर पद सनकार ।
यह छब गिरधरलालकी बेद भरे ललकार ॥ अजी मत० ॥ २
टीप ॥ श्याम तनु घनश्याम दुलारा गोवनका रखवाला जी ॥ मोरे० ॥ २
दोहा ॥ होत भई ! बावरी, दुजी रही नहिं आस ।
निजरूप लपट रही जों फूलनमों बास ॥ अजी मत० ॥ १

चित्तचैतन्यके रंगमों, होय रहा रंग डूब ।
अजब नैनके बागमों फूल फुला महबूब ॥ अजी मत० ॥ १
टीप ॥ जित देखों तित आप बिराजे, हे वृजबासी प्यारे ! ॥ मोरे० ॥ ३
दोहा ॥ लपट रही उस रूपमों बिसर गई सब सूद ।
साई निरंजन दर्यावमों ज्याय परी हू कूद ॥ अजी मत० ॥ १
कूद परी दर्यावमों ज्या पैठी निजमूल ।
जलमों जलरूप हो रही, नहीं जात नहिं कूल ॥ अजी मत० ॥ २
टीप ॥ देवनाथ प्रभु गोविंद व्यापक जनवन सिगरा जी ॥ मोरे० ॥ ४

## पद ( ४०३ ).

गोकलवाला । ब्रिजबासी गोकुलपाला ॥ ध्रुवपद ॥
माथे मोरमुगुट है डाला । मानो कोटिसुरंजउजियाला ।
कानन कुंडलकी छब आला। गले सुहावन बैजयती माला. ॥गोकुल०॥१
अजि जसोमत तनुरंग काला । गहरा जमुनाका जल काला ।
तामों रहत फणी वो काला । ताको जेर करे नंदलाला. ॥ गोकुल० ॥ २
जाको ध्यान धरत शिव भोला । सो गोपिनसों करत किलोला ।
साथ लियो गोपनका मेला । कमलनैन प्रभु छैलछबेला ॥ गोकुल० ॥ ३
सद्गुरुगोविंदनाथ गोपाला । भुवनत्रयको पालनवाला ।
मुरलिअधरधर सो अलबेला।देवनाथको दिनानाथ रखवाला.॥गोकुल०॥४

## पद ( ४०४ )

अखिया हरि देखनको ललचाई ॥ ध्रु० ॥
नंदको नंदन या बन्सीधर । गोकुलग्वालखिलौना ।
इन मनमोहन बिना सखि मोहे। ओर कछू नहिं चाही ॥ आखिया० ॥ १
ग्वालनके घर दहीं चुरावे । खावे शाम सलोना ।
करधरमुरली अधर बजावे । बेदनने जस गाई ॥ अखियां० ॥ २
पहरे पट पीतांबर पीला । गले बैजयती माला ।
मोरमुगुट सिरकानन झलके । कुंडलकी छबि छाई ॥ ३
देवनाथप्रभुनाथनिरंजन । गुरुगोविंद गिरिधारी ।
मूरत छैलछबेली आपही । छाय रही जगमाहीं ॥ अखियां० ॥ ४

## पद ( ४०५ )

बरखत आयो मेहुला । गरज गरज ॥ ध्रु० ॥
रैन अंधेरी कारे भये बादर । टपकत बुंदरी गहिरी मा ॥ १
अखियन मोहे कछु सूझत नाहीं । भीग गई सारी चुनरी मा ॥ २
बिंद्रावन हर बन्सी बजावे । सुनत धुन निकसी भई बावरी ॥ ३
देवनाथप्रभू यह नटनागर कुंजनके बिच नैन निहारी ॥ ४

## पद ( ४०६ )

सखी ! मेरो पिया कौन बतावे । ताकी जाउंगी हो बलहारी ॥ ध्रुवपद ॥
कहा करो, कित जाऊ अरि ! अब । धुंडतहूं नहीं पावे ॥ सखी० ॥ १
रैनदिन मोहे चैन पडे नहीं । सोवत निंद न आवे ॥ सखी० ॥ २
बावरि भई सावरिया न देखत । या मन बिरह सतावे ॥ सखी० ॥ ३
देवनाथ प्रभु नाथ निरंजन । मेरो पिया नाहि दिखावे ॥ सखी० ॥ ४

## पद ( ४०७ )

आज मोरी सावरियासों लागी प्रीत ॥ ध्रुवपद ॥
रैनदिन मोहे चैन परे नहिं, उलट भई सब रीत ॥ आज० ॥ १
कहा करों, कित जाउं सखीरी ! । कैसि बनी अब बीत ॥ आज० ॥ २
देवनाथ प्रभुनाथ निरंजन । निसिदिन गावे गीत ॥ आज० ॥ ३

## पद ( ४०८ )

तेरे पदरसकी प्यासि । भला ! बनसीवाले ! रे ! ॥ ध्रुवपद ॥
रैनदिन मोहे चैन परे नहीं । । नींद न आवत, मतवारे ! ॥ तेरे० ॥ १
नंदनदन ये ब्रिजवासी । गौवनके रखवारे ! रे ॥ तेरे० ॥ २
देवनाथ प्रभुनाथ निरंजन । त्रिभुवनपालनवारे ! रे ! ॥ तेरे० ॥ ३

## पद ( ४०९ )

वापरसों तनमन वारो ॥ ध्रुवपद ॥
मुरलीअधरधर सुंदर नागर । गौवनको रखवारो ॥ वापरसों० ॥ १
सूरत श्याम मूरत खूब । नैनन रूप निहारो. ॥ वापरसों० ॥ २
देवनाथप्रभु नाथ निरंजन । पूरनब्रह्म है मेरो ॥ वापरसों० ॥ ३

## पद ( ४१० )

ब्रिजवासी नंदकन्हय्या ॥ ध्रु० ॥

गोकुलग्वालके संग दयाल वे अवर चरावत गैय्या ॥ ब्रिज० ॥ १
गोपिनके संग करत किलोला राधाके प्राणगुसय्या ॥ ब्रिज० ॥ २
गौवनपाछे कछनी कांछे माता लेत बलैया ॥ ब्रिज० ॥ ३
देवनाथप्रभु नाथनिरंजन दासनको रखवैया ॥ ब्रिज० ॥ ४

## पद ( ४११ )

दरद न आवे बेदरदीका ॥ ध्रु० ॥

कलन परे मोहे बिकल भयो लागी हिये अरी बिरहकट्यारी ॥ १
आप न आवे कछु न लिख भेजे काहा करो कैसे जियराजी ॥ २
सब सखि या मिल जावो कोही पूछो तासो कछू बी दया ॥ ३
देवनाथप्रभु रुठयो कर जोरे बिनति करतहू केतो मनावूं ॥ ४

## पद ( ४१२ ).

तट जमुनाके तीर चला हो लाला मोहे मिला ।
लटपट पेंच मुकुट अलबेला । नाचत है रंगलाला ॥ ध्रु० ॥
जमुनाके नीरतीर धेनु चरावे गउ बछिया रखवाला ।
तरफ तरफ ब्रिजभानकी छोरी चुंबन देत किलोला ।
श्याममुरत देवनाथदयालु, अखियन करत उजाला ॥ तट जमुनाके ॥

## पद ( ४१३ ).

आसत न मान माई जसोदा ॥ ध्रु० ॥

बछिया छोरी छोरी उठावे मान नहीं कछु नंददुलारे ॥ १
कछुवा छोरे छतिया छूवे करे बरजोरी तेरो कान्हा ॥ २
देवनाथ प्रभु ऐसो सतावे सखी अब तोसु काहांतक कहियो ॥ ३

## पद ( ४१४ )

सुनरी सुन माई ! जसोदा ! ठकडो है कान्हा तेरा ॥ ध्रुवपद ॥
सातपांच मिलकर बहेना । जात हती जल भरने जमुना ॥
बीच मिलोगी तेरो कान्हा । नाहक हमकु वहां घेरा ॥ सुनरी० ॥ १

---

पद न० ४१२ हे दयाळनाथाचें आहे असें मागाहून समजलें.

नन्हे नन्हे मिलावे छोरे । कुंजगलीनमो आन घेरे ॥
ऐसे इसके फैल बुरे । जी । लरसाया जी । मेरा ॥ सुनरी० ॥ २
एक दिना घर नहीं रे मास । बांधे पोलबसनकी कास ॥
थाडा आन रहा मोरी पास । पूछो इन पकरा मेरा ॥ सुनरी० ॥ ३
एक करसे पकडे बहियां । दुजे करसे छुवन छतीया ॥
यापें प्राण देउगी मय्या । नाहक सतावत देह हमारा ॥ सुनरी० ॥ ४
देवनाथप्रभु या श्याम । मोहे मागतसेगी दाम ॥
मोहे कछु नहीं रही काम । मानस मोह लियोरी मेरा ॥ सुनरी० ॥ ५

## पद ( ४१५ )

जा मनमोहन बेग सीधार रे ॥ ध्रु० ॥
गोरसकेमिस, जो रस चाहत, सो रस ना देऊगी, या निरधार रे।
कुंजगलीबिच, कायकु रोकत, होगी अबी कछु, ओरकी ओर रे।
देवनाथप्रभु काहे सतावत, नदपे जाय मे कहुगी करार रे ॥जा मनमोहन॥

## पद ( ४१६ )

तेरे बन्सीने कान्हा कियो अब मोहे टोना रे ॥ ध्रु० ॥
काहेकु तैं ऐसी बन्सी बजाई । सुंदर श्याम सलोना रे ॥
जित देखो तित तो बिन नाही । रूप भर्यो मोरे नैनारे ॥
बारहिबार अटारिके डारमे । निरखत हैं मनमोहना रे ॥
देवनाथप्रभुनाथनिरंजन । मोह लयो मनप्राना रे ॥

## पद ( ४१७ ).

केतो कहिये कान्हा तोहे । ठग केतो कहिये कान्हा ॥ ध्रु० ॥
बाटमों घाटमों काहेको रोकत दे नहीं मथुरा जान ॥ १
मारत पाथर फोरत घगरिया मागत नहींसो दान ॥ २
राज तुफानी, राजा कसको छनहिमो लेगो प्रान ॥ ३
देवनाथप्रभु लालबिहारी । बिनति हमारी मान ॥ ४

## पद ( ४१८ )

नदनदन कान्हा । गोरस हौं न देउंगी ॥ ध्रुवपद ॥
जो ठग तुमसों बोलन चाहे । तापे मैं प्राण त्यजूगी ॥ नंद० ॥ १

ग्वालनसे गुमराई करत हो । मोपे सो ना चलेगी ॥ नंद० ॥
ठाडे रहो जिन बेग सिधारो । नदपे जाय कहुगी ॥ नंद० ॥ ३
देवनाथ प्रभु नाथ निरंजन जा तोरे पाव लगुगी ॥ नद० ॥ ४

## पद ( ४१९ )

सुध न पाई अरि वो माई ॥ ध्रु० ॥
कुजनमों हर मुरलि बजाई । सुनत धुन भुली है लुगाई ॥ १
राग अलापत गात अडाना । मधुर मधुर मुरली बजाई ॥ २
जमुनाजीके तट ठारि बिहारी । करधर बन्सी अधर लगाई ॥ ३
देवनाथप्रभु नाथ निरंजन । नदके नदन सौत जगाई ॥ ४

## पद ( ४२० ).

मनमोहन सखि मोरा । अंगियापे रंग डारो ॥ ध्रु० ॥
जात हती जमुनाजल लेबे । कुंजगलीबिच घेरो ॥ १
बर्जत ना कोउ नाहक सतावत । बन्सी बजावनहारो ॥ २
या नंदलाल गुलाल लये कर । मार करे दइमारो ॥ ३
देवनाथप्रभु मानत नाहीं । नया ब्रिजराज दुलारो ॥ ४

## पद ( ४२१ )

काहेको मोहे सतावे रे । ब्रिजवासी कन्हय्या ॥ ध्रु० ॥
कुंजगलीबिच देख अकेली । आयके छतिया छुवेरे ॥ १
वाटमें टोकत रोकत घाटको । अहिरके छोरे मिलावेरे ॥ २
ये इतनी बदमस्ती करत हो । नदजू नही सिखावेरे ॥ ३
आधि रैन अंधियारी परीबिच । बीचहि बन्सी बजावेरे ॥ ४
देवनाथप्रभु हौं तोसो हारी । जित तित आप दिखावेरे ॥ ५

## पद ( ४२२ ).

हौ ना खेलुगी होरी रे । तोसू शामछबीले ॥ ध्रु० ॥
आवत जावत घडीपल टोकत । काहे करे बरजोरी रे ॥ १
हात लयी पिचकारी भर्यो रग । अंगिया भिगावत सारी रे ॥ २
ठाढे रहो जिन बेग सिधारो । काहे करतिहो चोरी रे ॥ ३
देवनाथप्रभु अंतरगामी । जीते हो तुम हम हारी रे ॥ ४

## पद ( ४२३ )

येरी प्रीत मोहन । सोलागि येरी प्रीत मोहन ॥ ध्रु० ॥
मोरमुकुटसिरकाननकुंडल । बनमाला कटपीतबसन ॥ १
गौवनके पाछे, कछनी काछत । वेनु बजावत या जगजीवन ॥ २
देवनाथप्रभुनाथनिरंजन । जमुनाके तट गखत गौवन ॥ ३

## पद ( ४२४ )

जाग जाग भोर भई नंदलाल प्यारे ॥ ॥ ध्रुवपद ॥
तमरजनी निकस गई बोध पहान उजारे ।
सुरवरमुनि गात सदा सगुनगुन तिहारे ॥ जाग० ॥ १
गो लिये गोपालग्वाल आन द्वार ठाडे ।
कान्ह कमलनयन कृष्ण दरसनको तिहारे ॥ जाग० ॥ २
सुनत विनति जाग उठो पतितको उधारे
देवनाथ सुभाव चरन सीस कमल धारे ॥ जाग० ॥ ३

## पद ( ४२५ )

हरी मनमोहन या मधुसूदन, माधो मुकुंद ॥ ध्रु० ॥
परमपुरख परमेश ईस्सर, पूरन सच्चिदानंद ॥ १
कालयमर्दन मदनमनोहर, या जगजीवन गोविंद ॥ २
देवनाथप्रभुनाथनिरंजन, निजजनपालय परमानंद ॥ ३

## पद ( ४२६ ).

बजीरी बजीरी माई बन्सी
सुनत धुन मोहे कछु नाहिं सूजी बावरी भई मनगजी ॥ २
चौंक पन्यो मोहे सुध नही कानन, मन्यो में ब्रिजको तजी ॥ २
देवनाथप्रभु गोविंदजीके रूपमों मिलके मे सजी ॥ ३

## पद ( ४२७ ).

बन्सीकुंजबनमो मधुर बजी ॥ ध्रुवपद ॥
आधि रैन सुख चैन पियासंग । सुनत कान मन भयो राजी ॥बन्सी०॥ १
बेग उठ चली कुंजराह सो । बावरी भई मोहे कछु न सूजी ॥बन्सी०॥ २
देवनाथ धुन सुनत कान । तब गृहधनसुतससार तजी ॥ बन्सी० ॥ ३

## पद ( ४२८ ).

जमुनातटपे निकट बजावे मधुर धुनी मुरलीकी ।
सुनत कान्हू भई बावरी सुध न रही तनमनकी ॥ ध्रुवपद ॥
आधि रैन सुख चैन सखीरी मै पियासंग सोई ।
सुनत नाद मदमस्त दौरके विंद्रावन आई ॥ जमुना० ॥ १
कहरी बजाई बन्सी कान्हने मधुर लहर वाकी ।
सुनत डार घर बार निकसी मैं वृद्ध सखी वाहूकी ॥ जमुना० ॥ २
गरज गरजके बरसे मेहु बुंदबरी टपके ।
आधि रात अंधियारि परीरी बीच दामन चमके ॥ जमुना० ॥ ३
देवनाथप्रभु नाथ निरंजन नंदलाल कान्हा ।
देख लपट रही पगसो सखीरि निरख रूप नैना ॥ जमुना० ॥ ४

## पद ( ४२९ )

कैसी मोहन बन्सी बजाई ।
सुनत धुन मोहे सुध नाहिं पाई ॥ ध्रुवपद ॥
उत्तम सावन मास चिलासत पुण्य करे नरनारी ।
साथ सखी ले मंगल गावत आधी रैन अंधेरी ।
कान परी धुन मोह लयो मन ये ब्रिजलाल बिहारी ।
मधुर बजावत, राग अलापत, गावत तान सवाई ॥ कैसी० ॥ १
भादो माससो मेघ गडाडत टपकत बुंदरी खासी ।
रुमझुम रुमझुम झुरमट झरिया बरखत है घनरासी ॥
ओढिहू शाल दुशाल पियासंग रमहीं भोगबिलासी ।
बिजलीसी बन्सी आयी, परि मोहे मदनकू मार भगाई ॥ कैसी० ॥ २
कुवार करे सिंगार सवारो सेजपे जाय हु बैठी ।
सारी हरी चुनरी पेहरी भर जोबन नैन अगेठि ।
आयो पिया मोरे लपट गले मिल बोलत बातही मीठी ।
तो सुना आवो नंद कछु मन तन धन आस छुराई ॥ कैसी० ॥ ३
कातिक मासमो गोरिया न्हावत कुटिलालक सवारे ।
बैठी हती ढिक मातापिताजूके कानन नांद निहारे ॥
विंद्रावन ब्रिजराज बजावत बन्सी नंददुलारे ।
ते सुनके भई बावरी चंचल मन कछु सूजत नाही ॥ कैसी० ॥ ४

अघहनमों अघहर बरत करत है पुजत देवी कुवारी ।
मागत दे भीक जनमजनमको दे कथ ये बनवारी ।
जमुनाजिके तट निकट बिराजत ठाडे भये पुतनारी
साथ लियो ब्रिजबाल गोपालजु पीतपट कास सोहाई ॥ कैसी० ॥ ५
पुसनमों कछु पूसन पावोरि पूरन भई है उदासी ।
जाय गह्यो मन प्रभुपायनसों गृहधनआस निरासी ।
धुन सुन मुरलिकि बिकल भयो मन कुजमें जायके निकसी ।
हरिबिन कछु नहिं सूजत या मन बावरि भइ है लुगाई ॥कैसी०॥ ६
माहे मासमों मनसिज मारे बाजत थंड घनेरी ।
तकियातोषक नरम न्याहली कछु नहिं लागत प्यारी
मारी अटारिके डारी निरखत नेनन कुजबिहारी
खडरस मोहे मीठो न लागत बन्सी चित्त चुराई. ॥ कैसी० ॥ ७
फागणमासमों खेलत फागनको सब मिलया ब्रिजनारी
ग्यानगुलाल और ध्यानअबिरकी हात लिई भरजोरी
भक्तीको रंगसुरग बनायोरी प्रेमभरे पिचकारी ।
ऐसी भई मतवारी सखी सब कान्हकु देखन आयी ॥ कैसी० ॥ ८
चेतनमों मधु चित्त चितावत कामि भई मृगनैनी ।
आंबके बनमांही किलकत कोकिल बोलत अमृतबानी
ब्रिजराज बिरहकी मारी भई तब मोहन लाग सुहानी ।
मुराले नहीं सखी मोहनी डारी नांद सुनी ललचाई ॥ कैसी० ॥ ९
बैशाखमासमों आइ उदासी झारत जब रुखपाती ।
तैसे हीं डार सिंगार जो हरिबिन भरभर आवत छाती
आधि रैन मोहे चैन परे नहीं कुजमों ढूंडन जाती ।
बावरी भई जैसी खाई बिजया सारी सूध गमाई. ॥ कैसी० ॥ १०
मास भये दस हेरत बाटके तो सखी जेठही आयो ।
दास उदासके आस मिलि बेगी सुभ सकुनही दिखायो ।
बाहुवा फरकत बाजुसा लपलप लपके नैन चलावो ।
आयी दूती कही मोसों सखि ! चल बेगी कान्ह बुलाई.॥ कैसी०॥ ११
आयी आखाडमों आस पुरी मन पुरनानंद भयोरी ।
या तनकुजमों श्रीगुरुगोविंद आतमाराम निहारी

समरस रम रह्यो मानसरूपमों वृत्ति भई अविकारी ।
देवनाथप्रभु अंतरबाहिर छाय रह्यो सबमांही ॥ कैसी० ॥ १२
प्रभु सुंदर मुरली बजाई या तनमों सब द्वैत मिटाई ॥

## पद ( ४३० )

चलोरी सखिया ब्रिजको छाड जैये ॥ ध्रु० ॥
मुरली बजावत राग आलापत ॥
बावरी करत कहांलो सहिये ॥ चलोरी० ॥ १
जैसे सिखावत नंद जसोमन ॥
चोरी करत कहांलो कहिये ॥ चलोरी० ॥ २
कुंज गलीबिच रोकत टोकत ॥
डारत कर छतियाको छुये ॥ चलोरी० ॥ ३
देवनाथ प्रभुनाथ निरंजन ॥
गावत वेद या भेद न देये ॥ चलोरी० ॥ ४

## पद ( ४३१ ).

आधि रैन सैन कान्ह बन्सी बजाई ॥ ध्रु० ॥
बासरिकी टेर हेर बिसर गयी सगरी ।
डार घरबार निसग बावरी भईरी ॥ १
कुंजनमों जाय सखी हरिपद लपटाय रही ।
छूटे तनभास सकल भूल परि ये माई ॥ २
देवनाथ सुनत कान तान लहर वाकी ।
ध्यान लगत मस्त भयो आपरूपमांही ॥ ३

## पद ( ४३२ ).

मतवारे तूं ऐसी क्या बन्सी बजाई
मे तेरे प्रीतसे धाई ॥ ध्रु० ॥
आधि रैन सुख चैन पियासग । सोवत नींद न आई ॥ १
कान परी धुन हो भई बावरि । बिंद्राबन दौरी आई ॥ २
आग लगे जल जावे ये बन्सी । सौतन किने बनाई ॥ ३
देवनाथप्रभु नाथनिरंजन । ऐसी धूम मचाईरे ॥ ४

## पद ( ४३३ )

बर्जा कान्ह बन्सी तेरी । जालिम वे ॥ ध्रुवपद ॥
सोवतथी मैं अपने पियासग । धुन कटियारी मारी ॥ जालिम० ॥ १
बन्सी न ही येतो बैरनसाची । सोवहि मोहेघरी ॥ जालिम वे ॥ २
नाद भरी मन कछु नहिं सूजत। उधरि मैं आई दौंगी ॥जालिम०॥ ३
देवनाथप्रभु नाथनिरंजन । बन्सी नहीं मोहनि डारी ॥जालिम वे॥ ४

## पद ( ४३४ ).

ऐसी केसी बन्सी बजाई । बिंद्रावनवासी ॥ ध्रुवपद ॥
मधुर बजी तेरी बन्सीकी धुन । सोवत निंद न आयी रे ॥ऐसी०॥ १
सोवत जागत बैठत उठत । आन घुसे मनमाहो ॥ ऐसी० ॥ २
तोडी असावरी राग आलापत । गावत तान सवाई ॥ ऐसी० ॥ ३
तान सुनी मन हो गयो बावरो । मोहे कछु सूजत नाहीं ॥ऐसी०॥ ४
देवनाथप्रभु दासी बिहरी मैं । तू मे प्राणगुसाइ ॥ ऐसी० ॥ ५

## पद ( ४३५ )

बन्सी बजावनहारे । अब कर हो दया मोपे ॥ ध्रुवपद ॥
नंदके नंदन कसनिकंदन । गौवनके रखवारे. ॥ अब० ॥ १
श्रीजगजीवन व्यापक जगमें । वेद कहे ललकारे ॥ अब० २
या मनमोहन दीनोद्धारण । शाम सुरत घनकारे ॥ अब० ॥ ३
बेग करो जी । न देर लगावो । राधाजूके प्राणप्यारे ॥ अब० ॥ ४
देवनाथप्रभु ऐसो कीजे । ननन रूप निहारे ॥ अब० ॥ ५

## पद ( ४३६ ).

हे मतवा र । ऐसी क्या बन्सी बजाई रे ॥ ध्रु० ॥
आधि रैन सुखचैन पियासग सोवत नींद न आई ॥ १
कान परी धुनि हो गयी बावरी वृंदावन दौरी आयी ॥ २
आग लगो जल जावो ये बन्सी सौतन कौन बनाई ॥ ३
देवनाथप्रभु नाथनिरंजन ऐसी क्या धूम मचाई ॥ हे० ॥ ४

## पद ( ४३७ ).

ब्रिजम होरी राधा गोरी खेलन आयी ॥ ध्रु० ॥
सात सखी सग लई वृंदावन दौर आई ।

ढुंडत हर कान्हजीको, कुंजबीच पायी ॥ २
ग्यानरंग लयसुरंग, धरत ध्यान बजत चंग ।
देख नयन रूप भऱ्यो, होत मगन धाई ॥ २
देवनाथप्रभुको रूप, निरख भई आपरूप ।
भेद सबही डार हरीमाहही समाई ॥ ब्रिजमें ॥ ३

## पद ( ४३८ ).

दइमारे कैसी बन्सी बजाई ॥ ध्रु० ॥

कान परी धुन, मोह लयो मन । या तनकी कछू सुध नहि पायी ॥ १
काम न धामकि, फाम नहीं कछु । ब्रिंदाबन दौरी आयी ॥ २
बन्सि नहि येतो बैरन सूजत । बाजत डाकन कौन बनाई ॥ ३
देवनाथप्रभु नंदुलारे । बिनदेखे मोहे चैन परे नहीं ॥ ४

## पद ( ४३९ )

अधरधरिरिया श्याम ! मुरली बजाई ॥ ध्रु० ॥

सुनत धुन मन कछू नहिं सूजत ।
भूली सुद कछु सुधर न पाई ॥ १
कानडा अडाना सोहनी अलापत ।
रामकली मीठी रागनि गाई ॥ २
सुनतहि छाडो सब घरधंदा
चौकपरी ब्रिजाकि या लुगाई ॥ ३
देवनाथप्रभु गोविंदजीके ।
चरणनसो अरी प्रीति लगाई ॥ ४

## पद ( ४४० )

बैरन रैन गई गइरीमा ॥ ध्रुवपद ॥

दूनि गई भई बैरन आई । चैन परे नहिं मनुवा तरसे ॥ १
कैसा करु कछु सूजत नाही । हरबिन हो मोहे कछु न सुहावे ॥ २
ढूंडत कुंजनबिच नहिं पायो । काहां गयो अरि अजहु न आयो ॥ ३
देवनाथप्रभु छैल छबेला । जावो कोई मोहे लाय मिलावो ॥ ४

## पद ( ४४१ )

अचरे भयो मनहीमो आज । आज सखोरी ॥ ध्रु० ॥
बेर भइ दूती अजहू न आई । शामसलोनेकी खबर न पाई ॥ १
कहां भयो कछु समज न आवे । बिंद्रावनविच कोन रमावे ॥ २
देवनाथप्रभु यहे नटनागर । नैनन आयो नंदकिसोर ॥ ३

## पद ( ४४२ ).

उधोजि प्यारे, मनकी मनमो रही ॥
जो कुछ भइ सो भई । उधोजि प्यारे ॥ ध्रु० ॥
गोकुल छांडके मथुरा आई । ब्रिजकु आग दई ॥ उधो० ॥ १
हमारी अखिया भरभर आई । नैनन गंगा बही ॥ उधो० ॥ २
पापी अकुर कहासो आया । दुःखपर दाग दई ॥ उधो० ॥ ३
बिनति सुनो मेरी देवनाथप्रभु । कुबरीनें जादु किई ॥ उधो० ॥ ४

## पद ( ४४३ )

होरी खेलन आयो मतवारोरी ॥ ध्रु० ॥
कुंजमो गुंजत ग्वाल लिये संग ॥
नंदको नंदन कारोरी ॥ होरी० ॥ १
या ब्रिजमो सखि धूम मचोरी ॥
ठारो अहिरको छोरोरी ॥ होरी० ॥ २
निरखत छबिया शाम छबिलकी ॥
कोटिसुरज नख वारोरी ॥ होरी० ॥ ३
देवनाथप्रभु अंतर बाहेर ॥
नैनन रूप निहारोरी ॥ होरी० ॥ ४

## पद ( ४४४ )

खेलुंगी आज मैं होरी । प्रभुनाथजी संग ॥ ध्रुवपद ॥
रूप भऱ्यो जगमाहे अनुपम । जाउंगी हू बलहारी. ॥ खेलुंगी० ॥ १
ग्यानगुलाल और ध्यान अबिरकी । हात लई भरझोरी ॥ खेलुंगी० ॥ २

---

टीपः—४४२ हें पद सुरदासांचें असें आता कळलें.

आतमरंग सवाईसों मारुंगी । प्रेम भरी पिचकारी ॥ खेलुंगी० ॥ ३
देवनाथप्रभु नाथ कृपालसों । कबहू न रहुंगी मैं न्यारी ॥ खेलुंगी० ॥ ४

## पद ( ४४५ ).

को खेले तोसु होरी । ठग जारे ! कन्हय्या ! ॥ ध्रुवपद ॥
मथुराके बाटमों रोकत घाटको । काहेकु घगरिया फोरी ? ॥ ठग जा० ॥ १
सुंदर श्याम सुहानि मूरत ऐसी कैसी मतमारी ? ॥ ठग जा० ॥ २
कुंजगलीबिच आन अडावत । मोरी काहेकू बहिया मरोरी ॥ ठग जा० ॥ ३
देवनाथप्रभु नंददुलारे । तुम जीते हम हारी ॥ ठग जा० ॥ ४

## पद ( ४४६ )

होरी खेलन आयी या ब्रिजकी ब्रिजराणी. ॥ ध्रुवपद ॥
लालगुलाल पहेरी सारी अंजनदृगू मृगनयनी ॥ होरी० ॥ १
ढुंडत बिंद्रावनकुंजनमों । गोरसकी रसदानी. ॥ होरी० ॥ २
आयो बसंत बिलासन कुंजमों । कोयल बोलत बानी ॥ होरी० ॥ ३
कुंजगलीबिच पायो कन्हय्या । मूरत श्याम सुहानी ॥ होरी० ॥ ४
हात गुलाल भरे भर मूठी । मार रहे मनमानी ॥ होरी० ॥ ५
देवनाथप्रभु नाथ निरंजन । मंद हस मुसकानी ॥ होरी० ॥ ६

## पद ( ४४७ )

होरी खेलन आयो कन्हय्या राधा गोरी ॥ ध्रुवपद ॥
श्याम सुंदर मनमोहन या घन- । श्यामकी है छब न्यारी. ॥ होरी० ॥ १
रंग भऱ्यो भरपूर अनुपम । कंचनकी पिचकारी ॥ होरी० ॥ २
श्रीनंदलाल गुलाल भऱ्यो । खुशियाल खडे बनवारी. ॥ होरी० ॥ ३
साथ लये अहीरनके छोरे । गावत हैं ललकारे. ॥ होरी० ॥ ४
देवनाथप्रभु नाथ निरंजन ब्रिजराज बिहारी. ॥ होरी० ॥ ५

## पद ( ४४८ ).

चल श्यामसुंदर मनमोहन खेलन आयो जी । ॥ ध्रुवपद ॥
बादर भये लाल उडत गुलालसों । छूटत रंगकी फुवारी. ॥ चल० ॥ १
बिंद्रावनके कुंजगलिनमों । ठाडि भयी ब्रिजनारी ॥ चल० ॥ २
देवनाथप्रभु नाथ निरंजन । श्रीनंदलाल बिहारी. ॥ चल० ॥ ३

## पद ( ४४९ )

देख सुरत एक लागि नैनसों नैन भेद कर दिया
गुरूने जोगन मुजकू किया ॥ ध्रुवपद ॥
एकदिन सखिया मस्त दिवाना, सुन्य मंदिरमों खडा
फकिर मुजे देखदेखके अडा ॥
मद मत्सर भाइचद मारे, खिनखांडेसों लढा
जाके कामकोधसों भिडा ॥
मानगुमान मार भगाई, अहंकारकु तोडा ।
फेर त्रिकुटशिखरपर चढा ॥
टीप ॥ अरस परस कर दरस दिखाया अरूप रूप हो गया. ॥ गुरूनें० ॥ १
आसामनसा जबरदस्त थे, कपडे छिनके लिये ।
त्रिगुनके बधे बाल छुडाये ॥
पंचतत्वके भेर भडार उसी वखत लुटाये ।
पाप जनमजनमके धोये ॥
गंगाजमुनासरसतिसंगम तिरिया तीर्थमो न्हाये ।
धोके जननमरणके खोये ॥
टीप ॥ शांतीविभुत चढाई बदनपर बहोत दिलासा दिया ॥ गुरूनें० ॥ २
नव थिगलेकी कथा गले बिच, ग्यान कफनि पेन्हाई ।
कानमो प्रेममुद्रा चढाई ॥
जतसतकी मेरे कांदे झोली, विवेकलकरी दिई
साइनें उमर मेरी बढाई ॥
अनुहत बाजा बजत घडयाळ, करायेन जप हो रही
घरघर अलक फेरि जगाई ॥
टीप ॥ दृश्य ब्रह्मकर भवरगुफमो हात पकर ले गया ॥ गुरूनें० ॥ ३
नैनन दरमिच छुटे फवारे दीनरयन सब गई ।
सुरजबिन चांद उजाला सही ॥
लखलख तारे झमके सारे, तुर्या उन्मनि भई ।
अखियां जर्द गर्द हो रही ॥
खुली समाधी हरदम जागे घटघटमों निजसाई
सच्चा गोविंदनाथ है तू ही ॥
टीप ॥ देवनाथप्रभु नाथ निरंजन, दिलसों दिल मिल गया ॥ गुरूनें० ॥ ४

## पद ( ४५० )

अपने घटमाहि बे । भटकता क्यों फिरता भाई । गुरूकू देख॥ध्रुवपद ॥
दृश्य मायासों निसदिन मन लागा बे । बाप महतारित्रिया जागा ॥
पूत और भ्राता । हरे हरे पूत और भ्राता ॥
पसुधन चित लागा बे । अंतको छन जावत भागा ॥
बधन पडा । हरे हरे बधन पडा ॥
नाहक प्रितधागा बे । कोउ न साथि एक होगा ॥
छांडके जावे । घरकू आवे । तोहिकु बनमांहि बे ॥ भटकता० ॥ १
सन्मुख तेरे सद्गुरु है ठारा बे । देख दृग्भर वाको चेहरा ॥
लाल और सफेत श्यामरग गहेग बे । वामों नीलबिंदु नाग ॥
बीच जगमगे । हरे हरे बीच जगमगे ॥
अहाल प्रीत प्यारा । बे जाको नहिं अत न पारा ॥
सोहं जाप । आपहि आप । उन्मनी है सोही बे ॥ भटकता० ॥ २
भवरगुंफामों निसदिन प्रभु खेले बे । सोही जगनगमों झुले ॥
उस तेजोसें । हर हर उस तेजोसें ॥
कोटि रवि न तुले बे । देखकर अगन चांद भूले ॥
लछलय लगा । वामो मन डोले बे । बहता अमृत वो पीले ॥
घनन घडियाल । बाजता ताल । करबिन जप वोहि बे ॥ भटकता० ३
गुरुकिरपासों भवबधन छूटे बे । सुनतहि जब छाती फाटे ॥
सज्जन गये । हरे हरे सज्जन गये ॥
जाना उस बाटे बे । जननमरनका बध काटे ।
जिसपर दयाल गुरु नजर उलटे बे । उसे देवनाथ ताठ गाठे बे ॥
पुरन भरपूर, रहो चकचुर तुजमें तूंहि बे ॥ भटकता० ॥ ४

## पद ( ४५१ ).

चूहे बादल उडे गगनसों कव्वा तीर चलावे
बकरीनें जद बाघ पछाडा बाघ कोन छुडावे । १
सद्गुरु बाहवाजी । खेल तुमारा कैसाजी ॥
गुगा बात बहेरेसो कहता अधा कुरान बाचे ।

दुडेनें जद ढोल बजाया लगडा क्या खुब नाचे ।
सद्गुरु बाहवाजी । खेल तुमारा कैसाजी ॥ २
देवनाथकी अमृतवानी सुनो मोरे भाई ।
उलट भेद है सद्गुरुघरका बिरला समजे कोई ।
सद्गुरु बाहवाजी । खेल तुमारा कैसाजी ॥ ३

## पद ( ४५२ )

गुरू दर्याव, दर्याव आप तूहीबे । देखले अपने घटमाहीं ॥ ध्रु० ॥
तूही जल निर्गुण, निर्गुण भरा पूराब । सगुण की उठ तेरी लहरा ॥
तुहि मीन भया, भया बिम्ब सारा । तुजेबिन दुजा नहीं थारा ॥
तेरी है माया, माया सब तूहीबे ॥ देखले० ॥ १
तूही जल भया, भया पवन पानीबे पचतत्वकी सब कथनी ।
पानी बिन नही । नही चार खानीबे । पानीकी गई चार बानी ।
समजकर बूझ बूझ तयी भाईबे ॥ देख० ॥ २
पानीसे भये, भये तन च्यार बे । स्थूल सूक्ष्मका हुवा बिचार ।
कारण महा, महाकारण सारबे । भया सब जलका आकार ।
तुहि मेहर मेहर है तूहि ब ॥ देखले० ॥ ३
त्वमूपद ततूपद, तत्पद असि नाम बे भया सब जलका महरम ।
तेरी तुज नही, नही रहि कामबे । तुहि जल तत्व भया सोह ।
बात सुन बिचार, बिचार कर ओहो ॥ देखले० ॥ ४
जलने भये, भये देव सारे । ब्रह्मा विष्णु शिव प्यारे ।
चांद और सूरज, सुरज तेज न्यारे । जल मायाने घेर मारे ।
बेद जल भया, भया देत गाहीबे ॥ देखले० ॥ ५
जलरूप आत्मा, आत्मा प्रगट । . . ।
समज मन भुले, भुले आपनी बाटबे माया जालसे भई झूट ।
किचडमों फसा, फसा नाहक ओही ॥ देखले० ॥ ६
आपकु देख, देख आप होना काम कल्पना दूर करना ।
मगन मस्तान, मस्तान होय रहना बना आकार रैन सपना ।
समज ले ख्याल, ख्याल नेग तुहि ॥ देखले० ॥ ७
निगुरा जाने, ज्याने क्या ग्यानकु । खबर मालुम गुरू ग्यानीकु ।

भरोसा नहीं, नहीं तन रहनेकु । सबही आसा है जानेकु ।
आया न गया, गया येक रहिये ॥ देखले० ॥
गुरू दर्याव, दर्याव भरा बांका । बिरला खोज करे बांका ।
मेहर बलभीम, बलभीम धनी सिरका । नाथ गोविंद नजर देखा ।
कहे देवनाथ, देवनाथ बात फटका । घाट चढ बैठा उन्मनिका ।
आप बिन दुजा, दुजा नही कोई ॥ देखले० ॥ १

## पद ( ४५३ )

अपने मनकी न काहुसो कहिये ॥ ध्रु० ॥
जाविध राखे रामदयाघन । ये मन सज्जन । ताविध रहिये ॥ १
जो गुरु करे पूरण इच्छा ना लो भली बुरी सबहुकी सहिये ॥ २
देवनाथप्रभुको रुप नैनन निरखत बिच मन समरस रहिये ॥ ३

## पद ( ४५४ )

प्रीतकी कठीण रीत निभाना ॥ ध्रुवपद ॥
यह जगमे कोई नाहिं है आपना । मन मिले प्रीत काहुसो करना ॥ १
जोले कृपा करे नाथ दयाघन तबले भली बुरी सब किहु सहना ॥ २
देवनाथप्रभु सच्चा साहेब । देखत नैनमों मस्तहो रहेना ॥ ३

## पद ( ४५५ )

हम तो बैरागी बैरागी । निजरूपसो लय लागी ॥ ध्रुवपद ॥
ग्यान ध्यानका अचला । बांधा दिल मायासो बिचला ॥ हम० ॥ १
शांती बभुत लगाई । मनकी दुग्धा मार भगाई ॥ हम० ॥ २
चुद फुला है जरदा । वामों लाल सुफेदी फरदा ॥ हम० ॥ ३
रतिपति मार लुढाया । जनसतका लंगोट चढाया ॥ हम० ॥ ४
श्रीगुरु गोविंद नैना । बन रहे देवनाथ मस्ताना ॥ हम० ॥ ५

## पद ( ४५६ )

कर लेबे साचे पीर । दिलबिच कर ले बे साचे पीर ॥ ध्रु० ॥
ग्यानसुधा गुरुमुखसे निकसत पीले मुख निहूर । ( ! ) ॥ १
फाटे जमीन और अस्माना नेक न छांडे धीर ॥ २
देवनाथप्रभु गुरुगोविंदजीके कदम कछु हो नीर ( ! ) ३

### पद ( ४५७ )

पावोगे सुजान । गुरुविन कैसे ग्यान ॥ ध्रु० ॥
स्वारथ सीख सिख भयो सयानो । तो भी तूं अजान ॥
अनुभवको सुख जानत विरला । परि तित लय धरे ध्यान ॥
देवनाथप्रभु नाथनिरंजन व्यापक सर्व समान ॥ पावोगे ॥

### पद ( ४५८ ).

पिपीलिकासो ब्रह्मतलोंजी ये जग भरा पसारा, ।
उलट कमलमें नैन निहारो ब्रह्मरूप ये सारा. ॥ ध्रुवपद ॥
नीजरूपसों आप बिराजे आत्मा गुरु अलबेला ।
चीन्हो ताको मगन हो रहो पियो प्रेमरसप्याला. ॥ पिपीलिकासों० ॥ १
प्याला पीया ऐसा जीसे नाथ निरंजन सूझे ।
ऐसा मर्द कोन है ठाडा वचन साधुका बूझे ॥ पिपीलिकासों० ॥ २
नरनारायन आपहि तुम हो जो गुरुपदरस पीयो ।
देवनाथ कहे पलटो यारो । अजरामरपद पावो ॥ पिपीलिकासों० ॥ ३

### पद ( ४५९ )

खासा ये तन पाया, यारो । समझो कछु हित अपना ।
आया है सो जावे देखो दुनिया दो दिन सपना ॥ ध्रुवपद ॥
मरना हक है, उधार जीना, नाम धनीका जपना ।
साई पाक नजर कर देखा, क्या मायामों खपना ? ॥ खासा० ॥ १
हुकुम पीरमुर्षदका मानो, मगरूरी ना करना ।
नेक राहसों चलना बाबा । आखरकू है मरना. ॥ खासा० ॥ २
फकीर होके जिकिर मिटावो अव्वल खासा रस्ता ।
जलदी पकडो नहिं तो डाले फासी आया फिरस्ता ॥ खासा० ॥ ३
करो सितावी मर्दो । उठके पीरकदमसो मिलना ।
ये ससारहाटको लेखा रात बसे दिन चलना ॥ खासा० ॥ ४
जोरूलडकेसमधिजवाई कोई साथ ना आवे ।
हाथी घोडा मालमवेशी झूटा सबही जावे ॥ खासा० ॥ ३
पीरनाथगोविंदमेहरसों दुग्धा मार भगाई ।
देवनाथ मस्तान हमेशा रबसे प्रीत लगाई ॥ खासा० ॥ ५

## पद ( ४६० )

खासी यह नरदेहि रे । बाबा । आवनकी फेर नाही ॥ ध्रुवपद ॥
पाप पुन्न समभागा भया, तब आपहि प्रगट सुहाई ।
आतमग्यानकी पेटी सुहावन याबिच राजत साँई ॥ खासी० ॥ १
लखचौऱ्यासी फेरा फिरा तब भागसो पुरन पाई ।
अमोल ये जावल है घडियां समजत ना हित कोई ॥ खासी० ॥ २
या बिच आतमाराम बिराजत बेदनकी है ग्वाही ।
सो निजसार बिचार कर देखिये आप भरो जगमाही. ॥खासी०॥ ३
आप भरो जगमाही कैसो देख बिचारके येही
सरन हो नाथनिरंजनको और गुरुबीन मारग नाहीं. ॥ खासी० ॥ ४
श्रीगुरुनाथगोविंददयाघन व्याप रह्यो जगमाही ।
देवनाथ प्रभु सुमरो या मन गुरुबिन मारग नाही ॥ खासी० ॥ ५

## पद ( ४६१ )

निगुरे ! क्या किया बे ' ॥ क्या किया ॥ ते जन्म अकारत खोया ॥ध्रुवपद॥
माबाप और भाई कबीला । आपना करके भाया बे ! ॥ निगुरे० ॥ १
जोरूलडकेसमाधिजबाई । मोहजाल लपटाया बे । ॥ निगुरे० ॥ २
भाग पुरब तासो पाई । खासी ये नरकाया बे । ॥ निगुरे० ॥ ३
या तन आतमाराम न चिन्हो । जनम अकारत खोया बे ! ॥निगुरे०॥ ४
बिखयबिखको प्याला पीको । दिलमस्तान झूला बे । ॥ निगुरे० ॥ ५
देवनाथ कहे फिर जलदीसों । नाहकके भरमाया बे । ॥ निगुरे० ॥ ६

## पद ( ४६२ ).

त्रिकुट शिखरपर अलखनिरंजन करते बादशाही ।
खननन खनम्नन नोबत बाजे अनुहात घाई ॥ धृ० ॥
नव दरवाजे बावन पायऱ्या बनाया सगीत ।
छस्सो एकविस हजार शिपाई बडे जबरदस्त ।
रातदिन है गस्त उनोंकी फिरगई द्वाही ॥ १
ॐ सोहं दो छडीदार है नित करते अर्जी ।
अटल तक्तपर बैठे बादशाह मनकेमनमौजी ।
आपहि कर्ता सब दुनिया कू दुजा नही कोई ॥ २

बडी फजरकी बैठक देखो अमोल एक जोर ।
मुक्त मोतिके मंडप छाये अगले भीतर ।
चम चम चम चम बिजली चमके नैननमो छायी ॥ ३
नहीं किसीसे काम साई एकही पैछाना ।
तीन तालके ऊपर बस्ती उनका ठिकाना ।
देवनाथगोविंदनिरंजन उनके पग ध्यायी ॥ ४

## पद ( ४६३ )

गुरुपद पायाजी । अनुभव आयाजी ॥ ध्रु० ॥
सद्गुरुनें जद किरपा कीन्हीं चिद्घनतख्त बिराजे ।
तन्मय छत्र विचित्र सुहावे अनुहत डंका बाजे ॥ १
द्वैतदलन करनेमे मिलाया दैवीसपत फौजा ।
देखतही सब शत्रू मिट गये इसविध मै हू राजा ॥ २
सारविचारविवेकसो नेमधरमसो जागे
मुक्ती बिरती तुरयामह मिल रहू फिर बेद बखाने ॥ ३
भंगतजगतमों मिलगये इसविध नामनिशान फडके ।
त्रिभुवनका सब खल हमारा जमकी छाती तडके ॥ ४
जगमग जोत निरामय देखी क्या कहू अजब तमाशा ।
देवनाथप्रभुनाथ दयाल झूले मस्तान हमेशा ॥ ५

## पद ( ४६४ ).

प्यार मौज थईं गुरुघरकी ।
बाजे अनुहत झनकार उलट नैननकी ॥ ध्रु० ॥
गोल्हाट मंडल चलेर जोगी सोहं तुतारी बाजत सिंगी ॥
अनुहतका बाजा मंडगी । षट्चक्रपर फिरकी ॥
सुन समाल रे गुरुघरकी । प्यारे ॥ १
ब्रम्हरध्रका रंग है काला पंचम बेद उन्मनी वाला ॥
परायवाणी गुरु मतवाला । देवनाथ अलबेला ॥
दसवी खिडकी प्यारे ॥ २

## पद ( ४६५ ).

अंतसमयको आवे यारो ! कालजालको फेरा ।
गुरुबिन, या जग सबही भरा है, कोन छुरावनहारा ! ॥ ध्रुवपद ॥

भागपूर भला खुला, तासों पाया नरतनु खासा ।
महाल मुलुख क्या करना । यारो ! आखर जंगल वासा ॥ अत०॥ १
भाई बंद और जोरु लडके कोई नहि आपना साथी ।
आपना करके भूले, यारो ! होगी तनकी माती ॥ अत० ॥ १
देवनाथ कहे समझो बाबा । जो चाहे हित अपना ।
सच्चा है गुरुनाथ निरंजन दुनिया दो दिन सपना ॥ अत० ॥ ३

## पद ( ५६६ )

बिना भगत भगवान भजनबिन कहु कैसे भवतरण,
काल शिर करनें बैठा हरन ॥ ध्रुवपद ॥
नहीं काम बेफाम हुवा तैं, नही खबर तुझे जरा ।
बिखय बिस गर्द जदमें परा ॥
हुवा सर्द तैं मर्द नही बेचहा दर्दनें घेरा, ।
अकलगुम बेसुध होकर परा ॥
याद पकर, मन ठौरहि धरके, गुरु दरवाजे खरा ।
जाय बेनाहक भ्रमसो भरा ॥
दयाल श्रीगुरुराज देव रमराज दृदका पुरा
पलकमें चुके कालका फेरा ॥
मान बचन, अनुमान डारके जाय, पकर गुरुचरन ॥ काल० ॥ १
कहां माडि और कहां अटारी कहा दौलत रथ घोडे ।
काल जब आन छातिसों भिडे ॥
माइबाप और भाइ कबीला लडके छोटे बडे
कोइ नहिं नजीक रहते खडे ॥
जलदी जलदी उठाव मट्टी, पुकार यहि सब पडे ।
कि जब तन तेरा अचेतन पडे ॥
झूटी काया झूटी माया बटे रोग ये बढे
खुसी हो बजाय जम चौघडे ॥
कोउ नहिं अपना, सपना सारा, पकड ग्यानकी धरन ॥काल०॥ २
ग्यान देहि येही अपने, देख सुरत कर जरा ।
बनाया अजब तन्हे पींजरा ॥

अंदर तोता राज करता, घटघटमांहे भरा ।
सुरत महबूब पाक चेहरा ॥
नाहि काला नहिं पीला नीला नहीं लाल नाहिं हरा ।
रंगबिन रंग खुब एक नरा ॥
वो तो तूही, तुजबिन कोई और नहीं दुसरा ।
गुरूबिन ग्यान मिलेना पुरा ॥
मनसाफीसों गुरूचरणसो भाव पकर, हो शरन ॥ काल० ॥ ३
गुरमेहरसो चुके कहर, दिलदार बहार वो मिले ।
हमेषा मस्त मगनमों झुले ॥
रामनामकी नौबद बाज, ग्यानगोदरी गले ।
सुनोजी भाग उनोके खुले ॥
आपहि अपने साथी गुरु फिर आपहि अपने चेले, ।
आपमों आप भये मतवाले ॥
अजब खेल साहबका जिसका भाग उसीकू मिले ।
कि निगुरे मायामों जा भुले ॥
देवनाथ कहे साच चुकावे गुरू जनम और मरन ॥ काल० ॥ ४

## पद ( ४६७ ).

प्यारे । उलट कमलमो पलट, देख ले मौजा ।
सब घटमों नाथ बिराजा ॥ ध्रुवपद ॥
नर लाल हुवा बेहाल, पडा भ्रमजाला ।
क्यों फिरता भटका भूला ॥
ते, डार सुधारस घटकु, बिखय बिखप्याला ।
पीकर हुवा मतवाला ॥
चढ आवे तुजपर काल फौजसों आला ।
को होय तेरा रखवाला ॥
इस मायामों एक तरन गुरु महाराजा ॥ सब० ॥ १
मैं हू वे कहांका कोन कहासे आया ।
ये सार बिचार न पाया ॥
मा बाप बहेन और भाइ कबीला माया ।
मैं मेरा कहा डुबवाया ॥

ससार नरकका मूल, नाहक लपटाया ।
कर याद गुरू वस्ताद, पकर ले पाया ॥
सुन, छमा ढाल ले हात ग्यानको नेजा ॥ सब० ॥ २
कर हुकुम, फौजमें बाजे कालका डंका ।
तुझे काम नही ले नाम पीर मुर्षदका ॥
हो सवार सावुतीसो घोडा मनका ।
चढे सवारीसेले बडा सुरतगड बाका ॥
सुन सुनो जी, भनसिंग किलेदार है व्हांका ।
गुरुग्यान चढा नीशान, पकड ले पटका ॥
भवजाल तोड जजाल करले हाजा ॥ सब० ॥ ३
हो निर्मल, आपने हितकु तवज्जु करना ।
गुरु ग्यान सुनावे कान, बतावे नैना ॥
प्यारे ! देख, कमलबिच मगन आप हो रहेना ।
नहि कमाल ये धन माल रैनका सपना ॥
साचकर मान सिपाही दिलजान नहिं रे तन अपना
जम फोड पटेका तोड नजरमों रखना ॥
प्यारे ! अजब फौजमें बाजे अनुहत बाजा
लै हुवा ख्यालपे मगन बिराजे राजा ॥ सब० ॥ ४
सुन मेहरबान हनुमान धनी है आला ।
ततनाक किया है पाक, कमल उजियाला ॥
अब दिया नाथके हात पिलाया प्याला ।
दस्तान चढा मस्तान हुवा मतवाला ॥
गैबतका बाजे तास घनन घडियाला ।
गुरुग्यान समज कर बुझे लाखमों बिरला ॥
कहे देवनाथ सुन बात खुदा नहिं दूजा ॥ सब० ॥ ५

## पद ( ५६८ )

घटघटमों बिराजे निरंजन सांई रे । ॥ ध्रुवपद ॥
निर्गुणज्योति स्वरूप सदाघन्द नैननमों छब छाई ॥ घट० ॥ १
रूप न गून अनाम अगोचर व्याप रह्यो सुखदाई ! ॥ घट ॥ २
देवनाथ प्रभुनाथ निरंजन आपहि आन न कोई ॥ घट० ॥ ३

## पद ( ४६९ )

गुरुकृपाका अंजन पाया मेरा मै जानू ।
आप रूप नयनोंमें छाया मेरा मै जानू ॥ ध्रुवपद ॥
उलट मार्गकी रही बतायी मेरा मै जानू ।
बुरे करमकी रेख मिटायी मेरा मै जानूं ॥ गुरुकृपेका० ॥ १ ॥
चांद्सुरजबिन परा उजाला मेरा मै जानूं ॥ गुरुकृपेका० ॥ २
पिलाया अजरामरका प्याला मेरा मे जानूं ।
जहां तहां मै आप अकेला मेरा मै जानू ।
आपहि गुरु और आपहि चेला मेरा मै जानूं । गुरुकृपेका० ॥ ३
गोविंदनाथनें यहि बतलाया मेरा मै जानूं ॥
देवनाथ अपनेमें मिलाया मेरा मै जानूं. ॥ गुरुकृपेका० ॥ ४

## पद ( ४७० ).

सुनरे सुन मनुवा रे सुन मनुवा । काहे फिरे बनबनवा ॥ ध्रु० ॥
जल भव भर रह्यो पुरा । सच्चा साहेब नाथ हमारा ॥ १
इस घटमो प्रभुराजा । आत्मा आपहि आप बिराजा ॥ २
देवनाथ गुण गावे । मेहर फिरके अजमत पावे ॥ ३

## पद ( ४७१ )

तुम सदा मगनमों डुलो । मूरखसे मत बोलो ।
तुम पियो ब्रह्मरसप्याला ॥ ध्रु० ॥
होट न हाले कंठ न बोले । सुस्मरणमें झुलो ॥
अंदर बाहिर एकही धडा ।उलटनयनपट खोला ॥
जहांतहां वो आप अकेला । साहेब मेरा रंगेला ॥
इडापिंगलासुषुम्ना बाला । त्रिवेणीसगम मेला ॥
त्रिकुटघाटबीच बडी मौज है । चंद्रासुरज उजियाला ॥
शिवसनकादिक अनुभवप्याला । वोही वचनकू पाला ॥
आदिअंतमें गुरू भरा है । कहे देवनाथ रंगीला । अलबेला ॥ तुम० ॥

## पद ( ४७२ ).

चोर गुज ले जावे ये । अब तुम जागत रहो भाई ॥ ध्रु०॥
इस नगरीमें गैबी पडा किसे खबर ना पाई ।

एकवीसहजारछेसों गठडी दीन रातमों खोई ॥ १
कायानगरमों चोर बैठा नाभीकमलकेमांही ।
सुगरा होय तो जागत रहेगा निगुरा गाफल सोई ॥ २
बडे बडे मदूर चोरोंने लूटे खाकधूलसे मिटवायी ।
हिंदूमुसल्मीन सबकू लूटा चोर अंत ना पायी । ३
सब संतननें दिया धेंडोरा कोई मानते नहीं ।
देवनाथनें गुरूकदमपर दौलत सब लुटवाई ॥ ४

## पद ( ४७३ )

अब कर दिल् दिवाने पाक ॥ ध्रुवपद ॥
ममक्षत नहिं या केसा सिखाऊ । नहिं उमजल नापाक ॥ १
भगतजुगतमों परगट रहना । अपना पानी राख ॥ २
देवनाथप्रभुनाथनिरंजन । आखर तनकी खाक ॥ ३

## पद ( ४७४ )

मुर्षद् मेरा यार । मनवा क्या किसिसे दरकार ॥ ध्रु० ॥
बदा सांईका सेवक संतोंका । उसका करते प्यार १
दिलसे गाता सांइकु रिझाला । तापर जाने वार ॥ २
देवनाथके प्रभुनाथ गोविंदजी । त्रिभुवनके सरदार ॥ ३

## पद ( ४७५ )

राम न जाने काहा जिया भला बे ॥ ध्रु० ॥
बापदादा जम लेगयो । निर्चिंत बैठो तेरो बडो हिया बे ॥ १
नरदेह पायके आत्मा न चीन्हे । जनम अकारत खोया बे ॥ २
रामरस छाडके क्या पियो मूरख । बिखयबिखरस पीया भला बे ॥ ३
देवनाथप्रभु गोविंदजीके चरण कभु नहिं छुया बे ॥ ४

## पद ( ४७६ ).

दो दिनकी जिंदगानी । भलाबे ॥ ध्रु० ॥
यह तन जावे फेर नहिं आवे । आखर कुकनाकनी ॥ भला बे० ॥ १
जीना उधार है हक है मरना कबु ना करना मनी ॥ भला बे० ॥ २
देवनाथप्रभु नाथनिरंजन भज ले गुरु सुखदानी ॥ भला बे० ॥ ३

## पद ( ४७७ ).

साथी कोइ नहिं अपना वे । । दुनिया दो दिन सपना वे ॥ ध्रुवपद ॥
मायाखेल झूट पसारा मृगजलसाच दिखावे । ।
भूला नर जो इस जलम्याने फिर फिर गोता खावे ॥ साथी० ॥ १
बहेनभाईसंगेकबीला नाहक कहता मेरा ।
काल आवेगा ले जावेगा कोउ नहीं होला तेरा ॥ साथी० ॥ २
चौऱ्यासीमें फिरते फिरते उत्तम नरदेह पाया ।
भूला भूला फिरे दिवाना अबहु समज ना आया ॥ साथी० ॥ ३
आपहि अपने साथ संगाती, दुजा कोउ नहिं आवे ।
जान बूझकर अंधा होता आखरकू पस्तावे ॥ साथी० ॥ ४
धन माल जाता यारो । पास कछु नहिं रहता ।
हरिभजनमों चित्त न लागे तो तो बैठे गोता ॥ साथी० ॥ ५
खाविंद हमारा नाथ गोविंदा पूर्णब्रह्म मैं जाना ।
हरिभजनकी नौबत बाजे देवनाथ मस्ताना ॥ साथी० ॥ ६

## पद ( ४७८ )

भली फकीरी छांड जिकीरी न रख किसीसों काम रे ॥ ध्रुवपद ॥
गाता फिरता जगमों रिझाता । क्यों चाहता ते दाम रे । ॥ भली० ॥ १
धनकामिनिसों लपट ख्योके । पकुडे झूटे चाम रे । ॥ भली० ॥ २
दुजी दौलत मार नसेपर ले हरजीको नाम रे । ॥ भली० ॥ ३
देवनाथप्रभु देख नजरमों सच्चा आत्माराम रे । ॥ भली० ॥ ४

## पद ( ४७९ )

या जग भऱ्या तो क्या करना जी ? ॥ ध्रुवपद ॥
भाऊबंद और पूत लुगाई । अंत न कोऊ आपना ॥ या जग० ॥ १
रैन बसे दिन उठे चल वे । । दुनिया सब सपना ॥ या जग० ॥ २
देवनाथप्रभु नाथ निरंजन । निरखत पग धरना ॥ या जग० ॥ ३

## पद ( ४८० ).

धनमालमवेशी क्या करना ? ।
दो दिनकी है जिंदगानी यारो आखरकू है मरना ॥ ध्रुवपद ॥
दोहा ॥ रात बसे और दीन चले, ये संसार है हाट ।
सौदा लेके बिरला निभा बडा बिकट है घाट ॥ अजी धन० ॥ १

भुलाभूला क्यों फिरे, कर दिल दिवाने ! पाक ।
आखरकू पस्तावेगा, होगी तनकी खाक ॥ अजी धन० ॥ २
टीप ॥ भाईबंद जोरु लडका आखरकू कोई नही आपना रे ! ॥धन०॥ १
दोहा ॥ देख अमरपद अमर नहीं, क्या सपत क्या राज ।
काल आवेगा ले जावेगा, जैसे तितरको बाज ॥अजी धन०॥ १
नंगा होकर आना जाना कोई नहिं आवे साथ ।
कालजालसी परी है, गहरि अंधेरी रात ॥ अजी धन० ॥ २
टीप ॥ देवनाथ प्रभुनाथ गोविंद निरख निरख पग धरना रे ! ॥धन०॥ ३

## पद ( ४८१ )

तैं जनम अकारत खोया रे ॥ ध्रुवपद ॥
जोग जुगतकी रहनि न जानी, कपडे रंगे तो क्या किया ! ॥ तै०॥१
दोहा ॥ कासि बनारस द्वारका, तीरथ करी गया ।
उपर खासी काया रसी, मनका मल नहिं धोया ॥ बे तै० ॥ १
हित करनेकों ये तन दीयो, सो हित तैं नहिं चाहा ।
धनमाल मालमस्तान हैं मन दामनपर ललच्याया ॥ बे तै० ॥ २
टीप ॥ आतमग्यानकी ये तन क्यारी, बीज नहीं बोया ॥ बे तै० ॥ १
दोहा ॥ जानीके जंगलमों सुसरी फनकी नाहाकके भरमाया ।
माया अधारी रात परी, भरपुर निंद भर सोया ॥ बे तै० ॥ १
आत्मामन इस देहीमों, जानत नहिं कच्छु पर या ।
आतमग्यानकी साचि करामत, गुरुकिरपा नहिं पाया ॥ बे तै० ॥ २
टीप ॥ देवनाथ प्रभुनाथ गोविंद सब घटमों ग्हो छाया ॥ तैं० ॥ ३

## पद ( ४८२ )

हो तैं जान दिवाने सचा । अबतैं हो गुरूका बचा ॥ ध्रुवपद ॥
अपने हितके काजे हमहुम न माने सो कादा ।
कुटनगी ( ? ) दीक्या कह जाने मरा मावना पुदा ॥ हो तैं० ॥ १
कोन किसीका खेस कबीला कोउ नहिं किसीका भाई ।
सब घटम्याने साहेब सचा देख तमाशा यही ॥ हो तैं० ॥ २
आपहि आपना बाप म्हतारी आपहि अपना बेटा ।
आपहि अपना गुरुपिरचेला कालकहरसें छूटा ॥ हो तैं० ॥ ३

आपहि आप मगनमों रहेना बोधभंगमों धुंदा ।
नरकाचा फेर न आवे नाहक हुवा है अंधा ॥ हो तैं० ॥ ४
देवनाथ ये कहत पुकारे मायामों जग गंदा ।
हमतो निकसे फेरफटककर साविंद नाथ गोविंदा ॥ हो तैं० ॥ ५

## पद ( ४८३ )

भई भोर ऊठ जाग मनवा । हरीभजनकी बिरियारे ॥ ध्रु० ॥
बिना भगतके जीवन कैसो छीजत जात काया रे ।
ये तन आतमग्यानकी क्यारी ब्रह्मबीज नहिं बोया रे ।
नैन निहारे देख प्यारे झूटी सबही माया रे ।
देवनाथप्रभुनाथनिरंजन ये जग सब है छाया रे ॥ भई भोर० ॥

## पद ( ४८४ )

सबमों फुंद कर मरत क्या फंद कर निंदले कालके संद पर न. ।
मंत्रको साद कर भुजंगमन बाद कर अनहातके नादमों धुंद करना ।
ध्यानको छंद धर ग्यानको बंद करके माया मद बेचंद फिरना ।
देवनाथगोविंद कर देख जगद्वंद हर आतमानंदरस बृंद चरना ॥

## पद ( ४८५ ).

शास्त्रको सीख सीख सयानो भयो, झट आतमाको
विचार, नाहि कैसेके रहतु है ।
अहंब्रह्म कहे रहे, अहंकार भ्रम पऱ्यो, आकार अरु
निरकार भिन्न भिन्न कहतु है ।
ग्यानको भंडारतो मुखहिमें विराजमान. सबहि
ब्रह्मता कोनहीं गहतु है ।
निर्हेतु ब्रह्म करी तू कछु और भयो देवनाथ कहत
मिश्रीको बोझो गधो जो बहतु है ॥

## पद ( ४८६ )

रमते नाथ फकीर । कोई दिन याद करोगे ॥ ध्रु० ॥
कोई दिन ओढे शालदुशाला । कोई दिन भगवे चीर ॥ १
कोई दिन खावे मेवामिठाई । कोई दिन पीवे नीर ॥ २

कोई दिन चढते पालकी घोडा । कोई दिन सिरपे अबदागीर ॥ ३
कोई दिन तोषक नरम न्यहाला । कोई दिन जमीन शरीर ॥ ४
कोई दिन पहेरे जरहि जव्हाग । कोई दिन भोडे शरीर ॥ ५
कोई दिन बस्ती कोई दिन जंगल । कोई दिन गंगातीर ६
कोई दिन झोली तुंबा बगलमों । चारखूट जहागीर ॥ ७
कोई दिन फिरते मस्त दिवाने । मार लुटाई फिकीर ॥ ८
कोई दिन सोते कोई दिन बैठे । करते साईंका जिकीर ॥ ९
कोई दिन हसते कोई दिन रोते । मारे फत्तर तीर ॥ १०
आपहि राजा आपहि रका । आपहि पाशा वजीर ॥ ११
सुनेचो लोगो समजो थारो । नहिं मिलनेके फीर ॥ १२
कहत हैं बारहि बार पुकारे । ना समजे काफीर ॥ १३
साई हमारे नाथ गोविंदा । रमते तापी तीर ॥ १४
देवनाथ प्रभुनाथ निरंजन । साहेब सचा पीर ॥* १५

## पद ( ४८७ ).

कहु बालक कहु तरुन म्हतारा । कहु सज्जन कहु कुटिल धुतारा ॥ ध्रुवपद. ॥
कहु अंधा कहु बहिरा मूका ऐसो बहुरंगी मैं देखा. ॥ कहु० ॥ १
कहु बम्हन कहु बन रह्यो सेखा । ऐसो बहुरंगी मैं देखा ॥ २
कहु माली कहु नाइ चोखा । ऐसो बहुरंगी मैं देखा ॥ कहु० ॥ ३
देवनाथ मनवा रूप अटका । ऐसो बहुरंगी मैं देखा कहु० ॥ ४

---

* १ पहिलें हें पद खाली दिल्याप्रमाणें अपुरें छापलें होतें:-

रमते नाथ फकीर । कोई दिन याद करोगे । ॥ ध्रुवपद. ॥
कोई दिन बैठे पालकि घोडा । कोई दिन शिरपे अबदागीर. ॥ कोई० ॥ १
कोई दिन वोढे शाल दुशाला । कोई दिन भगवे चीर. ॥ कोई० ॥ २
कोई दिन धोती है लगोटी । कोई दिन नंगे पीर ॥ कोई० ॥ ३
कोई दिन खासा पलग बिछानो । कोई दिन जमिनपे शीर ॥ कोई० ॥ ४
कोई दिन महलोम्थानें सोते । कोई दिन गंगातीर ॥ कोई० ॥ ५
कोई दिन खेलते हसते रोते । करते नामाजिकीर. ॥ कोई० ॥ ६
मस्त भये मतवाले आशयमां लुटायी फिकीर ॥ कोई० ॥ ७
देवनाथप्रभु नाथ निरंजन । सच्चे साहेब पीर ॥ कोई० ॥ ८

## पद ( ४८८ ).

ऐसो मन जान । या जग हरसमान ॥ ध्रु० ॥
आपहि सब घटमटजलथमों ।
भर रह्यो है पुरन या जगदीस ॥ ऐसो ॥ १
जित देखो उत अंतरबाहर ।
रम रह्यो रोमरोम लालछबीला ॥ ऐसो ॥ २
देवनाथप्रभु व्याप रह्यो है ।
नैनन छाये येही गुरुग्यान ॥ ऐसो ॥

## पद ( ४८९ )

मै तो नहीं जानी । ऐसो करें हो गोपालजी ॥ ध्रु० ॥
कहासो आयी बहू पुतया कौनको पाछे ।
लगायो यौंही काल जजालजी ॥ १
सबही गवायो जपध्यान तपसाधन ।
दुसियारो भयो मन बहोत बेहालजी ॥ २
करम दयो आगे पाछ दयो पट कायके ।
काहा कियो मोरो राजा गोकुलग्वालजो ॥ ३
या भवजलमाहे डुबत हो नाथजी ।
देवनाथ प्रभुदाता ये ब्रिजलालजी ॥ ४

## पद ( ४९० ).

जुगजुग जीयो । हरिभजनके साथी ॥ सज्जनहरी० ॥ ध्रु० ॥
कहना सुनना कछून करना नामधनी का लेना ।
और कछु नहीं कीयो ॥
या हरजीको प्रेमभजनमे मगनमस्त रहिया ॥ जुगजुग० ॥ १
मनुगत मनुजा उत्तम मनुवा बारबार नहिं कीयो ।
रामरामकृष्ण गोविंद कहो नामरसको पीयो ।
आत्मा आपन आप बिराजे .....
देवनाथप्रभु गुरुगोविंदके शरणागत तू रहियोरे ।
गुरुरूपासो तूंहि ब्रह्म है समाधिसमरस रहियो ॥ जुगजुग० ॥ ३

## पद ( ४९१ )

ये संसार बडो दुखदायी, निपट कालको रगडो ।
नेह लगावो, हरसो यारो ! नाम कभू ना छोडो ॥ ध्रुवपद ॥
जो तुम हमसों प्रीत लगाई, सो दिनदिन पैं बढती हैं ।
की जो यारो ! और कछु नहीं, यही हमारी विनती है ॥ ये० ॥ १
कल तो होगा कूच हमारा, ख्याल फक्कीरी रमता है ।
तुम चारोंके प्रेमप्रीतसो भई दो दिनकी गमता है ॥ ये० ॥ २
भली बुरी कछु निकसी वाणी, अपना करके जानो है ।
देवनाथ प्रभु फक्कर कहे यारो ! बुरा कोऊ मत मानो है ॥ ३

## संशयित पद ( ४९२ )

मुरलीवाले छेलछबेले क्या दिल तेरे बोल भला ॥ ध्रु० ॥
दिईदिखाई हमखुन पाई ये मन मेरा अपचिचला ॥ १
चलिरिमों फर्क किया मन गर्क बिखयमों ।
यही कारण सरक करना दुनिया ये तो नेक भला ॥ २
राह बीचकी चिथिया लेके लपटा गांडसो धड मारने लागी ।
भूक तब चटनीरोगी खडरस खाना बिरथा ऊपर जाहे मिला ॥ [illegible]
गुरुगोविंदगोपाळ लाल बहाल किया ते बिकभाकी ।
जालडाल ने कबु हमकू तूहीं समाल कालकला ॥ [illegible]
ये ही मत तेरे फेर देर क्यों अलकखलक भरपूर ।
पलकमों उठाव घोडे खडे; यार नहिं टलने दूर ।
क्या माविंदा शिरकू देवनाथ रखवाला ॥ ५

ग्रा. क्र. ११८८

REFBK-0001188